श्रीशंकर

सार्थ योगरत्नाकर

(मूळासह मराठी भाषांतर)

भाग १ ला

भिषजां साधुवृत्तानां भद्रमागमशालिनाम् ।
अभ्यस्तकर्मणां भद्रं भद्रं भद्राभिलाषिणाम् ॥

—अष्टांगहृदय.

भाषांतरकार
वैद्यराज दत्तो बल्लाळ बोरकर, इसलामपूरकर.

संशोधक
परशुराम लक्ष्मण वैद्य
संस्कृत शिक्षक, न्यू इंग्लिश स्कूल, पुणें

प्रकाशक
यज्ञेश्वर गोपाळ दीक्षित
बुकसेलर आणि पब्लिशर, बुधवार पेठ, पुणें

सन १९१७

किंमत ३॥ रुपये

मुद्रक
अच्युत चिंतामण भट, यशवंत छापखाना, कसबा पेठ, पुणें.

श्री.

अर्पणपत्रिका.

हा ग्रंथ

आयुर्वेदाविषयीं आदर असणाऱ्या आणि
आयुर्वेदाची अभिवृद्धि इच्छिणाऱ्या
आमच्या आश्रयदात्यांस
प्रेमपूर्वक अर्पण
करितों.

प्रकाशक

यज्ञेश्वर गोपाळ दीक्षित

बुकसेलर बुधवार पेठ

पुणें शहर.

प्रस्तावना

कायचिकित्सेवरील अग्निवेशादि ऋषींनीं लिहिलेल्या संहितांनंतर व शल्यचिकित्सेवरील सुश्रुतसंहितेनंतर प्रायः वैद्यकावर स्वतंत्र रीतीनें ग्रंथ-रचना करणारे प्रतिभासंपन्न आयुर्वेदज्ञ निर्माण झालेच नाहींत म्हटलें तरी चालेल. चरकसंहिता व सुश्रुतसंहिता हे दोन महर्षिप्रणीत ग्रंथ सोडून दिले तर उपलब्ध असलेल्या अर्धवट स्वतंत्र ग्रंथांत सिंहगुप्तसूनु वाग्भट यांचे दोन ग्रंथ--अष्टांगसंग्रह व अष्टांगहृदय--हे अत्यंत उच्च दर्जाचे आहेत. या दोन ग्रंथांत ऋषिप्रणीत संहितांचें सार इतक्या उत्तम रीतीनें प्रतिबिंबित झालें आहे कीं, रक्तपुष्पांच्या सान्निध्यांत असणाऱ्या तेजस्वी व निर्मल अशा स्फटिकमणींखेरीज या दोन ग्रंथांला दुसरी उत्तम उपमाच देतां येणार नाहीं. या दोन ग्रंथांनंतरचे सर्व ग्रंथ बहुधा संग्रहरूपच आहेत.

ज्या काळांत अष्टांगहृदय तयार झालें, त्या वेळेसच रसचिकित्सेचा भारतवर्षांत जारीनें प्रचार होऊं लागला होता. शस्त्रचिकित्सा करणें लोकांना जड जाऊं लागलें होतें; काढे, बस्ति वगैरे रोगचिकित्सेचे प्रकार लोकांना त्रासदायक व कंटाळवाणे वाटूं लागले होते. काढे, चूर्णें, घृतें, तैलें, फांट, हिम, वगैरे औषधें आयत्या वेळीं तयार करणें शक्य नाहीं, व अगोदर तयार करून ठेविलीं तर हीनवीर्य होऊन फुकट जाणार! अशा स्थितींत रसगंधकयुक्त औषधांचा—रसचिकित्सेचा—जास्त प्रचार होणें साहजिक आहे. आजकालचे नामांकित भारतवर्षीय वैद्य पाहिले तर ते सुद्धां चरकानें किंवा वाग्भटानें वर्णिलेल्या चिकित्सापद्धतीचा अवलंब न करितां रसवैद्यका-वरच आपली सर्व भिस्त ठेवितात. एखाद्या वैद्य-घराण्याची प्रसिद्धि तर आजकाल त्याजपाशीं असलेल्या वंशपरंपरागत मात्रांवर व रसायनांवर अवलंबून असते, असें म्हटलें तर त्यांत बिलकूल अतिशयोक्ति नाहीं.

रसचिकित्सेचा याप्रमाणें जरी विजय झाला, तरी वनौषधिचिकित्सेचें निर्मूलन तिला करितां आलें नाहीं. या गोष्टीचें एक कारण असें आहे कीं, पारा, गंधक वगैरे औषधांचें शोधनमारण अत्यंत काळजीपूर्वक करावें लागतें, व त्यांत थोडी जरी न्यूनता राहिली तरी तिजपासून होणारे अपाय रोग्याला जन्मभर भोगावे लागतात. शिवाय हीं औषधें महाग व दुर्मिळ असतात; गरीब रोग्यांना हीं औषधें घेणें किंवा देणें जवळजवळ फार कठीण पडतें. आजकाल तर कलखापरी वगैरे खनिज पदार्थ खरोखरीचे मिळतात

कीं नाहींत, याविषयींहि संशय वाढूं लागला आहे. ही स्थिति वनौषधि-चिकित्सेची नाहीं. तींतील औषधें सुलभ आहेत; खेड्यापाड्यांतूनही त्यांपैकीं बरींच औषधें मिळूं शकतात; व त्यांपासून अपाय होण्याची फारशी धास्ती नसते. म्हणूनच वनौषधिचिकित्सेवर जनसमूहाचा विश्वासही आहे.

वर दिलेल्या कारणांमुळें संग्रहग्रंथकर्त्यांची प्रवृत्ति दोन्ही पद्धतींच्या चिकित्सेचा संग्रह करण्याकडे झाली असावी. मधुकरवृत्ति संग्रहग्रंथकारांनीं ज्या ज्या चिकित्सापद्धतींत कांहीं विशेष असें आढळलें, त्याचा संग्रह केलेला आहे; व वनौषधि आणि रसचिकित्सा यांतूनच केवळ नव्हे, तर युनानी औषधांचाही कोठें संस्कृत श्लोकांत तर कोठें अस्सल उर्दूत त्यांनीं संग्रह केला आहे. देशभेदानें प्रसिद्ध संग्रहकार निरनिराळे आहेत; बंगालमध्यें वंगसेन हा संग्रहकार होऊन गेला, व महाराष्ट्रांत शार्ङ्गधर, लोलिंबराज, व योगरत्नाकराचा कर्ता हे प्रसिद्ध ग्रंथकार आहेत. याशिवाय वैद्यामृत, वैद्यविनोद, वगैरे पुस्तकें आहेत; आणखीही पुष्कळ जुन्या परंपरागत वैद्यघराण्यांचीं बाडें कितीतरी असतील.

तथापि अशा रीतीनें बनत गेलेल्या औषधीबाडांपेक्षां योगरत्नाकराची योग्यता फार निराळी व मोठी आहे. योगरत्नाकर ग्रंथ बहुधा एकाच ग्रंथकाराच्या हातचा असावा असें दिसतें. कारण, आरंभापासून तों शेवटपर्यंत विषयविवेचनाची व औषधीयोगांच्या संग्रहाची पद्धति एकसारखी आहे; तींत कोठेंही यत्किंचित् सुद्धां बिघाड झाला नाहीं. या ग्रंथकारानें प्रथम चिकित्सेला उपयोगी अशीं सर्वसामान्य वैद्यकीय परिभाषा, अष्टविध-परीक्षा, कालज्ञान, द्रव्यांचे गुणदोष, दिनचर्या, रात्रिचर्या, ऋतुचर्या, रसोपरस व धातूपधातु यांचें शोधनमारण, वमनविरेचनादि पंचकर्मांची माहिती, कषायादि कल्पना, वगैरे प्रकरणें सुलभ व सुसंबद्ध रीतीनें संगृहीत केलीं आहेत; व नंतर ज्वरादि रोगक्रमानें निदान व चिकित्सा यांचा संग्रह करून शेवटीं वाजीकरण व रसायन हींही प्रकरणें संगृहीत केलीं आहेत. निदानवर्णन बहुतेक माधवनिदानावरूनच घेतलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. रोगांची चिकित्सा लिहितांनाही या ग्रंथकारानें सर्वत्र एकच पद्धति स्वीकारलेली आहे. यानें सर्व रोगांवर प्रथम रामबाण असे सोपेसे उपचार सांगितले असून नंतर क्रमानें काढे, चूर्णें, गुटिका, अवलेह, तेलें, तुपें, पाक व रसायनें अशा रीतीनें निवडक औषधीयोगांचा संग्रह केला आहे, व शेवटीं त्या त्या रोगावरील पथ्यापथ्यही दिलें आहे. या संक्षिप्त वर्णनावरून या ग्रंथाचें स्वरूप काय आहे, हें थोडक्यांत सर्वांचे लक्षांत

येईल. सुलभ विवेचनपद्धतीमुळें व अनुभविक औषधांच्या संग्रहामुळें वैद्यांना व वैद्यकीची आवड असलेल्या इतर जिज्ञासूंना हा ग्रंथ म्हणजे बहुमोल रत्न वाटेल, यांत शंका नाहीं.

या सर्व गोष्टींचा विचार केल्यावर वाचकांची, ग्रंथकर्त्याचें नांव जाणण्याची इच्छा साहजिक रीतीनें जागृत होईल; पण ती पूर्ण करण्याचें आमच्या हातांत नाहीं. ग्रंथकर्त्यानें आपल्या नांवाचा, देशाचा व कालाचा कोठेंही उल्लेख केलेला नाहीं. पण हा ग्रंथकार महाराष्ट्रीय–कदाचित् कोंकणांतीलही–असावा, असें ठरविण्यास बरींच सबळ कारणें आहेत. धान्यादि पदार्थांच्या गुणवर्णनांत यानें महाराष्ट्रीय पदार्थांचें विशेष वर्णन केलें आहे. सिद्धान्तवर्णनामध्येंही महाराष्ट्राला परिचित अशाच पदार्थांचें तो वर्णन करितो. या गोष्टींवरून तो महाराष्ट्रीय असावा असें अनुमान काढणें फारसें चुकीचें नाहीं. या अनुमानाला बळकटी देणारें आणखी एक प्रमाण असें आहे कीं, या ग्रंथाच्या उपलब्ध असलेल्या सर्व प्रती महाराष्ट्रांतीलच आहेत; इतर प्रांतीं याच्या प्रती उपलब्ध झाल्या नाहींत.

जरी या ग्रंथकर्त्याचें नांव-गांव नक्की माहीत नाहीं, तरी त्याचा कालनिर्णय करण्याचीं चांगलीं साधनें उपलब्ध आहेत. ग्रंथकर्त्यानें हा ग्रंथ तयार करितांना चरक, सुश्रुत, विदेह, निमि वगैरे तंत्रें, वाग्भट, माधवनिदान, वृंदमाधव, शार्ङ्गधर, वैद्यजीवन व वैद्यामृत वगैरे ग्रंथांचा उपयोग केला आहे. या ग्रंथमालिकेंतील वैद्यामृत हा ग्रंथ सर्वांत अर्वाचीन असून तो **मोरेश्वर वैद्य** यानें शके १६०३ या वर्षीं लिहिला, असें त्यानें आपल्या पुस्तकाच्या शेवटीं लिहिलेल्या श्लोकावरून सिद्ध होतें. आनंदाश्रमानें प्रसिद्ध केलेली योगरत्नाकराची आवृत्ति ज्या सात प्रतींवरून छापलेली आहे, त्यांपैकीं सर्वांत जुनी प्रत वे. **हरभट्ट लागवणकर** यांची असून तिचा लेखनशक १६६८ हा आहे. तेव्हां हा ग्रंथ शके १६०३ व १६६८ यांच्या दरम्यान केव्हां तरी तयार झाला असावा, हें सिद्ध होतें. वैद्यामृत या ग्रंथांतील उतारे घेण्याइतकी मान्यता त्याला येण्यास सुमारें २५ वर्षें लागलीं असें गृहीत धरलें, व १६६८ पूर्वीं या ग्रंथाच्या आणखी जुन्या प्रती असाव्या असें मानलें, तर हा ग्रंथ १६३०–५० च्या सुमारास रचला गेला असावा, असें म्हणण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं.

या ग्रंथाचें भाषांतर **वैद्यराज दत्तो बल्लाळ बोरकर** राहणार इसलामपूर यांनीं केलें आहे. आम्हीं प्रसिद्ध केलेल्या माधवनिदानाचेंही भाषांतर रा. बोरकर यांनींच केलें आहे. इतकें सांगितलें म्हणजे वाचकांस त्यांची

निराळी ओळख करून देण्याचें कारण नाहीं. रा. बोरकर यांनीं भाषांतर करितांना आनंदाश्रमाची व निर्णयसागरची संस्कृत प्रत यांशिवाय तीन लेखी संस्कृत प्रतींचा उपयोग केला आहे. त्यांपैकीं पहिली प्रत इसलामपूर येथील प्रसिद्ध वैद्य कै० **माधवराव वैद्य** यांचे चि. डॉ. **श्रीपाद महादेव वैद्य,** एल्. एम्. ऍण्ड् एस्. यांची असून ती अत्यंत शुद्ध असल्यामुळें तिचा त्यांस फार उपयोग झाला आहे. याशिवाय तासगांव येथील वे. **बाळाचार्य वैद्य** व विसापूर येथील वे. **शंकरशास्त्री नाटेकर** यांच्याकडील हस्तलिखित संस्कृत प्रतींचाही बराच उपयोग झालेला आहे. चुकलेले पाठभेद टीपेंत दाखवून योग्य पाठाच्या अनुरोधानेंच भाषांतर करण्याचा क्रम रा. बोरकर यांनीं पाळिला आहे. औषधींचे मराठी पर्यायशब्द देतांनाही त्यांनीं बरीच काळजी घेतली आहे.

शिवाय आमच्या कित्येक वैद्य मित्रांनीं ज्या सूचना केल्या त्यांबद्दल त्यांचे, आणि आमचे मित्र **वैद्यपंचानन कृष्णशास्त्री कवडे,** बी. ए. यांनीं या ग्रंथाची हस्तलिखित प्रत बरीचशी तपासून पाहिली त्याबद्दल त्यांचे आम्ही फार फार आभारी आहों.

मनुष्यकृति सदोष असावयाचीच. भाषांतरकार व संशोधक यांनीं आपली शिकस्त केली असूनही ग्रंथविस्तारामुळें चुका राहिल्या नसतीलच, असें म्हणतां येणार नाहीं; पण त्याला उपाय नाहीं. विद्वान् वाचकांनीं त्या दुरुस्त कराव्या व कर्त्यांना क्षमा करावी, हीच आमची विनंति आहे.

यज्ञेश्वर गोपाळ दीक्षित

प्रकाशक.

सार्थ योगरत्नाकर

भाग १ ला

अनुक्रमणिका

सार्थ योगरत्नाकर

रोगानुक्रमणिका

भाग १ ला.

ग्रंथाची विस्तृत अनुक्रमणिका आम्हीं दिलीच आहे. परंतु ती फारच मोठी असल्यामुळें ज्वरादि रोगांची अनुक्रमणिका पाहण्यास फार त्रास पडेल व लौकर पृष्ठांक सांपडणार नाहीं असें वाटल्यावरून सोईकरतां फक्त ही रोगानुक्रमणिका मुद्दाम दिली आहे.



सार्थ
योगरत्नाकर
रोगानुक्रमणिका
भाग २ रा.



श्रीशंकर.

सार्थ
योगरत्नाकर.

श्रीगणेशाय नमः । श्रीनृसिंहाय नमः । श्रीधन्वतरये नमः ।

मंगलाचरण.

शिवं हरिं विधातारं तत्पत्नीस्तत्सुतान् गुरून् ।
नत्वा समस्तप्रत्यूहशान्तये मङ्गलाय च ॥ १ ॥

मंगलप्राप्तीकरितां आणि विघ्नशांतीकरितां, शिव, हरी, ब्रह्मदेव, त्यांच्या (पार्वत्यादि) पत्न्या, त्यांचे (गजाननादि) पुत्र, आणि गुरु यांना नमस्कार करून (मी "योगरत्नाकर" नांवाचा ग्रंथ रचितों.)

वैद्यप्रशंसा.

अन्नदो जलदश्चैव ह्यातुरस्य चिकित्सकः ।
त्रयस्ते स्वर्गमायान्ति विना यज्ञेन भारत ॥ २ ॥

हे भारता, अन्नदाता, जलदाता, आणि रोग्याला औषध देणारा (वैद्य) हे तिघे यज्ञ केल्यावांचून स्वर्गास जातात.

रोगपङ्कार्णवे मग्नं यः समुद्धरते नरम् ।
कस्तेन न कृतो धर्मः कां च पूजां न सोऽर्हति ॥ ३ ॥

समुद्रासारख्या अपार रोगरूप चिखलामध्यें बुडालेल्या मनुष्याला जो त्यांतून सोडवितो, त्याच्या हातून कोणचा धर्म घडत नाहीं? आणि तो कोणच्या पूजेला (संभावनेला किंवा मानाला) पात्र होत नाहीं? (सारांश, तो सर्व प्रकारच्या पूजेला, संभावनेला किंवा मानाला पात्र आहे.)

वैद्यः पुरोहितो मन्त्री दैवज्ञश्च चतुर्थकः ।
द्रष्टव्याः प्रातरेवैते नित्यं श्रेयोविवृद्धये ॥ ४ ॥

आपलें कल्याण व्हावें अशी इच्छा करणारानें वैद्य, उपाध्याय, राजप्रधान, व चवथा ज्योतिषी ह्यांचें नित्य प्रातःकाळीं दर्शन घ्यावें.

गतश्रीर्गणकान् द्वेष्टि गतायुश्च चिकित्सकान् ।
गतश्रीश्च गतायुश्च ब्राह्मणान् द्वेष्टि भारत ॥ ५ ॥

हे भारता, ज्याची संपत्ति नष्ट झाली आहे असा मनुष्य ज्योतिष्यांचा द्वेष करितो व ज्याचें आयुष्य नष्ट झालें आहे असा मनुष्य वैद्यांचा द्वेष करितो; आणि ज्याची संपत्ति आणि आयुष्य हीं दोन्ही नष्ट झालीं आहेत असा मनुष्य ब्राह्मणांचा द्वेष करितो.

ज्यौतिषं व्यवहारं च प्रायश्चित्तं चिकित्सितम् ।
विना शास्त्रेण यो ब्रूयात्तमाहुर्ब्रह्मघातकम् ॥ ६ ॥

ज्योतिष. (ज्योतिष शास्त्रासंबंधाची माहिती), व्यवहार (न्याय), प्रायश्चित्त (एखाद्या निंद्य कर्माबद्दल धर्मशास्त्रांत सांगितलेला दानव्रतादि परिहार), व चिकित्सा (औषधी उपचार) ह्या गोष्टी शास्त्राध्ययनावांचून जो सांगतो त्याला ब्रह्मघातकी असें म्हणतात (म्हणजे त्याला ब्रह्महत्येचें पातक लागतें).

क्वचिद्धर्मः क्वचिन्मैत्री क्वचिदर्थः क्वचिद्यशः ।
कर्माभ्यासः क्वचिच्चेति चिकित्सा नास्ति निष्फला ॥७॥

रोग्याची चिकित्सा करण्यामध्यें केव्हां धर्म घडतो, केव्हां उत्तम मैत्रीचा लाभ होतो, केव्हां धनप्राप्ति होते, केव्हां केवळ यश (कीर्ति) मिळतें, आणि एखादे वेळेस निदान अनुभव (कर्माभ्यास) तरी मिळतो. सारांश, रोग्याची चिकित्सा करणें केव्हांही निष्फळ होत नाहीं.

जन्मान्तरकृतं पापं व्याधिरूपेण बाधते ।
तच्छान्तिरौषधैर्दानैर्जपहोमसुरार्चनैः ॥ ८ ॥

जन्मांतरीं (पूर्वजन्मीं) केलेलीं पापें व्याधीच्या रूपानें पीडा करितात. म्हणून औषधोपचार, दानधर्म, जपजाप्य, होमहवन, आणि इष्ट देवतेची पूजाअर्चा इत्यादिकांनीं त्यांचें शमन करावें.

व्याधेस्तत्त्वपरिज्ञानं वेदनायाश्च निग्रहः ।
एतद्वैद्यस्य वैद्यत्वं न वैद्यः प्रभुरायुषः ॥ ९ ॥

रोग उत्पन्न होण्याचें कारण नीट लक्षांत आणून त्यापासून होणारी पीडा दूर करणें एवढेंच वैद्याचें कर्तव्य आहे. वैद्य कांहीं आयुष्य देऊं शकत नाहीं.

अग्निमूलं बलं पुंसां रेतोमूलं च जीवितम् ।
तस्मात्सर्वप्रयत्नेन वह्निं शुक्रं च रक्षयेत् ॥ १० ॥

मनुष्याचें बळ जठराग्नीवर अवलंबून आहे आणि मनुष्याचें जीवित त्याच्या शुक्रधातूवर अवलंबून आहे. म्हणून वैद्यानें मोठ्या प्रयत्नानें रोग्याचा जठराग्नि व शुक्रधातु ह्यांचें रक्षण करावें.

जातमात्रश्चिकित्स्यस्तु नोपेक्ष्योऽल्पतया गदः ।
वह्निशस्त्रविषैस्तुल्यः स्वल्पोऽपि विकरोत्यसौ ॥ ११ ॥

औषधोपचारानें बरा होणारा (साध्य) असा कोणताहि रोग झाल्याबरोबर तो लहान आहे म्हणून त्याची हयगय करूं नये. कारण त्याची हयगय केली असतां तो अग्नि, विष किंवा शस्त्र ह्यांच्याप्रमाणें अपाय करितो.

निवृत्तोऽपि पुनर्व्याधिः स्वल्पेनायाति हेतुना ।
दोषैर्मार्गीकृते देहे शेषः सूक्ष्म इवानलः ॥ १२ ॥

ज्याप्रमाणें विस्तवाची लहानशी फुणगी ज्वलनसाहित्य मिळतांच वाढून तिचा मोठा अग्नि तयार होतो, त्याप्रमाणें नुकताच बरा झालेला व्याधि दोषांची अनुकूलता मिळतांच स्वल्प कारणानें देखील वाढून पूर्व स्थितीला येतो.

यावत्कण्ठगतप्राणस्तावत्कार्या प्रतिक्रिया ।
कदाचिद्दैवयोगेन दृष्टरिष्टोऽपि जीवति ॥ १३ ॥

जोंपर्यंत कंठामध्यें प्राण आहे म्हणजे श्वासोच्छ्वास चालतो आहे, तोपर्यंत औषधोपचार करीत असावें. कारण मृत्युचिन्हें दिसत असून देखील एखादे वेळीं दैवयोगानें रोगी वांचतो.

यथाशास्त्रं तु निर्णीतो यथाव्याधि चिकित्सितः ।
न शमं याति यो व्याधिः स ज्ञेयः कर्मजो बुधैः ॥ १४ ॥

शास्त्ररीत्या यथाविधि निदान व चिकित्सा (औषधोपचार) करून देखील जो व्याधि बरा होत नाहीं तो व्याधि कर्मज (पूर्वजन्मार्जित कर्मदोषानें झालेला) आहे म्हणून समजावें.

पुण्यैश्च भेषजैः शान्तास्ते ज्ञेयाः कर्मदोषजाः ।
विज्ञेया दोषजास्त्वन्ये केवला वाथ संकराः ॥ १५ ॥

पुण्यकर्मानें व औषधोपचारानें जे रोग बरे होतात ते कर्म व

दोष (प्रकृतिस्थ दोष) ह्या दोहोंपासून झालेले असतात असें समजावें. याखेरीज इतर रोग केवळ दोषजन्य किंवा मिश्र समजावे.

औषधं मङ्गलं मंत्रो ह्यन्याश्च विविधाः क्रियाः ।
यस्यायुस्तस्य सिध्यन्ति न सिध्यन्ति गतायुषि ॥ १६ ॥

औषधें, पुण्यकर्मे, मंत्रतंत्रादि अन्य क्रिया ज्या रोग्याचें आयुष्य बळकट आहे त्यालाच फलप्रद होतात ज्याचें आयुष्य संपलें आहे त्याला त्यांचा उपयोग होत नाहीं.

विकारनामाकुशलो न जिह्रीयात् कदाचन ।
न हि सर्वविकाराणां नामतोऽस्ति ध्रुवा स्थितिः ॥ १७॥

एकाद्या विकाराचें नांव समजलें नाहीं म्हणून वैद्यानें लज्जित होण्याचें किंवा घोटाळ्यांत पडण्याचें कारण नाहीं; कारण सर्वच रोगांचा नामनिर्देश शास्त्रांत केलेला असतो असें नाहीं.

नास्ति रोगो विना दोषैर्यस्मात्तस्माद्विचक्षणः ।
अनुक्तमपि दोषाणां लिङ्गैर्व्याधिमुपाचरेत् ॥ १८ ॥

ज्या अर्थी वातादि दोषांवांचून रोगच होत नाहीं, त्या अर्थी शास्त्रांत ज्याचें नांव अगर वर्णन नाहीं अशा रोगाची चिकित्सा दोषांच्या लक्षणांच्या अनुरोधानें करावी.

रोगमादौ परीक्षेत ततोऽनन्तरमौषधम् ।
ततः कर्म भिषक्कुर्याज्ज्ञानपूर्वं विचक्षणः ॥ १९ ॥

आधीं रोगाची चांगली परीक्षा करून नंतर औषधाची योजना करावी. त्यानंतर जी क्रिया करावयाची ती विचारपूर्वक करावी.

मूर्खश्चोरस्तथा म्लेंच्छो ब्रह्मघ्नो मत्स्यघातकी ।
द्वेष्टा च ग्रामकूटश्च वंचको मांसविक्रयी ॥ २० ॥
एतांस्तु व्याधिना ग्रस्तान्न कुर्याच्छमनक्रियाम् ।
तेषां जीवाप्तिसंदाता वैद्यो भवति पापभाक् ॥ २१ ॥

मूर्ख, चोर, म्लेंच्छ (क्रूर मनुष्य), ब्रह्मघातकी, मासे मारणारा, सर्व लोक ज्याचा द्वेष करितात असा, गांवकुटाळ, ठग, मांसविक्रय करणारा, ह्यांना रोग झाला असतां तो बरा होण्याकारितां उपचार करूं नये. कारण त्यांना रोगमुक्त करून जीवदान देणारा वैद्य पापी (पापाचा भागीदार) होतो.

दर्शनस्पर्शनप्रश्नैः परीक्षेत च रोगिणम् ।

रोगं निदानप्राग्रूपलक्षणोपशयाप्तिभिः ॥ २२ ॥

रोग्याला प्रत्यक्ष पहाणें, स्पर्श करणें, व त्याला होणाऱ्या लक्षणांविषयीं प्रश्न करून खुलासा करून घेणें, अशा तीन प्रकारांनीं रोग्याची परीक्षा करावी. आणि निदान, पूर्वरूप, प्रत्यक्ष होणारीं लक्षणें, उपशय, व संप्राप्ति अशा पांच प्रकारांनीं रोगाची परीक्षा करावी.*

पादचतुष्टय.

भिषग्द्रव्याण्युपस्थाता रोगी पादचतुष्टयम् ।
चिकित्सितस्य निर्दिष्टं प्रत्येकं तच्चतुर्गुणम् ॥ १ ॥

वैद्य, औषधी द्रव्य, परिचारक व रोगी ह्यांना पादचतुष्टय (वैद्यक्रियेचीं चार आंगें किंवा चार पाद) असें म्हणतात. ह्या प्रत्येकामध्यें आणखी चार चार गुण असावे लागतात.

दक्षस्तीर्थात्तशास्त्रार्थो दृष्टकर्मा शुचिर्भिषक् ।

आपल्या कामांत नेहमीं दक्ष असणारा, गुरूजवळ शास्त्राध्ययन केलेला, प्रत्यक्ष अनुभव मिळविलेला, आणि शुचिर्भूत असा वैद्य असावा.

बहुकल्पं बहुगुणं संपन्नं योग्यमौषधम् ॥ २ ॥

ज्या औषधाचे अनेक कल्प (चूर्ण, कषायादि) आहेत, किंवा जें अनेक प्रकारच्या योजनांनीं देतां येतें, ज्यामध्यें अनेक प्रका-

---

* ते पांच प्रकार असेः —

१. **निदान** – कोणताहि रोग उत्पन्न होण्याला जें कारण घडून येतें त्याला निदान म्हणतात.

२. **प्राग्रूप**– ज्यामध्यें एकाद्या विशिष्ट दोषाचा संबंध झालेला नाहीं असें, पुढें उत्पन्न होणाऱ्या व्याधीचें जें पूर्व चिन्ह त्यास प्राग्रूप असें म्हणतात.

३. **लक्षण** - रोगाचीं चिन्हें स्पष्ट दिसूं लागलीं म्हणजे त्यांला त्या रोगाचें लक्षण असें म्हणतात.

४. **उपशय**– रोगाच्या उत्पत्तीचें कारण व तो रोग ह्यांच्या उलट किंवा उलट परिणामाची क्रिया करणारा, असा—औषध, अन्न व व्यायाम इत्यादिकांचा जो सुखावह उपयोग त्याला उपशय म्हणतात.

५. **आप्ति**– स्वकारणांनीं दूषित झालेले दोष शरीरामध्यें इकडे तिकडे संचार करीत असतां रोग उत्पन्न करितात. त्या दोषांच्या संचाराला आप्ति किंवा संप्राप्ति असें म्हणतात. ह्यांविषयीं अधिक माहिती "सार्थ माधवनिदानां"त पहावी.

रचे रोगनाशक गुण आहेत, जें संपन्न (यथास्थित परिपक्वदशेंत असलेलें, आणि रोगाच्या व रोग्याच्या स्थितीला अनुसरून योग्य) असें चार गुणांनीं युक्त औषध असावें.

अनुरक्तः शुचिर्दक्षो बुद्धिमान् परिचारकः ।

आपल्या मालकावर प्रेम करणारा, शुचिर्भूत, कामाला तत्पर, आणि बुद्धिमान् असा परिचारक असावा.

आढ्यो रोगी भिषग्वश्यो ज्ञापकः सत्त्ववानपि ॥ ३ ॥

धनवान, वैद्य सांगेल त्याप्रमाणें वागणारा, आपली सर्व हकीकत यथास्थित सांगणारा, आणि धैर्यवान असा रोगी असावा.

दूतपरीक्षा.

दूतस्य प्रश्नाक्षरयोगसंख्या त्रिघ्नाष्टभाज्या प्रवदन्ति शेषे ।
समे च मृत्युर्विषमे च नैव विलोक्य वैद्याः खलु प्रश्नकाले ॥१॥

वैद्याला बोलावण्याकरितां जो दूत येतो त्याच्या प्रश्नाचीं अक्षरें मोजून त्या संख्येची तिप्पट करावी. आणि त्याला आठांनीं भागावें आणि शेष अंक रहातील त्यांजवरून फळ पहावें. सम अंक राहिले तर रोगी वांचणार नाहीं आणि विषम अंक राहिले तर रोगी वांचेल असें समजावें.

दूतो रक्तकषायकृष्णवसनो दण्डी जटी मुण्डित-
स्तैलाभ्यक्तवपुर्भयंकरवचा दीनोऽश्रुपूर्णेक्षणः ।
भस्माङ्गारकपालपाशमुशली सूर्येऽस्तगे व्याकुलो
यः शून्यस्वरसंस्थितो गदवतो दूतस्तु कालानलः ॥ २ ॥

तांबडें, भगवें किंवा काळें वस्त्र धारण केलेला, हातांत काठी घेतलेला, मस्तकावर जटा असलेला, मुंडण केलेला, अंगास तेल लावलेला, भयंकर भाषण करणारा, दीन, ज्याचे डोळे पाण्यानें भरले आहेत असा, भस्म धारण केलेला, हातांत निखारे, कपाळ, किंवा मुसळ धारण केलेला, सूर्य अस्ताला जाण्याच्या समयास आलेला, व्याकुळ, ज्याच्या तोंडांतून शब्द निघत नाहीं असा, व रोगी अशा प्रकारचा दूत प्रत्यक्ष कालाग्नीप्रमाणें समजावा.

स्वज्ञातिः श्वेतवस्त्रो द्रविणयुतकरः क्षत्रियो ब्राह्मणो वा ।

तास्बूलास्यः सुशीलः शुभवचनवदः स्यात्प्रशस्तोऽत्र दूतः॥३॥

रोग्याच्या जातीचा, शुभ्रवस्त्र धारण केलेला, हातीं द्रव्य घेऊन आलेला, क्षत्रिय किंवा ब्राह्मण जातीचा, तोंडांत विडा असलेला, सुस्वभावाचा आणि शुभ भाषण बोलणारा, अशा प्रकारचा दूत उत्तम समजावा.

संध्याकाले तथा रात्रौ स्नानभोजनसंगमे ।
विपरीतेषु कालेषु न गच्छेत्तत्र बुद्धिमान् ॥ ४ ॥

संध्याकाळीं, तसेंच रात्रीं, स्नानाच्या वेळीं, जेवणाच्या प्रसंगीं आणि एखाद्या विपरीत वेळीं बुद्धिमानानें वैद्याच्या घरीं जाऊं नये.

न स्वप्याद्रोगिसदने न भुञ्जीयात्कदाचन ।
विनाह्वानं न गच्छेच्च न ब्रूयान्मरणं भिषक् ॥ ५ ॥

रोग्याचे घरीं वैद्यानें निजूं नये, भोजन तर मुळींच करूं नये. वैद्यानें बोलाविल्यावांचून रोग्याच्या घरीं जाऊं नये, आणि त्यानें रोग्याचें मरण सांगूं नये.

शकुन.

छत्रं गौर्द्विजकन्यकामिषसुरा पण्यांगना रोचनं
मांगल्यं नृपवाजिवारणदधि स्तोत्रादिपाठः शुभः ।
संगीतं करुणाभयानकमहारौद्रैर्विहीनं स्मर-
क्रीडाभावमनोहरं किमपि चेद्बालानि सद्योगिनः ॥ १ ॥

छत्र, गाय, ब्राह्मण, कन्या, (अविवाहित स्त्री, कुमारी) मांस, सुरा, वेश्या, गोरोचन, मंगल पदार्थ (दूध, नारळ, आम्रपल्लव इत्यादि) राजा, घोडा, हत्ती, दहीं, स्तोत्रपाठ, करुण रस, भयानक रस व रौद्ररस ह्यांखेरीज इतररसयुक्त संगीत (गाणें), स्मरक्रीडा, मनाला आल्हाद उत्पन्न करणारे पदार्थ, बालक आणि उत्तम प्रकारचे योगी, हे वैद्याला रोग्याच्या घरीं जातांना पुढें आले असतां शुभकारक समजावे.

मार्गच्छेदोऽहिमार्जारगोधासरटवानरैः ।
रोगिद्वाराभि निर्गच्छेन्मंगलं तदमंगलम् ॥ २ ॥

तसेंच रोग्याच्या घराकडे जातांना वैद्याला वाटेंत सर्प, मांजर, घोरपड, सरडा, वानर ह्यांपैकीं कोणी आडवीं गेलीं तर तो अशुभ

शकुन समजावा. तसेंच रोग्याच्या द्वारानजीक गेल्यावर रोग्याच्या घरांतून जर मंगल वस्तु बाहेर पडलेल्या दिसतील तर तें अमंगलकारक समजावें.

पुंनामा वामतः श्रेष्ठो गजखेचरवर्जितः ।
स्त्रीनामा दक्षिणे श्रेष्ठः शिवाश्यामाविवर्जितः ॥ ३ ॥

हत्ती व खेचर खेरीज करून इतर पुरुष जातीचे प्राणी डावे गेले असतां श्रेष्ठ समजावे. आणि कोल्ही (कोल्ह्याची स्त्री) व कोकिळा खेरीज करून इतर स्त्रीजातीचे प्राणी उजवे गेले असतां श्रेष्ठ समजावे.

दुर्गा काकस्तथा श्वान उलूकखरजम्बुकाः ।
निर्गमे वामतः श्रेष्ठाः प्रवेशे दक्षिणाः शुभा ॥ ४ ॥

कोकिळ पक्ष्याची स्त्री, कावळा, कुत्रा, घुबड, गाढव व कोल्हे हीं जनावरें घरांतून बाहेर जातांना डावीं गेलीं असतां उत्तम आणि घरांत प्रवेश करतांना उजवीं गेलीं असतां श्रेष्ठ समजावीं.

रोग्याचीं परीक्षणीय अष्ट स्थानें.

रोगाक्रान्तशरीरस्य स्थानान्यष्टौ निरीक्षयेत् ।
नाडीं मूत्रं मलं जिह्वां शब्दं स्पर्शं दृगाकृती ॥ १ ॥

रोगी मनुष्याची नाडी, मूत्र, मल, जिह्वा, (जीभ) शब्द, (स्वर, आवाज) स्पर्श, दृष्टि (डोळे) व आकृति (रूप, चेहरा) हीं स्थानें अवश्य तपासून पहावीं.

दोषकोपे घनेऽल्पे च पूर्वं नाडीं परीक्ष्य च ।
अन्ते चादौ स्थितिस्तस्या विज्ञेया भिषजा स्फुटम् ॥२॥

पुष्कळ किंवा थोडा जरी दोषांचा प्रकोप दिसून आला तरी प्रथम नाडीची परीक्षा करून तिची आरंभीची (नाडी हातीं धरल्याबरोबर दिसून येणारी) आणि शेवटची (नाडी हातांतून सोडण्याचे वेळीं दिसून येणारी) गति वैद्यानें नीट स्पष्ट रीतीनें समजून घ्यावी.

यथा वीणागता तन्त्री सर्वान्रागान्प्रभाषते ।
तथा हस्तगता नाडी सर्वान्रोगान्प्रकाशयेत् ॥ ३ ॥

जशी विण्याची तार गायनसंबंधीं सर्व राग बोलून दाखविते, तशी हातांमध्यें धरलेली नाडी सर्व रोगांना प्रकाशित करिते.

सर्वेषामेव रोगाणां निदानं कुपिता मलाः ।
तत्प्रकोपस्य तु प्रोक्तं विविधाहितसेवनम् ॥ ४ ॥

वातादि दोषांचा प्रकोप हा सर्व रोगांना कारणीभूत आहे. आणि अनेक प्रकारचे अहितकारक आहारविहार हे त्या वातादि दोषांच्या प्रकोपाला कारण होतात, असें वैद्यशास्त्रांत सांगितलें आहे.

निदानार्थकरो रोगो रोगस्याप्युपलक्ष्यते ।

एखादा रोग देखील दुसऱ्या रोगाला उत्पन्न करण्याला कारणीभूत होतो असें पहाण्यांत येतें.

आदौ सर्वेषु रोगेषु नाडीजिह्वाक्षिमूत्रतः ॥ ५ ॥
परीक्षां कारयेद्वैद्यः पश्चाद्रोगं चिकित्सयेत् ।

वैद्यानें आधीं नाडी, जीभ, आणि लघवी (मूत्र) ह्यांच्या द्वारानें सर्व रोगाची परीक्षा करावी. आणि नंतर त्याची चिकित्सा करावी.

नाड्या मूत्रस्य जिह्वाया लक्षणं यो न विन्दति ॥ ६ ॥
मारयत्याशु वै जन्तुं स वैद्यो न यशो भजेत् ।

नाडी, लघवी आणि जीभ ह्यांचीं लक्षणें ज्याला समजत नाहींत तो वैद्य प्राणाचा नाश करितो. शिवाय त्याला यशहि मिळत नाहीं.

लक्षयित्वा देशकालौ ज्ञात्वा रोगबलाबलम् ॥ ७ ॥
चिकित्सामारभेद्वैद्यो यशः कीर्तिमवाप्नुयात् ॥ ८ ॥

देशकालांचा विचार करून व रोगाचें बलाबल लक्षांत आणून वैद्यानें चिकित्सा करावी, म्हणजे त्याला यश व कीर्ति हीं प्राप्त होतात.

नाडीपरीक्षा.

नाडीमंगुष्ठमूलाधः स्पृशेद्दक्षिणगे करे ।
ज्ञानार्थं रोगिणो वैद्यो निजदक्षिणपाणिना ॥ १ ॥

रोग्याच्या प्रकृतीचें ज्ञान होण्याकरितां वैद्यानें रोग्याच्या हाताच्या अंगठ्याच्या खालच्या (मागच्या) बाजूची नाडी आपल्या उजव्या हातानें पहावी.

स्थिरचित्तः प्रशान्तात्मा मनसा च विशारदः ।
स्पृशेदंगुलिभिर्नाडीं जानीयाद्दक्षिणे करे ॥ २ ॥

शांतपणानें मन स्थिर करून नाडी जाणणाऱ्या वैद्यानें (रोग्याच्या) उजव्या हाताची नाडी (आपल्या उजव्या हाताच्या) तीन बोटांनीं पहावी.

प्रायः स्फुटा भवति वामकरे वधूनां
पुंसां च दक्षिणकरे तदियं परीक्षा ।
ईषद्विनामितकरं विततांगुलीकं
बाहुं प्रसार्य रहितं परिपीडनेन ॥ ३ ॥

बहुतकरून स्त्रियांची डाव्या हाताची व पुरुषांच्या उजव्या हाताची नाडी स्पष्टपणानें कळते. हातावर भार न देतां बाहूपासून हात पुढें पसरावा आणि तो मध्यें किंचित वांकवून बोटें पसरून धरून नाडीची परीक्षा करावी.

ईषद्विनम्रकृतकूर्परवामभागे
हस्ते प्रसारितसदंगुलिसंधिके च ।
अंगुष्ठमूलपरिपश्चिमभागमध्ये ।
नाडीं प्रभातसमये प्रहरं परीक्ष्य ॥ ४ ॥

हाताच्या कोंपराचा भाग खालच्या बाजूस किंचित् वांकवून, सांध्यापासून बोटें पसरतीं धरून आंगठ्याच्या मुळाच्या मागच्या बाजूस प्रातःकाळीं प्रहर दिवस येईपर्यंत नाडीची परीक्षा करावी.

वारत्रयं परीक्षेत धृत्वा धृत्वा विमोचयेत् ।
विमृश्य बहुधा बुद्ध्या रोगव्यक्तिं विनिर्दिशेत् ॥ ५ ॥

नाडी धरावी, पहावी, पुनः सोडावी. ह्याप्रमाणें वरचेवर तीनवेळ नाडीची परीक्षा करावी. आणि स्वस्थ चित्तानें चांगला विचार करून रोगाचें स्वरूप ओळखावें.

अंगुलित्रितये स्पृष्ट्वा क्रमाद्दोषत्रयोद्भवाम् ।
मन्दां मध्यगतिं तीक्ष्णां त्रिभिर्दोषैस्तु लक्षयेत् ॥ ६ ॥

आपल्या हाताच्या तीन (तर्जनी, मध्यमा, अनामिका) अंगुलींनीं नाडीला स्पर्श करून अनुक्रमें कफ, वात व पित्त ह्या तीन दोषांच्या मंद, मध्यम व तीक्ष्ण अशा तिन्हीहि दोषांपासून उत्पन्न होणाऱ्या तीन गति लक्ष्यांत घ्याव्या.

वातं पित्तं कफं द्वंद्वं त्रितयं सांनिपातिकम् ।
साध्यासाध्यविवेकं च सर्वं नाडी प्रकाशयेत् ॥ ७ ॥

वात, पित्त व कफ हे पृथक् तीन दोष; द्वंद्व दोष (वातपित्त, वातकफ, व कफपित्त,) आणि सान्निपात (वात, पित्त आणि कफ ह्या तिहींचा एकदम प्रकोप) तसेंच रोगाच्या साध्यासाध्यत्वाविषयीं विचार ह्या सर्वांचें ज्ञान नाडीपासून होतें.

स्नायुर्नाडी ततो हंसी धमनी धरणी धरा ।
तन्तुकी जीवनज्ञाना शब्दाः पर्यायवाचकाः ॥ ८ ॥

स्नायु, नाडी, हंसी, धमनी, धरणी, धरा, तंतुकी, जीवनज्ञाना, हे सर्व नाडीचे पर्यायशब्द आहेत.

सद्यःस्नातस्य भुक्तस्य तथा स्नेहावगाहिनः ।
क्षुत्तृषार्तस्य सुप्तस्य नाडी सम्यङ्न बुध्यते ॥ ९ ॥

नुकताच स्नान केलेला, जेवलेला, अंगास तेल लावलेला, भूक व तहान लागलेला व निजलेला अशा मनुष्याची नाडी बरोबर समजून येत नाहीं.

अंगुष्ठमूलभागे या धमनी जीवसाक्षिणी ।
तच्चेष्टया सुखं दुःखं ज्ञेयं कायस्य पण्डितैः ॥ १० ॥

अंगठ्याच्या मूळाचे ठिकाणीं जी जिवंतपणाची साक्ष देणारी नाडी असते, तिच्या गतीवरून वैद्यानें सुखदुःखाचें ज्ञान करून घ्यावें.

स्त्रीणां भिषग्वामहस्ते पादे वामे च यत्नतः ।
शास्त्रेण संप्रदायेन तथा स्वानुभवेन वै ॥ ११ ॥
परीक्षा रत्नवच्चास्यास्त्वभ्यासादेव जायते ।

वैद्यानें स्त्रियांची डाव्या हाताची किंवा डाव्या पायाची नाडी पहावी. शास्त्राचा अभ्यास, सांप्रदाय (गुरुपरंपरा) व नित्य येणारा स्वतःचा अनुभव ह्या तीन गोष्टींनीं रत्नपरीक्षेप्रमाणें केवळ नित्य अभ्यासानेंच नाडीच्या परीक्षेचें ज्ञान होतें.

वातनाडी भवेद्ब्रह्मा पित्तनाडी च शंकरः ॥ १२ ॥
श्लेष्मनाडी भवेद्विष्णुस्त्रिदेवा नाडिसंस्थिताः ।

वातनाडीच्या ठिकाणीं ब्रह्मदेव, पित्तनाडीच्या ठिकाणीं शंकर आणि कफनाडीच्या ठिकाणीं विष्णु ह्याप्रमाणें ह्या तीन देवता नाडीच्या ठिकाणीं वास्तव्य करितात.

अग्रे वातवहा नाडी मध्ये वहति पित्तला ।
अन्ते श्लेष्मविकारेण नाडी ज्ञेया बुधैः सदा ॥ १३ ॥

अग्रभागीं वातदोषाची नाडी वाहते, मध्यें पित्तदोषाची नाडी वाहते आणि शेवटीं कफदोषाची नाडी वाहते असें समजावें.

सर्पजलौकादिगतिं वदन्ति विबुधाः प्रभञ्जने नाडीम् ।
पित्तेन काकलावकमण्डूकादेस्तथा चपलाम् ॥ १४ ॥
राजहंसमयूराणां पारावतकपोतयोः ।
कुक्कुटस्य गतिं धत्ते धमनी कफसङ्गिनी ॥ १५ ॥

साप किंवा जळू जशी चालते, तशी वातनाडी वक्रगतीनें चालते, असें नाडीशास्त्रवेत्ते म्हणतात. पित्तदोषानें कावळा, लावा पक्षी किंवा बेडुक ह्यांच्या चालीप्रमाणें व चंचल अशी नाडीची गति असते. कफदोषानें राजहंस, मोर, पारवा, होला किंवा कोंबडा यांच्या गतीप्रमाणें मंद अशी नाडीची गति असते.

मुहुः सर्पगतिं नाडीं मुहुर्भेकगतिं तथा ।
वातपित्तसमुद्भूतां तां वदन्ति विचक्षणाः ॥ १६ ॥

एकदां सापाप्रमाणें तर एकदां बेडकाप्रमाणें अशी वरचेवर नाडीची गति जर दिसून आली तर तिला वातपित्तजन्य नाडी असें म्हणतात.

सर्पहंसगतिं तद्वद्वातश्लेष्मवतीं वदेत् ।
हरिहंसगतिं धत्ते पित्तश्लेष्मान्विता धरा ॥ १७ ॥

साप व हंस ह्या उभयतांच्या गतीप्रमाणें वरचेवर नाडी वाहूं लागली असतां तिला वातकफजन्य नाडी असें म्हणतात. आणि बेडूक व राजहंस ह्या उभयतांची गति नाडीमध्यें वरचेवर भासूं लागली असतां तिला कफपित्तजन्य नाडी असें म्हणतात.

काष्ठकुट्टो यथा काष्ठं कुट्टते चातिवेगतः ।
स्थित्वा स्थित्वा तथा नाडी संनिपाते भवेद् ध्रुवम् १८

लाकडांतील किडा राहून राहून अति वेगानें जसें लाकूड कोरतो त्याप्रमाणें सन्निपातामध्यें (तिन्हीही दोषांचा कोप झाला असतां) राहून राहून अतिवेगानें नाडी वाहते.

स्पन्दते चैकमानेन त्रिंशद्वारं यदा धरा ।
स्वस्थानेन तदा नूनं रोगी जीवति नान्यथा ।
स्थित्वा स्थित्वा वहति या सा ज्ञेया प्राणघातिनी ॥१९॥

दोषानुरूप स्वस्थानीं (त्या त्या दोषांच्या ठिकाणीं) एकाच

गतीनें सारख्या प्रमाणांत जर नाडीचे ठोके तीस वेळ एकसारखे पडतील तर निश्चयानें रोगी जगेल. आणि त्यांत जर फरक दिसून येईल तर रोगी जगणार नाहीं असें समजावें.

मन्दं मन्दं शिथिलशिथिलं व्याकुलं व्याकुलं वा
स्थित्वा स्थित्वा वहति धमनी याति सूक्ष्मा च सूक्ष्मा ।
नित्यं स्कन्धे स्फुरति पुनरप्यंगुलीः संस्पृशेद्वा
भावैरेवं बहुविधतरैः संनिपातादसाध्या ॥ २० ॥
तस्य मृत्युं विजानीयाद्यस्येदं नाडिलक्षणम् ॥ २१ ॥

जी नाडी फार हळू हळू, अतिशय ढिली, अतिशय अशक्त अशी वाहते, तसेंच वाहतां वाहतां जी अति सूक्ष्म होते, बोटा-खालची गति एकदम बंद होऊन स्कंधाचे ठिकाणीं (बाहुमूळाशीं) लागूं लागते, पुनः क्षणांत बोटांखालीं वाहूं लागते, अशी त्रिदोषा-मुळें अनेक प्रकारांनीं वाहणारी नाडी असाध्य समजावी. व अशा प्रकारची ज्याच्या नाडीची गती आहे तो मरणार असें समजावें.

पूर्वं पित्तगतिं प्रभञ्जनगतिं श्लेष्माणमाबिभ्रती–
मत्यन्तं भ्रमणं मुहुर्विदधतीं चक्राधिरूढामिव ।
भीष्मत्वं दधतीं कलासु पतितां सूक्ष्मत्वमातन्वतीं
नो साध्यां धमनीं वदन्ति मुनयो नाडीगतिज्ञानिनः ॥ २२ ॥

आधीं नाडी पित्तगतीनें चालली असतां एकदम वाताची व कफाची गति दाखविते; आणि चाकावर बसून फिरल्याप्रमाणें मध्येंच घोटाळल्यासारखी वरचेवर भ्रमण करिते; एकाएकीं भयं-कर जोरानें वाहते व लागलीच एक एक कलेनें कमी होत सूक्ष्म होते, अशा प्रकारची नाडी नाडीशास्त्रवेत्ते असाध्य समजतात.

गम्भीरा या भवेन्नाडी सा भवेन्मांसवाहिनी ।
ज्वरवेगेन धमनी सोष्णा वेगवती भवेत् ॥ २३ ॥

जी नाडी गंभीर (खोल) वाहते तिला मांसवाहिनी म्हणतात. ज्वराच्या योगानें नाडी ऊष्ण असून वेगानें चालते.

कामक्रोधाद्वेगवहा क्षीणा चिन्ताभयप्लुता ।
मन्दाग्नेः क्षीणधातोश्च नाडी मन्दतरा भवेत् ॥ २४ ॥

काम व क्रोध ह्यांच्या योगानें मन संतप्त झालें असतां नाडी

वेगानें वाहते आणि मन चिंतातुर किंवा भयभीत झालें असतां नाडी क्षीण वाहते. मंदाग्नि मनुष्याची व धातुक्षीण मनुष्याची नाडी अतिशय मंद वाहते.

असृक्पूर्णा भवेत्सोष्णा गुर्वी सामा गरीयसी ।
लघ्वी वहति दीप्ताग्नेस्तथा वेगवती मता ॥ २५ ॥

रक्तपूर्ण नाडी ऊष्ण व जड असते. आणि आमदोषाची नाडी फारच जड असते. ज्याचा अग्नि प्रदीप्त आहे त्याची नाडी हलकी व वेगानें चालते.

चपला क्षुधितस्यापि तृप्तस्य वहति स्थिरा ।
मरणे डमरूकस्य भवेदेकदिनेन च ॥ २६ ॥

भुकेलेल्या मनुष्याची नाडी चंचळ असते, आणि जेवण केले-ल्या मनुष्याची नाडी स्थिर चालते. ज्याच्या मृत्यूला एक दिवस अवधि आहे त्याची नाडी डमरूप्रमाणें (कडेच्या दोन बोटांखालीं तेवढी लागणारी) गति दाखविते.

कम्पते स्पन्दतेऽत्यन्तं पुनः स्पृशति चाङ्गुलीः ।
तामसाध्यां विजानीयान्नाडीं दूरेण वर्जयेत् ॥ २७ ॥

जी नाडी अत्यंत कांपते व मध्येंच बोटाला स्पर्श करिते ती नाडी असाध्य समजून सोडून द्यावी.

स्थिरा नाडी भवेद्यस्य विद्युद्द्युतिरिवेक्ष्यते ।
दिनैकं जीवितं तस्य द्वितीये मृत्युरेव च ॥ २८ ॥

ज्याची नाडी स्थिर असून मध्येंच वीज चमकल्याप्रमाणें एक-दम चंचळ होते, त्याच्या आयुष्याची मुदत एकच दिवसाची; दुसरे दिवशीं त्याला मृत्यु येणार म्हणून समजावें.

शीघ्रा नाडी मलोपेता शीतला वाऽथ दृश्यते ।
द्वितीये दिवसे मृत्युर्नाडी ज्ञेया विचक्षणैः ॥ २९ ॥

ज्याची नाडी मलदूषित असून जलद वाहते किंवा थंड असते, त्याला दुसरे दिवशीं मृत्यु येणार म्हणून समजावें.

मुखे नाडी वहेत्तीव्रा कदाचिच्छीतला वहेत् ।
आयाति पिच्छिलः स्वेदः सप्तरात्रं न जीवति ॥ ३० ॥

अग्रभागीं ज्याची नाडी तीव्र असून कदाचित् थंडही असते,

आणि अंगाला चिकट घाम येतो, तो सात दिवसपर्यंत देखील जगणार नाहीं. (त्याच्या आयुष्याची शिकस्त मुदत सात दिवसांची.)

देहे शैत्यं मुखे श्वासो नाडी तीव्रा विदाहवत् ।
मासार्धं जीवितं तस्य नाडीविज्ञानभाषितम् ॥ ३१ ॥

ज्याचें अंग थंड असून तोंडानें श्वासोच्छ्वास चालला आहे व नाडी तीव्र असून ऊष्ण आहे, तो पंधरा दिवस वांचेल असें नाडीशास्त्रवेत्ते म्हणतात.

मुखे नाडी यदा नास्ति मध्ये शैत्यं बहिः क्लमः ।
यदा मन्दा भवेन्नाडी त्रिरात्रं नैव जीवति ॥ ३२ ॥

अग्रभागीं ज्याची नाडी लागत नाहीं, अंतर्यामीं किंवा शरीराच्या मध्यभागीं थंडपणा असून बाहेरून ग्लानि असते आणि नाडी मंद असते तो तीन दिवसांपेक्षां जास्त जगणार नाहीं.

अतिसूक्ष्मातिवेगा च शीतला च भवेद्यदि ।
तदा वैद्यो विजानीयाद्रोगिणं च गतायुषम् ॥ ३३ ॥

नाडीची गति अति सूक्ष्म किंवा अति वेगाची असून नाडी थंड असेल, तर त्या रोग्याचें आयुष्य संपलें आहे असें समजावें.

विद्युद्भ्रमिता नाडी दृश्यते च न दृश्यते ।
अकालविद्युत्पातेव स गच्छेद्यमशासनम् ॥ ३४ ॥

जशी वीज अकस्मात चमकते व नाहींशी होते, त्याप्रमाणें ज्याची नाडी बोटाला स्पर्श होतो न होतो तोंच नाहींशी होते तो वीज पडून अकस्मात मरणाऱ्या मनुष्याप्रमाणें अकस्मात यमसदनीं जातो.

तिर्यगुष्णा च या नाडी सर्पगा वेगवत्तरा ।
कफपूरितकण्ठस्य जीवितं तस्य दुर्लभम् ॥ ३५ ॥

ज्या रोग्याची नाडी ऊष्ण, वक्रगति आणि सर्पाप्रमाणें वेगानें चालणारी असून कंठ कफानें भरून आलेला असतो, त्याचें जीवित दुर्लभ समजावें.

चैलाञ्चलितवेगा च नासिकाधारसंयुता ।
शीतला दृश्यते या च याममध्ये च मृत्युदा ॥ ३६ ॥

वाऱ्याच्या साहाय्यानें हलणाऱ्या वस्त्राच्या पदराप्रमाणें केवळ

नाकावाटे चालणाऱ्या श्वासोच्छ्वासाच्या आधारानें चालणारी असून जी नाडी थंड वाहते ती रोग्याला एक प्रहरांत मृत्यु आणिते.

दृश्यते चरणे नाडी करे नैवाभिदृश्यते ।
मुखं विकसितं यस्य तं दूरं परिवर्जयेत् ॥ ३७ ॥

ज्या रोग्याची नाडी पायाच्या ठिकाणीं लागत असून हाताच्या ठिकाणीं मुळींच लागत नाहीं आणि तोंड पसरलेलें असते, त्याला असाध्य समजून लांबूनच सोडून द्यावा.

वातपित्तकफाश्चापि त्रयो यस्यां समाहिताः ।
कृच्छ्रसाध्यामसाध्यां वा प्राहुर्वैद्यविशारदाः ॥ ३८ ॥

ज्या नाडीमध्यें वात, पित्त व कफ हे दोष एकदम वाढलेले दिसतात, तिला ज्ञाते वैद्य कष्टसाध्य किंवा असाध्य असें म्हणतात.

वक्रा च चपला शीतस्पर्शा वातज्वरे भवेत् ।
द्रुता च सरला दीर्घा शीतपित्तज्वरे* भवेत् ॥ ३९ ॥

वातज्वरामध्यें नाडीची गति वक्र असून चपळ असते व स्पर्शानें शीत असते. शीतपित्तज्वरामध्यें नाडीची गति जलद, सरळ व लांबलेली अशी असते.

मंदा च सुस्थिरा शीता पिच्छिला श्लेष्मतो भवेत् ।
वक्रा च ईषच्चपला कठिना वातपित्तजा ॥ ४० ॥
ईषच्च दृश्यते स्पृष्टा मन्दा स्याच्छ्लेष्मवातजा ।
सूक्ष्मा शीता स्थिरा नाडी पित्तश्लेष्मसमुद्भवा ॥ ४१ ॥

कफज्वरांत नाडी मंद, जड, थंड व चिकट अशी असते. वातपित्तज्वरामध्यें नाडीची गति वक्र असून किंचित् चपळ व कठिण अशी असते. कफवातज्वरामध्यें नाडीची गति किंचित् स्पष्ट व मंद अशी असते. पित्तकफज्वरामध्यें नाडीची गति सूक्ष्म, थंड व जड अशी असते.

हंसगा चैव या नाडी तथैव गजगामिनी ।
मुखं प्रशस्तं च भवेत्तस्याऽऽरोग्यं भवेत्सदा ॥ ४२ ॥

नाडीची गती हंसाप्रमाणें किंवा हत्तीप्रमाणें सावकाश असून मुखकांति प्रशस्त असणें हें आरोग्याचें लक्षण आहे असें समजावें.

* 'शीतपित्तज्वरे' या ठिकाणीं 'शीघ्रा पित्तज्वरे' असा पाठभेद असून तो सयुक्तिक आहे.

यो रोगिणः करं स्पृष्ट्वा स्वकरं क्षालयेद्यदि ।
रोगास्तस्य विनश्यन्ति पङ्कः प्रक्षालनाद्यथा ॥ ४३ ॥

जो वैद्य रोग्याचा हात पाहून झाल्यावर आपला हात पाण्यानें धुवून टाकतो, त्याचे रोग पाण्यानें चिखल धुवून गेल्याप्रमाणें नाश पावतात.

मूत्रपरीक्षा.

अथातः संप्रवक्ष्यामि मूत्रस्य च परीक्षणम् ।
येन विज्ञातमात्रेण रोगचिह्नं प्रकाश्यते ॥ १ ॥

जिचें ज्ञान झालें असतां रोगाचें लक्षण काय आहे हें उघड रीतीनें समजतें, ती मूत्रपरीक्षा आतां मी सांगतों.

निशान्त्ययामे घटिकाचतुष्टये उत्थाप्य वैद्यः किल रोगिणं च ।
मूत्रं धृतं काचमये च पात्रे सूर्योदये तत्सततं परीक्षेत् ॥ २ ॥
तस्याऽऽद्यधारां परिहृत्य मध्यधारोद्भवं तत्परिधारयित्वा ।
सम्यक्परिज्ञाय गदस्य हेतुं कुर्याच्चिकित्सां सततं हिताय ॥३॥

रात्रीच्या शेवटच्या प्रहरांतील चार घटका उरल्या म्हणजे वैद्यानें रोग्याला उठवून त्याची लघवी काचेच्या भांड्यांत धरून नेहमीं सूर्योदय होतांच तिची परीक्षा करावी. लघवी धरतांना पहिली धार सोडून देऊन मधली धार धरून तिची परीक्षा करावी आणि रोगाचा हेतू बरोबर लक्षांत घेऊन नंतर त्याची योग्य असेल ती चिकित्सा करावी.

वाते च पाण्डुरं मूत्रं सफेनं कफरोगिणः ।
रक्तवर्णं भवेत्पित्ते द्वंद्वजे मिश्रितं भवेत् ।
संनिपाते च कृष्णं स्यादेतन्मूत्रस्य लक्षणम् ॥ ४ ॥

वातदोषानें लघवीचा वर्ण पांढुरका असतो. कफदोषानें लघवी फेसयुक्त असते. पित्तदोषानें लघवीचा रंग तांबूस होतो. द्वंद्वज दोषांमध्यें त्या त्या दोन दोन दोषांचीं लक्षणें मिश्र असतात. तिनीही दोषांच्या प्रकोपामुळें लघवीचा रंग काळसर होतो. हें दोषसंबंधी मूत्राचें लक्षण आहे.

परीक्षा विधिवत्कार्या रोगिमूत्रस्य तत्वतः ।
तृणेन दापयेत्तैलबिन्दुं तत्रातिलाघवात् ॥ ५ ॥

विकासितं तैलमथाऽऽशु मूत्रे
साध्यः स रोगी न विकासितं चेत् ।
स्यात्कष्टसाध्यस्तलगे त्वसाध्यो
नागार्जुनेनैव कृता परीक्षा ॥ ६ ॥

गवताच्या काडीनें तेलाचा एक लहानसा थेंब हळूच लघवींत टाकावा. व विधियुक्त त्याची परीक्षा करावी. लघवींत टाकलेला तेलाचा बिंदु (थेंब) जर लवकर पसरला तर रोगी साध्य आहे असें समजावें. तो न पसरतां तसाच स्थिर राहिला तर कष्टसाध्य आणि बुडून तळाला गेला तर असाध्य असें नागार्जुनाचें मत आहे.

नीलं च रूक्षं कुपिते च वायौ पीतारुणं तैलसमं च पित्ते ।
स्निग्धं कफे पल्वलवारितुल्यं स्निग्धोष्णरक्तं रुधिरप्रकोपे ॥७॥
मातुलुंगरसाभासं सौवीराभं जलोपमम् ।
प्रपाकरहितानां च मूत्रं चन्दनसंनिभम् ॥ ८ ॥

वातदोषाच्या प्रकोपामुळें लघवीचा रंग निळसर असून लघवी रूक्ष दिसते. पित्तदोषाच्या प्रकोपामुळें पिवळट, तांबूस व तेलासारखी (स्निग्ध) असते. कफदोषाच्या प्रकोपामुळें लघवी स्निग्ध असून डबक्यांतील पाण्याप्रमाणें गढूळ व थंड असते. आणि रक्तप्रकोपामुळें लघवी स्निग्ध, उष्ण व लाल असते. ज्यांच्या दोषाचा पाक झाला नाहीं त्यांची लघवी महाळुंगाच्या रसाप्रमाणें, कांजीप्रमाणें व पाण्यासारखी असून चंदनाप्रमाणें (चंदनाच्या गंधाच्या रंगासारखी) दिसते.

अजीर्णप्रभवे रोगे मूत्रं तण्डुलतोयवत् ।
नवज्वरे धूम्रवर्णं बहुमूत्रं प्रजायते ॥ ९ ॥

अजीर्णापासून झालेल्या विकारांत लघवी तांदळाच्या धुवणाप्रमाणें पांढरी असते. नवज्वरांत लघवी धुरकट व पुष्कळ होते.

पित्तानिले धूम्रजलाभमुष्णं श्वेतं मरुच्छ्लेष्मणि बुद्बुदाभम् ।
तच्छ्लेष्मपित्ते कलुषं सरक्तं जीर्णज्वरेऽसृक्सदृशं च पीतम् ।
स्यात्संनिपातादपि मिश्रवर्णं तूर्णं विधिज्ञेन विचारणीयम् १०

वातपित्तापासून धुरकट, पाण्यासारखी व उष्ण लघवी होते. वातकफापासून लघवीचा रंग पांढुरका असून तिजवर बुडबुडे येतात.

कफपित्तापासून लघवी तांबूस व गढूळ होते, आणि जीर्णज्वरामध्यें लाल किंवा पिंवळी लघवी होते. त्रिदोषजन्य लघवीमध्यें तिनीही दोषांचे मिश्र रंग असतात.

पूर्वाशां वर्धते बिन्दुर्यदा शीघ्रं सुखी भवेत् ।
दक्षिणाशां ज्वरो ज्ञेयस्तथाऽऽरोग्यं क्रमाद्भवेत् ॥ ११ ॥
उत्तरस्यां यदा बिन्दोः प्रसरः संप्रजायते ।
अरोगिता तदा नूनं पुरुषस्य न संशयः ॥ १२ ॥
वारुण्यां प्रसरेद्बिन्दुः सुखारोग्यं तदाऽऽदिशेत् ।
ऐशान्यां वर्धते बिन्दुर्ध्रुवं मासेन नश्यति ॥ १२ ॥
आग्नेय्यां तु तथा ज्ञेयं नैर्ऋत्यां प्रसरेद्यदि ।
छिद्रितश्च भवेत्पश्चाद् ध्रुवं मरणमेव च ॥ १४ ॥
वायव्यां प्रसरेद्बिन्दुः सुधयापि विनश्यति ।

लघवीमध्यें टाकलेला तेलाचा थेंब जर पूर्वदिशेकडे पसरत गेला तर त्या रोग्यास लवकर सुख प्राप्त होईल. दक्षिणेकडे पसरत गेला तर अंगांत ज्वर असून रोगी क्रमानें औषधोपचारानें बरा होईल. उत्तरेकडे पसरत गेला तर त्या रोग्याला निश्चयानें आरोग्य प्राप्त होईल. पश्चिमेच्या बाजूस पसरत गेला तर त्याला सुखानें आरोग्य होईल. ईशान्येकडे पसरला तर निश्चयानें एक महिन्यानें रोगी मरेल. आग्नेयीकडे पसरला तर त्याचप्रमाणें एक महिन्यांत रोगी मरेल. नैऋत्येकडे थेंब पसरून त्यामध्यें छिद्रें दिसलीं तर निश्चयानें रोगी मरेल. वायव्येकडे पसरला तर अमृत जरी कदाचित् मिळालें तरी रोगी जगणार नाहीं.

विकाशितं हलं कूर्मं सैरिभाकारसंयुतम् ॥ १५ ॥
करण्डमण्डलं वापि शिरोहीननरं तथा ।
गात्रखण्डं च शस्त्रं च खड्गं मुशलपट्टिशम् ॥ १६ ॥
शरं च लगुडं चैव तथैव त्रिचतुष्पथम् ।
बिन्दुरूपं नरो दृष्ट्वा न कुर्वीत क्रियां क्वचित् ॥ १७ ॥

लघवीमध्यें पसरलेल्या तेलाच्या थेंबाचा आकार नांगर, कांसव, रेडा, करंडा, मनुष्याचें शिरोविरहित शरीर (धड), शरीराचा एखादा तुटका अवयव, शस्त्र, तलवार, मुसळ, पट्टा, बाण, सोटा, किंवा चवाठ्याप्रमाणें दिसेल तर त्या रोग्याला औषध देऊं नये.

हंसकारण्डताडागं कमलं गजचामरम् ।
छत्रं वा तोरणं हर्म्यं सुपूर्णं दृश्यते यदि ॥ १८ ॥
आरोग्यता ध्रुवं ज्ञेया तदा कुर्यात्प्रतिक्रियाम् ।

हंस, कारंडव पक्षी, तलाव, कमळ, हत्ती, चवरी, छत्र, तोरण व वाडा ह्यांपैकीं कोणचाही आकार पूर्ण (साग्र) दृष्टीस पडेल तर निश्चयानें आरोग्य होईल असें समजून चिकित्सा करावी.

तैलबिन्दुर्यदा मूत्रे चालनीसदृशो भवेत् ॥ १९ ॥
कुलदोषो ध्रुवं ज्ञेयः प्रेतदोषसमुद्भवः ।

लघवीवर तेलाचा थेंब जर चाळणीप्रमाणें सच्छिद्र दिसूं लागला तर कुळसंबंधीं पिशाच्चबाधा आहे असें समजावें.

नराकारं प्रजायेत किंवा स्यान्मस्तकद्वयम् ।
भूतदोषं विजानीयाद्भूतविद्यां तदाचरेत् ॥ २० ॥

मनुष्याचा आकार किंवा दोन मस्तकांचा आकार दिसेल तर भूतबाधा आहे असें समजून तत्संबंधीं प्रतिकार करावा.

मञ्जिष्ठाभं धूम्रवर्णं च नीलं स्निग्धं मूत्रं वारितुल्यं च शीतम् ।
ज्ञात्वा चित्ते बुद्धिमान्मानुषाणां कुर्यात्त्वन्तर्भेषजं रोगिणां च ॥२१॥

मंजिष्ठाचे रंगाप्रमाणें लाल, धुरकट, निळसर, स्निग्ध किंवा पाण्याप्रमाणें थंड लघवी असेल तर त्या रोग्याला औषध द्यावें.

सर्पाकारं भवेद्वाताच्छत्राकारं तु पित्ततः ।
मुक्ताकारं बलासात्स्यादेतन्मूत्रस्य लक्षणम् ॥ २२ ॥

लघवीवर पसरलेल्या बिंदूचा आकार सापासारखा असेल तर वातदोष समजावा. छत्रासारखा असेल तर पित्तदोष समजावा. कफदोषानें बिंदूचा आकार मोत्याप्रमाणें होतो. ह्याप्रमाणें मूत्र-लक्षणें समजावीं.

मलपरीक्षा.

वातान्मले तु दृढता शुष्कता चापि जायते ।
पीतता जायते पित्ताच्छुक्लता श्लेष्मतो भवेत् ॥ १ ॥
संनिपाते च सर्वाणि लक्षणानि भवन्ति हि ।
त्रुटितं फेनिलं रूक्षं धूमलं वातकोपतः ।
वातश्लेष्मविकारे च जायते कपिशं मलम् ॥ २ ॥

बद्धं सुत्रुटितं पीतश्यामं पित्तानिलाद्भवेत् ।
पीतश्यामं श्लेष्मपित्तादीषत्सान्द्रं च पिच्छिलम् ॥ ३ ॥
श्यामं त्रुटितपीताभं बद्धश्वेतं त्रिदोषतः ।

वातदोषानें मळ कठिण व शुष्क होतो. पित्तदोषानें पिंवळा व कफदोषानें पांढरा मळ होतो. त्रिदोषजन्य मळामध्यें तिन्हीही लक्षणें होतात. त्रुटित (थोडा थोडा गाठाळ असा), फेसाळ, रूक्ष व धुरकट असा मळ वातदोषानें होतो. वातकफापासून काळसर तांबूस अशा मिश्र रंगाचा होतो. गाठाळ, थोडा थोडा, पिंवळट, काळा, असा मळ वातपित्तापासून होतो. पिंवळट, काळा, घट्ट, व बुळबुळित असा मळ कफपित्तदोषानें होतो. काळा, थोडाथोडा, पिंवळट रंगाचा, गांठाळ व पांढुरका असा मळ त्रिदोषापासून होतो.

दुर्गन्धः शीतलश्चैव विष्ठोत्सर्गो यदा भवेत् ॥ ४ ॥
तदा जीर्णं मलं वैद्यैर्दोषज्ञैः परिभण्यते ।
कपिलं गुटियुक्तं च यदि वर्चोऽवलोक्यते ॥ ५ ॥
प्रक्षीणमलदोषेण दूषितः परिकथ्यते ।
सितं महत्पूतिगन्धं मलं ज्ञेयं जलोदरे ॥ ६ ॥
श्यामं क्षये त्वामवति* पीतं सकटिवेदनम् ।

दुर्गंधी, थंड असा मळ झाला असतां अजीर्ण दोष झाला आहे असें वैद्य म्हणतात. काळसर तांबूस व शेळीच्या लेंड्यांप्रमाणें मळ, मलक्षीणत्वानें होतो. पांढरा, पुष्कळ व दुर्गंधयुक्त असा मळ जलोदरामध्यें होतो. क्षयरोगामध्यें मळ काळा होतो. व आमवातामध्यें कंबर दुखते व मळ पिंवळा होतो.

अतिकृष्णं चातिशुभ्रमतिपीतं तथाऽरुणम् ॥ ७ ॥
मरणाय मलं किंतु भृशोष्णं मृत्यवे ध्रुवम् ॥

अतिशय काळा, अतिशय पांढरा, अतिशय पिंवळा किंवा अतिशय तांबडा मळ होणें हें मरणसूचक आहेच अत्यंत पण मळ, उष्ण होणें हें निश्चयानें मृत्यु आणणारें लक्षण आहे.

---

* ' आमवति ' ह्या ठिकाणीं ' आमवाते ' असा पाठभेद असून तोच अधिक बरोबर दिसतो.

वातस्य च मलं कृष्णं ततः पित्तस्य पीतविट् ।
रक्तवर्णं मलं किंचिन्मलं श्वेतं कफोद्भवम् ॥ ८ ॥
आमं वा श्लेष्मजं प्राहुर्मिश्रितं द्वंद्वजं वदेत् ।
अपक्वं स्यादजीर्णे तु पक्वं स्वच्छमलं भवेत् ॥ ९ ॥

वातदोषानें मळ काळा होतो आणि पित्तदोषानें पिंवळा व किंचित तांबूस असा होतो. आणि कफदोषानें मळ पांढरा होतो. किंवा कफदोषानें अपक्व किंवा आमयुक्त मळ होतो, असें कित्येक म्हणतात. द्विदोषामध्यें दोन दोषांचीं मिश्र लक्षणें असतात. अजीर्णामुळें अपक्व मळ होतो. पक्व मळ स्वच्छ असतो.

अत्यग्नौ पिंडितं शुष्कं मन्दाग्नौ तु द्रवीकृतम् ।
दुर्गन्धं चन्द्रिकायुक्तमसाध्यं मललक्षणम् ॥ १० ॥

जठराग्नि अत्यंत प्रखर असला म्हणजे शुष्क व बांधीव (खड्या-सारखा) मळ होतो आणि जठराग्नि मंद असला म्हणजे मळ पातळ होतो. दुर्गंधी व चांद्रिकायुक्त (भिंगाप्रमाणें चमकणारा) मळ असणें हें मळाचें असाध्य लक्षण समजावें.

शब्दपरीक्षा.

गुरुस्वरो भवेच्छ्लेष्मा स्फुटवक्ता च पित्तलः ।
उभाभ्यां रहितो वातः स्वरतश्चैव लक्षयेत् ॥ १ ॥

कफदोषानें शब्द जड येतो, पित्तदोषानें शब्द स्पष्ट येतो, आणि वाताचें लक्षण या दोन्हीही लक्षणांहून भिन्न हें आवाजा-वरून ओळखावें.

स्पर्शपरीक्षा.

पित्तरोगी भवेदुष्णो वातरोगी च शीतलः ।
आर्द्रतः स भवेच्छ्लेष्मा स्पर्शतश्चैव लक्षयेत् ॥ १ ॥

पित्तदोष अधिक असला म्हणजे अंगाला स्पर्श केला असतां अंग उष्ण लागतें. वातदोषामुळें अंग थंड लागतें. कफदोष अधिक असला तर अंग ओलसर चिकट लागतें. हें प्रत्यक्ष स्पर्शानें समजून घ्यावें.

रूपपरीक्षा.

विभुत्वादाशुकारित्वाद्बलित्वादन्यकोपनात्।
स्वातंत्र्याद्बहुरोगत्वाद्दोषाणां प्रबलोऽनिलः ॥ १ ॥
प्रायस्त एव पवनाध्युषिता मनुष्या
दोषात्मकाः स्फुटितधूसरकेशगात्राः।
शीतद्विषश्चलधृतिस्मृतिबुद्धिचेष्टा-
सौहार्ददृष्टिगतयोऽपि बहुप्रलापाः ॥ २ ॥

वायु हा सर्वव्यापक, आशुकारी, (त्वरित प्रभाव दाखविणारा) बलवान, दुसऱ्याला कोपविणारा, स्वतंत्र व अनेक रोग उत्पन्न करणारा असल्यामुळे सर्व दोषांमध्यें प्रमुख आहे. म्हणून वात-प्रकृति मनुष्य प्रायः दोषात्मक (दुर्गुणी), त्याचे केस व अवयव हे मळकट, फुटणारे असे असतात. त्याला थंड पदार्थांचा द्वेष असतो. त्याची धारणाशक्ति, स्मरणशक्ति, बुद्धि, कृति, मैत्री, दृष्टि, गति हीं अस्थिर (चंचल) असतात, आणि बडबड मात्र फार असते.

पित्तं वह्निर्वह्निजं वा यदस्मात्पित्तोद्रिक्तस्तीक्ष्णतृष्णाबुभुक्षः।
गौरोष्णाङ्गस्ताम्रहस्तांघ्रिवक्त्रः शूरो मानी पिङ्गकेशोऽल्परोमा ॥३

पित्त हें केवळ अग्निच किंवा अग्नीपासून उत्पन्न झालेलें असें असल्यामुळें पित्तप्रकृति मनुष्याची तहान व भूक हीं फार तीक्ष्ण असतात. त्याचे शरीराचा वर्ण गोरा असून अंग नेहमीं उष्ण असतें. त्याचे हात, पाय व तोंड हीं लाल असतात. तो शूर व मानी असतो. त्याचे केस पिंगट असून कमी असतात.

श्लेष्मा सोमः श्लेष्मलस्तेन सौम्यो गूढस्निग्धश्लिष्टसंध्यास्थिमांसः।
क्षुत्तृट्शोकक्लेशधर्मैरतप्तो बुद्ध्या युक्तः सात्त्विकः सत्यसंधः ॥४॥

कफ हा प्रत्यक्ष चंद्र (किंवा चंद्रासारखा) असल्यामुळें कफ-प्रकृति मनुष्य फार सौम्य (शांत स्वभावाचा) असतो. त्याचे सांधे, हाडें व मांस हीं पुष्ट, स्निग्ध व घट्ट अशीं असतात. त्याला भूक तहान, शोक, श्रम, व ऊन ह्यांपासून फारसा त्रास होत नाहीं. तो बुद्धिमान, सात्विक व सत्यप्रतिज्ञ (बोलल्याप्रमाणें करणारा, निश्चयी) असा असतो.

दृक्परीक्षा.

रूक्षा धूम्रा तथा रौद्रा चला चान्तर्ज्वलत्यपि ।
दृष्टिर्यदा तदा वातरोगं रोगविदो जगुः ॥ १ ॥
दीपद्वेषी च संतप्तं पीतं पित्तेन लोचनम् ।
जलार्द्रं ज्योतिषा हीनं स्निग्धं मन्दं कफेन तत् ॥ २ ॥
द्वन्द्वदोषे भवेन्मिश्रं तूर्णं तूर्णं विलोचनम् ।
श्यामवर्णं च निर्भुग्नं तन्द्रामोहसमन्वितम् ॥ ३ ॥
रौद्रं च रक्तवर्णं च भवेच्चक्षुस्त्रिदोषतः ।

डोळे रूक्ष, धूम्रवर्ण, भयंकर, चंचळ असे असून त्यांची आंतून जळजळ होणें हीं लक्षणें असलीं म्हणजे वातदोष आहे असें समजावें. पित्तदोषामुळें डोळ्याला दिव्याचा प्रकाश सहन होत नाहीं. डोळे संतप्त (जळजळीत) व पिवळट रंगाचे असे असतात. कफदोषानें डोळे पाण्यानें डबडबलेले, स्निग्ध, तेजोहीन व मंद असे असतात. द्विदोषामध्यें त्या त्या दोन दोन दोषांचीं लक्षणें मिश्र असून डोळे चंचळ असतात. त्रिदोषामुळें डोळे काळसर, ताठलेले, झांपड व मूर्च्छा ह्यांनीं युक्त, भयंकर व आरक्तवर्ण, असे असतात.

एकं चक्षुर्यदा भीमं द्वितीयं मीलितं भवेत् ॥ ४ ॥
त्रिभिर्दिनैस्तदा रोगी स याति यममन्दिरम् ।
ज्योतिर्विहीनं सहसा रोगिणो यस्य लोचनम् ॥ ५ ॥
ईषत्कृष्णं स नियतं प्रयाति यमशासनम् ।
सरक्तं कृष्णवर्णं च रौद्रं च प्रेक्षते यदा ॥ ६ ॥
इति लिङ्गैर्विजानीयान्मृत्युरेव न संशयः ।
एकदृष्टिरचैतन्यो भ्रमन्स्फुरिततारकः ।
एकरात्रेण नियतं परलोकपथं व्रजेत् ॥ ७ ॥

एक डोळा भयंकर दिसतो व दुसरा मिटलेला राहतो, असा रोगी तीन दिवसांत यमसदनाला जातो. ज्या रोग्याचे डोळे कारणावांचून निस्तेज असून किंचित् कृष्णवर्ण असतात, तोही यमसदनीं जातो. डोळे लाल, कृष्णवर्ण व भयंकर दिसले तर हीं लक्षणें निःसंशय मृत्युकारक समजावीं. एक डोळा अचेतन (दृष्टिरहित) असून डोळ्यांतील बाहुल्या (तारका) फिरतात व स्फुरण

पावतात, असा रोगी एक रात्र उलटल्यावर निश्चयानें परलोकाचा रस्ता धरणार असें समजावें.

शुष्कास्यः श्यामकोष्ठोऽप्यसितरदततिः शीतनासाप्रदेशः
शोणाक्षश्चैकनेत्रो लुलितकरपदः श्रोत्रपातित्ययुक्तः ।
शीतश्वासोऽथ चोष्णश्वसनसमुदयः शीतगात्रप्रकम्पः
सोद्वेगो निष्प्रपञ्चः प्रभवति मनुजः सर्वथा मृत्युकाले ॥ ८ ॥

ज्याचें तोंड सुकलें आहे, ओंठ काळे पडले आहेत, दांत-(दंतपंक्ति) ही काळे पडले आहेत, नाक गार झालें आहे, डोळे लाल असून एक डोळा उघडा आहे, हातपाय हालत आहेत, कान म्लान आहेत, श्वासोच्छ्वास थंड किंवा उष्ण येत आहे; सर्व शरीर गार असून कांपत आहे, जो उद्विग्न असून निष्प्रपंच (शरीराच्या कोणत्याही व्यापारास असमर्थ) झाला आहे, असा मनुष्य मरणार म्हणून समजावें, म्हणजे अशी अवस्था मृत्युकाळीं होते.

आस्यपरीक्षा.

वाते च मधुरास्यत्वं पित्ते च कटुकं[1] तथा ।
मधुराम्लं कफे चैव सर्वलिङ्गं त्रिदोषजे ।
अजीर्णे घृतपूर्णं स्यात्कषायं चाग्निमान्द्यके ॥ १ ॥

वातदोषानें तोंड गुळमट होतें. पित्तानें तिखट (किंवा कडू) होतें. कफदोषानें आंबटमधुर असें होतें; व त्रिदोषामध्यें हीं सर्व लक्षणें असतात. अजीर्णानें तोंड तुपानें माखल्यासारखें ओषट होतें; आणि अग्निमांद्यामुळें तोंड तुरट होतें.

जिह्वापरीक्षा.

जिह्वा शीता खरस्पर्शा स्फुटिता मारुतेऽधिके ।
रक्ता श्यामा भवेत्पित्ते कफे शुभ्राऽतिपिच्छिला ॥ १ ॥

---

१. 'कटुक' ह्या शब्दाचा वास्तविक अर्थ 'तिखट' असा असल्यामुळें येथें 'तिखट' म्हटलें आहे. पण पित्तदोषानें तोंड बहुधा कडूच होतें. 'कडू' ह्या अर्थींही 'कटुक' हा शब्द आधुनिक वैद्यकग्रंथांतूत क्वचित् योजलेला दृष्टीस पडतो. ह्यावरून 'कटुक' ह्याचा अर्थ 'कडू' असा घेण्यासही हरकत नाहीं.

कृष्णा सकण्टका शुष्का संनिपाताधिके तु सा ।
मिश्रिते मिश्रिता ज्ञेया सर्वलक्षणवर्जिता ॥ २ ॥

जीभ थंड, खरखरीत व फुटलेली (कातरे पडलेली) असणें हीं लक्षणें वातदोषापासून होतात. तांबडी व काळसर अशी जीभ पित्त-दोषापासून होते. कफदोषामुळें जीभ पांढरी व बुळबुळीत होते. त्रिदोषापासून जीभ काळी होते, तिच्यावर कांटे येतात व जीभ कोरडी पडते. त्रिदोषाचीं लक्षणें खेरीज करून द्विदोषामध्यें त्या त्या दोषानुसार मिश्र लक्षणें असतात.

कालज्ञान.

अभ्रैर्लक्षितलक्षणेन पयसा पूर्णेन्दुना भानुना
पूर्वादक्षिणपश्चिमोत्तरदिशं षट्त्रिद्विमासैककम् ।
छिद्रं पश्यति चेत्तदा दशदिनं धूमाकृतिं पञ्चमे
ज्वालां पश्यति सद्य एव मरणं कालोचितज्ञानिनाम् ॥ १ ॥

पाण्यामध्यें पडलेलें चंद्राचें किंवा सूर्याचें प्रतिबिंब जो कोणी पूर्व, दक्षिण, पश्चिम व उत्तर ह्या दिशांकडून अभ्राच्छादित आहे असें पाहील तो अनुक्रमें सहा, तीन, दोन, किंवा एक महिना जगेल; म्हणजे पूर्वेस अभ्राच्छादित पाहिल्यास सहा महिने, दक्षिणेस तीन महिने, पश्चिमेस दोन महिने व उत्तरेस एक महिना ह्याप्रमाणें वांचेल, असें समजावें; आणि चंद्राला किंवा सूर्याला छिद्र पाहील तर तो दहा दिवस वांचेल आणि चंद्र व सूर्य हे धूम्राकार पाहील तर पांच दिवसपर्यंत वांचेल; आणि चंद्र व सूर्य ह्यांच्यापासून ज्वाळा निघत आहेत असें पाहील तर तात्काळ मरेल असें समजावें, असें कालज्ञानी म्हणतात.

अरुन्धतीं ध्रुवं चैव विष्णोस्त्रीणि पदानि च ।
आयुर्हीना न पश्यन्ति चतुर्थं मातृमण्डलम् ॥ २ ॥
अरुन्धती भवेज्जिह्वा ध्रुवो नासाग्रमेव च ।
विष्णुस्तु भ्रूद्वयोर्मध्यो भ्रूद्वयं मातृमण्डलम् ॥ ३ ॥
नासाग्रं भ्रूयुगं जिह्वां मुखं चैव न पश्यति ।
कर्णघोषं न जानाति स गच्छेद्यममन्दिरम् ॥ ४ ॥
नवभ्रूः पञ्चचक्षुश्च सप्तकर्णस्त्रिनासिका ।

जिह्वा च दिनमेकं तु कालचिह्नं दिने दिने ॥ ५ ॥

अरुंधती, ध्रुव, विष्णूचीं तीन पदें, व चवथें मातृमंडळ हीं चार स्थानें ज्याचें आयुष्य संपलें आहे त्याला दिसत नाहींत. अरुंधती म्हणजे जीभ, ध्रुव म्हणजे नाकाचा शेंडा, दोन भुवयांच्या मधला जो भाग त्याला विष्णूचीं तीन पदें म्हणतात. व दोन भुवयांला मातृमंडल असें म्हणतात. नासाग्र (नाकाचा शेंडा), दोन्ही भुवया, जीभ व तोंड हीं ज्याला दिसत नाहींत, आणि कर्णघोष (कानांत बोटें घातलीं असतां जो आवाज निघतो तो) ज्याला ऐकू येत नाहीं, तो लवकरच यमसदनाप्रत जातो. ज्याला भुवया दिसत नाहींत त्याच्या आयुष्याची मर्यादा नऊ दिवस. डोळ्याचें बुबुळ थोडें दाबलें असतां त्याच्या बाजूला जीं चक्रें (दोन्ही डोळ्यांच्या बाजूस दिसणारीं दोन तेजोवलयें) दिसतात, तीं जर दिसलीं नाहींत तर त्याच्या आयुष्याची मुदत पांच दिवस. कानांत होणारा शब्द (कर्णघोष) जर न ऐकूं येईल तर त्याच्या आयुष्याची मुदत सात दिवस. नासाग्र (नाकाचा शेंडा) न दिसेल तर त्याच्या आयुष्याची मुदत तीन दिवस. आणि जिभेचा शेंडा दिसत नसेल तर त्याच्या आयुष्याची मुदत एक दिवस. हीं काळचिन्हें नेहमीं पहावीं.

अकस्माच्च भवेत्स्थूलो ह्यकस्माच्च कृशो भवेत् ।
अकस्मादन्यथाभावः षण्मासैश्च विनश्यति ॥ ६ ॥

जो एकाएकीं पुष्ट किंवा कृश होतो किंवा अकस्मात् भलतीच भावना ज्यास होते म्हणजे नित्यस्वभावांत बदल होतो (जसें, रागीट असला तर शांत होतो; धार्मिक असला तर अधर्मी होतो), तो सहा महिन्यांनीं मरणार म्हणून समजावें.

रसनायां कृष्णभावो मुखं कुङ्कुमसंनिभम् ।
जिह्वा स्वल्पखरस्पर्शा दुर्लभं तस्य जीवितम् ॥ ७ ॥

ज्याची जीभ काळी झाली आहे व तोंड कुंकवासारखें लाल असून जिभेला किंचित् खरखरीतपणा आहे त्याचें जीवित दुर्लभ समजावें.

स्वेदो ललाटे हिमवन्नरस्य शीतार्दितस्यापि सुपिच्छिलस्य ।
कण्ठे स्थितो यस्य न याति वक्षो नूनं यमस्यैति गृहं स मर्त्यः ॥८

अंग थंड असून कपाळाला घाम येतो, थंडीनें पीडित असून अंग चिकट असतें, कंठाच्या ठिकाणीं अडकून राहिलेला कफ खालीं हृदयाकडे उतरत नाहीं असा रोगी निश्चयानें यमसदनीं जाणार म्हणून समजावें.

रात्रौ दाहोऽभितपति दिवा जायते शीतलत्वं
कण्ठे श्लेष्मा विरसवदनं कुङ्कुमाकारनेत्रे ।
जिह्वा कृष्णा वहति च सदा स्थूलसूक्ष्मा च नाडी
तद्भैषज्यं स्मरणमधुना रामरामेति नाम्नः ॥ ९ ॥

ज्याला रात्रीं अतिशय दाह होतो व दिवसा थंडी वाजते, घशांत कफ असून तोंड अगदीं विरस (बेचव) असतें, डोळे कुंकवासारखे लाल असून जीभ काळी झालेली असते व नाडी केव्हां स्थूल तर केव्हां सूक्ष्म अशी चालते तो असाध्य समजावा. रामनाम हेंच त्याला औषध समजावें.

सौम्या दृष्टिर्वदति विमलं हस्तपादौ सदोष्णौ ।
स्वल्पो दाहः सुरसवदनं कोमला यस्य जिह्वा ।
नासाश्वासो वहति सरलः स्वेदहीनो ज्वरोऽसौ ।
साध्यो रोगी भवति नियतं वैद्यभैषज्ययोग्यः ॥ १० ॥

ज्याची दृष्टि सौम्य आहे, बोलणें स्वच्छ आहे, हातापायाला उबारा आहे, अंगाचा दाह थोडा होत असून तोंडाला चव आहे, जीभ कोमल असून नाकानें सरळ श्वास चालतो व घाम नसून ज्वर आहे असा रोगी साध्य व औषधोपचाराला योग्य आहे, असें समजावें.

देशज्ञान.

देशोऽल्पवारिद्रुनगो जाङ्गलः स्वल्परोगदः ।
अनूपो विपरीतोऽस्मात्समः साधारणः स्मृतः ॥ १ ॥
जाङ्गलं वातभूयिष्ठमनूपं तु कफोल्बणम् ।
साधारणं सममलं त्रिधा भूदेशमादिशेत् ॥ २ ॥

ज्या प्रदेशामध्यें डोंगर व झाडी थोडी असते व पाऊसही थोडा पडतो त्या प्रदेशास जांगल देश म्हणतात. अशा प्रदेशामध्यें

रोग थोडे होतात. ह्याच्या उलट म्हणजे ज्या ठिकाणीं डोंगर व झाडी फार असून पाऊसही फार पडतो त्याला अनूप देश म्हणतात. ह्या प्रदेशांत रोग फार होतात. आणि ज्या प्रदेशांत झाडी व डोंगर मध्यम प्रमाणांत असून पाऊसही मध्यम प्रमाणांतच पडतो त्या प्रदेशाला साधारण देश म्हणतात. अशा प्रदेशांत रोगाचें मानही मध्यम प्रमाणांतच असतें. जांगल देशांमध्यें वातदोषाचें प्राधान्य असतें. अनूप देशांमध्यें कफाचें प्राधान्य असतें. साधारण देशांत दोषाचें मान समस्थितींत असतें. ह्याप्रमाणें ह्या पृथ्वीवर तीन प्रकारचे देश आहेत.

देशः प्रचुरपानीयो बहुवृक्षसमाकुलः ।
बहुवातकफव्याधिरनूप इति कथ्यते ॥ ३ ॥
स्वल्पोदकः स्वल्पवृक्षो बहुपित्तासृगामयः ।
कथ्यते जाङ्गलो देशस्ताभ्यां साधारणः परः ॥ ४ ॥

ज्या देशांत जलाशय फार असतात व पाऊसही फार पडतो आणि झाडी फार असते, त्या देशाला अनूप देश म्हणतात. अशा देशांत वातकफजन्यरोग फार होतात. ज्या देशांत जलाशय फार कमी असतात, पाऊसही थोडा पडतो व रक्तपित्तजन्यरोग फार होतात त्या देशास जांगलदेश म्हणतात. ह्या दोहोंहून वेगळा म्हणजे ज्या देशांमध्यें जलाशय बेताचेच असून पाऊसही बेताचाच पडतो त्या देशाला साधारण देश म्हणतात.

कोणकोणच्या महिन्यांमध्यें वातादिदोषांचा प्रकोप होतो.

मार्गे पौषे तथा माघे आषाढे श्रावणेऽपि च ।
भाद्रे मासि चिकित्साज्ञैर्वातो राजा प्रकीर्तितः ॥ १ ॥
आश्विने कार्तिके मासे वैशाखज्येष्ठयोर्ध्रुवम् ।
सर्वशास्त्रविचारज्ञैः पित्तं राजा प्रकीर्तितः ॥ २ ॥
फाल्गुने चैत्रमासे च जन्तुपीडाकरो मतः ।
शीतलाम्बुसमुद्भूतः श्लेष्मा राजा प्रकीर्तितः ॥ ३ ॥

मार्गशीर्ष, पौष, माघ, आषाढ, श्रावण व भाद्रपद ह्या महिन्यांमध्यें वातदोषाचें प्राबल्य असतें, असें वैद्यांनीं सांगितलें आहे.

आश्विन, कार्तिक, वैशाख व ज्येष्ठ ह्या महिन्यांत पित्ताचें प्राबल्य असतें असें शास्त्रवेत्ते म्हणतात. आणि फाल्गुन व चैत्र ह्या महिन्यांमध्यें थंड पाण्यापासून उत्पन्न होणारा व मनुष्यांना पीडा देणारा असा जो कफदोष त्याचें प्राबल्य असतें.

कोणच्या ऋतूमध्यें कोणचे दोष उत्पन्न होतात.

हेमन्तवर्षाशिशिरेषु वायोः पित्तस्य तोयान्तनिदाघयोश्च ।
कफस्य कोपः कुसुमागमे च कुर्वीत यद्यद्विहितं तथैव ॥ १ ॥

हेमंत, वर्षा व शिशिर ह्या ऋतूंत वाताची वृद्धि असते. शरद्ऋतू व ग्रीष्मऋतू ह्या ऋतूंमध्यें पित्ताचें प्राबल्य असतें. आणि वसंत ऋतूमध्यें कफाचा प्रकोप होत असतो. म्हणून त्या त्या ऋतूंत जे विहित म्हणजे योग्य असे आहारादि सांगितले आहेत ते करावे.

वातादि दोषांच्या प्रकोपाचीं कारणें.

संधारणाध्यशनजागरणोच्चभाषा
व्यायामयानकटुतिक्तकषायरूक्षैः ।
चिन्ताव्यवायभयलंघनशीतशोकै-
र्वातः प्रकोपमुपयाति घनागमे च ॥ १ ॥
कट्वम्लमद्यलवणोष्णविदाहितीक्ष्ण-
क्रोधातपानलभयश्रमशुष्कशाकैः ।
क्षाराद्यजीर्णविषमाशनभोजनैश्च
पित्तं प्रकोपमुपयाति घनात्यये च ॥ २ ॥
स्वप्नाद्दिवा मधुरशीतलमत्स्यमांस-
गुर्वम्लपिच्छिलतिलेक्षुपयोविकारैः ।
स्निग्धातितृप्तिलवणोदकपानभक्ष्यैः
श्लेष्मा प्रकोपमुपयाति तथा वसन्ते ॥ ३ ॥

मलमूत्रादिकांचा वेग आवरून धरणें, जेवणावर जेवण करणें, रात्रीं जागरण करणें, फार मोठ्यानें भाषण करणें, अति व्यामाम, पालखी, मेणा, गाडी वगैरे वाहनांत बसणें; तिखट, कडू, रूक्ष व तुरट असे पदार्थ अति सेवन करणें; काळजी, अतिमैथुन, भीति, उपास, थंड उपचार व शोक इतक्या कारणांनीं वर्षाऋतूमध्यें

वाताचा प्रकोप होतो. तिखट, आंबट, दारू (मद्य), खारट पदार्थ उष्ण पदार्थ, विदाही (घशाशीं जळजळणारे) तीक्ष्णपदार्थ (मोहरी वगैरे) ह्यांचें अति सेवन, राग, अतिशय ऊन घेणें, विस्तवाचा शेक घेणें, भीति, अति श्रम, सुकलेल्या भाज्यांचें अतिसेवन, क्षारादिक तीक्ष्ण पदार्थ खाणें, विरुद्ध भोजन (तिखटमिठाचे पदार्थ दुधाशीं खाणें वगैरे), अजीर्ण होईपर्यंत खाणें इत्यादि कारणांनीं शरद्ऋतूमध्यें पित्ताचा प्रकोप होतो. दिवसा झोंप घेणें, मधुर व थंड पदार्थ विशेष खाणें, मासे, मांस, जड, आंबट, बुळबुळीत (भोंकरें वगैरे) तीळ, उंस व दूध ह्यांचे पदार्थ (काकवी, दहीं वगैरे) स्निग्ध पदार्थ अतिशय खाणें, अतिशय जेवणें, खारट पदार्थ, पाणी अतिशय पिणें आणि भक्ष्य पदार्थ (चाऊन खाण्यांत येणारे, लाडू, करंज्या, पुऱ्या वगैरे) ह्यांच्या अतिसेवनानें व वसंत ऋतूमध्यें कफाचा प्रकोप होतो.

तिन्ही दोषांचीं कामें.

पारुष्यसंकोचनतोदशूलश्यावत्वभङ्गव्यथचेष्टभावान् ।
सुप्तत्वशीतत्वखरत्वशोषान्कर्माणि वायोः प्रवदन्ति तज्ज्ञाः॥१॥
परिश्रमस्वेदविदाहरागवैगन्ध्यसंक्लेदविपाककोथाः ।
प्रलापमूर्च्छाभ्रमपित्तदाहाः पित्तस्य कर्माणि वदन्ति तज्ज्ञाः॥२
श्वेतत्वशीतत्वगुरुत्वकण्डूस्नेहोपदेहस्तिमितत्वलेपान् ।
उत्सेधसंक्लेदचिरक्रियाश्च कफस्य कर्माणि वदन्ति तज्ज्ञाः॥३॥

अंग कठिण लागणें, अंग आंखडणें, अंगांत टोंचल्यासारखी पीडा होणें, ठणका, अंगावर काळसरपणा येणें, शरीरामध्यें व्यथा, अंगाचें चलनवलन न होणें, त्वचेला स्पर्श न समजणें, अंग गार असणें, अंगाला खरखरीतपणा असणें, अंग सुकणें किंवा शोष फार असणें, हीं वायूचीं कामें आहेत. आयासावांचून श्रम, अंगाला घाम फार येणें, घशाशीं जळजळणें, शरीराचा वर्ण तांबूस होणें, अंगाला दुर्गंधी असणें, अंग ओलसर असणें, अंगावर पुटकुळ्या उठणें, अंगावर गांधी उठणें, बडबड, मूर्च्छा, घेरी येणें, पित्तामुळें अंगाचा दाह होणें हीं पित्ताचीं कामें आहेत. अंगाला पांढरेपणा,

अंग थंड असणें, अंग जड असणें, अंगाला कंडू असणें, अंगाला तेल माखल्याप्रमाणें वाटणें, अंग स्तब्ध होणें, अंगाला लेपटल्या-सारखें वाटणें, अंग सुजणें, अंग ओलसर असणें व फार उशीरानें क्रिया घडणें, हीं कफाचीं कामें आहेत असें तज्ज्ञ म्हणतात.

तिन्ही दोषांच्या शमनाचा प्रकार.

स्निग्धोष्णस्थिरवृष्यबल्यलवणस्वाद्वम्लतैलातप-
स्नानाभ्यञ्जनबस्तिमांसमदिरासंवाहनोद्वर्तनम् ।
स्नेहस्वेदनिरूहनस्यशयनस्थानोपनाहादिकं
पानाहारविहारभेषजमिदं वातं प्रशान्तिं नयेत् ॥ १ ॥

स्निग्ध, उष्ण, जड, वृष्य (धातुवर्धक), बलदायक, गोड, आंबट व खारट असे पदार्थ व तेल ह्यांचें सेवन, ऊन घेणें, स्नान करणें, अंगाला तेल लावणें, बस्ती घेणें, मांस व मद्य ह्यांचें सेवन, अंग रगडणें, अंगाला उटी लावणें, अंतर्बाह्य तेलाचा उपयोग करणें (स्नेहन), घाम काढणें, निरूह नांवाचा (काढ्याचा) बस्ति घेणें, नस्य (नाकांत औषध घालणें), झोंप घेणें व ज्या ठिकाणीं वात असेल त्या ठिकाणीं पोटिस बांधणें, अशा प्रकारच्या आहार-विहारादिकांनीं वातदोषाचें शमन करावें.

तिक्तस्वादुकषायशीतपवनच्छायानिशावीजन-
ज्योत्स्नाभूगृहवारियन्त्रजलजस्त्रीगात्रसंस्पर्शनम् ।
सर्पिःक्षीरविरेकसेकरुधिरस्रावोपदेहादिकं
पानाहारविहारभेषजमिदं पित्तं प्रशान्तिं नयेत् ॥ २ ॥

कडू, गोड, तुरट, असे पदार्थ खाणें, गार वारा घेणें, सावली, रात्रीची वेळ, एकांतवास, चांदणें, ह्याचें सेवन; तळघरामध्यें बसणें, जवळ आसपास कारंजे सोडणें, कमळाचीं फुलें धारण करणें, स्त्रियांचें आलिंगन, दूध व तूप यांचें सेवन, रेचक, अंगावर गुलाब-पाणी वगैरे शिंपडणें, रक्त काढणें, थंडगार असे लेप करणें, अशा प्रकारच्या आहारविहारादिकांनीं पित्ताचें शमन करावें.

रूक्षक्षारकषायतिक्तकटुकव्यायामनिष्ठीवनं
स्त्रीसेवाध्वनियुद्धजागरजलक्रीडापदाघातनम् ।

धूमस्तापशिरोविरेकवमनं स्वेदोपनाहादिकं
पानाहारविहारभेषजमिदं श्लेष्माणमुग्रं जयेत् ॥ ३ ॥

रूक्ष, खारट, तुरट, खट्ट, तिखट अशा प्रकारचे पदार्थ खाणें, व्यायाम (श्रम) करणें, वमन करणें (ओकारी करणें), मैथुन (स्त्रीसेवन), मार्ग चालणें (प्रवास), युद्ध (कुस्ती वगैरे), जागरण, जलक्रीडा, पायांनीं अंग तुडविणें, धूम्रपान, शेकणें, शिरोविरेचन (नाकांत औषध ओढून नाकावाटे मस्तकांतील कफ काढून टाकणें), ओकारी, घाम काढणें, अंगास सुखकर असे लेप वगैरे करणें, इत्यादि आहारविहारादिकांनीं उग्र अशा कफदोषास जिंकावें.

कफं दुर्जनवत्तीक्ष्णैर्वातं स्नेहेन मित्रवत् ।
पित्तं जामातरमिव मधुरैः शीतलैर्जयेत् ॥ ४ ॥

दुर्जनाला जसें कठोर शासनानें ताब्यांत आणावें लागतें, तसेंच तीक्ष्ण उपचारांनीं कफास जिंकावें. मित्राप्रमाणें स्नेहानें (स्निग्ध उपचारानें) वातास ताब्यांत ठेवावें. आणि पित्ताला जांवईबुवाप्रमाणें आदरपूर्वक मधुर व थंड अशा उपचारांनीं जिंकावें.

कफप्रकोपे वमनं सनस्यं विरेचनं पित्तभवे विकारे ।
वातामये बस्तिविशोधनं च संसर्गजे च प्रविमिश्रमेतत् ॥ ५॥

कफदोषाचा प्रकोप झाला असतां त्याला नस्य (नाकांत औषध घालणें) व वमन (ओकारी) द्यावें. पित्तविकारावर रेचक आणि आणि वातविकारावर बस्ति व रेचक द्यावें. दोन दोन दोषांच्या विकारांवर त्या त्या दोन दोन दोषांचे उपचार करावे.

दिवस व रात्र ह्यांमधील तिन्ही दोषांच्या प्रवर्तक वेळा.

श्लेष्मा प्रायस्तु पूर्वाह्णे प्रदोषे च प्रवर्तते ।
पित्तं प्रायस्तु मध्याह्ने क्षपामध्ये प्रवर्तते ॥ १ ॥
अपराह्णेऽनिलः प्रायोऽपररात्रे प्रवर्तते ॥

प्रातःकाळीं व सायंकाळीं बहुतेक कफाचें प्राबल्य असतें. मध्यान्ह (दिवसाचा मध्य) व मध्यरात्र ह्या वेळीं पित्ताचें प्राबल्य असतें. दिवसाच्या तिसऱ्या प्रहरांत (अपराह्णीं) व रात्रीच्या तिसऱ्या प्रहरांत वाताचें प्राबल्य असतें.

आमव्याधीचें लक्षण.

आलस्यतन्द्राहृदयाविशुद्धिदोषप्रवृत्त्याकुलमूत्रभावैः ।
गुरूदरत्वारुचिसुप्तताभिरामान्वितं व्याधिमुदाहरन्ति ॥ १ ॥

आळस, ग्लानि, मनाला अस्वस्थता, वातादि दोषांची योग्य मार्गाकडे प्रवृत्ति नसल्यामुळें मलमूत्र साफ न होणें, पोटाला जडत्व, अरुचि व अंगाला बधिरपणा हीं लक्षणें आमयुक्त विकारामध्यें असतात.

त्याचा प्रतिकार.

आमं जयेल्लंघनकोष्णपेयालघ्वन्नरूक्षौदनतिक्तयूषैः ।
निरूहणैः स्वेदनपाचनैश्च संशोधनैरूर्ध्वमधस्तथा च ॥ १ ॥

लंघन, सुखोष्ण अशी पेज, हलकें व रूक्ष असें अन्न, कडू रसानें युक्त अशीं धान्याचीं कढणें, निरूह बस्ति, घाम काढणें, पाचन औषधें देणें, वमन व रेचन असें दोन्ही प्रकारचें संशोधन अशा उपायांनीं आमव्याधि जिंकावा.

वयोविचार.

बाल्यमाषोडशाद्वर्षान्मध्यमासप्ततेस्ततः ।
वृद्धत्वमूर्ध्वं विज्ञेयं वयोमानमिति त्रिधा ॥ १ ॥

जन्मापासून वयाच्या सोळा वर्षांपर्यंत बाल्यावस्था, सत्तर वर्षांपर्यंत मध्यमावस्था आणि त्याच्या पुढें वृद्धावस्था, ह्याप्रमाणें वयमान तीन प्रकारचें आहे.

प्रकृति.

अधृतिरदृढसौहृदः कृतघ्नः कृशपरुषो धमनीततः प्रलापी ।
द्रुतगतिरटनोऽनवस्थितात्मा वियति च गच्छति संभ्रमेण सुप्तः ॥
अव्यवस्थितमतिश्चलदृष्टिर्मन्दरत्नधनसंचयमित्रः ।
किंचिदेव विलपत्यनिबद्धं मारुतप्रकृतिरेष मनुष्यः ॥ २ ॥

धैर्यहीन, दृढमैत्री न करणारा, कृतघ्न, शरीराचा बांधा कृश असलेला, त्याच्या अंगाच्या शिरा बारीक व ताणल्यासारख्या असतात, ज्याचें मन स्थिर नसतें, जो निजला असतां स्वप्नांत आपण भ्रमण करीत आकाशांत गेलों आहों असें पहातो, ज्याची बुद्धि

चंचल असते, दृष्टिही चंचल असते, ज्याच्याजवळ रत्नें व धन-संचय थोडा असतो, ज्याला मित्रही फार नसतात, आणि किंचित् असंबद्ध भाषण करितो, अशा प्रकारचा मनुष्य वातप्रकृति समजावा.

मेधावी निपुणमतिर्विगल्भवक्ता तेजस्वी समितिषु दुर्निवारवीर्यः।
सुप्तःसन्कनकपलाशकर्णिकारान्संपश्येदपि च हुताशविद्युदुल्काः॥
न भयात्प्रणमेदनतेष्वमृदुः प्रणतेष्वपि सान्त्वनदानपरः।
भवतीह सदा व्यथितास्यगतिः स भवेदिह पित्तमयप्रकृतिः ॥४॥

बुद्धिमान्, कुशलबुद्धीचा, धीटपणानें भाषण करणारा, पराक्रमी, युद्धामध्यें अनिवार शौर्य गाजविणारा, निजला असतां स्वप्नामध्यें सोनें, पळसाचीं झाडें व बाहव्याचीं झाडें, वीज, अग्नि, व उल्का (पडणारे तारे) ह्यांना पहाणारा, भीतीनें कोणालाही नम्र न होणारा, आपणाशीं उद्धटपणानें वागणाराबरोबर कठोरपणानें वागणारा, आणि आपणाशीं नम्र वागणाराबरोबर शांत व उदारपणानें वागणारा, व मुखरोगानें युक्त असा मनुष्य पित्तप्रकृति असतो म्हणून समजावें.

शुक्लाक्षः स्थिरकुटिलालिनीलकेशो लक्ष्मीवाञ्जलदमृदङ्गसिंहघोषः।
सुप्तः सन्सकमलहंसचक्रवाकान्संपश्येदपि च जलाशयान्मनोज्ञान्
रक्तान्तनेत्रः सुविभक्तगात्रः स्निग्धच्छविः सत्त्वगुणोपपन्नः।
क्लेशक्षमो मानयिता गुरूणां ज्ञेयो बलासप्रकृतिर्मनुष्यः ॥ ६ ॥

ज्याचे डोळे पांढरे आहेत असा, भुंग्याप्रमाणें काळेभोर केस असून राठ (स्थिर) व वांकड्या केसाचा, श्रीमान्; मृदंग, मेघ, किंवा सिंह ह्यांच्याप्रमाणें गंभीर भाषण करणारा, निजला असतां झोंपेंत कमळें, हंसपक्षी, चक्रवाकपक्षी आणि सुंदर जलाशय पहाणारा, ज्याच्या डोळयाचे कोपरे आरक्तवर्ण आहेत असा, ज्याचे अवयव व्यवस्थित विलग आहेत असा, स्निग्ध कांतीचा, सत्वगुणी, कष्ट सहन करणारा, गुरु, वडील माणसें, देवता ह्यांना पूज्य मानणारा, असा मनुष्य कफप्रकृति आहे म्हणून समजावें.

द्वयोर्वा तिसृणां वापि प्रकृतीनां तु लक्षणैः।
ज्ञात्वा संसर्गजा वैद्यः प्रकृतीरभिदर्शयेत् ॥ ७ ॥
विषजातो यथा कीटो न विषेण विपद्यते।

तद्वत्प्रकृतयो मर्त्यं शक्नुवंति न बाधितुम् ॥ ८ ॥

ज्याच्या प्रकृतीमध्यें वरील तीन प्रकृतीच्या लक्षणांपैकीं कोणत्याही दोन दोषांचीं लक्षणें दिसून येतील त्याची प्रकृति द्वंद्वज समजावी आणि तीन्ही दोषांचीं लक्षणें ज्या प्रकृतींत दिसून येतील ती त्रिदोषात्मक प्रकृति समजावी. विषामध्यें उत्पन्न होणारा किडा जसा त्या विषानें नाश पावत नाहीं त्याप्रमाणें हे वातादि जरी दोष आहेत तरी त्यांच्याचपासून बनणारी प्रकृति मनुष्याला बाधा करूं शकत नाहीं.

आरोग्यलक्षण.

मङ्गलाचारसंपन्नः परिवारस्तथाऽऽतुरः ।
श्रद्दधानोऽनुकूलश्च प्रभूतद्रव्यसंग्रहः ॥ १ ॥
सत्त्वलक्षणसंयुक्तो भक्तिर्वैद्यद्विजातिषु ।
चिकित्सायामनिर्वेदस्तदारोग्यस्य लक्षणम् ॥ २ ॥

रोग्याचा परिवार व रोगी हे मंगलाचारसंपन्न, भक्तिमान् वैद्याला अनुकूल (वैद्य सांगील तसे वागणारे) विपूल संपत्ति, सात्विक गुणांनीं युक्त, वैद्य व ब्राह्मण ह्यांच्यावर पूर्ण भक्ति, औषधोपचाराविषयीं कंटाळा नसणें, इतका सर्व संभार ज्याजवळ आहे त्या रोग्याला निश्चयानें आरोग्य प्राप्त होणार म्हणून समजावें.

परिभाषा.

न मानेन विना युक्तिर्द्रव्याणां जायते क्वचित् ।
अतः प्रयोगकार्यार्थं मानमत्रोच्यते मया ॥ १ ॥
मानं च द्विविधं प्रोक्तं कालिङ्गं मागधं तथा ।
कालिङ्गान्मागधं श्रेष्ठमिति मानविदो विदुः ॥ २ ॥

परिमाणावांचून औषध योजतां येत नाहीं, म्हणून औषधांचे योग तयार करण्यासाठीं औषधांचें परिमाण सांगतों. एक कालिंग व दुसरें मागध असे औषधीच्या वजनमापाचे दोन प्रकार आहेत. त्यांत कालिंगमानापेक्षां मागधमान श्रेष्ठ आहे असें तज्ज्ञांचें मत आहे.

त्रसरेणुर्बुधैः प्रोक्तस्त्रिंशद्भिः परमाणुभिः ।
त्रसरेणुस्तु पर्यायनाम्ना वंशी निगद्यते ॥ ३ ॥
जालान्तरगतैः सूर्यकरैर्वंशी विलोक्यते ।

षड्वंशीभिर्मरीचिः स्यात्ताभिः षड्भिश्च राजिका ॥ ४ ॥

तीस परमाणूंचा एक त्रसरेणू होतो. त्रसरेणूचा पर्यायशब्द वंशी असा आहे. घरांमध्यें कौलाराच्या पिंजरीच्या छिद्रांतून जो सूर्यकिरणाचा कवडसा पडतो, त्यांत जे रजःकण दिसतात, त्यांलाच वंशी किंवा त्रसरेणू म्हणतात. सहा वंशींची एक मरीचि होते. व सहा मरीचींची एक राजिका (राई) होते.

तिसृभी राजिकाभिश्च सर्षपः प्रोच्यते बुधैः ।
यवोऽष्टसर्षपैः प्रोक्तो गुञ्जा स्यात्तच्चतुष्टयम् ॥ ५ ॥

तीन राजिका मिळून एक सर्षप (शिरस) होतो. आठ सर्षपांचा एक यव आणि चार यवांची एक गुंज होते.

षड्भिस्तु रक्तिकाभिः स्यान्माषको हेमधानकौ ।
माषैश्चतुर्भिः शाणः स्याद्धरणः स निगद्यते ॥ ६ ॥
टङ्कः स एव कथितस्तद्द्वयं कोल उच्यते ।
क्षुद्रभो वटकश्चैव द्रंक्षणः स निगद्यते ॥ ७ ॥

सहा गुंजांचा एक मासा होतो. हेम व धानक (किंवा धान्यक) हे त्याचे पर्याय शब्द आहेत. चार माशांचा एक शाण होतो. त्यालाच धरण व टंक अशीं नांवें आहेत. दोन शाणांचा एक कोल होतो. क्षुद्रभ, वटक व द्रंक्षण हे कोलाचे पर्याय शब्द आहेत.

कोलद्वयं तु कर्षः स्यात्स प्रोक्तः पाणिमानिका ।
अक्षः पिचुः पाणितलं किंचित्पाणिश्च तिन्दुकम् ॥ ८ ॥
बिडालपदकं चैव तथा षोडशिका मता ।
करमध्यं हंसपदं सुवर्णं कवलग्रहः ॥ ९ ॥
उदुम्बरं च पर्यायैः कर्ष एव निगद्यते ।

दोन कोलांचा एक कर्ष (तोळा) होतो. कर्षालाच पाणिमानिका असें म्हणतात. अक्ष, पिचु, पाणितल, किंचित्पाणि, तिंदुक, बिडालपदक, षोडशिका, करमध्य, हंसपद, सुवर्ण, कवलग्रह व उदुंबर, हे कर्षाचे पर्याय शब्द आहेत.

स्यात्कर्षाभ्यामर्धपलं शुक्तिरष्टमिका तथा ॥ १० ॥
शुक्तिभ्यां च पलं ज्ञेयं मुष्टिराम्रं चतुर्थिका ।
प्रकुञ्चः षोडशी बिल्वं पलमेवात्र कीर्त्यते ॥ ११ ॥

दोन कर्षांचें (तोळ्यांचें) एक अर्धपल होतें. शुक्ति व अष्टमिका

हीं त्याचीं दुसरीं नांवें आहेत. दोन शुक्तींचें (अर्धपलांचें) एक पल होतें. मुष्टि, आम्र, चतुर्थिका, प्रकुंच, षोडशी व बिल्व हे पलाचे पर्यायशब्द आहेत.

पलाभ्यां प्रसृतिर्ज्ञेया प्रसृतश्च निगद्यते ।
प्रसृतिभ्यामंजलिः स्यात्कुडवोऽर्धशरावकः ॥ १२ ॥
अष्टमानं च विज्ञेयं कुडवाभ्यां च मानिका ।
शरावोऽष्टपलं तद्वज्ज्ञेयमत्र विचक्षणैः ॥ १३ ॥

दोन पलांची एक प्रसृति (पसा) होते. प्रसृत हा तिचा पर्यायशब्द आहे. दोन प्रसृतींचा एक अंजलि (ओंजळ). कुडव, अर्धशराव, अष्टमान हे अंजलीचे पर्यायशब्द आहेत. दोन कुडवांची एक मानिका होते. शराव आणि अष्टपल हे मानिकेचे पर्यायशब्द आहेत.

शरावाभ्यां भवेत्प्रस्थश्चतुष्प्रस्थैस्तथाढकम् ।
भाजनं कंसपात्रं च चतुःषष्टिपलं च तत् ॥ १४ ॥

दोन शरावांचा एक प्रस्थ आणि चार प्रस्थांचा एक आढक. भाजक व कंसपात्र हे आढकाचे पर्यायशब्द आहे. ह्याचीं पलें चौसष्ट होतात.

चतुर्भिराढकैर्द्रोणः कलशो नल्वणोऽर्मणः ।
उन्मानश्च घटो राशिर्द्रोणपर्यायसंज्ञिताः ॥ १५ ॥

चार आढकांचा एक द्रोण. कलश, नल्वण, अर्मण, उन्मान, घट व राशि हे द्रोणाचे पर्यायशब्द आहेत.

द्रोणाभ्यां शूर्पकुम्भौ च चतुःषष्टिशरावकः ।
शूर्पाभ्यां च भवेद्द्रोणी वाहो गोणी च सा स्मृता ॥ १६ ॥
द्रोणीचतुष्टयं खारी कथिता सूक्ष्मबुद्धिभिः ।
चतुःसहस्रपलिका षण्णवत्यधिका च सा ॥ १७ ॥

दोन द्रोणांचा एक शूर्प. कुंभ हा त्याचा पर्यायशब्द आहे. शूर्पाचे शराव चौसष्ट होतात. दोन शूर्पांची एक द्रोणी होते. वाह व गोणी हे तिचे पर्यायशब्द आहेत. चार द्रोणींची एक खारी होते. खारीचीं पलें चार हजार शहाण्णव होतात.

पलानां द्विसहस्रं च भार एकः प्रकीर्तितः ।
तुला पलशतं ज्ञेया सर्वत्रैवं विनिश्चयः ॥ १८ ॥

दोन हजार पळांचा एक भार होतो. आणि शंभर पळांची एक तुला होते, असें समजावें.

माषटङ्काक्षबिल्वानि कुडवः प्रस्थमाढकम् ।
राशिर्गोणी खारिकेति यथोत्तरचतुर्गुणाः ॥ १९ ॥

मासा, टंक, अक्ष (तोळा), बिल्व (पल), कुडव (अंजलि– ओंजळ), प्रस्थ, आढक, राशि, गोणी, खारी, हीं परिमाणें उत्तरोत्तर एकाहून एक चौपट आहेत. (जसें–चार माशांचा एक टंक; चार टंकांचा एक अक्ष (तोळा); चार अक्षांचा एक बिल्व (पळ); चार पळांचा एक कुडव; चार कुडवांचा एक प्रस्थ; चार प्रस्थांचा एक आढक; चार आढकांचा एक राशि; चार राशींची एक गोणी; आणि चार गोणींची एक खारी, ह्याप्रमाणें जाणावें.)

गुञ्जादिमानमारभ्य यावत्स्यात्कुडवस्थितिः ।
द्रवार्द्रशुष्कद्रव्याणां तावन्मानं समं मतम् ॥ २० ॥
प्रस्थादिमानमारभ्य द्विगुणं तद्द्रवार्द्रयोः ।
मानं तथा तुलायास्तु द्विगुणं न क्वचित्स्मृतम् ॥ २१ ॥

एक गुंजेपासून कुडवापर्यंत पातळ द्रव्यें, ओलीं द्रव्यें व शुष्क (वाळलेलीं) द्रव्यें ह्या सर्वांचें मान समान समजावें. आणि प्रस्थापासून पुढें पातळ द्रव्यें, ओलीं द्रव्यें ह्यांचें मान शुष्क द्रव्यापेक्षां दुप्पट समजावें. तथापि तुळेचें मान दुप्पट घेऊं नये.

मृद्वृक्षवेणुलोहादेर्भाण्डं यच्चतुरङ्गुलम् ।
विस्तीर्णं च तथोच्चं च तन्मानं कुडवं वदेत् ॥ २२ ॥
यदौषधं तु प्रथमं यस्य योगस्य कथ्यते ।
तन्नाम्नैव स योगो हि कथ्यतेऽत्र विनिश्चयः ॥ २३ ॥

पातळ औषधें मोजण्याकरितां मातीचें, लाकडाचें, कळकाचें किंवा लोहाचें विस्तारानें व उंचीनें चार अंगुळाचें जें भांडें (माप) करितात त्याला कुडव असें म्हणतात. ज्या औषधीप्रयोगांत जें द्रव्य प्रथम असतें, त्या द्रव्याचें नांव त्या योगाला असतें, असें समजावें. (जसें–शठ्यादिकषाय (काढा) सीतोपलादिचूर्ण, भार्ग्यादिवटि, कूष्मांडपाक, वगैरे.)

कलिंगपरिभाषा.

स्थितिर्नास्त्येव मात्रायाः कालमग्निं वयो बलम् ।
प्रकृतिं दोषदेशौ च दृष्ट्वा मात्रां प्रकल्पयेत् ॥ १ ॥
यतो मन्दाग्नयो ह्रस्वा हीनसत्त्वा नराः कलौ ।
अतस्तु मात्रा तद्योग्या प्रोच्यते सुज्ञसंमता ॥ २ ॥

औषधसेवनाचें प्रमाण निश्चित असें ठरावितां येत नाहीं. काल (उन्हाळा, पावसाळा वगैरे), जठराग्नि, वय, शक्ति, प्रकृति, वातादि दोषांची स्थिति, आणि देश (देशाचें हवामान, देश जांगल आहे कां अनूप आहे वगैरे) ह्या सर्वांचा विचार करून मात्रा (औषध सेवनाचें मान) ठरवावी. ज्या अर्थी ह्या कलियुगांमध्यें लोक शरीरानें लहान आकाराचे, मंदाग्नि (ज्यांचा जठराग्नि मंद आहे असे) व बलहीन असे असतात, त्या अर्थी विद्वानांच्या संमतीनें अशा लोकांना योग्य असें औषधाचें प्रमाण सांगतों.

यवो द्वादशभिर्गौरसर्षपैः प्रोच्यते बुधैः ।
यवद्वयेन गुञ्जा स्यात्रिगुञ्जो वल्ल उच्यते ॥ ३ ॥
माषो गुञ्जाभिरष्टाभिः सप्तभिर्वा भवेत्क्वचित् ।
स्याच्चतुर्माषकैः शाणः स निष्कष्टङ्क उच्यते ॥ ४ ॥
गद्याणो माषकैः षड्भिः कर्षः स्याद्दशमाषकः ।
चतुष्कर्षैः पलं प्रोक्तं दशशाणमितं बुधैः ॥
चतुष्पलैश्च कुडवः प्रस्थाद्याः पूर्ववन्मताः ॥ ५ ॥

बारा पांढऱ्या शिरसांचा (सर्षपांचा) एक यव होतो. दोन यवांची एक गुंज. तीन गुंजांचा एक वाल (वल्ल) होतो. आठ गुंजांचा किंवा क्वचित् सात गुंजांचा मासा होतो. चार माशांचा एक शाण होतो. निष्क व टंक हे माषाचे पर्याय शब्द आहेत. सहा माशांचा एक गद्याण होतो. आणि दहा माशांचा एक तोळा (कर्ष) होतो. चार तोळ्यांचें एक पल. पलाचे शाण दहा होतात. चार पलांचा एक कुडव. ह्यापुढील प्रस्थापासून सर्व मानें पूर्वी सांगितलेल्या मागध परिभाषेप्रमाणेंच समजावीं.

धान्यादींचे गुण.[1]

साळ.

श्वेता रक्ताः स्थूलसूक्ष्मा ये चान्ये शालयः शुभाः ।
स्वादुपाकरसाः स्निग्धा वृष्या बद्धाल्पवर्चसः ॥ १ ॥
कषायानुरसाः पथ्या लघवो मूत्रला हिमाः ।
षष्टिका व्रीहिषु श्रेष्ठा गौरश्चासितगौरतः ॥ २ ॥

पांढऱ्या, तांबड्या, स्थूल (मोठ्या), सूक्ष्म (बारीक), या खेरीज आणखी दुसऱ्या सर्व जातीच्या साळी ह्या सर्व उत्तम प्रकारच्या आहेत. ह्या सर्व काळीं व पाककाळीं मधुर, स्निध, वृष्य (धातुवर्धक), मलबंधक, अल्प मळ उत्पन्न करणाऱ्या आहेत. व साठेसाळी रुचीला मागून किंचित् तुरट, पथ्यकारक (कोणच्याही रोगांत हितकर), पचनाला हलक्या, मूत्रल (अतिशय मूत्रकारक), व थंड आहेत. व्रीहि जातीच्या भातामध्यें साठेसाळी श्रेष्ठ आहेत. साठेसाळीमध्यें कृष्णशाली व गौरशाली (काळें व पांढरें भात) हे मुख्य दोन भेद आहेत. ह्या दोहोंमध्यें पांढऱ्या साळी श्रेष्ठ आहेत.[2]

जव-सातु.

रूक्षः शीतो गुरुः स्वादुः सरो विड्वातकृद्यवः ।

---

१. ह्या गुणदोषप्रकरणाच्या आरंभीं क्वचित्प्रतींमध्यें पुढील श्लोक आहे.

गोधूमशालितुवरीयवयावनाला,
वार्तांगलंकमसुराश्चणकाः कुलित्थाः ॥
मुद्गाः प्रियंगुतिलकोद्रवकातसी च
श्यामाकमाषचवला इति धान्यवर्गः ॥ १ ॥

गहूं, साळी, तुरी, जव, जोंधळे, वार्तांग (वाटाणे), लांक, मसूरा, हरभरे, हुलगे, मूग, राळे, तीळ, हारीक, अळशी (जवस) सावे, उडीद व चवळ्या ह्याला धान्यवर्ग म्हणतात.

२. ह्या ठिकाणीं शालि व व्रीहि असा भेद न करितां मोघम व्रीहिंमध्यें साठेसाळी श्रेष्ठ म्हटलें आहे. पण चरकादि ग्रंथांतून शालि व व्रीहि असे भाताचे दोन भेद मानले आहेत. ह्यासंबंधीं फक्त दत्ताच्या द्रव्यगुणसंग्रहावरील टीकाकार शिवदास सेन म्हणतो कीं, ग्रीष्म ऋतूमध्यें होणाऱ्या षष्टिकादि शालि हा एक प्रकार, ह्यांना शालि म्हणतात. आणि शरद्ऋतूमध्यें होणाऱ्या शालींना व्रीहि म्हणतात. तथापि शालि व व्रीहि ह्यांमध्यें तादृश भेद नाहीं.

जव हे रूक्ष, थंड, जड, मधुर आणि सारक असून मल व वात ह्यांना उत्पन्न करितात.

गहूं.

संधानकारी मधुरो गोधूमः स्थैर्यकृत्सरः ॥ ३ ॥

गहूं मोडलेल्या हाडाला सांधणारा, मधुर, शरीराला बळकटी आणणारा (स्थैर्यकारक), व सारक आहे.

जोंधळे.

युगंधरस्त्रिदोषघ्नः स्वादुः पथ्यो रसायनः ।

जोंधळे त्रिदोषनाशक, मधुर, पथ्यकारक व रसायन (शरीरांतील सप्तधातूंना समप्रमाणांत ठेवणारे) असे आहेत.

मूग, तुरी, मसूर इत्यादि.

मुद्गाढकीमसूरादि शिम्बीधान्यं विबन्धकृत् ॥ ४ ॥
कषायं स्वादु संग्राहि कटुपाकं हिमं लघु ।
मेदश्लेष्मास्रपित्तेषु हितं लेपोपसेकयोः ॥ ५ ॥

मूग, तुरी, मसुरा, वगैरे शेंगांत होणारीं धान्यें मलाचा खडा बनविणारीं आहेत. तसेंच तुरट, गोड, मळ घट्ट करणारी, (संग्राही) पाककाळीं तिखट, थंड, हलकीं, मेद, कफ, रक्तपित्त ह्या विकारांना हितकारक आहेत. लेप करण्याचें कामीं व वरण करण्याकडे ह्यांचा चांगला उपयोग होतो.

मुद्गस्तु पथ्यः संशुद्धव्रणकण्ठाक्षिरोगिणाम् ।
वातानुलोमी कौलत्थो गुल्मतूनिप्रतूनिजित् ॥ ६ ॥
वरोऽत्र मुद्गोऽल्पचलः कलायस्त्वतिवातलः ।
चणको वातलस्तद्वत्कुलत्थः कफवातहृत् ॥ ७ ॥

ह्या शिंबीधान्यांत (शेंगांत होणाऱ्या धान्यांत) मूग हे विशेषतः पथ्यकारक, व्रणशोधक, आणि ज्याला गळ्यासंबंधीं रोग आहेत त्याला व नेत्ररोग्यांना हितकारक आहेत. हुलगे वायूचें अनुलोमन करणारे (वायूला मार्गावर आणणारे) असून गुल्म, तूनी व प्रतूनी (हे दोन वातरोग आहेत) ह्या विकारांचा नाश करितात. ह्या सर्व शेंगांत होणाऱ्या धान्यांत मूग हें श्रेष्ठ असून किंचित वातकारक आहेत. आणि वाटाणे तर फारच वातकारक

आहेत. हरभरे हे वाटाण्याप्रमाणेंच वातकारक असून हुलगे कफवातनाशक आहेत.

चंदनबटवा, चिलघोळ, कांगोणी व मेथी.

वास्तुकं ग्रहणीकुष्ठत्रिदोषार्शोहरं सरम् ।
तद्वल्लघुदला चिल्ली काचमाची च मेथिका ॥ ८ ॥

चंदनबटव्याची भाजी संग्रहणी, कोड, त्रिदोष, व मूळव्याध यांची नाशक आहे. त्याचप्रमाणें लहान पानाची घोळ, कांगोणी, व मेथी ह्या भाज्यांचे गुण आहेत.

तांदुळजा व चुका.

तन्दुलीयो हिमो रूक्षो विषपित्तास्रकासजित् ।
चाङ्गेरी कफवातास्रसंग्रहण्यतिसारजित् ॥ ९ ॥

तांदुळजाची भाजी थंड, रूक्ष, विष, रक्तपित्त, व खोकला यांची नाशक आहे. व चुक्याची भाजी कफ, वातरक्त, संग्रहणी व अतिसार ह्यांची नाशक आहे.

पडवळ.

हृद्यं पटोलं कृमिजित्स्वादु शीतं रुचिप्रदम् ।
पटोलपत्रं पित्तघ्नं नालं तस्य कफापहम् ॥ १० ॥
फलं त्रिदोषशमनं मूलं चास्य विरेचनम् ।

पडवळ हें हृदयाला हितकारक, कृमिनाशक, गोड, थंड व रुचिदायक आहे. ह्याचीं पानें पित्तशामक असून त्याची वेल कफनाशक आहे. पडवळीचें फळ तिन्हीही दोषांचा नाश करणारें असून मूळ हें रेच करणारें आहे.

रिंगणी व डोरलें.

पित्तलं दीपनं भेदि वातघ्नं बृहतीद्वयम् ॥ ११ ॥

रिंगणी व डोरली पित्तकारक, अग्निदीपक, मलभेदक, व वातनाशक आहेत.

कारलें व कर्टोली.

कारवेल्लं सतिक्तं स्याद्दीपनं कफजित्परम् ।
कर्कोटकं ज्वरश्वासदद्रुकुष्ठविषापहम् ॥ १२ ॥

कारलें हें कडु, अग्निदीपक, व अत्युत्तम कफनाशक आहे. व

कर्टोलीचें फळ (काटलें) ज्वर, श्वास, दाद (गजकर्ण), कोड व विष यांचें नाशक आहे.

वांगें.

वार्ताकं कफवातघ्नं किंचित्पित्तप्रकोपनम् ।
सरलं मूत्रलं प्रोक्तं बलकृद्बालमेव तत् ॥ १३ ॥

वांगें हें कफवातनाशक, किंचित पित्तकारक, सारक (शौचास साफ करणारें), मूत्रल व (अतिशय मूत्र करणारें) असून कोवळें वांगें हें बलकारक आहे.

भेंडी.

भेण्डी त्वम्लरसा सोष्णा ग्राहिका रुचिकारिका ।

भेंडी ही आंबट रस उत्पन्न करणारी असून उष्ण, ग्राही (मळ बांधीव करणारी) व रुचिकारक आहे.

तोंडलें.

बिम्बीफलं स्वादु शीतं स्तम्भनं लेखनं गुरु ॥ १४ ॥
पित्तास्रदाहशोफघ्नं वाताध्मानविबन्धकृत् ।

तोंडलीचें फळ गोड, थंड, मलाचा अवरोध करणारें (स्तंभक), लेखन (दोषांना पातळ करणारें), जड, रक्तपित्त, दाह व सूज ह्यांचा नाश करणारें, वायु, पोटफुगी व शौचाचा अवरोध ह्यांना उत्पन्न करणारें आहे.

कोहळा.

कूष्माण्डं बृंहणं शीतं गुरु पित्तास्रवातजित् ॥ १५ ॥
बालं पित्तापहं शीतं मध्यमं कफकारकम् ।
पक्वं नातिहिमं स्वादु सारकं दीपनं लघु ॥ १६ ॥
बस्तिशुद्धिकरं चेतोरोगदोषत्रयापहम् ।

कोहळा पौष्टिक, थंड, जड, रक्तपित्त व वात ह्यांचा नाशक आहे. कोंवळा कोहळा पित्तनाशक व थंड आहे. जून कोहळा कफकारक आहे. पिकलेला कोहळा अतिशय थंड नसून गोड, सारक, दीपन, हलका, बस्तीचें शोधन करणारा, मानसिक विकारांचा नाशक आणि तिन्हीही दोषांचें शमन करणारा आहे.

दुध्या भोपळा.

मिष्टतुम्बीफलं वृष्यं कफपित्तहरं गुरु ॥ १७ ॥

गोड दुध्या भोपळा कामोद्दीपक, कफपित्तनाशक व जड आहे.

कडू भोपळा.

कटुतुम्बी हिमा हृद्या पित्तकासकफापहा ।

कडू भोपळा थंड, हृदयाला हितावह, कफ पित्त व खोकला यांचा नाशक आहे.

तवसें—काकडी.

त्रपुसं मूत्रलं शीतं रूक्षं पित्तास्रकृच्छ्रजित् ॥ १८ ॥
तत्पक्वमुष्णमम्लं स्यात्पित्तलं कफवातजित् ।

कांकडी मूत्रकारक, थंड, रूक्ष, रक्तपित्त व मूत्रकृच्छ्र यांची नाशक आहे. ती पिकली असतां उष्ण व आंबट असून पित्तकारक व कफवातनाशक आहे.

दोडकी.

कोशातकी लघुस्तिक्ता रूक्षाऽऽमाशयशोधिनी ॥ १९ ॥
शोफपाण्डूदरप्लीहकुष्ठार्शःकफपित्तजित् ।
तत्पत्रं भेदनं शीतं लघु मेहविशोषजित् ॥ २० ॥

दोडकी हलकी, कडू, रूक्ष, आमाशयाचें शोधन करणारी, सूज, पांडुरोग, उदर, पांथरी, कोड, मूळव्याध, व कफपित्त ह्यांचा नाश करणारी आहे. हिचें पत्र (पान) मलभेदक, थंड, हलकें, प्रमेह व शोष ह्यांचें नाशक आहे.

शेपूची भाजी.

शतपुष्पा कटुः स्निग्धा तिक्तोष्णा श्लेष्मवातहा।
रुच्या वस्तिहिता नेत्र्या बद्धविट्क्रिमिशुक्रनुत् ॥ २१ ॥

शेपूची भाजी तिखट, स्निग्ध, कडवट, उष्ण, कफवातनाशक, रुचिकारक, बस्तीला (ओटीपोटाला) हितावह म्हणजे बस्तिशोधक, नेत्रांना हितकर, मलबद्धतानाशक (शौचास साफ करणारी), कृमि व शुक्रदोष ह्यांची नाशक आहे.

चाकवत.

चक्रवर्त्याभिधं शाकं गुणैर्वास्तुकवन्मतम् ।
सरं शीतं त्रिदोषघ्नं लघु दीपनपाचनम् ॥ २२ ॥

चाकवताची भाजी गुणानें चंदनबटव्याच्या भाजीप्रमाणें असून सारक, थंड, त्रिदोषनाशक, हलकी, अग्निदीपक व पाचक आहे.

शिरस-मोहरीचा भेद-ह्याची भाजी.

शाकं तु सर्षपोद्भूतं चक्षुर्घ्नं दाहि रोचनम् ।
बद्धविट्कं बद्धमूत्रं गुरूष्णं च त्रिदोषकृत् ॥ २३ ॥

शिरसाच्या पाल्याची भाजी नेत्राला विकार करणारी, विदाह (घशाशीं जळजळ) करणारी, रुचिकारक, पुष्कळ मळ उत्पन्न करणारी, मलमूत्रांचा अवरोध करणारी, जड, उष्ण व त्रिदोषकारक आहे.

कर्डईच्या पाल्याची भाजी.

कौसुम्भं स्वादु रूक्षोष्णं कफजित्पित्तलं लघु ।

कर्डईच्या पाल्याची भाजी मधुर, रूक्ष, उष्ण, कफनाशक, पित्तकारक व पचनाला हलकी आहे.

हरभऱ्याची भाजी.

चणकं शाकमुद्दिष्टं दुर्जरं कफवातकृत् ॥ २४ ॥

हरभऱ्याच्या पाल्याची भाजी पचनाला जड असून कफ व वात उत्पन्न करणारी आहे.

शेवग्याचे पाल्याची भाजी.

शिग्रुस्तीक्ष्णो लघुर्ग्राही वह्निदः कफवातजित् ।
तीक्ष्णोष्णो विद्रधिप्लीहव्रणघ्नश्चाम्लपित्तजित् ॥ २५ ॥

शेवगा तीक्ष्ण, हलका, मलबंधक, अग्निदीपक, कफ व वात ह्यांचा नाश करणारा, अतिशय उष्ण, विद्रधि[1] (करट), पांथरी, व्रण व आम्लपित्त यांचा नाश करणारा आहे.

गोडा शेवगा.

मधुशिग्रुः कटुस्तिक्तः शोफघ्नो दीपनः सरः ।
तत्पत्रं वातपित्तघ्नं चक्षुष्यं स्वादु शीतलम् ॥ २६ ॥
शिग्रुजं कुसुमं स्वादु कफपित्तहरं गुरु ।
सकषायं गुरु ग्राहि चक्षुष्यं क्रिमिनाशनम् ॥ २७ ॥
सौभाञ्जनफलं स्वादु कषायं कफपित्तजित् ।

---

१. ह्यांमध्यें अंतर्विद्रधीचाही समावेश होतो. कारण पुढें चिकित्साप्रकरणीं अंतर्विद्रधीवर शेवग्याचा एक योग सांगितला आहे.

शूलकुष्ठक्षयश्वासगुल्मघ्नं दीपनं परम् ॥ २८ ॥

गोडा शेवगा तीक्ष्ण, तिखट, शोफ-(सूज) नाशक, दीपन व सारक आहे. शेवग्याचीं पानें वातपित्तनाशक, नेत्रांना हितावह, गोड, व थंड आहेत. शेवग्याचीं फुलें गोड, कफ व पित्तनाशक, शुभ[1] (हितकारक-पथ्यकारक), किंचित् तुरट, जड, व ग्राही (मलबंधक), नेत्राला हितावह, आणि कृमिनाशक आहेत. शेवग्याचें फळ (शेंगा) गोड, तुरट, कफ व पित्तनाशक, शूल, कुष्ठ, क्षय, श्वास, गुल्म ह्यांचें नाशक असून उत्तम प्रकारचें अग्निदीपक आहे.

कोंथिंबीर.

आर्द्रा कुस्तुम्बरी कुर्यात्स्वादुसौगन्ध्यहृद्यताः ।
शुष्का स्निग्धा स्वादुपाका कषाया कटुका लघुः ॥ २९ ॥

ओली कोथिंबीर पदार्थाला गोडी, सुवास, व आवड (हृद्यता) हीं आणते. वाळलेली कोथिंबीर स्निग्ध, मधुरविपाकी, तुरट, तिखट व हलकी असते.

केळफूल.

कदलीकुसुमं तिक्तं कषायं ग्राहि दीपनम् ।
उष्णवीर्यं बलासघ्नं तद्गुणं चास्फुटं दलम् ॥ ३० ॥

केळफूल कडू, तुरट, ग्राहक, अग्निदीपक, उष्णवीर्य, कफनाशक आहे; आणि पाकळ्या जर उमललेल्या नसतील तर त्याचेही गुण हेच आहेत.

हदग्याचीं फुलें व शेंगा यांची भाजी.

आगस्त्यपुष्पं शिशिरं चतुर्थज्वरशान्तिकृत् ।
नक्तान्ध्यनाशनं प्रोक्तं दीपनं श्लेष्मपित्तनुत् ॥ ३१ ॥
सतिक्तं कटुकं पाके कषायं वातलं मतम् ।
आगस्त्यशिम्बः सदृशो गुणैः पुष्पस्य दुर्जरः ॥ ३२ ॥

हदग्याचीं फुलें थंड, चातुर्थिक ज्वराचा नाश करणारीं, रात्र्यं-

---

१. सर्व छापील प्रतींत " कफपित्तहरं गुरु " असा पाठ असल्यामुळें " गुरु " ह्या शब्दाची द्विरुक्ति होते. ह्यासाठीं आमचे जवळील लेखी प्रतींतिल " कफपित्तहरं शुभं " हा पाठ घेऊन " शुभ-हितकारक, पथ्यकारक " असा अर्थ केला आहे.

घत्व (रातांधळें)नाशक, दीपन, कफपित्तनाशक आहेत. किंचित् कडू, विपाककाळीं तिखट, तुरट, वातकारक असतात. हदग्याची शेंगही गुणानें फुलाप्रमाणें असून दुर्जर (जिरण्यास कठीण) आहे.

शेवती.

शतपत्री तरुण्युक्ता कर्णिका चारुकेसरा ।
सहाकुमारी गन्धाढ्या लाक्षापुष्पातिमंजुला ॥ ३३ ॥
शतपत्री हिमा हृद्या ग्राहिणी शुक्रला लघुः ।
दोषत्रयास्रजिद्वर्ण्या तिक्ता कट्वी च पाचनी ॥ ३४ ॥

शतपत्री, तरुणी, कर्णिका, चारुकेसरा, सहकुमारी, गंधाढ्या, लाक्षापुष्पा, अतिमंजुला, हीं शेवतीचीं नावें आहेत. शेवती थंड, हृद्य (हृदयाला हितावह), ग्राहक (बांधीव मळ करणारी), धातु-वर्धक, हलकी, त्रिदोष व रक्तविकारनाशक, वर्ण्य (शरीराचा वर्ण चांगला करणारी), कडू, तिखट व पाचक आहे.

मुळा.

मूलकं बालकं रुच्यं वीर्योष्णं पाचनं लघु ।
महत्तदेव रूक्षोष्णं गुरु दोषत्रयप्रदम् ॥ ३५ ॥

कोंवळा मुळा रुचिकारक, ऊष्णवीर्य, पाचक, व हालका आहे. तोच जून झाला म्हणजे रूक्ष, उष्ण, जड व त्रिदोषकारक आहे.

सुरण.

सूरणो दीपनो रूक्षः कफार्शःक्रिमिजिल्लघुः ।
तद्वद्वन्यो विशेषेण कफघ्नो रक्तपित्तकृत् ॥ ३६ ॥

सूरण अग्निदीपक, रूक्ष, कफ, मूळव्याध, व क्रिमि, यांचा नाशक व हलका आहे. त्यांत रानसुरण हा विशेषतः कफनाशक व रक्तपित्तकारक आहे.

गाजर.

गर्जरं मधुरं तीक्ष्णं तिक्तोष्णं दीपनं लघु ।
संग्राहि रक्तपित्तार्शोग्रहणीकफवातजित् ॥ ३७ ॥

गाजर मधुर, तीक्ष्ण, कडू, ऊष्ण, अग्निदीपक, हलकें, मळाला घट्टपणा आणणारें, रक्तपित्त (ज्यामध्यें रक्ताच्या वांत्या, रेच किंवा लघवी होते तो रोग), मूळव्याध, संग्रहणी, कफ व वातदोष यांचें नाशक आहे.

केळीचा कांदा.

शीतलः कदलीकन्दो ग्राही रूक्षोऽस्रपित्तजित् ।
ईषत्कषायः कफकृद्वातलः प्रदरे हितः ॥ ३८ ॥

केळीचा कांदा थंड, ग्राहक, रूक्ष, रक्तपित्तनाशक, किंचित् तुरट, कफकारक, वातनाशक आणि प्रदर (धुपणीचा आजार) याचा नाशक आहे.

गोवारी.

रूक्षाऽतिपित्तकृद्गुर्वी वातला गौरबाकुची ।
तिक्ता नोदरिणां पथ्या ग्रहण्यर्शोविकारनुत् ॥ ३९ ॥

गोवारी रूक्ष, अतिशय पित्तकारक, जड, वातकारक, कडू, उदररोग्याला अपथ्यकारक, ग्रहणी व मूळव्याध यांची नाशक आहे.

मिरची.

क्षुपजं मरिचं रुच्यं दोषलं सर्वरोगकृत् ।
विशेषतः प्रमेहार्शोविकारेषु न शस्यते ॥ ४० ॥
वृहन्मरीचं क्षुपजं ततोऽप्यल्पतरं गुणैः ।

मिरची रुचिकारक, वातादि दोषांना कोपविणारी, सर्व रोग उत्पन्न करणारी, आणि विशेषतः प्रमेह व अर्श (मूळव्याध) ह्या रोगांना अपथ्यकारक आहे. मोठी मिरची (लङ्क मिरची) वरील मिरचीपेक्षां गुणांनीं कमी आहे.

कांकडी.

क्षीरा कर्कटिका त्वन्या राजकर्कटिका च सा ॥ ४१ ॥
सुदीर्घा राजिलफला वाणैः कुलककर्कटी ।
वालुकं श्लेष्मलं स्वादु लघु भेदि च पित्तजित् ॥ ४२ ॥
मधुराम्लरसं पित्तरक्तजित्पक्कमुत्तमम् ।

क्षीरा कर्कटिका (पांढरी काकडी), हिलाच राजकर्कटिका (राजकांकडी) असें म्हणतात. राजिलफला ही लांब असते (पडवळासारखी लांब कांकडी,) जिच्यावर कांटे असतात ती कुलककर्कटी (काटे वाळूक). वाळूक हें कफकर, गोड, हलकें, भेदक, (मलभेदक) पित्तनाशक व पिकलेलें वाळूक आंबट व मधुर असून पित्तनाशक व रक्तनाशक असून उत्तम आहे.

पांढरें अळूं.

अग्निदीप्तिकरं श्वेतं शाकूटममलं सरम् ।
दुर्नामक्रिमिमेहघ्नं कफपित्तहरं परम् ॥ ४३ ॥

पांढरें शाकूट (पांढरें अळूं) निर्दोष, अग्निदीपक, सारक, मूळव्याध, क्रिमि, मेह यांचा नाश करणारें, व उत्कृष्ट कफपित्त-नाशक आहे.

काळें अळूं.

दुर्नामहृच्छ्यामलशाकुटं तु मन्दाग्निविण्मूत्रविबन्धहन्तृ ।

काळें शाकूट (काळें अळूं) मूळव्याधीचें नाशक, अग्निमांद्य-नाशक, आणि मल व मूत्र ह्यांना साफ करणारें आहे.

द्राक्ष.

द्राक्षाबालफलं कटूष्णविशदं पित्तास्रदोषप्रदं
मध्यं चाम्लरसं रसान्तरगतं रुच्यातिवह्निप्रदम् ।
पक्कं चेन्मधुरं तथाऽऽम्लसहितं तृष्णास्रपित्तापहं
पक्कं शुष्कतमं श्रमार्तिशमनं संतर्पणं पुष्टिदम् ॥ ४४ ॥

कोवळें द्राक्ष कडू, उष्ण, तोंड स्वच्छ करणारें, आणि रक्तपित्त व वातादि दोष वाढविणारें आहे. जून द्राक्ष रसांतर होऊन अम्ल होतें. तें रुचिकर व अत्यंत अग्निदीपक आहे. तेंच पिकलें असतां मधुर असून थोडें आंबट असतें. व तहान आणि रक्तपित्तनाशक असतें. पिकून वाळलेलें (सुकें द्राक्ष, मनुका) श्रमनाशक, तृप्तिकारक व पौष्टिक आहे.

द्राक्ष (कोणचेंही)

द्राक्षा पक्कसरा शीता चक्षुष्या बृंहणी गुरुः ।
हन्ति तृष्णाज्वरश्वासवांतिवातास्रकामलाः ॥ ४५ ॥
कृच्छ्रास्रपित्तसंमोहदाहशोषमदात्ययान् ।
आमा स्वल्पगुणा गुर्वी सैवाम्ला रक्तपित्तजित् ॥ ४६ ॥

पिकलेलें द्राक्ष सारक, थंड, नेत्ररोगनाशक, पौष्टिक, जड, आणि तहान, ज्वर, श्वास, ओकारी, वातरक्त, कावीळ, मूत्रकृच्छ्र, रक्तपित्त, मूर्च्छा, दाह, शोष व मदात्यय (अतिशय दारू पिण्यानें येणारा मद) यांचें नाशक आहे. कच्चें द्राक्ष गुणानें अल्प असून जड, आंबट व रक्तपित्तनाशक आहे.

आंबा.

आम्रो ग्राही प्रमेहास्रकफपित्तव्रणाञ्जयेत् ।
तत्फलं बालमत्यम्लं रूक्षं दोषत्रयास्रकृत् ॥ ४७ ॥
बद्धास्थि तादृगेवोक्तं वातहारि च पित्तलम् ।
पक्वं तु मधुरं वृष्यं स्निग्धं हृद्यं बलप्रदम् ।
गुरु वातहरं रुच्यं वर्ण्यं शीतमपित्तलम् ॥ ४८ ॥
संतर्पणो यः सकलेन्द्रियाणां बलप्रदो वृष्यतमश्च हृद्यः ।
स्त्रीषु प्रहर्षं प्रचुरं ददाति फलाधिराजः सहकार एव ॥४९॥
रसस्त्वस्य सरः स्निग्धो रोचनो बलवर्णकृत् ।
आम्रबीजं कषायं स्याच्छर्द्यतीसारनाशकृत् ॥ ५० ॥
आम्रपुष्पमतीसारकफपित्तप्रमेहनुत् ।
असृग्दोषहरं शीतं रुचिकृद्वातनाशनम् ॥ ५१ ॥
आम्रस्य पल्लवं रुच्यं कफपित्तविनाशनम् ।

आंबा ग्राहक, प्रमेह, रक्तदोष, कफ, पित्त, व व्रण यांचा नाशक आहे. त्याचें कोवळें फळ अतिशय आंबट, रूक्ष, त्रिदोष व रक्तदोषकारक आहे. ज्या आंब्यांतील कोय बांधली आहे तो देखील गुणानें असाच असून वातनाशक व पित्तकारक आहे. पिकलेला आंबा गोड, शुक्रवर्धक, स्निग्ध, हृदयाला हितावह, शक्तिवर्धक, जड, वातनाशक, रुचिकारक, शरीराचा वर्ण चांगला करणारा, थंड, पित्त न वाढविणारा आहे. सर्व इंद्रियानां संतृप्त करणारा, बलकारक, अत्यंत शुक्रवर्धक, हृदयाला हितकर, स्त्रीप्रसंगीं अत्यंत हर्षदायक, व सर्व फलांमध्यें श्रेष्ठ (फलाधिराज) असा एक आंबाच आहे. ह्याचा (पिकलेल्या आंब्याचा) रस सारक, स्निग्ध, रुचिकारक, बलकारक व कांति देणारा (वर्णकारक) आहे. आंब्याची कोय तुरट, ओकारी व अतिसारनाशक आहे. आंब्याचें फूल (मोहोर) अतिसार, कफ, पित्त व प्रमेह यांचें नाशक असून रक्तदोषनाशक, थंड, रुचिकारक व वातनाशक आहे. आंब्याचें पान रुचिकारक, कफ व पित्त यांचें नाशक आहे.

फणस.

पनसं शीतलं पक्वं स्निग्धं पित्तानिलापहम् ॥ ५२ ॥
बल्यं शुक्रप्रदं हन्ति रक्तपित्तक्षतक्षयान् ।

आमं तदेव विष्टम्भि वातलं तुवरं गुरु ॥ ५३ ॥
ईषत्कषायं मधुरं तद्बीजं वातलं गुरु ।
तत्फलस्य विकारघ्नं रुच्यं त्वग्दोषनाशनम् ॥ ५४ ॥

पिकलेला फणस थंड, स्निग्ध, वातपित्तनाशक, बलकर, शुक्रवर्धक, रक्तपित्त, उरःक्षत, व क्षय यांचा नाशक आहे. हिरवा फणस मलाचा अवरोध करणारा, वातकारक, तुरट, व जड आहे. फणसांतील बी (आठळी) किंचित तुरट, गोड, वातकारक, जड, फणसांतील गरे खाण्यापासून होणाऱ्या विकारांचा नाश करणारी, रुचिकारक, आणि त्वचादोषनाशक आहे.

केळ.

कदली योनिदोषाश्मरक्तपित्तहरा हिमा ।
तत्कन्दः शीतलो बल्यः केश्यः पित्तकफास्रजित् ॥ ५५ ॥
तत्फलं मधुरं शीतं विष्टम्भि बलकृद् गुरु ।
स्निग्धं पित्तास्रहृद्दाहक्षतक्षयसमीरजित् ॥ ५६ ॥
बालं फलं मधुरमम्लमथो कषायं
पित्तापहं शिशिररुच्यमथापि नालम् ।
पुष्पं तदप्यनुगुणं क्रिमिहारि कन्दं
पर्णं च शूलशमनं कदलीभवं स्यात् ॥ ५७ ॥
रम्भापक्वफलं कषायमधुरं बल्यं च शीतं तथा
पित्तं चास्रविमर्दनं गुरुतरं पथ्यं न मन्दानले ।
सद्यः शुक्रविवर्धनं क्रिमिहरं तृष्णापहं कान्तिदं ।
दीप्ताग्नौ सुखदं कफामयहरं संतर्पणं दुर्जरम् ॥ ५८ ॥

केळ योनिदोष, मूतखडा, रक्तपित्त, यांची नाशक असून थंड आहे. तिचा कांदा थंड, बलकर, केशांना हितकारक, पित्त कफ व रक्तदोष यांची नाशक आहे. केळीचें फळ (पिकलेलें केळें) गोड, थंड, मलाचा अवरोध करणारें, शक्तिवर्धक, जड, स्निग्ध, रक्तपित्तनाशक, दाहशांतिकारक, उरःक्षत, क्षय, आणि वात यांचें नाशक आहे. कोवळें केळें गोड, आंबट, तुरट, पित्तनाशक, थंड, रुचिदायक आहे. केळीचा गाभा (काल, नाल) व फूल (केळफूल, कोका) ह्यांचे गुणही तसेच असून केळीचा कंद (कांदा) कृमिनाशक आहे. आणि केळीचें पान शूलनाशक आहे. केळीचें पिकलेलें फळ

किंचित तुरट, गोड, शक्तिवर्धक, थंड, पित्त व रक्तदोषनाशक व अतिशय जड असून, ज्याचा जठराग्नि मंद आहे त्याला अपथ्यकारक आहे. धातूची वृद्धि करणारें आहे. कृमि व तहाननाशक असून कांतिदायक, ज्याचा जठराग्नि फार तीक्ष्ण आहे त्याला पथ्यकारक, कफरोग[1]नाशक, तृप्तिदायक, व पचन होण्यास फार कठीण असें आहे.

नारळ.

नारीकेलफलं शीतं दुर्जरं बस्तिशोधनम् ।
विष्टम्भि बृंहणं बल्यं वातपित्तास्रदाहजित् ॥ ५९ ॥
तस्याम्भः शीतलं हृद्यं दीपनं शुक्रलं लघु ।
तत्पादपशिरोमज्जा शुक्रला वातपित्तजित् ॥ ६० ॥
विशेषतः कोमलनारिकेलं निहन्ति पित्तज्वरपित्तदोषान् ।
तदप्यजीर्णं गुरु पित्तकारि विदाहि विष्टम्भि मतं भिषग्भिः ६१

नारळ थंड, पचन होण्यास कठीण, बस्तिशोधक, मलावष्टंभक, पौष्टिक, शक्तिवर्धक, वात, पित्त व दाह यांचा नाशक आहे, नारळांतील पाणी थंड, हृदयाला हितकर, दीपन (अग्निदीपक), [2]हलकें व शुक्रवर्धक आहे. नारळीच्या झाडाच्या शेंड्यांतील मगज धातुवर्धक आणि वातपित्तनाशक आहे. विशेतषः नारळाचें कोवळें फळ (शहाळें) हें पित्तज्वर व पित्तसंबंधीं विकार

---

१ सर्व प्रतींतून 'कफामयहरं' असा पाठ आहे. म्हणून कफरोगनाशक ' असा अर्थ केला आहे. तथापि ' राजनिघंट ' ' निघंटशिरोमणी ' व वाग्भट यांमध्यें कफकर असें म्हटलें आहे. शिवाय बाकीच्या गुणांवरून पहातां केळें हें कफरोगकारकच म्हणणें इष्ट आहे.

२ मूळांत ' लघु ' असा पाठ आहे. पण चक्रदत्ताच्या द्रव्यगुणसंग्रहांत ' गुरु ' असा पाठ आहे. ह्याविषयीं त्याचा टीकाकार 'शिवदाससेन ' म्हणतो जेज्जटानें ' गुरु ' याच्या ठिकाणीं ' लघु ' असा पाठ घेतला आहे, पण तो बरोबर नाहीं. कारण तो मधुर, वृष्य, स्निग्ध, ह्या गुणांशीं विरुद्ध आहे. शिवाय तो पाठ सशास्त्र नाहीं, असें चक्राचें मत आहे. ह्यावरून ' गुरु ' असाच पाठ सशास्त्र दिसतो.

यांचें नाशक आहे. पक्का न झालेला नारळ जड, पित्तकर, विदाह-(घशाशीं जळजळ) कारक व मलावरोधक आहे.

खारीक.

खर्जूरिकाफलं शीतं स्वादु स्निग्धं क्षुधास्रजित् ।
बल्यं हन्ति मरुत्पित्तमदमूर्छामदात्ययान् ॥ ६२ ॥
तस्मात्स्वल्पगुणं ज्ञेयमन्यत्खर्जूरिकाफलम् ।

खारीक थंड, गोड, स्निग्ध, क्षुधाशांतिकारक, रक्तदोषनाशक, शक्तिवर्धक, वात, पित्त, मद, मूर्च्छा, व मदात्ययरोग यांची नाशक आहे. आणि खजूर खारकेपेक्षां गुणानें कमी आहे.

डाळिंब, आवळा, बोर व रायबोर.

दाडिमं ग्राहि दोषघ्नं हृद्यं रोचनदीपनम् ॥ ६३ ॥
तद्वदामलकं पथ्यं मधुराम्लरसं सरम् ।
बदरं लघु संग्राहि रुच्यमुष्णं समीरजित् ॥ ६४ ॥
कफपित्तकरं तद्वत्कोमलं गुरु संमतम् ।
सौवीरं बदरं शीतं भेदनं गुरु शुक्रलम् ॥ ६५ ॥
बृंहणं पित्तदाहास्रक्षयतृष्णानिलापहम् ।

डाळिंब ग्राही (मलाला घट्टपणा आणणारें), सर्व दोषनाशक, हृदयाला हितकर, रुचिकारक, आणि अग्निदीपक आहे. त्याचप्रमाणें आंवळा पथ्यकारक असून मधुर, आंबट व सारक आहे. बोर हलकें, ग्राहक, रुचिकारक, उष्ण, व वातनाशक आहे. कोंवळें बोर जड आणि कफपित्तकारक आहे. रायबोर थंड, शुक्रवर्धक, मलभेदक, जड, पौष्टिक, पित्त, दाह, रक्तदोष, क्षय, तहान आणि वात यांचें नाशक आहे.

जांभूळ.

जम्बूफलं ग्राहि रूक्षं कफपित्तव्रणास्रजित् ॥ ६६ ॥
क्षुद्रजम्बूफलं तद्वद्विशेषाद्वातनाशनम् ।

जांभूळ ग्राही (मलबंधक), रूक्ष, कफ, पित्त, व्रण, व रक्तदोष नाशक यांचें नाशक आहे. क्षुद्र जांभूळही गुणानें त्यासारखेंच असून विशेषतः वातनाशक आहे.

खर्बूज.

खर्बुजं मूत्रलं बल्यं कोष्ठशुद्धिकरं गुरु ॥ ६७ ॥

स्निग्धं स्वादुतरं शीतं वृष्यं पित्तानिलापहम् ।

खर्बुज हें मूत्रल (अतिशय मूत्र करणारें), शक्तिवर्धक, कोठ्याचें शोधन करणारें, जड, स्निग्ध, फार गोड, थंड, वृष्य, (शुक्रवर्धक) पित्त, व वात यांचें नाशक आहे.

बदाम.

वातामम्रुष्णं सुस्निग्धं वातहृद्बलशुक्रकृत् ॥ ६८ ॥

बदाम उष्ण, अतिशय स्निग्ध, वातनाशक, बलकारक, व शुक्रवर्धक आहे.

आक्रोड.

अक्षोटं मधुरं बल्यं गुरूष्णं वातहृत्सरम् ।

अक्रोड मधुर, बलकारक, जड, उष्ण, वातनाशक व सारक आहे.

सेवफळ.

से[१]व्यं समीरपित्तघ्नं बृंहणं कफकृद् गुरु ॥ ६९ ॥
रसे पाके च मधुरं शिशिरं रुचिशुक्रकृत् ।

शेवफळ वातपित्तनाशक, पौष्टिक, कफकारक, जड, रसकाळीं व पाककाळीं मधुर, थंड, रुचिकारक व शुक्र उत्पन्न करणारें आहे.

सीताफळ.

शीताफलं तु मधुरं शीतं पित्तविनाशनम् ॥ ७० ॥
हृद्यं बलकरं स्वादु पुष्टिदं स्वल्पवातलम् ।

सीताफळ मधुर, थंड, पित्तनाशक, हृदयाला हितकर, शक्तिवर्धक, गोड, पौष्टिक व किंचित् वातकारक आहे.

रामफळ.

रामाह्वयफलं तद्वदीषत्स्वादु च वातकृत् ॥ ७१ ॥

रामफळही गुणानें सीताफळासारखेंच असून किंचित् गोड व वातकारक आहे.

शिंगाडे.

शृङ्गाटं मधुरं रूक्षं गुरु ग्राहि हिमं तथा ।
शुक्रानिलश्लेष्मकरं शुष्कमार्द्रं विशेषतः ॥ ७२ ॥

---

१. 'सेव्य' ह्या ठिकाणीं 'नीवं' असा पाठ आमचे जवळचे एका हस्तलिखित प्रतींत आहे.

वाळलेले शिंगाडे मधुर, रूक्ष, जड, मलबंधक व थंड आहेत. आणि शुक्र, वात व कफ यांना वाढविणारे आहेत. ओले शिंगाडे वाळल्या शिंगाड्यांहून गुणानें विशेष आहेत.

लहान पीलु.

विरेचनफलः शाखी श्यामः करभवल्लभः ।
अर्कांधः कटुकः पीलुः कषायो मधुराम्लकः ॥ ७३ ॥
रसः स्वादुश्च गुल्मार्शःशमनो दीपनः परः ।
मधुरस्तु महापीलुर्वृष्यो विषविनाशनः ।
पित्तप्रशमनो रुच्यो ह्यामघ्नो दीपनः परः ॥ ७४ ॥

विरेचनफल, शाखी, श्याम, करभवल्लभ, अर्कांध हीं पीलूचीं नांवें आहेत. पीलु तिखट, तुरट, मधुर व आंबट आहे. ह्याचा रस गोड, गुल्म व मूळव्याध यांचा नाशक व अतिशय अग्निदीपक आहे. आणि थोर पीलु शुक्रवर्धक (कामोद्दीपक), विषनाशक, पित्तशामक, रुचिकारक, आमनाशक व अग्निदीपक आहे.

अंजीर.

सुस्वादु पाकरसयोर्गुरु शीतलं च
श्लेष्मामवातकरमग्निरमग्निशत्रु ॥ ७५ ॥

अंजीर रसकाळीं व पाककाळीं अत्यंत मधुर, जड, थंड, कफ, आम, व वात यांना करणारें व अग्निमांद्यकारक आहे.

अननस किंवा भव्य.

आमं तु कैतकं रुच्यं कफपित्तकरं गुरु ।
अन्नप्ररोचकं हृद्यं श्रमक्लमनिबर्हणम् ।
पक्कं तु पित्तहृत्स्वादुरसमातपदोषनुत् ।

हिरवें अननस रुचिकारक, कफपित्तकारक, जड, अन्नाला रुचि आणणारें, हृदयाला हितावह, श्रम (थकवा) व ग्लानि यांचें नाशक आहे. आणि पिकलेलें अननस पित्तनाशक, गोड असून ह्याचा रस उन्हापासून होणाऱ्या दोषांचा नाशक आहे.

महाळुंग.

बीजपूरफलं रुच्यं रसेऽम्लं दीपनं लघु ॥ ७६ ॥
रक्तपित्तकरं ग्राहि जिह्वाहृच्छोधनं परम् ।
त्वक् तस्य तिक्ता गुर्व्युष्णा क्रिमिवातकफापहा ॥ ७७ ॥

तन्मांसं बृंहणं शीतं गुरु पित्तसमीरजित् ।
केसरो मधुरो ग्राही शूलगुल्मोदरापहः ॥ ७८ ॥
बीजमुष्णं क्रिमिश्लेष्मवातजिद्गर्भदं गुरु ।
तत्पुष्पं शीतलं ग्राहि रक्तपित्तहरं लघु ॥ ७९ ॥

महाळुंगाचें फळ रुचिकारक, रसकाळीं आंबट, अग्निदीपक, हलकें, रक्तपित्तकारक, मलबंधक, जीभ व हृदय यांची उत्तमप्रकारें शुद्धि करणारें आहे. महाळुंगाच्या फळाची साल कडवट, जड, उष्ण, क्रिमि, वात व कफ यांची नाशक आहे. महाळुंगाच्या फळांतील गर पौष्टिक, थंड, जड आणि वातपित्तनाशक आहे. त्याचे केसर मधुर, मलबंधक, शूळ, गुल्म व उदर यांचे नाशक आहेत. ह्याचें बीं उष्ण, क्रिमि, कफ व वात नाशक असून गर्भप्रद व जड आहे. याचें फूल थंड, मलबंधक, रक्तपित्तनाशक व हलकें आहे.

पपयी.

मधुकर्कटिका शीता रक्तपित्तहरा गुरुः ।

पपयी थंड रक्तपित्तनाशक व जड आहे.

कलिंगड.

कालिङ्गं ग्राहि दृक्पित्तशुक्रहृच्छीतलं गुरु ॥ ८० ॥

कलिंगड मलबंधक, दृष्टिदोष, पित्तदोष, व शुक्र यांचें नाशक असून बुळबुळीत व जड आहे.

नारिंग.

नारिंगमम्लमत्युष्णं रुच्यं वातहरं सरम् ।
कट्वम्लमपरं हृद्यं दुर्जरं वातनाशनम् ॥ ८१ ॥

नारिंग आंबट, अतिशय उष्ण, रुचिकारक, वातनाशक, व सारक आहे कित्येकांच्या मतें किंचित् तिखट, आंबट, हृदयाला हितकर, पचन होण्यास कठीण व वातनाशक आहे.

झांबर, ईड.

जम्बीरमम्लं शूलघ्नं गुरूष्णं कफवातजित् ।
आस्यवैरस्यहृत्पीडावह्निमान्द्यक्रमीञ्जयेत् ॥ ८२ ॥

ईडनिंबू आंबट, शूळनाशक, जड, कफ व वातनाशक, ऊष्ण, तोंडाचा बेचवपणा घालविणारें, हृदयासंबंधीं पीडा, अग्निमांद्य, व क्रिमि याचें नाशक आहे.

आम्लवेताचें फळ.

अम्लवेतसमत्यम्लं भेदनं शतवेधि च ।
हृद्रोगशूलगुल्मघ्नं पित्तास्रकफदूषणम् ॥ ८३ ॥

आम्लवेतस अतिशय आंबट, मलभेदक, हृद्रोग, शूळ, गुल्म, यांचा नाशक, पित्त, कफ आणि रक्त यांना दूषित करणारा आहे. शतवेधी हें त्याचें दुसरें नांव आहे.

निंबुभेद.

साराम्लमम्लं वातघ्नं गुरु पित्तकफप्रदम् ।

निंबूभेद आंबट, वातनाशक, जड व कफपित्तकारक आहे.

कमरक.

कर्मरङ्गं हिमं ग्राहि स्वाद्वम्लं कफपित्तजित् ॥ ८४ ॥

करमर थंड, मलबंधक, गोड, आंबट, कफ व पित्तनाशक आहे.

कागदी लिंबू व राजलिंबू (मुसंबें)

निम्बूकमम्ल वातघ्नं पाचनं दीपनं लघु ।
राजनिम्बूफलं स्वादु कफपित्तसमीरजित् ॥ ८५ ॥

कागदी लिंबू आंबट, वातनाशक, पाचक, अग्निदीपक व हलकें आहे. राजलिंबू गोड, कफ वात व पित्त यांचें नाशक आहे.

साखरलिंबू.

मिष्टनिम्बूफलं पित्तवातहृद्गुरुरोचनम् ।
श्रमतृड्दाहपित्तास्रच्छर्दिक्षयगरापहम् ॥ ८६ ॥

साखरलिंबू वातपित्तनाशक, जड, रुचिकारक, श्रम (घेरी), तहान, दाह, रक्तपित्त, ओकारी, क्षय व विषबाधा यांचें नाशक आहे.

चिंच.

आम्लिकाऽऽमा गुरुर्वातहरा पित्तकफास्रजित् ।
पक्का तद्वत्सरा रुच्या वह्निबस्तिविशुद्धिकृत् ॥ ८७ ॥
शुष्का हृद्या श्रमभ्रांतितृष्णाक्रमिहरा लघुः ।

हिरवी चिंच जड, वातनाशक, पित्त, कफ, व रक्तदोष यांची नाशक आहे. पिकलेली चिंच ही गुणानें तशीच असून सारक, रुचिकारक, अग्निदीपक, व बस्तिशोधक आहे. वाळलेली चिंच हृदयाला हितकर, थकवा, भ्रांति, तहान व क्रिमि यांची नाशक व हलकी आहे.

आमसूल.

तिंत्तिडीकं समीरघ्नमाममुष्णं परं गुरु ॥ ८८ ॥
तत्पक्कं लघु संग्राहि ग्रहणीकफवातजित् ।

आमसूल हिरवें असतांना वातनाशक ऊष्ण व अतिशय जड आहे. तें पिकलें म्हणजे हलकें, ग्राहक, संग्रहणी, कफ व वातनाशक आहे.

करवंद.

करमर्दं गुरूष्णाम्लं रक्तपित्तकफप्रदम् ॥ ८९ ॥
तत्पक्कं मधुरं रुच्यं लघु पित्तसमीरजित् ।
शुष्कं पक्ववदप्यामं पक्कमप्यार्द्रमामवत् ॥ ९० ॥

हिरवें करवंद जड, ऊष्ण, आंबट, रक्तपित्त व कफ यांना वाढविणारें आहे. तें पिकलें म्हणजे मधुर रुचिकारक, हलकें आणि वातपित्तनाशक आहे. पिकून सुकलेलें करवंद पिकलेल्या करवंदासारखेंच गुणानें असून कच्चें किंवा पिकलें असून ओलें असें करवंद गुणानें हिरव्या करवंदाप्रमाणेंच आहे.

कवठ.

कपित्थमामं संग्राहि लघु दोषत्रयापहम् ।
पक्कं गुरु तृषाहिक्काशमनं वातपित्तजित् ॥ ९१ ॥
स्वाद्वम्लं तुवरं कण्ठशोधनं ग्राहि दुर्जरम् ।

हिरवें कवठ संग्राही (मळ घट्ट करणारें) हलकें व त्रिदोषनाशक आहे. पिकलेलें कवठ आंबट, मधुर, तुरट, कंठशोधक, जड, तहान व उचकी यांचें नाशक, वातपित्तनाशक, ग्राहक, आणि पचण्यास कठिण आहे.

अंबाडा.

आम्रातमामं वातघ्नं गुरूष्णं रुचिकृत्सरम् ॥ ९२ ॥
पक्कं स्वादु हिमं वृष्यं मरुत्पित्तक्षतास्रजित् ।

आंबाड्याचें हिरवें फळ वातनाशक, जड, ऊष्ण, रुचिकारक, व सारक आहे. त्याचें पिकलेलें फळ गोड, वृष्य (कामोद्दीपक), थंड, वातपित्त, उरःक्षत, व रक्तदोष यांचें नाशक आहे.

सुपारी.

पूगं गुरु हिमं रूक्षं कषायं कफपित्तजित् ॥ ९३ ॥
मोहनं दीपनं रुच्यमास्यवैरस्यनाशनम् ।
आर्द्रं तु गुर्वभिष्यन्दि वह्निदृष्टिकरं सरम् ॥ ९४ ॥
स्विन्नं त्रिदोषहृत्सर्वं तद्भेदांस्तद्वदादिशेत् ।

सुपारी थंड, जड, रूक्ष, तुरट, कफपित्तनाशक, मूर्च्छाकारक, अग्निदीपक, रुचिकारक व मुखाचा विरसपणा यांची नाशक आहे. ओली सुपारी जड, स्रावी, अग्निवर्धक व सारक आहे. शिजविलेली सुपारी त्रिदोषनाशक आहे. सर्व जातीच्या सुपाऱ्यांचे गुण ह्या-सारखेच आहेत.

लसूण.

लशुनो बृंहणो वृष्यः स्निग्धोष्णः पाचनः सरः ॥ ९५ ॥
भग्नसंधानकृत्केश्यो गुरुः पित्तास्रवुद्धिदः ।
रसायनं कफश्वासकासगुल्मज्वरारुचीः ॥ ९६ ॥
हन्ति शोफप्रमेहार्शः कोष्ठशूलानिलं कृमीन् ॥ ॥
तत्पत्रं मधुरं क्षारं नालो मधुरपिच्छिलः ॥ ९७ ॥

लसूण पौष्टिक, धातुवर्धक, स्निग्ध, उष्ण, पाचक, सारक, मोडलेल्या हाडाला सांधणारी, केशवर्धक, जड, रक्तपित्तकारक, बुद्धिदायक, रसायन (सर्व धातूंना समप्रमाणांत राखून शरीराला तारुण्य आणणारी) व कफ, श्वास, खोकला, गुल्म, ज्वर, अरुचि, सूज, प्रमेह, मूळव्याध, कोठ्यांतील शूल, वात व क्रिमि यांची नाशक आहे. हिचीं पानें मधुर व खारट असतात; आणि कोंब मधुर व स्निग्ध आहे.

कांदा.

पलाण्डुस्तु गुणैस्तुल्यः कफकृन्नातिपित्तलः ।
अनुष्णः केवलं वातं स्वादुपाकरसैर्जयेत् ॥ ९८ ॥

कांदा गुणानें लसुणाप्रमाणेंच असून कफकारक आहे. फारसा पित्तकारक नाहीं. उष्ण नसून रसकाळीं व पाककाळीं गोड असल्या-मुळें केवळ वाताचा नाश करतो.

आलें.

आर्द्रं पाचनदीपनं रुचिकरं वृष्यं कटूष्णं वरम्।
स्वर्यं मेदहरं कफामयहरं शोफापहं शूलजित्॥ ९९॥
जिह्वाकंठविशोधनं सलवणं पथ्यं सदा भोजने।
निम्बूतोयविमिश्रितं रुचिकरं संदीपनं सारणम्॥१००॥
कुष्ठे पाण्ड्वामये कृच्छ्रे रक्तपित्ते व्रणे ज्वरे।
दाहे निदाघे शरदि नैव पूजितमार्द्रकम्॥ १०१॥

आलें पाचक, अग्निदीपक, रुचिकारक, धातुवर्धक, तिखट, उष्ण, पथ्यकर (वरं), स्वर चांगला करणारें, मेदनाशक, कफरोगनाशक, सूजनाशक, आणि शूलनाशक, जीभ व कंठ यांचें शोधन करणारें आहे. आणि लिंबाचा रस व सैंधव यांनीं मिश्र केलेलें आलें पथ्यकारक, जेवणांत रुचि उत्पन्न करणारें, अग्निदीपक व सारक आहे. कुष्ठ, पांडुरोग, मूत्रकृच्छ्र (उन्हाळे), रक्तपित्त, व्रण, ज्वर (उष्णापासून होणारा), दाह, उन्हाळा, व शरदृतू ह्यांमध्यें आलें हितकारक नाहीं.

शाकवर्जन.

शाकेषु सर्वेषु वसन्ति रोगाः सहेतवो देहविनाशनाय।
तस्माद्बुधः शाकविवर्जनं हि कुर्यात्तथाऽम्लेषु स एव दोषः॥

सर्व पालेभाज्यांमध्यें मनुष्याच्या देहाचा नाश करण्याच्या हेतूनें रोग राहिलेले आहेत. यासाठीं समंजस लोकांनीं भाज्या वर्ज कराव्या. आणि आंबट पदार्थांमध्येंही तसेच दोष आहेत (म्हणून त्यांचाही त्याग करावा).

तमाखू.

धूमाख्यो धूमवृक्षश्च बृहत्पत्रश्च धूसरः।
तमाखुर्गुच्छफलको धूमयंत्रप्रकाशकः॥ १॥
बहुबीजो बहुफलः सूक्ष्मबीजस्तु दीर्घकः।
दीर्घं पाटलवर्णं च पुष्पं तस्य प्रकीर्तितम्॥ २॥
तस्य पत्रं तु तीक्ष्णोष्णं कफवातहरं परम्।
श्वासकासहरं चैव कोष्ठवातहरं तथा॥ ३॥
वातानुलोमनकरं बस्तिशोधनमुत्तमम्।
दन्तरुक्शमनं चैव क्रिमिकण्डूवदिनाशनम्॥ ४॥

मदपित्तभ्रमकरं वमनं रेचनं स्मृतम् ।
दृष्टिमान्द्यकरं चैव तीक्ष्णशुक्रकरं तथा ॥ ५ ॥

धूमाख्य, धूमवृक्ष, बृहत्पत्र, धूसर, तमाखू, गुच्छफलक, धूमयंत्रप्रकाशक, बहुबीज, बहुफल, सूक्ष्मबीज व दीर्घक हीं तमाखूचीं नांवें आहेत. हिचें फूल लांबट असून तांबूसपांढरें असतें. तमाखूचें पान तीक्ष्ण, उष्ण, कफवातनाशक, श्वास व खोकला यांचें नाशक कोष्ठवातनाशक, वाताचें अनुलोमन करणारें, उत्तम प्रकारचें बस्तिशोधक, दांतासंबंधीं पीडा, क्रिमि व कंडु यांचें नाशक आहे. आणि मद, पित्त व घेरी यांना करणारें असून वामक व रेचक आहे. दृष्टीला मंदत्व आणणारें, तीक्ष्ण व शुक्रकारक आहे. (हे गुण तमाखू खाण्याचे समजावे.)

तस्यैव धूमपानं तु विशेषाद्धृदि शुक्रहृत् ।
देशान्तरप्रभेदेन तीक्ष्णं चाऽऽर्तवपित्तलम् ॥ ६ ॥
वमनस्य प्रभावेण वृश्चिकादिविषं हरेत् ।
रेचनत्वाद्धरेद्वातं श्लेष्माणं च नियच्छति ॥ ७ ॥

तमाखूचें धूम्रपान हृदयनाशक व शुक्रनाशक आहे. देशभेदानें तमाखू तीक्ष्ण असून अतिशय पित्तल आहे. वमनाच्या योगानें विंचवावें विष नष्ट करितें. रेचक गुणानें वाताचा व कफाचा नाश करितें.

मांसगुण.

मांसवर्गो द्विधा ज्ञेयो जाङ्गलानूपभेदतः ।

जांगल व अनूप असे मांसवर्गाचे दोन प्रकार आहेत.

जांगलाचें लक्षण व गुण.

मांसवर्गेऽत्र जङ्घाला बिलस्थाश्च गुहाशयाः ॥ १ ॥
तथा पर्णमृगा ज्ञेया विष्किराः प्रतुदा अपि ।
प्रसहा अथ च ग्राम्या अष्टौ जाङ्गलजातयः ॥ २ ॥

मांसवर्गामध्यें जंघाल, बिलेशय, गुहाशय, पर्णमृग, विष्किर, प्रतुद, प्रसह, व ग्राम्य अशा आठ जांगलाच्या जाती आहेत.

हरिणैणकुरङ्गमृगादयो जङ्घालाः ।
गोधाशशभुजंगाखवादयो बिलस्थाः ।
सिंहव्याघ्रवृकर्क्षादयो गुहाशयाः ।

वानरर्क्षमार्जारादयः पर्णमृगाः ।
वार्तिकलावतित्तिरविकिरकपिञ्जलादयो विष्किराः ।
हारीतकपोतसारिकाखञ्जरीटपिकादयः प्रतुदाः ।
काकोलूकगृध्रशशाचिल्लचाषादयः प्रसहाः । प्रसह्य
आहृत्य भक्षणात् ।
छागमेषवृषाश्वाद्या ग्राम्याः प्रोक्ता महर्षिभिः ॥ ३ ॥

हरीण (तांबड्या रंगाचा), एण (काळ्या रंगाचा), कुरंग (चपल व देखणा) इत्यादि मृगजातींना जंघाल अशी संज्ञा आहे. कारण ते जंघाल (वेगवान) असतात. घोरपड, ससा, सर्प इत्यादि प्राणी बिळांत राहतात म्हणून त्यांना बिलेशय म्हणतात. सिंह, वाघ, लांडगा, अस्वल हीं जनावरें गुहेमध्यें राहतात, म्हणून ह्यांना गुहाशय असें म्हणतात. वानर, अस्वल, मांजर (रानमांजर) इत्यादि प्राणी झाडांवर राहून झाडपाल्यावरच आपला निर्वाह करितात, म्हणून ह्यांना पर्णमृग असें म्हणतात. वार्तिक (रानचिमणी), लावापक्षी, तित्तिर, विकिर, कपिंजल (पांढरा तित्तिर) हे पायांनीं उकरून आपलें भक्ष्य मिळवितात, व म्हणून ह्यांना विष्किर असें म्हणतात. हारीत, (तिलगिरू पक्षी), कबूतर, साळुंखी, ताजवा किंवा तय्यर ज्याला म्हणतात तो पक्षी (खंजरीट), कोकिळ, हे चोंचीनें टोंचून भक्ष्य खातात, म्हणून ह्यांना प्रतुद असें म्हणतात. कावळा, घुबड, गिधाड, घार, चाष (तास) हे बळजबरीनें ओढून आपलें भक्ष्य मिळवितात, म्हणून ह्यांना प्रसह असें म्हणतात. बोकड, मेंढा, बैल, घोडा, इत्यादि गांवामधील जनावरांना ग्राम्य असें म्हणतात. ह्या आठ जांगल मांसाच्या जाती आहेत.

अनूपाचें लक्षण व गुण.

कूलेचराः प्लवाश्चापि कोशस्थाः पादिनस्तथा ।
मत्स्या एतेऽत्र विख्याताः पञ्चधाऽनूपजातयः ॥ १ ॥
महिषा गण्डवाराहाश्चमरीवारणादयः ।
एते कूलेचराः प्रोक्ता यस्मात्कूले चरन्त्यपाम् ॥ २ ॥
हंससारसबकबृहद्बककौञ्चादयः प्लवसंज्ञकाः ।

शुक्तिशङ्खशम्बूकादयः कोशस्थाः ।
कूर्मनक्रघण्टिकाशिशुमारकर्कटादयः पादिनः ।
रोहिताद्यास्तु ये जीवास्ते मत्स्याः परिकीर्तिताः ॥ ३ ॥

कूलेचर, प्लव, कोशस्थ, पादीन, व मत्स्य असे अनूप प्राण्यांचे पांच वर्ग आहेत. रेडा, गेंडा, डुक्कर, चमरी (एक जातीचा मृग, ह्याच्या शेपटीचा झुबका चवरीसारखा असतो), व हत्ती हीं जनावरें पाण्याच्या कांठाला असतात, म्हणून ह्यांना कूलेचर म्हणतात. हंस, सारस पक्षी, बगळा, थोर बगळा, व क्रौंच पक्षी (करकोचा पक्षी) हे पाण्यांत राहतात, म्हणून ह्यांना प्लव अशी संज्ञा आहे. शिंपींत राहणारे, शंखांत राहणारे, व शंबूक कोशांत वास करितात म्हणून ह्यांना कोशस्थ अशी संज्ञा आहे. कासव, सुसर, घंटिका (जलचर प्राणी), शिरस, व खेकडा ह्या पाण्यांत राहणाऱ्या जनावरांस पाय असतात, म्हणून ह्यांना पादिन असें म्हणतात. आणि रोहित (तांबडा मासा) आदिकरून जे प्राणी त्यांना मत्स्य असें म्हणतात. अशा अनूप प्राण्याच्या पांच जाती आहेत.

जांगल मांसाचे गुण.

एणमांसं हिमं रुच्यं ग्राहि दोषत्रयापहम् ।
षड्रसं बलदं पथ्यं लघु रूक्षं ज्वरास्रजित् ॥ १ ॥

तांबड्या हरिणाचें मांस थंड, रुचिकारक, मलबंधक, त्रिदोषनाशक, षड्रसयुक्त, बलदायक, पथ्यकारक, हलकें आणि रूक्ष, ज्वर व रक्तदोषनाशक आहे.

चितळ व सांबर.

चित्राङ्गो वातुलः कश्चिन्मधुरो बलवर्धनः ।
तद्वच्छम्बरमांसं तु वृष्यं दोषत्रयापहम् ॥ २ ॥

चितळ (मृगविशेष) ह्याचें मांस वातूळ, मधुर व बलवर्धक आहे. सांबराचें मांसही त्यासारखेंच असून वृष्य (कामोद्दीपक) व त्रिदोषनाशक आहे.

ससा.

शशः शीतो लघुः स्वादुर्ग्राही पथ्योऽग्निदीपनः ।
संनिपातज्वरश्वासरक्तपित्तकफापहः ॥ ३ ॥

सशाचें मांस हलकें, थंड, गोड, ग्राहक, अग्निदीपक, पथ्यकारक, सन्निपात ज्वर व श्वास, रक्तपित्त व खोकला यांचा नाश करितें.

घोरपड व उंदीर.

गोधाऽनिलहरा बल्या वृष्या मेध्या च कीर्तिता ।
मूषको बद्धविण्मूत्रो बल्यो वृष्योऽनिलापहः ॥ ४ ॥

घोरपडीचें मांस वातनाशक, शक्तिवर्धक, कामोद्दीपक व बुद्धिवर्धक आहे. उंदराचें मांस मलमूत्राचा अवरोध करणारें, शक्तिवर्धक व वातनाशक आहे.

साळई पक्षी.

सल्लकः श्वासकासास्रशोषदोषत्रयापहः ।
सेधा तथैव विज्ञेया विशेषाद्बलवर्धिनी ॥ ५ ॥

साळई पक्ष्याचें मांस श्वास, खोकला, रक्तदोष, शोष (क्षय) व त्रिदोष यांचें नाशक आहे. सेधा (सारसल) हिचेंही मांस साळईच्या मांसाप्रमाणेंच असून विशेषतः बलवर्धक आहे.

कोल्हा व वानर.

शृगालो बलदो वृष्यः सर्ववातक्षयापहः ।
वानरः पवनश्वासमेदःपाण्डुक्रिमीञ्जयेत् ॥ ६ ॥

कोल्ह्याचें मांस बलवर्धक व वृष्य असून सर्व प्रकारचे वात व क्षयरोग ह्यांचें नाशक आहे. वानराचें मांस वात, श्वास, मेद, पांडुरोग व क्रिमि ह्यांचें नाशक आहे.

रानचिमणी व पारवा.

वार्तिको मधुरः शीतो रूक्षश्च कफवातजित् ।
पारावतो गुरुः स्वादुः कषायो रक्तपित्तहा ॥ ७ ॥

रानचिमणीचें मांस मधुर, थंड, रूक्ष आणि कफवातनाशक आहे. पारव्याचें मांस जड, गोड, तुरट व रक्तपित्तनाशक आहे.

चिमणी.

चटकः शीतलः स्निग्धः स्वादुः शुक्रकफप्रदः ।
संनिपातहरो वेश्मचटकः शुक्रलः परः ॥ ८ ॥

चिमण्यांचें मांस थंड, स्निग्ध, गोड, शुक्रवर्धक, व कफकारक

आहे. गांवांतील चिमण्यांचें मांस संन्निपातनाशक असून अत्यंत शुक्रवर्धक आहे.

लावा पक्षी.

लावा वह्निकराः स्निग्धा मधुरा ग्राहिणो हिमाः ।
पांशुलः श्लेष्मलस्तेषु वीर्योष्णोऽनिलनाशनः ॥ ९ ॥
गौरो लघुतरो रूक्षो वह्निकारी त्रिदोषजित्
पौण्ड्रकः पित्तकृत्किंचिल्लघुर्वातकफापहः ॥ १० ॥
दर्भरो रक्तपित्तघ्नो हृदामयहरो हिमः ।

सर्व प्रकारच्या लाव्यांचें मांस अग्निदीपक, स्निग्ध, मधुर, ग्राही व थंड आहे. पांशुल जातीचा कफकारक, उष्णवीर्य, व वातनाशक आहे. गौरवर्ण लावा अतिशय हलका, रूक्ष, अग्निदीपक व त्रिदोषनाशक आहे. पौंड्रक (मिश्रवर्ण) लावा किंचित् पित्तकारक, हलका व वातकफनाशक आहे. दर्भरसंज्ञक लावा रक्तपित्तनाशक, हृद्रोगनाशक व थंड आहे.

तिपटा पक्षी.

तिंत्तिरः कृष्णवर्णः स्यात्स तु गौरः कपिञ्जलः ॥ ११ ॥
तित्तिरो वर्णदो ग्राही हिक्कादोषत्रयापहः ।
श्वासकासज्वरहरस्तस्माद्गौरोऽधिको गुणैः ॥ १२ ॥

तित्तिर काळ्या रंगाचा असतो. आणि जो तित्तिर पांढरा असतो त्याला कपिंजल असें म्हणतात. तित्तिर पक्ष्याचें मांस शरीराचा वर्ण चांगला करणारें, ग्राही, उचकी, त्रिदोष, श्वास, खोकला व ज्वर यांचें नाशक आहे. पांढरा तित्तिर ह्याहून गुणांनीं श्रेष्ठ आहे.

मोर.

मयूरमांसं सुस्निग्धं वातघ्नं शुक्रवर्धनम् ।
बल्यं मेधाकरं प्रोक्तं चक्षूरोगविनाशनम् ॥ १३ ॥
सेव्यं मयूरजं मांसं हेमन्ते शिशिरे मधौ ।
न शरद्ग्रीष्मयोः पथ्यं वर्षास्वपि हितं न च ॥ १४॥

मोराचें मांस अतिशय स्निग्ध, वातनाशक, शुक्रवर्धक, बलकारक, बुद्धिवर्धक, आणि नेत्ररोगनाशक आहे. मोराचें मांस हेमंत, शिशिर व वसंत ह्या ऋतूंमध्यें सेवन करावें. शरद्, ग्रीष्म व वर्षा ऋतूमध्यें तें पथ्यकारक नाहीं.

होला व रावा.

स्वादुः कषायश्च लघुः कपोतः कफपित्तहा।
शुको बल्योऽतिवृष्यश्च वीर्यवृद्धिकरः परः ॥ १५ ॥

होल्याचें मांस गोड, तुरट, हलकें व कफपित्तनाशक आहे. राघूचें मांस अतिशय बलकारक व वृष्य असून अत्यंत वीर्यवर्धक आहे.

कोंबडा.

कुक्कुटो बृंहणः स्निग्धो वीर्योष्णोऽनिलजिद्गुरुः।
चक्षुष्यः शुक्रकफकृद्वन्यो हृद्यः कफान्तकः ॥ १६ ॥
पानीयकुक्कुटः स्निग्धो बृंहणः श्लेष्मलो गुरुः।

कोंबड्याचें मांस पौष्टिक, स्निग्ध, उष्णवीर्य, वातनाशक, जड, नेत्राला हितकारक, शुक्र उत्पन्न करणारें व कफकारक आहे. रानकोंबडयाचें मांस हृद्य (हृदयाला हितकर) व कफनाशक आहे. व पाणकोंबडयाचें मांस स्निग्ध, पौष्टिक, कफकारक व जड आहे.

बोकड.

छागमांसं गुरु स्निग्धं लघुपाकं त्रिदोषजित् ॥ १७ ॥
अदाहि बृंहणं नातिशीतं पीनसनाशनम्।
देहधातुसमानत्वादनभिष्यन्दि बृंहणम् ॥ १८ ॥
तत्रापि कोमलच्छागमांसं पथ्यं त्रिदोषजित्।

बोकडाचें मांस जड, स्निग्ध, लवकर पचणारें, त्रिदोषनाशक विदाह (जळजळ) न करणारें, पौष्टिक, अति थंड नसणारें, पीनसाचा नाश करणारें, मनुष्याच्या देहधातूशीं समान गुणाचें असल्यामुळें अनभिष्यंदी (स्राव न करणारें, तोंडाला पाणी सुटणें, नाकाला गळती लागणें इ.) व पौष्टिक आहे. आणि त्याहून लहान (कोवळ्या) बोकडाचें मांस पथ्यकारक असून त्रिदोषनाशक आहे.

मेंढी.

मेषमांसं गुरु स्निग्धं बल्यं पित्तकफप्रदम् ॥
मेदःपुष्ट्यामदं[1] वृष्यं कफपित्तकरं गुरु ॥ १९ ॥

---

१ 'मेदःपुष्ट्यामदं' ह्या ठिकाणीं आनंदाश्रमांतील प्रतींत 'मेदःपुच्छामिषं' असा पाठ आहे. आमचे जवळील एका लेखी प्रतींतही तोच पाठ आहे. चक्रपाणिदत्त ह्याच्या द्रव्यगुणसंग्रहामध्यें देखील "मेदःपुच्छोद्भवं"

मेंढ्याचें मांस जड, स्निग्ध, बलकारक, पित्त व कफ यांना वाढविणारें, आणि शेपटीकडील भागीं लोंबणारा मेद असणाऱ्या मेंढ्याचें मांस वृष्य असून कफपित्तकर आहे.

अनूप मांसाचे गुण.

डुक्कर.

सौकरं पित्तलं स्वादु बल्यं वातापहं गुरु ॥ १ ॥
स्निग्धोष्णं शुक्रलं रुच्यं निद्रास्थूलत्वदार्ढ्यकृत् ॥ १ ॥

डुकराचें मांस पित्तकर, गोड, बलकर, वातनाशक, जड, स्निग्ध, उष्ण, धातुवर्धक, रुचिकारक, झोंप, स्थूलत्व आणि बळकटी यांना करणारें आहे.

चक्रक्रौंचबकाऽडादि मांसं स्निग्धं हिमं गुरुः।
मधुरं सृष्टविण्मूत्रं वातपित्तास्रनाशनम् ॥ २ ॥

चक्रवाक पक्षी, करकोचा, बगळा व आडी इत्यादि पक्ष्यांचें मांस स्निग्ध, थंड, जड, मधुर, मलमूत्र साफ करणारें, वात, पित्त व रक्तदोष ह्यांचा नाश करणारें आहे.

जलचर प्राणी.

मोरी मासा.

मोरिका वातहृद्बल्या बृंहणी मधुरा गुरुः।
पित्तहृत्कफकृद्रुच्या वृष्या दीप्ता कृशे हिता ॥ १ ॥

मोरी जातीचा मासा वातनाशक, बलकर, पौष्टिक, मधुर, जड, पित्तनाशक, कफनाशक, रुचिकारक, कामोद्दीपक, अग्निदीपक, व जो कृश आहे त्याला हितकारक आहे.

असा पाठ असून त्याचा टीकाकार शिवदाससेन ह्यानें "मेदःपुच्छो मेषमेदः, स च पुच्छदेशे लंबमानमांसपिंडः।" अशी टीका लिहिली आहे. म्हणून ह्या आधारानें आनंदाश्रमांतील प्रतीचा पाठच बरोबर असें समजून वरील अर्थ लिहिला आहे. शिवाय आमचे जवळील दुसऱ्या प्रतींत "मेदःपुच्छामिषं" ह्या ठिकाणीं "मेष्याः पुष्टिप्रदं" असा पाठ आहे व सर्व प्रतींतून श्लोकाच्या शेवटीं "मेंढा व मेंढी" असें म्हटलें आहे. ह्यावरून ग्रंथकाराचा उद्देश मेंढा व मेंढी ह्या दोहोंच्या मांसाचे गुण सांगण्याचा दिसतो. ह्यावरून "मेष्याःपुष्टिप्रदं" हा पाठही संयुक्तिक असून त्याचा अर्थ, मेंढीचें मांस पौष्टिक, वृष्य, कफपित्ताकरक व जड आहे असा होतो.

रसंग मासा.

शिलीन्ध्रः श्लेष्मलो बल्यो विपाके मधुरो गुरुः ।
वातपित्तहरो हृद्य आमवातकरश्च सः ॥ २॥

रसंग मासा कफकर, बलकर, विपाककाळीं (पचनसमयीं) मधुर, जड, वातपित्तनाशक, हृदयाला हितकर व आमवातकारक आहे.

बोंबिल व विखणा.

बाम्बमत्स्यो हरेद्वातपित्तं रुचिकरो लघुः ।
शकुली ग्राहिणी हृद्या मधुरा तुवरा स्मृता ॥ ३ ॥

बोंबिल मासा वातपित्तनाशक, रुचिकारक, व हलका आहे. विखणा मासा ग्राहक, हृद्य, मधुर व तुरट आहे.

कर्ली मासा.

कविका मधुरा स्निग्धा कषाया रुचिकारिणी ।
किंचित्पित्तकरी वातनाशिनी बलवर्धिनी ॥ ४ ॥

कर्ली मासा मधुर, स्निग्ध, तुरट, रुचिकारक, किंचित् पित्त-कारक, वातनाशक व शक्तिवर्धक आहे.

सेवटे मासा.

गरघ्नी मधुरा तिक्ता तुवरा वातपित्तहृत् ।
कफघ्नी रुचिकृद्वह्निदीपनी बलवीर्यकृत् ॥ ५ ॥

सेवटे मासा मधुर, कडू, तुरट, वातपित्तनाशक, कफनाशक, रुचिकारक, अग्निदीपक व बल आणि शुक्र ह्यांना उत्पन्न करितो.

सुडदस मासा.

मद्गुरो वातहृद्वृष्यो बल्यः कफकरो लघुः ।

सुडदस मासा वातनाशक, कामोद्दीपक, शक्तिवर्धक, कफकारक व हलका[१] आहे.

माशाचें अंडें.

मत्स्यगर्भो भृशं वृष्यः स्निग्धः पुष्टिकरो गुरुः ॥ ६ ॥

माशाचें अंडें अत्यंत कामोद्दीपक, स्निग्ध, पुष्टिकारक व जड आहे.

---

१. श्लोकांत 'लघु' असा पाठ आहे, म्हणून त्याचा अर्थ हलका असा केला आहे. पण तो त्याच्या वृष्य, व कफकर बल्य ह्या गुणांशीं विरुद्ध आहे. चक्रपाणिदत्तानें आपल्या द्रव्यगुणसंग्रहामध्यें 'गुरु' असेंच म्हटलें आहे व तोच पाठ बरोबर दिसतो.

भाजलेला मासा.

दग्धमत्स्यो गुणैः श्रेष्ठः पुष्टिकृद्बलवर्धनः।

भाजलेला (तळलेला) मासा गुणानें श्रेष्ठ असून पौष्टिक व बलवर्धक आहे.

सहरी मासा.

महाशफरसंज्ञस्तु तिक्तः पित्तकफापहः ॥ ७ ॥
शिशिरो मधुरो रुच्यो वाते साधारणः स्मृतः।

सहरी मासा कडू, कफपित्तनाशक, थंड, मधुर व रुचिकारक, असून वातविकाराला साधारण प्रतीचा म्हणजे वाताला जास्त न करणारा असा आहे.

क्षुद्र मासे.

क्षुद्रमत्स्याः स्वादुरसा दोषत्रयविनाशनाः ॥ ८ ॥
लघुपाका रुचिकराः सर्वदा ते हिता मताः।

क्षुद्र मासे गोड, त्रिदोषनाशक, पचनाला हलके, रुचिकारक, आणि सर्वकाळ पथ्यकारक असतात.

अति सूक्ष्म मासे.

अतिसूक्ष्माः पुंस्त्वहरा रुच्याः कासानिलापहाः ॥ ९ ॥

अति बारीक मासे पुरुषत्वनाशक, रुचिकारक, खोकला व वातनाशक आहे.

नदींतील मासे.

नादेया बृंहणा मत्स्या गुरवोऽनिलनाशनाः।

नदींतील मासे पौष्टिक, जड व वातनाशक आहेत.

विहिरींतील मासे.

काप्या वृष्याः कफाष्ठीलामूत्रकृच्छ्रविबन्धदाः ॥ १० ॥

विहिरींतील मासे कफ, अष्ठीला (एक वातरोग), मूत्रकृच्छ्र व मळाचा अवरोध ह्यांना उत्पन्न कारितात.

तळावांतील व सरोवरांतील मासे.

ताडागा गुरवो वृष्याः शीतला बलमूत्रदाः।
सरोजा मधुराः स्निग्धा बल्या वातनिबर्हणाः ॥ ११ ॥

तळ्यांतील मासे जड, कामोद्दीपक, थंड, शक्तिवर्धक व मूत्रल

आहेत. सरोवरांतील मासे मधुर, स्निग्ध, शक्तिवर्धक, व वातनाशक आहेत.

समुद्रांतील मासे.

सामुद्रा गुरवो नातिपित्तलाः पवनापहाः ।
तत्रापि लवणाम्भोजा ग्राहिणो दृष्टिनाशनाः ॥ १२ ॥

समुद्रांतील मासे जड, अतिशय पित्त न करणारे व वातनाशक असतात. त्यांतही खाऱ्या पाण्यांतील मासे ग्राहक (मळ घट्ट करणारे) व दृष्टिनाशक आहेत.

डोहांतील मासे.

ह्रदोद्भवा बलकरास्ते तु स्वच्छजलोद्भवाः ।

डोहाच्या स्वच्छ पाण्यामध्यें होणारे मासे असतील तर ते बलकारक असतात.

ऋतुपरत्वें पथ्यकर मासे.

हेमन्ते कूपजा मत्स्याः शिशिरे सारसा हिताः ॥ १३ ॥
वसन्ते तु नदीजाता ग्रीष्मे ह्रदसमुद्भवाः ॥
तडागजाता वर्षासु तास्वपथ्या नदीभवाः ॥ १४ ॥
नैर्झराः शरदि श्रेष्ठा विशेषोऽयमुदाहृतः ॥

हेमंतऋतूमध्यें विहिरींतील मासे पथ्यकारक असतात. शिशिरऋतूंत सरोवरामध्यें होणारे मासे पथ्यकारक असतात. वसंत ऋतूंमध्यें नदीमध्यें होणारे मासे पथ्यकारक असतात. ग्रीष्मऋतुमध्यें डोहांतील मासे पथ्यकारक असतात. तलावांत होणारे मासे वर्षाऋतूंत पथ्यकारक असतात. वर्षाऋतूंमध्यें नदींतील मासे अपथ्य कारक आहेत. झऱ्याचे पाण्यांतील मासे शरदृतूमध्यें श्रेष्ठ आहेत, हे विशेष गुण सांगितले आहेत.

शंखादिकांचे गुण.

शङ्खो वराटकश्चैव शुक्तिशम्बूकभल्लकाः ।
जीवाश्चैवंविधाः सर्वे कोशस्थाः परिकीर्तिताः ॥ १ ॥
कोशस्था मधुराः स्निग्धाः पित्तवातहरा हिमाः ।
बृंहणाश्च तथा वृष्या वर्चस्याः कफवर्धनाः ॥ २ ॥

शंख, कवड्या व शिंपा ह्यांमध्यें होणारे किडे, शंबूक व भल्लक

जातीचे किडे ह्या सर्वांना कोशस्थ म्हणतात. हे कोशस्थ किडे मधुर, स्निग्ध, पित्तवातनाशक, थंड, पौष्टिक, कामोद्दीपक, मल वाढविणारे व कफ वाढविणारे आहेत.

खेंकडा व कासव.

कर्कटो बृंहणो वृष्यः शीतलोऽसृग्गदापहः ।
कच्छपो बलदः स्निग्धो वातघ्नः पुंस्त्वकारकः ॥ ३ ॥

खेकडा पौष्टिक, कामोद्दीपक, थंड व रक्तसंबंधीं विकार यांचा नाशक आहे. कासव हें बल देणारें, स्निग्ध, वातनाशक व पुरुषत्व आणणारें आहें.

सिद्ध अन्नाचे गुण.

भात.

जले चतुर्दशगुणे तण्डुलानां चतुष्पलम् ।
विपचेत्स्रावयेन्मण्डं स भक्तो मधुरो लघुः ॥ १ ॥
अत्युष्णं बलहद्भक्तं शीतं शुष्कं च दुर्जरम् ।
अतिक्लिन्नं ग्लानिकरं दुर्जरं तण्डुलान्वितम् ॥ २ ॥
अतिद्रवं तु यद्भक्तं श्वासकासाग्निपीनसैः ।
हरेद्वर्णबलं ज्ञेयं शकृद्वातनिरोधकृत् ॥ ३ ॥

चौदापट पाण्यामध्यें सोळा तोळे तांदूळ घालून शिजवावे आणि पेज काढून टाकून भात करावा. तो भात गोड व हलका असतो. अतिशय उष्ण भात बलनाशक असतो. थंड व सुकलेला भात पचनाला कठीण असतो. अतिशय ओलसर भात ग्लानिकारक असतो. ज्या भातांतील तांदूळ चांगले शिजलेले नसतात तो लवकर पचन होत नाहीं. अतिशय पातळ भात श्वास, खोकला, अग्निमांद्य व पीनस ह्यांना उत्पन्न करितो, आणि बल व वर्ण ह्यांचा नाश करून मल व अधोवायु ह्यांचा अवरोध करितो.

ताकांत शिजविलेला भात.

तक्रसिद्धं तु यद्भक्तं ग्रहण्यर्शःश्रमापहम् ।
वातघ्नं बलदं श्लेष्मपित्तरक्ताभिवर्धनम् ॥ ४ ॥

ताकांत शिजविलेला भात संग्रहणी, मूळव्याध व श्रम ह्यांचा नाश करितो. तो वातनाशक असून शक्तिवर्धक आहे; व कफ, पित्त व रक्त ह्यांना वाढविणारा आहे.

भाजलेल्या तांदुळाचा भात.

भृष्टतण्डुलजं भक्तं रुचिकृत्कफजिल्लघु ।
वातपित्तहरं ग्राहि ज्वरयक्ष्मातिसारनुत् ॥ ५ ॥

भाजलेल्या तांदुळाचा भात रुचिकारक, कफनाशक, हलका, वातपित्तनाशक, ग्राहक आणि ज्वर, राजयक्ष्मा व अतिसार ह्यांचा नाशक आहे.

मोकळा भात.

यथोचिते जले धौतांस्तण्डुलान्विपचेत्सुधीः ।
मण्डं संस्राव्य सर्पिस्तु तत्र किंचिद्विनिक्षिपेत् ॥ ६ ॥
ज्वलन्तमेकमङ्गारं तदुपर्यर्पयेदथ ।
घटिकानन्तरं दर्व्योपरिभागं विनिर्हरेत् ॥ ७ ॥
भक्तं विभक्तमेतत्तु राजयोग्यं मनोहरम् ॥

यथायोग्य पाणी घेऊन त्यांत धुतलेले तांदुळ घालून शिजवावे. तांदूळ चांगले शिजल्यावर पेज काढावी आणि त्यांत थोडें तूप घालून त्यावर एक पेटलेला निखारा ठेवावा; आणि अजमासें एक घटका झाल्यावर पळीनें त्या भाताच्या वरचा भाग काढून टाकावा. म्हणजे हा उत्तम प्रतीचा मोकळा भात होतो. हा राजाला सेवन करण्यास योग्य आहे.

कण्हेरी.

यवागूः षड्गुणैस्तोयैः संसिद्धा विरलद्रवा ॥ ८ ॥
यवागूर्ग्राहिणी तृष्णाज्वरघ्नी बस्तिशोधनी ।

तांदुळाच्या सहापट पाणी घालून दाट अशी जी कण्हेरी करितात, ती यवागू ग्राहक असून तहान व ज्वर ह्यांची नाशक व बस्तिशोधक अशी आहे.

अटवल.

चतुर्गुणे तु संसिद्धा विलेपी घनसिक्थका ॥ ९ ॥
विलेपी दीपनी बल्या हृद्या संग्राहिणी लघुः ।
व्रणाक्षिरोगिणां पथ्या तर्पणी तृड्ज्वरापहा ॥ १० ॥
आमशूलहरा स्वादुर्दीपनी रुचिपुष्टिकृत् ।

चौपट पाणी घालून जिच्यामध्यें पुष्कळ शितें आहेत म्हणजे यवागूपेक्षां दाट अशी जी करितात तिला विलेपी म्हणतात. ती

अग्निदीपक, बलकर, हृद्य, ग्राहक, हलकी, व्रणरोग व डोळ्याचे रोग ज्यांना आहेत त्यांना पथ्यकर, तृप्तिदायक, तहान व ज्वर यांची नाशक, आमशूलनाशक, गोड, अग्निदीपक, रुचिकारक व पौष्टिक आहे.

पेज.

पेया सिक्थान्विता तोये चतुर्दशगुणे कृता ॥ ११ ॥
पेया कुक्षिगदक्लान्तिज्वरस्तम्भातिसारजित् ।
रुच्याऽग्निकृल्लघुर्दोषमलस्वेदानुलोमनी ॥ १२ ॥

चौदापट पाणी घालून ज्यामध्यें थोडीं थोडीं शितें आहेत अशा प्रकारची जी पेज तिला पेया म्हणतात. ती कुशीसंबंधीं रोग, थकवा, ज्वर, अंग ताठणें, व अतिसार यांची नाशक आहे. तसेंच रुचिकारक, अग्निदीपक, हलकी, वातादिदोष व मल ह्यांचें अनुलोमन करणारी व घाम आणणारी आहे.

मंड.

मण्डश्चतुर्दशगुणे सिद्धस्तोये त्वसिक्थकः ।
मण्डो ग्राही लघुः शीतो दीपनो धातुसाम्यकृत् ॥ १३ ॥
स्रोतोमार्दवकृत्पित्तज्वरश्लेष्मभ्रमापहः ।

चौदापट पाणी घालून केलेल्या तांदळाच्या पेजेंतील शितें काढून टाकलीं म्हणजे तिला मंड म्हणतात. हा मंड ग्राहक, हलका, थंड, अग्निदीपक, शरीरांतील धातूंना समान स्थितींत ठेवणारा, स्रोतसांना मृदुत्व आणणारा आणि पित्त, ज्वर, कफ आणि घेरी ह्यांचा नाशक आहे.

जवांच्या व भाताच्या लाह्याचा मंड.

वाट्यमण्डो यवैर्भृष्टैर्लाजमण्डस्तु शालिभिः ॥ १४ ॥
वाट्यमण्डो लघुर्ग्राही शूलदाहत्रिदोषनुत् ।
नवज्वरेऽपि पथ्योऽयं पटोलमगधान्वितः ॥ १५ ॥
लाजमण्डो लघुर्ग्राही हृद्यः पाचनदीपनः ।
अतीसारग्रहण्यर्शोरोचको रुक्त्रिदोषनुत् ॥ १६ ॥

सातू भाजून त्यांचा जो मंड करितात त्याला वाट्यमंड म्हणतात. आणि भाताच्या लाह्या घालून जो मंड करितात त्याला लाजमंड

म्हणतात. वाट्यमंड हलका, ग्राहक व शूल, दाह व त्रिदोष ह्यांचा नाशक आहे. कडू पडवळ व पिंपळी घालून केला असतां हा नवज्वरांत देखील पथ्यकारक आहे. लाजमंड लघु (हलका), ग्राहक, हृदयाला हितकर, पाचक आणि अग्निदीपक असा आहे. आणि तो अतिसार, संग्रहणी व मूळव्याध या रोगांत रुचि देणारा, व शूल व त्रिदोष ह्यांचा नाशक आहे.

अष्टगुणमंड.

तण्डुलैरर्धमुद्गांशैः किंचिद्भृष्टैः सुपाचितैः ।
हिङ्गुसिन्धूत्थधनिकातैलत्रिकटुसंस्कृतः ॥ १ ॥
ज्ञेयः सोऽष्टगुणो मण्डो ज्वरदोषत्रयापहः ।
रक्तक्षुद्वर्धनः प्राणप्रदो बस्तिविशोधनः ॥ २ ॥

अर्धे तांदूळ व अर्धे मूग किंचित भाजून शिजवून त्यांत हिंग, सैंधव, धने, तेल व त्रिकुटु (सुंठ, मिरीं, पिंपळी) ह्यांची फोडणी देऊन केलेला जो मंड त्याला अष्टगुणमंड असें म्हणतात. हा मंड ज्वर व त्रिदोष ह्यांचा नाशक आहे. आणि रक्तवर्धक, क्षुधावर्धक (भूक वाढविणारा) प्राणदायक व बस्तिशोधक आहे.

सारें.

सारं भोजनसारं सारं सारङ्गलोचनाधरतः ।
पिब खलु वारंवारं नो चेन्मुधा भवति संसारः ॥ १ ॥

सार हें भोजनांतील केवळ सारच आहे. किंबहुना कुरंगनयना ज्या सुंदर कुलकामिनी त्यांच्या अधरामृतापेक्षांही तें रुचीनें मधुर आहे. ह्याचें वारंवार सेवन कर, नाहींपेक्षा संसार व्यर्थ आहे.

चिंचेचें सार.

अम्लिकायाः पलं पक्कं प्रस्थे नीरे विनिक्षिपेत् ।
अर्धावशिष्टे पूते च मरीचार्धपलं तथा ॥ २ ॥
सैन्धवं जरणं हिङ्गु यथायोग्यं प्रकल्पयेत् ।
श्लक्ष्णपिष्टकृतं सर्वं तस्मिंस्तोये विनिक्षिपेत् ॥ ३ ॥
कालशाकेन संयोज्य चाऽऽर्द्रां कुस्तुम्बरीं भिषक् ।
पुनः पाकं विधायाथ यथाकालं च सेवयेत् ॥ ४ ॥
अम्लिकाफलसंभूतं सारं वातविनाशनम् ।
पित्तश्लेष्मकरं किंचित्सुरुच्यं वह्निबोधकम् ॥ ५ ॥

पिकलेली चिंच चार तोळे घेऊन ती चौसष्ट तोळे पाण्यांत टाकून अर्धें पाणी आटे तोंपर्यंत शिजवावी. नंतर गाळून घेऊन त्यांत दोन तोळे मिऱ्याची पूड व सैंधव घालून जिरें व हिंग ह्यांची यथायोग्य फोडणी द्यावी. आणि त्यांत कालशाक व ओली कोथिंबीर घालून पुनः थोडें शिजवून योग्य वेळीं सेवन करावें. हें चिंचेचें सार वातनाशक, किंचित् कफपित्तकारक, उत्तम प्रकारचें रुचिकर व अग्निदीपक आहे.

द्विदल धान्याचें कट.

यूषः स्मृतो वैदलानामष्टादशगुणेऽम्भसि ।
यूषो बल्यो लघुः पाके रुच्यः कण्ठकफापहः ॥ १ ॥

कोणत्याही द्विदल धान्याच्या अठरापट पाणी घालून शिजवून चतुर्थांश करून घेतात त्याला यूष (कट) असें म्हणतात. हा यूष बलकारक, विपाककाळीं हलका, रुचिकारक, व घशांतील कफाचा नाशक आहे.

मुगाचा यूष.

मुद्गानामुत्तमो यूषो दीपनः शीतलो लघुः
व्रणोर्ध्वजत्रुरुग्दाहकफपित्तज्वरास्रजित् ॥ २ ॥
दाडिमामलकाभ्यां तु मुद्गयूषः सुसाधितः ।
पित्तवातहरः पथ्यो लघुरग्निप्रदः सरः ॥ ३ ॥

मुगाचा यूष उत्तम असून अग्निदीपक, थंड, हलका, व्रण, मानेच्या वरचे विकार, दाह, कफ, पित्त व ज्वर यांसंबंधीं पीडा ह्यांचा नाशक आहे. आणि त्यांमध्यें डाळिंबाचा रस किंवा आवळे घालून तयार केला असतां तो पित्तवातनाशक, पथ्यकारक, अग्निदीपक व सारक होतो.

मूग व आवळे यांचा यूष.

मुद्गामलकयूषस्तु भेदनः कफपित्तजित् ।
तृड्दाहशमनः शीतो मूर्छाभ्रममदापहः ॥ ४ ॥

मूग व आवळे ह्यांचा यूष मलभेदक, कफपित्तनाशक, तृषानाशक, दाहशामक, थंड, मूर्च्छा, भ्रम (भोवळ) व मद (मदात्यय रोग) ह्यांचा नाश करितो.

हुलग्याचा यूष.

कुलत्थयूषो गुल्मार्शःकफवाताश्मशर्कराः ।
तूनीप्रतूनीमेदांसि मेहं हन्त्यग्निकृत्सरः ॥ ५ ॥

हुलग्याचा यूष गुल्म, मूळव्याध, कफ, वात, मूतखडा, मूत्रशर्करा, तूनी, प्रतूनी, मेद व प्रमेह ह्यांचा नाशक, अग्निदीपक व सारक असा आहे.

हरभऱ्याचा यूष.

चणकैर्विहितो यूषोऽनुष्णस्तुवरको लघुः ।
रक्तपित्तप्रतिश्यायकासपित्तकफापहः ॥ ६ ॥

हरभऱ्याचा यूष उष्ण नसून तुरट, हलका व रक्तपित्त, पडसें, खोकला, पित्त व कफ ह्यांचा नाशक आहे.

मटक्याचा यूष.

मकुष्ठयूषः संग्राही पित्तश्लेष्मज्वरापहः ।
लघुः संतर्पणः पथ्यो हृद्यः पीनसकासजित् ॥ ७ ॥

मटक्याचा यूष संग्राही (मळ घट्ट करणारा), पित्त, कफ व ज्वर यांचा नाशक, हलका, तृप्तिदायक, पथ्यकारक, हृद्य (हृदयाला हितावह) असून पीनस, व खोकला ह्यांचा नाशक आहे.

मसुराचा यूष.

मसूरयूषः संग्राही बृंही स्वादुः प्रमेहजित् ।

मसूराचा यूष संग्राही, पौष्टिक, गोड व प्रमेहनाशक आहे.

तुरीचा यूष.

तथा कषायो मधुरश्च यूषो विशोषणो वातहृदाढकीनाम् ।
पित्तापहः श्लेष्महरो ज्वराणां कृमीन्निहन्याद्गुददारणं च ॥८॥

तुरीचा यूष तुरट, मधुर, शोषक, वातनाशक, पित्तनाशक, कफनाशक, ज्वरनाशक, कृमिनाशक व भगंदरनाशक आहे.

अगस्तिसार.

अगस्तिसारः सुस्वादुस्तिक्तो वायुकफप्रणुत् ।
पाण्डुशोफारुचिप्लीहगुल्मशूलगदापहः ॥ १ ॥

अगस्तिसार अतिशय स्वादिष्ट, कडू, वात व कफनाशक, पांडुरोग, सूज, अरुचि, गुल्म व शूल ह्यांचें नाशक आहे.

वरण.

मुगाचें वरण.

मुद्गसूपो लघुर्ग्राही कफपित्तहरो हिमः ।
स्वादुर्नेत्र्योऽनिलहरः कुल्माषाः शुक्रवर्धनाः ॥ १ ॥

मुगाचें वरण हलकें, ग्राहक, कफपित्तनाशक, थंड, गोड, नेत्ररोगनाशक व वातनाशक आहे. मुगाची उसळ शुक्रवर्धक आहे.

उडदाचें वरण.

माषसूपश्च कुल्माषः स्निग्धो वृष्योऽनिलापहः ।
उष्णः संतर्पणो बल्यः सुस्वादुरुचिकारकः ॥ २ ॥

उडदाचें वरण आणि घुगऱ्या स्निग्ध, वृष्य, वातनाशक, उष्ण, तृप्तिकारक, बलकर, अतिशय गोड व रुचिकर आहेत.

तुरीचें वरण.

आढकीसूप उद्दिष्टः श्लेष्मपित्तहरो हिमः ।
किंचित्कषायो रुचिकृत्साज्यो दोषत्रयप्रणुत् ॥ ३ ॥

तुरीचें वरण कफपित्तनाशक, थंड व किंचित् तुरट, रुचिकारक, आणि त्यांत तूप घातलें असतां तिन्हीही दोषांचें नाशक आहे.

हरभऱ्याचें वरण.

चाणकः सूप आख्यातो रोचनः पाचनः परः ।
बलासपित्तनुद्बल्यो रक्तजिन्नातिवातलः ॥ ४ ॥

हरभऱ्याचें वरण रुचिकारक, पाचक, कफ व पित्तनाशक, बलकारक, रक्तविकारनाशक, व साधारण वातकारक असें आहे.

मटक्याचें वरण.

मकुष्ठसूपोऽल्पबलः पाचनो दीपनो लघुः ।
चक्षुष्यो बृंहणो वृष्यः पित्तश्लेष्मास्त्ररोगनुत् ॥ ५ ॥

मटक्याचें वरण अल्प बलकारक, पाचक, दीपक, हलकें, डोळ्यांला हितकारक, शक्तिवर्धक, कामोद्दीपक, पित्त, कफ व रक्तविकार यांचें नाशक आहे.

मसूराचें वरण.

मसूरसूपः संग्राही शीतलो मधुरो लघुः ।
कफपित्तास्त्रजिद्वर्ण्यो विषमज्वरनाशनः ॥ ६ ॥

मसुराचें वरण संग्राही, शीतल, मधुर, हलकें, कफ, पित्त व रक्तविकार यांचें नाशक, वर्णकर व विषमज्वरनाशक आहे.

चवळ्याचें वरण.

राजमाषभवः सूपः स्वादुरूक्षः कषायकः ।
ग्राही गुरुर्वातकरः स्तन्यकृद्रुचिकारकः ॥ ७ ॥

चवळ्याचें वरण गोड, रूक्ष, तुरट, मळ घट्ट करणारें, जड, वातनाशक, स्तनांतील दूध वाढविणारें, व रुचिकारक आहे.

पावट्याचें वरण.

निष्पावसूपः पित्तास्रमूत्रस्तन्यानिलप्रदः ।
विदाह्युष्णो गुरुः शोफकफकृच्छुक्रलः सरः ॥ ८ ॥

पावट्यांचें वरण रक्तपित्ताला वाढविणारें, मूत्रकारक, स्तनांतील दूध वाढविणारें व वातकारक आहे. तसेंच घशाशीं जळजळ उत्पन्न करणारें, उष्ण, जड, स्थूल, कफकारक, धातुवर्धक व सारक आहे.

हुलग्याचें वरण.

कुलत्थसूपो वातघ्नः कटुः पाके कषायकः ।
कफाविरोधी पित्तास्रकरोष्णःश्वासकासनुत् ॥ ९ ॥

हुलग्याचें वरण वातनाशक, पाककाळीं तिखट, तुरट, कफाशीं विरोध न करणारें, पित्त व रक्त ह्यांना कोपविणारें आणि उष्ण श्वास व खोकला यांचें नाशक आहे.

पापड.

पटुजीरकबाह्लीकस्वर्जिकामरिचान्विताः ।
अरोचकजिगीषूणां पर्पटाः पुरतो भटाः ॥ १ ॥

मीठ, जिरें, हिंग, सज्जीखार, व मिरीं हीं घालून केलेले पापड, अरुचीला जिंकणारांचे पुढारी योद्धे आहेत. सारांश, पापड हे उत्तम अरुचिनाशक आहे.

उडदाचे पापड.

माषजाः पर्पटा बल्या रोचनाः पाचनाः सराः ।
गुरवो रक्तपित्ताग्निकफदा बहुवर्चसः ॥ २ ॥

उडदाचे पापड बलकर, रुचिकारक, पाचक, सारक, जड, रक्त-पित्त व कफ वाढविणारे, अग्निवर्धक व पुष्कळ मलकारक आहेत.

मुगाचे पापड.

मुद्गजाः पर्पटाः पथ्या ज्वराक्षिश्रवणामये ।
अरोचकच्छिदः स्निग्धा लघवो दोषनाशनाः ॥ ३ ॥

मुगाचे पापड ज्वर, नेत्ररोग आणि कर्णरोग ह्यांना पथ्यकारक असून अरुचिनाशक, स्निग्ध, तुरट व दोषनाशक आहेत.

मुगाची डाळ व तांदूळ यांची खिचडी.

मुद्गतण्डुलजा ज्ञेया कृशराऽल्पबला लघुः ।
भक्ततो दुर्जरा बल्या पुष्टिकृत्तर्पणी हिमा ॥ १ ॥
तण्डुलैर्मौक्तिकाकारैः कण्डितैर्न च खण्डितैः ।
चतुर्थभागैर्माषस्य वैदलैः परिमिश्रितैः ॥ २ ॥
यथोचिताम्बुसंसिद्धैः सहिङ्गुलवणार्द्रकैः ।
सस्नेहा कामिनीवेयं कृशरा शिशिरे हिता ॥ ३ ॥
कृशरा दुर्जरा बल्या गुर्वी वातविनाशिनी ।
बलपुष्टिमलश्लेष्मपित्तरेतःप्रदा सरा ॥ ४ ॥

मूग व तांदूळ ह्यांची खिचडी किंचित् बलकारक, हलकी, भातापेक्षां जिरण्याला कठिण, शक्तिवर्धक, पौष्टिक व थंड आहे. मोत्यासारखे दिसणारे तांदूळ कूट न होईल अशा बेतानें कांडून घेऊन त्यांत त्यांच्या चौथाई उडदाची डाळ मिसळून यथायोग्य पाणी घालून व मीठ, हिंग व सुंठ वगैरे मसाला घालून केलेली उडदाची डाळ व तांदूळ ह्यांची घृतयुक्त (तूप घातलेली) स्निग्ध खिचडी सकाम युवतीप्रमाणें थंडीच्या दिवसांत हितकारक आहे. ही खिचडी पचनाला कठीण, बलकारक, जड, वातनाशक व बळ, पुष्टि, मळ, कफ, पित्त व शुक्र ह्यांना वाढविणारी व सारक आहे.

तांदुळाची खीर.

अर्धावशिष्टे क्वथनाद्दुग्धेऽष्टांशांश्च तण्डुलान् ।
पचेन्नातिद्रवघनं परमान्नमिदं स्मृतम् ॥ १ ॥
पायसं दुर्जरं बल्यं धातुपुष्टिप्रदं गुरु ।
शुक्रलं मधुरं पाके पित्तघ्नं बृंहणं सरम् ॥ २ ॥

दूध तापवून अर्धे आटवावें. नंतर त्यांत अष्टमांश तांदूळ घालून अतिशय दाट किंवा पातळ न होईल अशा बेतानें शिजवून खीर तयार करावी. ह्याला परमान्न असें म्हणतात. ही खीर पचण्याला कठिण, बलकारक, धातुपुष्टिकारक, जड, शुक्रवर्धक, पाककाळीं

१. एकदां धातुपौष्टिक म्हणून सांगितल्यावर पुनः शुक्रवर्धक व पौष्टिक म्हणण्याचें कारणः—धातुपौष्टिक म्हणजे रसरक्तादि सर्व धातूंना पुष्टिकारक;

मधुर, पित्तशामक, पौष्टिक व सारक आहे.

गव्हाची खीर.

गोधूमपायसं बल्यं मेदःकफकरं गुरु ।
शीतलं पित्तशमनं वातकृच्छुक्रवर्धनम् ॥ ३ ॥

गव्हाची खीर बलकारक, मेद व कफ ह्यांना वाढविणारी, जड, थंड, पित्तशामक, वातकारक व शुक्रवर्धक आहे.

गव्हाची पोळी.

गोधूमपोलिका बल्या कफला वातनुद्गुरुः ।
शुक्रला मधुरा पाके पित्तघ्नी बृंहणी सरा ॥ १ ॥

गव्हाची चपाती बलकारक, कफकारक, वातनाशक, जड, शुक्रवर्धक, पाककाळीं (पचनकाळीं) मधुर, पित्तनाशक व सारक आहे.

रोडगा.

गोधूमचूर्णं वस्वंशचणकक्षोदमिश्रितम् ।
यवानीहिंगुलवणैः किंचिदाज्यैश्च मर्दितम् ॥ २ ॥
संमर्द्य चक्रिका तस्य कार्या निम्नास्तु मध्यतः ।
निर्धूमाङ्गारसंभृष्टा अदग्धास्ताम्ररोचिषः ॥ ३ ॥
अङ्गारकर्कटी बल्या बृंहिणी शुक्रला लघुः ।
दीपनी कफहृद्रोगपीनसश्वासवातनुत् ॥ ४ ॥

आठ भाग गव्हाच्या कणिकींत एक भाग हरभऱ्याचें पीठ मिसळून त्यांत बेतानें ओवा, हिंग, मीठ व किंचित् तूप घालून मर्दन करून त्याची मध्यें खोलगट अशी चकती करून निर्धूम निखाऱ्यावर ती न करपूं देतां तांबूस रंग येई तोंपर्यंत भाजून काढावी. हिला अंगारकर्कटी म्हणतात. ही बलकारक, पौष्टिक, धातुवर्धक, हलकी, अग्निदीपक, कफ, हृद्रोग, पीनस, श्वास व वात ह्यांची नाशक आहे.

मांडा.

मण्डको लघुरुष्णस्तु पथ्यो दोषत्रयापहः ।
रेतःपुष्टिप्रभादृष्टिप्रदः स्निग्धश्च बृंहणः ॥ ५ ॥

व शुक्रवर्धक म्हणजे केवळ शुक्रवर्धक, आणि पौष्टिक म्हणजे शरीर पुष्ट करणारी, असे भिन्न गुण आहेत.

मांडा हलका, उष्ण, पथ्यकारक, त्रिदोषनाशक, शुक्रवर्धक, कांतिदायक, दृष्टिदायक, स्निग्ध व पौष्टिक आहे.

मलिदा.

मर्दिता दृढपाणिभ्यां शर्कराघृतसंयुता ।
अङ्गारिका महावृष्या वातपित्तहरा गुरुः ॥ १ ॥

कणकीचा रोडगा करून त्यांत तूपसाखर घालून चुरून हातानें सडकून मळावा. ह्याला मलिदा म्हणतात. हा अत्यंत वृष्य, वातपित्तनाशक व जड आहे.

वडे.

लवणमरिचहिङ्गुशृङ्गवेरैः समुपचितो वरमाषजः सुपक्वः ।
अतिसुरभिघृतेऽथवा सुतैले विशति मुखे वटकः सुपुण्यभाजाम् १
पवनारुचिदैन्यजयोद्भटकाः क्षपितार्दितकम्पमरुत्कटकाः ।
रसनातलरङ्गधरा नटकाः कफपित्तविकारकरा वटकाः ॥ २ ॥

मीठ, मिरीं (किंवा मिरची), हिंग, आलें किंवा सुंठ हे पदार्थ यथायोग्य घालून तुपांत किंवा उत्तम तेलांत तळलेले उडदाचे वडे भाग्यशाली मनुष्याच्याच मुखांत पडतात. वडे हे वात, अरुचि व अप्रसन्नता (दैन्य) ह्यांचे नाशक आहेत. आक्षेपक, अर्दित व कंपवात ह्या वातविकारांचे नाशक आहेत. जिव्हारूपी रंगभूमीवरील हे नट आहेत; सारांश इतके ते रुचिकारक आहेत. आणि कफपित्तकारक आहेत.

कांजीतील वडे.

बाह्लीकधूपयुतनिर्मलवारिपूर्णे
कुम्भे यथोचितपटूत्तमराजिकाद्यैः ।
संधूपिताः कतिविधानि दिनानि रुच्या
वातघ्नकाञ्जिकवटाः कफपित्तलाः स्युः ॥ ३ ॥

हिंगाची धुरी दिलेल्या एका मातीच्या भांड्यांत स्वच्छ पाणी भरून त्यांत मीठ, मोहऱ्या वगैरे मसाल्याचे पदार्थ घालून त्यांत वरीलप्रमाणें तळलेले उडदाचे वडे घालून तोंड बांधून कांहीं दिवस (तीन दिवस) ठेवून काढावे. ह्यांना कांजिकवटक म्हणतात. हे

रुचिकारक, वातनाशक व कफपित्तकारक असतात.

मुगाचे वडे.

मुद्गवटी गुरू रुच्या वातपित्तास्रदा मता ।
श्लेष्मला पुष्टिबलकृच्छुक्रला मृदुलाऽल्पतृट् ॥ ४ ॥

मुगाचे वडे जड, रुचिकारक, वात, पित्त व रक्त ह्यांना वाढविणारे, कफकारक, पुष्टि व बल देणारे, शुक्रवर्धक, मृदु व किंचित् तृषाकारक आहेत.

सारनोळ्या व कचोऱ्या.

वैदलैश्चाणकैः स्विन्नैः सगुडैः सूक्ष्मपेषितैः ।
किंवा सलवणाजाजीहिङ्गुभिः पूरणीकृतैः ॥ ५ ॥
एतैर्भृताश्च तलिताः कृतगोधूमपूरिकाः ।
पूरिका मधुरा बल्याः श्रमवातामयापहाः ॥ ६ ॥
शुक्रला बृंहणी श्वासपथ्या हृद्रोगनाशिनी ।
इयं सलवणा लघ्वी श्लेष्मवातविनाशिनी ॥ ७ ॥

हरभऱ्याची डाळ शिजवून गूळ मिश्र करून बारीक वाटावी. किंवा गूळ न घालतां मीठ, हिंग, जिरें वगैरे घालून वाटून पुरण करावें. मग तें पुरण भरून कणकीच्या पुऱ्या करून त्या तेलांत किंवा तुपांत तळून काढाव्या. ह्या मधुर, बलकारक, श्रमहारक, वातविकारनाशक, शुक्रवर्धक, पौष्टिक, श्वासविकाराला पथ्यकारक, व हृद्रोगनाशक असतात. तीच मीठ वगैरे घालून केलेली हलकी कफवातनाशक असते. (ह्यापैकीं गुळाचें पुरण घालून करतात तिला सारनोळी म्हणतात व मीठ, मसाला वगैरे घालून करितात तिला कचोरी म्हणतात.

तांदुळाच्या पिठाचे घीवर.

सुशालिपिष्टं घनदुग्धमिश्रितं सशर्करं वस्त्रसुपूतमेतत् ।
घृते सुपक्वं पृथुलीकृतं बुधैर्निगद्यते शालिजघेवरोऽयम् ॥८॥

तांदुळाच्या पिठांत दाट दूध घालून व वस्त्रगाळ करून तापलेल्या तुपांत तें ओतून चांगले पसरट घीवर तयार करावे. ह्याला तांदुळाचे घीवर म्हणतात.

उडदामुगाच्या शेंगोळ्या (मुटके.)

माषपिष्ट्यथवा मुद्गपिष्टी सपटुरामठा।
जीरकार्द्रकसंयुक्ता पिण्डिता मुष्टिमात्रया ॥ ९ ॥
तृणाम्बुगर्भिते पात्रे सुस्विन्ना तलिता ततः।
खादयेदिण्डरीं शुष्कां किंवाऽऽम्लाद्यैः प्रलोडिताम् ॥१०
माषेण्डर्युदिता बल्या रोचिकाऽनिलजिद्गुरुः।
शुक्रला बृंहिणी चाथ मुद्गजा स्वल्पजा लघुः ॥ ११ ॥

उडदाच्या किंवा मुगाच्या पिठांत मीठ, हिंग, जिरें, आलें किंवा सुंठ वगैरे मसाला घालून मळून मुठीनें गोळे वळून (मुटके वळून) पाला घातलेल्या एका भांड्यांत घालून उकडून नंतर तेलांत तळून काढावे. ह्यांना इंडरी म्हणतात. ही कोरडीच किंवा आंबट पदार्थांमध्यें बुडवून खावी. उडदाची इंडरी (शेंगोळी) शक्तिवर्धक रुचिकारक, वातनाशक, जड, शुक्रवर्धक व पौष्टिक आहे आणि मुगाची इंडरी हलकी असून गुणानें अल्प आहे.

पिठाचे पदार्थ.

शालिपिष्टकृता भक्ष्या नातिबल्या विदाहिनः।
अवृष्या गुरवश्चोष्णाः कफपित्तप्रकोपनाः ॥ १२ ॥
गोधूमविहिता भक्ष्या बल्याः पित्तानिलापहाः।
वैदला वातला भक्ष्या गुरुवस्तुवरा हिमाः ॥ १३ ॥
माषपिष्टकृता भक्ष्या बल्याः पित्तकफप्रदाः

तांदुळाच्या पिठाचे केलेले भक्ष्य पदार्थ शक्ति फारशी न वाढविणारे, विदाहकारक, वीर्यवृद्धि न करणारे, जड व उष्ण असून कफ व पित्त वाढविणारे आहेत. गव्हाच्या पिठाचे भक्ष्य पदार्थ बलकारक व वातपित्तनाशक आहेत. द्विदल धान्याचे भक्ष्य पदार्थ वातकारक, जड, तुरट, व थंड असतात. उडदाच्या पिठाचे भक्ष्य-पदार्थ बलकारक व पित्तकफनाशक असतात.

तुपांत व तेलांत तळलेल्या अन्नाचे गुण.

घृतपाचितभक्ष्यास्तु बल्याः पित्तानिलापहाः।
तैलजा दृक्समीरघ्ना उष्णाः पित्तास्रदूषणाः ॥ १ ॥
दुग्धालोडितगोधूमशालिपिष्टादिनिर्मिताः।
वातपित्तहरा भक्ष्या हृद्याः शुक्रबलप्रदाः ॥ २ ॥

तुपांत तळलेले पदार्थ बलकारक व वातपित्तनाशक असतात. तेलांत तळलेले पदार्थ उष्ण, पित्त व रक्त ह्यांना वाढविणारे, दृष्टीला कमी करणारे व वातनाशक असे असतात. गव्हाच्या व तांदुळाच्या पिठाचे दुधांत कालवून तयार केलेले पदार्थ वातपित्तनाशक, हृदयाला हितावह आणि शुक्र व बल देणारे असतात.

सरबतें.

द्राक्षाम्लिकापरूषादिजलं खण्डादिमिश्रितम् ।
मरीचार्द्रककर्पूरचातुर्जातादिसंस्कृतम् ॥ १ ॥
पानकं द्विविधं तत्स्यादम्लानम्लविभेदतः ।
पानकं मूत्रलं हृद्यं प्रीणनं तृट्श्रमापहम् ॥ २ ॥
यथाद्रव्यगुणात्तत्तु गुरुलघ्वादि निर्दिशेत् ।

द्राक्षें, चिंचा व फालसा इत्यादिकांच्या रसांमध्यें खडीसाखर वगैरे घालून मिरीं, आलें, कापूर, चातुर्जात (दालचिनी, वेलची, तमालपत्र, नाकेशर) इत्यादिकांनीं रस सुवासिक व रुचिकर करितात त्याला पन्हें किंवा सरबत असें म्हणतात. हें आंबट व गोड (अनम्ल) असें दोन प्रकारचें असतें. पन्हें हें साधारणतः मूत्रल, हृदयाला हितावह, सर्वांना प्रिय, तहान व श्रमनाशक आहे. ज्या द्रव्याचें तें केलें असेल त्याप्रमाणें तें जड किंवा हलकें वगैरे असतें.

सरबत.

द्राक्षादिपानकं हृद्यं मूत्रलं तृड्भ्रमापहम् ॥ ३ ॥
पित्तवातक्लमच्छर्दिदाहमोहमदप्रणुत् ।

द्राक्षाचें सरबत हृद्य व मूत्रल असून तहान, श्रम (थकवा), भोंवळ, पित्त, वात, ओकारी, दाह, मोह (मूर्च्छा) आणि मद (मदात्यय) ह्यांचा नाश करतें.

फालसा व बोरें ह्यांचें सरबत.

परूषकाणां कोलानां हृद्यं विष्टम्भि पानकम् ॥ ४ ॥

फालसा व बोरें ह्यांचें सरबत हृद्य असून मलाचा अवरोध करितें.

आंब्याचें पन्हें.

अपक्वाम्ररसोद्भूतं पानकं वातनाशनम् ।
कफपित्तकरं किंचित्प्रत्यहं यदि पीयते ॥ ५ ॥

पक्वाम्रसंभवं तत्तु स्वादूष्णं गुरु पित्तकृत् ।
रुचिदं श्लेष्मलं बल्यं वर्ण्यं वृष्यं तु वातनुत् ॥ ६ ॥

हिरव्या आंब्याचें पन्हें वातनाशक असून रोज सेवन केलें तर किंचित् कफपित्तकारक होतें. पिकलेल्या आंब्याचें पन्हें (आंबरस) गोड, उष्ण, जड, पित्तकारक, रुचिकारक, कफकारक, शक्तिवर्धक, कांतिकारक, वृष्य व वातनाशक आहे.

धन्याचें सरबत.

धान्यकल्कसिताजातं पानकं शशिवासितम् ।
शीतं परं पित्तहरं मूत्रकृच्छ्रविनाशनम् ॥ ७ ॥

धन्याचा कल्क (धने पाण्यांत गंधाप्रमाणें बारीक वाटून करितात तो) व पिठीसाखर घालून केलेलें धन्याचें सरबत थंड, उत्तम प्रकारचें पित्तनाशक, व मूत्रकृच्छ्र (उन्हाळे) नाशक आहे.

लिंबाचें सरबत.

भागैकं निम्बुजं तोयं षड्भागं शर्करोदकम् ।
लवङ्गमरिचोन्मिश्रं पानकं पानकोत्तमम् ॥ ८ ॥
निम्बूफलभवं पानमत्यम्लं वातनाशनम् ।
वह्निदीप्तिकरं रुच्यं समस्ताहारपाचकम् ॥ ९ ॥

एक भाग लिंबाचा रस, आणि सहा भाग साखरेचें पाणी एकत्र करून त्यांत लवंग व मिरीं ह्यांच्या चूर्णाचें योग्य मिश्रण करावें, म्हणजे उत्तम प्रकारचें सरबत होतें. हें लिंबाचें सरबत अतिशय आंबट, वातनाशक, अग्नि प्रदीप्त करणारें, रुचिकारक व सर्व आहार पचन करणारें आहे.

मोरांबे.

आममाम्रं त्वचा हीनं द्विस्त्रिर्वा खण्डितं ततः ।
भृष्टमाज्ये मनागस्तं खण्डपाकेऽथ युक्तितः ॥ १ ॥
सुपक्वं च समुत्तीर्य मरीचैलेन्दुवासितम् ।
स्थापितं स्निग्धमृद्भाण्डे रागखाण्डवसंज्ञितम् ॥ २ ॥
पुष्टिदो बलदः पित्तवातास्रारुचिनाशनः ।
स्निग्धो गुरुस्तर्पणश्च सुस्वादू रागखाण्डवः ॥ ३ ॥
सितारुचकसिन्धूत्थैः सवृक्षाम्लपरूषकैः ।

जम्बूफलरसैर्युक्तो रागो राजिकया कृतः ॥ ४ ॥
खाण्डवा मधुराम्लादिरससंयोगसंभवाः ।
दीपना बृंहणा रुच्यास्तीक्ष्णा हृद्याः श्रमापहाः ॥ ५ ॥

हिरवे आंबे आणून त्यांवरील साल काढून त्यांच्या फोडी कराव्या. आणि त्या थोड्याशा तुपांत परतून घेऊन खडीसाखरेच्या पाकांत घालून शिजवाव्या. नंतर त्यांना मिरीं, वेलदोड्याचे दाणे व कापूर ह्यांचा वास लावून स्निग्ध अशा मातीच्या भांड्यांत (बरणींत) ठेवाव्या. ह्याला रागखांडव म्हणतात. हा पौष्टिक, शक्तिवर्धक, पित्त, वात व रक्तदोष ह्यांचा नाशक, स्निग्ध, जड, तृप्तिदायक व गोड असा आहे. संचळ, पिठीसाखर, सैंधव, आमसुलें, फालसा व जांभूळ ह्या सर्वांचा रस यथायोग्य प्रमाणांत मिश्र करून त्याला मोहरीचा वास लावावा. ह्याला राग (रायतें) असें म्हणतात. आणि मधुर-आंबट अशा रसांनीं युक्त जो करतात त्याला खांडव असें म्हणतात. हे अग्निदीपक, पौष्टिक, रुचिकारक, तीक्ष्ण, हृद्य, व श्रमनाशक आहेत.

श्रीखंड.

दधि बद्धं तुल्यसितं त्वर्धपयो गालितं शनकैः ।
मरिचैलाशशिसहितं भवति रसालाभिधं लोके ॥ १ ॥

घट्ट दहीं त्यांतील पाणी काढून टाकून घ्यावें, आणि त्यांत समभाग साखर घालून मिरें, वेलदोडयाचे दाणे व कापूर ह्यांचा वास लावून तयार करावें. ह्यास रसाला (श्रीखंड) असें म्हणतात.

दुसरा प्रकार.

ससितं दधिमध्वाज्यमरिचैलादिसंस्कृतम् ।
मथितं कान्तकामिन्या कर्पूरपरिवासितम् ॥ २ ॥
रसाला शिखरिण्युक्ता मार्जारी मार्जिका बुधैः ।
रसाला शुक्रला बल्या रोचना वातपित्तजित् ॥ ३ ॥
स्निग्धा गुरुः प्रतिश्यायं विशेषेण विनाशयेत् ।

वरीलप्रमाणें तयार केलेलें घट्ट दहीं साखर, मध व तूप ह्यांच्या योग्य प्रमाणाशीं मिश्र करून त्यांत मिरीं, वेलदोडे वगैरे मसाला

घालून चांगलें मंथन करून त्याला कापराचा वास द्यावा. ह्याला रसाला (श्रीखंड), शिखरिणी, मार्जारी किंवा मार्जिका असें म्हणतात. ही शुक्रवर्धक, बलकारक, रुचिकारक, वातपित्तनाशक, स्निग्ध, जड आणि विशेषतः पडसें दूर करणारी आहे.

भरित.

लवणमरिचचूर्णेनावृतं रामठाढ्यं
दहनवदनपक्वं निम्बुतोयेन युक्तम् ।
हरति पवनसंघं श्लेष्महन्तृ प्रसिद्धं
जठरभरणयोग्यं चारुभोज्यं भरित्थम् ॥ १ ॥

वांगें आदिकरून ज्या फळाचें किंवा कंदादिकांचें भरित करावयाचें असेल, तें फळ किंवा तो कंद प्रत्यक्ष विस्तवामध्यें भाजून घ्यावा आणि त्यावरील साल काढून टाकून तो चांगला कुसकरावा. नंतर त्यांत मीठ, मिऱ्याची पूड घालून थोडा लिंबाचा रस घालावा, म्हणजे भरित होतें. तें वातसमुदायाचा नाश करितें व कफनाशक आहे. हें खाण्याला योग्य असून उत्तम प्रकारचा भोज्य पदार्थ आहे.

आल्याचा चटका.

धौतं खण्डितमार्द्रकं च सलिलैः क्षिप्तं सुतप्ते घृते
सिन्धूत्थं मरिचं सुजीरयुगलं चूर्णीकृतं प्रक्षिपेत् ।
चूर्णं भृष्टचणोद्भवं च वितुषं हिंग्वाज्यधूमे दहे
दित्थं दोषविहीनमार्दकवरं सुस्वादु संजायते ॥ २ ॥

आलें स्वच्छ धुवून बारीक चिरावें. नंतर तें तुपांत परतून घेऊन त्यांत सैंधव किंवा मीठ, मिरीं किंवा मिरची, जिरें व शहाजिरें ह्यांची पूड घालावी, आणि भाजलेल्या हरभऱ्याचें पीठ लावून तुप व हिंग ह्यांची फोडणी द्यावी. म्हणजे हें आलें निर्दोष व रुचिकारक होतें.

पोहे.

पृथुका गुरवो बल्याः श्लेष्मला वातनाशनाः ।
दुर्जराः शुक्ररुचिदा आमविष्टम्भकारिणः ॥ १ ॥

पोहे जड, बलकारक, कफकारक, वातनाशक, पचण्यास कठीण, धातुवर्धक व रुचिकारक असून आमांश व मलावष्टंभ (मलाचा अवरोध) करणारे आहेत.

लाह्या.

लाजा लघुतराः शीता बल्याः पित्तकफच्छिदः।
वम्यतीसारदाहास्रमेदोमेहतृषापहाः ॥ २ ॥

लाह्या फारच हलक्या, थंड व बलकारक असून पित्त, कफ, ओकारी, अतिसार, मेद, मेह व तहान ह्यांच्या नाशक आहेत.

हौळा.

शिम्बीधान्यैरर्धपक्वैः सुभृष्टैर्होलका मताः।
होलकाल्पानिला मेदःकफदाश्च स्वभावतः ॥ ३ ॥

शेंगांतील धान्यें (हरभरे वगैरे) अर्धवट पक्व अशीं घेऊन विस्तवावर भाजावीं. ह्याला होलक किंवा होला असें म्हणतात. (ह्यालाच मराठी भाषेंत हौळा असें म्हणतात.) हा गुणानें किंचित् वातकर, मेद व कफ करणारा आहे.

मसाला.

शुण्ठीमरीचपिप्पल्यो धान्यकाजाजिदाडिमम्।
पिप्पलीमूलसंयुक्तो वेसवार इति स्मृतः ॥ १ ॥
वेसवारो गुरुः स्निग्धो बल्यो वातरुजापहः।
पुष्टिदः सर्वधातूनां विशेषान्मलनाशनः ॥ २ ॥

सुंठ, मिरीं, पिंपळी, धने, जिरें, आंबट डाळिंबाचे दाणे व पिंपळमूळ हीं द्रव्यें योग्य प्रमाणांत घेऊन करितात त्याला वेसवार म्हणजे मसाला म्हणतात. हा जड, स्निग्ध, बलकर, वायूची पीडा दूर करणारा, सर्व धातूंना पुष्टि देणारा व मलनाशक आहे.

आयुष्याचा विचार.

भिषगादौ परीक्षेत रुग्णस्याऽऽयुः प्रयत्नतः।
सत्यायुषि तु विस्तीर्णे चिकित्सा सफला भवेत् ॥ १ ॥

वैद्यानें प्रथम रोग्याच्या आयुष्याची परीक्षा करावी. कारण जर आयुष्य पुष्कळ असेल तर चिकित्सा फलद्रूप होईल.

दीर्घायूचें लक्षण.

सौम्या दृष्टिर्भवेद्यस्य श्रोत्रं त्वक्च तथैव च ।
स्वादुगन्धं विजानाति स साध्यो नात्र संशयः ॥ २ ॥
पाणी पादौ च यस्योष्णौ दाहः स्वल्पतरो भवेत् ।
जिह्वा सुकोमला यस्य स रोगी न विनश्यति ॥ ३ ॥
स्वेदहीनो ज्वरो यस्य श्वासो नासिकया सरेत् ।
कण्ठश्च कफहीनः स्यात्स रोगी जीवति ध्रुवम् ॥ ४ ॥
यस्य निद्रा सुखेन स्याच्छरीरं सोद्यमं भवेत् ।
इन्द्रियाणि प्रसन्नानि स रोगी नैव नश्यति ॥ ५ ॥

ज्याची दृष्टि सौम्य आहे, तसेंच कान व त्वचा हीं सौम्य आहेत आणि ज्याच्या नाकाला सुवास उत्तम प्रकारें कळतो, असा रोगी निश्चयानें साध्य होईल म्हणून समजावें. ज्याच्या हातापायाला उबारा आहे व फार थोडा असा अंगाचा दाह होतो आणि जीभ कोमल आहे तो रोगी दगावत नाहीं. ज्याला स्वेदरहित (घामा-वांचून) ज्वर आहे, श्वासोच्छ्वास नाकानें चालतो आहे व कंठा-मध्यें कफ नाहीं तो रोगी निश्चयानें जगतो. ज्याला सुखानें झोंप येते, शरीराला उद्योगाची हुरूप वाटते, आणि ज्याचीं इंद्रियें प्रसन्न आहेत तो रोगी नाश पावत नाहीं.

स्वल्पायूचीं लक्षणें, कालज्ञान.

अथ कालस्य विज्ञानं प्रवक्ष्यामि यथाश्रुतम् ।
जीवितं मरणं वापि येन जानाति निश्चितम् ॥ १ ॥
कालग्रहस्य यस्येदं दंष्ट्रायाः संयुगे जगत् ।
अद्यैव वा प्रभाते वा सोऽवश्यं भक्षयिष्यति ॥ २ ॥
रसं रसायनं योग्यं कालं ज्ञात्वा समाचरेत् ।
तस्याज्ञाने वृथा सर्वं तस्मात्तत्प्रोच्यते मया ॥ ३ ॥
शरीरशीलयोर्यस्य प्रकृतेर्विकृतिर्भवेत् ।
तदरिष्टं समासेन व्यासतश्च निबोध मे ॥ ४ ॥

ज्याच्या योगानें रोग्याचें जीवित अथवा मरण निश्चयानें जाणतां येईल असें कालज्ञान मीं जसें ऐकिलें आहे तसें सांगतों. ज्या अर्थीं हें सर्व जग काळाच्या दाढेमध्यें आहे, त्या अर्थीं आज नाहीं तर उद्यां केव्हां तरी तो तें अवश्य भक्षण करणार. औष-

धींचे रस किंवा रसायन यांची योजना कालाचें (आयुष्याचें) ज्ञान करून घेऊन करावी. कारण त्याचें जर ज्ञान नसेल तर सर्व व्यर्थ आहे. ह्यासाठीं तें कालज्ञान मी सांगतों. सामान्यतः शरीर व स्वभाव यांमध्यें बदल उत्पन्न झाला, तर त्याला रिष्ट असें म्हणतात. तें मीं संक्षेपानें पूर्वीं सांगितलें आहेच, तें आतां विस्तारानें सांगतों.

शृणोति विविधाञ्शब्दान्विपरीतं शृणोति वा ।
न शृणोति च योऽकस्मात्तं वदन्ति गतायुषम् ॥ ५ ॥
यत्तूष्णमिव गृह्णाति शीतमुष्णं च शीतवत् ।
उष्णगात्रोऽतिमात्रं यो भृशं शीतेन कम्पते ॥ ६ ॥
प्रहारं नैव जानाति यो गच्छेदन्यथाऽपि वा ।
पांशुनेवावकीर्णानि यश्च गात्राणि मन्यते ॥ ७ ॥
वर्णोऽन्यथा वा राज्यो वा यस्य गात्रे भवन्ति हि ।
स्नातानुलिप्तं यं चापि भजन्ते नीलमक्षिकाः ॥ ८ ॥
विपरीतेन गृह्णाति रसान्यश्चोपयोजितान् ।
यो वा रसान्न संवेत्ति तं गतासुं प्रचक्षते ॥ ९ ॥

ज्याला अनेक प्रकारचे नाद ऐकूं येतात किंवा विपरीत शब्द ऐकूं येतात, किंवा ज्याला अकस्मात ऐकूंच येत नाहीं तो गतायुषी समजावा. ज्याला थंड उपचार उष्ण भासतात व उष्ण उपचार थंड भासतात, किंवा ज्याचें अंग अतिशय उष्ण असून थंड उपचारानें अतिशय कांपूं लागतें किंवा ज्याला शरीरावर झालेला आघात कळत नाहीं किंवा जो भलतीकडेच जातो, आपलें शरीर धुळीनें माखलें आहे असें ज्यास वाटतें, ज्याच्या अंगाचा वर्ण बदलला आहे अगर अंगावर रेषा (राजी) दिसत आहेत, स्नान व गंधलेपन केलें असूनही ज्याच्या अंगावर नीलवर्ण माशा फार बसतात, ज्याला मधुरादि रस विपरीत भासतात किंवा त्यांची रुचि मुळींच समजत नाहीं, त्याचें आयुष्य संपलें आहे म्हणून समजावें.

सुगन्धं वेत्ति दुर्गन्धं दुर्गन्धं च सुगन्धवत् ।
गृह्णाति योऽन्यथा गन्धं शान्ते दीपे निरामयः ॥ १० ॥

---

१. ' अष्टविध परीक्षा ' हें प्रकरण पहा.

रात्रौ सूर्यं ज्वलन्तं वा दिवा वा चन्द्रवर्चसम् ।
दिवा ज्योतींषि यश्चापि ज्वलितानीव पश्यति ॥ ११ ॥
विद्युत्वतः सितान्मेघान्गगने निर्घने घनान् ।
विमानयानप्रासादैर्यश्च संकुलमम्बरम् ॥ १२ ॥
यश्चानिलं मूर्तिमन्तमन्तरिक्षेऽवलोकते ।
धूमनीहारवासोभिरावृतां यश्च मेदिनीम् ॥ १३ ॥
प्रदीप्तमिव यो लोकं यो वा प्लुतमिवाम्भसा ।
भूमिमष्टपदाकारां लेखाभिर्यश्च पश्यति ॥ १४ ॥
यो न पश्यति ऋक्षाणि यश्च देवीमरुन्धतीम् ।
ध्रुवमाकाशगङ्गां च तं वदन्ति गतायुषम् ॥ १५ ॥

ज्याला सुगंधी पदार्थांची घाण येते व दुर्गंधी पदार्थ सुवासिक वाटतात, एखाद्या पदार्थाचा वास्तविक जो वास असेल तो न कळतां कांहीं तरी भलताच वास येतो, किंवा दिवा मालविला असतां त्याच्या घाणीनें ज्याला त्रास येत नाहीं, तसेंच ज्याला रात्रीं चंद्र सूर्याप्रमाणें प्रखर भासतो व दिवसा सूर्य चंद्राप्रमाणें सौम्य भासतो, किंवा दिवसा आकाशांत नक्षत्रें पेटत आहेत असें पहातो, तसेंच निरभ्र आकाशामध्यें वीज चकमकलेली पहातो किंवा निरभ्र आकाशांत ज्याला ढग दिसतात, विमानें, वाहनें किंवा मोठमोठे वाडे ह्यांनीं आकाश व्यापलें आहे असें पहातो, आकाशामध्यें वायूला मूर्तिमंत पहातो, धूर, धुकें, किंवा वस्त्र ह्यांच्या योगानें जमीन आच्छादित आहे असें पहातो, सर्व जग पेटत आहे किंवा पाण्यामध्यें बुडत आहे असें पहातो, ज्याला जमीन अष्टपैलू दिसते किंवा तिजवर अनेक रेषा दिसतात, ज्याला नक्षत्रें दिसत नाहींत, अरुंधतीची तारा, आकाशगंगा किंवा ध्रुव हीं ज्याला दिसत नाहींत, त्याचें आयुष्य संपलें आहे म्हणून समजावें.

आदर्शेऽम्बुनि घर्मे वा छायां यश्च न पश्यति ।
पश्यत्येकाङ्गहीनां वा विकृतां वाऽन्यसत्त्वजाम् ॥ १६ ॥
ह्रीभियौ नश्यतो यस्य तेज ओजः स्मृतिः प्रभा ।
अकस्माद्यं भजन्ते वा स परासुरसंशयम् ॥ १७ ॥

आरशामध्यें किंवा पाण्यामध्यें ज्याला प्रतिबिंब दिसत नाहीं, किंवा उन्हांतील आपली छाया दिसत नाहीं, दिसलीच तर त्यांत

एखादा अवयव दिसत नाहीं, विपरीत (फार लहान, फार मोठी वगैरे) किंवा दुसऱ्याच प्राण्याच्या आकाराची दिसते, ज्याची भीति व लाज नाहींशी झालेली असते व ज्याचें ओज, अंगकांति, स्मृति व प्रभा हीं अकस्मात् नाहींशी होतात किंवा अकस्मात् विलक्षण तऱ्हेचीं प्राप्त होतात, त्याचें आयुष्य संपलें म्हणून समजावें.

यस्याधरोष्ठः पतितः क्षिप्तश्चोर्ध्वं तथोत्तरः।
उभौ वा जाम्बवाभासौ दुर्लभं तस्य जीवितम् ॥ १८ ॥

ज्याचा खालचा ओंठ खालीं पडतो व वरचा वर जातो, किंवा दोन्हीही जांभळाप्रमाणें जांभळे होतात, त्याचें जीवित दुर्लभ आहे म्हणून समजावें.

आरक्ता दशना यस्य श्यावा वा स्युः पतन्ति वा।
खञ्जनप्रतिमा वाऽपि तं गतायुषमादिशेत् ॥ १९ ॥

ज्याचे दांत आरक्तवर्ण होतात, काळे होतात, पडतात किंवा चाष पक्ष्याच्या रंगासारखे होतात, त्याचें आयुष्य संपलें आहे म्हणून समजावें.

कृष्णा तथाऽनुलिप्ता च जिह्वा शूना च यस्य वै।
कर्कशा वा भवेद्यस्य सोऽचिराद्विजहात्यसून् ॥ २० ॥

ज्याची जीभ काळी होते, बळसानें लेपटलीशी भासते, सुजून जाड होते व कर्कश (खरखरित) होते, तो लवकरच नाश पावतो.

कुटिला स्फुटिता चापि शुष्का वा यस्य नासिका।
अवस्फूर्जति भग्ना वा स न जीवति मानवः ॥ २१ ॥

ज्याचें नाक वाकडें झालें आहे, फुटलें आहे, कोरडें झालें आहे, अतिशय ताणलें आहे किंवा भेगललें आहे तो मनुष्य जगत नाहीं.

संक्षिप्ते विषमे स्तब्धे रूक्षे स्रस्ते च लोचने।
स्यातां च प्रस्रुते यस्य स गतायुर्नरो ध्रुवम् ॥ २२ ॥

ज्याचे डोळे संकुचित झालेले, विषम, ताठलेले, रूक्ष, गळल्यासारखे किंवा पसरलेले दिसतात, त्याचें आयुष्य संपलें आहे म्हणून समजावें.

केशाः सीमन्तिनो यस्य संक्षिप्ते विनते भ्रुवौ।
लुलन्ति वाऽक्षिपक्ष्माणि सोऽचिराद्याति मृत्यवे ॥ २३ ॥

ज्याच्या भुवया गळल्यासारख्या व संकुचित दिसतात, भुवयांच्या केसांत नवीन भांग पडतात, किंवा डोळ्याच्या पापणीचे केस गळल्यासारखे दिसतात तो लवकरच मृत्युपंथाला जातो.

नाऽऽहरत्यन्नमास्यस्थं न धारयति यः शिरः ।
एकाग्रदृष्टिर्मूढात्मा सद्यः प्राणान्स मुञ्चति ॥ २४ ॥

ज्याला घशांत कांहीं आजार नसतां तोंडांतील घास गिळतां येत नाहीं, ज्याला मान सावरत नाहीं, जो एखाद्या ठिकाणीं एकसारखी दृष्टि लावतो व मूढ होतो (भानहीन होतो), तो तात्काळ प्राणास मुकतो.

उत्थाप्यमानो बहुशः संमोहं योऽधिगच्छति ।
बलवान्दुर्बलो वाऽपि तं पक्कं भिषगादिशेत् ॥ २५ ॥

सशक्त असो किंवा अशक्त असो, निजलेला असून त्याला उठविण्याचा प्रयत्न केला असतां मूर्च्छा येते, तो पक्क झाला आहे (म्हणजे मरणाच्या स्थितीला आला आहे) म्हणून समजावें.

निद्रा निरन्तरं यस्य यो जागर्ति च सर्वदा ।
मुह्येद्वा वक्तुकामश्च प्रत्याख्येयः स जानता ॥ २६ ॥

ज्याला एकसारखी झोंप आहे, किंवा जो एकसारखा जागा आहे म्हणजे ज्याला कधीं झोपच येत नाहीं, तसेंच बोलूं लागलें असतां (तेवढ्या श्रमानें) ज्याला मूर्च्छा येते, तो प्रत्याख्येय (उपचार करण्यास अयोग्य किंवा असाध्य) समजावा.

उत्तरोष्ठं च यो लिह्यात्फूत्कारांश्च करोति यः ।
प्रेतैर्वा भाषते सोऽयं प्रेतरूपं तमादिशेत् ॥ २७ ॥

जो रोगी वरचा ओठ वरचेवर चाटतो व फूत्कार करतो किंवा पिशाच्चांशीं संभाषण करतो, तो प्रेतवत् समजावा.

खेभ्यः सरोमकूपेभ्यो यस्य रक्तं प्रवर्तते ।
पुरुषस्याविषार्तस्य स सद्यो जीवितं त्यजेत् ॥ २८ ॥

ज्याच्या नाकांतून व रोमरंध्रांतून विषविकार नसतांना रक्त येऊं लागतें तो तात्काळ प्राण सोडतो.

सम्यक्चिकित्स्यमानस्य विकारो योऽभिवर्धते ।
प्रक्षीणबलमांसस्य लक्षणं तद्गतायुषः ॥ २९ ॥

यथायोग्य रीतीनें उपचार चालू असतां ज्याचा रोग वाढतच असतो आणि शक्ति व मांस हीं क्षीण होतात, त्याचें आयुष्य संपलें असें समजावें.

भूताः प्रेताः पिशाचाश्च रक्षांसि विविधानि च ।
मरणाभिमुखं जन्तुमुपसर्पन्ति नित्यशः ॥ ३० ॥
तानि भेषजवीर्याणि प्रतिघ्नन्ति जिघांसया ।
तस्मान्मोघाः क्रियाः सर्वा भवन्त्येव गतायुषाम् ॥ ३१ ॥

अनेक प्रकारचीं भूतें, प्रेतें, पिशाचें व राक्षस जो मरणोन्मुख झाला आहे त्याच्यापुढें नित्य येतात. ते त्याला मारण्याच्या हेतूनें औषधांच्या वीर्याचा नाश करितात. त्यामुळें ज्याचें आयुष्य संपलें आहे त्याला केलेले सर्व उपचार व्यर्थ होतात.

योनिसंख्या.

जलजा नवलक्षास्तु दशलक्षास्तु पक्षिणः ।
रुद्रलक्षास्तु क्रिम्याद्याः स्थावराणां च विंशतिः ॥ ३२ ॥
त्रिंशल्लक्षं गवादीनां चतुर्लक्षास्तु मानवाः ।

जलचर प्राण्यांच्या जाती (योनि) नऊ लक्ष, पक्ष्यांच्या दहा लक्ष, क्रिमिकीटकांच्या जाती अकरा लक्ष, स्थावर प्राण्यांच्या (वृक्षादिकांच्या) जाती वीस लक्ष, गाई बैल वगैरे जनावरांच्या जाती तीस लक्ष, आणि मानवांच्या जाती चार लक्ष, मिळून एकंदर चौऱ्यायशी लक्ष योनि आहेत.

शतायुः पुरुषश्चैव वृक्षाणां तु सहस्रकम् ॥ ३३ ॥
द्वात्रिंशच्च तुरंगाणां शतं कुञ्जरसिंहयोः ।
व्याघ्राणां च चतुःषष्टिः सहस्रं फणिकाकयोः ॥ ३४ ॥
जम्बुकानां षोडशाब्दं शुनां द्वादशवत्सरम् ।
चतुर्विंशतिरुक्तं गोमहिष्योः सूकरस्य च ॥ ३५ ॥
अजानां द्वादश प्रोक्तं मत्स्यानामयुतं तथा ।
कुक्कुटा नव वर्षाणि मृगाणां विंशतिर्भवेत् ॥ ३६ ॥
पक्षिणां दश वर्षाणि खराणां द्वादशद्वयम् ।
चतुर्विंशतिरुष्ट्राणां रासभानां तथैव च ॥ ३७ ॥

मनुष्याचें आयुष्य शंभर वर्षें, वृक्षांचें आयुष्य हजार वर्षें, घोड्याचें आयुष्य बत्तीस वर्षें, हत्ती व सिंह ह्यांचें आयुष्य शंभर

वर्षें, वाघाचें आयुष्य चौसष्ट वर्षें, नाग व कावळे ह्यांचें आयुष्य हजार वर्षें, कोल्ह्याचें आयुष्य सोळा वर्षें, कुत्र्याचें आयुष्य बारा वर्षें, गाई म्हशी व डुकरें ह्यांचें आयुष्य चोवीस वर्षें, शेळीचें आयुष्य बारा वर्षें, मत्स्यांचें आयुष्य दहा हजार वर्षें, कोंबड्यांचें आयुष्य नऊ वर्षें, हरिणादि मृगांचें आयुष्य वीस वर्षें, पक्ष्यांचें आयुष्य दहा वर्षें आणि गाढवांचें, उंटांचें आणि खेंचराचें आयुष्य चोवीस चोवीस वर्षें; ह्याप्रमाणें आयुष्य गणना आहे.*

नित्यविधीचा प्रकार.

दिनचर्यां निशाचर्यामृतुचर्यां यथोदिताम् ।
पुरुषः संव्यवहरन्सदा तिष्ठति नान्यथा ॥ १ ॥

दिनचर्या, रात्रिचर्या, व ऋतुचर्या ही जशी सांगितली आहे त्याप्रमाणें वागलें असतां मनुष्य (सुखानें) राहतो; नाहींपेक्षां सुखानें राहात नाहीं (म्हणजे त्याला कांहीं तरी रोग होऊन कष्ट प्राप्त होतात.)

---

* ह्यापुढें आमच्या जवळच्या लेखी प्रतींत पुढील श्लोक आहेत.

शिशुरादंतजननादाशिखं बाल उच्यते ॥
मौंजीबन्धनतः पूर्वं कुमारः कथ्यते खग ॥ १ ॥
मौंज्याभावाच्च शूद्रादेः सप्तमासः शिशुः स्मृतः ॥
ऊनवर्षद्वयो बालः कुमारः पंचवत्सरः ॥ २ ॥
पौगंडो नववर्षः स्यात्किशोरः षोडशाब्दकः ॥
अत ऊर्ध्वं युवा ज्ञेयो मानवो विनतासुत ॥ ३ ॥

जन्मापासून दांत येईपर्यंत मनुष्याला शिशु म्हणतात. दांत आल्यानंतर शेंडी राखेपर्यंत त्याला बाल असें म्हणतात. मौंजीबंधन होईपर्यंत त्याला कुमार म्हणतात, शूद्रांमध्यें व्रतबंध होत नाहीं म्हणून जन्मापासून सात महिने होईपर्यंत त्याला शिशु म्हणतात. दोन वर्षांच्या आंत त्याला बाळ म्हणतात. पांच वर्षांपर्यंत त्याला कुमार म्हणतात. नऊ वर्षांपर्यंत पौगंड म्हणतात. सोळा वर्षांपर्यंत किशोर म्हणतात. आणि सोळा वर्षांपुढें त्याला तरुण म्हणावें. हे विनतासुत म्हणजे गरुडा! ह्याप्रमाणें मनुष्याच्या वयोवस्था आहेत.

निरोगिलक्षण.

समदोषः समाग्निश्च समधातुमलक्रियः ।
प्रसन्नात्मेन्द्रियमनाः स्वस्थ इत्यभिधीयते ॥ २ ॥

ज्याचे दोष समान स्थितींत आहेत, ज्याचा जठराग्नि समान आहे, शरीरांतील रक्तादि धातु सम प्रमाणांत आहेत, मलमूत्रादिकांच्या उत्सर्गाची क्रिया नियमित होत आहे आणि मन, शरीर व इंद्रियें सुप्रसन्न आहेत त्याला स्वस्थप्रकृति म्हणतात.

ब्राह्मे मुहूर्ते बुध्येत स्वस्थो रक्षार्थमायुषः ।
तत्र सर्वाघशान्त्यर्थं स्मरेच्च मधुसूदनम् ॥ ३ ॥
दध्याज्यादर्शसिद्धार्थबिल्वगोरोचनस्रजाम् ।
दर्शनं स्पर्शनं कार्यं प्रबुद्धेन शुभावहम् ॥ ४ ॥
स्वमाननं घृते पश्येद्यदीच्छेच्चिरजीवितम् ।
आयुष्यमुषसि प्रोक्तं मलादीनां विसर्जनम् ।
तदन्त्रकूजनाध्मानोदरगौरववारणम् ॥ ५ ॥

आयुष्याचें रक्षण होण्याकरितां निरोगी मनुष्यानें नित्य पहाटेच्या चार घटिका रात्रीं उठावें. नंतर सर्व पापांचें निरसन होण्याकरितां परमात्मा जो मधुसूदन त्याचें स्मरण करावें, दहीं, मध, तूप, आरसा, पांढरे शिरस, बेल, गोरोचन व पुष्पहार ह्यांचें दर्शन घ्यावें व त्यांना स्पर्श करावा. प्रातःकाळीं निजून उठतांच ह्या सर्व गोष्टी करणें शुभकारक आहे. चिरंजीव (दीर्घायु) होण्याची इच्छा करणारानें प्रातःकाळीं निजून उठतांच पातळ तुपामध्यें आपलें मुख अवलोकन करावें. प्रातःकाळीं मलमूत्रांचा उत्सर्ग (शौचविधि) करणें आयुष्याची वृद्धि करणारें आहे; आणि आंतड्यांतील गुडगुड, पोटफुगी व पोटांतील जाड्य ह्यांचें नाशक आहे.

मलवेगधारणाचीं लक्षणें.

आटोपशूलौ परिकर्तिका च सङ्गः पुरीषस्य तथोर्ध्ववातः ।
पुरीषमास्यादथवा निरेति पुरीषवेगेऽभिहते नरस्य ॥ ६ ॥

पोटांत गुडगुडणें, शूल, गुदद्वारांत कातरल्यासारखी पीडा होणें, मलाचा अवरोध, वाताची ऊर्ध्व गति होणें (ढेंकर येणें), किंवा

वांतीच्या योगानें तोंडावाटे मळ बाहेर पडणें, हे विकार शौचाचा वेग धारण केला असतां होतात.

अधोवायुवेगधारणाचीं लक्षणें.

वातमूत्रपुरीषाणां सङ्गोऽध्मानं क्रमो रुजा ।
जठरे वातजाश्चान्ये रोगाः स्युर्वातनिग्रहात् ॥ ७ ॥

अधोवायु न सरणें, मल व मूत्र ह्यांचा अवरोध, पोट फुगणें, थकवा, पोटांत दुखणें, व पोटामध्यें वातसंबंधीं दुसरे विकार, हीं लक्षणें अधोवायूच्या निग्रहानें होतात.

मूत्रनिग्रहाचें लक्षण.

बस्तिमेहनयोः शूलं मूत्रकृच्छ्रं शिरोरुजा ।
विनामो वंक्षणानाहः स्याल्लिङ्गं मूत्रनिग्रहे ॥ ८ ॥

बस्ति (ओटीपोट), व शिस्न ह्यांमध्यें शूळ, उन्हाळे लागणें (मूत्रकृच्छ्र), डोकें दुखणें, वेदनांमुळें कंबर वाकणें, जांघाडामध्यें जखडल्याप्रमाणें पीडा होणें व पोट फुगणें हीं लक्षणें मूत्राचा वेग आवरून धरल्यामुळें होतात.

न वेगितोऽन्यकार्यः स्यान्न वेगानीरयेद्बलात् ।
कामशोकभयक्रोधान्मनोवेगान्विधारयेत् ॥ ९ ॥

मलमूत्रांचे वेग आले असतां दुसऱ्या उद्योगाला लागूं नये. मलमूत्रादिकांचे वेग मुद्दाम (कुंथून) आणूंही नयेत. कामवासना, शोक, भय, राग, वगैरे मानसिक वेगांचें अवश्य संयमन करावें.

गुदादिमलमार्गाणां शौचं कान्तिबलप्रदम् ।
पावित्र्यकरमायुष्यमलक्ष्मीकलिपापहृत् ॥ १० ॥
प्रक्षालनं हि पाण्योश्च पादयोः शुद्धिकारणम् ।
मलश्रमहरं वृष्यं चक्षुष्यं राक्षसापहम् ॥ ११ ॥

गुद आदिकरून सर्व मलमार्ग वेळच्या वेळीं पाण्यानें धुवून स्वच्छ राखणें हें कांति आणि शक्ति वाढविणारें असून पवित्रता, आयुष्य व लक्ष्मी ह्यांना देणारें आहे. कलिसंबंधीं पापाचें नाशक आहे. तसेंच हात व पाय धुण्यानें मलिनपणा जातो, श्रम परिहार होतात, स्वच्छता वाटते. शिवाय तें डोळ्यांना हितावह असून वृष्य (उत्तेजक) व राक्षसांची पीडा दूर करणारें आहे.

दांत घासण्याचा विधि.

अर्कन्यग्रोधखदिरकरञ्जककुभादिकम् ।
प्रागुदङ्मुखमासीनो निश्चलो मौनवानपि ॥ १२ ॥
मधुको मधुरे श्रेष्ठः करञ्जः कटुके तथा ।
निम्बस्तु तिक्तके श्रेष्ठः कषाये खदिरस्तथा ॥ १३ ॥
समयं तु समालोक्य दोषं च प्रकृतिं तथा ।
यथोचितै रसैर्वीर्यैर्युक्तं द्रव्ये प्रयोजयेत् ॥ १४ ॥
तेनाऽऽस्यरसवैरस्यगन्धजिह्वास्यजा गदाः ।
रुचिवैशद्यलघुता न भवन्ति भवन्ति च ॥ १५ ॥

रुई, वड, खैर, करंज, अर्जुनसादडा, इत्यादि वृक्षांपैकीं आपल्याला योग्य वाटेल त्या वृक्षाची काडी घेऊन पूर्वेकडे किंवा उत्तरेकडे तोंड करून बसून स्थिरपणानें व मौन धारण करून दंतधावन करावें (दांत घासावे). दांत घासण्याला मधुर औषधींपैकीं मधुक (मोहाचें झाड) श्रेष्ठ आहे. तिखट औषधींमध्यें करंज श्रेष्ठ आहे. कडू औषधींमध्यें कडुनिंब श्रेष्ठ आहे. आणि तुरट औषधींमध्यें खैर श्रेष्ठ आहे. दोष व प्रकृति ह्यांचा विचार करून त्याला योग्य अशा रसवीर्यादिकांनीं युक्त अशा द्रव्याची योग्य वेळीं दंतधावनाकरितां योजना करावी. दंतधावनानें (दांत घासण्यानें) तोंडाचा विरसपणा, दुर्गंधी, तोंड व जीभ ह्यांचे रोग हे दूर होऊन जिभेला रुचि येते, तोंड स्वच्छ होतें व हलकेपणा वाटतो.

अर्के वीर्यं वटे दीप्तिः करञ्जे विजयो भवेत् ।
प्लक्षे चैवार्थसंपत्तिर्बदर्यां मधुरो ध्वनिः ॥ १६ ॥
खदिरे मुखसौगन्ध्यं बिल्वे तु विपुलं धनम् ।
उदुम्बरे तु वाक्सिद्धिस्त्वाम्रे त्वारोग्यमेव च ॥ १७ ॥
कदम्बे च धृतिर्मेधा चम्पके दृढवाक्श्रुतिः ।
शिरीषे कीर्तिसौभाग्यमायुरारोग्यमेव च ॥ १८ ॥
अपामार्गे धृतिर्मेधा प्रज्ञा शक्तिस्तथा ध्वनिः ।
दाडिम्यां सुन्दराकारः ककुभे कुटजे तथा ॥ १९ ॥
जातीतगरमन्दारैर्दुःस्वप्नश्च विनश्यति ।

रुईच्या काडीनें दांत घासले असतां वीर्यवृद्धि होते. वडाच्या काडीनें कांति वाढते. करंजाच्या काडीनें विजय प्राप्त होतो. पिंपर-

णीच्या काडीनें द्रव्य व संपत्ति (अनेक प्रकारचे विलासाचे पदार्थ, दागदागिने वगैरे) वाढते. बोरीच्या काडीनें आवाज उत्तम होतो. खैराच्या काडीनें मुख सुगंधित होतें. बेलाच्या काडीनें पुष्कळ द्रव्यप्राप्ति होते. उंबराच्या काडीनें वाचासिद्धि (जें बोलेल तें खरें होणें) होते. आंब्याच्या काडीनें आरोग्यप्राप्ति होते. कळंबाच्या काडीनें वाणी शुद्ध होते व श्रवणेंद्रिय बळकट होतें. शिरसाच्या काडीनें कीर्ति, सौभाग्य, आयुष्य व आरोग्य ह्यांची प्राप्ति होते. आघाडयाच्या काडीनें धारणाशक्ति, बुद्धि, पठणशक्ति व ध्वनि हीं बळकट होतात. डाळिंब, अर्जुनसादडा, व कुडा ह्यांच्या काडीनें सौंदर्य प्राप्त होतें. जाई, तगर, व मंदार ह्यांच्या काडीनें दुःस्वप्नाचा नाश होतो.

भक्षयेद्दन्तधवनं द्वादशांगुलमायतम् ॥ २० ॥
कनिष्ठिकावत्स्थूलं च मृद्वग्रन्थि तथाऽव्रणम् ।
एकैकं घर्षयेद्दन्तं मृदुना कूर्चकेण तु ॥ २१ ॥
दन्तशोधनचूर्णेन दन्तमांसान्यबाधयन् ।
क्षौद्रत्रिकटुकाक्तेन तैलसिन्धुभवेन वा ॥ २२ ॥
चूर्णेन तेजोवत्याश्च दन्तान्नित्यं विशोधयेत् ।

दंतधावनाकरितां जी काडी घ्यावयाची ती बारा बोटें लांब, करंगळीइतकी जाड, मऊ व मध्यंतरीं गांठ किंवा छिद्र नाहीं.अशी असावी ती काडी दांतानें चावून तिचें टोंक कुंच्यासारखें करून त्यानें एक-एक दांत घासावा. नंतर दांत स्वच्छ करण्याचें चूर्ण (दंतमंजन किंवा दांतवण) घेऊन त्यानें सुंठ, मिरीं, पिंपळी ह्यांचें चूर्ण व मध ह्यांच्या मिश्रणानें, तेल व सैंधवानें किंवा मालकांगोणीच्या सालीच्या चूर्णानें दातांवरील मासांला पीडा न होईल अशा बेतानें दांत घासावे.

शिरोरुजार्तस्तृषितः श्रान्तो पानक्लमान्वितः ॥ २३ ॥
अर्दिती कर्णशूली च नेत्ररोगी नवज्वरी ।
वर्जयेद्दन्तकाष्ठं तु हृदामययुतोऽपि च ॥ २४ ॥
न खादेद्गलताल्वोष्ठजिह्वादन्तगदेषु तत् ।
मुखस्य पाके शोथे च श्वासकासवमीषु च ॥ २५ ॥

दुर्बलोऽजीर्णभुक्तश्च हिक्कामूर्छामदान्वितः ।

ज्याचें डोकें दुखत आहे, जो तहानेला आहे, जो थकला आहे, ज्याला मदिरादिकांच्या पानानें ग्लानि (क्लम, कलम) आली आहे, आर्दितवायु, कर्णशूळ, नेत्ररोग, नवज्वर व हृद्रोग हे विकार ज्याला आहेत, त्यानें दंतकाष्ठ भक्षण करूं नये. तसेंच गळा, टाळा (तालु), ओठ, जीभ व दांत ह्यांचे रोग, मुखपाक, सूज, खोकला, श्वास व ओकारी हे विकार ज्याला आहेत, जो अशक्त आहे, ज्याला अजीर्ण झालें आहे, जो जेवला आहे व ज्याला उचकी, मूर्छा व मदात्यय हे रोग आहेत त्यानेंही दंतधावन करूं नये.

जिह्वानिर्लेखनं हैमं राजतं ताम्रजं तथा ॥ २६ ॥
पाटितं मृदु तत्काष्ठं मृदुपत्रमयं तथा ।
दशांगुलं मृदु स्निग्धं तेन जिह्वां लिखेत्सुखम् ॥ २७ ॥
तेनाऽऽस्यमलवैरस्यगन्धा जिह्वास्यदन्तजाः ।
नश्यन्ति रुचिवैशद्यं लघुता च भवन्ति हि ॥ २८ ॥

जीभ घासण्याची पट्टी दहा बोटें लांबीची सोन्याची, रुप्याची तांब्याची किंवा मऊ व गुळगुळीत अशा कापीव लाकडाची करावी. आणि त्यानें जीभ बेताबेतानें घासावी. जीभ घासण्यापासून मुख-संबंधीं मळ, विरसपणा, जीभ, तोंड, व दांत ह्यांची दुर्गंधी हीं नाहींशीं होतात. आणि तोंडाला रुचि, स्वच्छपणा व जिभेला हलकेपणा हे गुण प्राप्त होतात.

गण्डूषमथ कुर्वीत शीतेन पयसा मुहुः ।
कफतृष्णामलहरं मुखान्तःशुद्धिकारणम् ॥ २९ ॥
सुखोष्णोदकगण्डूषः कफारुचिमलापहः ।
दन्तजाड्यहरश्चापि मुखलाघवकारकः ॥ ३० ॥
विषमूर्छामदार्तानां शोषिणां रक्तपित्तिनाम् ।
कुपिताक्षिमलक्षीणरूक्षाणां स न शस्यते ॥ ३१ ॥

थंड पाण्यानें वरचेवर चुळा भरून टाकाव्या. त्या योगानें कफ, तहान व मुखसंबंधीं मळ, हीं नाहींशीं होऊन आंतून मुख शुद्ध होतें. आपल्याला सोसेल अशा ऊन पाण्यानें चुळा भरून टाकल्या असतां कफ, अरुचि व तोंडांतील मळ ह्यांचा नाश होतो, आणि

दांताचें जडत्व जाऊन तोंडाला हलकेपणा येतो. विषबाधा झालेला, मूर्च्छा, मदात्यय, क्षय व रक्तपित्त ह्या विकारानें पीडित, ज्याचे डोळे आले आहेत, जो मलक्षीण आहे व ज्याचें शरीर अथवा कोठा रूक्ष आहे त्यानें चुळा भरण्याचा प्रयोग करूं नये.

मुखप्रक्षालनं शीतपयसा रक्तपित्तजित् ।
मुखस्य पिडकाशोषनीलिकाव्यंगनाशनम् ॥ ३२ ॥
कुर्याद्वाऽपि कदुष्णेन पयसाऽऽस्यविशोधनम् ।
कफवातहरं स्निग्धं मुखशोषविनाशनम् ॥ ३३ ॥

थंड पाण्यानें तोंड धुणें हें रक्तपित्त, तोंडावरील किंवा आंतील पुटकळ्या, शोष, नीलिका (वांगाचा एक भेद) व वांग ह्यांचें नाशक आहे. ऊन पाण्यानें तोंड धुतलें असतां तें विशेषतः मुखशुद्धिकारक, कफवातहारक, स्निग्ध व तोंडाची कोरड दूर करणारें आहे.

नाकांत औषध घालणें.

कटुतैलादि नस्यार्थं नित्याभ्यासेन योजयेत् ।
प्रातः श्लेष्मणि मध्याह्ने पित्ते सायं समीरणे ॥ ३४ ॥
सुगन्धवदनाः स्निग्धनिःस्वना विमलेन्द्रियाः ।
निर्वलीपलितव्यङ्गा भवेयुर्नस्यशीलिनः ॥ ३५ ॥

नस्याचा नित्य अभ्यास ठेवून शिरसेलादिकांची नस्यकर्मांत योजना करावी. कफविकारामध्यें प्रातःकाळीं, पित्तविकारावर माध्यान्हकाळीं व वातविकारावर सायंकाळीं नस्य करावें. नस्यकर्मानें तोंड सुगंधित होतें, स्वर चांगला होतो, इंद्रियें निर्मळ होतात आणि वलीपलित (अंगावर सुरकुत्या पडणें व केस पांढरे होणें) व वांग हे विकार होत नाहींत.

डोळ्यांत औषध घालणें.

सौवीरमञ्जनं नित्यं पथ्यमक्ष्णोस्ततो भजेत् ।
लोचने तेन भवतः सुस्निग्धे घनपक्ष्मणी ॥ ३६ ॥
वक्रे त्रिवेणीविमले मनोज्ञे सूक्ष्मदर्शने ।

---

१. वाग्भट–सूत्रस्थान, अध्याय बावीस, श्लोक १२।१३ पहा. त्यांत गुळण्या करण्यानें नेत्ररोग साध्य होतात असें म्हटलें आहे. हें ह्या विषयाला विरुद्ध दिसतें.

चक्षुस्तेजोमयं तस्य विशेषाच्छ्लेष्मतो भयम् ॥ ३७ ॥
स्रोतोञ्जनमतः श्रेष्ठं विशुद्धं सिन्धुसंभवम् ।
दृष्टेः कण्डूमलहरं दाहक्लेदरुजापहम् ॥ ३८ ॥
अक्ष्णो रूपावहं चैव सहते मारुतातपौ ।
नेत्ररोगा न जायन्ते तस्मादंजनमाचरेत् ॥ ३९ ॥
रात्रौ जागरितः श्रान्तश्छर्दितो भुक्तवांस्तथा ।
ज्वरातुरः शिरःस्नातो नाक्ष्णोरंजनमाचरेत् ॥ ४० ॥

सुरम्याचें अंजन करणें हे डोळ्यांना फार हितावह आहे. म्हणून डोळ्यांत नित्य सुरम्याचें अंजन करावें. त्या योगानें दृष्टि स्निग्ध होते. डोळ्याच्या पापण्या बळकट होतात. डोळे सुंदर दिसतात, व दृष्टि सूक्ष्म होते. डोळे हे तेजोमय आहेत, म्हणून त्यांना विशेषतः कफापासून विकार होण्याची भीति असते. ह्यासाठीं सिंधु नामक पर्वताचे ठिकाणीं सांपडणारा काळा सुरमा शुद्ध करून त्याचें डोळ्यांत अंजन करणें श्रेष्ठ आहे. सुरम्याच्या अंजनानें डोळ्याचा कंडू व मल दूर होतो. डोळ्याची आग, चिकटपणा व ठणका हे विकार नाहींसे होतात. डोळ्याला रूप ग्रहण करण्याची शक्ति येते, आणि वारा व ऊन हीं सहन होतात. आणि नेत्रसंबंधीं विकार केव्हांही होत नाहींत. म्हणून अंजनाचा नित्य अभ्यास ठेवावा. ज्याला रात्रीं जागरण झालें आहे, जो श्रम करून दमला आहे, ज्याला ओकारी झाली आहे, तसेंच ज्यानें जेवण केलें आहे, जो ज्वरानें पीडित आहे आणि ज्यानें डोक्यावरून स्नान केलें आहे त्यानें डोळ्यांत अंजन घालूं नये.

पञ्चरात्रान्नखश्मश्रुकेशरोमाणि कर्तयेत् ।
केशश्मश्रुनखादीनां कर्तव्यं संप्रसाधनम् ॥ ४१ ॥
पौष्टिकं धन्यमायुष्यं शौचकान्तिकरं परम् ।
उत्पाटयेत्तु रोमाणि नासायां न कदाचन ॥ ४२ ॥
तदुत्पाटनतो दृष्टेर्दौर्बल्यं त्वरया भवेत् ।
केशपाशे प्रकुर्वीत प्रसाधन्या प्रसाधनम् ॥ ४३ ॥
केशप्रसाधनं केश्यं रजोजन्तुमलापहम् ।

पांच रात्री गेल्या म्हणजे (पांच दिवसांनीं) नखें काढावीं, मिशा कातराव्या, दाढीचे व डोक्याचे केस काढावे. म्हणजे सौंदर्य, पुष्टि,

धन्यता, आयुष्य, शुचिर्भूतपणा व कांति हीं प्राप्त होतात. नाकांतील केस कधींही उपटूं नयेत. ते उपटले असतां तात्काळ दृष्टीला दौर्बल्य येतें. फणीनें केस विंचरून साफ करावे, केस विंचरणें हें केसांना हितावह असून केसांतील मळ व जंतू ह्यांचें नाशक आहे.

आदर्शालोकनं प्रोक्तं माङ्गल्यं कान्तिकारकम् ॥ ४४ ॥
पौष्टिकं बल्यमायुष्यं पापालक्ष्मीविनाशनम् ।

नित्य आरशांत आपलें रूप पाहणें हें मंगलकारक, कांतिवर्धक, पुष्टिदायक, बलवर्धक, आयुष्यकारक, पाप व दारिद्र्य ह्यांचें नाशक आहे.

व्यायाम.

लाघवं कर्मसामर्थ्यं विभक्तघनगात्रता ॥ ४५ ॥
दोषक्षयोऽग्निवृद्धिश्च व्यायामादुपजायते ।
व्यायामदृढगात्रस्य व्याधिर्नास्ति कदाचन ॥ ४६ ॥
विरुद्धं वाऽविपक्कं वा भुक्तं शीघ्रं विपच्यते ।
भवन्ति शीघ्रं नैतस्य वलीशिथिलतादयः ॥ ४७ ॥
न चैनं सहसाऽऽक्रम्य जरा समधिरोहति ।
न चास्ति सदृशं तेन किंचित्स्थौल्यापकर्षणम् ॥ ४८ ॥
स सदा गुणमाधत्ते बलिनां स्निग्धभोजिनाम् ।
वसन्ते शीतसमये सुतरां स हितो मतः ॥ ४९ ॥
अन्यदाऽपि च कर्तव्यो बलार्धेन यथाबलम् ।
हृदयस्थो यदा वायुर्वक्त्रं शीघ्रं प्रपद्यते ॥ ५० ॥
मुखं च शोषं लभते तद्बलार्धस्य लक्षणम् ।
किंवा ललाटे नासायां गात्रसंधिषु कक्षयोः ॥ ५१ ॥
यदा संजायते स्वेदो बलार्धं तु तदाऽऽदिशेत् ।

व्यायामानें शरीर हलकें होतें. काम करण्यास सामर्थ्य येतें. शरीर बळकट व पिळदार होतें. दोषांचें शमन होऊन अग्नि प्रदीप्त होतो. व्यायामानें (तालीम करून) ज्याचें शरीर बळकट झालें आहे त्याला केव्हांही रोग होत नाहीं. कच्चें अथवा विरुद्ध कसलेंही अन्न त्यानें खाल्लें तरी तें त्याला तेव्हांच पचतें. व्यायाम करणाराला मेद व शरीरशिथिलता हे रोग लवकर होत नाहींत. त्याला सहसा म्हातारपण येत नाहीं. स्थूलत्वाला दूर करणारें व्यायामासारखें दुसरें साधन नाहीं. सशक्ताला व स्निग्ध भोजन करणा रास

व्यायाम हा गुणावहच होतो. हेमंत ऋतूंमध्यें (हिंवाळ्यांत) व वसंत ऋतूमध्यें व्यायाम अवश्य करावा. कारण त्या ऋतूंत तो हितावह होतो. आणि इतर ऋतूमध्यें आपल्या सामर्थ्याच्या निंमे व्यायाम करावा. हृदयस्थ वायु तोंडाकडे लौकर येणें (श्वासोच्छ्वास जलद चालूं लागणें) व तोंड कोरडें होणें हें शक्तीच्या निंमे व्यायाम झाल्याचें लक्षण आहे. किंवा कपाळ, नाक, शरीराचे सांधे व काखा ह्या ठिकाणीं घाम आला म्हणजे सामर्थ्याच्या निंमे व्यायाम झाला म्हणून समजावें.

भुक्तवान्कृतसंभोगः कासी श्वासी कृशः क्षयी ॥ ५२ ॥
रक्तपित्ती क्षती शोषी न तं कुर्यात्कदाचन ।
अतिव्यायामतः कासो ज्वरश्छर्दिर्भ्रमः क्लमः ॥ ५३ ॥
तृष्णा क्षयः प्रतमको रक्तपित्तं च जायते ।

ज्यानें नुकतेंच जेवण केलें आहे, मैथुन केलें आहे, ज्याला खोकला, श्वास, कृशपणा, क्षय, रक्तपित्त, उरःक्षत, किंवा राजयक्ष्मा हे विकार झाले आहेत त्यानें कधींही व्यायाम करूं नये. अति व्यायामापासून खोकला, ज्वर, ओकारी, भ्रम (घेरी), थकवा, तहान, क्षम, प्रतमक श्वास व रक्तपित्त हे विकार होतात.

अंगास तेल लावणें.

अभ्यङ्गमाचरेन्नित्यं सर्वेष्वङ्गेषु पुष्टिदम् ॥ ५४ ॥
शिरःश्रवणपादेषु तं विशेषेण शीलयेत् ।
सार्षपं गन्धतैलं च यत्तैलं पुष्पवासितम् ॥ ५५ ॥
अन्यद्रव्ययुतं तैलं न दुष्यति कदाचन ।
अभ्यङ्गो वातकफहृच्छ्रमशान्तिबलं सुखम् ॥ ५६ ॥
निद्रावर्णमृदुत्वायुः कुरुते दृष्टिपुष्टिकृत् ।
अभ्यंगः शीलितो मूर्ध्नि सकलेन्द्रियतर्पणः ॥ ५७ ॥
दृष्टिपुष्टिकरो हन्ति शिरोभूमिगतान्गदान् ।
केशानां बहुतां दार्ढ्यं मृदुतां दीर्घतां तथा ।
कृष्णतां कुरुते कुर्याच्छिरसः पूर्णतामपि ॥ ५८ ॥

अंगाला तेल मर्दन केलें असतां सर्व शरीराला पुष्टि येते. ह्यासाठीं अंगाला नित्य तेल लावावें. त्यांत विशेषतः मस्तक कान व पाय ह्या ठिकाणीं अवश्य तेल जिरवावें. शिरसाचें तेल, सुगंधी तेल,

सुवासिक फुलांच्या वासानें सुवासित केलेलें तेल किंवा इतर द्रव्यांनीं युक्त असें तेल असलें तरी तें अवगुण करीत नाहीं. अंगाला तेल मर्दन केल्यानें वात, कफ, व श्रम ह्यांचा नाश होतो; आणि शांति, बल व सुख मिळतें. अभ्यंगानें झोंप लागते. अंगाचा वर्ण चांगला होऊन अंग मऊ होतें, दृष्टि चांगली होते. शरीर पुष्ट होतें व आयुष्य वाढतें. मस्तकाला तेल जिरविणें हें सर्व इंद्रियांना समाधानकारक असून दृष्टि चांगली करणारें व शरीर पुष्ट करणारें आहे. त्यानें सर्व प्रकारचे मस्तकरोग नाश पावतात. पुष्कळ केस उत्पन्न होतात. केसांना बळकटी येते. केस मऊ, लांब व काळे होतात, आणि मस्तक बळकट होतें.*

न कर्णरोगा न मलं न च मन्याहनुग्रहः ।
नोच्चैःश्रुतिर्न बाधिर्यं स्यान्नित्यं कर्णपूरणात् ॥ ५९ ॥
रसाद्यैः पूरणं कर्णे भोजनात्प्राक्प्रशस्यते ।
तैलाद्यैः पूरणं कर्णे भास्करेऽस्तमुपागते ॥ ६० ॥

नित्य कानांत तेल घातल्यानें कानासंबंधीं रोग होत नाहींत. कानांत मळ सांठत नाहीं. मन्यास्तंभ व हनुग्रह हे वातसंबंधीं रोग होत नाहींत. दूरचें ऐकूं येतें व बहिरटपणा दूर होतो. वनस्पतींचे रस कानांत घालावयाचे असल्यास ते दिवसा जेवणापूर्वी घालावे. आणि तेल आदिकरून स्निग्ध पदार्थ कानांत घालावयाचे असल्यास ते दिवस मावळल्यावर घालावे.

पादाभ्यङ्गस्तु सुस्थैर्यनिद्रादृष्टिप्रसादकृत् ।
पादसुप्तिभ्रमस्तम्भसंकोचस्फुटनप्रणुत् ॥ ६१ ॥

पायाला तेल मर्दन केलें असतां पायाला बळकटी, झोंप, व दृष्टीला प्रसन्नता हीं प्राप्त होतात. पायांचा बधिरपणा, भ्रम, पाय ताठणें, पाय आखडणें व पाय फुटणें हे विकार दूर होतात.

मूर्ध्नोऽभ्यंगात्कर्णयोः शीतमाहुः कर्णाभ्यङ्गात्पादयोरेवमेव ।
पादाभ्यङ्गो नेत्ररोगान्हरेच्च नेत्राभ्यङ्गाद्दन्तरोगश्च नश्येत् ॥ ६२

* "शिरसः पूर्णतामपि" ह्याचा अर्थ वास्तविक 'मस्तक पूर्ण होतें' असा आहे. 'मस्तक पूर्ण होतें' म्हणजे लहान मुलाची टाळू पोकळ असते ती पूर्ण भरून येते.

व्यायामक्षुण्णवपुषं पद्भ्यां संमर्दितं तथा ।
व्याधयो नोपसर्पन्ति वैनतेयमिवोरगाः ॥ ६३ ॥

मस्तकाला तेल मर्दन केल्यापेक्षां कानांत तेल घालणें शीतळ असून कानांत तेल घालण्यापेक्षांही पायाला तेल जिरविणें अधिक शीतळ आहे; त्या योगानें नेत्ररोग दूर होतात. डोळ्यांत तेल घातल्यानें दांताचे रोग नाहींसे होतात. व्यायामानें ज्याचें शरीर शिणलें आहे त्याच्या पायाला तेल मर्दन केलें असतां गरुडाला पाहून जसे साप दूर पळतात, त्याप्रमाणें त्याच्यापासून सर्व रोग दूर होतात.

रोमकूपशिराजालधमनीभिः कलेवरम् ।
तर्पयेद्बलमाधत्ते स्नेहो युक्तोऽवगाहने ॥ ६४ ॥
अद्भिः संसिक्तमूलानां तरूणां पल्लवादयः ।
वर्धन्ते हि तथा नृणां स्नेहसंसिक्तधातवः ॥ ६५ ॥

तेलामध्यें बुडून राहतां येईल किंवा बसून राहतां येईल अशा तऱ्हेनें तेलाची योजना केली असतां रोमरंध्रें, शिरांचा समुदाय व धमन्या ह्यांच्यासहवर्तमान सर्व शरीराचें संतर्पण होतें, व बल वाढतें. ज्याप्रमाणें मुळांशीं पाणी घातलें असतां पालवी, डाहळ्या वगैरे वाढतात त्याप्रमाणें तेलाच्या योगानें शरीर न्हाऊन निघालें असतां शरीरांतील सर्व धातु वृद्धिंगत होतात.

नवज्वरी ह्यजीर्णी च नाभ्यक्तव्यः कदाचन ।
तथा विरिक्तो वान्तश्च निरूढो यश्च मानवः ॥ ६६ ॥
पूर्वयोः कृच्छ्रता व्याधेरसाध्यत्वमथापि वा ।
शेषाणां बहवः प्रोक्ता वह्निसादादयो गदाः ॥ ६७ ॥

नवज्वर असलेल्या रोग्यानें व अजीर्ण झालेल्या रोग्यानें अभ्यंग (अंगास तेल लावणें) करूं नये. तसेंच ज्याला रेच झाले आहेत किंवा वांत्या झाल्या आहेत, त्यानेंही अभ्यंग करूं नये. कारण नवज्वरी व अजीर्णी ह्यांनीं अभ्यंग केलें असतां त्यांचा तो रोग कष्टसाध्य किंवा असाध्यही होतो. तसेंच रेच किंवा वांत्या झालेल्यानें अभ्यंग केला असतां अग्निमांद्यादि अनेक विकार उत्पन्न होतात.

उद्वर्तनं कफहरं मेदोघ्नं शुक्रदं परम् ।
बल्यं शोणितकृत्कान्तित्वक्प्रसादमृदुत्वकृत् ॥ ६८ ॥

अंगाला सुगंधी द्रव्याची उटी वगैरे लावल्यापासून कफदोषाचा नाश होतो. मेद झडतो. शुक्र व सामर्थ्य वाढतें. रक्तवृद्धि होते. कांति वाढते व त्वचा सुंदर व मृदु होते.

मुखलेपाद् दृढं चक्षुः पीनो गण्डस्तथाऽऽननम्।
कान्तमव्यङ्गपिटकं भवेत्कमलसंनिभम् ॥ ६९ ॥

मुखलेपनानें दृष्टि बळकट होते, गाल पुष्ट होतात; तोंडावरील तारुण्यपीटिका (मोड्या), वांग वगैरे जाऊन तोंड कमळपुष्पाप्रमाणें रमणीय होतें.

आंघोळीचा विधि.

दीपनं वृष्यमायुष्यं स्नानमोजोबलप्रदम्।
कण्डूमलश्रमस्वेदतन्द्रातृड्दाहपापनुत् ॥ ७० ॥
बाह्यैश्च सेकैः शीताद्यैरूष्माऽन्तर्याति पीडितः।
नरस्य स्नातमात्रस्य दीप्यते तेन पावकः ॥ ७१ ॥
प्रातःस्नानमलश्च पापहरणं दुःस्वप्नविध्वंसनं
शौचस्याऽऽयतनं मलापहरणं संवर्धनं तेजसाम्।
रूपद्योतकरं शरीरसुखदं कामाग्निसंदीपनं
स्त्रीणां मन्मथगाहनं श्रमहरं स्नाने दशैते गुणाः ॥७२॥

स्नान करण्यानें अग्नि प्रदीप्त होतो. तसेंच तें वृष्य, आयुष्य-वर्धक व अजब शक्ति वाढविणारें आहे; आणि कंडू, मल, श्रम, घाम, ग्लानि, तहान, दाह व पाप ह्यांचें नाशक आहे. थंड पाण्यानें वगैरे बाहेरच्या बाजूनें शरीरावर सेचन केल्यानें शरीराच्या अंतर्गत असलेली उष्णता आंत दबली जाते. त्यामुळें स्नान केलेल्या मनुष्याचा अग्नि प्रदीप्त होतो. प्रातःस्नान हें मळ व घाण ह्यांचा नाश करतें, दुःस्वप्नाचा दोष घालवितें. हें पवित्रपणाचें एक साधन असून मलनाशक व कांतिवर्धक आहे. रूप तेजःपुंज करणारें शरीराला सुखदायक, कामवर्धक, स्त्रियांच्या कामाची शांति करणारें व श्रमनाशक; असे हे प्रातः स्नानाचे दहा गुण आहेत.

शीतेन पयसा स्नानं रक्तपित्तप्रशान्तिकृत्।
तदेवोष्णेन तोयेन बल्यं वातकफापहम् ॥ ७३ ॥
उष्णाम्बुनाऽधःकायस्य परिषेको बलावहः।
तेनैव चोत्तमाङ्गस्य बलहृत्केशचक्षुषाम् ॥ ७४ ॥

शिरःस्नानमचक्षुष्यमत्युष्णेनाऽम्बुना सदा ।
वातश्लेष्मप्रकोपे तु हितं तच्च प्रकीर्तितम् ॥ ७५ ॥
यः सदाऽऽमलकैः स्नानं करोति स विनिश्चितम् ।
वलीपलितनिर्मुक्तो जीवेद्वर्षशतं नरः ॥ ७६ ॥
अशीतेनाम्भसा स्नानं पयःपानं युवास्त्रियः ।
एतद्धि मानवाः पथ्यं स्निग्धमल्पं च भोजनम् ॥ ७७ ॥

थंड पाण्यानें स्नान केलें असतां रक्तपित्ताचें शमन होतें, किंवा रक्तदोष व पित्तदोष ह्यांचें शमन होतें. तेंच ऊन पाण्यानें केलें असतां बलकारक व वातकफनाशक आहे. ऊन पाण्यानें गळ्याखालीं स्नान करणें बलावह असतें. तेंच ऊन पाण्याचें स्नान डोक्यावरून केलें असतां केस व डोळे ह्यांची शक्ति कमी करतें. अतिशय कढत पाण्यानें डोक्यावरून स्नान करणें डोळ्यांला अपायकारक आहे. तथापि तें वातकफांच्या प्रकोपाला दूर करणारें आहे. जो नित्यनेमानें आवळे किंवा आवळकाठीचें चूर्ण अंगाला लावून स्नान करितो, त्याच्या अंगावर वळ्या पडत नाहींत, केस पांढरे होत नाहींत, व तो पूर्ण शंभर वर्षें वांचतो. नित्य ऊन पाण्यानें स्नान करणें, दूध पिणें, तरुण स्त्रीशीं समागम करणें, आणि स्निग्ध व अल्प भोजन करणें हें हे लोकहो! हितावह आहे.

स्नानं ज्वरेऽतिसारे च नेत्रकर्णानिलार्तिषु ।
आध्मानपीनसाजीर्णभुक्तवत्सु च गर्हितम् ॥ ७८ ॥
स्नानस्यानन्तरं सम्यग्वस्त्रेण तनुमार्जनम् ।
कान्तिप्रदं शरीरस्य कण्डूत्वग्दोषनाशनम् ॥ ७९ ॥

ज्वर, अतिसार, नेत्ररोग, कर्णरोग, पोट फुगणें, पीनस व अजीर्ण विकार ज्याला आहेत व जो जेवलेला आहे त्याला स्नान करणें हितावह नाहीं. स्नान केल्यानंतर वस्त्रानें अंग पुसलें असतां शरीराची कंडू व त्वचेचे रोग दूर होतात व अंगकांति वाढते.

कौशेयं चित्रवस्त्रं च रक्तवस्त्रं तथैव च ।
वातश्लेष्महरं शीतकाले तत्तु विधारयेत् ॥ ८० ॥
मेध्यं सुशीतं पित्तघ्नं काषायं वस्त्रमुच्यते ।
तद्धारयेदुष्णकाले तच्चापि लघु शस्यते ॥ ८१ ॥
शुक्लं तु शुभदं वस्त्रं शीतातपनिवारणम् ।

न चोष्णं न च वा शीतं तच्च वर्षासु धारयेत् ॥ ८२ ॥
यशस्यं काम्यमायुष्यं श्रीदमानन्दवर्धनम् ।
त्वच्यं वशीकरं रुच्यं नवं निर्मलमम्बरम् ॥ ८३ ॥
कदाऽपि न जनैः सद्भिर्धार्यं मलिनमम्बरम् ।
तत्तु कण्डूक्रिमिकरं ग्लान्यलक्ष्मीकरं परम् ॥ ८४ ॥

तांबडें किंवा चित्रविचित्र रंगाचें रेशमी वस्त्र वातकफदोषांचा नाश करितें, म्हणून तें थंडीच्या दिवसांत पांघरण्यास घ्यावें. भगवें वस्त्र बुद्धिवर्धक, शीतळ व पित्तनाशक असतें, म्हणून तें उष्णकाळीं हलकेंसें पाहून धारण करावें. शुभ्रवस्त्र शुभकारक असून थंडी व ऊन ह्या दोहोंचेंही निवारण करितें. तें उष्ण किंवा थंड नसतें, म्हणून तें पावसाळ्यांत पांघरण्यास घ्यावें. नवें व स्वच्छ वस्त्र यशस्वी, काम्यसिद्धिदायक (इच्छिलेलें पूर्ण करणारें), आयुष्यवर्धक, लक्ष्मी व आनंद ह्यांना वाढविणारें, त्वचेला हितावह, वश्यकारक व कांतिप्रद असतें. मळकें वस्त्र जंतुयुक्त असतें. तें अंगावर घेतलें असतां कंडू उत्पन्न करितें, ग्लानि व दारिद्य करणारें असतें, म्हणून तें सज्जनांनीं वापरूं नये.

गंधलेपन.

कुङ्कुमं चन्दनं चापि कृष्णागुरुविमिश्रितम् ।
उष्णं वातकफध्वंसि शीतकाले तदिष्यते ॥ ८५ ॥
चन्दनं घनसारेण वालकेन च मिश्रितम् ।
सुगन्धि परमं शीतमुष्णकाले प्रशस्यते ॥ ८६ ॥
चन्दनं घुसृणोपेतं मृगनाभिसमायुतम् ।
न चोष्णं न च शीतं वा वर्षाकाले तदिष्यते ॥ ८७ ॥
अनुलेपस्तृषामूर्छादुर्गन्धश्रमदाहजित् ।
सौभाग्यतेजस्त्वग्वर्णकान्त्योजोबलवर्धनः ।
स्नानानर्हस्य लोकस्य त्वनुलेपोऽपि नो हितः ॥ ८८ ॥

केशर, चंदन व कृष्णागर ह्यांच्या मिश्रणानें तयार केलेलें गंध उष्ण असून वातकफनाशक आहे. म्हणून तें हिवाळ्यांत प्रशस्त आहे. वाळा आणि कापूर ह्यांच्या मिश्रणानें तयार केलेलें चंदनाचें गंध विशेष सुगंधी असून फार थंड आहे. म्हणून तें उन्हाळ्यांत

लेपन करण्यास प्रशस्त आहे. केशर व कस्तुरी ह्यांनीं मिश्रित चंद-नाचें गंध फार उष्ण किंवा फार थंड नसल्यामुळें पावसाळ्यांत लेपन करण्यास तें प्रशस्त आहे. अंगास गंधलेपन केल्यानें तहान, मूर्च्छा, अंगाची दुर्गंधी, श्रम, व दाह ह्यांची शांति होते. आणि सौभाग्य, तेज, त्वचेचा वर्ण, कांति, ओज व बल हीं वाढतात. ज्यांना स्नान वर्ज म्हणून सांगितलें आहे, त्यांना गंधलेनपही हितकारक नाहीं.

सुगन्धिपुष्पपत्राणां धारणं कान्तिकारणम् ।
पापरक्षोग्रहहरं कामौजःश्रीविवर्धनम् ॥ ८९ ॥

सुवासिक फुलें, पानें इत्यादिकांचे हार, गजरे वगैरे अंगावर धारण केल्यानें अंगकांति उत्तम होते; पाप, राक्षस व ग्रह ह्यांची बाधा दूर होते; काम, ओज व लक्ष्मी ह्यांची वाढ होते.

भूषणैर्भूषयेदंगं यथायोग्यं विधानतः ।
शुचि सौभाग्यसंतोषदायकं काञ्चनं स्मृतम् ॥ ९० ॥
ग्रहदुष्टिहरं पुष्टिकरं दुःस्वप्ननाशनम् ।
पापदौर्भाग्यशमनं रत्नाभरणधारणम् ॥ ९१ ॥

अंगावर यथायोग्य रीतीनें अलंकार धारण करावे. सोन्याचे अलं-कार पवित्रता, सौभाग्य व आनंद देणारे असतात; व रत्नाचे अलं-कार ग्रहदोषनाशक, पुष्टिकारक व दुःस्वप्ननाशक असून पाप व दुर्भाग्य ह्यांचा नाश कारितात.

माणिक्यं तरणेः सुनिर्मलमथो चन्द्रस्य मुक्ताफलं
माहेयस्य च विद्रुमो निगदितः सौम्यस्य गारुत्मतम् ।
देवेज्यस्य च पुष्परागमसुराचार्यस्य वज्रं शने-
र्नीलं निर्मलमन्ययोश्च गदिते गोमेदवैडूर्यके ॥ ९२ ॥
वासःस्रगादिरत्नानां धारणं प्रीतिवर्धनम् ।
रक्षोघ्नमर्थ्यमोजस्यं सौभाग्यकरमुत्तमम् ॥ ९३ ॥

माणिक सूर्याला प्रिय असतें. चंद्राला उत्तम मोतीं, मंगळाला पोवळें, बुधाला पाचरत्न, गुरूला पुष्पराग, शुक्राला हिरा, शनीला नीलमणी, राहूला गोमेद आणि केतूला वैडूर्य रत्न प्रिय असतें. वस्त्र, माळा व रत्नें इत्यादि आंगावर घालणें मनाला आनंद-

दायक असतें. त्यामुळें राक्षसबाधा होत नाहीं; द्रव्य, ओज व सौभाग्य वाढतें.

सततं सिद्धमन्त्रस्य महौषध्यास्तथैव च ।
रोचनासर्षपादीनां मङ्गल्यानां च धारणम् ॥ ९४ ॥
आयुर्लक्ष्मीकरं रक्षोहरं मंगलदं शुभम् ।
हिंस्रादिभयविध्वंसि वशीकरणकारकम् ॥ ९५ ॥
देवगोविप्रवृद्धानां गुरूणां चैव पूजनम् ।
आयुष्यं वृद्धिदं पुण्यमलक्ष्मीकिल्बिषापहम् ॥ ९६ ॥

सिद्धमंत्र, महौषधी, गोरोचन, शिरस, इत्यादि मंगलवस्तु धारण केल्या असतां आयुष्य व लक्ष्मी देणाऱ्या होतात; राक्षसबाधा दूर करितात; मंगलकारक व शुभकारक असतात; हिंसक प्राण्यांची भीति दूर करितात व त्यांना वश करतात. तसेंच देव, गाई व ब्राह्मण ह्यांचें पूजन करणें हें आयुष्याची वृद्धि करणारें, पुण्यकारक, दारिद्र्य व पापनाशक असतें. ह्यासाठीं त्यांचें अवश्य पूजन करावें.

ततो भोजनवेलायां कुर्यान्मंगलदर्शनम् ।
तेषां प्रतिक्षणं नित्यमायुर्धर्मविवर्धनम् ॥ ९७ ॥
लोकेऽस्मिन्मंगलान्यष्टौ ब्राह्मणो गौर्हुताशनः ।
हिरण्यं सर्पिरादित्यः स्त्रियो राजा तथाऽष्टमः ॥ ९८ ॥
पादुकारोहणं कुर्यात्पूर्वं भोजनतः परम् ।
पादरोगहरं वृष्यं चक्षुष्यं चायुषे हितम् ॥ ९९ ॥

त्यानंतर जेवणाच्या वेळीं देखील मंगलकारक पदार्थांचें अवलोकन करावें. क्षणोक्षणीं मंगल पदार्थांचें दर्शन घेणें हें आयुष्य व धर्म ह्यांची वृद्धि करितें. ह्या जगतामध्यें ब्राह्मण, गाय, अग्नि (निर्धूम), सुवर्ण, तूप, सूर्य, स्त्री (सुवासिनी) व राजा हे आठ मंगलकारक आहेत. भोजनाच्या पूर्वीं व नंतर फिरावयाचें असल्यास पादुका घालून फिरावें. पादुकारोहण हें वृष्य (प्रसन्नता उत्पन्न करणारें) नेत्राला हितावह व आयुष्यालाही हितकारक आहे.

स्वाभाविक वांच्छा.

शरीरे जायते नित्यं वाञ्छा नृणां चतुर्विधा ।
बुभुक्षा च पिपासा च सुषुप्सा सुरतस्पृहा ॥ १०० ॥

भोजनेच्छाविघातात्स्यादङ्गमर्दोऽरुचिः श्रमः ।
तन्द्रा लोचनदौर्बल्यं धातुदाहो बलक्षयः ॥ १०१ ॥
विघातेन पिपासायाः शोषः कण्ठास्ययोर्भवेत् ।
श्रवणस्यावरोधश्च रक्तशोषो हृदि व्यथा ॥ १०२ ॥
निद्राविघाततो जृम्भा शिरोलोचनगौरवम् ।
अंगमर्दस्तथा तन्द्रा स्यादन्नापाक एव च ॥ १०३ ॥
बुभुक्षितो न योऽश्नाति तस्याऽऽहारेन्धनक्षयात् ।
मन्दीभवति कामाग्निर्नाग्निर्वर्धेऽग्निरिन्धनः ॥ १०४ ॥
आहारं पचति शिखी दोषानाहारवर्जितः पचति ।
दोषक्षये च धातून्पचति च धातुक्षये प्राणान् ॥ १०५ ॥
आहारः प्रीणनः सद्यो बलकृद्देहधारकः ।
स्मृत्यायुःशक्तिवर्णौजःसत्त्वशोभाविवर्धकः ॥ १०६ ॥
यथोक्तगुणसंपन्नमुपसेवेत भोजनम्
विचार्य देशकालादीन्कालयोरुभयोरपि ॥ १०७ ॥

बुभुक्षा (खाण्याची इच्छा), पिपासा (पाणी पिण्याची इच्छा) सुषुप्सा, (झोंप घेण्याची इच्छा), व सुरतस्पृहा (रति करण्याची इच्छा) ह्या चार प्रकारच्या इच्छा मनुष्याला स्वाभाविक असतात. भोजनाच्या इच्छेचा विघात केला असतां अंग मोडून येणें, अरुचि, श्रम, ग्लानि, दृष्टीला दुर्बळपणा, धातुदाह (जठराग्नीच्या प्रखर-पणामुळें सर्व धातु संतप्त होणें) आणि बलक्षय हे विकार होतात. तहान मारल्यानें तोंडाला व घशाला कोरड पडते, कान गच्च होतात, रक्त आटूं लागतें व हृदयामध्यें दुखूं लागतें. निद्रानाश झाला असतां (जागरण झालें असतां) जांभया येतात, मस्तक व डोळे ह्यांना जडत्व येतें, अंग मोडून येतें, ग्लानि व अन्नाचें अप-चन हे विकार होतात. ज्याप्रमाणें सर्पणावांचून अग्नि पेट घेत नाहीं किंवा वाढत नाहीं त्याप्रमाणें भूक लागली असतां जो खात नाहीं त्याचा जठराग्नि आहाररूप सर्पण न मिळाल्यामुळें न वाढतां उलट मंद होतो. वेळच्या वेळीं आहार केला असतां जठराग्नि हा त्या आहाराचें पचन करितो. आहार न करितां लंघन केलें तर तो जठराग्नि वातादि दोषांना पचवूं लागतो आणि दोषांचें पचन होऊन त्यांचा क्षय झाला असतां तो धातूंना पचवितो; व धातूंचाही

क्षय झाला म्हणजे अखेर प्राणाचाही नाश करितो. आहार हा मनुष्याला (प्राणिमात्राला) तृप्तिदायक असल्यामुळें त्याच्या योगानें तात्काळ बल वाढतें व देहधारण होतें. आहार हा स्मृति, आयुष्य, शक्ति, वर्ण, ओज, प्राण व शोभा ह्यांना वृद्धिंगत करणारा आहे. देशकालांचा विचार करून आपल्या प्रकृतीला यथायोग्य गुणसंपन्न असा आहार दोनप्रहरीं व सायंकाळीं अशा दोनीही वेळीं करावा.

भोजनासंबंधीं देश व काळ.

सायं प्रातर्मनुष्याणामशनं श्रुतिचोदितम् ।
नान्तरा भोजनं कुर्यादग्निहोत्रसमो विधिः ॥ १०८ ॥
याममध्ये न भोक्तव्यं यामयुग्मं न लंघयेत् ।
याममध्ये रसोत्पत्तिर्यामयुग्माद्बलक्षयः ॥ १०९ ॥
क्षुत्संभवति पक्वेषु रसदोषमलेषु च
काले वा यदि वाऽकाले सोऽन्नकाल उदाहृतः ॥ ११० ॥
उद्गारशुद्धिरुत्साहो वेगोत्सर्गो यथोचितः ।
लघुता क्षुत्पिपासा च जीर्णाहारस्य लक्षणम् ॥ १११ ॥

मनुष्यानें दोनप्रहरीं व संध्याकाळीं भोजन करणें हें वेदविहितच आहे. ह्याखेरीज मध्यंतरीं भोजन करूं नये, म्हणजे अग्निहोत्राप्रमाणें हा विधि होतो. एकदां खाल्ल्यानंतर एक प्रहराच्या आंत केव्हांही पुन्हा खाऊं नये व दोनप्रहर होण्याचे आंत पुन्हा आहार केल्यावांचून राहूं नये. जेवल्यापासून एक प्रहरपर्यंत खाल्लेल्या अन्नाचा रस उत्पन्न होत असतो. म्हणून प्रहराचे आंत पुन्हा जेवण करूं नये व दोनप्रहर होऊन गेल्यानंतर जेवलें असतां बलक्षय होतो. अन्नरस, दोष व मल ह्यांचें यथायोग्य पचन झालें असतां भूक लागते. मग ती जेवणाच्या नियमित वेळीं लागो अगर अकालीं लागो, तोच अन्नग्रहणकाल समजावा. शुद्ध ढेकर येणें, हुषारी वाटणें, यथायोग्य मलमूत्रादिकांची प्रवृत्ति होणें, अंग हलकें वाटणें, तहान व भूक लागणें हे आहार जिरल्याचें लक्षण समजावें.

आहारं तु रहः कुर्यान्निर्हारमपि सर्वदा ।
उभाभ्यां लक्ष्म्युपेतः स्यात्प्रकाशे हीयते श्रिया ॥ ११२ ॥

ज्वरितं ज्वरमुक्तं वा दिनान्ते भोजयेल्लघु ।
श्लेष्मक्षये प्रवृद्धोष्मा बलवाननलस्तदा ॥ ११३ ॥
आहारनिर्हारविहारयोगाः सदैव सद्भिर्विजने विधेयाः ।

नेहमीं जेवण हें एकांतस्थळीं करावें. तसेंच शौचविधिही एकांत स्थळींच करावा. दोन्हींही एकांतस्थळीं केल्यापासून मनुष्य लक्ष्मी-युक्त होतो व हीं दोनींही उघड्यावर केलीं असतां लक्ष्मीची हानि होते. जो ज्वरयुक्त आहे अथवा नुकताच ज्वरांतून मोकळा झाला आहे, त्याला दिवस मावळण्याच्या सुमारास भोजन करणें हें हितकारक आहे. कारण त्या वेळीं कफदोष कमी झाल्यामुळें शरीरांत उष्णता वाढून अग्नि बलवान झालेला असतो. आहार, शौचविधि, व विहार (स्त्रीसमागम) हीं तिन्ही कामें ज्या ठिकाणीं दुसरें कोणी मनुष्य नाहीं अशा एकांतस्थळीं सज्जनांनीं करावीं.

हीनदीनक्षुधार्तानां पापपाखण्डरोगिणाम् ।
कुक्कुटादिशुनां दृष्टिर्भोजने नैव शोभना ॥ ११४ ॥
पितृमातृसुहृद्वैद्यपाककृद्धंसबर्हिणाम् ।
सारसस्य चकोरस्य भोजने दृष्टिरुत्तमा ॥ ११५ ॥

नीच कुळांतील मनुष्य, भिकारी, भुकेनें व्याकुळ झालेला, पाप-कर्मी, पाखंडी, रोगी, कोंबडे व कुत्रे ह्यांच्या दृष्टीस भोजनाचें अन्न पडूं देऊं नये. आई, बाप, मित्र, वैद्य, पाक सिद्ध करणारा (आचारी), राजहंस, मोर, सारस पक्षी व चकोर पक्षी ह्यांच्या दृष्टीस भोजनाचें अन्न पडलें असतां उत्तम समजावें.

भोजनादिकाला योग्य भांडें.

दोषहृद्दृष्टिदं पथ्यं हैमं भोजनभाजनम् ।
रौप्यं भवति चक्षुष्यं पित्तहृत्कफवातकृत् ॥ ११६ ॥
कांस्यं बुद्धिप्रदं रुच्यं रक्तपित्तप्रसादनम् ।
पैत्तलं वातकृद्रूक्षमुष्णं क्रिमिकफप्रणुत् ॥ ११७ ॥
आयसे कान्तपात्रे च भोजनं सिद्धिकारकम् ।
शोथपाण्डुहरं बल्यं कामलापहमुत्तमम् ॥ ११८ ॥
शैलजे मृन्मये पात्रे भोजनं श्रीनिवारणम् ।
दारूद्भवे विशेषेण रुचिदं श्लेष्मकृत्तथा ॥ ११९ ॥
पात्रं पत्रमयं रुच्यं दीपनं विषपापनुत् ।

जलपात्रं तु ताम्रस्य तदभावे मृदो हितम् ॥ १२० ॥
पात्रं पवित्रं शीतं च घटितं स्फटिकेन यत् ।
काचेन रचितं तद्वत्तथा वैदूर्यसंभवम् ॥ १२१ ॥

जेवणाला सोन्याचें भांडें घेतलें असतां तें दोषनाशक, दृष्टि उत्तम करणारें व पथ्यकारक होतें. रुप्याचें डोळ्यांना हितावह, पित्तशामक, व कफवातकारक आहे. कांशाचें भांडें बुद्धिदायक, रुचि उत्पन्न करणारें, आणि रक्त व पित्त ह्यांची शुद्धि करणारें असून पित्तकारक, वातकारक, रूक्ष, ऊष्ण, कृमि व कफ ह्यांचें नाशक आहे. लोखंडाचें किंवा कांतलोहाचें (लोहचुंबकाचें) भांडें सिद्धिदायक, सूज व पांडुरोगनाशक, शक्तिवर्धक, व उत्तम प्रकारचें कावीळनाशक आहे. दगडाचें किंवा मातीचें भांडें अलक्ष्मी-कारक आहे. लाकडाचें भांडें विशेषतः रुचि आणणारें व कफकारक आहे. केळी वगैरेंच्या पानांचें केलेलें भांडें रुचिकारक, अग्निदीपक, विषदोष व पापदोष ह्यांचें नाशक आहे. पाणी प्यावयाकारितां तांब्याचें भांडें उत्तम. तें नसेल तर मातीचें भांडें त्या अभावीं घ्यावें. स्फटिकाचें भांडें थंड व पवित्र असतें. तसेंच काचेचें व वैडूर्य नामक रत्नाचें केलेलें भांडें थंड व पवित्र असतें.

भोजनाचा प्रकार.

भोजनाग्रे सदा पथ्यं लवणार्द्रकभक्षणम् ।
अग्निसंदीपकं रुच्यं जिह्वाकण्ठविशोधनम् ॥ १२२ ॥

नेहमीं जेवणापूर्वीं आलें व मीठ भक्षण करणें हितकारक असून तें अग्निदीपक, रुचिकारक आणि जीभ व कंठ ह्यांची शुद्धि करणारें आहे.

दृष्टिदोषनाशक मंत्र.

अन्नं ब्रह्मा रसो विष्णुर्भोक्ता देवो महेश्वरः ।
इति संचिन्त्य यो भुङ्क्ते दृष्टिदोषो न बाधते ॥ १२३ ॥
अञ्जनीगर्भसंभूतं कुमारं ब्रह्मचारिणम् ।
दृष्टिदोषविनाशाय हनूमन्तं स्मराम्यहम् ॥ १२४ ॥

अन्न हें ब्रह्मरूप असून त्याचा रस विष्णुस्वरूप आहे, आणि

अन्नाचा भोक्ता महादेव आहे, अशी भावना मनामध्यें धरून जो भोजन करितो त्याला दृष्टिदोषाची बाधा होत नाहीं. दृष्टि-दोषनाशार्थ अंजनीच्या गर्भामध्यें उत्पन्न झालेल्या बालब्रह्मचारी हनुमंताचें मी स्मरण करितों. (असा मंत्रही म्हणावा.)

अश्नीयात्तन्मना भूत्वा पूर्वं तु मधुरं रसम् ।
मध्येऽम्ललवणौ पश्चात्कटुतिक्तकषायकान् ॥१२५॥

जेवणामध्यें आरंभीं मधुर रसांचे जे पदार्थ (खीर वगैरे) असतील त्यांचें सेवन करावें. मध्यंतरीं आंबट रसाचे पदार्थ खावे; आणि शेवटीं तिखट, कडू, तुरट, अशा पदार्थांचें सेवन करावें. जेवतांना सर्व लक्ष जेवणाकडेच ठेवून जेवण करावें.

फलान्यादौ समश्नीयाद्दाडिमादीनि बुद्धिमान् ।
विना मोचफलं तद्वद्वर्जनीया च कर्कटी ॥ १२६ ॥
मृणालबिसशालूककन्देक्षुप्रभृतीन्यपि ।
पूर्वमेव हि भोज्यानि न तु भुक्त्वा कदाचन ॥ १२७ ॥
प्रियालजम्बूबदरीफलानि गांगेरिकोदुम्बरतित्तिडीकम् ।
तालीफलानागरनारिकेलसारं च भक्ष्यं तिलमिश्रमाम्रम् ॥
अङ्कोलरम्भाफलसामलानां फलानि वर्ज्यानि सदा प्रभाते१२८

केळें व काकडी हीं फळें वर्ज करून प्रथम डाळिंबादि फळें भक्षण करावीं. त्याचप्रमाणें कमळाचीं बिसें, कमळाचा कांदा व ऊंस इत्यादि पदार्थ देखील आधींच खावे; जेवल्यानंतर केव्हांही खाऊं नयेत. चारोळीचें फळ, जांभूळ, बोरें, तोरण, उंबर, चिंच, ताडाचें फळ, पडवळ, नारळांतील खोबरें, तिळमिश्रित भक्ष्य-पदार्थ, आंबा, अंकोलाचें फळ, केळें, फालसा व आंवळा हीं फळें नेहमीं प्रातःकाळीं वर्ज करावीं.

गुरु पिष्टमयं द्रव्यं लड्डुकान्पृथुकानपि ।
न जातु भुक्तवान्खादेन्मात्रां खादेद्बुभुक्षितः ॥ १२९ ॥

जड, पिठाचे पदार्थ, लाडू, पोहे हे पदार्थ जेवल्यानंतर केव्हांही खाऊं नयेत. भूक लागली असतां नियमित प्रमाणांतच खावेत.

घृतपूर्वं समश्नीयात्कठिनं प्राक्ततो मृदु ।
अन्ते पुनर्द्रवाशी तु बलारोग्ये न मुञ्चति ॥ १३० ॥

यद्यत्स्वादुतरं तद्धि विदध्यादुत्तरोत्तरम् ।
भुक्त्वा यत्प्रार्थ्यते भूयस्तदुक्तं स्वादुभोजनम् ॥ १३१ ॥
सौमनस्य बलं पुष्टिमुत्साहं रसनासुखम् ।
स्वादु संजनयत्यन्नमस्वादु च विपर्ययम् ॥ १३२ ॥
अत्युष्णान्नं बलं हन्ति शीतं शुष्कं च दुर्जरम् ।
अतिक्लिन्नं ग्लानिकरं युक्तियुक्तं हि भोजनम् ॥ १३३ ॥

जेवतांना प्रथम कठीण पदार्थ (भाकरी, चपाती वगैरे) तुपाशीं खावे. नंतर मृदु पदार्थ (भात, सांजा वगैरे) खावे. शेवटीं पातळ पदार्थ (खीर वगैरे) खावे. अशा रीतीनें भोजन करणाराला बल व आरोग्य हें केव्हांही सोडून जात नाहीं. जें अन्न आपणास गोड लागतें तेंच अन्न जेवणांत उत्तरोत्तर खावें. जें अन्न पोटभर खाल्लें असूनही पुन्हा हवेंसें वाटतें त्याला गोड अन्न म्हणावें. आपणास गोड लागणारें अन्न खाल्लें असतां मनाला उत्साह, बल, पुष्टि, हुषारी व जिभेला सुख हे गुण होतात. आणि आपणास न आवडणारें अन्न खाल्लें असतां ह्याच्या उलट गुण होतात. अतिशय कढत अन्न खाल्लें असतां बलहानि करतें. थंड झालेलें व शुष्क अन्न लवकर पचन होत नाहीं. अतिशय शिळें होऊन ओलसर झालेलें अन्न ग्लानि आणतें. ह्यासाठीं युक्तीनें योग्य असें भोजन करावें.

मधुराद्वर्धते रक्तमम्लान्मज्जाप्रवर्धनम् ।
लवणाद्वर्धते त्वस्थि तिक्तान्मेदः प्रवर्धते ॥ १३४ ॥
कटुकाद्वर्धते मांसं कषायाद्वर्धते रसः ।
अन्नाच्च वर्धते शुक्रं षड्रसा धातुवर्धनाः ॥ १३५ ॥
अतिद्रुताशिताहारो गुणान्दोषान्न विन्दति ।
भोज्यं शीतमहृद्यं च स्याद्विलम्बितमश्नतः ॥ १३६ ॥

मधुर अन्नानें रक्ताची वृद्धि होते. आंबट अन्नानें मज्जा वाढते. मिठाच्या पदार्थापासून अस्थि (हाडें) वाढतात. कडू पदार्थापासून मेद वाढतो. तिखट पदार्थापासून मांस वाढतें व तुरट पदार्थापासून रस वाढतो. अन्नापासून शुक्र वाढतें. मधुरादि षड्रस हे धातूंची वृद्धि करतात. अति जलद केलेला आहार कांहीं गुणदोष करीत नाहीं. जर फार वेळ जेवत बसलें तर अन्न थंड होऊन आवडेनासें होतें.

मन्दानलो नरो द्रव्यमात्रां गुर्वीं विवर्जयेत् ।
स्वभावतश्च गुरु यत्तथा संस्कारतो गुरु ॥ १३७ ॥
मात्रागुरुस्तु मुद्गादिर्माषादिः प्रकृतेर्गुरुः ।
संस्कारगुरु पिष्टान्नं प्रोक्तमित्युपलक्षणम् ॥ १३८ ॥

जें अन्न स्वभावतः गुरु असतें किंवा जें संस्कारानें जड होतें, असें अन्न मंदाग्नि मनुष्यानें फार खाऊं नये. मूग हे खार खाल्ले असतां पचनाला जड होतात. उडीद हे जातीचेच जड आहेत. पिष्टान्न हें संस्कारानें जड होतें. हें जड द्रव्यांचें सामान्य लक्षण सांगितलें आहे.

आहारं षड्विधं चोष्यं पेयं लेह्यं तथैव च ।
भोज्यं भक्ष्यं तथा चर्व्यं गुरु विद्याद्यथोत्तरम् ॥ १३९ ॥
गुरूणामर्धसौहित्यं लघूनां नातितृप्तता ।
द्रवो द्रवोत्तरश्चापि न मात्रागुरुरिष्यते ॥ १४० ॥
द्रवाढ्यमपि शुष्कं तु सम्यगेवोपपद्यते ।
विशुष्कमन्नमभ्यस्तं न पाकं साधु गच्छति ॥ १४१ ॥
पिण्डीकृतमसंक्लिन्नं विदाहमुपगच्छति ।
शुष्कं विरुद्धं विष्टम्भि वह्निव्यापदमावहेत् ॥ १४२ ॥

पेय, लेह्य, चोष्य, भोज्य, भक्ष्य व चर्व्य असा सहा प्रकारचा आहार आहे. पेय आहारापासून पुढील एकापेक्षां एक जड आहेत. जड आहार भुकेच्या मानानें अर्धा खावा. हलका आहार अतिशय पोट न भरेल अशा बेतानें खावा. पातळ (पेज वगैरे) व अति पातळ (दूध वगैरे) आहार यथेच्छ केला तरी तो जड होत नाहीं. द्रव्यान्न व शुष्कान्न एकत्र करून भक्षण केलें असतां चांगलें पचन होतें. अतिशय शुष्क अन्न चांगलें पचन होत नाहीं. लाडूप्रमाणें गोळा केलेलें कोरडें अन्न विदाह (घशाशीं जळजळ) उत्पन्न करितें. कोरडें अन्न, विरुद्ध अन्न व मलाचा अवरोध करणारें अन्न अग्नीला मंदत्व आणतें.

न भुक्त्वा न रदैश्छित्त्वा न निशायां न वा बहून् ।
न जलान्तारितान्न द्विः सक्तूनद्यान्न केवलान् ॥ १४३ ॥

सत्तू (पीठ) खाणें ते जेवल्याबरोबर दांतांनीं चावून, रात्रीं, पुष्कळ, पाण्यामध्यें मिसळून, किंवा निवळ सत्तूच कधींही खाऊं नयेत.

पुनर्दानं पृथक्पानं सामिषं पयसा निशि ।
दन्तच्छेदनमुष्णं च सप्त सक्तुषु वर्जयेत् ॥ १४४ ॥

जेवण करून पुनः सत्तु किंवा सत्तूचे पदार्थ भक्षण करणें, पाणी व सत्तू वेगवेगळे प्राशन करणें, मांसाबरोबर किंवा दुधा-बरोबर खाणें, रात्रीं भक्षण करणें, दातानें चावून खाणें, किंवा सत्तूचे पदार्थ ऊनऊन आहेत तोंच खाणें हे सात प्रकार सत्तूच्या पदा-र्थाला वर्ज करावे.

बहु स्तोकमकाले वा ज्ञेयं तद्विषमाशनम् ।
आलस्यगौरवाटोपशब्दांश्च कुरुते गदान् ।
हीनमात्रं तनोः कार्श्यं करोति च बलक्षयम् ॥ १४५ ॥
अप्राप्तकाले भुञ्जानो ह्यसमर्थतनुर्नरः ।
तांस्तान्व्याधीनवाप्नोति मरणं चाधिगच्छति ॥ १४६ ॥
कालेऽतीतेऽश्नतो जन्तोर्वायुनाऽपहतेऽनले ।
कृच्छ्राद्विपच्यते भुक्तं न स्याद्भोक्तुं पुनः स्पृहा ॥ १४७ ॥
कुक्षेर्भागद्वयं भोज्यैस्तृतीये वारि पूरयेत् ।
वायोः संचारणार्थाय चतुर्थमवशेषयेत् ॥ १४८ ॥

फार जेवणें, अतिशय कमी जेवणें किंवा अवेळीं जेवणें ह्याला विषमाशन असें म्हणतात. अति जेवणापासून आळस, जडपणा, पोटांत गुडगुड शब्द व अनेक प्रकारचे रोग उत्पन्न होतात. अति-शय कमी जेवण केल्यानें कृशत्व व बलहानि होते. वेळच्या वेळीं न जेवणाऱ्या मनुष्याचें शरीर सामर्थ्यहीन होतें. व त्याला अजीर्ण-विसूचिकादि रोग होऊन कदाचित् मरणही येतें. जेवणाची वेळ टळून गेल्यावर जेवलें असतां वायूच्या योगानें अग्नि मंद होऊन खाल्लेलें अन्न मोठ्या कष्टानें पचतें व पुन्हा खाण्याची वांच्छा होत नाहीं. जेवतांना पोटाचे दोन भाग अन्नानें भरावे, तिसरा पाण्यानें भरावा, व राहिलेला चवथा भाग वायूला संचार करण्याकरितां मोकळा ठेवावा.

रसेनान्नस्य रसना प्रथमे नोपतर्पिता ।
न तथा स्वादुतामेति ततः सेव्याऽम्बुनाऽन्तरा ॥ १४९ ॥
अत्यम्बुपानान्न विपच्यतेऽन्नं निरम्बुपानाच्च स एव दोषः ।

तस्मान्नरो वह्निविवर्धनाय मुहुर्मुहुर्वारि पिबेद्भूरि ॥ १५० ॥
भुक्तस्याऽऽदौ जलं पीतं कार्श्यमन्दाग्निदोषकृत् ।
मध्येऽग्निदीपनं श्रेष्ठमन्ते स्थौल्यकफप्रदम् ।
समस्थूलकृशा भुक्तमध्यान्तप्रथमाम्बुपाः ॥ १५१ ॥
तृषितस्तु न चाश्नीयात्क्षुधितो न पिबेज्जलम् ।
तृषितस्तु भवेद्गुल्मी क्षुधितस्तु जलोदरी ॥ १५२ ॥

प्रथम खाल्लेल्या अन्नाच्या रसानें जीभ तृप्त झाली असल्यामुळें तिला दुसऱ्या पदार्थाची गोडी लागत नाहीं, म्हणून मध्यें पाणी पिऊन रुचीचा पालट करावा. जेवतांना अतिशय पाणी प्यालें असतां अन्नाचें चांगलें पचन होत नाहीं, तसेंच मुळींच पाणी न पिण्यानेंही अन्नाचें पचन होत नाहीं. ह्यासाठीं अग्नि प्रदीप्त होण्याकरितां जेवतांना वरचेवर थोडें पाणी प्यावें. जेवणाचे पूर्वीं पाणी प्यालें असतां तें कृशत्व व अग्निमांद्य करितें. जेवणांत मध्यंतरीं पाणी प्यालें असतां उत्तम, तें अग्नि प्रदीप्त करितें. जेवणाच्या शेवटीं पाणी प्याल्यानें स्थूलपणा व कफ वाढतो. जेवणाच्या मध्यंतरीं पाणी पिणाराचें शरीर कृश किंवा स्थूल न होतां सम स्थितींत राहतें, शेवटीं पिणाराचें स्थूल होतें, आणि आरंभीं पिणाराचें कृश होतें. तहान लागली असतां जेवूं नये व भूक लागली असतां पाणी पिऊं नये. तहान लागली असून आधीं जेवण केलें तर गुल्म रोग होतो; आणि भूक लागली असून आधीं पाणी प्यालें तर जलोदर होतें.

अश्नीयात्तन्मना भूत्वा पूर्वं तु मधुरं रसम् ।
मध्येऽम्ललवणौ पश्चात्कटुतिक्तकषायकान् ॥ १५३ ॥
एवं भुक्त्वा समाचामेच्चूषग्रहणपूर्वकम् ।
भोजने दन्तलग्नानि निर्हृत्याऽऽचमनं चरेत् ॥ १५४ ॥
दन्तान्तरगतं चान्नं शोधनेनाहरेच्छनैः ।
कुर्यादनिर्हृतं तद्धि मुखस्यानिष्टगंधताम् ॥ १५५ ॥
दन्तलग्नमनिर्हार्यं लेपमन्ये तु दन्तवत् ।
न तत्र बहुशः कुर्याद्यत्नं निर्हरणं प्रति ॥ १५६ ॥
आचम्य जलयुक्ताभ्यां पाणिभ्यां चक्षुषी स्पृशेत् ।
भुक्त्वा पाणितले घृष्ट्वा चक्षुषोर्यदि दीयते ॥
जातरोगा विनश्यन्ति तिमिराणि तथैव च ।
भुक्त्वा च संस्मरेन्नित्यमगस्त्यादीन्सुखावहान् ॥ १५७ ॥

जेवतांना सर्व लक्ष जेवणाकडे लावून प्रथम मधुर अन्नाचें सेवन करावें. मध्यंतरीं आंबट, खारट असे पदार्थ खाऊन नंतर तिखट, कडू, तुरट असे पदार्थ खावे. ह्याप्रमाणें भोजन केल्यानंतर आंचवावें (हात व तोंड धुवावें). आंचवितांना चुळा भरून टाकाव्या, व दांतांत अडकलेलें अन्न दांतकोरण्यानें काढून टाकावें. तें काढून टाकलें नाहीं तर तोंडाला दुर्गंधी येते. दांतांत अडकून राहिलेलें किंवा चिकटून राहिलेलें अन्न सहजगत्या न निघेल तर तें दांताप्रमाणेंच समजून काढून टाकण्याकरितां फार प्रयत्न करूं नये. आंचविल्यानंतर ओल्या हातांनीं डोळ्यांला स्पर्श करावा (डोळ्यांवरून हात फिरवावे), म्हणजे डोळ्याचे रोग व तिमिर रोग ह्यांचा नाश होतो. जेवल्यानंतर अगस्त्यादिकांचें सुखदायक स्मरण करावें.

आदौ सूपाज्यभक्तं सकथिकमुदितं पायसं वाऽथ रम्यं
पक्वान्नं मध्यमध्ये बहुविधपललं व्यञ्जनान्यत्र भोज्ये ।
अन्ते दुग्धं सिताढ्यं शृतमतुलरसं सान्नमत्यन्तमिष्टं
दध्यन्नं वा यथेच्छं परिकलितमिदं देशरीत्या विदध्यात् १५८
आदिमध्यावसानेषु भोजने पयसा युते ।
कार्श्यं साम्यं तथा स्थौल्यमिति स्युः क्रमशो गुणाः १५९
आदौ द्रवं समश्नीयात्तत्राम्बु न पिबेद्बहु ।
मध्ये तु कठिने भक्ष्ये यथेष्टं शस्यते जलम् ॥ १६० ॥
तथा च भोजनस्यान्ते पीतमम्बु बलप्रदम् ।
द्रवप्रधानभुक्तान्ते किंतु तन्मात्रया पिबेत् ॥ १६१ ॥

जेवणामध्यें प्रथम वरणभात व तूप कालवून कढीशीं खावा, किंवा उत्तम खीर प्रथम खावी. मध्यंतरीं नानाविध पक्वान्नें, मांसांचे पदार्थ, चटण्याकोशिंबिरी वगैरे अन्य खाण्याचे पदार्थ खावेत. शेवटीं साखर घालून उत्तम शिजवून तयार केलेलें दूध व भात किंवा गोड दहीं व भात खावा. ह्याप्रमाणें ज्या त्या देशरीतीला अनुसरून भोजन करावें. जेवतांना आरंभीं, मध्यें किंवा शेवटीं दुधाशीं अन्न खाल्लें असतां शरीर अनुक्रमें कृश, सम व स्थूल होतें. जेवतांना आधीं द्रवान्न खावें, पण त्यावर फार पाणी पिऊं नये. मध्यंतरीं कठीण भक्ष्य पदार्थ खाऊन यथेच्छ पाणी प्यावें. तसेंच भोज-

नाच्या शेवटीं पाणी प्यालें असतां तें बलप्रद होतें. परंतु जेवतांना द्रवान्न विशेष खाल्लें असतां पाणी फार बेतानें प्यावें.

जेवणानंतर म्हणण्याचा मंत्र.

विष्णुरन्नं तथैवान्नपरिणामश्च वै यथा ।
सत्येन तेन मद्भुक्तं जीर्यत्वन्नमिदं तथा ॥ १६२ ॥
अगस्तिरग्निर्वडवानलश्च भुक्तं ममान्नं जरयन्त्वशेषम् ।
सुखं ममैतत्परिणामसंभवं यच्छत्वरोगं मम चारुदेहम् ॥१६३॥
अङ्गारकमगस्तिं च पावकं सूर्यमश्विनौ ।
यश्चैतान्संस्मरेन्नित्यमन्नं तस्याशु जीर्यति ॥ ६४ ॥
अगस्तिं कुम्भकर्णं च शनिं च वडवानलम् ।
आहारपरिपाकार्थं स्मरामि च वृकोदरम् ॥ १६५ ॥
इत्युच्चार्य स्वहस्तेन परिमार्ज्य तथोदरम् ।
अनायासप्रदायीनि कुर्यात्कर्माण्यतन्द्रितः ॥ १६६ ॥

अन्न हें साक्षात् विष्णुस्वरूप असून त्याचा परिणाम जो अन्नरस तोही विष्णुच आहे हें सत्य आहे; आणि अशा सत्य भावनेनें मीं खाल्लेलें अन्न पचन होवो. अगस्ति व वडवानल नांवाचा अग्नि हें मीं खाल्लेलें सर्व अन्न पचन करोत. आणि त्या अन्नाचें पचन झाल्यानंतर उत्पन्न होणारा अन्नरस मला सुख, आरोग्य आणि सुंदर देह देवो. अंगारक (मंगळ), अगस्ति, पावक (अग्नि), सूर्य व अश्विनीकुमार ह्यांचें नित्य जेवण झाल्यावर जो स्मरण करितो त्याचें अन्न लवकर जिरतें. अगस्ति, कुंभकर्ण, वडवाग्नि, शनि आणि वृकोदर (भीम) ह्यांचें अन्न पचन होण्याकरितां मी स्मरण करितों. ह्याप्रमाणें मंत्र म्हणून पोटावरून हात फिरवावा. नंतर ज्यापासून आयास होणार नाहींत अशीं कामें सावधगिरीनें करावीं.

धूमतांबूलभक्षण.

जीर्णेऽन्ने वर्धते वायुर्विदग्धे पित्तमेधते ।
भुक्तमात्रे कफश्चापि क्रमोऽयं भोजनोपरि ॥ १६७ ॥
धूमेनापोह्य हृद्यैर्वा कटुतिक्तकषायकैः ।
पूगकर्पूरकस्तूरीलवङ्गसुमनःफलैः ॥ १६८ ॥
फलैः कटुकषायैर्वा मुखवैशद्यकारिभिः ।
ताम्बूलपत्रसहितैः सुगन्धैर्वा विचक्षणः ॥ १६९ ॥

अन्न जिरलें म्हणजे वायु वाढतो, जिरत असतां पित्त वाढतें व जेवल्याबरोबर कफ वाढतो; हा जेवणानंतर दोषवृद्धीचा क्रम समजावा. ह्यासाठीं सुगंधी द्रव्यांच्या धूम्रपानानें (तमाखूच्या नव्हे) किंवा सुपारी, कापूर, कस्तुरी, लवंग, जायफळ इत्यादिकांनीं किंवा तिखट, तुरट अशा तोंड स्वच्छ करणाऱ्या फळांनीं किंवा सुगंधी द्रव्यानें युक्त अशा विड्याच्या पानांनीं भोजनोत्तर वाढणाऱ्या कफास जिंकावें.

रते सुप्तोत्थिते स्नाते भुक्ते वान्ते च संगरे ।
सभायां विदुषां राज्ञां कुर्यात्ताम्बूलचर्वणम् ॥ १७० ॥
प्रत्युषसि भुक्तसमये युवतीनां च संगमे विरमे ।
विद्वद्राजसभायां ताम्बूलं यो न खादयेत्स पशुः ॥ १७१ ॥

संभोगसमयीं, निजून उठल्यावर, स्नान केल्यावर, जेवल्यावर, वमनानंतर, युद्धाच्या वेळीं, विद्वानांच्या आणि राजांच्या सभेमध्यें तांबूल भक्षण करावा. प्रातःकाळीं, जेवल्यावर, रतिसमयाचे पूर्वीं व नंतर, विद्वान मंडळींच्या सभेंत व राजसभेंत जो तांबूल भक्षण करीत नाहीं तो पशु समजावा.

ताम्बूलं कटुतिक्तमुष्णमधुरं क्षारं कषायान्वितं
वातघ्नं क्रिमिनाशनं कफहरं दुर्गन्धिनिर्णाशनम् ।
वक्त्रस्याऽऽभरणं विशुद्धिकरणं कामाग्निसंदीपनं
ताम्बूलस्य सखे त्रयोदश गुणाः स्वर्गेऽपि ते दुर्लभाः ॥ १७२
ताम्बूलमुक्तं तीक्ष्णोष्णं रोचनं तुवरं सरम् ।
तिक्तं क्षारोषणं कामरक्तपित्तकरं लघु ॥ १७३ ॥
वश्यं श्लेष्मास्यदौर्गन्ध्यमलवातश्रमापहम् ।
मुखवैशद्यसौगन्ध्यकान्तिसौष्ठवकारकम् ॥ १७४ ॥
तच्च दन्तमलध्वंसि जिह्वेन्द्रियविशोधनम् ।
मुखप्रसेकशमनं गलामयविनाशनम् ॥ १७५ ॥

तांबूल (विडा) हा कडू, तिखट, मधुर, उष्ण, खारट, तुरट वातनाशक, कृमिनाशक, कफनाशक, मुखदुर्गंधीनाशक, मुखशोभाकारक, तोंड स्वच्छ करणारा व कामोत्तेजक असून हे त्याचे त्रयोदश (तेरा) गुण स्वर्गामध्यें देखील दुर्लभ आहेत. विडा हा तीक्ष्ण, उष्ण, रुचिकारक, तुरट, सारक, कडू, खारट, तिखट, कामवर्धक,

रक्तपित्ताला वाढविणारा, हलका, वश्यकारक आणि कफ, तोंडाची दुर्गंधी व मळ, वात आणि श्रम ह्यांचा नाशक आहे. त्याचप्रमाणें तोंड स्वच्छ व सुगंधित करणारा, उत्तम कांतिकारक, दातांच्या मलाचा नाश करणारा, जीभ स्वच्छ करणारा, तोंडाला पाणी सुटण्याचें बंद करणारा व कंठासंबंधीं रोगांचा नाशक आहे.

नवं तदेव मधुरं कषायानुरसं गुरु ।
बलासजननं प्रायः पत्रशाकगुणं स्मृतम् ॥ १७६ ॥
वङ्गदेशोद्भवं पर्णं परं कटुरसं सरम् ।
पाचनं पित्तजनकमुष्णं कफहरं मतम् ॥ १७७ ॥
पर्णं पुराणमकटु क्षुल्लकं तनु पाण्डुरम् ।
विशेषाद्गुणवद्धेयमन्यद्धीनगुणं मतम् ॥ १७८ ॥

विड्याचें ताजें पान मधुर किंचित् तुरट, जड, कफकारक आणि बहुतेक पत्रशाखाप्रमाणें गुणकारक आहे म्हणून समजावें. बंगाल प्रांतामध्यें होणारीं पानें अतिशय तिखट व सारक असून पाचक, पित्तकारक, उष्ण व कफनाशक असतात. जून पिकलेलीं विड्यांचीं पानें तिखट नसणारीं, हलकीं, विस्तृत, पांढुरक्या रंगाचीं व विशेषतः गुणकारक असतात. ह्याखेरीज इतर गुणहीन समजावीं.

पूगं गुरु हिमं रूक्षं कषायं कफपित्तनुत् ।
मोहनं दीपनं रुच्यमास्यवैरस्यनाशनम् ॥ १७९ ॥
पूगं स्याद्दृढमध्यं यत्खिन्नं चापि त्रिदोषनुत् ।
सरसं गुर्वभिष्यन्दि तद्भृशं वह्निनाशनम् ॥ १८० ॥

सुपारी थंड, जड, रूक्ष, तुरट, कफपित्तनाशक, मूर्छाकारक, अग्निदीपक, रुचिकारक व तोंडाचा बेचवपणा दूर करणारी आहे. जी सुपारी कठीण, मध्यम व शिजविलेली असते, ती त्रिदोषनाशक असते. ओली सुपारी, जड, स्रावी व अत्यंत अग्निमांद्यकर असते.

खदिरः कफपित्तघ्नश्चूर्णं वातबलासनुत् ।
संयोगतस्त्रिदोषघ्नं सौमनस्यं करोति च ॥ १८१ ॥

कात कफपित्तनाशक आहे; आणि चुना वात व कफ यांचा नाशक आहे; यांचा संयोग त्रिदोषनाशक असून मन सुप्रसन्न करतो.

पूगाधिकं प्रभाते स्यान्मध्याह्ने खादिराधिकम् ।
चूर्णाधिकं निशायां तु ताम्बूलं भक्षयेत्सदा ॥ १८२ ॥

पर्णमूले भवेद्व्याधिः पर्णाग्रे पापसंभवः ।
तस्मादग्रं तथा मूलं मध्यं पर्णस्य वर्जयेत् ॥ १८३ ॥
चूर्णपत्रं हरत्यायुः शिरा बुद्धिविनाशिनी ।
आयुरग्रे यशो मूले लक्ष्मीर्मध्ये व्यवस्थिता ॥ १८४ ॥
आद्यं विषोपमं पीतं द्वितीयं मेहि दुर्जरम् ।
तृतीयादि तु पातव्यं सुधातुल्यं रसायनम् ॥ १८५ ॥

सकाळीं सुपारी अधिक घालून, दोनप्रहरीं कात अधिक घालून व रात्रीं चुना अधिक घालून नेहमीं विडा खावा. पानाचा देंठ भक्षण केला असतां व्याधि उत्पन्न होतात. पानाचा शेंडा पाप कारक आहे. ह्यासाठीं पानाचें मूळ (देंठ) व शेंडा काढून टाकावा. पान चुरून खाण्यानें आयुष्याचा नाश होतो. शिरा बुद्धिनाशक आहेत. पानाच्या अग्रभागीं आयुष्य, मूळाकडे यश व मध्यें लक्ष्मी वास करिते. विड्याचा प्रथम येणारा रस गिळला असतां तो विष-तुल्य असतो; दुसरे वेळीं येणारा रस जिरण्यास कठीण असून प्रमेहकारक असतो. तिसऱ्या वेळीं व त्यापुढें निघणारा रस अमृत-तुल्य असतो; तो गिळावा.

आलस्यविद्रध्युपजिह्विकानां सतालुदन्तार्बुदरोगिणां च ।
गलास्यगण्डापचितालुशोषश्लेष्मामयानां तदतिप्रशस्तम् १८६
न नेत्रकोपे न च रक्तपित्ते क्षते न दाहे न विषे न शोषे ।
मदात्यये नापि न मोहमूर्छाश्वासेषु ताम्बूलमुशन्ति वैद्याः १८७
ताम्बूलं नातिसेवेत विरिक्तो न बुभुक्षितः ।
देहदृक्केशदन्ताग्निश्रोत्रवर्णबलक्षयः ॥ १८८ ॥
शोषपित्तानिलास्रं स्याददतिताम्बूलभक्षणात् ।
ताम्बूलं न हितं दन्तदुर्बलेक्षणरोगिणाम् ।
विषमूर्छामदार्तानां क्षतिनां रक्तपित्तिनाम् ॥ १८८ ॥

आळस, विद्रधि (करट), उपजिव्हक (जिभेचा रोग), टाळ्यांचे रोग, दांताचे रोग, अर्बुद रोग, गलरोग, मुखसंबंधी रोग, गंड-माला, अपची, टाळ्यांची कोरड व कफरोग ह्यांना विडा फार प्रशस्त आहे. नेत्रविकार, रक्तपित्त, व्रण किंवा उरःक्षत, दाह, विष, राजयक्ष्मा, मदात्यय, मोह, मूर्च्छा व श्वास ह्या विकारांमध्यें विडा खाणें वैद्यांना पसंत नाहीं. ज्याला रेच झाले आहेत व

जो भुकेलेला आहे त्यानें विडा अतिशय खाऊं नये. अति विडा खाण्यानें देह, दृष्टि, केस, दांत, जठराग्नि, कान, शरीराचा वर्ण व बल ह्यांचा नाश होतो. शिवाय तोंडाला कोरड, रक्तपित्त व वात-रक्त हे रोग होतात. ज्याचे दांत दुर्बळ आहेत (बळकट नाहींत), ज्याला डोळ्याचा आजार आहे, तसेंच विषबाधा, मूर्च्छा, मदात्यय, उरःक्षत व रक्तपित्त हे रोग ज्यांना आहेत त्यांना विडा पथ्य-कारक नाहीं.

शतपावली वगैरे.

भुक्त्वा शतपदं गच्छेच्छनैस्तेन तु जायते ।
अन्नसंघातशैथिल्यं ग्रीवाजानुकटीसुखम् ॥ १९० ॥
भुक्त्वोपविशतस्तुन्दं शयानस्य बलं भवेत् ।
आयुश्चंक्रममाणस्य मृत्युर्धावति धावतः ॥ १९१ ॥
श्वासानष्टौ समुत्तानस्तान्द्विः पार्श्वे तु दक्षिणे ।
ततस्तद्विगुणान्वामे पश्चात्स्वप्याद्यथासुखम् ॥ १९२ ॥
वामदिशायामनलो नाभेरूर्ध्वोऽस्ति जन्तूनाम् ।
तस्मात्तु वामपार्श्वे शयीत भुक्तप्रपाकार्थम् ॥ १९३ ॥

जेवण झाल्यानंतर सावकासपणें शतपावली करावी. त्यामुळें अन्नाच्या संचयाला शिथिलपणा येतो; आणि मान, गुढगे आणि कंबर ह्यांना सुख होतें. जेवण केल्यावर स्वस्थ बसलें असतां दोंद वाढतें. निजलें असतां बल वाढतें. चाललें असतां आयुष्य वाढतें आणि धावलें असतां मृत्यु आपल्याकडे धाव घेतो (आयुष्य क्षीण होतें). शतपावली केल्यावर निजते वेळीं प्रथम उताणें निजून आठ श्वासोच्छास घ्यावे. नंतर उजव्या कुशीवर वळून सोळा व डाव्या कुशीवर निजून बत्तीस श्वासोश्वास घेऊन नंतर आपल्याला सुखावह होईल तसें निजावें. बेंबीच्या वर डाव्या बाजूस जठराग्नीचें स्थान आहे. ह्यासाठीं खाल्लेल्या अन्नाचें पचन होण्याकरितां डाव्या कुशीवर निजावें.

त्रिदोषशमनी खट्वा तूली वातकफापहा ।
भूशय्या बृंहणी वृष्या काष्ठपट्टी तु वातला ॥ १९४ ॥
भूशय्या वातलाऽतीव रूक्षा पित्तास्रनाशिनी ।

सुशय्याशयनं हृद्यं पुष्टिनिद्राधृतिप्रदम् ॥ १९५ ॥
श्रमानिलहरं वृष्यं विपरीतमतोऽन्यथा ।
संवाहनं मांसरक्तत्वक्प्रसादकरं परम् ॥ १९६ ॥
प्रीतिनिद्राकरं वृष्यं कफवातश्रमापहम् ।

खाट ही त्रिदोषनाषक असून गादी वात व कफ यांची नाशक आहे. भूमीवर निजणें पौष्टिक व वृष्य आहे. लाकडाच्या फळीवर निजणें वातकारक आहे. भूमीवर निजणें अतिशय वातकारक, रूक्ष व रक्तपित्तनाशक आहे. उत्तम शय्येवर निजणें प्रियकर व पौष्टिक असून झोंप व धैर्य किंवा धारणाशक्ति ह्यांना देतें, श्रम आणि वात ह्यांचा नाश करितें आणि कामोत्तेजक होतें. हीन शय्या गुणांनीं ह्याच्या उलट आहे. अंग रगडणें हें मांस, रक्त व त्वचा ह्यांचें प्रसादन (शुद्धि) करणारें, प्रीति, निद्रा व काम ह्यांना वाढविणारें व श्रम, वात व कफ यांचें नाशक आहे.

प्रवातं रौक्ष्यवैवर्ण्यस्तम्भकृद्दाहपित्तनुत् ॥ १९७ ॥
स्वेदमूर्छापिपासाघ्नमप्रवातमतोऽन्यथा ।
सुखं प्रवातं सेवेत ग्रीष्मे शरदि चोत्तरम् ॥ १९८ ॥
निर्वातमायुषे सेव्यमारोग्यं यत्र सर्वदा ।
पूर्वोऽनिलो गुरुः सोष्णः स्निग्धः पित्तास्रदूषकः ॥१९९॥
विदाही वातलः शान्तिकफशोषवतां हितः ।
स्वादुः पटुरभिष्यन्दी त्वग्दोषार्शोविषक्रिमीन् ॥ २०० ॥
संनिपातज्वरश्वासमामवातं प्रकोपयेत् ।
दक्षिणः पवनः स्वादुः पित्तरक्तहरो लघुः ॥ २०१ ॥
वीर्येण शीतलो बल्यश्चक्षुष्यो न च वातलः ।
पश्चिमः पवनस्तीक्ष्णः शोषणो बलहृल्लघुः ॥ २०२ ॥
मेदःपित्तकफध्वंसी प्रभञ्जनविवर्धनः ।
उत्तरो मारुतः शीतः स्निग्धो दोषप्रकोपकृत् ॥ २०३ ॥
क्लेदनः प्रकृतिस्थानबलदो मधुरो लघुः ।
आग्नेयो दाहकृद्रूक्षो नैर्ऋतो न विदाहकृत् ॥ २०४ ॥
वायव्यस्तु भवेत्तिक्त ऐशानः कटुकः स्मृतः ।
विष्वग्वायुरनायुष्यः प्राणिनां बहुरोगकृत् ॥ २०५ ॥
अतस्तं नैव सेवेत सेवितः स्यान्न शर्मणे ।
व्यजनस्यानिलो दाहस्वेदमूर्छाश्रमापहः ॥ २०६ ॥

तालवृन्तभवो वातस्त्रिदोषशमनो मतः ।
वंशव्यजनजस्तूष्णो रक्तपित्तप्रकोपनः ॥ २०७ ॥
चामरो वस्त्रसंभूतो मायूरो वेत्रजस्तथा ।
एते दोषजितो वाताः स्निग्धा हृद्याः सुपूजिताः ॥ २०८ ॥

निजल्यावर वारा घेणें रूक्ष, विवर्णता-(अंगाचा रंग बदलणें) कारक, स्तंभक (अंग ताठविणारें), दाह व पित्त ह्यांचें नाशक, घाम, मूर्च्छा व तहान ह्यांना दूर करणारें आहे. निर्वात स्थळीं निजणें हें गुणांनीं ह्याच्या उलट आहे. ग्रीष्म व शरद् ऋतूंमध्यें उत्तरेकडील वारा सुख होईल अशा बेतानें घ्यावा. सर्वदा निर्वात स्थळीं निजणें आयुष्य व आरोग्य करणारें आहे. पूर्वेकडील[1] वारा जड, उष्ण, स्निग्ध, पित्त व रक्त ह्यांना दूषित करणारा, विदाही, वातकारक, श्रम करून शिणलेले, कफरोगी व तान्हेले ह्यांना हितकर, गोड, क्षारयुक्त (खारट), स्रावी[2], त्वचेचे विकार, मूळव्याध, विषकृमि, सन्निपात ज्वर व आमवात ह्यांला कोपवितो. दक्षिणेकडील वारा गोड, रक्तपित्त-नाशक, हलका, शीतवीर्य, बलकर, नेत्रांना हितावह व वात न कर-णारा आहे. पश्चिमेकडील वारा तीक्ष्ण, शोषक[3], बलनाशक, हलका, मेद, पित्त व कफनाशक व वात वाढविणारा आहे. उत्तरेकडील वारा थंड, स्निग्ध, दोषांचा प्रकोप करणारा, कफकारक, प्रकृतिस्थ (वातप्रकृतीचे) जे त्यांना बलकारक, मधुर व हलका आहे. आग्नेयीकडील वारा दाहकारक व रूक्ष असून नैऋत्येकडील वारा विदाहकारक नाहीं. वायव्येकडील वायु कडवट असून ईशान्येकडील तिखट आहे. सर्व बाजूनें येणारा वायु आयुष्याचा नाशक असून अनेक प्रकारचे रोग उत्पन्न करणारा आहे. ह्यासाठीं अशा वाऱ्यांत

---

१. पूर्वेकडील वारा (ढासा वारा) रूक्ष असल्याचा अनुभव येतो. हा कार्तिक मार्गशीर्ष महिन्यांत सुटतो. त्यामुळें अंग फुटतें. ह्यावरून त्याचें रूक्षत्व सिद्ध होतें.

२. स्रावी (अभिष्यंदि) हा गुण इकडे पश्चिमेकडील वाऱ्यांत अनु-भवास येतो. कारण पश्चिमेकडील वाऱ्यानें विहिरींचे पाझर वाढतात, असें अनुभवास येतें.

३. शोषक हा गुण इकडे पूर्वेकडील वाऱ्यांत अनुभवास येतो.

जाऊं नये. हा वारा घेतला असतां सुखावह होत नाहीं. पंख्याचा वारा दाह, घाम, मूर्च्छा व श्रम ह्यांचा नाशक आहे. ताडाच्या पंख्याचा वारा त्रिदोषशामक आहे. कळकाच्या पंख्याचा वारा उष्ण व रक्तपित्त ह्यांचा प्रकोप करतो. चवरी, वस्त्र, मयूरपिच्छ (मोरचेल) व वेताचे पंखे ह्यांचे वारे दोषनाशक, स्निग्ध, प्रिय (हृद्य) व पूज्य (श्रेष्ठ मानलेले) असे आहेत.

दिवास्वापं न कुर्वीत यतोऽसौ स्यात्कफावहः।
ग्रीष्मवर्जेषु कालेषु दिवास्वापो निषिध्यते ॥ २०९ ॥
उचितो हि दिवास्वापो नित्यं तेषां शरीरिणाम्।
वातादयः प्रकुप्यन्ति येषामस्वपतां दिवा ॥ २१० ॥
भोजनात्प्राग्दिवास्वापः पाषाणमपि जीर्यति।
भोजनान्ते दिवास्वापाद्वातपित्तकफोद्भवः ॥ २११ ॥

व्यायामप्रमदाध्ववाहनरतान्क्लान्तानतीसारिणः
शूलश्वासवतस्तृषापरिगतान्हिक्कामरुत्पीडितान्।
क्षीणान्क्षीणकफाञ्शिशून्मदहतान्वृद्धान्रसाजीर्णिनो
रात्रौ जागरितान्नरान्निरशनान्कामं दिवा स्वापयेत् ॥२१२॥

दिवा वा यदि वा रात्रौ निद्रा सात्मीकृता तु यैः।
न तेषां स्वपतां दोषो जाग्रतां चोपजायते ॥ २१३ ॥
भोजनानन्तरं निद्रा वातं हरति पित्तहृत्।
कफं करोति वपुषः पुष्टिं सौख्यं तनोति हि ॥ २१४ ॥
शयनं पित्तनाशाय वातनाशाय मर्दनम्।
वमनं कफनाशाय ज्वरनाशाय लंघनम् ॥ २१५ ॥
शब्दान्स्पर्शांश्च रूपाणि रसान्गंन्धान्मनःप्रियान्।
भुक्तवानपि सेवेत तेनान्नं साधु तिष्ठति ॥ २१६ ॥

ज्याअर्थी दिवसा झोंप घेतली असतां कफाची वाढ होते, त्याअर्थी दिवसा झोंप घेऊं नये. ग्रीष्मऋतु खेरीज करून इतर ऋतूंमध्यें दिवसा निजूं नये. दिवसा झोंप घेतली नाहीं तर ज्यांचे वातादि दोष प्रकुपित होतात त्यांनीं नित्य दिवसा निजणें हें उचित आहे. जेवणापूर्वीं दिवसा झोंप घेतली असतां पाषाणाचें देखील पचन होतें. जेवणानंतर दिवसा निजलें असतां वात पित्त व कफ हे दोष वाढतात. व्यायाम, मैथुन, किंवा मार्गक्रमण कर-

णारा, वाहनावर बसून हिंडणारा, थकलेला, अतिसारी, शूल, श्वास, तहान, उचकी व वातरोग ह्यांनीं पीडित असलेला, क्षीण, ज्याचा कफ क्षीण झाला आहे तो, बालक, ज्यांना मदात्यय रोग झाला आहे तो, वृद्ध, ज्याला रसशेष अजीर्ण झालें आहे तो, ज्यानें रात्रीं जागरण केलें आहे तो, व उपोषण करणारा ह्यांनीं अवश्य दिवसा निजावें. दिवसा व रात्रीं ज्यांनीं झोंप घेण्याची संवयच केली आहे त्यांनीं दिवसा झोंप घेतली असतां दोष नाहीं. परंतु ते झोंप न घेतां जागरण करतील तर मात्र दोष होतो. जेवल्यानंतर झोंप घेतली असतां ती वात व पित्त ह्यांचा नाश करिते, कफाला वाढविते आणि शरीराला पुष्टि व सुख देते. पित्ताचें शमन होण्याकरितां झोंप घ्यावी. वातनाश होण्याकरितां अंग रगडावें. कफनाश होण्याकरितां वमन, आणि ज्वरनाश होण्याकरितां लंघन करावें. जेवल्यानंतर आपणास आवडतील अशा प्रकारचे शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध हे पांच ज्ञानेंद्रियांचें पांच विषय सेवन करावे. त्या योगानें खाल्लेलें अन्न चांगलें राहातें.

शब्दः स्पर्शस्तथा रूपं रसो गन्धो जुगुप्सितः ।
भुक्तमप्रयतं चान्नमहितास्यं च वामयेत् ॥ २१७ ॥
शयनं चाशनं चाति न भजेन्न द्रवाधिकम् ।
नाग्न्यातपौ न प्लवनं न यानं नापि वाहनम् ॥ २१८ ॥
व्यायामं च व्यवायं च धावनं पानमेव च ।
युद्धं गीतं च पाठं च मुहूर्तं भुक्तवांस्त्यजेत् ॥ २१९ ॥
अत्यम्बुपानाद्विषमाशनाच्च संधारणात्स्वप्नविपर्ययाच्च ।
कालेऽपि सात्म्यं लघु चापि भुक्तमन्नं न पाकं भजते नरस्य २२०
अजीर्णे भुज्यते यत्तु तदध्यशनमुच्यते ।
प्राग्भुक्ते त्वनले मन्दे द्विरह्नो न समाहरेत् ॥
पूर्वभुक्तेऽविदग्धेऽन्ने भुञ्जानो हन्ति पावकम् ॥ २२१ ॥
भवेद्यदि प्रातरजीर्णशङ्का तदाऽभयानागरसैन्धवानाम् ।
विचूर्णितं शीतजलेन भुक्त्वा भुक्तामशंको मितमन्नमद्यात् २२

अतिशय अन्न खाणें, जेवल्यावर फार हसणें व अप्रिय असे शब्दस्पर्शादि विषय सेवन करणें ह्या कारणानें खाल्लेलें अन्न ओकून पडतें. अतिशय झोंप घेऊं नये. अति खाऊं नये व ज्यामध्यें पातळ

पदार्थ फार आहेत असें जेवण जेवूं नये. जेवण झाल्यावर विस्तवाजवळ शेकत बसणें, पोहणें, गाडी इत्यादि यानामध्यें बसणें, घोडे इत्यादि वाहनांवर बसणें, व्यायाम, मैथुन, धावणें पाणी इत्यादिक पिणें, युद्ध, गाणें, वेदादिकांचें पठण ह्या गोष्टी दोन घटकापर्यंत वर्ज कराव्या. अति पाणी पिणें, विषम अन्न खाणें, मलमूत्रादिकांचे वेग आवरून धरणें, झोंपेचा विपर्यास करणें, ह्या कारणानें वेळच्यावेळीं व हलका आहार करून देखील मनुष्याचें अन्न चांगलें पचन होत नाहीं. पहिलें खाल्लेलें अन्न पचन होण्यापूर्वी पुन्हां जेवण केलें तर त्याला अध्यशन म्हणतात. एकदां जेवण केल्यावर अग्नि मंद असेल तर पुन्हा जेवण करूं नये, म्हणजे भूक नसतांना दिवसाचें दोन वेळ जेवण करूं नये. पूर्वीचें अन्न अर्धवट पचन झालें असून त्याजवर पुन्हा जेवलें तर तें अग्नीचा नाश करितें. सकाळीं उठल्यावर जर अन्नाचें पचन न झाल्यामुळें अजीर्णाची शंका राहील तर हिरडेदळ, सुंठ व सैंधव ह्यांचें चूर्ण थंड पाण्याशीं भक्षण करून अजीर्ण मोडल्यावर परिमित आहार करावा.

सुखाचार.

अध्वा वर्णकफस्थौल्यसौकुमार्यविनाशनः ।
पादचंक्रमणं नातिदेहपीडाकरं भवेत् ॥ २२३ ॥
तदायुर्बलमेधाग्निप्रदमिन्द्रियबोधनम् ।
आस्यवर्णकफस्थौल्यसौकुमार्यसुखप्रदम् ॥
उष्णीषं कान्तिकृत्केश्यं रजोवातकफापहम् ॥ २२४ ॥
पादाभ्यामनुपानद्भ्यां सदा चङ्क्रमणं नृणाम् ।
अनारोग्यमनायुष्यमिन्द्रियघ्नमदृष्टिदम् ॥ २२५ ॥
छत्रस्य धारणं वर्षातपवातरजोपहम् ।
हिमघ्नं हितमक्ष्णोश्च माङ्गल्यमपि कीर्तितम् ॥ २२६ ॥
सत्त्वोत्साहबलस्थैर्यवीर्यधैर्यविवर्धनम् ।
अवष्टम्भकरं चापि भयघ्नं दण्डधारणम् ॥ २२७ ॥

मार्गक्रमण (प्रवास) शरीराचा वर्ण, कफ, स्थूलता, सुकुमारपणा यांचा नाश करतें. पायानें चालणें शरीराला फारसें त्रासदायक नाहीं. तें आयुष्य, बल, बुद्धि व अग्नि ह्यांना वाढविणारें व इंद्रिय

बोधक आहे. पागोटें कांतिकारक केशांना हितावह, धूळ, वात व कफ ह्यांना दूर करणारें आहे. सदोदित अनवाणी पायानें चालणें हें आरोग्य व आयुष्य ह्यांची हानि करणारें, इंद्रियें व दृष्टि ह्यांचें नाशक आहे. छत्री धरणें हें पाऊस, ऊन, वारा, धूळ व थंडी ह्यांचें निवारण करणारें, डोळ्यांला हितकर व मंगलकारक आहे. हातांत काठी धरणें हें सत्व, उत्साह, बल, स्थिरता, धैर्य व वीर्य (पराक्रम) ह्यांना वाढविणारें, आधार (अवष्टंभ) उत्पन्न करणारें व भयनाशक आहे.

ऊर्ध्वाच्छादनसंयुक्ता शिबिका सर्ववल्लभा ।
तस्यामारोहणं नृणां त्रिदोषशमकं मतम् ॥ २२८ ॥
वातश्लेष्मगदार्तानामहिता भ्रमकृत्तरिः ।
पित्तानिलकरो हस्ती लक्ष्म्यायुःपुष्टिवर्धनः ॥ २२९ ॥
घोटकारोहणं वातपित्ताग्निश्रमकृन्मतम् ।
मेदोवर्णकफघ्नं च हितं तद्बलिनां परम् ॥ २३० ॥

वर आच्छादन असलेली पालखी सर्वांना प्रिय असून त्यांत बसणें त्रिदोषशामक असतें. नावेंत बसणें भोंवळ आणणारें व वात-रोगी व कफरोगी ह्यांना अहितकारक आहे. हत्तीवर बसणें वात-पित्तकारक असून लक्ष्मी, आयुष्य व पुष्टि ह्यांना वाढविणारें आहे. घोड्यावर बसण्यानें वात व पित्त वाढतें, अग्नि प्रदीप्त होतो, व थेरी येते, असें कित्येकांचें मत आहे. शिवाय त्यापासून मेद, वर्ण व कफ ह्यांचा नाश होतो. हें बलवानाला फार हितकारक आहे.

आतपः स्वेदमूर्छास्रपित्ततृष्णाक्लमश्रमान् ।
दाहं विवर्णतां कुर्यादेतांश्छाया व्यपोहति ॥ २३१ ॥
वृष्टिर्वृष्या हिमा बल्या निद्रालस्यविवर्धिनी ।
भयावहा मोहकरी कुहातिः कफवातला ॥ २३२ ॥
अग्निर्वातकफस्तम्भशीतवेपथुनाशनः ।
आमाभिष्यन्दशमनो रक्तपित्तप्रकोपनः ॥ २३३ ॥
सद्यःश्लेष्मकरो धूमो नेत्रयोरहितो भृशम् ।
शिरोगौरवकृच्चापि वातपित्तं च कोपयेत् ॥ २३४ ॥

ऊन हें घाम, मूर्च्छा, रक्तपित्त, तहान, ग्लानि, श्रम, दाह व विवर्णता ह्यांना उत्पन्न करतें, व छाया दूर करितें. पाऊस कामोत्पत्ति-

कारक, थंड, बलकर व झोंप व आळस ह्यांना वाढविणारा आहे. अतिवृष्टि भयप्रद व मोहकारक असून कफ व वात ह्यांना वाढविते. अग्नीचा शेक (उष्णता) वात, कफ, अंग ताठणें, थंडी, कंप, आम व ओलसरपणा ह्यांचा नाशक व रक्तपित्ताला कोपविणारा आहे. धूर हा तात्काळ कफ उत्पन्न करणारा, डोळ्यांला त्रासदायक, मस्तकाला जडपणा आणणारा व वातपित्त कोपविणारा आहे.

मैत्रीं सद्भिरसद्भिश्च कुर्यात्सत्सु तु सर्वथा ।
संसर्गः साधुभिः कुर्यादसत्सङ्गं परित्यजेत् ॥ २३५ ॥
सेवेत देवभूदेववृद्धवैद्यनृपातिथीन् ।
विमुखान्नार्थिनः कुर्यान्नावमन्येत कानपि ॥ २३६ ॥
गुरूणां संनिधौ तिष्ठेत्सदैव विनयान्वितः ।
पादप्रसारणादीनि तत्र नैव समाचरेत् ॥ २३७ ॥
अपकारपरेऽपि स्यादुपकारपरः पुमान् ।
आत्मवत्सकलान्पश्येद्वैरिणो दूरतो वसेत् ॥ २३८ ॥
न कंचिदात्मनः शत्रुं नाऽऽत्मानं कस्यचिद्रिपुम् ।
प्रकाशयेन्नापमानं न च निःस्नेहतां प्रभोः ॥ २३९ ॥

सज्जनाची व दुर्जनाची अशी मैत्री दोन प्रकारची आहे. त्यांत नेहमीं सज्जनाशीं मैत्री करावी व दुर्जनाची संगत करूं नये. देव, ब्राह्मण, राजा, वृद्ध, वैद्य व अतिथि ह्यांची सेवा करावी. याचकाला विमुख (कांहीं एक न देतां परतविणें) करूं नये. कोणाचाही अवमान करूं नये. गुरूंच्या (वडील माणसें वगैरेसुद्धां) समोर नेहमीं नम्रपणानें असावें. त्यांच्यापुढें पाय पसरून वगैरे अव्यवस्थित राहूं नये. अपकार करणाऱ्यावर देखील उपकार करावा. सर्व प्राणिमात्राला आपल्यासारखेंच पहावें. व शत्रूपासून दूर रहावें. आपल्याला कोणी शत्रू असूं देऊं नये व आपणही कोणाचें शत्रुत्व करूं नये. आपला अपमान व यजमानाची गैरमर्जी हीं कधीं उघड करूं नयेत.

नात्मानमुदके पश्येन्न नग्नः प्रविशेज्जलम् ।
तथा नाज्ञातगाम्भीर्यं न हिंस्रप्राणिसेवितम् ॥ २४० ॥
काले हितं मितं सत्यं संवादे मधुरं वदेत् ।
भुञ्जीत मधुरं प्रायः स्निग्धं काले हितं मितम् ॥ २४१ ॥

न रात्रौ दधि भुञ्जीत न च निर्लवणं तथा।
नामुद्गसूपं नाक्षौद्रं न चाप्यघृतशर्करम् ॥ २४२ ॥
जनस्याशयमालक्ष्य यो यथा परितुष्यति।
तं तथैवानुवर्तेत पराराधनपण्डितः ॥ २४३ ॥
नैकः सुखी न सर्वत्र विश्वस्तो न च शङ्कितः।
नोद्यमाद्विरमेत्क्वापि हेतावीर्ष्येत्फले न तु ॥ २४४ ॥
वेगान्न धारयेत्किंचिन्मनोवेगान्विधारयेत्।
न पीडयेदिन्द्रियाणि न चैतान्यतिलालयेत् ॥ २४५ ॥

आपलें प्रतिबिंब पाण्यांत पाहूं नये. नग्न होऊन पाण्यांत प्रवेश करूं नये. तसेंच पाणी किती खोल आहे हें पाहिल्यावांचून त्यांत प्रवेश करूं नये. हिंस्र प्राण्यांची सेवा करूं नये. कालाचा विचार करून लोकांना रुचेल असें मित व मधुर भाषण करावें. वेळच्या वेळीं प्रायः स्निग्ध व मधुर असा परिमित आहार करावा. रात्रीं दहीं भक्षण करूं नये. केलेंच तर मुगाचें कढण, सैंधव, तुपाची फोडणी व साखर ह्यापैकीं कांहीं तरी घातल्यावांचून करूं नये. लोकांच्या मनांतील अभिप्राय जाणून ज्याचा जसा संतोष होईल त्याप्रमाणें त्याशीं वागावें. सारांश, दुसऱ्याला खूष ठेवण्यांत तत्पर असावें. मीच काय तो सुखी असें मनांत आणूं नये. सर्वांवर विश्वासही टाकूं नये व साशंकही असूं नये. उद्योग सोडून केव्हांही मोकळें बसूं नये. एखाद्याला एखाद्या कार्यांत पुष्कळ फलप्राप्ति झाली तर त्याच्या त्या सद्गुणाची इर्ष्या धरावी, फलप्राप्तीची धरूं नये. मलमूत्रादिकांचे वेग धारण करूं नयेत. पण मानसिक वेगांना अवश्य आवरून धरावें. इंद्रियांचें अतिशय दमन करूं नये व त्यांचा अतिशय लाडही करूं नये, म्हणजे त्यांच्या स्वैरवृत्तीला आळा घालावा.

वर्षातपादिषु च्छत्री दण्डी रात्र्यटवीषु च।
सोपानत्कस्तनुं रक्षन्विचरेद्युगमात्रदृक् ॥ २४६ ॥
नदीं तरेन्न बाहुभ्यां नाग्निस्कन्धमभिव्रजेत्।
संदिग्धनावं वृक्षं च नारोहेद्दुष्टयानवत् ॥ २४७ ॥
नासंवृतमुखः कुर्यात्सभायां सुविचक्षणः।
कासं हासं तथोद्गारं जृम्भणं क्षवथुं तथा ॥२४८॥
नासिकां न विकुष्णीयान्नासीतोत्कटकः क्वचित्।

नोर्ध्वजानुश्चिरं तिष्ठेन्न नखैर्विलिखेद्भुवम् ॥२४९॥
संमार्जनीरजो नैव देहे दध्यात्कदाचन।
न नखेन तृणं छिन्द्यान्नोच्छिष्टो ब्राह्मणं स्पृशेत् ॥ २५० ॥
नोपरक्तं न चोद्यन्तं नास्तं यान्तं दिवाकरम्।
सर्वथा तु समीक्षेत न जले प्रतिबिम्बितम् ॥ २५१ ॥
नेक्षेत प्रततं सूक्ष्मं दीप्तामेध्याप्रियाणि च।
पौरंदरं धनुर्नैव दर्शयेत्कमपि कचित् ॥ २५२ ॥
रिपोरन्नं न भुञ्जीत गणिकान्नमपि कचित्।
प्रतिभूर्न भवेत्कापि न च साक्षी वृथा वदेत् ॥ २५३ ॥
स्थर्गीं न धारयेज्जातु द्यूतं दूरात्परित्यजेत्।
विश्वासं नाचरेत्स्त्रीणां ताः स्वतन्त्राश्च नाचरेत् ॥ २५४ ॥
रक्षणीया सदा पत्नी यौवने तु विशेषतः।
न भिन्नशयने स्वप्यान्न चैको विवरे बिले।
नैको देवालये नैव रात्रौ तरुतले न च ॥ २५५ ॥
एवं दिनानि गमयेत्सदाचारपरः सदा।
ततो रात्रिप्रयुक्तानि कुर्यात्कर्माणि मानवः ॥ २५६ ॥

उन्हांतून किंवा पावसांतून जातानां छत्री घेऊन जावें. रात्रीं किंवा अरण्यांतून चालतांना हातांत काठी घेऊन जावें. चालतांना जोडा घालून व पुढें चार हातापर्यंत दृष्टि ठेवून चालावें. बाहुबलावर नदी तरून जाऊं नये व मोठी आग लागली असेल तिकडे जाऊं नये. फुटक्या नावेंत बसूं नये. दुष्ट यानावर व तसेंच वृक्षावरही चढूं नये. सभेमध्यें तोंडाला पदर लावल्यावांचून खोकणें, हसणें, ढेकर देणें, जांभई देणें किंवा शिंकणें ह्या गोष्टी करूं नयेत. नाक टोकरूं नये, व केव्हांही उकिडवें बसूं नये. गुडघा वर धरून फार वेळ उभें राहूं नये. नखांनीं भुईवर रेघोट्या ओढूं नयेत. केरसुणीचा केर आंगावर केव्हांही येऊं देवूं नये. नखांनीं गवताच्या काड्या खुडूं नयेत. ब्राह्मणाला उष्ट्यानें शिवूं नये. ग्रहण लागलेला, उगवत असलेला, अस्तास जात असलेला व पाण्यांत प्रतिबिंबित झालेला सूर्य पाहूं नये. एकसारखें सूक्ष्म पदार्थाकडे पाहूं नये. प्रदीप्त, अमंगळ व अप्रिय वस्तूकडे पाहूं नये. इंद्रधनुष्य कोणाला कधींही दाखवूं नये. शत्रूकडील व वेश्येकडील अन्न केव्हांही खाऊं नये. कोणाला जामीन

होऊं नये व खोटी साक्ष देऊं नये. पानसुपारी ठेवण्याचें पात्र केव्हांही जवळ बाळगूं नये. द्यूत खेळण्याचा तर दुरूनच त्याग करावा. स्त्रियांवर विश्वास ठेवूं नये व त्यांना स्वातंत्र्य देऊं नये. सदोदित पत्नीवर नजर ठेवावी; त्यांत तरुणपणीं तर विशेषतः ठेवावी. पत्नीची व आपली शय्या भिन्न ठेवूं नये. भुयारांत अगर गुहेंत एकटें निजूं नये. तसेंच देवळांत किंवा रात्रीं झाडाखालीं एकटें निजूं नये. ह्याप्रमाणें नेहमीं सदाचारानें दिवस घालवून रात्र झाल्यावर रात्रींचीं योजलेलीं कामें करावीं.

इत्याचारं समासेन भाषितं यः समाचरेत् ।
स विन्दत्यायुरारोग्यं प्रीतिं धर्मं धनं यशः ॥ २५७ ॥
एतानि पञ्च कर्माणि संध्यायां वर्जयेद्बुधः ।
आहारं मैथुनं निद्रां संपाठं गतिमध्वनि ॥ २५८ ॥
भोजनाज्जायते व्याधिर्मैथुनाद्गर्भवैकृतम् ।
निद्राया निःस्वता पाठादायुर्हानिर्गतेर्भयम् ॥ २५९ ॥

ह्याप्रमाणें संक्षेपतः सांगितलेला हा आचार जो आचरण करतो, त्याला आयुष्य, आरोग्य, प्रीति, धर्म, धन व यश ह्यांची प्राप्ति होते. आहार, मैथुन, निद्रा, वेदादिकांचें पठण, व मार्गक्रमण हीं पांच कर्में संध्यासमयीं (तिनीसांजा) वर्ज करावीं. कारण भोजन केलें असतां व्याधि उत्पन्न होतो व मैथुनापासून गर्भधारण झालें असतां गर्भाला विकार (व्यंगपणा) उत्पन्न होतो. झोप घेतली असतां दारिद्र्य येतें. वेदादिकांचा पाठ करण्यानें आयुष्य क्षीण होतें आणि मार्गक्रमण करण्यांत भय असतें.

रात्रिचर्या.

ज्योत्स्ना शीता स्मरानन्दप्रदा तृट्पित्तदाहहृत् ।
ततो हीनगुणः कुर्यादवश्यायोऽनिलं कफम् ॥ १ ॥
तमो भयावहं मोहदिङ्मोहजननं भवेत् ।
पित्तहृत्कफकृत्कामवर्धनं क्लमकृच्च तत् ॥ २ ॥
रात्रौ तु भोजनं कुर्यात्प्रथमप्रहरान्तरे ।
किंचिदूनं समश्नीयाद्दुर्जरं तत्र वर्जयेत् ॥ ३ ॥

चांदणें थंड, कामोद्दीपक, आनंददायक, तहान व पित्त व दाह

ह्यांचें नाशक आहे. धुकें त्याहून गुणानें हीन असून वात व कफ करणारें आहे. अंधकार हा भयप्रद, मोह व दिशाभूल उत्पन्न करणारा, पित्त व कफ कारक, कामवर्धक व ग्लानि आणणारा आहे. रात्रीच्या पहिल्या प्रहरांत भोजन करावें, पण जड पदार्थ खाऊं नयेत; व किंचित् भूक राखून जेवावें.

शरीरे जायते नित्यं देहिनां सुरतस्पृहा।
अव्यवायान्मेहमेदोवृद्धिः शिथिलता तनोः ॥ ४ ॥
बलिनो मनसो रोधात्क्रोधाद्वा ब्रह्मचर्यतः।
नारीणामरसज्ञत्वात्क्षीणं शुक्रं भवेन्नृणाम् ॥ ५ ॥
दौर्बल्यं मुखशोषश्च पाण्डुत्वं सदनं भ्रमः।
क्लैब्यं शुक्रविसर्गश्च क्षीणशुक्रस्य लक्षणम् ॥ ६ ॥

मनुष्याला नित्य सुरत करण्याची इच्छा असते, म्हणून मैथुन वर्ज केलें तर प्रमेह, मेदोवृद्धि व शरीराला शिथिलपणा हे विकार होतात. मैथुनेच्छेचा रोध केल्यानें, क्रोधामुळें, ब्रह्मचर्यानें स्त्रीच्या अरसिकपणामुळें पुरुषाचें शुक्र क्षीण होतें. अशक्तपणा, तोंडाला कोरड, शरीर पांढरेंफिक्कट होणें, अंग गळल्यासारखें होणें, भोवळ येणें, नपूंसकत्व, लघवींतून अगर स्वप्नामध्यें धातू जाणें हीं धातुक्षीणतेचीं लक्षणें आहेत.

संबन्धिन्यरिवल्लभा नृपवधूर्मित्राङ्गना रोगिणी
शिष्यब्राह्मणवल्लभातिपतितोन्मत्ता महापापिनी।
पिङ्गा प्रव्रजिता सती गुरुवधूर्वृद्धा तथा गर्भिणी
म्लेच्छा कृष्णतमा तथाऽपरिचिता त्याज्या इमा योषितः ७
सेवनं योषितां कुर्याद् बुधो बुद्ध्वा रतिक्रमम्
बालामुग्धाधिरूढानामनुरागाविभावनात् ॥ ८ ॥
बालेति गीयते नारी यावद्वर्षाणि षोडश।
ततस्तु तरुणी ज्ञेया द्वात्रिंशद्वत्सरावधि ॥ ९ ॥
तदूर्ध्वमधिरूढा स्यात्पञ्चाशद्वत्सरावधि।
वृद्धा तत्परतो ज्ञेया सुरतोत्सववर्जिता ॥ १० ॥

आप्त स्त्री, शत्रूची स्त्री, राजपत्नी, मित्राची स्त्री, रोगी स्त्री, शिष्यस्त्री, ब्राह्मणाची स्त्री, भ्रष्ट स्त्री, उन्मत्त स्त्री, महापापी स्त्री, वेश्या स्त्री, संन्यास घेतलेली स्त्री, पतिव्रता स्त्री, गुरुपत्नी, वृद्ध स्त्री,

गर्भार स्त्री, म्लेंच्छ स्त्री, अतिशय काळी स्त्री, अपरिचित स्त्री, ह्या स्त्रियांशीं मैथुन करूं नये. बाला, मुग्धा, अधिरूढा, अशांना प्रेम उत्पन्न होईल अशा तऱ्हेनें कामशास्त्रांतील नियमाला अनुसरून स्त्रीसेवन. करावें. स्त्रियांना वयाच्या सोळा वर्षांपर्यंत बाला असें म्हणतात. त्यापुढें बत्तीस वर्षांपर्यंत तिला तरुणी म्हणतात. तेथून पन्नास वर्षांपर्यंत तिला अधिरूढा म्हणतात. त्यापुढें तिला वृद्धा म्हणतात. ती सुरतोत्सवाविषयीं वर्ज सांगितली आहे.

निदाघशरदोर्बाला हिता विषयिणे मता।
तरुणी शीतसमये प्रौढा वर्षावसन्तयोः ॥ ११ ॥
नित्यं बाला सेव्यमाना नित्यं वर्धयते बलम्।
तरुणी ह्रासयेच्छक्तिं प्रौढोद्भासयते जराम् ॥ १२ ॥

ग्रीष्म व शरद् ऋतु ह्या ऋतूमध्यें बाला स्त्री, हेमंत ऋतूमध्यें तरुणी आणि वर्षा व वसंतऋतूंमध्यें प्रौढ स्त्री समागमाला प्रशस्त असते. बाला स्त्रीच्या समागमानें बलवृद्धि होते. ह्यासाठीं नित्य बालास्त्रीचा समागम करावा. तरुणी स्त्रीच्या समागमानें शक्तीचा ऱ्हास होतो व प्रौढ स्त्रीचया समागमानें जरा उत्पन्न होते.

सद्योमांसं नवान्नं च बाला स्त्री क्षीरभोजनम्।
घृतमुष्णोदकस्नानं सद्यःप्राणकराणि षट् ॥ १३ ॥
पूतिमांसं स्त्रियो वृद्धा बालार्कस्तरुणं दधि।
प्रभाते मैथुनं निद्रा सद्यःप्राणहराणि षट् ॥ १४ ॥
वृद्धोऽपि तरुणीं गत्वा तरुणत्वमवाप्नुयात्।
वयोधिकां स्त्रियं गत्वा तरुणः स्थविरायते ॥ १५ ॥
आयुष्मन्तो मन्दजरा वपुर्वर्णबलान्विताः।
स्थिरोपचितमांसाश्च भवन्ति स्त्रीषु संयताः ॥ १६ ॥
सेवेत कामतः कामं तृप्तो वाजीकृतां हिमे।
प्रकामं तु निषेवेत मैथुनं शिशिरागमे ॥ १७ ॥
त्र्यहाद्वसन्तशरदोः पक्षाद् वर्षानिदाघयोः।
शीते रात्रौ दिवा ग्रीष्मे वसन्ते तु दिवा निशि ॥ १८ ॥
वर्षासु वारिदध्वाने शरत्सु सरसः स्मरः।
त्रिभिस्त्रिभिरहोभिर्हि समेयात्प्रमदां नरः ॥ १९ ॥
सर्वेष्वृतुषु घर्मेषु पक्षात्पक्षाद् व्रजेद् बुधः।
आयुःक्षयभयाद्विद्वान्नाहि सेवेत कामिनीम् ॥ २० ॥

अवशो यदि सेवेत तदा ग्रीष्मवसन्तयोः ॥ २१ ॥
नोपेयात्पुरुषो नारीं संध्ययोर्न च पर्वसु ।
गोसर्गे चार्धरात्रे च तथा संध्यादिनेऽपि च ॥ २२ ॥
कल्पस्योदग्रवयसो वाजीकरणसेविनः ।
सर्वेष्वृतुष्वहरहर्व्यवायो न निवार्यते ॥ २३ ॥

ताजें मांस, ताजें अन्न, बाला स्त्री, दुधाबरोबर भोजन, घृतपान (तूप खाणें) व ऊन पाण्यानें स्नान करणें, हीं सहा प्राणकर (शक्ति वाढविणारीं) आहेत. नासकें मांस, वृद्धा स्त्री, सकाळचें ऊन, ताजें दहीं, प्रातःकाळीं मैथुन करणें, व झोंप घेणें हीं सहा बलहारक आहेत. वृद्ध पुरुषाला तरुण स्त्रीशीं समागम केल्यानें तरुणपण येतें. आपल्यापेक्षां अधिक वयाच्या स्त्रीशीं समागम केल्यानें वृद्धत्व येतें. स्त्रीशीं समागम (नियमित) करणाराला आयुष्य प्राप्त होतें, म्हातारपण फार उशीरा येतें, अंगाचा वर्ण चांगला होतो, बल वाढतें, व मांसवृद्धि होऊन त्याला दृढत्व येतें. वाजीकरण औषधांचें सेवन करून हेमंत ऋतूमध्यें इच्छा तृप्त होईपर्यंत कामसेवन करावें; आणि शिशिर ऋतूंमध्यें पाहिजे तितकें मैथुन करावें. वसंत व शरद ऋतूंमध्यें तीन दिवसांनीं एकदां व ग्रीष्म आणि वर्षा ऋतूंमध्यें पंधरा दिवसांनीं एकदां मैथुन करावें. हिवाळ्यांत रात्रीं मैथुन करावें. ग्रीष्म ऋतूमध्यें दिवसा मैथुन करावें. वसंतऋतूमध्यें दिवसा व रात्रीं केव्हांही करावें. वर्षाऋतूंत मेघांचा कल्लोळ चालू असतांना व शरद्ऋतूमध्यें सरोवराचे ठायीं मदनाचा वास असतो, म्हणून सरोवरासन्निध स्मरक्रीडा करावी सर्व ऋतूंमध्यें तीनतीन दिवसांनीं मैथुन करावें. परंतु ग्रीष्मऋतूमध्यें तें पंधरा दिवसांनीं करावें. आयुष्याची हानि होण्याची भीति असते म्हणून दिवसा स्त्रीसमागम करूं नये. आवश्यक असेल तर फक्त ग्रीष्म आणि वसंत ऋतूंमध्यें मात्र करावा. प्रातःकाळीं व सायंकाळीं, पर्वणीच्या वेळीं, गाई रानांत जाण्याच्या वेळीं, मध्यरात्रीं व मध्याह्नीं (भर दोनप्रहरीं) स्त्रीसमागम करूं नये. शास्त्ररीत्या मैथुनाला योग्य वय असलेल्या मनुष्यानें वाजीकरण औषधाचें सेवन

करून सर्व ऋतूंमध्यें दररोज स्त्रीसंग केला असतां हरकत नाहीं.

घृतक्षीराशनो निर्भीर्निर्व्याधिर्नित्यगो युवा ।
विहारं भार्यया कुर्याद्देशेऽतिशयसंवृते ॥ २४ ॥
रम्ये श्राव्याङ्गनागाने सुगन्धिसुखमारुते ।
देशे गुरुजनासन्नेऽनिभृतेऽतित्रपाकरे। ॥ २५॥
श्रूयमाणव्यथाहेतुवचने च रमेत न ।
स्नातश्चन्दनलिप्ताङ्गः सुगन्धसुमनोन्वितः॥ २६ ॥
भुक्तवृष्यः सुवसनः सुवेषः समलङ्कृतः ।
ताम्बूलवदनः पत्न्यामनुरक्तोऽधिकस्मरः ॥ २७ ॥
पुत्रार्थी पुरुषो नारीमुपेयाच्छयने शुभे ।
अत्याशितेऽधृतिः क्षुद्वान्सव्यथाङ्गः पिपासितः ॥ २८ ॥
बालो वृद्धोऽन्यवेगार्तस्त्यजेद्रोगी च मैथुनम् ।
भार्यां तुल्यगुणोपेतां तुल्यशीलां कुलोद्भवाम् ॥ २९ ॥
अभिकामोऽभिकामां च हृष्टो हृष्टामलङ्कृताम् ।
सेवेत प्रमदां युक्त्या वाजीकरणबृंहितः ॥ ३० ॥

निरोगी व तरुण अशा नित्य स्त्रीसंग करणाऱ्या पुरुषानें तूप-दूध यथेच्छ खाऊन गुप्त आणि रम्य अशा ठिकाणीं स्त्रियांचें गायन व सुखकर व सुगंधी वारा वाहात असेल अशा वेळीं पत्नीशीं समागम करावा. ज्या ठिकाणीं वडील माणसें आहेत त्या ठिकाणीं, उघडच्या जागेवर, ज्या ठिकाणीं लज्जा उत्पन्न होईल अशा ठिकाणीं, व ज्या ठिकाणीं दुःखकारक भाषण ऐकूं येत आहे अशा ठिकाणीं मैथुन करूं नये. स्नान करून अंगाला चंदनाची उटी लावून सुवासिक फुलांचे हार वगैरे घालून कामोत्तेजक पदार्थांचें सेवन करून उत्तम वस्त्रें, चांगले पोषाख व अलंकार धारण करून, विडा खाऊन पत्नीशीं अनुरक्त झालें असतां अधिक कामोत्तेजन होतें. पुत्रप्राप्तीची इच्छा असेल त्यानें उत्तम शयनावर पत्नीशीं रत व्हावें. ज्यानें अतिशय जेवण केलें आहे, ज्याचें धैर्य खचलें आहे, ज्याला भूक लागली आहे, ज्याचें अंग व्यथित झालें आहे, जो ताहानेला आहे, जो बाल, वृद्ध, रोगी व मलमूत्रादिकांच्या वेगानें पीडित असतो, अशानें मैथुन करूं नये. जिचे गुण व शील आपल्या गुणांशीं व स्वभावाशीं समान आहे, जी कुलीन आहे, जिच्या

शरीरामध्यें कामसंचार होऊन जी हर्षयुक्त झाली आहे अशा आपल्या पत्नीशीं वाजीकरण औषधांचें सेवन करून पुष्ट झालेल्या व कामसंचारानें हर्षयुक्त झालेल्या पुरुषानें रममाण व्हावें.

सीमन्ताक्ष्यधरे कपोलगलके कुक्षौ कुचोरःस्थले
नाभिश्रोणिवराङ्गजानुषु तथा गुल्फे पदांगुष्ठके ।
वामाङ्गे हरिणीदृशां मनसिजो मासस्य पक्षद्वये
शुक्लश्यामविभागतः सुविहरत्यूर्ध्वाध एवं क्रमात् ॥३१॥
सीमन्ते नखरं सुचुम्बनाविधिं नेत्रे कपोलेऽधरे ।
दन्ताग्रं विदधीत किंच नखरं कुक्षौ सुकण्ठेऽपि च ।
मन्दं वक्षसि ताडनं कुचयुगे श्रोणौ दृढं मर्दनं
नाभौ किंच चपेटिकां स्मरगृहे मातङ्गलीलायितम् ॥३२॥
गुल्फजानुपदांगुष्ठसमये घातनानि च ।
इष्टचन्द्रकलास्पर्शाद्द्रावयेदम्बुजेक्षणाम् ॥ ३३ ॥

भांग, डोळे, ओठ, गाल, गळा, कुशी, स्तन, हृदय, नाभि, कटिप्रदेश, गुडघे, घोटे व पायांचे आंगठे ह्या स्थानीं महिन्याच्या दोन पक्षांपैकीं शुक्लपक्षांत, उजव्या बाजूच्या त्या त्या अवयवांत खालून वर (पायाच्या आंगठ्यापासून भांगाकडे) आणि कृष्णपक्षांत वरून खालीं (भांगाकडून पायाच्या आंगठ्याकडे) क्रमानें त्या त्या तिथीस स्त्रियांच्या कामाचें वास्तव्य असतें. ह्यासाठीं भांगामध्यें हळूच नखानें टोचावें. डोळे, गाल व ओठ ह्या ठिकाणीं चुंबावें. कुशी व कंठ ह्या ठिकाणीं दांतांनीं अगर नखांनीं किंचित् टोचावें. हृदयावर अल्पसें ताडन करावें. कुचयुग्म व कटी ह्यांचें मर्दन करावें. नाभीच्या ठिकाणीं हाताच्या बोटांनीं किंचित् ताडन व स्मरमंदिराचे ठायीं मातंगलीला आचरावी. गुडघे, घोटे व पायाचे आंगठे ह्या ठिकाणीं ताडन करावें. ह्याप्रमाणें त्या त्या तिथीला त्या त्या अवयवांच्या स्पर्शानें स्त्रियांची कामशांति करावी.

रजस्वलामकामां च मलिनामप्रियां तथा ।
वर्णवृद्धां वयोवृद्धां तथा व्याधिप्रपीडिताम् ॥ ३४ ॥
हीनाङ्गीं गर्भिणीं द्वेष्यां योनिरोगसमन्विताम् ।
सगोत्रां गुरुपत्नीं च तथा प्रव्रजितामपि ॥ ३५ ॥
नाभिगच्छेत्ततो नारीं भूरिवैगुण्यशङ्कया ।

रजस्वलां गतवतो नरस्यासंयतात्मनः ॥ ३६ ॥
दृष्ट्यायुस्तेजसां हानिरधर्मश्च ततो भवेत् ।
लिङ्गिनीं गुरुपत्नीं च सगोत्रामथ पर्वसु ॥ ३७ ॥
वृद्धां च संध्ययोश्चापि गच्छतो जीवनक्षयः ।
गर्भिण्यां गर्भपीडा स्याद्व्याधितायां बलक्षयः ॥ ३८ ॥
हीनाङ्गीं मलिनां द्वेष्यां क्षामां वन्ध्यामसंवृते ।
देशेऽभिगच्छतो रेतः क्षीणं म्लानं मनो भवेत् ॥ ३९ ॥

ऋतुमती, जिला कामवासना नाहीं अशी, मलिन, अप्रिय, श्रेष्ठ वर्णाची, वयानें मोठी, व्याधीनें पीडित, अंगहीन, गर्भिणी, शत्रुत्व करणारी, योनिरोगानें युक्त, स्वगोत्रांत उत्पन्न झालेली, गुरुपत्नी व संन्यासवृत्ति धारण करणारी, अशा स्त्रियांशीं समागम करूं नये. कारण त्यापासून फार अपाय होतो. इंद्रियाधीन पुरुषानें ऋतुमती स्त्रीशीं संग केला असतां दृष्टि, आयुष्य, तेज व धर्म ह्यांची हानि होते. विरक्त स्त्री, गुरुपत्नी, सगोत्रा स्त्री, वृद्ध स्त्री ह्यांच्याशीं किंवा पर्वणी व दोन्ही संध्यासमयीं मैथुन केलें असतां जीविताची हानि होते. गर्भिणी स्त्रीशीं संग केल्यानें गर्भाला पीडा होते. रोगी स्त्रीशीं संग केला असतां शक्तीचा ऱ्हास होतो. हीनांगी, मलीन, द्वेष करणारी, अशक्त व वंध्या स्त्री यांच्याशीं आणि उघड्या जागेंत संग केला असतां धातुक्षीणता व मनाला म्लानपणा हे विकार उत्पन्न होतात.

क्षुधितः क्रुद्धचितश्च मध्याह्ने तृषितोऽबलः ।
स्थितस्य हानिं शुक्रस्य वायोः कोपं च विन्दति ॥ ४० ॥
व्याधितस्य रुजा प्लीहा मूर्च्छा मृत्युश्च जायते ।
प्रत्युषस्यर्धरात्रे च वातपित्ते प्रकुप्यतः ॥ ४१ ॥
तिर्यग्योनावयोनौ वा दुष्टयोनौ तथैव च ।
उपदंशस्तथा वायोः कोपः शुक्रसुखक्षयः ॥ ४२ ॥
उच्चारिते मूत्रिते च रेतसश्च विधारणे ।
उत्ताने च भवेच्छीघ्रं शुक्राश्मर्यास्तु संभवः ॥ ४३ ॥
सर्वमेतत्त्यजेत्तस्माद्यतो लोकद्वयेऽहितम् ।
शुक्रं तूपस्थितं मोहान्न संधार्यं कदाचन ॥ ४४ ॥

क्षुधेनें पीडित, क्रोधयुक्त, तृषार्त व अशक्त अशा पुरुषानें व

मध्याह्नसमयीं (दोनप्रहरीं) मैथुन केलें असतां धातूची क्षीणता आरोग्याची हानि आणि वायूचा कोप हे विकार उत्पन्न होतात. व्याधित मनुष्याला रोगाची वृद्धि, पांथरी, मूर्च्छा हे विकार होतात आणि मृत्यूही येतो. प्रातःकाळीं व मध्यरात्रीं मैथुन केलें असतां वातपित्ताचा प्रकोप होतो. तिर्यग्योनी-(चतुष्पादादि योनि) वांचून अन्यत्र व दूषित योनि, अशा ठिकाणीं मैथुन केलें असतां उपदंश, वायूचा कोप, सौख्य व धातू ह्यांचा क्षय हे विकार होतात. मल, मूत्र व शुक्र ह्यांचा वेग धारण केल्यानें व पुरुषानें उताणें निजून मैथुन केल्यानें शुक्राश्मरी (शुक्रजन्य मुतखडा) उत्पन्न होतो. मैथुनसमयीं स्थानापासून भ्रष्ट झालेलें शुक्र केव्हांही आवरून धरूं नये. ह्या सर्व गोष्टी उभयलोकींही अहितकारक आहेत, ह्यासाठा त्यांचा त्याग करावा.

स्नानानुलेपनहिमानिलखण्डखाद्य-
शीताम्बुदुग्धरसयूषसुराप्रसन्नाः।
सेवेत चानुशयनं विरतौ रतस्य
तस्यैवमाशु वपुषः पुनरेति धाम ॥ ४५ ॥
स्नानं सशर्करं क्षीरं भक्ष्यमैक्षवसंस्कृतम्।
ततो मांसरसः स्वप्नो व्यवायान्ते हिता अमी ॥ ४६ ॥

स्नान, गंधलेपन, थंड वारा, शर्करायुक्त भक्ष्य पदार्थ, थंड पाणी, दूध, मांस, रस, सरबत, स्वच्छ उत्तम प्रकारचें मद्य, ह्यांचें सेवन मैथुनानंतर केलें असतां मैथुनानें कमी झालेलें तेज पुन्हा प्राप्त होतें. स्नान, साखर घातलेलें दूध, साखरमिश्रित भक्ष्य पदार्थ मांस रस ह्यांचें सेवन व झोंप हीं मैथुनानंतर हितकर आहेत.

अतिव्यवायाज्जायन्ते रोगाश्चाक्षेपकादयः।
शूलकासज्वरश्वासकार्श्यपाण्ड्वामयक्षयाः ॥ ४७ ॥

अति मैथुनापासून शूल, खोकला, ज्वर, श्वास, कृशपणा, पांडुरोग व आक्षेपकादिक रोग हे विकार उत्पन्न होतात.

रात्रौ जागरणं रूक्षं कफदोषविषार्तिजित्।
निद्रा तु सेविता काले धातुसाम्यमतन्द्रितम् ॥
पुष्टिवर्णबलोत्साहवह्निदीप्तिं करोति च ॥ ४८ ॥

यो लेढि शयनसमये मधुमिश्रं बीजपूरदलचूर्णम् ।
स व्रीडाकरवातप्रसरनिरोधात्सुखं स्वपिति ॥ ४९ ॥

रात्रीं जागरण करणें रूक्ष असून कफदोष व विषबाधा ह्यांचा नाश करितें. योग्य कालीं झोंप घेतली असतां ती धातूंचें साम्य करिते, अग्नि प्रदीप्त करून तन्द्रा दूर करिते, आणि पुष्टि, वर्ण, शक्ति, व उत्साह ह्यांना वाढविते. जो महाळुंगाच्या पानाचें चूर्ण व मध एकत्र करून नित्य रात्रीं निजते वेळीं चाटतो तो पीडाकारक अशा वाताच्या अवरोधापासून मुक्त होऊन सुखानें झोंप घेतो.

सवितुरुदयकाले प्रसृतीः सलिलस्य यः पिबेदष्टौ ।
रोगजरापरिमुक्तो जीवेद्वत्सरशतं साग्रम् ॥ ५० ॥
अनुदिनं त्वनुदिते रविमण्डले पिबति तोयमनुज्झितमूत्रविट् ।
अनिलपित्तकफानलदोषहृच्छतसमा रमते तरुणीशतम् ॥ ५१ ॥
विगतघननिशीथे प्रातरुत्थाय नित्यं
पिबति खलु नरो यो घ्राणरन्ध्रेण वारि ।
स भवति मतिपूर्णश्चक्षुषा तार्क्ष्यतुल्यो
वलिपलितविहीनः सर्वरोगैर्विमुक्तः ॥ ५२ ॥

सूर्योदयाच्या वेळीं जो मनुष्य आठ प्रसृति म्हणजे ६४ तोळे पाणी पितो तो रोग व जरा ह्यांपासून मुक्त होत्साता पूर्ण शंभर वर्षें वांचतो. प्रतिदिवशीं सूर्योदयापूर्वीं मलमूत्रोत्सर्ग करण्याच्या आधीं जो पाणी पितो त्याचे वातपित्तकफजन्य विकार व अग्नीसंबंधीं दोष दूर होतात, आणि तो शंभर वर्षें वांचून शंभर स्त्रियांशीं रत होऊं शकतो. जो नित्य रात्र संपल्यावर प्रातःकाळीं नाकानें पाणी पितो तो बुद्धिमान होतो; त्याची दृष्टि गरुडाप्रमाणें होते; त्याचे केस पांढरे होत नाहींत, त्याच्या अंगावर वळ्या पडत नाहींत व तो सर्व रोगांपासून मुक्त होतो.

अर्शःशोथग्रहण्यो ज्वरजठरजराकोष्ठमेदोविकारा
मूत्राघातास्रपित्तश्रवणगलशिरःश्रोणिशूलाक्षिरोगाः ।
ये चान्ये वातपित्तक्षतजकफकृता व्याधयः सन्ति जन्तो-
स्तांस्तानभ्यासयोगादपहरति पयः पीतमन्ते निशायाः ५३

मूळव्याध, सूज, संग्रहणी, ज्वर, उदर, जरा, कोष्ठविकार, मेद, मूत्राघात, रक्तपित्त, डोळे, गळा, व मस्तक ह्यांचे रोग, कटिशूळ,

नेत्ररोग, आणि जे दुसरे वात, पित्त, उरःक्षत ह्यासंबंधाचे विकार हे सर्व प्रातःकाळीं पाणी पिण्यानें (उषःपानानें) दूर होतात.

स्नेहपीते क्षतेऽशुद्धावाध्माने स्तिमितोदरे ।
हिक्कायां कफवातोत्थे व्याधौ तद्वारि वारयेत् ॥ ५४ ॥

ज्यानें स्नेहपान केलें आहे, ज्याला व्रण किंवाउरःक्षत झालें आहे, ज्यानें शोधन औषधांनीं आपला कोठा शुद्ध केलेला नाहीं, ज्याचें पोट फुगलें आहे व स्तब्ध झालें आहे, व ज्याला वातकफजन्य विकार व उचकी लागली आहे त्यांनीं प्रातःकाळीं पाणी पिऊं नये (उषःपान करूं नये).

नरो दिनादिचर्याभिर्यो न वर्तेत नित्यशः ।
स एव लभते रोगं ततः पथ्यं समाचरेत् ॥ ५५ ॥

जो मनुष्य ह्या दिनचर्यादिकांत सांगितलेल्या आचाराप्रमाणें वागत नाहीं तो रोगी होतो. ह्यासाठीं हें हितकर आचरण करावें.

ऋतुचर्या.

शिशिरः पुष्पसमयो ग्रीष्मो वर्षाः शरद्धिमः ।
माघादिमासयुग्मे स्युर्ऋतवः षट् क्रमादमी ॥ १ ॥
उत्तरायणमत्राऽऽद्यैः परैः स्याद्दक्षिणायनम् ।
आद्यमुष्णं बलहरं ततोऽन्यद्बलदं हिमम् ॥ २ ॥
शिशिरः शीतलोऽतीव रूक्षो वाताग्निवर्धनः ।
वसन्तो मधुरः स्निग्धः श्लेष्मवृद्धिकरश्च सः ॥ ३ ॥
ग्रीष्मो रूक्षोऽतिकटुकः पित्तकृत्कफनाशनः ।
वर्षाः शीतविदाहिन्यो वह्निमान्द्यानिलप्रदाः ॥ ४ ॥
शरदुष्णा पित्तकर्त्री नृणां मध्यबलावहा ।
हेमन्तः शीतलः स्निग्धः स्वादुर्जठरवह्निकृत् ॥ ५ ॥
चयप्रकोपप्रशमा वायोर्ग्रीष्मादिषु त्रिषु ।
वर्षादिषु च पित्तस्य श्लेष्मणः शिशिरादिषु ॥ ६ ॥
चयकोपशमान्दोषा विहाराहारसेवनैः ।
समानैर्यान्त्यकालेऽपि विपरीतैर्विपर्ययम् ॥ ७ ॥

शिशिर, वसंत, ग्रीष्म, वर्षा, शरद् व हेमंत हे सहा ऋतु माघादि दोन दोन महिन्यांनीं होतात. त्यांत शिशिरादि पहिल्या तीन ऋतूंनीं उत्तरायण होतें व वर्षादि तीन ऋतूंनीं दक्षिणायन

होतें. पहिले तीन ऋतु उष्ण असून बलहारक आहेत. व शेवटचे तीन थंड असून बलदायक आहेत. शिशिर ऋतु अतिशय थंड, व रूक्ष असून वात व अग्नि ह्यांना वाढविणारा आहे. वसंत ऋतु मधुर[1], स्निग्ध व कफ वाढविणारा आहे. ग्रीष्मऋतु रूक्ष, अतिशय तिखट, पित्तकारक व कफनाशक आहे. वर्षाऋतु थंड, विदाहकारक, अग्नि-मांद्यकारक व वात वाढविणारा आहे. शरद्ऋतु उष्ण, पित्तकारक व मध्यम बलदायक आहे. हेमंतऋतु थंड, स्निग्ध व मधुर असून अग्निदीपक आहे. ग्रीष्मादि तीन ऋतूंमध्यें अनुक्रमें वायूचा संचय, प्रकोप व प्रशमन होतें. वर्षादि तीन ऋतूंमध्यें पित्ताचा व शिशिरादि तीन ऋतूंमध्यें कफाचा अनुक्रमें संचय, प्रकोप व शमन हीं होतात. आहारविहार नेहमीं समान असले म्हणजे हे वातादिकांचे संचयप्रकोपप्रशमनादि प्रकार वर सांगितलेल्या त्या त्या ऋतूंत नियमित प्रमाणांत होतात. परंतु आहारविहारादिकांत विपर्यास (न्यूनाधिकपणा) झाला असतां अकालीं देखील ह्या संचयप्रकोप-प्रशमनामध्यें विपर्यास होतो; म्हणजे ऋतु किंवा काल नसतांना-देखील ह्या गोष्टी होतात.

चयाचें लक्षण.

स्वस्थानस्थस्य दोषस्य वृद्धिः स्यात्स्तब्धकोष्ठता ।
पीतावभासता वह्निमन्दता चाङ्गगौरवम् ॥ ८ ॥
आलस्यं चयहेतौ तु द्वेषश्च चयलक्षणम् ।
संचयेऽपहृता दोषा लभन्ते नोत्तरा गतीः ।
ते तूत्तरासु गतिषु भवन्ति बलवत्तराः ॥ ९ ।

स्वस्थानीं दोषांची वृद्धि झाली असतां कोठा स्तब्ध होतो, पिवळेपणा भासतो. अग्निमांद्य, अंगाला जडत्व व अन्नद्वेष हीं लक्षणें दोषांचा संचय झाला असतां होतात. दोषांचा संचय झाल्याबरोबर

---

१ मधुर, कटु (तिखट) वगैरे जे ऋतूचे गुण आहेत, त्यांचा मथितार्थ असा आहे कीं, त्या ऋतूंत त्या रसाचें प्राधान्य (प्राबल्य) असून हवेंत व वनस्पतींत त्या रसाचें आधिक्य असतें. २. 'पीतांबुभासता' असा पाठभेद आहे. त्याचा अर्थ--'पाणी प्यालें असें भासतें.'

जर ते (वमनविरेचनादिकांनीं) बाहेर काढून टाकले तर ते पुढच्या गतीला पोहोंचत नाहींत म्हणजे त्यांचा प्रकोप होत नाहीं. ते दोष पुढच्या गतीला पोहोंचले तर बलवान होतात.

वर्षाऋतूमध्यें हिताहित.

वर्षासु प्रबलो वायुस्तस्मान्मिष्टादयस्त्रयः ।
रसाः सेव्या विशेषेण पवनस्योपशान्तये ॥ १ ॥
भवेद्वर्षासु वपुषि क्लिन्नत्वं यद्विशेषतः ।
तत्क्लेदशान्तये सेव्या अपि कट्वादयस्त्रयः ॥ २ ॥
स्वेदनं मर्दनं सेव्यं दध्युष्णं जाङ्गलामिषम् ।
गोधूमाः शालयो माषा जलं कौपं दिवश्च्युतम् ॥ ३ ॥
न भजेत्पूर्वपवनं वृष्टिं घर्मं हिमं श्रमम् ।
नदीनीरं दिवास्वापं रूक्षं नित्यं च मैथुनम् ॥ ४ ॥

वर्षाऋतूमध्यें वायु प्रबळ असतो. म्हणून वायूची शांति होण्याकरितां गोड, खारट व आंबट ह्या पदार्थांचें सेवन विशेष करावें. पण ओलसरपणामुळें जर कफ वाढला असेल तर त्याच्या शांतीकरितां तिखट, कडू, व तुरट ह्या तीन रसांचेंदेखील सेवन करावें. स्वेदन (घाम आणणें), मर्दन (अंग रगडणें), ऊन केलेलें दहीं, जांगल प्राण्यांचें मांस, गहू, तांदूळ, उडीद हे पदार्थ व विहिरीचें व पावसाचें पाणी, ह्यांचें सेवन करावें. पूर्वेकडील वारा, पाऊस, ऊन, गारठा, ह्यांचें सेवन करूं नये व श्रम करूं नयेत. तसेंच नदीचें पाणी, दिवसाची झोंप, रूक्ष पदार्थांचें सेवन व नित्यमैथुन हें सर्व वर्ज करावें.

शरदृतूमध्यें हिताहित.

सर्पिः स्वादुकषायतिक्तकरसा यच्छीतलं यल्लघु
क्षीरं स्वच्छसितैक्षवः पटुरसः स्वल्पः पलं जाङ्गलम् ।
गोधूमा यवमुद्गशालिसहिता नादेयमंशूदकं
चन्द्रश्चन्दनमिन्दुरादिरजनी माल्यं पटो निर्मलः ॥ १ ॥
विश्रामः सुहृदां गणेषु मधुरा वाचः सरःक्रीडनं
पित्तानां च विरेचनं बलवतो युक्तं शिरामोक्षणम् ।

एतान्यत्र घनावसानसमये पथ्यानि मुञ्चेद्दधि
व्यायामाम्लकटूष्णतीक्ष्णदिवसस्वप्नं हिमं चातपम् ॥२॥
दिवा रविकरैर्जुष्टं निशि शीतकरांशुभिः ।
श्रेयमंशूदकं नाम स्निग्धं दोषत्रयापहम् ॥ ३ ॥
इक्षवः शालयो मुद्गाः सरोऽम्भः क्वथितं पयः ।
शरद्येतानि पथ्यानि प्रदोषे चेन्दुरश्मयः ॥ ४ ॥

शरदृतूंत तूप; गोड, तुरट व कडू हे रस; हलके व थंड पदार्थ, दूध व खडीसाखर, थोडे खारट पदार्थ, जांगल मांस, गहू, जव, मूग, व साळी हीं धान्यें, नदीचें पाणी, अंशूदक, कापूर, चंदन, चांदण्याची रात्र, फुलांच्या माळा, स्वच्छ वस्त्र ह्यांचें सेवन करावें. प्रिय मित्राच्या समुदायामध्यें मधुर संभाषणें करीत विश्रांति घ्यावी. सरोवरामध्यें जलक्रीडा करावी. पित्ताचें शमन होण्याकरिता विरेचन (ढाळक) घ्यावें व बलवानानें शिरावेध करून रक्त काढावें. ह्या सर्व क्रिया शरदृतूमध्यें हितकारक आहेत. आणि दहीं, व्यायाम, आंबट व तिखट पदार्थ, उष्ण व तीक्ष्ण पदार्थ, दिवसा निजणें, थंडी व ऊन हीं अहितकारक आहेत, म्हणून वर्ज करावीं. दिवसा सूर्याच्या तेजानें व रात्रीं चंद्राच्या शीतळ किरणानें निर्दोष झालेलें जें पाणी त्याला अंशूदक (हंसोदक) असें म्हणतात. तें स्निग्ध व त्रिदोषनाशक असतें. ऊंस, साळी, मूग, सरोवराचें पाणी, ऊन पाणी व प्रदोषसमयीं चांदण्यांत बसणें ह्या गोष्टी शरदृतूमध्यें हितावह आहेत.

हेमंतऋतूमध्यें हिताहित.

प्रातर्भोजनमम्लपिष्टलवणानभ्यङ्गघर्मश्रमान्
गोधूमैक्षवशालिमाषपिशितं पिष्टं नवान्नं तिलान् ।
कस्तूरीं वरकुंकुमागुरुयुतामुष्णाम्बु शौचेऽनलं
स्निग्धं स्त्रीसुखं गुरूष्णवसनं सेवेत हेमन्तके ॥ १ ॥

हेमंतर्तूमध्यें प्रातःकाळीं भोजन करावें. आंबट, खारट व पिष्टमय पदार्थ भक्षण करावे. अंगाला तेल लावणें, घाम काढणें, व श्रम करणें (तालीम वगैरे) ह्या क्रिया कराव्या. गहू, साळी, उंसा-

चे पदार्थ (साखर गूळ वगैरे), उडीद, मांस, पीठ, ताजें अन्न, तीळ, कस्तुरी, उत्तम केशर व कृष्णागर हे पदार्थ, स्नानाकरितां ऊन पाणी, शेकण्याकरितां निर्धूम विस्तव, स्निग्ध पदार्थ, सुखावह होईल अशा प्रकारचें स्त्रीसेवन, आणि उबदार व जड अशीं वस्त्रें हीं सर्व हेमंतऋतूमध्यें सेवन करावीं.

शिशिरर्तूमध्यें हिताहित.

शिशिरे शीतमधिकं रौक्ष्यं चाऽऽदानकालजम् ।
विशेषतस्तु तत्रैव हेमन्तस्य मतो विधिः ॥ १ ॥

शिशिर ऋतूमध्यें थंडी फार असते आणि आदानकालासंबंधानें शरीराला रूक्षपणा आलेला असतो, म्हणून ह्या ऋतूमध्यें विशेषतः हेमंत ऋतूंतील आहारविहारच अधिक प्रमाणांत करणें योग्य आहे.

वसंत ऋतूमध्यें हिताहित.

वान्तिं नस्यमथाभयां च मधुना व्यायाममुद्वर्तनं
संसेवेत मधौ कफघ्नकवलं मांसं तथा जाङ्गलम्
गोधूमान्बहुभेदशालिसहितान्मुद्गान्यवान्षाष्टिकान् ।
लेपं चन्दनकुंकुमागुरुकृतं रूक्षं कटूष्णं लघु ॥ १ ॥
मिष्टमम्लं दधि स्निग्धं दिवास्वप्नं च दुर्जरम् ।
अवश्यायमपि प्राज्ञो वसन्ते परिवर्जयेत् ॥ २ ॥

वसंतऋतूमध्यें वमन, नस्य (नाकांत औषध घालणें), मधाबरोबर हिरड्याचें चूर्ण, व्यायाम, उटणें, कफनाशक पदार्थांच्या गुळण्या व जांगल मांस ह्याचें सेवन करावें. तसेंच गहू, अनेक प्रकारच्या साळी, मूग, सातू, साठेसाळी, चंदन, केशर व कृष्णागर ह्यांच्या उट्या आणि रूक्ष, तिखट व उष्ण असे पदार्थ सेवन करावे. आणि मधुर व आंबट पदार्थ, दहीं, स्निग्ध पदार्थ, दिवसा झोंप घेणें, पचन होण्यास कठीण असे पदार्थ, व धुक्यांत जाणें हें वसंतर्तूमध्यें वर्ज करावें.

ग्रीष्मऋतूंत हिताहित.

स्वादु स्निग्धहिमं लघु द्रवमयं द्रव्यं रसालां सितां

सकुक्षीरदशाङ्गुलानि सितया शालिं रसं मांसजम् ।
शीतांशुं स्वपनं दिवा मलयजं शीतं पयःपानकं
सेवेतोष्णदिने त्यजेत्तु कटुकक्षाराम्लघर्मश्रमान् ॥ १ ॥

ग्रीष्म ऋतूमध्यें गोड, स्निग्ध, थंड, हलके व पातळ असे पदार्थ, थंड अशा रसाला, सातू, दूध, गव्हले किंवा शेवया यांची शर्करायुक्त (खीर), साळी, मांसरस, चंद्र (चंद्राचें चांदणें), दिवसा झोप घेणें, चंदन, थंड दूध व पन्हीं ह्यांचें सेवन करावें. आणि तिखट, खारट, आंबट असे पदार्थ, घाम काढणें, श्रम हें वर्ज करावें.

ऋतुष्वेषु य एतैस्तु विधिभिर्वर्तते नरः ।
दोषानृतुकृतान्नैव लभते स कदाचन ॥ २ ॥

हा जो त्या त्या ऋतूंतील विधि सांगितला आहे त्याप्रमाणें जो वागतो त्याला ऋतूसंबंधीं दोष (रोग) कधींही होत नाहींत.

तप्तं तप्तांशुकिरणैः शीतं शीतांशुरश्मिभिः ।
समन्तादप्यहोरात्रमगस्त्योदयनिर्विषम् ॥ ३ ॥
शुचि हंसोदकं नाम निर्मलं मलजिज्जलम् ।
नाभिष्यन्दि न वा रूक्षं पानादिष्वमृतोपमम् ॥ ४ ॥

दिवसा सूर्य किरणांनीं तापलेलें, रात्रीं चंद्राच्या चांदण्यानें शीत झालेलें आणि अहोरात्र अगस्तीच्या उदयानें निर्विष झालेलें जें पवित्र उदक त्याला हंसोदक म्हणतात. हें निर्मल व दोषनाशक असून रुक्ष किंवा अभिष्यंदि नसतें. म्हणून तें पिण्याला अमृताप्रमाणें उपयुक्त असतें.

पाण्याचे गुण.

पानीयं शीतलं रूक्षं हन्ति पित्तविषभ्रमान् ।
दाहाजीर्णश्रमच्छर्दिमोहमूर्छामदात्ययान् ॥ १ ॥
मूर्छापित्तोष्मदाहेषु विषे रक्ते मदात्यये ।
भ्रमक्लमातिसारेषु मार्गोत्थवमथौ तथा ।
ऊर्ध्वगे रक्तपित्ते च शीतमम्भः प्रशस्यते ॥ २ ॥

पाणी शीतळ व रूक्ष असून पित्त, विष, भ्रम, दाह, अजीर्ण, श्रम, ओकारी, मोह (ग्लानि), मूर्च्छा, व मदात्यय ह्यांचा नाश करितें. थंड पाणी मूर्च्छा, पित्त, दाह, ऊष्मा, विष, रक्तदोष,

मदात्यय, भ्रम, थकवा, अतिसार, ओकारी व ऊर्ध्वगामी रक्तपित्त ह्या विकारांना फार प्रशस्त आहे.

ऊन पाण्याचे गुण.

यत्क्वाथ्यमानं निर्वेगं निष्फेनं निर्मलं भवेत् ।
अर्धावशिष्टं भवति तदुष्णोदकमुच्यते ॥ १ ॥
कफमेदोनिलामघ्नं दीपनं बस्तिशोधनम् ।
कासश्वासज्वरहरं पथ्यमुष्णोदकं सदा ॥ २ ॥
तप्तं पाथः पादभागेन हीनं पथ्यं प्रोक्तं वातजातामयघ्नम् ।
अर्धांशोनं नाशयेद्वातपित्तं पादप्रायं तत्तु दोषत्रयघ्नम् ॥३॥
तप्तायःपिण्डसंसिक्तं लोष्ठनिर्वापितं जलम् ।
सर्वदोषहरं पथ्यं सदा नैरुज्यकारकम् ॥ ४ ॥
उष्णोदकं श्रेष्ठतमं वदन्ति विश्वायवानीसहितं क्रमेण ।
कफे च वाते न च पित्तरोगे सर्वेषु रोगेषु न शीतलाम्बु ॥५॥

जें पाणी कढून अर्धें आटून उकळया शांत होऊन वरचा फेस जाऊन निर्मळ झालेलें असतें त्याला उष्णोदक म्हणतात. तें कफ, मेद व आम ह्यांचें नाशक, अग्निदीपक, बस्तीचें शोधक, खोकला, श्वास, ज्वर ह्यांचें नाशक व नेहमीं पथ्यकारक असतें. चवथाई आटविलेलें पाणी पथ्यकर व वातजन्यविकारनाशक आहे. अर्धें आटविलेलें पाणी वातपित्ताचा नाश करितें, आणि तीन भाग आटवून एक भाग राहिलेलें पाणी त्रिदोषाचा नाश करितें. तापवून लाल केलेलें लोखंड किंवा तापवून लाल केलेलें मातीचें ढेकूळ बुडवून तयार केलेलें पाणी सर्वदोषनाशक व नेहमीं आरोग्यकारक असतें. अनुक्रमें सुंठ व ओवा घालून तापविलेलें पाणी कफरोग व वातरोग ह्यांना पथ्यकारक आहे; परंतु तें पित्तरोगाला पथ्यकारक नाहीं. तसेंच थंड पाणी सर्व रोगांवर नाहीं.

ऋतुविशेषानें पाणी तापविण्याचा नियम.

शारदं चार्धपादोनं पादहीनं तु हैमतम् ।
शिशिरे च वसन्ते च ग्रीष्मे चार्धावशेषितम् ।
विपरीते ऋतौ तद्वत्प्रावृष्यष्टावशेषितम् ॥ १ ॥

शरदृतूमध्यें एक अष्टमांश (आठवा हिस्सा) आटविलेलें पाणी प्यावें. हेमंत ऋतूंत चवथाई आटविलेलें पाणी प्यावें. शिशिर, वसंत व ग्रीष्म ऋतूंत अर्धे आटविलेलें पाणी प्यावें. ऋतुविपर्यास झाला असतां (म्हणजे पावसाळ्यांत पाऊस न पडतां थंडी किंवा ऊन पडणें वगैरे) किंवा वर्षाऋतूमध्यें आटवून आठवा हिस्सा उरविलेलें पाणी प्यावें.

रात्रीं ऊन पाणी प्याल्याचे गुण.

भिनत्ति श्लेष्मसंघातं मारुतं चापकर्षति ।
अजीर्णं जरयत्याशु पीतमुष्णोदकं निशि ॥ १ ॥

रात्रीं ऊन पाणी प्यालें असतां तें कफसंचयाचा नाश करितें, वात शमवितें व अजीर्ण अन्नाचें पचन करितें (म्हणजे अजीर्णाचा नाश करितें.)

ऊन पाण्याचा निषेध.

दिवा शृतं तु यत्तोयं रात्रौ तद्गुरुतां व्रजेत् ।
रात्रौ शृतं दिवा तद्वद्गुरुत्वमधिगच्छति ॥ १ ॥

दिवसां तापविलेलें पाणी रात्रीं जड होतें व रात्रीं तापविलेलें पाणी दुसऱ्या दिवशीं जड होतें, (ह्यासाठीं दिवसां व रात्रीं वेगवेगळें पाणी तापवून प्यावें).

थंड पाण्याचा निषेध.

पार्श्वशूले प्रतिश्याये वातरोगे गलग्रहे ।
आध्माने स्तिमिते कोष्ठे सद्यःशुद्धे नवज्वरे ॥
हिक्कायां स्नेहपीते च शीताम्बु परिवर्जयेत् ॥ १ ॥

पार्श्वशूल, पडसें, गलग्रह (गळ्याचा अवरोध), पोट फुगणें, कोठा स्तब्ध होणें, नवज्वर, उचकी हे रोग ज्यांना आहेत, ज्यांनीं वमनविरेचनादि शोधन घेतलें आहे त्यांनीं व ज्यांनीं स्नेहपान केलें आहे त्यांनीं थंड पाणी पिऊं नये.

थोडें पाणी पिणें.

अरोचके प्रतिश्याये प्रसेके श्वयथुक्षये ।
मन्दाग्नावुदरे कोष्ठे ज्वरे नेत्रामये तथा ॥
व्रणे च मधुमेहे च पानीयं मन्दमाचरेत् ॥ १ ॥

अरोचक, पडसें, मळमळणें, सूज, क्षय, अग्निमांद्य, उदर, कोष्ठ-विकार, ज्वर, नेत्ररोग, व्रण, मधुमेह ह्या विकारांत पाणी मंद प्यावें.

तापवून थंड केलेल्या पाण्याचे गुण.

गुल्मार्शोग्रहणीक्षयेषु जठरे मन्दानलाध्मानके ।
शोफे पाण्डुगलग्रहे व्रणगदे मेहे च नेत्रामये ॥
वातारुच्यतिसारके कफयुते कुष्ठे प्रतिश्यायके ।
उष्णं वारि सुशीतलं शृतहिमं स्वल्पं प्रदेयं जलम् ॥१॥

गुल्म, मूळव्याध, संग्रहणी, क्षय, उदर, अग्निमांद्य, पोट फुगणें, सूज, पांडुरोग, गळ्याचा अवरोध, व्रण, मेह, नेत्रविकार, वातरोग, अरुचि, कफयुक्त अतिसार, कुष्ट, पडसें ह्या विकारांत तापवून थंड केलेलें पाणी द्यावें.

पाण्याच्या पाकाचा काल.

आमं जलं जीर्यति याममात्रं तदर्धमात्रं शृतशीतलं च ।
तदर्धमात्रं तु शृतं कदुष्णं प्रायः प्रपाके त्रय एव कालाः ॥१॥

थंड पाणी एका प्रहरामध्यें पचन होतें. तापवून थंड केलेलें पाणी अर्ध्या प्रहरामध्यें पचन होतें. आणि आधण आणून साधारण पिण्यासारखें केलेलें ऊन पाणी पाव प्रहरामध्यें पचन होतें. ह्याप्रमाणें पाण्याच्या परिपाकाचे तीन काल आहेत.

जलाधिक्यान्मनुष्याणामामवृद्धिः प्रजायते ।
आमवृद्ध्या तु मन्दाग्निर्मन्दाग्नौ चाप्यजीर्णता ॥ २ ॥
अजीर्णेन ज्वरोत्पत्तिर्ज्वरादौ धातुनाशनम् ।
धातुनाशात्सर्वरोगा जायन्ते चोत्तरोत्तरम् ॥ ३ ॥

अतिशय पाणी पिण्यानें मनुष्याच्या शरीरामध्यें आम वाढतो. आम वाढल्यानें अग्नि मंद होतो. अग्निमांद्यापासून अजीर्ण होतें. अजीर्णापासून ज्वर उत्पन्न होतो. ज्वराच्या आरंभीं धातुनाश होतो, व धातुनाश झाला असतां उत्तरोत्तर सर्व रोग होतात.

शर्करासहितं नीरं कफकृत्पवनापहम् ।
सितासितोपलायुक्तं शुक्रलं दोषनाशनम् ॥ ४ ॥

साखर घातलेलें पाणी कफकारक असून वाताचा नाश करितें. आणि खडीसाखर घालून प्यालेलें पाणी शुक्रवर्धक व दोषनाशक

असतें. गूळ घातलेलें पाणी मूत्रकृच्छ्रनाशक व कफपित्तकारक आहे.

नारळाच्या पाण्याचे गुण.

सगुडं मूत्रकृच्छ्रघ्नं पित्तश्लेष्मकरं भवेत् ।
स्निग्धं स्वादु हिमं हृद्यं दीपनं बस्तिशोधनम् ।
वृष्यं पित्तपिपासाघ्नं नारिकेलोदकं लघु ॥ १ ॥

नारळाचें पाणी स्निग्ध, गोड, थंड, हृदयाला प्रिय, अग्निदीपक बस्तिशोधक, कामोत्तेजक, पित्तनाशक व तृषानाशक आहे.

दुधाचे गुण.

दीप्तानले कृशे पुंसि बाले वृद्धे रतिप्रिये ।
मतं हिततमं यस्मात्सद्यःशुक्रकरं पयः ॥ १ ॥

दूध हें त्वरित वीर्य उत्पन्न करणारें आहे, म्हणून तें ज्याचा अग्नि प्रदीप्त आहे व जो कृश आहे त्याला, लहान मुलाला, वृद्ध मनुष्याला व मैथुनेच्छूला फार हितावह आहे.

जीर्णज्वरे मूत्रकृच्छ्रे रक्तपित्ते मदात्यये ।
कासे श्वासे प्रशंसन्ति गव्यं क्षीरं भिषग्वराः ॥ २ ॥
गोक्षीरं मधुरं शीतं गुरु स्निग्धं रसायनम् ।
बृंहणं स्तन्यकृद्बल्यं जीवनं वातपित्तनुत् ॥ ३ ॥

जीर्णज्वर, रक्तपित्त, मूत्रकृच्छ्र, मदात्यय, खोकला आणि श्वास ह्या विकारांमध्यें गाईचें दूध प्रशस्त आहे, असें वैद्य सांगतात. गाईचें दूध मधुर, थंड, जड, स्निग्ध, रसायन, पौष्टिक, स्तनांतील दूध वाढविणारें, शक्तिवर्धक, जीवन (आयुष्याची वृद्धि करणारें) व वातपित्तनाशक आहे.

गव्यं माहिषमाजं च कारभं स्त्रैणमाविकम् ।
ऐभमैकशफं चेति क्षीरमष्टविधं मतम् ॥ ४ ॥

गाईचें, म्हशीचें, शेळीचें, उंटिणीचें, स्त्रीचें, मेंढीचें, हत्तिणीचें, व एकखुरी (घोडी) प्राण्याचें असें आठ प्रकारचें दूध आहे.

वर्णभेद.

कृष्णगव्या वरं क्षीरं वातपित्तकफप्रणुत् ।
पीताया वातपित्तघ्नं रक्ताया वातहृत्परम् ॥ १ ॥
चित्रायास्तद्वदाख्यातं श्वेतायाः श्लेष्मलं गुरु ।
बालवत्साविवत्सानां गवां क्षीरं त्रिदोषकृत् ॥ २ ॥

वष्कयण्यास्त्रिदोषघ्नं तर्पणं बलकृत्पयः।
पिण्याकाद्यशनाज्जातं क्षीरं गुरु कफावहम् ॥ ३ ॥
निद्रारेतोबलस्थौल्यवह्निमान्द्यकरं हिमम्।

काळ्या (कपिला) गाईचें दूध श्रेष्ठ असून वात, पित्त व कफ ह्या तिन्हीही दोषांचें नाशक आहे. पिंवळ्या गाईचें दूध वात-पित्तनाशक आहे आणि तांबड्या गाईचें अत्यंत वातनाशक आहे. चित्रवर्ण (काळ्या वर्णाच्या) गाईचें दूधही तसेंच असून पांढऱ्या गाईचें कफकारक व जड आहे. जिचें वासरूं लहान आहे किंवा जिला वासरूं नाहीं, तिचें दूध त्रिदोषकारक असतें. विऊन फार दिवस झालेल्या गाईचें दूध त्रिदोषनाशक, तृप्तिकारक व बलवर्धक असतें. पेंड वगैरे खाणाऱ्या गाईचें दूध जड, कफकारक, झोंप आणणारें, शुक्र, बल, स्थूलपणा व अग्निमांद्य ह्यांना उत्पन्न करणारें व थंड असतें.

दुधाच्या फेसाचे गुण.

कृष्णगव्याः पयःफेनो ह्यजानां चातिशस्यते ॥ ४ ॥
मन्दाग्नीनां कृशानां च विशेषादतिसारिणाम्।
उत्साहदीपनं बल्यं मधुरं वातनाशनम् ॥ ५ ॥
सद्यो बलकरं दण्डतप्तक्षीरं विलोडितम्।
क्षीणे ज्वरातिसारे च सामे च विषमे ज्वरे ॥
मन्दाग्नौ कफमाश्रित्य पयःफेनः प्रशस्यते ॥ ६ ॥

काळ्या गाईच्या दुधावरील फेस व शेळीच्या दुधावरील फेस ज्यांचा अग्नि मंद आहे, जे कृश आहेत त्यांना व विशेषतः जे अतिसारी आहेत त्यांना हितावह असून अग्निदीपक, बलकारक, उत्साह देणारा, वातनाशक व मधुर असतो. तापलेला लोखंडाचा दांडा दुधांत बुडविला असतां त्यावर जो फेस येतो तो तात्काल-बलदायक असतो. क्षीण झालेले, ज्वर व अतिसार ह्यांनीं पीडि-लेले, आमयुक्त अतिसार, विषमज्वर, व कफामुळें झालेलें अग्नि-मांद्य ह्या विकारांनीं पीडिलेल्यांना दुधावरील फेस प्रशस्त आहे.

म्हशीच्या दुधाचे गुण.

माहिषं मधुरं क्षीरं स्निग्धं गुरु बलप्रदम्।

निद्राशुक्रकरं शीतमभिष्यन्द्यग्निमान्द्यकृत् ॥ १ ॥

म्हशीचें दूध मधुर, बलकारक, स्निग्ध, जड, झोंप आणणारें शुक्रवर्धक, थंड, कफकारक, व अग्नीला मंदत्व आणणारें आहे.

शेळीच्या दुधाचे गुण.

आजं गव्यगुणं ग्राहि विशेषाद्दीपनं लघु ।
हन्ति क्षयार्शोतीसारत्रिदोषास्रभ्रमज्वरान् ॥ १ ॥
अजानामल्पकायत्वात्कटुतिक्तनिषेवणात् ।
नात्यम्बुपानाद्व्यायामात्त्रिदोषघ्नमजापयः ॥ २ ॥

शेळीचें दुध गुणानें गाईच्या दुधासारखें, ग्राही (मळाला घट्ट-पणा आणणारें), विशेषतः अग्निदीपक, हलकें व क्षय, मूळव्याध, अतिसार, त्रिदोष, रक्तपित्त, भ्रम, ज्वर ह्यांचा नाश करितें. शेळ्यांच शरीर लहान असून त्या कडू, तिखट अशा वनस्पतींचा आहार करितात. पाणी फार पीत नाहींत व त्यांचा व्यायाम फार असतो, म्हणून त्यांचें दूध त्रिदोषनाशक असतें.

मेंढीच्या दुधाचे गुण.

आविकं मधुरं केश्यं स्निग्धं वातकफापहम् ।
गुरु कालेऽनिलोद्भूते केवले चानिले वरम् ॥ १ ॥

मेंढीचें दूध, मधुर, केशांना हितावह, स्निग्ध, जड, कालानुरूप होणाऱ्या वातविकारावर व केवळ वातविकारावर हितकारक आहे.

उंटिणीचें दूध.

औष्ट्रं स्वादु पयो रूक्षं लवणं लघु दीपनम् ।
क्रिमिकुष्ठकफानाहशोफोदरहरं परम् ॥ १ ॥

उंटिणीचें दूध गोड, खारट, रूक्ष, हलकें, दीपक असून क्रिमि, कुष्ठ, कफ, पोटफुगी, सूज व उदर ह्यांचा नाश करितें.

हत्तिणीचें दूध.

हस्तिन्या दुर्जरं दुग्धं वातश्लेष्मकरं गुरु ।
मधुरं पित्तनुद्बल्यं शीतं श्रमवतां हितम् ॥ १ ॥

हत्तिणीचें दूध पचन होण्यास कठीण, वातकफकारक, जड, मधर, पित्तनाशक, बलकर, थंड व श्रम करणाराला हितावह आहे.

घोडीचें दूध.

आश्वमुष्णं पयो रूक्षं बल्यं श्वासानिलापहम् ।

अम्लं पटु लघु स्वादु सर्वमेकशफं तथा ॥ १ ॥

घोडीचें दूध उष्ण, रूक्ष, बलकर, श्वास व वातनाशक आहे. सर्व एकखुरी प्राण्यांचें दूध आंबट, खारट, हलकें व गोड असतें.

गाढवीचें दूध.

श्वासवातहरं साम्लं लवणं रुचिदीप्तिकृत् ।
कफकासहरं बालरोगघ्नं गर्दभीपयः ॥ १ ॥

गाढवीचें दूध श्वास, वात, कफ, खोकला व बालरोग यांचें नाशक, आंबट, खारट, रुचिकारक व अग्निदीपक आहे.

स्त्रीचें दूध.

नार्या लघु पयः शीतं दीपनं वातपित्तजित् ।
चक्षुःशूलाभिघातघ्नं नस्याश्चोतनयोर्हितम् ॥ १ ॥
प्रलापमूर्छाभ्रमदाहयुक्ते तृषान्विते दोषसमूहमूर्तौ ।
पयोऽङ्गनानां पिबतां नराणां प्रागेव जूर्तिः प्रशमं प्रयाति ॥२॥
स्तन्यं रुद्राक्षसंयुक्तमाहारार्थं प्रयोजयेत् ।

स्त्रीचें दूध हलकें, थंड, दीपन, वातपित्तनाशक, डोळयाचा ठणका व डोळयाला कांहीं लागून झालेली इजा ह्यांना दूर करणारें, नस्य (नाकांत घालणें) व आश्चोतन कर्मांत (डोळयांत पातळ औषधांचे थेंब सोडून त्यानें डोळा भरणें) हितकारक व बडबड, मूर्च्छा, भ्रम, दाह, तृषा व दोषसमुदाय ह्यांना हितकर आहे. ज्वर येण्यापूर्वीं स्त्रीचें दूध प्राशन केलें असतां ज्वराचें शमन होतें. स्त्रीचे दुधांत रुद्राक्ष मिसळून मग तें प्राशनाकरितां द्यावें.

दोषज्वरेऽतिसारे च शूले च ग्रहणीगदे ॥ ३ ॥
पाण्डुरोगे क्षये चार्शःशोफे मन्दाग्निकेऽरुचौ ।
प्रसेके च प्रतिश्याये क्रिमिरोगे भगंदरे ।
उदावर्ते विषूच्यां च स्तन्यपानं प्रशस्यते ॥ ४ ॥
मानुष्यं मधुरं स्तन्यं कषायानुरसं हिमम् ।
नस्याश्चोतनपथ्यं च जीवनं लघु दीपनम् ॥ ५ ॥

दोषी ज्वर, अतिसार, शूल, संग्रहणी, पांडुरोग, क्षय, मूळव्याध शूल, मंदाग्नि, अरुचि, मळमळ, पडसें, क्रिमिरोग, भगंदर, उदावर्त, विषूचिका, ह्या विकारांवर स्तन्य (स्त्रियांचें दूध) प्राशन करणें प्रशस्त आहे. स्त्रीचें दूध मधुर, किंचित् तुरट, थंड, नस्य व

आश्चोतन ह्यांना हितावह, आयुष्यवर्धक (जीवन), हलकें व अग्नि-दीपक आहे.

धारोष्ण दुधाचे गुण.

धारोष्णं शस्यते गव्यं धाराशीतं तु माहिषम्।
शृतोष्णमाविकं पथ्यं शृतशीतमजापयः ॥ १ ॥
पित्तघ्नं माहिषं क्षीरं वातघ्नं चाऽऽविकं पयः।
वातपित्तहरं गव्यं त्रिदोषघ्नमजापयः ॥ २ ॥

गाईचें दूध धारोष्ण घ्यावें आणि म्हशीचें दूध धार काढून निवाल्यावर घ्यावें. तापवून कढत आहे तोंच घेणें तर तें मेंढीचें घ्यावें. आणि तापवून थंड झाल्यावर शेळीचें घ्यावें. म्हशीचें दूध पित्तनाशक, मेंढीचें दूध वातनाशक, गाईचें वातपित्तनाशक, आणि शेळीचें दूध त्रिदोषनाशक आहे.

धारोष्णं पवनप्रकोपशमनं दुग्धं गवां पुष्टिकृत्।
पांडुं कामलकां निहन्ति तरसा क्षीणोर्जकृच्छ्रीकरम्।
दाहं देहगतं करांघ्रिनयनज्वालां च पित्तोन्नतिं
दुष्टास्रं कृशतां कृशानुजनितां कृच्छ्रांश्च रोगाञ्जयेत् ॥३॥

गाईचें धारोष्ण दूध प्रकुपित झालेल्या वाताची शांति करितें. देहाला पुष्ट करितें, क्षीणाला शक्ति देतें व कांति वाढवितें. तसेंच शरीराचा दाह, हातापायाची जळजळ, पित्ताचा प्रकोप, रक्तदोष, कृशपणा व जठराग्नीसंबंधीं सर्व रोग ह्यांना दूर करितें.

न तापविलेल्या दुधाचे गुण.

आमं क्षीरमभिष्यन्दि गुरु श्लेष्मामवर्धनम्।
तदपथ्यं भवेत्सर्वं गव्यमाहिषवर्जितम् ॥ १ ॥

कच्चें (निरसें) दूध अभिष्यंदी (स्रावकारक), जड व कफ व आम यांचें नाशक आहे. गाईचें व म्हशीचें दूध खेरीजकरून बाकी सर्व जातीचीं दुधें कच्चीं सेवन केलीं असतां अपथ्यकारक आहेत.

तापविलेल्या दुधाचे गुण.

शृतोष्णं कफवातघ्नं शृतशीतं तु पित्तनुत्।
अर्धोदकं क्षीरशिष्टमामाल्लघुतरं हितम् ॥ १ ॥
अक्कथितं दश घटिकाः कथितं द्विगुणाश्च ताः पयः पथ्यम्।

उषसि रसाढ्यं यावत्तावद्रुचिकृत्पथः प्राश्यम् ॥ २ ॥
जीर्णज्वरे किंतु कफे विलीने स्याद्दुग्धपानं तु सुधासमानम् ।
तदेव पीतं तरुणज्वरे च निहन्ति हालाहलवन्मनुष्यम् ॥ ३ ॥
चतुर्थभागं सलिलं निधाय यत्नाद्यदावर्तितमुत्तमं तत् ।
सर्वामयघ्नं बलपुष्टिकारि ओजःप्रदं क्षीरमतिप्रशस्तम् ॥ ४ ॥
बल्यं बृंहणमग्निवृद्धिजननं पूर्वाह्णकाले पयो
मध्याह्ने बलदायकं रुचिकरं कृच्छ्राश्मरीछेदनम् ।
बालेष्वग्निकरं क्षये बलकरं वृद्धस्य रेतःप्रदं
रात्रौ क्षीरमनेकदोषशमनं सेव्यं सदा प्राणिनाम् ॥५ ॥

तापविलेलें कढत दूध कफ, वात यांचें नाशक, तापवून निवालेलें पित्तनाशक, आणि दुधाच्या अर्धे पाणी घालून पाणी आटवून शिल्लक राखलेलें दूध कच्च्या दुधापेक्षां फार हलकें असून पथ्यकारक आहे. न तापविलेलें दूध दहा घटिका व तापविलेलें वीस घटिका पथ्यकारक असतें. जोंपर्यंत दुधामध्यें गोडी व चव आहे तोंपर्यंत तें प्रातःकाळीं प्यावें. कफ कमी झाल्यावर जीर्णज्वरामध्यें दूध प्राशन करावें. तें अमृताप्रमाणें गुण करितें. पण तेंच नूतन (तरुण) ज्वरांत प्राशन केलें असतां विषाप्रमाणें मनुष्याला मारतें. चवथाई पाणी घालून पाणी आटेपर्यंत शिजवून घेतलेलें दूध अति उत्तम, सर्व रोगनाशक, बळपुष्टिकारक, ओज (शुक्रतेज) वाढविणारें व अतिशय प्रशस्त आहे. नित्य दिवसाच्या पूर्वभागांत दूध प्राशन करण्यानें बळ व पुष्टि प्राप्त होऊन अग्नीची वृद्धि होते. दिवसाच्या मध्यभागांत दूध प्राशन करण्यानें शक्ति वाढते, रुचि येते, मूत्रकृच्छ्र व अश्मरी (मूतखडा) ह्यांचा नाश होतो. रात्रीं दूध प्राशन करण्यानें लहान मुलांचा अग्नि प्रदीप्त होतो. क्षयरोग्याला शक्ति येते. वृद्धाला शुक्रोत्पत्ति करितें आणि अनेक दोषांचें शमन होतें. म्हणून मनुष्यानें नित्य रात्रीं दूध प्यावें.

नवज्वरे च मन्दाग्नौ ह्यामदोषेषु कुष्ठिनाम् ।
शूलिनां कफदोषेषु कासिनामतिसारिणाम् ॥ ६ ॥
पयःपानं न कुर्वीत विशेषात्क्रिमिदोषिणम् ।

नवज्वर, अग्निमांद्य, आमदोष, कुष्ठ, शूल, कफदोष, खोकला,

अतिसार हे विकार ज्यांना आहेत त्यांनीं व हें विशेषतः क्रिमि-दोषकारक आहे म्हणून ज्यांला जंताचा विकार आहे त्यांनीं दूध सेवन करूं नये.

शर्करासहितं क्षीरं कफकृत्पवनापहम् ॥ ७ ॥
सितासितोपलायुक्तं शुक्रलं दोषनाशनम् ।
सगुडं मूत्रकृच्छ्रघ्नं पित्तश्लेष्मकरं तथा ॥ ८ ॥
क्षीरं न भुञ्जीत कदाऽप्यतप्तं तप्तं च नैतल्लवणेन सार्धम् ।
पिष्टेन संधानकषायमुद्गकोशातकीकन्दफलादिकैश्च ॥ ९ ॥

साखर घातलेलें दूध कफकारक व वातनाशक आहे. खडी-साखर घातलेलें दूध धातुवर्धक व दोषनाषक आहे. गूळ घातलेलें दूध मूत्रकृच्छनाशक व कफपित्तकारक आहे. तापविल्याखेरीज दूध केव्हांही पिऊं नये आणि तापलेलें दूध देखील मीठ घालून पिऊं नये. त्याचप्रमाणें पीठ, संधान (मद्यविशेष), तुरट पदार्थ, मूग दोडका वगैरे फळें व कंद ह्यांच्याशींही दूध सेवन करूं नये.

दुधाशीं मिसळण्याचे पदार्थ.

सहकारफलं चैव गोस्तनी माक्षिकं घृतम् ।
नवनीतं शृङ्गवेरं पिप्पली मरिचानि च ॥ १ ॥
सितापृथुकसिन्धूत्थं पटोलं नागराभयाः ।
क्षीरेण सह शस्यन्ते वर्गेषु मधुरादिषु ॥ २ ॥
अम्लेष्वामलकं पथ्यं शर्करा मधुरेषु च ।
पटोलः शाकवर्गेषु कटुकेष्वार्द्रकं भवेत् ।
कषायेषु यवाश्चैव लवणेषु च सैन्धवम् ॥ ३ ॥

आंबा, गोस्तनी मनुका, मध, तूप, लोणी, आलें, पिंपळी, मिरीं, साखर, पोहे, सैंधव, पडवळ, सुंठ व हिरडा हे मधुरवर्गांतील पदार्थ दुधाशीं खाण्यास प्रशस्त आहेत. तसेंच आम्लवर्गांतील आवळा, मधुरवर्गांत साखर, शाकवर्गांत पडवळ, तिखट पदार्थांत आलें, तुरट पदार्थांत सातु आणि खारट पदार्थांत सैंधव हे पदार्थ दुधाशीं सेवन करण्यास प्रशस्त आहेत.

दुधाशीं विरुद्ध पदार्थ.

मत्स्यमांसगुडमुद्गमूलकैः कुष्ठमावहति सेवितं पयः ।
शाकजाम्बवसुरादिसेवितं मारयत्यबुधमाशु सर्पवत् ॥ १ ॥

नैकध्यं पयसाऽश्नीयात्सर्वं चोष्णं द्रवद्रवम् ।
मूलकाद्या हरितकास्तैलपिण्याकसर्षपाः ॥ २ ॥
कपित्थं जम्बु जम्बीरं पनसं मातुलिङ्गकम् ।
वांशं करीरं बदरं कदलीं चाम्लदाडिमम् ॥ ३ ॥
फलमीदृग्विधं चान्यत्तद्वद्बिल्वफलान्यपि ।
क्षीरे विरुद्धान्यैकध्यं सह वै भुज्यते यदि ॥ ४ ॥
बाधिर्यमान्ध्यं वैवर्ण्यं मूकत्वं चाथ मारणम् ।

मासे, मांस, गूळ, मूग व मुळे ह्या पदार्थांशीं दूध सेवन केलें असतां कुष्ठ उत्पन्न होतें. भाजीपाला, जांभळें, सुरा (मद्य), ह्यांच्याशीं दूध सेवन केलें असतां तें सर्पाप्रमाणें प्राणनाशक होतें. म्हणून ह्या पदार्थांशीं मिसळून दूध कधींही खाऊं नये. तसेंच कोणतेही पातळ किंवा घट्ट पदार्थ उष्ण असतां ते व मुळे आदिकरून हरीतक (अजवला, शेवगा, मोहरी, लसूण, कांदा वगैरे भाज्या), तेल, पेंड (तिळकूट), शिरस, कवठ, जांभूळ, लिंबू, फणस, महाळुंग, वेळूचे कोंब, बोरें, केळीं, आंबट डाळिंब, अशाच प्रकारचीं दुसरीं फळें व बेलफळें हे सर्व पदार्थ दुधाशीं विरुद्ध आहेत. हे जर दुधाशीं एकत्र मिसळून भक्षण केले तर बहिरेपणा, आंधळेपणा, विवर्णता (शरीराचा रंग बदलणें), मुकेपणा हे विकार होतात किंवा मृत्युही येतो.

दुधाच्या साईचे गुण.

संतानिका स्वानुरूपा शृतदुग्धोपरि स्थिता ।
संतानिका गुरुः शीता वृष्या पित्तास्रवातनुत् ॥ १ ॥

तापल्या दुधावर आलेली दुधासारखीच पांढरी शुभ्र दिसणारी दुधाची साय जड, थंड व वृष्य (कामोद्दीपक) असून रक्त, पित्त व वातनाशक आहे.

दह्याचे गुण.

गव्यं दध्युत्तमं बल्यं पाके स्वादु रुचिप्रदम् ।
पवित्रं दीपनं स्निग्धं पुष्टिकृत्पवनापहम् ॥ १ ॥

गाईचें दहीं उत्तम, बलकारक, रुचिकर, विपाककाळीं मधुर, पवित्र, दीपन, स्निग्ध, पुष्टिकारक व वातनाशक आहे.

माहिषं दधि सुस्निग्धं श्लेष्मलं वातपित्तनुत्।
स्वादुपाकमभिष्यन्दि वृष्यं गुर्वस्रदूषणम् ॥ २ ॥

म्हशीचें दहीं अतिशय स्निग्ध, कफकारक, वातपित्तनाशक, विपाककाळीं मधुर, अभिष्यंदि, वृष्य जड व रक्ताला दूषित करणारें आहे.

आजं दध्युत्तमं ग्राहि लघु दोषत्रयापहम्।
शस्यते श्वासकासार्शःक्षयकार्श्येषु दीपनम् ॥ ३ ॥

शेळीचें दहीं उत्तम प्रकारचें ग्राहक (मळाला घट्ट करणारें), हलकें, त्रिदोषनाशक, श्वास, खोकला, मूळव्याध, क्षय, व कृशपणा ह्यांना दूर करणारें व अग्नीचें दीपन करणारें आहे.

साय काढलेल्या दुधाच्या दह्याचे गुण.

असारं दधि संग्राहि कषायं वातलं लघु।
विष्टम्भि दीपनं रुच्यं ग्रहणीरोगनाशनम् ॥ १ ॥

निःसार दहीं ग्राहक तुरट, वातकारक, हलकें, मलावष्टंभक, अग्निदीपक, रुचिकारक, आणि संग्रहणीला दूर करणारें आहे.

अर्धमुरें दह्याचे गुण.

विदाहि सृष्टविण्मूत्रं मन्दजातं त्रिदोषकृत्।

मंद दहीं (अर्धवट विरझण लागलेलें) विदाहकारक, मलमूत्र साफ करणारें व त्रिदोषकारक असतें.

मन्दं दुग्धवदव्यक्तरसं किंचिद्घनं भवेत्।

मंद दहीं दुधाप्रमाणें अस्पष्ट रसाचें व किंचित दाट असें असतें.

सशर्करं दधि श्रेष्ठं तृष्णापित्तास्रदाहजित् ॥ २ ॥
सगुडं वातनुद्वृष्यं बृंहणं तर्पणं गुरु।

साखर घातलेलें दही उत्तम असून रक्त, पित्त व दाह ह्यांचें नाशक आहे. गूळ घातलेलें दहीं वातनाशक, वृष्य (कामोद्दीपक), पौष्टिक, तृप्तिदायक व जड असें असतें.

न रात्रौ दधि सेवेत न चाप्यघृतशर्करम् ॥ ३ ॥
नामुद्गसूपं नाक्षौद्रं नोष्णं नामलकैर्विना।
शस्यते दधि नो रात्रौ शस्तं चाम्बुघृतान्वितम् ॥ ४ ॥

रात्रीं दहीं खाऊं नये. खाणें झाल्यास तूपसाखर घातल्या-

वांचून खाऊं नये. किंवा मुगाचें कढण, मध, आवळकाठी ह्यांपैकी कांहीं तरी घातल्यावांचून किंवा ऊन केलेलें खाऊं नये. रात्रीं दहीं खाणें प्रशस्त नाहीं, तथापि खाणें झाल्यास तें तूप व पाणी मिसळून खाणें प्रशस्त आहे.

रक्तपित्तकफोत्थेषु विकारेषु हितं न तत्।

रक्तपित्त व कफविकार, ह्यांजवर दहीं खाणें प्रशस्त नाहीं.

मूत्रकृच्छ्रे प्रतिश्याये शीतगे विषमज्वरे ॥ ५ ॥
अतिसारेऽरुचौ कार्श्ये दिवा च दधि शस्यते।

मूत्रकृच्छ्र, पडसें, शीतपूर्व विषमज्वर, अतिसार, अरुचि व कृशत्व ह्या विकारांवर दिवसा दहीं खाणें प्रशस्त आहे.

हेमन्ते शिशिरे चैव वर्षासु दधि शस्यते ॥ ६ ॥
शरद्ग्रीष्मवसन्तेषु प्रायशस्तद्विगर्हितम्।

हेमंतऋतु, शिशिरऋतु, व वर्षाऋतु ह्या ऋतूंमध्यें दहीं खाणें प्रशस्त आहे. शरद्ऋतु, ग्रीष्मऋतु व वसंतऋतु ह्या ऋतूंमध्यें प्रायः तें निंद्य आहे.

दध्नस्तूपरि यत्तोयं तन्मस्तु परिकीर्तितम् ॥ ७ ॥
मस्तु क्लमहरं बल्यं लघु भक्ताभिलाषकृत्।
स्रोतोविशोधनाह्लादि कफतृष्णानिलापहम् ॥
अवृष्यं प्रीणनं शीघ्रं भिनत्ति मलसंग्रहम् ॥ ८ ॥

दह्यावर जें पाणी असतें, त्याला मस्तु म्हणतात. तें थकवा-नाशक, बलकर, हलकें, भाताची आवड उत्पन्न करणारें (भाता-बरोबर खाण्यास योग्य) किंवा क्षुधा उत्पन्न करणारें, स्रोतसांची शुद्धि करणारें, आनंदकारक, कफ, तहान व वात ह्यांचें नाशक, अवृष्य (कामेच्छा न करणारें), प्रीणन (तृप्तिकारक) व मलाचें त्वरित भेदन करणारें आहे.

साराचेगुण.

दध्नस्तूपरि भागो यो घनः स्नेहसमन्वितः।
लोके सर इति ख्यातो दध्नो वारि तु मस्त्विति ॥ १ ॥

---

* वर्षाऋतूमध्यें दहीं खावें म्हणून सांगितलें आहे. ह्याचें कारण तें अम्ल व स्निग्ध ह्या गुणांनीं वाताचा नाश करतें म्हणून.

सरः स्वादुर्गुरुर्वृष्यो वातवह्निप्रणाशनः ।
बस्तेर्विधमनश्चाम्लपित्तश्लेष्मविवर्धनः ॥ २ ॥

दह्यावरचा घट्ट व स्नेहयुक्त असा जो भाग त्याला लोकांमध्यें "सर" असें म्हणतात. आणि दह्यावर जें पाणी असतें त्याला "मस्तु" असें म्हणतात. "सर" हा गोड, जड, वृष्य, वातनाशक, अग्निमांद्यकारक, अम्लपित्त व कफ ह्यांना वाढविणारा व बस्तीचें विधमन करणारा आहे.

ताकाचे गुण.

घोलं मथितमुदश्वित्तक्रं चतुर्विधं ज्ञेयम् ।
ससरं निर्जलं घोलं मथितं सरवर्जितम् ।
तक्रं पादजलं प्रोक्तमुदश्विच्चार्धवारिकम् ॥ १ ॥
दिवोदासप्रभृतयस्तक्रमर्धजलं जगुः ।
पादतोयं विनिगदन्त्युदश्विदपि तत्तथा ॥ २ ॥

घोल, मथित, उदश्वित् व ताक, असे ताकाचे चार प्रकार आहेत. पाणी न घालतां व लोणी न काढतां नुसतें घुसळून सारखें करून घेतात त्याला '**घोल**' असें म्हणतात. पाणी न घालतां घुसळून लोणी काढून घेतात, त्याला मथित (मट्ठा) असें म्हणतात. चवथाई पाणी घालून घुसळून लोणी काढून घेतात त्याला ताक असें म्हणतात आणि अर्धें पाणी घालून घुसळून लोणी काढून घेतात त्यास उदश्वित् असें म्हणतात. दिवोदास (काशिराज धन्वन्तरीचा अवतार, सुश्रुताचे गुरु) प्रभृति आचार्य अर्धें पाणी घातलें असतां त्याला ताक म्हणतात व चतुर्थांश पाणी घातलें असतां त्याला उदश्वित् असें म्हणतात.

वातपित्तहरं घोलं मथितं कफपित्तनुत् ।
तक्रं त्रिदोषशमनमुदश्वित्कफदं स्मृतम् ॥ ३ ॥

घोल हें वातपित्तनाशक आहे. मथित (मट्ठा) हें कफपित्तनाशक आहे. ताक त्रिदोषशामक आहे आणि उदश्वित् हें कफकारक आहे.

गव्यं तु दीपनं तक्रं मेध्यमर्शोत्रिदोषनुत् ।

हितं गुल्मातिसारेषु प्लीहार्शोग्रहणीगदे ॥ ४ ॥

गाईचें ताक अग्निदीपक, बुद्धिवर्धक व मूळव्याध व त्रिदोष यांचें नाशक असून गुल्म, अतिसार, पांथरी, मूळव्याध व संग्रहणी ह्या विकारांना पथ्यकारक आहे.

माहिषं श्लेष्मलं तक्रं सान्द्रं शोफकरं गुरु ।

म्हशीचें ताक कफकारक, दाट, सूज उत्पन्न करणारें व जड आहे.

सुस्निग्धं छागलं तक्रं लघु दोषत्रयापहम् ॥ ५ ॥
गुल्मार्शोग्रहणीशोफपाण्ड्वामयविनाशनम् ।

शेळीचें ताक अतिशय स्निग्ध, हलकें व त्रिदोषनाशक असून गुल्म, मूळव्याध, संग्रहणी, सूज, व पांडुरोग ह्यांचें नाशक आहे.

वातेऽम्लं सैन्धवोपेतं स्वादु पित्ते सशर्करम् ॥ ६ ॥
पिबेत्तक्रं कफे रूक्षं व्योषक्षारसमन्वितम् ।
मूत्रकृच्छ्रे तु सगुडं पाण्डुरोगे सचित्रकम् ॥ ७ ॥

वातविकारावर आंबट ताक सैंधव घालून द्यावें. पित्तविकारावर गोड ताक साखर घालून द्यावें. आणि कफविकारावर लोणी काढलेलें (रूक्ष[१]) ताक सुंठ, मिरीं, पिंपळी व जवखार ह्यांचें चूर्ण घालून द्यावें. मूत्रकृच्छ्र (उन्हाळे) विकारावर गूळ घालून व पांडुरोगावर चित्रक घालून ताक द्यावें.

हिंगुजीरयुतं घोलं सैन्धवेनावधूलितम् ।
तद्भवेदतिवातघ्नमर्शोतीसारनाशनम् ॥ ८ ॥
सुरुच्यं पुष्टिदं बल्यं बस्तिशूलविनाशनम् ।
शीतकालेऽग्निमान्द्ये च कफवातामयेषु च ॥ ९ ॥
अरुचौ स्रोतसां रोधे तक्रं स्यादमृतोपमम् ।

हिंग, जिरें, व सैंधव ह्यांचें चूर्ण घालून तयार केलेलें "घोल" नांवाचें ताक अतिशय वातनाशक, मूळव्याध व अतिसार ह्यांना दूर करणारें, रुचिकारक, पौष्टिक, व बलकारक आणि बस्तिशूलनाशक आहे. हिवाळ्यामध्यें व अग्निमांद्य, कफवातविकार, अरुचि, स्रोतसांचा अवरोध ह्या विकारांत ताक हें अमृताप्रमाणें आहे.

---

१. रूक्ष ह्मणजे लोणी काढलेलें ताक कफविकारावर द्यावें, असें ह्मटलें आहे. ह्यावरून वात व पित्त विकारावर लोणी न काढतां नुसतें घुसळून सारखें करून द्यावें असें ध्वनित होतें व तसें घेणें हेंच सशास्त्र दिसतें.

नैव तक्रं क्षते दद्यान्नोष्णकाले न दुर्बले ।
न मूर्छाभ्रमदाहेषु न रोगे रक्तपित्तजे ॥ १० ॥

उरःक्षत रोगामध्यें व उन्हाळ्यांमध्यें ताक सेवन करूं नये. तसेंच तें मूर्च्छा, भ्रम (भोंवळ), दाह, रक्तपित्त हे रोग ज्यांना आहेत त्यांनीं व अशक्त मनुष्यानें सेवन करूं नये.

तक्रं तल्लवणोपेतं दीपनं ग्रहणीगदे ॥
तक्रं लवणहीनं यद्ग्रहण्यर्शोविकारकृत् ॥ ११ ॥

संग्रहणीच्या विकारांत मीठ घातलेलें ताक दिलें असतां तें जठराग्नीचें दीपन करितें. मीठ न घातलेलें ताक संग्रहणी व मूळव्याध हे रोग उत्पन्न करितें.

क्षुद्वर्धनं नेत्ररुजापहं च प्राणप्रदं शोणितमांसदं च ।
आमाभिघातं कफवातहन्तृ त्वष्टौ गुणा वै कथिता हि तक्रे १२

क्षुधावर्धक, नेत्ररोगनाशक, प्राणप्रद, रक्त व मांस यांचें वर्धक, आमनाशक व कफवातनाशक, असे हे ताकाचे आठ गुण सांगितले आहेत.

कढविलेलें ताक.

तक्रमामं कफं कोष्ठे हन्ति कण्ठे करोति च ।
पीनसश्वासकासादौ पक्वमेव विशिष्यते ॥ १ ॥
न तक्रसेवी व्यथते कदाचिन्न तक्रदग्धाः प्रभवन्ति रोगाः ।
यथा सुराणाममृतं प्रधानं तथा नराणां भुवि तक्रमाहुः ॥ २ ॥

न कढविलेलें ताक कोठ्यांतील कफाचा नाश करितें. पण घशामध्यें कफ उत्पन्न करितें. ह्यासाठीं पीनस, श्वास, खोकला, इत्यादि विकारांमध्यें कढविलेलें ताक घेणेंच विशेष आहे. ताकाचें सेवन करणाराला केव्हांही रोग होत नाहींत. आणि ताकानें बरे झालेले रोग पुन्हा उत्पन्न होत नाहींत. जसें देवांना अमृत हें श्रेष्ठ आहे तसें ह्या पृथ्वीवर मनुष्यांला ताक श्रेष्ठ आहे.

तक्राल्लघुतरो मन्थः कूर्चिका दधितक्रवत् ।
गोजाविमहिषीतक्रं तद्वद्दधिगुणाः पृथक् ॥ ३ ॥

ताकापेक्षा मंथ फार हलका आहे. व तक्रकूर्चिका ही दहीं व ताक ह्यांसारखी गुणानें आहे. गाई, म्हशी, शेळ्या व मेंढ्या

ह्यांच्या ताकाचे जे गुण सांगितले आहेत, तसेच त्यांच्या दह्याचे गुणही आहेत.

कैलासे यदि तक्रमस्ति गिरिशः किं नीलकण्ठो भवे-
द्वैकुण्ठे यदि कृष्णतामनुभवेदद्यापि किं केशवः ।
इन्द्रो दुर्भगतां क्षयं द्विजपतिर्लम्बोदरत्वं गणः
कुष्ठित्वं च कुबेरको दहनतामग्निश्च किं विन्दति ॥ ४ ॥

कैलासामध्यें जर ताक असतें तर शंकर नीलकंठ कां झाला असता? तसेंच वैकुंठांत ताक असतें तर अझूनपर्यंत विष्णूचें आपलें शरीर कृष्णवर्ण कां झालें असतें? त्याचप्रमाणें इंद्राच्या अंगावर भगें, चंद्राला क्षय, गणपतीच्या पोटाचें स्थूलत्व (लंबोदरत्व), कुबेराचें कुष्ठित्व, व अग्नीची दहनता (उष्णता) हे सर्व प्रकार स्वर्गांत ताक असतें तर कां टिकले असते?

लोण्याचे गुण.

नवनीतं हिमं गव्यं वृष्यं वर्णबलाग्निकृत् ।
संग्राहि वातपित्तार्शःक्षयेऽर्दितकासजित् ॥ १ ॥
तद्धितं बालके वृद्धे विशेषादमृतं शिशौ ।

गाईचें लोणी थंड, वृष्य, बलकारक, अग्निदीपक, वर्णकर, मलाला घट्ट करणारें, वात, पित्त, मूळव्याध, क्षय, अर्दित, व खोकला ह्याचें नाशक, लहान मुलांना व वृद्धांना हितावह आणि विशेषतः लहान मुलांना अमृताप्रमाणें गुणावह आहे.

माहिषं नवनीतं तु वातश्लेष्मकरं गुरुः ॥ २ ॥
दाहपित्तश्रमहरं मेदःशुक्रविवर्धनम् ।
आजं त्रिदोषशमनं नवनीतं तयोर्वरम् ॥ ३ ॥

म्हशीचें लोणी वातकफकारक, जड, दाह, पित्त, श्रम ह्यांचें नाशक, व मेद आणि शुक्र ह्यांना वाढविणारें आहे. शेळीचें लोणी, त्रिदोषशामक असून गाईच्या व म्हशीच्या लोण्याहून श्रेष्ठ आहे.

क्षीरोत्थं तदतिस्निग्धं चक्षुष्यं रक्तपित्तनुत् ।
वृष्यं बलकरं ग्राहि मधुरं शीतलं परम् ॥ ४ ॥

दुधावरील काढलेलें लोणी अतिशय स्निग्ध, डोळ्यांना हितावह,

रक्तपित्तनाशक, वृष्य, बलकारक, मलाला घट्ट करणारें, मधुर व अतिशय थंड आहे.

नवनीतं तु सद्यस्कं स्वादु ग्राहि हिमं लघु ।
मेध्यं किंचित्कषायाम्लमीषत्तक्रांशसंक्रमात् ॥ ५ ॥

ताजें लोणी गोड, मलाला घट्ट करणारें, थंड, हलकें, बुद्धिवर्धक, किंचित् तुरट आणि आंत किंचित् ताकाचा अंश असल्यामुळें किंचित् आंबटही असतें.

फार दिवसांच्या लोण्याचे गुण.

सक्षारकटुकाम्लत्वाच्छर्द्यर्शःकुष्ठकोपनम् ।
श्लेष्मलं गुरु मेदस्यं नवनीतं चिरंतनम् ॥ १६ ॥

फार दिवसांचें लोणी खारट, तिखट व आंबट असल्यामुळें ओकारी, मूळव्याध व कुष्ट ह्यांना कोपवितें. आणि जड असून कफ व मेद ह्यांना वाढवितें.

तुपाचे गुण.

धीकान्तिस्मृतिकारकं बलकरं मेधाकरं शुद्धिकृ-
द्वातघ्नं श्रमनाशनं स्वरकरं पित्तापहं पुष्टिदम् ।
वह्नेर्वृद्धिकरं विपाकमधुरं वृष्यं वपुःस्थैर्यदं
सेव्यं गव्यघृतोत्तमं बहुगुणं सद्यः समावर्तितम् ॥ १ ॥

गाईचें तूप बुद्धि, कांति, स्मृति, बल, व धारणाशक्ति, ह्यांना उत्पन्न करणारें, स्रोतसांचें शोधन करणारें, वातनाशक, श्रमनाशक, स्वरकारक, पित्तनाशक, पुष्टिकारक, अग्निवर्धक, मधुरविपाकी, वृष्य, शरीराला स्थिर करणारें (आयुष्यकारक), श्रेष्ठ व बहुगुणी आहे. म्हणून हें नेहमीं ताजें सेवन करावें.

सर्पिर्गवां चामृतकं विषघ्नं चक्षुष्यमारोग्यकरं च वृष्यम् ।
रसायनं मन्दमतीव मेध्यं स्नेहोत्तमं चेति बुधाः स्तुवन्ति ॥ २ ॥

गाईचें तूप हें केवळ अमृतच आहे. तें विषनाशक, नेत्राला हितावह, आरोग्यकारक, वृष्य, रसायन, कायमचा गुण देणारें व अतिशय बुद्धिवर्धक, असून सर्व स्नेहांमध्यें श्रेष्ठ आहे असें विद्वान लोक म्हणतात.

म्हशीचें तूप.

सर्पिर्माहिषमुत्तमं धृतिकरं सौख्यप्रदं कान्तिदं

वातश्लेष्मनिबर्हणं बलकरं वर्णप्रसादक्षमम् ।
दुर्नामग्रहणीविकारशमनं मन्दानलोद्दीपनं
चक्षुष्यं नवगव्यतः परमिदं हृद्यं मनोहारि च ॥ ३ ॥

म्हशींचें तूप उत्तम धारणाशक्ति देणारें, सुखदायक, कांतिवर्धक, कफवातनाशक, शक्तिवर्धक, शरीराचा वर्ण उत्तम करणारें, मूळव्याध व संग्रहणी ह्या रोगांचा नाश करणारें, मंदाग्नीला प्रदीप्त करणारें, नेत्राला हितावह आणि गाईच्या तुपापेक्षां मनोहर व हृदयाला हितावह (किंवा सर्वांना प्रिय) असें आहे.

शेळीचें तूप.

आजं घृतं दीपनं च चक्षुष्यं बलवर्धनम् ।
कासे श्वासे क्षये वाऽपि पथ्यं पानेषु तल्लघु ॥ ४ ॥

शेळीचें तूप अग्निदीपक, नेत्रांला हितावह व बलवर्धक, असून कास, श्वास व क्षय ह्या रोगांना पथ्यकारक व हलकें आहे.

मेंढीचें व उंटिणीचें तूप.

आविकं घृतमतीव गुरुत्वाद्वर्ज्यमेव सुकुमारनराणाम् ।
सद्य एव बलपुष्टिकरं स्यादौष्ट्रकं श्वयथुनाशकरं च ॥ ५ ॥

मेंढीचें तूप अतिशय जड आहे. म्हणून सुकुमार माणसांना तें खाण्याला वर्ज आहे. हें तात्काल बल व पुष्टि देतें. आणि उंटिणीचें दूध सुजेचा नाश करणारें आहे.

नव्या तुपाचे गुण.

योजयेन्नवमेवाज्यं भोजने तर्पणे श्रमे ।
बलक्षये पाण्डुरोगे कामलानेत्ररोगयोः ॥ १ ॥

नवें (ताजें) तूप श्रमनाशक व तृप्तिकारक आहे. म्हणून तेंच नेहमीं भोजनांत योजावें. तसें तें अशक्तपणा, पांडुरोग, कामला (कावीळ) व नेत्ररोग ह्यांजवरही योजावें.

जुनें तूप.

सर्पिः पुराणं विज्ञेयं दशवर्षस्थितं तु यत् ।
सर्पिः पुरातनं श्रेष्ठं त्रिदोषतिमिरापहम् ॥ ७ ॥
मूर्छाकुष्ठविषोन्मादग्रहापस्मारनाशनम् ।
दशसंवत्सरादूर्ध्वमाज्यमुक्तं रसायनम् ॥ ८ ॥
शतवर्षस्थितं यत्तु कुम्भसर्पिस्तदुच्यते ।

रक्षोघ्नं कुम्भसर्पिः स्यात्परतस्तु महाघृतम् ॥ ९ ॥
पेयं महाघृतं भूपैः सर्वतोऽपि गुणाधिकम् ।
यथा यथा जरां याति गुणवत्स्यात्तथा तथा ॥ १० ॥
भक्षणात्कासरोगघ्नमञ्जनान्नेत्ररोगजित् ।
शिरोऽभ्यङ्गादूर्ध्वजत्रुरोगघ्नं तत्पुरातनम् ॥ ११ ॥

जें तूप दहा वर्षेंपर्यंत ठेवलेलें असतें, त्याला जुनें तूप म्हणतात. जुनें तूप त्रिदोषजन्य तिमिररोग (अंधत्व) नाश करण्याविषयीं उत्तम आहे. मूर्च्छा, कुष्ठ, ग्रहबाधा, विषबाधा, उन्माद, व अपस्मार ह्यांचें नाशक आहे. दहा वर्षांवरील तूप रसायन आहे असें म्हणतात. शंभर वर्षांच्या जुन्या तुपाला " **कुंभसर्पिः** " असें म्हणतात. तें राक्षसबाधा दूर करणारें आहे. आणि " कुंभसर्पि " तुपापेक्षांही जें जुनें तूप त्याला " **महाघृत** " असें म्हणतात. सर्व तुपांपेक्षां ज्या अर्थीं तें गुणानें अधिक आहे, त्या अर्थीं तें राजानें प्राशन करावें. जसें जसें तूप जुनें होत जातें, तसें तसें तें गुणांनीं अधिक अधिक वाढत जातें (अधिक गुणावह होतें). जुनें तूप भक्षण केलें असतां कासनाशक, अंजन केलें असतां नेत्ररोगनाशक आणि मस्तकाला चोळून जिरविलें असतां मानेच्यावरील सर्व रोगांचें नाश करणारें आहे.

रोगविशेषानें तुपाचा निषेध.

राजयक्ष्माणि बाले च वृद्धे श्लेष्माश्रये गदे ।
रोगे सामे विषूच्यां च विबन्धे च मदात्यये ॥
ज्वरे मन्दानले मेहे न सर्पिर्बहु मन्यते ॥ १२ ॥

राजयक्ष्मा (क्षय), कफसंबधीं सर्व रोग, आमयुक्त रोग, विषूचिका, मलावरोध, मदात्यय, ज्वर, अग्निमांद्य व प्रमेह ह्या रोगांमध्यें आणि बाल व वृद्ध ह्यांना तूप खाणें प्रशस्त नाहीं.

तेलाचे गुण.

सर्वं वातहरं तैलं विशेषात्तिलसंभवम् ।
तैलं संयोगसंस्कारात्सर्वरोगहरं स्मृतम् ॥ १ ॥
तिलतैलमलंकरोति केशान्मधुरं तिक्तकषायमुष्णतीक्ष्णम् ।
बलकृत्कफवातजन्तुखर्जूव्रणकण्डूवर्तिहरं च कान्तिदायि ॥ २ ॥

कण्डूहरं कान्तिविवर्धनं च वर्चोविवृद्धिव्रणरोपणं च ।
तिलस्य जातं खलु यच्च तैलं बालेषु वृद्धेष्वपि पथ्यमेतत् ॥ ३

सर्व प्रकारचीं तेलें वातहारक आहेत. तथापि तिळाचें तेल विशेषतः वातनाशक आहे. इतर द्रव्यांचा संयोग व संस्कार ह्यांच्या योगानें तेल सर्वरोगनाशक होतें. तिळाचें तेल केशांना सुशोभित करितें. तें गोड, कडू, तुरट, उष्ण, तीक्ष्ण, बलकारक, कफ, वात, जंतु, खरूज, व्रण, कंडू व वेदना ह्यांचा नाश करणारें व कांतिदायक आहे. तिळाच्या तेलाचे आणखी गुणः—तिळापासून निघालेलें जें तेल तें कंडुनाशक, कांति वाढविणारें, तेज आणणारें, व्रणाला भरून आणणारें आणि बाल व वृद्ध ह्यांना देखील पथ्यकर आहे.

न पित्तरोगे न च शोणिते च पथ्यं महावातविकारसंघे ।
तिलोद्भवं तैलमुदाहरन्ति वाताश्रितान्हंति समस्तदोषान् ४

पित्तविकार, रक्तविकार, व महावातसंबंधीं विकारसमुदाय, ह्यांजवर तिळाचें तेल पथ्यकारक नाहीं. तिळाचें तेल सर्व वातसंबंधीं विकारांचा नाश करितें, असें सांगतात.

एरंडेल तेल.

तैलमेरण्डजं बल्यं गुरूष्णं मधुरं सरम् ।
तिक्तोष्णं पित्तलं विस्रं रक्तैरण्डोद्भवं भृशम् ॥ ५ ॥
एरण्डतैलं क्रिमिनाशनं च सर्वत्र शूलघ्नमरुत्प्रणाशम् ।
कुष्ठापहं चापि रसायनं च पित्तप्रकोपानिलशोधनं च ॥ ६ ॥
वर्ध्मगुल्मानिलकफानुदरं विषमज्वरम् ।
वातशूलगजेन्द्राणामेरण्डस्नेहकेसरी ॥ ७ ॥

एरंडेल बलकारक, जड, उष्ण, मधुर, सारक, कडू, उष्ण, पित्तकारक, अपक्व, मांसगंधी म्हणजे वाईट वासाचें आहे. तांबड्या एरंडाचे तेलाचे गुण ह्यापेक्षां तीव्र आहेत. एरंडेलाचे आणखी गुण. एरंडेल क्रिमिनाशक, सर्व ठिकाणचा शूल व वातनाशक, कुष्ठनाशक, रसायन, पित्ताचा प्रकोप करणारें, वातदोषाची शुद्धि करणारें, वर्ध्म रोग (आडसंधीचे ठिकाणीं गांठ येते ती वळ किंवा बद) गुल्म, वात, कफ, उदर, विषमज्वर, वातरोग व शूल ह्या हत्तींप्रमाणें बलवान रोगांना एरंडेल तेल हे सिंहाप्रमाणें जिंकणारें आहे.

शिरसाचें तेल.

सार्षपं क्रिमिनुत्तैलं कुष्ठकण्डूहरं लघु ।
पित्तास्रदूषणं हन्ति मेदःकर्णशिरोग्रहान् ॥ ८ ॥

शिरसाचें तेल क्रिमिनाशक, कुष्ठ व कंडू ह्यांना दूर करणारें, हलकें, रक्तपित्ताला दूषित करणारें, मेद, कर्णशूल व मस्तकपीडा ह्याचें नाशक आहे.

करडईचें तेल.

कुसुम्भतैलं विष्टम्भि पाके च कटुकं गुरु ।
विदाहि च विशेषेण सर्वदोषप्रकोपणम् ॥ ९ ॥

करडईचें तेल मलाचा अवरोध करणारें, विपाककाळीं तिखट, जड, विदाहकारक (घशाशीं जळजळ करणारें) व विशेषतः सर्व दोषांना कोपविणारें आहे.

मोहरीचें तेल.

सार्षपेण समं तैलं राजिकायाश्च कृच्छ्रजित् ।
कण्डूपामाहरं दद्रुकृमिनुत्तीक्ष्णकं पुनः ॥ १० ॥

मोहरीचें तेल शिरसाच्या तेलासारखेंच असून मूत्रकृच्छ्र, कंडू, खरूज, नायटे व कृमि ह्यांचें नाशक व तीक्ष्ण आहे.

जवसादिकांच्या तेलांचे गुण.

क्षौमं तैलमचक्षुष्यं पित्तकृद्वातनाशनम् ।

जवसाचें तेल डोळ्यांला अपायकारक, पित्तकर व वातनाशक आहे.

अक्षजं कफवातघ्नं केश्यं दृक्श्रोत्रतर्पणम् ॥ ११ ॥

बेहड्याच्या बियांचें तेल, कफवातनाशक, केसांना हितावह व दृष्टि व कान ह्यांना तृप्त (प्रसन्न) करणारें आहे.

ज्योतिष्मतीभवं तैलं पित्तलं स्मृतिबुद्धिदम् ।

ज्योतिष्मती (मालकांगोणी किंवा करण्डकांगोणी) हिचें तेल स्मृति व बुद्धिवर्धक आहे.

निम्बतैलं जयेत्कुष्ठव्रणमेहमहाक्रिमीन् ॥ १२ ॥

निंबोळयांचें तेल (कडू लिंबाच्या बियांचें तेल) कुष्ठनाशक, व्रण, प्रमेह व महाकृमि ह्यांचें नाशक आहे.

सर्वधान्यसमावर्तजातानि फलजानि च ।
तैलवत्तानि तल्लेपः खर्जूकण्डूविनाशनः ॥ १३ ॥

सर्व धान्यें व फळें ह्यांचीं तेलें सामान्य गुणानें तेलाप्रमाणेंच असून त्यांच्या लेपानें खरूज व कंडू हीं नष्ट होतात.

मधाचे गुण.

त्रिदोषघ्नं मधु प्रोक्तमन्यत्स्यात्संनिपातहम् ।
हिक्काश्वासक्रिमिच्छर्दिमोहतृष्णाविषापहम् ॥ १ ॥
माक्षिकं भ्रामरं क्षौद्रं पौतिकं छात्रमेव च ।
आर्घ्यमौद्दालकं दालमित्यष्टौ मधुजातयः ॥ २ ॥
माक्षिकं तैलसंकाशं भ्रामरं स्फटिकोज्ज्वलम् ।
क्षौद्रं कपिशवर्णं च पौतिकं तैलसंनिभम् ॥ ३ ॥
छात्रं तत्पीतकपिलमार्घ्यं श्वेतपिशङ्गकम् ।
औद्दालं पीतकपिलं नानावर्णं तु दालकम् ॥ ४ ॥

मध हा वात, पित्त व कफ ह्या प्रत्येकाचा म्हणजे त्रिदोषाचा नाशक असून सान्निपात म्हणजे तिनीही दोषांच्या प्रकोपाचा किंवा सान्निपात ज्वराचा नाशक आहे. तसेंच उचकी, श्वास, कृमि, ओकारी, मोह, तहान व विष ह्यांचा नाशक आहे. माक्षिक, भ्रामर, क्षौद्र, पौतिक, छात्र, आर्घ्य, औद्दालक व दालक अशा मधाच्या आठ जाती आहेत. माक्षिक जातीचा मध दिसण्यांत तेलासारखा, भ्रामर जातीचा मध स्फटिकाप्रमाणें स्वच्छ, क्षौद्र जातीचा मध काळसर तांबूस रंगाचा, पौतिक जातीचा मध तेलासारखा, छात्र जातीचा मध पिवळटपिंगट रंगाचा, आर्घ्य जातीचा मध पांढुरका पिंगट रंगाचा, औद्दालक जातीचा मध पिवळटपिंगट रंगाचा व दालक जातीचा मध अनेक रंगांचा असतो.

माक्षिकं मधुकं श्रेष्ठं नेत्रामयहरं लघु ।

माक्षिक मध श्रेष्ठ, नेत्ररोगनाशक व हलका असतो.

पौतिकं लघु संग्राहि कफघ्नं वातपित्तकृत् ॥ ५ ॥

पौत्तिक मध हलका, मलाला घट्ट करणारा, कफनाशक व वातपित्तकारक आहे.

क्षौद्रं माक्षिकवज्ज्ञेयं विशेषान्मेहनाशनम् ।

क्षौद्र मध माक्षिकाप्रमाणेंच असून विशेषतः प्रमेहनाशक आहे.

भ्रामरं रक्तपित्तघ्नं मूत्रजाड्यकरं गुरु ॥ ६ ॥

भ्रामर मध रक्तपित्तनाशक, मूत्रजाड्यकारक व जड आहे.

नवीनं मध्वाभिष्यन्दि स्निग्धं श्लेष्महरं सरम्।

नवीन मध अभिष्यंदी (स्रावी), स्निग्ध, कफनाशक आणि सारक आहे.

पुराणं ग्राहि तद्रूक्षं मेदोघ्नमतिलेखनम् ॥ ७ ॥

जुना मध मळ घट्ट करणारा, रूक्ष, मेदनाशक आणि अतिशय लेखन आहे. (म्हणजे रसादि धातु व वातादि दोष ह्यांचें शोषण करून त्यांना पातळ करणारा आहे.)

त्रिदोषशोषज्वरनाशनं च श्वासं प्रमेहं व्रणशोधनं च।
पित्तं च तृष्णां नयने जलं च रक्तं च गुल्मं क्रिमिशूलकुष्ठम् ८
शस्त्राभिघातं ह्युरसोऽभिघातं क्षयं प्रमेहं ह्युदरं च हिक्काम्।
पित्तातिसारं ग्रहणीगदं च सर्वांश्चरोगान्विनिहंति क्षौद्रम् ९

मध हा त्रिदोष, शोष, ज्वर, श्वास व प्रमेह ह्यांचा नाश करणारा, व्रणाला शुद्ध करणारा, पित्त, तहान, डोळ्याचें पाणी, रक्तदोष, गुल्म, कृमि, शूल, कुष्ठ, शस्त्राचा आघात (शस्त्रानें झालेली जखम), छाती दुखावणें, क्षय, प्रमेह, उदर, उचकी, पित्तजन्य अतिसार, संग्रहणी, आणि सर्व रोग ह्यांचा नाश करितो.

मधाचे विशेष गुण.

क्षये माक्षिकमुद्दिष्टं भ्रामरं रक्तपित्तनुत्।
क्षौद्रं मेहहरं प्राहुर्व्रणे पौतिकमुत्तमम् ॥ १० ॥
छात्रं सर्वत्र शस्तं स्यादार्घ्यं चक्षुष्यमुत्तमम्।
औद्दालकं कुष्ठहरं रुचिकृद्दालमीरितम् ॥ ११ ॥
एते विशिष्टाः कथिता मधुनो मुनिभिर्गुणाः।

क्षयावर माक्षिक जातीचा मध चांगला उपयोगी असतो. भ्रामर जातीचा मध रक्तपित्ताचा नाश करितो. क्षौद्र जातीचा मध मेहनाशक असून व्रणशोधनाला पौत्तिक मध उत्तम असतो. छात्र जातीचा मध सर्वत्र प्रशस्त असून आर्घ्य मध उत्तम प्रकारचा नेत्ररोगनाशक आहे. औद्दालक जातीचा मध कुष्ठनाशक व दालक जातीचा मध रुचिकारक आहे. हे मधाचे विशेष गुण पूर्वीच्या आचार्यांनीं सांगितले आहेत.

प्रस्थं च मधुनः क्षीरं गवां च कुडवद्वयम् ॥ १२ ॥
निशाभयारजो दद्यात्प्रत्येकं च पलं पलम् ।
मध्ववसानं विपचेन्मधुपाके त्वयं विधिः ॥ १३ ॥

चौसष्ट तोळे मध, बत्तीस तोळे दूध, हळद व हिरडेदळाचें चूर्ण हीं प्रत्येक चार चार तोळे घेऊन सर्व एकत्र करून दूध आटून मध मात्र उरेपर्यंत शिजवावें. मध पचन करण्याचा हा क्रम आहे.

उंसाचे गुण.

इक्षुः स्वादुर्गुरुः शीतो वृष्यः स्निग्धो बलप्रदः ।
जीवनो वातपित्तघ्नः कुर्यान्मूत्रकफक्रिमीन् ॥ १ ॥
स मूले मधुरोऽत्यर्थं मध्ये मधुर एव च ।
अग्रे ग्रन्थिषु विज्ञेयो लवणो रसतस्तथा ॥ २ ॥

ऊंस हा गोड, जड, थंड, वृष्य, स्निग्ध, बलदायक, आयुष्यवर्धक, वातपित्तनाशक, मूत्रकारक व कफकारक असून जंत उत्पन्न करतो तो मुळाकडील भागाला अतिशय गोड, मध्यें गोड, शेंड्याला व ज्या ठिकाणीं त्याचे डोळे (बी) असतात त्या भागाला खारट असतो.

उंसाचे भेद.

लोहितेक्षुर्गुरुः शीतो दाहपित्तास्रकृच्छ्रजित् ।
पौण्ड्रकः शीतलः स्निग्धो बृंहणः कफकृत्सरः ॥ ३ ॥
कृष्णेक्षुस्तद्गुणैर्ज्ञेयो विशेषाद्दाहनाशनः ।
वंशेक्षुरीषत्कफकृद्वृष्यः स्निग्धो विबन्धनुत् ॥ ४ ॥

तांबडा ऊंस जड व थंड, असून दाह, पित्त, रक्तदोष, मूत्रकृच्छ्र, ह्यांचा नाशक आहे. मिश्रवर्ण ऊंस थंड, स्निग्ध, पौष्टिक, कफकारक व सारक आहे. काळा ऊंस त्याच्यासारखाच गुणानें असून विशेषतः दाहनाशक आहे. कळकी ऊंस किंचित् कफकारक, वृष्य, स्निग्ध आणि मलभेदक आहे.

कृत्वा पौण्ड्रकगण्डकान्सुरुचिरांश्चन्द्रांशुभिर्भावितान्
प्रत्यूषेऽथ यथाबलं भजति यो युक्त्या ज्वरार्तश्चिरम् ।
मुक्तः स्याद्चिरेण शीतकमुखाज्जीर्णज्वराद्यक्षमतः
पित्तं याति शमं प्रयाति वपुषः पुष्टिं बलं पावकः ॥ ५ ॥

वृष्यो रक्तास्रपित्तश्रमशमनपरः शीतलः श्लेष्मदोऽल्पः
स्निग्धो हृद्यश्च रुच्यो रचयति स मुदं मूत्रशुद्धिं विधत्ते।
कान्तिं देहस्य धत्ते बलमपि कुरुते बृंहणस्तृप्तिदायी
दन्तैर्निष्पीड्य काण्डे मृदु यदि रसितो भक्षितश्चेक्षुदण्डः॥६॥
अभुक्ते पित्तहन्तारो भुक्ते पित्तप्रकोपणाः।
भुक्तिमध्ये गुरुतमा इतीक्षूणां गुणास्त्रयः॥७॥

पौंड्रक जातीच्या (मिश्रवर्ण) उंसाच्या उत्तमशा गंडेऱ्या (कर्वे) करून त्या रात्रीं चांदण्यांत ठेवाव्या आणि सकाळीं उठल्यावर यथाशक्ति भक्षण कराव्या. ह्याप्रमाणें जो नेहमीं करतो तो लवकरच ज्वरपीडेपासून मुक्त होतो. तसेंच शीतपूर्वादि जीर्णज्वर, क्षय किंवा पित्तविकार हे दूर होऊन शरीराला पुष्टि व बल हीं प्राप्त होतात व अग्नि प्रदीप्त होतो. तसेंच मऊ कांड्याचा ऊंस दातांनीं चावून खाल्ला असतां तो वृष्य असून रक्तदोष, रक्तपित्त व श्रम (थकवा) ह्यांना दूर करणारा, थंड, किंचित् कफकारक, स्निग्ध, हृदयाला हितावह, रुचिकारक, आनंददायक, मूत्र स्वच्छ करणारा, तृप्ति, शरीराला कांति, बल व पुष्टि ह्यांना देणारा असा आहे. जेवणापूर्वीं ऊंस खाल्ला असतां तो पित्ताचें शमन करितो. जेवल्यावर खाल्ला तर पित्ताला वाढवितो आणि जेवणामध्यें खाल्ला तर तो जडत्व उत्पन्न करतो. असे उंसाचे तीन गुण आहेत.

काकवी.

फाणितं गुर्वभिष्यन्दि दोषलं मूत्रशोधनम्॥१॥

काकवी जड, अभिष्यंदी (स्रावी), दोषकारक व मूत्रशोधक आहे.

गूळ.

गुडः समधुरक्षारो गुरूष्णः कफवातनुत्।
अहितः पित्तरक्ते च जीर्णश्चैव रसायनः॥१॥

गूळ हा गोड किंचित् खारट, जड, उष्ण, कफ व वातनाशक, रक्तदोष व पित्त ह्यांना अपथ्यकारक आणि तो जुना झाला म्हणजे रसायन (तारुण्यदायक) आहे.

जुन्या गुळाचे गुण.

पित्तघ्नः पवनापहो रुचिकरो हृद्यस्त्रिदोषार्तिनुत्-

संयोगेन विशेषतो ज्वरहरः संतापशान्तिप्रदः ।
विण्मूत्रामयनाशनोऽग्निजननः पाण्डुप्रमेहापहः
स्निग्धः स्वादुरसो लघुः श्रमहरः पथ्यः पुराणो गुडः॥ १ ॥

जुना गूळ पित्तनाशक, वातनाशक, रुचिकारक, हृदयाला हितावह, त्रिदोषजन्य पीडानाशक, संयोगानें विशेषतः ज्वर व दाह ह्यांची शांति करणारा, मलमूत्रांसंबंधीं विकारनाशक, अग्निवर्धक, पांडुरोग व प्रमेहनाशक, स्निग्ध, गोड, हलका, श्रमनाशक आणि पथ्यकारक आहे.

खडी साखरेचे गुण.

सितोपला सरा गुर्वी वातपित्तहरा हिमा ।
वृष्या श्रमक्लमच्छर्दिदाहमूर्छामदापहा ॥ १ ॥

खडीसाखर सारक, जड, वातपित्तनाशक, थंड व वृष्य असून श्रम, ग्लानि, ओकारी, दाह, मूर्च्छा व मदात्यय ह्यांची नाशक आहे.

पिठी साखर.

रुच्या पुष्टिप्रदा स्निग्धा मोहदाहमदभ्रमान् ।
निहन्ति खण्डा शिशिरा गुरुः पित्तसमीरजित् ॥ १ ॥

खंडशर्करा (खडीसाखर साधारण प्रतीची) रुचिकारक, पौष्टिक, स्निग्ध, मोह, दाह, मद व भ्रम (भोवळ) ह्यांची नाशक, थंड, जड व वातपित्तनाशक आहे.

अतिशय पांढरी साखर.

सिता मत्स्यंडिका पल्ली इति मदनपालनिघंटौ चिनीशर्करा ॥

सिता (पांढरी साखर), मत्स्यंडिका (साखऱ्या), व पल्ली साखर असे मदनपालनिघंटांत पिठीसाखरेचे तीन भेद सांगितले आहेत.

सिता हिमा सरा वृष्या बलतृप्तिकरा लघुः ।
तृट्क्लमश्रमपित्तास्रदाहमोहानिलापहा ॥ २ ॥

पिठी साखर थंड, सारक, वृष्य, बल व तृप्ति ह्यांना देणारी, हलकी व तहान, ग्लानि, भ्रम (भोवळ), रक्तपित्त, दाह, मोह व वात ह्यांची नाशक आहे.

माधवी शर्करा रूक्षा कफपित्तास्रजिद्गुरुः ।

मधाची साखर रूक्ष, कफ, पित्त व रक्त दोष ह्यांना जिंकणारी व हलकी आहे.

आठ प्रकारचीं मूत्रें.

माहिषाजाविगोश्वानां खराणामुष्ट्रहस्तिनाम् ।
मूत्राष्टकमिति ख्यातं सर्वशास्त्रेषु संमतम् ॥ १ ॥

म्हैस, शेळी, मेंढी, गाय, घोडी, गाढवी, उंटीण (सांड) व हत्तीण ह्या जनावरांच्या मूत्रांना मूत्राष्टक असें म्हणतात. हें सर्व शास्त्रांना संमत *आहे.

गोमूत्रं कटु तिक्तोष्णं सक्षारं लेखनं सरम् ।
लघ्वग्निदीपनं मेध्यं पित्तलं कफवातजित् ॥ २ ॥
शूलगुल्मोदरानाहविकारे स्थापनादिषु ।
मूत्रप्रयोगसारेषु गव्यं मूत्रं प्रयोजयेत् ॥ ३ ॥

गोमूत्र कडू, तिखट, उष्ण, खारट, लेखन (दोषांचें शोषण करून त्यांना पातळ करणारें), सारक, हलकें, अग्निदीपक, बुद्धिवर्धक, पित्तकारक, व कफवातनाशक आहे. तसेंच शूल, गुल्म, उदर, आनाह (पोट फुगणें) ह्या विकारांत, आस्थापनादि बस्तिकर्मांत व ज्या ज्या प्रयोगांत मूत्राची योजना आहे, त्या त्या प्रयोगांत गोमूत्र योजावें.

कासश्वासापहं शोफकामलापाण्डुरोगजित् ।
छागं रूक्षोष्णकटुकमीषन्मारुतकोपनम् ॥ ४ ॥

शेळीचें मूत्र कास, श्वास, सूज, कामला व पांडुरोग ह्यांचें नाशक, रूक्ष, उष्ण, तिखट व किंचित् वातकारक आहे.

प्लीहोदरश्वासकासशोफवर्चोग्रहे हितम् ।
सक्षारकटुकं तिक्तमुष्णवातघ्नमाविकम् ॥ ५ ॥

---

* मूत्राच्या कामीं स्त्रीजातिनिर्देश करण्याचा हेतु असा कीं, नरजातीचीं मूत्रें शुक्रमार्गांतून येतात; त्यामुळें त्यांच्यांत शुक्रसंसर्गानें जडत्व असतें. स्त्रियांचा शुक्रमार्ग व मूत्रमार्ग भिन्न असल्यामुळें त्यांचें मूत्र शुक्ररहित असल्यानें हलकें असतें. शिवाय, वाग्भटानेंही मूत्रप्रकरणीं स्त्रीजातीचाच निर्देश केला आहे. त्याचें कारण देखील तीं निर्भेळ व हलकीं असतात हेंच आहे. चक्रदत्ताच्या द्रव्यगुणसंग्रहाचा टीकाकार शिवदास सेन ह्याचें मत जड मूत्रें वातविकार व सिंचनकर्म ह्या कामीं विशेष उपयुक्त आहेत. ह्यासाठीं जें योग्य वाटेल तें घ्यावें.

मेंढीचें मूत्र पांथरी, उदर, श्वास, खोकला, सूज व मलावरोध ह्यांना हितकर, खारट, तिखट, कडु, उष्ण व वातनाशक आहे.

दुर्नामोदरशूलेषु कुष्ठमेहविषूचिषु ।
आनाहशोफगुल्मेषु पाण्डुरोगे च माहिषम् ॥ ६ ॥

म्हशीचें मूत्र मूळव्याध, उदर, शूल, कुष्ठ, मेह, विषूचिका (कालरा), पोट फुगणें, सूज, गुल्म व पांडुरोग ह्या विकारांना फार हितावह आहे.

सतिक्तं लवणं भेदि वातघ्नं पित्तकोपनम् ।
तीक्ष्णं क्षारं किलासे च गजमूत्रं प्रयोजयेत् ॥ ७ ॥

हत्तिणीचें मूत्र कडू, खारट, मलभेदक, वातनाशक, पित्तकारक, तीक्ष्ण व क्षारयुक्त आहे. हें किलास नांवाच्या कुष्ठावर योजावें.

दीपनं कटु तीक्ष्णोष्णं वातरोगविकारनुत् ।
आश्वं कफहरं रूक्षं क्रिमिदद्रुविनाशनम् ॥ ८ ॥

घोडीचें मूत्र अग्निदीपक, तिखट, उष्ण, वातरोगनाशक, कफनाशक, रूक्ष, कृमि व दद्रु (नायटे) ह्यांचें नाशक आहे.

औष्ट्रं कुष्ठोदरोन्मादशोफार्शःक्रिमिवातनुत् ।
गरचेतोविकारघ्नं तीक्ष्णं जठररोगजित् ॥ ९ ॥

उंटिणीचें (सांडीचें) मूत्र कुष्ठ, उदर, उन्माद, सूज, मूळव्याध, कृमि, वात, गरदोष, मानसिक विकार (अपस्मार वगैरे) व उदर ह्यांचा नाश करणारें व तीक्ष्ण आहे.

दीपनं गार्दभं मूत्रं क्रिमिवातकफापहम् ।
कषायतिक्तमेतेषु हिक्काश्वासहरं परम् ॥ १० ॥

गाढवीचें मूत्र अग्निदीपक, कृमि, वातविकार व कफ ह्यांचें नाशक व ह्या सर्व मूत्रांपेक्षां कडू व तुरट असून उत्तम प्रकारचें उचकी व श्वासनाशक आहे

पित्तरक्तक्रिमिहरं रेचनं कफवातजित् ।
तिक्तं मोहहरं मूत्रं मानुषं तु विषापहम् ॥ ११ ॥

मनुष्याचें मूत्र पित्त, रक्तदोष, कृमि ह्यांचें नाशक, रेचक, कफवातनाशक, कडू, मोह व विषदोष ह्यांचें नाशक आहे.

त्रिफळ्याचे गुण.

एका हरीतकी योज्या द्वौ च योज्यौ बिभीतकौ ।
चत्वार्यामलकान्येव त्रिफलैषा प्रकीर्तिता ॥ १ ॥
त्रिफला शोथमेहघ्नी नाशयेद्विषमज्वरान् ।
दीपनी श्लेष्मपित्तघ्नी कुष्ठहन्त्री रसायनी ।
सर्पिर्मधुभ्यां संयुक्ता सैव नेत्रामयाञ्जयेत् ॥ २ ॥

एक हिरडा, दोन बेहडे व चार आवळे (वाळलेले) ह्यांच्या एकत्र केलेल्या चूर्णाला त्रिफळा असें म्हणतात. हा प्रमेह, सूज, विषमज्वर, कफ, पित्त व कुष्ठ ह्यांचा नाशक, अग्निदीपक, रसायन असून तूप व मध ह्यांच्याशीं घेतला असतां नेत्ररोगांना जिंकतो.

त्रिकटूचे गुण.

पिप्पली मरिचं शुण्ठी त्रयमेतद्विमिश्रितम् ।
त्रिकटु त्र्यूषणं व्योषं कटुत्रिकमथोच्यते ।
दीपनं रुचिदं वातश्लेष्ममन्दाग्निशूलनुत् ॥ १ ॥

पिंपळी, मिरीं व सुंठ ह्यांचें समभाग चूर्ण एकत्र करावें. त्याला त्रिकटु, त्र्यूषण, व्योष किंवा कटुत्रिक असें म्हणतात. हें अग्नि-दीपक व रुचिकारक असून वात, कफ, अग्निमांद्य व शूल ह्यांचें नाशक आहे.

पंचकोलाचे गुण.

पिप्पलीपिप्पलीमूलचव्याचित्रकनागरैः ।
एकत्र मिश्रितैरेभिः पञ्चकोलकमुच्यते ॥ १ ॥
पञ्चकोलं त्रिदोषघ्नं रुच्यं दीपनपाचनं ।
स्वरभेदोहरं चैव शूलगुल्मार्तिनाशनम् ॥ २ ॥

पिंपळी, पिंपळीमूळ (पिंपळमूळ), चवक, चित्रक व सुंठ ह्यांच्या समभाग एकत्र चूर्णाला पंचकोल असें म्हणतात. हें त्रिदोषनाशक, दीपक व पाचक असून स्वरभेद, शूल, गुल्म, ह्यांचा नाश करतें.

षडूषण व त्याचे गुण.

पञ्चकोलं समरिचं षडूषणमुदीर्यते ।
पंचकोलगुणं तत्तु विशेषाद्वह्निवर्धनम् ॥ १ ॥

वरील पंचकोलांतील पांच औषधें व मिरीं ह्यांच्या समभाग

चूर्णाला षडूषण म्हणतात. ह्याचे गुण पंचकोलाप्रमाणेंच असून हें विशेषतः अग्निदीपक आहे.

चतुरूषणाचे गुण.

त्र्यूषणं ग्रन्थिकयुतं जायते चतुरूषणम् ।
चतुरूषणमाख्यातं गुणैस्त्र्यूषणवद् बुधैः ।
कफाग्निमान्द्यविष्टम्भारुचिपीनसकासनुत् ॥ १ ॥

त्रिकटु व पिंपळमूळ ह्यांच्या समभाग चूर्णाला चतुरूषण असें म्हणतात. हें त्र्यूषणाप्रमाणेंच गुणानें असून खोकला, अग्निमांद्य, मलमूत्राचा अवरोध, अरुचि, पीनस व कफ ह्यांचें नाशक आहे.

त्रिजात व चतुर्जात ह्यांचे गुण.

त्वगेलापत्रकैस्तुल्यैस्त्रिसुगन्धि त्रिजातकम् ।
नागकेसरसंयुक्तं चातुर्जातकमुच्यते ॥ १ ॥
स्वरभेदश्वासकासमुखदोषविनाशनम् ।
वृष्यं बल्यं च योगार्हं चातुर्जातं रसायनम् ॥ २ ॥

दालचिनी, वेलदोडे व तमालपत्र ह्यांच्या समभाग चूर्णाला त्रिजात किंवा त्रिसुगंध असें म्हणतात. आणि त्रिजात व नाकेशर ह्यांच्या चूर्णाला चातुर्जात असें म्हणतात. हीं दोनीहीं स्वरभेद, श्वास, कास व मुखरोग यांचीं नाशक असून वृष्य व बलकारक, योगवाही (कोणत्याही योगांत योजलें असतां त्या योगाला अनुसरून गुण देणारीं) असून चातुर्जात हें रसायन आहे.

दशमुळें व त्याचे गुण.

बिल्वोऽग्निमन्थः स्योनाकः कश्मरी पाटला तथा ।
शालिपर्णी पृश्निपर्णी बृहतीद्वयगोक्षुरम् ।
दशमूलमिदं श्वाससंनिपातज्वरापहम् ॥ १ ॥

बेल, ऐरण (टाकळी), टेटू, शिवण, पाडळ, साळवण, गोखरू, पिठवण, डोरली व रिंगणी ह्यांच्या मुळांना दशमुळें म्हणतात. हीं श्वास व सन्निपात ज्वर ह्यांचा नाश करितात.

तच्च लघुमहद्भेदेन भिन्नम् ।

तें दशमूळ लहान व मोठें असें दोन प्रकारचें आहे.

शालिपर्णी पृश्निपर्णी बृहती कण्टकारिका ।
तथा गोक्षुरसंयुक्तं पञ्चमूलमिदं लघु ॥ २ ॥

सालवण, पिठवण, रिंगणी, डोरली व गोखरू ह्यांच्या मूळांना लघुपंचमूळ असें म्हणतात.

बिल्वोऽग्निमन्थः स्योनाकः काश्मरी चाथ पाटला।
ज्ञेयं महत्पञ्चमूलं दशमूलमुभे युते ॥ ३ ॥

बेल, ऐरण, टेटू, पाडळ व शिवण ह्यांच्या मूळांना महत् (मोठें) पंचमूळ म्हणतात. आणि ह्या दोनींही पंचमूळांना मिळून दशमूळ असें म्हणतात.

पञ्चमूलं त्रिदोषघ्नं वातघ्नं दशमूलकम्।
ज्वरकासश्वासशूलमन्दाग्न्यरुचिनाशनम् ॥ ४ ॥

पंचमूळ हें त्रिदोषनाशक असून दशमूळ हें वात, ज्वर, खोकला, श्वास, शूल, अग्निमांद्य व अरुचि ह्यांचें नाशक आहे.

मध्यम पंचमूळाचे गुण.

बलापुनर्नवैरण्डशूर्पपर्णीद्वयेन च।
मध्यमं कफवातघ्नं नातिपित्तकरं परम् ॥ १ ॥

चिकणा, पुनर्नवा, एरंड, रानमूग व रानउडीद ह्यांच्या मुळांना मध्यम पंचमूळ म्हणतात. हें कफवातनाशक व फारसें पित्त न करणारें आहे.

पंचवल्कलें व त्यांचे गुण.

न्यग्रोधोदुम्बराश्वत्थप्लक्षवेतसवल्कलैः।
सर्वैरेकत्रमिलितैः पंचवल्कलमुच्यते ॥ १ ॥
रसे कषायं शीतं च वर्ण्यं दाहतृषापहम्।
योनिदोषं कफं शोफं हन्तीदं पञ्चवल्कलम् ॥ २ ॥

वड, उंबर, पिंपळ, पिंपरणी, आम्लवेतस ह्या सर्वांच्या समभाग एकत्र केलेल्या सालींना पंचवल्कल असें म्हणतात. हें तुरट, थंड, अंगाचा वर्ण चांगला करणारें, दाह, तहान, योनिदोष, कफ व सूज ह्यांचें नाशक आहे.

पंचभृंगाचे गुण.

देवदाली शमी भृङ्गी निर्गुण्डी शमकं तथा।
रोगांते स्नानपानार्हं पंचभृङ्गमिति स्मृतम् ॥ १ ॥

देवडांगरी, शमी, निर्गुडी, माका व लहान शमी, ह्यांला भृंग-

पंचक म्हणतात. रोग बरा झाल्यावर स्नानपानादिकांत ह्यांचा उपयोग करावा.

आम्लपंचक व त्याचे गुण.

बीजपूरं च जम्बीरं नारिंगं साम्लवेतसम्।
फलपंचाम्लकं ख्यातं तिन्तिडीसहितं परम्।
पंचाम्लकं समुद्दिष्टं तथोक्तं चाम्लपंचकम् ॥ १ ॥

महाळुंग, जंबीर निंबु (ईड), नारिंग, आम्लवेतस व चिंच ह्यांना फलपंचाम्लक, पंचाम्लक किंवा आम्लपंचक असें म्हणतात.

पंचांग.

त्वक्पत्रफलमूलानि पुष्पाण्येकस्य शाखिनः।
पञ्चाङ्गमिति बोद्धव्यं प्राज्ञैरेकत्र मिश्रितम् ॥ १ ॥

एकाच झाडाची साल, पानें, फळें, मूळें व फुलें ह्या सर्वांना समभाग एकत्र करणें ह्याला पंचांग असें म्हणतात.

संतर्पणाचे गुण.

द्राक्षादाडिमखर्जूरैर्मर्दिताम्बु सशर्करम्।
लाजचूर्णं सुमध्वाढ्यं संतर्पणमुदाहृतम् ॥ १ ॥
तर्पणं शीतलं पाने नेत्ररोगविनाशनम्।
बल्यं रसायनं हृद्यं वीर्यवृद्धिकरं परम् ॥ २ ॥

द्राक्षें, डाळिंब, खजूर हीं साखरेसह पाण्यांत कुसकरून त्यांत थोडें भाताच्या लाह्यांचें पीठ व मध घालावा. ह्याला संतर्पण असें म्हणतात. हें पिण्याला शीतळ, नेत्ररोगनाशक, बलकारक, हृद्य, व वीर्यवृद्धि करणारें असें आहे.

यक्षकर्दमाचे गुण.

कुङ्कुमागुरुकर्पूरकस्तूरीचन्दनानि च।
महासुगन्ध इत्युक्तो नामतो यक्षकर्दमः ॥ १ ॥
यक्षकर्दम एवं स्याच्छीतस्त्वग्दोषहृच्च सः।
सुगन्धिः कान्तिदश्चैव शिरोर्तिविषनाशनः ॥ २ ॥

केशर, कृष्णागर, कस्तुरी, कापूर, चंदन, ह्याला महासुगंध असें म्हणतात. ह्याला "यक्षकर्दम" असें नांव आहे. हा थंड, त्वचेचे रोग दूर करणारा, सुगंधी, कांतिकारक व मस्तकपीडा व विष ह्यांचा नाश करणारा आहे.

केशराचीं नांवें व गुण.

ज्ञेयं कुङ्कममग्निशेखरमसृक्काश्मीरजं पीतकं
काश्मीरं रुचिरं वरं च पिशुनं रक्तं शठं शोणितम् ।
बाह्लीकं घुसृणं वरेण्यमसृणं कालेयकं जागुडं
कान्तं वह्निशिखं च केशरवरं गौरीवराक्षीरितम् ॥ १ ॥

कुंकुम, अग्निशेखर, असृक्, काश्मीरज, पीतक, काश्मीर, रुचिर, वर, पिशुन, रक्त, शठ, शोणित, बाह्लीक, घुसृण, वरेण्य, असृण, कालेयक, जागुड, कान्त, वह्निशिख, केशरवर, गौरीवराक्षि, हीं केशराचीं बावीस नांवें आहेत.

कुङ्कमं सुरभि तिक्तकटूष्णं कासवातकफकण्ठरुजाघ्नम् ।
मूर्धशूलविषदोषविमोचं रोचनं च तनुकान्तिकरं च ॥ २ ॥
वसन्तकाले घुसृणेन युक्तः कस्तूरिकाचन्दनचारुलेपः ।
आवासितश्चेन्नवमल्लिकाभिस्त्रिदोषजिन्मन्मथजन्मभूमिः ॥३॥

केशर हें सुवासिक, कडू, तिखट, उष्ण व खोकला, वात, कफ, कंठासंबंधीं पीडा, मस्तकपीडा व विषदोष ह्यांचा नाश करणारें, रुचिकारक व शरीराला कांति देणारें आहे. वसंत ऋतूमध्यें कस्तुरी, चंदन व केशर ह्यांची उटी अंगाला लावून मोगऱ्याच्या फुलांच्या हारांनीं शरीर सुवासिक केलें असतां त्रिदोषनाशक व मदनाचें केवळ जन्मस्थानच आहे.

पंचसुगंधिकाचे गुण.

कंकोलकं पूगफलं लवङ्गकुसुमानि च ।
जातीफलानि कर्पूरमेतत्पञ्चसुगन्धिकम् ॥ १ ॥
सुगन्धिपञ्चकं शीतं रक्तपित्तविनाशनम् ।
हन्त्याशु मुखवैगन्ध्यं पीनसं वा कफास्रजित् ॥ २ ॥

कंकोळ, सुपारी, लवंग, जायफळ व कापूर ह्याला पंचसुगंधिक असें म्हणतात. हें सुगंधिपंचक शीत, रक्तपित्तनाशक, पीनस किंवा मुखदुर्गंधि ह्यांना त्वरित दूर करणारें आणि कफरक्तदोष ह्यांचें नाशक आहे.

सहा रस.

कटुस्तिक्तः कषायश्च लवणोऽम्लस्तु पञ्चमः ।

मधुरेण समायुक्ताः कथिताः षड्रसा अमी ॥ १ ॥

तिखट, कडू, तुरट, खारट, आंबट व मधुर ह्या रसांना षड्रस असें म्हणतात.

मधुरत्रिक.

घृतं गुडोऽथ माक्षीकं विज्ञेयं मधुरत्रयम् ।
ज्ञेयं त्रिमधुरं चैव प्रोक्तं च मधुरत्रयम् ॥ १ ॥

तूप, मध व गूळ ह्यांना मधुरत्रिक, त्रिमधुर किंवा मधुरत्रय असें म्हणतात.

समत्रिक.

हरीतकी नागरं च गुडं चैकत्र मिश्रितम् ।
त्रिसमं भाष्यते प्राज्ञैस्तथा चापि समत्रिकम् ॥ १ ॥

हिरडयाचें चूर्ण, सुंठीचें चूर्ण व गूळ ह्यांचें समभाग मिश्रण केलें म्हणजे त्याला समत्रिक किंवा त्रिसम असें म्हणतात.

क्षारत्रय.

स्वर्जिक्षारो यवक्षारष्टङ्कणक्षार एव च ।
क्षारत्रयं समाख्यातं त्रिक्षारं च प्रकीर्तितम् ॥ १ ॥

सज्जीखार, जवखार व टाकणखार ह्यांना क्षारत्रय किंवा त्रिक्षार असें म्हणतात.

क्षारपंचक.

पलाशतिलमुष्काणां क्षाराः स्वर्जियवाग्रजैः ।
समांशमिलिताः पञ्च क्षारपञ्चकमादिशेत् ॥ १ ॥

पळसाचा क्षार, तिळाच्या काडयांचा क्षार, मोखाचा क्षार, सज्जिखार व जवखार ह्यांच्या समभाग मिश्रणाला क्षारपंचक म्हणतात.

क्षाराष्टक.

अपामार्गपलाशार्कतिलमुष्कयवाग्रजम् ।
स्वर्जिटङ्कणसंयुक्तं क्षाराष्टकमुदाहृतम् ॥ १ ॥

आघाड्याचा क्षार, पळसाचा क्षार, रुईचा क्षार, तिळाचा क्षार, मोखाचा क्षार, जवखार, सज्जीखार व टाकणखार ह्यांना क्षाराष्टक असें म्हणतात.

क्षारद्वय.

स्वर्जिका यावशूकश्च क्षारद्वयमुदाहृतम् ।

ज्ञेयौ वह्निसमौ क्षारौ स्वर्जिकायावशूकजौ ॥ १ ॥
क्षाराश्चान्येऽपि गुल्मार्शोग्रहणीरुक्छिदः सराः ।
पाचनाः क्रिमिपुंस्त्वघ्नाः शर्कराश्मरिनाशनाः ॥ २ ॥

सज्जीखार व जवखार ह्यांना क्षारद्वय असें म्हणतात. हे दोन्ही क्षार अग्नीप्रमाणें प्रखर आहेत. हे दोन्ही क्षार आणि बाकीचे क्षार देखील गुल्म, मूळव्याध व संग्रहणी ह्यांचा नाश करणारे, सारक, व पाचक असून कृमि, पुरुषत्व, मूत्रशर्करा व मूतखडा ह्यांचा नाश करणारे आहेत.

लवणत्रय.

सैन्धवं रुचकं चैव बिडं च लवणत्रयम् ।
एतत्त्रिलवणं प्रोक्तं नामतः शास्त्रकोविदैः ॥ १ ॥

सैंधव (सेंधेलोण), पादेलोण व बिडलोण ह्यांना लवणत्रय किंवा त्रिलवण असें म्हणतात.

लवणपंचक.

सौवर्चलं सैन्धवं च बिडमौद्भिदमेव च ।
सामुद्रेण समायुक्तं ज्ञेयं लवणपञ्चकम् ॥ १ ॥
एकद्वित्रिचतुष्पंचलवणानि क्रमाद्विदुः ।
मधुरं सृष्टविण्मूत्रं स्निग्धं सूक्ष्मं बलापहम् ।
वीर्योष्णं दीपनं तीक्ष्णं कफहृत्पित्तवर्धनम् ॥ २ ॥

संचळ (पादेलोण), सैंधव, बिडलोण, औद्भिद जातीचें मीठ (जमीनीमध्यें उकरून निघालेल्या खाऱ्या पाण्यापासून सूर्यकिरणांच्या साहाय्यानें किंवा अग्नीच्या साहाय्यानें जें लवण (मीठ) तयार करितात त्याला औद्भिद लवण असें म्हणतात.) आणि समुद्राच्या पाण्यापासून झालेलें मीठ ह्यांना लवणपंचक असें म्हणतात. यांचींच क्रमानें एक, दोन, तीन, चार व पांच लवणें होतात. हें पंचलवण मधुर, मलमूत्रांना सोडणारें-स्निग्ध, सूक्ष्म (अगदीं बारिक स्रोतसांतून प्रवेश करणारें), बलनाशक, उष्णवीर्य, दीपन, तीक्ष्ण, कफनाशक व पित्तवर्धक आहे.

लवणषट्क.

सामुद्रं सिन्धुरुचकं बिडं रोमकपांशवम् ।
षडेते च समाख्याता लवणाः शास्त्रकोविदैः ॥ १ ॥

समुद्राचें मीठ, सैंधेलोण, पादेलोण, बिडलोण, रोमक[1] (रुमा नांवाच्या नदीच्या पाण्यापासून जें मीठ तयार करितात तें) व औद्भिद लवण ह्या सहा प्रकारच्या लवणांना लवणषट्क म्हणतात.

चंदन व त्याचे गुण.

स्वादे तिक्तं कषे पीतं छेदे रक्तं तनौ सितम् ।
ग्रन्थिकोटरसंयुक्तं चन्दनं श्रेष्ठमुच्यते ॥ १ ॥

रुचीला कडू, उगाळतांना पिवळा, तोडला असतां लाल, वरून अंगानें पांढरा, ज्याला ढोल पडली आहे व जो गांठाळ आहे, असा चंदन श्रेष्ठ समजावा.

चन्दनं शीतलं रूक्षं तिक्तमाह्लादनं लघु ।
हृद्यं वर्ण्यं विषश्लेष्मतृष्णापित्तास्रदाहजित् ॥ २ ॥

चंदन हा गुणानें थंड, रूक्ष, कडू, आनंददायक, हलका, हृदयाला हितकारक, वर्ण चांगला करणारा, विष, कफ, तहान, रक्तपित्त व दाह यांचा नाशक आहे.

कालीयकं रक्तगुणं विशेषाद्रोगनाशनम् ।

कालीयक नांवाचा चंदन तांबडा व विशेषतः रोगनाशक आहे.

कृष्णागुरूष्णं कर्णाक्षिरोगनुच्छीतलं लघु ॥ ३ ॥

कृष्णागर या नांवाचा चंदन उष्ण, कर्णरोग व नेत्ररोगनाशक, थंड व हलका आहे.

गुळवेलीच्या सत्वाचे गुण.

छिन्नासत्वं हरति सकलं दुस्तरं तीव्रतापं
काले चोक्तं भवति च नृणां यौवनेषु ज्वरेषु ।
दाहं मेहं ज्वरमरुचितृट्श्वासपाण्ड्वर्शोहिक्काः
स्त्रीणां रक्तप्रदरजनिते रोगराजेऽपि युक्तम् ॥ १ ॥

गुळवेलीचें सत्व सर्व प्रकारचे तीव्र दाहनाशक, कोणत्याही कालीं घेण्यास योग्य, तरुण ज्वरामध्यें देखील उपयुक्त व दाह, प्रमेह, ज्वर, अरुचि, तहान, अर्श (मूळव्याध), श्वास, पांडुरोग, उचकी, स्त्रियांचा प्रदर व क्षय ह्यांजवर देखील उपयुक्त आहे.

---

१. संभर देशामध्यें जें मीठ होतें तें रोमक असें कित्येकांचें मत आहे.

स्वरसादि.

अथात्र स्वरसः कल्कः क्वाथश्च हिमफाण्टकैः ।
ज्ञेयाः कषायाः पंचैते लघवः स्युर्यथोत्तरम् ॥ १ ॥

स्वरस, कल्क, कषाय (काढा), हिम व फांट हे काढ्याचे पांच प्रकार आहेत. हे उत्तरोत्तर लघु आहेत.

स्वरसाची कल्पना.

आहतात्तक्षणाकृष्टाद्द्रव्यात्क्षुण्णात्समुद्भवेत् ।
वस्त्रनिष्पीडितो यः स्यात्स्वरसो रस उच्यते ॥ १ ॥
कुडवं चूर्णितं द्रव्यं क्षिप्तं च द्विगुणे जले ।
अहोरात्रं स्थितं तस्माद्भवेद्वा रस उत्तमः ॥ २ ॥
आदाय शुष्कं द्रव्यं वा स्वरसानामसंभवे ।
जलेऽष्टगुणिते साध्यं पादशिष्टं च गृह्यते ॥ ३ ॥

तोडून काढून आणलेली वनस्पति तत्क्षणीं कुटून वस्त्रामध्यें घरून पिळून जो रस काढतात, त्याला स्वरस असें म्हणतात. तसेंच सोळा तोळे कुटून चूर्ण केलेली (ओली) औषधी घेऊन दुप्पट पाणी घालून एक अहोरात्र (चोवीस तास) ठेवून नंतर तें पाणी गाळून घ्यावें. त्यालाही रस असें म्हणतात. किंवा स्वरसाच्या अभावीं शुष्क द्रव्य घेऊन अर्धवट कुटून आठपट पाणी घालून विस्तवावर ठेवून आटवून चवथाई उरल्यावर घ्यावें.

स्वरसस्य गुरुत्वाच्च पलमर्धं प्रयोजयेत् ।
निशोषितं चाग्निसिद्धं पलमात्रं रसं पिबेत् ॥ ४ ॥
मधुश्वेतागुडक्षाराजीरकं लवणं तथा ।
घृतं तैलं च चूर्णादीन्कोलमात्रान्रसे क्षिपेत् ॥ ५ ॥

स्वरस हा जड असतो, म्हणून त्याची मात्रा (प्रमाण) दोन तोळ्यांची योजावी. आणि रात्रीं भिजत घालून सकाळीं अग्नीवर आटवून तयार केलेल्या कषायरूप स्वरसाची मात्रा चार तोळ्यांची योजावी. स्वरसामध्यें मध, साखर, गूळ, क्षारद्रव्य, जिरें, लवण (सैंधव वगैरे) तूप, तेल, चूर्ण वगैरे घालणें झाल्यास त्याचें प्रमाण सहा मासे असावें.

अमृताया रसः क्षौद्रयुक्तः सर्वप्रमेहजित् ।
हरिद्राचूर्णयुक्तो वा रसो धात्र्याः समाक्षिकः ॥ ६ ॥

गुळवेलीचा स्वरस दोन तोळे घेऊन त्यांत सहा मासे मध घालून घ्यावा. तो प्रमेहाला जिंकतो. तसेंच आंवळ्यांचा स्वरस दोन तोळे घेऊन त्यांत सहा मासे मध व सहा मासे हाळदीची पूड घालून घ्यावी. तोही प्रमेहाचा नाश करतो.

पुटपाकाची कल्पना.

पुटपाकस्य मात्रेयं लेपस्याङ्गारवर्णता ।
लेपं च द्व्यंगुलं स्थूलं कुर्याद्वांऽगुष्ठमात्रकम् ॥ १ ॥
काश्मरीवटजम्ब्वादिपत्रैर्वेष्टनमुत्तमम् ।
पलमात्रो रसो ग्राह्यः कर्षमात्रं मधु क्षिपेत् ।
कल्कचूर्णद्रवाद्यास्तु देयाः स्वरसवद्बुधैः ॥ २ ॥

ज्या द्रव्याचा पुटपाक करावयाचा तें द्रव्य कुटून किंवा वाटून त्याचा गोळा करून त्याजवर शिवणीचीं, वडाचीं किंवा जांभळीचीं पानें गुंडाळून त्याजवर (कणकीचा, मातीचा किंवा गाईच्या शेणाचा) दोन अंगुळें जाडीचा किंवा अंगठ्याइतक्या जाडीचा लेप करून तो वरील लेप अग्नीप्रमाणें लाल होईपर्यंत विस्तवांत ठेवून तो गोळा भाजावा. नंतर काढून घेऊन आंतील द्रव्याचा पिळून रस काढून घ्यावा. तो रस चार तोळे घेऊन त्यांत मध एक तोळा घालावा. आणि कल्क, चूर्ण किंवा इतर पातळ पदार्थ घालणें झाल्यास ते स्वरस प्रकरणांत सांगितलेल्या मानानें घालावे.

तत्कालाकृष्टकुटजत्वचं तण्डुलवारिणा ।
पिष्टां चतुष्पलमितां जम्बूपल्लववेष्टिताम् ॥ ३ ॥
सूत्रबद्धां च गोधूमपिष्टेन परिवेष्टिताम् ।
लिप्तां च घनपङ्केन गोमये वह्निना दहेत् ॥ ४ ॥
अङ्गारवर्णां च मृदं दृष्ट्वा वह्नेः समुद्धरेत् ।
ततो रसं गृहीत्वा च शीतं क्षौद्रयुतं पिबेत् ।
जयेत्सर्वानतीसारान्दुस्तरान्सुचिरोत्थितान् ॥ ५ ॥

कुड्याची ताजी ओली साल सोळा तोळे घेऊन तांदुळाच्या धुवणांत वाटून तिचा गोळा करावा; त्याजवर जांभळीचीं पानें गुंडाळून वर सुतानें बांधून त्याजवर कणकीचा लेप करून व चिखलानें लिंपून गाईच्या शेणाच्या गोवऱ्यांत वरील माती लाल विस्तवाप्रमाणें होईपर्यंत भाजून काढावा. नंतर आंतील गोळ्याचा

रस काढावा व थंड झाल्यावर त्यांत मध घालून घ्यावा. ह्यानें फार दिवसांचे सर्व प्रकारचे दुस्तर अतिसार नाहींसे होतात.

कल्काची रीत.

द्रव्यमार्द्रं शिलापिष्टं शुष्कं वा सजलं भवेत् ।
प्रक्षेपावापकल्कास्ते तन्मात्रा कर्षसंमिता ॥ १ ॥
कल्के मधु घृतं तैलं देयं द्विगुणमात्रया ।
सितां गुडं समं दद्याद्द्रवा देयाश्चतुर्गुणाः ॥ २ ॥

ओलें द्रव्य पाट्यावर बारीक वाटावें. वाळलेलें असल्यास पाणी घालून बारीक गंधाप्रमाणें वाटावें. त्याला कल्क असें म्हणतात. प्रक्षेप व आवाप हीं त्याचीं दुसरीं नांवें आहेत. ह्याच्या मात्रेचें प्रमाण एक तोळा असतें. कल्कांत मध, तूप, तेल घालावयाचें झाल्यास कल्काचे दुप्पट घालावें. साखर व गूळ घालणें झाल्यास कल्काच्या समान घालावें आणि दूध, पाणी वगैरे घालणें झाल्यास कल्काच्या चौपट घालावें.

त्रिवृद्ध्या पंचवृद्ध्या वा सप्तवृद्ध्याऽथवा कणाः ।
पिबेत्पिष्ट्वा दशादिनं तास्तथैवापकर्षयेत् ॥ ३ ॥
एवं विंशद्दिनं सिद्धं पिप्पलीवर्धमानकम् ।
अनेन पाण्डुवातास्रकासश्वासारुचिज्वराः ।
उदरार्शःक्षयश्लेष्मवाता नश्यन्त्युरोग्रहाः ॥ ४ ॥

तीन, पांच किंवा सात अशा क्रमानें वाढत्या पिंपळ्या (दुधांत) वाटून कल्क करून दहा दिवसपर्यंत खाव्या. व त्याच क्रमानें पुढें दहा दिवस उतरत न्याव्या. ह्याप्रमाणें वीस दिवस करावें. म्हणजे वर्धमान पिंपळीचा एक प्रयोग होतो. ह्याच्या योगानें पांडुरोग, वातरक्त, खोकला, श्वास, अरुचि, ज्वर, उदर, अर्श (मूळव्याध), क्षय, कफवातविकार, व उरोग्रह (हृदयपीडा) ह्यांचा नाश होतो.

काढा करण्याची कल्पना.

पानीयं षोडशगुणं क्षुण्णे द्रव्यपले क्षिपेत् ।
मृत्पात्रे क्काथयेद्ग्राह्यमष्टमांशावशेषितम् ॥ १ ॥
तज्जलं पाययेद्धीमान्कोष्णं मृद्वग्निसाधितम् ।
शृतः क्काथः कषायश्च निर्यूहः स निगद्यते ॥ २ ॥

आहाररसपाके च संजाते द्विपलोन्मितम् ।
वृद्धवैद्योपदेशेन पिबेत्काथं सुपाचितम् ॥ ३ ॥
काथे क्षिपेत्सितामंशैश्चतुर्थाष्टमषोडशैः ।
पित्तवातकफातङ्के विपरीतं मधु स्मृतम् ॥ ४ ॥
जीरकं गुग्गुलुं क्षारं लवणानि शिलाजतु ।
हिंगु त्रिकटुकं चैव काथे शाणमितं क्षिपेत् ॥ ५ ॥
क्षीरं घृतं तैलमूत्रं चान्यद्द्रव्यं तथा क्षिपेत् ।
कल्कचूर्णादिकं काथे निक्षिपेत्कर्षसंमितम् ॥ ६ ॥

चार तोळे अर्धवट कुटलेल्या द्रव्यांत सोळा पट पाणी घालून मातीच्या भांड्यांत काढा शिजवावा. तो आटून अष्टमांश करून उरला म्हणजे कोमट असतांनाच प्राशन करावा. ह्याला शृत, काथ (काढा), कषाय व निर्यूह अशीं नांवें आहेत. खाल्लेल्या अन्न-रसाचें चांगलें पचन झालें म्हणजे अनुभविक वृद्ध वैद्याच्या अनुमतानें उत्तम तयार केलेला काढा आठ तोळेपर्यंत घ्यावा. काढ्यांत साखर घालावयाची ती पित्तरोग असतां काढ्याच्या चवथाई घालावी. वातरोग असतां अष्टमांश घालावी व कफरोग असतां सोळावा हिस्सा घालावी. आणि मधाचें प्रमाण ह्याच्या उलट असावें. (म्हणजे पित्तरोग असतां सोळावा हिस्सा, वातरोग असतां आठवा हिस्सा व कफरोग असतां चवथा हिस्सा घालावा) जिरें, गुग्गुळ, क्षार, लवण, शिलाजित, हिंग, त्रिकटु हे पदार्थ काढ्यांत घालणें झाल्यास त्यांचें प्रमाण तीन मासे असावें. दूध, तूप, तेल, मूत्र, दुसरीं पातळ द्रव्यें आणि कल्कचूर्णादिक एक एक तोळा घालावीं.

गुडूचीधान्यकारिष्टरक्तचंदनपद्मकैः ।
गुडूच्यादिरयं काथः सर्वज्वरहरः स्मृतः ॥ ७ ॥

गुळवेल, धने, कडू लिंबाची साल, तांबडा चंदन, पद्मकाष्ठ व गुळवेल ह्यांचा काढा सर्वज्वरनाशक आहे.

हिमाची कल्पना.

क्षुण्णद्रव्यपलं सम्यक्षड्भिर्नीरपलैः प्लुतम् ।
निशोषितं हिमः स स्यात्तथा शीतकषायकः ॥
तन्मानं फाण्टवज्ज्ञेयं सर्वत्रैवैष निश्चयः ॥ १ ॥

कुटलेलें द्रव्य चार तोळे घेऊन तें चोवीस तोळे पाण्यांत रात्रीं भिजत घालून सकाळीं तें पाणी गाळून घ्यावें. ह्याला हिम असें म्हणतात. शीतकषाय हें त्याचें दुसरें नांव आहे. ह्याचें घेण्याचें मान फांटाप्रमाणें आहे असें समजावें.

आम्रं जम्बूं च ककुभं चूर्णीकृत्य जले क्षिपेत् ।
हिमं तस्य पिबेत्प्रातः सक्षौद्रं रक्तपित्तजित् ॥ २ ॥

आंब्याची साल, जांभळीची साल व अर्जुनसादड्याची साल ह्यांचें चूर्ण करून पाण्यांत टाकावें आणि सकाळीं त्याचा हिम गाळून घेऊन त्यांत मध घालून प्राशन करावा. हा रक्तपित्ताचा नाशक आहे.

फांटाची कल्पना.

क्षुण्णद्रव्यपले सम्यग्जलमुष्णं विनिक्षिपेत् ।
मृत्पात्रे कुडवोन्मानं ततस्तु स्रावयेत्पटात् ॥ १ ॥
स स्याच्चूर्णद्रवः फाण्टस्तन्मानं द्विपलोन्मितम् ।

कुटून चूर्ण केलेलें चार तोळे द्रव्य मातीच्या भांड्यांत घालून त्याजवर कढत (आधणाचें) पाणी सोळा तोळा ओतावें. नंतर तें गाळून घ्यावें. ह्याला फांट किंवा चूर्णद्रव्य असें म्हणतात. ह्याची मात्रा आठ तोळ्याची आहे. ह्यामध्यें साखर, मध, किंवा गूळ घालणें झाल्यास काढ्याचे मानाप्रमाणेंच घालावें.

मधुश्वेतागुडादींश्च क्राथवत्तत्र निक्षिपेत् ॥ २ ॥
मधूकपुष्पं मधुकं चन्दनं सपरूषकम् ।
मृणालं कमलं लोध्रं गम्भारीं नागकेसरम् ॥ ३ ॥
त्रिफलासारिवाद्राक्षालाजान्कोष्णजले क्षिपेत् ।
सितामधुयुतः पेयः फाण्टो वाऽसौ हिमोऽथवा ॥ ४ ॥
वातपित्तज्वरं दाहं तृष्णामूर्छारतिभ्रमान् ।
रक्तपित्तं मदं हन्यान्नात्र कार्या विचारणा ॥ ५ ॥

मोहाचीं फुलें, जेष्ठमध, चंदन, फालसा, कमळाचीं बिसें, कमळपुष्प, लोध्र, शिवणीचीं फळें, नाकेशर, त्रिफळा (हिरडा, बेहडा व आवळकाठी ह्यांचें चूर्ण), अनंतमूळ (उपरसालीचें मूळ), द्राक्षं, व भाताच्या लाह्या हीं प्रत्येक तीन तीन मासे घेऊन चूर्ण करून मातीच्या भांड्यांत घालून त्याजवर कढत पाणी सोळा तोळे

ओतावें व वस्त्रगाळ करून घ्यावें व त्यांत खडिसाखर व मध घालून हा फांट अथवा हिम प्राशन करावा. ह्याच्या योगानें वात, पित्त, ज्वर, दाह, तहान, मूर्च्छा, अरति (दुरूप नसणें), भ्रम (भोंवळ), रक्तपित्त व मदात्यय हे रोग नाश होतात, ह्यांत संशय नाहीं.

चूर्णाची कल्पना.

अत्यन्तशुष्कं यद् द्रव्यं सुपिष्टं वस्त्रगालितम् ।
तत्स्याच्चूर्णं रजः क्षोदस्तन्मात्रा कर्षसंमिता ॥ १ ॥
चूर्णे गुडः समो देयः शर्करा द्विगुणा भवेत् ।
चूर्णेषु भर्जितं हिङ्गु जीरकं चेति केचन ॥ २ ॥

अत्यंत शुष्क द्रव्य कुटून वस्त्रगाळ करून घ्यावें. त्याला चूर्ण असें म्हणतात. रज व क्षोद हीं त्याचीं दुसरीं नांवें आहेत. ह्याची मात्रा (डोस) एक तोळ्याची आहे. चूर्णामध्यें गूळ घालणें असल्यास तो समभाग घालावा व साखर दुप्पट घालावी. कित्येकांच्या मतानें जिरें व हिंग चूर्णांत घालणें झाल्यास भाजून घालावींत.

गोळ्यांची कल्पना.

वटका अथ कथ्यन्ते तन्नाम गुटिका वटी ।
मोदको वटिका पिण्डी गुडो वर्तिस्तथोच्यते ॥ १ ॥

आतां वटक कसे करावयाचे तें सांगतों. गुटिका, वटी, मोदक, वटिका, पिण्डी, गुड व वर्ती हीं वटकाचीं नांवें आहेत.

लेहवत्साध्यते वह्नौ गुडो वा शर्कराऽथवा ।
गुग्गुलुर्वा क्षिपेत्तत्र तच्चूर्णं निर्मिता वटी ॥ २ ॥
कुर्यादवह्निसिद्धेन क्वचिद्गुग्गुलुना वटीम् ।
द्रवेण मधुना वाऽपि गुटिकां कारयेद् बुधः ॥ ३ ॥
सिता चतुर्गुणा देया वटीषु द्विगुणो गुडः ।
सर्वचूर्णसमः कार्यो गुग्गुलुर्मधु तत्समम् ॥ ४ ॥
द्रवं च द्विगुणं देयं मोदकेषु भिषग्वरैः ।
कर्षप्रमाणां तन्मात्रां बलं दृष्ट्वा प्रयोजयेत् ॥ ५ ॥

गुळाचा अथवा साखरेचा लेहाप्रमाणें पाक करून त्यांत चूर्ण घालून गोळ्या कराव्या, किंवा गुग्गुळाचा (पाण्यांत अथवा का-

ढ्यांत) पाक करून त्यांत चूर्ण घालून गोळ्या कराव्या. गुग्गुळाच्या गोळ्या अग्नीवर पाक केल्यावांचूनही द्रवद्रव्य व चूर्ण घालून कराव्या, मध किंवा द्रवद्रव्य (पातळ द्रव्य) घालून चूर्णाच्याही गोळ्या कराव्या. साखरेंत गोळ्या करावयाच्या असल्यास साखर चौपट घालावी व गूळ दुप्पट घालावा. गुग्गुळ किंवा मध हा चूर्णाच्या समान घालावा. द्रवद्रव्य, पाणी वगैरे चूर्णाच्या दुप्पट घालावें. वटकाच्या मात्रेचें प्रमाण एक तोळ्याचें आहे. ही मात्रा बलाबलाचा विचार करून योजावी.

अवलेहाची कल्पना.

क्वाथादेर्यत्पुनः पाकाद्धनत्वं सा रसक्रिया।
सोऽवलेहश्च लेहश्च तन्मात्रा स्यात्पलोन्मिता ॥ १ ॥

काढे इत्यादिकांना पुनरपि अग्नीवर ठेवून आटवून पळीला चिकटेल अशा रीतीनें पाक सिद्ध करणें ह्याला रसक्रिया असें म्हणतात. अवलेह हें त्याचें दुसरें नांव आहे. ह्यालाच लेह असेंही म्हणतात. ह्याची मात्रा चार तोळ्यांची आहे.

सिता चतुर्गुणा कार्या चूर्णाच्च द्विगुणो गुडः।
द्रवं चतुर्गुणं दद्यादिति सर्वत्र निश्चयः ॥ २ ॥
दुग्धमिक्षुरसो यूषः पञ्चमूलकषायकः।
वासाक्वाथो यथायोग्यमनुपानं प्रशस्यते॥ ३ ॥

चूर्णाच्या चौपट साखर घ्यावी. गूळ घेणें झाल्यास तो दुप्पट घ्यावा. पाणी वगैरे पातळ पदार्थ चूर्णाच्या चौपट घालावे. असा सर्व लेहांसंबंधानें नियम आहे. दूध, उंसाचा रस, पंचमूळाचा काढा, यूष, आडुळशाचा काढा, ह्यांपैकीं विकारानुरूप योग्य त्या अनुपानाबरोबर अवलेहाची योजना करावी.

तेल तयार करण्याची कल्पना.

आदौ संचारयेत्क्वाथं दुग्धं कल्कं ततः क्रमात्।
ततोऽन्यत्सुरभि द्रव्यमेष स्नेहविधिः क्रमात् ॥ १ ॥

तेल सिद्ध करतांना प्रथम काढा, नंतर दूध, नंतर कल्क, आणि त्यानंतर दुसरीं सुवासिक द्रव्यें घालावीं. हा तेल सिद्ध करण्याचा क्रम आहे.

तैलं कृत्वा कटाहे दृढतरविमले मन्दमन्दानले तत्
पक्वं निष्फेनभावं गतमिह हि यदा शैत्यभावं समेत्य ।
मञ्जिष्ठारात्रिलोध्रैर्जलधरतनुकैः सामलैः साक्षपथ्यैः
सूचीपुष्पांघ्रिनीरैरुपहितमथ तैस्तैलगन्धं जहाति ॥ २ ॥

एका बळकट जाड अशा स्वच्छ कढईमध्यें तेल घालून मंदाग्नीनें (त्यांत घालावयाच्या काथादि द्रव्यांसह) पचन करावें. त्यावर फेस येण्याचा बंद झाला म्हणजे तें पक्व झालें असें समजावें. नंतर तें अग्नीवरून उतरून ठेवावें. निवाल्यावर मंजिष्ठ, हळद, लोध्र, नागरमोथे, दालचिनी, हिरडा, बेहडा, आवळकाठी, केवडा, वडाच्या पारंब्या व वाळा, ह्यांच्या कल्काची त्या तेलाला भावना द्यावी, म्हणजे तेलाचा दुर्गंध जातो.

तैलस्येन्दुकलांशकेन विकसा ग्राह्या तु मूर्छाविधौ
ये चान्ये त्रिफलापयोदरजनीह्रीवेरलोध्रान्विताः ।
सूचीपुष्पवटावरोहनलिकास्तत्स्याथ पादांशकाः
पाच्यास्तैलजगन्धदोषहृतये कल्कीकृतास्तद्विदैः ॥ ३ ॥

तेलाची दुर्गंधी जाण्याकरितां मंजिष्ठ घालावयाचें तें तेलाच्या सोळाव्या हिश्यानें घालावें. आणि त्रिफळा (हिरडा, बेहडा, आवळकाठी) नागरमोथे, हळद, वाळा, लोध्र, केवडा, वडाच्या पारंब्या, व गुलाबाचीं फुलें हीं द्रव्यें तेलाच्या चतुर्थांश घेऊन त्यांचा कल्क करून तेलांत घालून तेलाची दुर्गंधी जाण्याकरितां तेल पचन करावें.

आम्रजम्बूकपित्थानां बीजपूरकबिल्वयोः ।
शोधनं तिलतैलस्य पल्लवानां तु पञ्चकम् ॥ ४ ॥

आंबा, जांभळ, कवठ, महाळुंग व बेल ह्या पांच वृक्षांचीं पानें तिळाच्या तेलाचें शोधन करितात. (ह्या पांची वृक्षांचीं पानें घेऊन त्यांचा कल्क व रस ह्यांनीं तिळाचें तेल पचन करावें म्हणजे तें शुद्ध होतें.)

कल्काच्चतुर्गुणः स्नेहः स्नेहात्क्वाथं चतुर्गुणम् ।
क्वाथाच्चतुर्गुणं वारि क्वाथः क्वाथ्यसमो मतः ॥ ५ ॥
मृदौ चतुर्गुणं देयं कठिनेऽष्टगुणं जलम् ।
कठिनात्कठिने द्रव्ये वारि षोडशभागिकम् ॥ ६ ॥

कल्क द्रव्याच्या चौपट तेल असावें, आणि तेलाच्या चौपट

काढा असावा. काढा करतांना काढ्यांतील जीं द्रव्यें असतील त्यांच्या चौपट पाणी घालून चतुर्थांश काढा करावा. काढ्यांतील द्रव्य जर मृदु असेल तर पाणी चौपट घालावें. कठीण असेल तर आठपट घालावें. आणि फारच कठीण द्रव्य असेल तर पाणी सोळापट घालावें.

कर्षादितः पलं यावद्वारि षोडशकं क्षिपेत् ।
तदूर्ध्वं कुडवं यावत्क्षिपेदष्टगुणं जलम् ॥ ७ ॥
प्रस्थादितः क्षिपेन्नीरं खारी यावच्चतुर्गुणम् ।
शब्दहीनोऽग्निनिक्षिप्तः स्नेहः सिद्धो भवेत्तदा ॥ ८ ॥

एक तोळ्यापासून चार तोळेपर्यंत काढ्याचें द्रव्य असल्यास पाणी सोळापट घालावें, आणि चार तोळ्यांपासून सोळा तोळ्यांपर्यंत द्रव्य असेल तर पाणी आठपट घालावें. काढ्याचें द्रव्य प्रस्थापासून खारीपर्यंत असल्यास पाणी चौपट घालावें. तेल तयार झाल्यावर तें विस्तवावर टाकावें. जर त्यापासून शब्द निघाला नाहीं तर तेल तयार झालें म्हणून समजावें.

यदा फेनोद्गमस्तैले फेनशान्तिश्च सर्पिषि ।
वर्णगन्धरसोत्पत्तिः स्नेहसिद्धिस्तदा भवेत् ॥ ९ ॥
अकल्कद्रव्ययोगानां कठिनानां विचारतः ।
क्वाथो विधीयतेऽन्येषां कल्क एव भिषग्मतः ॥ १० ॥

ज्या वेळेस तेलावर फेस येऊं लागतो व तुपावरील फेस नाहींसा होऊं लागतो आणि त्यांतील द्रव्याप्रमाणें त्याला वर्ण, रुचि व वास हीं येऊं लागतात, त्या वेळीं तें तेल किंवा तूप तयार झालें असें समजावें. ज्या कठीण द्रव्यांचा कल्क होत नाहीं त्यांचा काढा करावा व ज्यांचा कल्क होण्यासारखा आहे त्यांचा कल्कच करावा, असें वैद्याचें मत आहे.

ईषत्पिष्टो भवेत्कल्कः क्वाथोऽग्निक्वथितो मतः ।
स्नेहपाकस्त्रिधा प्रोक्तो मृदुर्मध्यः खरस्तथा ॥ ११ ॥
ईषत्सरसकल्कस्तु स्नेहपाको मृदुर्भवेत् ।
मध्यपाकस्य सिद्धिश्च कल्के नीरसकोमले ॥ १२ ॥
ईषत्कठिनकल्कश्च स्नेहपाको भवेत्खरः ।
तदूर्ध्वं दग्धपाकः स्याद्दाहकृन्निष्प्रयोजकः ॥ १३ ॥

आमपाकश्च निर्वीर्यो वह्निमान्द्यकरो गुरुः ।
नस्यार्थं स्यान्मृदुः पाको मध्यमः सर्वकर्मसु ॥ १४ ॥
अभ्यङ्गार्थं खरः प्रोक्तो युञ्ज्यादेवं यथोचितम् ।
घृततैलगुडादींश्च साधयेन्नैकवासरे ।
प्रकुर्वन्त्युषिताश्चैते विशेषाद्गुणसंचयम् ॥ १५ ॥

द्रव्य वाटून पिठाप्रमाणें किंचित् बारीक केलें म्हणजे तो कल्क होतो. आणि द्रव्यांमध्यें पाणी घालून शिजवून तयार केला म्हणजे त्याला काढा म्हणतात. मृदु, मध्यम व खर असा स्नेहपाक तीन प्रकारचा आहे. तेलांतील कल्क किंचित् रसयुक्त असला म्हणजे त्याला मृदु स्नेहपाक म्हणतात. कल्कांतील सर्व रस नाहींसा होऊन कल्क न करपतां तसाच कोमल (मृदु) राहिला तर त्याला मध्यम पाक म्हणतात. आणि सर्व रस आटून तेलांतील कल्क कठीण झाला तर त्याला खरपाक असें म्हणतात. ह्यापेक्षां ज्यास्त आंच लागून तेलांतील कल्क करपला तर त्याला दग्धपाक असें म्हणतात. तो दाहकारक व निरुपयोगी समजावा. जर स्नेहपाक कच्चा राहिला तर तें तेल हीनवीर्य, जड व अग्निमांद्यकारक होतें. नस्यकर्मामध्यें मृदु स्नेहपाक असलेलें तेल घ्यावें. मध्यम स्नेहपाक असलेलें तेल सर्व कर्मांत योजावें. आणि अंगाला माखण्याकरितां खर (कडक) स्नेहपाक झालेलें तेल योजावें. ह्याप्रमाणें जशी योग्य दिसेल त्याप्रमाणें तेलाची योजना करावी. तूप, तेल व गुडादिक ह्यांची पाकसिद्धि एका दिवसामध्यें करूं नये. तीं एक रात्र पाण्यांत भिजत घालून दुसरे दिवशीं सिद्ध करावींत, म्हणजे विशेष गुणकारक होतात.

तैलं संस्थाप्य पात्रे विधिवदथ पचेद्वासरादग्निमानात्
क्काथैर्दुग्धैश्च कल्कैस्तदनु सुरभिभिः शोधनीयैर्विशुद्धैः ।
कस्तूरीचन्दनग्लौजलजलदसटीरक्तपाटीरकुष्ठ-
त्वङ्मञ्जिष्ठातुरुष्कागुरुनखरदलैः पीतकङ्कोलमुख्यैः ॥ १६ ॥

विधिपूर्वक तेल पात्रांत घालून काढा, दूध व कल्क ह्यांनीं व त्यानंतर कस्तुरी, चंदन, कापूर, वाळा, नागरमोथे, कचोरा, केशर, चंदन, कोष्ट, दालचिनी, मंजिष्ट, शिलारस, कृष्णागर, नखला, तमालपत्र, पिवळा वाळा, कंकोळ इत्यादि सुंगधी व शोधनीय

द्रव्यांनीं एक दिवसभर अग्नीचें पचन करावें.

लाक्षारसाचा विधि.

दशांशं लोध्रमादाय तद्दशांशां च सर्जिकाम् ।
किंचिच्च बदरीपत्रं वारि षोडशधा स्मृतम् ।
वस्त्रपूतो रसो ग्राह्यो लाक्षायाः पादशेषितः ॥ १ ॥

दहा भाग लोध्र त्याच्या दहाव्या हिश्शानें सज्जीखार, थोडीं बोरीचीं पानें व सोळापट पाणी घालून चतुर्थांश काढा करून वस्त्रगाळ करून घ्यावा. ह्याला लाक्षारस असें म्हणतात.

आसव व अरिष्ट यांची कल्पना.

द्रवेषु चिरकालस्थं द्रव्यं यत्संधितं भवेत् ।
आसवारिष्टभेदैस्तत्प्रोच्यते भेषजोचितम् ॥ १ ॥
यदपक्वौषधाम्बुभ्यां सिद्धं मद्यं स आसवः ।
अरिष्टः क्वाथसिद्धः स्यात्तयोर्मानं पलोन्मितम् ॥ २ ॥
अनुक्तमानारिष्टेषु द्रवद्रोणे गुडात्तुलाम् ।
क्षौद्रं क्षिपेद्गुडादर्धं प्रक्षेपं दशमांशकम् ॥ ३ ॥

पाणी आदिकरून द्रवपदार्थांमध्यें औषधी द्रव्यें घालून (तीं मातीच्या भांड्यांत ठेवून) तोंड बंद करून कित्येक दिवस पुरून ठेवावें. जमीनींतून काढल्यावर उत्तम प्रतीचें औषध बनतें. आसव व अरिष्ट असे त्याचे दोन प्रकार आहेत. जें पाण्यामध्यें घालून अग्नीवर पचन न करितां तसेंच पुरून ठेवून मद्याप्रमाणें तयार करितात त्याला आसव म्हणतात. आणि काढ्याप्रमाणें अग्नीवर तयार करून आसवाप्रमाणें पुरून ठेवून काढतात त्याला अरिष्ट असें म्हणतात. ह्यांची मात्रा चार तोळ्यांची आहे. अरिष्टादिकांमध्यें जेथें पाणी आदिकरून द्रव द्रव्यांचें प्रमाण सांगितलें नाहीं, त्या ठिकाणीं द्रवद्रव्य दोन द्रोण (वीसशें अठ्ठेचाळीस तोळे) घ्यावें. गूळ चारशें तोळे घ्यावा. मध गुळाच्या निम्मे घालावा. आणि आंत घालावयाचीं द्रव्यें गुळाच्या दशमांश घालावीं.

ज्ञेयः शीतरसः शीधुरपक्वमधुरद्रवैः ।
सिद्धः पक्वरसः सीधुः संपक्वमधुरद्रवैः ॥ ४ ॥
परिपक्वान्नसंधानसमुत्पन्नां सुरां जगुः ।
सुरामण्डः प्रसन्ना स्यात्ततः कादम्बरी घना ॥ ५ ॥

तदधो जगलो ज्ञेयो मेदको जगलाद्धनः ।
पक्वोऽसौ हृतसारः स्यात्सुराबीजं च किण्वकम् ॥ ६ ॥
यत्तालखर्जूररसैः साधितं सा हि वारुणी ।
कन्दमूलफलादीनि सस्नेहलवणानि च ॥ ७ ॥
यत्र द्रवेऽभिषूयन्ते तत्सूक्तमभिधीयते ।
विनष्टमम्लतां यातं मधु वा मधुरद्रवः ॥ ८ ॥
विनष्टः संधितो यस्तु तच्चुक्रमभिधीयते ।
गुडाम्बुना सतैलेन कन्दशाकफलैस्तथा ॥ ९ ॥
साधितं चाम्लतां यातं गुडसूक्तं प्रचक्षते ।
एवमेवेक्षुसूक्तं स्यान्मृद्वीकासंभवं तथा ॥ १० ॥
तुषाम्बु संधितं ज्ञेयमामैर्विदलितैर्यवैः ।
यवैः सुनिस्तुषैः पक्वैः सौवीरं संधितं भवेत् ॥ ११ ॥
कुल्माषधान्यमण्डादिसंधितं काञ्जिकं विदुः ।
सण्डाकी संधिता ज्ञेया मूलकैः सर्षपादिभिः ॥ १२ ॥

ऊंस आदिकरून पदार्थांचे गोड रस अपक्व असतांच मद्याप्रमाणें तयार करणें ह्याला "शीतरससीधु" असें म्हणतात. आणि तेच मधुरादि रस पक्व करून मद्याप्रमाणें तयार केलें असतां त्याला "पक्वरससीधु" म्हणतात. साळीचा भात वगैरे अन्नाच्या संधानापासून जें मद्य तयार करितात, त्याला सुरा म्हणतात. सुरेवरील जी निवळ तिला प्रसन्ना म्हणतात. त्याचा जो घन भाग त्याला कादंबरी म्हणतात. कादंबरीचा जो खालचा भाग त्याला जगल म्हणतात. जगलामधील जो घन भाग त्याला मेदक म्हणतात. तो पक्व करून त्याचा अर्क काढून घेतल्यावर जो भाग राहतो त्याला सुराबीज किंवा किण्वक असें म्हणतात. ताडाच्या किंवा खजुराच्या रसापासून जी तयार करितात तिला वारुणी म्हणतात. कंद, मुळें, फळें इत्यादिकांमध्यें तेल, मीठ वगैरे घालून पाणी वगैरे द्रव पदार्थ मिश्र करून (तीन दिवसपर्यंत पुरून ठेवून) जें तयार करितात त्याला सूक्त म्हणतात. मध अथवा मधुर रस मातीच्या भांड्यांत घालून पुरून ठेवून तें आंबट झाल्यावर कांहीं दिवसांनीं काढून घेतात त्याला चुक्र असें म्हणतात. गुळाचें पाणी, तेल, व कंदशाकादि फळें मिश्र करून भांड्यांत घालून तोंड बंद

करून कांहीं दिवस पुरून ठेवून आंबट झाल्यावर काढून घेतात त्याला गुडसूक्त म्हणतात. ह्याचप्रमाणें उंसाच्या रसाचें व द्राक्षांच्या रसाचेंही सूक्त करितात. सातू न भाजतां तसेच भरडून त्यांत पाणी घालून मातीच्या भांड्यांत ठेवून तोंड बंद करून कांहीं दिवस पुरून ठेवून काढतात त्याला तुषांबु म्हणतात. कांडून कोंडा काढून टाकलेले सातू शिजवून त्यांत पाणी घालून तोंड बंद करून पुरून ठेवून कांहीं दिवसांनीं आंबट झाल्यावर काढून घेतात त्याला सौवीर म्हणतात. अर्धवट भिजविलेल्या धान्यांत पाणी घालून शिजवून त्याचें कट अथवा पेज काढून ती वरीलप्रमाणें भांड्यांत भरून तोंड बंद करून कांहीं दिवस ठेवतात व आंबल्यावर काढतात त्याला कांजी म्हणतात. मुळ्याचा खीस घेऊन त्यांत पाणी घालून मोहऱ्या हिंग, जिरें, वगैरे पदार्थ घालून तोंड बंद करून कांही दिवस ठेवून आंबल्यावर काढून घेतात त्याला संडाकी असें म्हणतात.

शिलाजतु करण्याची रीत.

मुख्यां शिलाजतुशिलां सूक्ष्मखण्डां प्रकल्पयेत् ।
निक्षिप्यात्युष्णपानीये यामैकं स्थापयेत्सुधीः ॥ १ ॥
मर्दयित्वा ततो नीरं गृह्णीयाद्वस्त्रगालितम् ।
स्थापयित्वा च मृत्पात्रे धारयेदातपे बुधः ॥ २ ॥
उपरिस्थं घनं यत्स्यान्निक्षिपेदन्यपात्रके ।
धारयेदातपे तस्मादुपरिस्थं घनं नयेत् ॥ ३ ॥
एवं पुनः पुनर्नीत्वा द्विमासाभ्यां शिलाजतु ।
भूयात्कार्यक्षमं वह्नौ क्षिप्तं लिङ्गोपमं भवेत् ॥ ४ ॥
निर्धूमं च ततः शुद्धं सर्वकार्येषु योजयेत् ।
अधःस्थितं च यच्छेषं तस्मिन्नीरं विनिक्षिपेत् ॥ ५ ॥

उत्तम प्रकारचा शिलाजिताचा दगड आणून त्याचे बारीक बारीक तुकडे काढून ते कढत पाण्यांत एक प्रहरभर भिजत टाकावे. नंतर ते पाण्यांत कुसकरून तें पाणी गाळून घ्यावें, आणि

---

१. "तस्मान्नीरं विनिक्षिपेत्" असा पाठ पुष्कळ प्रतींतून असून तोच बरोबर दिसतो. म्हणून त्याला धरून अर्थ लिहिला आहे.

मातीच्या भांड्यांत घालून उन्हांत ठेवावें. नंतर पाण्यावर (साई-प्रमाणें) येणारा घन भाग काढून घ्यावा. ह्याप्रमाणें वरचेवर करीत गेलें असतां दोन महिन्यांनीं शिलाजित तयार होतो. तो औषधी-प्रयोगांत योजण्यास योग्य असून अग्नीवर ठेवला असतां लिंगाकार होतो व निर्धूम असतो. तो सर्व औषधीप्रयोगांत योजावा. खालीं राहिलेला जो भाग त्यांतील पाणी काढून टाकावें.

धातूचें लक्षण, शोधन, मारण.

स्वर्णताराररताम्राणि नागवङ्गौ च तीक्ष्णकम् ।
धातवः सप्त विज्ञेया अष्टमः कापि पारदः ॥ १ ॥

सोनें, चांदी, पितळ, तांबें, शिसें, वंग (कथिल) व तिखें (पोलाद) हे सात धातु आहेत. पारा हा आठवा धातु आहे असें-ही कोणी मानतात.

स्वर्णं तारं च ताम्रं च वङ्गो नागस्तु पंचमः।
रीतिका च तथा घोषो लोहं चेत्यष्ट धातवः ॥ २ ॥

सोनें, चांदी, तांबें, कथिल, शिसें, पितळ, कांसें व लोखंड असे आठ धातु आहेत, असेंही एकाचें मत आहे.

तैले तक्रे गवां मूत्रे कांजिके च कुलत्थके ।
सप्तधा सप्तनिर्वापात्सर्वलोहं विशुध्यति ॥ ३ ॥

तेल, ताक, गोमूत्र, कांजी, हुलग्याचें कट ह्या प्रत्येकामध्यें तापवून सात सात वेळ बुडविले म्हणजे सर्व धातु शुद्ध होतात.

सप्त धातूंचे रंग.

स्वर्णं चम्पकवर्णाभं कृष्णत्वं तारताम्रयोः ।
कांस्यं धूसरवर्णं स्यान्नागः पारावतप्रभः ॥ १ ॥
वङ्गं शुभ्रत्वमायाति तीक्ष्णं जम्बूफलोपमम् ।
अभ्रकं चेष्टिकाभं स्याद्धातूनां वर्णनिर्णयः ॥ २ ॥

सोनें सोनचाफ्याच्या फुलासारखें पिवळें असतें. चांदी व तांबें ह्यांना काळेपणा असतो. कांसें धुरकट रंगाचें असतें. शिसें पार-व्याच्या रंगासारखें असतें. कथील शुभ्र रंगाचें असतें. पोलाद जांभळ्या रंगाचें असतें, आणि अभ्रक विटकराप्रमाणें असतें. ह्या-प्रमाणें धातूंचे रंग आहेत.

सर्व धातूंचें सामान्य मारण.

शिलार्कदुग्धगन्धकैर्युताश्च सप्त धातवः ।
पुटैश्च द्वादशैः परं व्रजन्ति भस्मतां सदा ॥ १ ॥

मनशीळ, गंधक, व रुईचा चीक ह्यांचा लेप करून गजपुट द्यावें. ह्याप्रमाणें बारा पुटें दिलीं असतां साती धातूंचीं उत्तम प्रकारचीं भस्में होतात.

सोनें.

दाहे रक्तं सितं छेदे निकषे कुङ्कुमप्रभम् ।
तारशुल्बोत्थितं स्निग्धं मृदु हेम गुरूत्तमम् ॥ १ ॥
श्वेताङ्गं कठिनं रूक्षं विवर्णं समलं दलम् ।
दाहे छेदे सितं श्वेतं कषे लघु च तत्त्यजेत् ॥ २ ॥

जें सोनें अग्नीमध्यें तापविलें असतां आरक्तवर्ण दिसतें, तोडलें असतां त्या ठिकाणीं पांढरी झांक मारते, कसोटीवर घासलें असतां केशरी रंगाप्रमाणें पिवळें उठतें तें व जें चांदी व तांबें ह्यांच्यापासून शोधून काढलेलें, स्निग्ध, मृदु व जड असें जें असतें तें उत्तम. जें सोनें दिसण्यांत पांढरें, कठीण, रूक्ष, ज्याचा पत्रा हीन रंगाचा, मळकट, जें तापविलें असतां, तोडलें असतां किंवा घासलें असतां पांढरें व वजनाला हलकें असतें तें कनिष्ट होय. तें औषधीकमात घेऊं नये.

सोन्याचें शोधन.

सुवर्णमुत्तमं वह्नौ विद्रुतं निक्षिपेत्रिशः ।
काञ्चनारद्रवैः शुद्धं काञ्चनं जायते भृशम् ॥ १ ॥

उत्तम सोनें अग्नीमध्यें पातळ करून तीन वेळ कांचनाच्या रसामध्यें ओतावें, म्हणजे उत्तम प्रकारें शुद्ध होतें.

सोन्याचें भस्म.

काञ्चने गलिते नागं षोडशांशेन निक्षिपेत् ।
चूर्णयित्वा तथाऽऽम्लेन घृष्ट्वा कृत्वा च गोलकम् ॥ १ ॥
गोलकेन समं गन्धं दत्त्वा चैवाधरोत्तरम् ।
शरावसंपुटे धृत्वा पुटेद्विंशद्वनोत्पलैः ॥ २ ॥
एवं सप्तपुटैर्हेम निरुत्थं भस्म जायते ।

सोनें पातळ करून त्यांत त्याच्या सोळाव्या हिश्शानें शुद्ध शिसें घालावें. नंतर त्याचें चूर्ण करून लिंबाच्या रसांत खलून त्याचा गोळा करून त्या गोळ्याच्या समभाग शुद्ध गंधक घेऊन तो खालीं वर घालून शरावसंपुटांत (तोंडास तोंड जुळणाऱ्या दोन परळांमध्यें) ठेवून त्याच्या तोंडास मातकापड करून वीस रान शेणींमध्यें पुट द्यावें. ह्याप्रमाणें सात पुटें दिलीं असतां निरुत्थ भस्म होतें.

दुसरा प्रकार.

स्वर्णपत्रसमं नागभस्म निम्बूविलेपितम् ॥ ३ ॥
त्रिवारं वै गजपुटे सुवर्णं भस्मतां व्रजेत् ।

सोन्याच्या पत्र्याच्या वजनाइतकें शिशाचें भस्म घेऊन तें लिंबाच्या रसांत खलून त्याचा सोन्याच्या पत्र्यास लेप करून शरावसंपुटांत घालून मातकापड करून गजपूट द्यावें. अशीं तीन गजपुटें दिल्यानें सोन्याचें भस्म होतें.

तिसरा प्रकार.

पारावतमलैर्लेप्यान्यथवा कुक्कुटोद्भवैः ॥ ४ ॥
हेमपत्राणि लेप्यानि प्रदद्यादुत्तरोत्तरम् ।
गन्धचूर्णं समं कृत्वा शरावयुतसंपुटे ॥ ५ ॥
प्रदद्यात्कुक्कुटपुटं पञ्चभिर्गोमयोपलैः ।
एवं नवपुटं दद्याद्दशमं च महापुटम् ।
त्रिंशद्वनोत्पलैर्देयं जायते हेमभस्म तु ॥ ६ ॥

पारव्याच्या विष्ठेनें अथवा कोंबड्याच्या विष्ठेनें सोन्याच्या पत्र्यास लेप करून, पत्र्याच्या समान शुद्ध गंधक घेऊन पत्र्याच्या खालीं वर घालून शरावसंपुटांत ठेवून गाईच्या शेणाच्या पांच गोवऱ्यांमध्यें कुक्कुटपुट द्यावें. ह्याप्रमाणें नऊ पुटें द्यावीं. प्रत्येक पुटास गंधक द्यावा, आणि शेवटीं दहावें महापुट गाईच्या शेणाच्या वीस गोवऱ्यांमध्यें द्यावें, म्हणजे सोन्याचें भस्म होतें.

सोन्याचे व त्याच्या भस्माचे गुण.

स्वर्णं शीतं पवित्रं क्षयवमिकसनश्वासमेहास्रपित्त-
क्षैण्यक्ष्वेडक्षतास्रप्रदरगदहरं स्वादु तिक्तं कषायम् ।

वृष्यं मेधाग्निकान्तिप्रदमधुररसं कार्श्यहारि त्रिदोषो-
न्मादापस्मारशूलज्वरजयि वपुषो बृंहणं नेत्रपथ्यम् ॥ १ ॥

शुद्ध सोनें हें गुणानें थंड, पवित्र व क्षय, वमन (ओकारी), खोकला, श्वास, प्रमेह, रक्तपित्त, क्षीणता, विषबाधा, उरःक्षत, रक्तप्रदर ह्या रोगांचें नाशक, मधुर, कडू, तुरट, कामोद्दीपक, बुद्धिवर्धक, कांतिदायक, गोड, सारक, कृशपणा दूर करणारें, त्रिदोष, उन्माद, अपस्मार, शूल व ज्वर ह्यांना जिंकणारें, शरीर पुष्ट करणारें, आणि नेत्रांना हितकारक असें आहे.

एतद्भस्म सुवर्णजं कटुघृतोपेतं द्विगुञ्जोन्मितं
लीढं हन्ति नृणां क्षयाग्निसदनं श्वासं च कासारुची ।
ओजोधातुविवर्धनं बलकरं पाण्डवामयध्वंसनं
पथ्यं सर्वविषापहं गदहरं दुष्टग्रहण्यादिहृत् ॥ २ ॥

सोन्याचें भस्म त्रिकटूचें चूर्ण व तूप यांशीं दोन गुंजांप्रमाणें घेतलें असतां क्षय, अग्निमांद्य, खोकला व अरुचि ह्यांचें नाशक, ओज व शुक्रादि धातु ह्यांना वाढविणारें, बलकारक, पांडुरोगनाशक, पथ्यकारक व सर्व गरदोष (सौम्य विषापासून होणारे विकार) व दुष्ट असा संग्रहणी रोग ह्यांचा नाश करितें.

बलं च वीर्यं हरते नराणां रोगव्रजान्पोषयतीह काये ।
असौख्यकार्यैव सदैव हेमापक्वं सदोषं मरणं करोति ॥ ३ ॥

अशुद्ध सोनें बल व वीर्य ह्यांचा नाश करितें. रोगसमुदायाची वाढ करितें. तें दोषयुक्त असून सदोदित अस्वस्थता उत्पन्न करितें, आणि अखेर मरणही आणतें.

शुद्ध सोन्याच्या वर्खाचे गुण.

शुद्धं स्वर्णदलं समस्तविषहृच्छूलाम्लपित्तापहं
हृद्यं पुष्टिकरं क्षयव्रणहरं कायाग्निमान्द्यं जयेत् ।
हिक्कानाहहरं परं कफहरं नृणां हितं सर्वदा
तत्तद्रोगहरानुपानसहितं सर्वामयध्वंसनम् ॥ १ ॥

शुद्ध सोन्याचा वर्ख सर्व प्रकारच्या विषांचा नाशक, शूल व आम्लपित्त ह्यांचाही नाश करणारा, हृदयाला हितावह, पौष्टिक, क्षय, व्रण, अग्निमांद्य, उचकी व पोट फुगणें ह्यांचा नाश करणारा,

पराकाष्ठेचा कफनाशक, सदोदित पथ्यकारक, व अनुपानपरत्वें सर्व रोगांचा नाश करणारा आहे.

रुपें.

गुरु स्निग्धं मृदु श्वेतं दाहे छेदे च यत्क्षमम् ।
वर्णाढ्यं चन्द्रवत्स्वच्छं तारमत्र गुणान्वितम् ॥ १ ॥

उत्तम प्रकारची चांदी जड, स्निग्ध, मृदु, पांढऱ्या रंगाची, अग्नीमध्यें तापविली असतां किंवा तोडली असतां जिचा रंग बदलत नाहीं अशी, उत्तम शुभ्रवर्ण, चंद्राप्रमाणें तेजस्वी व गुणावह असते.

कृत्रिमं कठिनं रूक्षं रक्तपीतदलं लघु ।
दाहे छेदे च यन्नष्टं रूप्ये दोषा दश स्मृताः ॥ २ ॥

रुपें हें कृत्रिम, कठीण व रूक्ष असल्यास, त्याचे पत्रे तांबूस पिवळट असल्यास, तें हलकें असल्यास. तापविलें असतां किंवा तोडलें असतां त्याचा रंग नष्ट झाल्यास तें दोषयुक्त आहे, असें समजावें.

चांदीचें शोधन.

पत्रीकृतं तु रजतं संतप्तं जातवेदसि ।
निर्वापितमगस्त्यस्य रसे वारत्रयं शुचि ॥ १ ॥

चांदीचे पत्रे करून ते अग्नीमध्यें तापवून हादग्याच्या पाल्याच्या रसांत तीन वेळ बुडवावे, म्हणजे ते शुद्ध होतात.

चांदीचें भस्म करण्याचा प्रकार.

तारपत्राणि सूक्ष्माणि कृत्वा तत्तुल्ययोः पृथक् ।
सूतगन्धकयोस्तुल्यतालयोः खल्वसंस्थयोः ॥ २ ॥
कल्कं कृत्वा कुमार्यद्भिस्तेन तानि प्रलेपयेत् ।
शरावसंपुटे रुद्ध्वा त्रिंशद्वन्योत्पलैः पुटेत् ।
एवं रजतमाप्नोति मृतिं वारद्वयेन वै ॥ ३ ॥

रुप्याचे पत्रे (कागदाप्रमाणें) बारीक करून पारा, गंधक व हरताळ हीं प्रत्येक शुद्ध करून त्या पत्र्याच्या वजनाइतकीं वेगवेगळीं घेऊन कोरफडीच्या रसांत खलून त्या कल्काचा त्या पत्र्यास लेप करून शरावसंपुटांत घालून मातकापड करून तीस रानशेणीमध्यें पुट द्यावें. अशीं दोन पुटें दिलीं असतां चांदीचें भस्म होतें.

दुसरा प्रकार.

विधाय पिष्टं सूतेन रजतस्याथ मेलयेत् ।
तालगन्धसमं पश्चान्मर्दयेन्निम्बुकद्रवैः ।
द्वित्रैः पुटैर्भवेद्भस्म योज्यमेतद्रसादिषु ॥ ३ ॥

चांदीचा चूर करून त्याच्या समान त्यांत पारा घालून खलावें. नंतर त्यांत त्या चांदीच्या चुराइतका गंधक व तितकाच हरताळ शुद्ध करून त्यांत मिसळून लिंबाच्या रसानें खलून गोळा करून शरावसंपुटांत ठेवून मातकापड करून दोनतीन पुटें द्यावीं, म्हणजे भस्म होतें. तें रसायनांमध्यें योजावें.

तिसरा प्रकार.

माक्षिकं दरदनिम्बुजप्लुतं सूक्ष्मरौप्यदलसंचयं पुटेत् ।
द्वित्रिवारमथ भस्मतां व्रजेत्पातकौघ इव शंकरस्मृतेः ४॥

शुद्ध चांदीचे पातळ पत्रे करून त्यांच्या समान शुद्ध हिंगूळ व शुद्ध सुवर्णमाक्षिक घेऊन लिंबाच्या रसांत खलून त्या पत्र्यास त्याचा खालीं वर लेप करावा, आणि दोन तीन पुटें द्यावीं; म्हणजे शंकराच्या नामस्मरणानें जसें पातकाचें भस्म होऊन जातें तसें चांदीचें भस्म होतें.

चांदीचे गुण.

तारं शीतकषायमम्लमधुरं दोषत्रयच्छेदनं
स्निग्धं दीपनमाक्षिकुक्षिगदजिद्दाहं विषादिं हरेत् ।
मेदोच्छेदि मदात्ययात्ययकरं कांत्यायुरारोग्यकृत्
यक्ष्मापस्मृतिशूलपाण्डुपलितप्लीहज्वरघ्नं सरम् ॥ १ ॥
अशुद्धं रजतं कुर्यात्पाण्डुकण्डुगलग्रहान् ।
विबन्धं वीर्यनाशं च बलहानिं शिरोरुजम् ॥ २ ॥

चांदी थंड, तुरट, आंबट, मधुर, त्रिदोषशामक, स्निग्ध, अग्निदीपक, नेत्ररोगनाशक, दाह, विषबाधा, मेद, मदात्यय, ह्यांना दूर करणारी, कांति, आयुष्य, आरोग्य ह्यांना देणारी, क्षय, अपस्मार, शूल, पांडुरोग, पलितरोग (म्हातारपण), पांथरी, व ज्वर ह्यांची नाशक आणि सारक आहे. अशुद्ध रुपें पांडुरोग, कंडू, गळ्याचा अवरोध, ह्या विकारांना कारितें. तसेंच तें मलावरोध, वीर्यनाश, बलहानि, व मस्तकपीडा ह्यांना कारितें.

तांबें.

न विषं विषमित्याहुस्ताम्रं तु विषमुच्यते ।
एको दोषो विषे ताम्रे त्वष्टौ दोषाः प्रकीर्तिताः ॥ १ ॥
भ्रमो मूर्छा विदाहश्च स्वेदक्लेदनवान्तयः ।
अरुचिश्चित्तसंताप एते दोषा विषोपमाः ।
तस्मात्संशोधयेत्ताम्रं तद्दोषविनिवृत्तये ॥ २ ॥

विष हें कांहीं विष नव्हे, इतकें तांबें हें विष आहे, असें म्हणतात. कारण विषामध्यें एकच दोष आहे, पण तांब्यामध्यें आठ दोष असतात. भ्रम, मूर्च्छा, विदाह, स्वेद (घाम येणें), अंग ओलसर असणें, ओकारी, अरुचि, मनाला संताप, हे आठ दोष विषाप्रमाणें ताम्रामध्यें आहेत. ह्यासाठीं हे दोष दूर होण्याकरितां ताम्राचें शोधन करावें.

तांब्याची शुद्धि.

वज्रीदुग्धैः सलवणैस्ताम्रपत्रं विलेपयेत् ।
अग्नौ संताप्य निर्गुण्डीरसैः संसेचयेत्त्रिशः ॥
स्नुह्यर्कक्षीरसेचैर्वा शुल्वशुद्धिः प्रजायते ॥ १ ॥

त्रिधारी निवडुंगाच्या चिकांत मीठ घालून त्याचा तांब्याच्या पत्र्यावर लेप करावा, आणि अग्नीमध्यें लाल करून त्याजवर निर्गुंडीचा रस किंवा त्रिधारी निवडुंगाचा चीक किंवा रुईचा चीक शिंपावा. ह्याप्रमाणें तीन वेळ करावें, म्हणजे तांबें शुद्ध होतें.

गोमूत्रेण पचेद्यामं ताम्रपत्रं दृढाग्निना ।
साम्लक्षारेण संशुद्धिं ताम्रं प्राप्नोति सर्वथा ॥ २ ॥

तांब्याचे पातळ पत्रे करून ते चिंच, मीठ व गोमूत्र हीं एकत्र करून त्यांत टाकून एक प्रहरपर्यंत पचन करावे, म्हणजे तांबें शुद्ध होतें.

मारण.

चूर्णं शुद्धस्य ताम्रस्य समसूतं विमर्दयेत् ।
खल्वे जम्बीरनीरेण तयोस्तुल्यं तु गन्धकम् ।
दिनं गजपुटे पाच्यं ताम्रभस्म प्रजायते ॥ १ ॥

शुद्ध तांब्याचा चूर करून त्याच्या समभाग शुद्ध पारा व दोन्ही दव्यांबरोबर शुद्ध गंधक घेऊन सर्वांचा लिंबाच्या रसांत खल करून

गजँपुटामध्यें एक दिवस पचन करावें. म्हणजे तांब्याचें भस्म होतें.

तिलपर्णीरसैस्ताम्रपत्राणि परिलेपयेत् ।
शुभ्रवर्णं भवेत्क्षिप्रं नात्र कार्या विचारणा ॥ २ ॥

तांब्याच्या पत्र्यास (पिवळ्या) तिळवणीच्या पाल्याच्या रसाचा लेप करून किंवा (कोणाच्या मतें) रक्तचंदनाच्या पाल्याच्या रसाचा लेप करून गजपूट द्यावें, म्हणजे तांब्याचें शुभ्रवर्ण भस्म होतें.

कथिलमिश्र तांब्याचें भस्म.

शुद्धताम्रस्य पत्राणि शुक्तिद्वयमितानि च ।
त्रपु शुक्तिमितं तेन वेष्टयित्वाऽथ तानि तु ॥ १ ॥
यामं पचेद्धटीयन्त्रे यदा त्रपुमयं तदा ।
तत्स्वाङ्गशीतं निष्कास्य भक्षयेद्वल्लसंमितम् ॥ २ ॥
शृङ्गबेरयवक्षारशोषणैस्तन्निहन्ति च ।
कफामयारुचिप्लीहस्त्रपुताम्रमिदं क्षणात् ॥ ३ ॥

शुद्ध तांब्याचे पत्रे दोन तोळे घेऊन दोन तोळे शुद्ध कथिल घ्यावें. त्या कथिलाचें त्या तांब्याच्या पत्र्यास वेष्टण करावें, आणि एक प्रहरपर्यंत घटीयंत्रांमध्यें ते पचन करावे. म्हणजे ते कथलाशीं एकरूप होतील. नंतर स्वांगशीत झाल्यावर काढून घेऊन एक वालप्रमाणें भक्षण करावें. हें आलें, जवखार व मिरीं ह्यांच्याशीं घेतलें असतां कफरोग, अरुचि व पांथरी ह्यांचा क्षणांत नाश करितें.

सोमनाथ ताम्र.

शुल्बतुल्येन सूतेन बलिना तत्समेन च ।

---

* गजपुटाचें प्रमाण रसरत्नसमुच्चयांत सांगितलें आहे तें असें:—दोन हात लांब, दोन हात रुंद व दोन हात खोल असा एक खळगा खणून त्याचा अजमासें दोन तृतीयांश भाग गोवऱ्यांनीं भरावा, व त्याजवर औषध घातलेली मूस (शरावसंपुट) ठेवून खालीं घातलेल्या गोवऱ्यांच्या निम्म्यानें गोवऱ्या वर घालून पेटवून द्यावें. ह्याला गजपुट म्हणतात. ह्यामध्यें पक्व झालेलें औषध महागुणवान होतें.

१ "शोषणैः" असा पाठ बहुतेक प्रतींत आहे; परंतु आमचे जवळचे तासगांवचे प्रतींत "शोषणैः" ह्या ठिकाणीं "सोषणैः" असा पाठ असून तोच पाठ चांगला वाटल्यावरून त्याला अनुसरून "मिरीं" असा अर्थ केला आहे.

तदर्धांशेन तालेन शिलया च तदर्धया ॥ १ ॥
विधाय कज्जलीं श्लक्ष्णां सूक्ष्मकज्जलसंनिभाम् ।
कज्जल्या ताम्रपत्राणि पर्यायेण विलेपयेत् ॥ २ ॥
यन्त्राध्यायविनिर्दिष्टवालुकायन्त्रगं पचेत् ।
प्रपचेद्युगयामं तु स्वाङ्गशीतं समुद्धरेत् ॥ ३ ॥
तत्तद्रोगहरानुपानसहितं ताम्रं द्विवल्लोन्मितं
तल्लीढं परिणामशूलमुदरं शूलं च पाण्डुज्वरम् ।
गुल्मप्लीहक्षयाग्निसादसदनं श्वासं च कासं तथा
दुष्टां च ग्रहणीं हरेद् ध्रुवमिदं तत्सोमनाथाभिधम् ॥ ४ ॥

शुद्ध तांब्याच्या पत्र्याबरोबर पारा, पाऱ्याच्या समान शुद्ध गंधक, गंधकाच्या निंमे शुद्ध हरताळ व हरताळाच्या निंमे शुद्ध मनशीळ घेऊन सर्वांची काजळाप्रमाणें बारीक कज्जली करून कांहीं तरी पर्यायानें (म्हणजे ती कज्जली लिंबाच्या किंवा कोरफडीच्या रसांत खलून) त्या तांब्याचे पत्र्यास लेप करावा; आणि ते पत्रे यंत्राध्यायांत सांगितलेल्या वालुकायंत्रांत[1] ठेवून दोन प्रहरपर्यंत पचन करावे, आणि स्वांगशीत झाल्यावर काढून घ्यावे, म्हणजे उत्तम प्रकारचें ताम्र भस्म होतें. हें त्या त्या रोगावरील अनुपान योजून दोन दोन वालपर्यंत द्यावें. ह्याच्या सेवनानें परिणामशूल, उदर, शूल, पांडुरोग, ज्वर, गुल्म, पांथरी, क्षय, अग्निमांद्य, कास, श्वास व दुष्ट असा संग्रहणी रोग ह्यांचा नाश होतो.

नेपालं समरुद्रबीजमसुरस्तुल्यस्तयोस्तालक-
स्तस्यार्धार्धशिलां विधाय विधिना श्लक्ष्णां परां कज्जलीम् ।
लिप्त्वा ताम्रदलान्यधोर्ध्वमनया भाण्डे पचेद्यामकं

---

१. वालुकायंत्राची कृतिः—एक 'अग्निकुपी' घेऊन तिला एक अंगुल जाडीचें मातकापड करून, तीमध्यें पचन करावयाचें रसायन घालून, तोंडास बूच बसवून ती कुपी एक वीतभर लांब व रुंद तोंडाच्या मातीच्या भांड्याच्या तळास बारीक भोंक पाडून त्याजवर ठेवून, सभोंवतीं वाळू घालून दोन तृतीयांश कुपी बुजवावी, व चुलीवर ठेवून सांगितल्याप्रमाणें अनुक्रमें मंद, मध्यम व कडक आंच द्यावी. ह्याला वालुकायंत्र म्हणतात. कुपीचें मातकापड वाळल्यावर त्यांत औषध भरावें. दोन तृतीयांश कुपी औषधानें भरून एकतृतीयांश भाग मोकळा राखावा.

यन्त्राध्यायसमुक्तशास्त्रविधिना तत्स्वाङ्गशीतं हरेत् ॥ १ ॥

तांब्याचे पातळ पत्रे शुद्ध करून त्यांच्या समान शुद्ध पारा, पाऱ्याच्या बरोबरीनें शुद्ध गंधक, गंधकाच्या निंमे शुद्ध हरताळ व हरताळाच्या निंमे शुद्ध मनशीळ घेऊन पाऱ्यासुद्धां सर्वांची कज्जली करून त्या कज्जलीनें त्या तांब्याच्या पत्र्यास खालीं वर लेप करून यंत्राध्यायांत सांगितलेल्या वालुकायंत्रामध्यें एक प्रहर पचन करावें. म्हणजे उत्तम प्रकारचें ताम्रभस्म होतें. तें स्वांगशीत झाल्यावर काढून घ्यावें. ह्याला सोमनाथी ताम्र म्हणतात.

तांब्याचे सामान्य गुण.

ताम्रं शीतं निहन्याद्व्रणकृमिजठरानाहसंप्लीहपाण्डु-
श्वासश्लेष्मास्रवातक्षयपवनगदं शूलयुग्मं च गुल्मम् ।
कुष्ठान्यष्टादशापि स्मरबलरुचिकृद्रक्तमेदोम्लपित्त-
च्छेदि प्रोक्तं त्वशुद्धं क्रिमिमुदरगदाध्मानकुष्ठादि कुर्यात् ॥१

शुद्ध तांबें थंड, व्रण, कृमि, उदर, पोट फुगणें, पांथरी, पांडुरोग, श्वास, कफ, वातरक्त, क्षय, वातविकार, शूल, परिणामशूल, गुल्म, अठरा प्रकारचीं कुष्ठें, रक्तपित्त व आम्लपित्त ह्यांचा नाश करितें. शिवाय तें शक्तिवर्धक, रुचिकारक व कामोद्दीपक असें आहे. अशुद्ध ताम्र कृमि, उदर व आध्मान (पोट फुगणें) हे विकार उत्पन्न करणारें आहे.

पितळ व कांसें.

रीतिका द्विविधा ज्ञेया तत्राऽऽद्या राजरीतिका ।
काकतुण्डी द्वितीया सा तयोराद्या गुणाधिका ॥ १ ॥
संतप्ता काञ्जिके क्षिप्ता ताम्रा स्याद्राजरीतिका ।
काकतुण्डी तु कृष्णा स्यान्नासौ सेव्या विजानता ॥ २ ॥

सोनपितळ (राजरीतिका) व काकतुंडी पितळ, असें पितळ दोन प्रकारचें आहे. त्यांत पहिलें गुणानें श्रेष्ठ आहे. सोनपितळ हें तापवून लाल करून कांजींत बुडविलें असतां तांबडें होतें, व काकतुंडी पितळ काळें होतें. तें सेवन करूं नये.

कांस्यं च द्विविधं प्रोक्तं पुष्पतैलिकभेदतः ।
पुष्पं श्वेततमं तत्र तैलिकं कपिशप्रभम् ॥ ३ ॥

एतयोः प्रथमं श्रेष्ठं संसेव्यं रोगशान्तये ।

पुष्प व तैलक असें दोन प्रकारचें कांसें आहे. पुष्प जातीचें कांसें पांढरें असतें, व तैलक जातीचें कांसें काळसर तांबूस रंगाचें असतें. ह्यांपैकीं पहिलें पुष्पजातीचें कांसें श्रेष्ठ आहे. तें रोगशांतीकरितां सेवन करावें.

राजरीतिस्तथा घोषं ताम्रवच्छोधयेद्भिषक् ॥ ४ ॥
ताम्रवन्मारणं चापि तयोरुक्तं भिषग्वरैः ।

सोनपितळ व पुष्पजातीचें कांसें ह्यांचें शोधन तांब्याप्रमाणें करावें. आणि मारणही तांब्याप्रमाणेंच करावें, असें श्रेष्ठ वैद्यांचें मत आहे.

रीतिकायुगुलं रूक्षं सतिक्तं लवणं सरम् ।
शोधनं पाण्डुरोगघ्नं क्रिमिघ्नं लेखनं हिमम् ॥ ५ ॥

दोन्ही प्रकारचें पितळ रूक्ष, कडू, खारट, सारक, शोधन करणारें, पांडुरोगनाशक, कृमिनाशक, लेखन (वातादि दोष व धातु ह्यांचें शोषण करणारें.) व थंड आहे.

कांस्यं कषायं तिक्तोष्णं लेखनं विशदं सरम् ।
रूक्षं गुरु च चक्षुष्यं कफपित्तहरं परम् ॥ ६ ॥

कांसें तुरट, कडू, उष्ण, लेखन, स्वच्छ, सारक, रूक्ष, जड, डोळ्यांना हितकारक व उत्तम कफपित्तनाशक आहे.

लोखंड.

मुण्डं तीक्ष्णं तथा कान्तमिति लोहं त्रिधा स्मृतम् ।
मुण्डाच्छताधिकं तीक्ष्णं तीक्ष्णात्कान्तं शताधिकम् ॥१॥

मुंड, तीक्ष्ण, कांत असें तीन प्रकारचें लोखंड आहे. मुंड जातीच्या लोहापेक्षां तीक्ष्ण (तिखें किंवा पोलाद) जातीचें लोह शंभरपटीनें गुणकारक, आणि तीक्ष्ण जातीच्या लोहापेक्षां कांत शंभरपटीनें गुणकारक आहे.

मुण्डं तु वर्तुलं भूमौ पर्वतेषु च जायते ।
गजबल्यादि तीक्ष्णं स्यात्कान्तं चुम्बकसंभवम् ॥ २ ॥
यत्राङ्गं दृश्यते लोहे तीक्ष्णं लोहं तदुत्तमम् ।
कासीसामलकल्काक्ते लोहेऽङ्गं दृश्यते मुखम् ॥ ३ ॥

मुंड जातीच्या लोखंडाचे जमीनींत किंवा पर्वतामध्यें वर्तुळाकृति दगड सांपडतात. गजबल्यादिक लोहांना तीक्ष्ण (तिखें

किंवा पोलाद) असें म्हणतात. कांतलोह हें लोहचुंबकाच्या दग-डापासून होतें. ज्या तिख्यामध्यें प्रतिबिंब दृष्टीस पडतें, तें तिखें उत्तम. हिराकस व आवळकाठी ह्यांच्या कल्कानें पोलादास लेप करून तें स्वच्छ केलें असतां त्यांत पहाणाराचें अंग व तोंड दिसतें.

कांतलोहाचें लक्षण.

यत्पात्रस्थः प्रसरति जले तैलबिन्दुर्न दत्तो
हिंगुर्गन्धं विसृजति निजं तिक्ततां निम्बकल्कः ।
पाच्यं दुग्धं भवति शिखराकारकं नैति भूमिं
दग्धाङ्गाः स्युः सजलचणकाः कान्तलोहं तदुक्तम् ॥ १ ॥

ज्या लोहपात्रामध्यें पाणी भरून त्यांत तेलाचा थेंब टाकला असतां पसरत नाहीं, हिंग आपला वास सोडतो (हिंगाचा वास नाहींसा होतो) व कडुनिंबाच्या पाल्याचा कल्क त्या भांड्यांत ठेवला असतां त्याचा कडूपणा नाहींसा होतो, ज्या भांड्यांत दूध तापत ठेविलें असतां अतिशय जाळ लागल्यानें ते उतूं येऊन शिखराकार होतें, पण जमीनीवर पडत नाहीं, व पाण्यांत भिजविलेले हरभरे टाकिले असतां त्यांच्यावरील फोलपटें जळल्यासारखीं होतात त्याला कांतलोह असें म्हणतात.

लोहाचें शोधन.

शशरक्तेन संलिप्तं किं चार्कपयसाऽयसः ।
दलं हुताशने ध्मातं सिक्तं त्रैफलवारिणा ।
एवं त्रिशः कृते लोहं शुद्धिमाप्नोत्यसंशयम् ॥ १ ॥

लोखंडाचे पातळ पत्रे करून त्यांना सशाचें रक्त चोपडून थोडा रुईचा चीक लावून विस्तवामध्यें तापवून लाल करून त्यांजवर त्रिफळ्याचा काढा शिंपडून ते विझवावेत, किंवा त्या काढ्यांत बुडवून विझवावेत. ह्याप्रमाणें तीन वेळ केलें असतां लोह शुद्ध होतें.

क्वाथ्यमष्टगुणे तोये त्रिफला षोडशं पलम् ।
तत्क्वाथे पादशेषे तु लोहस्य पलपञ्चकम् ॥ २ ॥
कृत्वा पत्राणि तप्तानि सप्तवारं निषेचयेत् ।
एवं प्रलीयते धातुर्गिरिजो लोहसंभवः ॥ ३ ॥

चौसष्ट तोळे त्रिफळा घेऊन त्याच्या आठपट त्यांत पाणी

घालून चतुर्थांश काढा करावा. नंतर त्या काढ्यांत वीस तोळे पोलादाचे पातळ पत्रे करून ते तापवून लाल करून बुडवावे. ह्याप्रमाणें सात वेळ केलें असतां पोलाद शुद्ध होतें.

लोहाचें मारण.

लोहानां मारणं श्रेष्ठं सर्वेषां रसभस्मना ।
मध्यमं मूलिकाभिश्च कनिष्ठं गन्धकादिभिः ॥ १ ॥

पाऱ्याच्या भस्मानें सर्व लोहांचें मारण केलें असतां तें उत्तम. वनस्पतींच्या मुळ्या इत्यादिकांनीं करणें हें मध्यम, व गंधकादिकांनीं करणें हें कनिष्ठ आहे.

शुद्धस्य सूतराजस्य भागो भागद्वयं बलेः ।
द्वयोः समं सारचूर्णं मर्दयेत्कन्यकाम्बुना ॥ २ ॥
यामद्वयं तस्य गोलं संवेष्ट्यैरण्डजैर्दलैः ।
ततः सूत्रेण संबध्य स्थापयेत्ताम्रसंपुटे ॥ ३ ॥
मुद्रयेद्वदनं तस्य मृदा संशोष्य तत्पुनः ।
त्रिदिनं धान्यराशिस्थं तत उद्धृत्य मर्दयेत् ॥ ४ ॥
रजस्तद्वस्त्रगलितं नीरे तरति हंसवत् ।
सोमामृताभिधमिदं लोहभस्म प्रकीर्तितम् ॥ ५ ॥

पारा एक भाग, गंधक दोन भाग व दोहींच्या समान पोलादाचें चूर्ण ह्या सर्वांचा कोरफडीच्या रसांत दोन प्रहरपर्यंत खल करावा. नंतर त्याचा गोळा करून त्याजवर एरंडाचीं पानें गुंडाळून सुतानें बांधून तांब्याच्या करंड्यांत ठेवून त्याचें तोंड चिकणमातीनें लिंपून उन्हांत ठेवून तें लिंपण वाळल्यावर तीन दिवस धान्याच्या राशींत पुरून ठेवावें. नंतर काढून वस्त्रगाळ करून घ्यावें व पाण्यावर टाकावें. म्हणजे तें पाण्यांत हंसाप्रमाणें तरतें. ह्याला "सोमामृत" लोहभस्म म्हणतात.

द्वादशांशेन दरदं तीक्ष्णचूर्णस्य मेलयेत् ।
कन्यानीरेण संमर्द्य यामयुग्मं तु तत्पुनः ॥ ६ ॥
शरावसंपुटे कृत्वा पुटेद्गजपुटेन वै ।
सप्तधैवं कृतं लोहरजो वारितरं भवेत् ॥ ७ ॥

शुद्ध पोलादाच्या चूर्णाच्या बाराव्या हिश्शानें शुद्ध हिंगूळ त्यांत मिसळून कोरफडीच्या रसांत दोन प्रहर खलून शराव-

संपुटांत घालून गजपुट द्यावें. अशीं सात पुटें दिलीं असतां पाण्यावर तरणारें लोहभस्म होतें.

लोहचूर्णं पलं खल्वे सोरकस्य पलं तथा ।
अश्वगन्धापलं चापि सर्वमेकत्र मर्दयेत् ॥ ८ ॥
कुमार्यद्भिर्दिनं पश्चाद्गोलकं रुबुपत्रकैः ।
संवेष्ट्य च मृदा लिप्त्वा पुटेद्गजपुटे पचेत् ॥ ९ ॥
स्वाङ्गशीतं समुद्धृत्य सिन्दूराभमयोरजः ।
मृतं वारितरं ग्राह्यं सर्वकार्यकरं परम् ॥ १० ॥

शुद्ध लोहाचें (पोलादाचें) चूर्ण चार तोळे, सोरा चार तोळे, अश्वगंधाचें चूर्ण चार तोळे, ह्या सर्वांचा खलामध्यें कोरफडीच्या रसाबरोबर एक दिवसभर खल करावा. नंतर त्याचा गोळा करून एरंडाच्या पानानें गुंडाळावा व त्याजवर मातीचा लेप करून गजपुटामध्यें पचन करावें. स्वांगशीत झाल्यावर सिंदुराप्रमाणें दिसणारें व पाण्यावर तरणारें असें लोहाचें भस्म काढून घ्यावें. हें उत्तम गुणकारक होतें.

दुसरा प्रकार.

दाडिमीपत्रजरसैर्लोहचूर्णं च भावितम् ।
आतपे सप्तधा तेन पुनर्गजपुटद्वयम् ॥ १२ ॥
इत्थं कृतं च तद्भस्म शुद्धं वारितरं भवेत् ।
योजयेत्सर्वरोगेषु सत्यं गुरुवचो यथा ॥ १२ ॥

शुद्ध पोलादाच्या चूर्णाला उन्हामध्यें सात भावना द्याव्या. नंतर दोन गजपुटें द्यावीं. म्हणजे लोहाचें पाण्यावर तरणारें भस्म होतें. तें सर्व कार्यांत योजावें. जसें गुरूचें वाक्य सत्य असतें, त्याप्रमाणें ही क्रिया सत्य आहे.

गृहीत्वा तीक्ष्णजं चूर्णं तथैव च गवां दधि ।
एकत्र कारयेद्भाण्डे यावच्छोषत्वमाप्नुयात् ॥ १३ ॥
उद्धृत्य गालयेदग्नौ त्रिफलायाः पुटत्रयम् ।
देयं वारितरं सद्यो जायते नात्र संशयः ॥ १४ ॥

शुद्धपोलादाचें चूर्ण घेऊन त्याच्या वजनाइतकेंच त्यांत गाईचें दहीं घालून ठेवावें. दहीं सुकल्यावर तें चूर्ण स्वच्छ धुवून त्रिफळ्याच्या काढ्यांत खलून शरावसंपुटांत घालून मातकापड

करून गजपुट द्यावें. ह्याप्रमाणें तीन गजपुटें द्यावीं, म्हणजे पाण्यावर तरणारें लोहाचें भस्म होतें.

एकभागं लोहचूर्णं तत्समो नवसागरः ।
किंचित्तप्तोदकं ग्राह्यं सर्वं वस्त्रे निबध्य च ॥ १५ ॥
यामान्ते घर्षयेत्पाणौ सद्यो वारितरं भवेत् ।
योजयेत्सर्वरोगेषु सर्वरोगापनुत्तये ॥ २ ॥

एक भाग शुद्धलोहाचें चूर्ण व त्याच्यासमान नवसागर घेऊन किंचित ऊन पाणी घालून सर्व एकत्र करून वस्त्रांत बांधावें; आणि एक प्रहर गेल्यावर काढून हातावर चोळावें. म्हणजे पाण्यावर तरणारें लोहाचें भस्म होतें. तें सर्व रोगांचा नाश होण्याकरितां सर्व रोगांवर योजावें.

लोहभस्माचें निरुत्थान.

सर्वमेतन्मृतं लोहं ध्मातव्यं मित्रपञ्चकैः ।
इत्येवं स्यान्निरुत्थानं सेव्यं वारितरं भवेत् ॥ १ ॥

सर्व लोहाचीं (धातूंचीं) भस्में पंचमित्रांशीं मिश्र करून मुशींत घालून अग्नीमध्यें फुंकावें. जर तें भस्म तसेंच राहिलें, तर तें निरुत्थभस्म समजून सेवन करावें. तें पाण्यावर तरणारें होतें.

मधुगुडघृतगुंजाटंकणं पंचमित्रम्

मध, गूळ, तूप, गुंजा व टाकणखार ह्यांना पंचमित्र म्हणतात.

रक्तिकाघृतं लाक्षया युतं क्षौद्रमिश्रितं टङ्कणान्वितम् ।
ऊर्णया तथा ध्माततां गताः सप्त धातवो यान्ति जीवताम् ॥२॥

दुसरा प्रकार–गुंजा, तूप, लाख, मध, टाकणखार व लोकर ह्यांच्यासह सातीही धातूंचीं भस्में मुशींत घालून अग्नीवर फुंकलीं असतां तीं कच्चीं असल्यास पुन्हा सजीव म्हणजे उत्थित होतात, म्हणजे ज्या धातूंचीं तीं असतात तसला धातु त्यांपासून निघतो.

गन्धकं चोत्थितं लोहं तुल्यं खल्वे विमर्दयेत् ।
दिनैकं कन्यकाद्रावै रुद्ध्वा गजपुटे पचेत् ॥
इत्येवं सर्वलोहानां कर्तव्यं तन्निरुत्थितम् ॥ ३ ॥

ह्याप्रमाणें उत्थित होणाऱ्या भस्मांचें निरुत्थान करण्याकरितां तो उत्थित धातु व त्याच्यासमान शुद्ध गंधक ह्यांचा कोवारफो-

डीच्या रसांत एक दिवसभर खल करून शरावसंपुटांत मातकापड करून गजपुट द्यावें; म्हणजे निरुत्थ भस्म होतें. ह्याप्रमाणें सर्व धातूंचीं भस्में निरुत्थ करावीं.

लोहाचे गुण.

कान्तं तु शीतं मधुरं कषायमायुष्करं धातुविवर्धनं च ।
हन्यात्रिदोषव्रणमेहकुष्ठप्लीहोदरग्रन्थिविषाक्रिमींश्च ॥ १ ॥
पाण्डुं पीडयति क्षयं क्षपयति क्षैण्यं क्षिणोति क्षणात्
कार्श्यं नाशयति भ्रमं शमयति श्लेष्मामयान्खादति ।
अस्त्रं गुल्मसशूलपीनसवमिश्वासप्रमेहारुची-
राशून्मूलयति प्रकम्पनहरं लोहं हिमं चाक्षुषम् ॥ २ ॥

कांतलोह थंड, मधुर, तुरट, आयुष्यकारक, धातुवर्धक व त्रिदोष, व्रण, प्रमेह, कुष्ठ, पांथरी, उदर, अंगावरील किंवा पोटांतील गांठी, विषबाधा, कृमि, पांडुरोग व क्षय ह्यांचा नाश करणारें, क्षीणत्व दूर करणारें, खोकल्याचा क्षणांत नाश करणारें व भ्रम व कफविकार ह्यांना शमविणारें असून, गुल्म, शूल, पनिस, ओकारी, श्वास, प्रमेह व अरुचि ह्यांचें केवळ अस्त्रच आहे. तसेंच तें कंपविकारनाशक असून थंड व नेत्रांना हितकारक आहे.

शुद्धं पित्तकफानिलमोहं हन्ति हतं शिवशक्त्या लोहम् ।
पाण्डुगदामयशूलविनाशि प्रोक्तमशुद्धं रोगविकासि ॥ ३ ॥

शुद्धलोह (पोलाद) पित्त, कफ, वात व मोह ह्यांचें नाशक आहे. पारा व गंधक ह्यांच्या मिश्रणानें केलेलें लोहभस्म पांडुरोग व शूल ह्यांचा नाश करितें; व अशुद्ध लोह अनेक प्रकारचे रोग उत्पन्न करितें.

ये गुणा मृतरूप्यस्य ते गुणाः कान्तभस्मनः ।
कान्ताभावे प्रदातव्यं रूप्यमित्याह भैरवः ॥ ४ ॥

जे गुण रुप्याच्या भस्मामध्यें आहेत, तेच गुण कांतभस्मामध्यें आहेत. म्हणून कांतभस्म नसेल तर त्याच्या अभावीं रुप्याचें भस्म योजावें असें भैरवाचें मत आहे.

कूष्माण्डं तिलतैलं च माषान्नं राजिकां तथा ।
मद्यमम्लरसं चैव त्यजेल्लोहस्य सेवकः ॥ ५ ॥
मत्स्यं जीवकवार्ताकमाषं च कारवेल्लकम् ।

व्यायामं तीक्ष्णकं मद्यं तैलाम्लं दूरतस्त्यजेत् ॥ ६ ॥

कोहळा, तिळाचें तेल, उडदाचें अन्न, मोहऱ्या, मद्य व आंबट पदार्थ हे जिन्नस लोहभस्म सेवन करणारानें वर्ज करावे. तसेंच मासे, जीवकशाक, वांगीं, उडीद, कारलें, व्यायाम, कडक मद्य, तेल व आंबट पदार्थ ह्यांचाही लोहसेवन करणारानें त्याग करावा.

लोहभस्माचीं अनुपानें.

वल्लं वल्लार्धमानं च यथायोगेन योजयेत् ।
त्रिफला लोहचूर्णं च वलीपलितनाशनम् ॥ १ ॥
व्योषं भार्गी च मधुना लोहं धातुरुजापहम् ।
कज्जलीमधुकृष्णाभ्यां श्लेष्मरोगनिवारणम् ॥ २ ॥
शर्करा च चतुर्जातं रक्तपित्तरुजापहम् ।
पुनर्नवा च गोक्षीरैर्बलवृद्धिकरं परम् ॥ ३ ॥
पुनर्नवारसेनैव पाण्डुरोगनिषूदनम् ।
हरिद्रा लोहचूर्णं च पिप्पली मधुना सह ॥
विंशतिं च प्रमेहानां नाशयेन्नात्र संशयः ॥ ४ ॥
शिलाजतुसमायुक्तं मूत्रकृच्छ्रनिवारणम् ।
वासकः पिप्पली द्राक्षा लोहं च मधुना सह ॥ ५ ॥
गुटिकां भक्षयेत्प्रातः पञ्चकासनिवारणम् ।
ताम्बूलेन समायुक्तं भक्षयेल्लोहमुत्तमम् ॥ ६ ॥
अग्निदीप्तिकरं वृष्यं देहकान्तिविवर्धनम् ।
किमत्र बहुनोक्तेन देहलोहकरं मतम् ॥ ७ ॥

एक वाल किंवा अर्धा वाल लोहभस्म योग्य अनुपानाशीं द्यावें. त्रिफळ्याशीं लोहभस्म घेतलें असतां तें वलीपलित रोगाचा नाश करितें. सुंठ, मिरीं, पिंपळी व भारंगमूळ ह्यांचें चूर्ण आणि मध ह्यांच्याशीं घेतलें असतां धातूसंबंधीं विकार दूर करितें. पारा, गंधक ह्यांची कज्जली, मध व पिंपळी ह्यांच्याशीं घेतलें असतां कफसंबंधीं रोगांचा नाश करितें. दालचिनी, तमालपत्र, नागकेशर, व वेलचीदाणे ह्यांचें चूर्ण व साखर ह्यांच्याशीं घेतलें असतां रक्तपित्ताची शांति करतें. पुनर्नवाचें मूळ (वेळूचें मूळ) व गाईचें दूध ह्यांच्याशीं घेतलें असतां उत्तम प्रकारची बलवृद्धि करितें. पुनर्नव्याच्या रसांतून घेतलें असतां हळदीचें चूर्ण, पिंपळी व मध

ह्यांच्याबरोबर लोहभस्म घेतलें असतां वीस प्रकारच्या प्रमेहांचा नाश करितें, ह्यांत संशय नाहीं. शिलाजिताबरोबर घेतलें असतां मूत्रकृच्छ्राचा (उन्हाळ्याचा) नाश करितें. अडुळशाचीं पानें, पिंपळी व मनुका ह्यांची गोळी करून ती गोळी व मध ह्यांशीं लोहभस्म सकाळीं घेतलें असतां पांच प्रकारच्या खोकल्यांचा नाश करितें. उत्तम प्रकारचें लोहभस्म विड्यांतून खावें. तें अग्निदीपक, कामोत्तेजक, व देहकांति वाढविणारें आहे. फार सांगून काय करावयाचें आहे? हें लोहभस्म मनुष्याचें शरीर लोखंडासारखें बनवितें.

अल्पौषधैस्तोकपुटैर्हीनं गन्धकपारदैः ।
अपक्वं लोहजं चूर्णमायुःक्षयकरं नृणाम् ॥ ८ ॥

पारा व गंधक ह्यांचीं व थोड्या वनस्पतींचीं थोडींच पुटें दिल्यानें कनिष्ठ प्रकारचें लोहभस्म होतें (तें सेवन करूं नये.). अपक्व लोहभस्म सेवन केलें तर मनुष्याच्या आयुष्याचा नाश होतो.

मंडूर करण्याचा प्रकार.

शताब्दमुत्तमं किट्टं मध्यं चाशीतिवार्षिकम् ।
अधमं षष्टिवर्षीयं ततो हीनं विषोपमम् ॥ १ ॥

शंभर वर्षांपलीकडील जुनें लोहकिट्ट उत्तम, ऐंशीं वर्षांचें मध्यम आणि साठ वर्षांचें कनिष्ठ; त्याहून कमी वर्षांचें लोहकिट्ट हीन असून विषवत् आहे.

अक्षाङ्गारैर्धमेत्किट्टं लोहजं तद्गवां जलैः ।
सेचयेदक्षपात्रान्तः सप्तवारं पुनः पुनः ॥ २ ॥
चूर्णयित्वा ततः क्वाथैर्द्विगुणैस्त्रिफलोद्भवैः ।
आलोड्य भर्जयेद्वह्नौ मण्डूरं जायते वरम् ॥ ३ ॥

लोहाचें किट्ट बेहड्याच्या लांकडांच्या कोळशामध्यें ठेवून फुंकावें व लाल झाल्यावर काढून बेहड्याच्या लांकडाच्या पात्रांत गोमूत्र घालून त्यांत बुडवावें. ह्याप्रमाणें सात वेळ करावें. नंतर त्याचें चूर्ण करून त्यांत त्याच्या दुप्पट गोमूत्र घालून तें गोमूत्र आटून कोरडें होईपर्यंत विस्तवावर भाजावें. म्हणजे उत्तम प्रकारचें मंडूर-भस्म तयार होतें.

मण्डूरं शिशिरं रुच्यं पाण्डुश्वयथुशोषजित् ।
हलीमकं कामलां च प्लीहानं कुम्भकामलाम् ॥ ४ ॥

मंडूरभस्म गुणानें थंड, रुचिकारक, व पांडुरोग, सूज व क्षय ह्यांचा नाश करणारें असून हलीमक, कावीळ, पांथरी व कुंभकामला ह्यांचाही नाश करणारें आहे.

कथील.

खुरकं मिश्रकं चेति द्विविधं वङ्गमुच्यते ।
खुरं तत्र गुणैः श्रेष्ठं मिश्रकं न हितं मतम् ॥ १ ॥
धवलं मृदुलं स्निग्धं द्रुतद्रावं सगौरवम् ।
निःशब्दं खुरवङ्गं स्यान्मिश्रकं श्यामशुभ्रकम् ॥ २ ॥

खुरक व मिश्रक असें दोन प्रकारचें कथील आहे. त्यांत खुरक हें उत्तम असून मिश्रक हें हितकारक नाहीं. खुरक जातीचें कथील पांढरें, मृदु, स्निग्ध, लवकर वितळणारें, जड व नादरहित असतें, व मिश्रक जातीचें कथील काळसर पांढरें असतें.

कथिलाचें शोधन.

द्रावयित्वा निशायुक्ते क्षिप्तं निर्गुण्डिकारसे ।
विशुध्यति त्रिवारेण खुरवंगं न संशयः ॥ १ ॥

खुरवंग विस्तवावर पातळ करून हळदीची पूड घातलेल्या निर्गुंडीच्या रसामध्यें ओतावें. ह्याप्रमाणें तीन वेळ केलें असतां खुरक जातीचें वंग शुद्ध होतें.

कथिलाचें मारण.

शाणमात्रं भवेद्वङ्गं भुजंगो रक्तिकामितः ।
खर्परे गलितं सर्वं लोहदर्व्या विघर्षयेत् ॥ १ ॥
प्रहराज्जायते भस्म भिन्नकज्जलसंनिभम् ।
शुक्लतां याति तद्भस्म तीव्रखर्परवह्निना ॥ २ ॥

शुद्ध कथील तीन मासे व शुद्ध शिसें एक गुंज खापरांत घालून विस्तवावर ठेवून पातळ झाल्यावर पळीच्या दांड्यानें घोटावें. म्हणजे एक प्रहरामध्यें काजळासारखें काळें भस्म होतें. त्यालाच पुन्हा त्याच खापरामध्यें तीव्र अग्नि दिला असतां पांढरें शुभ्र भस्म होतें.

दुसरा प्रकार.

पलाशद्रवयुक्तेन वङ्गपत्राणि लेपयेत् ।
तालेन पुटितं भस्म त्रिवारं जायते ध्रुवम् ॥ १ ॥

पळसाच्या पानाच्या रसांत शुद्ध हरताळ खलून त्याचा वंगाच्या पत्र्यांस खालीं वर लेप करून पुट द्यावें. ह्याप्रमाणें तीन पुटें दिल्यानें वंगाचें निश्चयानें भस्म होतें.

तिसरा प्रकार.

भल्लाततैलसंलिप्तं वङ्गं वस्त्रेण वेष्टितम् ।
चिञ्चापिप्पलपालाशकाष्ठाग्नौ याति पञ्चताम् ॥ १ ॥

शुद्ध कथिलाच्या पत्र्यांना बिब्याच्या तेलाचा लेप करून वस्त्रांत गुंडाळून चिंच, पिंपळ व पळस ह्यांच्या लाकडाच्या अग्नीमध्यें पुट द्यावें, म्हणजे कथिलाचें भस्म होतें.

चवथा प्रकार.

मृत्पात्रे द्राविते वङ्गे चिञ्चाश्वत्थत्वचो रजः ।
क्षिप्त्वा क्षिप्त्वा चतुर्थांशं लोहदर्व्या विचालयेत् ।
ततो द्वियाममात्रेण वङ्गभस्म प्रजायते ॥ १ ॥
अथ भस्मसमं तालं क्षिप्त्वाऽम्लेन प्रमर्दयेत् ।
ततो गजपुटे पक्त्वा पुनरम्लेन मर्दयेत् ॥ २ ॥
तालेन दशमांशेन याममेकं ततः पुटेत् ।
एवं दशपुटैः पक्कं वंगं तु म्रियते ध्रुवम् ॥ ३ ॥

शुद्ध कथील मातीच्या भांड्यांत घालून विस्तवावर ठेवून पातळ करावें, आणि त्याच्या चतुर्थांश चिंचेच्या व पिंपळाच्या सालीचें चूर्ण घेऊन तें त्याजवर वरचेवर टाकून लोखंडाच्या पळीनें घोटावें. ह्याप्रमाणें दोन प्रहर केलें असतां कथिलाचें भस्म होतें. नंतर त्या भस्मासमान तालक (शुद्ध हरताळ) घेऊन लिंबाच्या रसांत दोहोंचा एकत्र खल करून गजपुट द्यावें. स्वांगशीत झाल्यावर काढून पुनः त्या भस्माच्या दहाव्या हिश्शानें शुद्ध हरताळ त्यांत मिसळून लिंबाच्या रसांत खलून एक प्रहराचें पुट द्यावें. ह्याप्रमाणें दहा पुटें दिल्यावर वंगाचें भस्म होतें.

कथिलाचे गुण.

वङ्गं तिक्तोष्णकं रूक्षमीषद्वातप्रकोपणम् ।

मेहश्लेष्मामयघ्नं च मेदोघ्नं क्रिमिनाशनम् ॥ १ ॥

वंगभस्म कटू, उष्ण, रूक्ष, किंचित् वात वाढविणारें व प्रमेह, कफविकार, मेद व क्रिमि यांचें नाशक आहे.

अशुद्धमसृतं वंगं प्रमेहादिगदप्रदम् ।
गुल्महृद्रोगशूलार्शःकासश्वासवमिप्रदम् ॥ २ ॥

अशुद्ध किंवा कच्चें वंगभस्म प्रमेहादि विकार उत्पन्न करितें. शिवाय गुल्म, हृदयाचा विकार, शूल, मूळव्याध, कास, श्वास व ओकारी ह्यांना उत्पन्न करितें.

शिसें.

द्रुतद्रावं महाभारं छेदे कृष्णं समुज्वलम् ।
पूतिगन्धं बहिःकृष्णं शुद्धं सीसमतोऽन्यथा ॥ १ ॥

लवकर पातळ होणारें, अतिशय जड, तोडलें असतां काळें व चकाकणारें, दुर्गंधियुक्त, बाहेरून काळें दिसणारें, असें शिसें शुद्ध (उत्तम) समजावें; ह्याव्यतिरिक्त अशुद्ध समजावें.

शिशाचें शोधन.

नागो द्रुतोऽग्निसंयोगाद्रविदुग्धे निपातितः ।
सच्छिद्रहण्डिकासंस्थस्त्रिवारं शुद्धिमाप्नुयात् ॥ १ ॥

शिसें अग्नीवर पातळ करून एका भांड्यांत रुईचा चीक घालून त्यावर दुसरें सच्छिद्र भांडें ठेवून त्यांत तें ओतावें. ह्याप्रमाणें तीन वेळ करावें, म्हणजे शिसें शुद्ध होतें.

शिशाचें मारण.

अश्वत्थचिञ्चात्वग्भस्म नागस्य चतुरंशतः ।
क्षिपेन्नागं पचेत्पात्रे चालयेल्लोहचाटुना ॥ १ ॥
यामाद्भस्म तदुद्धृत्य भस्मतुल्यां मनःशिलाम् ।
जम्बीरैरारनालैर्वा पिष्ट्वा रुद्ध्वा पुटे पचेत् ॥ २ ॥
स्वाङ्गशैत्यं पुनः पिष्ट्वा विंशत्यंशशिलायुतम् ।
अम्लेनैव तु यामैकं पूर्ववत्पाचयेत्पुटे ।
एवं षष्टिपुटैः पक्वो नागः स्यात्सुनिरुत्थितः ॥ ३ ॥

पिंपळाच्या सालीचें व चिंचेच्या सालीचें भस्म करून तें शिशाच्या चतुर्थांश घ्यावें. नंतर तें शिसें खापरांत घालून पातळ करून त्यावर तें भस्म टाकून लोखंडाच्या दांड्यानें ढवळावें. ह्या-

प्रमाणें एक प्रहरभर केलें असतां शिशाचें भस्म होतें. तें घेऊन त्याच्या समान शुद्ध मनशीळ घेऊन दोहोंचा लिंबाच्या रसांत खल करून किंवा कांजींत खल करून शरावसंपुटांत घालून मातकापड करून पुट द्यावें. स्वांगशीत झाल्यावर काढून पुन्हा त्या भस्माच्या विसाव्या हिश्शानें मनशीळ घेऊन दोहोंना पूर्ववत् लिंबाच्या रसांत किंवा कांजींत खलून पुट द्यावें. ह्याप्रमाणें साठ पुटें दिलीं असतां शिशाचें निरुत्थ भस्म होतें.

दुसरा प्रकार.

मनःशिलागन्धयुताटरूषपरिप्लुतं नागदलं विमृष्टम् ।
पुटैस्त्रिभिः कुम्भमितैः प्रयाति भस्मत्वमेतत्प्रवदन्ति तज्ज्ञाः ॥ ४

शुद्ध मनशीळ व शुद्ध गंधक ह्यांचा आडुळशाच्या रसांत खल करून त्यानें शुद्ध शिशाच्या पत्र्यांस लेप करून कुंभपुटांत पचन करावें. ह्याप्रमाणें तीन पुटें दिलीं असतां शिशाचें भस्म होतें, असें तज्ज्ञ म्हणतात.

तिसरा प्रकार.

ताम्बूलीरससंपिष्टशिलालेपात्पुनः पुनः ।
द्वात्रिंशद्भिः पुटैर्नागो निरुत्थो जायते ध्रुवम् ॥ ५ ॥

विडयाच्या पानाचे रसांत शुद्ध मनशीळाचा खल करून त्याचा शुद्ध शिशाचे पत्र्यांस लेप करून पुट द्यावें. ह्याप्रमाणें बत्तीस पुटें दिलीं असतां निश्चयानें शिशाचें भस्म होतें.

शिशाचे गुण.

अत्युष्णं सीसकं स्निग्धं तिक्तं वातकफापहम् ।
प्रमेहतोयदोषघ्नं दीपनं चाऽऽमवातनुत् ॥ १ ॥

शिसें अतिशय उष्ण, स्निग्ध व कडू असून वातकफनाशक,

---

१. एका मातीच्या घागरीस एका बोटाएवढीं चाळीस भोकें पाडून ती अर्धी कोळशांनीं भरावी, व त्यांजवर औषध ठेवून तोंडावर एक परळ झांकून मातकापड करून तोंड लिंपावें, व सावलींत वाळवावें. नंतर ती घागर चुलीवर ठेवून वरील परळांत निखारे घालून खालीं जाळ लावावा. तीन दिवसांनीं स्वांगशीत झाल्यावर आंतील औषध काढून घ्यावें.

प्रमेहनाशक, पाण्यासंबंधीं दोषानें नाशक, अग्निदीपक व आमवातनाशक आहे.

अशुद्धः कुरुते नागः प्रमेहक्षयकामलाः ।
तस्मात्संशुद्ध एवायं मारणीयो भिषग्वरैः ॥ २ ॥

अशुद्ध शिसें प्रमेह, क्षय व कामला ह्यांना उत्पन्न करितें. ह्यासाठीं वैद्यांनीं शुद्ध शिशाचेंच भस्म करावें.

उपधातु.

अभ्रकं माक्षिकं तालं शिला नीलाञ्जनं तथा ।
तुत्थकं रसकं चैव प्रोक्ताः सप्तोपधातवः ॥ १ ॥

अभ्रक, माक्षिक, तालक (हरताळ), मनशीळ, काळा सुरमा, मोरचूत आणि कलखापरी ह्या सात उपधातु आहेत.

अभ्रक.

शुक्लं रक्तं तथा पीतं कृष्णं चैव यथाक्रमम् ।
पिनाकं दर्दुरं नागं वज्रं चेति चतुर्विधम् ॥ १ ॥

पांढरें, तांबडें, पिवळें व काळें असें हें अनुक्रमानें पिनाक, दर्दुर, नाग व वज्र ह्या नांवांचें चार प्रकारचें अभ्रक आहे.

दलानि मुञ्चत्यनले पिनाकं भेकं स्वरावं कुरुतेऽनलस्थम् ।
फूत्काररावं भुजगः करोति ह्यविक्रियं वह्निगतं सुवज्रम् ॥ २ ॥
पिनाकं कुरुते कुष्ठं दर्दुरं मृत्युदायकम् ।
नागं भगंदरं कुर्याद्वज्राभ्रं गदवृन्दजित् ॥ ३ ॥

पिनाक नांवाचें अभ्रक विस्तवावर ठेविलें असतां त्याचे निरनिराळे पदर सुटतात. दर्दुर किंवा भेकसंज्ञक अभ्रक अग्नीमध्यें टाकलें असतां बेडकाप्रमाणें शब्द करितें. नाग किंवा भुजंग नांवाचें अभ्रक अग्नीवर टाकलें असतां सर्पाप्रमाणें फूत्कारयुक्त शब्द करितें. आणि वज्राभ्रक अग्नीवर टाकिलें असतां विकार न पावतां जसेंच्या तसेंच राहतें. तें पिनाक संज्ञक अभ्रक सेवन केलें असतां कुष्ठ उत्पन्न करितें. दर्दुर हें मृत्युदायक आहे. नागसंज्ञक अभ्रक भगंदर रोग करितें आणि वज्राभ्रक रोगसमुदायाचा नाश करितें.

अभ्रकाचें शोधन.

प्रतप्तं सप्तवाराणि निक्षिप्तं काञ्जिकेऽभ्रकम् ।

निर्दोषं जायते नूनं प्रक्षिप्तं वापि गोजले ।
त्रिफलाक्कथिते वाऽपि गवां दुग्धे विशेषतः ॥ १ ॥

अभ्रक अग्नीवर तापवून कांजींत, गोमूत्रांत, त्रिफळ्याच्या काढ्यांत, किंवा विशेषतः गाईच्या दुधांत सात वेळ बुडविलें असतां निर्दोष म्हणजे शुद्ध होतें.

दुसरा प्रकार.

कृष्णाभ्रकं धमेद्वह्नौ ततः क्षीरे विनिक्षिपेत् ।
भिन्नपत्रं ततः कृत्वा तण्डुलीयाम्लयोर्द्रवैः ॥ २ ॥
भावयेदष्टयामं तु ह्येवं शुध्यति चाभ्रकम् ॥ ३ ॥

काळा अभ्रक विस्तवांत तापवून दुधांत विझवावा. नंतर त्याचे वेगवेगळे पत्रे काढून ते तांदुळजाच्या रसांत व लिंबाच्या रसांत आठप्रहर खलावे, म्हणजे अभ्रक शुद्ध होतो.

धान्याभ्रक.

पादांशशालिसंयुक्तमभ्रं बद्ध्वाऽथ कम्बले ।
त्रिरात्रं स्थापयेन्नीरे तत्क्लिन्नं मर्दयेत्करैः ॥ १ ॥
कम्बलाद्गलितं सूक्ष्मं वालुकासदृशं च यत् ।
तद्धान्याभ्रमिति प्रोक्तमथ मारणसिद्धये ॥ २ ॥

अभ्रकाच्या चवथाई साळी (भात) घेऊन दोन्ही एकत्र करून घोंगड्याच्या एका फडक्यांत बांधून तीन दिवस पाण्यांत भिजत ठेवावें. नंतर काढून तें कांबळ्यासकट हातानें चोळावें व कांबळ्याच्या छिद्रांतून वाळूसारखे पडणारे अभ्रकाचे कण एकत्र करून घ्यावे. त्याला धान्याभ्रक असें म्हणतात. हें मारणाच्या उपयोगीं पडतें.

अभ्रकाचें मारण.

कृत्वा धान्याभ्रकं तच्च शोषयित्वाऽथ मर्दयेत् ।
अर्कक्षीरैर्दिनं खल्वे चक्राकारं च कारयेत् ॥ १ ॥
वेष्टयेदर्कपत्रैश्च सम्यग्गजपुटे पचेत् ।
पुनर्मर्द्यं पुनः पाच्यं सप्तवारं पुनः पुनः ॥ २ ॥
ततो वटजटाक्काथैस्तद्वद्देयं पुटत्रयम् ।
म्रियते नात्र संदेहः सर्वरोगेषु योजयेत् ॥ ३ ॥

धान्याभ्रक करून तें सुकवून रुईच्या चिकांत एक दिवस खलून

चक्रिका (वाटोळी दामटी) करून त्याच्या भोंवताली रुईचीं पानें गुंडाळून शरावसंपुटांत घालून मातकापड करून गजपुट द्यावें. ह्याप्रमाणें पुन्हा रुईच्या चिकांत वरीलप्रमाणें खलून पुन्हा गजपुट द्यावें. ह्याप्रमाणें सात पुटें द्यावीं. नंतर वडाच्या पारंब्यांच्या काढ्याचीं वरीलप्रमाणें तीन पुटें द्यावीं. म्हणजे अभ्रकाचें भस्म होतें ह्यांत संशय नाहीं. हें सर्व रोगांवर योजावें.

तुल्यं घृतं मृताभ्रेण लोहपात्रे विपाचयेत् ।
घृते जीर्णे तदभ्रं तु सर्वरोगेषु योजयेत् ॥ ४ ॥

अभ्रकभस्माच्या समभाग तूप घेऊन दोन्ही लोखंडाच्या भांड्यांत घालून पचन करावें. सर्व तूप जिरल्यावर तें अभ्रकभस्म सर्व रोगांवर योजावें.

धान्याभ्रकं रविक्षीरै रविमूलद्रवेण वा ।
पिष्ट्वा पिष्ट्वा पुटेत्पाकात्सप्तधा म्रियतेऽभ्रकः ॥ ५ ॥

धान्याभ्रक करून रुईच्या चिकांत अथवा रुईच्या मुळांच्या रसांत खलून गजपूट द्यावें. ह्याप्रमाणें सात पुटें दिलीं असतां अभ्रकाचें भस्म होतें.

दुसरा प्रकार.

धान्याभ्रं मेघनादः कदलिघनजलैष्टङ्कणाङ्कोलतोयैः
खल्वे संमर्द्य गाढं तदनु गजपुटान्द्वादशैवं प्रदद्यात् ।
मीनाक्षीभृंगतोयैस्त्रिफलजलयुतैर्मर्दयेत्सप्तवारं
गन्धं तुल्यं च दत्वा प्रवरगजपुटात्पञ्चतां याति मेघः ॥१॥

धान्याभ्रक करून तें तांदुळजा, केळें, नागरमोथे, टाकणखार व अंकोल ह्यांच्या रसांमध्यें (किंवा काढ्यामध्यें) पुष्कळ खलून गजपुट द्यावें. ह्याप्रमाणें बारा पुटें द्यावीं. नंतर चुका व माका, ह्यांचा रस, त्रिफळ्याचा काढा ह्यांच्यामध्यें सातसात दिवस खलून त्याच्यासमान शुद्ध गंधक मिळवून गजपुट द्यावें. म्हणजे अभ्रकाचें भस्म होतें.

तिसरा प्रकार.

दुग्धत्रयं कुमार्यम्बु गजमूत्रं नृमूत्रकम् ।
वटभृंगमजारक्तमेभिरभ्रं सुमर्दितम् ॥
शतधा पुटितं भस्म जायते पद्मरागवत् ॥ ७ ॥

रुईचा चीक, त्रिधारी निवडुंगाचा चीक, वडाचा चीक, कोरफडीचा रस, हत्तिणीचें मूत, नरमूत्र, वडाच्या पारंब्यांच्या रस, माक्याचा रस, शेळीचें रक्त ह्यांच्याशीं वेगवेगळें खलून पुट द्यावें. ह्याप्रमाणें प्रत्येकाचीं अकरा अकरा पुटें द्यावींत. अशीं शंभर पुटें दिल्यानें पद्मराग मण्याच्या कांतीप्रमाणें (अरुणवर्ण) अभ्रकाचें भस्म होतें.

चवथा प्रकार.

धान्याभ्रकं समादाय मुस्ताकाथैः पुटत्रयम् ।
तद्वत्पुनर्नवानीरैः कासमर्दरसैस्तथा ॥ ८ ॥
नागवल्लीदलैः सर्पिः क्षीरैर्देयं पृथक्‌ पृथक्‌ ।
दिने दिने मर्दयित्वा काथैर्वटजटोद्भवैः ॥ ९ ॥
दत्वा पुटत्रयं पश्चात्त्रिपुटं मुसलीद्रवैः ॥
त्रिगोक्षुरकषायेण त्रिः पुटेद्वानरीरसैः १० ॥
मोचाकन्दरसैः पाच्यं त्रिवारं कोकिलाक्षजैः ।
रसैः पुटेत्ततो धेनुक्षीरादेकं पुटं मृदु ॥ ११ ॥
दध्ना घृतेन मधुना स्वच्छया सितया तथा ।
एकमेकं पुटं दद्यादभ्रस्यैवं मृतिर्भवेत् ॥ १२ ॥

धान्याभ्रक घेऊन त्याला नागरमोथ्याच्या काढ्याचीं तीन गजपुटें द्यावीं. त्याचप्रमाणें पुनर्नव्याच्या काढ्याचीं, कारविंद्याच्या रसाचीं, विड्याच्या पानाच्या रसाचीं, तुपाचीं, दुधाचीं तीन तीन गजपुटें प्रत्येक दिवशीं त्या त्या रसांत वगैरे खलून द्यावींत. त्यानंतर मुसळीच्या काढ्याचीं, गोखरूच्या काढ्याचीं, कुहिलीच्या काढ्याचीं, केळीच्या गड्ड्याच्या रसाचीं, व काटेकोळिंस्त्याच्या काढ्याचीं वरीलप्रमाणें तीन तीन पुटें द्यावींत. नंतर गाईच्या दुधांत खलून एक मृदु पुट द्यावें. नंतर त्याचप्रमाणें दहीं, तूप, मध व खडीसाखर ह्या प्रत्येकाचें एक एक पुट द्यावें. ह्याप्रमाणें पुटें दिल्यानें अभ्रकाचें भस्म होतें.

पांचवा प्रकार.

धान्याभ्रकस्य भागैकं द्वौ भागौ टङ्कणस्य च ।
पिष्ट्वा तदन्धमूषायां रुद्ध्वा तीव्राग्निना पचेत् ॥
स्वभावशीतलं चूर्णं सर्वरोगेषु योजयेत् ॥ १३ ॥

धान्याभ्रक एक भाग व टाकणखार दोन भाग ह्यांचा खल करून अंधमुशीमध्यें (शरावसंपुटांत) घालून मातकापड करून तीव्र अग्नीनें पचन करावें, आणि स्वांगशीत झाल्यावर काढून सर्व रोगांवर योजावें.

अभ्रकाचे गुण.

निश्चन्द्रकं भजेत्तत्तु शुद्धदेहे रसायनम् ।
सचन्द्रं विषवज्ज्ञेयं मृत्युकृद्व्याघ्ररोमवत् ॥ १ ॥

वमनविरेचनादिकांनीं देह शुद्ध करून निश्चंद्र अभ्रकभस्म (ज्यामध्यें चकाकी नाहीं असें अभ्रकभस्म) सेवन केलें असतां तें रसायन (जराविनाशक) आहे. तेंच सचंद्र असलें तर विषासारखें असून, वाघाचा केस जसा पोटांत गेला असतां मृत्युकारक होतो, त्याप्रमाणें तें मृत्युकारक होतें.

वराम्बु गोघृतं चाभ्रं कलाषड्दिक्समांशकम् ।
मृद्वग्निना पचेल्लोहे ह्यमृतीकरणं त्विदम् ॥ २ ॥

सोळाभाग त्रिफळ्याचा काढा, सहा भाग गाईचें तूप ; दहा भाग अभ्रकभस्म एकत्र करून लोखंडाच्या भांड्यांत घालून मृदु (मंद) अग्नीनें पचन करावें, व कोरडें झाल्यावर काढून घ्यावें. ह्याला अमृतीकरण असें म्हणतात.

वेल्लव्योषसमन्वितं घृतयुतं वल्लोन्मितं सेवितं
दिव्याभ्रं क्षयपाण्डुरुग्ग्रहणिकाशूलामकोष्ठामयान् ॥
आर्तिश्वासगदं प्रमेहमरुचिं कासामयं दुर्धरं ।
मन्दाग्निं जठरव्यथां विजयते खं हन्ति सर्वामयान् ॥ ३ ॥

वावडिंग, सुंठ, मिरीं व पिंपळी ह्यांचें समभाग चूर्ण व तूप ह्यांच्याशीं एक वाल अभ्रकभस्म सेवन केलें असतां तें क्षय, पांडुरोग, संग्रहणी, शूल, आमविकार, कोठ्यांतील विकार, श्वास, प्रमेह, अरुचि, खोकला, अग्निमांद्य, उदररोग ह्यांना जिंकतें आणि सर्व रोगांचाही नाश करितें.

गौरीतेजः परममृतं वातपित्तक्षयघ्नं
प्रज्ञाबोधि प्रशमितजरं वृष्यमायुष्यमग्र्यम् ।
बल्यं स्निग्धं रुचिदमकफं दीपनं शीतवीर्यं

तत्तद्योगैः सकलगदहृद्व्योम सूतेन्द्रबंधि ॥ ४ ॥

अभ्रक हें अमृताप्रमाणें उत्कृष्ट असून वात, पित्त व क्षय ह्यांचा नाश करितें. बुद्धि वाढवितें, ज्वर कमी करितें, कामोद्दीपन करितें. हें आयुष्य वाढविण्याविषयीं श्रेष्ठ आहे. बलवर्धक, स्निग्ध, रुचिकारक, अग्निदीपक व थंड असून त्या त्या अनुपानाशीं योजून दिलें असतां सर्व रोगनाशक व पाऱ्याची गोळी करण्याच्या कामीं गुणकारक आहे.

क्षाराम्लं द्विदलं कोलं कर्कटी कारवेल्लकम् ।
वृन्ताकं च करीरं च तैलं चाभ्रे विवर्जयेत् ॥ ५ ॥

क्षार पदार्थ, आंबट पदार्थ, द्विदलधान्य, बोरें, काकड्या, कारलीं, वांगीं, कळकाचे कोंब व तेल हे पदार्थ अभ्रकभस्म सेवन करीत असतां वर्ज करावे.

अभ्रकाचीं अनुपानें

अभ्रकं च निशायुक्तं पिप्पलीमधुना सह ।
विंशतिं च प्रमेहानां नाशयेन्नात्र संशयः ॥ १ ॥
अभ्रकं हेमसंयुक्तं क्षयरोगविनाशनम् ।
रौप्यहेमाभ्रकं चैव धातुवृद्धिकरं परम् ॥ २ ॥
अभ्रकं च हरीतक्या गुडेन सह योजितम् ।
एलाशर्करया युक्तं रक्तपित्तविनाशनम् ॥ ३ ॥
त्रिकटु त्रिफलां चैव चातुर्जातं सशर्करम् ।
मधुना लेहयेत्प्रातः क्षयार्शःपाण्डुनाशनम् ॥ ४ ॥
गुडूचीसत्त्वखण्डाभ्यां मिश्रितं मेहनाशनम् ।
एलागोक्षुरभूधात्रीसितागव्येन मिश्रितम् ॥ ५ ॥
प्रातः संसेवनान्नित्यं मेहकृच्छ्रनिवारणम् ।
पिप्पलीमधुसंयुक्तं भ्रमजीर्णज्वरापहम् ॥ ६ ॥
मधुत्रिफलया युक्तं दृष्टिपुष्टिकरं मतम् ।
मूर्वासत्त्वयुतं व्योम व्रणानां च विनाशनम् ॥ ७ ॥
गोक्षीरक्षीरकन्दाभ्यां बलवृद्धिकरं परम् ।
भल्लातकयुतं व्योम त्वग्दोषनिवारणम् ॥ ८ ॥
नागरं पौष्करं भार्गीं गगनं मधुना सह ।
अश्वगन्धायुतं खादेद्वातव्याधिनिवारणम् ॥ ९ ॥
चातुर्जातं सिता चाभ्रं पित्तरोगनिवारणम् ।

कट्फलं पिप्पली क्षौद्रं श्लेष्मरोगनिवारणम् ॥ १० ॥
सर्वक्षारयुतं चाभ्रमग्निवृद्धिकरं परम् ।
मूत्राघातं मूत्रकृच्छ्रमश्मरीमपि नाशयेत् ॥ ११ ॥
विजयारससंयुक्तं शुक्रस्तम्भकरं परम् ।
लवङ्गमधुसंयुक्तं धातुवृद्धिकरं परम् ॥ १२ ॥
गोक्षीरं शर्करायुक्तं पित्तरोगविनाशनम् ।
अभ्रकं विधिसंयुक्तं पथ्ययोगेन योजितम् ॥ १३ ॥
वलीपलितनाशं स्याज्जीवेच्च शरदां शतम् ।

हळदीचें चूर्ण, पिंपळीचें चूर्ण व मध ह्यांच्याशीं अभ्रकभस्म सेवन केलें असतां वीस प्रमेहांचा नाश करितें, ह्यांत संशय नाहीं. सोन्याच्या वर्खाशीं अभ्रकभस्म घेतलें असतां क्षयरोगाचा नाश करितें. रुप्याचा वर्ख व सोन्याचा वर्ख ह्यांच्याशीं अभ्रकसेवन केलें असतां पराकाष्ठेची धातुवृद्धि करितें. हिरड्याचें चूर्ण व गूळ ह्यांच्याशीं किंवा वेलदोड्याच्या दाण्याची पूड व साखर यांच्याशीं अभ्रक घेतलें असतां रक्तपित्ताचा नाश करितें. त्रिकटु, त्रिफळा, चातुर्जात ह्यांचें चूर्ण मध व साखर ह्यांच्याशीं प्रातःकाळीं अभ्रक सेवन केलें असतां क्षय, मूळव्याध व पांडुरोग ह्यांचा नाश करितें. गुळवेलीचें सत्व व खडीसाखर ह्यांच्याशीं सेवन केलें असतां मेहाचा नाश करितें. वेलचीदाणे, गोखरू, भुईआवळी, खडीसाखर व गाईचें दूध ह्यांच्याशीं नित्य प्रातःकाळीं सेवन केलें असतां प्रमेह व मूत्रकृच्छ्र ह्यांचा नाश होतो. पिंपळी व मध ह्यांशीं सेवन केलें असतां भ्रम व जीर्णज्वर ह्यांचा नाश होतो. त्रिफळ्याचें चूर्ण व मध ह्यांच्याशीं सेवन केलें असतां दृष्टि बळकट करितें. मोरवेलाचे सत्वाशीं अभ्रक घेतलें असतां व्रणांचा नाश करितें. भुईकोहळ्याचें चूर्ण व गाईचें दूध ह्यांच्याशीं घेतलें असतां शक्ति वाढवितें. बिब्याच्या कल्काशीं अभ्रक घेतलें असतां मूळव्याधीसंबंधीं दोष नाहींसें करितें. सुंठ, पोंखरमूळ, भारंगमूळ, अश्वगंध व मध ह्यांच्याशीं अभ्रक सेवन केलें असतां वातव्याधीचा नाश करितें. चातुर्जाताचें चूर्ण व खडीसाखर ह्यांच्याशीं अभ्रक घेतलें असतां पित्तरोगाचा नाश करितें. कायफळ, पिंपळी व मध ह्यांच्याशीं घेतलें असतां कफरोगाचा

नाश करितें. सर्व प्रकारचे क्षारां--(टांकणखारादि) सह अभ्रकभस्म घेतलें असतां अग्नीची वृद्धि करितें, आणि मूत्राघात, मूत्रकृच्छ्र व अश्मरी (मूतखडा) ह्यांचाही नाश करितें. भांगेचा रस किंवा काढा ह्यांच्याशीं अभ्रक घेतलें असतां शुक्राचें स्तंभन करितें. लवंगांचें चूर्ण व मध ह्यांच्याशीं घेतलें असतां धातूची वृद्धि करितें. गाईचें दूध व साखर ह्यांच्याशीं घेतलें असतां पित्तसंबंधीं रोगाचा नाश करितें. अभ्रकभस्म विधियुक्त पथ्य वगैरे करून सेवन केलें असतां वलीपलित रोगाचा (म्हातारपणाचा) नाश होऊन मनुष्य शंभर वर्षें वांचतो.

वेल्लव्योषसमन्वितं घृतयुतं वल्लोन्मितं सेवितं
दिव्याभ्रं क्षयपाण्डुसंग्रहणिकाशूलं च कुष्ठामयम् ।
सर्वश्वासगदं प्रमेहमरुचिं कासामयं दुर्धरं
मन्दाग्निं जठरव्यथां परिहरेच्छ्लेष्मामयान्निश्चितम् ॥१४॥
नातः परतरं किंचिज्जरामृत्युविनाशनम् ॥ १५ ॥

वावडिंग, सुंठ, मिरीं, पिंपळी ह्यांचें चूर्ण व मध ह्यांच्याशीं अभ्रकभस्म एक वाल सेवन केलें असतां क्षय, पांडुरोग, संग्रहणी, शूल, कुष्ठरोग, सर्व प्रकारचे श्वासविकार, प्रमेह, अरुचि, दुर्धर कासरोग (खोकला) अग्निमांद्य, उदर व कफरोग ह्यांचा निश्चयानें नाश करितें. ह्या अभ्रकभस्मासारखें जरा (म्हातारपणा) व मृत्यु यांचें नाशक दुसरें रसायन नाहीं.

सुवर्णमाक्षिक.

स्वर्णवर्णं गुरु स्निग्धमीषन्नीलच्छविच्छटम् ।
कषे कनकवद्घृष्टं तद्वरं हेममाक्षिकम् ॥ १ ॥

सोन्यासारख्या रंगाचें, जड, स्निग्ध, किंचित् नीलवर्णाची झांक मारणारें, कसोटीवर घासलें असतां सोन्याप्रमाणें दिसणारें असें जें तें उत्तम सुवर्णमाक्षिक समजावें.

अशुद्धं माक्षिकं कुर्यादान्ध्यं कुष्ठं क्षयं क्रिमीन् ।
शोधनीयं प्रयत्नेन तस्मात्कनकमाक्षिकम् ॥ २ ॥

अशुद्ध सुवर्णमाक्षिक दृष्टिनाशक असून कुष्ठ, क्षय व क्रिमि हे विकार उत्पन्न करितें. ह्यासाठीं प्रयत्नानें सुवर्णमाक्षिकाचें शोधन करावें.

सुवर्णमाक्षिकाचें शोधन.

त्रिभागं माक्षिकं ग्राह्यं चतुर्थांशेन सैन्धवम् ।
जम्बीरजरसैर्वाऽपि बीजपूरद्रवैः पचेत् ॥ १ ॥
घर्षितं लोहपात्रे च याति पात्रं च रक्तताम् ।
ततः शुद्धत्वमायाति स्वर्णमाक्षिकमीदृशम् ॥ २ ॥

तीन भाग सुवर्णमाक्षिक व एक भाग सैंधव एकत्र करून लोखंडाच्या भांड्यांत घालून त्यांत लिंबाचा अथवा महाळुंगाचा रस घालून कोळशावर ठेवून फुंकावें व लोखंडाच्या पळीनें घोटावें पात्रावर माक्षिकाचा रंग लाल दिसूं लागला, म्हणजे तें शुद्ध झालें म्हणून समजावें.

प्रकार दुसरा.

एरण्डतैललुङ्गाम्बुसिद्धं शुध्यति माक्षिकम् ।
शुद्धं वा कदलीकन्दतोयेन घटिकाद्वयम् ।
तप्तं क्षिप्तं वराक्वाथे शुद्धिमायाति माक्षिकम् ॥ १ ॥

माक्षिक एरंडतेलांत खलून लोखंडी तव्यांत घालून निखाऱ्यावर ठेवून फुंकावें. तेल पेटून विझल्यावर त्यांत महाळुंगाचा रस किंवा लिंबाचा रस घालून लोखंडाच्या पळीनें घोटावें. घोटतां घोटतां त्याला लाल रंग आल्यावर काढून घ्यावें, म्हणजे सुवर्ण माक्षिक शुद्ध होतें.

प्रकार तिसरा.

अगस्तिपत्रनिर्यासैः शिग्रुमूलं सुपेषितम् ।
तन्मध्ये पुटितं शुद्धं निम्बूजाम्लेन पाचितम् ॥ २ ॥

शेवग्याचें मूळ हादग्याचे पाल्याचे रसांत उगाळून त्याचा कल्क खालीं वर घालून मध्यें सुवर्णमाक्षिक ठेवून शरावसंपुष्टांत गजपुट द्यावें. नंतर लिंबाच्या रसांत खलून गजपुट द्यावें. म्हणजे सुवर्ण माक्षिक शुद्ध होतें.

सुवर्णमाक्षिकाचें मारण.

माक्षिकस्य चतुर्थांशं दत्त्वा गन्धं विमर्दयेत् ।
उरुबूकस्य तैलेन ततः कार्या सुचक्रिका ॥ १ ॥
शरावसंपुटे कृत्वा पुटेद्गजपुटेन च ।

धान्यस्य तुषमूर्ध्वाधो दत्त्वा शीतं समुद्धरेत् ।
सिन्दूराभं भवेद्भस्म माक्षिकस्य न संशयः ॥ २ ॥

शुद्ध सुवर्णमाक्षिक घेऊन त्याच्या चवथाईनें त्यांत शुद्ध गंधक घालून एरंडतेलामध्यें खलावें व त्याची चक्रिका (चकती) करावी, आणि शरावसंपुटांत घालून मातकापड करून त्या शरावसंपुटाच्या खालीं वर धान्याचें भुसकट घालून गजपुट द्यावें. स्वांगशीत झाल्यावर काढून घ्यावें. म्हणजे शेंदराप्रमाणें लाल असें माक्षिकाचें भस्म होतें.

कंटधत्तूरपत्रस्य रसैः संभाव्य माक्षिकम् ॥
ततः पुटेदिति त्रिधा पुटनान्माक्षिके मृतिः ॥ १ ॥
एवमिर्वारुमध्यस्थं पुटनान्माक्षिके मृतिः ।

(काटेधोतऱ्याच्या पाल्यांत शुद्ध सुवर्णमाक्षिक खलून गज पुट द्यावें. ह्याप्रमाणें तीन पुटें दिल्यानें सुवर्णमाक्षिकाचें भस्म होतें. ह्याप्रमाणें काकडीमध्यें शुद्ध सुवर्णमाक्षिक घालून शरावसंपुटांत गजपुट द्यावें. म्हणजे माक्षिकाचें भस्म होतें.)*

दुसरा प्रकार.

अजामूत्रेऽथवा तैले कषाये वा कुलत्थजे ।
तक्रे वा घर्षितं पक्वं म्रियते स्वर्णमाक्षिकम् ॥ ३ ॥

शेळीच्या मुतांत अथवा तेलांत (एरंडेलांत) किंवा हुलग्याच्या काढ्यांत अगर ताकांत शुद्ध सुवर्णमाक्षिक खलून गजपुट दिलें असतां सुवर्णमाक्षिकाचें भस्म होतें.

सुवर्णमाक्षिकाचे गुण.

माक्षिकं तिक्तमधुरं मेहार्शःक्षयकुष्ठनुत् ।
कफपित्तहरं शीतं योगवाहि रसायनम् ॥ १ ॥
माक्षिको रजतहाटकप्रभः शोधितोऽतिगुणदः सुसेवितः ।
मेहकुष्ठकृमिशोफपाण्डुतापस्मृतीर्हरति सोऽश्मरीं जयेत् ॥२॥

सुवर्णमाक्षिक कडू, मधुर, प्रमेह, मूळव्याध, क्षय, कृमि, कफ, पित्त ह्यांचें नाशक योगवाही (अनुपानपरत्वें निरनिराळ्या गुणाचें)

---

* हे कंसांतील दोन प्रकार आमचे जवळचे हस्तलिखित प्रतींमधील आहेत म्हणून कंसांत लिहिले आहेत.

व रसायन आहे. रौप्यमाक्षिक व सुवर्णमाक्षिक शुद्ध करून सेवन केलें असतां अतिशय गुणकारक होतें. शुद्ध माक्षिक–प्रमेह, कुष्ठ, कृमि, सूज, पांडुरोग, अपस्मार (फेपरें) व मुतखडा ह्या विकारांचा नाश करितें.

मन्दानलत्वं बलहानिमुग्रां विष्टम्भतामन्यगदांश्च दुष्टान्।
करोति मालां व्रणपूर्विकां च माक्षीकधातुर्गुरुरप्यपक्वः ॥ ३ ॥

अशुद्धमाक्षिक–अग्निमांद्य, भयंकर बलहानि, मलादिकांचा अवरोध, ज्यामध्यें व्रण आहेत अशा गंडमाळा व अन्य दुष्ट रोग ह्यांना उत्पन्न करितें. भस्म न केलेलें (अपक्व) सुवर्णमाक्षिक जड असतें.

माक्षीकधातुः सकलामयघ्नः प्राणो रसेन्द्रस्य परं हि वृष्यः।
दुर्मेललोहद्वयमेलकश्च गुणोत्तरः सर्वरसायनाग्र्यः ॥ ४ ॥

माक्षिक हा धातु सर्व रोगनाशक, रसेंद्र म्हणजे पारा ह्याचें केवळ जीवित, पराकाष्ठेचें वृष्य (कामोद्दीपक), मिश्र न होणाऱ्या दोन धातूंचें मेळन करणारा, अत्यंत गुणकारक व सर्व रसायनांमध्यें श्रेष्ठ आहे.

रौप्यमाक्षिक.

कांस्यवत्तारमाक्षिकयं कषे घृष्टं तु रूप्यवत्।
गुरु स्निग्धं सितं यत्तच्छ्रेष्ठं स्यात्तारमाक्षिकम् ॥ १ ॥
स्वर्णमाक्षिकवद्दोषा विज्ञेयास्तारमाक्षिके।
अतस्तद्दोषशान्त्यर्थं शोधनं कथ्यते यथा ॥ २ ॥

रौप्यमाक्षिक हें दिसण्यांत कांशाप्रमाणें दिसतें. कसोटीवर रुप्याप्रमाणें उठतें. जें रौप्यमाक्षिक जड, स्निग्ध, पांढरें असतें, तें उत्तम समजावें. रौप्यमाक्षिकामध्यें देखील सुवर्णमाक्षिकाप्रमाणेंच दोष आहेत. ह्यासाठीं ते दोष जाण्याकरितां त्याचें शोधन सांगतों.

रौप्यमाक्षिकाचें शोधन.

कर्कोटीमेषशृङ्गीजै रसैर्जम्बीरजैर्दिनम्।
आतपे भावना देया शुद्धं स्यात्तारमाक्षिकम् ॥ १ ॥

कर्टोली, मेढशिंगी व जंबीर निंबु (ईड) ह्यांच्या रसाची एक दिवस उन्हामध्यें भावना द्यावी, म्हणजे रौप्यमाक्षिक शुद्ध होतें.

रौप्यमाक्षिकाचें मारण.

स्वर्णमाक्षिकवज्ज्ञेयं तारमाक्षिकमारणम् ।

सुवर्णमाक्षिकाप्रमाणेंच रौप्यमाक्षिकाचेंही भस्म करावें.

विमलाया गुणाः किंचिन्न्यूनाः कनकमाक्षिकात् ॥ १ ॥

विमला म्हणून जो माक्षिकाचा भेद आहे (त्याला कोणी कांस्य-माक्षिक असें म्हणतात व कोणी रौप्यमाक्षिकही म्हणतात), त्याचे गुण सुवर्णमाक्षिकाहून कांहीं कमी आहेत.

हरताळाचा विधि.

अशुद्धं तालमायुर्घ्नंकफमारुतमेहकृत् ।
तापस्फोटाङ्गसंकोचान्कुरुते तेन शोधयेत् ॥ १ ॥

अशुद्ध हरताळ आयुष्यनाशक, व कफ, वात, प्रमेह, ज्वर, गांधी, शरीरावयवाचें आंकुचन हे विकार करतो, म्हणून त्याचें शोधन करावें.

हरताळाचें शोधन.

तालकं कणशः कृत्वा तच्चूर्णं काञ्जिके क्षिपेत् ।
दोलायंत्रेण यामैकं ततः कूष्माण्डजद्रवैः ॥ १ ॥
तिलतैले पचेद्यामं यामं च त्रिफलाजले ।
चूर्णोदके च यामैकं पक्कं शुध्यति तालकम् ॥ २ ॥

हरताळाचे बारीक कण करून एका फडक्यांत बांधून कांजी-मध्यें सोडून दोलायंत्रानें एक प्रहरभर पचन करावे. नंतर कोहा-ळ्याच्या पाण्यांत, तिळाच्या तेलांत, त्रिफळ्याच्या काढ्यांत व चुन्याच्या निवळींत अनुक्रमें एक एक प्रहर पचन करावें. म्हणजे हरताळ शुद्ध होतो.

हरताळाचें मारण.

सदलं तालकं शुद्धं पुनर्नव्या रसेन तु ।
खल्वे विमर्दयेदेकदिनं पश्चाद्विशोषयेत् ॥ १ ॥
संशोष्य गोलकं तस्य कुर्यात्तच्च विशोषयेत् ।
ततः पुनर्नवाक्षारैः स्थाल्यर्धं तु प्रपूरयेत् ॥ २ ॥
तत्र तद्गोलकं धृत्वा पुनस्तेनैव पूरयेत् ।
आकण्ठं पिठरं तस्य पिधानं धारयेन्मुखे ॥ ३ ॥
स्थालीं चुल्यां समारोप्य क्रमाद्वह्निं विवर्धयेत् ।
दिनान्यन्तरशून्यानि पञ्च वह्निं प्रदीपयेत् ॥ ४ ॥

एवं तु म्रियते तालं मात्रा तस्यैकरक्तिका ।
अनुपानान्यनेकानि यथायोग्यं प्रयोजयेत् ॥ ५ ॥

पत्रीहरताळ शुद्ध करून घेटुळीच्या रसामध्यें एक दिवस खलून वाळवावा, व त्याचा गोळा करून तोही सुकवावा. नंतर एका परळांत किंवा कुंडाल्यांत घेटुळीचा अगर वसूचा क्षार घालून तो अर्धा भरून त्यावर तो गोळा ठेवून पुन्हा क्षार घालून मळ्यापर्यंत तो कुंडाला भरावा. व त्याजवर झाकण ठेवून तो चुलीवर ठेवून क्रमानें वाढता अग्नि द्यावा. ह्याप्रमाणें खळ पडूं न देतां सारखा पांच दिवस अग्नि द्यावा. म्हणजे हरताळाचें भस्म होतें. तें एक गुंज प्रमाणें अनेक अनुपानें योजून यथायोग्य द्यावें.

हरताळाचे गुण.

हरितालं कटु स्निग्धं कषायोष्णं हरेद्विषम् ।
कण्डूकुष्ठाख्यरोगास्त्रवातपित्तकफव्रणान् ॥ १ ॥
तालकं हरते रोगान्कुष्ठं मृत्युजरापहम् ।
शोधितं कुरुते वीर्यं कांन्तिं वृद्धिं तथाऽऽयुषः ॥ २ ॥

हरताळ—तिखट, स्निग्ध, तुरट, उष्ण, विषनाशक, कंडु, कुष्ट, वातरक्त, पित्त, कफ, व्रण, कुष्ट, म्हातारपण व मृत्यु ह्यांचा नाश करितो. शुद्ध तालक (हरताळ) वीर्यवर्धक, कांन्तिवर्धक व आयुष्यवर्धक आहे.

मनशीळ.

मनःशिला मन्दबलं करोति जन्तुं ध्रुवं शोधनमन्तरेण ।
मलस्य बन्धं किल मूत्ररोगं सशर्करं कृच्छ्रगदं च कुर्यात् ॥१॥

अशुद्ध मनशीळ शक्ति क्षीण करिते. जंतु उत्पन्न करिते, मलाचा अवरोध, मूत्ररोग, मूत्रशर्करा (लघवींतून वाळूसारखी रेव पडणें) व मूत्रकृच्छ्र (उन्हाळे) हे रोग उत्पन्न करिते.

मनशिळाचें शोधन.

पचेत्त्र्यहमजामूत्रे दोलायंत्रे मनशिलाम् ।
भावयेत्सप्तधा मूत्रैरजायाः शुद्धिमृच्छति ॥ १ ॥

मनशीळ तीन दिवस शेळीच्या मुतामध्यें दोलायंत्रानें पचन करावा. नंतर काढून शेळीचे मुतांतच सात भावना द्याव्या, म्हणजे तो शुद्ध होतो.

दुसरा प्रकार.

अगस्तिपत्रतोयेन भाविता सप्तवारकम् ।
शृङ्गबेररसे वाऽपि विशुध्यति मनःशिला ॥ २ ॥

हादग्याच्या पाऱ्याच्या रसाच्या अथवा आल्याच्या रसाच्या मनशिळाला सात दिवसपर्यंत सात भावना द्याव्या. म्हणजे मनशीळ शुद्ध होतो.

मनशिळाचे गुण.

मनःशिला गुरुर्वर्ण्या सरोष्णा लेखनी कटुः ।
तिक्ता स्निग्धा विषश्वासकासभूतविषास्रनुत् ॥ १ ॥

मनशीळ जड, उत्तम वर्ण करणारा, सारक, उष्ण, लेखन, तिखट, कडु, स्निग्ध व विष, श्वास, खोकला, भूतबाधा व रक्तदोष ह्यांचा नाशक आहे.

सुरमा.

स्रोतोञ्जनं द्विधा प्रोक्तं श्वेतकृष्णप्रभेदतः ।
त्रिफलावारिणा स्वेद्यं तद्द्वयं शुद्धिमृच्छति ॥ १ ॥

सुरमा काळा व पांढरा असा दोन प्रकारचा आहे. तो त्रिफळ्याच्या काढ्यांत दोलायंत्रानें शिजविला असतां शुद्ध होतो.

सुरम्याचे गुण.

सौवीरं ग्राहि मधुरं चक्षुष्यं कफपित्तजित् ।
हिध्माक्षयास्रनुच्छीतं स्रोतोञ्जनमपीदृशम् ॥ १ ॥

सुरमा ग्राहक (मलबंधक), मधुर, चक्षुष्य (नेत्राला हितावह), कफपित्तनाशक व उचकी, क्षय व रक्तदोष ह्यांचा नाशक व थंड, असून पांढरा सुरमाही असाच आहे.

मोरचूत.

विष्ठया मर्दयेत्तुत्थं मार्जारककपोतयोः ।
दशांशं टङ्कणं दत्वा पचेल्लघुपुटे ततः ॥
पुटं दध्ना पुटं क्षौद्रैर्देयं तुत्थं विशुध्यति ॥ १ ॥

मांजराच्या व पारव्याच्या विष्ठेशीं मोरचूत खलून त्याच्या दहाव्या हिश्शानें टाकणखार घालून लघुपुट[1] द्यावें. नंतर दह्यांत

---

1. गजपुटाच्या निम्यानें जें पुट देतात त्याला लघुपुट म्हणतात.

खलून एक पुट द्यावें, व मद्यांत खलून एक पुट द्यावें, म्हणजे मोरचूत शुद्ध होतो.

ओतोर्विशा समं तुत्थं सक्षौद्रं टङ्कणांघ्रियुक् ।
त्रिधैवं पुटितं शुद्धं वान्तिभ्रान्तिविवर्जितम् ॥ १ ॥

मोरचुताच्या समान मांजराची विष्ठा व चतुर्थांश टांकणखार व मध हे एकत्र खलून लघुपुट द्यावें. ह्या प्रमाणें तीन पुटें दिलीं असतां मोरचुत शुद्ध होऊन वांति व भ्रांति करीत नाहीं.

मोरचुताचे गुण.

तुत्थकं कटुकं क्षारं कषायं विशदं लघु ।
लेखनं भेदि चक्षुष्यं कण्डूकृमिविषापहम् ॥
कफास्रपित्तकुष्ठघ्नं मेहमेदोविनाशनम् ॥ २ ॥

मोरचुत तिखट, क्षार (खारट), तुरट, विष, हलका, लेखन, मलभेदक, नेत्राला हितावह, कंडु, कृमि, विषबाधा, ह्यांचा नाशक, कफ, रक्तपित्त, कुष्ठ, प्रमेह व मेद ह्यांना दूर करणारा आहे.

कलखापरी.

नृमूत्रे वाऽथ गोमूत्रे सप्ताहं रसकं पचेत् ।
दोलायंत्रेण शुद्धं स्यात्ततः कार्येषु योजयेत् ॥ १ ॥

मनुष्याच्या (किंवा घोड्याच्या) अथवा गाईच्या मुतांत कलखापरी सात दिवसपर्यंत दोलायंत्रानें शिजवावी, म्हणजे शुद्ध होते. नंतर ती औषधांत योजावी.

खर्परं कटुकं क्षारं कषायं वामकं लघु ।
लेखनं भेदनं शीतं चक्षुष्यं कफपित्तनुत् ॥
विषास्रकुष्ठकण्डूनां नाशनं परमं मतम् ॥ २ ॥

कलखापरी तिखट, खारट, तुरट, वांतिकारक, हलकी, लेखन, मलभेदक, थंड, नेत्राला हितावह, कफपित्तनाशक, विषबाधा, रक्तदोष व कुष्ठ ह्यांची उत्कृष्ट नाशक आहे.

पारा.

रसो विप्रः सितो रक्तः क्षत्रियः पीत ऊरुजः ।
शूद्रः कृष्ण इति प्रोक्तो वर्णभेदाच्चतुर्विधः ॥ १ ॥
ब्राह्मणः कल्प्यते कल्पे गुटिकायां च बाहुजः ।
धातुवादे तथा वैश्यः शूद्रश्चेतरकर्माणि ॥ २ ॥

अन्तःसुनीलो बहिरुज्ज्वलाङ्गो मध्याह्नचन्द्रप्रतिमप्रकाशः।
शस्तोऽथ धूम्रः परिपाण्डुरश्च चित्रो न योज्यो रसकर्मसिद्ध्यै ३

श्वेतपारा ब्राह्मण, रक्तपारा क्षत्रिय, पिवळा पारा वैश्य, आणि काळा पारा शूद्र असा वर्णभेदानें पारा चार प्रकारचा आहे. औषधी-कल्पामध्यें ब्राह्मणजातीचा पारा योजितात. गुटिका करण्याच्या कामीं क्षत्रियजातीचा पारा योजितात. धातुवादामध्यें (क्रिमयेमध्यें) वैश्यजातीचा पारा योजितात. व शूद्रजातीचा पारा इतर कर्मांत योजितात. आंतून नीलवर्णाची झांक मारणारा, बाहेरून तेजस्वी, मध्यावर आलेल्या चंद्राप्रमाणें प्रकाशमान, असा पारा प्रशस्त समजावा. जो पारा धुरकट व पांढऱ्या रंगाचा व तसाच चित्रविचित्र वर्णाचा पारा रसकर्मामध्यें योजूं नये.

पूर्वैर्दोषा रसेन्द्रश्च ये च प्रोक्ता मनीषिभिः।
अतस्तेषां प्रशान्त्यर्थं प्रोच्यते कर्म सांप्रतम् ॥ ४ ॥

पूर्वींच्या रसशास्त्र वेत्यांनीं पाऱ्यामध्यें जे दोष असतात म्हणून सांगितलें आहे, ते नाहींसे होण्यास पारदाचें शोधन सांगतों.

पाऱ्याचें शोधन.

मलशिखिविषनामानो रसस्य नैसर्गिकास्त्रयो दोषाः।
मूर्छां मलेन कुरुते शिखिना दाहं विषेण मृत्युं च ॥ ५ ॥

मलदोष, अग्निदोष, व विषदोष असे हे तीन दोष पाऱ्यामध्यें निसर्गतः असतात. मलदोषानें मूर्च्छा, अग्निदोषानें दाह आणि विष-दोषानें मृत्यु हीं होतात.

दुसरा प्रकार.

मलेन मूर्छां दहनेन दाहं विषेण मृत्युं वितनोति सूतः।
मलादिदोषत्रयमेतदत्र नैसर्गिकं शुद्धिमतोऽभिधास्ये ॥ १ ॥

अशुद्ध पारा मलदोषानें मूर्च्छा उत्पन्न करितो. अग्निदोषानें दाह उत्पन्न करितो, आणि विषदोषानें मृत्यु आणतो. असे हे तीन दोष पाऱ्यामध्यें निसर्गतःच आहेत. म्हणून पाऱ्याचें शोधन कसें करावें तें सांगतों.

नागो वङ्गो मलो वह्निश्चाञ्चल्यं च गिरिर्विषम्।
पारदे कंचुकाः सप्त सन्ति नैसर्गिका इमे ॥ १ ॥

शिसें, कथिल, मल, अग्नि, चंचलता, विष व गिरि (पर्वत) यासंबंधीं दोष अशा सात कंचुका (दोष) पाऱ्यामध्यें निसर्गतः आहेत.

रक्तेष्टिकानिशाधूमसारोर्णाभस्मचूर्णकैः ।
जम्बीरद्रवसंयुक्तैर्नागदोषापनुत्तये ॥ ३ ॥
विशालाङ्कोलमूलानां रजसा काञ्जिकेन च ।
शनैः शनैः स्वहस्तेन वङ्गदोषविमुक्तये ॥ ४ ॥
राजवृक्षस्य मूलोत्थचूर्णेन सह कन्यका ।
मलदोषापनुत्यर्थं चित्रको वह्निदूषणम् ॥ ५ ॥
चाञ्चल्यं कृष्णधत्तूरो गिरिं हन्ति कटुत्रयम् ।

पाऱ्यामधील शिशाचा दोष जाण्याकरितां विटकराची पूड, हळद, घेरोसा, लोकरीची राख व चुना, ह्यांच्याशीं लिंबाच्या रसामध्यें पाऱ्याचें मर्दन करावें. कथिलाचा दोष जाण्याकरितां, कडु वृंदावनाच्या मूळाचें चूर्ण व अंकोलाच्या मूळाचें चूर्ण ह्यांच्याशीं कांजीमध्यें पाऱ्याचें हळुहळू मर्दन करावें. मलदोष जाण्याकरितां बाहाव्याच्या मूळाचें चूर्ण व कोरफडीचा रस ह्यांमध्यें पाऱ्याचें मर्दन करावें. अग्नीसंबंधीं दोष जाण्याकरितां चित्रकमूळाच्या रसाशीं पाऱ्याचें मर्दन करावें. धोतऱ्याच्या रसाशीं मर्दन केलें असतां चांचल्यदोष व कटुत्रयाच्या काढ्याशीं मर्दन केल्यानें गिरिसंबंधीं दोष नाहींसा होतो. विषसंबंधीं दोष दूर होण्याकरितां त्रिफळ्याच्या काढ्यांत मर्दन करावें.

त्रिफला विषनाशाय कन्यका सप्त कंचुकान् ॥ ६ ॥

कोरफडीचा रस हा पाऱ्याच्या सातीही कंचुकांच्या दोषांना काढून टाकतो.

प्रकार दुसरा.

आरग्वधो हन्ति मलं प्रयत्नात्कुमारिका सप्त हि कंचुकांश्च ।
अङ्कोलमूलं च विषं निहन्याद्रसस्य वह्निः किल पावकं च ॥ १
प्रत्येकं सप्तवारं च मर्दितः पारदो भवेत् ।
तदा विशुद्धतां याति सर्वयोगार्हितो भवेत् ॥ २ ॥

बाहवा हा पाऱ्याचा मल दूर करतो, आणि कोरफड सातीही कंचुका दूर करिते. अंकोलाचें मूळ पाऱ्याचा विषदोष नाहींसा

करितें. चित्रकमूळ अग्नीसंबंधीं दोष नाहींसा करितें. ह्या प्रत्येकाच्या रसामध्यें पारा सात सात दिवस खलला असतां तो शुद्ध होऊन सर्व योगांमध्यें योजण्यास योग्य होतो.

प्रकार तिसरा.

कुमारीत्रिफलाव्योषचित्रकं निम्बुकं रसम् ।
दिनैकं मर्दितं कृत्वा शुद्धो भवति पारदः ॥ १ ॥

कोरफडीचा रस, त्रिफळ्याचें चूर्ण, सुंठ, मिरीं, पिंपळी, चित्रक, ह्यांचें चूर्ण व लिंबाचा रस ह्यांमध्यें पारा एक एक दिवस खलला असतां तो शुद्ध होतो.

आरनालेन चोष्णेन क्षारयेत्प्रतिमर्दनम् ।
रसं तत्र प्रयातं तु शोषयित्वाऽथ पातयेत् ॥ १ ॥
गृहीत्वा प्रक्षिपेत्सूतं स्यादेवं पारदः शुचिः ।

प्रत्येक मर्दनाच्या वेळीं कांजी ऊन करून त्यानें पारा धुवून घ्यावा, व तो कोरडा करून ऊर्ध्वपातन करून घ्यावें, म्हणजे पारा शुद्ध होतो. तो रसप्रयोगामध्यें योजावा.

पारदात्षोडशांशं तु मिलित्वा सकलं भिषक् ॥ २ ॥
चूर्णं प्रदेयं च पलं मर्दने तप्तखल्वके ।
अजाशकृत्तुषाग्निं च खनित्वा भूमिमावपेत् ॥ ३ ॥
तस्योपरि स्थितं खल्वं तप्तखल्वं जगुर्बुधाः ।
एतन्मर्दनमाख्यातं रससंशुद्धये बुधैः ॥ ४ ॥

वरील विटकरादिकांचीं चूर्णें पाऱ्याच्या षोडशांश घ्यावीं, आणि मर्दनाकरितां चार तोळे चूर्ण तप्त खलामध्यें घालावें. जमिनीमध्यें एक लहानसा खळगा काढून त्यांत शेळीच्या लेंड्यांचे निखारे व धान्याच्या कोंड्याचा अग्नि करून तो खळगा भरावा, आणि त्यावर पारा खलण्याचा खल ठेवावा. ह्याला तप्तखल्व असें विद्वान् म्हणतात. त्यामध्यें पारदाचें वर सांगितल्याप्रमाणें मर्दन करावें.

त्र्यूषणं त्रिफला वन्ध्याकन्दक्षुद्रा द्वयान्वितम् ।
चित्रकेण निशाक्षारकन्यार्ककनकद्रवैः ॥ १ ॥
सूतं कृतेन क्वाथेन वारान्सप्त विमर्दयेत् ।
इत्थं संमूर्छितः सूतो जह्यात्सप्तापि कंचुकान् ॥ २ ॥

सुंठ, मिरीं, पिंपळी, हिरडा, बेहडा, आवळकाठी, वांझ कर्टो-

ळीचा कांदा, रिंगणमूळ, डोरलीमूळ व चित्रकमूळ ह्यांचा काढा हळदीचा क्षार, कुमारीचा रस व धोतऱ्याच्या मुळांचा काढा ह्या काढ्यानें सात दिवस मर्दन करावें, म्हणजे पाऱ्याचे सातही दोष नाहींसे होतात.

पारा उडवून घेणें.

तत उत्थापयेत्सूतमातपे निम्बुकार्दितम् ।
उत्थापनं विशिष्टं तु चूर्णपातनयंत्रके ।
धृत्वाऽग्नावूर्ध्वभांण्डांतं संग्रहेत्पारदः शुचिः ॥ १ ॥

नंतर पारा लिंबाच्या रसांत घालून उन्हांत ठेवावा. रस आटल्यावर तो पारा घेऊन उत्थापनाकरितां ज्या द्रव्याचीं चूर्णें घ्यावयाचीं त्या द्रव्याचीं चूर्णें घेऊन त्यांत पारा मिसळेपर्यंत खलून तें सर्व चूर्ण डमरुयंत्रांत[1] घालून चुलीवर ठेवून अग्नि द्यावा, व थंड झाल्यावर वरील भांड्यास लागणारा पारा काढून घ्यावा. ह्याला उत्थापन म्हणतात. ह्यानें पारा शुद्ध होतो.

स्वेदन.

रसं चतुर्गुणे वस्त्रे रसोनकशरावके ।
नियन्त्र्य दोलायन्त्रे तु प्रकल्प्य दिवसं पचेत् ॥ १ ॥
सव्योषत्रिफलावह्निकन्याकल्के तुषाम्बुनि ।
शेषदोषापनुत्त्यर्थमिदं स्वेदनमीरितम् ॥ २ ॥

पारा चौपदरी फडक्यामध्यें बांधून एका कुंडाल्यामध्यें लसणीचा रस भरून त्यांत सुंठ, मिरीं, पिंपळी, हिरडा, बेहडा, आवळकाठी, कोरफडीचा गर ह्यांचा कल्क व कांजी घालून त्यांमध्यें पाऱ्याची पोटली दोलायंत्रानें[2] सोडून बाकीचे दोष जाण्याकरितां पारा एक दिवस पचन करावा. ह्याला स्वेदन असें म्हणतात.

---

१. तोंडास तोंड मिळणारीं दोन गाडगीं घेऊन एकांत पारा घालून दुसरें गाडगें वर पालथें घालून तोंडास कणकीनें लिंपून चुलीवर ठेवून अग्नि द्यावा. ह्याला डमरुयंत्र असें म्हणतात.

२. एका भांड्यांत पातळ द्रव्य अर्धें भरून त्याच्या गळ्याला समोरासमोर दोन भोकें पाडून त्यांत एक लहानशी काठी आरपार घालून भांड्यांतील रसांत बुडेल अशी पाऱ्याची मोटली त्यास बांधून चुलीवर ठेवावें. ह्याला दोलायंत्र म्हणतात.

पलादूनस्य सूतस्य शतपलाधिकस्य च ।
न संस्कारः प्रकर्तव्यः संस्कारः स्यात्ततोऽपरः ॥ १ ॥
शुभेऽहनि प्रकर्तव्य आरम्भो रसशोधने ।
एकान्ते धामनि शुभे पुराऽभ्यर्च्यो हि भैरवः ॥ २ ॥

चार तोळ्यांहून कमी व चारशें तोळ्यांहून अधिक पाऱ्याला संस्कार करूं नये. त्याहून अधिक पाऱ्यास संस्कार करणें असल्यास पुनः दुसरा संस्कार करावा. रसशोधनाला आरंभ करतांना तो सुमुहूर्तावर करावा. त्याला शुचिर्भूत व एकांतस्थान पहावें आणि प्रथम भैरवाचें पूजन करावें. नंतर रसशोधनास सुरवात करावी.

पाऱ्याचे गुणदोष.

मृतोऽशुद्धतया गुणं न कुरुते कुष्ठाग्निमान्द्यक्रिमि-
च्छर्द्यारोचकजाड्यदाहमरणं धत्ते नृणां सेवनात् ।
शुद्धः स्यात्सकलामयौघशमनो यो योगवाहो मृतो
युक्त्या षड्गुणगन्धयुग्गदहरो योगेन धात्वादिभुक् ॥१॥

अशुद्ध पाऱ्याचें भस्म केलें असतां तो गुण देत नाहीं. उलट कुष्ठ, अग्निमांद्य, कृमि, वांति, अरुचि, जडत्व व दाह हे विकार करतो किंवा त्याच्या सेवनानें मरणही येतें. उत्तम प्रकारें शुद्ध केलेल्या पाऱ्याचें भस्म केलें असतां तें सर्वरोगनाशक, योगवाही होतें. आणि युक्तीनें पाऱ्याला षड्गुणगंधकाचें जारण केलें असतां तो रोगनाशक होतो; व अन्य प्रयोगानें तो सुवर्णादि धातूंचें भक्षण करतो म्हणजे तो बुभुक्षित होतो.

मूर्छातो गदहृत्तथैव खगतिं दत्ते निबद्धोऽर्थद-
स्तद्भस्मामयवार्धकादिहरणं दृक्पुष्टिकान्तिप्रदम् ।
वृष्यं मृत्युविनाशनं बलकरं कान्ताजनानन्ददं
शार्दूलातुलसत्त्वकृत्क्रमभुजां योगानुसारि स्फुटम् ॥ २॥

पारा मूर्छित केला असतां रोगांचा नाश करितो. त्याची गोळी तयार केली (बद्ध केला) असतां आकाशांतून गमन करण्याची शक्ति येते आणि भस्म केलें असतां द्रव्यप्राप्ति होते; व सर्व रोग व म्हातारपण ह्यांचें हरण होतें. तो दृष्टि, पुष्टि व कांति देतो, कामोद्दीपन करतो, मृत्यूचें निवारण करितो व शक्ति देतो. ह्याचें

सेवन करणारा पुरुष स्त्रियांना आनंददायक होतो. ह्याच्या क्रमपूर्वक सेवनानें सिंहाप्रमाणें मनुष्य अतुल पराक्रमी होतो. पाऱ्याचें हें भस्म योगवाही आहे.

दुसरा प्रकार.

मूर्च्छां गतो यो हरते च रोगान्बद्धो यदा खेचरतामुपैति ।
लीनो भवेत्सर्वसमृद्धिदायी विराजतेऽसौ नितरां रसेन्द्रः ॥१॥

जो मूर्च्छित झाला असतां रोगाचा नाश करतो, बद्ध झाला असतां जो आकाशांतून गमन करण्याचें सामर्थ्य देतो, जो लीन झाला असतां (भस्म झाला असतां) सर्व समृद्धि (ऐश्वर्य) देतो, असा हा पारद (रसेंद्र) अत्यंत शोभिवंत आहे.

मूर्छित्वा हरति रुजं बन्धनमनुभूय मुक्तिदो भवति।
अमरीकरोति हि मृतः कोऽन्यः करुणाकरः सूतात् ॥ २ ॥

मूर्छित झाला असतां रोगांचा नाश करितो. बद्ध झाला असतां (त्या बंधनाच्या अनुभवानें) लोकांना मुक्तिदायक होतो. आणि मृत (भस्मरूप) झाला असतां सेवन करणाराला अमर करतो. असा पाऱ्यासारखा कृपेचा सागर दुसरा कोण आहे?

अर्थाः सहाया निखिलं च शास्त्रं हस्तक्रिया कर्मणि कौशलं च ।
नित्योद्यमस्तत्परता च वह्निरेभिर्गुणैः सिध्यति सूतकेन्द्रः ॥ ३ ॥

विपुल द्रव्यसाहाय्य, रसशास्त्राची पूर्ण माहिती, यशस्वी हस्तक्रिया, रसकर्मामध्यें कुशल, नित्य उद्योगामध्यें तत्पर असणें व योग्य अग्नीची सामुग्री हे सर्व गुण अनुकूल असले म्हणजे पारा सिद्ध होतो.

अथवा दरदाकृष्टं स्विन्नं लवणाम्बुभाजि दोलायाम् ।
रसमादाय यथेच्छं कर्तव्यस्तेन भैषजो योगः ॥ ४ ॥

इतकी अनुकूलता नसेल तर हिंगूळांतून काढलेला पारा घेऊन त्याचें मिठाच्या पाण्यांत दोलायंत्रानें स्वेदन करून तो पारा घेऊन यथेच्छ औषधें तयार करावीं.

निम्बूरसेन संपिष्टं प्रहरं दरदं दृढम् ।
ऊर्ध्वपातनयंत्रेण संग्राह्यो निर्मलो रसः ॥ ५ ॥

लिंबाच्या रसांत प्रहरभर हिंगूळ खलून तो सुकला म्हणजे

डमरुयंत्रांत घालून चार प्रहर अग्नि द्यावा. स्वांगशीत झाल्यावर वरील भांड्यास आंतून लागलेला पारा काढून घ्यावा.

पाऱ्याला मुख करावयाचा प्रकार.

अथ षड्बिन्दुकीटैश्च रसो मर्द्यस्त्रिवासरम् ।
लवणाम्लैर्मुखं तस्य जायते धातुभक्षकम् ॥ १ ॥

पारा इंद्रगोप किड्यासह (बीरबरोटी किंवा मखमली किड्या-सह) तीन दिवस मर्दन करावा; व त्यानंतर पंच लवणें (सैंधव, पादेलोण, बिडलोण, मीठ, औद्भिद लवण किंवा सांबरलोण) व लिंबाचा रस किंवा कांजी ह्यांमध्यें दोलायंत्रानें त्याचें स्वेदन करावें, म्हणजे तो धातुभक्षक होतो.

सास्यो रसः स्यात्पटुशिग्रुतुत्थैः सराजिकैः शोषणकैस्त्रिरात्रम् ।
पिष्टस्ततः स्विन्नतनुः सुवर्णमुख्यानयं खादति सर्वधातून् ॥ १ ॥

पारा—पंचलवणें (सैंधेलोण, पादेलोण, बिडलोण, मीठ व सांबर-लोण), शेवग्याच्या मुळाचें चूर्ण, मोरचूत, मोहऱ्या व सुंठ, मिरीं, पिंपळी, ह्यांचें चूर्ण ह्यांशीं तीन दिवस खलून लिंबाच्या रसांत किंवा कांजींत दोलायंत्रानें स्वेदन करावें. म्हणजे पाऱ्याला मुख उत्पन्न होतें, व तो सुवर्णादि सर्व धातूंचें भक्षण करितो.

पाऱ्याला त्याच्या सहापट गंधक जिरविण्याचा प्रकार.

तप्तखल्वे रसं क्षिप्त्वा अधश्चुल्ल्यास्तुषाग्निभिः ।
स्तोकं स्तोकं क्षिपेद्गन्धमेवं वै षड्गुणं चरेत् ॥ १ ॥

खालीं धान्याच्या भुसकटाचा (भाताच्या कोंड्याचा) अग्नि करून वर खल ठेवावा. तो तापल्यावर त्या तप्त खलामध्यें पारा घालून त्याजवर थोडा थोडा गंधक घालून जिरवावा. ह्याप्रमाणें पाऱ्याच्या सहापट गंधक जिरवावा.

कच्छप यंत्रानें गंधक जिरविण्याचा प्रकार.

मृत्कुण्डे निक्षिपेन्नीरं तन्मध्ये च शरावकम् ।
मृत्कुण्डे च पिधानाभं मध्ये मेखलया युतम् ॥ १ ॥
क्षिप्त्वा च मेखलामध्ये संशुद्धं रसमुत्तमम् ।
रसस्योपरि गन्धस्य रजो दद्यात्समांशकम् ॥ २ ॥
दत्त्वोपरि शरावं च भस्ममुद्रां प्रदापयेत् ।
तस्योपरि पुटं दद्याच्चतुर्भिर्गोमयोपलैः ॥ ३ ॥

एवं पुनः पुनर्गन्धं षड्गुणं जीर्यते बुधैः ।
गन्धे जीर्णे भवेत्सूतस्तीक्ष्णाग्निः सर्वकर्मसु ॥ ४ ॥

एका (पेल्याच्या आकाराच्या) मातीच्या कुंडीमध्यें पाणी घालून त्यावर आच्छादनरूप असा एक शराव (परळ) ठेवून त्याला आंतून एक कंगोरा (कांठ किंवा मेखला) करून त्यामध्यें त्या कंगोऱ्याच्या मध्यभागीं पारा ठेवून त्यावर पाऱ्याच्या समान शुद्ध गंधक घालून त्यावर दुसरा शराव पालथा घालून सभोंवार राखेनें लिंपावें. आणि त्यावर गाईच्या शेणाच्या चार गोवऱ्यांचें पुट द्यावें. ह्याप्रमाणें पाऱ्याच्या सहापट गंधक पुनःपुनः जिरवावा. ह्याप्रमाणें सहापट गंधक जिरला असतां तो पारा सर्व कर्मांमध्यें अग्नीप्रमाणें प्रखर रहातो.

गंधक जिरविलेल्या पाऱ्याचे गुण.

समे गन्धे तु रोगघ्नो द्विगुणे राजयक्ष्मनुत् ।
जीर्णे तु त्रिगुणे गन्धे कामिनीदर्पनाशनः ॥ १ ॥
चतुर्गुणे तु तेजस्वी सर्वशास्त्रविशारदः ।
भवेत्पञ्चगुणे सिद्धः षड्गुणे मृत्युनाशनः ॥ २ ॥

पाऱ्याच्या समान शुद्ध गंधक पाऱ्यामध्यें जिरविला असतां तो रोगनाशक होतो. दुप्पट जिरविलेला असतां तो क्षयाला दूर करितो. तिप्पट गंधक जिरविलेला पारा तरुण स्त्रियांचा गर्व हरण करणारा (पुरुषाला अत्यंत कामोत्तेजक असा) होतो. चौपट गंधक जारण केलेला पारा (भक्षण करणाराला) तेजस्वी व सर्वशास्त्रविशारद करतो. पांचपट गंधक जारण केलेला पारा सिद्धिदायक होतो, आणि सहापट गंधक जारण केलेला पारा मृत्युनाशक होतो.

दिनमेकं रसेन्द्रस्य यो ददाति हुताशनम् ।
द्रवन्ति तस्य पापानि कुर्वन्नपि न लिप्यते ॥ ३ ॥

एक दिवसपर्यंत पाऱ्याला जो अग्नि देतो म्हणजे अग्नीमध्यें टिकवितो, त्याचीं सर्व पापें लयाला जातात व त्यानें आणखी जरी पापें केलीं तरीं तीं त्याला लागत नाहींत.

पारा बद्ध करणें.

रम्भा वीरास्नुही चैव क्षीरकंचुकिरेव च ।
दिनारैश्चैव गोरम्भा मीनाक्षी काचमाचिका ॥
एभिस्तु मर्दितः सूतः पुनर्जन्म न विद्यते ॥ १ ॥

केळीचा कांदा, पांढरी कणेर, त्रिधारी निवडुंग, दुधी (गोरख दुधी), तांबडी घेटुळी, शिवलिंगी (महादेवफळाची वेल), होन-गुंदा (जलपिंपळी) व कांगोणी ह्यांच्या यथासंभव चिकांमध्यें व रसामध्यें पारा खलला असतां तो बद्ध होतो. पुनः पूर्वस्थितीला येत नाहीं.

दुसरा प्रकार.

पुष्पितमनोजमन्दिरमध्ये सूतो नियोजितो युक्त्या ।
बद्धो भवति कियद्भिर्दिवसैः पुष्पप्रभावेण ॥ २ ॥

ऋतुमतीच्या जननेंद्रियांत युक्तीनें पारा ठेवला असतां, पुष्प-प्रभावानें कित्येक दिवसांनीं तो बद्ध होतो.

तिसरा प्रकार.

भूलताशीवरीमूलं वारिणा मर्दयेद्दृढम् ।
तन्मूषां लेपयेन्मध्ये तन्मध्ये निक्षिपेद्रसम् ॥ ३ ॥
पञ्चटङ्कप्रमाणां तां मूषामङ्गारके क्षिपेत् ।
एवं बद्धो भवेत्सूतो मूषान्तःस्थो दृढो भवेत् ॥ ४ ॥
मुखमध्यगतस्तिष्ठेन्मुखरोगविनाशनः ।
शरीरे क्रमिते सूते जरापलितजिन्नरः ॥ ५ ॥
स्तम्भयेच्छस्त्रसंघातं कामोत्पादनकारकः ।
पुनर्नवं वयः कुर्यात्साधकानां न संशयः ॥ ६ ॥

दानवी व आघाड्याचें[1] मूळ ह्या दोघांचें वस्त्रगाळ चूर्ण करून तें पाण्यांत खूप खलावें व त्याची एक मूस तयार करावी व तिच्यामध्यें पारा घालावा. ती मूस पांच[2] टांक वजनाच्या कोळशा-

---

१. "शीवरी" ह्या ठिकाणीं "शिखरी" असा पाठ अन्य ग्रंथांतून दिसतो. तोच सयुक्तिक वाटल्यावरून त्याला धरून अर्थ लिहिला आहे.

२. मूळांत "पंचटंकप्रमाणां" ह्या ठिकाणीं "पंचटंकप्रमाणं" असा पाठ कांहीं प्रतींत आहे. तोच सयुक्तिक दिसल्यावरून त्याला अनु-सरून अर्थ लिहिला आहे.

च्या अग्नीवर ठेवावी. ह्याप्रमाणें अग्नि दिला असतां मुशीमध्यें पारा बद्ध व कठीण होतो. तो तोंडांत धरला असतां मुखरोग नाहींसे करितो. व तो शरीरामध्यें गेला असतां (भक्षण केला असतां) म्हातारपण व पलितरोग (अकालीं केश काळे होणें) ह्यांना जिंकतो. त्याचे योगानें शस्त्राचें स्तंभन होतें (शरीरावर शस्त्रप्रहार केला असतां पीडा होत नाहीं) व कामोत्पत्ति होते. हा पारा सेवन करणाऱ्या साधकाला पुन्हा तारुण्य आणतो, ह्यांत संशय नाहीं.

पाऱ्याचें भस्म करण्याचा प्रकार.

अपामार्गस्य बीजानां मूषायुग्मं प्रकल्पयेत् ।
तत्संपुटे न्यसेत्सूतं मलयूदुग्धमिश्रितम् ॥ १ ॥
द्रोणपुष्पीप्रसूनानि विडङ्गमरिमेदकः ।
एतच्चूर्णमधश्चोर्ध्वं दत्त्वा मुद्रां प्रदापयेत् ॥ २ ॥
तं गोलं मुद्रयेत्सम्यङ् मृन्मूषासंपुटे सुधीः ।
मुद्रां दत्त्वा शोषयित्वा ततो गजपुटे पचेत् ।
एवमेकपुटेनैव जायते सूतभस्मकम् ॥ ३ ॥

आघाड्याचें बी आणून त्याचें चूर्ण करून त्याच्या दोन मुशी कराव्या व त्यापैकीं एका मुशींत द्रोणपुष्पीचे (गोकर्णीचे) फुलाचें चूर्ण, वावडिंगाचें चूर्ण व खैराच्या सालीचें चूर्ण हीं चूर्णें समभाग एकत्र करून घालून, त्यावर काळ्या उंबराच्या चिकांत मिसळलेल्या पाऱ्याची गोळी घालून, त्यावर पुन्हा तें चूर्ण बसवून दुसरी मूस त्यावर पालथी घालून, मातकापड करून तें वाळल्यावर एकदां गजपुटांत ठेवून पचन करावें. म्हणजे ह्या एका पुटानेंच पाऱ्याचें भस्म होतें.

दुसरा प्रकार.

शुद्धसूतं समं गन्धं वटक्षीरैर्विमर्दयेत् ।
पाचयेन्मृत्तिकापात्रे वटकाष्ठैर्विघट्टयेत् ॥ १ ॥
लघ्वग्निना दिनं पाच्यं भस्मसूतं भवेद् ध्रुवम् ।
द्विगुञ्जं पर्णखण्डेन पुष्टिमग्निं च वर्धयेत् ॥ २ ॥

शुद्ध पारा व त्याच्या समान शुद्ध गंधक ह्यांचा वडाच्या चिकांत खल करून एका मातीच्या परळांत घालून चुलीवर ठेवून एक

दिवसभर मंद अग्नीनें पचन करावें, व वडाच्या लाकडानें घोटावें. म्हणजे निश्चयानें पाऱ्याचें भस्म होतें. हें दोन गुंजा विड्याच्या पानाशीं द्यावें, म्हणजे अग्नीची वृद्धि होऊन पुष्टि येते.

रससिंदूर करण्याचा प्रकार.

पलद्वयं शुद्धरसं पलार्धं शुद्धगन्धकम् ।
कर्षार्धं नवसारं च जम्बीरेण विमर्दयेत् ॥ १ ॥
काचकूप्यां क्षिपेच्चैव सप्तधा मृदकर्पटैः ।
विलेप्य काचकूपीं तामातपे शोषयेद् दृढम् ॥ २ ॥
छिद्रभाण्डे ततः कूपीं न्यसेत्सिकतयन्त्रके ।
कूपिकां कण्ठमानेन पूजयेदिष्टदेवताः ॥ ३ ॥
पञ्च पूज्याः कुमार्यश्च ततश्चुल्ल्यां विनिक्षिपेत् ।
पचेद्यामाष्टकं चैव कूपिकां च क्षणे क्षणे ॥ ४ ॥
संशोध्य पाचयेद्यन्त्रे स्वाङ्गशीतं समुद्धरेत् ।
ग्राह्यं च दरदाकारं देवदानवदुर्लभम् ॥ ५ ॥
सेवयेद्रोगनाशाय तत्तद्रोगानुपानतः ।
वल्लं वा वल्लयुग्मं वा कणया मधुना सह ॥ ६ ॥
सेवितं कामिनीकामं दर्शयेद्रतिकौतुकम् ।
वीर्यबन्धकरं शीघ्रं योषामदविनाशनम् ॥ ७ ॥

आठ तोळे शुद्ध पारा व दोन तोळे शुद्ध गंधक ह्यांची कज्जली करून तिच्यामध्यें अर्धा तोळा नवसागर घालून लिंबाच्या रसानें घोटावें. कोरडें झाल्यावर सात मातकापडें केलेल्या कांचेच्या कुपींत भरून ती कुपी तळाला भोंक पाडलेल्या एका मातीच्या कुंडाल्यांत मधोमध ठेवून तिच्या भोंवतीं तिच्या गळ्यापर्यंत येईल इतकी त्यांत वाळू भरावी. नंतर इष्टदेवता व पांच कुमारिका ह्यांचें पूजन करून ती चुलीवर ठेवावी, व आठ प्रहर पचन करावें. क्षणोक्षणी सळीनें कुपीचें तोंड मोकळें राखावें (कुपीचें शोधन करावें). आठ प्रहरानंतर स्वांगशीत झाल्यावर कुपी काढून घ्यावी, व तिच्या कंठाशीं हिंगुळाप्रमाणें लागलेलें, देवदानवादिकांना देखील दुर्लभ असें रसायन काढून घ्यावें. आणि रोगनाशाकरितां त्या त्या रोगाचें अनुपान योजून द्यावें. हें एक वाल किंवा दोन वाल मध व पिंपळी यांशीं सेवन केलें असतां कामवृद्धि करून रति-

प्रसंगीं कौतुक दाखवितें. वीर्याचें तात्काळ स्तंभन करितें व स्त्रियांचा गर्व हरण करितें.

सिन्दूरं हरवीर्यसंभवमिदं रूक्षाग्निमान्द्यापहं
यक्ष्मादिक्षयपाण्डुशोफमुदरं गुल्मप्रमेहापहम् ।
शूलप्लीहविनाशनं ज्वरहरं दुष्टव्रणान्नाशये-
दर्शांसि ग्रहणीभगंदरहरं छर्दित्रिदोषापहम् ॥ ८ ॥

हा पाऱ्यापासून तयार केलेला रससिंदूर रूक्ष, अग्निमांद्यनाशक, राजयक्ष्मा, क्षय, पांडुरोग, सूज, उदर, गुल्म, प्रमेह, शूल, पांथरी, ज्वर, दुष्ट व्रण, मूळव्याध, संग्रहणी, भगंदर, ओकारी व त्रिदोष ह्यांचा नाशक आहे.

दुसरा प्रकार.

सूतः पञ्चपलः स्वदोषरहितस्तत्तुल्यभागो बलि-
र्द्वौ चैतौ नवसारपादकलितौ संमर्द्य कूप्यां न्यसेत् ।
तां यन्त्रे सिकताख्यके तलबिले पक्त्वाऽर्कयामं हिमं
भित्त्वा कुंकुमपिञ्जरं रसवरं भस्माददेद्वैद्यराट् ॥ १ ॥
वाते सक्षौद्रपिप्पल्यपि च कफरुजि त्र्यूषणं साग्निचूर्णं
पित्ते सैला सिता स्याद् व्रणवति बृहतीनागरार्द्रामृताम्बु ।
पुष्टौ साज्यत्रियामा हरनयनफला शाल्मलीपुष्पवृन्तं
किंवा कान्ताललाटाभरणरसपतेः स्यादनूपानमेतत् ॥ २ ॥

शुद्ध पारा वीस तोळे व शुद्ध गंधक वीस तोळे ह्यांची कज्जली करून त्या दोहोंच्या चतुर्थांश त्यांत नवसागर मिसळून सर्व एकत्र खलून सात मातकापडें केलेल्या कांचेच्या कुपींत भरून तळाला भोंक पाडलेल्या वालुकायंत्रांत ठेवून बारा प्रहर अग्नि द्यावा. आणि स्वांगशीत झाल्यावर कुपी फोडून कुंकवाप्रमाणें लाल व रसांमध्यें श्रेष्ठ असा रससिंदूर काढून घ्यावा. तो वातरोगावर मध-पिंपळीशीं द्यावा; कफरोगावर सुंठ, मिरीं, पिंपळी व चित्रकमूळ ह्यांच्या चूर्णाशीं द्यावा; पित्तविकारावर वेलदोड्याच्या दाण्याचें चूर्ण व खडीसाखर ह्यांशीं घ्यावा; व्रणरोगावर डोरली, सुंठ व ओली गुळवेल ह्यांच्या काढ्याशीं द्यावा. पुष्टीकरितां हळद, रुद्राक्ष व सावरीच्या फुलांचे देठ ह्यांचें चूर्ण व तूप ह्यांशीं किंवा केशर व तूप ह्यांशीं द्यावा.

तिसरा प्रकार.

भागो रसस्य त्रय एव भागा गन्धस्य माषः पवनाशनस्य ।
संमर्द्य गाढं सकलं सुभाण्डे तां कज्जलीं काचकृते निदध्यात् १
संरुध्य मृत्कर्पटकैर्वटीनां मुखे सचूर्णां गुटिकां च दत्वा ।
क्रमाग्निना त्रीणि दिनानि पक्त्वा तां वालुकायन्त्रगतां ततः स्यात्२
बन्धूकपुष्पारुणमीशजस्य भस्म प्रयोज्यं च किलामयेषु ।
निजानुपानैर्मरणं जरां च हन्त्यस्य वल्लः क्रमसेवनेन ॥ ३ ॥
अपहरति रोगवृन्दं द्रढयति कायं महद्बलं कुरुते ।
शुक्रशतानि च सूते सिन्दूराख्यो रसः पुंसाम् ॥ ४ ॥
निखिलक्षयभक्षणदक्षतरं व्रणकुष्ठभगंदरमेहहरम् ।
बलदीधितिशुक्रसमृद्धिकरं रसभस्म समस्तगदापहरम् ॥ ५ ॥

एक भाग पारा, तीन भाग शुद्ध गंधक व एक मासा शुद्ध शिसें घेऊन प्रथम पारा खलांत घालून त्यांत शिसें पातळ करून घालून घोटावें. नंतर गंधक घालून घोटून कज्जली करावी; व ती मातकापड केलेल्या कुपींत भरून त्या कुपीच्या तोंडाला चुन्याची गोळी बसवून वालुकायंत्रांत ती कुपी ठेवून क्रमानें मंद, मृदु व तीक्ष्ण अग्नीनें तीन दिवस पचन करावें. म्हणजे दुपारीच्या फुलांप्रमाणें तांबडचा रंगाचा रससिंदूर तयार होतो. तो सर्व रोगांवर योजावा. हा एक वाल योग्य अनुपानाशीं सेवन केला असतां म्हातारपण ह्यांचा नाश करतो. हा रससिंदूर रोगसमुदायाचा नाश करतो. शरीर दृढ करतो. मोठें सामर्थ्य देतो व शंभर पटीनें शुक्र उत्पन्न करतो. हा रससिंदूर सर्व प्रकारच्या क्षयांचा नाश करण्याविषयीं दक्ष असतो. व्रण, कुष्ठ, भगंदर व प्रमेह ह्यांचा नाश करतो आणि बल, बुद्धि, धारणाशक्ति व शुक्र ह्यांची समृद्धि करतो व सर्व रोगांचें हरण करतो.

चवथा प्रकार.

पलमात्रं रसं शुद्धं तावन्मात्रं तु गन्धकम् ।
विधिवत्कज्जलीं कृत्वा न्यग्रोधांकुरवारिणा ॥ १ ॥
भावनात्रितयं दत्वा स्थालीमध्ये निधापयेत् ।
विधाय काच्छपं यन्त्रं वालूकाभिः प्रपूरयेत् ॥ २ ॥
दद्यात्तदनु मन्दाग्निं भिषग्यामचतुष्टयम् ।

जायते रससिन्दूरं तरुणारुणसंनिभम् ॥ ३ ॥
अनुपानविशेषेण करोति विविधान्गुणान् ।
क्षयकुष्ठमरुत्प्लीहमेहघ्नं पाण्डुनाशनम् ॥ ४ ॥

चार तोळे शुद्ध पारा व तितकाच शुद्ध गंधक घेऊन त्यांची कज्जली करावी आणि तिला वडाच्या पारंब्यांच्या रसाच्या तीन भावना द्याव्या. नंतर ती कज्जली एका परळांत घेऊन कच्छपयंत्राच्या पद्धतीप्रमाणें वर आच्छादन वगैरे ठेवून सर्व कृति कच्छपयंत्राप्रमाणें करावी; व तो परळ वालुकायंत्रांत ठेवून त्याच्या वरपर्यंत वाळू भरावी. व तें चुलीवर ठेवून त्याखालीं मंद अग्नि द्यावा. ह्याप्रमाणें चार प्रहर अग्नि दिला असतां आरक्तवर्ण रससिंदूर तयार होतो. हा अनुपान योजून दिला असतां नानाविध गुण करतो. हा रससिंदूर क्षय, कुष्ठ, वात, पांथरी, प्रमेह व पांडुरोग ह्यांचा नाश करितो.

रससिंदुराचीं विशेष अनुपानें.

यथा जलगतं तैलं तत्क्षणादेव सर्पति ।
एवमौषधमंगेषु प्रसर्पत्यनुपानतः ॥ १ ॥

ज्याप्रमाणें पाण्यावर टाकलेलें तेल तात्काळ पसरतें, त्याप्रमाणें अनुपानाशीं औषध दिलें असतां शरीरामध्यें तात्काळ पसरतें.

पिप्पली मधुना सार्धं वातमेहं हिनस्ति च ।
त्रिफला शर्करासार्धं पित्तमेहहरा स्मृता ॥ २ ॥
पिप्पली मारिचं शुण्ठी भार्गी च मधुना सह ।
कासश्वासप्रशमनः शूलस्य च विनाशनः ॥ ३ ॥
हारिद्रा शर्करासार्धं रुधिरस्य विकारनुत् ।
त्र्यूषणं त्रिफला वासा कामलापाण्डुमान्द्यहृत् ॥ ४ ॥
पिप्पली चित्रकं पथ्या तथा सौवर्चलं क्षिपेत् ।
अग्निमान्द्यबद्धकोष्ठहृद्व्यथानाशनं परम् ॥ ५ ॥
शिलाजतु तथैला च सितोपलसमन्वितम् ।
मूत्रकृच्छ्रे प्रशस्तोऽयं सत्यं नागार्जुनोदितम् ॥ ६ ॥
लवङ्गं कुंकुमं पत्री हिंगुलं करहाटिका ।
पिप्पली विजया चैव समानीमानि कारयेत् ॥ ७ ॥
कर्पूरादहिफेनाच्च नागाद्भागार्धकं क्षिपेत् ।
सर्वमेकत्र संमर्द्य धातुवृद्धौ प्रदापयेत् ॥ ८ ॥

सौवर्चलं लवङ्गं च भूनिम्बश्च हरीतकी ।
अस्यानुपानयोगेन सर्वज्वरविनाशनः ॥ ९ ॥
तथा रेचकरः प्रोक्तः सौवर्चलपलत्रिकात् ।
लवङ्गं कुंकुमं चैव दरदेन च संयुतः ॥ १० ॥
ताम्बूलेन समं भक्ष्यो धातुवृद्धिकरः परः ।
विदारीचूर्णयोगेन धातुवृद्धिकरो मतः ।
विजयादीप्यसंयुक्तो वमनस्य विकारनुत् ॥ ११ ॥
सौवर्चलं हरिद्रा च विजया दीप्यकस्तथा ।
अनेनोदरपीडां च सद्योजातां विनाशयेत् ॥ १२ ॥
चतुर्वल्लं पलाशस्य बीजाच्च द्विगुणं गुडात् ।
अस्यानुपानयोगेन कृमिदोषविनाशनः ॥ १३ ॥
अहिफेनं लवंगं च दरदं विजया तथा ।
अस्यानुपानतः सद्यः सर्वातीसारनाशनः ॥ १४ ॥
सौवर्चलेन दीप्येन चाग्निमान्द्यहरः परः ।
क्षुद्बोधजनकश्चैव सिद्धनागेश्वरोदितम् ॥ १५ ॥
गुडूचीसत्त्वयोगेन सर्वपुष्टिकरः स्मृतः ।
युक्तानुपानसहितः सर्वान्रोगान्विनाशयेत् ॥ १६ ॥

रससिंदूर पिंपळी व मध यांशीं घेतला असतां वातप्रमेहाचा नाश करतो. त्रिफळ्याचें चूर्ण व साखर ह्यांशीं घेतला असतां पित्तप्रमेहाचा नाशक होतो. पिंपळी, मिरीं, सुंठ व भारंगमूळ ह्यांशीं मध घालून घेतला असतां खोकला, श्वास व शूळ ह्यांचा नाश करतो. हळद व साखर ह्यांशीं घेतला असतां रक्तसंबंधीं विकार नाहींसे करतो. सुंठ, मिरीं, पिंपळी ह्यांचें चूर्ण, हिरडा, बेहडा, आवळकाठी ह्यांचें चूर्ण व अडुळशाचीं पानें ह्यांशीं घेतला असतां कावीळ, पांडुरोग व अग्निमांद्य ह्यांचा नाश करितो. पिंपळी, चित्रकमूळ व हिरडा ह्यांच्या चूर्णाशीं पादेलोण मिसळून त्याशीं घेतला असतां अग्निमांद्य, बद्धकोष्ठता व हृदयांतील पीडा ह्यांचा नाश करण्याविषयीं हा उत्कृष्ट आहे. शिलाजित, वेलदोड्याच्या दाण्याची पूड व खडीसाखर ह्यांशीं घेतला तर तो मूत्रकृच्छ्रावर प्रशस्त आहे, असें नागार्जुनाचें मत आहे. लवंग, केशर, जायपत्री, शुद्ध हिंगूळ, सोन्याचा वर्ख किंवा अक्कलकारा, पिंपळी, भांग हीं सर्व समभाग

घ्यावीं; कापूर, अफू व नागभस्म हीं अर्धा अर्धा भाग घ्यावीं. ह्या सर्वांचा एकत्र खल करून त्याबरोबर धातुवृद्धीकारितां शक्तिमाना-प्रमाणें द्यावा. पादेलोण, लवंग, काडेचिराईत व हिरडे ह्यांच्या चूर्णाशीं घेतला असतां सर्व ज्वरांचा नाश करतो. त्याचप्रमाणें त्रिफळ्याचें चूर्ण व पादेलोण ह्यांच्याबरोबर घेतला असतां रेच-कारक होतो. लवंग व केशर ह्याचें चूर्ण हिंगुळाशीं मिळवून तो विड्यांतून घेतला असतां पराकाष्ठेची धातूची वृद्धि करितो. तसेंच भुईकोहळ्याच्या चूर्णाशीं घेतला असतांही धातुवृद्धि करतो, असें मत आहे. भांगेचें चूर्ण व ओंवा ह्यांच्याशीं दिला असतां वांति-संबंधीं विकार नाहींसे करतो. पादेलोण, हळद, हिरडा व ओंवा ह्यांच्या चूर्णाबरोबर घेतला असतां नुकत्याच झालेल्या उदरासंबं-धाची पीडा दूर करतो. चार वाल पळसाच्या बियांचें चूर्ण व दुप्पट गूळ ह्यांशीं दिला असतां जंतविकारासंबंधीं दोष नाहींसे करितो. अफू, लवंग, हिंगूळ व भांग ह्यांच्या अनुपानाशीं घेतला असतां तात्काळ सर्व अतिसाराचा नाश करतो. पादेलोण व ओवा ह्यां-च्याशीं घेतला असतां उत्तम प्रकारें अग्निमांद्याचा नाश करितो, आणि क्षुधा उत्पन्न करतो, असें सिद्धनागेश्वराचें मत आहे. गुळ-वेलीच्या सत्वाशीं घेतला असतां सर्व प्रकारें पुष्टिकारक होतो. आणि योग्य अनुपान योजून दिला असतां सर्व रोग नष्ट करतो.

रससिंदुराचें पथ्यापथ्य.

सैन्धवामृतधान्याकजीरकार्द्रकसंयुतम् ।
तण्डुलीयकवार्ताकपटोललाजसाधितम् ॥ १ ॥
गोधूमजीर्णशाल्यन्नं गव्यं क्षीरं घृतं दधि ।
हंसोदकं मुद्गरसं रसेन्द्रे च हितं विदुः ॥ २ ॥

सैंधव व आलें घालून धने, जिरें आणि तूप ह्यांची फोडणी दिलेल्या तांदुळजा, वांगीं, व पडवळें ह्यांच्या भाज्या, लाह्या, गहूं, जुने साळीचे तांदुळ ह्यांचें अन्न, गाईचें दूध, तूप व दहीं, हंसोदक व मुगाचें कट हे पदार्थ पारद भक्षणाराला हितकारक आहेत.

अभ्यङ्गं मलिने योज्यं तैलैर्नारायणादिभिः ।

अबला शीततोयेन मस्तके परिषेचयेत् ॥ १ ॥
तृष्णायां नारिकेलाम्बु मुद्गयूषं सशर्करम् ।
द्राक्षादाडिमखर्जूरकदलीनां फलं भजेत् ॥ २ ॥
बृहतीबिल्वकूष्माण्डं वंशाग्रं कारवेल्लकम् ।
माषान्मसूरनिष्पावं कुलत्थाँल्लवणं तिलान् ॥ ३ ॥
लंघनोद्वर्तनं स्नानं ताम्रभाण्डे सुरासवम् ।
अनूपमांसं धान्याम्लं भोजनं कदलीदले ॥ ४ ॥
कांस्यके गुरु विष्टम्भि तीक्ष्णं चोष्णं भृशं तथा ।
अपथ्यं सूतराजस्य पुरा प्रोक्तं महर्षिभिः ॥ ५ ॥

अंगाला लावण्याकरितां नारायणतेल घ्यावें. स्त्रीसमागम करावा; मस्तकावर थंड पाणी घ्यावें. तहान लागली असतां नारळाचें पाणी किंवा मुगाचा यूष साखर घालून प्यावा. द्राक्षें, डाळिंब, खजूर व केळीं हीं फळें खावीं. डोरली, बेलफळ, कोहळा, कळकाचे कोंब, कारलीं, उडदाचें अन्न, मसूरा, पावटे, हुलगे, मीठ, तीळ, लंघन, अंगाला उटी लावणें, स्नान, तांब्याच्या भांड्यांतून मद्य पिणें, किंवा आसव प्राशन करणें, अनूप जातीचें मांस, कांजी, केळीच्या पानावर जेवणें, कांशाच्या भांड्यांत जेवणें, जड, अवष्टंभक, तीक्ष्ण व अतिशय उष्ण पदार्थ खाणें, हें सर्व पाऱ्याचें सेवन करणाराला अपथ्यकारक आहे.

कूष्माण्डं कर्कटी कोलं कलिङ्गं करमर्दकम् ।
करीरं चेति षट् कादीन् रसभुग्वर्जयेज्जनः ॥ ६ ॥

कोहाळा, काकडी, कोल, कलिंगडें, करवंद व करीर ह्या सहा ककारादि पदार्थांचें सेवन पारद भक्षणारानें करूं नये.

गंधक.

चतुर्धा गन्धकः प्रोक्तो रक्तः पीतः सितोऽसितः ।
रक्तो हेमक्रियासूक्तः पीतश्चैव रसायने ।
व्रणादिलेपने श्वेतः श्रेष्ठः कृष्णः सुदुर्लभः ॥ १ ॥

गंधक तांबडा, पिवळा, पांढरा व काळा असा चार प्रकारचा आहे. तांबडा गंधक सुवर्णक्रियेंत उपयोगी म्हणून सांगितला आहे. पिवळा गंधक रसायनकर्मांत व पांढरा जखमांच्या लेपनाच्या कामीं उपयोगी असतो, व काळा श्रेष्ठ असून दुर्मिळ आहे.

सदुग्धभाण्डस्य पटस्थितोऽयं शुद्धो भवेत्कूर्मपुटेन गन्धः ।
आभ्यां कृता कज्जलिकाऽनुपानैः सर्वामयघ्नी रसगन्धकाभ्याम् २

एका भांड्यांत दूध घालून त्याजवर एक फडकें झांकावें व त्या फडक्यावर गंधक ठेवून त्या भांड्याचे कांठ खळग्याच्या कांठाबरोबर येतील अशा बेतानें तें भांडें एका खळग्यांत ठेवावें, व त्यावर एक परळ झांकावा. तो अशा बेतानें झाकावा कीं, गंधकाला त्याचें बूड चिकटून राहील. नंतर त्या परळाच्या कांठाभोंवतीं मातीनें संधिलेप करून त्यावर गोवऱ्यांचा अग्नि करावा. ह्याला कूर्मपुट म्हणतात. ह्या पुटानें गंधक पातळ होऊन दुधांत गळेल, तो काढून घ्यावा. तो शुद्ध झालेला असतो. तो शुद्ध गंधक व शुद्ध पारा ह्या दोहोंची कज्जली करावी. ती अनुपानपरत्वें सर्वरोगनाशक असते.

गन्धकः कटुकस्तिक्तो वीर्योष्णस्तुवरः सरः ।
पित्तलः कटुकः पाके कण्डूविसर्पजन्तुजित् ॥ १ ॥
हन्ति कुष्ठक्षयप्लीहकफवातान्रसायनम् ।

गंधक हा गुणानें तिखट, कडू, तुरट, उष्णवीर्य, सारक, पित्तकारक, विपाककाळीं तिखट व कंडू, विसर्प व जंतु ह्यांचा नाश करणारा आहे. तसेंच हा शुद्ध गंधक, कुष्ठ, क्षय, पांथरी, कफ व वात ह्यांचा नाशक असून रसायन आहे.

अशोधितो गन्ध एष कुष्ठसंतापकारकः ।
शुक्रौजःक्षयदौर्बल्यं करोति च रुचिप्रणुत् ॥ २ ॥

अशुद्ध गंधक कुष्ठ व दाह कारणार असून शुक्र व ओज ह्यांचा क्षय करणारा, शक्तीचा ऱ्हास करणारा व तोंडाची चव घालविणारा आहे.

हिंगूळ.

दरदस्त्रिविधः प्रोक्तश्चर्मारः शुकतुण्डकः ।
हंसपादस्तृतीयस्तु गुणवानुत्तरोत्तरम् ॥ १ ॥
चर्मारस्त्वतिरक्तः स्यात्किंचित्पीतः शुकास्यकः ।
श्वेतरेखः प्रवालाभो हंसपादः स उच्यते ॥ २ ॥

चर्मार, शुकतुंड व हंसपाद असा तीन प्रकारचा हिंगूळ आहे. हे उत्तरोत्तर गुणांनीं अधिक आहेत. चर्मार नांवाचा हिंगूळ अति-

श्य रक्तवर्ण असतो. शुकतुंड नांवाचा हिंगूळ किंचित् पिवळट रंगाचा असतो, आणि हंसपाद नांवाचा हिंगूळ पांढऱ्या रेषांनीं युक्त व पोंवळ्यासारख्या रंगाचा असतो.

अशुद्धो दरदः कुर्यादान्ध्यं क्षैण्यं क्लमं भ्रमम् ।
मोहं मेहं च संशोध्यः क्रमाद्वैद्यैस्तु हिंगुलः ॥ ३ ॥

अशुद्ध हिंगूळ दृष्टिनाश, क्षीणता, थकवा, घेरी, मोह व प्रमेह हे विकार करतो. ह्यासाठीं क्रमानें त्याचें शोधन करावें.

मेषीक्षीरेण दरदमम्लवर्गैश्च भावितम् ।
सप्तवारं प्रयत्नेन शुद्धिमायाति निश्चितम् ॥ ४ ॥

हिंगूळ प्रथम मेंढीच्या दुधांत सात दिवस खलून नंतर आम्लवर्गामध्यें सात दिवस खलावा, म्हणजे निश्चयानें शुद्ध होतो.

हिंगुळाचें भस्म.

वल्लमात्रं तालपिष्टं शरावे स्थापयेत्ततः ।
तस्मिन्कर्षसमं देयं शकलं दरदस्य च ॥ १ ॥
पूरयेदार्द्रकरसं द्विगुणं तत्र बुद्धिमान् ।
पुष्पाणि माषमात्राणि परितः स्थापयेत्ततः ॥ २ ॥
शरावसंपुटं दत्वा चुल्ल्यां मध्याग्निना पचेत् ।
घटिकात्रयपर्यन्तं तत उत्तार्य पेषयेत् ॥ ३ ॥
ताम्बूले गुञ्जमात्रं तु देयं पुष्टिकरं मतम् ।
पाण्डौ क्षये च शूले च सर्वरोगेषु योजयेत् ॥ ४ ॥

शुद्ध हरताळ एक वाल घेऊन एका परळांत पसरावा. त्यावर शुद्ध हिंगुळाचा तुकडा ठेवून त्यावर दोन तोळे आल्याचा रस घालावा व त्याच्या सभोंवार लवंगा एक मासाभार लावाव्या व त्यावर दुसरा परळ घालून संधिलेप करून चुलीवर ठेवून तीन घटकांपर्यंत मध्यमाग्नीनें पचन करावें. नंतर चुलीवरून उतरून खलून ठेवावें व विड्यांतून एक गुंजभर द्यावें. म्हणजे तें शरीर पुष्ट करितें. तसेंच पांडुरोग, क्षय, शूल वगैरे सर्व रोगांवरही तें योजावें.

रत्नांचें शोधन व मारण.

हिरा.

व्याघ्रीकन्दगतं वज्रं दोलायंत्रेण पाचयेत् ।
सप्ताहं कोद्रवक्वाथैः कुलिशं विमलं भवेत् ॥ १ ॥

हिरा वाघाटीच्या किंवा कर्टोलीच्या गड्डयामध्यें घालून हारिकाच्या काढ्यांत दोलायंत्रानें सात दिवस शिजवावा, म्हणजे तो शुद्ध होतो.

हिऱ्याचें भस्म.

त्रिवर्षारूढकार्पासीमूलमादाय पेषयेत् ।
त्रिवर्षनागवल्या वा निजद्रावैः प्रपेषयेत् ॥ १ ॥
तद्गोलके क्षिपेद्वज्रं रुद्ध्वा गजपुटे पचेत्
एवं सप्तपुटैर्नूनं कुलिशं मृतिमृच्छति ॥ २ ॥

तीन वर्षांच्या कापशीच्या झाडाचें मूळ आणून तें कापशीच्याच पानाच्या रसांत वाटून त्याचा गोळा करावा व त्या गोळ्यांत हिरा ठेवावा. किंवा तीन वर्षांच्या नागवेलीच्या वेलाचें मूळ आणून तें त्याच वेलाच्या पानाच्या रसांत वाटून गोळा करून त्या गोळ्यांत हिरा ठेवावा, आणि एक गजपुट द्यावें. ह्याप्रमाणें सात गजपुटें द्यावीं म्हणजे हिऱ्याचें निश्चयानें भस्म होतें.

त्रिःसप्तकृत्वः संतप्तं खरमूत्रेण सेचितम् ।
मत्कुणैस्तालकं पिष्ट्वा तद्गोले कुलिशं क्षिपेत् ॥ १ ॥
प्रध्मातं वाजिमूत्रेण सिक्तं पूर्वक्रमेण वै ।
भस्मीभवति तद्वज्रं शङ्खशीतांशुसुन्दरम् ॥ २ ॥

हिरा तापवून लाल करावा व त्याजवर गाढवाचें मूत शिंपडावें. ह्याप्रमाणें एकवीस वेळ करावें. नंतर शुद्ध हरताळ ढेकणाशीं खलून त्याचा गोळा करून त्यांत तो हिरा ठेवून तो गोळा निखाऱ्यावर ठेवून फुंकावें व पूर्वीप्रमाणें घोडयाचें मूत त्या गोळ्यावर शिंपून तो विझवावा; ह्याप्रमाणें एकवीस वेळ करावें. म्हणजे हिऱ्याचें शंखाप्रमाणें किंवा चंद्राप्रमाणें शुभ्रवर्ण भस्म होतें.

तिसरा प्रकार.

हिंगुसैन्धवसंयुक्तक्वाथे कौलत्थजे क्षिपेत् ।
तप्तं तप्तं पुनर्वज्रं भूयाच्चूर्णं त्रिसप्तधा ॥ १ ॥
मण्डूकं कांस्यजे पात्रे निगृह्य स्थापयेत्सुधीः ।
स भीतो मूत्रयेत्तत्र तन्मूत्रे वज्रमावपेत् ।
तप्तं तप्तं च बहुधा वज्रस्यैवं मृतिर्भवेत् ॥ २ ॥

हुलग्याच्या काढ्यांत हिंग व सैंधव घालून त्यांत हिरा तापवून

बुडवावा. ह्याप्रमाणें एकवीस वेळ करावें, म्हणजे हिऱ्याचें चूर्ण होतें. नंतर एक बेडूक धरून तो कांशाच्या भांड्यांत ठेवावा, म्हणजे तो भीतीनें त्या भांड्यांत मुतेल. मग हिरा तापवून पुष्कळ वेळ त्यांत बुडवावा, म्हणजे हिऱ्याचें भस्म होतें.

वज्रं समीरकफपित्तगदान्निहन्ति वज्रोपमं च कुरुते वपुरुत्तमाश्रि ।
शोषक्षयभ्रमभगंदरमेहमेदःपाण्डूदरश्वयथुहारि च षण्ढषाण्ढ्यम् ॥

हिरा वात, पित्त, कफ ह्या दोषांपासून होणाऱ्या रोगांचा नाश करितो. देहाला वज्राप्रमाणें बळकट करून कांति देतो. राजयक्ष्मा, क्षय, भ्रम, भगंदर, प्रमेह, मेदोरोग, पांडुरोग, उदर व सूज ह्यांचा नाश करतो, आणि नपुंसकाचें नपुंसकत्व दूर करतो.

वैक्रांत.

वैक्रान्तं वज्रवच्छोध्यं नीलं वा लोहितं तथा ।
हयमूत्रेण सिञ्चेत तप्तं तप्तं त्रिसप्तधा ॥ १ ॥
ततस्तु मेषदुग्ध्यास्तु पञ्चाङ्गे गोलके क्षिपेत् ।
पुटेन्मूषापुटे रुद्ध्वा कुर्यादेवं च सप्तधा ।
वैक्रान्तं भस्मतां याति वज्रस्थाने नियोजयेत् ॥ २ ॥

तांबडा किंवा निळा वैक्रांत मणी हिऱ्याप्रमाणेंच शुद्ध करावा. वैक्रांत तापवून त्याजवर घोड्याचें मूत्र शिंपडावें. ह्याप्रमाणें चौदा वेळ करावें. नंतर मेढशिंगीच्या पंचांगांची लुगदी करून त्यांत तो वैक्रांत घालून मुशीमध्यें ठेवून तोंड बंद करून पुट द्यावें. ह्याप्रमाणें सात पुटें द्यावीं, म्हणजे वैक्रांत मण्याचें भस्म होतें. तें हिऱ्याच्या भस्माच्या ऐवजीं योजावें.

वातपित्तानिलध्वंसि षड्रसं देहदार्ढ्यकृत् ।
पाण्डूदरज्वरश्वासकासयक्ष्मप्रमेहनुत् ॥ १ ॥

वैक्रांतमणी गुणानें वात, पित्त, कफ ह्या दोषांचा नाश करणारा, साही रसांनीं युक्त, देहाला दृढत्व आणणारा व पांडुरोग, उदर, ज्वर, श्वास, खोकला, क्षय व प्रमेह ह्यांचा नाशक आहे.

बाकीच्या रत्नांचें शोधन.

शुध्यत्यम्लेन माणिक्यं जयन्त्या मौक्तिकं शुचि ।
विद्रुमं क्षारवर्गेण तार्क्ष्यं गोदुग्धतः शुचि ॥ १ ॥

पुष्परागं च कौलत्थकाथयोगेन शुध्यति ।
रोचनाभिश्च गोमेदं वैडूर्यं त्रिफलाजलैः ।
नीलं नीलीरसैर्वज्रं विना शुध्यति दोलया ॥ २ ॥

लिंबाच्या रसांत किंवा कोणत्याही आम्लरसामध्यें माणिक शुद्ध होतें. टाकळीच्या रसामध्यें मोतीं शुद्ध होतें. पोवळें क्षारवर्गामध्यें व पाच रत्न गाईच्या दुधांत शुद्ध होतें. पुष्पराग रत्न हुलग्याच्या काढयांत शुद्ध होतें. गोरोचनानें गोमेद व त्रिफळयाच्या काढ्यामध्यें वैडुर्यमणी शुद्ध होतो. निळीच्या रसामध्यें नीलमणी शुद्ध होतो. हिऱ्यावांचून हीं सर्व रत्नें त्या त्या रसांमध्यें दोलायंत्रानें शुद्ध होतात.

स्वेदयेद्दोलिकायंत्रे जयन्त्याः स्वरसेन च ।
मणिमुक्ताप्रवालानि यामैकं शोधनं भवेत् ॥ १ ॥

जयंतीच्या रसामध्यें दोलायंत्रानें एक प्रहरभर स्वेदन केलें असतां सर्व रत्नें, मोतीं व पोवळीं ह्यांचें शोधन होतें.

रत्नांचें मारण.

लकुचद्रावसंपिष्टैः शिलातालकगन्धकैः ।
वज्रं विनाऽन्यरत्नानि म्रियन्तेऽष्टपुटैः खलु ॥ १ ॥

चुक्याच्या रसांत शुद्ध मनशीळ, शुद्ध हरताळ व शुद्ध गंधक ह्यांचा खल करून त्याची लुगदी करून त्यांत हिऱ्यावांचून कोणतेंही रत्न शुद्ध करून घालून पुट द्यावें. अशीं आठ पुटें दिल्यानें त्याचें भस्म होतें. ह्याप्रमाणें हिऱ्यावांचून सर्व रत्नांचें भस्म होतें.

दुसरा प्रकार.

कुमार्या तण्डुलीयेन स्तन्येन च निषेचयेत् ।
प्रत्येकं सप्तवेलं च तप्ततप्तानि कृत्स्नशः ॥ १ ॥
मौक्तिकानि प्रवालानि तथा रत्नान्यशेषतः ।
क्षणाद्विविधवर्णानि म्रियन्ते नात्र संशयः ॥ २ ॥
उक्तमाक्षिकवन्मुक्ताप्रवालानि च मारयेत् ।
वज्रवत्सर्वरत्नानि शोधयेन्मारयेत्तथा ॥ ३ ॥

मोतीं, पोवळें वगैरे सर्व रत्नें अग्नीमध्यें तापवून अनुक्रमें कोरफडीचा रस, तांदुळजाचा रस, व स्त्रीचें दूध ह्या प्रत्येकामध्यें सात सात वेळ बुडवावीं किंवा त्यांजवर अनुक्रमें सात सात वेळ ह्यांचें

सिंचन करावें. म्हणजे नानाप्रकारच्या रंगांचीं रत्नें क्षणांत भस्मरूप होतात, ह्यांत संशय नाहीं. सुवर्णमाक्षिकाच्या मारणाच्या रीतीनें मोतीं व पोवळें ह्यांचें मारण करावें. आणि हिऱ्याप्रमाणें सर्व रत्नांचें शोधन व मारण करावें.

रत्नांचे सामान्य गुण.

रत्नानि चोपरत्नानि चक्षुष्याणि सराणि च ।
शीतलानि कषायाणि मधुराणि शुभानि च ॥ १॥
वृष्याणि मङ्गलान्यायुस्तुष्टिपुष्टिकराणि च ।
ग्रहालक्ष्मीविषक्षैण्यपापसंतापनानि च ॥ २ ॥
यक्ष्मपाण्डुप्रमेहार्शःकासश्वासभगंदरान् ।
ज्वरविसर्पकुष्ठानि शूलकृच्छ्रव्रणामयान् ।
घ्नन्ति पुष्टिं यशः कान्ति पुण्यानि च नृणां भृशम् ॥ ३ ॥

सर्व प्रकारचीं रत्नें व उपरत्नें डोळ्याला हितकारक, सारक, थंड, तुरट, मधुर, कल्याणकारक, वृष्य, मंगलकारक व आयुष्य, संतोष, शरीराला पुष्टता ह्यांना देणारीं, ग्रहपीडा, दारिद्र्य, विषबाधा क्षीणता व पाप ह्यांना दूर करणारीं, क्षय, पांडुरोग, प्रमेह, मूळव्याध, कास श्वास, भगंदर, ज्वर, विसर्प, कुष्ठ, शूल, मूत्रकृच्छ्र, व व्रण हे रोग बरे करतात आणि पुष्टि, यश, कान्ति, व पुण्य ह्यांची प्राप्ति करून देतात.

शिलाजित.

निदाघे घर्मसंतप्ता धातुसारं धराधरः ।
निर्यासवत्प्रमुञ्चन्ति तच्छिलाजतु कीर्त्यते ॥ १ ॥

ज्या पर्वतांतून सुवर्णादि धातु निघतात, असे पर्वत उन्हाळ्यामध्यें त्या सुवर्णादि धातूंच्या सत्वाचा डिंकाप्रमाणें पाझर सोडतात. त्याला शिलाजतु असें म्हणतात.

शिलाजिताचें शोधन.

अथोष्णकाले रवितापयुक्ते व्यभ्रे निवाते समभूमिभागे ।
चत्वारि पात्राण्यसितायसानि न्यस्यातपे दत्तमनोवधानः ॥ १ ॥
शिलाजतु श्रेष्ठमवाप्य पात्रे प्रक्षिप्य तोयं द्विगुणं ततोऽस्मात् ।
उष्णं तदर्धं शृतमत्र दत्वा विशोधयेत्तन्मृदितं यथावत् ॥ २ ॥
ततस्तु यत्कृष्णमुपैति चोर्ध्वं संतानिकावद्रविरश्मियोगात् ।
त्रात्तदन्यत्र ततो निदध्यात्तस्यान्तरे चोष्णजलं निधाय ॥ ३ ॥

ततश्च तस्मादपरत्र पात्रे तस्माच्च पात्रादपरत्र तत्र ।
पुनस्ततोऽन्यत्र निधाय कृष्णं यत्संहृतं तत्पुनराहरेच्च ॥ ४ ॥
यदा विशुद्धं जलमच्छमूर्ध्वं प्रसन्नभावान्मलमेत्यधस्तात् ।
तदा त्यजेत्तत्सलिलं मलं च शिलाजतु स्याज्जलशुद्धमेवम् ॥ ५ ॥

उन्हाळ्यामध्यें आकाशांत ढग नसतील अशा वेळीं निर्वात ठिकाणीं सपाट जमिनीवर उन्हामध्यें लोखंडाचीं चार भांडीं ठेवावीं, व त्यांपैकीं एका भांड्यांत उत्तम प्रकारचा शिलाजित घालून त्यांत त्याच्या दुप्पट निम्में थंड व निम्में आधणाचें पाणी ओतावें व हातानें मर्दन करावें. सर्व शिलाजित पाण्यांत मिसळल्यावर कांहीं वेळ स्वस्थ रहावें, म्हणजे उन्हाच्या तापानें त्यावर काळा सायी-सारखा थर येतो. तो काढून दुसऱ्या पात्रांत घ्यावा व पुनः त्यांत ऊन पाणी घालावें, व पूर्ववत मर्दन करून स्वस्थ राहावें. म्हणजे पुनः त्याजवर साईसारखा थर येईल. तो काढून तिसऱ्या पात्रांत घेऊन पुनः पूर्ववत् ऊन पाणी घालून मर्दन वगैरे करून चवथ्या पात्रांत काढून घ्यावें. ह्याप्रमाणें केल्यानें वर स्वच्छ पाणी व तळाला मळ राहील. तो मळ व तें स्वच्छ पाणी टाकून देऊन त्यावर आ-लेला जलशुद्ध शिलाजित तेवढा काढून घ्यावा.

शिलाजिताची परीक्षा.

वह्नौ क्षिप्तं तु निर्धूमं यत्तु लिंगोपमं भवेत् ।
तृणाग्रेणाम्भसि क्षिप्तमधो गलति तन्तुवत् ।
गोमूत्रगन्धि मलिनं शुद्धं ज्ञेयं शिलाजतु ॥ १ ॥

जो शिलाजित अग्नीवर टाकला असतां त्यांतून धूर निघत नाहीं; लिंगाचा आकार धारण करतो; गवताच्या काडीनें स्वच्छ पाण्यांत सोडला असतां सुताप्रमाणें तारा पाण्याच्या तळाकडे सोडतो, ज्याला गोमूत्राचा वास येतो व मळकट दिसतो, तो शिलाजित शुद्ध समजावा.

शिलाजतु रसायनं कटुकतिक्तमुष्णं कृमि-
क्षयोदरभिदश्मरीश्वयथुपाण्डुकण्डूहरम् ।
प्रमेहवमिकुष्ठजित्कफसमीरदुर्नामहृ-
द्ब्लीपलितमानसानपि सकासकृच्छ्रप्रणुत् ॥ २ ॥

शिलाजित गुणानें रसायन, तिखट, कडू, उष्ण व कृमि, क्षय, उदर, मूतखडा, सूज, पांडुरोग, कंडू, प्रमेह, ओकारी, कुष्ठ, कफ, वात, मूळव्याध, वली, पलित, मानसिक रोग, खोकला व मूत्रकृच्छ्र ह्या रोगांचा नाश करतो.

अशुद्धं दाहमूर्छायभ्रमपित्तास्रशोषताः ।
शिलाजतु प्रकुरुते मान्द्यमग्नेश्च विड्ग्रहम् ॥ ३ ॥

अशुद्ध शिलाजित–दाह, मूर्च्छा, भ्रम, रक्तपित्त, शोष, अग्निमांद्य व मलबद्धता हे विकार करतो.

शेंदूर.

सिन्दूरं निम्बुकद्रावैः पिष्ट्वा वह्नौ विशोषयेत् ।
ततस्तण्डुलतोयेन तथाभूतं विशुध्यति ॥ १ ॥

शेंदूर लिंबाच्या रसांत खलून अग्नीवर कोरडा करावा. नंतर तांदुळाच्या धुवणांत खलून पूर्ववत् अग्नीवर ठेवून कोरडा करावा, म्हणजे शुद्ध होतो.

सिन्दूरमुक्तं वीसर्पकुष्ठकंडूविषापहम् ।
भग्नसंधानजननं व्रणशोधनरोपणम् ॥ २ ॥

शेंदूर विसर्प, कुष्ठ, कंडू व विष ह्यांचा नाश करतो, मोडलेल्या हाडाला सांधतो, व व्रणाचें शोधन व रोपण करतो.

समुद्रफेस.

समुद्रफेनश्चक्षुष्यो लेखनः शीतलः सरः ।
कर्णस्रावरुजागूथहरः पाचनदीपनः ॥ १ ॥
अशुद्धः स करोत्यङ्गभङ्गं तस्माद्विशोधयेत् ।

समुद्रफेस डोळ्याला हितावह, लेखन, थंड, सारक व कानांतील स्राव, शूळ, व मळ ह्यांचा नाशक, पाचक व अग्निदीपक आहे. अशुद्ध समुद्रफेस अंगभंग करतो, ह्यासाठीं त्याचें शोधन करावें.

समुद्रफेनः संपिष्टो निम्बुतोयेन शुध्यति ॥ २ ॥

समुद्रफेस लिंबाच्या रसांत खलला असतां शुद्ध होतो.

कान.

गैरकं किंचिदाज्येन भृष्टं शुद्धं प्रजायते ।

सोनकाव थोडी तुपांत भाजून घेतली असतां शुद्ध होते.

कायकान्तिवयःस्थैर्यबलौजोवृद्धिकारकम् ॥ १ ॥

प्रमेहकुष्ठपिटकासर्वव्रणविषापहम् ।
स्वर्णगैरिकमन्यत्तु श्रेष्ठं सामान्यगैरिकात् ॥ २ ॥

सोनकाव शरीराची कांति, आयुष्याची स्थिरता, शक्ति व ओज ह्यांची वृद्धि करते. प्रमेह, कुष्ठ, पुटकुळ्या, सर्व प्रकारचे व्रण, व विष ह्यांची नाशक आहे. ही सामान्य कावेहून श्रेष्ठ आहे.

एरंड्यांचें शोधन.

गन्धर्वहस्तबीजानां नारिकेलोदकेन च ।
याममात्राद्भवेच्छुद्धिर्दन्तीबीजं पचेद्यथा ॥ १ ॥

जयपाळाच्या बियांप्रमाणें एरंडाच्या बियांवरील टरफलें काढून त्या बिया नारळाच्या पाण्यांत एक प्रहरभर शिजवाव्या, म्हणजे शुद्ध होतात.

मिऱ्यांची शुद्धि.

मरीचं चाम्लतक्रेण भावितं घटिकात्रयम् ।
मरीचं निस्तुषं कृत्वा शुद्धं भवति निश्चितम् ॥ १ ॥

मिरीं आंबट ताकांत तीन घटका भिजत घालून त्यांजवरील सालपटें काढून टाकावीं, म्हणजे तीं शुद्ध होतात.

पिंपळीची शुद्धि.

वैदेही चित्रकरसैरातपे भावयेत् पुटे ।
सम्यक् शुद्धा भवत्यत्र रसयोगेषु योजयेत् ॥ १ ॥

पिंपळी चित्रकाच्या रसांत भिजत घालून उन्हांत ठेवावी. ह्याप्रमाणें एक पुट दिल्यानें पिंपळी शुद्ध होते. ती रसायनामध्यें योजावी.

हिंगाची शुद्धि.

पद्मपत्ररसे याममातपे भावितं विदुः ।
रामठं शुद्धिमाप्नोति रसयोगेषु योजयेत् ॥ १ ॥

हिंगाला कमळाच्या पानाच्या रसांत एक प्रहरभर खललें असतां तो शुद्ध होतो. तो रसायनांत योजावा.

शंख.

शङ्खः क्षारो हिमो ग्राही ग्रहणीरेकनाशनः ।
नेत्रपुष्पहरो वर्ण्यस्तारुण्यपिटकाप्रणुत् ।
अशुद्धो गुणदो नैष शुद्धोऽम्लैः स गुणप्रदः ॥ १ ॥

दक्षिणावर्तशङ्खस्तु त्रिदोषघ्नः शुचिर्निधिः ।
ग्रहालक्ष्मीक्षयक्ष्वेडक्षामतिक्तक्षयाक्षमी ॥ २ ॥

शंखभस्म थंड व ग्राहक असून संग्रहणीसंबंधीं रेच व डोळ्यांतील फूल ह्यांचा नाश करितें. अंगाचा वर्ण चांगला करितें व तारुण्य-पीटिकांचा नाश करितें. अशुद्ध शंखाचें भस्म गुण देत नाहीं. अम्लरसांत शंख शुद्ध करून भस्म केलें असतां तें गुणदायक होतें. दक्षिणावर्त शंख त्रिदोषनाशक, पवित्र व लक्ष्मीदायक असतो. आणि ग्रहबाधा, दारिद्र्य, क्षय कर्णक्ष्वेड ह्यांचा नाश करतो व क्षयाचाही नाश करतो. हा रुचीला कडवट आहे.

दानव्याचें व मोराच्या पिसाचें सत्व.

ताम्रभूभवभूनागांस्त्रिंशतिपिष्यान्समेन तान् ।
पुरलाक्षोर्णनाभिः स्यान्मत्स्यपिण्याकटङ्कणैः ॥ १ ॥
द्रवमेतैश्च संयोज्य मर्दयित्वा धमेत्सुखम् ।
मुंचन्ति ताम्रवत्सत्त्वं तत्पक्षा अपि बर्हिणाम् ॥ २ ॥

तांब्याच्या खाणींत उत्पन्न झालेलीं दानवीं आणून तीं हळदीच्या चूर्णांत घोळून नंतर गुग्गुळ, लाख, लोकर, मासे, पेंड व टाकणखार ह्यांच्या द्रवामध्यें खलून मुशींत घालून अग्नीवर ठेवून फुंकावें. म्हणजे तांब्याप्रमाणें सत्व उत्पन्न होतें. ह्याच रीतीनें मोरांच्या पिसापासूनही सत्व उत्पन्न होतें.

भूनागसत्वं शिशिरं सर्वकुष्ठव्रणप्रणुत् ।
तत्सृष्टजलपानेन स्थावरं चापि जङ्गमम् ॥ ३ ॥
विषं नश्यति तत्पात्रगतः सूतोऽग्नितो दृढः ।
एवं मयूरपक्षोत्थसत्त्वस्यापि गुणो मतः ॥ ४ ॥

दानव्याचें सत्व थंड व सर्व प्रकारचीं कुष्ठ व व्रण ह्यांचें नाशक आहे. दानव्यापासून काढलेल्या तांब्याचें पात्र किंवा अंगठी करून त्या पात्रांतून किंवा ती अंगठी बुडविलेलें पाणी प्यालें असतां स्थावर व जंगम विषांचा नाश होतो. आणि त्या सत्वाच्या पात्रांत पारा घालून तो अग्नीवर ठेवला असतां त्याची गोळी होते. ह्याच-प्रमाणें मोराच्या पिसापासून काढलेल्या सत्वाचेही गुण आहेत, असें मत आहे.

कापराचें शोधन.

गोदुग्धे त्रिफलाकाथे भृङ्गद्रावे समांशके ।
मर्दयेद्यामपमात्रं तु कर्पूरं शुद्धिमाप्नुयात् ॥ १ ॥

गाईच्या दुधांत, त्रिफळ्याच्या काढ्यांत व माक्याच्या रसांत कापूर एक प्रहरभर खलावा, म्हणजे शुद्ध होतो.

टाकणखाराचें शोधन.

अशुद्धष्टङ्कणो वान्तिभ्रान्तिकारी प्रयोजितः ।
अतस्तं शोधयेदेवं गोमयेनावृतः शुचिः ॥ १ ॥

अशुद्ध टाकणखार सेवन केला असतां वांति व भ्रांति ह्यांना उत्पन्न करतो. ह्यासाठीं त्याचें शोधन करावें. टाकणखार आणून त्याला गाईच्या शेणानें लिंपून कांहीं वेळ ठेवावें, म्हणजे तो शुद्ध होतो.

टङ्कणो वह्निकृत्स्वर्णरूप्ययोः शोधनः सरः ।
विषदोषहरो हृद्यो वातश्लेष्मविकारनुत् ॥ २ ॥

टाकणखार अग्निदीपक, सोनें व रुपें ह्यांचें शोधन करणारा, सारक, विषनाशक, हृदयाला हितावह व वातकफनाशक आहे.

विषें.

कालकूटो वत्सनाभः शृङ्गकश्च प्रदीपनः ।
हालाहलो ब्रह्मपुत्रो हरिद्रः सक्तुकस्तथा ।
सौराष्ट्रिक इति प्रोक्ता विषभेदा अमी नव ॥ १ ॥
ब्राह्मणः पाण्डुरस्तेषु क्षत्रियो रक्तवर्णकः ।
वैश्यः पीतप्रभः शूद्रः कृष्णाभः स तु निन्दितः ॥ २ ॥

कालकूट, बचनाग, शृंगक, प्रदीपन, हालाहल, ब्रह्मपुत्र, हारिद्र, सक्तुक, व सौराष्ट्रक हे विषाचे नऊ भेद आहेत. त्यांत जीं विषें पांढरीं असतात, त्यांना ब्राह्मण ही संज्ञा आहे. जीं तांबडीं असतात त्यांना क्षत्रिय असें म्हणतात. जीं पिवळीं असतात, त्यांना वैश्य म्हणतात; आणि जीं काळीं असतात, त्यांना शूद्र असें म्हणतात. तीं निंद्य आहेत.

रसायने विषं विप्रं देहपुष्टौ तु बाहुजम् ।
कुष्ठनाशे प्रयुञ्जीत वैश्यं शूद्रं तु धातुषु ॥ ३ ॥
विषं प्राणहरं युक्त्या प्राणकृच्च रसायनम् ।

योगवाहि परं श्लेष्मवातहृत्संनिपातजित् ॥ ४ ॥

ब्राह्मण जातीचें विष रसायनकर्मांत घ्यावें. शरीर पुष्ट होण्याकरितां क्षत्रिय जातीचें विष घ्यावें. कुष्ठनाश होण्याकरितां वैश्य जातीचें विष घ्यावें, आणि शूद्र विष धातुकर्मांत योजावें. विष हें प्राणहारक आहे. तथापि युक्तीनें योजिलें असतां प्राणदायक व रसायन आहे. योगवाही आहे. उत्कृष्ट तऱ्हेचें वातपित्तनाशक व सन्निपाताला जिंकणारें आहे.

विषाचें शोधन.

विषं तु खण्डशः कृत्वा वस्त्रखण्डेन बन्धयेत् ।
गोमूत्रमध्ये निक्षिप्य स्थापयेदातपे त्र्यहम् ॥ १ ॥
गोमूत्रं तु प्रदातव्यं नूतनं प्रत्यहं बुधैः ।
त्र्यहेऽतीते तदुद्धृत्य शोषयेन्मृदु पेषयेत् ।
शुद्धत्येवं विषं सेव्यं योग्यं भवति चार्तिजित् ॥ २ ॥

विषाचे तुकडे करून एका फडक्यांत बांधून गोमूत्रांत बुडवून तीन दिवस उन्हांत ठेवावें. प्रत्येक दिवशीं शिळें गोमूत्र काढून टाकून नवें घालावें. ह्याप्रमाणें तीन दिवस केल्यावर तें गोमूत्रांतून काढून उन्हांत वाळवावें व थोडें खलावें. तें चांगलें वाळलें म्हणजे रोगनाशाविषयीं समर्थ होतें. तें सेवन करावें.

दुसरा प्रकार.

खण्डीकृत्य विषं वस्त्रपरिबद्धं तु दोलया ।
अजापयसि संस्विन्नं यामतः शुद्धिमाप्नुयात् ।
अजादुग्धाभावतस्तु गव्यक्षीरेण शोधयेत् ॥ १ ॥

बचनागादि विषांचे तुकडे करून ते वस्त्रांत बांधून शेळीच्या दुधांत दोलायंत्रानें एक प्रहरपर्यंत पचन करावे, म्हणजे ते शुद्ध होतात. शेळीचें दूध न मिळाल्यास गाईच्या दुधांतही शोधन करावें.

तिसरा प्रकार.

विषग्रन्थि मले न्यस्य माहिषे दृढमुद्रितम् ।
करीषाग्नौ पचेद्यामं वस्त्रपूतं विषं शुचि ॥ १ ॥

विष बांधलेली पुरचुंडी म्हशीच्या शेणांत घालून त्याचा गोळा बळकट करून तो गोवऱ्यांच्या निखाऱ्यांत एक प्रहरभर पचन

करावा. नंतर दस्त्यांतून विष काढून ध्यावें. तें शुद्ध होतें.

चवथा प्रकार.

कणशो वत्सनागं च कृत्वा बद्धा च कर्पटे ।
दोलायंत्रे जलक्षीरे प्रहराच्छुद्धिमृच्छति ॥ १ ॥

बचनागाचे बारीक बारीक कण करून ते फडक्यांत बांधून दूध व पाणी समान एकत्र करून त्यांत दोलायंत्रानें एक प्रहरभर पचन करावे, म्हणजे बचनागाची शुद्धि होते.

विषाचें मारण.

तुल्येन टङ्कणेनैव द्विगुणेनोषणेन च ।
विषं संयोजितं शुद्धं मृतं भवति सर्वथा ॥ १ ॥

विषाच्या बरोबरीनें टाकणखार व दुप्पट मिरीं घेऊन त्याजबरोबर खलून विषाची योजना करावी, म्हणजे तें मृत होतें.

विषाचे गुण.

विषं रसायनं बल्यं वातश्लेष्मविकारनुत् ।
कटुतिक्तकषायं च मदकारि सुखप्रदम् ॥ १ ॥
व्यवायि शीतनुद्दाहि कुष्ठवातास्रनाशनम् ।
अग्निमान्द्यश्वासकासप्लीहोदरभगंदरान् ।
गुल्मपाण्डुव्रणार्शांसि नाशयेत्क्रमशो नृणाम् ॥२ ॥

विष हें रसायन, बलकारक, वातकफविकारनाशक, तिखट, कडू, तुरट, मदकारक, सुखदायक, व्यवायि, शैत्यनाशक, दाहकारक, कुष्ठ व वातरक्त ह्यांचें नाशक, तसेंच अग्निमांद्य, श्वास, खोकला, पांथरी, उदर, भगंदर, गुल्म, पांडुरोग, व्रण, मूळव्याध, ह्या सर्वांचा अनुक्रमें नाश करितें.

सोमल.

गौरीपाषाणकः प्रोक्तो द्विविधः श्वेतरक्तकः ।
श्वेतः शङ्खसदृग्रक्तो दाडिमाभः प्रकीर्तितः ॥ १ ॥
श्वेतः कृत्रिमकः प्रोक्तो रक्तः पर्वतसंभवः ।
विषरूपधरौ तौ हि रसकर्मणि पूजितौ ॥ २ ॥

गौरीपाषाण पांढरा व तांबडा असा दोन प्रकारचा आहे. पांढरा शंखाप्रमाणें पांढरा असतो, आणि तांबडा डाळिंबांतील दाण्या-

प्रमाणें असतो. पांढरा कृत्रिम आहे व तांबडा पर्वतामध्यें सांपडतो. दोन्ही विषरूप असून रसकर्मांत श्रेष्ठ आहेत.

त्यांचीं नांवें.

गौरीपाषाणकश्चान्यो विकटो रक्तचूर्णकः ।

गौरीपाषाण, विकट व रक्तचूर्ण हीं त्यांचीं नांवें आहेत.

सोमलाचे गुण.

रसबन्धकरः स्निग्धो दोषघ्नो रसवीर्यकृत् ॥ १ ॥

सोमल—पाऱ्याचें बंधन करणारा, स्निग्ध, दोषनाशक व पाऱ्याचें वीर्य वाढविणारा आहे.

सोमलाची शुद्धि.

घननादरसान्विते च मल्लः परिपाच्यः किल दोलकाह्वयन्त्रे ।

शुभवह्निरथो दिनं च मन्दः परिदेयः परिजायते स शुद्धः ॥१॥

तांदुळजाच्या रसामध्यें दोलायंत्रानें सोमलाचें मंद जाळ लावून एक दिवसभर पचन करावें. म्हणजे सोमल शुद्ध होतो.

दुसरा प्रकार.

उल्लीपाषाणसंशुद्धिर्वक्ष्यते शास्त्रसंमता ।

चूर्णीकृतं पटे बद्ध्वा शिलाक्षारोदकेन च ॥ १ ॥

दोलायन्त्रे दिनैकं तु पाचितः शुद्धिमाप्नुयात् ।

शास्त्रसंमत अशी सोमलाची शुद्धि सांगतों. सोमलाचें चूर्ण करून वस्त्रांत बांधून चुन्याच्या निवळीमध्यें दोलायंत्रानें एक दिवस पचन करावें, म्हणजे सोमलाची शुद्धि होते.

विकटं पोटलीं बद्ध्वा दोलायन्त्रेण काञ्जिके ॥ २ ॥

टङ्कणे वा गवां दुग्धे पाचयेद्घटिकाद्वयम् ।

आजमांसरसे वाऽपि शुद्धो भवति निश्चयात् ॥ ३ ॥

सोमलाची फडक्यांत पुरचुंडी बांधून कांजींत, टाकणखाराच्या पाण्यांत किंवा गाईच्या दुधांत दोलायंत्रानें दोन घटका पचन करावें, म्हणजे सोमलाची शुद्धि होते. तसेंच शेळीच्या मांसरसांत दोलायंत्रानें वरीलप्रमाणें पचन केलें असतांही सोमलाची शुद्धि होते.

उल्लीपाषाणमल्लं च केचिन्नामान्तरं विदुः ।

वाते कफे तथा शीते योजयन्ति चिकित्सकाः ॥ ४ ॥

कित्येक ह्याला उल्लीपाषाण व मल्ल अशींही नांवें देतात. वैद्य-लोक वात, कफ व थंडीचे विकार ह्यांजवर ह्यांची योजना करितात.

उपविषें.

अर्कक्षीरस्नुहीक्षीरलाङ्गलीकरवीरकाः ।
गुञ्जाहिफेनधत्तूराः सप्तोपविषजातयः ॥ १ ॥

रुईचा चीक, त्रिधारी निवडुंगाचा चीक, कळलावी, कण्हेर, गुंज, अफू व धोतरा ह्या सात उपविषाच्या जाती आहेत.

दुसरें मत.

अर्कस्नुग्लाङ्गलीगुञ्जाहयारिविषमुष्टयः ।
धूर्तोऽहिफेनजैपालौ नवोपविषजातयः ॥ १ ॥

रुई, त्रिधारी निवडुंग, कळलावी, गुंज, कण्हेर, विषमुष्टि, धोतरा, अफू व जायफळ ह्या नऊ उपविषाच्या जाती आहेत.

दोन प्रकारची रुई.

अर्कद्वयं सरं वातकुष्ठकण्डूविषापहम् ।
निहन्ति प्लीहगुल्मार्शोयकृच्छ्लेष्मोदरक्रिमीन् ॥ २ ॥

दोन्ही जातीच्या रुई—सारक व कुष्ठ, कंडू, विष, पांथरी, गुल्म, मूळव्याध, यकृत, कफ, उदर व कृमि ह्यांचा नाश करितात.

त्रिधारी निवडुंग.

सेहुण्डो रेचनस्तीक्ष्णो दीपनः कटुको गुरुः ।
शूलमष्ठीलिकाध्मानगुल्मशोफोदरानिलान् ॥ १ ॥
हन्ति दोषान्यकृत्प्लीहकुष्ठोन्मादाश्मपाण्डुताः ।

त्रिधारी निवडुंग—रेचक, तीक्ष्ण, अग्निदीपक, गुरु, तिखट, शूल, अष्ठीलिका, पोट फुगणें, गुल्म, शोफ, उदर, वात, त्रिदोष, यकृत, पांथरी, कुष्ठ, उन्माद, मूतखडा व पांडुरोग ह्यांचा नाशक आहे.

अर्कसेहुण्डयोर्दुग्धं तत्स्वयं शुद्धमुच्यते ॥ २ ॥

रुई व निवडुंग ह्यांचे चीक स्वतः शुद्धच असतात.

कळलावी-खड्या नाग.

लाङ्गली शुद्धिमायाति दिनं गोमूत्रसंस्थिता ।

कळलावीचे गड्डे एक दिवस गोमूत्रांत भिजत घातले असतां शुद्ध होतात.

कलिकारी सरा कुष्ठशोफार्शोव्रणशूलजित् ।
तीक्ष्णोष्णा कृमिनुल्लघ्वी पित्तला गर्भपातिनी ॥ १ ॥

कळलावी गुणानें सारक, कुष्ठ, सूज, मूळव्याध, व्रण व शूळ ह्यांची नाशक, तीक्ष्ण, उष्ण, हलकी, पित्तकारक, कृमिनाशक व गर्भपात करणारी आहे.

गुंज.

गुञ्जा काञ्जिकसंस्विन्ना शुद्धिमायाति यामतः ।

गुंजा कांजींत घालून एक प्रहरभर शिजविल्या असतां शुद्ध होतात.

गुञ्जा लघुर्हिमा रूक्षा भेदनी श्वासकासजित् ।
कोष्णा वृष्या कुष्ठकण्डूश्लेष्मपित्तव्रणापहा ॥ १ ॥

गुंजा थंड, हलक्या, रूक्ष, मलभेदक, श्वास व खोकला ह्यांचा नाश करणाऱ्या, किंचित् उष्ण, वृष्य, कुष्ठ, कंडू, पित्त व व्रण ह्यांचा नाश करणाऱ्या आहेत.

कण्हेर.

हयारिर्विषवच्छोध्यो गोदुग्धे दोलकेन तु ।

कण्हेरीच्या मुळ्या बचनागाप्रमाणें गाईच्या दुधांत दोलायंत्रानें प्रहरभर शिजवाव्या.

करवीरद्वयं नेत्ररोगकुष्ठव्रणापहम् ॥ १ ॥
लघूष्णं कृमिकण्डूघ्नं भक्षितं विषवन्मतम् ॥

दोन्हीही कण्हेरी (पांढरी व तांबडी) नेत्ररोगनाशक, कुष्ठ व व्रणनाशक, लघु, ऊष्ण, कृमि, कंडु ह्यांची नाशक आणि भक्षण केली असतां विषाप्रमाणें मारक आहेत.

कुचला.

किंचिदाज्येन संभृष्टो विषमुष्टिर्विशुध्यति ।

कुचल्याच्या बिया तुपांत तळाव्या म्हणजे शुद्ध होतात.

विषमुष्टिस्तिक्तकटुस्तीक्ष्णोष्णः श्लेष्मवातहा ।
सारमेयविषोन्मादहरो मदकरः स्मृतः ॥ १ ॥

कुचला कडू, तिखट, तीक्ष्ण, ऊष्ण, कफवातनाशक, तसाच कुत्र्याचें विष व उन्माद ह्यांचा नाशक, व मदकारक आहे.

जयपाळ.

जैपालोऽस्ति गुरुस्तिक्तो वान्तिकृज्ज्वरकुष्ठनुत् ।
उष्णः सरो व्रणश्लेष्मकण्डूकृमिविषापहः ॥ १ ॥

जैपाळ जड, कडू, वांति, ज्वर व कुष्ठ ह्यांचा नाश करणारा उष्ण, सारक, व्रण, कफ, कंडु, कृमि व विष ह्यांचा नाशक आहे.

जयपाळाची शुद्धि.

जैपालं रहितं त्वगंकुररसज्ञाभिर्मले माहिषे।
निक्षिप्तं त्र्यहमुष्णतोयविमलं खल्वे सवासोर्दितम् ।
लिप्तं नूतनखर्परेषु विगतस्नेहं रजःसंनिभं
निम्बूकाम्बुविभावितं च बहुशः शुद्धं गुणाढ्यं भवेत् ॥ १

जैपाळाच्या बियांवरील टरफलें व आंतील अंकुराची जीभ काढून टाकून तीन दिवस म्हशीच्या शेणांत ठेवून नंतर ऊन पाण्यानें स्वच्छ धुवून खलांत घालून त्यांत एक फडकें घालून त्या फडक्यासह खलावें; व एका कोऱ्या गाडग्याच्या बुडास बाहेरून लिंपावें. नंतर लिंबाच्या रसांत पुष्कळ वेळ खलून ठेवावें, म्हणजे शुद्ध व गुणदायक होतें.

दुसरा प्रकार.

जैपालं निस्तुषं कृत्वा दुग्धे दोलायुतं पचेत् ।
अन्तर्जिह्वां परित्यज्य युंज्याच्च रसकर्मणि ॥ १ ॥

जैपाळाच्या बियांचीं टरफलें काढून टाकून दुधांत दोलायंत्रानें पचन करावें. नंतर त्यांच्या आंतील जीभ काढून टाकून रस-कर्मांत योजावें.

तिसरा प्रकार.

वस्त्रे बद्ध्वा तु जैपालं गोमयस्योदके न्यसेत् ।
पाचयेद्याममात्रं तु जैपालः शुद्धतां व्रजेत् ॥ २ ॥

जैपाळावरचीं टरफलें काढून टाकून तो वस्त्रांत बांधून गाईच्या शेणाच्या रसांत दोलायंत्रानें एक प्रहरभर पचन करावा, म्हणजे जैपाळ शुद्ध होतो.

धोतरा.

धत्तूरबीजं गोमूत्रे चतुर्यामोषितं पुनः ।
कंडितं निस्तुषं कृत्वा शुद्धं योगेषु योजयेत् ॥ १ ॥

धोतऱ्याचें बीं गोमूत्रामध्यें चार प्रहर भिजत घालून पुनः काढून कोरडें करून कांडून वरील कोंडा काढून टाकावा, म्हणजे शुद्ध होतें. तें औषधांत योजावें.

धत्तूरो मदवर्णाग्निवातकृज्ज्वरकुष्ठनुत् ।
उष्णो गुरुर्व्रणश्लेष्मकण्डूकृमिविषापहः ॥ २ ॥

धोतरा उन्मादकारक, वर्णकारक, अग्निदीपक, व वातकारक आहे; ज्वर व कुष्ठनाशक आहे. उष्ण व जड आहे. व्रण, कफ, कंडु, कृमि, व विष ह्यांचा नाशक आहे.

अफू.

अहिफेनं शृङ्गबेररसैर्भाव्यं त्रिसप्तधा ।
शुध्यत्युक्तेषु योगेषु योजयेत्तद्विधानतः ॥ १ ॥

अफू आल्याच्या रसांत एकवीस दिवस खलावी म्हणजे शुद्ध होते. ती विधिपूर्वक औषधी प्रयोगांत योजावी.

अफुकं शोषणं ग्राहि श्लेष्मघ्नं वातपित्तलम् ।
मदतृड्दाहकृच्छुक्रस्तम्भनायासमोहकृत् ॥ २ ॥
अतिसारे ग्रहण्यां च हितं दीपनपाचनम् ।
सेवितं दिवसैः कैश्चिद्भ्रमयत्यन्यथार्तिकृत् ॥ ३ ॥

अफू शोषक, ग्राही, कफनाशक, वातपित्तकारक, मद तहान व दाह ह्यांना करणारी, वीर्यस्तंभक, आयास व मोहकारक, अतिसार व संग्रहणी ह्यांना हितकारक, अग्निदीपक व पाचक आहे. अफू कांहीं दिवस सारखी सेवन केली असतां घेरी उत्पन्न करिते व आणखीही अन्य पीडा करिते.

नवभिर्मर्दितः सूतश्छिन्नपक्षः प्रजायते ।
मुखं च जायते तस्य धातूंश्च ग्रसतेतराम् ॥ ४ ॥

नऊ उपविषांबरोबर पारा मर्दन केला असतां पाऱ्याचा पक्षच्छेद होतो व त्याला मुख उत्पन्न होतें. तो सर्व धातूंचा ग्रास करतो.

भङ्गिका पित्तला तिक्ता तीक्ष्णोष्णा ग्राहिणी लघुः ।
कर्षणी दीपनी रुच्या मदकृत्कफवातहृत् ॥ ५ ॥

भांग पित्तकारक, कडू, तीक्ष्ण, उष्ण, ग्राहक, हलकी, कर्षक, अग्निदीपक, रुचिकारक, कैफ आणणारी व कफवातनाशक आहे.

बब्बूलत्वक्कषायेण भंगां संस्वेद्य शोषयेत् ।
गोदुग्धभावनां दत्वा शुष्कां सर्वत्र योजयेत् ॥ ६ ॥

भांग बाभळीच्या सालीच्या काढ्यांत दोलायंत्रानें प्रहर स्वेदन करून सुकवावी व पुनः गाईच्या दुधाची एक भावना देऊन सुकवावी, म्हणजे शुद्ध होते. ती सर्व योगांत योजावी.

सर्व विषावर गरुडमंत्र.

ॐ नमः प्रचण्डगरुडाय पक्षिराजाय विष्णुवाहनायं विनतासुताय । हे गरुड कश्यपसुत वैनतेय ताक्ष्यं स्वर्णवज्र चंचुवज्र तुण्डनखप्रहरणायानन्तवासुकितक्षककर्कोटपद्ममहापद्मशङ्खपालकुलिकजयविजयाष्टमहानागकाल उच्चाटनीमूषकविषकप्रहरणावहन धूनन शीघ्रकम्प २ आवेश २ ढण्ढर हे श्रीगरुडाय नमः ।

मंत्रेणानेन मंत्रज्ञो जलं चुलकमात्रकम् ।
सप्तवाराभिजप्तं तु पाययेद्गस्तचेतनम् ॥ १ ॥
सर्पादिविषवेगेण सद्यो निर्विषमाप्नुयात् ।
त्रिवारमेयं पानीयं पातव्यं न पिबेदपि ॥ ३ ॥
मुखमध्ये तदाक्षेपः कर्तव्यस्तज्जलेन हि ।
अथवा मस्तके तस्य तर्जन्या ताडयेद्बुधः ।
त्रिवारं मंत्रपूर्वं तु निर्विषो भवति क्षणात् ॥ ४ ॥

हा मंत्र जाणणाऱ्या मंत्र्यानें एक घोटभर पाणी घेऊन तें ह्या मंत्रानें सात वेळ मंत्रून ज्याला विषबाधा झाली आहे किंवा विषानें जो मूर्च्छित झाला आहे त्याला पाजावें, म्हणजे त्याचें विष तात्काळ उतरतें. ह्याप्रमाणें त्याला तीन वेळ पाणी पाजावें. जर तो प्याला नाहीं तर तें पाणी त्याच्या तोंडांत घालावें. किंवा हा मंत्र म्हणून आपल्या उजव्या हाताच्या तर्जनीनें त्याच्या मस्तकावर तीन वेळ ताडण करावें म्हणजे क्षणांत विष उतरतें.

अभ्रकसत्वपातनाचा प्रकार.

भावयेच्चूर्णितं त्वभ्रं दिनैकं काञ्जिकेन च ।
रम्भासूरणजैर्नीरैर्मूलकैश्च सुमेलयेत् ॥ १ ॥
तुर्यांशटङ्कणेनैव क्षुद्रमत्स्यैः समं पुनः ।
महिषीमलसंमिश्रान्विधायास्याथ गोलकान् ॥ २ ॥
खराग्निना धमेद्गाढं सत्वं मुञ्चति कांस्यवत् ।
भारितं ताम्रवत्वभ्रपारदाभ्यां निषेचयेत् ॥ ३ ॥

अभ्रकाच्या चूर्णाला एक दिवस कांजीमध्यें खलावें. त्याचप्रमाणें त्यास केळीच्या कांद्याचा रस, सुरणाच्या गड्ड्याचा रस व मुळ्याचा रस ह्यांची एक एक भावना द्यावी. नंतर त्या अभ्रकाच्या चतुर्थांश टाकणखार, अभ्रकाच्या चूर्णाचे बरोबरीनें मासे व म्हशीचें शेण त्यांत मिळवून त्यांचे गोळे करावे. आणि ते गोळे प्रखर अग्नीमध्यें ठेवून सडकून फुंकावें. म्हणजे त्या अभ्रकाचें कांशाप्रमाणें सत्व निघतें. त्याचें ताम्राप्रमाणें मारण करावें व अभ्रक भस्म आणि पारद भस्म ह्यांचयाशीं तें सेवन करावें.

सत्वमभ्रस्य शिशिरं त्रिदोषघ्नं रसायनम् ।
विशेषात्पुंस्त्वजननं वयसः स्तम्भनं परम् ॥ ४ ॥

अभ्रकाचें सत्व थंड, त्रिदोषनाशक, रसायन, विशेषेंकरून पुरुषत्व आणणारें व वयाचें स्तंभन करणारें आहे.

अगस्त्यपत्रनिर्यासमर्दितं सूरणास्थितम् ।
अभ्रं गोष्ठगतं मासं जायते पारदोपमम् ॥ ५ ॥

अभ्रकाचें चूर्ण हादग्याच्या पाल्याच्या रसांत मर्दन करून सुरणाच्या गड्ड्यांत भरून गोठ्याच्या जमिनींत एक महिनाभर पुरून ठेवावें. म्हणजे पाऱ्याप्रमाणें पातळ होतें.

हरताळाचे सत्वपातनाचा प्रकार.

लाक्षाराजितिलाञ्शिग्रु टङ्कणं लवणं गुडम् ।
तालकार्धेन संमिश्रं मूषायां स्थिरभाजने ।
रुद्ध्वा पुटेदधोयन्त्रे सत्त्वं मुञ्चति सर्वथा ॥ १ ॥

लाख, मोहऱ्या, तीळ, शेवग्याची साल, टांकणखार, मीठ व गूळ हे सर्व पदार्थ हरताळीच्या निम्म्यानें घेऊन त्यामध्यें मिसळून मुशींत घालून अधोयंत्रामध्यें ठेवून पुट द्यावें, म्हणजे हरताळाचें सत्व निघतें.

क्षार काढण्याची रीत.

क्षारवृक्षस्य काष्ठानि शुष्काण्यग्नौ प्रदीपयेत् ।
नीत्वा तद्भस्म मृत्पात्रे क्षिप्त्वा नीरे चतुर्गुणे ॥ १ ॥
विमर्द्य धारयेद्रात्रौ प्रातरच्छं जलं नयेत् ।
तन्नीरं क्राथयेद्वह्नौ यावत्सर्वं विशुष्यति ॥ २ ॥

ततः पात्रात्समुद्धृत्य क्षारो ग्राह्यः सितप्रभः ।
चूर्णाभः प्रतिसार्यः स्यात्तैजसः क्वाथवत्स्थितः ॥
इति क्षारद्वयं धीमान् युक्तकार्येषु योजयेत् ॥ ३ ॥

ज्या वृक्षाच्या लाकडाचा क्षार काढावयाचा त्याचीं वाळलेलीं लाकडें पेटवून त्यांची पांढरी शुभ्र राख करावी; व ती मातीच्या भांड्यांत चौपट पाण्यांत टाकून हातानें चांगली कुसकरून एक रात्रभर तें पाणी तसेंच ठेवावें. दुसरे दिवशीं त्यावरील निव्वळ पाणी काढून घ्यावें व अग्नीवर ठेवून कोरडें होईपर्यंत आटवावें व पात्राच्या बुडाशीं असलेला पांढराशुभ्र क्षार काढून घ्यावा. जो चूर्णाप्रमाणें कोरडा असतो त्याला "प्रतिसार्य क्षार" म्हणतात. व जो काढ्याप्रमाणें पातळच राखतात त्याला "तैजस क्षार" असें म्हणतात. असे हे क्षाराचे दोन प्रकार आहेत. कोणचा क्षार कोणच्या ठिकाणीं योग्य आहे हें पाहून त्याप्रमाणें त्यांची योजना करावी.

दुर्मिळ औषधांच्या अभावीं घ्यावयाचीं औषधें.

सत्वाभावे गुडूच्यास्तु अमृताया रसः स्मृतः ।
चित्रकाभावतो दन्ती क्षारः शिखरिजोऽथवा ॥ १ ॥
अभावे धन्वयासस्य प्रक्षेप्याऽथ दुरालभा ।
तगरस्याप्यभावे तु कुष्ठं देयं भिषग्वरैः ॥ २ ॥
मूर्वाभावे त्वचो ग्राह्या जिङ्गिनीप्रभवा बुधैः ।
अहिंस्राया अभावे तु मानकन्दः प्रशस्यते ॥ ३ ॥
लक्ष्मणाया अभावे तु नीलकण्ठशिखा मता ।
बकुलाभावतो देयं कह्लारोत्पलपङ्कजम् ॥ ४ ॥
नीलोत्पलस्याभावे तु कुमुदं तत्र दीयते ।
कमलस्याप्यभावे तु कमलाक्ष इति स्मृतः ॥ ५ ॥
बकुलस्याप्यभावे तु आभात्वक्तत्र दीयते ।
जातीपत्रं न यत्रास्ति लवङ्गं तत्फलं स्मृतम् ॥ ६ ॥
अर्कपर्णादिपयसो ह्यभावे तद्रसो मतः ।
पौष्कराभावतः कुष्ठं तथैरण्डजटा मता ॥ ७ ॥
स्थौणेयकस्याभावे तु भिषग्भिर्दीयते गदः ।
चविकागजपिप्पल्यौ पिप्पलीमूलवत्स्मृते ॥ ८ ॥
अभावे सोमराज्यास्तु प्रपुन्नाटफलं मतम् ।

यत्र न स्याद्दारुनिशा तदा देया निशा बुधैः ॥ ९ ॥
रसाञ्जनस्याभावे तु सम्यग्दार्वी प्रयुज्यते ।
सौराष्ट्र्यभावतो ज्ञेया स्फुटिका तद्गुणा जनैः ॥ १० ॥
तालीसपत्रकाभावे स्वर्णताली प्रशस्यते ।
भार्ग्यभावे तु तालीसं कण्टकारी जटाऽथवा ॥ ११ ॥
रुचकाभावतो दद्याल्लवणं पांसुपूर्वकम् ।
लवणानामभावे च सैन्धवं तत्र दीयते ॥ १२ ॥
अभावे मधुयष्ट्यास्तु धातकीं च प्रयोजयेत् ।
अम्लवेतसकाभावे चुक्रं दातव्यमिष्यते ॥ १३ ॥
तदभावे तु सर्वत्र जम्बीरादिरसः स्मृतः ।
द्राक्षा यदि न लभ्यन्ते प्रदेयं काश्मरीफलम् ॥ १४ ॥
तयोरभावे कुसुमं मधुकस्य मतं बुधैः ।
लवंगकुसुमं देयं नखस्याभावतः पुनः ॥ १५ ॥
वरी विदारी मुसली जीरकं च निशाद्वयम् ।
दीप्यकं देवदारुश्चाभावे त्वेकं प्रयोजयेत् ॥ १६ ॥
कण्टकारीयुगं चैव धावनीयुगमेव च ।
शतपुष्पाद्वयं चैव उशीरयुगलं तथा ॥ १७ ॥
मुद्गपर्णीमाषपर्णीयुग्मं चैव ततो भवेत् ।
तर्कारीयुगलं चैव सर्वत्रेति विनिश्चयः ॥ १८ ॥
पृथक्पृथग्द्वंद्वमध्येऽभावे तत्र प्रयोजयेत् ।
परस्परस्याभावे तु एकं तत्र प्रयोजयेत् ॥ १९ ॥
कस्तूर्यभावे कंकोलं देयं तत्र भिषग्वरैः ।
कंकोलस्याप्यभावे तु जातीपुष्पं प्रदीयते ॥ २० ॥
अथवा मालतीपुष्पं पत्रं वा दीयते बुधैः ।
कर्पूराभावतो देयं सुगन्धि मुस्तकं तथा ॥ २१ ॥
कर्पूराभावतो देयं ग्रन्थिपर्णं विशेषतः ।
कुंकुमाभावतो दद्यात्कुसुम्भकुसुमं नवम् ॥ २२ ॥
श्रीखण्डचन्दनाभावे कर्पूरं देयमिष्यते ।
अभावे च ततो वैद्यः प्रक्षिपेद्रक्तचन्दनम् ॥ २३ ॥
रक्तचन्दनकाभावे नवोशीरं विदुर्बुधाः ।
निर्गन्धं च सगन्धं च द्विविधं रक्तचन्दनम् ॥ २४ ॥
अन्योन्यस्याप्यभावे तु योजयेन्मतिमान्भिषक् ।
परपरस्याभावे तु योजयेच्चन्दनत्रयम् ॥ २५ ॥
मुस्ता चातिविषाभावे देया तत्र शिवा मता ।

अभावे च हरीतक्या मता कर्कटशृंगिका ॥ २६ ॥
अभावे नागपुष्पस्य पद्मकेसरमिष्यते ।
भल्लातकस्याभावे तु नदीभल्लातको मतः ॥ २७ ॥
मेदाजीवककाकोलीऋद्धिद्वंद्वेऽपि वाऽसति ।
वरीविदार्यश्वगन्धावाराहीश्च क्रमात्क्षिपेत् ॥ २८ ॥
वाराह्याश्च तथाऽभावे चर्मकारालुको मतः ।
वाराहीकन्दकः प्रोक्तः पश्चिमे गृष्टिसंज्ञकः ॥ २९ ॥
क्षीरान्विता मूलकतुल्यकन्दा सप्ताष्टपत्रा सितरक्तकाण्डा ।
बिभर्ति या पल्लवमब्दमब्दात्सा कंचुकी श्वेतवपुर्वरेण्या ॥३०॥
श्यावकर्कशवाराहवृषणामानकन्दकाः ।
ताम्बूलवल्ली छदनावल्ली वाराहकुट्टिका ॥ ३१ ॥
भल्लाताभावतश्चित्रं नलश्चेक्षोरभावतः ।
कुशस्य चाप्यभावे तु काशो ग्राह्यः प्रयत्नतः ॥ ३२ ॥
बिल्वकाश्मर्यतर्कारीपाटलाटुण्टुकैर्महत् ।
ह्रस्वं बृहत्यंशुमतीद्वयगोक्षुरकैर्भवेत् ॥ ३३ ॥
एतेषां दशमूलानामेकमूलं प्रयोजयेत् ।
अभावे तद्गुणं मूलं योज्यं वैद्यविशारदैः ॥ ३४ ॥
मधु यत्र न लक्ष्येत तत्र जीर्णगुडो मतः ।
मत्स्यण्डिकाखण्डसिताः क्रमेण गुणवत्तराः ॥ ३५ ॥
मत्स्यण्ड्यभावतो देयं खण्डं च परिकीर्तितम् ।
तदभावे सिता योज्या बुधैः सर्वत्र निश्चयः ॥ ३६ ॥
निर्गुण्ड्याश्चाप्यभावे तु सुरसा दीयते बुधैः ।
तुलस्या अप्यभावे तु निर्गुण्डीं योजयेत्ततः ॥ ३७ ॥
कुठेरिकायाश्चाभावे तुलसीं तत्र योजयेत् ।
पुनर्नवायाश्चाभावे रक्ता सा च प्रकीर्तिता ॥ ३८ ॥
रास्ना यदि न लभ्येत कोलाञ्जनमिति स्मृतम् ।
सुवर्णस्याप्यभावे तु स्वर्णमाक्षिकमुच्यते ॥ ३९ ॥
तारमाक्षिकमायोज्यं तदभावे तु यत्नतः ।
माक्षिकस्याप्यभावे तु प्रदद्यात्स्वर्णगैरिकम् ॥ ४० ॥
शुद्धो रसो हाटकादि मृतं यत्र न लक्ष्यते ।
तत्र लोहेन कर्माणि भिषक् कुर्यात्प्रयत्नतः ॥ ४१ ॥
कान्ताभावे तीक्ष्णलोहं योजयेद्वैद्यसत्तमः ।
अभावे मौक्तिकस्यापि मुक्ताशुक्तिं प्रयोजयेत् ॥ ४२ ॥
वैदूर्यादीनि रत्नानि न लभ्यन्तेऽत्र धीमता ।
तत्र मुक्तादिभूतिं च योजयेच्च भिषग्वरः ॥ ४३ ॥

अभावे रसभूत्याश्च सिन्दूरं रसपूर्वकम् ।
तदभावे तु दरदं योजयेत्तत्र बुद्धिमान् ॥ ४४ ॥
अलाभे यस्य तद्द्रव्यं प्रत्याम्नायेन योजयेत् ।
गोक्षीराभावतश्छागं पयः सर्वत्र दीयते ॥ ४५ ॥
गोघृतस्याप्यभावे तु चाजं सर्वत्र दीयते ।
अत्र प्रोक्तानि वस्तूनि तानि तेषु च योजयेत् ॥ ४६ ॥
क्षीराभावे रसो मौद्गो मासुरो वा प्रयुज्यते ।

गुळवेलीचें सत्व नसल्यास गुळवेलीचा रस द्यावा. चित्रकाच्या अभावीं दांतीमुळाचा अथवा आघाड्याचा क्षार द्यावा. धमासा न मिळाल्यास त्याच्या अभावीं तांबडा धमासा द्यावा. तगरमूळ न मिळाल्यास त्याचे अभावीं कोष्ट द्यावें. मोरवेलीच्या अभावीं जिंगिणीची साल किंवा मंजिष्ट द्यावें. अहिंस्रेच्या अभावीं मानाकंद द्यावा. लक्ष्मणा नांवाच्या वनस्पतीच्या अभावीं मयूरशिखा द्यावी. बकुळीच्या फुलाच्या अभावीं कल्हार जातीच्या कमळाचीं फुलें द्यावीं. निळ्या कमळाच्या अभावीं कुमुद जातीचें कमळ द्यावें. कमळाच्या अभावीं कमलबीज द्यावें. बकुळीच्या सालीच्या अभावीं बाभळीची साल द्यावी. जायपत्रीच्या अभावीं लवंग किंवा जायफळ द्यावें. रुई इत्यादिकांच्या चिकाच्या अभावीं त्यांच्या पानाचा रस द्यावा. पुष्करमुळाच्या अभावीं कोष्ट किंवा एरंडमूळ द्यावें. स्थौणेयकाच्या अभावीं कोष्ट द्यावें. चवक व गजपिंपळी ह्यांच्या अभावीं पिंपळमूळ द्यावें. बावच्याच्या अभावीं टाकळ्याचें बीं द्यावें. दारुहळदीच्या अभावीं हळद द्यावी, रसांजनाच्या अभावीं दारुहळद द्यावी. गोपीचंदनाच्या अभावीं तुरटी द्यावी. तालीसपत्राच्या अभावीं स्वर्णताली द्यावी. भारंगीच्या अभावीं तालीस किंवा रिंगणमूळ द्यावें. पादेलोणाच्या अभावीं सोरमीठ द्यावें. सर्व लवणांच्या अभावीं सैंधव द्यावें. जेष्ठमधाच्या अभावीं धायटी द्यावी. आम्लवेतसाच्या अभावीं चुका द्यावा. चुकाच्या अभावीं लिंबादिकांचा रस द्यावा. द्राक्षांच्या अभावीं शिवणीचीं फळें द्यावीं. द्राक्षें व शिवणीचीं फळें ह्यांच्या

अभावीं मोहाचीं फुलें द्यावीं. नखल्याच्या अभावीं लवंग द्यावी. शतावरीच्या अभावीं भुईकोहळा किंवा भुईकोहळ्याच्या ऐवजीं शतावरी द्यावी. काळी मुसळी व सफेत मुसळी; जिरें व शहाजिरें; हाळद व दारुहाळद; ओवा व अजमोदा; काष्ठदारु व देवदारू; ह्या दोन दोन द्रव्यांच्या जोडीपैकीं कोणतेंही एक न मिळाल्यास त्याच्या अभावीं त्या जोडींतील दुसरें द्यावें. रिंगणी व डोरली; साळवण व पिठवण; बडीशेप व बाळंतशेप; वाळा व काळा वाळा; रानमूग व रानउडीद; काळी टाकळी व पांढरी टाकळी; ह्या प्रत्येक दोन दोन द्रव्यांपैकीं कोणतेंही एक न मिळाल्यास त्या जोडींतील दुसरें द्रव्य त्याच्या अभावीं द्यावें. कस्तुरीच्या अभावीं कंकोळ द्यावा. आणि कंकोळही न मिळाल्यास जाईचीं फुलें अथवा मालतीचीं फुलें अगर पानें द्यावीं. कापराच्या अभावीं सुगंधी नागरमोथे द्यावे. विशेषेंकरून कापराच्या अभावीं ग्रंथिपर्ण द्यावा. केशराच्या अभावीं ताजीं कर्डईचीं फुलें द्यावीं. मलयगिरीवरील चंदनाच्या अभावीं कापूर द्यावा. रक्तचंदनाच्या अभावीं नवीन वाळा द्यावा. सुवासिक व वासरहित असे रक्तचंदनाचे दोन भेद आहेत. त्यांपैकीं एकाच्या अभावीं दुसरा योजावा. मलयगिरी-वरील चंदन, पांढरा चंदन व रक्तचंदन ह्या तीन चंदनांपैकीं एका-च्या अभावीं कोणत्याही दुसऱ्याची परस्परयोजना करावी. अति-विषाच्या अभावीं नागरमोथा द्यावा. हिरड्याच्या अभावीं बाळ-हिरडे किंवा काकडशिंगी द्यावी. नागकेशराच्या अभावीं कमळां-तील केशर द्यावें. बिब्याच्या अभावीं नदींत होणाऱ्या बिब्याच्या झाडाचे बिब्बे द्यावे. मेदा व महामेदा; जीवक व ऋषभक; काकोली व क्षीरकाकोली; ऋद्धि व वृद्धि ह्या प्रत्येक दोन दोन औषधांच्या जोडीपैकीं जी जोडी नसेल तिच्याबद्दल क्रमानें शतावरी, भुई-कोहळा, अश्वगंध, व डुकरकंद ह्यांची योजना करीत जावी. वाराहीकंदाच्या अभावीं चांभारआळवाचा गड्डा द्यावा. पश्चिम-देशामध्यें वाराहीकंदाला गृष्टिकंद असें म्हणतात. वाराहीचे कंद

मुळ्याप्रमाणें असतात. व ते क्षीरयुक्त असतात. त्या कंदांना सातआठ पानें येतात. त्यांचे दांडे पांढरट तांबूस असतात. त्याला प्रतिवर्षीं पानें येतात आणि त्यांच्यावरील मुख्य त्वचा पांढरी असते. ह्यांचे कंद दिसण्यांत काळसर व कर्कश, डुकराच्या अंगासारखे असतात. तांबूलवल्ली, छदनावल्ली व वाराहकुट्टिका हीं त्याचीं नांवें आहेत. बिब्याच्या अभावीं चित्रक घ्यावा. उसाच्या अभावीं नल घ्यावा. कुशाच्या अभावीं काश घ्यावा. बेलमूळ, शिवणमूळ, टाकळीमूळ, पाडळमूळ व टेट्टमूळ ह्या पांच मुळांच्या समुदायाला महत् पंच-मूळ म्हणतात. रिंगणमूळ, डोरलीमूळ, साळवण, पिठवण व सरा-ट्याचें मूळ ह्यांना लघुपंचमूळ असें म्हणतात. ह्या दोन्ही पंचमुळांना दशमूळ अशी संज्ञा आहे. ह्यांपैकीं एखादें मूळ न मिळाल्यास त्याच्या अभावीं दुसरें मूळ त्याच्यासारख्या गुणाचें घ्यावें. मध न मिळाल्यास त्याच्या अभावीं जुना गुळ घ्यावा. साखऱ्या व खडीसाखर हीं क्रमानें एकापेक्षां एक गुणानें जास्त आहे. साखऱ्या नसल्यास खडीसाखर घ्यावी. व खडीसाखर नसल्यास तिच्या अभावीं पिठीसाखर घ्यावी. निर्गुडीच्या अभावीं तुळस घ्यावी व तुळशीच्या अभावीं निर्गुडी घ्यावी. अजवल्याच्या अभावीं तुळस घ्यावी. श्वेत पुनर्नवा न मिळाल्यास त्याच्या अभावीं तांबडा पुन-र्नवा किंवा तांबडी वसु घ्यावी. रास्ना न मिळाल्यास कोळिंजन घ्यावें. सोन्याच्या अभावीं सुवर्णमाक्षिक घ्यावें. सुवर्णमाक्षिकाच्या अभावीं तारमाक्षिक घ्यावें, आणि सुवर्णमाक्षिकाच्या अभावीं सोन-कावही घ्यावी. शुद्ध पारा किंवा सुवर्णादि धातूंचीं भस्में न मिळा-ल्यास त्यांच्या अभावीं लोहभस्म घ्यावें. कांतलोहाचें भस्म न मिळाल्यास त्याच्या अभावीं तिख्याचें भस्म घ्यावें. मौक्तिक भस्माच्या अभावीं मोत्याच्या शिंपीचें भस्म घ्यावें. वैडूर्य वगैरे रत्नांचीं भस्में न मिळाल्यास त्यांच्या अभावीं मोतीं इत्यादिकांचीं भस्में घ्यावीं. पारद भस्माच्या अभावीं रससिंदूर घ्यावा. आणि रससिंदुराच्या अभावीं हिंगूळ घ्यावा. ह्यांशिवाय ज्या द्रव्याच्या

अभावीं जें दुसरें द्रव्य घ्यावयाचें असेल तें आपल्या परंपरेला अनुसरून घ्यावें. गाईच्या दुधाच्या अभावीं शेळीचें दूध योजावें, आणि गाईच्या तुपाच्या अभावीं शेळीचें तूप योजावें. ह्या ठिकाणीं ज्या वस्तूंबद्दल ज्या वस्तु घ्यावयास सांगितल्या आहेत, त्यांच्याबद्दल त्याच वस्तु घ्याव्या. दुधाच्या अभावीं मुगाचें अथवा मसुराचें कट घ्यावें.

द्रव्यशक्ति.

उष्णशीतगुणोत्कर्षात्तत्र वीर्यं द्विधा स्मृतम् ।
त्रिधा विपाको द्रव्यस्य स्वाद्वम्लकटुकात्मकः ॥ ४७ ॥
आदौ षड्रसमप्यन्नं मधुरीभूतमीरयेत् ।
फेनीभूतं कफं यातं विदाहादम्लतां ततः ॥
अग्निना शोषितं पक्वं पिण्डितं कटु मारुतात् ॥ १ ॥

गुणप्रभावामुळें द्रव्यामध्यें उष्ण व थंड असें दोन प्रकारचें वीर्य आहे. गोड, आंबट व तिखट असा तीन प्रकारचा द्रव्याचा विपाक आहे. षड्रसयुक्त असें खाल्लेलें अन्न प्रथम लाळेच्या संयोगानें मधुर व कफरूप होतें. नंतर विदाहामुळें त्याला अम्लत्व येतें. त्यानंतर अग्नीनें पक्व होऊन पिंडित झालें असतां वायूच्या संयोगानें त्याला तिखटपणा येतो.

चरकाचार्य म्हणतातः—

तीक्ष्णं रूक्षं लघु स्निग्धं मृदूष्णं गुरु शीतलम् ।
वीर्यमष्टविधं केचिद् द्विविधं प्राहुरत्रयः ॥ १ ॥
रसवीर्यविपाकाद्यैः समं द्रव्यं विचिन्त्य च ।
युंज्यात्तद्विधमन्यच्च द्रव्याणां च रसादिकम् ॥ २ ॥

तीक्ष्ण, रूक्ष, लघु, स्निग्ध, मृदु, उष्ण, गुरु व थंड असें आठ प्रकारचें वीर्य आहे, असें कित्येक म्हणतात, व कित्येक दोनच प्रकारचें आहे असें म्हणतात. द्रव्याचे रस, वीर्य व विपाक सारखे आहेत कीं नाहींत ह्याचा विचार करून ज्या द्रव्यांचे रस, वीर्य, विपाक व रसादिक सारखे आहेत अशा द्रव्यांपैकीं एकाच्या अभावीं दुसरें द्रव्य योजावें.

कुटेरिकायाः स्वरसेन सम्यक् स्वर्णादिकानां च भवेच्च भस्म ।

वान्त्यादिदोषं न करोति तत्तु वन्योपलाभिर्गजसंज्ञकं पुटम् ॥३॥

अजवस्याच्या स्वरसानें सुवर्णादिक धातूंना भावना देऊन रानशेणींत एक गजपुट द्यावें, म्हणजे त्यांचें भस्म होतें. तें वांति वगैरे दोष करीत नाहीं.

वमनं रेचनं नस्यं कर्णपूरणमेव च ।
रक्तस्रुतिः समासेन कथ्यते नातिविस्तरम् ॥ ४ ॥

वमन, रेचन, नस्य, कर्णपूरण व रक्तस्रुति हीं कर्में संक्षेपानें सांगतों.

वमनकर्माचा प्रकार.

शरत्काले वसन्ते च प्रावृट्काले च देहिनाम् ।
वमनं रेचनं चैव कारयेत्कुशलो भिषक् ॥ १ ॥
बलवन्तं कफव्याप्तं हृल्लासादिनिपीडितम् ।
तथा वमनसात्म्यं च धीरचित्तं च वामयेत् ॥ २ ॥

शरदृऋतु, वसंतऋतु, व वर्षाऋतु ह्या ऋतूंमध्यें कुशल वैद्यानें वमन व रेचन द्यावें. बलवान, कफदोषानें व्यापलेला, मळमळ वगैरे विकारांनीं पीडित, ज्याला वमनाची संवय आहे व जो धैर्यवान आहे अशा मनुष्याला वमनाचें औषध देऊन वमन करवावें.

विषदोषे स्तन्यरोगे मन्दाग्नौ श्लीपदेऽर्बुदे ।
हृद्रोगकुष्ठविसर्पमेहाजीर्णभ्रमेषु च ॥ ३ ॥
विदारिकापचीकासश्वासपीनसवृद्धिषु ।
अपस्मारे ज्वरोन्मादे तथा रक्तातिसारिषु ॥ ४ ॥
नासाताल्वोष्ठपाके च कर्णस्रावेऽधिजिह्वके ।
गलशुण्ड्यामतीसारे पित्तश्लेष्मगदे तथा ॥ ५ ॥
मेदोदोषेऽरुचौ चैव वमनं कारयेद्भिषक् ।

विषदोष, स्तन्यरोग, मंदाग्नि, श्लीपद, अर्बुद, हृद्रोग, कुष्ठ, विसर्प, मेह, अजीर्ण, भ्रम, विदारिका, अपची, खोकला, श्वास, पीनस, अंडवृद्धि, अपस्मार, ज्वर, उन्माद, रक्तातिसार, नासापाक, तालुपाक, ओष्ठपाक, कर्णस्राव, अधिजिव्हक, गलशुंडी, आमातिसार, पित्तकफात्मक विकार, मेदासंबंधीं दोष व अरुचि ह्या विकारांत वमन करवावें.

न वामनीयस्तिमिरी न गुल्मी नोदरी कृशः ॥ ६ ॥

नातिवृद्धो गर्भिणी च न स्थूलो न क्षतातुरः।
सुकुमारं कृशं बालं वृद्धं भीरुं न वामयेत् ॥ ७ ॥

तिमिर, गुल्म, उदर, किंवा कृशत्व ह्यांनीं पीडित, अति वृद्ध, गर्भिणी, उरःक्षत व व्रण ह्यानें पीडित, सुकुमार, अशक्त, बाळ, वृद्ध व भित्रा ह्यांना वमन देऊं नये.

वमने चापि वेगाः स्युरष्टौ पित्तान्त उत्तमाः।
षड्वेगा मध्यमा वेगाश्चत्वारस्त्ववरा मताः ॥ ८ ॥

वमनाचे आठ वेग येऊन शेवटीं ओकारींतून पित्त पडणें हा वमनाचा उत्तम योग, सहा वेग येऊन थांबणें हा मध्यम योग, आणि चार वेग येऊन थांबणें हा वमनाचा कनिष्ठयोग समजावा.

कृष्णाराठफलं सिन्धुं कफे कोष्णजलैः पिबेत्।
पटोलवासानिम्बैश्च पित्ते शीतजलं पिबेत् ॥ ९ ॥

पिंपळी, गेळफळ व सैंधव ह्यांचें चूर्ण करून ऊन पाण्याशीं कफ-विकारांत वमन होण्याकरितां घ्यावें. कडु पडवळ, अडुळसा, बाळंत-लिंबाची साल ह्यांचें चूर्ण थंड पाण्याशीं पित्तविकारांत वमन होण्याकरितां द्यावें.

सश्लेष्मवातपीडायां सक्षीरं मदनं पिबेत्।
अजीर्णे कोष्णपानीयं सिन्धुं पीत्वा वमेत्सुधीः ॥ १० ॥

कफयुक्त वातविकारांत गेळफळाचें चूर्ण दुधाशीं द्यावें. अजी-र्णाच्या विकारांत वमन होण्याकरितां ऊन पाण्यांत सैंधव घालून पिण्यास द्यावें.

पटोलनिम्बसलिलं चाम्लपित्ते च वान्तिकृत्।
लवणं घृतयुक्तं च वमनार्थं सुखावहम् ॥ १ ॥

कडू पडवळ व बाळंतलिंबाची साल ह्यांचा काढा आम्लपित्ता-मध्यें वमनाविषयीं प्रशस्त आहे. मीठ व तूप मिश्र करून दिलें असतां सुखानें वांति होते.

हृत्कण्ठशिरसां शुद्धिर्दीप्तिरग्नेश्च लाघवम्।
कफपित्तविनाशश्च सम्यग्वान्तस्य चेष्टितम् ॥ २ ॥
ततोऽपराह्णे दीप्ताग्निं मुद्गषष्टिकशालिभिः।
हृद्यैश्च जाङ्गलरसैः कृत्वा यूषं च भोजयेत् ॥ ३ ॥

हृदय, कंठ व मस्तक ह्यांचें शोधन, जठराग्नि प्रदीप्त होणें,

शरीर हलकें वाटणें आणि कफ व पित्त हे दोष कमी होणें हीं योग्य प्रकारें वांति झाल्याचीं लक्षणें आहेत. ह्या प्रकारें उत्तम वांति झाल्यावर तिसरे प्रहरीं भूक लागली असतां मूग व साळी ह्यांचें अन्न आपल्याला आवडेल अशा जांगल प्राण्याच्या मांसरसाशीं खावें.

अजीर्णं शीतपानीयं व्यायामं मैथुनं तथा ।
स्नेहाभ्यङ्गं प्रकोपं च दिनैकं वर्जयेत्सुधीः ॥ ४ ॥

अजीर्ण होईल अशा प्रकारचें अन्नपान, थंड पाणी, व्यायाम, मैथुन, अंगाला तेल लावणें व रागावणें ह्या गोष्टी वमन घेतलेल्या मनुष्यानें एक दिवसपर्यंत वर्ज कराव्या.

रेचक घेण्याचा प्रकार.

स्निग्धस्विन्नाय वान्ताय दद्यात्सम्यग्विरेचनम् ।
अवान्तस्य त्वधः स्रस्तो ग्रहणीं छादयेत्कफः ॥ १ ॥
मन्दाग्निं गौरवं कुर्याज्जनयेद्वा प्रवाहिकाम् ।
अथवा पाचनेनैव बलासं चापि पाचयेत् ॥ २ ॥
स्निग्धस्य स्नेहनैः कार्यं स्वेदैः स्विन्नस्य रेचनम् ।
शरद्दतौ वसन्ते च देहशुद्धौ विरेचयेत् ॥ ३ ॥
अन्यदात्ययिके कार्यं स्वेदनं शीलयेद्बुधः ।
पित्ते विरेचनं युंज्यादामोद्भूते गदे तथा ॥ ४ ॥

ज्याला उत्तम प्रकारें स्नेहन, स्वेदन व वमन दिलें आहे अशा मनुष्याला त्याच्या प्रकृतीला योग्य असें विरेचन द्यावें. ज्यानें वमन घेतलेलें नाहीं म्हणजे ज्याला वांत्या झाल्या नाहींत, त्याला रेचक दिलें असतां त्याचा कफदोष खालीं सरून ग्रहणीला आच्छादून टाकून अग्निमांद्य, अंगाला जडत्व किंवा प्रवाहिका हे विकार उत्पन्न करतो. ह्यासाठीं प्रथम पाचनीय द्रव्यानें कफाचें पाचन करावें आणि नंतर रेचन द्यावें. तसेंच स्नेहन व स्वेदन ह्या उपचारांनीं ज्याचें शरीर स्निग्ध व स्विन्न झालें आहे अशाला रेचक द्यावें. शरद्‌ऋतु व वसंत ऋतु ह्या दोन ऋतूंमध्यें देहशुद्धीकरितां रेचन द्यावें. अन्य ऋतूंमध्यें रेचन देणें जरूरच असेल तर प्रथम स्वेदन द्यावें. पित्तविकार, आमजन्य रोग, उदर व पोट फुगणें ह्या विकारांत कोठ्याची शुद्धि होण्याकरितां रेचक द्यावें.

उदरे च तथाऽऽध्माने कोष्ठशुद्धौ विशेषतः ।
दोषाः कदाचित्कुप्यन्ति जिता लंघनपाचनैः ॥ ५ ॥
ये तु संशोधनैः शुद्धा न तेषां पुनरुद्भवः ।

लंघन व पाचन ह्या उपचारांनीं जिंकलेले दोष कदाचित् पुनः प्रकुपित होतात; परंतु संशोधक उपचारांनीं दोष काढून टाकल्यामुळें ज्यांचा देह व कोठा शुद्ध झाला आहे त्यांचे दोष पुनः वाढत नाहींत.

बालवृद्धावतिस्निग्धः क्षतक्षीणो भयान्वितः ॥ ६ ॥
श्रान्तस्तृषार्तः स्थूलश्च गर्भिणी च नवज्वरी ।
नवप्रसूता नारी च मन्दाग्निश्च मदात्ययी ॥ ७ ॥
शल्यार्दितश्च रूक्षश्च न विरेच्या विजानता ।

बाल, वृद्ध, ज्याचा कोठा अतिस्निग्ध झाला आहे तो, उरक्षतः किंवा व्रण विकारानें क्षीण झालेला, भ्यालेला, दमलेला, तहानेलेला, स्थूळ, गार्भिणी, नवज्वर ज्याला आहे तो, नुकतीच बाळंत झालेली स्त्री, ज्याचा अग्नि मंद आहे तो, मदात्यय रोगानें पीडित, शरीरांत कांहीं शल्य गेल्यामुळें त्यानें पीडित व रूक्ष कोठा असलेला मनुष्य ह्यांना विचक्षण वैद्यानें रेचन देऊं नये.

जीर्णज्वरी गरव्याप्तो वातरक्ती भगंदरी ॥ ८ ॥
अर्शःपाण्डूदरग्रन्थिहृद्रोगारुचिपीडितः ।
योनिरोगप्रमेहार्तो गुल्मप्लीहव्रणार्दितः ॥ ९ ॥
विद्रधिच्छर्दिविस्फोटविषूचीकुष्ठसंयुताः ।
कर्णनासाशिरोवक्त्रगुदमेढ्रामयान्विताः ॥ १० ॥
प्लीहशोफाक्षिरोगार्ताः कृमिक्षारानलार्दिताः ।
शूलिनो मूत्रघातार्ता विरेकार्हा नरा मताः ॥ १. ॥

ज्याला जीर्णज्वर आहे असा मनुष्य, गरदोषानें व्याप्त, वातरक्त झालेला, भगंदर झालेला, मूळव्याध, पांडुरोग, ग्रंथिरोग, हृद्रोग, अरुचि, योनीसंबंधी रोग, प्रमेह, गुल्म, पांथरी, व्रण, विद्रधि, ओकारी, विस्फोटरोग, विषूचिका, कुष्ठ, नाक, कान, मस्तक, तोंड, शिस्न व गुद ह्यासंबंधीं रोग, पांथरी, सूज, नेत्ररोग, कृमिरोग, शूल व मूत्रसंबंधीं विकार ह्या रोगांनीं पीडित, क्षार व अग्निकर्म ह्यांनीं पीडलेले असे रोगी रेचन देण्यास योग्य आहेत म्हणून समजावें.

रेचकाचे औषधी प्रयोग.

एरण्डतैलं त्रिफलाक्काथेन द्विगुणेन च ।
युक्तं पीत्वा पयोभिर्वा न चिरेण विरिच्यते ॥ १ ॥

एरंडेल तेलाच्या दुप्पट त्रिफळ्याचा काढा घेऊन त्यांत तें एरंडेल तेल घालून प्यावें किंवा एरंडेल तेलाच्या दुप्पट दूध घेऊन त्यांतून तें एरंडेल तेल द्यावें, म्हणजे त्वरित रेच होतात.

त्रिवृता कौटजं बीजं पिप्पली विश्वभेषजम् ।
समृद्धीकारसं क्षौद्रं वर्षाकाले विरेचनम् ॥ २ ॥

निशोत्तर, इंद्रजव, सुंठ, पिंपळी ह्यांचें समभाग चूर्ण करून तें वर्षाऋतूंमध्यें जुलाब होण्याकरितां मनुकाच्या काढ्याशीं मध घालून द्यावें.

त्रिवृद्दुरालभा मुस्ता शर्करोदीच्यचन्दनम् ।
द्राक्षाम्बुना सयष्ट्याह्वं शीतलं च घनात्यये ॥ ३ ॥

निशोत्तर, धमासा, नागरमोथे, वाळा, चंदन व खडीसाखर ह्यांचें समभाग चूर्ण करून तें शरदृतूंत मनुका व ज्येष्ठमध ह्यांच्या काढ्यांतून घ्यावें.

पिप्पली नागरं सिन्धुश्यामां च त्रिवृता सह ।
लिहेत्क्षौद्रेण शिशिरे वसन्ते च विरेचनम् ॥

पिंपळी, सुंठ, सैंधव, निळीचें बीं, तेड ह्यांचें चूर्ण करून तें शिशिर ऋतूंत व वसंत ऋतूंत रेच होण्याकरितां मधाशीं चाटावें.

त्रिवृता शर्करा तुल्या ग्रीष्मकाले विरेचनम् ॥ ४ ॥

तेडाचें चूर्ण करून तें ग्रीष्म ऋतूंत रेच होण्यास साखरेशीं घ्यावें.

एरण्डतैलं पवने विरेचनं द्राक्षा पयश्चाम्बु घृतं च पित्ते ।
क्काथः कफे त्रैफलको गुडेन दुग्धाभया सर्वमलं तथैव ॥ १ ॥

वातविकारामध्यें जुलाब होण्याकरितां एरंडेल तेल द्यावें. पित्तविकारामध्यें दुधांतून मनुका अथवा द्राक्षें घ्यावीं, किंवा तूप व पाणी घ्यावें. कफविकारामध्यें त्रिफळ्याचा काढा गूळ घालून घ्यावा, आणि सर्वदोषजन्य विकारामध्यें जुलाब होण्याकरितां हिरड्याचें चूर्ण दुधाशीं घ्यावें.

पिप्पली पिप्पलीमूलमभया द्विगुणोत्तरम् ।
चूर्णमुष्णाम्बुना पेयं स्वस्थे सुखविरेचनम् ॥ १ ॥

पिंपळी व पिंपळमूळ ह्या दोन जिनसा एक एक भाग, हिरडेदळ दोन भाग ह्यांचें वस्त्रगाळ चूर्ण करून ऊन पाण्याशीं घेतलें असतां निरोगी मनुष्याला सुखानें जुलाब होतात.

पादमदकर्णहस्तैः पथ्या त्रिवृतं च नागरं लवणम् ।
निष्कथितपीतसारं नरपतियोग्यं विरेचनं भवति ॥ १ ॥

हिरडेदळ पाव भाग, निशोत्तर एक भाग, सुंठ दोन भाग, सैंधव दान भाग ह्यांचें चूर्ण थोर असाण्याच्या काढ्यांतून द्यावें. हा ढाळकाचा योग राजालाही देण्यास योग्य आहे.

प्रपथ्यासैन्धवकणाचूर्णमुष्णाम्बुना सह ।
एतन्नाराचकं ख्यातं रेचनं च हितावहम् ॥ १ ॥

हिरडा, सैंधव, व पिंपळी, ह्यांचें समभाग चूर्ण करून तें ऊन पाण्याशीं घ्यावें. ह्याला "नाराच-चूर्ण" म्हणतात. हें रेचकारक असून हितावह आहे.

वराम्बुना देशसमाख्यबीजं सुवर्णमित्रं कुसुमाभिधानम् ।
विचित्रविद्याधरनामकोऽयं मलं विना मुञ्चति चाऽऽममेव ॥१॥

इंद्रजव, टाकणखाराची लाही व बडिशेप ह्यांचें चूर्ण त्रिफळ्याच्या काढ्याशीं घ्यावें. ह्याला "विचित्रविद्याधरयोग" असें म्हणतात. ह्यानें मलावांचून केवळ आमाचा झाडा होतो.

मेघनाद रस.

दरदं टङ्कणं चैव सैन्धवं च कटुत्रयम् ।
त्रिफला हारहूरा च कृमिघ्नं रामठं तथा ॥ १ ॥
दस्युदीप्यं समानं च दन्ती सर्वार्धभागिका ।
जम्बीरवारा संमर्द्य चणकस्य प्रमाणतः ॥ २ ॥
उष्णोदकानुपानेन कुम्यामान्तं विरेचनम् ।
तस्योपरि हितं देयं पथ्यं दध्योदनं परम् ॥ ३ ॥
उदरे पाण्डुशोफे च शोफोदरजलोदरे ।
सर्वज्वरे च विषमे मेघनादः प्रशस्यते ॥ ४ ॥

शुद्ध हिंगूळ, टाकणखाराची लाही, सैंधव, सुंठ, मिरीं, पिंपळी हिरडा, बेहडा, आवळकाठी; काळी द्राक्षें, वावडिंग, हिंग, व चोर-

ओवा हीं सर्व औषधें समभाग, आणि दांतीबीज सर्वांच्या अर्ध्या भागानें घेऊन, लिंबाच्या रसांत खल करून हरभऱ्याएवढ्या गोळ्या कराव्या, आणि त्यांतील एक गोळी ऊन पाण्याचे घोटाबरोबर द्यावी. म्हणजे सर्व कृमि व आम पडून जाईपर्यंत रेच होतात. ह्याजवर उत्तम प्रकारचें दहीं व भात हें पथ्य करावें. ह्याला "मेघनाद रेचनरस" असें म्हणतात. हा उदर, पांडुरोग, सूज, शोफोदर, जलोदर, सर्व ज्वर, व विषमज्वर ह्यांजवर प्रशस्त आहे.

पीत्वा विरेचनं शीतजलैः संसिच्य चक्षुषी ।
सुगन्धि किंचिदाघ्राय ताम्बूलं शीलयेद्वरम् ॥ १ ॥
न वातस्थो न वेगांश्च धारयेन्न स्वपेत्तथा ।
शीताम्बु न स्पृशेत्कापि कोष्णं नीरं पिबेन्नरः ॥ २ ॥

जुलाब होण्याचें औषध घेतल्यावर डोळ्यावर थंड पाणी शिंपावें; सुगंधी द्रव्याचा थोडा वास घ्यावा; उत्तम विडा खावा; वाऱ्यांत बसूं नये; शौचाचा वेग आला असतां त्याचा अवरोध करूं नये; झोंप घेऊं नये; थंड पाण्याला स्पर्श देखील करूं नये व ऊन पाणी पिण्यास घ्यावें.

इन्द्रियाणां बलं बुद्धेः प्रसादो वह्निदीप्तिता ।
धातुस्थैर्यं वयःस्थैर्यं भवेद्रेचनसेवनात् ॥ ३ ॥

रेचक घेऊन उत्तम प्रकारें रेच झाले म्हणजे इंद्रियांची शक्ति वाढते; बुद्धि प्रसन्न होते; जठराग्नि प्रदीप्त होतो; शरीरांतील सर्व धातूंना स्थिरत्व येतें आणि वृद्धत्व लवकर येत नाहीं.

प्रवातसेवाशीताम्बुस्नेहाभ्यङ्गमजीर्णताम् ।
व्यायामं मैथुनं चैव न सेवेत विरेचितः ॥ ४ ॥

रेच झाल्यानंतर वारा घेऊं नये; थंड पाण्याचें सेवन करूं नये; अंगाला तेल मर्दन करूं नये; अजीर्ण होईल असा आहार करूं नये; व्यायाम करूं नये व मैथुनही करूं नये.

शालिषष्टिकमुद्गाद्यैर्यवागूं भोजयेत्कृताम् ।
जाङ्गलैर्विष्किराणां वा रसैः शाल्योदनं हितम् ॥ ५ ॥

साळीचे किंवा साठेसाळीचे तांदूळ व मूग इत्यादि हलक्या धान्यांची कण्हेरी करून खावी, किंवा जांगल किंवा विष्किर प्राण्यां-

च्या मांसाच्या रसाशीं साळींच्या तांदुळाचा भात खावा.

विरेकस्यातिवेगेन मूर्छा भ्रंशो गुदस्य च ।
शूलं कफातियोगः स्यान्मांसधावनसंनिभम् ॥ ६ ॥
मेदोनिभं जलाभासं रक्तं वाऽपि विरिच्यते ।
तस्य शीताम्बुभिः सिक्त्वा शरीरं तण्डुलाम्बुभिः ॥ ७ ॥
सहकारत्वचाकल्को दध्ना सौवीरकेण वा ।
पिष्ट्वा नाभिप्रलेपेन हन्त्यतीसारमुल्बणम् ॥ ८ ॥

रेचक अतिशय लागू झालें असतां मूर्च्छा येते; गुदद्वार बाहेर येतें; शूल होतो; कफ वाढतो; धुतलेल्या मांसाच्या पाण्यासारखे किंवा मेदासारखे किंवा पाण्यासारखे अथवा रक्ताचे जुलाब होतात. असें झालें असतां त्याच्या अंगावर थंड पाणी शिंपावें किंवा तांदुळाचें धुवण शिंपावें, आंब्याच्या झाडाच्या सालीचा दह्यांत किंवा कांजींत कल्क करून बेंबीवर लेप करावा म्हणजे अतिशय होणारे जुलाब बंद होतात.

नाकांत औषध घालणें.

नस्यं विधेयं गुडनागरेण जलेन वा सैन्धवपिप्पलीभ्याम् ।
घ्राणास्यमन्याहनुबाहुपृष्ठशिरोक्षिकण्ठश्रवणामयेषु ॥ १ ॥
भुक्तवत्यथवा स्नाते नस्यं योज्यं न कर्हिचित् ।
कृते नस्ये शिरःस्नानं क्रोधादींश्च विवर्जयेत् ॥ २ ॥

नाकाचे रोग, मान, हनुवटी, बाहु, पाठ, मस्तक, नेत्र, कंठ, व कान ह्यांच्यासंबंधानें होणाऱ्या रोगांत सुंठ व गूळ ह्यांचें किंवा सैंधव आणि पिंपळी ह्यांचें पाण्याशीं नस्य द्यावें. जेवल्याबरोबर अथवा स्नान केल्याबरोबर केव्हांही नाकांत औषध घालूं नये. नाकांत औषध घातल्यावर लागलेंच डोक्यावरून स्नान करूं नये, व राग वगैरे येऊं देऊं नये.

कानांत औषध घालणें.

रसाद्यैः पूरणं कर्णे भोजनात्प्राक् प्रशस्यते ।
तैलाद्यैः पूरणं कर्णे भास्करेऽस्तमुपागते ॥ १ ॥
स्वेदयेत्कर्णदेशं तु परिवर्तनशायिनः ।
मूत्रैः स्नेहै रसैः कोष्णैः पूरयेच्च ततो भिषक् ॥
स्वस्थस्य पूरणे स्नेहैर्मात्राशतमवेदने ।

शतत्रयं श्रोत्रगदे शिरोरोगे तथैव च ॥ ३ ॥
कर्णं प्रपूरयेत्सम्यक् स्नेहाद्यैर्मात्रयोक्तया ।
नोच्चैः श्रुतिर्न बाधिर्यं स्यान्नित्यं कर्णपूरणात् ॥ ४ ॥

औषधींचे रस वगैरे पातळ औषधें कानांत घालणें झाल्यास तीं भोजनाच्या पूर्वीं घालणें प्रशस्त आहे. तेल वगैरे स्निग्ध पदार्थ कानांत घालावयाचे असल्यास ते दिवस मावळल्यावर घालावे. कान शेकणें झाल्यास तो एका कुशीवर निजून शेकावा. नंतर मूत्र, तेल किंवा औषधिरस सोसेल असा ऊन करून कानांत घालावा. निरोगी मनुष्याचा कान दुखत नसल्यास शंभर मात्रेचा काल जाईपर्यंत त्यांत तेल घालून कान भरून ठेवावा; आणि कानासंबंधीं कांहीं रोग असल्यास किंवा मस्तकसंबंधीं रोगामध्यें तीनशें मात्रांचा काल जाईपर्यंत कानांत औषध भरून ठेवावें. वर सांगितलेल्या प्रमाणानें तेल वगैरे औषधांनीं तितक्या मात्रांचा काल जाईपर्यंत कानांत औषध घालून ठेवावें. कानांत नित्य तेल वगैरे घातल्यानें बहिरेपणा येत नाहीं व उत्तम ऐकूं येतें.

कालाचें परिमाण.

दक्षजानुकरावर्तच्छोटिका वांऽगुलिद्वयात् ।
निमिषोन्मेषकालो वा बस्तौ मात्रा कृता बुधैः ॥ १ ॥

आपल्या उजव्या गुडघ्याभोंवतीं एकदां हात फिरवून दोन दोन बोटानें एक चुटकी वाजवावी ह्याला जो काळ लागतो तो काळ किंवा डोळ्याच्या पापण्यांची उघडझाक होण्यास जो काळ लागतो त्याला मात्रा असें म्हणतात. बस्तिकर्माकरितां हें कालाचें परिमाण विद्वानांनीं सांगितलें आहे.

शिरा तोडून रक्त काढणें.

शरत्काले स्वभावेन कुर्याद्रक्तस्रुतिं नरः ।
त्वग्दोषग्रन्थिशोथाद्या न स्यू रक्तरुजो यतः ॥ १ ॥
इन्द्रगोपनिभं ज्ञेयं प्रकृतिस्थमसंहतम् ।

ज्या अर्थीं अंगातून रक्त काढलें असतां त्वचेचे रोग, गांठी, सूज व रक्तविकार हे रोग होत नाहींत, त्या अर्थीं शरदृतूमध्यें स्वभावतः रक्त काढावें. निरोगी मनुष्याचें रक्त स्वभावतः मखमली

किड्याप्रमाणें लाल व पातळ असतें.

शोथे दाहेंऽगपाके च रक्तवर्णेऽसृजः स्रुतौ ॥ २ ॥
वातरक्ते तथा कुष्ठे सपीडे दुर्जयानिले ।
पाणिरोगे श्लीपदे च विषदुष्टे च शोणिते ॥ ३ ॥
ग्रन्थ्यर्बुदापचीक्षुद्ररोगरक्ताधिमन्थिषु ।
विदारीस्तनरोगेषु गात्राणां सादगौरवे ॥ ४ ॥
रक्ताभिष्यन्दतन्द्रायां पूतिघ्राणास्यदाहके ।
यकृत्प्लीहाविसर्पेषु विद्रधौ पिटकोद्गमे ॥ ५ ॥
कर्णौष्ठघ्राणवक्त्राणां पाके दाहे शिरोरुजि ।
उपदंशे रक्तपित्ते रक्तस्रावः प्रशस्यते ॥ ६ ॥

सूज, दाह, अंगावर पुटकुळ्या उठणें, अंग लाल होणें, नाकांतून वगैरे रक्त वाहणें, वातरक्त, कुष्ठ, पीडायुक्त व औषधोपचारांनीं बरा न होणारा वातविकार, हाताचे रोग, श्लीपद, विषदोषानें होणारा रक्ताचा बिघाड, गांठ, अर्बुद, अपची, क्षुद्ररोग, रक्तजन्य अधिमंथ, विदारी, स्तनरोग, अंगाचा शिथिलपणा किंवा जडत्व, रक्तजन्य अभिष्यंद, तंद्रा, नाकांत व तोंडांत घाण येणें, त्यांचा दाह होणें, यकृत, पांथरी, विसर्प, विद्रधि, अंगावर फोड किंवा पुळ्या होणें, नाक, कान, ओठ व तोंड ह्या ठिकाणीं फोड येणें, त्यांचा दाह होणें, मस्तक दुखणें, उपदंश व रक्तपित्तरोग ह्या विकारांत शिरावेध करून रक्त काढणें प्रशस्त आहे.

गोशृंगेण जलौकाभिरलाबुभिरपि त्रिधा ।
वातपित्तकफैर्दुष्टं शोणितं स्रावयेद्बुधः ॥ ७ ॥
द्विदोषाभ्यां च संदुष्टं त्रिदोषैरपि दूषितम् ।
शोणितं स्रावयेद्युक्त्या शिरामोक्षैः पदैस्तथा ॥ ८ ॥
गृह्णाति शोणितं शृंगं दशांगुलमितं बलात् ।
जलौका हस्तमात्रं तु तुम्बी च द्वादशांगुलम् ॥ ९ ॥
पदमङ्गुलमात्रं स्याच्छिरा सर्वांगशोधिनी ।
शीतोपचारैः कुपिते स्रुतरक्तस्य मारुते ॥ १० ॥
कोष्णेन सर्पिषा शोथं शनैः परिषेचयेत् ।

वात, पित्त व कफ ह्या दोषांनीं दूषित झालेलें रक्त, शिंग, जळवा, व भोपळा किंवा तुंबडी अशा तीन तऱ्हेनें काढावें. वात, पित्त व कफ ह्या दोषांनीं दूषित झालेलें किंवा दोन दोषांनींही दूषित

झालेलें रक्त शीर तोडून किंवा फासण्या टाकून काढावें. शिंग दहा अंगुळें भागांतील रक्त घेतें. जळू एक हात प्रदेशांतील व तुंबडी बारा अंगुळ प्रदेशांतील रक्त घेते. फासणीनें एक अंगुळ प्रदेशांतील रक्त निघतें. व शीर तोडली असतां सर्व शरीरांतील रक्ताचें शोधन होतें. रक्त काढल्यामुळें वाताचा कोप झाला असतां थंड उपचार करावे व सुजेच्या भागावर कोंबटसें तूप शिंपावें.

क्षीणस्यैणशशोरभ्रहरिणच्छागमांसजः ॥ ११ ॥
रसः समुचितः पाने क्षीरं वा षष्टिका हिताः ।
व्यायाममैथुनक्रोधशीतस्नानप्रवातकान् ॥ १२ ॥
एकासनं दिवा निद्रां क्षाराम्लकटुभोजनम् ।
शोकं वादमजीर्णं च त्यजेद्यावद्बलं भवेत् ॥ १३ ॥

रक्त काढल्यामुळें क्षीणत्व आलें असतां हरीण, ससा, मेंढा, काळवीट व बोकड ह्यांच्या मांसाचा रस किंवा दूध पिण्याकरितां हितकर असून साठेतांदूळ खाण्यास हितकारक आहेत. व्यायाम, मैथुन, राग, थंड पाण्याचें स्नान, सोसाट्याचा वारा, एका ठिकाणीं बसून राहणें, दिवसा झोंप घेणें, खारट, आंबट व तिखट अशा प्रकारचें जेवण, शोक, वाद करणें व अजीर्ण होईल असें खाणें ह्या गोष्टी चांगली शक्ति येईपर्यंत वर्ज्य कराव्या.

पारिभाषिक शब्द

तत्र सहेतुकान्सलक्षणान्कतिचिद्विकारानाह ॥

आतां कारणें व लक्षणें ह्यांसह कांहीं विकार सांगतों.

तंद्रेचें लक्षण.

इन्द्रियार्थेष्वसंवित्तिर्गौरवं जृम्भणं क्लमः ।
निद्रार्तस्येव यस्यैते तस्य तन्द्रां विनिर्दिशेत् ॥ १ ॥

इंद्रियांना आपआपले विषय ग्रहण करण्याचें सामर्थ्य नसणें, किंवा इंद्रियांच्या विषयांचें ज्ञान न होणें, अंगाला जडत्व, जांभया, थकवा हीं लक्षणें ज्याच्या ठिकाणीं झोंपेनें ग्रासल्याप्रमाणें दिसून येतात त्याला तंद्रा आहे म्हणून समजावें.

जांभईचें लक्षण.

पीत्वैकमनिलोच्छ्वासमुद्वमेद्विवृताननः ।
यं मुञ्चति सनेत्राश्रु स जृम्भ इति संज्ञितः ॥ १ ॥

तोंड पसरून एक श्वास घेऊन सोडतो व असें करीत असतां त्याच्या डोळयांतून पाणी येतें, ह्याला जांभई असें म्हणतात.

थकवा.

योऽनायासश्रमो देहे प्रवृद्धश्वासवर्जितः ।
क्लमः स इति विज्ञेय इन्द्रियार्थप्रबाधकः ॥ १ ॥

ज्याला अतिश्रम केल्यावांचून थकल्याप्रमाणें वाटतें, पण अतिश्रमामुळें होणारा जोराचा श्वासोच्छ्वास मात्र नसतो त्याला क्लम किंवा थकवा असें म्हणतात.

शिंक.

प्राणोदानौ समौ स्यातां मूर्ध्नि स्रोतःपथे स्थितौ ।
नस्तः प्रवर्तते शब्दः क्षवथुं तं विनिर्दिशेत् ॥ १ ॥

प्राणवायु व उदानवायु हे बरोबरीनें सारखे मस्तकाकडील स्रोतोमार्गांत राहून नाकावाटे बाहेर येतांना शब्द उत्पन्न करितात त्यास क्षवथु म्हणजे शिंक असें म्हणतात.

आळस.

सुखस्पर्शाप्रसङ्गित्वं दुःखद्वेषेऽप्यलोलता ।
शक्तस्य चाप्यनुत्साहः कर्मस्वालस्यमुच्यते ॥ १ ॥

सुखाविषयीं अप्रासंगिकपणा म्हणजे केवळ सुख असलें म्हणजे झालें, त्याबद्दल वेळेचा विचार नसतो; व दुःखद्वेषासंबंधानेंही विशेष लोलुपता नसते. काम करण्याची अंगांत धमक असूनही व करण्याविषयीं मन प्रसन्न नसतें. ह्या अवस्थेला आळस असें म्हणतात.

ओकारी आल्यासारखें वाटणें.

उत्क्लिश्यान्नं न निर्गच्छेत्प्रसेकष्ठीवनेरितम् ।
हृदयं पीड्यते चास्य तमुत्क्लेशं विनिर्दिशेत् ॥ १ ॥

पोटांत ढवळल्यासारखें होतें पण अन्न पडत नाहीं, आणि मळमळ व तोंडावाटे अतिशय थुंकी मात्र येते; व हृदयांत पीडा होते. ह्याला कोरडी ओकारी असें म्हणतात.

ग्लानीचें लक्षण.

वक्त्रे मधुरता तन्द्रा हृदयोद्वेष्टनं भ्रमः ।
न चान्यदभिकांक्षेत ग्लानिं तस्य विनिर्दिशेत् ॥ १ ॥

तोंड गुळमट असणें, तंद्रा, हृदयामध्यें व्यथा, घेरी येणें, आणि कशाचीही इच्छा नसणें ही लक्षणें ज्यामध्यें असतात त्याला तंद्रा असें म्हणतात.

जडत्व.

आर्द्रचर्मावनद्धं च यो गात्रं मन्यते नरः ।
तथा गुरु शिरोत्यर्थं गौरवं तद्विनिर्दिशेत् ॥ १ ॥

ज्याला आपलें अंग ओल्या चामड्यानें गुंडाळल्यासारखें वाटतें व डोकें जड झाल्यासारखें वाटतें, त्याला गौरव म्हणजे जडत्व झालें आहे असें म्हणावें.

मळमळणें.

हृल्लासो हृदयादीषद्व्यथः पटम्बुनिर्गमः ॥ १ ॥

हृदयांत थोडी पिडा होऊन तोंडाला खारट पाणी सुटतें त्याला मळमळणें असें म्हणतात.

याप्य व्याधीचें लक्षण.

यापनीयं तु तं विद्यात्क्रिया धारयते तु यम् ।
क्रियायां तु निवृत्तायां सद्यो यश्च विनश्यति ॥ १ ॥

जो रोगी औषधोपचार चालू आहे तोंपर्यंत जगतो आणि औषधोपचार बंद पडले असतां जो नाश पावतो, त्या रोग्याला याप्य असें म्हणतात.

उपद्रवाचें लक्षण.

रोगारंभकदोषस्य प्रकोपादुपजायते ।
योऽन्यो विकारः स बुधैरुपद्रव इति स्मृतः ॥ १ ॥

रोग उत्पन्न होण्याला जो दोष कारणीभूत असतो त्या दोषाच्या प्रकोपामुळें जो दुसरा विकार उत्पन्न होतो, त्याला उपद्रव असें म्हणतात.

मरणचिन्ह.

रोगिणो मरणं यस्मादवश्यंभावि लक्ष्यते ।

तल्लक्षणमरिष्टं स्यादिष्टं चापि तदुच्यते ॥ १ ॥

ज्या लक्षणावरून पुढें लवकरच येणारें रोग्याचें मरण समजतें, त्या लक्षणाला अरिष्ट असें म्हणतात. कोणी रिष्ट असेंही म्हणतात.

चिकित्सा.

या क्रिया व्याधिहारिणी सा चिकित्सा निगद्यते ।
दोषधातुमलानां या सम्यक्कृत्वैव रोगहृत् ॥ १ ॥

वातादि दोष, रसरक्तादि धातु, व मूत्रादि मल ह्यांना सम प्रमाणांत आणून जी क्रिया रोग नाहींसा करिते, त्या क्रियेला चिकित्सा असें म्हणतात.

स्वभावतः अपथ्य पदार्थ.

शिंबीषु माषान् ग्रीष्मर्तौ लवणेष्वौषरं त्यजेत् ।
फलेषु लकुचं शाके सार्षपं न हितं मतम् ॥ १ ॥
गोमांसं ग्राम्यमांसेषु न हिता महिषी च सा ।
मेषीपयः कुसुंभस्य तैलं त्याज्यं च फाणितम् ॥ २ ॥

शेंगांतील धान्यापैकीं उडीद हे ग्रीष्मऋतूंमध्यें खाणें अपथ्यकारक आहे. मिठामध्यें औषरमीठ खाऊं नये. फळामध्यें ओटीचें फळ, भाजीमध्यें मोहरीची किंवा शिरसाची भाजी हीं पथ्यकारक नाहीं. ग्राम्य मांसामध्यें गाईचें मांस व म्हशीचें मांस तसेंच मेंढीचें दूध, करड्याचें तेल व काकवी हीं अपथ्यकारक आहेत. म्हणून तीं सोडून द्यावीं.

इक्षूरसः परिपक्वो योऽर्धं घनं फाणितं तु तज्ज्ञेयम् ।

उंसाचा रस शिजवून निम्मा आटविला असतां त्याला काकवी असें म्हणतात.

मिश्र झाले असतां विरुद्ध गुण करणारे ते पदार्थ.

मत्स्यमानूपमांसं च दुग्धयुक्तं विवर्जयेत् ।
कपोतं सार्षपस्नेहभर्जितं परिवर्जयेत् ॥ १ ॥
मत्स्यानिक्षोर्विकारेण तथा क्षौद्रेण वर्जयेत् ।
सक्तून्मांसपयोयुक्तानुष्णैर्दधि विवर्जयेत् ॥ २ ॥
उष्णैर्नभोंबुना क्षौद्रं पायसं कृसरान्वितम् ।
रंभाफलं त्यजेत्तक्रदधिबिल्वफलान्वितम् ॥ ३ ॥
दशाहमुषितं सर्पिः कांस्ये मधुघृते समे ।
कृतान्नं च कषायं च पुनरुष्णीकृतं त्यजेत् ॥ ४ ॥

एकत्र बहुमांसानि विरुध्यन्ते परस्परम् ।
मधुसर्पिर्वसातैलपानीयानि यथा तथा ॥ ५ ॥
घृतं तैलं च पानीयं कषायं व्यंजनादिकम् ।
पक्त्वा शीतीकृतं तप्तं तत्सर्वं स्याद्विषोपमम् ॥ ६ ॥

मासे व अनूप प्राण्यांचें मांस दुधाशीं खाऊं नये. शिरसाच्या अथवा मोहरीच्या तेलांत तळलेलें होल्याचें मांस वर्ज करावें. गूळ, काकवी वगैरे उंसाच्या पदार्थाबरोबर अथवा मधाबरोबर मासे खाऊं नयेत मांसरसाबरोबर सातू व उष्ण पदार्थाबरोबर दहीं वर्ज करावें. उष्ण पदार्थाबरोबर मध किंवा पावसाचें पाणी आणि खिरीबरोबर खिचडी हीं खाऊं नयेत. केळें ताकाशीं व बेलफळ दह्याशीं खाऊं नये. दहा दिवसपर्यंत कांशाच्या भांड्यांत ठेविलेलें तूप किंवा तूप आणि मध हीं समभाग खाऊं नये. शिजवून तयार केलेलें अन्न व काढा पुनः ऊन करून खाऊं नये. अनेक प्रकारच्या प्राण्यांचीं मांसें एकत्र केलीं असतां तीं परस्पर विरुद्ध होतात. त्याचप्रमाणें मध, तूप, पाणी आणि वसा हे पदार्थ एकत्र केले असतां परस्परविरुद्ध होतात. तूप, तेल, पाणी, काढा व चटण्याकोशिंबिरी वगैरे हे सर्व पदार्थ शिजवून थंड झाल्याबर ते पुन्हा ऊन केलें असतां विषासारखे होतात.

औषधी घेण्याविषयीं नियम.

लवणं सैंधवं प्रोक्तं चंदनं रक्तचंदनम् ।
चूर्णलेहाऽसवः स्नेहाः साध्या धवलचंदनैः ॥ १ ॥
कषायलेपयोः प्रायो युज्यते रक्तचंदनम् ।
अंतःसंमार्जने ज्ञेया ह्यजमोदा यवानिका ॥ २ ॥
बहिःसंमार्जने सैव विज्ञातव्याजमोदिका ।
प्रायः सर्पिःप्रयोगे तु गव्यमेव हि गृह्यते ॥ ३ ॥
शकृद्रसो गोमयजे मूत्रं गोमूत्रमुच्यते ।

ज्या ठिकाणीं लवण द्यावें असें म्हटलें असतें, त्या ठिकाणीं सैंधव द्यावें. चंदन सांगितला असेल तेथें रक्तचंदन द्यावा. तथापि चूर्ण, लेह, आसव व तेल ह्यांमध्यें पांढरा चंदन घालावा आणि बहुतकरून काढा व लेप ह्यांमध्यें तांबडा चंदन घेतात. अंतःसंमा-

र्जनाकरितां अजमोदा म्हणजे ओवा घेतात. आणि बहिःसंमार्जनाकरितां तो अजमोदाच घेतात. ज्या योगामध्यें तूप सांगितलें आहे त्यामध्यें प्रायः गाईचें तूप घेतात. ज्या योगांत शेणाचा रस सांगितला आहे त्यामध्यें गाईच्या शेणाचा रस घेतात. आणि मूत्र सांगितलें असेल त्या ठिकाणीं गोमूत्र घेतात.

ग्रंथांतील ज्वरादि रोगांचा अनुक्रम.

ज्वरातिसारौ ग्रहणी ह्यर्शोजीर्णं विषूचिका ।
सालसा च विलम्बी च कृमिरुक्पाण्डुकामलाः ॥ १ ॥
हलीमकं रक्तपित्तं राजयक्ष्मा उरःक्षतं ।
कासो हिक्का तथा श्वासः स्वरभेदस्त्वरोचकः ॥ २ ॥
छर्दिस्तृष्णा च मूर्छा च तथा पानात्ययादयः ।
दाहाख्यश्च तथोन्मादो ह्यपस्मारोऽनिलामयः ॥ ३ ॥
वातरक्तमूरुस्तम्भ आमवातोऽथ शूलरुक् ।
पक्तिजं शूलमानाह उदावर्तोऽथ गुल्मरुक् ॥ ४ ॥
हृद्रोगो मूत्रकृच्छ्रं च मूत्राघातस्तथाऽश्मरी ।
प्रमेहो मधुमेहश्च पिटिकाश्च प्रमेहजाः ॥ ५ ॥
मेदोदोषोदरं शोथो वृद्धिश्च गलगण्डकः ।
गण्डमालाऽपची ग्रन्थिरर्बुदं श्लीपदं तथा ॥ ६ ॥
विद्रधिर्व्रणशोथश्च द्वौ व्रणौ भग्ननाडिकौ ।
भगंदरोपदंशौ च शूकदोषस्त्वगामयः ॥ ७ ॥
शीतपित्तमुदर्दश्च उत्कोठश्चाम्लपित्तकम् ।
विसर्पश्च सविस्फोटस्तथैव च मसूरिकाः ॥ ८ ॥
क्षुद्रास्यकर्णनासाक्षिशिरःस्त्रीबालकामयाः ।
विषं चेत्येवमुद्देशः संग्रहेऽस्मिन्प्रकीर्तितः ॥ ९ ॥

ज्वर, अतिसार, संग्रहणी, मूळव्याध, अजीर्ण, विषूचिका, अलसक, विलंबी, कृमिरोग, पांडुरोग, कावीळ, हलीमक, रक्तपित्त, राजयक्ष्मा, उरःक्षत, खोकला, उचकी, श्वास, स्वरभेद, अरोचक, ओकारी, तहान, मूर्च्छा, मदात्यय, दाह, उन्माद, अपस्मार, वातरोग, वातरक्त, ऊरुस्तंभ, आमवात, शूलरोग, परिणामशूल, आनाह, उदावर्त, गुल्मरोग, हृद्रोग, मूत्रकृच्छ्र, मूत्राघात, मूतखडा, प्रमेह, मधुमेह, प्रमेहपीटिका, मेदोरोग, उदर, सूज, अंत्र-

वृद्धि, गालगुंड, गंडमाळा, अपची, ग्रंथिरोग, अर्बुद, श्लीपद, विद्रधि, व्रणशोथ, भग्न व्रण, नाडीव्रण, भगंदर, उपदंश, शूकदोष, त्वचेचे रोग, शीतपित्त, उदर्द, उत्कोठ, अम्लपित्त, विसर्प, विस्फोट, मसूरिका, क्षुद्ररोग, मुखरोग, कर्णरोग, नासारोग, नेत्ररोग, शिरोरोग, स्त्रीरोग, बालरोग, व विषबाधा इतक्या रोगांचे उद्देश ह्या संग्रहामध्यें सांगितले आहेत.

ज्वराचें लक्षण.

दक्षापमानसंक्रुद्धरुद्रनिःश्वाससंभवः ।
ज्वरोऽष्टधा पृथग्द्वंद्वसंघातागन्तुजः स्मृतः ॥ १ ॥

दक्षानें अपमान केल्यामुळें रागावलेल्या रुद्राच्या उच्छ्वासापासून उत्पन्न झालेला ज्वर वातादि तीन दोषांनीं तीन प्रकारचा, दोन दोन दोषांच्या संयोगानें तीन प्रकारचा, त्रिदोषापासून एक, आणि आगंतुक एक मिळून आठ प्रकारचा आहे.

ज्वराची संप्राप्ति.

मिथ्याहारविहाराभ्यां दोषा ह्यामाशयाश्रयाः ।
बहिर्निरस्य कोष्ठाग्निं ज्वरदाः स्यू रसानुगाः ॥ २ ॥

प्रकृतीला अपथ्यकारक अशा आहारविहारादिकांनीं आमाशयाचा आश्रय करून असलेले वातादि दोष कोठ्यांतील अग्नीला बाहेर काढून रसधातूला दूषित करून ज्वर उत्पन्न करितात.

ज्वराचें पूर्वरूप.

श्रमोऽरतिर्विवर्णत्वं वैरस्यं नयनप्लवः ।
इच्छाद्वेषौ मुहुश्चापि शीतवातातपादिषु ॥ ३ ॥
जृम्भाङ्गमर्दो गुरुता रोमहर्षोऽरुचिस्तमः ।
अप्रहर्षश्च शीतं च भवन्त्युत्पत्स्यति ज्वरे ॥ ४ ॥

थकवा, निरुत्साह, शरीराचा वर्ण बदलणें, अरुचि, डोळ्यांतून पाणी येणें, थंडी, वारा किंवा ऊन हे एखादे वेळीं पाहिजे असें वाटणें किंवा नकोसें वाटणें, जांभया, अंग मोडून येणें, अंगाला जडत्व, अंगावर शहारे येणें, तोंड बेचव होणें, डोळ्याला अंधारी येणें, अप्रसन्नता, आणि थंडी वाजणें हीं लक्षणें ज्वर येण्यापूर्वीं होतात. हीं ज्वराच्या पूर्वरूपाचीं सामान्य लक्षणें आहेत.

सामान्यतो विशेषात्तु जृम्भाऽत्यर्थं समीरणात् ।
पित्तान्नयनयोर्दाहः कफान्नान्नाभिनन्दनम् ॥ ५ ॥
सर्वलिङ्गसमवायः सर्वदोषप्रकोपजे ।
रूपैरन्यतराभ्यां तु संसृष्टैर्द्वंद्वजं विदुः ॥ ६ ॥

आतां विशेष लक्षणें सांगतों. वातज्वरापूर्वीं जांभया अतिशय येतात. पित्तज्वर येण्यापूर्वीं डोळ्याची आग होते. कफज्वर येण्यापूर्वीं अन्नावरची इच्छा नाहींशी होते. त्रिदोषज्वरापूर्वीं तिन्हीही दोषांपासून होणारीं ज्वराचीं पूर्व लक्षणें होतात; आणि दोन दोषांचीं मिश्र लक्षणें दिसलीं म्हणजे त्याला द्वंद्वज असें म्हणतात.

ज्वराचें सामान्य लक्षण.

स्वेदावरोधः संतापः सर्वाङ्गग्रहणं तथा ।
युगपद्यत्र रोगे तु स ज्वरो व्यपदिश्यते ॥ ७ ॥

घाम न येणें, शरीर, इंद्रियें व मन ह्यांना संताप होणें व सर्व अंग जखडल्यासारखें वाटणें, हीं सर्व लक्षणें एकदम झालेलीं ज्या रोगांत दिसून येतात त्याला ज्वर असें म्हणतात.

वातज्वराची संप्राप्ति.

वातलाहारचेष्टाभ्यां वायुरामाशयाश्रयः ।
बहिर्निरस्य कोष्ठाग्निं ज्वरकृत्स्याद्रसानुगः ॥

वातकारक आहारविहारादिकांनीं आमाशयांत वाढलेला वायु जठराग्नीला बाहेर काढून रसाचा आश्रय करून ज्वर उत्पन्न करतो.

वातज्वराचें लक्षण.

वेपथुर्विषमो वेगः कण्ठोष्ठपरिशोषणम् ।
निद्रानाशः क्षवस्तम्भो गात्राणां रौक्ष्यमेव च ॥ १ ॥
शिरोहृद्गात्ररुग्वक्त्रवैरस्यं बद्धविट्कता ।
शूलाध्माने जृम्भणं च भवन्त्यनिलजे ज्वरे ॥ २ ॥

अंग कापणें, ज्वराचा वेग कमीज्यास्त होणें, घसा, ओठ व तोंड ह्यांना कोरड असणें, झोंप न येणें, शिंका न येणें, अंगाला रूक्षपणा असणें, डोकें दुखणें, हृदयामध्यें पीडा होणें, अंग ठणकणें, तोंड बेचव असणें, मळाचा खडा होणें, पोट फुगणें, पोटांत दुखणें व जांभया येणें हीं लक्षणें वातज्वरामध्यें होतात.

दुसरें लक्षण.

भवन्ति विविधा वातवेदनाः पादसुप्तता ।
पिंण्डिकोद्वेष्टनं कर्णस्वनो वक्त्रकषायता ॥
उरुसादो हनुस्तंभो विश्लेषः सन्धिजानुनोः ।
शुष्ककासो वमिर्लोमदन्तहर्षः श्रमभ्रमौ ॥
अरुणं मूत्रनेत्रादि तृट्प्रलापोष्णकामिताः ।

वातज्वरांत अनेक प्रकारच्या वातसंबंधीं वेदना होतात. पाय बधिर होतात. पायाला गोळे येतात. कंबरेंत दुखणें, कानांत नाद होणें, तोंड तुरट असणें, मांड्या गळल्यासारख्या होणें, हनुवटी ताठणें, गुडघ्याचे सांधे ढिले पडणें, कोरडा खोकला, वांति, अंगावर कांटा येणें, दांत शिवशिवणें थकवा किंवा घेरी येणें; डोळे, मल व मूत्र ह्यांना तांबूसपणा, तहान, बडबड व ऊन पदार्थांची इच्छा ही लक्षणें वातज्वरामध्यें होतात.

पित्तज्वराची संप्राप्ति.

पित्तलाहारचेष्टाभ्यां पित्तमामाश्रयाश्रयम् ।
बहिर्निरस्य कोष्ठाग्निं ज्वरकृत्स्याद्रसानुगम् ॥

पित्तकारक आहारविहारानें आमाशयांतील पित्त प्रकुपित होऊन जठराग्नीला बाहेर फेकून रसधातूचा आश्रय करून ज्वर उत्पन्न करितें.

पित्तज्वराचें लक्षण.

वेगस्तीक्ष्णोऽतिसारश्च निद्राल्पत्वं तथा वमिः ।
कण्ठोष्ठमुखनासानां पाकः स्वेदश्च जायते ॥ १ ॥
प्रलापो वक्त्रकटुता मूर्छा दाहो मदस्तृषा ।
पीतविण्मूत्रनेत्रत्वक् पैत्तिके भ्रम एव च ॥ २ ॥

कडक ताप असणें, अतिसार, झोंप थोडी येणें, ओकारी, घशांत, तोंडावर व ओठावर पुटकुळ्या उठणें, घाम येणें, बडबड, तोंडाला कडवटपणा, मूर्च्छा, दाह, उन्मत्तपणा, तहान, डोळे, त्वचा, मळ व मूत्र ह्यांना पिवळटपणा आणि घेरी हीं लक्षणें पित्तज्वरामध्यें असतात.

कफज्वराची संप्राप्ति.

श्लेष्मलाहारचेष्टाभ्यां कफ आमाशयाश्रयः ॥

बहिर्निरस्य कोष्ठाग्निं ज्वरकृत्स्याद्रसानुगः ॥ १ ॥

कफकारक आहारविहारादिकांनीं आमाशयांतील कफ जठराग्नीला बाहेर ढकलून रसाचा आश्रय करून ज्वर उत्पन्न करितो.

कफज्वराचें लक्षण.

स्तैमित्यं स्तिमितो वेग आलस्यं मधुरास्यता ।
शुक्लमूत्रपुरीषत्वक् स्तम्भस्तृप्तिरथापि च ॥ १ ॥
गौरवं शीतमुत्क्लेदो रोमहर्षोऽतिनिद्रता ।
स्रोतोरोधो विडल्पत्वं प्रसेको बहुमूत्रता ॥ २ ॥
नात्युष्णगात्रता छर्दिरग्निसादोऽविपाकता ।
प्रतिश्यायोऽरुचिः कासः कफजेऽक्ष्णोश्च शुक्लता ॥३॥

अंगाला ओलें वस्त्र गुंडाळल्यासारखें वाटणें, ज्वराचा वेग मंद असणें, आळस, तोंड गुळमट होणें, त्वचा, मळ व मूत्र ह्यांना पांढरेपणा असणें, अंग ताठणें, अन्नावर वासना नसणें, अंग जड असणें, थंडी वाजणें, मळमळणें, अंगावर कांटा येणें, अतिशय झोंप, पडसें, अरुचि, खोकला व डोळ्याला पांढरेपणा हीं लक्षणें कफज्वरामध्यें होतात.

वातपित्तज्वराची संप्राप्ति.

वातपित्तकरैर्वातपित्ते आमाशयाश्रये ॥
बहिर्निरस्य कोष्ठाग्निं रसगे ज्वरकारिणी ॥ १ ॥

वातपित्तकारक अशा आहारविहारांनीं आमाशयांतील वात व पित्त हे दोष कुपित होऊन जठराग्नीला बाहेर टाकून ज्वर उत्पन्न करितात.

वातपित्तज्वराचें पूर्वरूप.

प्रायूपे वातपित्तस्य भवतो वातपैत्तिके ॥

वातपित्तज्वर येण्यापूर्वीं वात व पित्त ज्वरांचीं पूर्व लक्षणें होतात.

तृष्णा मूर्छा भ्रमो दाहः स्वप्ननाशः शिरोरुजा ।
कण्ठास्यशोषो वमथू रोमहर्षोऽरुचिस्तमः ।
पर्वभेदश्च जृम्भा च वातपित्तज्वराकृतिः ॥ १ ॥

तहान, बेशुद्धपणा, घेरी येणें, दाह, झोंप न येणें, डोळे दुखणें, घशाला व तोंडाला कोरड, ओकारी, अंगावर कांटा येणें, अरुचि,

डोळ्याला अंधेरी, सांधे दुखणें व जांभया येणें हीं लक्षणें वातपित्तज्वरामध्यें होतात.

वातकफज्वराची संप्राप्ति.

वातश्लेष्मकरैर्वातकफावामाशयाश्रयौ ।
बहिर्निरस्य कोष्ठाग्निं रसगौ ज्वरकारिणौ ॥

वातकफकारक आहारविहारादिकांनीं आमाशयांतील वात व कफ हे दोष प्रकुपित होऊन जठराग्नीला बाहेर काढून रसाचा आश्रय करून ज्वर उत्पन्न कारितात.

कफवातज्वराचें पूर्वरूप.

प्राग्रूपे वातकफयोः स्यातां वातकफज्वरे ।

वात व कफ या ज्वरांची जीं पूर्व लक्षणें तींच वातकफज्वरामध्यें होतात.

वातकफज्वराचें लक्षण.

स्तैमित्यं पर्वणा भेदो निद्रा गौरवमेव च ।
शिरोग्रहः प्रतिश्यायः कासः स्वेदाप्रवर्तनम् ।
संतापो मध्यवेगश्च वातश्लेष्मज्वराकृतिः ॥ १ ॥

अंगाला ओलें वस्त्र गुंडाळल्यासारखें वाटणें, सांधे दुखणें, झोंप येणें, अंगाला जडत्व, डोकें जड होणें, पडसें येणें, खोकला, घाम न येणें, अंगाचा दाह होणें, आणि ज्वराचा वेग मध्यम असणें हीं लक्षणें वातकफज्वरामध्यें असतात.

पित्तकफज्वराची संप्राप्ति.

पित्तश्लेष्मकरैः पित्तकफावामाशयाश्रयौ ।
बहिर्निरस्य कोष्ठाग्नि रसगौ ज्वरकारिणौ ॥ १ ॥

पित्तकफकारक आहारविहारादिकांनीं आमाशयांतील कफपित्त हे दोष कुपित होऊन अग्नीला बाहेर काढून रसधातूचा आश्रय करून ज्वर उत्पन्न कारितात.

पित्तश्लेष्मज्वराचें पूर्वरूप.

प्राग्रूपे पित्तकफयोः स्यातां पित्तकफज्वरे ।

पित्त व कफ ज्वरांचीं जीं पूर्व लक्षणें तीच ह्या कफपित्तज्वरामध्यें होतात.

कफपित्तज्वराचें लक्षण.

लिप्ततिक्तास्यता तन्द्रा मोहः कासोऽरुचिस्तृषा ।
मुहुर्दाहो मुहुः शीतं पित्तश्लेष्मज्वराकृतिः ॥ १ ॥

तोंड चिकट व कडवट वाटणें, तंद्रा, बेशुद्धपणा, खोकला, अरुचि, तहान, एकदां अंगाचा दाह होणें व पुन्हा थंडी वाजणें, हीं लक्षणें कफपित्तज्वरामध्यें होतात.

सन्निपातज्वराचीं कारणें व संप्राप्ति.

(धातुवैषम्यामुळें स्वस्थान सोडून दोषांचें जें एकत्र मेलन त्याला सन्निपात असें म्हणतात.)

त्रिदोषजनकैर्वातपित्तश्लेष्मामगेहिनः ।
बहिर्निरस्य कोष्ठाग्निं रसगा ज्वरकारिणः ॥

वात, पित्त व कफ ह्या दोषांना वाढविणाऱ्या आहारविहारादिकांनीं आमाशयांतील वात, पित्त व कफ हे दोष प्रकुपित होऊन जठराग्नीला बाहेर काढून रसाचा आश्रय करून ज्वर उत्पन्न करितात.

पूर्वरूप.

प्राग्रूपाणि त्रिदोषाणां स्युस्त्रिदोषज्वरे नृणाम् ।

तिन्हीही दोषांच्या ज्वरांचीं जीं पूर्व लक्षणें तींच सन्निपात ज्वरामध्यें होतात.

विरोधिकैरन्नपानैरजीर्णाभ्यसनेन च ।
व्यामिश्रसेवनाच्चापि संनिपातः प्रकुप्यति ॥ १ ॥

एकमेकाशीं विरुद्ध अशा अन्नपानाच्या सेवनानें, नित्य अजीर्ण होईल अशा अन्नपानाच्या सेवनानें व एकमेकाशीं विरुद्ध गुणाचे पदार्थ मिश्र करून खाण्यानें सन्निपाताचा प्रकोप होतो.

सन्निपातज्वराचें लक्षण.

क्षणे दाहः क्षणे शीतमास्थिसंधिशिरोरुजा ।
सास्रावे कलुषे रक्ते निर्भुग्ने चापि लोचने ॥ २ ॥
सस्वनौ सरुजौ कर्णौ कण्ठः शूकैरिवाऽवृतः ।
तन्द्रा मोहः प्रलापश्च कासः श्वासोऽरुचिर्भ्रमः ॥ ३ ॥
तद्वच्छीतं महानिद्रा दिवा जागरणं निशि ।
सदा वा नैव वा निद्रा महास्वेदोऽति नैव वा ॥ ४ ॥
गीतनर्तनहास्यादिविकृतेहाप्रवर्तनम् ।

परिदग्धा खरस्पर्शा जिह्वा स्रस्ताङ्गता परम् ॥ ५ ॥
ष्ठीवनं रक्तपित्तस्य कफेनोन्मिश्रितस्य च ।
शिरसो लोठनं तृष्णा निद्रानाशो हृदि व्यथा ॥ ६ ॥
स्वेदमूत्रपुरीषाणां चिराद्दर्शनमल्पशः॥
कृशत्वं नातिगात्राणां प्रततं कण्ठकूजनम् ॥ ७ ॥
कोठानां श्यावरक्तानां मण्डलानां च दर्शनम् ।
मूकत्वं स्रोतसां पाको गुरुत्वमुदरस्य च ॥
चिरात्पाकश्च दोषाणां संनिपातज्वराकृतिः ॥ ८ ॥

क्षणांत दाह होणें, क्षणांत थंडी वाजणें, हाडें, सांधे व मस्तक दुखणें, डोळ्यांतून पाणी येणें, डोळे गढूळ व ताठल्यासारखे होणें, कानांत नाद होणें, व कान ठणकणें, घशांत कूस गेल्यासारखें वाटणें, तंद्रा, मूर्च्छा, बडबड, खोकला, श्वास, अरुचि, भ्रम, दिवसा थंडी वाजणें व अतिशय झोंप येणें, किंवा सदोदित झोंप न येणें अगर सारा वेळ झोंप असणें, अतिशय घाम येणें अगर मुळींच घाम न येणें, वेडेवांकडें गाणें, नाचणें किंवा हसणें ह्या-विषयीं इच्छा होणें, जीभ भाजल्याप्रमाणें काळी व खरखरीत होणें, अंग अतिशय गळल्यासारखें होणें, थुंकींतून कफानें मिश्र असें रक्त व पित्त पडणें, डोकें हालविणें, तहान, झोंप न येणें, छातींत दुखणें, फार वेळानें थोडा घाम येणें, लघवी थोडी होणें, व मळही थोडा होणें, अवयव फार कृश न होणें, घशांत अतिशय घुरघुरणें, बोलतां न येणें, अंगावर गांधी व काळसर तांबूस अशीं मंडळें उठणें, स्रोतसांमध्यें पुटकुळ्या उठणें, पोट जड किंवा मोठें होणें, आणि वात, पित्त व कफ ह्या दोषांचा पाक लवकर न होणें हीं सन्निपातज्वराचीं लक्षणें आहेत.

सन्निपातज्वराचे तेरा भेद.

एकोल्बणास्त्रयस्ते स्युर्द्व्युल्बणाश्च तथेति षट् ॥
त्र्युल्बणश्च भवेदेको विज्ञेयः स तु सप्तमः ॥ १ ॥
प्रवृद्धमध्यहीनैस्तु वातपित्तकफैश्च षट् ॥
सन्निपातज्वरस्यैवं स्युर्विशेषास्त्रयोदश ॥ २

वातादि एक एक दोषाच्या आधिक्यानें तीन, दोन दोन दोषांच्या आधिक्यानें तीन मिळून सहा आणि तिनीही दोषांच्या

आधिक्यानें एक हा सातवा, वात, पित्त व कफ ह्यांच्या अतिशय वृद्धीमुळें, मध्यम स्थितीमुळें व हीन स्थितीमुळें सहा, ह्याप्रमाणें सन्निपात ज्वराचे तेरा प्रकार आहेत.

तत्र प्रवृद्धवातो मध्यपित्तो हीनकफः ।
मध्यवातः प्रवृद्धपित्तो हीनकफः ।
हीनवातः प्रवृद्धपित्तो मध्यकफः ।
प्रवृद्धवातो हीनपित्तो मध्यकफः ।
मध्यवातो हीनपित्तः प्रवृद्धकफः ।
हीनवातो मध्यपित्तः प्रवृद्धकफश्चेति षट् ।

वाताधिक, मध्यपित्त हीनकफ, एक; मध्यम वात, अधिक पित्त, हीन कफ दुसरा; हीन वात, अधिक पित्त, मध्यम कफ तिसरा; अधिकवात, हीनपित्त, मध्यकफ चवथा; मध्यवात, हीनपित्त, अधिक कफ पांचवा; हीनवात, मध्यम पित्त, अधिक कफ हा सहावा; असे हे सहा प्रकार आहेत.

त्यांचीं नांवें.

विस्फारिकश्चाशुकारि कम्पनो बभ्रुसंज्ञकः ॥
शीघ्रकारी तथा भल्लः सप्तमः कूटपालकः ॥
संमोहकः पालकश्च याम्यः क्रकच इत्यपि ॥
ततः कर्कटकः प्रोक्तस्ततो वैदारिकाभिदः ॥ १ ॥

विस्फारिक, आशुकारी, कम्पन, बभ्रु, शीघ्रकारी, भल्लु, सातवा कूटपालक, संमोहक, पालक, याम्य, क्रकच, कर्कटक आणि वैदारिक असे हे तेरा संन्निपात आहेत.

वातप्रधान विस्फारक सन्निपाताचें लक्षण.

श्वासः कासो भ्रमो मूर्च्छा प्रलापो मोहवेपथुः ॥
पार्श्वस्य वेदना जृंभा कषायत्वं मुखस्य च ॥
वातोल्बणस्य लिंगानि सन्निपातस्य लक्षयेत् ॥
एष विस्फारिको नाम्ना सन्निपातः सुदारुणः ॥ १ ॥

श्वास, खोकला, भ्रम, मूर्च्छा, बडबड, मूढपणा, अंग कापणें, कुशीमध्यें वेदना, जांभया व तोंडाला तुरटपणा हीं वातदोषाधिक सन्निपाताचीं लक्षणें आहेत. ह्याला विस्फारिक सन्निपात म्हणतात. हा फार भयंकर आहे.

पित्ताधिक आशुकारी सन्निपाताचें लक्षण.

अतिसारो भ्रमो मूर्च्छा मुखपाकस्तथैव च ॥
गात्रे च बिंदवो रक्ता दाहोतीव प्रजायते ॥
पित्तोल्बणस्य लिंगानि सन्निपातस्य लक्षयेत् ॥
भिषग्भिः संनिपातोऽयमाशुकारीति कीर्तितः ॥

अतिसार, भ्रम, मूर्च्छा, तोंडावर पुटफुळ्या, अंगावर तांबडे ठिपके, व अतिशय दाह, हीं पित्ताधिक सन्निपाताचीं लक्षणें आहेत. वैद्यांनीं हा आशुकारी सन्निपात म्हणून सांगितला आहे.

कंपन नांवाच्या कफाधिक सन्निपाताचें लक्षण.

जडता गद्गदा वाणी रात्रौ निद्रा भवत्यपि ।
प्रस्तब्धे नयने चैव मुखमाधुर्यमेव च ॥
कफोल्बणस्य लिंगानि सन्निपातस्य लक्षयेत् ।
मुनिभिः सन्निपातोयमुक्तः कम्पनसंज्ञकः ॥३॥

अंगाला जडत्व, अस्पष्ट भाषण, रात्रीं झोप येत असूनही डोळ्याला ताठपणा, तोंडाला गोडपणा, हीं कफाधिक सन्निपाताचीं लक्षणें आहेत. पूर्वींच्या आचार्यांनीं ह्याला कंपन नांवाचा सन्निपात असें म्हटलें आहे.

बभ्रु नांवाच्या वातपित्ताधिक सन्निपाताचें लक्षण.

वातपित्ताधिको यस्य सन्निपातः प्रकुप्यति ।
तस्य ज्वरो मदस्तृष्णामुखशोषः प्रमीलकः ॥
आध्मानारुचितंद्राश्च कासश्वासारुचिर्भ्रमाः ।
मुनिभिर्बभ्रुनामायं सन्निपात उदाहृतः ॥ ४ ॥

वातपित्ताधिक सन्निपात ज्याला होतो, त्याला ज्वर, उन्मत्तपणा, तहान, तोंडाला कोरड, तंद्रा, पोटाला फुगोटी, अरुचि, डोळ्यांवर झापड, खोकला, श्वास, अरुचि, व भ्रम हीं लक्षणें होतात. मुनि ह्याला बभ्रु नांवाचा सन्निपात असें म्हणतात.

वातपित्ताधिक सन्निपाताचें लक्षण.

वातश्लेष्माधिको यस्य सन्निपातः प्रकुप्यति ।
तस्य शीतज्वरो मूर्च्छा क्षुत्तृष्णा पार्श्वनिग्रहः ॥
शूलमस्विद्यमानस्य मूर्च्छा श्वासश्च जायते ।
असाध्यसन्निपातोऽयं शीघ्रकारीति कथ्यते ॥

न हि जीवत्यहोरात्रमनेनाविष्टविग्रहः ॥ ५ ॥

ज्याला वातकफाधिक सन्निपात होतो, त्याला थंडी वाजून ताप येतो; मूर्च्छा येते; तहान लागते; अन्न खाण्याची इच्छा होते; कुशी जखडल्याप्रमाणें होतात; शूल, घाम न येणें, बेशुद्धपणा व श्वास हीं लक्षणें होतात. हा शीघ्रकारी सन्निपात असाध्य आहे. हा सन्निपात झालेला रोगी एक अहोरात्रपर्यंत देखील जगत नाहीं.

भल्लुक सन्निपाताचें लक्षण.

पित्तश्लेष्माधिको यस्य सन्निपातः प्रकुप्यति ।
अन्तर्दाहो बहिःशीतं तस्य तृष्णा प्रवर्धते ॥
तुद्यते दक्षिणे पार्श्वमुरःशीर्षगलग्रहः ।
ष्ठीवति श्लेष्मपित्तं च कृच्छ्रात्कंठश्च दूयते ॥
विड्भेदश्वासहिक्काश्च वर्धते सप्रमीलकाः ।
ऋषिभिर्भल्लुनामाऽयं सन्निपात उदाहृतः ॥

पित्तकफाधिक सन्निपात ज्याला होतो, त्याला आंतून दाह व बाहेरून थंडी वाजणें अशीं लक्षणें होतात. तहान फार लागते; उजव्या बाजूला कुशींत दुखतें; छाती, मस्तक व गळा जखडल्यासारखा होतो; तो कष्टानें कफ व पित्त ह्यांनीं मिश्र अशी थुंकी टाकतो; घसा दुखतो; मळ पातळ होतो; श्वास व उचकी हे विकार वाढतात. ऋषींनीं हा भल्लु नांवाचा सन्निपात म्हणून सांगितला आहे.

कूटपाल सन्निपाताचें लक्षण.

सर्वदोषोल्बणो यस्य सन्निपातः प्रकुप्यति ॥
त्रयाणामपि दोषाणां तस्य रूपाणि लक्षयेत् ॥
त्रिदंडरूपमचलं तथैवाहुस्त्रिदंडवत् ।
यानि ज्वरचिकित्सायां रूपाण्युक्तानि कृत्स्नशः ।
तैः सर्वैरेव संपूर्णो विज्ञेयः कूटपालकः ॥
व्याधिभ्यो दारुणश्चैव वज्रशस्त्राग्निसंनिभः ।
केवलोच्छ्वासपरमः स्तब्धांगः स्तब्धलोचनः ॥
त्रिरात्रात्परमेतस्य जन्तोर्हरति जीवितम् ।
तदवस्थं तु तं दृष्ट्वा मूढो व्याहरते जनः ॥
धर्षितो राक्षसैर्नूनमवेलायां चरन्ति ये ॥
अंबया स्नुवते केचिद्यक्षिण्या ब्रह्मराक्षसैः ।

पिशाचैर्गुह्यकैश्चैव तथान्यैर्मस्तके हतम्।
कुलदेवार्चनाहीनं धर्षितं कुलदेवतैः॥
नक्षत्रपीडामपरे गरकर्मेति चापरे।
सन्निपातमिमं प्राहुर्भिषजः कूटपालकम्॥ ७॥

तिन्हींही दोषांच्या प्रकोपानें ज्याला सन्निपात होतो त्याला तिन्हीही दोषांचीं लक्षणें होतात. हा सन्निपात झालेला रोगी, तीन दंड जसे अचल स्थितींत पडावे, तसा तो निश्चल त्रिदंडाप्रमाणें स्तब्ध पडून राहतो. ज्वरचिकित्साप्रकरणामध्यें सन्निपाताचीं जीं जीं रुपें सांगितलीं आहेत, त्या सर्व लक्षणांनीं युक्त असा हा कूटपाल नांवाचा सन्निपात असतो. हा सर्व व्याधींमध्यें वज्रशस्त्र किंवा अग्नि ह्यांसारखा फार भयंकर आहे. ह्या सन्निपातामध्यें रोग्याचें अंग स्तब्ध असतें; डोळे स्तब्ध असतात आणि केवळ श्वासोच्छ्वास मात्र चालू असतो. हा तीन अहोरात्रींनंतर रोग्याच्या जीविताचा नाश करितो. अशी त्याची अवस्था पाहून मूर्ख लोक म्हणतात कीं, खरोखर ह्याला अवेळीं संचार करणाऱ्या राक्षसांनीं पछाडिलें आहे. कित्येक अंबेनें, यक्षिणीनें, ब्रह्मराक्षसादिकांनीं किंवा पिशाच्च, गुह्यक इत्यादिकांनीं त्याच्या मस्तकावर प्रहार केला असावा असें म्हणतात. कित्येक कुलदेवतेची पूजा न केल्यामुळें हा रोग झाला असें म्हणतात, तर कित्येक ग्रहांच्या पीडेनें किंवा गरदोषामुळें हा रोग झाला असें म्हणतात. वैद्य ह्या संन्निपाताला कूटपालक असें म्हणतात.

संमोहक सन्निपाताचें लक्षण.

प्रवृद्धमध्यहीनैस्तु वातपित्तकफैश्च यः।
तेन रोगास्तथैवोक्ता यथादोषबलाश्रयाः॥
प्रलापायाससंमोहकम्पमूर्च्छाऽरतिभ्रमाः।
एकपक्षाभिघातश्च तत्राप्येतद्विशेषतः॥
एष संमोहको नाम्ना सन्निपातः सुदारुणः॥ ८॥

ह्या वाताधिक मध्यपित्त व हीनकफ सन्निपातामध्यें दोषांच्या बलानुसार ते ते रोग होतात. बडबड, थकवा, मूर्च्छा, कांपरें, बेशुद्धपणा, दीनपणा व घेरी हीं लक्षणें असून अर्धांगवात हें

लक्षण विशेष असतें. हा संम्मोहक नांवाचा सन्निपात फार भयंकर आहे.

पालक सन्निपाताचें लक्षण.

मध्यप्रवृद्धहीनैस्तु वातपित्तकफैश्च यः ।
तेन रोगास्त एवोक्ता यथादोषबलाश्रयाः ॥
मोहप्रलापमूर्च्छाः स्युर्मन्यास्तंभः शिरोग्रहः ।
कासश्वासे भ्रमस्तंद्रा संज्ञानाशो हृदि ग्रहः ॥
खेभ्यो रक्तं विसृजति तंद्रा स्यात्स्तब्धनेत्रता ॥
तत्राप्येते विशेषाः स्युर्मृत्युरर्वाक् त्रिवासरात् ॥
भिषग्भिः सन्निपातोऽयं कथितः पालकाभिधः ॥

मध्यम वात, अधिक पित्त व हीन कफ अशा दोषानें जो सन्निपात होतो त्यामध्यें त्या दोषानुसार लक्षणें असून विशेषतः मूढपणा, बडबड, मूर्च्छा, मान ताठणें, डोकें जखडल्यासारखें होणें, खोकला, श्वास, भ्रम, तंद्रा, वस्तूसंबंधीं ज्ञान न होणें, उरामध्यें जखडल्याप्रमाणें होणें, नाकांतून रक्त येणें, तंद्रा, व डोळे ताठल्यासारखे होणें, हीं लक्षणें होतात. हा सन्निपात तीन दिवसांचे आंत मृत्यु आणतो. वैद्यलोक ह्याला पालक सन्निपात म्हणतात.

याम्य सन्निपाताचें लक्षण.

हीनप्रवृद्धमध्यैस्तु वातपित्तकफैश्च यः ॥
तेन रोगास्त एवोक्ता यथादोषबलाश्रयाः ॥
हृदयं दह्यते चास्य यकृत्प्लीहां च फुप्फुसाः ॥
पच्यंतेऽत्यर्थमूर्ध्वाधः पूयशोणितनिर्गमः ॥
शीर्णदन्तश्च मृत्युश्च तत्राप्येतद्विशेषतः ॥
भिषग्भिः सन्निपातोऽयं याम्यनामा प्रकीर्तितः ॥

हीन वात, अधिक पित्त व मध्यम कफ अशा दोषानें जो सन्निपात होतो त्यामध्यें त्या त्या दोषानुसार लक्षणें असून शिवाय हृदयामध्यें दाह होतो. यकृत्, पांथरी, व फुप्फुसें हीं पिकतात. त्यामुळें तोंडावाटे व गुदद्वारानें पू आणि रक्त पडतें. विशेषतः दांत पडतात व मृत्यु येतो. वैद्य ह्या सन्निपाताला याम्य असें म्हणतात.

क्रकच सन्निपाताचें लक्षण.

प्रवृद्धहीनमध्यैस्तु वातपित्तकफैश्च यः ॥

तेन रोगास्त एवोक्ता यथादोषबलाश्रयाः ॥
प्रलापायाससंमोहकम्पमूर्च्छारतिभ्रमाः ॥
मन्यास्तंभेन मृत्युश्च तत्राप्येतद्विशेषतः ॥
उक्तः क्रकचनामायं सन्निपातो भिषग्वरैः ॥

अधिक वात, हीन पित्त, व मध्य कफ अशा दोषांनीं झालेल्या ह्या सन्निपातामध्यें त्या त्या दोषानुसार लक्षणें असून बडबड, थकवा, मूढपणा, कंप, मूर्च्छा, अप्रसन्नता व घेरी हीं लक्षणें होतात. आणि विशेषतः मान ताठून मृत्यु येतो; वैद्यांनीं ह्या क्रकच नांवाचा सन्निपात म्हणून सांगितला आहे.

कर्कोटक सन्निपाताचें लक्षण.

मध्यहीनप्रवृद्धैश्च वातपित्तकफैश्च यः ॥
तेन रोगास्त एवोक्ता यथादोषबलाश्रयाः ॥
अंतर्दाहो विशेषोऽत्र स च वक्तुं न शक्यते ॥
रक्तमालक्तकेनेव लक्ष्यते मुखमंडलम् ॥
यत्नेनाकर्षितः श्लेष्मा हृदयान्न प्रसिच्यते ॥
इषुणैवाहतं पार्श्वं तुद्यते खन्यते हृदि ॥
प्रमीलकश्वासहिक्का वर्धते तु दिने दिने ॥
जिह्वा दग्धा खरस्पर्शा गलः शूकैरिवावृतः ॥
विसर्गान्नाभिजानाति कूजते च कपोतवत् ॥
अतीव श्लेष्मणा पूर्णः शुष्कवत् कोष्ठतालुकः ॥
तंद्रानिद्रातियोगार्तो हतवाणिर्हतद्युतिः ॥
न वाति लभते ग्लानिं विपरीतानि चेच्छति ॥
आयम्यते च बहुशो रक्तं ष्ठीवति चाल्पशः ॥
एष कर्कोटको नाम्ना सन्निपातः सुदारुणः ॥

मध्यम वात, हीनपित्त व अधिक कफ अशा दोषांनीं जो सन्निपात होतो त्यांत त्या दोषाला अनुसरून त्या दोषानुरूप लक्षणें होतात. ह्यामध्यें विशेषतः अंतर्दाह असतो. त्याला बोलण्याची शक्ति नसते. तोंड अळित्याप्रमाणें लाल होतें. मोठ्या यत्नानें खाकरलें असतांही छातींत अडकलेला कफ निघत नाहीं. कुशीमध्यें बाणानें वेधल्याप्रमाणें पीडा होते. हृदयामध्यें टोचल्याप्रमाणें किंवा उकरल्याप्रमाणें पीडा होते. डोळ्यावर झांपड असते. थकवा, श्वास, उचकी,

हीं प्रतिदिवशीं वाढत असतात. जीभही भाजल्याप्रमाणें व खरखरीत होते. घशांत कूस आडकल्याप्रमाणें खवखवतें. त्याला मलमूत्रांचे वेग आलेले कळत नाहींत. तो पारठ्याप्रमाणें किंवा होल्याप्रमाणें घुमतो. कफ वाढतो. कोठा व टाळा हीं शुष्क होतात. त्याला अतिशय तंद्रा व झोप असते. त्याच्या अंगावरील कांति व वाणी हीं नष्ट होतात. किंवा अतिशय ग्लानि नसते व विपरीत पदार्थांची इच्छा करतो. बहुतकरून त्याचें अंग ताठतें व थुंकींतून थोडें थोडें रक्त पडतें. ह्याला कर्कोटक सन्निपात म्हणतात. हा फार भयंकर आहे.

वैदारिक सन्निपाताचें लक्षण.

हीनमध्यप्रवृद्धैस्तु वातपित्तकफैश्च यः ॥
तेन रोगास्त एवोक्ता यथादोषबलाश्रयाः ॥ १ ॥
अल्पशूलं कटीतोदो मध्यो दाहो रुजा भ्रमः ॥
भृशं क्लमः शिरोवक्रमन्याहृदयवाग्रुजः ॥ २ ॥
प्रमीलकश्वासहिक्काकासजाड्यविसंज्ञता ॥
प्रथमोत्पन्नमेतं तु साधयन्ति कदाचन ॥ ३ ॥
एतस्मिन्सन्निवृत्ते तु कर्णमूले सुदारुणः ॥
पीटिका जायते जंतोर्यया कृच्छ्रेण जीवति ॥ ४ ॥
स वैदारिकसंज्ञोऽयं सन्निपातः सुदारुणः ॥
त्रिरात्रात्परमेतस्य व्यर्थमौषधकल्पनाः ॥ ५ ॥

हीनवात, मध्यमपित्त व अधिक कफ अशा दोषांनीं जो सन्निपात होतो त्यांत दोषाला अनुसरून लक्षणें होतात. शिवाय किंचित् शूळ, कमरेंत वेदना, मध्यम दाह, अंग ठणकणें, भ्रम, अतिशय थकवा, मस्तक, तोंड, मान, हृदय ह्या ठिकाणीं वेदना, बोलतांना वेदना, डोळ्यांवर झापड, श्वास, उचकी, खोकला, जडत्व, वस्तूविषयीं अज्ञान, हीं सर्व लक्षणें आरंभींच उत्पन्न झालीं असतां साध्य होत नाहींत. आणि हीं लक्षणें कमी झाल्यावर कानाच्या मागें गाठ येते. ती आली असतां तो कष्टानें जगतो. हा वैदारिक नांवाचा सन्निपात फार भयंकर आहे. तीन दिवस गेल्यावर ह्याजवर औषधांची योजना करणें व्यर्थ आहे.

सन्निपाताचे प्रकार.

अम्लस्निग्धोष्णतीक्ष्णैः कटुमधुरसुरातापसेवाकषायैः
कामक्रोधातिरूक्षैर्गुरुतरपिशिताहारसौहित्यशीतैः ।
शोकव्यायामचिन्ताग्रहगणवनितात्यन्तसङ्गप्रसङ्गैः
प्रायः कुप्यन्ति पुंसां मधुसमयशरद्वर्षणे संनिपाताः ॥ १ ॥

आंबट, स्निग्ध, उष्ण, तीक्ष्ण, तिखट, गोड, तुरट असे पदार्थ, मद्य, ऊन, काम, क्रोध, अतिशय रूक्ष पदार्थ, अतिशय जड अन्न, अतिशय जड मांस, आकंठ भोजन, अतिशय थंड पदार्थांचें सेवन, शोक, व्यायाम, काळजी, पिशाच्चादिकांची बाधा, व स्त्रीसंग ह्या सर्वांच्या अतिसेवनानें बहुतकरून वसंतऋतु, शरद्ऋतु व वर्षाऋतु ह्या कालामध्यें प्रायः मनुष्याचे तीनही दोष एकदम कुपित होतात.

अन्यग्रंथांतील त्यांचीं नावें.

संधिकश्चान्तकश्चैव रुग्दाहश्चित्तविभ्रमः ।
शीताङ्गस्तन्द्रिकश्चैव कण्ठकुब्जश्च कर्णकः ॥ २ ॥
विख्यातो भुग्ननेत्रश्च रक्तष्ठीवी प्रलापकः ।
जिह्वकश्चेत्यभिन्यासः संनिपातास्त्रयोदश ॥ ३ ॥

संधिक, अंतक, रुग्दाह, चित्तविभ्रम, शीतांग, तंद्रिक, कंठकुब्ज, कर्णक, भुग्ननेत्र, रक्तष्ठीवी, प्रलापक, जिव्हक, आणि अभिन्यास असे तेरा सन्निपात आहेत.

संधिके वासराः सप्त चान्तके दश वासराः ।
रुग्दाहे विंशतिर्ज्ञेया वह्न्यष्टौ चित्तविभ्रमे ॥ ४ ॥
पक्षमेकं तु शीताङ्गे तन्द्रिके पञ्चविंशतिः ।
विज्ञेया वासराश्चैव कण्ठकुब्जे त्रयोदश ॥ ५ ॥
कर्णके च त्रयो मासा भुग्ननेत्रे दिनाष्टकम् ।
रक्तष्ठीविनि दिग्घस्राः प्रलापे स्युश्चतुर्दश ॥ ६ ॥
जिह्वके षोडशाहानि पक्षोऽभिन्यासलक्षणे ।
परमायुरिदं प्रोक्तं म्रियते तत्क्षणादपि ॥ ७ ॥

संधिक सन्निपाताची मुदत सात दिवस, अंतकाची दहा दिवस, रुग्दाहाची वीस, चित्तभ्रमाची चोवीस, शीतांगाची पंधरा दिवस, तंद्रिकाची पंचवीस दिवस, कंठकुब्जाची तेरा दिवस, कर्णकाची तीन

महिने, भुग्ननेत्राची आठ दिवस, रक्तष्ठीवीची दहा दिवस, प्रलापकाची चौदा दिवस, जिव्हकाची सोळा दिवस, आणि अभिन्यास सन्निपाताची मुदत पंधरा दिवस, ही सन्निपात झालेल्या रोग्याची जगण्याची कमाल मुदत आहे. तरी रोगी तात्काळ देखील मरतो.

साध्यासाध्य सन्निपात.

संधिकस्तंन्द्रिकश्चैव कर्णकः कण्ठकुब्जकः ।
जिह्वकश्चित्तविभ्रंशः षट् साध्याः सप्त मारकाः ॥ ८ ॥

संधिक, तंद्रिक, कर्णक, कंठकुब्ज, जिव्हक आणि चित्तभ्रम हे सहा सन्निपात साध्य असून बाकी राहिलेले सात असाध्य आहेत.

त्यांचीं वेगवेगळीं लक्षणें.

पूर्वरूपकृतशूलसंभवं शोषवातबहुवेदनान्वितम् ॥
श्लेष्मतापबलहानिजागरं संनिपातमिति संधिकं वदेत् ॥ ९ ॥

संधिक सन्निपात होण्याच्या पूर्वीं शूल उत्पन्न होतो; तहान लागते; वातासंबंधीं अतिशय पीडा होते; कफ वाढतो; ताप फार असतो; शक्ति क्षीण होते व झोंप येत नाहीं. हीं लक्षणें ज्यामध्यें होतात त्याला "संधिक सन्निपात" असें म्हणतात.

दाहं करोति परितापनमातनोति
मोहं ददाति विदधाति शिरःप्रकम्पम् ।
हिक्कां तनोति कसनं च समाजुहोति ।
जानीहि तं विबुधवर्जितमन्तकाख्यम् ॥ १० ॥

ज्या सन्निपातामध्यें दाह होतो, ताप अतिशय कडक असतो, मूर्च्छा येते, डोकें थरथर कांपतें, उचकी येते व खोकला येतो, त्याला विद्वान वैद्यांनीं असाध्य म्हणून सोडून दिलेला अंतक सन्निपात असें म्हणतात. (ह्याप्रमाणें अंतक सन्निपात असाध्य असल्यामुळें त्याला औषध नाहीं.)

प्रलापपरितापनप्रबलमोहमान्द्यश्रमः ।
परिभ्रमणवेदनाव्यथितकण्ठमन्याहनुः ॥
निरन्तरतृषाकरः श्वसनकासहिक्काकुलः।
स कष्टतरसाधनो भवति हन्ति रुग्दाहकः ॥ ११ ॥

बडबड, तीव्र ताप, अत्यंत मूर्च्छा, मंदपणा, आयासावांचून

श्रम, घेरी, अंगामध्यें वेदना, गळा, मान व हनुवटी ह्या ठिकाणीं व्यथा, निरंतर एकसारखी तहान, श्वास, खोकला व उचकी ह्या लक्षणांनीं युक्त अशा सन्निपाताला रुग्दाह सन्निपात असें म्हणतात. रोग्याला हा बहुतेक मारतोच, कदाचित् झालाच तर फार कष्टानें साध्य होतो.

यदि कथमपि पुंसां जायते कायपीडा
श्रममदपरितापो मोहवैकल्यभावः ।
विकलनयनहासो गीतनृत्यप्रलापोऽ-
भिदधति तमसाध्यं केऽपि चित्तभ्रमाख्याम् ॥१२॥

कोणत्याहि प्रकारें शरीराला पीडा होणें, घेरी येणें, उन्मत्तपणा, तापाचा अतिशय जोर किंवा दाह होणें, मूर्च्छा, व्याकुळपणा, डोळे गळल्यासारखे होणें, हसणें, गाणें, नाचणें व बडबडणें, हीं लक्षणें ज्या सन्निपाताध्यें असतात, त्याला चित्तभ्रम सन्निपात असें म्हणतात. कित्येक वैद्य हा असाध्य आहे असें म्हणतात.

हिमसदृशशरीरो वपथुश्वासहिक्का-
शिथिलितसकलाङ्गो खिन्ननादोग्रतापः ।
क्लमथुदवथुकासच्छर्दतीसारयुक्त-
स्त्वरितमरणहेतुः शीतगात्रः प्रभावात् ॥१३॥

शरीर बर्फाप्रमाणें गार असणें, अंग थरथर कांपणें, श्वास, उचकी, सर्व अंग शिथिल होणें, स्वर खोल जाणें, अभ्यंतरीं तापाचा अतिशय जोर असणें, थकवा, मनांत काळजी करणें, खोकला, ओकारी, व अतिसार, हीं लक्षणें ज्या सन्निपातांत असतात त्याला शीतांग सन्निपात असें म्हणतात. हा आपल्या प्रभावानें मृत्यूला त्वरित कारण होतो. हा शीतांग सन्निपात असाध्य आहे.

प्रभूता तन्द्रार्तिज्वरकफपिपासाकुलतरो ।
भवेच्छयामा जिह्वा पृथुलकठिना कण्टकवृता ॥
अतीसारश्वासक्लमथुपरितापश्रुतिरुजो ।
भृशं कण्ठे जाड्यं शयनमनिशं तन्द्रिकगदे ॥ १४ ॥

अतिशय तंद्रा, अंग ठणकणें, ज्वर, कफ व तहान ह्यांनीं व्याकूळ असणें, हीं लक्षणें असून जीभ काळी, जाड, कठीण व काटे

झालेली असते. अतिसार, श्वास, थकवा, दाह, कानांत ठणका, घसा अतिशय जड होणें, व रात्रंदिवस झोंप, हीं लक्षणें तंद्रिक सन्निपातामध्यें असतात.

शिरोर्तिकण्ठग्रहदाहमोहकम्पज्वरारक्तसमीरणार्तिः।
हनुग्रहस्तापविलापमूर्च्छाः स्यात्कण्ठकुब्जः खलु कष्टसाध्यः॥

मस्तक दुखणें, गळा जखडल्याप्रमाणें होणें, दाह, मूर्च्छा, अंग कापणें, ज्वर, रक्त व वातसंबंधीं पिडा, हनुवटी जखडल्या प्रमाणें होणें, संताप, बडबडणें व मूर्च्छा ह्या लक्षणांनीं युक्त सन्नि-पाताला कंठकुब्ज सन्निपात असें म्हणतात. हा कष्टसाध्य आहे.

प्रलापश्रुतिहासकण्ठग्रहाङ्गव्यथाश्वासकासप्रसेकप्रभावम्।
ज्वरस्तापकर्णान्तयोर्गल्लपीडा बुधाः कर्णकं कष्टसाध्यं वदन्ति १६

बडबड, बहिरेपणा, गळा जखडल्यासारखें होणें, अंग ठण-कणें, श्वास, खोकला, तोंडाला पाणी सुटणें, ज्वर, अंगाचा दाह कानामध्यें व गालामध्यें पीडा, ह्या लक्षणांनीं युक्त सन्निपाताला कर्णक सन्निपात असें म्हणतात. विद्वान वैद्य हा कष्टसाध्य आहे असें म्हणतात.

संनिपातज्वरस्यांते कर्णमूले सुदारुणः॥
शोथः संजायते तेन कश्चिदेव प्रमुच्यते ॥ १७ ॥

सन्निपात ज्वराच्या शेवटीं कानाच्या मागें गड्ड्याजवळ भयंकर सूज येते. ती आली असतां त्यांतून क्वचित् एखादा वांचतो.

ज्वरस्य पूर्वं ज्वरमध्यतो वा ज्वरांततो वा श्रुतिमूलशोथः॥
क्रमादसाध्यः खलु कष्टसाध्यः सुखेन साध्यो मुनिभिः प्रदिष्टः १८

ज्वराच्या पूर्वी, ज्वराच्या मधल्या स्थितींत किंवा ज्वराच्या शेवटच्या अवस्थेत जर कानाच्या गड्ड्याजवळ सूज आली तर ती क्रमानें असाध्य, कष्टसाध्य, व सुसाध्य अशी असते.

ज्वरबलापचयः स्मृतिशून्यता श्वसनभुग्नविलोचनमोहितः।
प्रलपनभ्रमकम्पनशोफवांस्त्यजति जीवितमाशु स भुग्नदृक् ॥१९

ज्वर, बलक्षीणता, स्मरणशक्ति नसणें, श्वास, नजर वाकडी होणें, मूर्च्छा, बडबड, भोंवळ, अंग कांपणें व सूज, ह्या लक्ष-णांनीं युक्त अशा सन्निपाताला भुग्ननेत्र सन्निपात असें म्हणतात. भुग्ननेत्र सन्निपात झालेला रोगी त्वरित मृत्यु पावतो.

रक्तष्ठीवी ज्वरवमितृषामोहशूलातिसाराः
हिक्काध्मानभ्रमणदवथुश्वाससंज्ञाप्रणाशाः ।
श्यामा रक्ताधिकतररसना मण्डलोत्थानरूपा
रक्तष्ठीवी निगदित इह प्राणहन्ता प्रसिद्धः ॥ २० ॥

थुंकींतून रक्त पडणें, ज्वर, ओकारी, तहान, मूर्च्छा, शूळ, अतिसार, उचकी, पोट फुगणें, घेरी येणें, काळजी असणें, श्वास, शुद्धीवर नसणें, जीभ अतिशय काळी किंवा लाल असून तिच्यावर मंडलें उठणें, ह्या लक्षणांनीं युक्त अशा सन्निपाताला रक्तष्ठीवी सन्निपात असें म्हणतात. हा प्राणहारक म्हणून प्रसिद्ध आहे.

कम्पप्रलापपरितापनशीर्षपीडाप्रौढप्रभावपवमानपरोऽन्यचिन्ता।
प्रज्ञाप्रणाशविकलः प्रचुरप्रवादः क्षिप्रं प्रयाति पितृपालपदं प्रलापी

अंग कांपणें, बडबडणें, अंगाचा दाह होणें, डोकें दुखणें, प्रौढपणाच्या गोष्टी सांगणें, किंवा प्रौढपणाचा आविर्भाव आणणें, शुचिर्भूतपणाविषयीं आसक्त असणें, दुसऱ्याविषयीं काळजी करणें, बुद्धि भ्रष्ट होणें, व्याकुळ होणें, पुष्कळ गोष्टी सांगणें हीं लक्षणें ज्या सन्निपातामध्यें होतात, त्याला प्रलापक सन्निपात असें म्हणतात. हा सन्निपात झालेला मनुष्य लवकरच यमसदनाला जातो.

श्वसनकासपरितापविह्वलः कठिनकण्टकवृतातिजिह्वकः ।
बधिरमूकबलहानिलक्षणो भवति कष्टतरसाध्यजिह्वकः ॥२२॥

श्वास, खोकला, अंगाचा दाह, व्याकुळपणा, कठीण व काटे आलेली अशी जीभ असणें, ऐकूं न येणें, बोलतां न येणें व शक्ति क्षीण होणें ह्या लक्षणांनीं युक्त सन्निपाताला जिव्हक सन्निपात असें म्हणतात. हा अतिशय कष्टसाध्य आहे.

दोषत्रयस्निग्धमुखत्वनिद्रावैकल्यनिश्चेतनकष्टवाग्मी ।
बलप्रणाशः श्वसनादिनिग्रहोऽभिन्यास उक्तो ननु मृत्युकल्पः २३

तिन्हीही दोषांच्या कोपानें तोंड स्निग्ध दिसणें, झोंप येणें, व्याकुळपणा, कांहींएक हालचाल न करितां निचेष्ट पडणें, कष्टानें एखादा शब्द बोलणें, शक्तीचा ऱ्हास होणें व श्वासादिकांचा रोध होणें ह्या लक्षणांनीं युक्त अशा सन्निपाताला अभिन्यास सन्निपात म्हणतात. जवळजवळ हा मृत्युरूप आहे.

वाताधिकादिकांचीं लक्षणें.

श्वासः कासो भ्रमो मूर्छा प्रलापो मोहवेपथू ।
पार्श्वयोर्वेदना जृम्भा कषायत्वं मुखस्य च ॥ १ ॥
वातोल्बणस्य लिंगानि संनिपातस्य लक्षयेत् ।
एष बिस्फारको नाम्ना संनिपातः सुदारुणः ॥ २ ॥

श्वास, खोकला, भ्रम, मूर्च्छा, बडबड, शुद्धींत नसणें, अंग कांपणें, दोनी कुशीमध्यें दुखणें, जांभया येणें, तोंडाला तुरटपणा हीं लक्षणें वाताधिक सन्निपातामध्यें असतात. हा विस्फारक नांवाचा सन्निपात फार भयंकर आहे.

अतिसारो भ्रमो मूर्छा मुखपाकस्तथैव च ।
गात्रे च बिन्दवो रक्ता दाहोऽतीव प्रजायते ॥ ३ ॥
पित्तोल्बणस्य लिंगानि संनिपातस्य लक्षयेत् ।
भिषग्भिः संनिपातोऽयमाशुकारी प्रकीर्तितः ॥ ४ ॥

अतिसार, भोवळ, मूर्च्छा, तोंडावर पुटकुळ्या, अंगावर तांबडे टिपके उठणें, अतिशय दाह होणें, हीं लक्षणें पित्ताधिक सन्निपातामध्यें होतात. वैद्यलोक ह्याला आशुकारी सन्निपात असें म्हणतात.

जडता गद्गदा वाणी रात्रौ निद्रा भवत्यपि ।
प्रस्तब्धे नयने चैव मुखमाधुर्यमेव च ॥ ५ ॥
कफोल्बणस्य लिंगानि संनिपातस्य लक्षयेत् ।
मुनिभिः संनिपातोऽयमुक्तः कम्पनसंज्ञकः ॥ ६ ॥

अंगाला जडत्व, अस्पष्ट भाषण, रात्रीं झोंप येत असूनही डोळ्याला ताठपणा असणें, व तोंड गुळमट असणें हीं लक्षणें कफाधिक सन्निपातामध्यें असतात. हा कंपन नांवाचा संन्निपात आहे, असें मुनींनीं सांगितलें आहे.

दोषे विवृद्धे नष्टेऽग्नौ सर्वसंपूर्णलक्षणः ।
संनिपातज्वरोऽसाध्यः कृच्छ्रसाध्यस्ततोऽन्यथा ॥ ७ ॥
सप्तमे दिवसे प्राप्ते दशमे द्वादशेऽपि वा ।
पुनर्घोरतरो भूत्वा प्रशमं याति हन्ति वा ॥ ८ ॥
सप्तमी द्विगुणा यावन्नवम्येकादशी तथा ।
एषा त्रिदोषमर्यादा मोक्षाय च वधाय च ॥ ९ ॥
पित्तकफानिलवृद्ध्या दशदिवसद्वादशाहसप्ताहात् ।
हन्ति विमुञ्चति पुरुषं त्रिदोषजो धातुमलपाकात् ॥ १० ॥

वातादि दोष अतिशय वाढल्यामुळें जठराग्नि नष्ट होऊन सान्निपाताचीं सर्व लक्षणें झालीं तर तो सन्निपात असाध्य समजावा. आणि ह्यामध्यें कांहीं न्यूनता असल्यास तो कष्टसाध्य समजावा. सन्निपात सातव्या दिवशीं, दहाव्या दिवशीं किंवा बाराव्या दिवशीं पुनः भयंकर वाढून रोग्याला मारतो किंवा शांत होतो. सात, नऊ, किंवा अकरा दिवस, तसेंच ह्यांच्या दुप्पट म्हणजे चौदा, अठरा किंवा बावीस दिवस ही त्रिदोषाची मारण्याची किंवा बरें होण्याची मुदत आहे. अनुक्रमें पित्त, कफ, व वात ह्या एक एक दोषाच्या वृद्धीनें झालेला सान्निपात ज्वर अनुक्रमें दहा, बारा, किंवा सात दिवसांमध्यें धातुपाक झाला असतां मनुष्याला मारतो. व मलपाक झाला असतां सोडतो म्हणजे रोगी बरा होतो.

दोषपाकाचीं लक्षणें.

दोषप्रकृतिवैकृत्यं लघुता ज्वरदेहयोः ।
इन्द्रियाणां च वैमल्यं दोषाणां पाकलक्षणम् ॥ ११ ॥

दोषांचें स्वरूप बदलणें, ज्वराचा वेग कमी होणें, शरीर हलकें वाटणें आणि इंद्रियें सुप्रसन्न असणें, हीं दोषांचा पाक झाल्याचीं लक्षणें आहेत.

नाभेरूर्ध्वं हृदोऽधस्तात्पीडिते चेद्व्यथा भवेत् ।
धातोः पाकं विजानीयादन्यथा तु मलस्य च ॥ १२ ॥

बेंबीच्या वर व हृदयाच्या खालीं दाबलें असतां जर व्यथा झाली तर धातुपाक झाला आहे म्हणून समजावें; अन्यथा दोषपाक झाला आहे म्हणून समजावें.

पाकाचें दुसरें लक्षण.

शश्वद्धीन्द्रियपञ्चकस्य पटुता वह्नेश्च यत्र क्रमा- ।
त्तृष्णादिप्रशमो ज्वरस्य मृदुता तं दोषपाकं वदेत् ॥
हृन्नाभ्योररतिवेदनातिसरणं तीव्रो ज्वरस्तृट् क्लमः ।
श्वासाधिक्यमरोचकोऽरतिरिति स्याद्धातुपाकाकृतिः॥१३॥

बुद्धि, पंचज्ञानेंद्रियें व जठराग्नि ह्या सर्वांना प्रफुल्लितपणा येणें, क्रमानें तहान वगैरे दोष कमी कमी होत जाणें व ज्वराला मृदुपणा येणें, हीं लक्षणें झालीं असतां दोषपाक झाला आहे म्हणून सांगावें.

आणि हृदय व बेंबी ह्यांच्यामध्यें अतिशय वेदना, अतिसार, तीव्र ज्वर असणें, तहान, थकवा, श्वास अधिक वाढणें, जिभेला रुचि नसणें व अप्रसन्नता हीं धातुपाकाचीं लक्षणें आहेत.

अभिचाराभिघाताभ्यामभिषङ्गाभिशापतः ।
आगन्तुर्जायते दोषैर्यथास्वं तं विभावयेत् ॥ १४ ॥

जारणमारणादि प्रयोगानें, शस्त्रादिकांच्या आघातानें, देवब्राह्मण इत्यादिकांच्या शापानें, कामशोकादि मानसिक विकारानें किंवा भूतपिशाच्यादिकांच्या बाधेनें दोष कुपित होऊन त्यापासून आगंतुक ज्वर उत्पन्न होतो. त्यांतील दोष त्यांच्या पुढील लक्षणांवरून ओळखावे.

भूतादौषधिगन्धाच्च भयाच्छोकाद्विषेण च ।
कामात्क्रोधाच्च जातो यः सोऽभिषङ्गज्वरः स्मृतः ॥१५॥

भूतबाधेमुळें, औषधांच्या वासामुळें, भय, शोक व विषबाधा ह्यामुळें, तसेंच काम व क्रोध यांच्या अतिरेकामुळें जो ज्वर होतो त्याला अभिषंग ज्वर असें म्हणतात.

श्यावास्यता विषकृते तथाऽतीसार एव च ।
भक्तारुचिः पिपासा च तोदश्च सह मूर्छया ॥ १६ ॥

विषबाधेमुळें झालेल्या ज्वरामध्यें तोंडावर काळसरपणा, अतिसार, अन्नावर अरुचि, तहान, मूर्छा, व अंगाला सुया टोंचल्याप्रमाणें पीडा हीं लक्षणें होतात.

ओषधीगन्धजे मूर्छा शिरोरुग्वमथुस्तमः ।

औषधीच्या वासापासून येणारा जो आगंतुक ज्वर त्यामध्यें मूर्च्छा, कपाळ दुखणें, मळमळणें, व डोळ्याला अंधारी येणें हीं लक्षणें होतात.

कामजे चित्तविभ्रंशस्तन्द्रालस्यमरोचकम् ॥ १७ ॥
हृदये वेदना चाऽऽस्य गात्रं च परिशुष्यति ।
भयात्प्रलापः शोकाच्च भवेत्कोपाच्च वेपथुः ॥ १८ ॥

कामज्वरामध्यें भ्रांति, तंद्रा, आळस, अरुचि व हृदयामध्यें वेदना हीं लक्षणें होऊन शरीर शुष्क होतें. भीतीमुळें व शोकामुळें येणाऱ्या ज्वरामध्यें बडबड फार असते, आणि क्रोधामुळें

येणाऱ्या ज्वरामध्यें अंगांत कापरें भरतें.

अभिचाराभिशापाभ्यां मोहस्तृष्णा च जायते ।
भूताभिषङ्गादुद्वेगो हास्यरोदनकम्पनम् ॥ १९ ॥

जारणमारणादि प्रयोगापासून किंवा शापापासून येणाऱ्या ज्वरामध्यें मूर्च्छा व तहान हीं लक्षणें होतात. भूतज्वरामध्यें उद्वेग, हसणें, रडणें, व अंग कांपणें हीं लक्षणें होतात.

कामशोकभयाद्वायुः क्रोधात्पित्तं त्रयो मलाः ।
भूताभिषङ्गात्कुप्यन्ति भूतसामान्यलक्षणाः ॥ २० ॥

काम, शोक व भय, ह्यांपासून होणाऱ्या ज्वरांमध्यें वातदोष प्रकुपित होतो. क्रोधामुळें येणाऱ्या ज्वरामध्यें पित्त प्रकुपित होतें. आणि भूतज्वरामध्यें तिन्हीही दोष प्रकुपित होऊन त्यांत भूतादिकांचीं उन्माद निदानांत सांगितलेलीं लक्षणें होतात.

प्रशापाच्चाभिघातोत्थश्चेतनाप्रभवस्तु यः ।
रात्र्यह्नोः षट्सु कालेषु प्रेरितेषु यथा पुरा ॥ २१ ॥
प्रसह्य विषमोऽभ्येति मानवं बहुधा ज्वरः ।
स चापि विषमो देहं न कदाचिद्विमुञ्चति ॥ २२ ॥
यस्माद्गौरववैवर्ण्यकार्श्येभ्यो न विमुञ्चति ।
वेगे तु समतिक्रान्ते गतोऽयमिति लक्ष्यते ॥ २३ ॥
शिरसो गौरवं ग्लानिर्नातिश्रद्धाऽतिभोजने ।
माधुर्यमतिवैरस्यं तिक्तत्वमथवा पुनः ॥ २४ ॥
वक्त्रस्य जायते यस्मात्प्रवेशे विगते सति ।
तस्मात्तु नियतो जुष्टः शरीरे विषमज्वरः ॥ २५ ॥
धात्वन्तरस्थो लीनत्वात्सूक्ष्मत्वाद्दुपलभ्यते ।
अल्पदोषेन्धनः क्षीणः क्षीणेन्धन इवानलः ॥ २६ ॥

शाप व अभिघात ह्यापासून दिवस व रात्र मिळून सहा काळामध्यें बहुतकरून मनुष्याला विषमज्वर येतो. तो बहुतकरून मनुष्याच्या देहाला एकदम सोडीत नाहीं. ह्या ज्वरामध्यें अंगाला जडत्व, विवर्णता व कृशत्व हीं लक्षणें होतात. ह्याचा वेग कमी झाला असतां फक्त हा गेला असें वाटतें. मस्तक जड होणें, ग्लानि, जेवणावर फारशी श्रद्धा नसणें, ज्वर येण्यापूर्वीं तोंड गुळमट बेचव असें होणें व तो कमी झाला म्हणजे तोंड कडू होणें, हीं

लक्षणें होतात. हा विषमज्वर नियमित वेळीं येतो. हा शांत होतो तेव्हां रसादि धातूंपैकीं कोणत्या तरी धातूमध्यें लीन होऊन असतो. त्यामुळें इंधन कमी असल्यामुळें जसा अग्नि क्षीण असतो त्याप्रमाणें दोषांच्या न्यूनत्वामुळें ह्याचा वेग कमी असतो.

विषमज्वराचें लक्षण.

दोषोऽल्पोऽहितसंभूतो ज्वरोत्सृष्टस्य वा पुनः ।
धातुमन्यतमं प्राप्य करोति विषमज्वरम् ॥ २७ ॥

अहितकारक आहारविहारादिकांनीं अल्पदोष योग्य वेळीं वाढून कोणत्याही धातूचा आश्रय करून ज्वर उत्पन्न करितात किंव ज्वरांतून उठलेल्या मनुष्याचेही शिल्लक राहिलेले दोष अन्य धातूचा आश्रय करून विषमज्वर उत्पन्न करितात.

क्वचिदुष्णेन शीतेन क्वचिद्रात्रौ क्वचिद्दिवा ।
प्रशमं याति कोपं च ज्वरः स विषमः स्मृतः ॥ २८ ॥

जो एखादा ज्वर उष्ण उपचारानें किंवा शीत उपचारानें शांत होतो किंवा वाढतो तसेंच जो रात्रीं किंवा दिवसा शांत होतो किंवा वाढतो त्याला विषमज्वर असें म्हणावें.

यः स्यादनियतात्कालात् शीतोष्णाभ्यां तथैव च ।
वेगतश्चापि विषमः स ज्वरो विषमः स्मृतः ॥ २९ ॥

तसेंच जो ज्वर शीत किंवा उष्ण उपचारांनीं अनियमित वेळीं येतो व ज्याचा वेगही अनियमित असतो, त्यालाही विषमज्वर असें म्हणावें.

संततः सततोऽन्येद्युस्तृतीयकचतुर्थकौ ।
पञ्चैते विषमाः ख्याताः सन्निपातोद्भवा ज्वराः ॥ ३० ॥

संतत, सतत, अन्येद्यु, तृतीयक व चातुर्थिक ह्या पांच ज्वरांना विषमज्वर असें म्हणतात. हे त्रिदोषापासून उत्पन्न होतात.

संततो रसधातुस्थो रक्तस्थः सततो मतः ।
ज्वरः समभवन्नृणां सोऽन्येद्युः पिशिताश्रितः ॥ ३१ ॥
मेदोगतस्तृतीयेऽह्नि त्वस्थिमज्जागतः पुनः ।
कुर्याच्चातुर्थकं घोरमन्तकं रोगसंकरम् ॥ ३२ ॥

संतत ज्वर रसधातूचा आश्रय करून असतो. सतत ज्वर रक्तधातूचा आश्रय करून होतो. अन्येद्यु ज्वर मांसाचा आश्रय करून

उत्पन्न होतो. मेदोधातूचा आश्रय करून तृतीयक ज्वर उत्पन्न होतो आणि अस्थि व मज्जा ह्यांच्या आश्रयानें राहिलेले दोष अनेक उपद्रवांनीं युक्त व प्राणघातक असा चातुर्थिक ज्वर उत्पन्न करितात.

सप्ताहं वा दशाहं वा द्वादशाहमथापि वा ।
संतत्या योऽविसर्गी स्यात्संततः स निगद्यते ॥ ३३ ॥

सात, दहा किंवा बारा दिवसपर्यंत जो ज्वर सारखा असतो, कमी होत नाहीं, त्याला संतत ज्वर असें म्हणतात.

अहोरात्रे सततको द्वौ कालावनुवर्तते ।
अन्येद्युष्कस्त्वहोरात्रादेककालं प्रवर्तते ॥ ३४ ॥
तृतीयकस्तृतीयेऽह्नि चतुर्थेऽह्नि चतुर्थकः ।
इत्यादयस्तु विज्ञेया ज्वरा नानाविधा बुधैः ॥ ३५ ॥

सततज्वर अहोरात्रींतून दोन वेळ येतो. आणि अन्येद्युष्क अहोरात्रींतून एक वेळ येतो. तृतीयक हा तिसरे दिवशीं म्हणजे एक दिवस आड येतो. आणि चतुर्थक ज्वर हा चवथे दिवशीं म्हणजे दोन दिवस मध्यें टाकून येतो. ह्याप्रमाणें नानाप्रकारचे ज्वर आहेत.

यथा दोषप्रकोपस्तु तथा मन्येत तं ज्वरम् ।
यथा वेगागमे वेलां छादयित्वा महोदधेः ॥ ३६ ॥
वेगहानौ तदेवाम्भस्तत्रैवान्तर्विलीयते ।
दोषवेगोदये तद्वदुदीयेत ज्वरोऽस्य तु ॥ ३७ ॥
वेगहानौ प्रशाम्येत तथाऽम्भः सागरे यथा ।

जसा दोषांचा प्रकोप असेल त्या मानानें तो ज्वर जाणावा. ज्याप्रमाणें भरतीची वेळ येतांच समुद्राचें पाणी समुद्राचें सर्व वाळवंट आच्छादून टाकतें आणि ओहोटीची वेळ झाली असतां पुन्हा स्वस्थानीं येतें, त्याप्रमाणें दोषांना वेग उत्पन्न झाला असतां ज्वर उत्पन्न होतो आणि दोषांचा वेग कमी झाला असतां ज्वर कमी होतो.

श्लेष्मप्रायस्तु पूर्वाह्णे प्रदोषे च प्रवर्तते ॥ ३८ ॥
पित्तप्रायस्तु मध्याह्ने त्वर्धरात्रे प्रवर्तते ।
अपराह्णेऽनिलप्रायः प्रत्यूषे च प्रवर्तते ॥ ३९ ॥

नर्ते वाताद्धि विषमो ज्वरः समुपजायते ।
कफपित्ते च निश्चेष्टे चेष्टयत्यनिलो यतः ॥ ४० ॥
तस्मान्नर्तेऽनिलाद्रोगाः संभवन्ति ज्वरादयः ।
श्लेष्मप्रायस्तु विषमः शीतपूर्वः प्रजायते ॥ ४१ ॥
पित्तप्रायस्तु विषमो दाहपूर्वः प्रजायते ।
वातप्रायस्त्वनियते काले समुपजायते ॥ ४२ ॥

कफदोषापासून येणारा विषमज्वर पूर्वाह्णीं आणि प्रदोषकाळीं म्हणजे रात्रीच्या पहिल्या प्रहरांत येतो. पित्तदोषापासून येणारा ज्वर दोनप्रहरीं आणि मध्यरात्रीं येतो. आणि वातदोषापासून येणारा ज्वर दिवसा तिसरे प्रहरानंतर आणि रात्रीच्या शेवटच्या प्रहरीं येतो. वातदोषाच्या साहाय्यावांचून विषमज्वर येत नाहीं. ज्या अर्थीं कफ व पित्त ह्या दोषांना स्वतःची गति नाहीं, वातामुळें त्यांना गति मिळते, त्याअर्थीं वातदोषाच्या साहाय्यावांचून ज्वरादि रोगच उत्पन्न होत नाहींत. कफाधिक विषमज्वरांत पूर्वी थंडी वाजून मग ज्वर येतो. पित्ताधिक विषमज्वरांत पूर्वीं अंगाचा दाह होऊन मग ज्वर येतो. आणि वातदोषाधिक विषमज्वर अनियमितकाळीं येतो.

कृत्वा चिराद्धि देहस्य क्षिप्रवेपथुमुत्तमम् ।
श्लेष्मपित्ते विदह्येत रसस्थाने यदाऽनिलः ॥ ४३ ॥
तस्मिन्काले मनुष्याणां विषमो जायते ज्वरः ।

ज्या वेळीं वायु हा रसांतर्गत कफ व पित्त दोषांचा विदाह करतो, त्या वेळीं अंगांत अतिशय कापरें भरून मनुष्याला विषमज्वर उत्पन्न होतो.

श्वासो मूर्छारुचिश्छर्दिस्तृष्णातीसारविड्ग्रहाः ॥ ४४ ॥
हिक्का कासोऽङ्गभेदश्च ज्वरस्योपद्रवा दश ।

श्वास, मूर्च्छा, अरुचि, वांति, तहान, अतिसार, मळावरोध, उचकी, खोकला, व अंग फुटणें हे दहा ज्वराचे उपद्रव आहेत.

तन्द्रालस्याविपाकास्यवैरस्यं गुरुगात्रता ॥ ४५ ॥
क्षुन्नाशो बहुमूत्रत्वं स्तब्धता बलवाञ्ज्वरः ।
आमज्वरस्य लिंगानि न दद्यात्तत्र भेषजम् ॥ ४६ ॥
भेषजं ह्यामदोषस्य भूयो जनयति ज्वरम् ।

शोधनं शमनीयं वा करोति विषमज्वरम् ॥ ४७ ॥

तंद्रा, आळस, अपचन, बेचवपणा, अंगाला जडत्व, भूक न लागणें, लघवीला फार होणें, अंग ताठणें, आणि जोराचा ताप हीं लक्षणें आमज्वराचीं आहेत. ह्या आमज्वरामध्यें औषध देऊं नये. दोषांची अपक्वस्थिति असतां औषध दिलें तर ज्वर अधिक वाढतो. तसेंच आमज्वरांत शोधन किंवा शमन करणारें औषध दिलें तर तें विषमज्वर उत्पन्न करितें.

ज्वरवेगोऽधिकस्तृष्णा प्रलापः श्वसनं भ्रमः ।
मलप्रवृत्तिरुत्क्लेशः पच्यमानस्य लक्षणम् ॥ ४८ ॥

ज्वराचा वेग अधिक असणें, तहान, बडबड, श्वास, घेरी घेणें, शौचाला होणें, व ओकारी आल्यासारखी वाटणें, हीं पच्यमान ज्वराचीं लक्षणें आहेत.

क्षुत्क्षामता लघुत्वं च गात्राणां ज्वरमार्दवम् ।
दोषप्रवृत्तिरुत्साहो निरामज्वरलक्षणम् ॥ ४९ ॥

भूक लागणें, शरीर हलकें होणें, ज्वराचा वेग मृदु असणें, दोष आपआपल्या स्थानीं प्रवृत्त असणें, व हुषारी असणें हीं लक्षणें निरामज्वराचीं आहेत.

प्रकाङ्क्षा लाघवं ग्लानिः स्वस्थता सुप्रसन्नता ।
उपद्रवनिवृत्तिश्च सम्यग्लङ्घितलक्षणम् ॥ ५० ॥

कडकडून भूक लागणें, शरीर हलकें होणें, ग्लानि, स्वस्थपणा, मन इंद्रियें वगैरे सुप्रसन्न असणें व ज्वराचे सर्व उपद्रव दूर होणें, हें उत्तम लंघन झाल्याचें लक्षण आहे.

निद्रा तन्द्रा क्लमो भ्रान्तिस्तृष्णा शोषो बलक्षयः ।
उपद्रवाश्च श्वासाद्याः संभवन्त्यतिलंघिते ॥ ५१ ॥

झोंप, तंद्रा, थकवा, भ्रांति, तहान, तोंडाला कोरड, अशक्तपणा, व श्वासादि उपद्रव, हे विकार अतिलंघनामुळें होतात.

स्वेदो लघुत्वं शिरसः कण्डू पाको मुखस्य च ।
क्षवथुश्चान्नकाङ्क्षा च ज्वरमुक्तस्य लक्षणम् ॥ ५२ ॥

घाम येणें, अंग हलकें होणें, मस्तकाला खाज उठणें, तोंडावर पुटकुळ्या उठणें, शिंका येणें व अन्नावर इच्छा होणें हीं लक्षण ज्वरमुक्तीचीं आहेत.

विगतक्लममोहं च त्वस्यर्थं विमलेन्द्रियम् ।
युक्तं प्रकृतिसत्त्वैश्च तं विद्याद्विगतज्वरम् ॥ ५३ ॥

थकवा व मूर्च्छा नाहींशी होणें, इंद्रियें अतिशय स्वच्छ होणें, व तीं आपल्या स्वाभाविक धर्मानें युक्त असणें, हीं लक्षणें ज्याला झालीं आहेत त्याचा ज्वर गेला म्हणून समजावें.

ज्वरमुक्तस्य यस्यापि शिरोरुङ् नैव मुञ्चति ।
अविमुक्तः स विज्ञेयो ज्वरः पुनरुपैति तम् ॥ ५४ ॥

ज्याचा ज्वर गेला असून डोकें दुखणें राहिलें नाहीं, त्याचा ज्वर गेला नाहीं म्हणून समजावें. कारण त्याला पुनः ज्वर येतो.

क्रमाला अनुसरून ज्वराची चिकित्सा.

ज्वरादौ लङ्घनं शस्तं ज्वरमध्ये तु पाचनम् ।
ज्वरान्ते रेचनं प्रोक्तमेतज्ज्वरचिकित्सितम् ॥ १ ॥

ज्वर येतांच प्रथम लंघन देणें प्रशस्त आहे. ज्वराच्या मधल्या स्थितीमध्यें पाचन द्यावें, आणि ज्वराच्या शेवटच्या स्थितीमध्यें रेचन द्यावें. अशा प्रकारें ज्वराची चिकित्सा करावी.

ज्वरे लङ्घनमेवाऽऽदावुपदिष्टमृते ज्वरात् ।
क्षयानिलभयक्रोधकामशोकश्रमोद्भवात् ॥ २ ॥

जरी ज्वराच्या आरंभीं लंघन द्यावें म्हणून सांगितलें आहे, तरी तें क्षय, वातदोष, भय, क्रोध, काम, शोक, व श्रम ह्यांपासून येणारे ज्वर सोडून बाकीच्या ज्वरांत द्यावें.

आमाशयस्थो हत्वाऽग्निं सामो मार्गान्पिधाय यत् ।
विदधाति ज्वरं दोषस्तस्मात्कुर्वीत लंघनम् ॥ ३ ॥
प्राग्रूपेषु ज्वरादौ वा बलं यत्नेन पालयन् ।
बलाधिष्ठानमारोग्यमारोग्यार्थः क्रियाक्रमः ॥ ४ ॥

आमाशयांतील दोष जठराग्नीचा नाश करून आमदोषासह स्रोतसांचे मार्ग आच्छादून ज्वर उत्पन्न करतो, ह्यासाठीं लंघन करावें. (वरील क्षयादिकापासून होणारे ज्वर खेरीज करून) बाकीच्या ज्वरांच्या पूर्वरूपांमध्यें किंवा ज्वराचे आरंभीं शक्तीचा ऱ्हास न होईल अशा बेतानें लंघन द्यावें. कारण आरोग्य हें बलावर अवलंबून आहे. आणि उपचारक्रम हा आरोग्याकरितां आहे. म्हणून रोग्याच्या बळाचें मोठ्या यत्नानें रक्षण करून लंघन द्यावें.

अनवस्थितदोषाग्नेर्लंघनं दोषपाचनम् ।
ज्वरघ्नं दीपनं कांक्षारुचिलाघवकारणम् ॥ ५ ॥

लंघन हें अव्यवस्थित दोषांचें पाचन करून त्याला स्वस्थानीं आणतें. जठराग्नीला प्रदीप्त करितें, ज्वराचा नाश करितें, क्षुधा करितें, तोंडाला रुचि आणतें व शरीराला हलकेपणा आणतें.

न लंघयेन्मारुतजे ज्वरे च क्षयोद्भवे च क्षुधिते च जन्तौ ।
न गुर्विणीदुर्बलबालवृद्धान्भीतांस्तृषार्तानपि सोर्ध्ववातान् ॥ ६ ॥

वातज्वरी मनुष्याला, क्षयापासून होणाऱ्या ज्वरामध्यें, भुकेलेल्या मनुष्याला, तसेंच गर्भिणी, बाल, वृद्ध, अशक्त, तान्हेलेला, भ्यालेला व ज्याला ऊर्ध्ववात आहे अशा मनुष्याला लंघन देऊं नये.

दोषाणामेव सा शक्तिर्लंघने या सहिष्णुता ।
न हि दोषक्षये कश्चित्सहते लंघनं महत् ॥ ७ ॥

लंघन सहन करणें ही दोषांची शक्ति आहे. ते क्षीण झाले असतां त्यांना मोठें लंघन सहन होत नाहीं.

वातजः सप्तरात्रेण दशरात्रेण पित्तजः ।
श्लेष्मजो द्वादशाहेन ज्वरः पाकं प्रपद्यते ॥ ८ ॥

वातज्वर सात रात्री गेल्या म्हणजे पक्क होतो. पित्तज्वर दहा रात्री गेल्या म्हणजे पक्क होतो. कफज्वर बारा दिवसांनीं पक्क होतो.

वाते द्वे पित्तजे चैकं कफे दिनचतुष्टयम् ।
सप्ताहं वातपित्ते च कफपित्ते दश स्मृताः ॥
कफवाते द्वादशाहं त्रिदोषे चैकविंशतिः ॥ ९ ॥

वातज्वर दोन दिवसांनीं पक्क होतो. पित्तज्वर एक दिवसानें पक्क होतो. कफज्वर चार दिवसांनीं पचन होतो. वातपित्तज्वर सात दिवसांनीं पचन होतो. कफपित्तज्वर दहा दिवसांनीं, कफवातज्वर बारा दिवसांनीं व सान्निपातज्वर एकवीस दिवसांनीं पचन होतो. म्हणजे वर ह्या त्या त्या दोषजन्य ज्वराच्या ज्या मुदती सांगितल्या आहेत, त्या होईपर्यंत तो ज्वर "साम" असतो असें समजावें.

आसप्तरात्रं तरुणं ज्वरमाहुर्मनीषिणः ।
मध्यं द्वादशरात्रं तु पुराणमत उत्तरम् ॥ १० ॥
सप्ताहेन तु पच्यन्ते सप्तधातुगता मलाः ।

निरामश्चाप्यतः प्रोक्तो ज्वरः प्रायोऽष्टमेऽहनि ॥ ११ ॥

ज्वराला सात दिवस होईपर्यंत तरुण आहे असें समजावें. बारा दिवसपर्यंत मध्यम व त्यापुढें त्याला पुराणज्वर असें म्हणावें. रसादि सातीहि धातूंच्या आश्रयानें असलेले दोष सात दिवसांमध्यें पचन होतात. ह्यासाठीं आठवे दिवशीं ज्वर निराम झाला असें म्हणतात.

सर्वज्वरेषु दातव्यः कषायः सप्तमेऽहनि ।
अथवा लङ्घयेत्तावद्यावदारोग्यदर्शनम् ॥ १२ ॥
न कषायं प्रशंसन्ति कदाचित्तरुणे ज्वरे ।
कषायेणाऽऽकुलीभूता दोषा जेतुं सुदुस्तराः ॥ १३ ॥

सर्व प्रकारच्या ज्वरामध्यें सातवे दिवशीं काढा द्यावा. किंवा रोग्याला आरोग्य वाटेपर्यंत म्हणजे ज्वर कमी होईपर्यंत लंघन द्यावें. तुरट औषधांच्या काढ्यानें व्याकूळ झालेले दोष जिंकण्याला फार कठीण जातात. म्हणून तरुण ज्वरामध्यें तसा काढा देण्याविषयीं कोणी प्रशंसा करीत नाहीं.

सर्वज्वरेषु सप्ताहे मात्रया लघु भोजयेत् ।
वेगापायेऽन्यथा तद्धि ज्वरवेगं विवर्धयेत् ॥ १ ॥
क्षुत्संभवति पक्वेषु दोषधातुमलेषु च ।
काले वा यदि वाऽकाले सोऽन्नकाल उदाहृतः ॥ २ ॥

सर्व ज्वरामध्यें सातवे दिवशीं हलकें अन्न प्रमाणांत देऊन रोग्यास जेवूं घालावें. ह्याप्रमाणें जर केलें नाहीं तर ज्वराच्या वेगाला अपाय होऊन ज्वराचा वेग वाढतो. वातादि दोष मळमूत्रादि मल व रसादि धातु हे पक्व झाले असतां क्षुधा उत्पन्न होते. मग ती वरील सात दिवसांनंतर होवो अथवा पूर्वीं होवो, तो अन्नकाल समजावा.

ज्वरितं ज्वरमुक्तं वा दिनान्ते भोजयेल्लघु
श्लेष्मक्षयप्रवृद्धोष्मा बलवाननलस्तदा ॥ १ ॥
यथोचितेऽथवा काले देशसात्म्यानुरोधतः ।
प्रागल्पवह्निर्भुञ्जानो न ह्यजीर्णेन पीड्यते ॥ २ ॥
कषायपानपथ्यान्नैर्दशाह इति लंघिते ।
ऊष्मा पित्तादृते नास्ति ज्वरो नास्त्यूष्मणा विना ॥ ३ ॥
तस्मात्पित्तविरोधीनि त्यजेत्पित्ताधिकेऽधिकम् ।
स्नानाभ्यङ्गप्रदेहांश्च परिशेषं च लंघनम् ॥ ४ ॥

अजीर्ण इव शूलघ्नं सामे तीव्ररुजि ज्वरे ।
न पिबेदौषधं तद्धि भूय एवाऽऽममावहेत् ॥ ५ ॥
तिक्तः पित्ते विशेषेण प्रयोज्यः कटुकः कफे ।
पित्तश्लेष्महरत्वेपि कषायस्तु न शस्यते ॥ ६ ॥
नवज्वरे मलस्तम्भात्कषायो विषमज्वरम्
कुरुतेऽरुचिहृल्लासहिध्माध्मानादिकानपि ॥ ७ ॥

ज्वर आलेला असो अथवा ज्वरांतून मोकळा झालेला असो, त्याला दिवसाच्या शेवटच्या प्रहरांत हलकें भोजन द्यावें. कारण त्या वेळीं कफाचें प्राबल्य नसल्यामुळें उष्णता वाढलेली असते, म्हणून जठराग्नि बलवान असतो. किंवा देश व नित्याची संवय ह्याला अनुसरून जठराग्नीची शक्ति कमी होण्यापूर्वीं जेवलें असतां अजीर्णापासून पीडा होत नाहीं. ह्याप्रमाणें काढा घेऊन व पथ्य अन्न सेवन करून दहा दिवस गेल्यावर, पित्तदोषावांचून उष्मा नाहीं व उष्णतेवांचून ज्वर नाहीं, ह्यासाठीं ज्वरामध्यें व विशेषतः पित्ताधिक ज्वरामध्यें पित्ताला विरोध आणणारीं द्रव्यें सेवन करूं नयेत. स्नान, अभ्यंग, अंगास उटी लावणें आणि उपोषणाखेरीज बाकीचीं लंघनें हीं ज्वरामध्यें वर्ज करावींत. तीव्र वेदनायुक्त अशा अजीर्णामध्यें ज्याप्रमाणें शूलनाशक औषध देत नाहींत त्याप्रमाणें आमज्वरामध्यें औषध सेवन करूं नये. जर केलें तर तें पुनः आमाची जास्तच वृद्धि करितें. ज्वरामध्यें पित्तदोष अधिक असतां कडू औषधांची योजना करावी आणि कफदोष अधिक असतां तिखट औषधांची योजना करावी. तुरट औषधें जरी कफपित्तनाशक आहेत तरी त्यांची योजना ज्वरामध्यें करूं नये. कारण तुरट औषधें मलाचें स्तंभन करणारीं असल्यामुळें तीं नवज्वरामध्यें घेतलीं असतां विषमज्वर उत्पन्न करितात. शिवाय अरुचि, मळमळ, उचकी व पोट फुगणें हे विकार उत्पन्न करितात.

सप्ताहादौषधं केचिदाहुरन्ये दशाहतः ।
केचिल्लघ्वन्नभुक्तस्य देयमामोल्बणे न तु ॥ ८ ॥

कित्येकांच्या मतानें ज्वराला सातवे दिवशीं औषध द्यावें. कित्ये-

कांच्या मतानें दहावे दिवशीं द्यावें. कित्येकांच्या मतानें थोडें हलकें अन्न खाल्ल्यावर द्यावें. परंतु आमदोषाधिक ज्वरांमध्यें मात्र औषध केव्हांही देऊं नये.

तीव्रज्वरपरीतस्य दोषवेगोदये यतः।
दोषेऽथवाऽतिनिचिते तन्द्रास्तैमित्यकारिणि ॥ ९ ॥
अपच्यमानं भैषज्यं भूयो जनयति ज्वरम्।

तीव्र ज्वरानें पीडित अशा रोग्यास दोषांचा अतिशय प्रकोप झाला असतां किंवा दोषांचा संचय होऊन तंद्रा व ओल्या वस्त्रानें अंग गुंडाळल्यासारखें वाटणें हीं लक्षणें झालीं असतां औषध दिलें तर त्याचें पचन न झाल्यामुळें तें अधिकच ज्वर वाढवितें.

मृदुर्ज्वरो लघुर्देहश्चलिताश्च मला यदा।
अचिरज्वरितस्यापि भेषजं योजयेत्तदा ॥ १० ॥

ह्यासाठीं ताप कमी होऊन अंग हलकें झालें व मल चलित झाले असतां ताप येऊन जरी फार दिवस झाले नसले तरी देखील औषधाची योजना करावी.

षड्दशद्वादशाहेषु व्यतीतेषु क्रमेण वै।
वातपित्तकफातङ्केष्वन्नकाला इमे त्रयः ॥ १ ॥
द्वंद्वजे संनिपाते च व्याधावारोग्यदर्शने।
सति यवागूयूषादि कल्पयेदातिनैपुणात् ॥ २ ॥
मुद्गान्मसूरांश्चणकान्कुलत्थान्मकुष्ठकान्पाचनयूषहेतून्।
हितान्हितानां विहितांश्च पेयान्दद्याद्यवागूमपि पाचनैः स्वैः ॥ ३

अनुक्रमें वात, पित्त व कफ ह्या दोषांपासून येणाऱ्या ज्वराला सहा, दहा व बारा दिवसानंतर अन्न देण्याचा काल सांगितला आहे; म्हणजे तितके दिवसपर्यंत लंघन करावें. आणि दोन दोषांपासून होणाऱ्या ज्वराला व सन्निपातापासून येणाऱ्या ज्वराला आरोग्याचीं चिन्हें दिसूं लागेपर्यंत लंघन देऊन नंतर मोठ्या चातुर्यानें कण्हेरी किंवा पेज ह्यांची योजना करावी. ज्वराचें पाचन करण्यास योग्य अशा मसुरा, हरभरे, हुलगे, मटक्या वगैरे धान्यांचें यूष, पेज किंवा कण्हेरी त्या त्या दोषानुरूप पाचनद्रव्यांनीं तयार करून द्यावी.

नवज्वरे दिवास्वापस्नानभोजनमैथुनम् ।
क्रोधप्रवातव्यायामकषायांश्च विवर्जयेत् ॥ १ ॥

नुकत्याच आलेल्या ज्वरामध्यें दिवसा झोंप घेणें, स्नान करणें, जेवणें, मैथुन, रागावणें, वारा घेणें, व्यायाम, व तुरट पदार्थ वर्ज करावेत.

निर्वातभवने वासमुष्णवारिनिषेवणम् ।
अभूरिजल्पं निष्क्रोधकामशोकं च रोगिणम् ॥ २ ॥
कुर्यादारोग्यसंपन्नं शीघ्रं वैद्यो विचक्षणः ।

ज्याला ज्वर आला आहे त्याला निवांत अशा स्थळीं ठेवावें. ऊन पाणी प्यावयास द्यावें. त्याला फार बोलूं देऊं नये. त्याला काम, क्रोध किंवा शोक हे विकार होऊं देऊं नयेत. अशा प्रकारें रोग्याला ठेवून चाणाक्ष वैद्यानें त्याला त्वरित आरोग्यसंपन्न करावें.

कफमेदोनिलामघ्नं दीपनं बस्तिशोधनम् ॥ ३ ॥
कासश्वासज्वरहरं पथ्यमुष्णोदकं सदा ।

ऊन पाणी कफ, मेद व वात ह्यांचा नाश करितें. तें अग्नि-दीपक असून बस्तीचें शोधन करितें. खोकला, श्वास व ज्वर ह्यांचा नाश करणारें असून तें नेहमीं पथ्यकारक आहे.

यत्क्वाथ्यमानं निर्वेगं निष्फेनं निर्मलं भवेत् ॥ ४ ॥
अर्धावशिष्टं भवति तदुष्णोदकमुच्यते ।

थंड पाणी चुलीवर ठेवून कढवावें. तें कढत असतां अर्धें आट-ल्यावर चुलीवरून खालीं उतरून ठेवावें. त्याजवरील उकळ्या व फेस नाहींसा झाला म्हणजे त्याला उष्णोदक असें म्हणतात.

तत्पादहीनं वातघ्नमर्धहीनं तु पित्तनुत् ॥ ५ ॥
त्रिपादहीनं श्लेष्मघ्नं पाचनं दीपनं लघु ।

पाणी तापवून चवथाई आटवून घेतलें असतां तें वातनाश करितें. अर्धें आटवून घेतलें असतां तें पित्तदोषाचा नाश करितें. आणि तीन भाग आटवून एक भाग उरविलेलें पाणी कफाचा नाश करितें.

द्वंद्वजे संनिपाते च ज्वरे पथ्यं तदार्तिजित् ॥ ६ ॥
शरदि त्वर्धपादोनं पादहीनं तु हैमने ।
शिशिरे च वसन्ते च ग्रीष्मे चार्धावशेषितम् ॥ ७ ॥

विपरीते ऋतौ तद्वत्प्रावृष्यष्टावशेषितम् ।
भिनत्ति श्लेष्मसंघातं मारुतं चापकर्षति ॥ ८ ॥
अजीर्णं जरयत्याशु पीतमुष्णोदकं निशि ।
धारापातेन विष्टम्भि दुर्जरं पवनाहतम् ॥ ९ ॥
शृतशीतं त्रिदोषघ्नं बाह्यान्तर्भावशीतलम् ।
दिवा शृतं तु यत्तोयं रात्रौ तद्गुरुतां व्रजेत् ॥ १० ॥
रात्रौ शृतं तु दिवसे गुरुत्वमधिगच्छति ।
तप्तायःपिण्डसंसिक्तं लोष्ठनिर्वापितं जलम् ॥ ११ ॥
सर्वदोषहरं पथ्यं सदा नैरुज्यकारकम् ।

शरद्ऋतूमध्यें पाणी तापवून आठवा हिस्सा आटवून घ्यावें. हेमंतऋतूमध्यें चवथाई आटवून घ्यावें. शिशिर, वसंत व ग्रीष्मऋतूमध्यें अर्धं आटवून घ्यावें. विपरीत ऋतूमध्यें व पावसाळ्यांत पाणी आटवून एक अष्टमांश उरवून घ्यावें. तें कफाच्या समुदायाचें भेदन करितें व वाताचा नाश करितें. रात्रीं ऊन पाणी प्यालें असतां तें अजीर्णाला दूर करितें. पाण्याची धार धरून घेतलेलें पाणी अवष्टंभ करितें. कांहीं वेळ वाऱ्यांत ठेवून घेतलेलें पाणी लवकर पचन होत नाहीं. तापवून थंड केलेलें पाणी त्रिदोषनाशक असून अंतर्बाह्य शीतळ असतें. दिवसा तापविलेलें पाणी रात्रीं जड होतें, आणि रात्रीं तापविलेलें पाणी दिवसा जड होतें. तापलेला लोखंडाचा गोळा अथवा तापवून लाल केलेलें मातीचें ढकूळ पाण्यांत विझवून घेतलेलें पाणी सर्वदोषनाशक, पथ्यकारक व नेहमीं आरोग्यदायक आहे.

उष्णीकृतं जलं पथ्यं दोषतृट्कासजिल्लघु ॥ १२ ॥
शृतशीतं जलं पथ्यं त्रिदोषशमनं लघु ।
नवज्वरे प्रतिश्याये पार्श्वशूले गलग्रहे ॥ १३ ॥
सद्यःशुद्धौ तथाऽऽध्माने व्याधौ वातकफोद्भवे ।
अरुचिग्रहणीगुल्मश्वासकासेषु विद्रधौ ॥ १४ ॥
हिक्कायां स्नेहपाने च पिबेदुष्णं जलं नरः ।

ऊन केलेलें पाणी पथ्यकारक व हलकें असून तें वातादिदोष व तहान ह्यांना जिंकतें. तापवून थंड केलेलें पाणी पथ्यकारक, त्रिदोषशामक व हलकें असतें. नवज्वर, पडसें, बरगड्यांतील शूल,

घशाचा अवरोध, वमनादिकांनीं नुकताच शुद्ध झालेला, पोट फुगलेला, ह्यांना व वातकफजन्य विकार, अरुचि, संग्रहणी, गुल्म, श्वास, खोकला, विद्रधि व उचकी ह्या विकारांमध्यें व स्नेहपान केलें असतां मनुष्यानें ऊन पाणी प्यावें.

अरोचके प्रतिश्याये प्रसेके श्वयथौ क्षये ॥ १५ ॥
मन्दाग्नावुदरे कुष्ठे ज्वरे नेत्रामये तथा ।
व्रणे च मधुमेहे च पानीयं मन्दमाचरेत् ॥ १६ ॥

अरुचि, पडसें, मळमळणें, सूज, भय, अग्निमांद्य, उदर, कुष्ठ, ज्वर, नेत्रविकार, व्रण व मधुमेह ह्या विकारांमध्यें पाणी थोडें प्यावें.

मूर्छापित्तोष्णदाहेषु विषमे च मदात्यये ।
भ्रमक्लमपरीतेषु मार्गोत्थे वमथौ तथा ॥
ऊर्ध्वगे रक्तपित्ते च शीतमम्भः प्रशस्यते ॥ १७ ॥

मूर्च्छा, पित्त, उष्णता, दाह, विषमज्वर, मदात्यय, घेरी येणें, थकवा, अतिशय मार्गक्रमणामुळें आलेला थकवा, ओकारी व तोंडावाटे पडणारें रक्तपित्त ह्या विकारांमध्यें थंड पाणी पिणें प्रशस्त आहे.

पानीयं पानीयं शरदि वसन्ते च पानीयम् ।
नादेयं नादेयं शरदि वसन्ते च नादेयम् ॥ १८ ॥

शरदृतूमध्यें पाणी यथेच्छ प्यावें. तेंच वसंतऋतूमध्यें पाणी थोडें प्यावें. शरदृतूमध्यें नदीचें पाणी पिण्यास हरकत नाहीं. परंतु वसंतऋतूमध्यें मात्र नदीचें पाणी पिऊं नये.

अन्य ग्रंथांतूनही म्हणलें आहे.

अमर्मोपहते देशे शिरासंध्यस्थिवर्जिते ।
वर्षावसन्तसमये कौपं वारि प्रशस्यते ॥
अम्भः शरदि ताडागं नादेयमृतुषु त्रिषु ॥ १ ॥

शिरा, सांधे व हाडें वर्ज करून मर्मरहित अशा ठिकाणीं आघात झाला असतां व वर्षा आणि वसंतऋतूमध्यें विहिरीचें पाणी पिण्याला प्रशस्त आहे. शरदृतूमध्यें तळ्याचें पाणी प्रशस्त आहे, आणि बाकीच्या तीन ऋतूंमध्यें नदीचें पाणी अमृताप्रमाणें पिण्यास प्रशस्त आहे.

उत्तमस्य पलं मात्रा त्रिभिरक्षैश्च मध्यमा ।
जघन्यस्य पलार्धेन स्नेहकार्थौषधेषु च ॥ २ ॥

कर्षश्चूर्णस्य कल्कस्य गुटिकानां च सर्वशः ।
द्रवः शुक्त्याऽवलेढव्यः पातव्यश्च चतुर्द्रवः ॥ ३ ॥
मात्रा मधुघृतादीनां क्वाथे स्नेहेषु चूर्णवत् ।
द्विचत्वारिंशता माषैरष्टादशकबद्धकैः ॥ ४ ॥
पलं द्वादशबद्धं स्याद् गुञ्जाषट्कसमन्वितम् ।

तेल, तूप, काढा वगैरे औषधांची मात्रा चार तोळ्यांपर्यंतची असणें उत्तम, तीन तोळ्यांची मध्यम आणि दोन तोळ्यांची मात्रा कनिष्ट समजावी. सर्व प्रकारचीं चूर्णें, कल्क व गुटिका ह्यांचें प्रमाण एक तोळ्याचें असावें. चाटून खातां येईल अशा अवलेहादि औषधांचें प्रमाण दोन तोळ्यांचें असावें. पितां येईल अशा पातळ औषधाचें प्रमाण आठ तोळे असावें. तेल, काढा ह्यांमध्यें तूप, मध वगैरे घालावयाचें झाल्यास त्यांचें प्रमाण चूर्णाइतकें म्हणजे एक तोळ्याचें असावें. बेचाळीस मासे किंवा अठरा बद्धक म्हणजे पल. कित्येक बारा बद्धक व सहा गुंजाचेंही पल मानतात.

क्वाथ्यद्रव्यपले वारि द्विरष्टगुणमिष्यते ॥ ५ ॥
चतुर्भागावशेषं तु पेयं पलचतुष्टयम् ।
दीप्तानलं महाकायं पाययेदञ्जलिं जलम् ॥ ६ ॥
अन्ये त्वर्धं परित्यज्य प्रसृतं तु चिकित्सकाः ।
क्वाथत्यागमनिच्छन्तस्त्वष्टभागावशेषितम् ॥ ७ ॥
पारम्पर्योपदेशेन वृद्धवैद्याः पलद्वयम् ।
पाययन्त्यातुरं सामे पाचनं सप्तमेऽहनि ॥ ८ ॥

काढा करण्याचें जें द्रव्य असेल त्याच्या सोळापट पाणी घालून चवथाई राहीपर्यंत आटवावें. आणि तो सोळा तोळे राहिलेला काढा द्यावा. महाकाथाचें प्रमाण सोळा तोळ्यांचें असतें. तो काढा अग्नि-दीपक असतो. कित्येक वैद्य काढा आठ तोळे प्रमाणानें देतात. व बाकीचे आठ तोळे देत नाहींत. जे कोणी वैद्य बाकीचा काढा टाकून देणें इष्ट नाहीं असें समजतात, ते वैद्य वृद्ध वैद्यांच्या परंपरागत उपदेशानुसार काढा शिजवून अष्टमांश राखून आठ तोळे प्रमाणानें देतात. रोग्याला पाचन करणारा काढा सातवे दिवशीं देतात.

वीर्याधिकं भवति भेषजमन्नहीनं
हन्यात्तथाऽऽमयमसंशयमाशु चैव।
तद्बालवृद्धयुवतीमृदवो निपीय
ग्लानिं परां समुपयान्ति बलक्षयं च ॥ १ ॥

जें औषध वीर्यानें अधिक असतें त्यावर जर लवकर अन्न खाल्लें नाहीं तर तें निःसंशय रोगाचा त्वरित नाश करितें. असें औषध बाल, वृद्ध व स्त्रिया ह्यांना थोड्या प्रमाणांत द्यावें. नाहीं तर तें त्यांना अतिशय ग्लानि आणतें व शक्ति कमी करितें.

औषध जिरल्याचें लक्षण.

अनुलोमोऽनिलः स्वास्थ्यं क्षुत्तृष्णा सुमनस्कता।
लघुत्वमथ चोद्गाराः शुद्धो जीर्णौषधाकृतिः ॥ २ ॥

औषध जिरलें असतां वायु मार्गावर येतो. स्वस्थपणा वाढतो. योग्य प्रकारें तहान व भूक लागते. मन प्रसन्न होतें. हलकेपणा व शुद्ध ढेकर येतो. हीं औषध जिरल्याचीं लक्षणें आहेत.

अजीर्ण औषधलक्षण.

क्लमो दाहोऽङ्गसदनं भ्रमो मूर्छा शिरोरुजः।
अरतिर्वमनं मोहो ह्यजीर्णौषधवैकृतिः ॥ १ ॥
औषधशेषे भुक्तं शेषेऽप्यन्ने तथौषधं पीतम्।
न करोति गदोपशमं प्रकोपयत्यन्यरोगांश्च ॥ २ ॥

थकवा, दाह, अंग गळाल्यासारखें होणें, घेरी, मूर्च्छा, मस्तक दुखणें, निरुत्साह, ओकारी व मोह हीं लक्षणें औषध न जिरल्यामुळें होतात. औषध जिरण्यापूर्वीं जेवण केलें किंवा अन्नाचें पचन होण्यापूर्वीं औषध घेतलें तर तें रोग बरा न करितां आणखी दुसरेच रोग उपस्थित करितें.

शीघ्रं विपाकमुपयाति बलं न हन्यादन्नावृतं न च पुनर्वदनान्निरेति।
प्राग्भुक्तसेवितमथौषधमेतदेव दद्याच्च भीरुशिशुवृद्धवराङ्गनाभ्यः ३

अन्नानें आच्छादित औषध लवकर पचतें व शक्ति क्षीण करीत नाहीं व पुन्हा तोंडावाटे बाहेर येत नाहीं. ह्यासाठीं भित्रे लोक, बाल, वृद्ध व स्त्रिया ह्यांना जेवणापूर्वीं औषध द्यावें.

ज्वरावर पथ्य.

तण्डुलीयकवास्तूकबालमूलकपर्पटान्।

पटोलं तिक्तशाकं च गुडूचीपल्लवान्यपि ॥ १ ॥
कालशाकं निम्बपुष्पं मारीषं दार्विकादलम् ।
जीवन्ती चापि चाङ्गेरी सुनिषण्णकमाविकैः ॥ २ ॥
पत्रशाकाप्रियाणां तु ज्वरितानां प्रदापयेत् ।

तांदुळजा, चंदनबटवा, कोवळा मुळा, पित्तपापडा, पडवळ, तिक्तशाक, गुळवेलीच्या पाल्याची भाजी, कालशाक, बाळंतलिंबाचीं फुलें, माठ, पाथरीची भाजी, हरणदोडी, चुका, कुर्डूचा पाला व मेढशिंगीचा पाला, ह्यांपैकीं कोणतीही भाजी ज्याला पालेभाज्यांची फार आवड आहे अशा ज्वर आलेल्या मनुष्याला द्यावी.

मुद्गान्मसूरांश्चणकान्कुलित्थांश्च मकुष्ठकान् ॥ ३ ॥
यूषार्थं यूषसात्म्यानां ज्वरितानां प्रदापयेत् ।
लावान्कपिञ्जलानेणान्पृषताञ्शरभाञ्शशान् ॥ ४ ॥

ज्याला धान्याचें कढण किंवा कट खाण्याची संवय आहे त्याला मूग, मसुरा, हरभरे, हुलगे, व मटक्या ह्या धान्यांचें यूष करून खाण्यास सांगावें.

कालपुच्छान्कुरङ्गांश्च तथैव मृगमात्रकान् ।
मांसार्थं मांससात्म्यानां ज्वरितानां प्रदापयेत् ॥ ५ ॥

ज्या ताप आलेल्या मनुष्याला मांस खाण्याची संवय आहे त्याला—लावापक्षी, कपिंजलपक्षी, हरीण, रुई, शरभ, ससा, कालपुच्छ, कुरंग व मृगमात्रक ह्यांचें मांस खावयास द्यावें.

सारसक्रौञ्चशिखिनस्तथा तित्तिरकुक्कुटाः ।
ज्वरितानां न शस्यन्ते इति केचिद्व्यवस्थिताः ॥ ६ ॥

सारसपक्षी, करढोंकपक्षी, मोर, तित्तिर व कोंबडा ह्यांचें मांस तापकरी रोग्याला हितकारक नाहीं असें कित्येकांचें मत आहे.

वृन्ताकपीलुककर्कोटपटोलककठिल्लकम् ।
फलशाककृते देयं सर्वं निःस्नेहमेव च ॥ ७ ॥
वत्सरोषितधान्यस्य तण्डुलान्धो ज्वरे हितम् ।
रोटिकार्थं प्रदातव्यं द्विवर्षोषितमल्पशः ।
गोधूमादि यदा सात्म्यमन्यदप्यल्पमर्पयेत् ॥ ८ ॥

वांगें, पीलूचीं फळें, कारलीं, पडवळ, लहान कारलीं, वगैरे फळभाज्या ज्या तापकरी मनुष्याला फळभाज्यांची आवड आहे

त्याला द्याव्या. हे सर्व पदार्थ स्नेहवर्जित द्यावे. एक वर्षाच्या जुन्या तांदुळाची पेज ज्वरामध्यें पथ्यकारक आहे. ज्वरामध्यें रोटी किंवा भाकरी द्यावयाची झाल्यास गहू आदिकरून जीं रोग्याच्या नित्य संवयीचीं धान्यें आहेत तीं दोन वर्षांची जुनीं, फार थोडीं द्यावीं.

औषध घेण्यासंबंधीं विचार.

तत्रोपविश्य विश्रान्तः प्रसन्नवदनेक्षणः ।
औषधं हेमरजतमृद्भाजनपरिष्ठितम् ॥ १ ॥
पिबेत्प्रसन्नवदनः पीत्वा पात्रमधोमुखम् ।
निक्षिप्य पात्रे सलिलं ताम्बूलाद्युपकल्पयेत् ॥ २ ॥
यमदूतपिशाचाद्या यक्षगन्धर्वराक्षसाः ।
ते घ्नन्त्यौषधवीर्याणि ततो गण्डूषवर्जनम् ॥ ३ ॥

डोळे व तोंड सुप्रसन्न ठेवून स्वस्थ बसावें, आणि सोन्याच्या, रुप्याच्या किंवा मातीच्या भांड्यांतून औषध घ्यावें; व भांडें पालथें करून पुनः उताणें करून ठेवून त्यांत पाणी घालावें; आणि विडा खावा. औषध घेतल्यावर लागलीच चूळ भरून टाकूं नये. कारण चूळ भरून टाकली असतां यमदूत, पिशाचें, यक्ष, गंधर्व, राक्षस, हे औषधाचें वीर्य हरण करितात. म्हणून औषध घेतांच चूळ भरून टाकूं नये.

क्वाथस्य कल्कस्य रसस्य यामं मासत्रयं चाञ्जनचूर्णवीर्यम् ।
षण्मासवीर्यं गुडलेहयोश्च संवत्सरं तैलघृतस्य वीर्यम् ॥ ४ ॥

काढा, कल्क स्वरस व ह्यांचा गुण एक प्रहरपर्यंत असतो. अंजन व चूर्ण ह्यांचे गुण तीन महिने राहतात. गुडपाक व अवलेह ह्यांचे गुण सहा महिनेपर्यंत असतात; औषधी द्रव्यानें तयार केलेलीं तेलें, तुपें ह्यांचे गुण एक वर्षपर्यंत राहतात.

पाचन व शमन औषधें.

यत्पचत्याममाहारं पचेदामं रसं च यत् ।
यदपक्वान्पचेद्दोषांस्तद्धि पाचनमुच्यते ॥ १ ॥
न शोधयति यद्दोषान्समान्नोदीरयत्यपि ।
समीकरोति विषमांस्तत्संशमनमुच्यते ॥ २ ॥

जें औषध अपक्व आहाराचें पचन करितें, तसेंच अपक्व अन्न-

रसाचेंही पचन करितें, आणि अपक्व दोषांचेंही पचन करितें, त्याला पाचन म्हणतात. जें औषध दोषांचें शोधन करीत नाहीं, समस्थितींत असलेल्या दोषांना बाहेर काढीत नाहीं, पण जे दोष विषम प्रमाणांत आहेत त्यांना मात्र सम प्रमाणांत आणितें, त्याला संशमन औषध म्हणतात.

औषध देण्याचा काल.

पाययेदातुरं सामे पाचनं सप्तमे दिने ।
शमनेनाथवा दृष्ट्वा निरामं तमुपाचरेत् ॥ ३ ॥

आमयुक्त ज्वरामध्यें सातवे दिवशीं पाचन औषध द्यावें किंवा ज्वर निराम झाला आहे असें पाहून संशमन औषध द्यावें.

वातज्वरावर उपचार.

गुडूचीपिप्पलीमूलनागरैः पाचनं स्मृतम् ।
दद्याद्वातज्वरे पूर्णलिङ्गे सप्तमवासरे ॥ १ ॥

गुळवेल, पिंपळमूळ व सुंठ ह्यांचा काढा सर्व लक्षणांनीं युक्त अशा वातज्वरामध्यें पाचन म्हणून सातवे दिवशीं द्यावा.

किराताब्दामृतोदीच्यबृहतीद्वयगोक्षुरैः ।
सस्थिराकलशीविश्वैः क्वाथो वातज्वरापहः ॥ २ ॥

काडेचिराईत, नागरमोथे, गुळवेल, वाळा, रिंगणमूळ, डारलीमूळ, गोखरू, सालवण, पिठवण व सुंठ, ह्यांचा काढा वातज्वर-नाशक आहे.

शालिपर्णी बला रास्ना गुडूची सारिवा तथा ।
आसां क्वाथं पिबेत्कोष्णं तीव्रवातज्वरच्छिदम् ॥ ३ ॥

साळवण, चिकणामूळ, रासना, गुळवेल व उपळसरीचें मूळ ह्यांचा काढा कोमट करून प्यावा. तो तीव्र अशा वातज्वराचा नाश करितो.

काश्मरीसारिवाद्राक्षात्रायमाणामृतोद्भवः ।
कषायः सगुडः पीतो वातज्वरविनाशनः ॥ ४ ॥

शिवणीचें मूळ, उपळसरीचें मूळ, मनुका, त्रायमाण, व गुळवेल ह्यांचा काढा करून तो गूळ घालून द्यावा. तो वातज्वराचा नाश करितो.

मरिचं रुचकं शुण्ठी किरातं च हरीतका ।
पिप्पली कटुका चैव वातज्वरविनाशनम् ॥ ५ ॥

मिरीं, पादेलोण, सुंठ, काडेचिराईत, हिरडेदळ, पिंपळी व कुटकी ह्यांचें चूर्ण वातज्वराचा नाश करतें.

त्रिफलाव्योषगुडयुक्शर्करात्रिवृतार्धकम् ।
मोदकं भक्षयित्वा तु पिबेच्चोष्णं जलं पुनः ॥
पार्श्वशूलेऽरुचौ कासे ज्वरे चानिलसंभवे ॥ ६ ॥

हिरडा, बेहडा, आवळकाठी, सुंठ, मिरीं व पिंपळी हीं औषधें एकएक भाग, तेड अर्धाभाग ह्यांचें चूर्ण गुळाशीं अथवा साखरेशीं गोळी करून खावें. व त्याजवर ऊन पाणी प्यावें. हें कुशींतील शूल, अरुचि, खोकला व वातज्वर ह्यांजवर द्यावें.

पित्तज्वरावर उपचार.

कट्फलेन्द्रयवाम्बष्ठातिक्तामुस्तैः शृतं जलम् ।
पाचनं दशमेऽह्नि स्यात्तीव्रे पित्तज्वरे नृणाम् ॥ १ ॥

कायफळ, इंद्रजव, पहाडमूळ, कुटकी व नागरमोथे ह्यांचा काढा तीव्र पित्तज्वरावर दहा दिवसांनीं पाचनार्थ द्यावा.

दुरालभापर्पटकप्रियंगुभूनिम्बवासाकटुरोहिणीनाम् ।
क्वाथं पिबेच्छर्करयाऽवगाढं तृष्णास्रपित्तज्वरदाहयुक्तः ॥ २ ॥

धमासा, पित्तपापडा, गव्हला, काडेचिराईत, अडुळसा व कुटकी ह्यांचा काढा तहान, रक्तपित्त, ताप व दाह ह्यानें युक्त अशा पित्तज्वरामध्यें साखर घालून द्यावा.

द्राक्षाभयापर्पटकाब्दतिक्ताक्वाथं सशम्याकफलं विदध्यात् ।
प्रलापमूर्छाभ्रमदाहशोषतृषान्विते पित्तभवे ज्वरे च ॥ ३ ॥

मनुका, बाळहिरडे, पित्तपापडा, कुटकी व बाहव्याच्या शेंगेतील मगज ह्यांचा काढा बडबड, मूर्च्छा, भ्रम, दाह, शोष व तहान ह्या विकारांनीं युक्त अशा पित्तज्वरामध्यें द्यावा.

एकः पर्पटकः श्रेष्ठः पित्तज्वरविनाशनः ।
किं पुनर्यदि युज्येत चन्दनोशीरधान्यकैः ॥ ४ ॥

एका पित्तपापड्याचाच काढा पित्तज्वराचा नाश करितो. पुनः त्यांत चंदन, वाळा व धनें हीं द्रव्यें घातलीं, तर मग तो पित्तज्वराचा नाश करीलच ह्यांत नवल काय ?

औदुम्बरस्य निर्यासः सितया दाहनाशनः ।
छिन्नासारः सितायुक्तः पित्तज्वरानिषूदनः ॥ ५ ॥

उंबराचा चीक खडीसाखरेशीं दिला असतां तो दाहशांति करतो. गुळवेलीचा काढा खडीसाखर घालून दिला असतां तोही पित्तज्वराचा नाश करतो.

द्राक्षा चैव गुडूची च मुस्ता पर्पटकं तथा ।
कटुका च समैः क्वाथः पित्तज्वरविनाशनः ॥ ६ ॥

मनुका, गुळवेल, नागरमोथे, पित्तपापडा व कुटकी ह्यांचा काढा पित्तज्वरनाशक आहे.

चन्दनं च सगन्धं च वालकोशीरपर्पटाः ।
मुस्ताशुण्ठीसमायुक्तः पित्तज्वरानिषूदनः ॥ ७ ॥

तांबडा व पांढरा चंदन, वाळा, काळा वाळा, पित्तपापडा, नागरमोथे व सुंठ ह्यांचा काढा पित्तज्वरनाशक आहे.

अहो किमर्थं बहवः कषायाः पराशराद्यैर्मुनिभिः प्रदिष्टाः ।
पित्तज्वरध्वंसकृते न किं स्यात्क्वाथो गुडूच्यामलपर्पटानाम् ॥ ८ ॥

अहो, पराशरादि मुनींनीं इतके काढे कशाला सांगितले ? गुळवेल, आवळकाठी व पित्तपापडा ह्यांचा काढा पित्तज्वराचा नाश करीत नाहीं काय ?

जलजलजलवाहरेणुविश्वौषधशिशिरैः शिशिरीकृतः कषायः ।
ननु खलु हरति ज्वरं प्रकृष्टं सवमिनिदाघतृषं निपीयमानः ॥ ९ ॥

वाळा, काळा वाळा, नागरमोथे, पित्तपापडा, सुंठ व चंदन ह्यांचा काढा थंड करून घेतला असतां ओकारी, दाह व तहान ह्यांसह पित्तज्वराचा खरोखर नाश करितो.

अशीतवारिणा सिता सितायुता तु रोहिणी ।
विदाहतड्भ्रमान्वितं निहन्ति पित्तजं ज्वरम् ॥ १० ॥

ऊन पाण्याशीं खडीसाखर किंवा खडीसाखरेशीं कुटकीचें चूर्ण घेतलें असतां तें दाह, तहान व घेरी ह्यांनीं युक्त अशा पित्तज्वराचा नाश करितें.

निम्बपल्लवसंभूतरसफेनप्रलेपनात् ।
तृड्दाहमोहाः प्रशमं यान्ति पित्तसमुद्भवाः ॥ ११ ॥

बाळंतलिंबाच्या पाल्याचा रस काढून त्याच्या फेसाचा लेप

केला असतां पित्तापासून होणारे तहान, दाह व मोह हे विकार शांत होतात.

केसरं मातुलुंगस्य मधुसैन्धवसंयुतम्।
जिह्वाताल्वुगलक्लोमशोषमूर्धनि दापयेत् ॥ १२ ॥

महाळुंगांतील केसर मध व सैंधव ह्यांसह जीभ, टाळा, घसा व क्लोम ह्यांना कोरड पडली असतां द्यावें.

कफज्वरावर उपचार.

बीजपूरशिफापथ्यानागरग्रन्थिकैः शृतम्।
सक्षारं पाचनं श्लेष्मज्वरे द्वादशवासरे ॥ १ ॥

महाळुंगाच्या मुळ्या, बाळहिरडे, सुंठ व पिंपळमूळ ह्यांचा काढा कफज्वरावर जवखार घालून बारावे दिवशीं पाचन म्हणून द्यावा.

भूनिम्बनिम्बपिप्पल्यः शठी शुण्ठी शतावरी।
गुडूची बृहती चेति क्वाथो हन्यात्कफज्वरम् ॥ २ ॥

काडेचिराईत, कडुनिंबाची साल, पिंपळी, कचोरा, सुंठ, शतावरीच्या मुळ्या, गुळवेल व डोरलीमूळ ह्यांचा काढा कफज्वराचा नाश करितो.

पटोलत्रिफलातिक्ताशठीवासामृतोद्भवः।
क्वाथो मधुयुतः पीतो हन्यात्कफकृतं ज्वरम् ॥ ३ ॥

कडुपडवळ, हिरडा, बेहडा, आवळकाठी, कुटकी, कचोरा, अडुळसा व गुळवेल ह्यांचा काढा मध घालून घेतला असतां तो कफज्वराचा नाश करितो.

निदिग्धिकाच्छिन्नरुहोपकुल्याविश्वौषधैः साधितमम्बु पीतम्।
हन्ति ज्वरश्वासबलासकासशूलाग्निमान्द्यं जठरानिलं च ॥ ४ ॥

रिंगणमूळ, गुळवेल, पिंपळी, व सुंठ ह्यांचा काढा ज्वर, श्वास, कफ, खोकला, शूल, अग्निमांद्य व पोटांतील वात ह्यांचा नाश करितो.

शृङ्गीकणाकट्फलपौष्कराणां क्षौद्रान्वितानां विहितोऽवलेहः।
श्वासेन कासेन युतं बलासज्वरं जयेदत्र न काऽपि शङ्का ॥ ५ ॥

काकडशिंगी, पिंपळी, कायफळ व पोखरमूळ ह्यांचें चूर्ण करून तें मधाशीं चाटलें असतां श्वास व खोकला ह्यांनीं युक्त अशा कफज्वराचा नाश करितें, ह्यांत कांहीं शंका नाहीं.

भार्ङ्गीगुडूचीघनदारुसिंहीशुण्ठीकणापुष्करजः कषायः ।
ज्वरं निहन्ति श्वसनं क्षिणोति क्षुधं करोति प्ररुचिं तनोति ॥ ६ ॥

भारंगमूळ, गुळवेल, नागरमोथे, देवदार, डोरलीमूळ, सुंठ, पिंपळी, व पोखरमूळ ह्यांचा काढा कफज्वराचा नाश करतो, श्वासाला दूर करतो, भूक वाढवितो व तोंडाला रुचि आणतो.

सर्व ज्वरांवर उपचार.

आमलक्यभया कृष्णा चित्रकश्चेत्ययं गणः ।
सर्वज्वरभयातंको भेदी दीपनपाचनः ॥ १ ॥

आवळकाठी, बाळहिरडे, पिंपळी व चित्रकमूळ हा गण सर्व ज्वरांची भीति नाहींशी करणारा, मलभेदक, दीपक व पाचक आहे.

अमृतारिष्टकचन्दनपद्मकधान्योद्भवः क्राथः ।
ज्वरहृल्लासच्छर्दितृष्णादाहारुचीर्हन्यात् ॥ २ ॥

गुळवेल, बाळंतलिंबाची साल, रक्तचंदन, पद्मकाष्ट व धने ह्यांचा काढा ताप, मळमळणें, ओकारी, तहान, दाह व अरुचि ह्यांचा नाश करतो.

छिन्नोद्भवाम्बुधरधन्वयवासविश्वैर्दुःस्पर्शपर्पटकमेघकिराततिक्तैः
मुस्ताटरूषकमहौषधधन्वयासैः क्राथं पिबेदनिलपित्तकफज्वरेषु ।

गुळवेल, नागरमोथे, धमासा व सुंठ ह्यांचा काढा; धमासा, नागरमोथे, पित्तपापडा, काडेचिराईत, व कुटकी यांचा काढा; आणि नागरमोथा, अडुळसा, सुंठ, व धमासा यांचा काढा; हे तीन काढे अनुक्रमें वात, पित्त व कफ ह्या दोषांपासून होणाऱ्या ज्वरावर द्यावे.

धान्यत्रिकटुसिन्धूत्थमुद्गसैंधवयोजितः ।
भृष्टश्च हिंगुतैलाभ्यां स मण्डोऽष्टगुणः स्मृतः ॥ ४ ॥
दीपनः प्राणदो बस्तिशोधनो रक्तवर्धनः ।
ज्वरजित्सर्वदोषघ्नो मण्डोऽष्टगुण उच्यते ॥ ५ ॥

धने, सुंठ, मिरीं, पिंपळी, सैंधव व मूग हीं द्रव्यें योग्य प्रमाणांत घेऊन हिंगासह तेलांत परतून त्यांचा जो मंड करितात, त्याला अष्टगुणमंड म्हणतात. तो अग्निदीपक, बलदायक, बस्तिशोधक, रक्ताची वृद्धि करणारा, ज्वरनाशक व सर्व दोषनाशक, असा गुणदायक हा अष्टगुणमंड आहे.

वातपित्तज्वरावर उपचार.

छिन्नोद्भवापर्पटवारिवाहभूनिम्बशुण्ठीजनितः कषायः ।
समीरपित्तज्वरजर्जराणां करोति भद्रं खलु पञ्चभद्रः ॥१॥

गुळवेल, पित्तपापडा, नागरमोथे, काडेचिराईत व सुंठ ह्याला पंचभद्र कषाय म्हणतात. हा वातपित्तज्वरानें पिडलेल्याला हितकारक आहे.

पञ्चमूल्यमृतामुस्ताविश्वाभूनिम्बसाधितः ।
कषायः शमयत्याशु वायुमायुभवं ज्वरम् ॥ २ ॥

सालवण, पिठवण, रिंगणी, डोरली व सराटे ह्यांचीं मुळें; गुळवेल, नागरमोथे, सुंठ व काडेचिराईत ह्यांचा काढा वातपित्तज्वराचा त्वरित नाश करितो.

त्रिफलाकाश्मरीरास्नाराजवृक्षाटरूषकैः ।
शृतमम्बु हरेत्तूर्णं वातपित्तोद्भवं ज्वरम् ॥ ३ ॥

हिरडा, बेहडा, आवळकाठी, शिवणीचें मूळ, रास्ना, बाहव्याची शेंग, अडुळसा ह्यांचा काढा वातपित्तज्वराचा त्वरित नाश करतो.

वातकफज्वरावर उपचार.

सिंहीयवानीछिन्नानां क्वाथश्चपलया युतः ।
कफवातज्वरश्वासशूलपीनसकासजित् ॥ १ ॥

डोरलीमूळ, ओवा, व गुळवेल ह्यांचा काढा पिंपळीचें चूर्ण घालून घेतला असतां तो कफवातज्वर, श्वास, शूळ, पीनस व खोकला ह्यांना जिंकतो.

क्षुद्रामृतानागरपुष्कराह्वैः कृतः कषायः कफमारुतोत्तरे ।
सश्वासकासारुचिपार्श्वशूले ज्वरे त्रिदोषप्रभवेऽपि शस्यते २

रिंगणमूळ, गुळवेल, पोखरमूळ व सुंठ ह्यांचा काढा कफवातज्वरामध्यें द्यावा. तो श्वास, खोकला, अरुचि, व पार्श्वशूळ ह्यांनीं युक्त त्रिदोषजन्य ज्वरावरही प्रशस्त आहे.

आरग्वधकणामूलमुस्तातिक्ताभयाकृतः ।
क्वाथः शमयति क्षिप्रं ज्वरं वातकफोद्भवम् ॥ ३ ॥

बाहव्याची शेंग, पिंपळमूळ, नागरमोथे, कुटकी, व बाळहिरडे, ह्यांचा काढा वातकफज्वराचा त्वरित नाश करितो.

मुस्ता पर्पटकं शुण्ठी गुडूची च दुरालभा ।
कफवातारुचिच्छर्दिदाहशोषज्वरापहाः ॥ ४ ॥

नागरमोथे, पित्तपापडा, सुंठ, गुळवेल व धमासा यांचा काढा कफ, वात, अरुचि, ओंकारी, दाह, शोष व ताप ह्यांचा नाश करितो.

भूनिम्बमुस्ताकटुकीगुडूचीदुरालभापर्पटनागराख्यैः ।
क्वाथं मरुच्छ्लेष्महरं वदन्ति सूर्यो यथा नाशयतेऽन्धकारम् ॥५॥

काडेचिराईत, नागरमोथे, कुटकी, गुळवेल, धमासा, पित्तपापडा व सुंठ ह्यांचा काढा, सूर्य जसा अंधकाराचा नाश करतो त्याप्रमाणें कफवातज्वराचा नाश करितो.

पित्तकफज्वरावर उपचार.

अमृतारिष्टकटुकामुस्तेन्द्रयवनागरैः ।
पटोलचन्दनाभ्यां च पिप्पलीचूर्णयुक् शृतः ॥ १ ॥
अमृताष्टकमेतच्च पित्तश्लेष्मज्वरापहम् ।
छर्द्यरोचकहृल्लासदाहतृष्णानिवारणम् ॥ २ ॥

गुळवेल, बाळंतलिंबाची साल, कुटकी, नागरमोथे, इंद्रजव, सुंठ, कडु पडवळ व रक्तचंदन ह्यांचा काढा पिंपळीचें चूर्ण घालून द्यावा. ह्याला अमृताष्टक म्हणतात. हें पित्तकफज्वराचा नाश करितें; आणि अरुचि, ओकारी, मळमळ, दाह व तहान ह्यांचें निवारण करितें.

पटोलं चन्दनं मूर्वा पाठा तिक्ताऽमृता कणा ।
पित्तश्लेष्मज्वरच्छर्दिदाहकण्डूविषापहाः ॥ ३ ॥

कडु पडवळ, रक्तचंदन, मोरवेल, पहाडमूळ, कुटकी, गुळवेल, पिंपळी ह्यांचा काढा पित्तकफज्वर, ओकारी, दाह, कंडु व विष ह्यांचा नाश करतो.

पटोलं पिचुमन्दं च त्रिफला मधुकं बला ।
साधितोऽयं कषायः स्यात्पित्तश्लेष्मभवे ज्वरे ॥ ४ ॥

कडु पडवळ, कडुलिंबाची साल, हिरडा, बेहडा, आवळकाठी, जेष्ठमध व चिकणामूळ ह्यांचा काढा पित्तकफज्वरावर द्यावा.

तिक्तोशीरबलाधान्यपर्पटाम्भोधरैः कृतः ।
क्वाथः पुनः समायातं ज्वरं शीघ्रं निवारयेत् ॥ ५ ॥

कुटकी, वाळा, चिकणामूळ, धने, पित्तपापडा व नागरमोथे ह्यांचा काढा पुनः उलटून येणाऱ्या ज्वराचा त्वरित नाश करतो.

कण्टकार्यमृताभार्ङ्गीनागरेन्द्रयवासकम् ।
भूनिम्बं चन्दनं मुस्ता पटोलं कटुरोहिणी ॥ ६ ॥
कषायं पाययेदेतं पित्तश्लेष्मज्वरापहम् ।
दाहतृष्णारुचीहिक्काकासहृत्पार्श्वशूलहृत् ॥ ७ ॥

रिंगणमूळ, गुळवेल, भारंगमूळ, नागरमोथे, सुंठ, इंद्रजव, अडूळसा, काडेचिराइत, रक्तचंदन, कडूपडवळ व कुटकी ह्यांचा काढा पित्तकफज्वराचा नाश करितो. आणि दाह, तहान, अरुचि, उचकी, खोकला, हृदय व कुशी ह्यांतील शूल ह्यांचें निवारण करतो.

लोहितचन्दनपद्मकधान्यच्छिन्नरुहापिचुमन्दकषायः ।
पित्तकफज्वरदाहपिपासावान्तिविनाशहुताशकरः स्यात् ॥८॥

रक्तचंदन, पद्मकाष्ठ, धने, गुळवेल, बाळंतलिंबाची साल ह्यांचा काढा पित्तकफज्वर, दाह, तहान, अरुचि व ओकारी ह्यांचा नाश करितो व अग्नि प्रदीप्त करितो.

लाजैर्वा तण्डुलैर्भृष्टैर्लाजमण्डः प्रकीर्तितः ।
श्लेष्मपित्तहरो ग्राही पिपासाज्वरजिन्मतः ॥ ९ ॥

तांदुळ किंवा भाताच्या लाह्या भाजून जो मंड करितात, त्याला लाजमंड म्हणतात. हा कफपित्तनाशक, ग्राहक व तहान व ज्वर यांचा नाशक आहे.

जीरकं कारवेल्लाम्बु शीतपूर्वज्वरे हितम् ॥ १० ॥

जिरें व कारलीचें मूळ ह्यांचा काढा शीतपूर्व ज्वरावर हितकारक आहे.

सन्निपातावर उपचार.

संनिपातज्वरे पूर्वं कुर्यादामकफापहम् ।
पश्चाच्छ्लेष्मणि संक्षीणे शमयेत्पित्तमारुतौ ॥ १ ॥
लङ्घनं वालुकास्वेदो नस्यं निष्ठीवनं तथा ।
अवलेहोऽञ्जनं चैव प्राक्प्रयोज्यं त्रिदोषजे ॥ २ ॥
त्रिरात्रं पञ्चरात्रं वा दशरात्रमथापि वा ।
लंघनं संनिपातेषु कुर्यादारोग्यदर्शनात् ॥ ३ ॥
दोषाणामेव सा शक्तिर्लंघने या सहिष्णुता ।

न कश्चिद्दोषरहितो लंघनं सहते नरः ॥ ४ ॥
रसस्थे रससंशुद्धी रक्तस्थे रक्तमोक्षणम् ।
मांसस्थे रेचनं शस्तं मेदोघ्नं मेदसि स्थिते ॥ ५ ॥
रेचनं वमनं स्वेदश्चास्थिस्थे स्वेदमर्दनम् ।
मज्जशुक्राशयं दृष्ट्वा तमसाध्यं ज्वरं वदेत् ॥ ६ ॥
क्रियायास्तु गुणालाभे क्रियामन्यां प्रयोजयेत् ।
पूर्वस्यां शान्तवेगायां न क्रियासंकरो हितः ॥ ७ ॥
तप्तायोलाञ्छनं पञ्चतालवादिषु त्रिदोषजे ।
रुद्राभिषेकभूदेवभोजनग्रहजाप्यतः ।
मंत्ररक्षादिभिः कार्या संनिपाते प्रतिक्रिया ॥ ८ ॥

सन्निपातज्वरामध्यें पूर्वी आमकफनाशक उपचार करावे. आणि कफ क्षीण झाला म्हणजे मग पित्त, व वात हे दोष जिंकावे. लंघन, वालुकास्वेद, नस्य, निष्ठीवन, अवलेह व अंजन ह्यांची सन्निपाता-मध्यें योजना आधीं करावी. सन्निपातांत तीन, पांच, किंवा दहा दिवस अगर आरोग्य वाटेपर्यंत लंघन द्यावें. लंघन सहन करणें ही दोषांची शक्ति आहे. दोषरहित असा कोणीही मनुष्य लंघन सहन करीत नाहीं. सन्निपातांत रसधातुगत ज्वर असल्यास रसधातूचें शोधन करावें. रक्तगत असला रक्त काढावें; मांसगत असला तर रेचक द्यावें; मेदोगत असल्यास मेदनाशक औषध द्यावें. अस्थिगत असला तर रेचक, वमन, स्वेदन, मर्दन व घाम काढणें हे उपचार करावे; आणि मज्जा व शुक्रगत झाला असतां तो असाध्य सम-जावा. एका उपचारानें गुण न आला तर दुसरा उपचार योजावा. पूर्वीच्या औषधाचा वेग कमी झाल्यावांचून दुसरें औषध योजूं नये. कारण तें हितकारक होत नाहीं. सन्निपातांत तालू आदिकरून पांच ठिकाणीं लोखंड तापवून डाग द्यावा; रुद्राचा अभिषेक करावा; ब्राह्मणभोजन घालावें; नवग्रहांचा जप करावा; अंगारे मंत्रून लावावे व मंत्ररक्षादि विधि करावा. अशा प्रकारें सन्निपातावर प्रतिक्रिया करावी.

पाचन.

कण्टकारीद्वयं शुण्ठी धान्यकं सुरदारु च ।
एभिः शृतं पाचनं स्यात्सर्वज्वरनिवारणम् ॥ १ ॥

रिंगणमूळ, डोरलीमूळ, सुंठ, धने व देवदार ह्यांचा काढा पाचन आहे. तो सर्व ज्वरांचें निवारण करतो.

वाळूचा स्वेद.

खर्परभृष्टपटस्थितकांजिकसंसिक्तवालुकास्वेदः ।
शमयति वातकफामयमस्तकशूलाङ्गभेदादीन् ॥ १ ॥

खापरांत भाजलेली वाळू फडक्यांत भरून पुरचुंडी करून त्याजवर कांजी शिंपून त्यानें शेकावें. म्हणजे वातकफजन्यविकार, मस्तकशूळ व अंग ठणकणें हे विकार शमतात.

नस्य.

मातुलुङ्गार्द्रकरसं कोष्णं त्रिलवणान्वितम् ।
अन्यद्वा सिद्धविहितं नस्यं तीक्ष्णं प्रयोजयेत् ॥ १ ॥
तेन प्रभिद्यते श्लेष्मा प्रभिन्नस्तु प्रसिच्यते ।
शिरोहृदयकंठास्यपार्श्वरुक्चोपशाम्यति ॥ २ ॥

महाळुंगाचा व आल्याचा रस, सेंधेलोण, पादेलोण व बिडलोण घालून कोमट करून नाकांत घालावा; किंवा दुसरें वैद्यानें तयार केलेलें योग्य असें तीक्ष्ण नस्य योजावें. त्यानें कफ पातळ होऊन पडतो व डोकें, हृदय, कंठ, मुख व कुशी ह्यांतील पीडा कमी होते.

मधूकसारसिन्धूत्थवचोषणकणाः समाः ।
श्लक्ष्णं पिष्ट्वाम्भसा नस्यं कुर्यात्संज्ञाप्रबोधनम् ॥ ३ ॥

मधूकसार, सैंधव, वेखंड, मिरीं, पिंपळी, ह्यांचें बारीक चूर्ण करून पाण्यांत कालवून नस्य करावें. हें नस्यही वरप्रमाणेंच डोकें, हृदय, इ. पांच इंद्रियांची ग्लानि घालवून शुद्धि आणतें.

सैन्धवं श्वेतमरिचं सर्षपाः कुष्ठपिप्पली ।
बस्तमूत्रेण पिष्टानि नस्यं तन्द्रानिवारणम् ॥ ४ ॥

सैंधव, पांढरीं मिरीं, शिरस, कोष्ट, पिंपळी हीं औषधें शेळीच्या मुतांत वाटून नस्य द्यावें. तें तंद्रेचा नाश करितें.

थुंकणें.

आर्द्रकस्वरसोपेतं सैन्धवं सकटुत्रयम् ।
आकण्ठं धारयेच्चाऽऽस्ये निष्ठीवेच्च पुनः पुनः ॥ १ ॥
तेनास्य हृदयाच्छ्लेष्मा मन्यापार्श्वशिरोगलात् ।
लीनो व्याकृष्यते शुष्को लाघवं चास्य जायते ॥ २ ॥

आल्याचा रस, सैंधव, सुंठ, मिरीं, पिंपळी ह्यांचें चूर्ण हीं सर्व एकत्र करून घशांत जाईपर्यंत तोंडांत धरून थुंकावें. ह्याप्रमाणें पुनः-पुनः करावें. त्यानें हृदय, मान, कुशी, मस्तक, गळा, ह्या ठिकाणीं लीन होऊन असलेला म्हणजे गोठून घट्ट झालेला शुष्क कफ पातळ होऊन निघतो आणि हलकेपणा येतो.

अवलेह.

कट्फलं पौष्करं शृङ्गी कृष्णा च मधुना सह ।
श्वासकासज्वरहरः श्रेष्ठो लेहः कफान्तकः ॥ १ ॥

कायफळ, पोखरमूळ, काकडशिंगी व पिंपळी ह्यांचें चूर्ण करून मधाशीं चाटावें. हा लेह खोकला, श्वास व ज्वर यांचा नाशक असून उत्तम कफनाशक आहे.

अष्टांगावलेहिका.

कट्फलं पौष्करं शृङ्गी व्योषं यासश्च कारवी ।
श्लक्ष्णं चूर्णीकृतं चैतन्मधुना सह लेहयेत् ॥ २ ॥
एषाऽवलेहिका हन्ति संनिपातं सुदारुणम् ।
हिक्कां श्वासं च कासं च कण्ठरोधं च घुर्घुरम् ।
एतद्योज्यं कफोद्रेके चूर्णमार्द्रकजै रसैः ॥ ३ ॥

कायफळ, पोखरमूळ, काकडशिंगी, सुंठ, मिरीं, पिंपळी, धमासा, बडीशेप, ह्या सर्वांचें चूर्ण करून मधाबरोबर चाटावें. हा अवलेह भयंकर सन्निपाताचा नाश करितो. व उचकी, श्वास, खोकला, गळ्याचा अवरोध व घुरघुर, ह्यांचाही नाश करितो. अतिशय कफ वाढला असतां हें चूर्ण आल्याच्या रसाशीं द्यावें.

अंजन व नस्य.

शिरीषबीजगोमूत्रकृष्णामरिचसैन्धवैः ।
अंजनं स्यात्प्रबोधाय सरसोनशिलावचैः ॥ १ ॥

शिरसाचे झाडाचें बीं, पिंपळी, मिरीं व सैंधव ह्यांचा गोमूत्रांत खल करून त्यांत लसूण, मनशीळ व वेखंड ह्यांची पूड घालून शुद्धि येण्याकरितां अंजन करावें.

कस्तूरी मरिचं वाजिलाला च मधुनाऽञ्जनम् ।
तन्द्रां निवारयत्याशु व्योषप्रधमनं तथा ॥ २ ॥

कस्तुरी व मिरीं ह्यांचा घोड्याच्या लाळेंत खल करून त्याची गोळी करून मधांतून अंजन करावें; हें त्वरित तंद्रेचा नाश करितें. किंवा सुंठ, मिरीं व पिंपळी यांचें चूर्ण करून तें नाकांत फुंकलें असतांही तंद्रा दूर होते.

अंजन व उद्धूलन.

तुरङ्गलालासहिता मनःशिला निहन्ति तन्द्रां सकृदंजनेन।
बब्बूलपत्राणि हरीतकी च संस्वेदिता स्वेदविकारहंत्री ॥ १ ॥

घोड्याच्या लाळेंत मनशीळ उगाळून एकदांच अंजन केल्यानें तंद्रा दूर होते. बाभळीचा पाला व हिरड्याची पूड ह्यांनीं शेकलें असतां घामापासून होणारे विकार दूर होतात.

भूनिम्बकटुकीकुष्ठं कारवीन्द्रयवः सटी।
एतानि समभागानि सूक्ष्मचूर्णानि कारयेत् ॥ २ ॥
प्रस्वेदे कण्ठरोधे च संधिमर्दनमिष्यते।
एतदुद्धूलनं श्रेष्ठं संनिपातहरं परम् ॥ ३ ॥

स्वेदोद्गमे भृष्टकुलत्थचूर्णैरुद्धूलनं शस्तमिति ब्रुवन्ति।
जीर्णं शकृद्गोर्लवणस्य भाण्डं स्वेदापहं गुण्डनमुत्तमं हि ॥ ४॥

काडेचिराईत, कुटकी, कोष्ट, बडिशेप, इंद्रजव व कचोरा हीं द्रव्यें समभाग घेऊन त्यांचें सूक्ष्म चूर्ण करावें. अतिशय घाम येणें व कंठाचा अवरोध ह्या विकारांत तें चूर्ण प्रत्येक सांध्याच्या ठिकाणीं मर्दन करावें. ह्या चूर्णाचें हें उद्धूलन श्रेष्ठ असून उत्तम सन्निपातावें नाशक आहे. अतिशय घामावर भाजलेल्या हुलग्याचें पीठ अंगास लावण्याकरितां प्रशस्त आहे, असें विद्वान् वैद्य म्हणतात. गाईच्या जुन्या शेणाचा गोवर अंगास लावावा, तो घाम अटवितो. व मिठाचें भांडें ऊन करून फडक्यांत बाधून अंगावरून फिरवावें, तें घामाचा नाश करितें.

यवानिका वचा शुण्ठी पिप्पली कारवी तथा।
एतैरुद्धूलनं शस्तं त्रिदोषोत्थे ज्वरे नृणाम् ॥ ५ ॥
किरातं कटुका पथ्या कणा कायफलं वचा।
उद्धूलनं त्रिदोषे च सदा शैत्ये च शस्यते ॥ ६ ॥

ओवा, वेखंड, सुंठ, पिंपळी, काळें जिरें, ह्यांचें चूर्ण करून तें आंगास कोरडेंच चोळावें. हें त्रिदोषाचें नाशक आहे. काडेचिराईत,

कुटकी, हिरडेदळ, पिंपळी, कायफळ व वेखंड, यांचें चूर्ण अंगास लावावें. हें त्रिदोष व थंडी ह्यांजवर प्रशस्त आहे.

विषभागो भवेदेको मरीचात्त्रिगुणो मतः ।
आरण्योपलजं भस्म षोडशांशसमन्वितम् ॥ ७ ॥
एकत्र मिलितं चूर्णं धूर्तस्वरसभावितम् ।
आतपे शोषितं तच्च शीतं स्वेदहरं परम् ॥ ८ ॥
अथवा चणका भृष्टा यवानीचूर्णमिश्रिताः ।
वचोषणरजोयुक्ताः स्वेदसंशोषणा मताः ॥ ९ ॥

बचनाग एक भाग, मिरीं तीन भाग व रानशेणींचें भस्म सोळा भाग ह्या सर्वांचें चूर्ण एकत्र खलून त्याला धोतऱ्याच्या रसाची भावना देऊन उन्हांत वाळवावें व तें अंगास लावावें. तें थंड असून घामाचा नाश करितें. किंवा भाजलेले हरभरे, ओवा, वेखंड, व मिरीं ह्यांचें चूर्ण भस्मासारखें पण वरचेवर चोळून आंगास लावावें. तें घामाचें नाशक आहे.

जिभेला लेप.

उच्छुष्कां स्फुटितां जिह्वां द्राक्षया मधुपिष्टया ।
प्रलेपयेत्सघृतया सन्निपातात्मके ज्वरे ॥ १ ॥

सन्निपातांत जीभ कोरडी होऊन तिला भेगा वगैरे पडल्या असतील तर त्याला मनुका मध व तुपांत घालून खलून लेप करावा.

सुवर्णमुक्तारजतप्रवालैः कस्तूरिकाकुंकुमरोचनं च ।
वराटरुद्राक्षमधूकबिल्वं कुष्ठं च खर्जूरपुनर्नवा च ॥ २ ॥
द्राक्षा कणा नागरपुत्रजीवी सारङ्गशृङ्गं कतकस्य बीजम् ।
एरण्डमूलं शरसर्षपं च मयूरिका श्वेतपुनर्नवा च ।
स्तन्येन पिष्ट्वा कुरु सन्निपाते लेपं सदा सर्वगदं निहन्ति ॥३॥

सोनें, मोतीं, चांदी, प्रवाळ, कस्तुरी, केशर, गोरोचन, कवडी, रुद्राक्ष, ज्येष्ठमध, बेलफळ, कोष्ट, खारिक, पुनर्नवा (घेटुळीची मुळी) मनुका, पिंपळी, सुंठ, पुत्रजीव वृक्षाची साल किंवा बीं, सांबराचें शिंग किंवा हरणाचें शिंग, निवळीचें बीं, एरंडमूळ, शर, शिरस, काळी तुळस, पांढरी घेटुळी, हीं सर्व द्रव्यें अंगावरील दुधांत खलून जिभेस लेप करावा; म्हणजे सन्निपातामध्यें होणारे सर्व विकार ह्यानें दूर होतात.

पंचमुष्टिक यूष.

यवकोलकुलित्थानां मुद्गमूलकयोरपि ।
एकैकं मुष्टिमादाय पचेदष्टगुणे जले ॥ ४ ॥
पञ्चमुष्टिक इत्येष वातपित्तकफापहः ।
शस्यते गुल्मशूले च श्वासे कासे क्षये ज्वरे ॥ ५ ॥

जव, वाळलेलीं बोरें, हुलगे, मूग व मुळे हीं द्रव्यें प्रत्येकीं चार चार तोळे घेऊन आठपट पाण्यांत शिजवावीं. ह्याला पंचमुष्टिक यूष असें म्हणतात. हा वात, पित्त व कफ यांचा नाशक आहे. ह श्वास, खोकला, क्षय व ज्वर ह्यांजवर प्रशस्त आहे.

सप्तमुष्टिक यूष.

कुलित्थयवकोलैश्च मुद्गैर्मूलकशुष्ककैः ।
शुण्ठीधान्यकयुक्तैश्च यूषः श्लेष्मानिलापहः ।
सप्तमुष्टिक इत्येष सन्निपातज्वराञ्जयेत् ॥ १ ॥

हुलगे, सातु, बोरें, मूग, वाळलेल्या मुळ्याचे तुकडे, सुंठ व धने ह्यांचा वरीलप्रमाणें जो यूष करितात, त्याला सप्तमुष्टिक यूष म्हणतात. हा कफवातनाशक असून सन्निपातज्वराला जिंकतो.

सिद्धार्थको वचा हिंगु करञ्जः सुरदारु च ।
माञ्जिष्ठा त्रिफला श्वेता कटभीत्वक्कटुत्रयम् ॥ १ ॥
प्रियंगुश्च शिरीषं च निशा दार्वी समांशतः ।
अजामूत्रेण संपिष्टो गोमूत्रैर्वाऽथ चूर्णितः ।
सर्वज्वरं निहन्त्याशु सिद्धार्थादिप्रलेपकः ॥ २ ॥

पांढऱ्या मोहऱ्या, वेखंड, हिंग, करंज, देवदार, मंजिष्ठ, हिरडदळ, बेहडेदळ, आवळकाठी, पांढरी किन्ही, दालचिनी, सुंठ, मिरीं, पिंपळी, गव्हला, शिरसाची साल, हळद व दारुहळद हीं सर्व समभाग घेऊन चूर्ण करून शेळीच्या किंवा गाईच्या मुतांत वाटून अंगास लेप करावा. हा सिद्धार्थादि प्रलेपक सर्व ज्वरांचा त्वरित नाश करितो.

द्वात्रिंशदाख्य काढा.

भार्ङ्गीभूनिम्बनिम्बैर्घनकटुकवचाव्योषवासाविशाला-
रास्नानन्तापटोलीसुरतरुरजनीपाटलादुण्डुकैश्च ।
ब्राह्मीदार्वीगुडूचीत्रिवृदतिविषिकापुष्करत्रायमाणै-

व्याघ्रीसिंहीकलिङ्गैस्त्रिफलसटियुतैः कल्पितस्तुल्यभागैः १
क्वाथो द्वात्रिंशदाख्यस्त्र्यधिकदशमहासंनिपाताग्निहन्या-
च्छूलं कासादिहिक्काकसनगुदरुजाध्मानविध्वंसकारी ।
ऊरुस्तम्भांत्रवृद्धिं गलगदमरुचिं सर्वसंधिग्रहार्तिं
मातङ्गं यो निहन्यान्मृगरिपुरिव चेद्रोगजालं तथैव ॥ २ ॥

भारंगमूळ, काडेचिराईत, बाळंतलिंबाची साल, नागरमोथे, कुटकी, वेखंड, सुंठ, मिरीं, पिंपळी, अडुळसा, कडु वृंदावन, रास्ना, उपळसरी, कडु पडवळ, देवदार, हळकुंड, पाडळमूळ, टेंटूमूळ, ब्राह्मी, दारुहळद, गुळवेल, लेंड, अतिविष, पोखरमूळ, त्रायमाण, रिंगणमूळ, डोरलीमूळ, इंद्रजव, हिरडा, बेहडा, आवळकाठी, व कचोरा हीं सर्व औषधें समभाग घेऊन त्यांचा काढा करावा. याला द्वात्रिंशदाख्य काढा असें म्हणतात. हा तेराही महा सन्निपातांचा नाश करितो. तसेंच शूल, श्वास, उचकी, खोकला, गुदांतील ठणका, पोट फुगणें, उरुस्तंभ, अंत्रवृद्धि, गळ्याचे रोग, अरुचि व सर्व सांध्यांतील पीडा ह्यांचा, सिंह जसा हत्तीचा नाश करितो त्याप्रमाणें नाश करितो.

अष्टादशांग काढा.

भूनिम्बदारुदशमूलमहौषधाब्द-
तिक्तेन्द्रबीजधनिकेभकणाकषायः ।
तन्द्राप्रलापकसनारुचिदाहमोह-
श्वासादियुक्तमखिलज्वरमाशु हन्यात् ॥ ३ ॥

काडेचिराईत, देवदार, दशमुळें, सुंठ, नागरमोथे, कुटकी, इंद्रजव, धने, गजपिंपळी ह्यांच्या काढ्याला अष्टादशांग काढा म्हणतात. हा तंद्रा, बडबड, खोकला, अरुचि, दाह, मोह व श्वास यांनीं युक्त अशा ज्वराचा त्वरित नाश करितो.

क्षुद्रादि पंचतिक्तकषाय.

क्षुद्रापौष्करभूनिम्बगुडूचीविश्वभेषजैः ।
पञ्चतिक्तकनामाऽयं क्वाथो हन्त्यष्टधाज्वरम् ॥ ४ ॥

रिंगणमूळ, पोखरमूळ, काडेचिराईत, गुळवेल व सुंठ ह्यांच्या काढ्याला पंचतिक्तकषाय म्हणतात. हा आठ प्रकारच्या ज्वरांचा नाश करितो.

दुसरा काढा.

दार्व्यम्बुदस्तिक्तफलत्रिकं च क्षुद्रा पटोली रजनी च निम्बः ।
क्वाथं विदध्याज्ज्वरसंनिपाते निश्चेतने पुंसि विबोधनार्थम् ॥ ५ ॥

दारुहळद, नागरमोथे, कुटकी, हिरडा, बेहडा, आवळकाठी, रिंगणमूळ, कडु पडवळ, हळकुंड व कडुनिंबाची साल, ह्यांचा काढा सन्निपातामध्यें बेशुद्ध असलेल्या रोग्यास शुद्धि येण्याकरितां द्यावा.

कफाधिक सन्निपातावर काढा.

ग्रन्थीन्द्रजामरतरुक्रिमिशत्रुभार्गी-
भृङ्गत्रिकटूवनलकट्फलपौष्कराणाम् ।
रास्नाभयाबृहतिकाद्वयदीप्यभूत-
केशीकिरातकवचाचविकाब्दकीणाम् ॥ ६ ॥

क्वाथो हन्यात्संनिपातान्समग्रान्बुद्धिभ्रंशं स्वेदशैत्यप्रलापान् ।
शूलाध्मानं विद्रधिं श्लेष्मवातान्वातव्याधीन्सूतिकानां च तद्वत् ७

गांठीपिंपळमूळ, इंद्रजव, देवदार, वावडिंग, भारंगमूळ, माका, सुंठ, मिरीं, पिंपळी, चित्रकमूळ, पोखरमूळ, रास्ना, बाळहिरडे, रिंगणमूळ, डोरलीमूळ, ओवा, निर्गुडी, काडेचिराईत, वेखंड, चवक व पहाडमूळ, ह्यांचा काढा सर्व सन्निपातांचा नाश करितो. तसेंच बुद्धिभ्रंश, घाम, शैत्य, बडबड, शूळ, पोटफुगी, करट, कफ, वात आणि बाळंतिणीला होणारे वातविकार ह्यांचा नाश करतो.

वाताधिक सन्निपातावर काढा.

अर्कानन्ताकिरातामरतरुरसनासिन्दुवारोग्रगन्धा
तर्कारीशिग्रुपञ्चोषणघुणदयितामार्कवाणां कषायः ।
सद्यस्तीव्रांस्त्रिदोषानपहरति धनुर्मारुतं दन्तबन्धं
शैत्यं गात्रेषु गाढं श्वसनकसनकं सूतिकावातरोगान् ॥ ८ ॥

रुईचें मूळ, धमासा, काडेचिराईत, देवदार, रास्ना, निर्गुडी, वेखंड, टाकळीची मुळी, शेवग्याचें मूळ, सुंठ, मिरीं, पिंपळी, चवक, चित्रक, अतिविष, माका ह्यांचा काढा सन्निपाताचा तात्काळ नाश करतो. तसेंच धनुर्वात, दातखिळी बसणें, अंग अतिशय थंड असणें, श्वास, खोकला व बाळंतिणीचे वातसंबंधीं रोग ह्यांचाही त्वरित नाश करितो.

दुसरा काढा.

अर्कग्रन्थिकशिग्रुदारुचविकानिर्गुण्डिकापिप्पली-
रास्नाभृङ्गपुनर्नवानलवचाभूनिम्बशुण्ठीकृतः।
क्राथः संहरति त्रिदोषमखिलं स्त्रापानिलं सूतिका-
नानामारुतशैत्यशान्तिकृदपस्मारस्मरत्र्यम्बकः ॥ ९ ॥

रुईचें मूळ, पिंपळमूळ, शेवग्याचें मूळ, देवदार, चवक, निर्गुडी, पिंपळी, रास्ना, माका, घेटुळीचें मूळ, चित्रक, वेखंड, काडेचिराईत व सुंठ ह्यांचा काढा सर्व सन्निपातांचा नाश करतो. तसेंच सुप्तिवात, बाळंतिणीचे नानाप्रकारचे वातविकार, अंगाचा गारपणा, ह्यांचा नाश करितो. शिवाय हा काढा अपस्माररूपी मदनाला त्र्यंबकाप्रमाणें आहे.

दशमूलादि काढा.

बिल्वोऽग्निमन्थः स्योनाकः काश्मरी पाटला स्थिरा।
त्रिकण्टकः पृश्निपर्णी बृहती कण्टकारिका ॥ १० ॥
दशमूलमिदं श्वाससंनिपातज्वरापहम्।

बेलाचें मूळ, टाकळीचें मूळ, टेंटूमूळ, शिवणमूळ, पाडळमूळ, साळवण, पिटवण, सराट्याचें मूळ, डोरलीमूळ, रिंगणमूळ, या दशमुळांचा काढा श्वास व सन्निपात ज्वर यांचा नाशक आहे.

दशमूली शठी शृंगी पौष्करं सदुरालभम् ॥ ११ ॥
शुण्ठी कुटजबीजं च पटोलं कटुरोहिणी।
अष्टादशांग इत्येष संनिपातज्वरापहः ॥
कासहृद्ग्रहपार्श्वार्तिश्वासहिक्कावमीहरः ॥ १२ ॥

दशमुळें, कचोरा, काकडशिंगी, पोखरमूळ, धमासा, सुंठ, इंद्रजव, कडु पडवळ व कुटकी, ह्याला दशमूलादि अष्टादशांग काढा म्हणतात. हा सन्निपातज्वराचा नाशक आहे. शिवाय खोकला, छातींत जखडल्यासारखें होणें, कुशींतील वेदना, श्वास, उचकी, व ओकारी ह्यांचाही नाश करितो.

लशुनं तिक्तकं काण्डं भार्गी चातिविषा तथा।
नरमूत्रेण च क्राथः संनिपाते सुदारुणे ॥ १३ ॥

लसूण, कुटकी, तिरकांडें, भारंगमूळ, अतिविष, ह्यांचा घोड्याच्या मुतांत काढा करून भयंकर सन्निपातावर द्यावा.

संधिक सन्निपात.

संधिस्थे हितमस्ति लङ्घनविधिस्वेदोपनाहादिकं
रूक्षं कर्म समग्रमेव विहितं कुर्याद्यवागूरलम् ।
मूलीपंचककल्ककलितमिदं सन्मागधीमिश्रितं
कौलत्थेन रसेन सैन्धवयुतं पेयं च विश्वौषधम् ॥ १ ॥

संधिक सान्निपातामध्यें लंघन, घाम काढणें व पुरचुंडीनें शेकणें ह्या क्रिया हितकारक आहेत. ह्याजवर सर्व रूक्षक्रिया करावी. पेज किंवा मांसरस द्यावयाचा तो लघुपंचमुळांचा कल्क व पिंपळीचें चूर्ण घालून तयार करून द्यावा, व हुलग्याचें काट सैंधव व सुंठ घालून प्यावयास द्यावें.

रास्नागुडूचीशठिवृद्धदारुसुराह्वविश्वात्रिफलावरीभिः ।
क्वाथं पिबेद्गुग्गुलुसंप्रयुक्तं समस्तसंधिग्रहसंनिपाते ॥ २ ॥

रास्ना, गुळवेल, कचोरा, वरधारा, देवदार, सुंठ, त्रिफळा व शतावरी, ह्यांचा काढा सर्व प्रकारच्या संधिग्रह सान्निपातावर गुग्गुळ घालून द्यावा.

रास्नाशुण्ठीगुडूचीसहचरजलदाभीरुपथ्यासुराह्वै-
स्तिक्ताकर्चूरवासानिलरिपुसहितैः पञ्चमूलीद्वयेन ।
एभिर्द्रव्यैः कषायस्त्वरितमपहरेत्पीतमात्रः प्रभाते
मन्यास्तम्भांत्रवृद्धिं ज्वरपिटककटीसंधिसर्वांगपीडाः ॥३॥

रासना, सुंठ, गुंळवेल, कोरांटीची मुळी, नागरमोथे, शतावरी, बाळहिरडे, देवदार, कुटकी, कचोरा, अडुळसा, एरंडमूळ व दशमुळें ह्यांचा काढा प्रातःकाळीं घेतला असतां मान ताठणें, अंत्रवृद्धि, ज्वरसंबंधी पीटिका, कंबर, सांधे व सर्वांगांतील पडा ह्यांचा नाश करतो.

अमृतोरुबूकविश्वासुरतरुरास्नाहरीतकीक्वाथः ।
सकलसमीरणरोगान्प्रातः सद्यो हरेत्पीतः ॥ ४ ॥

गुळवेल, एरंडमूळ, सुंठ, देवदार, रास्ना, बाळहिरडे, ह्यांचा काढा प्रातःकाळीं घेतला असतां सर्व वातरोगांचा नाश करतो.

ग्रन्थिककलितरुपथ्याकृतमालशिवाटरूषकैर्विहितः ।
एरण्डतैलयुक्तः क्वाथो हन्यान्मरुन्मान्द्यम् ॥ ५ ॥

पिंपळमूळ, बेहडा, बाळहिरडे, करंजाची साल, आवळकाठी, व

अडुळसा ह्यांचा काढा एरंडेल घालून घेतला असतां वातविकारानें येणारें मांद्य दूर करतो.

अथान्तकस्यासाध्यत्वादौषधं नास्ति।

अंतक सन्निपात असाध्य असल्यामुळें त्याजवर औषध नाहीं.

रुग्दाहाची चिकित्सा.

जलधरमलयजनागरसवालकोशीरपर्पटैः कथितम्।
यः पिबति पयः शीतं शाम्यति रुग्दाहकस्तस्य ॥ १ ॥

नागरमोथे, रक्तचंदन, सुंठ, वाळा, काळा वाळा, पित्तपापडा, ह्यांचा काढा करून थंड झाल्यावर घेतल्यास रुग्दाहसन्निपात शांत होतो.

बदरीपल्लवलेपः श्रीखण्डारिष्टफेनसंयुक्तः।
दातव्यः पदतलयो रुग्दाहकसंनिपातघ्नः ॥ २ ॥

चंदनाचें गंध, बाळंतलिंबाच्या रसावरील फेस व बोरीचीं पानें हीं एकत्र वाटून पायाच्या तळव्याला लेप करावा. तो रुग्दाहसन्निपाताचा नाश करितो.

पर्युषितधान्यसलिलं प्रातः पीतं सशर्करं पुंसाम्।
अन्तर्दाहं शमयति प्रवृद्धमपि तत्क्षणादेव ॥ ३ ॥

रात्रीं धणे पाण्यांत भिजत घालून सकाळीं तें पाणी साखर घालून घ्यावें. हें अतिशय वाढलेल्या अंतर्दाहाचा क्षणांत नाश करितें.

ब्राह्मीद्राक्षाजलधरवचोशीरशम्याकतिक्ता-
पथ्याधात्रीकलितरुबलानिम्बकोशातकीभिः।
भूनिम्बाद्यो भवति सहितः पञ्चमूलीद्वयेन
पीतः क्राथः सकलपवनव्याधिरुग्दाहहन्ता ॥ ४ ॥

ब्राह्मी, मनुका, नागरमोथे, वेखंड, वाळा, बाहव्याची शेंग, कुटकी, हिरडा, बेहडा, आवळकाठी, चिकणा, बाळंतलिंबाची साल, कडु दोडकी, काडेचिराईत आणि दशमुळें ह्या सर्वांचा काढा सर्व वातविकार व रुग्दाहसन्निपात ह्यांचा नाश करितो.

अगुरुघनसारसल्लककररुहनतनीरचन्दनैर्युक्तः।
रुग्दाहसंनिपातं निहन्ति मधुमिश्रितो धूपः॥ ५ ॥

कृष्णागर, कापूर, साळईचा डिंक, नखला, तगर, वाळा, व चंदन ह्या सर्वांचें चूर्ण करून मधाशीं मिसळून धूप द्यावा. हा रुग्दाहसन्निपाताचा नाश करितो.

निर्गुण्डीपुरसहितः सिद्धार्थकनिम्बसंयुक्तः ।
सर्जरसेन समेतो धूपो रुग्दाहकं हन्ति ॥ ६ ॥

निर्गुंडी, गुग्गूळ, मोहऱ्या, बाळंतलिंबाचा पाला, व राळ ह्यांचा धूप रुग्दाह सन्निपाताचा नाशक आहे.

पयोधराभ्यां कुशलां सुरूपां नवयौवनाम् ।
प्रमदां स्वभुजाश्लेषैर्भजेद्रुग्दाहमूर्छितः ॥
प्रह्लादं चास्य विज्ञाय तां स्त्रीमपनयेत् पुनः ।
हितं च भोजयेदन्नं येनाप्नोति सुखं महत् ॥ ७ ॥

रुग्दाह सन्निपातानें पीडित रोग्याला जिचे स्तन पुष्ट आहेत, अशा तरुण, सुस्वरूप व कुशल स्त्रीकडून आलिंगन देववावें. नंतर त्याला कामवासना उत्पन्न होण्याचा योग दिसला कीं, त्या स्त्रीला दूर करावें आणि त्याला सुख होईल असें पथ्यकारक अन्न खावयास घालावें.

चित्तभ्रमाची चिकित्सा.

पथ्यापर्पटकटुकामृद्वीकादारुजलदभूनिम्बाः ।
शम्याकपटोलशिवाकाथश्चित्तभ्रमं हन्ति ॥ १ ॥

बाळहिरडे, पित्तपापडा, कुटकी, मनुका, देवदार, नागरमोथे, काडेचिराईत, बाहव्याची शेंग, कडु पडवळ व आवळकाठी, ह्यांचा काढा चित्तभ्रमसन्निपाताचा नाश करतो.

हरीतकीपर्पटहारहूराशम्बूकपुष्पीकटुकापयोदैः ।
शम्याकदेवाह्वयभारतीभिश्चित्तभ्रमं हन्ति कृतः कषायः २

बाळहिरडे, पित्तपापडा, काळीं द्राक्षें, शंखपुष्पी, कुटकी, नागरमोथे, बाहव्याची शेंग, देवदार व ब्राह्मी ह्यांचा काढा चित्तभ्रमसन्निपाताचा नाश करितो.

कणोषणोग्रालवणोत्तमानि करंजबीजं प्रमदामलानि ।
पथ्याक्षसिद्धार्थकहिंगुशुंठीयुतानि बस्तांबुविमिश्रितानि ॥३॥
पिष्ट्वा गुटीयं नयने विधेया प्रचेतनेति प्रथितान्वितार्था ।
चित्तभ्रमापस्मृतिभूतदोषशिरोक्षिरोगभ्रमनाशहेतुः ॥ ४ ॥

मिरीं, पिंपळी, वेखंड, सैंधव, करंजाचें बीं, हळद, आवळकाठी, हिरडा, बेहडा, हिंग, सुंठ व मोहऱ्या ह्या सर्वांचें चूर्ण करून शेळीच्या मुतांत खलून गोळी करावी. आणि हिची पूड करून डोळयांत घालावी, म्हणजे शुद्धी येते; आणि चित्तभ्रम, अपस्मार, भूतबाधा, मस्तक व नेत्र ह्यांचे विकार, व भ्रम ह्यांचा नाश करिते.

शीतांगसन्निपातोऽसाध्यः

शीतांग सन्निपात असाध्य आहे.

शीतांगाची चिकित्सा.

भास्वन्मूलं जीरकव्योषभार्गी व्याघ्री शुंठी पुष्करं गोजलेन ।
सिद्धं सद्यः शीतगात्रार्तिमोहश्वासश्लेष्मोद्रेककासान्निहंति ॥ १ ॥

रुईचें मूळ, जिरें, सुंठ, भारंगमूळ, रिंगणमूळ, सुंठ, पोखरमूळ, ह्यांचा गोमूत्रांत काढा करून द्यावा. हा शीतांग सन्निपात, अतिशय मोह, श्वास, कफोद्रेक व खोकला ह्यांचा नाश करतो.

रसविषमरिचमहेशप्रियफलभस्मैकभूचतुर्वसुभिः ॥ २ ॥
भागैर्मितमुद्धूलनमिदमतिस्वेदशैत्यहरम् ॥

पारा एक भाग, बचनाग एक भाग, मिरीं चार भाग आणि धोतऱ्याच्या फळाची राख आठ भाग ह्यांचा एकत्र खल करून अंगास लावावें. हें अति घाम व अंगाचा थंडपणा नाहींसा करितें.

तंद्रिकाची चिकित्सा.

ज्वरे प्रथममुत्पन्ने चक्षुर्भ्यां नैव पश्यति ।
तन्द्रिकः संनिपातोऽयं कष्टसाध्यो भवेत्ततः ॥ १ ॥

तंद्रिक सन्निपाताचा ज्वर उत्पन्न झाल्याबरोबर रोग्याला डोळ्यानें दिसत नाहीं. म्हणून हा तंद्रिक सन्निपात कष्टसाध्य आहे.

भार्गीपुष्करपथ्यानिदिग्धिकानागरामृताक्काथः ।
अपनयति तन्द्रिकमिमं निःसंशयं प्रगे पीतः ॥ २ ॥

भारंगमूळ, पोखरमूळ, बाळहिरडे, रिंगणमूळ, सुंठ, व गुळवेल ह्यांचा काढा प्रातःकाळीं घेतला असतां तंद्रिक सन्निपात निःसंशय दूर होतो.

राजामनःशिलैलांजनमेतत्तन्द्रिकेऽपीष्टम् ।

रास्ना, मनशीळ, व वेलदोडे ह्यांचें सूक्ष्म चूर्ण करून तंद्रिक सन्निपातामध्यें अंजन करावें.

अमृतापटोलवासाव्योषयुतस्तन्द्रिके क्काथः ॥ ३ ॥

गुळवेल, कडु पडवळ, अडुळसा, सुंठ, मिरीं, व पिंपळी ह्यांचा काढा तंद्रिक ज्वरावर द्यावा.

कुष्ठगवाक्षीनागरमरिचनिशाद्वयवचाकणायुक्तः ।
बस्तसलिलेन पिष्टं तन्द्रिकनिघ्नं भवेन्नस्यम् ॥ ४ ॥

कोष्ठ, कवंडळीचें मूळ, सुंठ, मिरीं, हळद, दारुहळद, वेखंड, व पिंपळी ह्या सर्वांचें चूर्ण करून शेळीच्या मुतांत खलून नस्य केलें असतां तें तंद्रिक ज्वराचा नाश करितें.

कंठकुब्जचिकित्सा.

त्रिकटुककलिङ्गकटुकाहरीतकीविभीतकामलकैः ।
ध्वंसयति कण्ठकुब्जं वृषरजनीद्वययुतः क्काथः ॥ १ ॥

सुंठ, मिरीं, पिंपळी, इंद्रजव, कुटकी, हिरडे, बेहडे, आवळकाठी, अडुळसा, हळद, व दारुहळद ह्यांचा काढा कंठकुब्जसन्निपाताचा नाश करितो.

शृङ्गीवत्सकचेतकीघनसटीभूनिम्बभार्गीनिशाः
तिक्तापुष्करचित्रकैः समरिचैर्व्याघ्रीवृषामिश्रितैः ।
धात्रीदारुविभीतकैश्च चविकाविश्वाकणाकट्फलैः
पीतः कृन्तति कण्ठकुब्जमचिरात्कोष्णः कषायस्त्विह ॥ २ ॥

काकडशिंगी, कुडा, बाळहिरडे, नागरमोथे, कचोरा, काडेचिराईत, भारंगमूळ, हळद, कुटकी, पोखरमूळ, चित्रकमूळ, मिरें, रिंगणमूळ, अडुळसा, आवळकाठी, देवदार, बेहडा, चवक, सुंठ, पिंपळी, कायफळ, ह्यांचा काढा कोमट करून घेतला असतां कंठकुब्जाचा त्वरित नाश करितो.

अपनयति कण्ठकुब्जं कृष्णापामार्गबीजदं नस्यम् ।
अथ हन्ति सलिलसहितं त्रिकटुककटुतुम्बिनीनस्यम् ॥ ३

काळ्या आघाड्याच्या बीचें नस्य केलें असतां तें कंठकुब्जाचा नाश करितें. तसेंच कडु भोपळ्याचें बीं, सुंठ, मिरीं, व पिंपळीं, ह्यांचें पाण्याशीं नस्य केलें असतां तेंही कंठकुब्जाचा नाश करितें.

कर्णकाची चिकित्सा.

रक्तस्रावो जलौकाभिर्घृतपानं च युज्यते ।
कर्णग्रन्थिविनाशार्थमायुर्वेदविदां वरः ॥ १ ॥
तत्र रक्तं हरेत्क्षिप्रं जलौकाभिरनन्तरम् ।
त्रिफलासर्पिषः पानं कार्यं जीर्णघृतस्य च ॥ २ ॥
प्रदेहाः कफपित्तघ्नाः कार्याः संशमनानि च ।
मुद्गपर्णनिभा पृष्ठे रक्तवर्णा यथोदरे ।
षडंगुलप्रमाणेन जलौका भद्रिका मता ॥ ३ ॥

कर्णक सन्निपातामध्यें वैद्यानें कानामागें होणाऱ्या गांठीला जळवा लावून रक्त काढावें आणि रोग्याला तूप पाजावें. जळवा लावून रक्त काढल्यानंतर जुनें तूप किंवा त्रिफलादि घृत रोग्यास पाजावें. कफपित्तनाशक व ज्वरशामक असे लेप अंगास लावावे. (रक्त काढावयास जिच्या पाठीचा रंग मुगाच्या पानासारखा व रंग तांबडा असतो अशी भद्रिका नांवाची जळू उत्तम समजावी.)

रास्नाबृहतीपथ्याव्योषकटुकाघनपुष्कराह्वैश्च ।
शृंगीधाराभार्गीकाथः कर्णकरुजं हरेत्पानात् ॥ ४ ॥

रासना, रिंगणमूळ, बाळहिरडे, सुंठ, मिरीं, पिंपळी, कुटकी, नागरमोथे, पोखरमूळ, काकडशिंगी, गुळवेल, भारंगमूळ, ह्यांचा काढा कर्णक सन्निपाताचा नाश करितो.

मरीचदशमूलमगधाफलत्रयनिशामहौषधीतिक्ताः ।
भूनिम्बसैन्धवयुतः कर्णकहन्ता भवेत्काथः ॥ ५ ॥

मिरीं, दशमुळें, पिंपळी, त्रिफळा, हळकुंड, सुंठ, कुटकी, काडेचिराईत, सैंधव ह्यांचा काढा कर्णक सन्निपाताचा नाश करितो.

हिंगुद्विनिशविशालासैन्धवसुरदारुकुष्ठरविदुग्धैः ।
दत्तः क्रमेण लेपो हन्ति महाकर्णकग्रन्थिम् ॥ ६ ॥

हिंग, हळद, दारुहळद, कडुवृंदावनाची मुळी, सैंधव, देवदार, कोष्ठ, व रुईचा चीक ह्यांचा क्रमानें लेप केला असतां कर्णक सन्निपातांतील मोठ्या गांठीचा नाश होतो.

दशशतकरदुग्धारुष्करत्वक्समेतं
दहनगुडाग्निकुम्भाकुष्ठकासीसयुक्तम् ।
अपनयति वितीर्णं लेपनं सप्तरात्रा-

श्वयथुहरणयुक्तं कर्णकग्रन्थिमेतत् ॥ ७ ॥

रुईचा चीक, बिब्याच्या झाडाची साल, किंवा पोंखरमुळाची साल, चित्रक, गूळ, दांतीमूळ, कोष्ट, व हिराकस ह्यांचा लेप केला असतां सात दिवसांमध्यें कर्णकग्रंथि व सूज ह्यांचा नाश होतो.

अशिशिरजलयुक्तं नावनं कर्णकार्तौ
जनयति सुखसिद्धिं घ्राणरन्ध्रप्रवेशात् ।
लवणपरमकृष्णाचूर्णयुक्तं प्रभाते
सकलमुनिभिरुक्तं व्याधिविध्वंसकारि ॥ ८ ॥

सैंधव व पिंपळी ह्यांचें चूर्ण कोमट पाण्यांत घालून त्या पाण्याचें प्रातःकाळीं नस्य द्यावें; म्हणजे कर्णकसन्निपातानें पीडलेल्या मनुष्याला सुख होतें. हा व्याधिनाशक प्रयोग सर्व मुनींनीं सांगितला आहे.

दन्तीचित्रकयोर्मूलं स्नुह्यर्कपयसी गुडः ।
भल्लातकास्थि कासीसं लेपो भवति कर्णके ॥ ९ ॥

दांतीमूळ, चित्रकमूळ, त्रिधारी निवडुंगाचा चीक, गूळ, बिब्यांतील गोडंबी, हिराकस, ह्यांचा लेप कर्णकसन्निपातांतील गांठीवर लावावा.

सनागरं देवदारुरास्नाचित्रकपेषितम् ।
प्रलेपनमिदं श्रेष्ठं गलशोथविनाशनम् ॥ १० ॥

सुंठ, देवदार, रास्ना व चित्रकमूळ हे जिन्नस पाण्यांत उगाळून लेप करावा. हा लेप गळ्याची सूज घालविण्याविषयीं प्रशस्त आहे.

कुलत्थः कट्फलं शुण्ठी कारवी च समांशकैः ।
सुखोष्णं लेपनं कार्यं कर्णमूले मुहुर्मुहुः ॥ ११ ॥

हुलगे, कायफळ, बडिशेप, व सुंठ ह्यांचें समभाग चूर्ण करून पाण्यांत कालवून ऊन करून कर्णमूळावर सुखोष्ण असा लेप वरचेवर करावा.

बीजपूरकमूलत्वग्वह्निमन्थस्तथैव च ।
शरपुङ्खाशिखीतुम्बीसकृष्णाविषमुष्टिभिः ॥ १२ ॥
प्रलेपो वा दृढं योज्यः श्वयथौ कर्णमूलजे ।

महाळुंगाच्या मुळांची साल, टाकळ्याच्या मुळ्यांची साल,

उन्हाळी, चित्रकमूळ, कडु भोपळ्याचें मूळ, पिंपळी, कुचला ह्यांचा कर्णमुळाच्या सुजेवर लेप करावा.

वज्रमुष्टिभवः कन्दः शोथविध्वंसनक्षमः ॥ १३ ॥

छुतीच्या कांद्याचा लेप सूज घालविण्याविषयीं समर्थ आहे.

कर्कटस्य च मांसेन स्वेदनं बन्धनं तथा ।
कर्णमूलभवं शोथं नाशयत्याविलम्बितम् ॥ १४ ॥

खेंकड्याच्या मांसानें शेकून तें मांस वर बांधावें, तें कर्णमूळाची सूज त्वरित दूर करितें.

सिद्धार्थसैन्धववचाग्रहधूमविश्वैः
पिष्टैर्जलेन निशया सहितश्च सूक्ष्मम् ।
लेपो हितो रुधिरनिष्क्रमणप्रतीत-
शोफव्रणस्य शमनः सरुजश्च कर्णे ॥ १५ ॥

कणमूळाचें रक्त काढून त्यावर मोहऱ्या, सैंधव, वेखंड, घेरोसा, सुंठ व हळद ह्यांचा पाण्यांतून लेप करावा. हा सूज, व्रण व कानाचा ठणका ह्यांजवर प्रशस्त आहे.

भुग्ननेत्राची चिकित्सा.

दार्व्यम्बुदातिक्तफलत्रिकं च क्षुद्रा पटोली रजनी सनिम्बा ।
क्वाथं विदध्याज्ज्वरसंनिपाते निश्चेतने पुंसि विबोधनार्थम् ॥ १ ॥

दारुहळद, नागरमोथे, कुटकी, त्रिफळा, रिंगणमूळ, कडुपडवळ, हळकुंड व बाळंतलिंबाची साल ह्यांचा काढा सन्निपातज्वरानें बेशुद्ध झालेल्याला शुद्धि येण्याकरितां द्यावा.

भूनिम्बमाक्षिकवचासहितं च कुर्या-
ल्लेहं कणोषणरसोनसुराजिकाभिः ।
नेत्राञ्जनं च लवणोत्तमपिप्पलीभ्यां
नस्यं वचामरिचहिंगुमधूकसारैः ॥ २ ॥

काडेचिराईत, वेखंड, पिंपळी, मिरीं, लसूण व मोहऱ्या हीं एकत्र वाटून मध घालून लेह द्यावा. हा हितकारक आहे. पिंपळी व सैंधव ह्यांचें डोळ्यांत अंजन करावें. आणि वेखंड, मिरीं, हिंग, व मोहाचा डिंक ह्यांचें नस्य करावें.

मरिचतुरगगन्धामागधीसिन्धुजातं
लशुनमधुकसारैरुग्रगन्धार्द्रकाभ्याम् ।

...गलकजलपिष्टः संयुतः शास्त्रविद्भिः
सपदि भवति नस्यो भुम्रनेत्रप्रमाथी ॥ ३ ॥

मिरीं, अश्वगंध, पिंपळी, सैंधव, लसुण व मोहाचा डीक, ह्यांचें किंवा वेखंड व आलें ह्यांचें शेळीच्या मुतांतून एकदांच नस्य केलें असतां भुम्रनेत्राचा नाश होतो.

रक्तष्ठीवीची चिकित्सा.

पर्पटधन्वयवासकवासाभूस्तृणकैः कटुकीफलिनीभ्याम् ।
शर्करया सहितोऽपि कषायो लोहितमास्यगतं विनिहन्ति ॥१॥

पित्तपापडा, धमासा, अडूळसा, रोहिस गवत, कुटकी व गव्हला ह्यांचा काढा साखर घालून द्यावा. तो तोंडावाटे पडणारें रक्त थांबवितो.

जलदाह्वयपद्मकपर्पटकैर्मलयोद्भवजातिवरीमधुकैः ।
मधुनिम्बजलानलचन्दनकैः क्वथितं मुखरक्तहरं सलिलम् ॥ २॥

नागरमोथे, पद्मकाष्ट, पित्तपापडा, रक्तचंदन, जाईचें मूळ, वाळा, जेष्टमध, ह्यांचा काढा मध घालून द्यावा. तो तोंडावाटे पडणारें रक्त बंद करितो. तसेंच बाळंतलिंबाच्या काड्या, वाळा, आंवळकाठी व रक्तचंदन ह्यांचा काढाही तोंडावाटे पडणारें रक्त बंद करितो.

प्रलापकाची चिकित्सा.

तगरतुरगगन्धा पर्पटी शङ्खपुष्पी
त्रिदशविटपितिक्ता भारती भूतकेशी ।
जलधरकृतमालश्वेतकीगोस्तनीभ्यां
सह हरति कषायो मंक्षु पानात्प्रलापम् ॥ १ ॥

तगर, अश्वगंध, पित्तपापडा, शंखपुष्पी, देवदार, कुटकी, ब्राह्मी, निर्गुडी, नागरमोथे, बाळहिरडे व मनुका ह्यांचा काढा प्रलापकाचा त्वरित नाश करितो.

जलधरदशमूलं वारि शुण्ठीसमेतं
मलयजकृतमालं वासकं पर्पटं च ।
समधरणधृतांशः क्वाथ एष प्रभाते
शमयति समुदीर्णं पीतमात्रः प्रलापम् ॥ २ ॥

नागरमोथे, दशमुळें, वाळा, सुंठ, रक्तचंदन, बाहव्याची शेंग,

अडुळसा व पित्तपापडा ह्या सर्व जिनसा समभाग घेऊन त्यांचा काढा घेतला असतां प्रलापकाचा नाश करितो.

जिह्वकाची चिकित्सा.

सिंहीनागरपुष्करैः सकटुकै रास्नागुडूचीयुतै-
र्भार्गीकर्कटशृङ्गिकाशठिसमैर्दुःस्पर्शवासाघनैः ।
पीतं जिह्वकहारि वारि भवति ब्राह्मीवचामिश्रितैः
प्रोक्तं वैद्यवरेण वन्द्यमुनिभिर्भूनिम्बमिश्रं शृतम् ॥ १ ॥

डोरलीमूळ, सुंठ, पोखरमूळ, कुटकी, रास्ना, गुळवेल, भारंगमूळ, काकडशिंगी, कचोरा, धमासा, अडुळसा, नागरमोथे, ब्रह्मी, वेखंड, काडेचिराईत, ह्यांचा काढा जिह्वकसन्निपाताचा नाश करितो, असें ऋषींनीं सांगितलें आहे.

सुरतरुकटुनिम्बैरक्षपथ्यापटोली
रजनियुगुलविश्वासिंहिकापुष्कराह्वैः ।
सलिलधरगुडूचीवासकैः सर्वमेभिः
प्रशमयति कषायो जिह्वकं कष्टसाध्यम् ॥ २ ॥

देवदार, बाळंतलिंबाची साल, बेहडेदळ, हिरडेदळ, कडु पडवळ, हळद, दारुहळद, सुंठ, डोरली, पोखरमूळ, नागरमोथे, गुळवेल व अडुळसा, ह्यांचा काढा कष्टसाध्य अशा जिह्वकाचा नाश करतो.

तीक्ष्णद्रव्यैः सलवणैर्मातुलुङ्गरसप्लुतैः ।
जिह्वायां च सकृल्लेपः कटुतीक्ष्णेन संयुतैः ॥ ३ ॥

तिखट, तीक्ष्ण व खारट अशा द्रव्यांचा महाळुंगाच्या रसाशीं एकदांच लेप केल्यास तो जिह्वकाचा नाशक आहे.

अभिन्यासाची चिकित्सा.

रामठनागरसहितं भृङ्गरसाम्लं विलेहयेत्प्रातः ।
अथ कटुतिक्तोपयुतं भवति सुखप्रबोधनं तस्य ॥ १ ॥

हिंग, सुंठ, माक्याचा रस, लिंबाचा रस, ह्यामध्यें आणखी कडूतिखट अशीं औषधें घालून चाटवावें, म्हणजे सुखानें शुद्धि येते.

मरिचलवणकृष्णाभूतकेशीमधूकैः
कटुफलमधु कृत्वा कोष्णनीरेण नस्यः ।
प्रकटयति विकीर्णश्चाष्टभिर्वा चतुर्भिः

सकलकरणबोधं बिन्दुभिर्दीयमानः ॥ २ ॥

मिरीं, सैंधव, पिंपळी, निर्गुंडीचा रस, मोहाचीं फुलें, कायफळ व मध ह्या सर्वांचें चूर्ण करून ऊन पाण्यांत घालून त्या पाण्याचे चार किंवा आठपर्यंत थेंब नाकांत घालावे; म्हणजे सर्व इंद्रियांना शुद्धि येते.

लशुनमरिचकृष्णामाणिमन्थोग्रगन्धा-
शुकतरुफलबीजैर्विश्वगोमूत्रपिष्टैः।
कफपवनविकारे रक्तपित्तप्रभेदे
गदितमगदविद्भिर्नेत्रयोरञ्जनं स्यात् ॥ ३ ॥

लसूण, मिरीं, पिंपळी, सैंधव, वेखंड, शिरसाचें बीं व सुंठ हे जिन्नस गोमूत्रांत वाटून त्यांचें कफवातविकारामध्यें व रक्तपित्त विकारामध्यें अंजन करावें, म्हणून विद्वानांनीं सांगितलें आहे.

संज्ञा यस्य न जायते चरणयोर्द्वंद्वं समादह्यते
भाले लोहशलाकया शशिकृते सर्वक्रियाकर्मणि।

ज्याला शुद्धि येत नसेल त्याला लोखंडाच्या सळईनें दोन पायांच्या तळव्याला व कपाळावर डाग द्यावा.

शृङ्गीधन्वयवासपुष्करजटाभार्गीशठीसिंहिका-
क्राथः पानविधानतः कफहरोऽभिन्यासविध्वंसकः ॥ ४ ॥

काकडशिंगी, धमासा, पोखरमूळ, भारंगमूळ, कचोरा, व डोरलीमूळ ह्यांचा काढा विधियुक्त घ्यावा तो कफ व अभिन्यास सान्निपाताचा नाशक आहे.

त्रायन्तीदशमूलपुष्करजटावातारिभिः कारवी-
भार्गी स्यादमृताटरूषकशटीगोमूत्रसंयोजितैः।
शृंगीव्योषपुनर्नवाभिरचिरादुष्णः कषायो हरे-
त्सोऽभिन्यासगदं कफज्वरहरो निःसंशयं पानतः ॥ ५ ॥

त्रायमाण, दशमुळें, पोखरमूळ, एरंडमूळ बडिशेप, भारंगमूळ, गुळवेल, अडुळसा, कचोरा, काकडाशिंगी, सुंठ, मिरीं, पिंपळी, घेटुळी किंवा वसु, ह्यांचा गोमूत्रांत काढा करून तो ऊन आहे तोंच द्यावा. हा घेतला असतां अभिन्यास व वाढलेला कफदोष ह्यांचा निःसंशय नाश करितो.

मञ्जिष्ठाशिखिबालबिल्वकशठीशुण्ठीकरंजानिशा-
त्रायन्तीबृहतीवृषोषणकणाक्काथस्तु पेपीयते ।
यैः प्रातः प्रणिधाय लक्षितगदैः सद्वैद्यराट्संनिधौ
तस्यापि प्रशमं व्रजन्ति सहसा सर्वांगजा व्याधयः ॥६॥

मंजिष्ट, चित्रक, कोंवळें बेलफळ, कचोरा, सुंठ, करंजाची साल, हळकुंड, त्रायमाण, रिंगणमूळ, अडुळसा, मिरीं व पिंपळी, ह्यांचा काढा चांगल्या वैद्याच्या सांगण्यावरून जो प्रातःकाळीं घेतो, त्याचे सर्वांगांतील रोग दूर होतात.

सुरभिसलिलयुक्तः सिंहिकाश्रीफलाभ्यां
प्रवरलवणयासाविश्वपाषाणभेदैः ।
पवनरिपुजटाभिः संयुतः क्काथ एष
प्रतिदिनमपि पीतो हन्त्यभिन्यासशूलम् ॥ ७ ॥

डोरलीमूळ, बेलफळ, धमासा, सुंठ, पाषाणभेद, व एरंड-मूळ ह्यांचा काढा गोमूत्रांत करून सैंधव घालून प्रतिदिवशीं द्यावा; तो अभिन्यास व शूल ह्यांचा नाश करितो.

शृंगीभार्ग्यभयाजाजी कणाभूनिंबपर्पटैः ।
देवदारुवचाकुष्ठयासकट्फलनागरैः ॥ ८ ॥
मुस्तधान्याकतिक्तेंद्रयवपाठाहरेणुभिः ।
हस्तिपिप्पल्यपामार्गपिप्पलीमूलचित्रकैः ॥ ९ ॥
विशालारग्वधारिष्टशठीबाकुचिकाफलैः ।
विडंगरजनीदार्वीयवानीद्वयसंयुतैः ॥ १० ॥
समांशैर्विहितः क्काथो हिंग्वार्द्रकरसाचितः ।
अभिन्यासं ज्वरं घोरं हन्ति तंद्रां च तत्क्षणात् ॥ ११ ॥
प्रमेहं कर्णशूलं च संनिपातांस्त्रयोदश ।
हिक्कां श्वासं च कासं च तथा सर्वानुपद्रवान् ॥ १२ ॥

काकडशिंगी, भारंगमूळ, बाळहिरडे, जिरें, पिंपळी, काडे-चिराईत, पित्तपापडा, देवदार, वेखंड, कोष्ट, धमासा, कायफळ, सुंठ, नागरमोथे, धने, कुटकी, इंद्रजव, पहाडमूळ, रेणुकबीज, गजपिंपळी, अघाड्याचें मूळ, पिंपळमूळ, चित्रक, कडू वृंदावनाची मुळी, बाह-व्याची शेंग, बाळंतलिंबाची साल, कचोरा, बावचीच्या शेंगा, वावडिंगें, दारुहळद, हळद, ओवा व अजमोदा हीं सर्व समभाग

घेऊन ह्यांचा काढा करून त्यांत हिंग व आल्याचा रस घालून द्यावा. हा काढा अभिन्यास ज्वर व तंद्रा यांचा क्षणांत नाश करितो. आणि प्रमेह, कर्णशूळ, तेरा सन्निपात, उचकी, श्वास कास, तसेंच ज्वरांचे सर्व उपद्रव ह्यांचा नाश करतो.

अत्र पूर्वोक्तो भार्ग्यादिक्काथः पूर्वोक्तान्यौषधानि च देयानि ।

ह्या अभिन्यास सन्निपातामध्यें मागें सांगितलेला भांर्ग्यादि काढा व पूर्वीं सांगितलेलीं इतर औषधेंही द्यावीं.

यावच्च श्वसते जीवो यावत्क्रामति भेषजम् ।
तावत्क्रिया प्रकर्तव्या दैवस्य कुटिला गतिः ॥ १३ ॥

जोंपर्यंत जीवाचा श्वासोच्छ्वास चालू आहे व जोंपर्यंत औषध घशांत उतरत आहे, तोंपर्यंत उपचार करीत असावें, कारण दैवाची गति विचित्र आहे.

आगंतुक ज्वराची चिकित्सा.

अभिचाराभिशापोत्थौ ज्वरौ होमादिना जयेत् ।
दानस्वस्त्ययनातिथ्यैरुत्पातग्रहपीडने ॥ १ ॥

जारणमारणादिकांनीं किंवा शापादिकांनीं येणारा ज्वर होमहवनादिकांनीं जिंकावा. अनिष्ट ग्रहादिकांच्या पीडेपासून होणारा ज्वर दान, पुण्याहवाचन, ब्राह्मणभोजन इत्यादिकांनीं जिंकावा.

भूतविद्यासमुद्दिष्टैर्बन्धावेशनताडनैः ।
जयेद्भूताभिषंगोत्थं मनःशान्त्या च मानसम् ॥ २ ॥

भूतविद्येमध्यें सांगितलेल्या बंधन, आवेशन, ताडन इत्यादि प्रयोगांनीं भूतादिकांपासून येणारे ज्वर जिंकावे; आणि मानसिक ज्वर मनाला स्वस्थपणा देऊन जिंकावा.

मधूकसारं मरिचं सैन्धवं पिप्पली वचा ।
संज्ञाप्रबोधनं नस्यं देयं भूतज्वरे सदा ॥ ३ ॥

मोहाचा डीक, मिरीं, सेंधेलोण, पिंपळी व वेखंड यांचें नस्य भूतज्वरामध्यें शुद्धि येण्याकरितां द्यावें.

अभिघातज्वरे कुर्यात्क्रियामुष्णविवर्जिताम् ।
कषायान्मधुरान्स्निग्धान्यथादोषमथापि वा ॥ ४ ॥
अभिघातज्वरो नश्येत्पानाभ्यंगेन सर्पिषः ।
मद्यैर्द्रव्यैश्च सात्म्यैश्च तथा मांसरसोदनैः ॥ ५ ॥

अभिघातज्वरावर उष्ण उपचार खेरीज करून इतर उपचार करावे. किंवा दोषानुरूप मधुर व स्निग्ध असे काढे वगैरे योजावे. तूप पिणें, अंगास लावणें, बुद्धिवर्धक द्रव्यादिकांचें व ज्याचीं नित्य संवय आहे अशा मांसरसयुक्त अन्नाचें सेवन केल्यानेंही अभिघात ज्वर शांत होतो.

वधबन्धसमावेशभग्ननष्टसमुद्भवान् ।
ज्वरानुपाचरेत्पूर्वमदिराक्षीरभोजनैः ॥ ६ ॥

वध, बंधन, आवेश, हाड वगैरे मोडणें इत्यादि कारणांनीं येणारा ज्वर मद्य व दूध वगैरे खाण्यास घालून जिंकावा.

औषधीगन्धविषजौ विषपित्तप्रसादनैः ।
जयेत्कषायैर्मतिमान्सर्वगन्धकृतैर्भिषक् ॥ ७ ॥

औषधादिकांच्या उग्र वासानें, विषादिकांच्या वासानें पित्त-प्रकोप होऊन जो ज्वर येतो, त्याजवर "सर्वगंधकषाय"[1] देऊन तो ज्वर जिंकावा.

क्रोधजे पित्तजित्काम्ये नार्यः सद्वाक्यमेव च ।
आश्वासनेष्टलाभेन वायोः प्रशमनेन च ॥ ८ ॥

क्रोधापासून येणारा ज्वर पित्तज्वरनाशक उपायांनीं जिंकावा. आणि कामज्वर स्त्रियांचें मधुर भाषण, आश्वासन, इष्ट वस्तूचा लाभ व वातनाशक उपाय ह्यांनीं जिंकावा.

हर्षेण च शमं यान्ति कामशोकभयज्वराः ।
व्याघ्रचित्तकघातार्थं स्थापयेज्जलमध्यगम् ॥ ९ ॥
अनया शीतक्रियया भयरोगः प्रशाम्यति ।
कामात्क्रोधज्वरो नाशं क्रोधात्कामसमुद्भवः ।
याति ताभ्यामुभाभ्यां वा भयशोकसमुत्थितः ॥ १० ॥

काम, शोक व भीति ह्यांपासून होणारे ज्वर मनाला आनंद झाला म्हणजे शांत होतात. आणि वाघादिकांची भीति मनांतून जाण्याकरितां रोग्याला पाण्यांत बसवावें. ह्या शीत उपचारानें भया-पासून होणारे विकार शांत होतात. कामसंचारानें क्रोधज्वर शांत

१. दालचिनी, तमालपत्र, वेलदोडे, नागकेशर, कापूर, कंकोळ, अगर, केशर व लवंग ह्या सर्वांना सर्वगंध असें म्हणतात.

होतो व रागानें कामज्वर शांत होतो. आणि काम व क्रोध ह्यांच्या योगानें भय व शोक ह्यांपासून होणारे ज्वर शांत होतात.

दोषोल्पोहितसंभूतो ज्वरोत्सृष्टस्य वा पुनः ॥
धातुमन्यतमं प्राप्य करोति विषमज्वरम् ।
शीतपूर्वः स विज्ञेयो दाहपूर्वो निरन्तरम् ॥ १ ॥

नुकतेच ज्वरांतून उठलेल्या मनुष्याचा शिल्लक राहिलेला अल्प दोष अपथ्यकारक आहारविहारादिकांनीं प्रकुपित होऊन रसादि अन्य धातूंचा आश्रय करून विषमज्वर उत्पन्न करितो, तो शीतपूर्व व दाहपूर्व असा असतो.

आतङ्कमुक्तौ कृशताश्रयाणां विमुक्तपथ्याद्युचितक्रियाणाम् ।
अल्पोऽपि दोषो विषमं विदध्याज्ज्वरं प्रवृद्धो प्रतिपक्षरुद्धम् ।
एकद्वित्रिचतुर्थः स्याद्विषमोऽन्यस्तु जीर्णकः ।
एते पञ्च ज्वराः पीडां यान्त्येव बहुवासरम् ॥ ३ ॥

ज्वरांतून उठल्यामुळें कृश झालेल्या मनुष्यानें पथ्यादि उचित क्रिया सोडून दिल्या असतां अल्प दोष देखील विरुद्ध दोषांनीं कोंडून धरल्यामुळें मोठा विषमज्वर उत्पन्न करतो. तो एकाहिक, द्व्याहिक, त्र्याहिक, चातुर्थिक व जीर्ण ज्वर असा पांच प्रकारचा आहे. हे पांच ज्वर फार दिवसपर्यंत पीडा देतात.

विषमज्वरनाशाय चिकित्सा वक्ष्यतेऽधुना ।
वातप्रधानं सर्पिर्भिर्बस्तिभिः सानुवासनैः ॥ ४ ॥
स्निग्धोष्णैरन्नपानैश्च शमयेद्विषमज्वरम् ।
विरेचनेन पयसा सर्पिषा संस्कृतेन च ॥ ५ ॥
विषमं तिक्तशीतैश्च ज्वरं पित्तोत्तरं जयेत् ।
वमनं पाचनं रूक्षमन्नपानं च लंघनम् ॥ ६ ॥
कषायोष्णं च विषमज्वरे शस्तं कफोत्तरे ।

विषमज्वर दूर होण्याकरितां आतां चिकित्सा सांगतों. तूप पिणें, अनुवासन बस्ति, स्निग्ध व उष्ण अशीं अन्नपानें ह्या उपायांनीं वातप्रधान विषमज्वर जिंकावा. दूध व तूप ह्यांनीं तयार केलेलीं विरेचनें व कडू व थंड अशीं अन्नपानें ह्यांनीं पित्तप्रधान विषमज्वर जिंकावा. वमन, पाचन व रूक्ष, तुरट व उष्ण असें अन्नपान व लंघन हें कफप्रधान विषम ज्वरामध्यें प्रशस्त आहे.

त्रायन्तीकटुकानन्तासारिवाभिः शृतं जलम् ॥ ७ ॥
संततारुये ज्वरे देयं वातादीनां निवृत्तये।
षोडशाष्टचतुर्भागं वातपित्तकफार्तिषु ॥ ८ ॥
क्षौद्रं कषाये दातव्यं विपरीतं तु शर्करा।

त्रायमाण, कुटकी, गुळवेल, व उपलसरीचें मूळ ह्यांचा काढा संततज्वरामध्यें वातादिकांची पीडा दूर होण्याकरितां द्यावा. काढा देणें तो अनुक्रमें सोळा भाग, आठ भाग व चार भाग ह्याप्रमाणें अनुक्रमें वात, पित्त व कफविकारावर द्यावा. काढ्यामध्यें मध व खडीसाखर हीं विषमप्रमाणांत घालावीं.

वासापटोलत्रिफलाद्राक्षाशम्याकनिम्बजः ॥
समधुः ससितः काथो हन्यादेकाहिकं ज्वरम् ॥ ९ ॥

अडूळसा, कडू पडवळ, हिरडेदळ, बेहेडेदळ, आवळकाठी, मनुका, बाहव्याच्या शेंगेचा मगज व बाळंतलिंबाची साल ह्यांचा काढा मध व खडीसाखर घालून घेतला असतां तो एकाहिक ज्वराचा नाश करितो.

उलूकदक्षिणः पक्षः सितसूत्रेण वेष्टितः।
धारणाद्वामकर्णे तु हरत्यैकाहिकं ज्वरम् ॥ १० ॥

घुबडाचे उजव्या बाजूचे पंख घेऊन ते पांढऱ्या सुतानें डाव्या कानांत बांधावे, म्हणजे एकाहिक ज्वराचा नाश होतो.

द्राक्षापटोलनिम्बाब्दशक्राव्हात्रिफलामृता।

---

१. सर्व प्रकारचे विषमज्वर त्रिदोषापासून होतात. म्हणून त्यामध्यें जो दोष अधिक असेल त्याला धरून चिकित्सा करावी. विषमज्वरामध्यें मुख्यतः वमन व विरेचन देऊन शोधन करावें. नंतर स्निग्ध व उष्ण अशा प्रकारच्या अन्नपानांनीं त्याचें शमन करावें. (लेखी प्रतीवरून.)

२. इंद्रजव, कडु पडवळीचीं पानें, कुटकी ह्यांचा काढा; कडु पडवळ, उपलसरी, नागरमोथे, पहाडमूळ, कुटकी, ह्यांचा काढा; बाळंतालिंबाची साल, कडु पडवळ, त्रिफळा, मनुका, नागरमोथे, कुडा ह्यांचा काढा; काडेचिराईत, गुळवेल, रक्तचंदन, व सुंठ ह्यांचा काढा; गुळवेल, आवळकाठी, व नागरमोथे ह्यांचा काढा, हे पांच काढे संतत, सतत, अन्येद्यु, तृतीयक व चातुर्थिक ह्या पांच विषमज्वरांचा क्रमानें नाश करितात. (लेखी प्रतीवरून.)

जलजं तु पिबेच्छीतमन्येद्युर्ज्वरशान्तये ॥ ११ ॥

मनुका, कडु पडवळ, कडु निंबाची साल, इंद्रजव, त्रिफळा, ह्यांचा काढा थंड झाल्यावर द्यावा. तो अन्येद्यु ज्वराचा नाश करितो.

सशिशिरः सघनः समहौषधः सनलदः सकणः सपयोधरः ।
समधुशर्कर एष कषायको जयति बालमृगाक्षि तृतीयकम् १

हे बालमृगाक्षी! रक्तचंदन, धने, सुंठ, वाळा, पिंपळी व नागरमोथे ह्यांचा काढा मध व साखर घालून दिला असतां तृतीयकज्वराचा नाश करितो.

ऊर्णनाभिस्थजालेन कज्जलं ग्राहयेत्ततः ।
अञ्जयेन्नेत्रयुगुलं त्र्याहिकं तु ज्वरं जयेत् ॥ २ ॥

कोळ्यानें केलेल्या जाळ्याचे तंतु आणून त्याची वात करून, तिळाच्या तेलांत भिजवून पेटवून तिचें काजळ धरावें, आणि त्या काजळाचें अंजन करावें; म्हणजे त्र्याहिक ज्वराचा नाश होतो.

वासाधात्रीस्थिरादारुधान्यनागरसाधितम् ।
सितामधुयुतं कुर्याच्चातुर्थिकनिवारणम् ॥ ३ ॥

अडूळसा, आवळकाठी, सालवण, देवदार, धने व सुंठ ह्यांचा काढा, मध व खडीसाखर घालून द्यावा. तो चातुर्थिक ज्वराचा नाश करितो.

पथ्यास्थिरानागरदेवदारुधात्रीवृषैरुत्कथितः कषायः ।
सितोपलामाक्षिकसंप्रयुक्तश्चातुर्थिकं हन्त्यचिरेण पीतः ॥४॥

बाळहिरडे, सालवण, सुंठ, देवदार, आवळकाठी व अडुळसा ह्यांचा काढा मध व खडीसाखर घालून द्यावा. तो लवकरच चातुर्थिक ज्वराचा नाश करितो.

चातुर्थिको गच्छति रामठस्य घृतेन जीर्णेन युतस्य नस्यात् ।
लीलावतीनां नवयौवनानां मुखावलोकादिव साधुभावः ५॥

नवयौवना सुंदर स्त्रीचे मुखावलोकनानें जसा साधुभाव नष्ट होतो, त्याप्रमाणें जुनें तूप व हिंग ह्यांच्या नस्यानें चातुर्थिक ज्वर दूर होतो.

अखण्डितशरत्कालकलानिधिसमानने ।
चातुर्थिकहरं नस्यं मुनिद्रुमदलाम्बुना ॥ ६ ॥

हे पूर्णशरच्चंद्रानने! हदग्याच्या पाल्याच्या रसाचें नस्य केलें असतां चातुर्थिक ज्वराचा नाश होतो.

कल्कः शिरीषपुष्पस्य रजनीद्वयसंयुतः ।
नस्ये सर्पिः समायोगाज्ज्वरं चातुर्थिकं जयेत् ॥ ७ ॥

शिरसाच्या फुलाचा कल्क, हळद व दारुहळद व जुनें तूप ह्यांचें नस्य केलें असतां चातुर्थिक ज्वर दूर होतो.

विवस्त्रेण धृता देवीमूलिका कर्णबन्धनात् ।
चातुर्थिकं ज्वरं हन्ति द्रोणपुष्पीरसांजनात् ॥ ८ ॥

नग्न होऊन सहदेवीचें मूळ काढून तें कानांत बांधावें, किंवा द्रोणपुष्पीच्या रसाचें अंजन करावें. तें चातुर्थिक ज्वराचा नाश करितें.

कन्याकर्तितसूत्रेण त्वपामार्गस्य मूलिका ।
रवौ बद्धा ज्वरं हन्ति तृतीयकचतुर्थकम् ॥ ९ ॥

लग्न न झालेल्या मुलीकडून रविवारीं सूत काढून त्या सुतानें आघाड्याची मुळी रविवारींच हातांत बांधावी; म्हणजे तृतीयक व चातुर्थिक ज्वराचा नाश होतो.

काकजंघा बला श्यामा भृङ्गराजोऽपमार्गकः ।
एकैकं पुष्ययोगेण बद्धा चातुर्थिकं हरेत् ॥ १० ॥

लहान कावळीचें मूळ, चिकण्याचें मूळ, काळी उपलसरी, माका व आघाडा ह्यांपैकीं कोणत्याही एका झाडाचें मूळ पुष्प नक्षत्रावर आणून विधियुक्त हातांत बांधावें म्हणजे चातुर्थिकज्वराचा नाश होतो.

कृष्णाम्बरे दृढं बद्धो गुग्गुलूलूकपुच्छकः ।
धूपश्चातुर्थिकं हन्यात्तमः सूर्य इवोदितः ॥ ११ ॥

काळ्या फडक्यांत गुग्गुळ व घुबडाचे पंख बांधून त्याचा धूप द्यावा. म्हणजे सूर्याच्या उदयानें जसा अंधकाराचा नाश होतो, त्याप्रमाणें चातुर्थिक ज्वराचा नाश होतो.

कुमारीमूलकर्षैकं पीत्वा कोष्णजलैर्वमेत् ।
विषमं तु ज्वरं हन्ति वमनेन चिरंतनम् ॥ १२ ॥

एक तोळा कोरफडीची मुळी ऊन पाण्यांत उगाळून तें पाजून ओकवावें. म्हणजे त्या ओकण्यानें फार दिवसांच्या विषमज्वराचा नाश होतो.

भवति विषमहंत्री चेतकी क्षौद्रयुक्ता
भवति विषमहंत्री पिप्पली वर्धमाना ।

विषमरुजमजाजी हन्ति युक्ता गुडेन
प्रशमयति तथाऽभ्यो सेव्यमाना गुडेन ॥ १३ ॥

हिरडा मधाशीं घ्यावा; वर्धमान पिंपळी घ्यावी; जिरें गुळाशीं घ्यावें; किंवा त्रिफळा गुळाशीं घ्यावा. ह्या प्रत्येक योग विषमज्वराचा नाशक आहे.

त्रिभिरथ परिवृद्धं पञ्चभिः सप्तभिर्वा ।
दशभिरथ विवृद्धं पिप्पलीं वर्धमानां ॥
अनुपिबति पयो यस्तस्य न श्वासकास-
ज्वरजठरगुदार्शोवातरक्तक्षयाः स्युः ॥ १४
क्षीरेण पिप्पलीर्भुक्त्वा क्षीरान्नं भुज्यते यतः ।
दशाहं पञ्चवृद्धिः स्यादपकर्षस्तथैव च ॥ १५ ॥

तिहींनीं, पांचांनीं, सातांनीं अथवा दहांनीं वाढत्या पिंपळ्या घेऊन दुधांत वाटून खाव्या व वर दूध प्यावें. म्हणजे त्याला श्वास, खोकला, ज्वर, उदर, मूळव्याध, वातरक्त व क्षय हे विकार होत नाहींत. दुधाशीं पिंपळी घेऊन दूधभात खावा. दहा दिवसपर्यंत रोज पांच पांच पिंपळ्या चढवाव्या व दहा दिवसांनीं पुनः पांच पांच प्रमाणें उतराव्या. ह्या प्रयोगाला 'वर्धमानपिंपळी' म्हणतात.

सर्पिः क्षौद्रं श्रृतं क्षीरं पिप्पल्यः सितशर्करा ॥ १६ ॥
पिबेत्खजेन मथितं पञ्चसारमिति स्मृतम् ।
विषमज्वरहृद्रोगश्वासकासक्षयापहम् ॥ १७ ॥

तूप, मध, तापविलेलें दूध, पिंपळ्या व खडीसाखर हे पदार्थ एकत्र करून रवीनें घुसळावे. ह्याला पंचसार म्हणतात. हें विषमज्वर, हृद्रोग, श्वास, कास व क्षय ह्यांचा नाश करितें.

निदिग्धिकानागरकामृतानां क्राथं पिबेन्मिश्रितपिप्पलीकम् ।
जीर्णज्वरारोचककासशूलश्वासाग्निमान्द्यार्दितपीनसेषु ॥ १ ॥

रिंगणमूळ, सुंठ व गुळवेल ह्यांचा काढा पिंपळीचें चूर्ण घालून घ्यावा. तो जीर्णज्वर, अरुचि, खोकला, श्वास, शूल, अग्निमांद्य व पीनस ह्या रोगांचा नाश करतो.

पटोलयष्टीमधुतिक्तरोहिणीघनाभयाभिर्विषमज्वरघ्नः ।
कृतः कषायस्त्रिफलामृतावृषैः पृथक्पृथग्वा विषमज्वरापहः ॥ २

कडू पडवळ, ज्येष्ठमध, कुटकी, नागरमोथे व बाळहिरडे यांचा

काढा विषमज्वरनाशक आहे; किंवा त्रिफळा, गुळवेल आणि अडुळसा ह्या सर्वांचा किंवा एकएकाचाही काढा विषमज्वराचा नाश करितो. ह्याला ' पटोलपंचककषाय ' म्हणतात.

द्राक्षालवङ्गशुण्ठीत्वग्धनिका च हरीतकी ।
मिसी मुस्ताऽमृता चैव कृतमालकषायकः ॥ १ ॥
वातपित्तज्वरं हन्ति पाचनो लघुदीपनः ।
दशभिश्चौषधैरेतैः सर्वज्वरविनाशनः ॥ २ ॥

मनुका, लवंग, सुंठ, दालचिनी, धने, बाळहिरडे, बडिशेप, नागरमोथे, गुळवेल व बाहव्याच्या शेंगेचा मगज ह्यांचा काढा वातपित्तज्वराचा नाश करतो. हा काढा पाचक, हलका व दीपक आहे.

भार्ग्यब्दपर्पटकधन्वयवासविश्व-
भूनिम्बकुष्ठकणसिंह्यमृताकषायः ।
जीर्णज्वरं सततसन्ततकौ निहन्या-
दन्येद्युकं सहतृतीयचतुर्थकौ च ॥ १ ॥

भारंगमूळ, नागरमोथे, पित्तपापडा, धमासा, सुंठ, काडेचिराईत, कोष्ट, पिंपळी, डोरलीमूळ, व गुळवेल ह्यांचा काढा जीर्णज्वर, सतत, संतत, अन्येद्यु, तृतीयक व चातुर्थिक ह्या ज्वरांचा नाश करितो.

भार्गीपर्पटविश्ववासककणाभूनिम्बनिम्बामृता-
मुस्ताधन्वयभेषजैस्तु दशभिर्हन्तीह सर्वज्वरान् ।
जीर्णान्धातुगतांस्तथा च विषमान्सोपद्रवान्दारुणा-
न्काथोऽयं यदि युग्मवासरमितं दत्तो यमाद्रक्षति ॥ २ ॥

भारंगमूळ, पित्तपापडा, सुंठ, अडुळसा, पिंपळी, काडेचिराईत, कडुनिंबाची साल, गुळवेल, नागरमोथे व धमासा ह्या दहा औषधांचा काढा जीर्णज्वर, धातुगतज्वर व उपद्रवसहित भयंकर विषमज्वर वगैरे सर्व ज्वरांचा नाश करतो. हा काढा दोनच दिवस घेतला असतां मृत्यूपासून रक्षण करितो.

वाङ्माधुर्यजितामृतेऽमृतलता लक्ष्मीशिवाभे शिवा
विश्वा विश्ववरे घनो घनकुचे सिंही च सिंहोदरि ।
एभिः पञ्चभिरौषधैर्मधुकणायुक्तः कषायः कृतः
पीतश्चेद्विषमज्वरः किमु तदा तन्वाङ्गि न क्षीयते ॥

हे सिंहोदारि! गुळवेल, आवळकाठी, सुंठ, नागरमोथे व डोरली-मूळ, ह्या पांच औषधांचा काढा मध व पिंपळी घालून दिला म्हणजे विषमज्वराचा नाश होणार नाहीं काय?

अबले कृतकामवले चपले चलदृक्कमले खलु रत्नकले।
अमृताब्दशिवं मधुमाद्विषमे विषमेषुविलासविलासरते ॥२॥

हे सुतनु! गुळवेल, आवळकाठी व नागरमोथे ह्यांचा काढा विषमज्वरावर द्यावा.

द्राक्षामृतानागरतोयमुष्णं कृष्णाविपाकं बहुरोगनिघ्नम्।
श्वासं च शूलं कसनं च मान्द्यं जीर्णज्वरं चैव जलेन तृष्णाम् ३

मनुका, गुळवेल, सुंठ व पिंपळी घालून शिजविलेलें पाणी पुष्कळ रोगनाशक आहे. हें श्वास, खोकला, शूल, अग्निमांद्य, जीर्णज्वर व तहान ह्यांचा नाश करितें.

दुःस्पर्शोशीरसिंहीघनमधुकशिवाजाजिविश्वाटरूष-
च्छिन्नारेणूकषायः समधुमगधको वापितश्चाष्टमांशम्।
दाहं स्वेदं च शोषं कृमिमथ रुधिरं शैत्यमुद्भ्रान्तचित्तं
श्वासं शूलं च तृष्णामहरहरसमं हन्ति चातुर्थिकाद्यम् ॥४॥

धमासा, वाळा, डोरलीमूळ, नागरमोथे, जेष्टमध, आवळकाठी, जिरें, सुंठ, अडुळसा, गुळवेल व पित्तपापडा ह्यांचा काढा करून त्यांत मध व पिंपळीचें चूर्ण घालून द्यावा. म्हणजे दाह, घाम, शोष, कृमि, रक्तदोष, शैत्य, भ्रांतिष्टपणा, श्वास, शूल, तहान व चातुर्थिकादि ज्वर ह्यांचा नाश होतो.

मुस्तामलकगुडूचीविश्वौषधकण्टकारिकाक्वाथः।
पीतः सकणाचूर्णः समधुर्विषमज्वरं हन्ति ॥ ५ ॥

नागरमोथे, आवळकाठी, गुळवेल, सुंठ व रिंगणमूळ ह्यांचा काढा मध व पिंपळीचें चूर्ण घालून द्यावा. तो विषमज्वराचा नाश करितो.

दार्वीदारुकलिङ्गलोहितलताशम्याकपाठाशटी-
शौण्डीविश्वकिरातवारणकणात्रायन्तिकापद्मकैः।
उग्राधान्यकनागराब्दसरलैः शिग्रुत्वगम्भःशिवा-
व्याघ्रीपर्पटदर्भमूलकटुकानन्तामृतापौष्करैः ॥ ६ ॥
धातुस्थं विषमं त्रिदोषजनितं चैकाहिकं द्व्याहिकं
क्वाथो हन्ति तृतीयकज्वरभयं चातुर्थिकं भूतजम् ॥७॥

दारुहळद, देवदार, इंद्रजव, मंजिष्ट, बाहव्याची शेंग, पहाड-मूळ, कचोरा, पिंपळी, सुंठ, काडेचिराईत, गजपिंपळी, त्रायमाण, पद्मकाष्ट, वेखंड, धने, सुंठ, नागरमोथे, सरळ देवदार, शेवग्याची साल, वाळा, आवळकाठी, रिंगणमूळ, पित्तपापडा, दर्भाचें मूळ, कुटकी, धमासा, गुळवेल, पोखरमूळ ह्यांचा काढा धातुगत ज्वर, विषमज्वर, त्रिदोषापासून झालेला ज्वर, एकाहिक, द्व्याहिक, त्र्याहिक, चातुर्थिक, आणि भूतज्वर ह्यांचा नाश करितो.

शृंगीरामठरामसेनरजनीरुग्रेणुकारोहिणी-
रास्नैरण्डरसोनदारुरजनीराजद्रुराजीफलैः ।
त्रायन्तीत्रिवृताहुताशननतानन्तामृतामुद्रिता-
दन्तीतुम्बुरुचित्रतण्डुलतृटीत्वक्तिक्तनक्तंचरैः ॥ १ ॥
वासावत्सकबीजवासवसुराबल्यावरीवल्लिजं
ब्राह्मीब्राह्मणयष्टिवारककणाविश्वावयस्थावृषैः ।
मूर्वामालविकासमूलमगधामुस्ताजमोदाढ्यै-
र्मिश्रेयागुरुचन्दनेन्द्रचविकास्फोतावचाकट्फलैः ॥२॥
इत्यैतैर्दशमूलयुग्भिगदितः क्वाथश्चतुःषष्टिकः
शृङ्ग्यादिर्मदनादिसिंहभिषजा सर्वामयोन्मूलने ।
पुंसामष्टविधज्वरार्तिशमने वाताग्निसंधुक्षणे
सर्वाङ्गेषु समीरणद्विपघटे शार्दूलविक्रीडितम् ॥ ३ ॥

काकडशिंगी, हिंग, कायफळ, हळद, कोष्ट, रेणुकबीज, रोहिणी, रास्ना, एरंडमूळ, लसूण, दारुहळद, बाहव्याची शेंग, कडुपडवळ, त्रायमाण, तेड, चित्रकमूळ, कोष्ट, धमासा, गुळवेल, मुद्रिकेचें मूळ, दांतीमूळ, चिरफळ, वावडिंग, वेलची, दालचिनी, कुटकी, गुग्गुळ, अडुळसा, इंद्रजव, कडुवृंदावन, थोर चिकणामूळ, शतावरी, मिरीं, ब्राह्मी, उतकठारीची मुळी, गजपिंपळी, सुंठ, बाळहिरडे, अडुळसा, मोरवेल, पहाडमूळ, पिंपळी, पिंपळमूळ, नागरमोथे, ओवा, आजमोदा, बडिशेप, अगर, रक्तचंदन, कुड्याची साल, चवक, पांढरी उपलसरी, वेखंड, कायफळ आणि दशमुळें ह्यांसुद्धां सर्व औषधांचा काढा करावा. ह्याला ' शृंगादि चतुःषष्टिक कषाय ' म्हणतात. हा मदनादिसिंह नांवाच्या वैद्यानें सर्व-

रोगनाशार्थ सांगितला आहे. हा काढा अष्टविधज्वरनाश करतो; अग्नि प्रदीप्त करितो. सर्व अंगांतील वातरूपी हत्तीला हा सिंहासारखा आहे.

क्षुद्रानागरमुस्तपर्पटघनाभूनिम्बनिम्बामृता
भार्गीचन्दनपुष्कराह्वकुलकैस्तिक्ताटरूषान्वितैः ।
पद्मास्थेन्द्रयवान्वितैश्च रचितः क्काथो निपीतः प्रगे
शीताद्यं ज्वरमुच्छिनत्तु विषमं त्रिद्व्येकघस्रोद्भवम् ॥ १

रिंगणमूळ, सुंठ, नागरमोथे, पित्तपापडा, घने, काडेचिराईत, बाळंतलिंबाची साल, गुळवेल, भारंगमूळ, रक्तचंदन, पोखरमूळ, कडुपडवळ, कुटकी, अडुळसा, पद्मकाष्ठ व इंद्रजव ह्यांचा काढा करून तो प्रातःकाळीं घ्यावा; म्हणजे शीतादि विषमज्वर, एकाहिक, द्याहिक, त्र्याहिक इत्यादि ज्वर ह्यांचा नाश होतो.

शक्राह्वदन्तुघ्नविषामृतानां निर्गुण्डिकाभृङ्गमहौषधानाम् ।
क्षुद्रायवानीसहितः कषायः शीतज्वरारण्यहिरण्यरेताः ॥ १ ॥

इंद्रजव, टाकळ्याचें मूळ, अतिविष, गुळवेल, निर्गुंडीचें मूळ, माक्याचें मूळ, सुंठ, रिंगणमूळ, व ओवा ह्यांचा काढा शीतज्वररूपी अरण्याला दावानलाप्रमाणें आहे.

रसोनकल्कं तैलेन सर्पिषा वा तिलैरपि ।
सेवितं विषयं हन्ति वातश्लेष्मगदानपि ॥ २ ॥

लसूण शिरसाच्या अथवा तिळाच्या तेलांत वाटून खावी. ती विषमज्वर व वातकफात्मक विकार ह्यांचा नाश करिते.

रास्नानागरकृष्णानां कल्कमुष्णाम्बुना पिबेत् ।
श्वासकासाग्निमान्द्यं च शीतज्वरहरं भवेत् ॥ १ ॥

रास्ना, सुंठ व हिरडेदळ ह्यांचा ऊन पाण्यांत कल्क करून घ्यावा; तो श्वास, खोकला, अग्निमांद्य व हिंवताप ह्यांचा नाश करतो.

जीरकं लशुनं व्योषं पाठां पिष्ट्वोष्णवारिणा ।
शीतज्वरस्यागमने पिबेद्गुडयुतेन च ॥ २ ॥

जिरें, लसूण, सुंठ, मिरीं, पिंपळी व पहाडमूळ ह्यांचा ऊन पाण्यांत कल्क करून हींव येण्यापूर्वी गुळाशीं घ्यावा.

पीतो मरिचचूर्णेन तुलसीपत्रजो रसः ।
द्रोणपुष्पीरसो वाऽपि निहन्ति विषमज्वरान् ॥ ३ ॥

तुळशीच्या अथवा कुंभ्याच्या पानाचा रस मिऱ्यांची पूड घालून घेतला असतां तो विषमज्वरांचा नाश करितो.

ज्वरेऽञ्जनं निशातैलकृष्णामरिचसैन्धवैः ।
वचाहरीतकीसर्पिर्धूपः स्याद्विषमज्वरे ॥ १ ॥

हळद, पिंपळीचें चूर्ण, मिऱ्याची पूड व सैंधव हे सर्व जिन्नस तेलांत खलून विषमज्वरामध्यें अंजन करावें. वेखंड, हिरडेदळ व तूप ह्यांचा धूप विषमज्वरावर द्यावा.

अजायाश्चर्मरोमाणि वचा कुष्ठं पलंकषा
निम्बपत्राणि मधु च धूपनं ज्वरनाशनम् ॥ १ ॥

शेळीचें कातडें, केंस, वेखंड, कोष्ट, गुग्गुळ, कडुनिंबाचीं पानें व मध ह्यांची धुरी ज्वरनाशक आहे.

सर्पत्वचा सर्षपहिंगुनिम्बपत्राण्यमीषां समचूर्णधूपः ।
विनिग्रहं राक्षसडाकिनीनां करोति रक्षां विषमज्वरस्य ॥ १

सापाची कात, पांढऱ्या मोहऱ्या, हिंग व बाळंतनिंबाचीं पानें हे जिन्नस समभाग घेऊन त्यांची धुरी द्यावी. ती राक्षस व डाकिनी ह्यांचा निग्रह करून विषमज्वरापासून रक्षण करिते.

पलंकषा निम्बपत्रं वचा कुष्ठं हरीतकी ।
सर्षपाः सयवाः सर्पिर्धूपनं ज्वरनाशनम् ॥ १ ॥

गुग्गुळ, कडुनिंबाचीं पानें, वेखंड, कोष्ट, हिरडेदळ, पांढऱ्या मोहऱ्या, सातु, व तूप ह्यांची धुरी ज्वरनाशक आहे.

कार्पासास्थिमयूरपिच्छबृहतीनिर्माल्यपिण्डीतक--
त्वङ्मांसीवृषदंशविण्नखवचाकेशाहिनिर्मोचनैः ।
नागेन्द्रद्विजशृङ्गहिंगुमरिचैस्तुल्यैः कृतं धूपनं
स्कन्दोन्मादपिशाचराक्षससुरावेशज्वरघ्नं परम् ॥ १ ॥

सरक्या, मोराचीं पिसें, रिंगणीचीं फुलें, शिलारस, दालचिनी, जटामांसी, मांजराची विष्ठा, नखला, वेखंड, केंस, सापाची कात, हस्तिदंत, शिंग, हिंग व मिरीं ह्या सर्व जिनसा समभाग घेऊन त्यांची धुरी द्यावी. स्कंदोन्माद, पिशाच, राक्षस व देवग्रह ह्यांचे आवेश व ज्वर ह्यांचा नाश करण्याविषयीं ही फार उत्तम आहे (ह्याला 'माहेश्वर धूप' म्हणतात.)

चूर्णें.

धान्यं लवङ्गं त्रितयं च शुण्ठी कोष्णाम्बुपीतं तरुणज्वरापहम् ।
तेभ्यः शृतं वारि तथाऽग्निमान्द्यं श्वासाद्यजीर्णं विषमं च वातम् ॥

धने, लवंग व सुंठ ह्यांचें समभाग चूर्ण नवज्वराचा नाश करतें. त्याचप्रमाणें हे जिन्नस टाकून तापविलेलें पाणी अग्निमांद्य, अजीर्ण, वात, श्वास व विषमज्वर ह्यांचा नाश करितें.

गोरोचनं च मरिचं रास्ना कुष्ठं च पिप्पली ।
उष्णोदकेन पीतं च सर्वज्वरविनाशनम् ॥ २ ॥

गोरोचन, मिरीं, रास्ना, कोष्ठ व पिंपळी ह्यांचें चूर्ण ऊन पाण्याशीं घ्यावें. तें सर्व ज्वरांचा नाश करितें.

भार्ङ्गी कर्कटशृंगी च चव्यं तालीसपत्रकम् ।
मरीचं मागधीमूलं प्रत्येकं द्विपलं भवेत् ॥ ३ ॥
षट्पलं शृङ्गबेरं च द्विपलं पिप्पलीद्वयम् ।
चातुर्जातमुशीरं च पलमेकं पृथक् पृथक् ॥ ४ ॥
चातुर्जातसमा शुभ्रा शर्करा सम्प्रयोजिता ।
ज्वरमष्टविधं हन्ति कासं श्वासं च दारुणम् ॥ ५ ॥
शोफशूलोदराध्मानदोषत्रयहरं परम् ।

भारंगमूळ, काकडशिंगी, चवक, तालीसपत्र, मिरें व पिंपळमूळ हीं प्रत्येक दोन दोन पळें, आलें सहा पळें, मोठी पिंपळी व बारीक पिंपळी दोन दोन पळें; दालचिनी, तमालपत्र, वेलची, नाकेशर व वाळा हे प्रत्येक एक एक पळ; आणि पिठी साखर सोळा तोळे ह्या सर्वांचें चूर्ण करून द्यावें. हें चूर्ण आठ प्रकारचे ज्वर, भयंकर श्वास, खोकला, सूज, शूल, पोटफुगी व त्रिदोष ह्यांचा नाश करण्याविषयीं उत्तम आहे.

अनन्ता वालकं मुस्ता नागरं कटुरोहिणी ॥ ६ ॥
सुखाम्बुना प्रागुदयात्पिबेदक्षसमं रवेः ।
एतत्सद्यो ज्वरान्हन्ति दीपयत्याशु चानलम् ॥ ७ ॥

धमासा, वाळा, नागरमोथे, सुंठ व कुटकी ह्यांचें चूर्ण सूर्योदयापूर्वीं ऊन पाण्याबरोबर एक तोळाभर घ्यावें. हें सर्व ज्वरांचा नाश करतें व अग्नि प्रदीप्त करितें.

द्राक्षाऽमृता सटी शृङ्गी मुस्तकं रक्तचन्दनम् ।

नागरं कटुका पाठा भूनिम्बः सदुरालभः ॥ ८ ॥
उशीरं पद्मकं धान्यं वालकं कण्टकारिका ।
पुष्करं पिचुमन्दं च दशाष्टाङ्गमिदं स्मृतम् ।
जीर्णज्वरारुचिश्वासकासश्वयथुनाशनम् ॥ ९ ॥

मनुका, गुळवेल, कचोरा, काकडशिंगी, नागरमोथे, रक्तचंदन, सुंठ, कुटकी, पहाडमूळ, कोडेचिराईत, धमासा, वाळा, पद्मकाष्ठ, धने, काळावाळा, रिंगणमूळ, पोखरमूळ व बाळंतलिंबाची साल ह्या चूर्णाला 'दशाष्टांग चूर्ण' म्हणतात. हें जीर्णज्वर, अरुचि, श्वास, खोकला व सूज ह्यांचा नाश करितें.

धात्रीशिवासैन्धवचित्रकाणां कणायुतानां समभागचूर्णम् ।
जीर्णज्वरारोचकवह्निमान्द्ये विड्विग्रहे शस्तमिति प्रतिज्ञा ॥१॥

आवळकाठी, बाळहिरडे, सैंधव, चित्रक आणि पिंपळी ह्यांचें समभाग चूर्ण करावें. हें जीर्णज्वर, अरुचि, अग्निमांद्य व मलावरोध ह्यांजवर प्रशस्त आहे. ह्याला 'आमलक्यादि चूर्ण' म्हणतात.

तालीसं मरिचं शुण्ठी पिप्पली वंशरोचना ।
एकद्वित्रिचतुष्पञ्चकर्षैर्भागान्प्रकल्पयेत् ॥ १ ॥
एलात्वचोस्तु कर्षार्धं प्रत्येकं भागमावहेत् ।
द्वात्रिंशत्कर्षतुलिता प्रदेया शर्करा बुधैः ॥ २ ॥
तालीसाद्यमिदं चूर्णं रोचनं पाचनं स्मृतम् ।
कासश्वासज्वरहरं छर्द्यतीसारनाशनम् ॥ ३ ॥
शोफाध्मानहरं प्लीहग्रहणीपाण्डुरोगजित् ।
पक्त्वा वा शर्करां चूर्णं क्षिपेत्सा गुटिका भवेत् ॥ ४ ॥

तालीसपत्र, मिरीं, सुंठ, पिंपळी व वंशलोचन हे जिन्नस अनुक्रमें एक, दोन, तीन, चार, पांच तोळे ह्या प्रमाणांत घेऊन दालचिनी व वेलदोडे हे अर्धा अर्धा तोळा घ्यावे. ह्या सर्वांचें चूर्ण करून त्यांत बत्तीस तोळे साखर मिसळावी. ह्याला 'तालिसादि चूर्ण' म्हणतात. हें रुचिकारक, पाचक व खोकला, श्वास, ताप, ओकारी, अतिसार, सूज, पोटफुगी, पांथरी, संग्रहणी व पांडुरोग ह्यांचें नाशक आहे. साखरेचा पाक करून त्यांत चूर्ण टाकून पाहिजे तर ह्याच्या गोळ्याही कराव्या.

सितोपला षोडश स्यादष्टौ स्याद्वंशरोचना ।

पिप्पली स्याच्चतुष्कर्षा एला च स्याद्विकर्षिका ॥ १ ॥
एककर्षस्त्वचः कार्यश्चूर्णयेत्सर्वमेकतः ।
सितोपलादिकं चूर्णं मधुसर्पिर्युतं लिहेत् ॥ २ ॥
श्वासकासक्षयहरं हस्तपादाङ्गदाहजित् ।
मन्दाग्निं सुप्तजिह्वं च पार्श्वशूलमरोचकम् ।
ज्वरमूर्ध्वगतं रक्तपित्तमाशु व्यपोहति ॥ ३ ॥

खडीसाखर सोळा भाग, वंशलोचन आठ भाग, पिंपळी चार भाग, वेलदोडे दोन भाग व दालचिनी एक भाग ह्यांचें वस्त्रगाळ चूर्ण करावें, त्याला सितोपलादि चूर्ण म्हणतात. हें तूप व मध यांबरोबर घ्यावें. हें श्वास, खोकला, क्षय, हातापायाचा व शरीराचा दाह, अग्निमांद्य, जिभेचा बधिरपणा, कुशींतील शूल, अरुचि, ज्वर व उर्ध्वगामी रक्तपित्त ह्यांचा नाश करितें

कासश्वासज्वरहरा पिप्पली त्रिफलायुता ।
चूर्णिता मधुना लीढा भेदनी चाग्निबोधिनी ॥ १ ॥

पिंपळीचें चूर्ण करून तें त्रिफळ्याचें चूर्ण व मध ह्यांशीं द्यावें. तें कास, श्वास व ज्वर ह्यांचा नाश करितें. हें मलभेदक असून अग्निदीपकही आहे.

कट्फलं मुस्तकं तिक्ता सटी शृङ्गी च पौष्करम् ।
चूर्णमेषां च मधुना शृङ्गबेररसेन वा ॥ १ ॥
लिहेज्ज्वरहरं कण्ठ्यं कासश्वासारुचीर्जयेत् ।
वायुं शूलं तथा छर्दिं क्षयं चैव व्यपोहति ॥ २ ॥

कायफळ, नागरमोथे, कुटकी, कचोरा, काकडशिंगी व पोखरमूळ ह्यांचें चूर्ण मधाशीं अथवा आल्याच्या रसाशीं घ्यावें. हें ज्वरनाशक, कंठाला हितावह, कास, श्वास, अरुचि, वायु, शूल, ओकारी व क्षय ह्यांचें नाशक आहे.

लघुसुदर्शन चूर्ण.

गुडूची पिप्पलीमूलं कणा तिक्ता हरीतकी ।
नागरं देवकुसुमं निम्बत्वक्चन्दनं तथा ॥ १ ॥
सर्वचूर्णस्य चार्धांशं कैरातं प्रक्षिपेत्सुधीः ।
एतत्सुदर्शनं नाम्ना लघु दोषत्रयापहम् ।
ज्वरांश्च निखिलान्हन्यान्नात्र कार्या विचारणा ॥ २ ॥

गुळवेल, पिंपळमूळ, पिंपळी, कुटकी, हिरडेदळ, सुंठ, लवंग, बाळंतलिंबाची साल, रक्तचंदन हे सर्व जिन्नस समभाग व सर्वांच्या निम्यानें काडेचिराईत घेऊन सर्वांचें चूर्ण करावें. ह्याला लघु सुदर्शन चूर्ण म्हणतात. हें त्रिदोष व सर्वज्वर ह्यांचा नाश करितें.

सुदर्शन चूर्ण.

तालीसत्रिफलातृटीत्रिकटुकं त्वक्त्रायमाणात्रिवृन्-
मूर्वाग्रन्थिनिशायुगं शठिबलारुक्कण्टकारीयुगम् ।
मुस्तापर्पटनिम्बपुष्करजटाभार्गीयवानीहिमं
चव्यं चित्रकपुण्डरीकतगरं लेव्यं विडङ्गं वचा ॥ १ ॥
यासो वत्सककुण्डलीन्द्रयवकं देवद्रुमं वालकं
बीजं शिग्रुभवं पटोलकटुकापद्माह्वपत्रं विषा ।
काकोलीमधुकुङ्कुमं च सतवक्षीरीलवङ्गं पृथक्
पर्णीशैलजशालिपार्णिसहितं शामन्तकीपुष्पकम् ॥२॥
सर्वं समं चूर्णतदर्धभागं कैरातकं श्रेष्ठतमं हि चूर्णम् ।
सुदर्शनं नाम मरुद्बलासामयोद्भवान्हन्ति पृथक्कृतान्ज्वरान् ॥३॥
संसर्गजान्सकलजान्विषमान्निहन्या-
द्धातूद्भवान्विषकृतानभिघातजांश्च ।
सामान्समानसकृतानातिदाहयुक्ता-
ञ्छीतांस्तृतीयकचतुर्थविपर्ययांश्च ॥ ४ ॥
ऐकाहिकान्द्व्याहिकसंनिपातान्नानाविधान्पाक्षिकमासजातान् ।
तृड्दाहमोहभ्रमदैन्यतन्द्राश्वासकासारुचिपाण्डुरोगान् ॥ ५ ॥
हलीमकं कामलपार्श्वशूलं पृष्ठोद्भवं जानुभवं तथैव ।
त्रिकग्रहं वातविकारजातं विनाशयत्येव शिरोग्रहं च ॥ ६ ॥
नानाप्रदेशोद्भववारिदोषान्दूषीविषादिप्रभवान्विकारान् ।
स्त्रीणां रजोदोषसमुद्भवांश्च विनाशयेदुष्णजलेन पीतम् ॥ ७ ॥
शीताम्बुना पित्तभवान्विकारान्नानामुनीन्द्रैर्गदितं जगद्धितम् ।
सुदर्शनं दानवनाशनं यथा सुदर्शनं रोगविनाशनं तथा ॥ ८ ॥

तालीसपत्र, त्रिफळा, वेलची, त्रिकटु, दालचिनी, त्रायमाण, तेड, मोरवेल, पिंपळमूळ, हळद, दारुहळद, कचोरा, चिकणामूळ, कोष्ठ, रिंगणमूळ, डोरलीमूळ, नागरमोथे, पित्तपापडा, कडुनिंबाची साल, पोखरमूळ, भारंगमूळ, ओवा, रक्तचंदन, चवक, चित्रक, पांढरें कमळ, तगर, काळा वाळा, वावडिंग, वेखंड, धमासा, कु-

ज्याची साल, गुळवेल, इंद्रजव, देवदार, वाळा, शेवग्याचें बीं, कडु पडवळ, कुटकी, पद्मकाष्ठ, तमालपत्र, अतिविष, काकोली, ज्येष्ठमध, केशर, तवकीर, लवंग, पिठवण, घोंडफूल, साळवण, श्यामंतकपुष्प[1] आणि या सर्व चूर्णांच्या निम्यानें उत्तम काडेचिराईताचें चूर्ण मिसळावें. याला सुदर्शन चूर्ण असें म्हणतात. हें वातकफजन्य विकार व वातजन्य, पित्तजन्य व कफजन्य ज्वर, द्वंद्वज ज्वर, त्रिदोषजन्य ज्वर, विषमज्वर, धातुगतज्वर, विषजन्य ज्वर, अभिघातजन्य ज्वर, आमज्वर, मानसिक विकारजन्य ज्वर, अतिशय दाहयुक्त शीतज्वर, तृतीयक, चातुर्थिक व त्यांचे विपर्यासजन्य ज्वर, एकाहिक, द्व्याहिक, सन्निपात, पाक्षिकज्वर, मानसिक ज्वर असे नाना प्रकारचे ज्वर, तहान, दाह, मोह, भ्रम, दैन्य, तंद्रा, श्वास, कास, अरुचि, पांडुरोग, हलीमक, कामला, कुशी, पाठ व गुडघे यांमधील शूल, वातामुळें माकडहाड जखडल्यासारखें होणें व मस्तकपीडा यांचा नाश करतें. नानाप्रकारच्या प्रदेशांतील पाण्यामुळें होणारे रोग, दूषी विषापासून झालेले रोग व स्त्रियांचे रजोदर्शनसंबंधीं रोग यांवर ऊन पाण्याशीं हें चूर्ण घेतलें असतां नाश होतो. आणि थंड पाण्याशीं हें घेतलें असतां पित्तजन्य विकाराचा नाश करितें. ज्याप्रमाणें सुदर्शन दानवांचा नाश करितें, त्याप्रमाणें हें सुदर्शनचूर्ण रोगांचा नाश करणारें आहे. म्हणून जगाच्या हिताकरितां हें भेडादि मुनींनीं सांगितलें आहे.

दुसरें सुदर्शन चूर्ण.

त्रिफला रजनीयुग्मं कण्टकारीयुगं सटी ।
त्रिकटु ग्रन्थिकं मूर्वा गुडूची धन्वयासकः ॥ १ ॥
कटुका पर्पटो मुस्ता त्रायमाणा च वालकम् ।
निम्बः पुष्करमूलं च मधुयष्टी च वत्सकः ॥ २ ॥
यवानीन्द्रयवा भार्गी शिग्रुबीजं सुराष्ट्रजा ।
वचात्वक्पद्मकोशीरचन्दनातिविषा बला ॥ ३ ॥
शालिपर्णी पृश्निपर्णी विडंगं तगरं तथा ।
चित्रको देवदारुश्च चव्यं पत्रं पटोलजम् ॥ ४ ॥

---

1 निघंटरत्नाकरांत 'सुल्या आंन्या' असें म्हटलें आहे.

जीवकर्षभकौ चैव लवंगं वंशलोचना ।
पुण्डरीकं च काकोली पत्रजं जातिपत्रकम् ॥ ५ ॥
तालीसपत्रं च तथा समभागानि चूर्णयेत् ।
सर्वचूर्णस्य चार्धांशं कैरातं प्रक्षिपेत्सुधीः ॥ ६ ॥
एतत्सुदर्शनं नाम चूर्णं दोषत्रयापहम् ।
ज्वरांश्च निखिलान्हन्यान्नात्र कार्या विचारणा ॥ ७ ॥
पृथग्द्वंद्वागन्तुजांश्च धातुस्थान्विषमज्वरान् ।
संनिपातोद्भवांश्चापि मानसानपि नाशयेत् ॥ ८ ॥
जीर्णज्वरैकाहिकादीन्मोहं तन्द्रां भ्रमं तृषाम् ।
श्वासं कासं च पाण्डुं च हृद्रोगं हन्ति कामलाम् ॥ ९ ॥
त्रिकपृष्ठकटीजानुपार्श्वशूलनिवारणम् ।
शीताम्बुना पिबेद्धीमान्सर्वज्वरनिवृत्तये ॥ १० ॥
सुदर्शनं यथा चक्रं दानवानां विनाशनम् ।
तद्वज्ज्वराणां सर्वेषामिदं चूर्णं प्रणाशनम् ॥ ११ ॥

त्रिफळा, हळद, दारुहळद, रिंगणमूळ, डोरलीमूळ, कचोरा, सुंठ, मिरें, पिंपळमूळ, मोरवेल, गुळवेल, धने, अडुळसा, कुटकी, पित्तपापडा, नागरमोथे, त्रायमाण, वाळा, कडुलिंबाची साल, पोखरमूळ, जेष्ठमध, कुडयाची साल, ओंवा, इंद्रजव, भारंगमूळ, शेवग्याचें बीं, तुरटी, वेखंड, दालचिनी, पद्मकाष्ट, काळा वाळा, चंदन, अतिविष, चिकणामूळ, सालवण, पिठवण, वावडिंग, तगर, चित्रक, देवदार, चवक, कडु पडवळाचीं पानें, जीवक, ऋषभक, लवंग, वंशलोचन, पांढरें कमळ, काकोली, जायपत्री व तालीसपत्र ह्या सर्वांचें समभाग चूर्ण करावें; व त्यांत त्याच्या निमे कांडेचिराईताचें चूर्ण मिसळावें. ह्याला सुदर्शन चूर्ण म्हणतात. हें त्रिदोषाचें नाशक आहे. हें सर्व ज्वरांचा नाश करितें. वातादि तीन दोषांनीं होणारे तीन ज्वर, द्वंद्वज व सन्निपातिक ज्वर, धातुगत ज्वर, विषमज्वर, मानसिक विकारजन्य ज्वर, जीर्णज्वर, एकाहिकादि ज्वर, मोह, तंद्रा, भ्रम, तहान, श्वास, खोकला, पांडुरोग, हृद्रोग, कामला, मांकडहाड, पाठ गुडघे, मांड्या ह्यांतील शूल ह्या रोगांचा नाश करितें. सर्व ज्वर- ... हें चूर्ण थंड पाण्याबरोबर द्यावें. दैत्यांच्या नाशांत ... उपयोगी पडतें.

लवंगादि चूर्ण.

लवंगजातीफलपिप्पलीनां भागं प्रकल्प्याक्षसमानमेषाम् ।
पलार्धमेकं मरिचस्य दद्यात्पलानि चत्वारि महौषधस्य ॥ १ ॥
सितासमं चूर्णमिदं प्रगृह्य रोगांश्च वातप्रभवान्निहन्ति ।
कासज्वरारोचकमेहगुल्मश्वासाग्निमान्द्यग्रहणीप्रदोषान् ॥ २ ॥

लवंग, जायफळ व पिंपळी हे एकएक तोळा, मिरें दोन तोळे, सुंठ चार तोळे ह्यांचें चूर्ण करून तें समभाग साखर घालून द्यावें. हें वातजन्य विकाराचें नाशक आहे. खोकला, ज्वर, अरुचि, मेह, गुल्म, श्वास, अग्निमांद्य व संग्रहणी ह्या विकारांचा नाश करितें.

लवंगं शुद्धकर्पूरमेला त्वग् नागकेशरम् ।
जातीफलमुशीरं च नागरं कृष्णजीरकम् ॥ १ ॥
कृष्णागरुस्तुगाक्षीरी मांसी नीलोत्पलं कणा ।
चंदनं तगरं वालं कंकोलं चेति चूर्णयेत् ॥ २ ॥
समभागानि सर्वाणि सर्वेभ्योर्धा सिता भवेत् ।
लवंगाद्यमिदं चूर्णं राजार्हं वह्निदीपनम् ॥ ३ ॥
रोचनं तर्पणं वृष्यं त्रिदोषघ्नं बलप्रदम् ।
हृद्रोगं कंठरोगं च कासं हिक्कां च पीनसम् ॥ ४ ॥
यक्ष्माणं तमकश्वासमतीसारमुरःक्षतम् ।
प्रमेहारुचिगुल्मादीन् ग्रहणीमपि नाशयेत् ॥ ५ ॥

लवंग, शुद्ध कापूर, वेलदोडे, दालचिनी, नाकेशर, जायफळ, वाळा, सुंठ, शहाजिरें, कृष्णागर, वंशलोचन, जटामांसी, निळें कमळ, पिंपळी, चंदन, तगर, काळा वाळा व कंकोळ ह्या सर्वांचें चूर्ण करून सर्वांच्या अर्ध्यानें त्यांत खडीसाखर घालावी. हें लवंगादि चूर्ण राजाला योग्य असून अग्निदीपक आहे. शिवाय रुचिकारक, तृप्तिदायक, वृष्य, त्रिदोषनाशक, बलदायक व हृद्रोग, कंठरोग, खोकला, उचकी, पीनस, राजयक्ष्मा, तमकश्वास, अतिसार, उरःक्षत, प्रमेह, अरुचि, गुल्म व संग्रहणी ह्यांचा नाश करितें.

---

१. अश्वगंधादि चूर्ण—अश्वगंध दोन तोळे, लवंग, वावडिंग, दालचिनी, चित्रक, तमालपत्र, पिंपळमूळ, पद्मकाष्ट, सुंठ, मिरीं, पिंपळी, तगर, रिंगणमूळ, हिरडा, बेहडा, आवळकाठी, हीं एक एक तोळा ह्यांचें चूर्ण समभाग साखरेशीं द्यावें. हें जीर्णज्वर, धातुगत ज्वर व इतर रोगांचा नाश करितें.

जीवकर्षभकौ चैव लवंगं वंशलोचना ।
पुण्डरीकं च काकोली पत्रजं जातिपत्रकम् ॥ ५ ॥
तालीसपत्रं च तथा समभागानि चूर्णयेत् ।
सर्वचूर्णस्य चार्धांशं कैरातं प्रक्षिपेत्सुधीः ॥ ६ ॥
एतत्सुदर्शनं नाम चूर्णं दोषत्रयापहम् ।
ज्वरांश्च निखिलान्हन्यान्नात्र कार्या विचारणा ॥ ७ ॥
पृथग्द्वंद्वागन्तुजांश्च धातुस्थान्विषमज्वरान् ।
संनिपातोद्भवांश्चापि मानसानपि नाशयेत् ॥ ८ ॥
जीर्णज्वरैकाहिकादीन्मोहं तन्द्रां भ्रमं तृषाम् ।
श्वासं कासं च पाण्डुं च हृद्रोगं हन्ति कामलाम् ॥ ९ ॥
त्रिकपृष्ठकटीजानुपार्श्वशूलनिवारणम् ।
शीताम्बुना पिबेद्धीमान्सर्वज्वरनिवृत्तये ॥ १० ॥
सुदर्शनं यथा चक्रं दानवानां विनाशनम् ।
तद्वज्ज्वराणां सर्वेषामिदं चूर्णं प्रणाशनम् ॥ ११ ॥

त्रिफळा, हळद, दारुहळद, रिंगणमूळ, डोरलीमूळ, कचोरा, सुंठ, मिरें, पिंपळमूळ, मोरवेल, गुळवेल, धने, अडुळसा, कुटकी, पित्तपापडा, नागरमोथे, त्रायमाण, वाळा, कडुलिंबाची साल, पोखरमूळ, जेष्टमध, कुडयाची साल, ओंवा, इंद्रजव, भारंगमूळ, शेवग्याचें बीं, तुरटी, वेखंड, दालचिनी, पद्मकाष्ट, काळा वाळा, चंदन, अतिविष, चिकणामूळ, सालवण, पिठवण, वावडिंग, तगर, चित्रक, देवदार, चवक, कडु पडवळाचीं पानें, जीवक, ऋषभक, लवंग, वंशलोचन, पांढरें कमळ, काकोली, जायपत्री व तालीसपत्र ह्या सर्वांचें समभाग चूर्ण करावें; व त्यांत त्याच्या निमे काडेचिराईताचें चूर्ण मिसळावें. ह्याला सुदर्शन चूर्ण म्हणतात. हें त्रिदोषाचें नाशक आहे. हें सर्व ज्वरांचा नाश करितें. वातादि तीन दोषांनीं होणारे तीन ज्वर, द्वंद्वज व सन्निपातिक ज्वर, धातुगत ज्वर, विषमज्वर, मानसिक विकारजन्य ज्वर, जीर्णज्वर, एकाहिकादि ज्वर, मोह, तंद्रा, भ्रम, तहान, श्वास, खोकला, पांडुरोग, हृद्रोग, कामला, माकडहाड, पाठ गुडघे, मांड्या ह्यांतील शूल ह्या रोगांचा नाश करितें. सर्व ज्वरनिवारणाकरितां हें चूर्ण थंड पाण्याबरोबर घ्यावें. दैत्यांच्या नाशांत सुदर्शनचक्राप्रमाणें हें ज्वरांच्या नाशांत उपयोगीं पडतें.

लवंगादि चूर्ण.

लवंगजातीफलपिप्पलीनां भागं प्रकल्प्याक्षसमानमेषाम् ।
पलार्धमेकं मरिचस्य दद्यात्पलानि चत्वारि महौषधस्य ॥ १ ॥
सितासमं चूर्णमिदं प्रगृह्य रोगांश्च वातप्रभवान्निहन्ति ।
कासज्वरारोचकमेहगुल्मश्वासाग्निमान्द्यग्रहणीप्रदोषान् ॥ २ ॥

लवंग, जायफळ व पिंपळी हे एकएक तोळा, मिरें दोन तोळे, सुंठ चार तोळे ह्यांचें चूर्ण करून तें समभाग साखर घालून द्यावें. हें वातजन्य विकारांचें नाशक आहे. खोकला, ज्वर, अरुचि, मेह, गुल्म, श्वास, अग्निमांद्य व संग्रहणी ह्या विकारांचा नाश करितें.

लवंगं शुद्धकर्पूरमेला त्वग् नागकेशरम् ।
जातीफलमुशीरं च नागरं कृष्णजीरकम् ॥ १ ॥
कृष्णागरुस्तुगाक्षीरी मांसी नीलोत्पलं कणा ।
चंदनं तगरं वालं कंकोलं चेति चूर्णयेत् ॥ २ ॥
समभागानि सर्वाणि सर्वेभ्योऽर्धा सिता भवेत् ।
लवंगाद्यमिदं चूर्णं राजार्हं वह्निदीपनम् ॥ ३ ॥
रोचनं तर्पणं वृष्यं त्रिदोषघ्नं बलप्रदम् ।
हृद्रोगं कंठरोगं च कासं हिक्कां च पीनसम् ॥ ४ ॥
यक्ष्माणं तमकश्वासमतीसारमुरःक्षतम् ।
प्रमेहारुचिगुल्मादीन् ग्रहणीमपि नाशयेत् ॥ ५ ॥

लवंग, शुद्ध कापूर, वेलदोडे, दालचिनी, नाकेशर, जायफळ, वाळा, सुंठ, शहाजिरें, कृष्णागर, वंशलोचन, जटामांसी, निळें कमळ, पिंपळी, चंदन, तगर, काळा वाळा व कंकोळ ह्या सर्वांचें चूर्ण करून सर्वांच्या अर्ध्यानें त्यांत खडीसाखर घालावी. हें लवंगादि चूर्ण राजाला योग्य असून अग्निदीपक आहे. शिवाय रुचिकारक, तृप्तिदायक, वृष्य, त्रिदोषनाशक, बलदायक व हृद्रोग, कंठरोग, खोकला, उचकी, पीनस, राजयक्ष्मा, तमकश्वास, अतिसार, उरःक्षत, प्रमेह, अरुचि, गुल्म व संग्रहणी ह्यांचा नाश करतें.[1]

---

१. अश्वगंधादि चूर्ण—अश्वगंध दोन तोळे, लवंग, वावडिंग, दालचिनी, चित्रक, तमालपत्र, पिंपळमूळ, पद्मकाष्ट, सुंठ, मिरीं, पिंपळी, तगर, रिंगणमूळ, हिरडा, बेहडा, आवळकाठी, हीं एक एक तोळा ह्यांचें चूर्ण समभाग साखरेशीं घ्यावें. हें जीर्णज्वर, धातुगत ज्वर व इतर रोगांचा नाश करितें.

कुरंटकादि लेह.

कुरण्टकं समूलं च क्षुण्णं प्रस्थं समाहरेत् ।
पानीयमष्टप्रस्थं वा क्वाथ्यमष्टावशेषकम् ॥ १ ॥
शेषक्वाथं भाण्डमध्ये पुनस्तं वह्निना पचेत् ।
क्वाथे त्रिभागपाचिते चूर्णद्रव्याणि निक्षिपेत् ॥ २ ॥
एला लवङ्गं त्रिफला चव्यं पत्रककेसरम् ।
द्विभार्गी ग्रन्थिकं पाठा मागधी चित्रकुष्ठकम् ॥ ३ ॥
कोलाञ्जनं चाजमोदा वज्रवल्ली विडङ्गकम् ।
जीरद्वयं चेन्द्रयवं मुस्तादीप्यकसैन्धवम् ॥ ४ ॥
कटुकाऽतिविषा मूर्वा करंजस्त्वरलूग्रकम् ।
एतद्द्रव्यं सूक्ष्मचूर्णं पूर्वक्वाथेन संयुतम् ॥ ५ ॥
लेहपाकं च विधिवद्धात्रीफलसमानकम् ।
उष्णोदकानुपानेन सेवयेद्दिनविंशतिम् ॥ ६ ॥
द्वंद्वज्वरं पुराणं च ह्यग्निमान्द्यमरोचकम् ।
त्वग्गतास्थिगतौ रक्तगतं मांसगतं ज्वरम् ॥ ७ ॥
संधिज्वरं च ह्यत्युग्रं रात्रिज्वरमथो हरेत् ।
त्रिदोषजं ज्वरं हन्ति श्वासकासज्वरापहः ॥ ८ ॥
गलरोगोपशमनो विषमज्वरनाशनः ।
कुरण्टकादिनामाऽयं लेहो रोगाहितः सदा ॥ ९ ॥

पिवळ्या कोरांटीचीं झाडें मुळांसकट, उपटून तीं चौसष्ट[1] तोळे घ्यावीं. त्यांत पांचशें बारा तोळे पाणी घालून अष्टमांश काढा करावा. नंतर तो काढा पुनः भांड्यांत घालून तीन भाग आटेतोंपर्यंत पचन करावा. नंतर त्यांत वेलदोडे, लवंग, हिरडा, बेहडा, आवळकाठी, चवक, तमालपत्र, नागकेशर, भारंगमूळ, रिंगणमूळ, पिंपळमूळ, पहाडमूळ, पिंपळी, चित्रक, कोष्ठ, कोळिंजन, ओवा, सूर्यफुलाची वेल, वावडिंग, जिरें, शहाजिरें, इंद्रजव, नागरमोथे, अजमोदा, सैंधव, कुटकी, अतिविष, मोरवेल, करंजाची साल, टेंटुमूळ, व वेखंड हीं प्रत्येक एक एक तोळा घेऊन ह्यांचें चूर्ण करून तें त्या काढ्यांत घालून लेहाप्रमाणें दाट झाल्यावर काढून घ्यावा. व रोज आवळ्याएवढा ऊन पाण्याशीं वीस दिवसपर्यंत

---

१. झाडें ओलीं असल्यास एकशें अठावीस तोळे घ्यावीं.

सेवन करावा. द्वंद्वज ज्वर, जीर्णज्वर, अग्निमांद्य, अरुचि, त्वचा, मांस, अस्थि व रक्त ह्यांच्या आश्रयानें येणारा ज्वर, संधिज्वर, उग्र असा रात्रिज्वर, त्रिदोषज्वर, श्वास, खोकला, सामान्य ज्वर, गलरोग व विषमज्वर ह्यांचा नाश करतो. हा कुरंटकादि नांवाचा लेह रोगांचा शत्रु आहे.

घृतें.

ज्वराः कषायैर्वमनैर्लङ्घनैर्लघुभोजनैः ।
रूक्षस्य ये न शाम्यन्ति तेषां सर्पिर्भिषग्जितम् ॥ १ ॥
सर्पिर्द्द्यात्कफे मन्दे वातपित्तोत्तरे ज्वरे ।
पक्केषु दोषेष्वमृतं तद्विषोपममन्यथा ॥ २ ॥

ज्या रुक्ष कोठ्याच्या मनुष्याचा ज्वर काढा, वमन, लंघन, लघुभोजन इत्यादि उपायांनीं बरा होत नाहीं, त्याला तूप हें उत्तम औषध आहे. कफ कमी असून वातपित्ताधिक ज्वर असतो तेव्हां तुपाची योजना करावी. तथापि दोष पक्क झाले असतील तर तूप हें अमृताप्रमाणें गुण देतें, आणि दोष अपक्क असल्यास तें विषासारखें आहे.

पंचतिक्तक घृत.

वृषनिम्बामृताव्याघ्रीपटोलानां शृतेन च ।
कल्केन पक्कं सर्पिस्तु निहन्याद्विषमज्वरान् ॥
पाण्डुं कुष्ठं विसर्पं च कृमीनर्शांसि नाशयेत् ॥ ३ ॥

अडुळसा, कडुनिंबाची साल, गुळवेल, रिंगणमूळ, कडु पडवळ ह्यांचा काढा व ह्याच औषधांचा कल्क घालून तयार केलेलें तूप विषमज्वराचा नाश करितें; आणि पांडुरोग, कृमि, कुष्ठ, मूळव्याध व विसर्प ह्यांचा नाश करितें.

अमृतादि घृत.

अमृतात्रिफलापटोलयासैः सपयस्कं विधिवद्घृतं विपक्कम् ।
विषमज्वरनाशनप्रधानं क्षयगुल्मारुचिकामलापहारि ॥ १ ॥

गुळवेल, त्रिफळा, कडु पडवळ व धमासा ह्यांचा काढा व दूध घालून तयार केलेलें तूप विषमज्वरनाशाविषयीं उत्तम असून क्षय, गुल्म, अरुचि व कावीळ ह्यांचा नाश करितें.

षट्पलघृत.

पिप्पलीपिप्पलीमूलचव्यचित्रकनागरैः ।
ससैन्धवैश्च पलिकैर्घृतप्रस्थं विपाचयेत् ॥ १ ॥
क्षीरं चतुर्गुणं दद्यात्तद् घृतं प्लीहनाशनम् ।
विषमज्वरमन्दाग्निहरं रुचिकरं परम् ॥ २ ॥

पिंपळी, पिंपळमूळ, चवक, चित्रक, सुंठ व सैंधव हीं द्रव्यें चार चार तोळे घेऊन चौसष्ठ तोळे तूप व चौपट दूध तयार करावें. हें तूप पांथरी, विषमज्वर, अग्निमांद्य व अरुचि ह्यांचा नाश करितें.

महाषट्पलघृत

पूतीकाग्निकपञ्चकोलरुचकैः साजाजियुग्मोद्भिदैः
सक्षारैः सबिडैः सहिंगुहपुषासिन्धूद्भवैः कल्कितैः ।
सूक्तेनाऽऽर्द्रकसंभवेन च रसेनैतन्महाषट्पलं
सर्पिः पक्वमरोचकाग्निसदनप्लीहज्वरश्वासजित् ॥ १ ॥

करंजाची साल, चित्रकमूळ, सुंठ, मिरीं, पिंपळी, चवक, पादेलोण, जिरें, शहाजिरें, सोरमीठ, जवखार, बिडलोण, हिंग, शेरणी व सेंधेलोण ह्यांचा कल्क, सूक्त व आल्याचा रस ह्यांनीं तूप तयार करावें. हें अरुचि, अग्निमांद्य, पांथरी, ज्वर व श्वास ह्यांचा नाश करितें.

अश्वगंधादि तेल.

अश्वगन्धाबलालाक्षा प्रस्थं प्रस्थं पृथक्पृथक् ।
जलद्रोणे विपक्तव्यं चतुर्भागावशेषितम् ॥ १ ॥
तैलं त्रिमानिकं दद्याद्दधिमस्तु चतुर्गुणम् ।
अश्वगन्धानिशादारुकौन्तीकुष्ठाब्दचन्दनैः ॥ २ ॥
निशा तिक्ता शताह्वा च लाक्षा मूर्वा समूलकैः ।
सुरदारु च मंजिष्ठा मधुकोशीरसारिवाः ॥ ३ ॥
समभागानि कुर्वीत कल्कीकृत्य विपाचयेत् ।
सर्वज्वरं हरत्याशु सर्वधातुविवर्धनम् ॥
एतदभ्यंजनेनाऽऽशु क्षयरोगं विमुञ्चति ॥ ४ ॥

अश्वगंध, चिकणामूळ व लाख हीं प्रत्येक चौसष्ट चौसष्ट तोळे घेऊन दहाशें चोवीस तोळे पाण्यांत चतुर्थांश काढा करावा. त्यांत तेल एकशें ब्याण्णव तोळे आणि तेलाच्या चौपट दह्याची निवळ

घालून अश्वगंध, हळद, देवदार, रेणुकबीज, कोष्ट, नागरमोथे, चंदन, दारुहळद, कुटकी, बडिशेप, लाख, मोरवेल, मुळा, सरळ देवदार, मंजिष्ट, जेष्ठमध, वाळा व उपळसरी, ह्या सर्वांचा समभाग कल्क तेलाच्या चतुर्थांश घालून तेल सिद्ध करावें. हें सर्व ज्वर-नाशक, सर्व धातूंना वाढविणारें व क्षयरोगनाशक आहे.

षट्तक्रतेल.

सुवर्चिकानागरकुष्ठमूर्वालाक्षानिशालोहितयष्टिकाभिः ।
तैलं ज्वरे षड्गुणतक्रसिद्धमभ्यञ्जनाच्छीतविदाहनुत्स्यात् ॥ १
दध्नः ससारकस्य स्यात्षट्तक्रे तक्रमुत्तमम् ॥ २ ॥

सज्जीखार, सुंठ, कोष्ट, मोरवेल, लाख, हळद, रक्तचंदन व ज्येष्टमध ह्यांचा कल्क व सहापट ताक घालून तयार केलेलें तेल शीतपूर्वक किंवा दाहपूर्वक ज्वराचा नाश करितें. लोणी न काढतां नुसतें दहीं घुसळून सारखें केलेलें जें ताक तें षट्तक्र तेल तयार करण्यास उत्तम असतें.

लघुलाक्षादि तेल.

लाक्षाहरिद्रामञ्जिष्ठाकल्कैस्तैलं विपाचयेत् ।
षड्गुणेनाऽऽरनालेन दाहशीतज्वरापहम् ॥ १ ॥

लाख, हळद व मंजिष्ट ह्यांचा कल्क व सहापट कांजी घालून तेल तयार करावें. तें दाहपूर्व किंवा शीतपूर्व ज्वराचा नाश करितें.

बृहल्लाक्षादि तेल.

तैलं लाक्षारसं क्षीरं पृथक्प्रस्थं समं पचेत् ।
चतुर्गुणेऽस्मिन् क्वाथे द्रव्यैरेतैः पलोन्मितैः ॥ १ ॥
लोध्रकट्फलमंजिष्ठामुस्तकेसरपद्मकैः ।
चन्दनोत्पलयष्ट्याह्वैस्तैलं गण्डूषधारणात् ॥ २ ॥
दन्तरोगाः प्रणश्यन्ति लेपात्सर्वज्वराञ्जयेत् ।
एतल्लाक्षादिकं तैलं बलपुष्टिप्रदायकम् ॥ ३ ॥

तिळाचें तेल, लाखेचा काढा व दूध प्रत्येक चौसष्ट चौसष्ट तोळे, व लोध्र, कायफळ, मंजिष्ट, नागरमोथे, पद्मकाष्ट, नाकेशर, पांढरा चंदन, ज्येष्टमध व कमळ हीं द्रव्यें चारचार तोळे घेऊन त्यांचा काढा करून तो काढा तेलाच्या चौपट त्यांत घालून तेल पचन करावें.

ह्या तेलाच्या गुळण्यानें सर्व प्रकारचे दांताचे रोग नाश होतात; आणि तें अंगाला लावलें असतां सर्व ज्वर दूर होतात. हें बृहल्लाक्षादि तेल बल व पुष्टि देणारें आहे.

षट्चरणतेल.

लाक्षामधुकमञ्जिष्ठामूर्वाचन्दनसारिवाः ।
तैलं षट्चरणं नाम त्वभ्यङ्गाज्ज्वरनाशनम् ॥ १ ॥

लाख, चंदन, मंजिष्ट, मोरवेल, जेष्टमध, उपलसरी ह्यांचा कल्क व काढा ह्यानें तेल तयार करावें. तें अंगास लावलें असतां ज्वराचा नाश करितें.

अंगारक तेल.

लाक्षा मूर्वा हरिद्रे द्वे मंजिष्ठा चेन्द्रवारुणी ।
बृहती सैन्धवं कुष्ठं रास्ना मांसी शतावरी ॥ १ ॥
आरनालाढकेनात्र तैलप्रस्थं विपाचयेत् ।
तैलमङ्गारकं नाम सर्वज्वरविमोक्षणम् ॥ २ ॥

लाख, मोरवेल, हळद, दारुहळद, मंजिष्ट, कडु इंद्रावण, रिंगणमूळ, सैंधव, कोष्ट, रास्ना, जटामांसी व शतावरी ह्यांचा कल्क सोळा तोळे, तेल चौसष्ट तोळे, आणि कांजी दोनशें छपन्न तोळे, ह्याप्रमाणें घेऊन तेल पचन करावें. ह्याला अंगारक तेल म्हणतात. हें सर्व ज्वरांचें नाशक आहे.

मध्यम लाक्षादि तेल.

तैलं प्रस्थमितं चतुर्गुणजतुक्काथं चतुर्मस्तुरुग-
यष्टीदारुनिशाब्दमूर्वकटुकामिश्यश्च कौन्तीहिमैः ।
रास्नाद्यैः पिचुसंमितैः कृतमिदं शस्तं तु जीर्णज्वरे ।
सर्वस्मिन्विषमेऽपि यक्ष्माणि शिशौ वृद्धे सगर्भासु च ॥१

तेल चौसष्ट तोळे, लाखेचा काढा तेलाच्या चौपट, दह्यावरील निवळ तेलाच्या चौपट, कोष्ट, जेष्टमध, देवदार, हळद, नागरमोथे, मोरवेल, कुटकी, बडिशेप, रेणुकबीज, वाळा व रास्ना हे प्रत्येक एक एक तोळा, ह्यांचा कल्क घालून तेल तयार करावें. हें बृहल्लाक्षादि तेल जीर्णज्वर, सर्व प्रकारचे विषमज्वर व क्षय ह्या विकारांत हितकारक असून बाल, वृद्ध व गर्भिणी स्त्रिया ह्यांनाही हितकारक आहे.

चंदनबलालाक्षादि तेल.

चन्दनं च बलामूलं लाक्षा लामज्जकं तथा ।
पृथक्पृथक्प्रस्थमात्रं द्रोणे च सलिले पचेत् ॥
चतुर्भागावशेषेऽस्मिंस्तैलं प्रस्थद्वयं क्षिपेत् ॥ १ ॥
चन्दनोशीरमधुकशताह्वाः कटुरोहिणी ।
देवदारुनिशाकुष्ठमंजिष्ठागुरुवालकम् ॥ २ ॥
अश्वगन्धा बला दार्वी मूर्वा मुस्ता समूलकाः ।
एला त्वङ्नागकुसुमं रास्ना लाक्षा सुगन्धिका ॥ ३ ॥
चम्पकं पीतसारं च सारिवा रोचकद्वयम् ।
कल्कैरेतैः समायुक्तं क्षीराढकसमन्वितम् ॥ ४ ॥
तैलमभ्यञ्जने श्रेष्ठं सप्तधातुविवर्धनम् ।
कासश्वासक्षयहरं सर्वच्छर्दिनिवारणम् ॥ ५ ॥
असृग्दरं रक्तपित्तं हन्ति पित्तकफामयम् ।
कान्तिकृद्दाहशमनं कण्डूविस्फोटनाशनम् ॥ ६ ॥
शिरोरोगं नेत्रदाहमङ्गदाहं च नाशयेत् ।
वातामयहतानां च क्षीणानां क्षीणरेतसाम् ॥ ७ ॥
बालमध्यमवृद्धानां शस्यते शोफकामलाम् ।
पाण्डुरोगे विशेषेण सर्वज्वरविनाशनम् ॥ ८ ॥

चंदन, चिकणामूळ, लाख व वाळा हीं प्रत्येक चौसष्ट तोळे घेऊन दहाशें चोवीस तोळे पाण्यांत चतुर्थांश काढा करून त्या काढ्यांत एकशें अठ्ठावीस तोळे तेल घालावें. नंतर चंदन, वाळा, जेष्टमध, बडिशेप, कुटकी, देवदार, हळद, कोष्ट, मंजिष्ट, अगर, काळा वाळा, अश्वगंध, चिकणामूळ, दारुहळद, मोरवेल, नागरमोथे, मुळा, वेलदोडे, दालचिनी, नाकेशर, रास्ना, लाख, सोनकेवडा, सोनचांफा, पिवळा चंदन, उपलसरी, सैंधव आणि पादेलोण, ह्यांचा कल्क व दोनशें छपन्न तोळे दूध घालून तेल सिद्ध करावें. हें अंगाला लावण्यास फार उत्तम असून सप्त धातूंना वाढविणारें आहे. हें खोकला, श्वास, क्षय, सर्व प्रकारची ओकारी, रक्तप्रदर, रक्तपित्त व पित्तकफजन्य रोग ह्यांचा नाश करितें; कांति वाढवितें; दाह शांत करितें आणि कंडु, विस्फोट, शिरोरोग, नेत्रदाह व अंगाचा दाह ह्यांचा नाश करितें. वातविकारानें पीडिलेले, क्षीण (कृश), धातुक्षीण,

बाल, वृद्ध व तरुण ह्यांना हितावह असून विशेषतः पांडुरोग, कामला, सूज व सर्व ज्वर ह्यांचा नाश करितें.

शेवंतीपाक.

श्वेतपुष्पसहस्राणि घृतप्रस्थे विपाचयेत् ।
घृतपक्वे कृते तस्मिन्निक्षिपेदेतदौषधम् ॥ १ ॥
सितोपला चतुर्भागा चातुर्जातं पलं पलम् ।
मृद्वीका षट्पलं चैव क्षिपेन्मधुपलाष्टकम् ॥ २ ॥
धारासत्त्वं चार्धपलं सर्वमेकत्र कारयेत्
कर्षप्रमाणं तत्सेव्यं सततं च गदातुरैः ॥ ३ ॥
जीर्णज्वरे क्षये कासे चाग्निमान्द्ये प्रमेहके ।
प्रदरं रक्तजान् रोगान्कुष्ठार्शांसि विनाशयेत् ।
नेत्ररोगान्सुदुःसाध्यांस्तथा सर्वान्मुखोत्थितान् ॥ ४ ॥

पांढऱ्या शेवतीचीं हजार फुलें चौसष्ट तोळे तुपांत तळावीं. नंतर दालचिनी, तमालपत्र, वेलदोडे व नाकेशर हीं प्रत्येक चार चार तोळे, मनुका चोवीस तोळे, मध बत्तीस तोळे, खडीसाखर दोनशें छप्पन्न तोळे, ह्यांचा विधियुक्त पाक करून त्यांत दोन तोळे गुळवेलीचें सत्व घालून तो ठेवावा; आणि रोज एक तोळा प्रमाणें सेवन करावा. हा पाक जीर्णज्वर, क्षय, खोकला, अग्निमांद्य, प्रमेह, प्रदर, रक्तासंबंधीं रोग, कुष्ट, मूळव्याध, दुःसाध्य असे नेत्ररोग व सर्व प्रकारचे मुखरोग ह्यांचा नाश करतो.

पिंपळीपाक.

पिप्पलीप्रस्थमादाय क्षीरेणैवानुपेषयेत् ।
अर्धाढकं घृतं गव्यं शुद्धं खण्डाढकं तथा ॥ १ ॥
पचेन्मृद्वग्निना तावद्यावत्पाकमुपागतम् ।
शीतीभूते क्षिपेत्तस्मिंश्चातुर्जातं पलत्रयम् ॥ २ ॥
योजयेन्मात्रया युक्तं दोषधात्वग्निसाम्यतः ।
बल्यं वृष्यं तथा हृद्यं तेजोवृद्धिकरं तथा ॥ ३ ॥
जीर्णज्वरे क्षतक्षीणमश्रान्तं चैव बृंहयेत् ।
छर्दिस्तृष्णारुचिश्वासशोषहिक्काः सकामलाः ॥ ४ ॥
हृद्रोगं पाण्डुरोगं च कण्ठरोगं त्रिदोषजम् ।
वातरक्तं प्रतिश्यायमामवातं विनाशयेत् ॥
संवत्सरप्रयोगेण वलीपलितवर्जितः ॥ ५ ॥

चौसष्ट तोळे पिंपळी आणून दुधांत बारीक वांटावी. नंतर तूप एकशें अठ्ठावीस तोळे व खडीसाखर दोनशें छपन्न तोळे त्यांत घालून पाक करावा. तो थंड झाल्यावर त्यांत दालचिनी, तमालपत्र, वेलदोडयाचे दाणे व नाकेशर ह्यांचें समभाग चूर्ण बारा तोळे घालून दोष, अग्निबळ व धातु ह्यांचें साम्य पाहून योग्य प्रमाणांत द्यावा. हा बलकारक, वृष्य, हृद्य, तेजोवृद्धि करणारा व जीर्णज्वर, क्षतक्षीण व थकलेले ह्यांना पुष्टि देतो. ओकारी, तहान, अरुचि, श्वास, खोकला, शोष, उचकी, कावीळ, हृद्रोग, पांडुरोग, कंडुरोग, त्रिदोष, वातरक्त, पडसें व आमवात ह्यांचा नाश करितो. हा पिंपळीपाक एक वर्षभर घेतला असतां वलीपलित रोगाचा नाश करितो.

रस.

सगन्धटङ्कं रसमूषणं च विमर्दितं भावय मीनपित्तैः ।
दिनत्रयं वल्लयुगं प्रदद्याद् वृन्ताकतक्रौदनपथ्यमत्र ॥ १ ॥
नवज्वरेभांकुशनामधेयः क्षणेन घर्मोद्गममातनोति ॥ २ ॥

पारा, गंधक, टाकणखार व मिरें समभाग घेऊन खल करावा. नंतर माशाच्या पित्ताची तीन दिवस भावना द्यावी. हा दोन वाल प्रमाणानें द्यावा. ह्याजवर वांगें, ताक व भात पथ्यास द्यावा. ह्याला नवज्वरेभांकुश म्हणतात. ह्याच्या सेवनानें एक क्षणांत घाम येतो.

नारायण रस.

सोमलं वत्सनागं च सूतगंधकतालकम् ।
कटुत्रयं कपर्दी च विजया कनकस्य च ॥ १ ॥
टंकणं समभागानि शृंगबेररसैस्त्र्यहम् ।
शीतज्वरे संनिपाते विषूच्यां विषमज्वरे ॥ २ ॥
नाशयेदतिवेगेन धान्यमात्रं प्रदापयेत् ।
वस्त्रमाच्छादयेत्तेन प्रस्वेदोयं प्रजायते ॥ ३ ॥
पथ्यं यदीच्छया देयं दधिशीतोदकादिकम् ।
रसो नारायणो नाम संनिपातज्वरापहः ॥ ४ ॥

सोमल, बचनाग, पारा, गंधक, हरताळ, सुंठ, मिरीं, पिंपळी, कवडीचें भस्म, भांग, धोतऱ्याचें बीं व टाकणखार हे सर्व जिन्नस

समभाग घेऊन आल्याच्या रसांत तीन दिवस खल करावा. आणि धन्याएवढी गोळी करून द्यावी. हा शीतज्वर, सन्निपातज्वर, विषूचिका व विषमज्वर ह्यांजवर योजला असतां त्यांचा तत्काळ नाश करितो. ही गोळी दिल्यावर पांघरूण घालून रोग्यास निजवावें, म्हणजे घाम येतो. ह्याजवर पथ्य दहीं, थंड पाणी वगैरे इच्छेनुरूप द्यावें. हा नारायणरस सन्निपातज्वराचा नाश करितो.

पंचामृतरस.

स्वर्णरौप्यरविपन्नगलोहं चन्द्रद्वकिशिखिचतुःशरभागम् ।
मर्दितं तनुतरं दिनमेकं भावितं मकरपित्तरसेन ॥ १ ॥
वल्लयुग्ममखिलज्वरशान्त्यै शर्करार्द्रकरसेन ददीत ॥ २ ॥

सोनें, रुपें, तांबें, शिसें व लोह ह्या पांच धातूंचीं भस्में अनुक्रमें एक, दोन, तीन, चार व पांच भाग अशा प्रमाणांत घेऊन; एक दिवस अत्यंत सूक्ष्म होईल अशा बेतानें खल करून मगराच्या पित्ताची एक भावना द्यावी. नंतर ह्याची दोन वाल प्रमाणाची मात्रा आल्याचा रस व खडीसाखर ह्यांतून द्यावी. ह्यानें सर्व ज्वर शमन होतात.

जीर्णज्वरांकुश.

मृतं सूताभ्रनागार्ककान्तवैक्रान्तमेव च ।
हिंगुलं टङ्कणं गन्धं विषं कुष्ठं समांशकम् ॥ १ ॥
त्रिकटुत्रिफलामुस्ताभृंगनिर्गुण्डिकाद्रवैः ।
भावयेत्रिदिनं चैव माषमात्रानुपानतः ॥ २ ॥
जीर्णज्वरे क्षये कासे दोषे मन्दानलेषु च ।
पाण्डुं हलीमकं गुल्ममुदरं चार्दितं जयेत् ॥ ३ ॥
ग्रहणीमूलरोगांश्च त्वरोचकमनेकधा ।
कान्ति तेजो बलं पुष्टिं वीर्यवृद्धिं विवर्धयेत् ॥
साध्यासाध्यं निहन्त्याशु रसो जीर्णज्वराङ्कुशः ॥ ४ ॥

पारा, अभ्रक, शिसें, तांबें, कांतलोह व वैक्रांत ह्यांचीं भस्में; हिंगूळ, टाकणखार, गंधक, बचनाग, कोष्ठ हे सर्व जिन्नस समभाग घेऊन खल करून सुंठ, मिरीं, पिंपळी, हिरडा, बेहडा, आवळकाठी, नागरमोथे, माका व निर्गुडी ह्यांच्या काढ्यानें तीन दिवस

भावना द्यावी. आणि उडदाएवढी गोळी करून अनुपान योजून द्यावी. जीर्णज्वर, क्षय, खोकला, मंदाग्नि, पांडुरोग, हलीमक, गुल्म, उदर, अर्दितवायु, संग्रहणी, मूळव्याध व अनेक प्रकारची अरुचि ह्या रोगांवर ह्याची योजना करावी. ह्याच्या सेवनानें कांति, तेज, बल, पुष्टि व वीर्यवृद्धि ह्यांची वाढ होते. हा जीर्णज्वरांकुश साध्य व असाध्य अशा रोगांचा त्वरित नाश करितो.

मुक्तापंचामृतरस.

मुक्ताप्रवालखुरवंगककम्बुशुक्ति-
भूतिं वसूदधिदृगिन्दुसुधांशुभागाम् ।
इक्षो रसेन सुरभेः पयसा विदारी-
कन्यावरीसुरसहंसपदीरसैश्च ॥ १ ॥
संमर्द्य यामयुगलं च वनोपलाभि-
र्दद्यात्पुटानि मृदुलानि च पञ्च पञ्च ।
पञ्चामृतं रसविभुं भिषजा प्रयुज्य
गुञ्जाचतुष्टयमितं चपलारजश्च ॥ २ ॥
पात्रे निधाय चिरसूतपयस्विनीनां
दुग्धेन च प्रपिबतः खलु चाल्पभोक्तुः ।
जीर्णज्वरः क्षयमियादथ सर्वरोगाः
स्वीयानुपानकलिताश्च शमं प्रयान्ति ॥ ३ ॥

मोतीं, पोंवळें, खुरजातीचें कथील, शंख व मोत्याची शिंप ह्यांचीं भस्में अनुक्रमें आठ, चार, दोन, एक व एक ह्या भागांप्रमाणें घेऊन उंसाचा रस, गाईचें दूध, भुईकोहळा, कोरफड, शतावरी, तुळस व लाजाळू ह्यांच्या रसानें दोन प्रहर खलून रानशेणीमध्यें पांच पांच लघुपुटें द्यावीं. नंतर हा पंचामृत रस, चार गुंजांप्रमाणें पिंपळीचें चूर्ण पात्रांत घालून त्यांत पाडशा गाईची धार काढून त्यांतून द्यावा व त्याजवर हलकें भोजन करावें. जीर्णज्वर, क्षय व सर्व रोग त्या त्या रोगाला योग्य अशा अनुपानानें हा दिला असतां बरे होतात.

त्रिभुवनकीर्तिरस.

हिंगुलं च विषं व्योषं टङ्कणं मागधीशिफाम् ।
संचूर्ण्य भावयेत्त्रेधा सुरसार्द्रकहेमभिः ॥ १ ॥

रसस्त्रिभुवनकीर्तिर्गुञ्जैकार्द्ररसेन वै ।
विनाशयेज्ज्वरान्सर्वान्सनिपातांस्त्रयोदश ॥ १ ॥

हिंगुळ, बचनाग, सुंठ, मिरीं, पिंपळीं, टाकणखार व पिंपळमूळ ह्या सर्वांचा एकत्र खल करून तुळशीचा रस, आल्याचा रस व धोतऱ्याचा रस यांच्या तीन भावना द्याव्या. हा त्रिभुवनकीर्तिरस एक गुंज आल्याच्या रसाशीं द्यावा, म्हणजे सर्व ज्वर व तेरा सन्निपात ज्वर यांचा नाश करितो.

महाज्वरांकुश.

शुद्धसूतं विषं गन्धं धूर्तबीजं त्रिभिः समम् ।
चतुर्णां द्विगुणं व्योषं हेमक्षीरीविभावितम् ॥ १ ॥
चतुर्वारं घर्मशुष्कं चूर्णं गुञ्जाद्वयोन्मितम् ।
एकजम्बीरकद्रावैर्युक्तार्द्रस्य द्रवैर्युतः ॥ २ ॥
महाज्वरांकुशो नाम ज्वराणामन्तको भवेत् ।
एकाहिकं द्व्याहिकं वा त्र्याहिकं वा चतुर्थकम् ।
विषमं वा त्रिदोषोत्थं नाशयेद्याममात्रतः ॥ ३ ॥

शुद्ध पारा, बचनाग व गंधक हे समभाग, तिन्हींही द्रव्यांबरोबर धोतऱ्याचें बीं, या चोहोंच्या दुप्पट सुंठ, मिरें व पिंपळी यांचें चूर्ण; या सर्वांना कांटेधोतऱ्याच्या रसाची भावना द्यावी. ह्याप्रमाणें चार भावना देऊन उन्हांत वाळवावें; व दोन गुंजांप्रमाणें हा महाज्वरांकुश रस आल्याचा रस व लिंबाचा रस ह्यांतून द्यावा. म्हणजे हा ज्वराचा नाश करितो. एकाहिक, द्व्याहिक, त्र्याहिक, चातुर्थिक, विषमज्वर व त्रिदोषज्वर ह्यांचा प्रहरामध्यें नाश करितो.

शीतांकुश.

तुत्थं टङ्कणसूतखर्परविषं स्याद्गन्धकं तालकं
सर्वं खल्वतले विमर्द्य घटिकां तत्कारवल्लीरसैः ।
गुञ्जैका गुटिका सुशर्करयुता सज्जीरकेणाथवा
एकद्वित्रिचतुर्थशीतहरणः शीतांकुशो नामतः ॥ १ ॥

मोरचूत, टाकणखाराची लाही, पारा, कलखापरी, गंधक, हरताळ हे सर्व जिन्नस समभाग घेऊन, कारलीच्या पाल्यांत खल करून गुंजप्रमाण गोळ्या करून पिठीसाखरेबरोबर किंवा जिऱ्या-

बरोबर द्याव्या. ह्याला शीतांकुश असें म्हणतात. हा एकाहिक, द्याहिक, त्र्याहिक व चातुर्थिक अशीं सर्व प्रकारचीं हिंवें दूर करितो.

ज्वरघ्नी गुटिका.

भागैकः स्याद्रसाच्छुद्धाद्देलयः पिप्पली शिवा ।
आकारकरभो गन्धः कटुतैलेन शोधितः ॥ १ ॥
फलानि चेन्द्रवारुण्याश्चतुर्भागमिता अमी ।
एकत्र मर्दयेच्चूर्णमिन्द्रवारुणिकारसैः ॥ २ ॥
माषोन्मितां गुटीं कृत्वा दद्यात्सद्योज्वरे बुधः ।
छिन्नारसानुपानेन ज्वरघ्नी गुटिका मता ॥ ३ ॥

शुद्ध पारा एक भाग, पिंपळी दोन भाग, अक्कलकारा तीन भाग, शिरसेल तेलामध्यें शुद्ध केलेला गंधक तीन भाग, व कडू इंद्रावणीचीं फळें चार भाग, ह्या सर्वांचा इंद्रावणीच्या पाल्याच्या रसांत खल करून उडदाएवढ्या गोळ्या कराव्या. हिला ज्वरघ्नी गुटिका म्हणतात. ही ज्वर आल्याबरोबर गुळवेलीच्या रसाचें अनुपान योजून द्यावी.

सन्निपातभैरव रस.

रसो गन्धस्त्रित्रिकर्षः कुर्यात्कज्जलिकां द्वयोः ।
तारारताम्रवंगाहिसाराश्चैकैककार्षिकाः ॥ १ ॥
शिग्रुज्वालामुखीशुण्ठीबिल्वेभ्यस्तण्डुलीयकात् ।
प्रत्येकं स्वरसैः कुर्याद्यामैकैकं विमर्दनम् ॥ २ ॥
कृत्वा गोलं वृतं वस्त्रैर्लवणापूरिते न्यसेत् ।
काचभाण्डे ततः स्थाल्यां काचकूपीं निवेशयेत् ॥३॥
वालुकाभिः प्रपूर्याथ वह्नियामद्वयं भवेत् ।
तत उद्धृत्य तं गोलं चूर्णयित्वा विमिश्रयेत् ॥ ४ ॥
प्रवालचूर्णकर्षेण शाणमात्रविषेण च ।
कृष्णसर्पस्य गरलैर्द्विवारं भावयेत्तथा ॥ ५ ॥
तगरं मुत्यली मांसी हेमाह्वा वेतसः कणा ।
नलिनीपत्रकं चैला चित्रकश्च कुठेरकः ॥ ६ ॥
शतपुष्पा देवदाली धत्तूरागस्त्यमुण्डिकाः ।
मधूकजातिमदनरसैरेषां विमर्दयेत् ॥ ७ ॥

---

१. लेखी प्रतींत "द्विपिप्पल्यस्ततस्त्रयः" असा पाठ असून तोच बरा वाटल्यावरून त्याला धरून अर्थ केला आहे.

प्रत्येकमेकवेलं च ततः संशोष्य धारयेत् ।
बीजपूरार्द्रकद्रावैर्मरीचैः षोडशोन्मितैः ॥ ८ ॥
रसो द्विगुञ्जप्रमितः संनिपातेषु दीयते ।
प्रसिद्धोऽयं रसो नाम्ना संनिपातस्य भैरवः ॥ ९ ॥

पारा तीन तोळे व गंधक तीन तोळे घेऊन त्यांची कज्जली करावी. नंतर चांदी, पितळ, तांबें, कथिल व शिसें ह्यांचीं भस्में एक एक तोळा त्यामध्यें घालून शेवग्याच्या सालीचा रस, भारजांभळ, सुंठ, बेल व तांदुळजा ह्यांचा रस ह्या प्रत्येकाची एक एक प्रहर भावना द्यावी, व खल करावा. नंतर त्याचा गोळा करून मातकापड केलेल्या कांचेच्या कुपींत मीठ भरून त्याजवर तो गोळा ठेवून ती कुपी वालुकायंत्रांत ठेवून दोन प्रहर अग्नि द्यावा. नंतर तो गोळा काढून त्याचें चूर्ण करावें. आणि त्यांत एक तोळा प्रवाळ व चार मासे बचनाग आंत मिसळून काळ्या सापाच्या गरळीच्या दोन दिवस भावना देऊन खल करावा. नंतर तगर, मुसळी, जटामांसी, कांटेघोतरा, आम्लवेतस, पिंपळी, कमळाचीं पानें, वेलदोडे, चित्रक, अजवला, बडिशेप, देवडांगरी, धोतरा, हादगा, गोरखमुंडी, जेष्टमध, जाई व देवदार ह्यांच्या यथासंभव पानांच्या किंवा मुळ्याच्या रसाची एक एक दिवस भावना द्यावी. आणि वाळल्यावर कुपींत भरून ठेवावा. व दोन गुंजांप्रमाणें आलें व महाळुंगाचा रस ह्यांत सोळा मिऱ्यांची पूड घालून सन्निपातज्वरावर द्यावा. हा सन्निपातावरील भैरवरस म्हणून प्रख्यात आहे.

दुसरा प्रकार.

सूतं गन्धं लोहकिट्टं विमर्द्य सर्वैस्तुल्यं वत्सनाभं नियुंज्यात् ।
आर्द्रं भृङ्गं बीजपूरं जयन्त्या निर्गुण्डीकाव्यस्तराजद्रवैश्च ॥ १ ॥
युक्त्या वैद्यैर्भावयित्वा विधेयः शाणार्धार्धं संनिपातस्य नूनम् ।
शीतैर्वातैर्निर्मलं स्नानपानं पथ्यं दुग्धं शर्कराभियुतं च ॥ २ ॥

पारा, गंधक व मंडूर हे समभाग आणि सर्वांच्या बरोबरीनें बचनाग घेऊन सर्वांचा एकत्र खल करावा. आणि आलें, भांग,

१. "व्यस्तराज" ह्या ठिकाणीं "भृंगराज" असा पाठ आहे. त्याला वरून वरील अर्थ केला आहे.

महाळुंग, टाकळी, निर्गुंडी व माका ह्यांची एक एक भावना द्यावी. ह्याला सन्निपातभैरव असें म्हणतात. हा एक मासा प्रमाणानें सान्निपातज्वरावर द्यावा. ह्याजवर गार वारा घेणें, स्नान करणें आणि दूध व साखर घालून भात खाणें हें पथ्य करावें.

त्रैलोक्यतापहर.

सूतशुल्बत्रिवृताबालितिक्तादन्तिबीजचपला विषतिन्दुः।
पथ्यया सह विचूर्ण्य समांशं हेमवारिसहितं दिनमेकम् ॥ १ ॥
वल्लयुग्मगुटिकार्द्रकवारा नाशयेदभिनवज्वरमाशु।
विश्वतापहरणोऽत्र च पथ्यं मुद्गयूषसहितं लघु भुक्तम् ॥२॥

पारा, ताम्रभस्म, नळीचें तेड, गंधक, कुटकी, जेपाळबीज, पिंपळी, कुचला, आणि हिरडेदळ हे सर्व जिन्नस समभाग घेऊन वस्त्रगाळ चूर्ण करून काळ्या धोतऱ्याच्या पाल्याच्या रसांत एक दिवस खल करून दोन वालाची गोळी करून आल्याच्या रसाशीं द्यावी. ती नवज्वराला तत्काळ दूर करिते. ह्याला विश्वतापहरण (त्रैलोक्यतापहरण) असें म्हणतात. ह्याजवर मुगाच्या कटाशीं हलकें भोजन करावें.

मृत्युंजय रस.

वत्सनाभं गंधकं च मरिचं टंकणं कणा।
एकैकं भागमादाय द्विभागं हिंगुलं भवेत् ॥ १ ॥
आर्द्रकस्वरसेनैव मुद्गमानां वटीं चरेत्।
मधुना लेहनं प्रोक्तं सर्वज्वरविनाशनम् ॥ २ ॥
जंबीरस्य रसैनैव जीर्णज्वरविनाशनम्।

---

१. पारा, गंधक, बचनाग, हिंगूळ व टांकणखार हे सर्व जिन्नस शुद्ध करून समभाग घेऊन एकत्र खल करून चित्रकमूळाच्या काढ्याची एक भावना देऊन वाळल्यावर वज्रमूषेमध्यें घालून वालुकायंत्रांत दोन प्रहर पचन करावें. नंतर चूर्ण करून ठेवावें. आणि शक्तिमानाप्रमाणें योग्य प्रमाणानें सुंठ, मिरीं व पिंपळीच्या काढ्यांतून द्यावें. ह्याला शरभेश्वर रस म्हणतात. हा वात, पित्त व कफ दोषादिकांपासून होणारे उग्र ज्वरांचा क्षणांत नाश करितो, व सन्निपाताचाहि नाश करितो. हा विशेषतः शीतांग सन्निपातनाशक आहे. (लेखीप्रतीवरून.)

अजाजीगुडसंमिश्रं विषमज्वरनाशनम् ।
आर्द्रकस्य रसैनैव दारुणं संनिपातकम् ॥ ३ ॥

बचनाग, गंधक, मिरीं, टाकणखार, व पिंपळी हीं प्रत्येक एक एक भाग व हिंगूळ दोन भाग घेऊन आल्याच्या रसांत खलून मुगाएवढ्या गोळ्या कराव्या. ही गोळी सर्व ज्वरांवर मधांतून द्यावी. लिंबाच्या रसांतून दिली असतां जीर्णज्वराचा नाश करते. जिरें व गूळ ह्यांशीं दिली असतां विषमज्वर दूर करिते. आणि आल्याच्या रसाशीं दिली असतां दारुण सन्निपाताचा नाश करिते. ह्याला मृत्युंजय रस म्हणतात.

अमृतकलानिधि.*

अमृतवराटकमरिचैर्द्विपञ्चनवमांशैः ।
मुद्गप्रमाणवटको ज्वरपित्तकफाग्निमान्द्यहारी स्यात् ॥१॥

बचनाग दोन भाग, कवडीभस्म पांच भाग व मिरें नऊ भाग, ह्यांच्या मुगाएवढ्या गोळ्या कराव्या. त्या ज्वर, कफ, पित्त व अग्निमांद्य ह्यांचा नाश करितात.

ज्वरमुरारि.

रसबलिफणिलोहव्योमताम्राणि तुल्या-
न्यथ रसदलभागो वत्सनागं प्रघृष्टम् ।
भवति गदमुरारिश्चास्य गुंजार्द्धवारा
क्षपयति दिवसेन प्रौढमामज्वराख्यम् ॥ १ ॥

---

* (१) शुद्ध हरताळ व शिंपांचें चूर्ण समभाग व दोहोंच्या नवव्या हिश्शानें शुद्ध मोरचूत ह्यांचा कुमारीच्या रसांत खल करून शुष्क झाल्यावर रानशेणींत गजपुट द्यावें. थंड झाल्यावर काढून बारीक करून एक गुंज साखरेशीं प्रातःकाळीं द्यावें, म्हणजे शीतज्वर दूर होतो. ह्या योगानें कोणाला वांति होते, कोणाला होत नाहीं. हें चूर्ण एकाच दिवसांत शीतज्वराचा नाश करितें. ह्याजवर दोन प्रहरीं गाईच्या दुधाशीं भात पथ्याला द्यावा.

(२) कोष्ठ, गंधक, बचनाग, सुंठ, मिरीं, पिंपळी, हिरडा, बेहडा, आवळकाठी व पारा हे सर्व समभाग घेऊन माक्याच्या रसांत मुगाएवढ्या गोळ्या कराव्या. हिला **अमृतवटी** म्हणतात. ही अजीर्ण, कफ, वात ह्यांचा नाश करिते. ही अग्निदीपक व रुचिकारक आहे. ही कारलीच्या रसाशीं जीर्णज्वर व शीतज्वर ह्यांजवर हितकारक आहे. (लेखी प्र. व.)

पारा, गंधक, शिशाचें भस्म, लोहभस्म, अभ्रकभस्म व ताम्रभस्म हीं सर्व समभाग व पाऱ्याच्या चवथाई बचनाग घेऊन सर्वांचा चांगला खल करावा; ह्याला 'गदमुरारि' असें म्हणतात. हा एक गुंजभर आल्याच्या रसाशीं द्यावा, म्हणजे एका दिवसांत मोठ्या आमज्वराचा नाश करतो.

चंद्रशेखर रस.[1]

शुद्धसूतसमं गन्धं मरिचं टङ्कणं तथा ।
चतुस्तुल्या सिता योज्या मत्स्यपित्तेन भावयेत् ॥ १ ॥
द्विगुंजामार्द्रकद्रावैर्देयं शीतोदकं पुनः ।
तक्रभक्तं च वृन्ताकं पथ्यं तत्र विधापयेत् ॥ २ ॥
त्रिदिनाच्श्लेष्मपित्तोत्थमत्युष्णं नाशयेज्ज्वरम् ॥ ३ ॥

शुद्ध पारा, गंधक, मिरें व टाकणखार हे समभाग, व ह्या चार जिनसांच्या बरोबरीनें साखर घेऊन माशाच्या पित्तानें भावना द्यावी. ह्याला चंद्रशेखर रस म्हणतात. हा दोन गुंजा आल्याच्या रसाशीं देऊन वर थंड पाणी प्यावयास द्यावें. ह्याजवर ताक-भात व वांग्याचें भरीत पथ्याला द्यावें. हा रस तीन दिवसांमध्यें कफवातजन्य अतिकडक ज्वराचा नाश करतो.

सुवर्णमालिनीवसंत.[2]

स्वर्णं मुक्तादरदमरिचं भागवृद्ध्या प्रदेयं
खर्परंयष्टौ प्रथमनवनीतेन निम्बंबुना च ।

---

१. एकवीस दिवस लोण्यांत खललेलें कलखापरीचें चूर्ण पुनः एकवीस दिवस लिंबाच्या रसांत खलावें; ह्याला 'ज्वरमुरारि' म्हणतात. हा दोन वाल साखरेशीं द्यावा. तो तत्काल येणाऱ्या ज्वराचा नाश करतो. (ले. प्र. व.)

२. पारा, गंधक, लोहभस्म, हिंगुळ व हरताळ हीं सर्व समभाग घेऊन पत्तूर ('पाथरी' असें लेखी प्रतींत म्हटलें आहे.) रसामध्यें (जळपिंपळीच्या रसामध्यें) खलून उन्हांत वाळवून पत्तूराच्या (जळपिंपळीच्या) पानाच्या लुगदींत ठेवून दोन किंवा तीन पुटें द्यावीं; म्हणजे हा लोहामृत-रस तयार झाला. हा ज्वराला जिंकतो. जीर्णज्वर, धातुगत ज्वर, वात व बाळंतिणीचे सर्व विकार ह्यांचा नाश करतो. हा लोहामृत रस म्हणजे अमृतच आहे असें गुरूचें वचन आहे. (लेखी प्रतीवरून)

यावत्स्नेहो व्रजति विलयं मर्दयेद्दीयतेऽसौ
गुञ्जाद्वंद्वं मधुचपलया सर्वरोगे वसन्तः ॥ १ ॥

सोनें एक भाग, मौक्तिक दोन भाग, हिंगुळ तीन भाग, मिरें चार भाग आणि शुद्ध कलखापरी आठ भाग ह्या सर्वांचा प्रथम लोण्यांत खल करून नंतर त्यांतील स्निग्धपणा नाहींसा होईपर्यंत लिंबाच्या रसांत खल करावा. ह्याला वसंत म्हणतात. हा सर्व रोगांवर मध व पिंपळी यांशीं द्यावा.

लघुमालिनीवसंत.

रसकयुगुलभागं वल्लिजं भागमेकं
छितयमथ सुखल्वे मर्दयेन्म्रक्षणेन ।
भवति घृतविमुक्तो निम्बुनीरेण यावज्-
ज्वरहरमधुकुल्या मालिनीप्राग्वसन्तः ॥ १ ॥
जीर्णज्वरे धातुगतेऽतिसारे रक्तान्विते रक्तभवे विकारे ।
घोरव्यथे पित्तभवे च दोषे वल्लद्वयं दुग्धयुतं च पथ्यम् ॥ २ ॥
प्रदरं नाशयत्याशु तथा दुर्नामशोणितम् ।
विषमं नेत्ररोगं च गजेन्द्रमिव केसरी ॥ ३ ॥
वसन्तो मालिनीपूर्वः सर्वरोगहरः शिशोः ।
गर्भिण्यै तत्र देयो वै जयन्त्याः पुष्पकैः सह ॥
सर्वज्वरहरः श्रेष्ठो गर्भपोषण उत्तमः ॥ ४ ॥

दोन भाग कलखापरी व एक भाग मिरें ह्या दोहोंचा खलामध्यें लोण्याशीं चांगला खल करावा. नंतर त्यांतील तुपाचा अंश नाहींसा होईपर्यंत लिंबाचा रस घालून खल करावा; ह्याला मालिनीप्रागवसंत असेंही म्हणतात. हा मध व पिंपळीचें चूर्ण ह्यांशीं घेतला ज्वराचा नाश करितो. जीर्णज्वर, धातुगत ज्वर, अतिसार, रक्तातिसार, रक्तजन्य विकार व पित्तजन्य भयंकर व्यथा ह्यांजवर दोन वालपर्यंत द्यावा व दुधाशीं पथ्याला द्यावें. हा वसंत रक्तप्रदर, रक्तमूळव्याध, विषमज्वर व नेत्ररोग ह्यांचा, सिंह जसा हत्तीचा नाश करतो, त्याप्रमाणें नाश करतो. हा मालिनीपूर्ववसंत बालकांचे सर्व रोग दूर करतो. हा गर्भिणीला जयंतीच्या फुलाशीं द्यावा, म्हणजे सर्व रोगांचें हरण करतो; व गर्भाचें उत्तम प्रकारें पोषण करितो.

व्याधिगजकेसरी.

नराम्बुमध्ये रसकस्य चूर्णं दिनानि सप्त त्रिगुणानि पूर्वम् ।
धृत्वातपे शोषितमेतदेव नृवारि जीर्णं भवतीति यावत् ॥ १ ॥
पलप्रमाणं मरिचं च निस्तुषं पलद्वयं स्याद्रसकस्य तस्य ।
एकत्र संचूर्ण्य कृतं तदेव पलार्धकं गोनवनीतकं च ॥ २ ॥
निम्बूत्थतोयेन विमर्द्दनीयं शतैकमानं भिषजा वरिष्ठम् ।
वल्लद्वयं चास्य कणामधुभ्यां प्रदापयेद्व्याधिगजस्य केसरी ॥ ३
नाम्ना प्रसिद्धो रसराज एष सद्यो ग्रहण्यामतिसारके च ।
ज्वरे क्षयेऽर्शःसु तथैव तापे शूलाग्निमान्द्यानिलजे विकारे ४

कलखापरीचें चूर्ण मनुष्याच्या मुतामध्यें घालून एकवीस दिवसपर्यंत उन्हांत ठेवावें. तें कोरडें झाल्यावर (स्वच्छ धुवून वाळवून) आठ तोळे घ्यावें. आणि सालपटें काढून टाकलेल्या मिऱ्यांचें चूर्ण चार तोळे घ्यावें. आणि त्या दोहोंच्या चूर्णांत दोन तोळे गाईचें लोणी घालून घोटावें. नंतर शंभर लिंबांचा रस काढून तो आटेपर्यंत त्या रसाच्या भावना देऊन खल करावा. नंतर ह्याच्या दोन वालाच्या गोळ्या बांधाव्या. व एक गोळी मध-पिंपळीशीं द्यावी. हा रसराज व्याधिगजकेसरी नांवानें प्रसिद्ध आहे. हा नूतन संग्रहणी, अतिसार, ज्वर, क्षय, मूळव्याध, दाह, शूल, अग्निमांद्य व वातविकार ह्यांजवर योजावा.

रसकेश्वर रस.

खर्परं मानुषे मूत्रे स्थितं घस्रत्रिसप्तकम् ।
निस्त्वक्तदर्धमरिचं नवनीतेन मर्दयेत् ॥ १ ॥
शतधा भावयेन्निम्बुरसैः स्याद्रसकेश्वरः ।
पिप्पलीमधुयुग्दत्तः ससितो वाऽस्य भेषजम् ॥ २ ॥
ज्वरं धातुगतं पित्तं भ्रमं पित्तास्रजान्गदान् ।
रक्तातिसारं ग्रहणीं दुर्नामास्रं निवारयेत् ॥
अनम्लं दधि वा दुग्धं पथ्यं चास्मिन्प्रयोजयेत् ॥ ३ ॥

कलखापरी मनुष्याच्या मुतांत एकवीस दिवस ठेवून शुद्ध करून घ्यावी. आणि सोललेल्या मिऱ्याचें चूर्ण त्या कलखापरीच्या निंम्यानें घेऊन दोहोंचा लोण्यामध्यें खल करावा. नंतर लिंबाच्या रसाच्या शंभर भावना द्याव्या. म्हणजे हा रसकेश्वर रस तयार होतो.

हा मधपिंपळीशीं अथवा साखरेशीं द्यावा. म्हणजे ज्वर, धातुगत ज्वर, पित्त, श्रम, रक्तपित्तजन्य विकार, रक्तातिसार, संग्रहणी व मूळव्याध ह्या रोगांचा नाश करितो. ह्यावर गोड दहीं किंवा दूध पथ्याला द्यावें.

अपूर्व मालिनीवसंत.

वैक्रान्तमभ्रं रवितार्प्यरौप्यं वङ्गं प्रवालं रसभस्म लोहम् ।
सुटङ्कणं कम्बुकभस्म सर्वं समांशकं सेव्यवरी हरिद्रा ॥ १ ॥
द्रव्यैर्विभाव्यं मुनिसंख्यया च मृगाङ्कजाशीतकरेण पश्चात् ।
वल्लप्रमाणो मधुपिप्पलीभिर्जीर्णज्वरे धातुगते नियोज्यः ।
गुडूचिकासत्त्वसितायुतश्च सर्वप्रमेहेषु नियोजनीयः ॥ २ ॥
कृच्छ्राश्मरीं निहन्त्याशु मातुलुङ्गांघ्रजैर्द्रवैः ।
रसो वसन्तनामाऽयमपूर्वो मालिनीपदः ॥ ३ ॥

वैक्रांत (तोरमल्ली), अभ्रकभस्म, ताम्रभस्म, सुवर्णमाक्षिकभस्म, रौप्यभस्म, वंगभस्म, प्रवाळभस्म, पाऱ्याचें भस्म (रससिंदुर), लोहभस्म, टाकणखाराची लाही व शंखभस्म हीं सर्व समभाग घेऊन शतावरी व हळद ह्यांच्या रसाच्या सात सात भावना देऊन चांदण्यांत वाळवावा. आणि एक वालप्रमाणानें मधपिंपळीशीं जीर्णज्वर व धातुगतज्वर ह्यांजवर द्यावा. गुळवेलीचें सत्व व खडीसाखर ह्यांशीं सर्व प्रमेहांवर द्यावा. महाळुंगाच्या काढ्याशीं दिला असतां मूत्रकृच्छ्र (उन्हाळे) व मूतखडा ह्यांचा त्वरित नाश करितो. ह्याला अपूर्व मालिनीवसंत म्हणतात.

पंचवक्त्ररस.

शुद्धसूतं विषं गन्धं मरीचं टङ्कणं कणाम् ।
मर्दयेद्धूर्तजद्रावैर्दिनमेकं च शोषयेत् ॥ १ ॥
पञ्चवक्त्ररसो नाम द्विगुञ्जः संनिपातजित् ।
अर्कमूलकषायं तु त्र्यूषणं चानुपाययेत् ॥ २ ॥
युक्तं दध्योदनं पथ्यं जलयोगं च कारयेत् ।
रसेनानेन शाम्यन्ति सक्षौद्रेण कफादयः ॥ ३ ॥
मधु त्वर्करसं चानु पिबेदग्निविवृद्धये ।
यथेष्टं घृतमत्स्याशु दीप्तो भवति पावकः ॥ ४ ॥

शुद्ध पारा, गंधक, बचनाग, मिरीं, टाकणखार व पिंपळी हीं

सर्व समभाग घेऊन धोतऱ्याचे पाल्याचे रसांत एक दिवस खल करून वाळवावा. ह्याला पंचवक्त्र रस असें म्हणतात. हा दोन गुंजाप्रमाणानें दिला असतां सन्निपाताचा नाश करितो. ह्याजवर रुईच्या मुळीच्या काढ्यांतून सुंठ, मिरीं, पिंपळीचें चूर्ण घ्यावें. ह्याजवर दहींभात पथ्याला देऊन जवळ पाण्याचीं भांडीं भरून ठेवावीं. हा रस मधाशीं दिला असतां कफादि दोष शमतात. ह्याजवर जठराग्नि वाढण्याकरितां रुईच्या मुळीचा काढा मध घालून द्यावा. ह्याजवर यथेच्छ तूप घ्यावें म्हणजे अग्नि प्रदीप्त होतो.

ज्वरहर गजसिंह रस.

गगनदरदयुक्तं शुद्धसूतं च गन्धं
प्रहरमथ सुपिष्टं वल्लयुग्मं नरोऽद्यात् ।
ज्वरहरगजसिंहः शृङ्गवेरोदकेन
प्रथमजनितदाहे तक्रभक्तं च भोज्यम् ॥ १ ॥

अभ्रकभस्म, हिंगुळ, पारा व गंधक हे सर्व जिन्नस समभाग घेऊन एक प्रहरभर खल करावा, आणि दोन वाल आल्याच्या रसाशीं द्यावा. ह्याला ज्वरहर गजसिंह रस असें म्हणतात. दाह होऊं लागला तर ह्याजवर प्रथम ताकभात खावा.

चंद्रकला रस.

मुस्तादाडिमदूर्वोत्थैः केतकिस्तनजद्रवैः
सहदेव्याः कुमार्याश्च पर्पटस्यापि वारिणा ॥ २ ॥
रामशीतलिकातोयैः शतावर्या रसेन च ।
भावयित्वा प्रयत्नेन दिवसे दिवसे पृथक् ॥ ३ ॥
तिक्ता गुडूचिकासत्त्वं पर्पटोशीरमाधवी ।
श्रीगन्धं सारिवा चैषां समानं सूक्ष्मचूर्णितम् ॥ ४ ॥

---

१ ह्या "मुस्तादाडिम०" श्लोकापूर्वीं पुढील श्लोक अन्य ग्रंथांत आहे.

प्रत्येकं तोलमादाय सूतं ताम्रं तथाभ्रकम् ।
द्विगुणं गंधकं चैव कृत्वा कज्जलिकां शुभाम् ॥ १ ॥

अर्थः—पारा, ताम्रभस्म व अभ्रकभस्म, हे प्रत्येक तोळा तोळा व गंधक दोन तोळे ह्या सर्वांचा एकत्र खल करावा व नंतर वरीलप्रमाणें भावना द्यावी.

द्राक्षाफलकषायेण सप्तधा परिभावयेत् ।
ततः पोताश्रयं कृत्वा वट्यः कार्याश्चणोपमाः ॥ ५ ॥
अयं चन्द्रकलानाम्ना रसेन्द्रः परिकीर्तितः ।
सर्वपित्तगदध्वंसी वातपित्तगदापहः ॥ ६ ॥
अन्तर्बाह्यमहादाहविध्वंसनमहाघनः ।
ग्रीष्मकाले शरत्काले विशेषेण प्रशस्यते ॥ ७ ॥
कुरुते नाग्निमान्द्यं च महातापज्वरं हरेत् ।
भ्रममूर्च्छाहरश्चाशु स्त्रीणां रक्तं महास्रवम् ॥ ८ ॥
उर्ध्वाधो रक्तपित्तं च रक्तवांतिं विशेषतः ।
मूत्रकृच्छ्राणि सर्वाणि नाशयेन्नात्र संशयः ॥ ९ ॥

(टिपेंतील श्लोकाप्रमाणें सर्व जिन्नस घेऊन त्यांचा एकत्र खल करून त्याला) नागरमोथे, डाळिंब, दूर्वा, केवड्याच्या पारंब्या, सहदेवी, कोवारफोड, पित्तपापडा, मरवा, शतावरी ह्यांच्या रसाची एक एक दिवस भावना द्यावी. नंतर कुटकी, गुळवेलीचें सत्व, पित्तपापडा, वाळा, मधुमालती, चंदन व उपलसरी ह्यांचें समभाग चूर्ण त्यांत मिसळून द्राक्षाच्या रसाच्या सात भावना द्याव्या. व कांहीं दिवस धान्यराशींत पुरून ठेवून नंतर काढून हरभऱ्याएवढ्या गोळ्या कराव्या; ह्याला चंद्रकला रस असें म्हणतात. हा सर्व पित्तरोग व वातपित्तजन्य रोग यांचा नाशक आहे. अंतर्बाह्य महान दाहनाश करणारा जसा काय हा मेघच आहे. ग्रीष्मऋतूंत व विशेषतः शरद्ऋतूंत हा प्रशस्त आहे. अग्निमांद्य न करितां हा महादाहयुक्त असा ज्वराचा नाश करतो. भ्रम, मूर्च्छा, स्त्रियांचा रक्तस्राव, ऊर्ध्वगामी व अधोगामी रक्तपित्त, विशेषतः रक्ताची ओकारी व मूत्रकृच्छ्र ह्यांचा नाश करतो, ह्यांत संशय नाहीं.

सप्तधातुगतज्वराचें लक्षण.

गुरुता हृदयोत्क्लेशः सदनं छर्द्यरोचकौ ।
रसस्थे च ज्वरे लिङ्गं दैन्यं चास्योपजायते ॥ १ ॥

---

१. जीर्णज्वराचें लक्षण लेखी प्रतींत पुढीलप्रमाणें सांगितलें आहे.
रात्रीं बारीक ताप येणें, अरुचि, घाम येणें, क्षीणता, अग्निमांद्य, अशक्तपणा, खोकला, श्वास व शरीर निस्तेज होणें हीं लक्षणें जीर्णज्वरामध्यें दिसून येतात. जीर्णज्वराचें सामान्य लक्षण असें आहे कीं, जो एकदोष-

अंगाला जडत्व, हृदयांत दुखणें, अंग गळल्यासारखें होणें, ओकारी, अरुचि, व दैन्य हीं लक्षणें रसधातुगतज्वरामध्यें होतात.

रक्तनिष्ठीवनं दाहो मोहश्छर्दनविभ्रमौ ।
प्रलापः पिटिका तृष्णा रक्तप्राप्ते ज्वरे नृणाम् ॥ २ ॥

थुंकींतून रक्त पडणें, दाह, मोह, ओकारी, घेरी येणें, बडबड, अंगावर पुटकुळ्या उठणें व तहान हीं लक्षणें रक्तधातुगतज्वरामध्यें होतात.

पिण्डिकोद्वेष्टनं मूर्च्छा सृष्टमूत्रपुरीषता ।
ऊष्मान्तर्दाहविक्षेपौ ग्लानिः स्यान्मांसगे ज्वरे ॥ ३ ॥

हातापायांस गोळे येणें, मूर्च्छा, मलमूत्र अधिक होणें, उकडणें, आंतून दाह होणें, अंग अस्ताव्यस्त टाकणें व ग्लानि हीं लक्षणें मांसगतज्वरामध्यें होतात.

भृशं स्वेदस्तृषा मूर्छा प्रलापश्छर्दिरेव च ।
दौर्गन्ध्यारोचकौ ग्लानिर्मेदस्थे चासहिष्णुता ॥ ४ ॥

फार घाम येणें, तहान, मूर्च्छा, बडबड, ओकारी, अंगास घाण येणें, अरुचि, ग्लानि व सहनशीलता कमी होणें हीं लक्षणें मेदोगत ज्वरामध्यें होतात.

मेदोऽस्थ्नां कूजनं श्वासो विरेकश्छर्दिरेव च ।
विक्षेपणं च गात्राणां विद्यादस्थिगते ज्वरे ॥ ५ ॥

हाडें ठणकणें, कुंथणें, श्वास, रेच होणें, ओकारी, व अंग अस्ताव्यस्त टाकणें हीं लक्षणें अस्थिगत ज्वरामध्यें होतात.

तमःप्रवेशनं हिक्का कासः शैत्यं वमिस्तथा ।
अन्तर्दाहो महाश्वासो मर्मच्छेदश्च मज्जगे ॥ ६ ॥

अंधारांत पडल्यासारखें वाटणें, उचकी, खोकला, थंडी वाजणें, ओकारी, अंतर्दाह, मोठा श्वास लागणें व मर्मस्थानीं फोडल्याप्रमाणें

जन्य किंवा द्विदोषजन्य ज्वर बारा दिवसानंतर मंद होऊन मनुष्याच्या अंगांत राहतो, तसेंच जो त्रिदोषजन्य ज्वर (सन्निपातज्वर) चोवीस दिवसांनंतर मंद होऊन अंगांत राहतो, त्याला वैद्यलोक जीर्णज्वर असें म्हणतात.

जीर्णज्वरांतील वातकफाचा प्रकारः—मंद ज्वर नित्य असतो. काठा रुक्ष असतो, सूज असते, अंग ताठतें व कफ अतिशय वाढतो. त्याला वातबलासक जीर्णज्वर म्हणतात. हा असाध्य आहे.

पीडा होणें ही लक्षणें मज्जागत ज्वरामध्यें होतात.

मरणं प्राप्नुयात्तत्र शुक्रस्थानगते ज्वरे।
शेफसः स्तब्धता मोक्षः शुक्रस्य च विशेषतः ॥ ७ ॥

इंद्रिय स्तब्ध होणें, शुक्रस्राव होणें, व अखेर मृत्यु येणें हीं लक्षणें शुक्रगत ज्वरामध्यें होतात.

सप्तधातुगतज्वराचिकित्सा.

रसस्थे च ज्वरे तस्मिन्कुर्याद्वमनलङ्घने।
सेकसंशमनालेपरक्तमोक्षास्त्वसृग्गते ॥ १ ॥
तीक्ष्णान्विरेकांश्च तथा कुर्यान्मांसगते ज्वरे।
मेदोगे मेदसो नाशमस्थिस्थे वातनाशनम् ॥ २ ॥
बस्तिकर्म प्रयोक्तव्यमभ्यंगोद्वर्तनं तथा।
मज्जशुक्रे क्रिया नोक्ता मरणं तत्र भाषितम् ॥ ३ ॥

रसधातुगत ज्वर असतां वमन व लंघन करावें. रक्ताश्रित ज्वर असतां काढे वगैरे अंगावर शिंपडणें, ज्वरशामक उपाय, ज्वरशामक औषधांचे लेप व शीर तोडून रक्त काढणें हे उपचार करावे. मांसगतज्वरावर तीक्ष्ण रेचक द्यावें. मेदोगत ज्वरावर मेदनाशक व अस्थिगत ज्वरावर वातनाशक उपचार करावे, व ज्वरनाशक बस्ती, ज्वरनाशक तेलाचे अभ्यंग व उट्या लावणें हेही उपचार करावे. मज्जा व शुक्रगत ज्वर झाला असतां तो मृत्युकारक आहे म्हणून सांगितलें असल्यामुळें त्याजवर उपचार सांगितले नाहींत.

आमाशयगत ज्वरावर काढा.

कटुका रोहिणीमुस्ता पिप्पलीमूलमेव च।
हरीतकी च तत्तोयमामाशयगते ज्वरे ॥ ४ ॥

कुटकी, नागरमोथे, पिंपळमूळ व बाळहिरडे ह्यांचा काढा आमागतशय ज्वरावर द्यावा.

---

१. रस व रक्ताश्रित ज्वर साध्य असतो. मांस, मेद, अस्थि व मज्जागत ज्वर कष्टसाध्य असतो; व शुक्रगत ज्वर असाध्य असतो.

२ जीर्णज्वरी मनुष्यानें केव्हांही लंघन करूं नये. कारण ज्वराची शक्ति मोठी असल्यामुळें तो मनुष्य लंघनानें क्षीण होतो. जीर्णज्वरामध्यें अपथ्यामुळें दोष काढून ज्वर पुन्हा पूर्वीप्रमाणें ज्वर येऊं लागला, तर त्याला लंघन करवून पूर्वीप्रमाणें ज्वरावरील उपचार करावे. (लेखी प्रतीवरून)

मधुराज्वराचें लक्षण.

ज्वरो दाहो भ्रमो मोहो ह्यतीसारो वमिस्तृषा ।
अनिद्रा च मुखं रक्तं तालु जिह्वा च शुष्यति ॥ १ ॥
ग्रीवायां परिदृश्यन्ते स्फोटकाः सर्षपोपमाः ।
एभिस्तु लक्षणैर्विद्यान्मन्थराख्यं ज्वरं नृणाम् ॥ २ ॥

ताप, दाह, घेरी, मोह, अतिसार, ओकारी, तहान, झोंप न येणें, तोंडाला लाली, जिभेला व टाळ्याला कोरड व मानेवर मोहरीसारखे फोड, ह्या लक्षणांवरून मधुराज्वर ओळखावा.

चिकित्सा.

मुस्ता पर्पटको यष्टी गोस्तनी समभागतः ।
अष्टावशेषतः क्काथो निपीतो मधुना सह ॥ ३ ॥
पित्तभ्रमं ज्वरं दाहं हन्ति छर्दि समन्थराम् ।

नागरमोथे, पित्तपापडा, ज्येष्टमध, गोस्तनी मनुका ह्या जिनसा समभाग घेऊन अष्टमांश काढा करून मध घालून द्यावा. म्हणजे पित्तामुळें येणारी घेरी दाह, ज्वर, ओकारी व मधुराज्वर ह्यांचा तो नाश करितो.

चन्दनोशीरधान्यं च बालकं पर्पटं तथा ॥ ४ ॥
मुस्ता शुण्ठी समं युक्तं मन्थरज्वरनाशनम् ।

चंदन, वाळा, धने, काळा वाळा, पित्तपापडा, नागरमोथे व सुंठ ह्यांचा काढा मधुराज्वराचा नाशक आहे.

मक्षिका गुडसंयुक्ता ज्वरे मन्थरके हिता ।
भ्रममोहातिसारांश्च नाशयत्यविलम्बतः ॥ ५ ॥

माशी गुळांतून द्यावी. ती मधुराज्वराला हितकारक असून घेरी, मूर्च्छा व अतिसार ह्यांचा त्वरित नाश करिते.

चलदलतरुसेवाहोममंत्रास्त्रिनेत्र-
द्विजगुरुजनपूजा विष्णुनाम्नां सहस्रम् ।
मणिधृतिरपि दानान्याशिषस्तापसानां
सकलमिदमरिष्टं स्वष्टमष्टज्वराणाम् ॥ १ ॥

पिंपळाची सेवा, होम, मंत्रांचा जप, रुद्र, ब्राह्मण व गुरु ह्यांची

---

* १ पोवळें, मोतीं, रुद्राक्ष, शंख व सोनें हे पदार्थ तुळशीच्या रसांत उगाळून मध घालून चाटण द्यावें; म्हणजे मधुर ज्वर शांत होतो.

पूजा, विष्णुसहस्रनामाचा पाठ, त्या त्या ग्रहांचीं रत्नें धारण करणें, दानें देणें व तपस्वी साधूंचा आशीर्वाद, हीं सर्व साधनें अष्टविध ज्वराला दूर करितात.

समुद्रस्योत्तरे तीरे द्विरदो नाम वानरः ।
तस्य स्मरणमात्रेण ज्वरा यान्ति दिगन्तरम् ॥ २ ॥

समुद्राच्या उत्तर तीरावर 'द्विरद' नांवाचा वानर आहे, त्याचें स्मरण केलें असतां ज्वर दिगंतरीं जातो. (या मंत्राचा जप करावा.)

दुर्जलजनित ज्वराची चिकित्सा.

हरीतकी निंबपत्रं नागरं सैंधवोनलः ।
एषां चूर्णं सदा खादेद् दुर्जलज्वरशांतये ॥ १ ॥

हिरडेदळ, लिंबाचीं पानें, सुंठ, सैंधव व चित्रक ह्यांचें चूर्ण करून तें चूर्ण घाण पाण्यापासून येणारा ज्वर शांत होण्याकरितां नेहमीं घ्यावें.

---

२ लवंग, शेळीच्या लेंड्या, सुंठ व तुळशीच्या मंजिरा हीं पाट्यावर वाटून त्यांचा कल्क करून घ्यावा; तो मधुराज्वराचा नाश करितो.

३ सुंठ, कोवळें बेलफळ व बाळहिरडे हे पाण्यांत वाटून घ्यावे; म्हणजे मधुराज्वर, सूज, आम व संग्रहणी हीं शांत होतात.

४ पिंपळ, उंबर, पिंपरणी, वड व आम्लवेतस ह्यांच्या पानाचा अष्टमांश काढा मधुराज्वर दूर होण्याकरितां घ्यावा.

५ मखमली झेंडूचीं पानें व पुदिन्याचीं पानें समभाग, आणि वडाचें एक पान ह्यांचा अष्टमांश काढा करून सांजसकाळ तीन दिवस द्यावा; म्हणजे मधुराज्वर शांत होतो.

६ लवंग, वेलदोडे व खजूर हे एके ठिकाणीं वाटून पुटपाकानें पचन करून ऊन पाण्याशीं घ्यावें; म्हणजे मधुराज्वर शांत होतो.

७ जोंधळ्याच्या लाह्या व बेलाचीं पानें ह्यांचा काढा थंड झाल्यावर घ्यावा; तो मधुराज्वराचा नाश करितो.

८ मक्याच्या बिरमोट्याची राख, खडीसाखर, बेहडेदळ व कात हीं समभाग घेऊन पडवळाच्या काढ्यांत खलून गोळ्या करून एक गोळी तोंडांत धरावी. ती मंथरज्वरांतील ओल्या किंवा कोरड्या खोकल्याचा नाश करिते, ह्यांत संशय नाहीं.

(लेखी प्रतीवरून)

अरुचिमनलमांद्यं पीनसश्वासकासा-
नुदरमुदकदोषानाशु हन्यादशेषान् ।
जनयति तनुकांतिं चित्तनेत्रप्रसादं
पलपरिमितशुंठीक्षौद्रसिद्धः कषायः ॥ २ ॥

चार तोळे सुंठीचा काढा करून तो मध घालून घ्यावा. तो अरुचि, अग्निमांद्य, पीनस, श्वास, खोकला, उदर व पाण्याचे दोष ह्या सर्वांचा नाश करतो; व शरीरकांति, मन व नेत्र ह्यांची प्रसन्नता करतो.

दुर्जलजेता रस.

विषं भागद्वयं दग्धं कंदर्पं पंचभागकम् ।
मरिचं नागरं चैव चूर्णं वस्त्रेण शोधयेत् ॥ १ ॥
आर्द्रकस्य रसेनास्य कुर्यान्मुद्गनिभां वटीम् ।
वारिणा वटिकायुग्मं प्रातः सायं च भक्षयेत् ॥ २ ॥
अयं रसो ज्वरे योज्यः सामे दुर्जलजेपि च ।
अजीर्णाध्मानविष्टंभशूलेषु श्वासकासयोः ॥ ३ ॥

बचनाग दोन भाग, कवडींचें भस्म पांच भाग, मिरें व सुंठ ह्यांचें चूर्ण नऊ भाग ह्यांचा आल्याच्या रसांत खल करून मुगाएवढी गोळी करावी. ह्या दोन गोळ्या सकाळसंध्याकाळ पाण्याशीं घ्याव्या. हा दुर्जलजेता रस आमज्वर, वाईट पाण्यापासून येणारा ज्वर, अजीर्ण, पोटफुगी, मलाचा अवरोध, शूल, खोकला व श्वास ह्यांजवर द्यावा.

पटोलादि काढा.

पटोलमुस्तामृतवल्लिवासकं सनागरं धान्यकिराततिक्तकम् ।
कषायमेषां मधुनापिबेन्नरो निवारयेद् दुर्जलदोषमुल्बणम् ॥४॥

कडूपडवळ, नागरमोथे, गुळवेल, अडुळसा, सुंठ, धने व काडेचिराईत ह्यांचा काढा मध घालून घ्यावा. तो वाईट पाण्यापासून येणारा ज्वर दूर करतो.*

---

* मंद ज्वर, पोट फुगणें, कोठ्यांत शूल, अग्निमांद्य, खोकला, श्वास, अरुचि, भूक नसणें व अंग कापणें हीं लक्षणें दुर्जलजन्य ज्वरांत होतात.

इंद्रजव सोळा भाग, पित्तपापडा चार भाग, जायफळ एक भाग आणि एरंडमूळ एक भाग ह्यांचें चूर्ण करावें. ह्याला **ज्ञानोदय** असें म्हणतात. हा साधकांना सिद्धिदायक आहे. ह्याचें नित्य सेवन करण्याची संवय ठेवली

भोजनाग्रे नरैर्भुक्तं शुंठीराज्यभयोत्थितम् ।
कल्कं तु सहते नित्यं नानादेशोद्भवं जलम् ॥ ५ ॥

सुंठ, मोहरी व हिरडेदळ हे जिन्नस पाण्यांत वाटून त्यांचा कल्क नित्य जेवणापूर्वीं घ्यावा. हा नित्य घेणाराला अनेक देशांतील पाणी सोसतें.

असतां हा पाण्यापासून होणारे दोष दूर करतो व वातकफजन्य रोग दूर करतो. हा ज्वरातिसारनाशक असून ग्राहक आहे.

दाह, थंडी वाजणें, डोकें दुखणें, पोट फुगणें, कंबर दुखणें, अंगाला खाज उठणें, अतिशय शौचास होणें किंवा मळाचा खडा बनणें हीं लक्षणें अपथ्यामुळें पुन्हा उत्पन्न झालेल्या ज्वरामध्यें होतात. अपथ्यामुळें येणारा ज्वर व मद्यप्राशनामुळें येणारा ज्वर ह्याला पित्त कारण आहे असें म्हणतात.

मनुष्य बलवान असून जर त्याला अपथ्यामुळें पुन्हा ज्वर आला, तर याला पुन्हा लंघन करणें हितावह आहे असें म्हणतात. आणि अल्प दोष असेल तर औषध द्यावें. मलांचें शोधन न केल्यामुळें जर पुन्हा ज्वर आला तर शोधन देऊन मल काढून टाकावा म्हणजे ज्वर शांत होतो.

काडेचिराईत, कुटकी, नागरमोथे, पित्तपापडा व गुळवेल ह्यांचा काढा पुन्हा उलटलेल्या ज्वराचा नाश करितो.

काडेचिराईत, वाळा, चिकणामूळ, धने, पित्तपापडा व नागरमोथे ह्यांचा काढा उलटून येणाऱ्या ज्वराचा नाश करितो.

मद्यज्वरचिकित्सा:—शिरसाच्या झाडाची साल, मनुका, पिकलेली चिंच व फालसा ह्यांचे स्वरस साखर घालून मद्यज्वरावर द्यावे. पित्तज्वरावर जी क्रिया सांगितली आहे ती देखील ह्याजवर प्रशस्त आहे.

रक्तज्वरावर—खैराची साल, त्रिफळा, बाळंतनिंबाची साल, कडु पडवळ, अडुळसा व गुळवेल ह्यांचा काढा तूप व मध घालून घ्यावा. तो रक्तदोषावर फार प्रशस्त आहे.

गुळवेल, बाळहिरडे, त्रिफळा, रिंगणमूळ, हळद, वेळूचे कोंब व अडुळसा ह्यांचा काढा मध घालून घ्यावा. तो भयंकर अशा रक्तज्वराचा नाश करतो.

काडेचिराईत, नागरमोथे, कुटकी, वाळा, सुंठ, भारंगमूळ, रिंगळमूळ, वावडिंग, बहाव्याची शेंग, धने, अडुळसा, एरंडमूळ, पद्मकाष्ट, इंद्रजव, कडू पडवळ, बाळंतलिंबाची साल व गुळवेल ह्यांचा काढा पांच प्रकारचे भयंकर विषमज्वर, उपद्रवयुक्त धातुगत जीर्णज्वर, तसेच कफवातपित्त-

पथ्यापथ्यविधि.

आलोक्य वैद्यतन्त्राणि यत्नादेष निबध्यते ।
व्याधितानां चिकित्सार्थं पथ्यापथ्यविनिश्चयः ॥ १ ॥
निदानौषधपथ्यानि त्रीणि यत्नेन चिन्तयेत् ।
तेनैव रोगाः शीर्यन्ते शुष्के नीर इवांकुराः ॥ २ ॥

रोग्याची चिकित्सा करण्याकरितां अनेक वैद्यकग्रंथ पाहून पथ्य कोणचें व अपथ्य कोणचें ह्याचा निर्णय सांगतों. पाणी नसलें म्हणजे जसे वनस्पतीचे अंकुर नाश पावतात, त्याप्रमाणें निदान, औषध व पथ्य ह्यांची विचारपूर्वक योजना केली असतां रोगांचा नाश होतो. ह्यासाठीं त्यांची विचारपूर्वक योजना करावी.

रुक्षु सर्वास्वपथ्यानि यथास्वं परिवर्जयेत् ।
तास्त्वपथ्यैर्विवर्धन्ते तोयदैरिव वीरुधः ॥ ३ ॥
विनाऽपि भेषजैर्व्याधिः पथ्यादेव विलीयते ।
न तु पथ्यविहीनस्य भेषजानां शतैरपि ॥ ४ ॥
दोषान्दूष्यान्देशकालौ सात्म्यं सत्त्वं बलं वयः ।
विकृतिं भेषजं वह्निमाहारं च विशेषतः ॥ ५ ॥
निरीक्ष्य मतिमान्वैद्यश्चिकित्सां कर्तुमुद्यतः ।
पथ्यानि योजयेन्नित्यं यथास्वं सर्वरोगिषु ॥ ६ ॥
मतः सर्वेषु रोगेषु प्रायः श्रेष्ठतमो ज्वरः ।
अतस्तस्यैव प्रथमं पथ्यापथ्यं वदाम्यहम् ॥ ७ ॥

सर्व रोगांमध्यें जीं जीं अपथ्यें म्हणून सांगितलीं आहेत, तीं सर्व वर्ज करावीं. कारण ज्याप्रमाणें मेघाच्या वर्षावानें लता वाढतात त्याप्रमाणें अपथ्यानें ते ते रोग वाढतात. पथ्यानें, औषध न घेतां देखील, केवळ पथ्य करून असल्यानें रोग बरा होतो. परंतु शेंकडों औषधें घेऊन पथ्य न करणाराचा मात्र रोग बरा होत

नन्य दुष्ट व असाध्य ज्वर ह्यांचा नाश करितो. तसेंच अरुचि, दाह, ओकारी, अग्निमांद्य, शोष, घाम, अपचन, खोकला, श्वास, कफ व भ्रम ह्यांचाही नाश करतो. ह्या रक्तज्वरावर लघुमालिनीवसंत फार उत्तम आहे.

गुळवेलीचें सत्व, आवळकाठी, मिरें, पिंपळी, चित्रक, थोर चिकणामूळ व हिरडेदळ ह्यांचें चूर्ण सहा मासेपर्यंत गुळाशीं अथवा मधाशीं गोळी करून द्यावें. तें धातुगत ज्वर, विषमादि ज्वर, एकाहिकादि ज्वर, धातुक्षय व अग्निमांद्य ह्यांना जिंकतें. ह्याजवर दूध प्यावें. (लेखी प्रतीवरून)

नाहीं. ह्यासाठीं चिकित्सा करण्याला सिद्ध होणाऱ्या वैद्यानें दोष, दूष्यें, देश, काल, सात्म्य (संवय), प्राणसामर्थ्य, बल, वय, विकार, औषध, जठराग्नीचें सामर्थ्य आणि विशेषतः आहार ह्या सर्वांचा लक्षपूर्वक विचार करून त्या त्या रोगावरील पथ्याची योजना करावी. सर्व रोगांमध्यें प्रायः ज्वर प्रधान आहे, म्हणून त्याचें पथ्यापथ्य प्रथम सांगतों.

तरुण ज्वरावर पाचनें.

वमनं लंघनं काले यवागूः स्वेदनानि च ।
कटुतिक्तरसाश्चैव पाचनं तरुणे ज्वरे ॥ १ ॥

योग्य वेळीं वमन, लंघन, पेज, घाम काढणें, तिखट व कडु रस हीं तरुणज्वरावर पाचनें आहेत.

सन्निपातावर पथ्य.

संनिपाते त्विदं सर्वं कुर्यादामकफापहम् ।
अवलेहोऽञ्जनं नस्यं गण्डूषाश्च रसक्रियाः ॥ १ ॥
पादयोर्हस्तयोर्मूले कण्ठे कूपे च गण्डयोः ।
स्वेदे भृष्टकुलत्थानां चूर्णघर्षणमाचरेत् ॥ २ ॥

सन्निपातावर आम व कफ यांची नाशक सर्व क्रिया करावी. अवलेह, अंजन, नस्य, गंडूष (चुळा) व रसक्रिया (घाम काढणें), अतिशय घाम येत असल्यास पायाच्या व हाताच्या मुळाशीं, गळ्याला, काखेमध्यें व गालांला भाजलेल्या हुलग्याचें चूर्ण चोळावें.

तरुणज्वरावर अपथ्य.

स्नानं विरेकं सुरतं कषायं व्यायाममभ्यञ्जनमह्नि निद्राम् ।
दुग्धं घृतं वैदलमामिषं च तक्रं सुरां स्वादुगुरुद्रवं च ॥
अन्नं प्रवातं भ्रमणं प्रकोपं त्यजेत्प्रयत्नात्तरुणज्वरार्तः ॥ १ ॥

स्नान, ढाळक, मैथुन, तुरट काढा, व्यायाम, अंगास तेल लावणें, दिवसा निजणें, दूध, तूप, डाळीचीं धान्यें, मांस, ताक, मद्य, गोड जड व पातळ असें अन्न, सोसाट्याचा वारा, हिंडणें व रागावणें ह्या सर्व गोष्टी तरुणज्वरामध्यें वर्ज कराव्या.

मध्यमज्वराला पथ्य.

पुरातनाः षष्टिकशालयश्च वार्ताकसौभाञ्जनकारवेल्लम् ।
वेत्राग्रमाषाढफलं पटोलं कर्कोटकं मूलकपोतिका च ॥ १ ॥

मुद्गैर्मसूरैश्चणकैः कुलत्थैर्मकुष्ठकैर्वा विहितश्च यूषः ।
पाठामृतावास्तुकतण्डुलीयजीवन्तिशाकानि च काकमाची ॥२
द्राक्षाकपित्थानि च दाडिमानि वैकङ्कतान्येव पचेलिमानि ।
लघूनि सात्म्यानि च भेषजानि पथ्यानि मध्यज्वरिणाममूनि ३

जुन्या साठ्या साळीचे तांदूळ, वांगें, शेवग्याच्या शेंगा, कारलें, वेताचे कोंब, आषाढफल, पडवळ, करटोली, कोंवळा मुळा, मयाळ, मूग, मसुरा, हरभरे, हुलगे, किंवा मटक्या ह्यांचें कढण, पहाडवेल, गुळवेल, चंदनबटवा, तांदुळजा, हरणदोडी व कांगोणी ह्यांच्या पालेभाज्या, द्राक्षें, कवठ, डाळिंब, बेहेकळ ह्यांचीं फळें, उडीद, व नित्य सेवयीपैकीं व हलकीं अशीं औषधें, हें सर्व मध्यमज्वराला पथ्य आहे.

जीर्णज्वरास पथ्य.

विरेचनं छर्दनमञ्जनं च नस्यं च धूमोऽप्यनुवासनं च ।
शिराव्यधः संशमनं प्रदेहोऽभ्यङ्गोऽवगाहः शिशिरोपचारः ॥ १

ढाळक, ओकारी, अंजन, नस्य, धूम्रपान, अनुवासन बस्ति, शिरावेध, ज्वरशामक औषधें, लेप, अभ्यंग, अवगाहन व थंड उपचार हें जीर्णज्वराला पथ्य आहे.

जीर्णज्वरावर दुसरें पथ्य.

एणः कुलिङ्गो हरिणो मयूरो लावः शशस्तित्तिरकुक्कुटौ च ।
क्रौञ्चः कुरङ्गः पृषतश्चकोरः कपिंजलो वर्तककालपुच्छौ ॥ १ ॥
गवामजायाश्च पयो घृतं च हरीतकी पर्वतनिर्झराम्भः ।
एरण्डतैलं सितचन्दनं च द्रव्याणि सर्वाणि पुरेरितानि ।
ज्योत्स्ना प्रियालिङ्गनपथ्ययं स्याद्वर्गः पुराणज्वरिणां सुखाय ॥२॥

काळा हरण, चिमणापक्षी, हरीण, मोर, लावापक्षी, ससा, तित्तिर, कोंबडा, करढोक पक्षी, तांबडा हरीण, रोहीजातीचा मृग, चकोर पक्षी, पांढरा तित्तिर, रानचिमणी, भेंकर (कालपुच्छ—एक हरणाची जात), गाईचें व शेळीचें दूध, तूप, हिरडे, पर्वतांतील झऱ्याचें पाणी, एरंडेल, पांढरा चंदन, वर मध्यम ज्वराला सांगितलेलीं पथ्यद्रव्यें, चांदणें व प्रेमळ पत्नीचें आलिंगन हीं सर्व जीर्णज्वराला पथ्यकारक आहेत.

आगंतुकज्वराला पथ्य.

आगन्तुके ज्वरे नैव नरः कुर्वीत लङ्घनम् ।

अभिचाराभिशापोत्थे जपहोमादि भेषजम् ॥ १ ॥
उत्पातग्रहपीडोत्थे दानस्वस्त्ययनादिभिः ।
कामशोकभयोद्भूते सर्वा वातहरी क्रिया ॥ २ ॥
आश्वासनं चेष्टलाभो हर्षदायीनि यानि च ।
हर्षेण च समायान्ति कामशोकभयज्वराः ॥ ३ ॥
क्रोधजे पित्तजित्कार्यं प्रियासद्वाक्यमेव च ।
ओषधीगन्धविषजौ विषपित्तप्रसादनैः ॥ ४ ॥
अध्वश्रान्तेषु चाभ्यङ्गं दिवा निद्रां च कारयेत् ।
मनःक्षोभसमुत्पन्ने मनसः सान्त्वनानि च ॥ ५ ॥
अभिघातसमुत्थाने पानाभ्यङ्गौ च सर्पिषः ।
रक्तावसेकमद्यैश्च तथा मांसरसौदनैः ॥ ६ ॥
क्षतजे व्रणजे चापि क्षतव्रणचिकित्सितम् ।
इत्यागन्तुज्वरे पूर्वं भिषग्भिः पथ्यमीरितम् ॥ ७ ॥

आगंतुक ज्वराला लंघन करूं नये. जारणमारणादिकांनीं किंवा शापामुळें येणाऱ्या ज्वरावर जप, होम इत्यादि उपचार करावे. उत्पात व ग्रहपीडा ह्यांपासून होणारा ज्वर दूर होण्याकरितां पुण्याहवाचन व दान हीं कर्में करावीं. काम, शोक व भय ह्यांमुळें येणाऱ्या ज्वरावर वातनाशक उपचार करावे. त्याचप्रमाणें आश्वासन, इष्टवस्तूची प्राप्ति व आनंददायक गोष्टी हे उपचार करून मनाला हर्ष झाला असतां काम, शोक व भय ह्यांपासून होणारे ज्वर दूर होतात. क्रोधामुळें आलेल्या ज्वरावर पित्तशामक उपचार, प्रियपत्नीचें मधुर भाषण हे उपचार करावे. औषधींचा वास व विष ह्यांपासून येणारा ज्वर विष व पित्तनाशक उपचारांनीं शांत होतो. मार्ग चालून झालेल्या श्रमामुळें आलेल्या ज्वरावर अभ्यंग व दिवसा झोंप घेणें हे उपचार करावे. मन क्षुब्ध झाल्यामुळें आलेल्या ज्वरावर मन शांत होईल अशी क्रिया करावी. अभिघातजन्य ज्वरावर अंगास तूप माखणें, पिणें, सांकळलेलें रक्त काढून टाकणें व मद्य व मांसरस ह्यांचें सेवन हे उपचार करावे. क्षतजन्य व व्रणजन्य ज्वरावर क्षत व व्रण यांच्या चिकित्सेंत सांगितलेली क्रिया व पथ्य करावें. ह्यांप्रमाणें वैद्यांनीं आगंतुकज्वरावर पथ्य सांगितलें आहे.

विषमज्वरावर पथ्य.

विष्णोर्नामसहस्रस्य पठनं श्रवणं श्रुतेः ।
देवानां ब्राह्मणानां च गुरूणामपि पूजनम् ॥ १ ॥
ब्रह्मचर्यं तपो होमः प्रदानं नियमो जपः ।
साधूनां दर्शनं श्रेष्ठं रत्नौषधिविधारणम् ॥
मङ्गलाचरणं चेति वर्गः सर्वज्वराञ्जयेत् ॥ २ ॥

विष्णुसहस्रनामाचा पाठ, वेदश्रवण, देव, ब्राह्मण व गुरु ह्यांची पूजा, ब्रह्मचर्य, तपश्चर्या, होम, दान, व्रत, जप, साधूंचें दर्शन, रत्नें व सिद्धौषधी ह्यांचें धारण आणि मंगल आचरण हीं सर्व ज्वराला जिंकणारीं आहेत.

व्यायामं च व्यवायं च स्नानं चंक्रमणानि च ।
ज्वरमुक्तो न सेवेत यावन्नो बलवान्भवेत् ॥ ३ ॥

व्यायाय, मैथुन, स्नान व मार्गक्रमण ह्या क्रिया ज्वरांतून उठलेल्या मनुष्यानें अंगांत चांगली शक्ति येईपर्यंत वर्ज कराव्या.

ज्वरचिकित्सापरिशिष्ट.

(लेखी प्रतीवरून.)

बलवान मनुष्याचा अल्पदोषांनीं युक्त असा उपद्रवरहित ज्वर साध्य असतो.

श्वास, मूर्च्छा, अरुचि, ओकारी, तहान, अतिसार, मलावरोध, उचकी, खोकला व अंग दुखणें हे ज्वराचे दहा उपद्रव आहेत.

व्याधीमध्यें उपद्रव झाले म्हणून वैद्यानें तो सोडूं नये. कारण व्याधि बरा झाला म्हणजे सर्व उपद्रव त्वरित नाहींसे होतात. म्हणून आधीं व्याधि बरा करून मागून उपद्रवावर उपचार करावे. कुशल वैद्य योग्य वाटल्यास प्रथम उपद्रवांनाही दूर करतो. तथापि त्या उपद्रवांमध्यें जो फार वाढला असेल त्याला आधीं जिंकावा. मुख्य व्याधीला पूर्वीं जिंकावें किंवा त्या दोहोंपैकीं जो बलवान् असेल त्यास आधीं जिंकावें, किंवा व्याधि व उपद्रव ह्यांच्या कमीजास्त प्रमाणाच्या अनुरोधानें उभयतांचीही चिकित्सा करावी.

डोरलीमूळ, रिंगणमूळ, धमासा, कडुपडवळ, काकडशिंगी, भारंगमूळ, पोखरमूळ, कुटकी, कचोरा व इंद्रजव ह्यांचा काढा सान्निपातांतील श्वासाचा नाश करतो.

भारंगमूळ, निंबाची साल, घने, बाळहिरडे, गुळवेल, काडे- चिराईत, अडुळसा, अतिविष, त्रायमाण, कुटकी, वेखंड, सुंठ, मिरीं, पिंपळी, बाहव्याची शेंग, अर्जुनसादडा, रास्ना, धमासा, पडवळ, पाडळमूळ, कचोरा, दारुहळद, इंद्रायणीचें मूळ, तेड, ब्राह्मी, पोखरमूळ, डोरली, रिंगणी, हळद, आवळकाडी, बेहडे- दळ व देवदार ह्यांचा हा **द्वात्रिंशांग** काढा आपल्या तेजानें सान्निपातांतील उपद्रवांचा, गरुड जसा सर्पांचा नाश करितो त्याप्रमाणें नाश करितो. आणि श्वास, कफ, खोकला, गुदांतील पीडा, हृद्रोग, उचकी, वात, मान ताठणें, गळ्याचे रोग, अर्दितवात, मलावष्टंभ व वर्ध्म (वळ) ह्यांचा नाश करितो.

पिंपळी, कायफळ व काकडशिंगी ह्यांचें चूर्ण मधाशीं चाटलें असतां मनुष्याला सुख होतें.

रानशेणीच्या अग्नीमध्यें खुरपें तापवून लाल करून त्यानें हातापायाच्या तळव्यांना ओरपावें; म्हणजे निःसंशय श्वास दूर होतो, असें मुनींनीं सांगितलें आहे.

मूर्च्छेवर—आल्याच्या रसाचें नस्य द्यावें. तपकिरीप्रमाणें श्वासकुठार नाकांत ओढला असतां तो मूर्च्छा दूर करितो, असें म्हणतात. मूर्च्छा दूर होण्याकरितां मध, सेंधेलोण, मनशीळ व मिरीं ह्यांचें डोळ्यांत अंजन करावें. थंड पाणी डोळ्यावर शिंपडणें, उत्तम सुवासिक धूप व सुगंधी फुलांचा वास, तसेंच ताडाच्या पंख्याचा मंद वारा आणि केळीच्या कोवळ्या पानाचा स्पर्श हे उपचार मूर्च्छा दूर करणारे आहेत.

अरुचि जाण्याकरितां आल्याचा रस आंबट पदार्थ व सैंधव ह्यांचा कवल (गोळा) तोंडांत धरावा. तसेंच सेंधेलोण व महाळुंगाचें केसर हें तोंडांत धरावें. किंवा महाळुंगाचें केसर, सेंधेलोण व तूप

तोंडांत धरावें, किंवा आवळकाठी, मनुका आणि खडीसाखर ह्यांचा कल्क तोंडांत धरावा.

गुळवेलीचा काढा थंड झाल्यावर मध घालून प्यावा; तो ओकारी दूर करितो.

रक्तचंदनची पूड खडीसाखर व मेण ह्यांची गोळी मधाशीं द्यावी. ती ओकारीला दूर करिते.

कवठाचा गर महाळुंगांतील केसर, डाळिंबांतील दाणे, बोरें व चुक्याचीं पानें ह्यांचा तोंडाला आंतून लेप करावा. किंवा चांदीची गोळी (किंवा घागरी) तोंडांत धरावी. ती तहानेचा नाश करिते.

थंड पाणी मध घालून आकंठ प्यावें. व लागलेंच ओकवून तें पाणी काढून टाकावें.

अत्यंत वाढलेली तहान शमण्यासाठीं साळीच्या लाह्या, कोष्ट, वडाच्या कोवळ्या पारंब्या व मध ह्यांचा कल्क तोंडांत धरावा.

कचोरा, तांबडे हुलगे, बोरें, महाळुंगांतील केसर व डाळिंबाचे दाणे ह्यांचा कल्क तोंडांत धरावा. तो तात्काळ तहान दूर करितो.

बलवान रोगी असल्यास ज्वरांतील अतिसारास लंघनासारखें दुसरें औषध नाहीं. कारण लंघन हें उच्छृंखळ झालेल्या दोषांचें पाचन व शमन करितें.

गुळवेल, कुड्याची साल, नागरमोथे, काडेचिराईत, अतिविष व सुंठ ह्यांचा काढा अथवा गुळवेल, सुंठ, कुड्याची साल व नागरमोथे ह्यांचा काढा ज्वरामधील अतिसाराचा त्वरित नाश करितो.

पहाडमूळ, गुळवेल, पित्तपापडा, नागरमोथे, सुंठ, काडेचिराईत व इंद्रजव ह्यांचा काढा द्यावा. तो सर्व प्रकारच्या दुर्निवार ज्वरातिसाराचा हट्टानें नाश करितो.

ज्वरामध्यें मळाचा खडा बांधला असल्यास वातनाशक व वाताचें अनुलोम करणारी चिकित्सा करावी.

बाळहिरडे, बाहव्याच्या शेंगा, कुटकी, तेड व आवळकाठी,

ह्यांचा काढा जीर्णज्वरांतील मलावरोधाकरितां द्यावा. तो त्वरित मलावरोधाचा नाश करितो.

हरीतक्यादि गुटी किंवा आमलक्यादि चूर्ण ह्यांची योजना मलावरोधावर करावी. ह्यासारखें त्याला दुसरें औषध नाहीं.

हिरडेदळ, तेड व वरधारा हे जिन्नस आठ आठ तोळे; पिंपळी, सुंठ, गुळवेल, गोखरूं, शतावरी, सहदेवी व वावडिंग हे प्रत्येक चार चार तोळे ह्यांच्या मधाशीं गोळ्या कराव्या. ह्या सेवन केल्या असतां ज्वर, खोकला, मलावरोध व अग्निमांद्य ह्यांचा नाश होतो.

पिंपळाची वाळलेली साल जाळून पाण्यांत टाकावी. तें पाणी प्यावयास दिलें असतां उचकी व ओकारी दूर होते.

घोड्याच्या वाळलेल्या लिदीची धुरी दिल्यानें उचकी दूर होते. हा श्रेष्ठ योग सन्निपातिक उचकीचाही नाश करतो.

सातू किंवा हुलगे शिजवून त्यांच्या पाण्याचें नस्य द्यावें, म्हणजे उचकी दूर होते.

सैंधलोण बारीक वाटून पाण्यांत घालून त्याचें नस्य द्यावें, म्हणजे उचकीचा त्वरित नाश होतो.

सुंठ साखरेशीं घेतल्यानें उचकी दूर होते; किंवा हिंगाची धुरी दिल्यानें उचकी रहाते.

पिंपळमूळ, पिंपळी, बेहडेदळ व सुंठ ह्याचें चूर्ण मधाशीं अथवा अडुळशाचा रस मधाशीं द्यावा; म्हणजे खोकल्याचा नाश होतो.

पोखरमूळ, सुंठ, मिरीं, पिंपळी, काकडशिंगी, कायफळ, धमासा, बडिशेप ह्यांचें चूर्ण मधाशीं चाटावें हा पुष्करावलेह खोकल्याचा शत्रु असून कफरोगनाशक आहे.

बेहडेदळ, मिरीं, लवंग ह्या सर्वांच्याबरोबर खैराचा कात ह्यांचा बाभळीच्या काढ्यांत खल करून गोळ्या कराव्या. ही गोळी तोंडांत धारिली असतां खोकला दूर होतो.

दाहाधिकारांत जे उपचार सांगितले आहेत, ते येथें दाह-उपद्रवावर करावेत. परंतु ज्या अर्थी ताप बरा करणें हें मुख्य काम

आहे, त्या अर्थीं जे उपचार करावयाचे ते त्याला विरुद्ध नसावेत.

निद्रानाश, अतिसार, संग्रहणी व अग्निमांद्य ह्या विकारांवर भांग भाजून तिचें चूर्ण रात्रीं मधाशीं द्यावें.

पिंपळमूळाचें चूर्ण गुळाशीं द्यावें, म्हणजे फार दिवस नाहींशी झालेली झोंप येते.

कांद्याच्या रसांत केशर खलून त्याचें अंजन केलें असतां ज्वर आलेला असो किंवा नसो, तात्काळ झोंप येते.

काकजंघेचें मूळ मस्तकावर बांधावें म्हणजे झोंप येते. ह्याच-प्रमाणें शमीचाही उपयोग होतो, असें वैद्य म्हणतात.

चुक्याचा रस, कांजी, मोगऱ्याच्या वगैरे फुलांचें तेल पायाला चोळावें, म्हणजे झोंप येते.

कोवळें व काळें वांगें रात्रीं भाजून ठेवावें आणि तें सकाळीं मध घालून खावें, म्हणजे त्वरित झोंप येते.

एरंडेल व जवसाचें तेल कांशाच्या भांड्यांत घालून बोटांनीं मर्दन करावें, म्हणजे अतिशय झोंप येते. शेळीचें दूध पायास चोळावें म्हणजे दाह शांत होऊन अतिशय झोंप येते. बडिशेप व भांग ह्यांची पूड शेळीच्या दुधांत वाटून साधारण ऊन करून पायाला लेप करावा म्हणजे झोंप येते. स्त्रियांच्या अंगावरील दुधांतून अथवा गाईच्या दुधांतून कस्तुरीचें अंजन डोळ्यांत घालावें, म्हणजे फार दिवस जरी झोंप नसली तरी त्याला झोंप येते.

कोष्ठ व एरंडमूळ कांजींत उगाळून मस्तकास लेप केला असतां वातजन्य मस्तकपीडा बंद होते. किंवा मुचकुंदाच्या फुलांनेंही मस्तक दुखावयाचें राहतें.

चंदन, वाळा, जेष्टमध, चिकणामूळ, नागरमोथे व कमळ हे जिन्नस दुधांत वाटून मस्तकास लेप करावा, म्हणजे रक्तजन्य व पित्तजन्य मस्तकपीडा दूर होते.

सुंठ, कोष्ठ व टाकळा ह्यांचा लेप कफसंबंधीं मस्तकपीडा दूर करतो.

मिरीं, वेखंड व आलें ह्यांचें नस्य भुग्ननेत्रसन्निपाताला जिंकतें.

जेपाळाचें बीं-टरफलें व आंतील जीभ काढलेलें--चाळीस मासे, आणि मिरीं व पिंपळीचें मूळ चार मासे ह्यांचा लिंबाच्या रसांत सात दिवस सारखा खल करावा. ह्या रसाचें अंजन केलें असतां तें सन्निपाताचा नाश करितें.

पारा व गंधक समभाग ह्यांचा धोतऱ्याच्या फळाच्या रसांत एक दिवस खल करून त्यांत त्याच्या बरोबरीनें सुंठ, मिरीं, पिंपळी यांचें चूर्ण घालावें. ह्याला उन्मत्तरस म्हणतात. ह्या नस्यानें सर्व सन्निपात जिंकले जातात.

अंग दुखत असलें म्हणजे त्याजवर वालुकास्वेदाची योजना करावी. ती फार उत्तम आहे.

पार्वती, नंदी व मातृगण ह्यांसह महादेवाची मोठ्या प्रयत्नानें पूजा करावी, म्हणजे रोगी तात्काळ ज्वरांतून मुक्त होतो. चराचर जगताचा पति जो सहस्रशीर्ष भगवान् महाविष्णु त्याची सहस्रनामानें स्तुति केली असतां सर्व ज्वरांचा नाश होतो.

अतिसारनिदान.

क्षीरमत्स्यादि यद्भुक्तं तद्विरुद्धाशनं मतम् ।
भुक्तस्योपरि यद्भुक्तं तदध्यशनमुच्यते ॥ १ ॥

दूध व मासे एकत्र खाणें, अशा प्रकारचें जें भोजन त्याला विरुद्धाशन असें म्हणतात; व एकदा जेवण झाल्यावर पुनः लगेच तें अन्न पचन होण्यापूर्वीं जेवण केलें, तर त्याला अध्यशन असें म्हणतात.

गुर्वतिस्निग्धरूक्षोष्णद्रवस्थूलातिशीतलैः ।
विरुद्धाध्यशनाजीर्णैर्विषमैश्चातिभोजनैः ॥ २ ॥
स्नेहाद्यैरतियुक्तैश्च मिथ्यायुक्तैर्विषैर्भयैः ।
शोकदुष्टाम्बुमद्यातिपानैः सात्म्यविपर्ययैः ॥ ३ ॥
जलाभिरमणैर्वेगविघातैः कृमिदोषतः ।
नृणां भवत्यतीसारो लक्षणं तस्य वक्ष्यते ॥ ४ ॥

जड अतिशय स्निग्ध, रूक्ष, उष्ण, पातळ, स्थूल (पाटवड्या, उसळ वगैरे पिष्टमय अन्न) व अतिशय थंड असें अन्न खाणें,

विरुद्ध अन्न खाणें, जेवणावर जेवणें, विषम भोजन करणें, अजीर्ण झालें असूनही जेवणें, अतिशय भोजन करणें, स्नेहपानादिकांचा अतियोग किंवा मिथ्यायोग होणें, विष, भय, व शोक ह्यांच्या बाधेमुळें, वाईट पाणी पिण्यानें, अतिशय मद्यपान केल्यानें, आपल्याला ज्या संवई आहेत त्यांचा विपर्यास केल्यानें, ज्या ऋतूंमध्यें जें उचित त्याचा विपर्यास केल्यानें, जलक्रीडा करण्यानें, मलमूत्रांच्या वेगाचा अवरोध केल्यानें व कृमिदोषामुळें मनुष्याला अतिसार होतो. आतां त्याचें लक्षण सांगतों.

संशम्यापां धातुरग्निं प्रवृद्धो वर्चोमिश्रो वायुनाऽधः प्रणुन्नः ।
सरत्यतीवातिसारं तमाहुर्व्याधिं घोरं षड्विधं तं वदन्ति ॥ ५ ॥
एकैकशः सर्वशश्चापि दोषैः शोकेनान्यः षष्ठ आमेन चोक्तः ।
केचिच्चाऽहुर्नैकरूपप्रकारं नेत्येवं तं काशिराजस्त्ववोचत् ॥ ६ ॥

शरीरामध्यें वाढलेला आपधातु (पाणी) जठराग्नीला मंद करून मळाशीं मिश्र होऊन वायूनें खालीं ढकलल्यामुळें वरचेवर गुदावाटे बाहेर सरतो, म्हणून त्याला अतिसार असें म्हणतात. हा भयंकर व्याधि सहा प्रकारचा आहे, असें म्हणतात. कित्येक म्हणतात कीं, हा व्याधि एक प्रकारचा व एक स्वरूपाचा नाहीं. परंतु तसें नाहीं असें काशिराज म्हणतो.

हृन्नाभिपायूदरकुक्षितोदगात्रावसादानिलसंनिरोधाः ।
विट्संगमाध्मानमथाविपाको भविष्यतस्तस्य पुरःसराणि ॥७॥

हृदय, बेंबी, गुद, पोट व कुशी ह्यांमध्यें टोचणी लागल्यासारखी होणें, अंग गळल्यासारखें वाटणें, वायूचा व मलाचा अवरोध, पोट फुगणें व अपचन हीं लक्षणें अतिसार होण्यापूर्वीं होतात.

अरुणं फेनिलं रूक्षमल्पमल्पं मुहुर्मुहुः ।
शकृदामं सरुक्शब्दं मारुतेनातिसार्यते ॥ ८ ॥

तांबूस रंगाचें, फेंसाळ, रूक्ष, वरचेवर, थोडें थोडें, मळ व आम यांनीं मिश्रित, वेदनायुक्त व शब्दयुक्त असें अतिसारामध्यें परसाकडे होतें.

पित्तात्पीतं नीलमालोहितं वा तृष्णामूर्च्छादाहपाकोपपन्नम् ।

पित्तदोषामुळें पिवळें, निळें व तांबडें आणि तहान, मूर्च्छा, दाह,

गुदाचे ठिकाणीं पुटकुळ्या ह्या विकारांनीं युक्त असें शौचास होतें.

शुक्लं सान्द्रं श्लेष्मणा श्लेष्मजुष्टं विस्रं शीतं हृष्टरोमा मनुष्यः ॥ ९॥

कफदोषामुळें पांढरें, दाट, कफमिश्रित, दुर्गंधीयुक्त व थंड असें शौचास होतें व अंगावर काटा येतो.

वराहस्नेहमांसाम्बुसदृशं सर्वरूपिणम् ।
कृच्छ्रसाध्यमतीसारं विद्याद्दोषत्रयोद्भवम् ॥ १० ॥

त्रिदोषजन्य अतिसारांत डुकराची चर्बी, मांस धुतलेलें पाणी, ह्यासारखें व सर्व दोषांच्या लक्षणांनीं युक्त असें शौचास होतें. हा त्रिदोषापासून होणारा अतिसार कष्टसाध्य आहे.

तैस्तैर्भावैः शोचतोऽल्पाशनस्य बाष्पोष्मा वै वह्निमाविश्य जन्तोः।
कोष्ठं गत्वा क्षोभयेत्तस्य रक्तं तच्चाधस्तात्काकणन्तीप्रकाशम् ११
निर्गच्छेद्वै विड्विमिश्रं ह्यविड् वा निर्गन्धं वा गन्धवद्वाऽतिसारः।
शोकोत्पन्नो दुश्चिकित्स्योऽतिमात्रं रोगो वैद्यैः कष्ट एव प्रदिष्टः १२

त्या त्या धनबांधवादिकांच्या हानीमुळें शोक करणाऱ्या मनुष्याच्या शरीरांतील शोकजन्य ऊष्मा व डोळ्यांतील पाणी अंतर्गत होऊन कोठ्यांत जाऊन जठराग्नीमध्यें प्रवेश करून रक्ताला क्षोभवितें. त्यामुळें तें रक्त अधोमार्गी होऊन गुंजेप्रमाणें लाल असें शौचावाटे बाहेर पडतें. तें केव्हां मळमिश्रित असतें किंवा मलरहित पडतें. त्याला दुर्गंधी असते किंवा नसतें. ह्याला शोकातिसार असें म्हणतात. हा फार दुश्चिकित्स्य आहे. वैद्यांनीं हा कष्टसाध्य आहे म्हणून सांगितलें आहे.

अन्नाजीर्णात्प्रद्रुताः क्षोभयन्तः कोष्ठं दोषा धातुसंघान्मलांश्च ।
नानावर्णं नैकशः सारयन्ति शूलोपेतं कष्टमेनं वदन्ति ॥ १३ ॥

अन्नाच्या अजीर्णामुळें क्षुब्ध झालेले वातादि दोष सर्व उदराला व्यापून मल व रस-रक्तादि धातु ह्यांना अनेक वर्णानें अनेक वेळां बाहेर सारतात. ह्यामध्यें शूल असतो. ह्या आमातिसाराला कष्टसाध्य असें म्हणतात.

आमातिसाराचें लक्षण.

संसृष्टमेभिर्दोषैस्तु न्यस्तमप्स्ववसीदति ।
पुरीषं भृशदुर्गन्धि पिच्छिलं चामसंज्ञितम् ॥ १४ ॥

ह्या वरील दोषांनीं सोडलेला मळ पाण्यांत टाकला असतां बुडतो. त्याला अत्यंत दुर्गंधी असते. तो बुळबुळीत असतो. त्याला आमातिसार असें म्हणतात.

आमाशयस्थः कायाग्नेर्दौर्बल्याद्विपाचितः ।
अपक्काहारधातुर्यः स आम इति संज्ञितः ॥ १५ ॥
ऊष्मणोऽल्पबलत्वेन धातुमाद्यमपाचितम् ।
दुष्टमामाशयगतं रसमामं प्रचक्षते ॥ १६ ॥

जठराग्नीच्या दुर्बळपणामुळें आमाशयांतील अन्नाचा जो अपक्व रस होतो त्याला आम असें म्हणतात. किंवा जठराग्नीच्या अशक्तपणामुळें आमाशयामध्यें उत्पन्न होणारा जो आद्य रसधातु तो अपक्व राहिल्यामुळें आमाशयामध्यें दूषित होऊन असतो, त्याला आम असें म्हणतात.

पक्वलक्षण.

एतान्येव तु लिंगानि विपरीतानि यस्य वै ।
लाघवं च विशेषेण तस्य पक्वं विनिर्दिशेत् ॥ १७ ॥

हीं जीं वर आमाशयाचीं लक्षणें सांगितलीं आहेत, त्यांच्या उलट लक्षणें दिसूं लागलीं व अंगामध्यें हलकेपणा वाटूं लागला म्हणजे त्याला पक्वातिसार असें म्हणावें.

असाध्य लक्षण.

नात्युपद्रवतायुक्तं नातिदुष्टेषु धातुषु ।
बाले वृद्धेऽप्यसाध्योऽयं रूपैरेतैरुपद्रवैः ॥ १८ ॥
अपि यूनामसाध्यः स्यादतिदुष्टेषु धातुषु ॥ १९ ॥

बाल व वृद्ध अशा मनुष्याला झालेला अतिसार जरी फार उपद्रवयुक्त नसला, किंवा त्या अतिसारामुळें रसादि धातुही फार दूषित झाले नसले तरी तो असाध्य असतो. परंतु जर तरुणाला झालेला अतिसार रसादि धातु फार दूषित होऊन झाला असेल तर मात्र असाध्य असतो.

लशुनकुणपगन्धं पूतिगन्धं घनं वा
पललजलसमानं पक्वजम्बूफलाभम् ।

घृतमधुपयआभं तैलशैवालनीलं
सुघनदधिसवर्णं वर्जयेच्चातिसारम् ॥ २० ॥

लसुणाप्रमाणें किंवा प्रेताप्रमाणें ज्याच्या मळाला घाण येते, अथवा कुजट दुर्गंधि येते, तसेंच ज्याला दाट, मांस धुतलेल्या पाण्यासारखें, पिकलेल्या जांभळाच्या रसाप्रमाणें, तुपासारखें, मध किंवा दूध यांसारखें, तेलासारखें, शेवाळाच्या रंगाचें, निळया रंगाचें किंवा दाट दह्याच्या रंगाप्रमाणें शौचास होतें; त्या अतिसारी मनुष्याला औषध देऊं नये.

शोफं शूलं ज्वरं तृष्णां श्वासं कासमरोचकम् ।
छर्दि मूर्छां च हिक्कां च दृष्ट्वाऽतीसारिणं त्यजेत् ॥ २१ ॥

सूज, शूल, ज्वर, तहान, श्वास, खोकला, अरुचि, ओकारी, मूर्च्छा व उचकी हे उपद्रव ज्याला झाले आहेत त्या अतिसारी मनुष्याला औषध देऊं नये.

रक्तातिसारानिदान.

पित्तकृन्ति यदाऽत्यर्थं द्रव्याण्यश्नाति पैत्तिके ।
तदोपजायते तीव्रो रक्तातीसार उल्बणः ॥
दोषलिङ्गेन मतिमान्संसर्गं तत्र लक्षयेत् ॥ २२ ॥

पित्तातिसारामध्यें अतिशय पित्तकारक पदार्थ खाल्यानें फार भयंकर असा रक्तातिसार उत्पन्न होतो. मागें वातादि दोषांचीं जीं लक्षणें सांगितलीं आहेत, त्यांवरून रक्तातिसारांत कोणत्या दोषाचा संबध आहे तें ओळखावें.

प्रवाहिकेचें लक्षण.

वायुः प्रवृद्धो निचितं बलासं नुदत्यधस्तादहिताशनस्य ।
प्रवाहतोऽल्पं बहुशो मलाक्तं प्रवाहिकां तां प्रवदन्ति तज्ज्ञाः ॥२३
प्रवाहिका वातकृता सशूला पित्तात्सदाहा सकफा कफाच्च ।
सशोणिता शोणितसंभवा च ताः स्नेहरूक्षप्रभवा मतास्तु ॥
तासामतीसारवदादिशेच्च लिङ्गं क्रमं चाऽऽमविपक्वतां च ॥ २४ ॥

अपथ्य करणाऱ्या मनुष्याचा संचित झालेला कफ प्रकुपित झालेला वायु कुंथत कुंथत मलासहवर्तमान बाहेर सोडतो, त्याला वैद्य प्रवाहिका असें म्हणतात. वातदोषादिक प्रवाहिकेमध्यें शूळ

असतो. पित्तदोषाधिक प्रवाहिकेमध्यें दाह असतो, आणि कफदोषाधिक प्रवाहिकेमध्यें कफच फार असतो. रक्तजन्य प्रवाहिकेमध्यें रक्त पडतें. ह्या सर्व प्रवाहिका अति स्निग्ध व अति रुक्ष पदार्थ फार खाण्यानें होतात. त्यांचीं लक्षणें व आम, पक्व वगैरे अनुक्रम अतिसाराप्रमाणेंच जाणावा.

यस्योच्चारं विना मूत्रं सम्यग्वायुश्च गच्छति ।
दीप्ताग्नेर्लघुकोष्ठस्य स्थितस्तस्योदरामयः ॥ २५ ॥

ज्याला शौचाला न होतां लघवी होते, वायु चांगला सरतो, अग्नि प्रदीप्त होतो व कोठा हलका होतो, त्याचा अतिसार गेला म्हणून समजावें.

ज्वरातिसारयोरुक्तं निदानं च पृथक्पृथक् ।
तस्माज्ज्वरातिसारस्य तेन नात्रोदितं पुनः ॥ २६ ॥

ज्वर व अतिसार ह्यांचें निदान वेगळें वेगळें सांगितलें आहेच, म्हणून पुन्हा येथें सांगितलें नाहीं.

स्तम्भो वेपथुराध्मानमुष्णगात्रविपर्ययः ।
गतायुषामतीसारे व्यञ्जनान्युपलक्षयेत् ॥ २७ ॥

अंग ताठणें व कांपणें, पोट फुगणें, शरीर गार पडणें हीं लक्षणें ज्याचें आयुष्य संपलें आहे अशा अतिसारी मनुष्याला होतात.

तृट्कासशोषज्वरदाहमूर्छाहिक्कान्नविद्वेषणवान्तिशूलैः ।
युक्तोतिसारी स्मरतु प्रसह्य गोविन्द गोपाल गदाधरेति ॥२८॥

तहान, खोकला, घशाला कोरड, ज्वर, दाह, मूर्च्छा, उचकी, अन्नद्वेष, वांति, शूल ह्या लक्षणांनीं युक्त अशा अतिसारी मनुष्यानें गोविंद, गोपाळ, गदाधर ह्याप्रमाणें ईश्वराचें नामस्मरण करावें.

अतिसारचिकित्सा.

हितं लंघनमेवाऽऽदौ पूर्ववत्तेन मानवः ।
षडंगं वाऽथवा यूषं पिप्पल्यादिं प्रयोजयेत् ॥ १ ॥

ह्या अतिसारामध्येंही पूर्वीं ज्वरचिकित्सेंत सांगितल्याप्रमाणें लंघन हेंच प्रथम हितकारक आहे; अथवा षडंगयूष, पिप्पल्यादि यूष ह्यांची योजना करावी.

मुद्गयूषं रसं तक्रं धान्यजीरकसंयुतम् ।
षडंगं यूषमित्याहुः सैन्धवेन समन्वितम् ॥ २ ॥

अग्निसंदीपनं प्रोक्तं ग्रहणीदोषनाशनम् ।
अरोचके ज्वरे चैव श्रेष्ठमेव प्रवाहिके ॥ ३ ॥

मुगाचें कढण, मांसरस व ताक ह्यांत सैंधव, जिरें व धने ह्यांचें योग्य प्रमाणांत मिश्रण केलें म्हणजे त्याला षडंगयूष असें म्हणतात. हा अग्निदीपक, संग्रहणीचा दोषनाशक, अरुचि, ज्वर आणि प्रवाहिका (आमांशाची हगवण) ह्यांजवर फार उत्तम आहे.

बिल्वं च धान्यं च सजीरकं च पाठां च शुण्ठीं तिलसंयुतां च ।
पिष्ट्वा षडंगः स हितो नराणां यूषो ह्यतीसारहरः प्रदिष्टः ॥ ४ ॥

कोवळें बेलफळ, धने, जिरें, पहाडमूळ, सुंठ, तीळ ह्यांचें चूर्ण एकत्र करून वरीलप्रमाणें यूष तयार करावा. ह्यालाहि षडंगयूष म्हणतात. हा अतिसारनाशक आहे.

तृष्णापनयनी लघ्वी दीपनी मलशोधिनी ।
चिरे चैवातिसारे च यवागूः सर्वदा हिता ॥ ५ ॥

कण्हेरी ही तहाननाशक, हलकी, अग्निदीपक व मलशोधक असल्यामुळें फार दिवसांच्या अतिसारावर सर्वदा हितकारक आहे.

आमातिसारचिकित्सा.

आमपक्वक्रमं हित्वा नातिसारे क्रिया यतः ।
अतः सर्वातिसारेषु ज्ञेयं पक्वामलक्षणम् ॥ १ ॥
आमे विलंघनं शस्तमादौ पाचनमेव च ।
कार्यं वाऽनशनस्यान्ते सद्रवं लघु भोजनम् ॥ २ ॥
लङ्घनमेकं मुक्त्वा नान्यदस्तीह भेषजं बलिनाम् ।
समुदीर्णदोषनिचयं शमयति तत्पाचयत्येव ॥ ३ ॥

अतिसार आम आहे का पक्व आहे, हें जाणल्यावांचून ज्या अर्थी क्रिया करूं नये म्हणून सांगितलें आहे, त्या अर्थी अतिसार आम आहे कीं पक्व आहे, हें लक्षपूर्वक जाणावें. आमातिसारामध्यें आधीं लंघन व पाचन करावें, किंवा लंघन केल्यावर पातळ व हलकें अन्न खावें. बलवान मनुष्याच्या अतिसारावर लंघनावांचून दुसरें औषध नाहीं. कारण तें संचित झालेल्या दोषाला बाहेर काढून अतिसाराचें पाचन व शमन करितें.

ह्रीबेरशृङ्गबेराभ्यां मुस्तपर्पटकेन वा ।

मुस्तोदीच्यश्टृतं तोयं देयं चापि पिपासवे ॥ ४ ॥

वाळा, आलें (सुंठ), नागरमोथे, पित्तपापडा किंवा नागरमोथे व वाळा घालून शिजविलेलें पाणी अतिसारामध्यें तहान लागली असतां प्यावयास द्यावें.

न तु संग्रहणं दद्यात्पूर्वमामातिसारिणाम् ।
दोषो ह्यादौ वर्धमानो जनयत्यायमयान्बहून् ॥ ५ ॥
शोफपाण्ड्वामयप्लीहकुष्ठगुल्मोदरज्वरान् ।
दण्डकालसकाध्मानग्रहण्यर्शोगदांस्तथा ॥ ६ ॥

आमातिसारी मनुष्याला आधीं संग्राहक (मळ घट्ट करणारें) औषध देऊं नये. कारण आधीं संग्राहक औषध दिल्यानें वाढलेले दोष अनेक रोग उत्पन्न करितात. सूज, पांडुरोग, प्लीहा, कुष्ट, गुल्म, उदर, ज्वर, दंडकालसक, आध्मान, संग्रहणी व मूळव्याध हे विकार करितात.

डिम्भजः स्थविरो वाऽपि वातपित्तात्मकश्च यः ।
क्षीणधातुर्ज्वरार्तश्च बहुदोषोऽतिविस्रुतः ॥ ७ ॥
आमोऽपि स्तम्भनीयः स्यात्पाचनान्मरणं भवेत् ।
अतिसारे ज्वरे चैव रक्तपित्ते दृगामये ॥ ८ ॥
आदौ न प्रतिकुर्वीत व्याधिवेगो हि दुस्तरः ।
स्तोकं स्तोकं विबद्धं वा सशूलं योऽतिसार्यते ॥ ९ ॥
अभयापिप्पलीकल्कैः सुखोष्णैस्तं विरेचयेत् ।
दीप्ताग्निर्बहुदोषो यो विबन्धमतिसार्यते ॥ १० ॥
विडंगत्रिफलाकृष्णाकषायैस्तं विरेचयेत् ।
क्षुत्क्षामस्य विरिक्ते तु पेयां युंज्याद्विचक्षणः ॥ ११ ॥
भेषजैर्मारुतघ्नैश्च दीपनीयैश्च कल्पिताम् ।
योऽतिबद्धं प्रभूतं च पुरीषमतिसार्यते ॥ १२ ॥
तस्याऽऽदौ वमनं योज्यं पश्चाल्लङ्घनमुच्यते ।

बालकाला झालेला अतिसार, वृद्धाला झालेला अतिसार, वातपित्तात्मक अतिसार, धातुक्षीणाला झालेला अतिसार, ज्वरी मनुष्याला झालेला अतिसार, अतिशय दोषांमुळें अतिशय स्रवणारा अतिसार हे सर्व आम (अपक्व) जरी असले, तरी त्यांचें स्तंभन करावें. कारण त्यांचें पाचन केलें असतां मृत्यु येतो. अतिसार, ज्वर, रक्तपित्त, दृष्टीचे रोग ह्यांमध्यें आधीं प्रतिक्रिया (उपशमन)

देऊं नये. कारण आरंभीं व्याधीचा वेग अनिवार असतो. थोडा थोडा, खडा होऊन व शूलयुक्त असा मळ ज्याला अतिसारामध्यें होतो, त्याला हिरडे व पिंपळी ह्यांचा कल्क ऊन पाण्याशीं देऊन रेच करवावे. ज्याचा अग्नि प्रदीप्त असून दोष फार वाढलेले असतात, त्याला मळाचा खडा होऊन अतिसार होतो. त्याजवर वावडिंग, हिरडा, बेहडा, आवळकाठी व पिंपळी ह्यांचा काढा रेच होण्याकरितां द्यावा. अतिसारामध्यें रेच झाल्यावर भूक लागली असतां पेज द्यावी. ती पेज वातनाशक व अग्निदीपक औषधांनीं केलेली असावी. ज्याला अतिशय बांधीव व पुष्कळ असा मळ होतो, त्याला प्रथम वमन देऊन नंतर लंघन द्यावें.

देवदारुवचामुस्तं नागरातिविषाभयम् ।
सर्वाजीर्णप्रशमनं पेयमेतैः शृतं पयः ॥ १३ ॥

देवदार, वेखंड, नागरमोथे, सुंठ, अतिविष व बाळहिरडे हे जिन्नस घालून शिजविलेलें दूध सर्व प्रकारचें अजीर्ण मोडण्याकरितां प्यावें.

त्र्यूषणातिविषाहिंगुवचासौवर्चलाभयाः ।
पीत्वोष्णेनाम्भसा जह्यादामातीसारमुद्धतम् ॥ १४ ॥

सुंठ, मिरीं, पिंपळी, अतिविष, हिंग, वेखंड, पादेलोण, हिरडेदळ, ह्यांचें चूर्ण ऊन पाण्याच्या घोटाशीं द्यावें. तें वाढलेल्या आमातिसाराचा नाश करितें.

पाठाहिंग्वजमोदोग्रापञ्चकोलाब्दजं रजः ।
उष्णाम्बुपीतं सरुजं जयत्यामं ससैन्धवम् ॥ १५ ॥

पहाडमूळ, हिंग, ओवा, वेखंड, पिंपळी, पिंपळमूळ, चवक, चित्रक, सुंठ, नागरमोथे व सैंधव ह्यांचें चूर्ण ऊन पाण्याशीं घेतलें असतां शूलयुक्त आमातिसाराचा नाश होतो.

चित्रकं पिप्पलीमूलं वचा कटुकरोहिणी ।
पाठावत्सकबीजानि हरीतक्यो महौषधम् ॥ १६ ॥
एतदामसमुत्थानमतिसारं सवेदनम् ।
कफात्मकं सपित्तं च सवातं हन्ति वै ध्रुवम् ॥ १७ ॥

चित्रक, पिंपळमूळ, वेखंड, कुटकी, पहाडमूळ, इंद्रजव, हिरडे-

दळ व सुंठ ह्यांचें चूर्ण शूलयुक्त, वात पित्त किंवा कफ दोषापासून होणारा आमातिसार दूर करितें.

विश्वाभयाघनवचातिविषासुराह्व-
क्काथोऽथ विश्वजलदातिविषाश्रृतो वा ।
आमातिसारशमनः कथितः कषायः
शुण्ठीघनाप्रतिविषामृतवल्लिजो वा ॥ १८ ॥

सुंठ, हिरडेदळ, नागरमोथे, वेखंड, अतिविष व देवदार ह्यांचा काढा किंवा सुंठ, नागरमोथे, व अतिविष ह्यांचा काढा, अथवा सुंठ, नागरमोथे, अतिविष व गुळवेल ह्यांचा काढा आमातिसार-नाशक आहे.

धान्यवालकबिल्वाब्दनागरैः साधितं जलम् ।
आमशूलहरं ग्राहि दीपनं पाचनं परम् ॥ १९ ॥

धने, वाळा, बेलफळ, नागरमोथे व सुंठ ह्यांचा काढा आम व शूल ह्यांचा नाशक असून ग्राही, दीपक व पाचक आहे.

पित्ते धान्यचतुष्कं च शुण्ठीत्यागाद्वदन्ति हि ।

वरील धान्यपंचकापैकीं सुंठ खेरीज करून बाकीच्या चार औषधांचा (धान्यचतुष्काचा) काढा पित्तातिसारावर द्यावा.

चूर्णं किंचिद्घृताभ्यक्तं शुण्ठ्या एरण्डजैर्दलैः ।
वेष्टितं पुटपाकेन निपचेन्मन्दवह्निना ॥ २० ॥
तत उद्धृत्य तच्चूर्णं ग्राह्यं प्रातः सितासमम् ।
तेन यान्ति शमं पीडा आमातीसारसंभवाः ॥ २१ ॥
कुक्षिशूलामशूलघ्नं विबन्धाध्मातिसारजित् ।

सुंठीचें चूर्ण किंचित् तूप घालून मळून एरंडाच्या पानांत घालून पुटपाकानें भाजून काढून सकाळीं साखरेशीं द्यावें; म्हणजे आमातिसाराची पीडा दूर होते. आणि तें कुशींतील शूल, आमशूल, मलाचा अवरोध व अतिसार ह्यांचा नाश करितें.

सेवितं सगुडं बिल्वं बिल्वतुल्यपयोधरे ॥ २२ ॥

कोवळ्या बेलफळांतील गर व गूळ एकत्र करून खाल्ला असतां आमातिसार दूर होतो.

शुण्ठी जीरं सैन्धवं हिंगु जातीबीजं तद्वत्साहकारं प्रशस्तम् ।
पेयं सार्द्धैः साखरुडं सबिल्वं मार्कण्डार्यैर्योजितं सूक्ष्मचूर्णम् २३

दध्ना च वटिकां कुर्यात्तेनैव सह लेहयेत् ।
आमातीसारमान्द्यं च अरुचिं हन्ति च क्षणात् ॥ २४ ॥

सुंठ, जिरें, सैंधव, हिंग, जायफळ व आंब्यांतील कोय, शमीच्या झाडाची गांठ, कोवळें बेलफळ व भुईतरवड (सोनामुखी) ह्यांचें चूर्ण करून दह्यांत खलून गोळी करावी; व ती दह्याशींच द्यावी. म्हणजे आमातिसार, अग्निमांद्य व अरुचि ह्यांचा नाश होतो.

सत्त्वाशुण्ठ्योषणं भृंगीसमांशं सूक्ष्मचूर्णितम् ।
यथासात्म्यं सेवनीयं शीततोयानुपानतः ॥ २५ ॥
सशूलमामदोषं च नाशमायाति सत्वरम् ।
दध्योदनं पथ्यमत्र उचितं रोगशान्तये ॥ २६ ॥

सुंठ, मिरीं, भांग ह्यांचें समभाग चूर्ण करून जसें मानवेल त्या मानानें थंड पाण्याशीं सेवन करावें. म्हणजे शूलयुक्त आमदोषाचा नाश होतो. ह्याजवर रोगशांतीकारितां दहींभाताचें पथ्य करावें.

जयाखण्डं साखरूडं जीरकं दधिमिश्रितम् ।
आमातिसाररक्तं च हन्ति वेगेन कौतुकम् ॥ २७ ॥

भांग, खडीसाखर, शमीच्या झाडाची गांठ व जिरें ह्यांचें चूर्ण दह्याशीं घ्यावें, म्हणजे आमातिसार व रक्त ह्यांचा त्वरित नाश होतो.

शुण्ठीसातिविषाहिंगुमुस्ताकुटजचित्रकैः ।
चूर्णमुष्णाम्बुना पीतमामातिसारनाशनम् ॥ २८ ॥

सुंठ, अतिविष, हिंग, नागरमोथे, कुड्याची साल व चित्रकमूळ ह्यांचें चूर्ण ऊन पाण्याशीं घ्यावें. तें आमातिसाराचा नाश करितें.

हरीतकी प्रतिविषा सिन्धु सौवर्चलं वचा ।
हिंगु चेति कृतं चूर्णं पिबदुष्णेन वारिणा ॥ २९ ॥
आमातीसारशमनं ग्राहि चाग्निप्रदीपनम् ।

हिरडेदळ, अतिविष, सैंधेलोण, पादेलोण, वेखंड, हिंग, ह्यांचें चूर्ण ऊन पाण्याशीं घ्यावें. हें आमातिसाराचा नाश करितें. हें ग्राही व अग्निदीपक आहे.

पयस्युत्क्वाथ्य मुस्तानां विंशतिं त्रिगुणाम्भासि ॥ ३० ॥
क्षीरावशेषं तत्पीतं हन्त्यामं शूलमेव च ।

दूध व वीस नागरमोथे घेऊन दुधाच्या तिप्पट पाणी घालून

दूध शेष राहीपर्यंत काढा करून घ्यावा. तो आम व शूल यांचा नाश करितो.

धान्यनागरजः क्वाथः पाचनो दीपनस्तथा ॥ ३१ ॥
एरण्डमूलयुक्तश्च जयेदामानिलव्यथाम् ।

त्याचप्रमाणें धने, सुंठ व एरंडमूळ ह्यांचा काढाही दीपक व पाचक असून आमवातासंबंधी पीडा दूर करतो.

यवानी नागरोशीरधनिकातिविषाघनैः ॥ ३२ ॥
बालबिल्वद्विपर्णीभिर्दीपनं पाचनं भवेत् ।

ओवा, सुंठ, वाळा, धने, अतिविष, नागरमोथे, कोवळें बेलफळ, साळवण व पिठवण ह्यांचा काढा दीपक व पाचक आहे.

कलिङ्गातिविषाहिंगुपथ्यासौवर्चलं वचा ॥ ३३ ॥
शूलस्तम्भविबन्धघ्नं देयं दीपनपाचनम् ।

इंद्रजव, अतिविष, हिंग, हिरडेदळ, पादेलोण व वेखंड ह्यांचें चूर्ण शूल, मलाचा अवरोध व मळाची गांठ ह्यांचा नाश करितें. तें दीपक व पाचकही आहे.

निरामरूपं शूलार्तं लंघनाद्यैश्च कर्षितम् ॥ ३४ ॥
क्षारनागरचाङ्गेरीकोलदध्याम्लसाधितम् ।
सर्पिरच्छं पिबेद्वाऽपि शूलातीसारशान्तये ॥ ३५ ॥

अतिसारांतील आमदोष जाऊन तो निराम झाला असून शूल असेल व त्याला लंघन वगैरे देऊन त्याचें कर्षण केलें असेल तर त्याला—जवखार, सुंठ, चुका, बोरें, दहीं व लिंबाचा रस ह्या पदार्थांनीं तूप सिद्ध करून तें पिण्यास द्यावें.

पक्वातिसारचिकित्सा.

सलोध्रं धातकीबिल्वं मुस्ताम्रास्थिकलिंगकम् ।
पिबेन्माहिषतक्रेण पक्वातीसारनाशनम् ॥ १ ॥

लोध्र, धायटीचीं फुलें, बेलफळ, नागरमोथे, आंब्याची कोय, व कुड्याचें बीं, ह्यांचें चूर्ण म्हशीच्या ताकाशीं द्यावें. तें पक्वातिसाराचा नाश करितें.

---

१ सुंठीचें चूर्ण करून तें एरंडमूळाच्या रसांत भिजवून एरंडाच्या पानांत घालून पुटपाकानें पचन करावें. हें आमातिसार व शूल ह्यांचें नाशक आहे.

पद्मं समंगा मधुकं बिल्वजं तु शलाटु च ।
पिबेत्तण्डुलतोयेन सक्षौद्रमगदं परम् ॥ २ ॥

कमळ, लाजाळू, जेष्ठमध, व कोवळें बेलफळ ह्यांचें चूर्ण मधासह तांदुळाच्या धुवणांतून द्यावें. हें उत्तम प्रकारचें आरोग्यकारक आहे.

कुटजातिविषाचूर्णं मधुना सह लेहितम् ।
चिरोत्थितमतीसारं पक्वं पित्तास्रजं जयेत् ॥ ३ ॥

कुडयाची साल व अतिविष ह्याचें चूर्ण मधाशीं द्यावें. तें फार दिवसांच्या रक्तपित्तजन्य पक्वातिसाराचा नाश करितें.

लघुगंगाधरचूर्ण.[2]

मोचरसमुस्तनागरपाठारलुधातकीकुसुमैः ।
चूर्णं मथितसमेतं रुणद्धि गंगाप्रवाहमपि ॥ ४ ॥

मोचरस, नागरमोथे, सुंठ, पहाडमूळ, टेंटुमूळ, व धायटीचीं फुलें ह्यांचें चूर्ण निर्जळ दह्याशीं घेतलें असतां तें गंगाप्रवाहासारख्या अतिसाराचेंही शमन करितें. ह्याला लघु गंगाधर चूर्ण असें म्हणतात.

वृद्धगंगाधरचूर्ण.[3]

मुस्तमोचरसलोध्रधातकीपुष्पबिल्वगिरिकौटजैः फलैः ।
चूर्णितैः सगुडतक्रसेवितैर्निम्नगाजलरयोऽपि रुध्यते ॥ १ ॥

---

१. पहाडमूळ किंवा अंबाडी, धायटी, लोध्र, लाजाळू, कमळकेसर, जेष्ठमध, टेंटुमूळ व कमळ हा गण पक्वातिसाराचा नाशक आहे. (लेखी प्रतीवरून)

२. लाजाळू, धायटीचीं फुलें, मंजिष्ट व लोध्र, ह्यांचें चूर्ण; मोचरस (सावरीचा डिंक), लोध्र व डाळिंबाच्या फळाची साल ह्यांचें चूर्ण; आंब्याच्या कोईंतील बी, लोध्र, बेलफळ व गव्हला ह्यांचें चूर्ण; आणि जेष्ठमध, सुंठ व टेंटूच्या मुळाची साल ह्यांचें चूर्ण, हीं चार चूर्णें पक्वातिसारनाशक आहेत. ह्या चार चूर्णांपैकीं कोणतेंही एक चूर्ण मध व तांदुळाचें धुवण ह्यांजबरोबर योजावें.

३. वृद्धगंगाधरचूर्णाचा दुसरा पाठ लेखी प्रतींत आहे तो असा---
नागरमोथे, टेंटूची मुळी, सुंठ, धायटी, लोध्र, वाळा, कोवळें बेलफळ, मोचरस, पहाडमूळ, इंद्रजव, कुड्याची साल, आंब्याची कोय, लाजाळु व अतिविष ह्यांचें चूर्ण करून तें मध व तांदुळाचें धुवण ह्यांशीं द्यावें; म्हणजे

नागरमोथे, मोचरस, लोध्र, धायटीचीं फुलें, बेलफळ व इंद्रजव ह्यांचें चूर्ण करून तें ताक व गुळ ह्यांशीं द्यावें; म्हणजे नदीच्या प्रवाहासारख्या अतिसाराचाही नाश होतो.

अंकोलमूलकल्कः सक्षौद्रस्तण्डुलाम्बुना पीतः।
सेतुरिव वारिवेगं झटिति निरुन्ध्यादतीसारम्॥ १॥

अंकोलाच्या मुळ्यांचा कल्क मध व तांदुळाचें धुवण ह्यांशीं द्यावा. ज्याप्रमाणें धक्का पाण्याचा वेग आवरून धरतो, त्याप्रमाणें तो अतिसाराला त्वरित आवरून धरतो.

अजमोदामोचरसं सशृंगबेरं सधातकीकुसुमम्।
करमथितसंप्रयुक्तं गंगामपि वाहिनीं रुन्ध्यात्॥ २॥

ओवा, मोचरस, सुंठ व धायटीचीं फुलें ह्यांचें चूर्ण ताकाशीं द्यावें. तें नदीप्रवाहासारख्या अतिसाराचा नाश करितें.

विश्वजीरकसिन्धूत्थं हिंगुजातीफलानि च।
साम्रास्थिशंखखण्डं च दध्नाम्लेन प्रपेषयेत्॥ ३॥
ईषदंगारकैर्भृष्टा वटिका कर्षसंमिता।
पक्वापक्वमतीसारं सशूलं ग्रहणीगदम्।
चिरोत्थमचिरोत्थं च नाशयेन्नात्र संशयः॥ ४॥

सुंठ, जिरें, सैंधव, हिंग, जायफळ, आंब्याची कोय व शंखाचे तुकडे ह्यांचा दह्यामध्यें खल करावा. नंतर किंचित् निखाऱ्यावर भाजून एक एक तोळ्याच्या गोळ्या कराव्या. ह्या पक्व अथवा अपक्व व शूलयुक्त अशा अतिसाराचा व संग्रहणीचा नाश करितात; तसेंच नुकताच झालेला अथवा फार दिवसांचा अतिसार व संग्रहणी रोग ह्यांचाही नाश करितात, ह्यांत संशय नाहीं.

वटप्ररोहं संपिष्टं श्लक्ष्णं तण्डुलवारिणा।
तं पिबेत्तक्रसंयुक्तमतीसारप्रशान्तये॥ ५॥

वडाचे अंकुर तांदुळाच्या धुवणांत वाटून अतिसार बरा होण्याकरितां ताकांत कालवून प्यावें.

प्रवाहिका, सर्व प्रकारचे अतिसार व संग्रहणी ह्यांचा त्वरित नाश होतो. हें वृद्धगंगाधरचूर्ण नदीप्रवाहासारख्या अतिसाराचाही रोध करितें.

वातातिसारचिकित्सा.*

कपित्थबिल्वचांगेरीतक्रदाडिमसाधिता ।
ग्राहिणी पाचनी पेया वाते वा पाञ्चमूलिका ॥ १ ॥

कवठ, बेल, चुका, ताक व डाळिंब ह्या द्रव्यांनीं तयार केलेली पेज ग्राहक व पाचक असून वातजन्य अतिसारावर पथ्यकारक आहे; किंवा साळवळ, पिटवण, रिंगणमूळ, डोरलीमूळ व सराट्याचें मूळ, ह्यांच्या काढ्यामध्यें तयार केलेली पेज ही वातजन्य अतिसारावर हितकारक आहे

पञ्चमूलबलाविश्वाधान्यकोत्पलबिल्वजा ।
वातातिसारिणे देया सकुनाऽन्यतमेन वा ॥ २ ॥

पंचमूळें, चिकणामूळ, सुंठ, धणे, कमळ, व बेलफळ हे पदार्थ घालून केलेली पेज सूक्त म्हणजे अम्लद्रव्य घालून वातातिसारावर द्यावी.

वचा प्रतिविषा मुस्ता बीजानि कुटजस्य च ।
श्रेष्ठो वातातिसारे च योगोऽयं वैद्यपूजितः ॥ ३ ॥

वेखंड, आतिविष, नागरमोथे व इंद्रजव ह्यांचें चूर्ण वातातिसारावर फार उत्तम व वैद्याला मान्य असें आहे.

पूतिकं मागधी शुण्ठी बला धान्यं हरीतकी ।
पक्वाम्बुना पिबेत्सामवातातीसारशान्तये ॥ ४ ॥

करंजाची साल, सुंठ, पिंपळी, चिकणामूळ, धने व हिरडेदळ ह्यांचें चूर्ण वातजन्य आमातिसाराच्या शांतीकरितां ऊन पाण्यांत घालून द्यावें.

पित्तातिसारचिकित्सा.

आमान्वयमतीसारं पैत्तिकं लंघनैर्जयेत् ।
लंघितस्य यथासात्म्यं यवागूमण्डतर्पणैः ॥ १ ॥

---

* पक्वातिसारावरील पुढील दोन प्रयोग लेखी प्रतींतून घेतले आहेत.

(१) गंगाधरकाथ—तांदुळजा, जांभळीचीं पानें, डाळिंबाचीं पानें, शिंगाड्याचीं पानें, कोवळें बेलफळ, वाळा, नागरमोथे व सुंठ ह्यांचा काढा नदीसारख्या वाहणाऱ्या अतिसाराचा नाश करितो.

(२) पहाडमूळ व आंब्याची कोय गाईच्या दह्यांत वाटून खावी, म्हणजे दाहयुक्त अतिसाराचा नाश होतो.

ज्या पित्तातिसारामध्यें आमाचा संबंध आहे त्या अतिसाराला प्रथम लंघनानें जिंकावें, आणि लंघन दिल्यानंतर मानबल त्या मानानें कण्हेरी व मंड ह्यांचें तर्पण द्यावें.

शृतचन्दनमुस्ताभ्यां पटोलोदीच्यनागरैः ।
पेयामम्लामतक्रां वा पाचनीं ग्राहिणीं पिबेत् ॥ २ ॥

रक्तचंदन, नागरमोथे, पडवळ, वाळा व सुंठ ह्यांची पेज आम्लरस किंवा कच्चें ताक घालून द्यावी. ती पाचक व ग्राही (मळाला घट्ट करणारी) आहे.

धान्योदीच्यशृतं तोयं तृष्णादाहातिसारवान् ।
ताभ्यामेव सपाठाभ्यां सिद्धमाहारमाचरेत् ॥ ३ ॥

धने व वाळा हीं द्रव्यें घालून कढविलेलें पाणी व धने, वाळा आणि पहाडमूळ ह्यांच्या काढ्यांत तयार केलेलें अन्न तहान व दाह यांनीं युक्त अतिसारी मनुष्याला द्यावें.

बिल्वशक्रयवाम्भोदवालकातिविषाकृतः ।
कषायो हन्त्यतीसारं सामं पित्तसमुद्भवम् ॥ ४ ॥

बेलफळ, इंद्रजव, नागरमोथे, वाळा व अतिविष ह्यांचा काढा पित्तजन्य आमातिसाराचा नाश करितो.

रसाञ्जनं प्रतिविषं कुटजस्य फलत्वचौ ।
धातकी शृंगबेरं च पाययेत्तण्डुलाम्बुना ॥ ५ ॥
माक्षिकेण युतं हन्यात्पित्तातीसारमुल्बणम् ।
मन्दं संदीपयेदग्निं शूलं चाऽऽशु निवर्तयेत् ॥ ६ ॥

रसांजन, अतिविष, कुड्याची साल, इंद्रजव, धायटीचीं फुलें व सुंठ यांचें चूर्ण तांदुळाचें धुवण व मध ह्यांच्याशीं दिलें असतां वाढलेल्या पित्तातिसाराचा नाश करितें; मंदाग्नीचें दीपन करितें; आणि (अतिसारामुळें होणाऱ्या) शूळाचा त्वरित नाश करितें.

मधुकं कट्फलं लोध्रं दाडिमस्य फलत्वचम् ।
पित्तातिसारे मध्वक्तं पाययेत्तण्डुलाम्बुना ॥ ७ ॥

जेष्टमध, कायफळ, लोध्र, व डाळिंबाच्या फळाची साल यांचें चूर्ण पित्तातिसारावर तांदुळाचें धुवण व मध यांशीं द्यावें.

समंगा धातकीपुष्पं बिल्वं सौवर्चलं बिडम् ।
सक्षौद्रं दाडिमं चैव पीतं तण्डुलवारिणा ॥ ८ ॥

चूर्णं पित्तातिसारघ्नं शूलं चाऽऽशु च निर्हरेत् ।

काजाकु, धायटीचीं फुलें, बेलफळ, पादेलोण, बिडलोण व कोवळें डाळिंब ह्यांचें चूर्ण तांदुळाचें धुवण व मध ह्यांशीं द्यावें. तें पित्तातिसार व शूल ह्यांचा नाश करतें.

सक्षौद्रातिविषां पिष्ट्वा वत्सकस्य फलं त्वचम् ॥ ९ ॥
तण्डुलोदकसंयुक्तं पेयं पित्तातिसारनुत् ।

अतिविष, कुडयाची साल व इंद्रजव ह्यांचें चूर्ण मध व तांदुळाच्या धुवणाशीं द्यावें. तें पित्तातिसाराचा नाश करितें.

कट्फलातिविषाम्भोदवत्सकं नागरान्वितम् ॥ १० ॥
शृतं पित्तातिसारघ्नं पातव्यं मधुसंयुतम् ।

कायफळ, अतिविष, नागरमोथे, कुडयाची साल व सुंठ ह्यांचा काढा मध घालून द्यावा. तो पित्तातिसाराचा नाश करितो.

पलं[1] वत्सकसंसिद्धं चतुर्गुणजले घृतम् ॥
पित्तातिसारे भिषजा देयं दीपनपाचनम् ॥ ११ ॥

चार तोळे कुडयाची साल, सोळा तोळे तूप व चौसष्ट तोळे पाणी ह्यांनीं सिद्ध केलेलें तूप पित्तातिसारनाशक असून दीपक व पाचक आहे.

रक्तातिसारचिकित्सा.

जम्ब्वाम्रामलकीनां च पल्लवैश्च रसो जयेत् ।
मध्वाज्यक्षीरसंयुक्तो रक्तातीसारनाशनः ॥ १ ॥

जांभळ, आंबा व आवळी ह्या झाडांच्या पानांचा रस, तूप, मध व दूध घालून द्यावा; म्हणजे रक्तातिसाराचा नाश होतो.

गुडेन खादयेद्बिल्वं रक्तातीसारनाशनम् ।
आमशूलविबन्धघ्नं कुक्षिरोगविनाशनम् ॥ २ ॥

कोवळ्या बेलफळाचा गर गुळाशीं खावा. तो रक्तातिसारनाशक असून आमशूल, मलावरोध व कुशींतील रोग ह्यांचा नाशक आहे.

कुटजातिविषामुस्तं वालकं लोध्रचन्दनम् ।
धातकी दाडिमं पाठा क्वाथं क्षौद्रयुतं पिबेत् ॥ ३ ॥

---

१. 'पलं' ह्या ठिकाणीं लेखी प्रतींत 'धान्य' असा पाठ आहे व तो बरा दिसतो. त्याप्रमाणें म्हटलें म्हणजे "धने व कुडयाची साल ह्यांनीं तूप सिद्ध करावें" असें होतें.

दाहे रक्ते सशूले च ह्यामरोगे च दुस्तरे ।
कुटजाष्टमिदं ख्यातं सर्वातीसारनाशनम् ॥ ४ ॥

कुडा, अतिविष, नागरमोथे, वाळा, लोध्र, चंदन, धायटीचीं फुलें, डाळिंब व पहाडमूळ ह्यांचा काढा मध घालून घ्यावा. म्हणजे दाह व शूलयुक्त रक्त, आम व सर्व अतिसार ह्यांचा नाश होतो. ह्याला कुटजाष्टक असें म्हणतात.

सवत्सकः सातिविषः सबिल्वः सोदीच्यमुस्तश्च कृतः कषायः ।
सामे सशूले च सशोणिते च चिरप्रवृत्तेऽपिहितोऽतिसारे ॥ ५ ॥

कुडा, अतिविष, बेलफळ, वाळा व नागरमोथे, ह्यांचा काढा आम, शूल व रक्त ह्यांसह फार दिवसांच्या अतिसाराचा नाश करतो.

लघुचेतकिजीरके समे मृदुभृष्टे च सुचूर्णितेऽर्पिते ।
सह तण्डुलवारिणा मतेऽतिसृतिघ्ने इति सिद्धयोग एषः ॥ ६ ॥

बाळहिरडे व जिरें समभाग घेऊन थोडे (तुपांत) भाजून त्यांचें चूर्ण करून तें तांदुळाच्या धुवणाशीं घ्यावें, म्हणजे अतिसाराचा नाश होतो. हा सिद्धयोग आहे.

अयि कन्दुकनिन्दकस्तनि प्रमदारूपमदापहारिणि ।
रुधिरातिसृतौ कषायकः समधुर्दाडिमवत्सकत्वचः ॥ ७ ॥

हे सुंदरी! रक्तातिसारावर कोवळें डाळिंब व कुडयाची साल ह्यांचा काढा करून द्यावा.

चन्दनं विमलतण्डुलाम्बुना संयुतं मधुयुतं सितान्वितम् ।
तृड्विखण्डनमसृग्विखण्डनं खण्डनं प्रचुरदाहमोहयोः ॥८॥

रक्तचंदन तांदळाच्या धुवणांत उगाळून त्यांत मध घालून घ्यावें; म्हणजे तहान, रक्तातिसार (रक्तस्राव) आणि अत्यंत दाह व मोह ह्यांचा नाश होतो.

ह्रीबेरातिविषामुस्तं बिल्वधान्यकवत्सकम् ।
समङ्गाधातकीलोध्रं विश्वं दीपनपाचनम् ॥ ९ ॥
हन्त्यरोचकपिच्छामं विबन्धं चातिवेदनम् ।
सशोणितमतीसारं सज्वरं वाऽथ विज्वरम् ॥ १० ॥

वाळा, अतिविष, नागरमोथे, बेलफळ, धने कुडयाची साल, लाजाळू, धायटी, लोध्र व सुंठ ह्यांचें चूर्ण अग्निदीपक, पाचक व अरुचि, आम, मलावरोध, अतिवेदनायुक्त व रक्तयुक्त अतिसार व

ज्वरयुक्त अथवा ज्वररहित अतिसार ह्यांचें नाशक आहे.

बिल्वं छागपयःसिद्धं सितामोचरसान्वितम् ।
कलिंगचूर्णसंयुक्तं रक्तातीसारनाशनम् ॥ ११ ॥

बेलफळाचा गर घालून सिद्ध केलेल्या शेळीच्या दुधांत साखर, मोचरस व इंद्रजव ह्यांचें चूर्ण घालून द्यावें; म्हणजे रक्तातिसाराचा नाश होतो.

रसांजनं सातिविषं कुटजस्य फलत्वचम् ।
धातकीशृङ्गवेरं च पिबेत्तण्डुलवारिणा ॥ १२ ॥
क्षौद्रेण युक्तं तद्देयं रक्तातीसारमुल्बणम् ।
जलमष्टगुणं दत्त्वा पलं कण्डिततण्डुलान् ।
धावयित्वा ततो देयं तण्डुलोदककर्मणि ॥ १३ ॥

रसांजन, अतिविष, कुडाची साल, इंद्रजव, धायटीचीं फुलें व सुंठ यांचें चूर्ण तांदुळाचें धुवण, चार तोळे सडलेले तांदूळ घेऊन त्यांत आठपट पाणी घालून चांगले कुसकरून तांदूळ धुवावेत, आणि तें धुवण व मध ह्यांतून द्यावें; म्हणजे मोठ्या वाढलेल्या रक्तातिसाराचा नाश होतो.

सहरीतकीप्रतिविषारुचकं सवचं सहिंगु सकालिङ्गयुतम् ।
इति तत्कलिङ्गयुतषट्कमिदं रुधिरातिसारगुदशूलहरम् ॥१४॥

हिरडेदळ, अतिविष, पादेलोण, वेखंड, हिंग व इंद्रजव यांचें चूर्ण करावें. याला "**कलिंगषट्क**" असें म्हणतात. हें रक्तातिसार व गुदशूल यांचा नाश करितें

पिच्छाबस्ति.

अल्पाल्पं बहुशो रक्तं सशूलमुपवेश्यते ।
यदा वायुर्विबद्धश्च पिच्छाबस्तिस्तदा हितः ॥ १ ॥

थोडें थोडें व शूलयुक्त परंतु फार रक्त पडतें व वायूचा अवरोध होतो, त्या वेळीं पिच्छाबस्ति द्यावा.

शाल्मलेरार्द्रपुष्पाणि पुटपाकीकृतानि च ।
संकुट्योलूखले सम्यग्गृह्णीयात्पयसि शृते ॥ २ ॥
गृहीत्वा च पलं तस्य त्रिपलं घृततैलयोः ।
युक्तं मधुककल्केन माक्षिकत्रिपलेन च ॥ ३ ॥
तैलाक्तवपुषो दद्याद्बस्तिं प्रत्यागते रसे ।

भोजयेत्पयसा वाऽपि पित्तातीसारपीडितम् ॥ ४ ॥

शेवरीचीं ओलीं (ताजीं) फुलें घेऊन तीं पुटपाकानें उकडून काढावीं. नंतर तीं वाटून दुधांत टाकून शिजवावीं व तें दूध चार तोळे घ्यावें. आणि तूप व तेल दोन्ही मिळून बारा बारा तोळे, जेष्टमधाचा कल्क एक तोळा व मध बारा तोळे हे सर्व एकत्र करून गुदाला तेल लावून त्या मिश्रणाचा बस्ति द्यावा. बस्ति परत आल्यावर ज्याला पित्तातिसार असेल त्याला दुधाशीं जेवूं घालावें.

पल्लवाञ्जर्जरीकृत्य शिंशपाकोविदारयोः ।
पचेद्यवांश्च स क्काथो घृतक्षीरसमन्वितः ॥ १ ॥
पिच्छाबस्तिः प्रयोक्तव्यः क्षतक्षीणबलावहः ।
पिच्छास्रुतौ गुदभ्रंशे प्रवाहणरुजासु च ॥ २ ॥

शिसवा व कांचन यांचा पाला आणून कुटून त्यांत सातु मिसळून त्यांचा काढा करावा. तो काढा तूप व दूध यांचा पिच्छाबस्ति द्यावा. हा व्रणानें क्षीण झालेल्या मनुष्याला किंवा उरःक्षती मनुष्याला बलदायक आहे. तसेंच स्त्रियांचा पिच्छास्राव, गुदभ्रंश व वेणा येणें (मुरडा–प्रवाहणरुजा) ह्यांजवरही हितकारक आहे.

अंग बाहेर येणें.

गुदो बहुभिरुत्थानैर्यस्य पित्तेन पच्यते ।
सिञ्चयेत्तं सुशीतेन पटोलमधुकाम्बुना ॥ १ ॥
रक्तातिसारिणामाजं पयः सक्षौद्रशर्करम् ।
गुदप्रक्षालने सेके प्रशस्तं पानभोजने ॥ २ ॥

अतिशय रेच झाल्यामुळें पित्त वाढून गुद पिकतें, त्याला पडवळ व जेष्ठमध ह्यांचा काढा करून तो थंड झाला म्हणजे त्यानें वरचेवर सेचन करावें (त्यानेंच धुवावें). रक्तातिसार झालेल्या मनुष्याला शेळीचें दूध मध व साखर घालून पिण्याला द्यावें, व गुदप्रक्षालन व सेचनही त्यानेंच करावें.

स्वेदोऽथ मूषिकामांसैस्तद्वसाभ्रक्षणं तथा ।
गुदनिःसरणे शस्तं चाङ्गेरीघृतमुत्तमम् ॥ ३ ॥

अंग बाहेर आलें असतां उंदराचें मांस उकडून त्यानें शेकावें;

किंवा उंदराच्या चर्बीनें माखावें. तें अंग बाहेर येतें त्यावर प्रशस्त असून चांगेरीघृत[1] त्याजवर उत्तम आहे.

शम्बूकमांसं सुस्विन्नं सतैललवणान्वितम् ।
ईषद्घृतेन चाभ्यक्तं स्वेदयेत्तेन यत्नतः ।
गुदभ्रंशमशेषेण नाशयेत्क्षिप्रमेव च[2] ॥ ४ ॥

कोरड्याचें मांस उकडून तेल व मीठ घालून गुदाला किंचित् तूप लावून त्यानें शेकावें; म्हणजे गुदभ्रंशाचा त्वरित नाश होतो.

कफातिसारचिकित्सा.

श्लेष्मातिसारे प्रथमं हितं लङ्घनपाचनम् ।
योज्यश्चामातिसारघ्नो यथोक्तो दीपनो गणः[3] ॥ १ ॥

कफजन्य अतिसारावर प्रथम लंघन व पाचन द्यावें, नंतर दीपक व आमातिसारनाशक म्हणून मागें आमातिसारचिकित्सा-प्रकरणांत सांगितलेल्या गणाची योजना करावी.

पूतिकव्योषबिल्वाग्निपाठादाडिमहिङ्गुभिः ।
भोजयेत्संस्कृतैर्यूषैः श्लेष्मातीसारपीडितम् ॥ २ ॥

करंजसाल, बेलफळ, चित्रक, पहाडमूळ, कोवळें डाळिंब, व हिंग हीं द्रव्यें घालून तयार केलेल्या मुगाच्या वगैरे कढणाबरोबर कफातिसारी मनुष्यानें भोजन करावें.

गोकण्टकगुहाव्याघ्रीकषायं सुशृतं पिबेत् ।
आमश्लेष्मातिसारघ्नं दीपनं पाचनं परम्[4] ॥ ३ ॥

---

१ चुक्याच्या पाल्याचा रस, बोरांचा काढा, दहीं हे तुपाच्या चौपट; जवखार व सुंठ ह्यांचा कल्क तुपाच्या चवथाई घालून तूप सिद्ध करावें व तें पिण्यास द्यावें. तें गुदभ्रंशाचा नाश करितें. कोवळीं कमळाचीं पानें साखरेशीं खाणाराचें केव्हांही अंग बाहेर येत नाहीं.

२ दिवसमावळीच्या मुळ्यांचा कल्क दुधाशीं घेऊन दुधाशीं भोजन केलें असतां रक्तातिसाराचा नाश होतो. तसेंच भांगेच्या कल्कानें तयार केलेलें तूप घेतलें असतांही रक्तातिसाराचा नाश होतो.

३ गाईचें दूध, लोणी, मध व खडीसाखर एकत्र करून घ्यावें. ह्याला नवनीतावलेह म्हणतात. हा रक्तातिसार बंद करण्याविषयीं फार उत्कृष्ट आहे.

४ चवक, अतिविष, कोष्ट, कोवळें बेलफळ, सुंठ, कुड्याची साल, इंद्रजव, बाळहिरडे, ह्यांचा काढा कफजन्य वांति व ओकारी ह्यांचा नाशक आहे.

गोखरूं, साळवण व रिंगणमूळ, ह्यांचा काढा करून प्यावा. तो आमकफजन्य अतिसाराचा नाशक असून पराकाष्ठेचा दीपक व पाचक आहे.

पथ्या सौवर्चलं हिङ्गु सैन्धवातिविषा वचा ।
आमातिसारं सकफं पीतमुष्णाम्बुना जयेत् ॥ ४ ॥

बाळहिरडे, पादेलोण, हिंग, सेंधेलोण, अतिविष व वेखंड ह्यांचें चूर्ण ऊन पाण्याशीं घ्यावें. तें कफयुक्त आमातिसाराचें नाशक आहे.

त्रिदोषज अतिसाराची चिकित्सा.

समङ्गाऽतिविषा मुस्ता विश्वं ह्रीबेरधातकी ।
कुटजत्वग्दलैर्बिल्वैः क्वाथः सर्वातिसारनुत् ॥ १ ॥

लाजाळू, अतिविष, नागरमोथे, सुंठ, धायटीचीं फुलें, कुड्याची साल, इंद्रजव, बेलफळ ह्यांचा काढा सर्व अतिसाराचा नाश करतो.

चतुःसम मोदक.

अभया नागरं मुस्तं गुडेन सह योजितम् ।
चतुःसमेयं गुटिका त्रिदोषघ्नी प्रकीर्तिता ॥ २ ॥
आमातिसारमानाहं सविबन्धं विषूचिकाम् ।
कृमीनरोचकं हन्याद्दीपयत्याशु चानलम् ॥ ३ ॥

हिरडेदळ, सुंठ, नागरमोथे व गूळ ह्यांच्या गोळ्या करून ठेवाव्या. ह्यांना चतुःसम मोदक म्हणतात. ह्या गोळ्या त्रिदोषनाशक आहेत. ह्या आमातिसार, आनाह (पोट फुगणें), मळाचा खडा धरणें व विषूचिका, कृमि व अरुचि ह्यांचा नाश करून जठराग्नि प्रदीप्त करितात.

अवेदनं सुसंपक्वं दीप्ताग्नेः सुचिरोत्थितम् ।

बावडिंग, वेखंड, बेलफळांतील गर, धने व कायफळ ह्यांचा काढा कफातिसारावर द्यावा. तसेंच हिंग, पादेलोण, सुंठ, मिरीं, पिंपळी, बाळहिरडे, अतिविष, वेखंड ह्यांचें चूर्ण ऊन पाण्याशीं घ्यावें. तें कफातातिसाराचें नाशक आहे. (लेखी प्रतीवरून)

१ मूळामध्यें "कुटजत्वग्दलैः" ह्या ठिकाणीं लेखी प्रतींतून "कुटजत्वक्फलैः" असा पाठ आहे व तोच बरोबर आहे असें वाटल्यावरून "फलैः" ह्या शब्दाचा अर्थ इंद्रजव असा केला आहे.

नानावर्णमतीसारं पुटपाकैरुपाचरेत् ॥ १ ॥

वेदनारहित, पक्क, फार दिवसांचा आणि अनेक वर्णांनीं युक्त अशा अतिसारावर पुटपाकाची योजना करावी.

स्निग्धं घनं कुटजवल्कमजतुन्जग्ध-
मादाय तत्क्षणमतीव च प्रेषयित्वा ।
जम्बूपलाशपुटतण्डुलतोयसिक्तं
बद्धं कुशेन च बहिर्घनपङ्कलिप्तम् ॥ २ ॥
सुस्विन्नपिष्टमुपपीड्य रसं गृहीत्वा
क्षौद्रेण युक्तमतिसारवते प्रदद्यात् ।
कृष्णात्रिपुत्रमतपूजित एष योगः
सर्वातिसारहरणे स्वयमेव राजा ॥ ३ ॥

दळदार, स्निग्ध (बुळबुळीत), न किडलेली अशी ताजी ओली कुडयाची साल आणून अतिशय बारीक वाटून तांदळाच्या धुवणांत मळून गोळा करावा. नंतर पळसाच्या व जांभळाच्या पानांत ठेवून वर गवताच्या (दर्भाच्या) ओल्या काड्यांचें वेष्टण करून बाहेरून चिखलाचा (अगर कणकीचा) जाड लेप करावा; व निखाऱ्यांत ठेवून उकडावा. चांगला उकडून निघाल्यावर काढून घेऊन त्याचा पिळून रस काढावा आणि त्यांत मध घालून अतिसार झालेल्या मनुष्याला द्यावा. हा योग कृष्णात्रि ऋषीच्या पुत्राला (कृष्णात्रेयाला) मान्य असून सर्व प्रकारचे अतिसाराचा नाश करणारा हा राजा आहे.

---

१ त्रिदोषजन्य अतिसारामध्यें तंद्रा, मोह, तोंडाला कोरड, अनेक रंगाचा मल होणें, तहान व सर्व दोषांचीं लक्षणें होतात. हा कष्टसाध्य आहे, तथापि बाल, वृद्ध व स्त्रिया ह्यांना झाला असतां तो असाध्य आहे.

पहाडमूळ, काडेचिराईत, वाळा, कुडयाची साल आणि इंद्रजव ह्यांचा काढा सर्व प्रकारचे अतिसार व ओकारी ह्यांचा नाश करतो. तसेंच शूलयुक्त व उपद्रवयुक्त अतिसार, श्वास व दुस्तर खोकला ह्यांचा नाश करतो. येथें जरी मोघम 'पंचमुळें' असें म्हटलें आहे, तरी पित्तातिसारामध्यें लहान पंचमुळें व कफातिसारामध्यें व वातातिसारामध्यें मोठीं पंचमुळें योजावीं.

(लेखी प्रतीवरून)

श्लेष्मपित्तातिसारचिकित्सा.

समङ्गा धातकीपुष्पमाम्रास्थि नागकेशरम् ।
बिल्वं मोचरसं लोध्रं कुटजस्य फलत्वचम् ॥ १ ॥
पिबेत्तण्डुलतोयेन कषायं कल्कमेव वा ।
श्लेष्मपित्तातिसारघ्नं रक्तं वाऽथ नियच्छति ॥ २॥

लाजाळु, धायटीचीं फुलें, आंब्याची कोय, नाकेशर, बेलफळ, मोचरस, लोध्र व कुडयाची साल ह्यांचा काढा अगर त्यांचाच तांदुळाच्या धुवणांत कल्क करून प्यावा. हा कफपित्तातिसार व शौचावाटे पडणारें रक्त ह्यांचा नाश करतो.

वातश्लेष्मातिसारचिकित्सा.

रसैः स्वादुकटुप्रायैरुभौ वातकफौ नृणाम् ।
कुरुतस्तावतीसारं क्रुद्धौ वह्निं निहत्य च ॥ १॥
द्रवं सफेनं पुरीषं तन्वामं मदगन्धिकम् ।
सशब्दवेदनावन्तं तत्र संपरिपच्यते ॥ २ ॥
नित्यं गुडगुडायन्तं तन्द्रामूर्छाश्रमक्लमैः ।
प्रसक्तं सक्थिकट्यूरुजानुपृष्ठास्थिशूलिनः ॥ ३ ॥
धान्यपञ्चकसंसिद्धो धान्यविश्वकृतोऽथवा ।
आहारो भिषजा योज्यो वातश्लेष्मातिसारिणे ॥ ४ ॥
वातातिसारे यच्चोक्तं पाचनं ग्राहि भेषजम् ।
तदत्रापि प्रयुंजीत संचिन्त्य कफमारुतौ ॥ ५ ॥

गोड व तिखट रसात्मक पदार्थ अतिशय खाल्ले असतां वात व कफ हे दोष कुपित होऊन जठराग्नीला मंद करून अतिसार उत्पन्न करितात. ह्या अतिसारामध्यें पातळ, फेंसयुक्त, पुष्कळ, आममिश्रित, मदगंधी, वेदना व शब्द यांनीं युक्त असा मळ तयार होऊन पडतो. पोटांत नित्य गुडगुडतें. तंद्रा, मूर्च्छा, श्रम व थकवा हे विकार होतात आणि पिंढऱ्या, कंबर, मांड्या, गुडगे, पाठ ह्या ठिकाणचीं हाडें फार दुखतात. ह्याजवर धान्यपंचकानें[1] अथवा धने व सुंठ ह्यांच्या काढ्यामध्यें तयार केलेलें अन्न पथ्याला द्यावें. वाताति-

---

१. धने, वाळा, नागरमोथे, सुंठ व कोवळें बेलफळ ह्या पांच द्रव्यांच्या समूहाला धान्यपंचक अथवा पंचधान्य असें म्हणतात.

सारावर जीं ग्राहक व पाचक औषधें सांगितलीं आहेत, तीं देखील विचार करून ह्याजवर द्यावीं.

वातपित्तातिसारचिकित्सा.

कट्फलं मधुकं लोध्रं त्वग्दाडिमफलस्य च।
वातपित्तातिसारघ्नं पिबेत्तण्डुलवारिणा ॥ १ ॥

कायफळ, जेष्टमध, लोध्र, डाळिंबाच्या फळाची साल ह्यांचें चूर्ण वातपित्तातिसारावर तांदुळाच्या धुवणाबरोबर घ्यावें.

मुस्तं सातिविषा दार्वी वचा शुण्ठी च तत्समम्।
कषायं क्षौद्रसंयुक्तं पित्तवातातिसारिणे ॥ २ ॥

नागरमोथे, अतिविष, दारुहळद, वेखंड व सुंठ ह्यांचा काढा मध घालून वातपित्तातिसारावर द्यावा.

पीतदारु वचा लोध्रं कलिङ्गफलनागरम्।
दाडिमाम्बुयुतं दद्यात्पित्तवातातिसारिणे ॥ ३ ॥

देवदार, वेखंड, लोध्र, इंद्रजव व सुंठ ह्यांचें चूर्ण डाळिंबाच्या रसांतून वातपित्तातिसारावर द्यावें.

ओकारीयुक्त अतिसाराची चिकित्सा.

बिल्वचूतास्थिनिर्यूहः पीतः सक्षौद्रशर्करः।
निहन्याच्छर्द्यतीसारं वैश्वानर इवाहुतिम् ॥ १ ॥

कोवळें बेलफळ व आंब्यांतील कोय ह्यांचा काढा मध व साखर घालून दिला असतां अग्नि ज्याप्रमाणें आहुतीचा नाश करतो, त्याप्रमाणें तो ओकारी व अतिसार यांचा नाश करितो.

पटोलयवधान्याकक्काथः पीतः सुशीतलः।
शर्करामधुसंयुक्तश्छर्द्यतीसारनाशनः ॥ २ ॥

पडवळ, सातू, धने ह्यांचा काढा थंड झाल्यावर साखर व मध घालून द्यावा. तो ओकारी व अतिसार यांचा नाश करतो.

प्रियङ्ग्वञ्जनमुस्ताख्यं पाचयेत्तु तथाबलम्।

---

१. चित्रक, अतिविष, नागरमोथे, कोवळें बेलफळ, सुंठ, कुड्याची साल व बाळहिरडे ह्यांचा काढा वातकफातिसाराचा नाश करितो.

नागरमोथे, अतिविष, मोरवेल, वेखंड, कुड्याची साल ह्यांचा काढा मध घालून द्यावा. तो पित्तकफातिसाराचा नाश करितो.

तृष्णातिसारच्छर्दिघ्नं सक्षौद्रं तण्डुलाम्बुना ॥ ३ ॥

गव्हला, रसांजन व नागरमोथे ह्यांचें चूर्ण मध व तांदळाचें धुवण ह्यांमधून शक्तिमानाप्रमाणें द्यावें. तें ओकारीसह अतिसाराचा नाश करितें.

जम्ब्वाम्रपल्लवोशीरवटशृङ्गावरोहकैः ।
रसः क्वाथोऽथवा चूर्णं क्षौद्रेण सह योजितम् ॥ ४ ॥
छर्दिज्वरमतीसारं मूर्छां तृष्णां च दुर्जयाम् ।
नियच्छत्यचिराद्रक्तस्रुतिं चानेकहेतुभिः ॥ ५ ॥

जांभळीचा कोवळा पाला, आंब्याचा कोवळा पाला, वाळा व वडाचे कोवळे अंकुर ह्यांचा अंगरस, काढा अथवा चूर्ण मधाशीं द्यावें. म्हणजे तें ओकारी, ज्वर, अतिसार, मूर्च्छा, अत्यंत वाढलेली तहान व रक्तस्राव ह्यांचा त्वरित नाश करितें.

शोफातिसारचिकित्सा.

सदेवदारुः सविषः सपाठः सजन्तुशत्रुः सघनः सतीक्ष्णः ।
सवत्सकः क्वाथ उदाहृतोसौ शोफातिसाराम्बुधिकुंभजन्मा ॥ १ ॥

देवदार, अतिविष, पहाडमूळ, वावडिंग, नागरमोथे, चवक व कुड्याची साल ह्यांचा काढा सुजेनें युक्त अशा अतिसाररूप समुद्राचा अगस्तीप्रमाणें नाशक आहे.

किराताब्दामृताविश्वचन्दनोदीच्यवत्सकैः ।
शोफातिसारशमनं विशेषाज्ज्वरनाशनम् ॥ २ ॥

काडेचिराईत, नागरमोथे, गुळवेल, सुंठ, चंदन, वाळा व कुडा ह्यांचा काढा सुजेनें युक्त अशा अतिसाराचा नाश करतो, आणि विशेषतः ज्वराचा नाश करितो.

भयशोकातिसारचिकित्सा.

भयशोकावतीसारौ भयशोकसमुद्भवौ ।
तयोर्वातहरी कार्या हर्षणाश्वासनक्रिया ॥ १ ॥

भय व शोकजन्य अतिसार भय व शोक ह्यांपासून उत्पन्न होतो. त्या दोहोंवरही वातनाशक, आनंददायक व आश्वासनयुक्त अशी चिकित्सा करावी.

पृश्निपर्णीबलाबिल्वधान्यकोत्पलनागरैः ।
विडङ्गातिविषामुस्तादारुपाठाकलिङ्गकैः ।

मरीचेन समायुक्तं शोकातीसारनाशनम् ॥ २ ॥

पिठवण, चिकणामूळ, बेलफळ, धने, कमळ, सुंठ, वावडिंग, अतिविष, नागरमोथे, देवदार, पहाडमूळ, इंद्रजव व मिरीं ह्यांचा काढा किंवा चूर्ण शोकातिसाराचा नाश करितें.

प्रवाहिका.

कल्कः स्याद्बालबिल्वानां तिलकल्कश्च तत्समः ।
दध्नः सारोऽम्लस्नेहाढ्यः षट् च हन्यात्प्रवाहिकाः ॥ १ ॥

कोवळया बेलफळाचा गर त्याच्या समान तिळाचा कल्क, दहीं (दह्यावरील साय), डाळिंब, लिंबाचा रस व तूप किंवा तेल हे सहा पदार्थ प्रवाहिकेचा नाश करितात.

मूद्गयूषरसं तक्रं धान्यजीरकसंयुतम् ।
षडंगमिति संप्रोक्तं सैन्धवेन समन्वितम् ॥ २ ॥
अग्निसंदीपनं प्रोक्तं ग्रहणीदोषनाशनम् ।
अरोचके ज्वरे चैव श्रेष्ठमेतत्प्रवाहिके ॥ ३ ॥

मुगाचें कढण, ताक व मांसरस ह्यांमध्यें जिरें, धने व सैंधेलोण घालावें. ह्याला **षडंगयूष** असें म्हणतात. हा अग्निदीपक, संग्रहणीचा दोषनाशक व ज्वर, अरोचक व प्रवाहिका ह्यांजवर फार उत्तम आहे.

बालबिल्वं गुडं तैलं पिप्पली विश्वभेषजम् ।
लिह्याद्वाते प्रतिहते सशूले सप्रवाहिके ॥ ४ ॥

बाळबेल (कोवळें बेलफळ), गूळ, तेल, पिंपळी व सुंठ ह्यांचा लेह्क वातजन्य प्रवाहिका व शूल ह्यांजवर द्यावा.

पयसा पिप्पलीकल्कः पीतो वा मरिचोद्भवः ।
त्र्यहान्निर्वाहिकां हन्याच्चिरकालानुबन्धिनीम् ॥ ५ ॥

पिंपळीचा अथवा मिऱ्यांचा कल्क दुधाबरोबर घ्यावा. तो फार दिवसांच्या प्रवाहिकेचा तीन दिवसांत नाश करतो.

तैलं सर्पिर्दधि क्षौद्रं विषा विश्वं सफाणितम् ।
सर्वमालोड्य पातव्यं सद्यो निर्वाहिकां हरेत् ॥ ६ ॥

तेल, तूप, दहीं, मध, अतिविष, सुंठ व काकवी हीं सर्व एकत्र करून द्यावीं; म्हणजे तात्काळ प्रवाहिकेचा नाश होतो.

त्र्यूषणं त्रिफला चैव चित्रको गजपिप्पली ।
बिल्वकर्कटिकाहिंस्राविडंगं सन्निदिग्धिकम् ॥ ७ ॥
घृतप्रस्थं पचेदेभिर्गवां मूत्रे चतुर्गुणे ।
तत्प्रयोगं पिबेत्काले हन्यात्तेन प्रवाहिकाम् ॥ ८ ॥

सुंठ, मिरें, पिंपळी, हिरडा, बेहडा, आवळकाठी, चित्रकमूळ, गजपिंपळी, बेलफळ, काकडशिंगी, जटामांसी, वावडिंग व रिंगणमूळ ह्यांचा कल्क व चौपट गोमूत्र ह्यांमध्यें तूप तयार करावें, आणि तें योग्य वेळीं सेवन करावें; म्हणजे प्रवाहिकेचा नाश होतो.

पुरीषक्षय.

दीप्ताग्न्यतिपुरीषो यः सार्यते फेनिलं शकृत् ।
स पिबेत्फाणितं शुण्ठीदधितैलपयोन्वितम् ॥ १ ॥

जठराग्नि अतिशय प्रदीप्त असल्यामुळें ज्याला फेंसाळ व अतिशय मळ होतो, त्यानें दहीं, दूध, काकवी व तेल ह्यांच्या मिश्रणांत सुंठ घालून प्राशन करावें.

दध्ना ससारेण समाक्षिकेण भुञ्जीत निःसारकपीडितस्तु ।
सुतक्रशुण्ठीक्कथितेन वाऽपि क्षीरेण शीतेन मधुप्लुतेन ॥ २ ॥

ज्याला प्रवाहिकेचा आजार आहे, त्यानें दहीं, डाळिंबाचा रस व मध ह्यांजबरोबर ताक व सुंठ ह्यांची कढी करून त्याबरोबर किंवा तापवून थंड झालेलें दूध व मध ह्यांजबरोबर सेवन करावें.

बलाविश्वशृतं क्षीरं गुडतैलानुयोजितम् ।
दीप्ताग्निं पाययेत्प्रातः सुखदं वर्चसः क्षये ॥ ३ ॥

चिकणामूळ व सुंठ ह्या द्रव्यांनीं सिद्ध केलेलें दूध गूळ व तेल घालून, ज्याचा जठराग्नि अतिशय प्रदीप्त असून मलाचा क्षय होतो त्याला प्रातःकाळीं पिण्यास द्यावें.

शशमांसं रुचिकरं सखण्डं सघृतं दधि ।
विपाच्य खादेत्सेवेच्च मृद्वन्नं शकृतः क्षये ॥ ४ ॥

सशाचें मांस खडीसाखर, तूप व दहीं ह्यांजबरोबर शिजवून खावें. तें रुचिकारक आहे. ह्याजवर हलकें अन्न खावें.

विबद्धवातो विट्शूलपरीतः सप्रवाहिकः ।
सरक्तपिच्छश्च पयः पिबेत्तृष्णासमन्वितः ॥ १ ॥
यथामृतं तथा क्षीरमतिसारेषु पूजितम् ।

सरक्तोत्थेषु तत्पेयमपां भागेषु संस्कृतम् ॥ २ ॥

वाताचा अवरोध, मळासंबंधी शूळ (मळ गोठून राहिल्यामुळें शूळ होतो तो) मुरडा, बुळबुळीत रक्तस्राव व तहान हे विकार ज्याला आहेत, त्यानें दूध प्यावें. अतिसारामध्यें दूध हें अमृताप्रमाणें श्रेष्ठ आहे. रक्तयुक्त अतिसारावर तें अवश्य प्यावें, आणि ज्या अतिसारामध्यें जलांश अधिक आहे त्यांत तें योग्य तीं औषधें घालून तापवून द्यावें.

ज्वरयुक्त अतिसार.

ज्वरातिसारयोरुक्तं भेषजं यत्पृथक् पृथक् ।
न तन्मिलितयोः कार्यमन्योन्यं वर्धयेद्यतः ॥ १ ॥
अतस्तौ प्रतिकुर्वीत विशेषोक्तचिकित्सितैः ॥ २ ॥

ज्वर व अतिसार ह्या वेगळ्या वेगळ्या विकारांवर जीं औषधें वेगळीं वेगळीं सांगितलीं आहेत तीं परस्पर मिश्र करून ज्वरातिसारावर देऊं नयेत. कारण तीं परस्परांना वाढविणारीं असतात. ह्यासाठीं ज्वरातिसाराकरितां म्हणून जी वेगळी विशेष चिकित्सा सांगितली असेल ती करावी.

लङ्घनमुभयोरुक्तं मिलिते कार्यं विशेषतस्तदनु ।
उत्पलषष्ठिकसिद्धं लाजकमण्डादिकं पेयम् ॥ ३ ॥

लंघन हें दोन्हीही विकारांला विहित आहे, म्हणून विशेषतः ज्वरातिसारावर लंघन करवावें. नंतर 'उत्पलषष्टका'नें सिद्ध केलेल्या लाजामंडादिकाचें प्राशन करावें.

उत्पलषष्ठक.

पृश्निपर्णीबलाबिल्वनागरोत्पलधान्यकैः ।
ज्वरातिसारी पेयां वा पिबेत्साम्लां शृतां नरः ॥ ४ ॥

पिठवण, चिकणामूळ, बेलफळ, धने, सुंठ व कमळ (ह्या सहा औषधांच्या समुदायाला "उत्पलषष्ठक" असें म्हणतात.) ह्या सहा औषधांनीं सिद्ध केलेला लाजामंड अथवा पेज ज्वरातिसारावर द्यावी.

धातकीक्वाथसंसिद्धा विश्वभेषजकल्किता ।
दाडिमाम्लयुता पेया ज्वरातीसारशूलिनाम् ॥ ५ ॥

धायटीचीं फुलें घेऊन त्यांचा काढा करून त्यांत सुंठीचा कल्क

घालून त्यानें पेज तयार करावी. ती आंबट डाळिंबाचा रस घालून ज्वरातिसार व शूल ह्यांजवर प्यावी.

पाठेन्द्रयवभूनिम्बमुस्तपर्पटकाः शृताः ।
जयन्त्याममतीसारं ज्वरं च समहौषधाः ॥ ६ ॥

पहाडमूळ, इंद्रजव, काडेचिराईत, नागरमोथे व पित्तपापडा ह्यांचा काढा सुंठीची पूड घालून द्यावा. तो आमयुक्त ज्वरातिसाराचा नाश करतो.

नागरातिविषामुस्तभूनिम्बामृतवत्सकैः ।
सर्वज्वरहरः क्काथः सर्वातीसारनाशनः ॥ ७ ॥

सुंठ, अतिविष, नागरमोथे, काडेचिराईत, गुळवेळ व कुड्याची साल ह्यांचा काढा सर्व प्रकारचे ज्वर व सर्व प्रकारचे अतिसार ह्यांचा नाश करतो.

धान्यकातिविषामुस्तागुडूचीबिल्वनागरैः ।
दत्तः कषायः शमयेदतिसारं चिरोत्थितम् ॥ ८ ॥
अरोचकामशूलास्रज्वरघ्नः पाचनः स्मृतः ।

धने, अतिविष, नागरमोथे, गुळवेळ, बेलफळ व नागरमोथे ह्यांचा काढा फार दिवसांच्या अतिसाराचा नाश करितो. आणि तो अरुचि, आम, शूल, रक्तस्राव व ज्वर ह्यांचा नाशक असून पाचक आहे.

कलिंगातिविषाशुण्ठीकिराताम्बुयवासकम् ॥ ९ ॥
ज्वरातीसारसंतापं नाशयेदविकल्पतः ।

इंद्रजव, अतिविष, सुंठ, काडेचिराईत, वाळा व धमासा ह्यांचा काढा ज्वरातिसार व दाह ह्यांचा निश्चयानें नाश करितो.

गुडूच्यतिविषाधान्यशुण्ठीबिल्वाब्दवालकैः ॥ १० ॥
पाठाकुटजभूनिम्बचन्दनोशीरपर्पटैः ।
पिबेत्कषायं सक्षौद्रं ज्वरातीसारशान्तये ॥ ११ ॥
हृल्लासारोचकच्छर्दिपिपासादाहनाशनम् ।

गुळवेल, अतिविष, सुंठ, धने, बेलफळ, नागरमोथे, वाळा, पहाडमूळ, कुड्याची साल, काडेचिराईत, चंदन, काळा वाळा व पित्तपापडा ह्यांचा काढा मध घालून द्यावा. हो ज्वरातिसारनाशक असून मळमळ, अरुचि, ओकारी, तहान व दाह ह्यांचा नाशक आहे.

वत्सकस्य फलं दारु रोहिणी गजपिप्पली ॥ १२॥
श्वदंष्ट्रा पिप्पली धान्यं बिल्वपाठा यवानिका ।
द्वावप्युक्ताविमौ योगौ श्लोकार्धेनावभाषितौ ॥ १३ ॥
ज्वरातीसारशमनौ विशेषाद्दाहनाशनौ ।

इंद्रजव, देवद्वार, कुटकी, गजपिंपळी व गोखरूं ह्यांचा काढा आणि गोखरूं, पिंपळी, धने, बेलफळ, पहाडमूळ व ओवा ह्यांचा काढा हे अर्ध्या अर्ध्या श्लोकानें सांगितलेले दोन काढे ज्वरातिसारनाशक असून विशेषतः दाहनाशक आहेत.

व्योषं वत्सकबीजानि निम्बभूनिम्बमार्कवम् ॥ १४ ॥
चित्रकं रोहिणी पाठा दार्वी ह्यतिविषा समम् ।
श्लक्ष्णचूर्णीकृतानेतांस्तत्तुल्यां वत्सकत्वचम् ॥ १५ ॥
सर्वमेकत्र संयोज्य पिबेत्तण्डुलवारिणा ।
सक्षौद्रं वा लिहेदेवं पाचनं ग्राहि भेषजम् ॥ १६ ॥
तृष्णारुचिप्रशमनं ज्वरातीसारनाशनम् ।
कामलां ग्रहणीरोगं गुल्मं प्लीहानमेव च ॥ १७ ॥
प्रमेहं पाण्डुरोगं च श्वयथुं च विनाशयेत् ।

सुंठ, मिरीं, पिंपळी, इंद्रजव, कडुलिंबाची साल, काडेचिराईत, माका, चित्रक, कुटकी, पहाडमूळ, दारुहळद व अतिविष ह्या सर्वांचें बारीक चूर्ण करून त्या सर्व चूर्णाच्या बरोबरीनें त्यांत कुडच्याच्या सालीचें चूर्ण घालावें, आणि तें एकत्र केलेलें चूर्ण मधाशीं अथवा मध व तांदुळाचें धुवण ह्यांशीं द्यावें. हें पाचक व मलबंधक (ग्राही) आहे. तसेंच तहान, अरुचि, ज्वरातिसार, कावीळ, संग्रहणी, गुल्म, पी (पांथरी), प्रमेह, पांडुरोग व सूज ह्यांचा हें नाश करितें.

उशीरं वालकं मुस्तं धान्यकं बिल्वमेव च ॥ १८ ॥
समंगा धातकी लोध्रं विश्वं दीपनपाचनम् ।
हन्त्यरोचकपिच्छामं विबन्धं सातिवेदनम् ॥ १९ ॥
सशोणितमतीसारं सज्वरं वाऽथ विज्वरम् ।

वाळा, काळा वाळा, नागरमोथे, धने, बेलफळ, लाजाळु, धायटीचीं फुलें, लोध्र व सुंठ ह्यांचें चूर्ण दीपक व पाचक असून अरुचि, बुळबुळित असा आमांश, वेदनायुक्त मलावरोध, रक्तयुक्त अतिसार, ज्वरयुक्त अतिसार किंवा ज्वररहित अतिसार ह्यांचा नाश करतो.

बिल्वबालकभूनिम्बगुडूचीधान्यनागरैः ।
कुटजाब्दामृताक्वाथो ज्वरातीसारशूलनुत् ॥ २० ॥

बेलफळ, वाळा, काडेचिराईत, गुळवेल, धने, सुंठ, कुडयाची साल, नागरमोथे व काळें अतिविष ह्यांचा काढा ज्वरातिसार व शूल ह्यांचा नाशक आहे.

पञ्चाङ्घ्रिवृक्ष्यब्दबलेन्द्रबीजत्वक्सेव्यतिक्तामृतविश्वबिल्वैः ।
ज्वरातिसारान्सवमीन्सकासान्सश्वासशूलाञ्शमयेत्कषायः २१

एरंडमूळ, पहाडमूळ, नागरमोथे, वायवर्णा, इंद्रजव, कुडयाची साल, पीत वाळा, कुटकी, गुळवेल, सुंठ व बेलफळ ह्यांचा काढा ज्वरातिसार, ओकारी, खोकला, श्वास व शूल ह्यांचा नाश करतो.

अरलुरतिविषा मुस्ता शुण्ठी बिल्वं सदाडिमम् ।
सर्वज्वरहरः क्वाथः सर्वातीसारनाशनः ॥ २२ ॥

टेंटुमूळ, अतिविष, नागरमोथे, सुंठ, बेलफळ व डाळिंब ह्यांचा काढा सर्व ज्वर व सर्व अतिसार ह्यांचा नाश करतो.

सर्व अतिसार.

यथा शृतं भवेद्वारि तथाऽतीसारनाशनम् ।
अतिसारं निहन्त्येव शतभागशृतं जलम् ॥ १ ॥

पाणी जितकें आटवावें तितकें तें जलद अतिसाराचा नाश करितें. आटवून शतांश उरविलेलें पाणी अतिसाराचा नाश करितें.

दाडिमादिलेह.

दाडिमादिफलप्रस्थं चतुष्प्रस्थजले पचेत् ।
चतुर्भागकषायेऽस्मिञ्शर्कराप्रस्थमेव च ॥ १ ॥
नागरं पिप्पलीमूलं कणाधान्यकदीप्यकम् ।
जातीफलं जातिपत्रं मरिचं जीरकं तुगा ॥ २ ॥
विजया निम्बपत्रं च समङ्गा कूटशाल्मली ।
अरलुरतिविषा पाठा लवङ्गं च पृथक्पलम् ॥ ३ ॥
घृतस्य मधुनः प्रस्थं सर्वलेहं विपाचयेत् ।
दाडिम्बलेहकं नाम ज्वरातीसारनाशनम् ॥ ४ ॥
आमरक्तं चाऽऽमशूलं मान्द्यशोफक्षयापहम् ।
धातुलीनं धातुगतमश्विभ्यां निर्मितं पुरा ॥ ५ ॥

कोवळीं डाळिंबें चौसष्ट तोळे घेऊन तीं दोनशें छपन्न तोळे

पाण्यांत शिजवावीं. चवथाई काढा उरला म्हणजे त्या काढ्यांत साखर चौसष्ट तोळे घालून पाक करावा, आणि त्यांत सुंठ, पिंपळमूळ, पिंपळी, धने, ओवा, जायफळ, जायपत्री, मिरीं, जिरें, वंशलोचन, भांग, बाळंतलिंबाचीं पानें, लाजाळु, काळ्या शेवरीचीं साल, टेटूमूळ, अतिविष, पहाडमूळ व लवंग हे जिन्नस चार चार तोळे घेऊन चूर्ण करावें व त्या पाकांत घालावें; आणि तूप व मध चौसष्ट चौसष्ट तोळे घालून पुनः शिजवावें. लेहाप्रमाणें झाल्यावर लेह भांड्यांत भरून ठेवावा. ह्याला दाडिमावलेह असें म्हणतात. हा ज्वरातिसाराचा नाशक आहे. आंव, रक्त, आमशूल, अग्निमांद्य, सूज व क्षय ह्यांचा व धातुगत किंवा धातुलीन विकारांचा नाश करतो. हा अश्विनीकुमारांनीं सांगितला आहे.

कुटजावलेह.

वत्सकस्यामृतायाश्च द्वे पले प्र.थमम्भसः।
श्रपयित्वा रसे तस्मिन्पादशेषावतारिते ॥ १ ॥
अष्टौ पलानि शक्रस्य यवाश्चूर्णीकृताश्च ते।
पक्त्वा पाकं विदित्वा तु यथावह्नि च खादयेत् ॥ २ ॥
जयेत्सर्वातिसारांश्च सर्वांश्च ग्रहणीगदान्।
नाशयेद्दीपयेच्चाग्निं कृष्णात्रेयस्य शासनात् ॥ ३ ॥

कुड्याची साल आठ तोळे, गुळवेलीचे तुकडे आठ तोळे ह्यांचा चौसष्ट तोळें पाण्यांत चतुर्थांश काढा करावा तो काढा उतरून त्यांत आठ पळें (बत्तीस तोळे) इंद्रजवाची पूड घालून पुन्हा पचन करावें. पाक झाल्यावर काढून ठेवून अग्निबल पाहून भक्षण करावा. ह्याला कुटजगुडूच्यवलेह असें म्हणतात. हा सर्व प्रकारचे अतिसार व सर्व प्रकारचे संग्रहणीरोग ह्यांचा नाश करतो, व जठराग्नि प्रदीप्त करतो, असें कृष्णात्रेयानें सांगितलें आहे.

दुसरा प्रकार.

शतं कुटजमूलस्य क्षुण्णं तोयार्मणे पचेत्।
क्वाथे पादावशेषेऽस्मिँल्लेहं पूतं पुनः पचेत् ॥ १ ॥
सौवर्चलयवक्षारबिडसैन्धवपिप्पली।
धातकीन्द्रयवाजाजीचूर्णं दत्त्वा पलद्वयम् ॥ २ ॥

लिह्याद्बदरमात्रं तु तच्छीतं मधुसंयुतम् ॥ ३ ॥
पक्वापक्वमतीसारं नानावर्णं सवेदनम् ।
दुर्वारं ग्रहणीरोगं जयेच्चैतत्प्रवाहिकाम् ॥ ४ ॥

शंभर तोळे कुड्याचीं मुळें आणून तीं कुटून दहाशें चोवीस तोळे पाण्यांत काढा करावा. चतुर्थांश उरल्यावर उतरून गाळून घेऊन पुन्हा पचन करावा. लेहाप्रमाणें दाट झाल्यावर त्यांत पादे-लोण, जवखार, बिडलोण, सेंधेलोण, पिंपळी, धायटीचीं फुलें, इंद्रजव व जिरें ह्यांचें समभाग चूर्ण आठ तोळे त्यांत घालून ढव-ळून बोराएवढ्या गोळ्या कराव्या, व एक एक गोळी मधाबरोबर खावी. ह्याला कुटजावलेह म्हणतात. हा पक्व किंवा अपक्व अति-सार, अनेक वर्णाचा वेदनायुक्त अतिसार, दुर्धर संग्रहणी रोग व प्रवाहिका ह्यांना जिंकतो.

तिसरा प्रकार.

कुटजस्य पलं ग्राह्यमष्टभागजले शृतम् ।
तथैव विपचेद्भूयो दाडिमोदकसंयुतम् ॥ १ ॥
कुटजक्वाथतुल्योऽत्र दाडिमस्य रसो मतः ।
यावच्च रसिकाभासं शृतं तमुपकल्पयेत् ॥ २ ॥
तस्यार्धकर्षं तक्रेण पिबेद्रक्तातिसारवान् ।
अवश्यं मरणीयोऽपि न मृत्योर्याति गोचरम् ॥ ३ ॥

चार तोळे कुड्याची साल आणून आठपट पाण्यामध्यें शिज-वावी. चवथाई काढा उरल्यावर त्यांत त्याच्या बरोबरीनें डाळिं-बाचा रस घालून पुन्हा कढवावें. दाट झाल्यावर उतरून भांड्यांत भरून ठेवावा. व रोज अर्धा तोळा प्रमाणें ताकाशीं रक्तातिसारी मनुष्याला द्यावा; म्हणजे मरणोन्मुख रोगी असला तरी बरा होतो.

कुटजाष्टक.

पक्त्वार्द्रां कुटजात्तुलां जलघटेऽष्टांशं पुनः पालिकैः
पाठाशाल्मलिधातकीघनविषालज्जालुबिल्वैः सह ।
तल्लिह्यात्कुटजाष्टकं जलगवां क्षीरेण मण्डानुपोऽ-
तीसारं ग्रहणीमसृग्दरमसृक्पित्तासृगर्शो जयेत् ॥ १ ॥

चारशें तोळे ओली कुड्याची साल आणून दहाशें चोवीस

तोळे पाण्यांत शिजवावी. अष्टमांश काढा झाल्यावर त्यांत पहाड-मूळ, शेवरीची साल, धायटीचीं फुलें, नागरमोथे, अतिविष, लाजाळू, वेलफळ ह्या सर्वांचें चूर्ण आठ तोळे घालून सारखें ढवळून भरून ठेवावा. नंतर अग्निबल पाहून गाईच्या दुधाशीं द्यावा व त्याजवर तांदुळाची पेज पथ्याला द्यावी. म्हणजे अतिसार, संग्रहणी, रक्त-प्रदर, रक्तपित्त व मूळव्याध ह्यांचा नाश होतो. ह्याला कुटजाष्टक असें म्हणतात.

कपित्थाष्टक.

यवानीपिप्पलीमूलचातुर्जातकनागरैः ।
मरीचाग्निजलाजाजीधान्यसौवर्चलैः समैः ॥ १ ॥
वृक्षाम्लधातकीकृष्णाबिल्वदाडिमदीप्यकैः ।
त्रिगुणैः षड्गुणसितैः कपित्थाष्टगुणीकृतैः ॥ २ ॥
चूर्णोऽतीसारगृहणीक्षयगुल्मगलामयान् ।
कासश्वासारुचिं हिक्कां कपित्थाष्टमिदं जयेत् ॥ ३ ॥

ओवा, पिंपळमूळ, दालचिनी, तमालपत्र, वेलदोडे, नाकेशर, सुंठ, मिरीं, चित्रक, वाळा, जिरें, धने व पादेलोण हे सर्व जिन्नस समभाग; आमसुलें, धायटीचीं फुलें, पिंपळी, बेलफळ, डाळिंब, ओवा हे जिन्नस तिप्पट, साखर सहापट व कवठाचा गर आठ-पट घेऊन सर्वांचें चूर्ण करावें. ह्याला कपित्थाष्टक असें म्हणतात. हें अतिसार, संग्रहणी, क्षय, गुल्म, गळ्याचे रोग, खोकला, श्वास, अरुचि व उचकी ह्यांचा नाश करितें.

दाडिमाष्टक.

कर्षोन्मिता तुगाक्षीरी चातुर्जातं तु कार्षिकम् ।
यवानीधान्यकाजाजीग्रन्थिव्योषं पलांशकम् ॥ १ ॥
पलानि दाडिमस्याष्टौ सिताया श्चैकतः कृतम् ।
गुणैः कपित्थाष्टकवच्चूर्णोऽयं दाडिमाष्टकः ॥ २ ॥

वंशलोचन एक तोळा; दालचिनी, तमालपत्र, वेलदोडे, नाके-शर हीं प्रत्येक तीन तीन मासे; ओवा, धनें; जिरें, पिंपळमूळ, सुंठ, मिरीं, पिंपळी हीं प्रत्येक चार चार तोळे; डाळिंब बत्तीस तोळे व साखर बत्तीस तोळे ह्यांचें एकत्र चूर्ण करून द्यावें. ह्याला

दाडिमाष्टक चूर्ण असें म्हणतात. हें गुणानें कपित्थाष्टकाप्रमाणेंच आहे.

डाळिंब पुटपाक.

पुटपाकेन विपचेत्सुपक्वं दाडिमीफलम् ।
तद्रसो मधुसंयुक्तः सर्वातीसारनाशनः ॥ १ ॥

पिकलेलें डाळिंब पुटपाकाच्या रीतीनें पचन करावें व त्याचा रस काढून मध घालून द्यावा. तो सर्व अतिसारांचा नाश करितो.

जातीफलं सर्पफेनं टङ्कं गन्धकजीरकं ।
एतानि समभागानि बालदाडिमबीजकैः ॥ २ ॥
पेषयेत्तेन कल्केन पूरयेद्दाडिमीफलम् ।
अङ्गारे तच्च गोधूमचूर्णेनाऽऽलेपयेद् दृढम् ॥
अतीसारे स्तम्भनं स्यात्परं दीपनपाचनम् ॥ ३ ॥

जायफळ, अफू, टाकणखार, गंधक व जिरें हीं सर्व समभाग घेऊन कोंवळया डाळिंबाच्या दाण्यांशीं वाटून डाळिंबाच्या कोंवळया फळांत तो कल्क भरून त्यावर कणकीचा लेप करून निखाऱ्यांत ठेवून उकडून काढावें व वाटून गोळया करून ठेवाव्या. ह्या अतिसाराचें स्तंभन करणाऱ्या असून चांगल्या दीपक व पाचक आहेत. ह्याला डाळिंबपाक असें म्हणतात.[1]

भल्लातानां द्विखण्डानां द्वे पले भर्जिते क्षिपेत् ।
शुण्ठ्याः पलं तु चेतक्याः पलार्धं सुमनाफलम् ॥ १ ॥
कर्षं मेथीवल्लजीरसर्षपान्कोलमात्रतः ।
ततो यवान्यर्धपलं पिप्पलीरामठोषणम् ॥ २ ॥
बिडसैन्धवजीरं च किर्माणीसंज्ञकं तथा ।
कर्षप्रमाणं विज्ञेयं वैद्यविद्याविशारदैः ॥ ३ ॥
सर्वमेकत्र संचूर्ण्य यथासात्म्यं तु भक्षयेत् ।
दध्ना सह तथा खादेत्सर्वातीसारनाशनम् ॥ ४ ॥

बिब्बे दुखंड केलेले आठ तोळे घेऊन भाजावे. नंतर त्यांत चार तोळे सुंठ, दोन तोळे हिरडेदळ, करंजाच्या बिया एक तोळा,

१. सुंठ दोन तोळे, जायफळ चार तोळे, अफू आठ तोळे व कोंवळया डाळिंबाचे दाणे सर्वांबरोबर (चौदा तोळे) हें सर्व एकत्र वाटून कोंवळयां डाळिंबांत भरून पुटपाकानें पचन करावें. नंतर काढून खलून बोराएवढी गोळी करून ताकाशीं द्यावी. ही पक्कातिसाराचा नाश करितें. (ले. प्र.)

वावडिंग, मेथी, जिरें व शिरस (मोहर्‍या) हीं प्रत्येक सहा सहा मासे, ओंवा दोन तोळे, पिंपळी, हिंग, मिरीं, बिडलोण, सेंधेलोण, जिरें व किरमाणी ओवा हीं प्रत्येक तोळा तोळा घेऊन ह्या सर्वांचें चूर्ण करून तें सोसेल त्या मानानें दह्याशीं द्यावें. हें सर्व अतिसारांचा नाश करितें.

शंखोदर रस.

कम्बूभस्म चतुष्कर्षं कर्षैकमहिफेनकम् ।
जातीफलं टंकणं च पृथक्कर्षं विनिक्षिपेत् ॥ १ ॥
अतिसूक्ष्मं विमर्द्याथ नवनीतेन गुञ्जकम् ।
रसः शङ्खोदरो नाम सर्वातीसारनाशनः ॥ २ ॥

शंखभस्म चार तोळे, अफू एक तोळा, जायफळ व टाकणखाराची लाही एक एक तोळा, ह्या सर्वांचा अति बारिक खल करून एक गुंजप्रमाणें लोण्यांतून द्यावा. ह्याला शंखोदर रस म्हणतात. हा सर्व अतिसारांचा नाशक आहे.

लघुलायी चूर्ण.

सूतं गन्धं त्रिकटुकं दीप्यकं जीरकद्वयम् ।
सौवर्चलं सैन्धवं च रामठं बिडमेव च ॥ १ ॥
शक्राह्वयस्य चूर्णं तु चूर्णतुल्यं प्रदापयेत् ।
संग्रहं शूलमानाहं हन्यान्नानातिसारजित् ॥ २ ॥

शुद्ध पारा, गंधक, सुंठ, मिरीं, पिंपळी, ओवा, जिरें, शहाजिरें, पादेलोण, सेंधेलोण, हिंग, व बिडलोण हे सर्व समभाग व सर्वांच्या बरोबर इंद्रजवाचें चूर्ण या सर्वांचा एकत्र खल करावा. ह्याला लायी चूर्ण असें म्हणतात. हें संग्रहणी, शूल, पोटफुगी व अनेक प्रकारचे अतिसार यांचा नाश करितें.

मृतसंजीवन रस.

रसगन्धौ विषं सूतात्पादभागं समं च तत् ।
गगनं भावयेदेभी रसैः सर्वं विचूर्णयेत् ॥ १ ॥
सर्पाक्षीधातकीस्वर्णविषाविश्वजयाम्बुदम् ।
यवानीबिल्वधान्याकजीरपाठाकणाशिवाः ॥ २ ॥
कुटजत्वककपित्थं च दाडिमं सकलिंगकम् ।
इत्येषां गोलकं कृत्वा वालुकायंत्रगं पचेत् ॥ ३ ॥

मृतसंजीवनो नाम रसः स्यादस्य वल्लकः ।
षट्प्रकारमतीसारं हन्ति वै चानुशीलितः ॥ ४ ॥
विश्वाब्दधातकीदारुयवान्यम्बुकणा वचा ।
कुटजो धान्यकं विल्वं पाठेन्द्रयवशाल्मली ।
विश्वाभया समं चैषां चूर्णेन मधुना सह ॥ ५ ॥

पारा व गंधक समभाग, बचनाग पाऱ्याच्या चतुर्थांश आणि अभ्रकभस्म सर्वांच्या बरोबर घेऊन सर्वांचा एकत्र खल करून मुंगुसवेलीच्या रसाची एक भावना द्यावी. नंतर धोतऱ्याच्या पाल्याच्या रसाची एक भावना द्यावी. नंतर धायटीचीं फुलें, अतिविष, सुंठ, भांग, नागरमोथे, ओवा, बेलफळ, धणे, जिरे, पहाडमूळ, पिंपळी, आवळकाठी, कुड्याची साल, कवठ, डाळिंब, व इंद्रजव यांच्या रसाची किंवा काढ्याची एक एक भावना देऊन त्याचा गोळा करून वालुकयंत्रांत पचन करावा. ह्याला मृतसंजीवनी रस असें म्हणतात. हा एक वालभर सेवन केला असतां सर्व अतिसारांचा नाश करितो. सुंठ, नागरमोथे, धायटीचीं फुलें, देवदार, ओवा, वाळा, पिंपळी, वेखंड, कुड्याची साल, धने, बेलफळ, पहाडमूळ, इंद्रजव, शेवरीची साल (किंवा मोचरस) सुंठ व हिरडेदळ, ह्या सर्वांचें समभाग चूर्ण करून हें चूर्ण व मध ह्याजबरोबर हा रस द्यावा.

चंद्रप्रभावटी.

मृतं सूतं मृतं स्वर्णं मृतं चाभ्रं समं समम् ।
तुल्यं च खादिरं सारं तथा मोचरसं क्षिपेत् ॥ १ ॥
द्रवैः शाल्मलिमूलोत्थैर्मर्दयेत्प्रहरद्वयम् ।
चणमात्रां वटीं कृत्वा खादेज्जीरकसंयुताम् ।
त्रिदोषोत्थमतीसारं सज्वरं नाशयेद् ध्रुवम् ॥ २ ॥

पारदभस्म (रससिंदूर), सुवर्णभस्म व अभ्रकभस्म हीं सर्व समभाग, सर्वांबरोबर खैराचा कात व मोचरस ह्या सर्वांचा एकत्र खल करून सावरीच्या मुळ्यांच्या रसानें दोन प्रहर खल करावा. आणि हरबऱ्याएवढी गोळी करून ती जिऱ्याच्या चूर्णाबरोबर द्यावी. हिला चंद्रप्रभावटी असें म्हणतात. ही त्रिदोषानें झालेल्या

ज्वरयुक्त अतिसाराचा नाश करिते.

अतिसारावर पथ्य.

लङ्घनं वमनं निद्रा पुराणाः शालिषष्टिकाः ।
विलेपी लाजमण्डश्च मसूरी तुवरी रसाः ॥ १ ॥
शशैणलावहारिणकपिञ्जलभवा रसाः ।
सर्वे क्षुद्रझषाः शृङ्गीडिण्डिशो मधुनालिका ॥ २ ॥
तैलं छागघृतं क्षीरं दधि तक्रं गवामपि ।
दधिजं वा पयोजं वा नवनीतं गवाजयोः ॥ ३ ॥
नवं रम्भापुष्पफलं क्षौद्रं जम्बूफलानि च ।
भव्यं महार्द्रकं विश्वं शालूकं च विकंकतम् ॥ ४ ॥
कपित्थं बकुलं बिल्वं तिन्दुकं दाडिमद्वयम् ।
शालूकं कण्टकाढ्या च चाङ्गेरी विजयाऽरुणा ॥ ५ ॥
जातीफलमफेनं च जीरकं गिरिमाल्लिका ।
कुस्तुम्बुरु महानिम्बः कषायः सकलो रसः ॥ ६ ॥
अन्नपानानि सर्वाणि दीपनानि लघूनि च ।
नाभेर्द्व्यंगुलतोऽधस्ताच्छस्त्रेणार्धेन्दुवद्दहेत् ।
तथा वंशास्थिमूलेऽपि पथ्यवर्गोऽतिसारिणाम् ॥ ७ ॥

लंघन, वमन, निद्रा, जुन्या साठ्यासाळी, आटवल, लाह्याचा मंड, मसूर, तूर ह्यांचें कट, ससा, काळवीट, हरीण, लावापक्षी, पांढरा तित्तिरपक्षी ह्यांचा मांसरस, सर्व प्रकारचे क्षुद्र मासे, घेंडशीचें फळ, मधुनालिका, तेल, शेळीचें अगर गाईचें तूप, दूध, दहीं, ताक, तसेंच गाईच्या अथवा शेळीच्या दुधावरील अथवा ताकावरील लोणी, केळफूल, हिरवें केळें, मध, जांभळें, मोठें आलें, नींवीचें फळ, सुंठ, जायफळ, येहेकळ, कवठ, बकुळ, बेलफळ, भोकर, गोड व आंबट डाळिंब, कमळकंद, काटेशेवरी, चुका, भांग, मंजिष्ट, जायफळ, अफू, जिरें, कुडा, कोथिंबीर, बकाणा निंब, (कढीनिंब) आणि सर्व प्रकारचे तुरट रस (फळें वगैरे), सर्व प्रकारचीं दीपक व हलकीं अन्नपानें हीं पथ्यकारक आहेत. शिवाय बेंबीच्या खालीं दोन बोटांवर शस्त्रानें डाग द्यावा व तसाच वंशास्थीच्या मूळाचे ठिकाणींही डाग द्यावा. हा अतिसारावर पथ्यवर्ग सांगितला आहे.

अतिसाराला अपथ्य.

स्वेदोऽञ्जनं रुधिरमोक्षणमम्बुपानं
स्नानं व्यवायमपि जागरधूमनस्यम् ।
अभ्यञ्जनं सकलवेगविधारणं च
रूक्षाण्यसात्म्यशयनं च विरुद्धमन्नम् ॥ १ ॥
गोधूममाषयववास्तुककाकमाची-
निष्पावकं च मधुशिग्रुरसालपूगम् ।
कूष्माण्डतुम्बिबदरं गुरु चान्नपानं
ताम्बूलमिक्षुगुडमद्यमुपोदकी च ॥ २ ॥
द्राक्षाम्लवेतसफलं लशुनं च धात्री
दुष्टाम्बु मस्तु गृहवारि च नारिकेलम् ।
सस्नेहनं मृगमदोऽखिलपत्रशाकं
क्षीरं सराणि सकलानि पुनर्नवा च ॥ ३ ॥
उर्वारुकं लवणमम्लमपि प्रकोपी
वर्गोऽतिसारगदपीडितमानवेषु ।

घाम काढणें, अंजन करणें, रक्त काढणें, पाणी पिणें, स्नान, मैथुन, जागरण, धूम्रपान, नस्य, अंगास तेल माखणें, सर्व प्रकारचे वेग (शिंक, खोकला ह्यांचे सुद्धां) आवरून धरणें, रूक्ष पदार्थ, संवय नसतां दिवसा निजणें वगैरे, दुधाशीं मासे वगैरे विरुद्ध अन्न खाणें, गहू, उडीद, सातू, चंदनबटवा, कांगोणी, पावटे, गोडा शेवगा, सुपारी, कोहाळा, दुध्या भोपळा, बोर, जड असें अन्न-पान, विडा, ऊंस, गूळ, मद्य, मयाळ, द्राक्षें, आम्लवेतस, लसूण, आवळे, वाईट पाणी, दह्यावरील पाणी, शिळें पाणी, नारळ, स्नेहन, कस्तुरी, सर्व प्रकारच्या पाले भाज्या, दूध वगैरे सर्व सारक पदार्थ, घेटूळी (वसू), वाळूक, मीठ आणि आंबट पदार्थ हा मनुष्याच्या अतिसाराला वाढविणारा (अपथ्यकारक) वर्ग आहे.

स्नानावगाहमभ्यङ्गगुरुस्निग्धान्नभोजनम् ॥
व्यायाममग्निसंतापमतीसारी विवर्जयेत् ॥ ४ ॥

स्नान, पाण्यांत बसणें, अंगास तेल लावणें, जड व स्निग्ध असें अन्न खाणें, व्यायाम व अग्नीचा शेक अतिसारी मनुष्यानें वर्ज करावा.

संग्रहणीचें निदान.

अतिसारे निवृत्तेऽपि मन्दाग्नेरहिताशिनः ।
भूयः संदूषितो वह्निर्ग्रहणीमभिदूषयेत् ॥ १ ॥
ग्रहण्या बलमग्निर्हि स चापि ग्रहणीं श्रितः ।
तस्मात्संदूषिते वह्नौ ग्रहणी संप्रदुष्यति ॥ २ ॥

अतिसार बरा झाल्यावर देखील मंदाग्नि मनुष्यानें अपथ्य भोजन केलें असतां दूषित झालेला जठराग्नि ग्रहणीला देखील दूषित करतो. ग्रहणीचें सामर्थ्य म्हणजे जठराग्नि आहे, आणि तो ग्रहणीच्याच आश्रयानें असतो. ह्यासाठीं अग्नि दूषित झाला असतां तो ग्रहणीलाही दूषित करितो.

नाभेरुपर्यग्निबलेनोपस्तब्धोपबृंहिता ।
षष्ठी कला पित्तधरा या पूर्वं समुदाहृता ॥ ३ ॥
पक्वामाशयमध्यस्था ग्रहणी सा प्रकीर्तिता ।
अपक्वं धारयत्यन्नं पक्वं सृजति पार्श्वतः ॥ ४ ॥
एकैकशः सर्वशश्च दोषैरत्यर्थमुच्छ्रितैः ।
सा दुष्टा बहुशो भुक्तमाममेव विमुञ्चति ॥ ५ ॥
पक्वं वा सरुजं पूति मुहुर्बद्धं मुहुर्द्रवम् ।
ग्रहणीरोगमाहुस्तमायुर्वेदविदो जनाः ॥ ६ ॥

बेंबीच्या वरच्या भागीं जठराग्नीच्या सामर्थ्यामुळें राहिलेली जी सहावी पित्तधरा नांवाची कला पक्वाशय व आमाशय ह्यांच्यामध्यें असते म्हणून सांगितलें आहे, तिला ग्रहणी असें म्हणतात. ती अपक्व अन्न धारण करिते आणि पक्व झाल्यावर सोडते. ती प्रकुपित्त झालेल्या एक एक अथवा सर्व दोषांनीं दूषित झाली असतां खाल्लेलें बहुतेक अन्न पचन होण्याच्या पूर्वींच सोडते; किंवा पक्व झाल्यावर सोडलें तरी शूलयुक्त, दुर्गंधीयुक्त, केव्हां बांधीव, केव्हां पातळ असा मळ सोडते. त्याला आयुर्वेदवेत्ते लोक ग्रहणी रोग (संग्रहणी रोग) असें म्हणतात.

पूर्वरूपं तु तस्येदं तृष्णाऽऽलस्यं बलक्षयः ।
विदाहोऽन्नस्य पाकश्च चिरात्कायस्य गौरवम् ॥ ७ ॥

तहान, आळस, शक्तिपात, अन्नाचा विदाह (घशाशीं जळजळणें), अन्नाचें फार वेळानें पचन होणें व अंगाला जडत्व हीं

लक्षणें संग्रहणीच्या पूर्वरूपामध्यें होतात.

वातग्रहणीचें लक्षण.

कटुतिक्तकषायातिरूक्षसंदुष्टभोजनैः ।
प्रमितानशनात्यध्ववेगनिग्रहमैथुनैः ॥ ८ ॥
मारुतः कुपितो वह्निं संछाद्य कुरुते गदान् ।
तस्यान्नं पच्यते दुःखं शुष्कपाकः खराङ्गता ॥ ९ ॥
कण्ठास्यशोषः क्षुत्तृष्णा तिमिरं कर्णयोः स्वनः ।
पार्श्वोरुवंक्षणग्रीवारुगभीक्ष्णं विषूचिका ॥ १० ॥
हृत्पीडा कार्श्यदौर्बल्यं वैरस्यं परिकर्तिका ।
गृद्धिः सर्वरसानां च मनसः सदनं तथा ॥ ११ ॥
जीर्णे जीर्यति चाऽऽध्मानं भुक्ते स्वास्थ्यमुपैति च ।
सवातगुल्महृद्रोगप्लीहाशंकी च मानवः ॥ १२ ॥
चिराद्दुःखं द्रवं शुष्कं तन्वामं शब्दफेनवत् ।
पुनः पुनः सृजेद्वर्चः कासश्वासार्दितोऽनिलात् ॥ १३ ॥

तिखट, कडू, तुरट, अतिशय रुक्ष व अतिशय दूषित (शिळें, विरुद्ध अन्न वगैरे) असें अन्न सेवन केल्यामुळें, अतिशय मिताहार (भूक असून फार थोडें खाणें), उपास करणें, अति मैथुन किंवा मलमूत्रादिकांचे वेग धारण करणें ह्या कारणांनीं कुपित झालेला वायु जठराग्नीला आच्छादित करून संग्रहणी रोग उत्पन्न करतो. त्यामुळें अन्नाचें पचन होत असतां पीडा होते. अन्नाचा पाक [1]आंबट होतो. अंग खरखरीत होतें. घसा व तोंड ह्यांना कोरड असते. भूक व तहान फार लागते. डोळ्यांला अंधेरी येते. कानांत नाद होतो. बरगड्या, मांड्या, आडसंधी व मान ह्यांमध्यें अतिशय पीडा होते. विषूचिका (ढाळ व वांत्या), हृदयांत दुखणें, कृशत्व, दुर्बळता, अरुचि, गुदामध्यें कातरल्याप्रमाणें पीडा, मधुरादि सर्व रसांसंबंधानें अभिलाष, मनाला उदासीनता, अन्न जिरल्यावर किंवा जिरत असतां पोट फुगणें व जेवलें असतां स्वस्थपणा, हीं लक्षणें वातग्रहणीमध्यें होतात. शिवाय वातग्रहणीच्या मनु-

१. "शुष्कपाक" ह्या ठिकाणीं "शुक्तपाक" असा पाठ असून तो बरोबर आहे त्याला धरून अर्थ केला आहे.

ष्याला वात (नळवात), गुल्म, हृद्रोग व पांथरी हे विकार ह्यां-ल्याची शंका येते. आणि त्याला फार वेळानें व कष्टानें पातळ, शुष्क, थोडा, अपक्क, शब्दयुक्त व फेसाळ असा वरचेवर मळ होतो. व तो मनुष्य खोकला व श्वास ह्यानें पीडित होतो.

पित्तग्रहणीलक्षण.

कट्वजीर्णविदाह्यम्लक्षाराद्यैः पित्तमुल्बणम् ।
आप्लावयद्धन्त्यनलं जलं तप्तमिवानलम् ॥ १४ ॥
सोऽजीर्णं नीलपीताभं पित्ताभः सार्यते द्रवम् ।
पूत्यम्लोद्गारहृत्कण्ठदाहारुचितृडर्दितः ॥ १५ ॥

तिखट पदार्थ, नवें धान्य, विदाही अन्न, आंबट व खारट पदार्थ, ह्यांच्या सेवनानें पित्त वाढून, जसें तापलेलें पाणी अग्नीला विझवितें, त्याप्रमाणें तें जठराग्नीला विझवितें. त्यामुळें त्या मनुष्याला अपक्क, निळया व पिवळया रंगाचा किंवा नुसत्या पिवळया रंगाचा व पातळ मळ होतो. आंबट व करपट ढेकर येते. हृदय व घसा ह्यांमध्यें जळजळतें आणि अरुचि व तहान हीं लक्षणें पित्तग्रहणीमध्यें होतात.

कफग्रहणीचें लक्षण.

गुर्वतिस्निग्धशीतादिभोजनादतिभोजनात् ।
भुक्तमात्रस्य च स्वप्नाद्धन्त्यग्निं कुपितः कफः ॥ १६ ॥
तस्यान्नं पच्यते दुःखं हृल्लासच्छर्द्यरोचकाः ।
आस्योपलेपमाधुर्यकासष्ठीवनपीनसाः ॥ १७ ॥
हृदयं मन्यते स्त्यानमुदरं स्तिमितं गुरु ।
दुष्टो मधुर उद्गारः सदनं स्त्रीष्वहर्षणम् ॥ १८ ॥
भिन्नामश्लेष्मसंसृष्टगुरुवर्चःप्रवर्तनम् ।
अकृशस्यापि दौर्बल्यमालस्यं च कफात्मके ॥ १९ ॥

जड, अतिशय स्निग्ध व थंड अशा प्रकारचें भोजन केल्यानें, अतिभोजन केल्यानें, जेवल्याबरोबर झोप घेतल्यानें, कुपित झालेला कफ जठराग्नीला मंद करितो. अशा मनुष्याचें अन्न पचन होत असतां पीडा होते. मळमळ, ओकारी, अरुचि, तोंड चिकट होणें, तोंडाला गुळमटपणा, खोकला, कफाचा बेडका येणें, पीनस, छा-

तोंत गच्च झाल्याप्रमाणें होणें, पोट स्तब्ध होणें, पोटाला जडत्व, अडखळत व मधुर असा ढेकर येणें, ग्लानि, कामवासना नष्ट होणें, भसरा, आम व कफमिश्र व जड असा मळ होणें, शरीर स्थूळ असूनही दुर्बळपणा, आणि आळस हीं लक्षणें कफग्रहणी-मध्यें होतात.

त्रिदोषग्रहणीचें लक्षण.

पृथग्वातादिनिर्दिष्टहेतुलिङ्गसमागमे ।
त्रिदोषं निर्दिशेदेवं तेषां वक्ष्यामि लक्षणम् ॥ २० ॥

वर वातादिग्रहणींचीं जीं कारणें व लक्षणें सांगितलीं आहेत, तींच सर्व त्रिदोषग्रहणीमध्यें होतात. त्यांचें लक्षण सांगतों—

आमसंग्रहणी.

अंत्रकूजनमालस्यं दौर्बल्यं सदनं भवेत् ।
द्रवं घनं सितं स्निग्धं सकटीवेदनं शकृत् ॥ २१ ॥
आमं बहु सपैच्छिल्यं सशब्दं मन्दकूजनम् ।
पक्षान्मासाद्दशाहाद्वा नित्यं वाऽपि प्रमुञ्चति ॥ २२ ॥
दिवा प्रकोपमायाति रात्रौ शान्तिं व्रजेच्च सा ।
दुर्विज्ञेया दुर्निवारा चिरकालानुबन्धिनी ॥ २३ ॥
सा भवेदामवातेन ग्रहणाद् ग्रहणी मता ।

पोटांत गुडगुडणें, आळस, अशक्तपणा व ग्लानि हीं लक्षणें होतात. पातळ, दाट, पांढरें, स्निग्ध, कटिवेदनांनीं युक्त, आम (अपक्व), पुष्कळ, अतिशय बुळबुळीत, शब्दयुक्त व किंचित् शूल-युक्त असें दहा दिवसांनीं, पंधरा दिवसांनीं, महिन्यानें किंवा नित्य शौचास होतें. दिवसा अधिक होतें व रात्रीं कमी असतें. ही ओळ-खण्यास फार कठीण असून बरी होण्यासही फार कठीण असते. ही फार दिवस राहाते. ही आम व वात दोष ह्यापासून होते. हिला आमसंग्रहणी असें म्हणतात.

असाध्य लक्षण.

संसृष्टा व्याधयो यस्य प्रतिलोमानुलोमगाः ॥ २४ ॥
आपन्नग्रहणीरोगः सोऽर्धमासं न जीवति ।

ज्यामध्यें उलट सुलट उपद्रव झाले आहेत, असा संग्रहणी-

रोग ज्याला झाला आहे तो पंधरा दिवस वांचत नाहीं.

घटीयंत्रसंग्रहणी.

स्वपतः पार्श्वयोर्यस्य गलज्जलघटध्वनिः ॥ २५ ॥
तं वदन्ति घटायन्त्रमसाध्यं ग्रहणीगदम् ।

निजलें असतां ज्याच्या कुशीमध्यें घागर ओतल्याप्रमाणें आवाज होतो, त्या संग्रहणीला घटीयंत्रसंग्रहणी असें म्हणतात. हीं असाध्य आहे.

अत्याहारस्य संक्षोभाद्विदग्धाहारमूर्छितात् ॥ २६ ॥
स्थानात्प्रमुच्यते श्लेष्मा आममित्यभिधीयते ।
अतिसारातिदिष्टानि ग्रहण्यामपि लक्षयेत् ॥ २७ ॥

अतिशय आहारामुळें क्षुब्ध झालेला व आहाराच्या विदग्धतेमुळें प्रकुपित झालेला कफ स्थानापासून सुटला म्हणजे त्याला आम असें म्हणतात. अतिसारामध्यें जीं लक्षणें सांगितलीं आहेत तीं संग्रहणींतही असतात.

बालके ग्रहणी साध्या यूनि कृच्छ्रा समीरिता ।
वृद्धे त्वसाध्या विज्ञेया मतं धन्वन्तरेरिदम् ॥ २८ ॥

लहान मुलाला झालेला संग्रहणी रोग साध्य असतो, तरुणाला झालेला कष्टसाध्य असतो आणि म्हाताऱ्या मनुष्याला झालेला असाध्य असतो, असें धन्वंतरीचें मत आहे.

वातग्रहणीवर उपचार.

ग्रहणीमाश्रितं दोषमजीर्णवदुपाचरेत् ।
अतिसारोक्तविधिना तस्यामं च विपाचयेत् ॥ १ ॥

ग्रहणीच्या आश्रयानें असलेल्या दोषांची अजीर्णाप्रमाणें चिकित्सा करावी. आणि अतिसाराच्या चिकित्सेमध्यें सांगितल्याप्रमाणें ग्रहणीसंबंधीं आमदोषाचें पाचन करावें.

पेयादिपञ्चलवणं पञ्चकोलादिभिर्युतम् ।
दीपनानि च तक्रं च ग्रहण्यां संप्रयोजयेत् ॥ २ ॥

पंचलवणें (सैंधव, संचळ, बिडलोण, सांबरलोण व मीठ) आणि पंचकोल (सुंठ, मिरीं, पिंपळी, चवक व चित्रक) यांनीं युक्त पेज वगैरे दीपक औषधें व ताक ह्यांची योजना संग्रणीवर करावी.

ज्ञात्वा तु परिपक्कं च वातजं ग्रहणीगदम् ।
दीपनैर्भेषजैः पक्कैः सर्पिर्भिः समुपाचरेत् ॥ ३ ॥

वातग्रहणी रोग पक्क झाला आहे असें पाहून दीपक औषधांनीं तयार केलेल्या तुपाची त्याजवर योजना करावी.

धान्याबिल्वबलाशुण्ठिशालिपर्णीशृतं जलम् ।
स्याद्वातग्रहणीदोषे सानाहे सपरिग्रहे ॥ ४ ॥

वातसंग्रहणी, पोट फुगणें व मलावरोध ह्यांजवर धने, बेलफळ, सुंठ, चिकणामूळ व सालवण ह्या द्रव्यांनीं शिजवून तयार केलेलें पाणी द्यावें.

पंचमूलादि घृत.

पञ्चमूल्यभयाव्योषपिप्पलीमूलसैन्धवैः ।
रास्नाक्षारद्वयाजाजीविडङ्गशटिभिर्घृतम् ॥ १ ॥
पक्केन मातुलुङ्गस्य स्वरसेनाऽऽर्द्रकस्य च ।
शुष्कमूलककोलाम्बुचुक्रिकादाडिमस्य च ॥ २ ॥
तक्रमस्तुसुरामण्डसौवीरकतुषोदकैः ।
काञ्जिकेन च तत्पक्त्वा पीतमाग्निकरं परम् ॥
शूलगुल्मोदरानाहकार्श्यानिलगदापहम् ॥ ३ ॥

पंचमूळें (सालवण, पिठवण, रिंगणमूळ, डोरलीमूळ व गोखरुमूळ), हिरडेदळ, सुंठ, मिरीं, पिंपळीं, पिंपळमूळ, सैंधेलोण, रास्ना, जवखार, सज्जीखार, जिरें, वावडिंग व कचोरा, ह्या द्रव्याचा कल्क, पिकलेल्या महाळुंगाचा रस, आल्याचा रस, वाळलेल्या मुळ्यांचा काढा, बोरांचा काढा, चुका व डाळिंब ह्यांचा रस, ताक, दह्याची निवळ, मद्याची निवळ, सौवीर, तुषांबु, व कांजी ह्यांमध्यें तूप सिद्ध करावें. याला पंचमूळादि घृत असें म्हणतात. हें सेवन केलें असतां अग्नि प्रदीप्त करितें. शूळ, गुल्म, उदर, पोट फुगणें, कृशत्व व वातरोग यांचा नाश करितें.

शुंठीघृत.

घृतं नागरकल्केन सिद्धं वातानुलोमनम् ।
ग्रहणीपाण्डुरोगघ्नं प्लीहकासज्वरापहम् ॥ १ ॥

सुंठीचा कल्क घालून सिद्ध केलेलें तूप वाताला मार्गावर आणतें; व संग्रहणी, पांडुरोग, पांथरी, खोकला व ज्वर ह्यांचा नाश करितें.

रसांजनादि चूर्ण.

रसाञ्जनं प्रतिविषा वत्सकस्य फलत्वचौ ।
नागरं धातकी चैवं सक्षौद्रं तण्डुलाम्बुना ॥
पित्तग्रहणीदोषार्शोरक्तपित्तातिसारनुत् ॥ १ ॥

रसांजन, अतिविष, कुडयाची साल, इंद्रजव, सुंठ, धायटीचीं फुलें, ह्यांचें समभाग चूर्ण करावें. ह्याला रसांजनादि चूर्ण म्हणतात. हें तांदुळाचें धुवण व मध ह्यांतून घ्यावें. हें पित्तसंग्रहणी, मूळव्याध, रक्तपित्त व अतिसार ह्यांचें नाशक आहे.

श्रीफलशलाटुकल्को नागरचूर्णेन मिश्रितः सगुडः ।
ग्रहणीगदमत्युग्रं तक्रभुजा शीलितो जयति ॥ १ ॥

बेलफळ व टेट्रूमूळ ह्यांचा करक सुंठीची पूड व गूळ ह्यांशीं घेऊन ताकाशीं जेवण करावें; म्हणजे अति उग्र अशा संग्रहणीचा नाश होतो.

नागरातिविषामुस्तं धातकी सरसाञ्जनम् ।
वत्सकत्वक्फलं बिल्वं पाठा तिक्तकरोहिणी ॥ २ ॥
पिबेत्समांशं तच्चूर्णं सक्षौद्रं तण्डुलाम्बुना ।
पित्तजे ग्रहणीदोषे रक्तं यश्चोपवेश्यते ॥ ३ ॥
अर्शांसि हृद्रुजं शूलं जयेच्चैव प्रवाहिकाम् ।
नागराद्यमिदं चूर्णं कृष्णात्रेयेण पूजितम् ॥ ४ ॥

सुंठ, अतिविष, नागरमोथे, धायटीचीं फुलें, रसांजन, कुडयाची साल, इंद्रजव, बेलफळ, पहाडमूळ, काडेचिराईत व कुटकी ह्यांचें समभाग चूर्ण करून तांदुळाचें धुवण व मध ह्यांशीं घ्यावें. म्हणजे पित्तसंग्रहणी, रक्त पडणें, मूळव्याध, हृद्रोग, शूल व प्रवाहिका ह्यांचा नाश होतो. हें नागरादि चूर्ण कृष्णात्रेय मुनीला मान्य आहे.

भूनिम्बकटुकाव्योषमुस्तानिन्द्रयवान्समान् ।
द्वौ चित्रकान्वत्सकत्वग्भागान्षोडश चूर्णयेत् ॥ १ ॥
गुडशीताम्बुना पीतं ग्रहणीपित्तदोषनुत् ।
कामलाज्वरपाण्डुघ्नं मेहतीव्रातिसारनुत् ॥ २ ॥

काडेचिराईत, कुटकी, सुंठ, मिरीं, पिंपळी, नागरमोथे व इंद्रजव हीं द्रव्यें समभाग, चित्रक दोन भाग आणि कुडयाची साल सोळा भाग ह्यांचें चूर्ण करावें, आणि गूळ व थंड पाणी ह्यांशीं

सेवन करावें. म्हणजे पित्तजन्य संग्रहणीचा नाश होतो. शिवाय हें चूर्ण कावीळ, ज्वर, पांडुरोग, प्रमेह व तीव्र अतिसार ह्यांचा नाश करितें.

कफसंग्रहणीची चिकित्सा.

शटी व्योषाभयं क्षारौ ग्रन्थिकं बीजपूरकम् ।
लवणाम्लाम्बुना पेयं श्लैष्मिके ग्रहणीगदे ॥ १ ॥

कचोरा, सुंठ, मिरीं, पिंपळी, हिरडेदळ, सज्जीखार, जवखार, पिंपळमूळ व महाळुंग ह्यांचें चूर्ण कफसंग्रहणीवर मीठ व पाणी ह्यांशीं द्यावें.

रास्नादि चूर्ण.

रास्ना पथ्या शटी व्योषं द्वौ क्षारौ लवणानि च ।
ग्रन्थिकं मातुलुंगस्य रसमेकत्र चूर्णयेत् ॥
पिबेदुष्णेन तोयेन श्लैष्मिके ग्रहणीगदे ॥ २ ॥

रास्ना, हिरडेदळ, कचोरा, सुंठ, मिरीं, पिंपळी, सज्जीखार, जवखार, सैंधेलोण, पादेलोण, बिडलोण, सांबरलोण, मीठ व पिंपळमूळ ह्या सर्वांचें चूर्ण करून त्याला महाळुंगाच्या रसाची भावना द्यावी. आणि हें चूर्ण कफसंग्रहणीवर ऊन पाण्याशीं द्यावें.

सामान्य संग्रहणीची चिकित्सा.

शुण्ठीं समुस्तातिविषां गुडूचीं पिबेज्जलेन क्थितां समांशाम् ।
मन्दानलत्वे सततामवाते सामानुबन्धे ग्रहणीगदे च ॥ १ ॥

सुंठ, अतिविष, नागरमोथे व गुळवेल हीं द्रव्यें समभाग घेऊन त्यांचा काढा करून तो अग्निमांद्य, आमवात व आमयुक्त संग्रहणी ह्या विकारांवर द्यावा.*

चित्रकादि गुटिका.

चित्रकं पिप्पलीमूलं द्वौ क्षारौ लवणानि च ।
व्योषं हिङ्ग्वजमोदा च चव्यमेकत्र चूर्णयेत् ॥ १ ॥
गुटिका मातुलुङ्गस्य दाडिमस्य रसेन वा ।

---

* धने, सुंठ, अतिविष, बेलफळ, धायटीचीं फुलें, नागरमोथे, कुडयाची साल, वाळा व कोवळें डाळिंब ह्यांचा काढा मध घालून घ्यावा. तो आमातिसार व संग्रहणी ह्यांचा नाश करतो. (लेखी प्रत)

कृता विपाचयत्यामं दीपयत्याशु चानलम् ॥ १ ॥

चित्रक, पिंपळमूळ, सज्जीखार, जवखार, सैंधव, संचळ, बिड-लोण, सांबरलोण, मीठ, सुंठ, मिरीं, पिंपळीं, हिंग, ओवा व चवक ह्यांचें समभाग चूर्ण एकत्र करून महाळुंगाच्या अथवा डाळिं-बाच्या रसांत गोळ्या कराव्या. ह्या आमाचें पाचन करितात व जठराग्नि प्रदीप्त करितात.

चूर्णं चव्यकचित्रश्रीविश्वभेषजनिर्मितम् ।
तक्रेण सहितं हन्ति ग्रहणीं दुःखकारिणीम् ॥ १ ॥

चवक, चित्रक, कोवळें बेलफळ व सुंठ ह्यांचें चूर्ण ताकाशीं घेतलें असतां तें दुःखकारक संग्रहणीचा नाश करितें.

भल्लातक क्षार.

भल्लातकं त्रिकटुकं त्रिफला लवणत्रयम् ।
अन्तर्धूमं द्विपलिकं गोपुरीषाग्निना दहेत् ॥ २ ॥
स क्षारः सर्पिषा पीतो भोज्ये वाऽप्यवचूर्णितः ।
हृद्रोगपाण्डुग्रहणीगुल्मोदावर्तशूलनुत् ॥ ३ ॥

बिब्बे, सुंठ, मिरीं, पिंपळी, हिरडा, बेहडा, आवळकाठी, सेंधे-लोण, पादेलोण व बिडलोण हे जिन्नस आठ आठ तोळे घेऊन शरावसंपुटांत घालून गाईच्या शेणींत अंतर्धूमानें राख करावी. नंतर चूर्ण करून हा क्षार जेवणाच्या वेळीं तुपाबरोबर घ्यावा. म्हणजे हृद्रोग, पांडुरोग, संग्रहणी, गुल्म, उदावर्त व शूळ ह्यांचा तो नाश करतो.

सप्ताहं वा दशाहं वा मासं मासार्धमेव वा ।
बलकालविभागज्ञो भिषक् तक्रं प्रयोजयेत् ॥ १ ॥
न तक्रदानात्प्रभवन्ति रोगा न तक्रसेवी व्यथते कदाचित् ।
यथा सुराणाममृतं प्रधानं तथा नराणां भुवि तक्रमाहुः ॥ २ ॥
तक्रं नोरःक्षते दद्यान्नोष्णकाले न दुर्बले ।
न मूर्छाभ्रमदाहे च न रोगे रक्तपैत्तिके ॥ ३ ॥

वैद्यानें रोग्याचें बल व काल ह्यांचा विचार करून सात, दहा, पंधरा दिवस किंवा एक महिनापर्यंत ताकाची योजना करावी. ताक दिलें असतां रोग होत नाहींत. ताक सेवन करणारा मनुष्य

कधींही आजारी होत नाहीं. जसें देवांना अमृत प्रधान आहे तसें ह्या पृथ्वीवर मनुष्याला ताक हें मुख्य आहे. उन्हाळ्यामध्यें ताक सेवन करूं नये. उरःक्षती रोग्याला ताक देऊं नये. अशक्त मनुष्याला ताक देऊं नये. भ्रम, मूर्च्छा, दाह (पित्तजन्य) व रक्तपित्त ह्या रोगांतही ताक देऊं नये.

ग्रहणीदोषिणां तक्रं दीपनं ग्राहि लाघवात् ।
पथ्यं मधुरपाकित्वान्न च पित्तप्रदूषणम् ।
कषायोष्णविकाशित्वाद्रूक्षत्वाच्च कफे हितम् ॥ १ ॥
वाते स्वाद्वम्लसांद्रत्वात्सद्यःकामविदाहि तत् ।
अरुचौ मातुलुङ्गस्य केसरं साज्यसैन्धवम् ।
दद्याद्भोजनकाले तु प्रातस्तक्रं च रोगिणाम् ॥ २ ॥

ताक हें दीपक, ग्राहक व हलकें असल्यामुळें संग्रहणीच्या रोगाला पथ्यकारक आहे. तें मधुर व विपाकी असल्यामुळें पित्ताचा प्रकोप होऊं देत नाहीं. तुरट, उष्ण, विकाशी व रूक्ष असल्यामुळें कफदोषाला पथ्यकारक आहे. आंबट, गोड व दाट असल्यामुळें तें वातालाही हितकारक आहे. आणि कामेच्छानाश करणारें आहे. संग्रहणीच्या रोग्याला अरुचि दूर होण्याकरितां जेवणाचे वेळीं महाळुंगाचें केशर, तूप व सैंधव खाण्यास द्यावें, आणि ताक सकाळचे प्रहरीं पिण्यास द्यावें.

दहनाजमोदसैन्धवनागरमरिचं पिबाम्लतक्रेण ।
सप्ताहादग्निबलं ग्रहण्यतीसारशूलघ्नम् ॥ ३ ॥

चित्रकमूळ, ओवा, सैंधव, सुंठ व मिरीं ह्यांचें चूर्ण आंबट ताकाशीं घ्यावें, म्हणजे सात दिवसांत अग्नि प्रदीप्त होऊन संग्रहणी, अतिसार व शूल ह्यांचा नाश होतो.

तक्रहरीतकी.

त्रिकंसे तक्रस्य द्विकुडवपटोः षष्टिरभयाः
पचेद्धस्थ्यः सार्धं घृततिलजविश्वाग्निकुडवैः ।
समावाप्याजाजीमरिचचपलादीप्यकपलै-
र्लिहन्सन्नं वह्निं द्रढयति विकारांश्च जयति ॥ ४ ॥

सातशें अडुसष्ट तोळे ताकामध्यें बत्तीस तोळे मीठ व साठ हिरडे घालून पचन करावें. हिरडे शिजल्यावर त्यांतील बिया

काढून टाकून तूप, तिळाचें तेल, सुंठ व चित्रकमूळ ह्यांचें चूर्ण सोळा सोळा तोळे घालून मिरीं, जिरें, पिंपळी व ओवा ह्यांचें चूर्ण चार चार तोळे घालावें. आणि शिजविलेल्या हिरड्याचीं टरफलें बारीक वाटून त्यांत टाकावीं, आणि कढवावें. लेहाप्रमाणें झाल्यावर तो यथाशक्ति भक्षण करावा. ह्याला तक्रहरितकी म्हणतात. हा अग्नि प्रदीप्त करतो, आणि संग्रहणीसंबंधीं विकारांचा नाश करतो.

कल्याणक अवलेह.

पाठाधान्ययवान्यजाजिहपुषाचव्याग्निसिन्धूद्भवैः
सश्रेयस्यजमोदकीटरिपुभिः कृष्णाजटासंयुतैः ।
सव्योषैः सफलत्रिकैः सतृटिभिस्त्वकपत्रकैरौषधै-
रित्यक्षप्रमितैः सतैलकुडवैः सार्धं त्रिवृन्मुष्टिभिः ॥ १ ॥
पतैरामलकीरसस्य तुलया सार्धं तुलार्धं गुडात्
पक्तव्यं भिषजावलेहवदयं प्राग्भोजनाद्भक्षितः ।
ये केचिद्ग्रहणीगदाः सगुदजाः कासाः सशोषामयाः
सश्वासाः श्वयथुस्वरोदररुजः कल्याणकस्ताञ्जयेत् ॥ २ ॥

पहाडमूळ, धने, ओवा, जिरें, शेरणी, चवक, चित्रक, सैंधेलोण, गजपिंपळी, अजमोदा, वावडिंग, पिंपळमूळ, सुंठ, मिरीं, पिंपळी, हिरडा, बेहडा, आवळकाठी, वेलची, दालचिनी व तमालपत्र हीं औषधें तोळा तोळा घेऊन त्यांचें चूर्ण करावें. नंतर आवळ्याचा रस चारशें तोळे घेऊन त्यांत दोनशें तोळे गूळ घालून पाक करावा व त्यांत तें चूर्ण आणि सोळा तोळे तेल व आठ तोळे नळीचे तेडाचें चूर्ण हे सर्व जिन्नस घालून लेहाप्रमाणें पाक करावा. आणि जेवणापूर्वीं भक्षण करावा. ह्याला कल्याणकावलेह म्हणतात. हा संग्रहणी रोग, मूळव्याध, खोकला, क्षयरोग, श्वास, सूज, स्वरभेद व उदर रोग ह्यांना जिंकतो.

भूनिम्बकौटजकटुत्रिकमुस्ततिक्ताः
कर्षांशकाः सशिखिमूलपिचुद्वयाश्च ।
त्वक्कौटजा पलचतुष्कमिता गुडाम्भः
पीतं नृणामिह हरेद्ग्रहणीविकारान् ॥ १ ॥

काडेचिराईत, इंद्रजव, सुंठ, मिरीं, पिंपळी, नागरमोथे आणि

कुटकी हीं औषधें एक एक तोळा, चित्रकमूळ दोन तोळे आणि कुडयाची साल सोळा तोळे ह्यांचें चूर्ण करून तें गूळपाण्याशीं घ्यावें. हें संग्रहणीचा नाश करितें.

बिल्वाब्दशक्रयववालकमोचासिद्ध-
माजं पयः पिबति यो दिवसत्रयं च ।
सोऽतिप्रवृद्धचिरकृद्ग्रहणीविकारं
मांसं सशोणितमसाध्यमपि क्षिणोति ॥ २ ॥

कोवळें बेलफळ, नागरमोथे, इंद्रजव, वाळा व मोचरस ह्या औषधांनीं सिद्ध केलेलें शेळीचें दूध जो तीन दिवस प्राशन करतो त्याचा अतिशय वाढलेला रक्तगत किंवा मांसगत झालेला असा असाध्य संग्रहणी रोग देखील दूर होतो.

व्योषं दीप्याजमोदाकृमिरिपुदहनं रामठं चाश्वगन्धं
सिन्धूत्थं जीरके द्वे रुचकपलयुतं धान्यकं तुल्यभागम् ।
भृङ्गीचूर्णं लवङ्गं घृतमधुसहितं शाणमात्रं च दद्या-
द्दीप्तिं पुष्टिं च कान्तिं बलमपि कुरुते नाशयेत्संग्रहण्याम् ॥ ३

सुंठ, मिरें, पिंपळी, ओवा, अजमोदा, वावडिंग, चित्रकमूळ, हिंग, अश्वगंध, सैंधेलोण, जिरें, शहाजिरें, महाळुंगांतील केशर, व धने हीं सर्व औषधें समभाग घेऊन चूर्ण करून तें भांगेचें चूर्ण, लवंगाचें चूर्ण, तूप व मध ह्यांशीं तीन मासेपर्यंत द्यावें. हें अग्नि प्रदीप्त करितें. शरीर पुष्ट करितें; कांति व बल वाढवितें, आणि संग्रहणीचा नाश करितें.

वृद्धगंगाधर चूर्ण.

मुस्ताबालकलोध्रवत्सकवृकीविश्वारलुश्रीमदा-
लज्जामोचरसाम्रकौटजविषाचूर्णस्तु गङ्गाधरः ।
पीतस्तण्डुलवारिमाक्षिकयुतः कर्षान्मितो वाहिका-
मुग्रां च ग्रहणीं निहन्ति सहसा सर्वातिसारामयान् ॥ १ ॥

नागरमोथे, वाळा, लोध्र, कुडा, पहाडमूळ, सुंठ, टेंटूमूळ, बेलफळांतील गर, धायटीचीं फुलें, लाजाळू, मोचरस, आंब्याची कोय, इंद्रजव व अतिविष ह्या औषधांचें समभाग चूर्ण करावें. ह्याला वृद्धगंगाधर चूर्ण म्हणतात. हें तांदुळाचें धुवण व मध ह्यांज-

बरोबर एक तोळा प्रमाणानें घ्यावें; म्हणजे उग्र प्रवाहिका तशीच संग्रहणी व सर्व अतिसार यांचा तें नाश करितें.

तालिसादि चूर्ण.

तालीसोग्रतुगाषडूषणनिशाबिल्वाजमोदासटी-
चातुर्जातलवङ्गधातकिविषाजातीफलं दीप्यकम् ।
पाठा मोचरसाल्लपञ्चलवणाजाजीद्वयं वेल्लकं
वृक्षाम्लाम्लवरापलाशतरुजं मांस्यम्बुदं वालुकम् ॥ १ ॥
ऐन्द्री ब्रह्मसुवर्चला दृढपदा कुष्ठं समंतैः समं
बल्या सर्वसमा जयाऽखिलसमा मत्स्यण्डिका वा सिता।
चूर्णोऽयं ग्रहणीक्षयादिकसनश्वासारुचिप्लीहहृद्-
दुर्नामातिसृतिज्वरार्तिपवनस्थौल्यप्रमेहप्रणुत् ॥ २ ॥
तीव्रापस्मृतिपाण्डुगुल्मजठरश्लेष्मोत्थपित्तोद्भवो-
न्मादध्वंसविधायको विजयते सर्वामयध्वंसकः ।
बालानां च विशेषतो हितकरः संस्पष्टवाणीप्रदः
पुष्ट्यायुर्बलकान्तिधीस्मृतिमहामेधाविलासप्रदः ॥ ३ ॥

तालीसपत्र, वेखंड, वंशलोचन, सुंठ, मिरीं, पिंपळीं, पिंपळी-मूळ, चवक, चित्रक, हळद, बेलफळ, अजमोदा, कचोरा, दाल-चिनी, तमालपत्र, वेलदोडे, नाकेशर, लवंग, धायटीचीं फुलें, अतिविष, जायफळ, ओवा, पहाडमूळ, मोचरस, धने, सैंधेलोण, पादेलोण, बिडलोण, काचलवण (बांगडखार), मीठ, जिरें, शहाजिरें, वावडिंग, आमसुलें (कोणाच्या मतें गोरखचिंच), आम्लवेतस, हिरडा, बेहडा, आवळकाठी, पळसाचें बीं, जटामांसी नागरमोथे, वाळा[1], इंद्रजव, ब्रह्मसुवर्चला (ब्राह्मी), शंखपुष्पी व कोष्ट, हीं सर्व समभाग, सर्वांबरोबर थोर चिकणामूळ, सर्वांच्या बरोबरीनें भांग आणि एकंदर औषधांच्या बरोबरीनें खडीसाखर किंवा पिठीसाखर घेऊन सर्वांचें चूर्ण करून ठेवावें. ह्याला तालि-सादि चूर्ण असें म्हणतात. हें संग्रहणी, क्षय खोकला, श्वास, अरुचि, पांथरी, मूळव्याध, अतिसार, ज्वर, वात, स्थूलपणा, प्रमेह,

---

१. 'वालुकं' ह्या ठिकाणीं 'वालकं' असा पाठ बहुतेक प्रतींत असून तोच बरा असा वाटल्यावरून 'वाळा' असा अर्थ लिहिला आहे.

तीव्र अपस्मार, पांडुरोग, गुल्म, उदर, कफात्मक किंवा पित्तजन्य उन्माद ह्यांचा नाश करितें. आणि सर्व रोगांना हें चूर्ण जिंकतें. हें विशेषतः लहान मुलांना हितकारक असून वाणी स्पष्ट करणारें आहे. तसेंच पुष्टि, आयुष्य, बल, कांति, बुद्धि, आणि उत्तम धारणाशक्ति ह्यांना देणारें आहे.

जातिफलादि चूर्ण.

जातीफललवङ्गैलापत्रत्वङ्नागकेसरैः ।
कर्पूरचन्दनतिलैस्त्वक्क्षीरीतगरामलैः ॥ १ ॥
तालीसपिप्पलीपथ्यास्थूलजीरकचित्रकैः ।
शुण्ठीविडङ्गमरिचैः समभागैर्विचूर्णितैः ॥ २ ॥
यावन्त्येतानि सर्वाणि दद्याद्भंगां च तावतीम् ।
सर्वचूर्णसमा देया शर्करा सुभिषग्वरैः ॥ ३ ॥
कर्षमात्रं ततः खादेन्मधुना प्लावितं सुधीः ।
अस्य प्रभावाद् ग्रहणीकासश्वासारुचिक्षयाः ।
वातश्लेष्मप्रतिश्यायाः प्रशमं यान्ति वेगतः ॥ ४ ॥

जायफळ, लवंग, वेलदोडे, तमालपत्र, नाकेशर, कापूर, चंदन, लोध्र[1], वंशलोचन, तगर, आवळकाठी, तालीसपत्र, पिंपळी, हिरडे-दळ, मोठें जिरें, चित्रकमूळ, सुंठ, वावडिंग व मिरीं, ह्या सर्वांचें समभाग चूर्ण करावें. आणि सर्व चूर्णाच्या बरोबरीनें भांगेचें चूर्ण मिसळावें. आणि सर्व चूर्णाच्या बरोबरीनें साखर मिसळावी. हें चूर्ण एक तोळापर्यंत मधाशीं घ्यावें. ह्याला "जातिफलादि चर्ण" म्हणतात. ह्याच्या प्रभावानें संग्रहणी, श्वास, खोकला, अरुचि, क्षय व वातकफात्मक पडसें हे विकार बरे होतात.

बिल्वादि घृत.

बिल्वाग्निचव्यार्द्रकशृङ्गबेरक्काथेन कल्केन च सिद्धमाज्यम् ।
सच्छागदुग्धं ग्रहणीगदोत्थे शोफाग्निसादारुचिनुद्वरं तत् ॥ १ ॥

बेलफळ, चित्रकमूळ, चवक, सुंठ व आलें ह्यांचा काढा आणि

---

१. "तिलैः" ह्या ठिकाणीं "लोध्र" असा पाठभेद बहुतेक प्रतींतून असून तोच योग्य वाटल्यावरून त्याला अनुसरून "लोध्र" असा अर्थ लिहिला आहे.

त्यांचाच कल्क ह्यांनीं तूप सिद्ध करावें. ह्याला बिल्वादिघृत म्हणतात. हें शेळीच्या दुधाशीं द्यावें, म्हणजे संग्रहणी, सूज व अग्निमांद्य व अरुचि ह्यांचा नाश करितें.

कृच्छ्रेण कठिनत्वेन यः पुरीषं विमुंचति ।
सघृतं लवणं तस्य पाययेत्क्लेशशान्तये ।
बिडं यवानीं विष्टम्भे पिबेदुष्णेन वारिणा ॥ २ ॥

ज्याला कष्टानें कठीण (खड्यासारखा) मळ होतो त्याला ती पीडा दूर होण्याकरितां तुपाशीं मीठ पाजावें; आणि ज्याला शौचास अवरोध होतो, त्याला बिडलोण व ओवा ह्यांचें चूर्ण ऊन पाण्याशीं द्यावें.

द्राक्षासव.

मृद्वीकायाः पलशतं जतुर्द्रोणेऽम्भसः पचेत् ।
द्रोणशेषे तु शीते च पूते तस्मिन्प्रदापयेत् ॥ १ ॥
द्विशते क्षौद्रखण्डाभ्यां धातक्याः प्रस्थमेव च ।
कङ्कोलकलवङ्ग च जातीसस्यं तथैव च ॥ २ ॥
पलांशकानि मरिचं त्वगेलापत्रकेसरम् ।
पिप्पली चित्रकं चव्यं पिप्पलीमूलरेणुकम् ॥ ३ ॥
घृतभाण्डस्थितमिदं चन्दनागुरुधूपितम् ।
कर्पूरवासितो ह्येष ग्रहणीदीपनः परम् ॥ ४ ॥
अर्शसां नाशनः श्रेष्ठ उदावर्तास्रगुल्मनुत् ।
जठरक्रिमिकुष्ठानि व्रणांश्च विविधांस्तथा ॥ ५ ॥
अक्षिरोगशिरोरोगगलरोगविनाशनः ।
ज्वरमामं महाव्याधिं पाण्डुरोगं सकामलम् ।
नाम्ना द्राक्षासवो ह्येष बृंहणो बलवर्णकृत् ॥ ६ ॥

चारशें तोळे मनुका चाळीसशें शहाणव तोळे पाण्यांत शिजवून दहाशें चोवीस तोळे (चतुर्थांश) उरल्यावर चुलीवरून उतरून निवाल्यावर तो काढा गाळून घ्यावा. आणि त्यांत दोनशें तोळे मध व चारशें तोळे खडीसाखर, आणि चौसष्ट तोळे धायटीच्या फुलांचें चूर्ण घालावें. शिवाय कंकोळ, लवंग, जायफळ, मिरीं, दालचिनी, वेलदोडे, तमालपत्र, नाकेशर, पिंपळी, चित्रकमूळ, चवक, पिंपळमूळ व रेणुकबीज ह्या औषधांचें चूर्ण चार चार तोळे घालून तुपानें

राबलेल्या व चंदन, अगर व कापूर यांनीं सुवासित केलेल्या भांड्यांत भरून (कांहीं दिवस जमिनींत पुरून नंतर काढून) ठेवावें. हें उत्तम संग्रहणीनाशक आहे. मूळव्याध, उदावर्त, रक्तगुल्म, उदर, कृमि, कुष्ट, अनेक प्रकारचे व्रण, नेत्ररोग, शिरोरोग, गलरोग, ज्वर, आमांश, महाव्याधि, पांडुरोग, कावीळ, ह्यांचा नाश करितें. ह्याला द्राक्षासव असें म्हणतात. हें पौष्टिक, बल व कांतिदायक आहे.

चतुर्मूर्ति रस.

सूतकं गन्धकं लोहं विषं चित्रकपत्रकम् ।
वरारी रेणुका मुस्ता एला ग्रन्थिककेशरम् ॥ १ ॥
फलत्रयं त्रिकटुकं शुल्बभस्म तथैव च ।
एतानि समभागानि सूक्ष्मचूर्णानि कारयेत् ॥ २ ॥
ग्रहण्यां पाण्डुरोगे च दातव्यं मधुना सह ।
अतिसारे क्षये कासे प्रमेहे विषमज्वरे ।
नानानुपानैर्दातव्यश्चतुर्मूर्ती रसोत्तमः ॥ ३ ॥

पारा, गंधक, लोह, चित्रकमूळ, तमालपत्र, वावडिंग, खैराची साल, रेणुकबीज, नागरमोथे, वेलदोडे, पिंपळमूळ, नाकेशर, त्रिफळा, सुंठ, मिरीं, पिंपळी व ताम्रभस्म हीं सर्व समभाग घेऊन बारीक चूर्ण करून ठेवावें. ह्याला चतुर्मूर्ति रस म्हणतात. हा अनेक अनुपानें योजून द्यावा. संग्रहणी व पाडुरोग ह्यांजवर हा मधाशीं द्यावा. तसेंच अतिसार, क्षय, खोकला, प्रमेह व विषमज्वर ह्यांजवरही ह्याची योजना करावी.

सुवर्णरसपर्पटी.

शुद्धसूतं पलमितं तुर्यांशस्वर्णसंयुतम् ।
मर्दयेन्निम्बुनीरेण यावदेकत्वमाप्नुयात् ॥ १ ॥
प्रक्षाल्योष्णाम्बुना पश्चात्पलमात्रे तु गन्धके ।
द्रुते लोहमये पात्रे बादरानलयोगतः ॥ २ ॥
प्रक्षिप्य चालयेल्लोह्यां मन्दं लोहशलाकया ।
ततः पाकं विदित्वा तु रम्भापत्रे शनैः क्षिपेत् ॥ ३ ॥
गोमयस्थे तदुपरि रम्भापत्रेण यंत्रयेत् ।
शीतं तच्चूर्णितं गुञ्जाक्रमवृद्धं निषेवयेत् ॥ ४ ॥

माषमात्रं भवेद्यावत्ततो मात्रां न वर्धयेत् ।
सक्षौद्रेणोषणेनैव लेहयेद्भिषगुत्तमः ॥ ५ ॥
ग्रहणीं हन्ति शोषं च सुवर्णरसपर्पटी ।
सद्योबलकरी शुक्रवर्धिनी वह्निदीपनी ।
क्षयकासश्वासमेहशूलातीसारपाण्डुनुत् ॥ ६ ॥

चार तोळे शुद्ध पारा व एक तोळा सुवर्णाचा कीस ह्या दोघांचा लिंबाच्या रसांत एकजीव होईपर्यंत खल करावा. व ऊन पाण्यानें धुवून टाकावा. नंतर चार तोळे शुद्ध गंधक एका लोखंडाच्या पात्रांत घालून चुलीवर ठेवून खालीं बोरीच्या लाकडाचा अग्नि लावावा. गंधक पातळ झाल्यावर त्यांत वरील पारा व सोनें ह्यांचें मिश्रण टाकून लोखंडाच्या सळईनें हळू हळू ढवळावें. पक्क होऊन सर्वांचें सारखें मिश्रण झाल्यावर गाईच्या ताजा शेणावर केळाच पान ठेवून त्याजवर तें ओतून लागलेंच वर केळीचें दुसरें पान झांकून दाबावें. थंड झाल्यावर काढून खलून चूर्ण करून ठेवावें. आणि एक गुंजेपासून क्रमवृद्धीनें सेवन करावें. तें एक मासापर्यंत वाढवावें, त्यापुढें वाढवूं नये. ह्याला सुवर्णरसपर्पटी म्हणतात. ही मिऱ्याची पूड व मध ह्यांशीं द्यावी. ही संग्रहणी व क्षय ह्यांचा नाश करिते. तात्काळ शक्ति वाढविते. ही शुक्रवर्धक व अग्निदीपक असून क्षय, खोकला, श्वास, प्रमेह, शूल, अतिसार व पांडुरोग ह्यांचा नाश करिते.

ग्रहणीकपाट रस.

तारमौक्तिकहेमानि सारश्चैकैकभागिकम् ।
द्विभागो गन्धकः सूतस्त्रिभागो मर्दयेदिमान् ॥ १ ॥
कपित्थस्वरसैर्गाढं मृगशृङ्गे ततः क्षिपेत् ।
पुटेन्मध्यपुटेनैव तत उद्धृत्य मर्दयेत् ॥ २ ॥
बलारसैः सप्तवेलमपामार्गरसैस्त्रिधा ।
लोध्रप्रतिविषामुस्तधातकीन्द्रयवामृताः ॥ ३ ॥
प्रत्येकमेतत्स्वरसैर्भावना स्यात्त्रिधा त्रिधा ।
माषमात्रं रसो देयो मधुना मरिचैस्तथा ॥ ४ ॥
हन्यात्सर्वानतीसारान्ग्रहणीं सर्वजामपि ।
कपाटो ग्रहणीरोगे रसोऽयं वह्निदीपनः ॥ ५ ॥

चांदी, मोतीं व सोनें ह्यांचीं भस्में एक एक भाग, गंधक दोन भाग व पारा तीन भाग ह्या सर्वांचा कवठाच्या रसांत खल करून तें मिश्रण हरिणाच्या शिंगांत भरावें. नंतर मध्यमपुट देऊन काढून मर्दन करावें, आणि चिकण्याच्या रसाच्या सात भावना द्याव्या. नंतर आघाड्याच्या रसाच्या तीन भावना देऊन लोध्र, अतिविष, नागरमोथा, धायटीचीं फुलें, इंद्रजव व गुळवेल, ह्या प्रत्येकाच्या स्वरसाच्या तीन तीन भावना द्याव्या. नंतर हा रस एका उडदाइतका मध व मिऱ्याची पूड ह्यांशीं द्यावा. हा सर्व अतिसार व सर्व दोषांपासून होणारी संग्रहणी ह्यांचा नाश करतो. हा ग्रहणीकपाट रस अग्निदीपक आहे.

दुसरा ग्रहणीकपाट रस.

रसेन्द्रगन्धातिविषाभयाभ्रं क्षारत्रयं मोचरसो वचा च ।
जया च जम्बीररसेन पिष्टं पिण्डीकृतं स्याद् ग्रहणीकपाटः॥१॥

पारा, गंधक, अतिविष, हिरडेदळ, अभ्रकभस्म, सज्जीखार, जवखार, टांकणखार, मोचरस, वेखंड व भांग ह्यांचा लिंबाच्या रसांत खल करून गोळ्या कराव्या. ह्याला ग्रहणीकपाटरस म्हणतात.

शुद्धः कर्कवराटकैर्गणनया भल्लातकांस्तत्समान्।
श्रोतान् बब्बुलकण्टकैर्लघुपुटैः पक्त्वांत्रिभागं रसम् ।
लेलीतेन समं विचूर्ण्य जयया सप्तानुभाव्यं शिव-
प्रोक्तोऽयं ग्रहणीकपाटकरसस्त्रैवल्लकस्त्वौषधैः ॥ १ ॥

शुद्ध केलेल्या पांढऱ्या मोठ्या कवड्या घेऊन त्या जितक्या असतील तितकेच बिब्बे घेऊन त्या बिब्यांना बाभळीच्या काट्यानें टोंचून कवड्यांसह त्यांना लघुपुट देऊन काढून घ्यावें. नंतर त्यांच्या चतुर्थांश पारा घेऊन त्याच्याबरोबर गंधक घ्यावा आणि सर्वांचा एकत्र खल करून भांगेच्या रसाच्या सात भावना द्याव्या. ह्याला ग्रहणीकपाट रस म्हणतात. हा शिवानें सांगितला आहे. हा अनुपान योजून तीन वालपर्यंत द्यावा.

ग्रहणीगजकेसरी रस.

गन्धं पारदमभ्रकं च दरदं लोहं च जातीफलं
बिल्वं मोचरसं विषं प्रतिविषां व्योषं तथा धातकीम् ।

भंगामव्यभयां कपित्थजलदौ दीप्यानलौ दाडिमं
टङ्काद्भस्म कलिङ्गकान्कनकजं बीजं च पक्षेक्षणम् ॥ १ ॥
एतत्तुर्यमफेनमेतदखिलं संमर्द्य संचूर्णये-
द्धत्तूरच्छदजै रसैश्च मतिमान्कुर्यान्मरीचाकृतिम् ।
दत्ता सा ग्रहणीगदं सरुधिरं सामं सशूलं चिरा-
तीसारं विनिहन्ति जूर्तिसहितं तीव्रां विषूचीमपि ॥२॥
दुःसाध्यामपि विस्वर्सी परिहरेदुक्तानुपानैरयं ।
नाम्ना तु ग्रहणीमतङ्गजमदध्वंसीभकण्ठीरवः ॥ ३ ॥

गंधक, पारा, अभ्रक, हिंगूळ, लोहभस्म, जायफळ, बेलफळ, मोचरस, बचनाग, अतिविष, सुंठ, मिरीं, पिंपळी, धायटीचीं फुलें, भांग, हिरडेदळ, कवठ, नागरमोथे, ओवा, चित्रक, डाळिंब, टाकणखाराची लाही, इंद्रजव, धोतऱ्याचें बीज, गजग्यांतील बीं व ह्यांच्या चवथाई अफू ह्या सर्वांचें बारीक चूर्ण करून त्याला धोतऱ्याच्या रसाची एक भावना देऊन मिऱ्याएवढ्या गोळ्या कराव्या. ह्या रक्तयुक्त, आमयुक्त व शूलयुक्त संग्रहणी, फार दिवसांचा अतिसार आणि ज्वरयुक्त विषूचिका ह्यांचाही नाश करितात. ह्या रसाला ग्रहणीगजकेसरी असें म्हणतात.

रसपर्पटी.

शुद्धपारदगन्धाभ्यां कृता पर्पटिका नृणाम् ।
निहन्ति ग्रहणीं क्षौद्रयुक्ता पथ्यभुजां भृशम् ॥ १ ॥

शुद्ध पारा व गंधक ह्यांची (सुवर्णरसपर्पटीच्या कृतीप्रमाणें) पर्पटी करावी. ही मधाशीं घेऊन पथ्य केलें असतां ग्रहणीचा नाश करिते. हिला रसपर्पटी असें म्हणतात.

पंचामृतपर्पटी.

लोहाभ्रार्करसं समं द्विगुणितं गन्धं पचेत्कोलिका-
काष्ठाग्नौ मृदुले निधाय सकलं लोहस्य पात्रे भिषक् ।
सर्वं गोमयमण्डले विनिहिते रम्भादले विन्यसेत्
तस्योर्ध्वं कदलीदलं द्रुततरं वैद्येश्वरो विन्यसेत् ॥ १ ॥
स्यात्पञ्चामृतपर्पटी ग्रहणिकायक्ष्मातिसारज्वर- ।
स्त्रीरुक्पाण्डुगराम्लपित्तगुदजक्षुन्मान्द्यविध्वंसिनी ॥२॥
ग्रहण्यामनुपानं हि हिंगुसैन्धवजीरकम् ।
जीरकं पाण्डुगरयोरितरेषु स्वयुक्तितः ॥ ३ ॥

लोहभस्म, अभ्रकभस्म, ताम्रभस्म व पारदभस्म (रससिंदूर) हीं समभाग आणि गंधक दोन भाग घेऊन लोखंडाच्या भांड्यांत गंधक घालून बोरीच्या लांकडाचा अग्नि देऊन गंधक पातळ झाल्यावर त्यांत बाकीचीं औषधें टाकून, पक्क झाल्यावर गाईच्या शेणाचें एक आळें करून त्याजवर केळीचें पान ठेवून त्याजवर ओतून लागलेंच दुसऱ्या केळीच्या पानानें झांकून दाबावें. हिला **पंचामृतपर्पटी** असें म्हणतात. ही संग्रहणी, क्षय, अतिसार, ज्वर, स्त्रीरोग (रक्तगुल्म, प्रदर, बाळंतरोग वगैरे), पांडुरोग, विषबाधा, आम्लपित्त, मूळव्याध व अग्निमांद्य ह्यांचा नाश करिते. ही संग्रहणीवर हिंग, सैंधव व जिरें ह्यांजबरोबर द्यावी. पांडुरोग व विष ह्यांवर जिऱ्याबरोबर द्यावी, आणि इतर रोगांवर अनुपान योजून द्यावी.

कनकसुंदर रस.

मरीचबलिहिंगुलैर्गरलपिप्पलीटंकणैः ।
सुवर्णभवबीजकैः समलवैर्दिनार्धावधि ।
जयारसविमर्दितैः कनकसुन्दरः सुन्दरि
स्मृतो ग्रहणिकाज्वरातिसृतिवह्निमान्द्यापहः ॥ १ ॥

मिरें, गंधक, हिंगूळ, बचनाग, पिंपळी, टाकणखाराची लाही, धोतऱ्याचें बीं ह्या सर्वांचा भांगेच्या रसांत अर्धा दिवसपर्यंत खल करावा. ह्याला कनकसुंदर रस असें म्हणतात. हा संग्रहणी, अतिसार, ज्वर व अग्निमांद्य ह्यांचा नाश करतो.

शंखवटी.

चिञ्चाक्षारपलं पटुव्रजपलं निम्बूरसे कल्कितं
तस्मिञ्शङ्खपलं प्रतप्तमसकृन्निर्वाप्य शीर्णावधि ।
हिंगुव्योषपलं रसामृतबलीन्निक्षिप्य निष्कांशकान्
बद्धा शङ्खवटी क्षयग्रहणिकारुक्पक्तिशूलादिषु ॥ १ ॥

चिंचेच्या टरफलाचा क्षार चार तोळे व पंचलवणें चार तोळे, ह्यांचा लिंबाच्या रसांत खल करून शंखाचे तुकडे चार तोळे घेऊन तापवून त्यांत बुडवावे. ह्याप्रमाणें शंखाच्या तुकड्यांचें चूर्ण होईपर्यंत करावें. नंतर हिंग, सुंठ, मिरीं व पिंपळी हीं चार चार तोळे, पारा, बचनाग व गंधक हीं तीन तीन मासे ह्या सर्वांचा खल करून

गोळ्या कराव्या. ह्याला शंखवटी असें म्हणतात. ही संग्रहणी, क्षय, शूल व परिणामशूल इत्यादिकांचा नाश करिते.

अग्निसूनुरस.

भागो दग्धकपर्दकस्य च तथा शङ्खस्य भागद्वयं
भागो गन्धकसूतयोर्मिलितयोः पिष्ट्वा मरीचादपि।
भागस्य त्रितयं नियोज्य सकलं निम्बूरसे चूर्णितं
नाम्ना वह्निसुतो रसोऽयमचिरान्मान्द्यं जयेद्दारुणम् ॥१॥
घृतेन खण्डात्सह भक्षितेन क्षीणान्नरान्हस्तिसमान्करोति।
समागधीचूर्णघृतेन लीढ्वा नरः प्रमुञ्चेद्ग्रहणीविकारान् ॥ २ ॥
शोषज्वरारोचकशूलगुल्मान्पाण्डूदरार्शोग्रहणीविकारान्।
तक्रानुपानो जयति प्रमेहान्युक्त्या प्रयुक्तोऽग्निसुतो रसेन्द्रः ॥३॥

कवडीभस्म एक भाग, शंखभस्म दोन भाग, पारा व गंधक ह्या दोहोंचा मिळून एक भाग आणि मिरीं तीन भाग ह्यांचा लिंबाच्या रसांत खल करावा. ह्याला वन्हिसुत (अग्निसुत) असें म्हणतात. हा भयंकर अग्निमांद्याचा त्वरित नाश करितो. हा तूप व खडीसाखरेबरोबर घेतला असतां क्षीण मनुष्याला हत्तीप्रमाणें बलवान करतो. पिंपळीचें चूर्ण व तूप ह्यांशीं घेतला असतां संग्रहणीचा नाश करितो. सूज, ज्वर, अरुचि, शूल, गुल्म, पांडुरोग, उदर, मूळव्याध व संग्रहणी ह्या विकारांवर ताकाशीं दिला असतां त्यांचा नाश करतो. आणि अनुपान योजून दिला असतां प्रमेहाचा नाश करतो.

अगस्तिसूतराज रस.

रसबलिसमभागं तुल्यहिंगूलयुक्तं
द्विगुणकनकबीजं नागफेनेन तुल्यम्।
सकलविहितचूर्णं भावयेद्भृङ्गनीरै-
र्ग्रहणिजलधिशोषे सूतराजो ह्यगस्तिः ॥ १ ॥
त्रिकटुकमधुयुक्तः सर्ववान्ति च शूलं
कफपवनविकारं वन्हिमान्द्यं च निद्राम्।
घृतमरिचयुतोऽयं गुञ्जमात्रः प्रवाहीं
हरति षडतिसाराञ्जीरजातीफलेन ॥ २ ॥

पारा, गंधक व हिंगूळ समभाग, धोतऱ्याचें बीं दोन भाग व

अभ्र एक भाग, ह्या सर्वांचें चूर्ण करून माक्याच्या रसाची भावना द्यावी. संग्रहणीरूप समुद्राला शोषण करणारा हा अगस्ति आहे. म्हणून ह्याला अगस्तिसूतराज असें म्हणतात. हा सुंठ, मिरें, व पिंपळी ह्यांच्या चूर्णाशीं मध घालून घेतला असतां सर्व प्रकारची वांति, शूल, कफवातात्मक विकार, अग्निमांद्य व झोंप ह्यांचा नाश करितो. हा तूप व मिऱ्यांची पूड ह्यांशीं घेतला असतां प्रवाहिका आणि जायफळ व जिऱ्यांची पूड ह्यांशीं घेतला असतां सहा प्रकारचे अतिसार ह्यांचा नाश करतो.

क्षारताम्ररस.

शङ्खक्षारार्कभूतिं च वराटं लोहभस्मकम् ।
अयोमलं यवक्षारं टङ्कणक्षारमेव च ॥ १ ॥
त्रिकटुं सैन्धवं तुल्यं भृङ्गतोयेन मर्दयेत् ।
आटरूषरसैर्मर्द्यमार्द्रकस्वरसेन च ॥ २ ॥
चणमात्रां वटीं कृत्वा रसोऽयं क्षारताम्रकः ।
श्वासे कासे प्रतिश्याये पुराणज्वरपीडिते ॥ ३ ॥
मन्दाग्नौ ग्रहणीदोषे त्वनुपानं यथोचितम् ।
सेवयेत्सप्तरात्रेण नाशयेन्नात्र संशयः ॥ ४ ॥
चिरकालानुबन्धे च सेवयेन्मण्डलावधि ।
तत्तद्व्याधिहरं पथ्यं नियमेन समाचरेत् ॥ ५ ॥

शंखभस्म, ताम्रभस्म, कवडीभस्म, लोहभस्म, मंडूरभस्म, जवखार, टाकणखाराची लाही, सुंठ, मिरें, पिंपळी, सैंधेलोण, हीं सर्व औषधें समभाग घेऊन सर्वांचा माक्याच्या रसांत खल करावा. नंतर अडुळशाच्या पानाच्या रसांत व आल्याच्या रसांत एकएक दिवस खल करून हरभऱ्याएवढ्या गोळ्या कराव्या. ह्याला क्षारताम्ररस असें म्हणतात. हा श्वास, खोकला, पडसें, जीर्णज्वर, अग्निमांद्य, व संग्रहणी ह्या विकारांवर योग्य अनुपान योजून द्यावा. हा सात दिवस सेवन केला असतां त्या त्या विकारांना दूर करतो, ह्यांत संशय नाहीं. फार दिवसांचा विकार असल्यास एक मंडल (बेचाळीस दिवस) पर्यंत सेवन करावा. ह्याजवर त्या त्या विकारांवर सांगितलेलें पथ्य करावें.

पथ्य.

मुद्गषष्टिकशाली च आढकी माक्षिकं तथा ।
छाग्याः पयो दधि घृतं नवनीतं कपित्थकम् ॥ १ ॥
निःसारं दधि गोर्बिल्वं रम्भायाः कुसुमं फलम् ।
दाडिमं लाजकृन्मण्डः शृङ्गाटं क्षुद्रमत्स्यकः ॥ २ ॥
एणतित्तिरलावानां शशानां क्रव्यमेव च ।
ग्रहण्यामातुरे पथ्यं कथितं मुनिभिर्हितम् ॥ ३ ॥

मुग, साठेसाळी व तुरी हीं धान्यें, शेळीचें दूध, तूप, दहीं व लोणी, कवठ, गाईचें लोणी काढून घेतलेलें दहीं, बेलफळ, केळफूल व केळीचें फळ, डाळिंब, लाह्याचा मंड, शिंगाडे, क्षुद्र मासे, काळवीट, तित्तिर पक्षी, लावा पक्षी व ससा ह्यांचीं मांसें, हें संग्रहणीच्या रोगाला हितकारक असें पथ्य सांगितलें आहे.

पिच्छिलानि कठोराणि गुरूण्यन्नानि यानि च ।
आमकृन्ति न सेव्यानि ग्रहणीरोगिभिः क्वचित् ॥ ४ ॥

अपथ्य—बुळबुळीत, कठीण व जड अशीं अन्नपानें तसेंच आमकारक पदार्थ ह्यांचें केव्हांही सेवन करूं नये.

मूळव्याधीचें निदान.

अरिवत्प्राणिनो मांसकीलका विशसंति यत् ।
अर्शांसि तस्मादुच्यंते गुदमार्गनिरोधतः ॥ १ ॥

गुदमार्गाचा रोध करणार मांसाचे मोड शत्रूप्रमाणें मनुष्याला पीडा देतात, म्हणून त्यांना अर्श असें म्हणतात.

पृथग्दोषैः समस्तैश्च शोणितात्सहजानि च ।
अर्शांसि षट्प्रकाराणि विद्याद्गुदवलित्रये ॥ २ ॥

वातादि तीन दोषांनीं वेगवेगळे तीन, त्रिदोषापासून एक, रक्तदोषामुळें एक आणि सहज (जन्मतः) असणारा एक असे मूळव्याधीचे सहा प्रकार गुदाच्या तिन्ही वळ्यांचे ठिकाणीं होतात.

मूळव्याधीचें स्वरूप.

दोषास्त्वङ्मांसमेदांसि संदूष्य विविधाकृतीन् ।
मांसांकुरानपानादौ कुर्वन्त्यर्शांसि ताञ्जगुः ॥ १ ॥

कुपित झालेले वातादि दोष गुदादिकांचे ठायीं त्वचा, मांस व मेद ह्यांना दूषित करून नाना प्रकारचे मांसाचे अंकुर उत्पन्न

करितात. त्यांना अर्श (मूळव्याध) असें म्हणतात.

मूळव्याधीचें कारण.

कषायकटुतिक्तानि रूक्षशीतलघूनि च ।
प्रमिताल्पाशनं तीक्ष्णं मद्यं मैथुनसेवनम् ॥ १ ॥
लङ्घनं देशकालौ च शीतौ व्यायामकर्म च ।
शोको वातातपस्पर्शो हेतुर्वातार्शसां मतः ॥ २ ॥

तुरट, तिखट, कडू, रुक्ष व थंड असे पदार्थ खाणें, अत्यंत अल्प आहार करणें, तीक्ष्ण मद्य सेवन करणें, अति व्यायाम करणें, शोक, अतिशय वारा व ऊन घेणें, हीं वातजन्य मूळव्याधीचीं कारणें आहेत.

कट्वम्ललवणोष्णानि व्यायामाग्न्यातपप्रभाः ।
देशकालावशिशिरौ क्रोधो मद्यमसूयनम् ॥ ३ ॥
विदाहि तीक्ष्णमुष्णं च सर्वं पानान्नभेषजम् ।
पित्तोल्बणानां विज्ञेयः प्रकोपे हेतुरर्शसाम् ॥ ४ ॥

तिखट, आंबट, खारट व उष्ण असे पदार्थ खाणें, अतिशय व्यायाम करणें, विस्तवाचा शेक घेणें, उन्हांत फिरणें, उष्ण देशांत व उष्ण हवेंत राहणें, अतिशय रागावणें, मद्य सेवन करणें, मत्सर करणें, विदाहकारक, तीक्ष्ण व उष्ण अशीं अन्नपानें व औषधें सेवन करणें हीं सर्व पित्तजन्य मूळव्याधीचीं कारणें आहेत.

मधुरस्निग्धशीतानि लवणाम्लगुरूणि च ।
अव्यायामदिवास्वप्नशय्यासनसुखे रतिः ॥ ५ ॥
प्राग्वातसेवा शीतौ च देशकालावचिन्तनम् ।
श्लैष्मिकाणां समुद्दिष्टमेतत्कारणमर्शसाम् ॥ ६ ॥

थंड, स्निग्ध, मधुर, खारट, आंबट व जड असे पदार्थ खाणें, मुळींच व्यायाम न करणें, दिवसा झोप घेणें, नेहमीं मऊ बिछान्यावर किंवा आसनावर बसणें, पूर्वेकडील वारा घेणें, थंड हवेंत व थंड देशांत रहाणें, हीं कफजन्य मूळव्याधीचीं कारणें आहेत.

हेतुलक्षणसंसर्गाद्विद्याद्वंद्वोल्बणानि च ।
सर्वो हेतुस्त्रिदोषाणां सहजैर्लक्षणैः समम् ॥ ७ ॥

ज्या ज्या दोन दोन दोषांचीं कारणें व लक्षणें मूळव्याधीमध्यें दिसून येतील, त्या त्या दोन दोषांपासून ती ती मूळव्याध होते.

आणि त्रिदोषज मूळव्याधीला तिन्ही दोषांचीं कारणें असून त्यामध्यें सहज (आनुवंशिक) मूळव्याधीप्रमाणें लक्षणें असतात.

मूळव्याधीचें पूर्वरूप.

विष्टम्भोऽङ्गस्य दौर्बल्यं कुक्षेराटोप एव च ।
कार्श्यमुद्गारबाहुल्यं सक्थिसादोऽल्पविट्कता ॥ १ ॥
ग्रहणीरोगपाण्डूर्तिराशङ्का चोदरस्य च ।
पूर्वरूपाणि निर्दिष्टान्यर्शसामभिवृद्धये ॥ २ ॥

मळाचा अवरोध, शरीराला दुर्बलता, कुशींत गुडगुडल्यासारखें होणें, कृशपणा, ढेंकर येणें, मांड्या गळल्यासारख्या वाटणें, शौचाचे वेळीं मळ थोडा होणें व संग्रहणी, पांडुरोग किंवा उदर होतें आहे कीं काय असा भास होणें, हीं लक्षणें मूळव्याध होण्यापूर्वीं होतात.

वातजन्य मूळव्याधीचें लक्षण.

गुदांकुरा बह्वनिलाः शुष्काश्चिमिचिमान्विताः ।
म्लानाः श्यावारुणाः स्तब्धा विशदाः परुषाः खर
मिथोविसदृशा वक्रास्तीक्ष्णा विस्फुटिताननाः ।
बिम्बीकर्कन्धूखर्जूरकार्पासीफलसंनिभाः ॥ २ ॥
केचित्कदम्बपुष्पाभाः केत्सिद्धार्थकोपमाः ।
शिरःपार्श्वांसकट्यूरुवङ्क्षणाभ्यधिकव्यथाः ॥ ३ ॥
क्षवथूद्गारविष्टम्भहृद्ग्रहारोचकप्रदाः ।
कासश्वासाग्निवैषम्यकर्णनादभ्रमावहाः ॥ ४ ॥
तैरार्तो ग्रथितं स्तोकं सशब्दं सप्रवाहिकम् ।
रुक्फेनपिच्छानुगतं विबद्धमुपवेश्यते ॥ ५ ॥
कृष्णत्वङ्नखविण्मूत्रनेत्रवक्त्रश्च जायते ।
गुल्मप्लीहोदराष्ठीलासंभवस्तत एव च ॥ ६ ॥

वातजन्य मूळव्याधीचे मोड कोरडे (शुष्क) असतात. त्यांत चिमचिम अशा वेदना होतात. ते कोमेजलेले, काळसर, तांबूस, ताठर, स्वच्छ, कठीण, खरखरीत, निरनिराळ्या आकाराचे, वांकडेतिकडे, अणकुचीदार व तोंडें दुभंग झाल्यासारखे असतात. ते तोंडले, खारीक, बोर किंवा कापसाचें बोंड (फळ) ह्यांसारखे असतात. कित्येक कळंबाच्या फुलासारखे तर कित्येक शिरसाच्या

(मोहरीच्या) आकाराचे असतात. हे उत्पन्न झाले असतां डोकें, दोन्ही कुशी, खांदे, कंबर, मांड्या व आडसंधी ह्यांमध्यें फार वेदना होतात. शिंका व ढेंकर ह्यांचा अवरोध होतो. मलाचाही अवरोध होतो. छातींत जखडल्याप्रमाणें वाटतें. अरुचि येते. खोकला, श्वास, जठराग्नीचें वैषम्य (कधीं भूक लागणें व कधीं न लागणें), कानामध्यें नाद होणें व घेरी येणें हे विकार होतात. ह्या वातजन्य मूळव्याधीच्या मोडांनीं पीडलेल्या रोग्याला गाठाळ, थोडा थोडा, शब्दयुक्त, कुंथत कुंथत, मुरडा, फेंस व बुळबुळितपणा ह्यांनीं युक्त व खड्याप्रमाणें मळ होतो. त्याची त्वचा, नखें, मल, मूत्र, डोळे व तोंड हीं काळसर होतात. आणि पुढें त्याला गुल्म, पांथरी, उदर किंवा अष्ठीला हे विकार उत्पन्न होतात.

पित्तजन्य मूळव्याधीचें लक्षण.

पित्तोत्तरा नीलमुखा रक्तपीतासितप्रभाः ।
तन्वस्रस्राविणो विस्रास्तनवो मृदवः श्लथाः ॥ १ ॥
शुकजिह्वायकृत्खण्डजलौकावक्त्रसंनिभाः ।
दाहपाकज्वरस्वेदतृण्मूर्छारतिमोहदाः ॥ २ ॥
सोष्माणो द्रवनीलोष्णपीतरक्तामवर्चसः ।
यवमध्या हरित्पीतहारिद्रत्वङ्नखादयः ॥ ३ ॥

पित्तजन्य मूळव्याधीच्या मोडाचीं तोंडें निळसर रंगाचीं असतात आणि ते मोड तांबूस, पिवळट, काळसर असे असतात. त्यांतून पातळ रक्त येतें. त्यांना घाण असते. ते बारीक, मऊ व शिथिल असतात. ते पोपटाची जीभ, काळजाचा तुकडा किंवा जळूचे तोंड ह्यांसारखे असतात. ह्या पित्तजन्य मूळव्याधीच्या मोडांपासून दाह, मोड पिकणें, ज्वर, घाम, तहान, मूर्च्छा, अस्वस्थपणा व मोह हे विकार होतात. मोड कढत असतात. ह्या मोडांनीं पीडित मनुष्याला पातळ, उष्ण, निळसर, पिवळट व तांबूस अशा रंगाचें व आमयुक्त शौचास होतें. हे मोड सातूप्रमाणें मध्यें फुगीर असतात. ह्यानें पीडित मनुष्याचीं नखें, त्वचा वगैरे हिरवींपिवळीं किंवा हळदीप्रमाणें पिंवळीं होतात.

कफज मूळव्याधीचें लक्षण.

श्लेष्मोल्बणा महामूला घना मन्दरुजः सिताः ।
उत्सन्नोपचिताः स्निग्धाः स्तब्धवृत्तगुरुस्थिराः ॥ १ ॥
पिच्छिलाः स्तिमिताः श्लक्ष्णाः कण्ड्वाढ्याः स्पर्शनप्रियाः ।
करीरपनसास्थ्याभास्तथा गोस्तनसंनिभाः ॥ २ ॥
वंक्षणानाहिनः पायुबस्तिनाभ्यवकर्षिणः ।
सकासश्वासहृल्लासप्रसेकारुचिपीनसाः ॥ ३ ॥
मेदकृच्छ्रशिरोजाड्यशिशिरज्वरकारिणः ।
क्लैब्याग्निमार्दवच्छर्दिरामप्रायविकारदाः ॥ ४ ॥
वसाभाः सकफप्राज्यपुरीषाः सप्रवाहिकाः ।
न स्रवन्ति न भिद्यन्ते पाण्डुस्निग्धत्वगादयः ॥ ५ ॥

कफजन्य मूळव्याधीच्या मोडाचीं मुळें खोलपर्यंत असतात. ते कठीण, मंदवेदनायुक्त व पांढरे असतात. ते वर उचललेले, मोठे, स्निग्ध, ताठर, वाटोळे, जड, न हालणारे, बुळबुळित, ओलसर, गुळगुळित, कंडूयुक्त, स्पर्शप्रिय (हात फिरविला असतां सुखावह) असतात. ह्यांचा आकार करीर (मारवाड देशांत प्रसिद्ध) किंवा फणस ह्यांच्या बींसारखा किंवा गोस्तनाप्रमाणें असतो. आड-संधी फुगल्यासारखे होतात. गुद, बस्ती व नाभि ह्यांना ओढ लागते. खोकला, श्वास, मळमळ, हृदयांत पीडा, अरुचि, पीनस, प्रमेह, (लघवी फार होणें), मूत्रकृच्छ्र, मस्तक जड होणें, थंडी वाजून ताप येणें, नपुंसकत्व, अग्निमांद्य, ओकारी आणि आमांशाप्रमाणें विकार हीं लक्षणें होतात. त्या रोग्याला चर्बीप्रमाणें कफयुक्त व कुंथत कुंथत शौचास होतें. मोड स्रवत नाहींत (त्यांतून रस वगैरे वाहात नाहीं) व फुटत नाहींत. रोग्याच्या अंगाची त्वचा नखें वगैरे पांढरीं होतात.

त्रिदोषजन्य व सहज मूळव्याधीचें लक्षण.

सर्वैः सर्वात्मकान्याहुर्लक्षणैः सहजानि च ॥ १ ॥

त्रिदोषापासून होणाऱ्या व सहज (आनुवांशिक) मूळव्याधिमध्यें सर्व दोषांचीं लक्षणें होतात.

रक्तज मूळव्याधीचें लक्षण.

रक्तोल्बणा गुदे कीलाः पित्ताकृतिसमन्विताः ।
वटप्ररोहसदृशा गुञ्जाविद्रुमसंनिभाः ॥ १ ॥
तेऽत्यर्थं दुष्टमुष्णं च गाढविट्कप्रपीडिताः ।
स्रवन्ति सहसा रक्तं तस्य चातिप्रवृत्तितः ॥ २ ॥
भेकाभः पीड्यते दुःखैः शोणितक्षयसंभवैः ।
हीनवर्णबलोत्साहो हतौजाः कलुषेन्द्रियः ।
विट् श्यावं कठिनं रूक्षमधो वायुर्न गच्छति ॥ ३ ॥

रक्तजन्य मूळव्याधीपासून होणारे मोड पित्तजन्य मूळव्याधीपासून होणाऱ्या मोडांसारखे असतात. ते वडाच्या अंकुराप्रमाणें, गुंजेप्रमाणें किंवा पोवळ्याप्रमाणें लाल असतात. त्यामुळें शौचास खडा होतो. शौचाचे वेळीं मोडांतून अतिशय कढत व पुष्कळ रक्त वाहतें. रक्त फार वाहून रोगी रक्तक्षयानें पीडित झाल्यामुळें बेडकाप्रमाणें पिवळट होतो. तो कांतिहीन, बलहीन व उत्साहहीन होतो. त्याचें सामर्थ्य कमी होतें, इंद्रियें विकळ होतात. त्याला शौचाचे वेळीं काळा, कठीण व रूक्ष असा मळ होतो आणि अधोवायु सरत नाहीं.

रक्तजन्य मूळव्याधीमध्यें वातादिकांचा संबंध.

तनु चारुणवर्णं च फेनिलं चासृगर्शसाम् ।
कट्यूरुगुदशूलं च दौर्बल्यं यदि चाऽधिकम् ॥ १ ॥
तत्रानुबन्धो वातस्य हेतुर्यदि च रूक्षणम् ।

ज्या रक्तज मूळव्याधीमध्यें पातळ, तांबूसवर्ण व फेसाळ रक्त वाहतें; कंबर, मांड्या व गुद ह्यांमध्यें शूळ होतो; अशक्तपणा फार असतो; (हीं लक्षणें रूक्षतेमुळें होतात) असें असल्यास त्यांत वाताचा संबंध आहे म्हणून समजावें.

शिथिलं श्वेतपीतं च विट् स्निग्धं गुरु शीतलम् ॥ २ ॥
यद्यर्शसां घनं चासृक्तन्तुमत्पाण्डुपिच्छिलम् ।
गुदं सपिच्छं स्तिमितं गुरु स्निग्धं च कारणम् ।
श्लेष्मानुबन्धो विज्ञेयस्तत्र रक्तार्शसां बुधैः ॥ ३ ॥

जर शिथिल (भसरा), पांढरा, पिवळा, स्निग्ध, जड व थंड असा मळ होत असेल, तसेंच तंतुयुक्त, पांढुरकें, बुळबुळित व दाट

रक्त वाहात असेल, गुद बुळबुळित व ओलसर असेल आणि हे विकार जड व स्निग्ध अन्नपानादिकांपासून होत असतील तर त्या रक्तजन्य मूळव्याधीमध्यें कफाचा संबंध आहे म्हणून समजावें.

सर्व दोषांच्या प्रकोपाचें लक्षण.

पञ्चात्मा मारुतः पित्तं कफो गुदवलित्रये ।
सर्वे एव प्रकुप्यन्ति गुदजानां समुद्भवे ॥ १ ॥
तस्मादर्शांसि दुःखानि बहुव्याधिकराणि च ।
सर्वदेहोपतापीनि प्रायः कच्छ्रतमानि च ॥ २ ॥

मूळव्याधीचे मोड उत्पन्न होण्याच्या वेळीं पांच प्रकारचे वायु, पांच प्रकारचें पित्त व पांच प्रकारचे कफ हे सर्व दोष गुदाच्या तीन वळ्यांचे ठिकाणीं प्रकुपित होतात. त्यामुळें मूळव्याध फार दुःखकारक होते व तिच्यामध्यें अनेक उपद्रव होतात. हे मूळव्याधीचे मोड सर्व देहाला फार त्रास देतात. व ते प्रायः कष्टसाध्य असतात.

सुखसाध्यलक्षण.

बाह्यायां तु वलौ जातान्येकदोषोल्बणानि च ।
अर्शांसि सुखसाध्यानि न चिरोत्पतितानि च ॥ १ ॥

गुदाच्या बाहेरील वळीवर असलेले, एकदोषजन्य आणि ज्यांला फार दिवस झाले नाहींत असे (एक वर्षाचे आंतील) अर्श (मूळव्याधीचे मोड) सुखसाध्य असतात.

कष्टसाध्यलक्षण.

द्वंद्वजानि द्वितीयायां वलौ यान्याश्रितानि च ।
कृच्छ्रसाध्यानि तान्याहुः परिसंवत्सराणि च ॥ १ ॥

दोन दोषांपासून झालेले, गुदाच्या दुसऱ्या वळीवर असलेले, आणि एक वर्षापलीकडचे मूळव्याधीचे मोड कष्टसाध्य असतात.

असाध्य लक्षणें.

सहजानि त्रिदोषाणि यानि चाभ्यन्तरां वलिम् ।
जायन्तेऽर्शांसि संश्रित्य तान्यसाध्यानि निर्दिशेत् ॥ १ ॥

जन्मतःच असलेले (आनुवंशिक), त्रिदोषजन्य आणि गुदाच्या आंतील वळीवर असलेले मूळव्याधीचे मोड असाध्य असतात.

शेषत्वादायुषस्तानि चतुष्पादसमन्विते ।
याप्यन्ते दीप्तकायाग्नेः प्रत्याख्येयान्यतोऽन्यथा ॥ २ ॥

ज्याचें आयुष्य बळकट आहे, वैद्य, औषध, परिचारक (सुश्रुषा करणारे) ह्यांची पूर्ण अनुकूलता व स्वतः श्रीमान् (ह्याला चतुष्पादयुक्त म्हणतात.) आहे आणि जठराग्नि प्रदीप्त आहे अशा मनुष्याची मूळव्याध याप्य (औषध चालू आहे तोपर्यंत बरी असणें) असते आणि ह्याच्या उलट असलेली असाध्य समजून सोडून द्यावी.

उपद्रवामुळें असाध्य लक्षण.

हस्ते पादे मुखे नाभ्यां गुदे वृषणयोस्तथा ।
शोथो हृत्पार्श्वशूलं च यस्यासाध्योऽर्शसो हि सः ॥ १ ॥

ज्या मूळव्याधीच्या मनुष्याच्या हातापायाला, गुद, नाभि, मुख व वृषण ह्यांना सूज असून हृदय व कुशी ह्यांमध्यें शूळ असणें हीं लक्षणें होतात. त्याची ती मूळव्याध असाध्य समजावी.

हृत्पार्श्वशूलसंमोहो छर्दिरङ्गस्य रुग्ज्वरः ।
तृष्णा गुदस्य पाकश्च निहन्युर्गुदजातुरम् ॥ २ ॥

हृदय व कुशी ह्यांमध्यें शूल, मोह, ओकारी, अंग ठणकणें, ज्वर, तहान, गुदपाक (गुद पिकणें), हीं लक्षणें मूळव्याधीच्या रोग्याला मारतात.

तृष्णारोचकशूलार्तमतिप्रस्रुतशोणितम् ।
शोथातीसारसंयुक्तमर्शांसि क्षपयन्ति हि ॥ ३ ॥

तहान, अरुचि व शूल हीं लक्षणें ज्या मूळव्याधीमध्यें आहेत, मूळव्याधींतून रक्त फार वहातें आहे; आणि सूज, अतिसार हीं लक्षणें होताहेत अशी मूळव्याध रोग्याचा नाश करिते.

मेढ्रादिष्वपि लक्ष्यन्ते यथास्वं नाभिजान्यपि ।
गण्डूपदास्यरूपाणि पिच्छलानि मृदूनि च ॥ १ ॥

शिस्न, कान व नाक इत्यादि ठिकाणीं देखील मूळव्याध होते, ती त्या त्या प्रकरणांत सांगितली आहे. नाभीचे ठिकाणीं होणारी मूळव्याध दानव्याच्या तोंडाच्या आकाराची असून बुळबुळीत व मऊ असतें.

चामकीळाचें लक्षण.

व्यानो गृहीत्वा श्लेष्माणं करोत्यर्शस्त्वचो बहिः ।
कीलोपमं स्थिरखरं चर्मकीलं तु तं विदुः ॥ १ ॥

व्यान वायु हा कफाला घेऊन शरीराच्या बाहेरील त्वचेवर (कोठेंही) मूळव्याधीच्या मोडांसारखे मोड उत्पन्न करितो. ते खिळ्याप्रमाणें स्थिर व खरखरीत असतात. त्याला " चर्मकीलक " म्हणजे चामकीळ असें म्हणतात.

वातादिभेदाचें लक्षण.

वातेन तोदः पारुष्यं पित्तादसितरक्तता ।
श्लेष्मणा स्निग्धता तस्य ग्रथितत्वं सवर्णता ॥ १ ॥

वातजन्य चामकीळ ठणका व खरखरीतपणा ह्यांनीं युक्त असतात. पित्तजन्य चामकीळ काळसर तांबूस असतात. आणि कफजन्य चामकीळ स्निग्ध, गाठाळलेले व त्वचेच्या रंगासारखे असतात.

मूळव्याधीवरील उपचार.

स्नेहस्वेदादयो वाते पित्ते स्यू रेचनादयः ।
कफे वान्त्यादयोऽर्शःसु मिश्रे मिश्रा प्रतिक्रिया ।
पित्तवद्रक्तजे कार्यः प्रतीकारोऽर्शसि ध्रुवम् ॥ १ ॥

वातज मूळव्याधीवर स्नेहन व स्वेदनादि (अंगास औषधी तेलें लावणें, पिणें व घाम काढणें, इत्यादि) उपचार करावे. पित्तजन्य मूळव्याधीवर रेचन वगैरे उपचार करावे. कफजन्य मूळव्याधीवर वमनादि उपचार करावे. मिश्रदोषजन्य मूळव्याधीवर मिश्र चिकित्सा करावी. आणि रक्तजन्य मूळव्याधीवर पित्तजन्य मूळव्याधीप्रमाणें चिकित्सा करावी.

अर्शोऽतिसारग्रहणीविकाराः प्रायेण चान्योन्यनिदानभूताः ।
सन्नेऽनले सन्ति न सन्ति दीप्ते रक्षेदतस्तेषु विशेषतोऽग्निम् ॥२॥

मूळव्याध, अतिसार, संग्रहणी हे विकार प्रायः परस्परांला कारणीभूत आहेत. हे बहुधा ज्याचा जठराग्नि मंद आहे, त्याला होतात. ज्याचा जठराग्नि प्रदीप्त आहे त्याला होत नाहींत. म्हणून ह्या विकारांमधून विशेषतः जठराग्नीचें रक्षण करावें. म्हणजे तो मंद न होईल अशी खबरदारी घ्यावी.

दुर्नाम्नां साधनोपायश्चतुर्धा परिकीर्तितः ।
भेषजक्षारशस्त्राग्निसाध्यत्वं याप्यमुच्यते ॥ ३ ॥

मूळव्याध बरी करण्याचे उपाय चार प्रकारचे सांगितले आहेत. ते असेः—औषध, क्षार, शस्त्रक्रिया, व अग्निकर्म (डाग देणें). ह्या चार उपायांनीं ती अजिबात बरी होते, किंवा उपचार चालू आहेत तोंपर्यंत बरी असते.

तिलादि मोदक.

तिलभल्लातकं पथ्या गुडश्चेति समांशकम् ।
दुर्नामश्वासकासघ्नं प्लीहपाण्डुज्वरापहम् ॥ १ ॥

तीळ, बिब्बे, हिरडेदळ व गूळ हीं समभाग घेऊन गोळ्या कराव्या. ह्या मूळव्याध, श्वास, खोकला, पांथरी, पांडुरोग, आणि ज्वर ह्यांचा नाश करितात.

मरिचादि मोदक.

मरिचमहौषधचित्रकसूरणभागा यथोत्तरं द्विगुणाः ।
सर्वसमो गुडभागः सेव्योऽयं मोदकः प्रसिद्धफलः ॥ १ ॥

मिरीं एक भाग, सुंठ दोन भाग, चित्रकमूळ चार भाग आणि सुरणाचा कांदा आठ भाग ह्यांत सर्वांबरोबर गूळ घालून गोळ्या कराव्या. ह्या गोळ्या मूळव्याधीचा नाश करितात.

प्राणद मोदक.

तालीसज्वलनोषणाः सचविकास्तुल्या द्विभागा भवेत्
कृष्णा मूलसमन्विता त्रिपलिका शुण्ठी चतुर्जातकम् ।
स्यान्मुष्टिप्रमितं गुडत्रिगुणितैरेभिः कृता मोदकाः
कासश्वासगदाग्निमान्द्यगुदजप्लीहप्रमेहापहाः ॥ १ ॥

तालीसपत्र, चित्रकमूळ, मिरीं व चवक हीं समभाग; पिंपळी व पिंपळमूळ दोन दोन भाग; त्रिफळा, सुंठ, दालचिनी, तमालपत्र नागकेशर, वेलदोड्याचे दाणे हीं सर्व आठ तोळे; आणि सर्वांच्या तिप्पट गूळ घेऊन त्यांच्या गोळ्या कराव्या. ह्या खोकला, श्वास, अग्निमांद्य, मूळव्याध, पांथरी व प्रमेह ह्यांचा नाश करितात.

कांकायनगुटिका.

पथ्यादलस्य पलपञ्चकमेकमेव-

चामकीळाचें लक्षण.

व्यानो गृहीत्वा श्लेष्माणं करोत्यर्शस्त्वचो बहिः ।
कीलोपमं स्थिरखरं चर्मकीलं तु तं विदुः ॥ १ ॥

व्यान वायु हा कफाला घेऊन शरीराच्या बाहेरील त्वचेवर (कोठेंही) मूळव्याधीच्या मोडांसारखे मोड उत्पन्न करितो. ते खिळ्याप्रमाणें स्थिर व खरखरीत असतात. त्याला " चर्मकीलक " म्हणजे चामकीळ असें म्हणतात.

वातादिभेदाचें लक्षण.

वातेन तोदः पारुष्यं पित्तादसितरक्तता ।
श्लेष्मणा स्निग्धता तस्य ग्रथितत्वं सवर्णता ॥ १ ॥

वातजन्य चामकीळ ठणका व खरखरीतपणा ह्यांनीं युक्त असतात. पित्तजन्य चामकीळ काळसर तांबूस असतात. आणि कफजन्य चामकीळ स्निग्ध, गाठाळलेले व त्वचेच्या रंगासारखे असतात.

मूळव्याधीवरील उपचार.

स्नेहस्वेदादयो वाते पित्ते स्यू रेचनादयः ।
कफे वान्त्यादयोऽर्शःसु मिश्रे मिश्रा प्रतिक्रिया ।
पित्तवद्रक्तजे कार्यः प्रतीकारोऽर्शसि ध्रुवम् ॥ १ ॥

वातज मूळव्याधीवर स्नेहन व स्वेदनादि (अंगास औषधी तेलें लावणें, पिणें व घाम काढणें, इत्यादि) उपचार करावे. पित्तजन्य-मूळव्याधीवर रेचन वगैरे उपचार करावे. कफजन्य मूळव्याधीवर वमनादि उपचार करावे. मिश्रदोषजन्य मूळव्याधीवर मिश्र चिकित्सा करावी. आणि रक्तजन्य मूळव्याधीवर पित्तजन्य मूळव्याधीप्रमाणें चिकित्सा करावी.

अर्शोऽतिसारग्रहणीविकाराः प्रायेण चान्योन्यनिदानभूताः ।
सन्नेऽनले सन्ति न सन्ति दीप्ते रक्षेदतस्तेषु विशेषतोऽग्निम् ॥२॥

मूळव्याध, अतिसार, संग्रहणी हे विकार प्रायः परस्परांला कारणीभूत आहेत. हे बहुधा ज्याचा जठराग्नि मंद आहे, त्याला होतात. ज्याचा जठराग्नि प्रदीप्त आहे त्याला होत नाहींत. म्हणून ह्या विकारांमधून विशेषतः जठराग्नीचें रक्षण करावें. म्हणजे तो मंद न होईल अशी खबरदारी घ्यावी.

दुर्नाम्नां साधनोपायश्चतुर्धा परिकीर्तितः ।
भेषजक्षारशस्त्राग्निसाध्यत्वं याप्यमुच्यते ॥ ३ ॥

मूळव्याध बरी करण्याचे उपाय चार प्रकारचे सांगितले आहेत. ते असेः—औषध, क्षार, शस्त्रक्रिया, व अग्निकर्म (डाग देणें). ह्या चार उपायांनीं ती अजिबात बरी होते, किंवा उपचार चालू आहेत तोंपर्यंत बरी असते.

तिलादि मोदक.

तिलभल्लातकं पथ्या गुडश्चेति समांशकम् ।
दुर्नामश्वासकासघ्नं प्लीहपाण्डुज्वरापहम् ॥ १ ॥

तीळ, बिब्बे, हिरडेदळ व गूळ हीं समभाग घेऊन गोळ्या कराव्या. ह्या मूळव्याध, श्वास, खोकला, पांथरी, पांडुरोग, आणि ज्वर यांचा नाश करितात.

मरिचादि मोदक.

मरिचमहौषधचित्रकसूरणभागा यथोत्तरं द्विगुणाः ।
सर्वसमो गुडभागः सेव्योऽयं मोदकः प्रसिद्धफलः ॥ १ ॥

मिरीं एक भाग, सुंठ दोन भाग, चित्रकमूळ चार भाग आणि सुरणाचा कांदा आठ भाग ह्यांत सर्वांबरोबर गूळ घालून गोळ्या कराव्या. ह्या गोळ्या मूळव्याधीचा नाश करितात.

प्राणद मोदक.

तालीसज्वलनोषणाः सचविकास्तुल्या द्विभागा भवेत्
कृष्णा मूलसमन्विता त्रिपलिका शुण्ठी चतुर्जातकम् ।
स्यान्मुष्टिप्रमितं गुडात्रिगुणितैरेभिः कृता मोदकाः
कासश्वासगदाग्निमान्द्यगुदजप्लीहप्रमेहापहाः ॥ १ ॥

तालीसपत्र, चित्रकमूळ, मिरीं व चवक हीं समभाग; पिंपळी व पिंपळमूळ दोन दोन भाग; त्रिफळा, सुंठ, दालचिनी, तमालपत्र नाकेशर, वेलदोडयाचे दाणे हीं सर्व आठ तोळे; आणि सर्वांच्या तिप्पट गूळ घेऊन त्यांच्या गोळ्या कराव्या. ह्या खोकला, श्वास, अग्निमांद्य, मूळव्याध, पांथरी व प्रमेह ह्यांचा नाश करितात.

कांकायनगुटिका.

पथ्यादलस्य पलपञ्चकमेकमेव-

मेकं पलं तु मरिचादपि जीरकस्य।
कृष्णातदुद्भवजटाचविकाग्निशुण्ठ्यः
कृष्णादिपञ्चकमिदं पलतः प्रवृद्धम् ॥ १ ॥
पलाष्टभल्लातकसंप्रयुक्तं
कन्दस्त्वरुष्करफलाद्विगुणः प्रकल्प्यः ।
स्याद्यावशूककुडवार्धमतः समस्तै-
र्योज्यो गुडो द्विगुणितो वटकीकृतश्च ॥ २ ॥
काङ्कायनेन मुनिना वटकः किलाय-
मुक्तः प्रजाहिततमेन गुदामयघ्नः ।
क्षाराग्निशस्त्रपतनैरपि ये न सिद्धाः
सिद्धन्त्यनेन वटकेन गुदामयास्ते ॥ ३ ॥

हिरडेदळ वीस तोळे, मिरें चार तोळे, जिरें चार तोळे, पिंपळी चार तोळे, पिंपळमूळ आठ तोळे, चवक बारा तोळे, चित्रक सोळा तोळे, सुंठ वीस तोळे, बिब्बे बत्तीस तोळे, सुरणाचा कांदा चौसष्ट तोळे, जवखार आठ तोळे आणि सर्वांच्या दुप्पट गूळ घेऊन गोळ्या कराव्या. ह्या गोळ्या, लोकांचें कल्याण व्हावें ह्या इच्छेनें कांकायन मुनींनीं सांगितल्या आहेत. ह्या मूळव्याधिनाशक आहेत. क्षार, अग्निकर्म (डाग देणें), शस्त्रक्रिया ह्या उपायांनीं जी मूळव्याध बरी होत नाहीं ती ह्या गोळ्यांनीं बरी होते.

सूरणमोदक.

चित्रकस्य पलं त्वेकं द्विपलं सूरणस्य च ।
पलार्धं नागरस्यापि मरिचं कोलमात्रकम् ॥ १ ॥
भल्लातकं कणामूलं विडङ्गं त्रिफला कणा ।
तालीससहितान्सर्वानक्षमात्रान्प्रयोजयेत् ॥ २ ॥
द्वे पले वृद्धदारस्य तालमूल्याः पलं भवेत् ।
त्वगेला मरिचांशा च सर्वानेकत्र चूर्णयेत् ॥ ३ ॥
गुडेन मर्दयित्वा तु द्विगुणेनेह बुद्धिमान् ।
मोदकः सूरणो नाम त्वक्षमात्रप्रमाणतः ॥ ४ ॥
उपयुक्तो निहन्त्याशु गुदकीलान्न संशयः ।
अग्निवृद्धिकरः पुंसां सेव्यमानो महागुणः ॥ ५ ॥

चित्रकमूळ चार तोळे, सुरणाचा कांदा आठ तोळे, सुंठ दोन तोळे, मिरें सहा मासे (सहा गुंजांचा मासा धरल्यास आठ मासे),

विड्ये, पिंपळमूळ, वावडिंग, हिरडा, बेहडा, आवळकाठी, पिंपळी, व तालिसपत्र, हीं सर्व औषधें एक एक तोळा; वरधारा आठ तोळे, काळी मुसळी चार तोळे, दालचिनी सहा मासे व वेलदोडयाचे दाणे सहा मासे, ह्या सर्वांचें चूर्ण करून सर्वांच्या दुप्पट गूळ घालून एक एक तोळयांच्या गोळ्या कराव्या. ह्याला सूरणमोदक असें म्हणतात. ह्याचा उपयोग केला असतां मूळव्याधीच्या मोडांचा निःसंशय नाश होतो. हा सेवन केला असतां अग्निवर्धक असून महागुणकारक आहे.

दुसरा सूरणमोदक.

शुष्कात्सूरणकन्दतोऽर्धमिलितं व्योषं तथा चित्रकं
श्रेष्ठाजीरकरामठं समलवं दीप्याजमोदान्वितम् ।
सर्वस्यांघ्रिकसिन्धुजं परिभवेन्निम्बुद्रवैर्वासरं
सिद्धः सूरणमोदको गदहरः श्रेष्ठो भवेत्प्राणिनाम् ॥ १ ॥
शूलं संग्रहणीगदं त्वतिसृतिं दुष्टां प्रवाहीं जयेद्
दीप्ताग्निं कुरुते बलं वितनुते गुल्मप्रणाशं तथा ।
अर्शांस्युद्धतमारुतामयहरो बाले च वृद्धे हितो
गर्भिण्यां च न शस्यते न निपुणैर्नो रक्तपित्तेऽपि च ॥२॥

सुंठ, मिरीं, पिंपळी, चित्रकमूळ, आमसुलें, जिरें, हिंग, ओवा, व अजमोदा हे समभाग व ह्यांच्या बरोबरीनें वाळलेला सुरणाचा कांदा आणि सर्वांच्या चवथ्या हिश्यानें सैंधव ह्या सर्वांचा लिंबाच्या रसांत एक दिवस खल करून ह्याच्या गोळ्या कराव्या. ह्यालाही सुरणमोदक असें म्हणतात. हा प्राणिमात्रांचे रोगनाशनाविषयीं श्रेष्ठ असून शूल, संग्रहणी, अतिसार, दुष्टप्रवाहिका ह्यांचा नाश करतो; अग्नि प्रदीप्त करतो; शक्ति वाढवितो; गुल्म, मूळव्याधीचे मोड व वातरोग ह्यांचा नाश करतो. हा बालकांना व वृद्धांना हितकर आहे; व गर्भिणी व रक्तपित्तरोगी ह्यांना हितावह नाहीं. म्हणून ज्ञात्यांनीं त्यांना हा देऊं नये.

सूरणपुटपाक.

मृल्लिप्तं सौरणं कन्दं पक्त्वाऽग्नौ पुटपाकवत् ।
दद्यात्सतैललवणं दुर्नामविनिवृत्तये ॥ १ ॥

सुरणाच्या कांद्यावर मातीचा लेप देऊन तो अग्नीमध्यें पुटपाकाप्रमाणें पचन करावा. नंतर त्यांत मीठ व तेल घालून मूळव्याधीच्या विकारावर द्यावा.

सौरणं कन्दमादाय पुटपाकेन पाचयेत् ।
सतैलगुडसंयुक्तो रसश्चार्शोविकारनुत् ॥ २ ॥

सुरणाचा कांदा पुटपाकानें पचन करून त्याचा रस काढून तो तेल व गूळ घालून द्यावा. तो मूळव्याधीचा नाश करितो.

बाहुशाल गुड.

इन्द्रवारुणिका मुस्ता शुण्ठी दन्ती हरीतकी ।
त्रिवृत्सटी विडङ्गानि गोक्षुरश्चित्रकस्तथा ॥ १ ॥
तेजोह्वा च द्विकर्षाणि पृथग्द्रव्याणि कारयेत् ।
सूरणस्य पलान्यष्टौ वृद्धदारश्चतुष्पलम् ॥ २ ॥
चतुष्पलं स्याद्भल्लातं काथयेत्सर्वमेकतः ।
जलद्रोणे चतुर्थांशं गृह्णीयात्क्काथमुत्तमम् ॥ ३ ॥
क्काथ्यद्रव्यात्त्रिगुणितं गुडं क्षिप्त्वा पुनः पचेत् ।
सम्यक्पक्कं च तं ज्ञात्वा चूर्णान्येतानि दापयेत् ॥ ४ ॥
चित्रकस्त्रिवृता दन्ती तेजोह्वा पलिकाः पृथक् ।
पृथक्त्रिपलिकाः कार्या व्योषैलामरिचत्वचः ॥ ५ ॥
निक्षिपेन्मधु शीते च तस्मिन्प्रस्थप्रमाणकम् ।
एवं सिद्धो भवेच्छ्रीमान्बाहुशालो गुडः शुभः ॥ ६ ॥
जयेदर्शांसि सर्वाणि गुल्मान्वातोदरं तथा ।
आमवातं प्रतिश्यायं ग्रहणीक्षयपीनसान् ।
हलीमकं पाण्डुरोगं प्रमेहं च रसायनम् ॥ ७ ॥

कडु इंद्रावणीचीं फळें (कडू वृंदावन), नागरमोथे, सुंठ, दांतीमूळ, हिरडेदळ, तेड, कचोरा, वावडिंगें, गोखरूं, चित्रक, तेजबळ, हीं औषधें दोन दोन तोळे; सुरणाचा कांदा बत्तीस तोळे, वरधारेच्या मुळ्या सोळा तोळे, बिब्बे सोळा तोळे ह्या सर्वांचा दहाशें चोवीस तोळे पाण्यांत चतुर्थांश काढा करावा. आणि काढा करण्याकरितां जीं औषधें घातलीं होतीं त्यांच्या तिप्पट गूळ त्या काढ्यांत घालून पुनः पाक करावा. बरोबर पाक झाल्यावर त्यांत चित्रकमूळ, तेड, दांतीमूळ, तेजबळ हीं चारचार तोळे; सुंठ, मिरीं,

पिंपळी, वेलदोडे, मिरीं व दालचिनी हीं औषधें बाराबारा तोळे, घालून सारखें ढवळून चुलीवरून उतरावा. निवाल्यावर त्यांत एक प्रस्थ (६४ तोळे) मध घालावा, म्हणजे हा बाहुशाल गुड तयार होतो. हा सर्व प्रकारच्या मूळव्याधीचा, गुल्माचा व वातजन्य उदरांचा नाश करितो. तसेंच आमवात, पडसें, संग्रहणी, क्षय, पिनस, हलीमक, पांडु व प्रमेह ह्यांचा नाश करतो. हा रसायन (जरानाशक) आहे.

अगस्तिमोदक.

हरीतकीनां त्रिपलं त्रीण्याम्राणि कटुत्रिकम् ।
त्वकपत्रकं चार्धपलं गुडस्याष्टपलं मतम् ॥ १ ॥
अगस्तिमोदकानेतान्कल्पितान्परिभक्षयेत् ।
शोफार्शोग्रहणीदोषकासोदावर्तनाशनान् ॥ २ ॥

हिरडेदळ बारा तोळे, आमचुरें बारा तोळे; सुंठ, मिरीं व पिंपळी चार चार तोळे; दालचिनी व तमालपत्र दोन दोन तोळे; गूळ बत्तीस तोळे ह्यांच्या गोळ्या कराव्या. ह्याला अगस्तिमोदक म्हणतात. हा भक्षण केला असतां सूज, मूळव्याध, संग्रहणी, खोकला, उदावर्त ह्यांचा नाश करतो.

लघुसूरणमोदक.

कणामरीचविश्वाग्निसूरणैस्तु गुडैः क्रमात् ।
द्विगुणैर्मोदकोऽर्शोघ्नः परं पाचनदीपनः ॥ १ ॥

पिंपळी, मिरीं, सुंठ, चित्रकमूळ व सुरणाचा कांदा हीं औषधें उत्तरोत्तर दुप्पट प्रमाणांत घेऊन गोळ्या कराव्या. याला लघुसुरणमोदक म्हणतात. हा मूळव्याधीचा नाशक असून पराकाष्ठेचा पाचक व दीपक आहे.

बृहद्भल्लातक लेह.

सुपक्वभल्लातफलानि सम्यग्द्विधा विधायाऽऽढकसंमितानि ।
विपाच्य तोयेन चतुर्गुणेन चतुर्थशेषे व्यपनीय तानि ॥ १ ॥
पुनः पचेत्क्षीरचतुर्गुणेन घृतांशयुक्तेन घनं यथा स्यात् ।
सितोपला षोडशभिः पलैश्च विमर्द्य संस्थाप्य दिनानि सप्त २
ततः प्रयोज्याग्निबलेन मात्रां जयेद्विकारानखिलान्गुदोत्थान् ।

कचान्सुनीलान्घनकुञ्चिताग्रान्सुपर्णदृष्टिं च शशांककान्तिम् ३
जवं हयानां बलमुत्तमं च स्वरं मयूरस्य हुताशदीप्तिम् ॥
स्त्रीवल्लभत्वं विविधप्रभावं नीरोगतां द्वित्रिशतायुषं च ॥ ४ ॥
न चान्नपाने परिहार्यमस्ति न चाऽऽतपे नाध्वनि मैथुने च ।
प्रयोगकाले सकलामयानां राजाधिराजश्च रसायनानाम् ॥५॥

उत्तम पिकलेले बिब्बे दोनशेंछप्पन्न तोळे घेऊन त्यांचा दहाशें चोवीस तोळे पाण्यांत चतुर्थांश काढा करावा. काढा झाल्यावर त्यांतील बिब्बे काढून टाकून त्यांत त्या काढ्याच्या चौपट दूध व चतुर्थांश तूप घालून पाक करावा. दाट झाल्यावर त्यांत खडीसाखर चौसष्ट तोळे घालून ढवळून चुलीवरून खालीं उतरून निवाल्यावर फडक्यानें तोंड बांधून सात दिवस तसाच ठेवावा. नंतर काढून अग्निबल पाहून द्यावा; म्हणजे हा सर्व प्रकारच्या मूळव्याधीचा नाश करितो. ह्याच्या सेवनानें केंस काळेभोर व दाट होतात. गरुडाप्रमाणें दृष्टि, चंद्राप्रमाणें कांति, घोड्याप्रमाणें वेग, उत्तम प्रकारचें सामर्थ्य, मोराप्रमाणें गंभीर शब्द व अग्नीप्रमाणें तेज हीं प्राप्त होतात. हा लेह सेवन करणारा मनुष्य स्त्रियांना प्रिय होतो. आरोग्य प्राप्त होतें. दोनशेंपासून तीनशें वर्षेपर्यंत आयुष्य प्राप्त होतें. हा प्रयोग चालू असतां ह्याला अन्नपानाचा नियम नाहीं. उन्हांत फिरणें, मार्ग चालणें किंवा मैथुन ह्यांविषयीं प्रतिबंध नाहीं. हा लेह सगळ्या रोगांचा व सर्व रसायनांचा राजा आहे. ह्याला बृहद्भल्लातक लेह म्हणतात.

मूळव्याधीवर शर्करासव.

दुरालभायाः प्रस्थं च चित्रकस्य वृषस्य च ।
पथ्यामलकयोश्चैव पाठाया नागरस्य च ॥ १ ॥
दद्याद्द्विपलिकान्भागाञ्जलद्रोणे विपाचयेत् ।
पादशेषे रसे पूते सुशीते शर्कराशतम् ॥ २ ॥
दत्वा कुम्भे दृढे स्थाप्यं मासार्धं घृतभाजने ।
प्रलिप्ते पिप्पलीचव्यप्रियंगुमधुसर्पिषा ॥ ३ ॥
तस्य मात्रां पिबेत्काले शार्करस्य यथाबलम् ।
अर्शांसि ग्रहणीरोगमुदावर्तमरोचकम् ॥ ४ ॥
शकृन्मूत्रानिलोद्गारावबन्धानग्निमार्दवम् ।

हृद्रोगं पाण्डुरोगं च सर्वरोगान्प्रणाशयेत् ॥ ५ ॥

घमासा चौसष्ट तोळे; चित्रकमूळ, अडुळसा, हिरडेदळ, आवळकाठी, पहाडमूळ, सुंठ हीं औषधें आठ आठ तोळे घेऊन दहाशें चोवीस तोळे पाण्यांत चतुर्थांश काढा करावा. काढा तयार झाल्यावर गाळून घेऊन त्यांत शंभर तोळे पिठीसाखर घालून तुपानें राबलेल्या भांड्यास आंतून पिंपळी, चवक, गव्हला, तूप व मध ह्यांचा लेप करून त्यांत घालून पंधरा दिवस पुरून ठेवावें. नंतर काढून शक्तिमानाप्रमाणें द्यावें. हें मूळव्याध, संग्रहणी, उदावर्त, अरुचि, मल, मूत्र, अधोवायु, ढेकर ह्यांचा अवरोध, अग्निमांद्य, हृद्रोग, पांडुरोग वगैरे सर्व रोगांचा नाश करतें. ह्याला शर्करासव म्हणतात.

द्राक्षासव.

द्राक्षापलशतं पक्त्वा चतुर्द्रोणेऽम्भसः पचेत् ।
द्रोणशेषे रसे तस्मिन्पूतशेषे प्रदापयेत् ॥ १ ॥
शर्करायास्तुलां दत्वा तत्तुल्यं मधुनस्तथा ।
पलानि सप्त धातक्याः स्थापयेदाज्यभाजने ॥ २ ॥
जातीलवङ्गकङ्कोललवलीफलचन्दनैः ।
कृष्णा त्रिगन्धसंयुक्ता भागैरर्धपलांशकैः ॥ ३ ॥
त्रिःसप्ताहाद्भवेत्पेया तस्य मात्रा यथाबलम् ।
नाम्ना द्राक्षासवो ह्येष नाशयेद्गुदकीलकान् ॥ ४ ॥
शोषारोचकहृत्पाण्डुरक्तपित्तभगंदरान् ।
गुल्मोदरकृमिग्रन्थिक्षतशोषज्वरान्तकृत् ।
वातपित्तप्रशमनः शस्तश्च बलवर्णकृत् ॥ ५ ॥

चारशें तोळे द्राक्षें चाळीसशें शहाण्णव तोळे पाण्यांत पचन करून चतुर्थांश काढा राहिल्यावर तो गाळून घेऊन त्यांत चारशें तोळे साखर, चारशें तोळे मध, व अठ्ठावीस तोळे धायटीचीं फुलें घालून तुपानें राबलेल्या मडक्यांत भरून त्यांत जायफळ, लवंग, कंकोळ, लवलीफळ (हरपररेवडी=रायआवळी) चंदन, पिंपळी, त्रिगंध, (जायफळ, सुपारी व लवंग) हीं औषधें दोन दोन तोळे घालून एकवीस दिवस पुरून ठेवावें. नंतर काढून शक्तीप्रमाणें

सेवन करावें. ह्याला द्राक्षासव असें म्हणतात. हें मूळव्याधीच्या मोडांचा नाश करितें. शिवाय क्षय, अरुचि, हृदयांतील पीडा, पांडुरोग, रक्तपित्त, भगंदर, गुल्म, उदर, कृमि, ग्रंथि, उरःक्षतापासून होणारा क्षय व ज्वर ह्यांचा नाश करितें. वातपित्ताचें शमन करितें. बल व कांति देण्याविषयीं हें प्रशस्त आहे.

समशर्करचूर्ण.

शुण्ठीकणामरिचनागदलत्वगेलं
चूर्णीकृतं क्रमविवर्धितमूर्ध्वमन्त्यात् ।
खादेदिदं समसितं गुदजाग्निमान्द्य-
गुल्मोदरश्वयथुपाण्डुगुदोद्भवेषु ॥ १ ॥

वेलदोड्याचे दाणे एक भाग, दालचिनी दोन भाग, विड्याचीं पानें तीन भाग, मिरीं चार भाग, पिंपळी पांच भाग व सुंठ सहा भाग, ह्याप्रमाणें औषधें घेऊन त्यांचें चूर्ण करून त्या चूर्णाच्या बरोबरीनें साखर घालून मूळव्याध, अग्निमांद्य, गुल्म, उदर, सूज, व पांडुरोग ह्या विकारांवर द्यावें. यास समशर्करचूर्ण म्हणतात.

व्योषाद्य चूर्ण.

व्योषाग्न्यरुष्करविडङ्गतिलाभयानां
चूर्णं गुडेन सहितं सततं प्रयोज्यम् ।
दुर्नामशोफगरकुष्ठशकृद्विबन्ध-
मग्नेर्जयत्यबलतां कृमिपाण्डुतां च ॥ १ ॥
चूर्णे चूर्णसमो देयो मोदके द्विगुणो गुडः ।

सुंठ, मिरीं, पिंपळी, चित्रकमूळ, बिब्बे, वावडिंगें, तीळ, बाळहिरडे ह्यांचें चूर्ण गुळाबरोबर नेहमीं घ्यावें. तें मूळव्याध, सूज, विषबाधा, कुष्ठ, मलबद्धता, अग्निमांद्य, कृमि, पांडुरोग ह्यांचा नाश करितें. हें चूर्ण घ्यावयाचें असेल त्या वेळीं गूळ चूर्णाबरोबरीनें घ्यावा, आणि गोळ्या करावयाच्या असल्यास गूळ दुप्पट घ्यावा.

गुडव्योषवरावेल्लतिलारुष्करचित्रकैः ।
अर्शांसि हन्ति गुटिका त्वग्विकारं च शीलिता ॥ २ ॥

गूळ, सुंठ, मिरीं, पिंपळी, हिरडा, बेहडा, आवळकाठी, वावडिंग, तीळ, बिब्बे व चित्रकमूळ ह्यांच्या गोळ्या करून नेहमीं

घ्याव्या. त्या मूळव्याध व त्वचेचे विकार ह्यांचा नाश करितात.

गुडेन शुण्ठीमथवोपकुल्यां पथ्यां तृतीयामथ दाडिमं च।
आमेष्वजीर्णेषु गुदामयेषु वर्चोविबन्धेषु च नित्यमद्यात् ॥३॥

सुंठ, पिंपळी, हिरडेदळ व डाळिंब (कोवळें) ह्यांचें चूर्ण गुळाशीं घ्यावें. तें आमांश, अजीर्ण, मूळव्याध व मलबद्धता ह्या विकारांवर नित्य घ्यावें.

शर्करया युतसूरणकन्दः कुञ्जरकेसरमेव तथाऽन्यत्।
क्षौद्रयुतं नवनीतमथो वा सूदनकारणमर्शस एव ॥ ४ ॥

सुरणाचा कांदा साखरेशीं घ्यावा, किंवा मधांतून अगर लोण्यांतून घ्यावा. तो मूळव्याधीच्या विकारावर हत्तीला सिंहाप्रमाणें आहे.

समूलपत्रकोकम्बं पलद्वयमितं शुभम्।
भल्लातफलमज्जाया मरीचस्य पलं पलम् ॥ ५ ॥
एतच्चूर्णीकृतं सूक्ष्मं भक्षयेत्कर्षसंमितम्।
अर्शोंकुरान्निहन्त्याशु सबाह्याभ्यन्तरानपि ॥ ६ ॥

मुळें व पानें ह्यांसह कोकंब्याची (रातंब्याचीं. ह्याचींच अमसुलें होतात.) झाडें आठ तोळे, बिब्यांतील गोडंब्या चार तोळे व मिरीं चार तोळे ह्यांचें चूर्ण करून तें एक तोळा घ्यावें. तें आतील व बाहेरील मूळव्याधीच्या मोडांचा नाश करतें.

दुःस्पर्शकेन बिल्वेन यवान्या नागरेण वा।
एकैकेनापि संयुक्ता पाठा हन्त्यर्शसां रुजम् ॥ ७ ॥

धमासा, कोवळें बेलफळ, ओवा व सुंठ ह्यांपैकीं कोणत्याही एका जिनसाशीं जरी पहाडमुळाचें चूर्ण करून घेतलें, तरी तें मूळव्याधीची व्यथा दूर करितें.

अपामार्गस्य बीजानां कल्कं तण्डुलवारिणा।
पीतं रक्तार्शसां नाशं कुरुते नात्र संशयः ॥ ८ ॥

आघाड्याच्या बियाचें चूर्ण तांदुळाच्या धुवणाबरोबर घ्यावें. तें रक्तजन्य मूळव्याधीचा नाश करितें, यांत शंका नाहीं.

चन्दनकिराततिक्तकधन्वयवासाः सनागराः कथिताः।
रक्तार्शसां प्रशमना दार्वीत्वगुशीरनिम्बाश्च ॥ ९ ॥

रक्तचंदन, काडेचिराईत, धमासा व सुंठ ह्यांचा काढा रक्तजन्य मूळव्याधीचा नाश करितो. तसेंच दारुहळद, दालचिनी व कडू

निंबाची साल ह्यांचाही काढा रक्तजन्य मूळव्याधीचा नाश करतो.

विड्विबन्धे हितं तक्रं यवानीविश्वसंयुतम् ।
न प्ररोहन्तिगुदजाः प्रायस्तक्रसमाहताः ॥ १० ॥

मळाचा खडा होत असल्यास त्यावर सुंठ व ओवा घालून तयार केलेलें ताक हितावह आहे. ताकाच्या सेवनानें नाहींसे झालेले मोड पुन्हा उत्पन्न होत नाहींत.

यो जातो गोरसः क्षीराद्वह्निमूलावचूर्णितात् ।
पिबंस्तमेव तेनैव भुञ्जानो गुदजान्जयेत् ॥ ११ ॥

चित्रकमूळाचें चूर्ण घालून तापविलेल्या दुधाचें ताक करून तें प्यावें व त्यानेंच जेवण करावें, म्हणजे मूळव्याधीचा नाश होतो.

पिबेदहरहस्तक्रं निरन्नो वा प्रकामतः ।
सप्ताहं वा दशाहं वा मासार्धं मासमेव वा ॥ १२ ॥

मूळव्याधीच्या मनुष्यानें अन्न न खातां सात दिवस, दहा दिवस, पंधरा दिवस किंवा महिनाभर इच्छेला वाटेल तितकें ताकच पिऊन राहावें.

बलकालविकारज्ञो भिषक् तक्रं प्रयोजयेत् ।

बल, काल व विकार ह्यांसंबंधीं पूर्ण माहिती करून घेऊन वैद्यानें ताकाची योजना करावी.

हरीतकीं तक्रयुतां त्रिफलां वा प्रयोजयेत् ॥ १३ ॥
चित्रकं हपुषां हिंगु दद्याद्वा तक्रसंयुतम् ।
पञ्चकोलकयुक्तं वा तक्रेणैव प्रदापयेत् ॥ १४ ॥

हिरड्याचें चूर्ण अथवा त्रिफळ्याचें चूर्ण ताकाशीं द्यावें. तसेंच चित्रकमूळ, शेरणी, हिंग ह्यांचें चूर्ण ताकाशीं द्यावें. किंवा पंचकोलाच (सुंठ, मिरीं, पिंपळी, चवक व चित्रक ह्यांचें) चूर्ण ताकाशीं द्यावें.

त्वचं चित्रकमूलस्य पिष्ट्वा कुम्भं प्रलेपयेत् ।
तक्रं वा दधि वा तत्र जातमर्शोहरं पिबेत् ॥ १५ ॥

चित्रकमूळाच्या सालीचें चूर्ण पाण्यांत वाटून त्याचा मडक्यास आंतून लेप करावा. आणि त्यांत विरजलेलें दहीं अथवा त्या दह्याचें ताक हीं दोन्हीही मूळव्याधीचा नाश करणारीं आहेत म्हणून त्यांचें सेवन करावें.

तक्रेणार्शांसि हन्यन्ते मुसलीकटुकाग्निना ।

मुसळी, कुटकी व चित्रकमूळ ह्यांचें चूर्ण घालून ताक प्यावें. तें मूळव्याधीचा नाश करितें.

अरलुत्वगग्निसुरेन्द्रयवांघ्रिरिबिल्वससैन्धवशुण्ठियुतान् ।
मथितेन पिबेद्यदि सप्त दिनं गुदजा निपतन्ति समूलबलाः ॥१६॥

टेटूच्या मुळाची साल, चित्रकमूळ, इंद्रजव, करंजाची साल, सैंधव व सुंठ ह्यांचें चूर्ण जर ताकाशीं सात दिवस घेतलें, तर मूळव्याधींचे मोड मुळासकट गळून पडतात.

हपुषादि तक्रारिष्ट.

हपुषा कुञ्चिका धान्यममाजी कारवी शटी ।
पिप्पली पिप्पलीमूलं चित्रको गजपिप्पली ॥ १ ॥
यवानी चाजमोदा च तच्चूर्णं तक्रसंयुतम् ।
मन्दाम्लकटुकं विद्वान्स्थापयेद्घृतभाजने ॥ २ ॥
व्यक्ताम्लकटुकं जातं तक्रारिष्टं कटुप्रियम् ।
प्रपिबेन्मात्रया काले त्वन्नस्य तृषितस्तथा ॥ ३ ॥
दीपनं रोचनं वर्ण्यं कफवातानुलोमनम् ।
गुदश्वयथुकण्ड्वार्तिनाशनं बलवर्धनम् ॥ ४ ॥

शेरणी, काळें जिरें, धने, जिरें, बडिशेप, कचोरा, पिंपळी, पिंपळमूळ, चित्रक, गजपिंपळी, ओवा, अजमोदा, ह्यांचें चूर्ण ताकांत घालावें. तें ताक फार आंबट नसावें. ह्याप्रमाणें किंचित् आंबट व तिखट असें तें मिश्रण तुपानें राबलेल्या मडक्यांत घालून ठेवावें. कांहीं दिवसांनीं तें चांगलें आंबट व तिखट झाल्यावर ज्याला तिखट पदार्थांची फार आवड आहे त्यानें योग्य प्रमाणांत योग्य वेळीं जेवणांत अगर तहान लागली असतां द्यावें. हें कफवाताचें अनुलोमन करणारें, दीपक, रुचिकारक, वर्णकारक व मूळव्याध, सूज व कंडू ह्यांचा नाश करणारें व बलवर्धक आहे.

चव्यादि घृत.

चव्यं त्रिकटुकं पाठा क्षारं कुस्तुम्बरूणि च ।
यवानी पिप्पलीमूलमुभे च बिडसैन्धवे ॥ १ ॥
चित्रकं बिल्वमभयां पिष्ट्वा सर्पिर्विपाचयेत् ।
शकृद्वातानुलोमार्थं जले दध्नि चतुर्गुणे ॥ २ ॥

प्रवाहिकां गुदभ्रंशं मूत्रकृच्छ्रं परिस्रवम् ।
गुदवङ्क्षणशूलं च घृतमेतद्व्यपोहति ॥ ३ ॥

चवक, सुंठ, मिरीं, पिंपळी, पहाडमूळ, जवखार, धने, ओवा, पिंपळमूळ, बिडलोण, सेंधेलोण, चित्रकमूळ, हिरडेदळ, ह्यांचें चूर्ण करून त्या चूर्णाच्या चौपट तूप व दह्यावरील निवळ तुपाच्या चौपट घेऊन तूप तयार करावें. हें मल व अधोवायु ह्यांचें अनुलोमन करणारें, प्रवाहिका, गुदभ्रंश (अंग बाहेर येणें), उन्हाळे (मूत्रकृच्छ्र), स्राव, गुद व आडसंधी ह्यांमधील शूल, ह्यांचा नाश करितें. ह्याला चव्यादि घृत म्हणतात.

शुंठीघृत.

त्रिंशत्पलानि शुण्ठीनां जलद्रोणे विपाचयेत् ।
तेन पादावशेषेण कल्के तासां पचेद्घृतम् ॥ १ ॥
दुर्नामश्वासकासघ्नं प्लीहपाण्ड्वामयापहम् ।
विषमज्वरशान्त्यर्थं तृष्णारोचकनाशनम् ॥ २ ॥
शुण्ठीघृतमिदं ख्यातं कृष्णात्रेयेण पूजितम् ।
नागरेण जले पक्वं बस्तिकुक्षिगदापहम् ॥ ३ ॥

एकशेंवीस तोळे सुंठ दहाशेंचोवीस तोळे पाण्यांत शिजवून चतुर्थांश काढा करावा. तो काढा आणि त्याच सुंठीचा कल्क ह्यांनीं तूप सिद्ध करावें. तें मूळव्याध, श्वास, खोकला, पांथरी, पांडुरोग, विषमज्वर, तहान, व अरुचि ह्यांचा नाश करितें. ह्याला शुंठीघृत असें म्हणतात. हें कृष्णात्रेयांनीं सांगितलें आहे. सुंठ व पाणी ह्यांच्या संयोगानें तयार केलेलें हें घृत बस्ति व कुशी ह्यासंबंधीचे रोगांचा नाश करितें.

लघुचव्यादि घृत.

चव्यतिक्ताकलिङ्गानि शताह्वा लवणानि च ।
सर्पिरर्शोविकारघ्नं ग्रहणीदीपनं परम् ॥ १ ॥

चवक, कुटकी, इंद्रजव, बडिशेप, पंचलवणें (सेंधेलोण, पादेलोण, बिडलोण, मीठ व कांचलवण) ह्यांनीं तयार केलेलें हें लघुचव्यादि घृत मूळव्याधीचें नाशक असून ग्रहणी नांवाची जी पित्तधरा कला तिचें दीपन करणारें (अग्नीचें दीपन करणारें) आहे.

ऱ्हीबेरादि घृत.

ह्रीबेरमुत्पलं लोध्रं समङ्गाचव्यचन्दनम् ।
पाठा सातिविषा बिल्वं धातकी देवदारु च ॥ १ ॥
दार्वीत्वङ्नागरं मांसी मुस्तं क्षारो यवाग्रजः ।
चित्रकश्चेति पेष्याणि चाङ्गेरीस्वरसे घृतम् ॥ २ ॥
एकत्र साधयेत्सर्वं तत्सर्पिः परमौषधम् ।
अर्शोऽतिसारग्रहणीपाण्डुरोगे ज्वरेऽरुचौ ॥ ३ ॥
मूत्रकृच्छ्रे गुदभ्रंशे बस्त्यानाहप्रवाहिके ।
पिच्छास्रावेऽर्शसां शूले योज्यमेतत्त्रिदोषहृत् ॥ ४ ॥

वाळा, कमळ, लोध्र, लाजाळु, चवक, चंदन, पहाडमूळ, अतिविष, बेलफळ, धायटीचीं फुलें, देवदार, दारुहळद, दालचिनी, सुंठ, जटामांसी, नागरमोथे, जवखार, चित्रकमूळ, ह्यांचा चुक्याच्या रसांत कल्क तयार करून तो कल्क व चुक्याचा रस ह्यांमध्यें तूप सिद्ध करावें. हे ऱ्हीबेरादि घृत परमौषध आहे. हें मूळव्याध, अतिसार, संग्रहणी, पांडुरोग, ज्वर, अरुचि, मूत्रकृच्छ्र, गुदभ्रंश, बस्तीचे रोग, आनाह, प्रवाहिका, पिच्छस्राव (बुळबुळीत आंव वगैरे पडणें) व मूळव्याधीचा ठणका ह्या विकारांवर हें त्रिदोषनाशक असें ऱ्हीबेरादि घृत द्यावें.

लेप.

आर्कं पयः सुधाकाण्डं कटुकालाबुपल्लवाः ।
करञ्जो बस्तमूत्रेण लेपनं श्रेष्ठमर्शसाम् ॥ १ ॥

रुईचा चीक, तिधारी निवडुंगाचा दांडा, कडू भोपळ्याचीं पानें, करंजाचें बी ह्यांचा शेळीच्या मुतामध्यें कल्क करावा आणि तो मूळव्याधीचे मोडांस लावावा. हा फार उत्तम आहे.

सिन्धूत्थं देवदाल्याश्च बीजं काञ्जिकपेषितम् ।
गुदांकुरान्प्रलेपेन पातयत्यचलानपि ॥ २ ॥

सैंधेलोण व देवडांगरीचें बीं हीं औषधें कांजींत वाटून मोडांस लेप करावा; म्हणजे न हालणारे मोड देखील गळून पडतात.

कृष्णाशिरीषबीजार्कक्षीरैः सामरसैन्धवैः ।
हरिद्राकुष्ठविडङ्गुञ्जागोमूत्रैः पिप्पलीयुतैः ॥ ३ ॥
एतल्लेपत्रयं योज्यं शीघ्रमर्शोविनाशनम् ।

जटामांसी, शिरसाचें बीं, रुईचा चीक, सांबराचें शिंग, सेंधे-लोण, हळद, अस्वलाची विष्ठा, गुंजा, गोमूत्र व पिंपळी हीं सर्व औषधें एकत्र वाटून त्यांचा तीन वेळ लेप करावा; म्हणजे मूळव्याधीच्या मोडांचा त्वरित नाश होतो.

ज्योतिष्काबीजकल्केन लेपो रक्तार्शसां हितः ॥ ४ ॥

करडकांगोणीचें बीं आणून तें वांटून त्याचा लेप केला असतां रक्तजन्य मूळव्याधीवर उपयोगी आहे.

कोशातकीरजोघर्षान्निपतन्ति गुदोद्भवाः ।

कडू दोडक्याच्या चूर्णानें घासावें म्हणजे मोड गळून पडतात.

निशाकोशातकीचूर्णं स्नुक्पयः सैन्धवान्वितम् ।
गोमूत्रेण समायुक्तं लेपो दुर्नामनाशनः ॥ ५ ॥

हळद, कडु दोडक्याचें बी, सेंधेलोण व तिधारी निवडुंगाचा चीक ह्यांचा गोमूत्राशीं लेप केला असतां मूळव्याधीच्या मोडांचा नाश होतो.

धुरी.

नृकेशाः सर्पनिर्मोको वृषदंशस्य चर्म च ।
अर्कमूलं शमीपत्रमर्शोभ्यो धूपनं हितम् ॥ १ ॥

मनुष्याचे केंस, सापाची कात, मांजराचें कातडें, रुईचें मूळ, शमीचीं पानें ह्यांची धुरी मूळव्याधीच्या मोडांला हितकारक आहे.

रालचूर्णस्य तैलेन सार्षपेण युतस्य च ।
धूमदानेन युक्त्याऽर्शोरक्तस्रावो निवर्तते ॥ २ ॥

राळेचें चूर्ण व शिरसाचें तेल हीं एकत्र करून धुरी द्यावी. ती मोडांतून होणाऱ्या रक्तस्रावाचा नाश करिते.

गोधूमपिष्टं पलमेव हिंगु शाणार्धमारुष्करमब्धिसंख्यम् ।
स्याद्धूपदानाद्गुदशूलनाशः स्यात्संनिपातो गुदसंभवानाम् ॥ ३ ॥

गव्हाचें पीठ चार तोळे, हिंग दोन मासे आणि चार बिब्बे ह्यांच्या धुरीनें गुदासंबंधीं ठणका नाहींसा होतो व मोड गळून पडतात.

नित्योदित रस.

विषरविगगनायःसूतगन्धं समांशं
समद्दुतभुगथाऽऽर्द्रं कन्दकैः सप्तवारम् ।

प्रबलगुदजकीलं हन्ति नित्योदितोऽसौ
नलहतिमलबन्धे मुद्गमात्रः ससर्पिः ॥ १ ॥

बचनाग, ताम्रभस्म, अभ्रकभस्म, लोहभस्म, पारा व गंधक हीं समभाग, सर्वांच्या समान बिब्बे, ह्यांचा सुरणाच्या कांद्याच्या रसांत सात दिवस खल करावा. हा नित्योदितरस प्रबळ अशा मूळव्याधीच्या मोडांचा नाश करतो. हा नळाचा विकार व मलबद्धता ह्यांजवर मुगाइतका तुपाशीं द्यावा.

अर्शःकुठार.

भागः शुद्धरसस्य भागयुगलं गन्धस्य लोहाभ्रयोः
षड्बिल्वाग्निहलोषणाभयरजोदन्ती च भागैः पृथक् ।
पञ्च स्युः स्फुटटङ्कणस्य च यवक्षारस्य सिन्धूद्भवा-
द्भागाः पञ्च गवां जलं सुविमलं द्वात्रिंशदेतत्पचेत् ॥१॥
स्नुग्दुग्धं च गवां जलावधि शनैः पिण्डीकृतं तद्भवे-
द्वौ माषौ गुदकीलकाननजटाछेदे कुठारो रसः ॥ २ ॥

पारा १ भाग, गंधक २ भाग, लोहभस्म दोन भाग, अभ्रकभस्म दोन भाग; बेलफळ, चित्रकमूळ, सुंठ, मिरीं, पिंपळी, हिरडेदळ, दांतीमूळ हीं प्रत्येक सहा सहा भाग, टाकणखाराची लाही पांच भाग, जवखार व सेंधेलोण पांच पांच भाग, ह्या सर्वांचा एकत्र खल करून बत्तीस भाग गोमूत्रामध्यें पचन करावें. नंतर त्यांत तिधारी निवडुंगाचा चीक बत्तीस तोळे घालून खलून दोन उडदांप्रमाणें गोळ्या करून द्याव्या. ह्याला अर्शःकुठार रस म्हणतात. हा मूळव्याधीच्या मोडांच्या मुळ्या तोडून काढण्याला कुऱ्हाडीप्रमाणें[1] आहे.

पथ्यापथ्य.

कुलित्था यवगोधूमाः शालयो रक्तभा हिताः ।
पुनर्नवा सूरणं च तक्रं धात्री कपित्थकम् ॥ १ ॥

---

१. पारा, गंधक, गुळवेलीचें सत्व हीं समभाग व सर्वांच्या समान रक्तबोळ ह्यांचा पांढऱ्या शेवरीच्या सालीच्या रसांत खल करावा. ह्याला **बोलबद्धरस** म्हणतात. हा मधाशीं तीन वाल द्यावा. हा क्षणांत रक्तमूळव्याधीचा नाश करतो. तसेंच पित्तजन्य मूळव्याध, विद्रधि (करट), रक्तप्रमेह, गुदावाटे पडणारें रक्त, स्त्रियांचा प्रदर रोग व भगंदर ह्यांचा नाश करतो.

नवनीतं तु वास्तूकं पटोलं मारिचं तथा ।
मृगमांसमजादुग्धं वृन्ताकं कांजिकं तथा ॥ २ ॥
अर्शोरोगे तु पथ्यानि मुनिभिः कथितानि तु ।

हुलगे, सातु, गहू, तामसाळ, घेटुळी (वसू), सुरण, ताक, आवळे, कवठ, लोणी, चंदनबटवा किंवा चाकवत, पडवळ, मिरें, हरणाचें मांस, शेळीचें दूध, वांगें व कांजी हे पदार्थ मूळव्याधीला पथ्यकारक आहेत, म्हणून मुनींनीं सांगितलें आहे.

वेगावरोधः स्त्री पृष्ठयानमुत्कटकासनम् ॥
यथास्वं दोषलं चान्नमर्शसः परिवर्जयेत् ॥ ३ ॥

मलमूत्रादिकांच्या वेगाचा अवरोध करणें, मैथुन, पृष्ठयान (घोड्यावर वगैरे बसणें), उकीडवें बसणें आणि त्या त्या दोषांना वाढविणारें अन्न हें मूळव्याधीला अपथ्य आहे. हें वर्ज करावें.

अग्निमांद्य.

मन्दस्तीक्ष्णोऽथ विषमः समश्चेति चतुर्विधः ।
कफपित्तानिलाधिक्यात्तत्साम्याज्जाठरोऽनलः ॥ १ ॥

अनुक्रमें कफ, पित्त व वात ह्यांच्या वाढीनें जठराग्निही मंद, तीक्ष्ण, आणि विषम (अनियमित) असतो, आणि हे तीनही दोष समान असले म्हणजे जठराग्नि समान असतो. असे जठराग्नीचे चार प्रकार आहेत.

समविषमादि अग्नीचीं लक्षणें.

समा समाग्नेरशिता मात्रा सम्यग्विपच्यते ।
स्वल्पाऽपि नैव मन्दाग्नेर्विषमाग्नेस्तु देहिनः ॥
कदाचित्पच्यते सम्यक्कदाचिन्नैव पच्यते ॥ १ ॥
मात्राऽतिमात्राऽप्याशिता सुखं यस्य विपच्यते ।
तीक्ष्णाग्निरिति तं विद्यात्समाग्निः श्रेष्ठ उच्यते ॥ २ ॥

ज्या जठराग्नीकडून खाल्लेलें अन्न चांगलें पचविलें जातें, त्याला समाग्नि असें म्हणतात. थोडें अन्न खाल्लें असून देखील तें पचन होत नाहीं, त्याला मंदाग्नि असें म्हणतात; आणि प्रमाणांत अन्न खाल्लें असून कधीं पचतें तर कधीं पचत नाहीं, त्याला विषमाग्नि

म्हणतात. प्रमाणांत खाल्लेलें असो अगर अधिक खाल्लेलें असो, असें खाल्लेलें अन्न ज्या अग्नीकडून सहज पचलें जातें, त्याला तीक्ष्णाग्नि असें म्हणतात. समाग्नि हा सर्वांत श्रेष्ठ मानला आहे.

विषमो वातजान्रोगांस्तीक्ष्णः पित्तनिमित्तजान् ॥
करोत्यग्निस्तथा मन्दो विकारान्कफसंभवान् ॥ ३ ॥

विषमाग्नि वातजन्य विकार उत्पन्न करतो; तीक्ष्णाग्नि पित्तजन्य विकार उत्पन्न करितो; आणि मंदाग्नि कफजन्य विकार उत्पन्न करतो.

अग्नीची चिकित्सा.

समस्य रक्षणं कार्यं विषमे वातनिग्रहः ।
तीक्ष्णे पित्तप्रतीकारो मन्दे श्लेष्मविशोधनम् ॥ १ ॥

समाग्नीचें रक्षण करावें. विषमाग्नि असतां वातनाशक चिकित्सा करावी; तीक्ष्णाग्नि असतां पित्तनाशक चिकित्सा करावी; आणि मंदाग्नि असतां कफनाशक चिकित्सा करावी.

सममग्निं भिषग्रक्षेदन्नपानैर्नृणां हितैः ।
मन्दं संवर्धयेदग्निं कटुतिक्तकषायकैः ॥ २ ॥
तीक्ष्णमग्निं दधिक्षीरपायसैः समतां नयेत् ।
स्नेहाम्ललवणाद्यैश्च विषमाग्निमुपाचरेत् ॥ ३ ॥

हितकारक असे अन्नपानादिक उपचार करून समाग्नीचें रक्षण करावें. तिखट, कडू व तुरट अशा औषधांनीं मंदाग्नीचें प्रदीपन करावें. तीक्ष्ण अग्नि असल्यास त्याला दहीं, दूध, क्षीर वगैरे अन्नपानादिकांनीं समान स्थितींत आणावा. विषमाग्नीवर स्नेह (तेल-तूप), आंबट व खारट पदार्थ ह्यांनीं उपचार करावे.

जरणरुचकशुण्ठीपिप्पलीतीक्ष्णवेल्लं
सुलवणमजमोदाहिंगुपथ्येतिकर्षम् ।
पृथगथ पलमात्रं स्यात्त्रिवृच्चूर्णमेषां
जननमुदरवह्नेः पाचनं रेचनं च ॥ ४ ॥

जिरें, पादेलोण, सुंठ, पिंपळी, चवक, वावडिंग, सैंधेलोण, ओंवा, हिंग व हिरडेदळ हीं औषधें प्रत्येक एक एक तोळा; आणि चार तोळे तेड ह्यांचें चूर्ण करावें. हें अग्निदीपक, पाचक व रेचक आहे.

भस्मकलक्षण.

कफे क्षीणे यदा पित्तं स्वस्थाने मारुतानुगम् ।
तीव्रं प्रवर्तयत्यग्निं तदा तं भस्मकं वदेत् ॥ १ ॥

कफ क्षीण झाला असतां स्वस्थानीं वाढलेलें पित्त वाताला अनुसरून जठराग्नीला अत्यंत वाढवितें, तेव्हां त्याला भस्मक असें म्हणावें.

कट्वादिरूक्षान्नभुजां नराणां क्षीणे कफे मारुतपित्तवृद्धौ ।
अतिप्रवृद्धः पवनान्वितोऽग्निः क्षणाद्रसं शोषयति प्रसह्य ॥२॥
भुक्तं क्षणाद्भस्म करोति यस्मात्तस्मादयं भस्मकसंज्ञकोऽभूत् ।
तृड्दाहमूर्छाभ्रमकासशोफविट्शोषमोहश्रमकर्मकारी ॥ ३ ॥
तृड्दाहश्वासकासादीन्कृत्वैवात्यग्निसंभवान् ।
पक्त्वाऽन्नमाशु धात्वादीन्स क्षिप्रं नाशयेद् ध्रुवम् ॥ ३ ॥

तिखट वगैरे रूक्ष अन्न खाणाऱ्या मनुष्याचा कफ क्षीण झाल्यामुळें वात व पित्त हे दोष वाढतात. त्यामुळें अतिशय वाढलेला जठराग्नि वातानें युक्त होऊन क्षणामध्यें अन्नरसाचें पचन करतो खाल्लेल्या पदार्थाचें क्षणांत भस्म करून टाकतो, म्हणून ह्या विकाराला भस्मक असें म्हणतात. त्यांत—तहान, दाह, मूर्च्छा, भोंवळ, खोकला, सूज, मळ शुष्क होणें, मोह व श्रम हीं लक्षणें होतात. तहान, दाह, श्वास, कास, इत्यादि अत्यग्नीपासून होणारे विकार उत्पन्न करून अन्नाचें त्वरित पचन करून हा भस्मकरोग शुक्रादि धातूंचा नाश करतो.

चरकामधील भस्मकाचें लक्षण.

नरे क्षीणकफे पित्तं कुपितं मारुतानुगम् ।
सोष्मणः पाचकस्थाने बलमग्नेः प्रयच्छति ॥ १ ॥
तदा लब्धबलो देहं रूक्षयेत्साऽनिलोऽनलः ।
अभिभूय पचत्यन्नं तैक्ष्ण्यादाशु मुहुर्मुहुः ॥ २ ॥
पक्त्वाऽन्नं स ततो धातूञ्शोणितादीन्पचत्यपि ।
ततो दौर्बल्यमातङ्कं मृत्युं चोपनयेत्परम् ॥ ३ ॥
भुक्तेऽन्ने लभते शान्तिं जीर्णमात्रे प्रताम्यति ।
तृड्दाहकासमोहाः स्युर्व्याधयोऽत्यग्निसंभवाः ॥ ४ ॥

ज्या मनुष्याचा कफ क्षीण झाला आहे त्याचें पित्त वाढून वायूच्या

साहाय्यानें पक्वाशयांत शिरून आपल्या अंगच्या उष्णतेनें अग्नीचें बळ वाढवितें. त्या वेळीं प्रखर झालेला तो अग्नि वायुसहवर्तमान देहाला रुक्ष करतो. त्यामुळें त्या मनुष्याला फार भूक लागते व प्रखरपणामुळें खाल्लेलें अन्न जठराग्नि वरचेवर पचवून टाकतो. ह्याप्रमाणें तो अन्नाला पचवून अखेर रक्तादि धातूंनाही पचवितो. त्यामुळें दुर्बळपणा व तत्संबंधी विकार उत्पन्न होतात व अखेर मृत्युही येतो. अन्न खाल्लें असतां बरें वाटतें, आणि तें जिरलें कीं मूर्च्छा येते. ह्या विकारामध्यें तहान, दाह, खोकला व मोह हीं लक्षणें व अत्यग्नीमुळें होणारे रोग हीं होतात.

भस्मकरोगाचें निदान व चिकित्सा.

कफे क्षीणे यदा पित्तं स्वस्थाने मारुतानुगम् ।
तीव्रं प्रवर्तयेद्वह्निं तदा तं भस्मकं वदेत् ॥ १ ॥
तृड्दाहश्वासमूर्छादीन्कृत्वैवात्यग्निसंभवान् ।
पक्त्वाऽन्नमाशु धात्वादीन्स क्षिप्रं नाशयेत्तनुम् ॥ २ ॥

ज्या वेळीं कफ क्षीण होऊन पित्त स्वस्थानीं वाढतें, त्या वेळीं तें वायूचा आश्रय करून अग्नीला प्रखर करितें. त्याला भस्मक असें म्हणतात. त्यामध्यें जठराग्नि तहान दाह, श्वास, मूर्च्छा वगैरे विकार किंवा अत्यग्नीसंबंधाचे विकार उत्पन्न करून अन्नाला त्वरित पचवून धात्वादिकांना पचवितो व देहाचाही नाश करितो.

तं भस्मकं गुरुस्निग्धसान्द्रमण्डहिमादिभिः ।
अन्नपानैर्नयेच्छान्तिं पित्तघ्नैश्च विरेचनैः ॥ ३ ॥

त्या भस्मक रोगाला जड, स्निग्ध व दाट अशा मंडहिमादि-कांनीं, अन्नपानादिकांनीं व पित्तनाशक रेचनांनीं शांत करावें.

अत्युद्धताग्निशान्त्यै माहिषदधिदुग्धसर्पींषि ।
सेवेत वा यवागूं समधूच्छिष्टां ससर्पिष्काम् ॥ ४ ॥
असकृत्पित्तहरणं पायसं प्रतिभोजने ।
श्यामात्रिवृद्विपक्वं वा पयो दद्याद्विरेचनम् ॥ ५ ॥

अतिशय वाढलेल्या अग्नीला शांत करण्याकरितां म्हशीचें दहीं, दूध व तूप ह्यांचें किंवा मेण व तूप घातलेली कण्हेरी ह्यांचें सेवन करावें. वरचेवर प्रत्येक जेवणांत पित्तनाशक अशी खीर किंवा

काळें निशोत्तर घालून शिजविलेल्या दुधाचें रेचक द्यावें.

यत्किंचिन्मधुरं मेध्यं श्लेष्मलं गुरु भोजनम् ।
सर्वं तदत्यग्निहितं भुक्त्वा प्रस्वपनं दिवा ॥ ६ ॥

जें जें कांहीं मधुर, मेध्य, कफकारक व जड अन्न आहे, तें सारें अत्यग्नीला हितकारक असून, जेवण झाल्यावर दिवसा झोप घेणें हेंही हितकारक आहे.

कफे पूर्वं जिते पित्ते मारुते चानलः समः ।
समधातोः पचत्यन्नं पुष्ट्यायुर्बलवर्धनः ॥ ७ ॥

आधीं कफ, पित्त व वात ह्यांना जिंकून अग्नि सम झाला असतां समधातु मनुष्याचें अन्न योग्य प्रकारें पचन होऊन पुष्टि, आयुष्य व बल हीं वाढतात.

आहारं पचति शिखी दोषानाहारवर्जितः पचति ।
दोषक्षये च धातून्धातुक्षैण्ये तथा प्राणान् ॥ ८ ॥

जठराग्नि हा आहाराचें पचन करतो; आहार न मिळाल्यास दोषांना पचवितो. दोषांचा क्षय झाला असतां धातूंना पचवितो. व धातू क्षीण झाले असतां अखेर प्राणांनाही पचवितो (त्यांचा नाश करितो).

मुहुर्मुहुरजीर्णेऽपि भोज्यान्यस्योपहारयेत् ।
निरिन्धनोऽन्तरं लब्ध्वा यथैनं न विपादयेत् ॥ ९ ॥

भस्मकरोग्याला अजीर्ण झालें तरी देखील वरचेवर जेवूं घालावें. कारण त्याच्या आहाररूप इंधनांत अंतर न पडल्यामुळें त्याचा वाढलेला जठराग्नि त्याचा नाश करीत नाहीं.

कोलास्थिमज्जकल्कस्तु पीतो वाप्युदकेन वै ।
अचिराद्विनिहन्त्येवं प्रयोगो भस्मकं नृणाम् ॥ १० ॥

बोराच्या बीमधील मग काढून तो पाण्यांत वाटून त्यावा. तो भस्मकाचा त्वरित नाश करितो.

नारीक्षीरेण संपिष्य पिबेदौदुम्बरत्वचम् ।
ताभ्यां वा पायसं सिद्धं पिबेदत्यग्निशान्तये ॥ ११ ॥

स्त्रीच्या दुधामध्यें उंबराची साल वाटून प्यावी, अथवा बोराच्या बीमधील मगज व उंबराची साल ह्यांनीं सिद्ध केलेली दुधाची खीर

करून प्यावी. ती वाढलेल्या अग्नीला शांत करिते.

सिततण्डुलसितकलमक्षीरेण पायसं सिद्धम् ।
भुक्त्वा घृतेन पुरुषो द्वादश दिवसान्बुभुक्षितो न भवेत् ॥ १२

पांढरे तांदुळ, व पांढरें कमळ[1] ह्यांची दुधांत खीर करून ती तूप घालून खावी, म्हणजे त्या मनुष्याला बारा दिवसपर्यंत भूक लागत नाहीं.

विदारीस्वरसे क्षीरे पचेदष्टगुणे घृतम् ।
माहिषं जीवनीयेन कल्केनात्यग्निनाशनम् ॥ १३ ॥

भुईकोहळ्याचा रस व दूध हीं आठपट घेऊन त्यांत जीवनीय[2] गणाचा कल्क घालून म्हशींचें तूप तयार करावें. तें अत्यग्नीचा नाश करितें.

अजीर्णाचें निदान.

अविपक्वोऽग्निमान्द्येन यो रसः स निगद्यते ।
रोगाणां प्रथमो हेतुः सर्वेषामामसंज्ञया ॥ १ ॥

अग्निमांद्यामुळें अपक्व राहिलेला जो अन्नरस तो सर्व रोगांना मूळ कारण आहे. त्याला आम असें म्हणतात.

आमं विदग्धं विष्टब्धं कफपित्तानिलैस्त्रिभिः ।
अजीर्णं केचिदिच्छन्ति चतुर्थं रसशेषतः ॥ २ ॥
अजीर्णं पञ्चमं केचिन्निर्दोषं दिनपाकि च ।
वदन्ति षष्ठं चाजीर्णं प्राकृतं प्रतिवासरम् ॥ ३ ॥

वात, पित्त व कफ ह्या तीन दोषांपासून अनुक्रमें आमाजीर्ण, विदग्धाजीर्ण व विष्टब्धाजीर्ण अशीं तीन प्रकारचीं अजीर्णें होतात. आहारजन्य रस पोटांत शिल्लक राहिल्यास त्याला कित्येक चवथें रसशेष अजीर्ण मानितात. ज्या अजीर्णामध्यें कांहीं विकार नसतात, परंतु दिवस व रात्र मिळून पोटांत गेलेलें अन्न रात्रीमध्यें

---

१. मूळांत 'कलम' ह्या ठिकाणीं 'कमल' असा पाठभेद आहे. तो बरा दिसल्यावरून त्याला धरून 'कमल' असा अर्थ केला आहे.

२. जीवनीय गण—जविक, ऋषभक, मेदा, महामेदा, काकोली, क्षीरकाकोली, रानमूग, रानउडीद, हरणवेल व ज्येष्टमध ह्या औषधांच्या समुदायाला जीवनीय गण म्हणतात.

पचन न होतां दुसऱ्या दिवसापर्यंत राहतें, त्याला दिनपाकी नावांचें पांचवें अजीर्ण असें कित्येक म्हणतात. आणि रोजचें जेवलेलें अन्न पचन होइपर्यंत कोठ्यांत राहतें त्याला प्रतिदिवसाचें प्राकृत अजीर्ण असें म्हणतात.

त्याचें कारण.

अत्यम्बुपानाद्विषमाशनाच्च संधारणात्स्वप्नविपर्ययाच्च ।
कालेऽपि सात्म्यं लघु चापि भुक्तमन्नं न पाकं भजते नरस्य ॥१॥
ईर्ष्याभयक्रोधपरिप्लुतेन लुब्धेन शुग्दैन्यनिपीडितेन ।
प्रद्वेषयुक्तेन च सेव्यमानमन्नं न सम्यक्पचते नरस्य ॥ २ ॥
मात्रया चाभ्यवहृतं पथ्यं चान्नं न जीर्यते ।
चिन्ताशोकभयक्रोधदुःखशय्याप्रजागरैः ॥ ३ ॥

अतिशय पाणी पिणें, विरुद्ध अन्नाचें भोजन करणें, मलमूत्रादिकांचे वेग धारण करणें, दिवसा निजणें व रात्रीं जागणें इत्यादि कारणांनीं नियमित वेळीं प्रकृतीला मानवणारा व हलका असा आहार सेवन केला असतांही तो बरोबर रीतीनें पचन होत नाहीं. तसेंच इर्ष्या, भय, राग, ह्यांनीं युक्त अशा मनुष्यानें किंवा लोभ, शोक, दैन्य व द्वेष ह्या मानसिक विकारांनीं पीडलेल्या मनुष्यानें सेवन केलेलें अन्न देखील चांगलें पचन होत नाहीं. आणि चिंता, शोक, भय, क्रोध, दुःख, अति निद्रा किंवा अति जागरण ह्या कारणांनीं प्रमाणांत आणि हितकारक असें खाल्लेलें अन्न देखील पचन होत नाहीं.

अजीर्णसामान्यलक्षण.

ग्लानिगौरवविष्टम्भभ्रममारुतमूढताः ।
विड्बन्धोऽतिप्रवृत्तिर्वा सामान्याजीर्णलक्षणम् ॥ ४ ॥

ग्लानि, गौरव, (जडत्व), विष्टंभ (मलमूत्रांचा अवरोध) भोंवळ, वायु उन्मार्गगामी होणें (वायूच्या अवरोधामुळें तो कोठ्यांत इतस्ततः फिरणें), मळाचा खडा होणें किंवा अतिशय शौचास होणें हें अजीर्णाचें सामान्य लक्षण आहे.

आमादि अजीर्णाचीं लक्षणें.

तत्राऽऽमे गुरुतोत्क्लेदः शोफो गण्डाक्षिकूटयोः ।

उद्गारश्च यथाभुक्तमविदग्धः प्रवर्तते ॥ ५ ॥

त्यांत आमाजीर्णामध्यें अंगाला जडत्व येतें, तोंडाला पाणी सुटतें, गाल व डोळ्यांच्या आसपास सूज येतें, आणि जसें अन्न खाल्लें असेल तसेच कर्पट ढेंकर येतात.

विदग्धे भ्रमतृण्मूर्छाः पित्ताच्च विविधा रुजः ।
उद्गारश्च सधूमाम्लः स्वेदो दाहश्च जायते ॥ ६ ॥

विदग्ध अजीर्णामध्यें भोंवळ, तहान, मूर्च्छा, पित्तापासून अनेक प्रकारचे विकार, घाम येणें व अंगाचा दाह होणें हे विकार होतात, आणि धुरकट व आंबट असे ढेंकर येतात.

विष्टब्धे शूलमाध्मानं विविधा वातवेदनाः ।
मलवाताप्रवृत्तिश्च मोहः स्तम्भोऽङ्गपीडनम् ॥ ७ ॥

विष्टब्ध अजीर्णामध्यें शूल, पोट फुगणें, वातासंबंधीं अनेक विकार, मळ व अधोवायु ह्यांचा अवरोध, मोह, अंग ताठणें व अतिशय दुखणें हे विकार होतात.

रसशेष अजीर्णाचें लक्षण.

उद्गारशुद्धावपि भक्तकांक्षा न जायते हृद्गुरुता च यस्य ।
रसावशेषेण चतुर्थमेतत्कचित्त्वजीर्णं प्रवदन्ति तज्ज्ञाः ॥ १ ॥
रसशेषेऽन्नविद्वेषो हृदयाशुद्ध्यरोचकौ ।

ज्यास ढेंकर शुद्ध येत असूनही जेवणाची इच्छा नसते व हृदयांत जडत्व असतें, त्यास कांहीं तज्ज्ञ वैद्य रसशेषामुळें होणारें चवथें अर्थात् रसशेष अजीर्ण असें म्हणतात. ह्या रसशेष अजीर्णामध्यें अन्नद्वेष व हृदयामध्यें अस्वस्थता व अरुचि हे विकार असतात.

अजीर्णाचे उपद्रव.

मूर्छा प्रलापो वमथुः प्रसेकः सदनं भ्रमः ।
उपद्रवा भवन्त्येते मरणं चात्यजीर्णतः ॥ २ ॥

मूर्च्छा, बडबड, ओकारी, मळमळ, अंग गळल्यासारखें वाटणें, भोंवळ, हे उपद्रव अजीर्णापासून होतात आणि अत्यजीर्णापासून अखेर मरणही येतें.

यावत्संतिष्ठते तस्य दुष्टोऽप्यन्नरसो हृदि ।

तावन्मर्माणि भिद्यन्ते विषं पीतवतो यथा ॥ ३ ॥

अजीर्ण झालेल्या मनुष्याच्या हृदयामध्यें जोंपर्यंत अन्नरस शिल्लक आहे तोंपर्यंत विषप्राशन करणाऱ्या मनुष्याची मर्मस्थानें जशीं फुटल्याप्रमाणें होतात त्याप्रमाणें त्याची मर्मस्थानें फुटल्या-प्रमाणें पीडा देतात.

अनात्मवन्तः पशुवद्भुञ्जते येऽप्रमाणतः ।
रोगानीकस्य ते मूलमजीर्णं प्राप्नुवन्ति हि ॥ ४ ॥

आपल्या इंद्रियावर ताबा नसणारे जे लोक पशूप्रमाणें अनियमित आहार करितात, त्यांस रोगसमुदायाला मूळ कारण जें अजीर्ण तें प्राप्त होतें (म्हणजे त्यांना अजीर्ण होतें).

अजीर्णमामं विष्टब्धं विदग्धं यदुदीरितम् ।
विषूच्यलसकौ तस्माद्भवेच्चापि विलम्बिका ॥ ५ ॥

पूर्वीं आमाजीर्ण, विदग्धाजीर्ण व विष्टब्धाजीर्ण नांवाचीं जीं अजीर्णें सांगितलीं आहेत, त्यांपासून विषूचिका, अलसक व विलंबिका हे रोग होतात.

विषूचिका.

सूचीभिरिव गात्राणि तुदन्संतिष्ठतेऽनिलः ।
यत्राजीर्णेन सा वैद्यैर्विषूचीति निगद्यते ॥ १ ॥

ज्या अजीर्णामध्यें वाढलेला वायु सर्व शरीरांत संचार करीत असतां शरीरामध्यें सुईनें टोचल्याप्रमाणें पीडा देतो, त्या रोगाला वैद्य विषूचिका असें म्हणतात.

न तां परिमिताहारा लभन्ते विदितागमाः ।
मूढास्तामजितात्मानो लभन्तेऽशनलोलुपाः ॥ २ ॥

जे आरोग्यशास्त्र जाणतात व ज्यांना नित्य परिमित आहार करण्याची संवय आहे, त्यांना विषूचिका होत नाहीं. पण ज्यांना मन स्वाधीन ठेवतां येत नाहीं व जे खाण्याविषयीं हपापलेले असतात, त्या मूढांस विषूचिका होते.

---

१. दोषानें विबद्ध झालेला आम स्वल्प असल्यामुळें लीन होऊन जठराग्नीच्या मार्गाला वेष्टून राहात नाहीं, त्या वेळीं अजीर्ण झालें असून देखील भूक लागते, पण ती मंदबुद्धि मनुष्याला विषाप्रमाणें मारते (सारांश ती भूक खरी नसते).

मूर्छातिसारौ वमथुः पिपासा शूलभ्रमोद्वेष्टनजृम्भदाहाः।
वैवर्ण्यकम्पौ हृदये रुजश्च भवन्ति तस्यां शिरसश्च भेदः ॥३॥

विषूचिकेमध्यें मूर्च्छा, अतिसार, तहान, ओकारी, शूळ, भोंवळ, हातापायांस गोळे येणें, जांभया येणें, अंगाचा दाह होणें, शरीरवर्ण पालटणें, अंग कांपणें, हृदयामध्यें पीडा व डोकें दुखणें हे विकार होतात.

अलसकाचें लक्षण.

कुक्षिरानह्यतेऽत्यर्थं प्रताम्येत् परिकूजति।
निरुद्धो मारुतश्चैवं कुक्षावुपरि धावति ॥ १ ॥
वातवर्चोनिरोधश्च यस्यात्यर्थं भवेदपि।
तस्यालसकमाचष्टे तृष्णोद्गारौ तु यस्य हि ॥ २ ॥

ज्या विकारांत कुशी अत्यंत फुगतात, मूर्च्छा येते, रोगी मोठ्यानें विवळतो, अधोवायूचा रोध झाल्यामुळें वायु वर चढून कुशीपासून वर हृदय व कंठ ह्या ठिकाणीं धावतो, मळ व अधोवायु यांचा अतिशय अवरोध होतो, तहान लागते व ढेकर येतात, त्या रोगाला अलसक असें म्हणतात[१].

विलंबिकेचें लक्षण.

दुष्टं तु भुक्तं कफमारुताभ्यां प्रवर्तते नोर्ध्वमधश्च यस्य।
विलम्बिकां तां भृशदुश्चिकित्स्यामाचक्षते शास्त्रविदः पुराणाः॥१॥

खाल्लेलें अन्न कफवातदोषांनीं दूषित झाल्यामुळें ढाळ किंवा वांत्या होऊन बाहेर पडत नाहीं, अशा दुश्चिकित्स्य व्याधीला प्राचीन वैद्य विलंबिका असें म्हणतात.

अजीर्णजन्य आमाचें दुसरें कार्य.

यत्रस्थमामं विरुजेत्तमेव देशं विशेषेण विकारजातैः।
दोषेण येनावततं शरीरं तल्लक्षणैरामसमुद्भवैश्च ॥ १ ॥

हा अजीर्णजन्य आम शरीराच्या ज्या भागांत असतो, त्याच ठिकाणीं विशेषतः अनेक विकार उत्पन्न करतो. त्या विकारांमध्यें

१. खाल्लेलें अन्न खालीं जात नाहीं, वरही येत नाहीं (ढाळ-वांत्या होत नाहींत) व पचनही होत नाहीं; कोठ्यांत स्तब्ध राहतें. म्हणून त्याला अलसक असें म्हणतात.

जो दोष सर्व शरीरांत बलवान असेल, त्याचीं लक्षणें असून शिवाय आमाचींही लक्षणें असतात.

विषूचिकेचें असाध्य लक्षण.

यः श्यावदन्तौष्ठनखोऽल्पसंज्ञो वम्यर्दितोऽभ्यन्तरयातनेत्रः ।
क्षामस्वरः सर्वविमुक्तसंधिर्यायान्नरोऽसौ पुनरागमाय ॥ १ ॥

ज्याचे दांत, ओंठ व नखें हीं काळीं झालीं आहेत, ज्याला मनुष्य किंवा पदार्थ ओळखतां येत नाहीं, जो ओकारीनें त्रासला आहे, ज्याचे डोळे खोल गेले आहेत, शब्द खोल गेला आहे व सर्व सांधे ढिले झाले आहेत, असा विषूचिकेचा रोगी जग कायमचें सोडून जातो.

विषूचिकेचे उपद्रव.

निद्रानाशोऽरतिः कम्पो मूत्राघातो विसंज्ञिता ।
अमी ह्युपद्रवा घोरा विषूच्याः पञ्च दारुणाः ॥ २ ॥

झोंप न येणें, अस्वस्थता, अंग कांपणें, लघवी बंद होणें व मनुष्य न ओळखणें, हे विषूचिकेचे पांच भयंकर उपद्रव आहेत.

जिरलेल्या आहाराचें लक्षण.

उद्गारशुद्धिरुत्साहो वेगोत्सर्गो यथोचितः ।
लघुता क्षुत्पिपासा च जीर्णाहारस्य लक्षणम् ॥ ३ ॥

शुद्ध ढेकर येणें, मनाला हुशारी वाटणें, आहारानुरूप मळमूत्र साफ होणें, शरीर हलकें वाटणें, तहान व भूक लागणें हें अन्न जिरल्याचें लक्षण आहे.

अजीर्णाच्या चिकित्सेचें विवेचन.

प्रायेणाऽऽहारवैषम्यादजीर्णं जायते नृणाम् ।
तन्मूलो रोगसंघातस्तद्विनाशाद्विनश्यति ॥ १ ॥

बहुतकरून विषम आहारामुळें मनुष्याला अजीर्ण होतें. आणि त्याच्याच मुळाशीं रोगांचा समुदाय असतो. म्हणून अजीर्णाचा नाश झाला असतां त्या रोगसमुदायाचाही नाश होतो.

तत्राऽऽमे वमनं कार्यं विदग्धे लङ्घनं हितम् ।
विष्टब्धे स्वेदनं शस्तं रसशेषे शयीत च ॥ २ ॥

त्यांत आमाजीर्णावर वमन द्यावें. विदग्ध अजीर्णावर लंघन

हितकारक आहे. विष्टब्धाजीर्णावर स्वेदन करावें, आणि रसशेष अजीर्ण झालें असतां झोंप द्यावी.

वचालवणतोयेन वान्तिरामे प्रशस्यते ।
धान्यनागरसिद्धं वा तोयं दद्याद्विचक्षणः ।
आमाजीर्णप्रशमनं शूलघ्नं बस्तिशोधनम् ॥ ३ ॥

आमाजीर्णावर वेखंडाचा काढा मीठ घालून वांति होण्याकरितां देणें प्रशस्त आहे. किंवा धने व सुंठ ह्यांनीं तयार केलेलें पाणी पिण्यास द्यावें. तें आमाजीर्णाचा नाश करितें. शूलनाश करितें, व बस्तीचें शोधन करितें.

अन्नं विदग्धं तु नरस्य शीघ्रं शीताम्बुना वै परिपाकमेति ।
तद्यस्य शैत्येन निहन्ति पित्तमाक्लेदिभावाच्च नयत्यधस्तात् ॥४॥

विदग्धाजीर्ण झालेलें अन्न थंड पाणी पिण्यानें पचन होतें. तें थंड पाणी आपल्या शीतपणानें पित्ताचा नाश करितें, आणि ओल-सरपणामुळें तें अन्नाला खालीं नेतें.

विष्टब्धे स्वेदनं कार्यं पेयं च लवणोदकम् ।
रसशेषे दिवा स्वापं लङ्घनं वातवर्जनम् ॥ ५ ॥

विष्टब्धाजीर्णावर स्वेदन करावें, आणि मीठ घालून पाणी (ऊन) पिण्यास द्यावें. रसशेष अजीर्णावर दिवसा झोप द्यावी, लंघन करावें आणि वारा घेऊं नये.

एरण्डतैले प्रविपाच्य पथ्यां खादेत्तदेवानु पिबेच्च तैलम् ।
स शूलविष्टम्भकृतान्विकारान्सर्वाञ्जयेत्पित्तकफानिलोत्थान्॥६

एरंडेलांत बाळहिरडे शिजवून ते खावेत, आणि वर तेल प्यावें. तें शूल व मलावरोध ह्यांपासून होणारे विकार व वात, पित्त व कफ-जन्य अशा सर्व विकारांचा नाश करितें.

आलिप्य जठरं प्राज्ञो हिंगुत्र्यूषणसैन्धवैः ।
दिवा स्वापं प्रकुर्वीत सर्वाजीर्णप्रणाशनम् ॥ ७ ॥

हिंग, सुंठ, मिरीं, पिंपळी व सैंधव ह्यांच्या कल्काचा पोटा-वर लेप करावा व दिवसा झोंप द्यावी; म्हणजे सर्व प्रकारचीं अजीर्णें नाश पावतात.

व्यायामप्रमदाध्ववाहनरतान्क्लान्तानतीसारिणः
शूलश्वासवतस्तृषापरिगतान्हिक्कामरुत्पीडितान् ।

क्षीणान्क्षीणकफाञ्शिशून्मदहतान्वृद्धांस्तथाऽजीर्णिनो
रात्रौ जागरितान्नरान्निरशनान्कामं दिवा स्वापयेत् ॥८॥

व्यायाम, स्त्रीसंग व मार्गक्रमण करणारे, वाहनावर बसून प्रवास करणारे, थकलेले; अतिसार, शूल, श्वास, तृषा, उचकी व वातविकार ह्यांनीं पीडिलेले; अशक्त, कफक्षयी, लहान बालक, मदात्ययी, वृद्ध, अजीर्ण झालेले, रात्रीं जाग्रण करणारे व उपास (लंघन) करणारे ह्यांनीं दिवसा अवश्य झोंप घ्यावी.

चूर्ण.

पथ्यापिप्पलिसंयुक्तं चूर्णं सौवर्चलं पिबेत् ।
मस्तुनोष्णोदकेनाथ मत्वा दोषगतिं भिषक् ॥ १ ॥
चतुर्विधमजीर्णं च मन्दानलमथारुचिम् ।
आध्मानं वातगुल्मं च शूलं चाऽऽशु विनाशयेत् ॥ २ ॥

बाळहिरडे, पिंपळी व पादेलोण ह्यांचें चूर्ण दोषानुरूप दह्याच्या निवळीशीं किंवा उष्णोदकाशीं घ्यावें; म्हणजे चारी प्रकारचें अजीर्ण, अग्निमांद्य, अरुचि, पोटफुगी, वातगुल्म व शूल ह्यांचा नाश होतो.

सिन्धूत्थपथ्यमगधोद्भववह्निचूर्ण-
मुष्णाम्बुना पिबति यः खलु नष्टवह्निः ।
तस्याऽऽमिषेण सघृतेन सहान्नपानं
भस्मीभवत्यशितमात्रमपि क्षणेन ॥ १ ॥

सैंधव, बाळहिरडे, पिंपळी व चित्रकमूळ ह्यांचें चूर्ण जो मंदाग्नि मनुष्य ऊन पाण्याशीं घेतो, त्यानें मांस व तूप ह्यांसह खाल्लेलें अन्न देखील सेवितांक्षणींच भस्म होतें.

हिंगाष्टक चूर्ण.

त्रिकटुकमजमोदा सैन्धवं जीरके द्वे
समधरणधृतानामष्टमो हिंगुभागः ।
प्रथमकवलभोज्यः सर्पिषा चूर्ण एष
जनयति जठराग्निं वातगुल्मं निहन्ति ॥ १ ॥

सुंठ, मिरें, पिंपळी, ओवा, सैंधव, जिरें, शहाजिरें, व हिंग हीं औषधें समभाग घेऊन त्यांचें चूर्ण करून जेवतांना पहिल्या घासाशीं तुपाबरोबर खावें. हें जठराग्नीला प्रदीप्त करितें आणि वातगुल्माचा नाश करितें.

दुसरा प्रकार.

कर्षं हिंगु द्विकर्षं बिडमथ मरिचं सैन्धवं विश्वकृष्णा-
दीप्याजीराजमोदासितजरणविभीताभया वेदकर्षाः ।
अष्टौ मार्कण्डिधात्र्योरथ बदरकपित्थोद्भवाः षोडश स्युः
सर्वं लुङ्गोदकार्द्रं हरति रुचिवधाध्मानबन्धाग्निसादान् ॥१॥

एक तोळा हिंग, दोन तोळे बिडलोण; मिरीं, सैंधव, सुंठ, पिंपळी, जिरें, ओवा, अजमोदा, शहाजिरें व बेहडेदळ हीं औषधें चार चार तोळे; सोनामुखी (भुईतरवड) व आवळकाठी आठ आठ तोळे; बोर व कवठ ह्यांचा गीर सोळा सोळा तोळे, ह्या सर्वांचें चूर्ण करून तें महाळुंगाच्या (किंवा लिंबाच्या) रसांत भिजवून द्यावें. हें अरुचि, पोट फुगणें, मळाचा खडा होणें, व अग्निमांद्य ह्या विकारांचा नाश करितें.

भास्करलवणचूर्ण.

पिप्पली पिप्पलमूलं धान्यकं कृष्णजीरकम् ।
सैन्धवं च बिडं चैव पत्रतालीसकेसरान् ॥ १ ॥
एषां द्विपलिकान्भागान्पञ्च सौवर्चलस्य च ।
मरीचाजाजिशुण्ठीनामेकैकस्य पलं पलम् ॥ २ ॥
त्वगेला चार्धभागा स्यात्सामुद्रं कुडवद्वयम् ।
दाडिमं कुडवं चैव द्विपलं चाम्लवेतसम् ॥ ३ ॥
एतच्चूर्णीकृतं श्लक्ष्णं गन्धाढ्यममृतोपमम् ।
लवणं भास्करं नाम भास्करेण विनिर्मितम् ॥ ४ ॥
श्लेष्मवातं वातगुल्मं शूलं मन्दाग्न्यरोचकम् ।
अन्यानपि निहन्त्याशु रोगाँल्लवणभास्करः ॥ ५ ॥

पिंपळी, पिंपळमूळ, धने, शहाजिरें, सैंधव, बिडलोण, तालीसपत्र, नागकेशर, हीं औषधें आठ आठ तोळे; पादेलोण वीस तोळे; मिरीं, जिरें व सुंठ हीं चार चार तोळे; दालचिनी, व वेलदोडे हीं औषधें दोन दोन तोळे, मीठ बत्तीस तोळे, डाळिंब (आंबट डाळिंब) सोळा तोळे व आम्लवेतस आठ तोळे, ह्यांचें वस्त्रगाळ चूर्ण करावें. हें सुवासिक व अमृताप्रमाणें गुणकारक आहे. हें भास्करानें सांगितलें म्हणून ह्यास भास्करलवणचूर्ण असें म्हणतात.

हें कफवात, वातगुल्म, शूल, मंदाग्नि, अरुचि, व आणखीही दुसरे रोग ह्यांचा त्वरित नाश करितें.

अग्निमुख चूर्ण.

हिंगुभागो भवेदेको वचा च द्विगुणा भवेत् ।
पिप्पली त्रिगुणा ज्ञेया शृङ्गबेरं चतर्गुणम् ॥ १ ॥
यवानिका पञ्चगुणा षड्गुणा च हरीतकी ।
चित्रकः सप्तगुणितः कुष्टं चाष्टगुणं भवेत् ॥ २ ॥
एतद्वातहरं चूर्णं पीतमात्रं प्रसन्नया ।
पिबेद्दध्ना मस्तुना वा सुरया कोष्णवारिणा ॥ ३ ॥
सोदावर्तमजीर्णं च प्लीहानमुदरं तथा ।
अङ्गानि यस्य शीर्यन्ते विषं वा येन भक्षितम् ॥ ४ ॥
अर्शोहरो दीपनश्च शूलघ्नो गुल्मनाशनः ।
कासं श्वासं निहन्त्याशु तथैव क्षयनाशनः ॥ ५ ॥
चूर्णो ह्यग्निमुखो नाम्ना न क्वचित्प्रतिहन्यते ॥ ६ ॥

हिंग एक भाग, वेखंड दोन भाग, पिंपळी तीन भाग, सुंठ चार भाग, ओवा पांच भाग, हिरडेदळ सहा भाग, चित्रकमूळ सात भाग, आणि कोष्ट आठ भाग, ह्या सर्वांचें चूर्ण करून तें स्वच्छ मदिरेशीं, दह्याशीं, दह्याच्या निवळीशीं, सुरेशीं (मद्याशीं) किंवा ऊन पाण्याशीं द्यावें; म्हणजे उदावर्त, अजीर्ण, पानथरी, उदर, अंग गळणें, विषबाधा, मूळव्याध, शूळ, गुल्म, खोकला, श्वास व क्षय ह्यांचा नाश करितें. हें अग्निमुख चूर्ण कोठेंही पराजित होत नाहीं.

सामुद्राद्य चूर्ण.

सामुद्रसौवर्चलसैन्धवानि क्षारो यवानीमजमोदकं च ।
हरीतकीपिप्पलिशृङ्गबेरं हिंगुं विडङ्गं च समानि दद्यात् ॥ १ ॥
संचूर्ण्य चैतानि घृतप्लुतानि भुञ्जीत चाऽऽदौ कवलानि पञ्च ।
अजीर्णवातं गुदगुल्मवातं वातप्रमेहं विषमं च वातम् ॥
विषूचिकाकामलपाण्डुरोगाऽश्वासं च कासं च जयेदवश्यम् २

मीठ, पादेलोण, सैंधव, जवखार, ओंवा, अजमोदा, हिरडेदळ, पिंपळी, सुंठ, हिंग, व वावडिंग हीं सर्व औषधें समभाग घेऊन चूर्ण करून जेवतांना हें चूर्ण व तूप ह्यांजबरोबर पांच घास प्रथम खावे. म्हणजे अजीर्णासंबंधीं वातविकार, गुद व गुल्म

ह्यासंबंधीं वातविकार, वातजन्य प्रमेह, विगुण वायु, विषूचिका (पटकी), कावीळ, पांडुरोग, श्वास व खोकला यांचा तें अवश्य नाश करितें.

व्योषाद्य चूर्ण.

व्योषैलाहिंगुभार्गीबिडलवणयवक्षारपाठायवानी-
चित्राश्वात्वग्भस्म चव्यं दहनकरिकणात्वक्पटुग्रन्थ्यजाजी ।
एतच्चूर्णं घृताढ्यं त्रिदिवसमशनाद्धन्यते रोगजातं
विश्वं वैश्वानरोऽसौ दहति सरभसं किं पुनर्भुक्तमन्नम् ॥१॥

सुंठ, मिरीं, पिंपळी, हिंग, भारंगमूळ, बिडलोण, जवखार, पहाडमूळ, ओंवा, चिंचेच्या टरफलाची राख, चवक, चित्रक, गजपिंपळी, दालचिनी, मीठ, पिंपळमूळ, जिरें, ह्यांचें चूर्ण करून तें तुपाशीं द्यावें. म्हणजे तें रोगसमूहाचा नाश करितें. हा वैश्वानर नांवाचा योग विश्वाचेंही पचन करतो, मग खाल्लेल्या अन्नाचें पचन करील ह्यांत आश्चर्य काय ?*

संजीवनी गुटिका.

विडङ्गं नागरं कृष्णा पथ्या वह्निर्विभीतकः ।
वचा गुडूची भल्लातं विषं चात्र प्रयोजयेत् ॥ १ ॥
एतानि समभागानि गोमूत्रेणैव पेषयेत् ।

---

*१. हिरडेदळ व सुंठ ह्यांचें चूर्ण गुळाशीं अथवा सैंधवाशीं सतत द्यावें. म्हणजे अग्नि प्रदीप्त होतो. २. सुंठ, मिरीं, पिंपळी, दांतीमूळ, तेड, चित्रकमूळ, व पिंपळमूळ ह्यांचें चूर्ण करून तें सकाळीं गुळाशीं भक्षण करावें. हें **गुडाष्टक** नांवाचें चूर्ण बलकारक, कांतिवर्धक व अग्निवर्धक आहे; आणि सूज, उदावर्त, शूल, पांडुरोग व पांथरी ह्यांचा नाश करितें.

३. **चित्रकादिचूर्णः**—चित्रकमूळ, सैंधेलोण, अजमोदा (बारीक ओवा), सुंठ व मिरीं ह्यांचें चूर्ण आंबट ताकाशीं द्यावें; म्हणजे तें सात दिवसांत अग्नि प्रदीप्त करितें, आणि पांडुरोग व मूळव्याध ह्यांचा नाश करितें.

४. वाळहिरडे, हिंग, सुंठ, पिंपळी, सैंधव व बिडलोण हीं सहा औषधें एक एक तोळा; बांगडखार व वावडिंग हीं अर्धा अर्धा तोळा; आणि दीड तोळा खुरासनी ओवा ह्यांचें चूर्ण करून तें पाण्याशीं द्यावें. तें आम पोटांत गुडगुडणें, अजीर्ण व कृमि ह्यांचा नाश करितें व रुचि वाढवितें.

गुञ्जाभा गुटिकाः कार्या दद्यादार्द्रकजै रसैः ॥ २ ॥
एकामजीर्णयुक्तस्य द्वे विषूच्यां प्रदापयेत् ।
तिस्रो भुजङ्गदष्टस्य चतस्रः संनिपातिनः ।
गुटिका जीवनी नाम्ना संजीवयति मानवम् ॥ ३ ॥

वावडिंग, सुंठ, पिंपळी, हिरडेदळ, बेहडेदळ, वेखंड, गुळवेल, बिब्बे व बचनाग हीं औषधें समभाग घेऊन चूर्ण करून गोमूत्रांत खल करून गुंज प्रमाणाच्या गोळ्या कराव्या; आणि आल्याच्या रसाशीं द्याव्या. अजीर्णविकारावर एक गोळी द्यावी; विषूचिकेवर (पटकीवर) दोन गोळ्या द्याव्या; सर्पदंशावर तीन गोळ्या द्याव्या आणि सन्निपातावर चार गोळ्या द्याव्या. ही संजीवनी नांवाची गुटिका मनुष्याला सजीव करते.

धनंजयवटी.

जीरकं चित्रकं चव्यं ससुगन्धं वचात्वचौ ।
एलाकर्चूरहपुषा कारवी नागकेसरम् ॥ १ ॥
पृथक्कर्षमिता ह्येते मिसी कर्षार्धसंमिता ।
यवानी पिप्पलीमूलं स्वर्जिका च हरीतकी ॥ २ ॥
जातीफलं लवङ्गं च पृथक्कर्षयुगं मतम् ।
धान्यकं चित्रकं चापि कर्षत्रयमितं पृथक् ॥ ३ ॥
कृष्णा पलप्रमाणा स्यात्पलमानं तु रौमकम् ।
मरीचात्पिचवः सप्त त्रिवृन्मूलात्पलद्वयम् ॥ ४ ॥
पृथग्दशाक्षं सामुद्रं सैन्धवं नागरं तथा ।
शरावसंमितं चुक्रं तदर्धं तिन्तिणीफलम् ॥ ५ ॥
धनंजयवटी ह्येषा धनंजयविवर्धनी ।
अजीर्णं जरयत्याशु शूलमुन्मूलयेद् द्रुतम् ॥ ६ ॥
हरेद्विबन्धसंवन्धमाध्मानं कर्षयत्यपि ।
ग्रहण्या निग्रहं कुर्याद्रुचयेद्रुचिमुत्तमाम् ॥ ७ ॥

जिरें, चित्रक, चवक, पादेलोण, वेखंड, दालचिनी, वेलदोडे, कचोरा, शेरणी, मेथी, नागकेशर, हीं प्रत्येक एक एक तोळा, व बाडिशेप अर्धा तोळा, ओंवा, पिंपळमूळ, सज्जीखार, हिरडेदळ, जायफळ, लवंग हीं प्रत्येक दोन दोन तोळे; धने व चित्रकमूळ तीन तीन तोळे, पिंपळी चार तोळे, सांबरमीठ चार तोळे, मिरीं सात तोळे, तेड आठ तोळे; मीठ, सैंधव व सुंठ हीं दहा दहा तोळे; चुका

बत्तीस तोळे, आणि चिंच (किंवा आमसुलें) सोळा तोळे, ह्या-प्रमाणें औषधें घेऊन त्यांच्या गोळ्या कराव्या. हिला धनंजयवटी म्हणतात. ही धनंजयास म्हणजे जठराग्नीस वाढविणारी आहे. ही अजीर्ण व शूल ह्यांचा त्वरित नाश करिते; मळाचा खडा व पोट फुगणें ह्यांचा नाश करिते; संग्रणीला दूर करिते व रुचि वाढविते.

शंखवटी.

चिञ्चाश्वत्थस्नुहीक्षारादपामार्गार्कतस्तथा ।
लवणं पञ्च संगृह्य ततो लवणपञ्चकम् ॥ १ ॥
सैन्धवाद्यं समादाय सर्वमेतत्पलद्वयम् ।
कर्षं कर्षं विषं गन्धं रसं टङ्कणमेव च ॥ २ ॥
हिंगुपिप्पलिशुण्ठीनां तथा मरिचजीरयोः ।
द्वौ द्वौ कर्षौ पृथक्कार्यौ तथा द्वौ शङ्खचूर्णतः ॥ ३ ॥
फलत्रयाच्च कर्षैकं द्विकर्षं तु लवङ्गतः ।
एतत्सर्वं समासाद्य श्लक्ष्णचूर्णीकृतं शुभम् ॥ ४ ॥
भावयेदम्लयोगेन सप्तधा च प्रयत्नतः ।
रसः शङ्खवटी नाम्ना सेवितः सर्वरोगजित् ॥ ५ ॥
गुञ्जामात्रमिदं खादेद्भवेद्दीपनपाचनम् ।
अजीर्णं वातसंभूतं पित्तश्लेष्मभवं तथा ॥
विषूचीं शूलमानाहं हन्यादत्र न संशयः ॥ ६ ॥

चिंचेची साल, पिंपळाची साल, त्रिधारी निवडुंग, आघाडा व रुई ह्या पांच वनस्पतींचे क्षार; व सैंधव, पादेलोण, बिडलोण, सांबर-लोण, (कोणाचे मतें बांगडखार) व मीठ हीं प्रत्येक आठआठ तोळे, बचनाग, गंधक, पारा, व टाकणखार एक एक तोळा; हिंग, पिंपळी, सुंठ व मिरीं दोन दोन तोळे; शंखभस्म दोन तोळे, हिरडा, बेहडा व आवळकाठी एक एक तोळा, आणि लवंग दोन तोळे ह्यांचें चूर्ण करून त्याला लिंबाच्या रसाच्या सात भावना द्याव्या. म्हणजे हा शंखवटी रस तयार होतो. हा सर्वरोगनाशक आहे. हा एक गुंजभर खावा, म्हणजे दीपन व पाचन होईल; व वातपित्त व कफ ह्यांपासून होणारें अजीर्ण, विषूचि (कॉलरा), शूळ व पोटफुगी ह्यांचा निःसंशय नाश करील.

दुसरी शंखवटी.

चिञ्चाक्षारपलं पटुव्रजपलं निम्बुद्रवे कल्कितं
तस्मिञ्छङ्खपलं प्रतप्तमसकृन्निर्वाप्य शीर्णावधि ।
हिंगुव्योषपलं रसामृतबलीन्निक्षिप्य निष्कांशकान्
बद्ध्वा शङ्खवटी ज्वरग्रहणिकारुक्पक्तिशूलादिषु ॥ १ ॥

चिंचेचा क्षार चार तोळे; सैंधव, पादेलोण, बिडलोण, सांबरलोण व मीठ हीं प्रत्येक चार चार तोळे; ह्यांचा लिंबाच्या रसांत कल्क करून त्यांत चार तोळे शंख तापवून त्यांत विरेपर्यंत अनेक वेळ बुडवावा; व हिंग, सुंठ, मिरीं, पिंपळी ह्यांचें चूर्ण चारचार तोळे व पारा, गंधक, बचनाग हीं औषधें चार चार मासे घालून गोळ्या कराव्या. हिला शंखवटी म्हणतात. ही ज्वर, संग्रहणी, पारिणामशूळ इत्यादिकांवर द्यावी.

अमृतहरितकी.

तक्रे समुत्स्वेद्य शिवाशतानि तद्बीजमुद्धृत्य च कौशलेन ।
षड्डूषणं पञ्च पटूनि हिंगुक्षारावजाजीमजमोदकं च ॥ १ ॥
षड्डूषणादेस्त्रिवृदर्धभागा गणस्य देयाऽम्बरगालितस्य ।
विभाव्य चुक्रेण रजांस्यमीषां क्षिपेच्छिवाबीजनिरस्तगर्भे ॥२॥
समूह्य घर्मे च विशोष्य तासां हरीतकीमन्यतमां निषेवेत् ।
अजीर्णमन्दानलजाठराभयान्सगुल्मशूलग्रहणीगुदांकुरान् ।
विबन्धमानाहरुजो जयत्यसौ तथामवातांस्त्वमृता हरितकी ॥३

शंभर हिरडे ताकांत शिजवावेत. ते चांगले शिजल्यावर त्यांतील बिया युक्तीनें काढून टाकाव्या. नंतर षड्डूषण (सुंठ, मिरें, पिंपळी, चवक, चित्रकमूळ व पिंपळमूळ), पंचलवण (सैंधव, पादेलोण, बिडलोण, सांबरलोण, मीठ) हिंग, जवखार, सज्जीखार, जिरें, अजमोदा हीं औषधें एक एक तोळा आणि तेड आठ तोळे ह्यांचें वस्त्रगाळ चूर्ण करून त्याला चुक्याच्या रसाची भावना द्यावी; आणि तें चूर्ण बिया काढून टाकिलेल्या त्या हिरड्यांच्या पोकळींत भरावें. आणि ते हिरडे उन्हांत वाळवून त्यांतील एखादा दुसरा हिरडा खावा. ह्याला अमृतहरीतकी असें म्हणतात. ही अजीर्ण, अग्निमांद्य, उदर, गुल्म, शूल, संग्रहणी, मूळव्याध, मळाचा खडा होणें, पोट फुगणें व आमवात ह्या रोगांना जिंकतें.

विडंगादि अवलेह.

विडङ्गभल्लातकचित्रकाभयाः सनागरास्तुल्यगुडेन सर्पिषा ।
अश्नन्ति ये मन्दहुताशना नरा भवन्ति ते वाडवतुल्यवह्नयः १

जे अग्निमांद्याचे रोगी वावडिंगें, बिब्वे, चित्रकमूळ, हिरडेदळ व सुंठ ह्यांचें चूर्ण करून त्यांत त्या चूर्णाच्या बरोबरीनें गूळ व तूप घालून सेवन करितात, त्यांचा जठराग्नि वडवाग्निप्रमाणें वाढतो.

विदह्यते यस्य तु भुक्तमात्रं दह्यन्ति हृत्कोष्ठगता मलाश्च ।
द्राक्षां सितामाक्षिकसंप्रयुक्तां लीढ्वाभयां वा स सुखं लभेत ॥२

जेवल्याबरोबर ज्याच्या घशाशीं जळजळतें आणि हृदय व कोठा ह्यांत आग होते, त्यानें साखर व मध ह्यांशीं मनुका खाव्यात किंवा हिरड्याचें चूर्ण मधाशीं घ्यावें; म्हणजे त्यास बरें वाटेल.

यवागू.

चित्रकचविकानागरमागधिकोग्रैर्यवागूः स्यात् ।
गुल्मानिलशूलहरी चित्राद्या वह्निजननी च ॥ १ ॥

चित्रक, चवक, सुंठ, पिंपळी व वेखंड ह्या औषधांनीं सिद्ध केलेली चित्रकादि कण्हेरी द्यावी; म्हणजे ती गुल्म व शूल ह्यांचा नाश करिते, व अग्नि प्रदीप्त करिते.

काढा.

लवङ्गपथ्ययोः क्वाथः सैन्धवेनावधूलितः ।
पीतः प्रशमयत्याशु त्वजीर्णं रेचयत्यपि ॥ १ ॥
धान्यनागरसिद्धं वा तोयं दद्याद्विचक्षणः ।
आमाजीर्णप्रशमनं शूलघ्नं वह्निदीपनम् ॥ २ ॥

लवंगा आणि बाळहिरडे ह्यांचा काढा करून त्यांत सैंधवाचें चूर्ण घालून द्यावा; म्हणजे तो अजीर्णाचा नाश करतो व रेचही करतो. अथवा धने व सुंठ ह्यांचा काढा द्यावा, तो आमाजीर्णाचा व शूलाचा नाश करितो, आणि अग्नीचें दीपन करतो.

अग्निकर घृत.

पञ्चमूल्यभयाव्योषपिप्पलीमूलसैन्धवैः ।
रास्नाक्षारद्वयाजाजीविडङ्गशटिभिर्घृतम् ॥ १ ॥
शुक्तेन मातुलुङ्गस्य स्वरसेनाऽऽर्द्रकस्य च ।
तक्रमस्तुसुरामण्डसौवीरकतुषोदकैः ॥ २ ॥

काञ्जिकेन च यत्पक्वं पीतमग्निकरं स्मृतम् ।
शूलगुल्मोदरश्वासकासानिलकफापहम् ॥ ३ ॥

पंचमुळें (रिंगणी, डोरली, साळवण, पिटवण व गोखरू ह्यांचीं मुळें), हिरडेदळ, सुंठ, मिरीं, पिंपळी, पिंपळमूळ, सैंधव, रास्ना, जवखार, सज्जीखार, जिरें, वावडिंग व कचोरा ह्या औषधांचा कल्क करून त्यांत महाळुंगाचा रस, आल्याचा रस, ताकावरील निवळी, सुरामंड (मद्याची निवळ), सौवीर, तुषोदक व कांजी हीं द्रव्यें घालून तूप तयार करावें. ह्याला "अग्निकर घृत" असें म्हणतात. हें शूळ, गुल्म, उदर, कास, श्वास, वात व कफदोष ह्यांचें नाशक आहे.

दशमूलघृत.

मरीचं पिप्पलीमूलं नागरं पिप्पली तथा ।
भल्लातकं यवानी च विडङ्गं गजपिप्पली ॥ १ ॥
हिंगु सौवर्चलं चैव त्वजाजी बिडधान्यकम् ।
सामुद्रं सैन्धवं क्षारं चित्रकं वचया सह ॥ २ ॥
पभिरर्धपलैर्भागैर्घृतप्रस्थं विपाचयेत् ।
दशमूलरसे सिद्धं पयसाऽष्टगुणेन वा ॥ ३ ॥
मन्दाग्नेश्च हितं सिद्धं ग्रहणीदोषनाशनम् ।
विष्टम्भमामं दौर्बल्यं प्लीहानमपकर्षयेत् ॥ ४ ॥
कासं श्वासं क्षयं वाऽपि दुर्नाम सभगंदरम् ।
कफजान्हन्ति रोगांश्च वायुजान्क्रिमिसंभवान् ॥
तान्सर्वान्नाशयत्याशु शुष्कं दावनलो यथा ॥ ५ ॥

मिरीं, पिंपळी, पिंपळमूळ, सुंठ, बिब्बे, ओंवा, वावडिंग, गजपिंपळी, हिंग, संचळ, जिरें, बिडलोण, धने, मीठ, सैंधव, जवखार, चित्रकमूळ, व वेखंड हीं औषधें दोन दोन तोळे घेऊन त्यांचा कल्क करून त्यांत तूप चौसष्ट तोळे घालून दशमूळांचा काढा व दूध तुपाच्या आठपट घालून तूप तयार करावें. हें मंदाग्नि मनुष्याला हितकर असून संग्रहणीचा दोष नष्ट करणारें आहे. मलावष्टंभ, आम, अशक्तपणा, पांथरी, खोकला, श्वास, क्षय, मूळव्याध, भगंदर, कफजन्य रोग, वातजन्य रोग व कृमीपासून होणारे

विकार ह्यांचा, अग्नि ज्याप्रमाणें वाळलेल्या लांकडाचा त्वरित नाश करतो, त्याप्रमाणें नाश करितें.

अजीर्णनाशक गण.

नारीकेलफलेषु तण्डुलमथ क्षीरं रसाले हितं
जम्बीरोत्थरसो घृते समुचितः सर्पिस्तु मोचाफले ।
गोधूमेषु च कर्कटी हिततमा मांसाशने काञ्जिकं
नारङ्गे गुडभक्षणं प्रकथितं पिण्डालुगं कोद्रवे ॥ १ ॥
पनसे कदलं कदले च घृतं घृतपाकविधावपि जम्भरसः ।
तदुपद्रवशान्तिकरं लवणं लवणेषु च तण्डुलवारि परम् ॥२॥
गोधूमे कर्कटिका माषे तक्रं च मूलकं चणके ।
आमलकं किल मुद्गे दीप्यः पक्का तु यावनाले स्यात् ॥ ३ ॥
खण्डं च खण्डयति माषभवं ह्यजीर्णं
तैलं कुलत्थजमिति प्रवदन्ति केचित् ।
द्राक्षामुकूलकनिकोचकसेवितं वा
वातामवृन्तफलपाककरं लवङ्गम् ॥ ४ ॥
कंगुश्यामाकनीवारकोरदूषमकुष्ठकाः ।
दध्ना जलेन जीर्यन्ति काञ्जिकं त्वाढकीं पचेत् ॥ ५ ॥
पिष्टान्ने शीतलं वारि कृशरान्ने तु सैन्धवम् ।
माषेण्डर्यां निम्बमूलं मुद्गयूषस्तु पायसे ॥ ६ ॥
मत्स्य आम्रफलात्कूर्मो यवक्षाराद्विपच्यते ।
काशमूलान्नीलकण्ठपारावतकपिञ्जलाः ॥ ७ ॥
पटोलवंशाङ्कुरकारवल्लीफलानि निम्बु*कथितानि जग्ध्वा ।
क्षारोदकं ब्रह्मतरोर्निपीय भोक्तुं पुनर्वाञ्छति तावदेव ॥ ८ ॥
विपच्यते सूरणको गुडेन तथाऽऽलुकं तण्डुलकोदकेन ।
पिण्डालुकं जीर्यति कोरदूषात्कसेरुपाकः खलु नागरेण ॥ ९ ॥
क्षारो जीर्यति तक्रेण तद्द्रव्यं कोष्णमण्डतः ।
माहिषं माणिमन्थेन शङ्खचूर्णेन तद्दधि ॥ १० ॥
रसाला जीर्यति व्योषात्खण्डं नागरभक्षणात् ।
गुडो नागरमुस्ताभ्यां तथेक्षुश्चाऽऽर्द्रकाशनात् ॥ ११ ॥

नारळाच्या फळाच्या (खोबऱ्याच्या) अजीर्णावर तांदूळ, आंबरसाच्या अजीर्णावर दूध, तुपाच्या अजीर्णावर लिंबाचा रस, केळांच्या अजीर्णावर तूप, गव्हाच्या अजीर्णावर काकडी आणि

* "फलानि निंबुकथितानि" ह्या ठिकाणीं "फलान्यलाबूनि बहून्" असें पाठांतर आहे व तें शुद्ध आहे.

मांसावर कांजी हितकारक आहे. नारिंगाच्या फळावर गूळ व हरीकावर पांढरें रताळें हितकारक आहे. फणसावर केळें, केळावर तूप, तुपावर लिंबाचा रस, लिंबाच्या रसावर मीठ, आणि मिठावर तांदुळाचें धुवण फार हितकारक आहे. गव्हावर काकडी, उडदावर ताक, हरभऱ्यावर मुळा, मुगावर आंवळा, आणि जोंधळ्यावर ओवा हितकारक आहे. उडीद खाल्लयामुळें झालेलें अजीर्ण खडीसाखरेनें मोडतें, आणि हुलग्यामुळें झालेलें अजीर्ण तेलानें मोडतें, असें कित्येक म्हणतात. द्राक्षें, पिस्ते, अक्रोड, किंवा बदाम ह्यांच्या फळांचें पचन लवंग करिते. राळे, सावे, देवभात, हारीक, मटक्या, हीं धान्यें दह्यावरील पाण्यानें जिरतात, आणि तुरीचें पचन कांजीनें होतें. पिष्टान्नावर थंड पाणी, खिचडीवर सैंधव, माषेंडरी-(उडदाच्या शेंगोळ्या किंवा पाटवड्या)वर लिंबाचें मूळ, आणि दुधावर मुगाचें कढण हितकारक आहे. आंब्यानें मासे पचन होतात आणि जवखारानें कासव पचन होतें. पारवा, पांढरा तित्तिर व मोर ह्यांचें मांस काश जातीच्या दर्भाच्या मूळानें पचन होतें. पडवळ, कळकाचे कोंब, कारलें व भोपळा हीं फळें अतिशय खाऊन त्यांवर पळसाच्या क्षाराचें पाणी प्यावें; म्हणजे तत्काळ त्यांचें पचन होऊन पुनः जेवण्याची इच्छा होते. सुरणाचें पचन गुळानें होतें. तसेंच अळवाच्या भाजीचें पचन तांदुळाच्या धुवणानें होतें. रताळें हारकानें पचन होतें. कसेरूचें (कचरा; कोंकणांत ज्याला फुरडें म्हणतात त्याचें) पचन सुंठीनें होतें. ताकानें क्षाराचें पचन होतें. गाईचें ताक कोमट असा मंड घेतल्यानें पचतें. म्हशीच्या ताकाचें पचन सैंधवानें होतें आणि शंखभस्मानें म्हशीचें दहीं पचतें. श्रीखंड हें सुंठ-मिरीं-पिंपळीच्या चूर्णानें पचतें, आणि खडीसाखर सुंठीनें पचते. गुळाचें पचन सुंठ व नागरमोथे ह्यांच्या चूर्णानें होतें. त्याचप्रमाणें ऊंस आलें खालें असतां पचन होतो.

अजीर्णहरीवटी.

दन्तीबीजमकल्मषं सदहनं शुण्ठीलवङ्गं समं

गन्धं पारदटङ्कणं च मरिचं श्रीवृद्धदारो विषम्।
खल्वे यामयुगं विमर्द्य विधिना दन्तीद्रवैर्भावना
देयाः पञ्चदशानु निम्बुकजलैस्त्रेधा त्रिधा चित्रकैः ॥१॥
त्रेधा चाऽऽर्द्रकजै रसैः शुभधिया सप्तैव चावेदिना
पश्चाच्छुष्ककलायसंमितवटी कार्या भिषक्संमता।
क्षुद्बोधप्रकरी त्रिशूलशमनी जीर्णज्वरध्वंसिनी
कासारोचकपाण्डुतोदरगदान्पामामरुन्नाशिनी ॥ २ ॥
बस्त्याटोपहलीमकामयहरी मन्दाग्निसंदीपनी
सिद्धेयं तु महोदधिप्रकटिता सर्वामयघ्नी सदा ॥ ३ ॥

टरफलें व आंतील अंकुर काढून टाकून शुद्ध केलेलें जेपाळाचें बीं, चित्रकमूळ, सुंठ, लवंग, गंधक, पारा, टाकणखार, वरधारा व बचनाग हीं सर्व समभाग घेऊन खलामध्यें घालून दोन प्रहर खल करावा. नंतर दांतीमूळाच्या रसाच्या म्हणजे काढ्याच्या पंधरा भावना द्याव्या. लिंबाच्या रसाच्या व चित्रकमूळाच्या काढ्याच्या तीन तीन भावना द्याव्या. आल्याच्या रसाच्या तीन भावना द्याव्या. आणि सात भावना बेलफळाच्या काढ्याच्या द्याव्या. नंतर वाळलेल्या वाटाण्याएवढ्या गोळ्या कराव्या. ह्या गोळ्या भूक उत्पन्न करितात; शूल, जीर्णज्वर, खोकला, अरुचि, पांडुरोग, उदर, खरूज, वातरोग, बस्तींतील गुडगुड व हलीमक ह्यांचा नाश करितात, आणि मंदाग्नीचें दीपन करितात. ही महोदधि नांवाच्या ग्रंथामध्यें सांगितलेली अजीर्णहरी सिद्धवटी सर्वरोगनाशक आहे.

अग्निकुमार रस.

पारदं च विषं गन्धं टङ्कणं समभागतः।
मरीचादष्टभागाः स्युर्द्वौ द्वौ शङ्खवराटयोः ॥ १ ॥
पक्वजम्बीरजैर्गाढं रसैः सप्त विभावयेत्।
गुंजाद्वयमितो देयो रसो ह्यग्निकुमारकः ॥ २ ॥
समीरणसमुद्भूतमजीर्णं च विषूचिकाम्।
क्षणेन क्षपयत्येष कफरोगनिकृन्तनः ॥ ३ ॥

पारा, बचनाग, गंधक, टाकणखाराची लाही हीं औषधें समभाग, मिरीं आठ भाग, शंखभस्म व कवडीभस्म दोन दोन भाग

ह्यांचा एकत्र खल करून लिंबाच्या रसाच्या सात भावना द्याव्या, हा अग्निकुमार रस दोन गुंजा प्रमाणानें द्यावा. हा वातजन्य अजीर्ण, विषूचिका (कालरा) आणि कफरोग यांचाही नाश करतो.

दुसरा अग्निकुमार.

रसेन गन्धं सह टङ्कणेन समं विषं योज्यमतस्त्रिभागम् ।
कपर्दशङ्खावपि नेत्रभागौ मरीचकं चाष्टगुणं विमर्द्य ॥ १ ॥
सुपक्वजम्बीररसेन खल्वे सिद्धो भवत्यग्निकुमारकोऽयम् ।
अजीर्णवातं गुदगुल्मवातं विषूचिकाद्यं विनिहन्ति सद्यः ॥ २ ॥

पारा, गंधक व टाकणखाराची लाही समभाग, वचनाग तीन भाग, कवडीभस्म व शंखभस्म दोन दोन भाग आणि मिरीं आठ भाग, ह्या सर्वांचा लिंबाच्या रसांत खल करावा. म्हणजे हा अग्नि-कुमार रस तयार होतो. हा अजीर्णासंबंधीं वात, गुद व गुल्मरोग ह्यासंबंधीं वात, व विषूचिकादि रोग ह्यांचा त्वरित नाश करितो.

लघुक्रव्याद.

पारदाद्विगुणं गन्धं गन्धांशं मृतलोहकम् ।
पिप्पली पिप्पलीमूलमग्निशुण्ठीलवङ्गकम् ॥ १ ॥
लोहसाम्यं पृथक्कुर्याद्रससाम्यं सुवर्चलम् ।
टंकणं मरिचं चापि गन्धतुल्यं प्रदापयेत् ॥ २ ॥
एतद्विचूर्ण्य यत्नेन भावयेत्सप्तधाऽऽम्लकैः ।
एतद्रसायनं श्रेष्ठं माषमात्रं प्रदापयेत् ॥ ३ ॥
तक्रेण केवलं वाऽपि दद्याद्भोजनपाचने ।
क्षिप्रं तज्जीर्यते भुक्तं दीपनं भवति ध्रुवम् ।
सर्वाजीर्णप्रशमनं लघुक्रव्यादसंज्ञितम् ॥ ४ ॥

पारा एक भाग, गंधक दोन भाग, लोहभस्म दोन भाग; पिंपळी, पिंपळमूळ, चित्रकमूळ, सुंठ, लवंग हीं औषधें दोन दोन भाग, पादेलोण एक भाग आणि टांकणखार व मिरीं दोन दोन भाग ह्या सर्वांचें चूर्ण करून आम्लरसाच्या (लिंबाच्या रसाच्या) सात भावना द्याव्या. हें श्रेष्ठ रसायन उडदाइतकें द्यावें. अन्न पचन होण्याकरितां हें ताकाशीं द्यावें, म्हणजे अन्न त्वरित पचन होतें; आणि पुनः भूक लागते. हा लघुक्रव्याद नांवाचा रस सर्व अजी-र्णांचा नाश करतो.

बृहत्क्रव्याद.

द्विपलं गन्धकं शुद्धं द्रावयित्वा विनिक्षिपेत् ।
पारदं पलमानं तु मृतशुल्बायसी पृथक् ॥ १ ॥
पलार्धमाने संमिश्र्य पञ्चांगुलदले क्षिपेत् ।
ततो विचूर्ण्य यत्नेन लोहपात्रे विचक्षणः ॥ २ ॥
निधापयेद्रसं तत्र जंबीरस्य पलं शतम् ।
वस्त्रपूतं ततः कृत्वा लोहपात्रे विनिक्षिपेत् ॥ ३ ॥
मृद्वग्निना पचेत्तच्च दर्व्या संचालयेन्मुहुः ॥ ४ ॥
संचूर्ण्य पञ्चकोलोत्थैः कषायैः साम्लवेतसैः ।
भावनाः किल दातव्याः पञ्चाशत्प्रमिताः पृथक् ॥ ५ ॥
भृष्टटंकणचूर्णेन तुल्येन सह मेलयेत् ।
तदर्धं कृष्णलवणं मरीचं सर्वतुल्यकम् ॥ ६ ॥
सप्तधा भावयेत्पश्चाच्चणकक्षारवारिणा ।
ततः संशोष्य संपिष्य कूप्यांश्च जठरे क्षिपेत् ॥ ७ ॥
अत्यर्थं गुरुमांसानि गुरुभोज्यान्यनेकशः ।
भुक्त्वा चाऽऽकण्ठपर्यन्तं चतुर्वल्लमितो रसः ॥ ८ ॥
कट्वम्लतक्रसहितः पीतमात्रो हि पाचयेत् ।
पुनर्भोजयति क्षिप्रं का पुनर्मन्दवह्निता ॥ ९ ॥
रसः क्रव्यादनामाऽयं प्रोक्तो मन्थानभैरवैः ।
सिंहलक्षोणिपालस्य भूरिमांसप्रियस्य च ।
पुनर्भोजनकामस्य भैरवानन्दयोगिनः ॥ १० ॥
कुर्याद्दीपनमूर्ध्वजत्रुगदहृद्दुष्टामसंशोधन-
स्तुन्दस्थौल्यनिबर्हणो मदहरः शूलार्तिमूलापहः ।
गुल्मप्लीहविनाशको बहुरुजां विध्वंसनो वातहा
वातग्रन्थिमहोदरापहरणः क्रव्यादनामा रसः ॥ ११ ॥

शुद्ध गंधक आठ तोळे घेऊन अग्नीवर पातळ करून त्यांत चार तोळे पारा घालावा, आणि ताम्रभस्म दोन तोळे व लोहभस्म दोन तोळे घालून पक्व झाल्यावर एरंडाच्या पानावर ओतावें. नंतर चूर्ण करून लोखंडाच्या भांड्यांत घालून त्यांत लिंबाचा रस चारशें तोळे वस्त्रगाळ करून घालावा. आणि मंदाग्नीवर पचन करावें, आणि वरचेवर पळीनें ढवळावें. शुष्क झाल्यावर चूर्ण करून त्याला पुनः पंचकोल (सुंठ, मिरीं, पिंपळीं, चवक व चित्रक) व

आम्लवेतस ह्यांच्या काढयाच्या पन्नास पन्नास वेगवेगळ्या भावना द्याव्या. नंतर टाकणखाराच्या लाहीचें चूर्ण त्याच्या बरोबरीनें त्यांत मिळवावें, आणि पादेलोण त्याच्या निम्यानें मिळवावें, व सर्वांच्या बरोबरीनें मिऱ्यांचें चूर्ण मिळवावें. नंतर हरभऱ्याच्या आंबेच्या सात भावना द्याव्या. नंतर शुष्क झाल्यावर चूर्ण करून कुपींत भरून ठेवावें. अतिशय जड मांस व अनेक प्रकारचे भोजनांतील जड पदार्थ ह्यांचें आकंठ भोजन करून त्यावर हा रस चार वाल-पर्यंत सुंठ-मिरीं-पिंपळीचें चूर्ण व आंबट ताक ह्यांशीं घ्यावा; म्हणजे तात्काळ त्याचें पचन होतें, व पुनः जेवणाची इच्छा होते. मांसाची अत्यंत आवड असणाऱ्या व जेवणानंतर पुनः जेवणाची इच्छा करणाऱ्या सिंहलद्वीपच्या राजासाठीं 'मंथानभैरव' नांवाच्या रससिद्धानें हा रस सांगितला आहे. हा क्रव्याद नांवाचा रस अग्नि प्रदीप्त करितो. मानेच्या वरच्या रोगाचें पचन करितो. दूषित आमाचा झाडा करितो. तसेंच पोटाचा मोठेपणा, स्थूलता, मद (उन्माद), शूळ, मूळव्याध, गुल्म व पांथरी ह्यांचा नाश करतो. अनेक प्रकारची पीडा, वात, वातजन्य ग्रंथि व मोठें उदर ह्यांचाही नाश करतो.

भुक्तद्रावी रस.

द्वौ क्षारौ टंकणं सूतं लवंगं लवणत्रयम् ।
पिप्पली गन्धकं शुण्ठी मरीचं पलसंमितम् ॥ १ ॥
कर्षमेकं विषं दत्त्वा सूक्ष्मचूर्णानि कारयेत् ।
अर्कदुग्धस्य दातव्या भावना सप्तवासरम् ॥ २ ॥
अन्तर्धूमं गजपुटे पक्त्वा शीतं समुद्धरेत् ।
ततो लवंगमरिचस्फटिकीनां पलं पलम् ॥ ३ ॥
सर्वं संमर्द्य दृढवद् दृढभाण्डे निधापयेत् ।
सायं गुञ्जाद्वयं खादेद्भुक्तं द्रावयति क्षणात् ॥ ४ ॥
पुनर्भोजनवाञ्छां च जनयेत्प्रहरोपरि ।
आममांसं द्रावयति श्लेष्मरोगनिकृन्तनम् ॥ ५ ॥

जवखार, सज्जीखार, टांकणखाराची लाही, पारा, लवंग, सैंधव, पादेलोण, बिडलोण, पिंपळी, गंधक, सुंठ आणि मिरीं, हीं प्रत्येक

औषधें चार चार तोळे, आणि बचनाग एक तोळा घालून सर्वांचें बारीक चूर्ण करावें, आणि त्याला रुईच्या चिकाच्या सात भावना द्याव्या. नंतर गजपुटामध्यें अंतर्धूमानें पचन करून स्वांगशीत झाल्यावर काढून घ्यावा. नंतर त्यांत लवंग, मिरीं, तुरटी ह्यांचें चूर्ण चार चार तोळे घालून सर्वांचा बराच वेळ खल करून भरून ठेवावा, आणि संध्याकाळीं दोन गुंजा घ्यावा; म्हणजे खालेल्या अन्नाचें क्षणांत पचन होतें, आणि एक प्रहर होतांच पुनः जेवणाची इच्छा होते. हा कर्चे मांस देखील पचवितो व कफरोगाचा नाश करतो. ह्याला भुक्तद्रावी रस म्हणतात.

अग्निमुख रस.

सूतं गन्धं विषं तुल्यं मर्दयेदार्द्रकद्रवैः ।
अश्वत्थचिञ्चापामार्गक्षाराः क्षारौ च टंकणम् ॥ १ ॥
जातीफलं लवंगं च त्रिकटु त्रिफला समम् ।
शंखक्षारं पञ्चपलं हिंगुजीरं द्विभागिकम् ॥ २ ॥
मर्दयेदम्लयोगेन गुञ्जामात्रा वटी शुभा ।
पाचनी दीपनी सद्योऽजीर्णशूलविषूचिकाः ॥ ३ ॥
हिक्कां गुल्मं चोदरं च नाशयेन्नात्र संशयः
रसेन्द्रसंहितायां च नाम्ना वह्निमुखो रसः ॥ ४ ॥

पारा, गंधक व बचनाग समभाग घेऊन त्यांचा आल्याच्या रसांत खल करावा. नंतर त्यांत चिंचा, पिंपळ व आघाडा ह्यांचा क्षार, जवखार, सज्जीखार, टांकणखार, जायफळ, लवंग, सुंठ, मिरीं, पिंपळी, हिरडा, बेहडा व आंवळकाठी हीं समभाग (पारा, गंधक ह्यांच्या प्रमाणांत) घालावीं. शंखभस्म वीस तोळे, हिंग व जिरें दोन दोन भाग घालून लिंबाच्या रसांत खल करावा. आणि गुंजेप्रमाणें गोळ्या कराव्या. ही गुटिका पाचक व दीपक आहे; व अजीर्ण, शूल, विषूचिका, उचकी, गुल्म व उदर ह्यांचा नाश करिते, ह्यांत संशय नाहीं. रसेंद्रसंहितेंत सांगितलेला हा अग्निमुख नांवाचा रस आहे.

अजीर्णारि रस.

शुद्धं सूतं गन्धकं च पलमानं पृथक्पृथक् ।

हरीतकी च द्विपला नागरं त्रिपलं स्मृतम् ॥ १ ॥
कृष्णा च मरिचं तद्वत्सिन्धूत्थं त्रिपलं पृथक् ।
चतुष्पला च विजया मर्दयेन्निम्बुकद्रवैः ॥ २ ॥
पुटानि सप्त देयानि घर्ममध्ये पुनः पुनः ।
अजीर्णारिरयं प्रोक्तः सद्यो दीपनपाचनः ।
भक्षयेद्द्विगुणं भक्ष्यं पाचयेद्रेचयेदपि ॥ ३ ॥

शुद्ध पारा व शुद्ध गंधक चार चार तोळे, हिरड्याचें चूर्ण आठ तोळे, सुंठ बारा तोळे; पिंपळी, मिरीं व सैंधव बारा बारा तोळे, भांग सोळा तोळे ह्यांचा लिंबाच्या रसांत खल करून उन्हामध्यें सात पुटें द्यावीं. ह्याला अजीर्णारि रस म्हणतात. हा दीपक व पाचक आहे. प्रमाणापेक्षां दुप्पट आहार करून वर हा रस द्यावा. तितक्याचेंही हा पचन करून रेचही करील.

अजीर्णहर रस.

सूतं गंधकतालकं विषयुतं टंकं यवक्षारकं
भार्गी वह्निपुनर्नवात्रिकटुकं लोहाभ्रकं त्रैफलं ।
चूर्णं भृंगरसेन मर्दितमनु निर्गुंडिकाद्रावकैः
पश्चाद्वार्द्रकबीजपूरकरसैर्देया पुनर्भावना ॥ १ ॥
भुक्तं जीर्यति भोजनं गुरुतरं मांसादिकं पिष्टकं
गुंजापंचकसंमितस्य वटिका श्रीभैरवाच्छिक्षिता ।
प्लीहं गुल्मजलोदरं कटिभवं शूलं पुनर्जाठरं
शोफं चामसमुद्भवं बहुरुजं दुग्धोदनं भक्षणे ॥२॥

पारा, गंधक, तालक, बचनाग, टांकणखाराची लाही, जवखार, भारंगमूळ, चित्रकमूळ, घेटूळीची मुळी, सुंठ, मिरीं, पिंपळी, अभ्रकभस्म, लोहभस्म, हिरडा, बेहडा, आवळकाठी, यांचें चूर्ण करून त्याला माक्याच्या रसाची भावना द्यावी. नंतर निर्गुंडीचा रस, आल्याचा रस व महाळुंगाचा रस ह्यांची एक एक भावना द्यावी. म्हणजे हा अजीर्णहर रस तयार झाला. ह्याची पांच गुंजांची गोळी करून द्यावी; म्हणजे ती अतिशय जड मांसादिकांचें किंवा पिष्टमय अन्नाचें तेव्हांच पचन करिते. ही वटिका श्रीभैरवनाथानें सांगितली आहे. ही पांथरी, गुल्म, जलोदर, कटिशूळ, पोटांतील शूळ,

आमजन्य सूज व अतिशय पीडा ह्यांचा नाश करिते. ह्यावर पथ्य दूधभात खावा.

पाशुपत रस.

कर्षं सूतं द्विधा गन्धं त्रिभागं भस्म तीक्ष्णकम् ।
त्रिभिः समं विषं योज्यं चित्रकद्रवभावितम् ॥ १ ॥
द्विधा त्रिकटुकं योज्यं लवंगैले तु तत्समे ।
जातीफलं जातिपत्रं चार्धभागमितं मतम् ॥ २ ॥
तथाऽर्धं पञ्चलवणं स्नुह्यर्कौ चाऽपि तिन्तिणी ।
अपामार्गोऽश्वत्थ एषां लवणं च पलार्धकम् ॥ ३ ॥
टंकणं यावकक्षारं स्वर्जिका हिंगु जीरकम् ।
हरीतकी सूततुल्या मर्दयेदम्लयोगतः ॥ ४ ॥
धूर्तबीजस्य वै भस्म सर्वैः सप्तमभागतः ।
रसः पाशुपतो नाम प्रोक्तः प्रत्ययकारकः ॥ ५ ॥
गुंजामात्रा वटी कार्या सर्वाजीर्णविनाशिनी ।
तालमूलीतक्रयोगादुदरामयनाशिनी ॥ ६ ॥
मोचारसेनातिसारं ग्रहणीं तक्रसैन्धवैः ।
शूले नागरकं शस्तं हिन्गुसौवर्चलान्वितम् ॥ ७ ॥
अर्शःसु तक्रेण हिता पिप्पली राजयक्ष्मणि ।
वातरोगं निहन्त्याशु शुण्ठीसौवर्चलान्विता ॥ ८ ॥
गुडूचीशर्करायोगात्पित्तरोगविनाशिनी ।
पिप्पलीक्षौद्रयोगेन श्लेष्मरोगान्निकृन्तति ।
अतः परतरा नास्ति धन्वन्तरमते वटी ॥ ९ ॥

पारा एक तोळा, गंधक दोन तोळे, लोह-(तिख्याचें) भस्म तीन तोळे, बचनाग सहा तोळे, ह्यांना चित्रकाच्या काढ्याची एक भावना द्यावी. नंतर सुंठ, मिरीं व पिंपळी दोन भाग; लवंग व वेलदोडे दोन भाग; जायफळ व जायपत्री एक एक भाग; सैंधव, पादेलोण, बिडलोण, सांबरलोण व मीठ हीं एक एक तोळा; त्रिधारी निवडुंग, रुई, चिंच, आघाडा व पिंपळ ह्यांचे क्षार दोन दोन तोळे; टांकणखार, जवखार, सज्जीखार, हिंग, जिरें, हिरडेदळ हीं औषधें पाऱ्याच्याबरोबर (एक एक तोळा), ह्यांचा लिंबाच्या रसांत खल करावा. आणि त्यांत सर्व औषधांच्या सातव्या हिश्शानें धोतऱ्याच्या बियांची राख घालून चांगला खल करावा. हा पाशुपत

रस अनुभविक म्हणून सांगितला आहे. ह्याची एक गुंज प्रमाणाची गोळी करावी. ही सर्व अजीर्णाचा नाश करिते. ही गोळी मुसळीची मुळी व ताक ह्यांशीं घेतली असतां उदराचा नाश करिते. मोचरसाशीं घेतली असतां अतिसाराचा व ताक आणि सैंधव ह्यांशीं घेतली असतां संग्रहणीचा नाश करिते. सुंठ, हिंग व पादेलोण ह्यांच्याशीं घेतली असतां शूलाचा नाश करिते. ही पाशुपत गुटिका ताकाशीं सेविली असतां मूळव्याधीचा नाश करिते; पिंपळीशीं सेविली असतां क्षयाचा नाश करिते; सुंठ व पादेलोण ह्यांशीं घेतली असतां वातरोगाचा त्वरित नाश करिते; गुळवेल व साखर ह्यांशीं सेविली असतां पित्तरोगाचा नाश करिते आणि पिंपळी व मध ह्यांशीं घेतली असतां कफरोगाचा नाश करिते. धन्वंतरीच्या मतानें ह्या पाशुपत रसायनाच्या गुटिकेप्रमाणें दुसरी गुटिका नाहीं.

आदित्यरस.

दरदं च विषं गन्धं त्रिकटु त्रिफलासमम् ।
जातीफलं लवङ्गं च लवणानि च पञ्च वै ॥ १ ॥
सर्वमेतत्कृतं चूर्णमम्लयोगेन सप्तधा ।
भावयित्वा वटी कार्या गुंजार्धप्रमिता बुधैः ॥ २ ॥
रसो ह्यादित्यसंज्ञोऽमयजीर्णक्षयकारकः ।
भुक्तमात्रं पाचयति जठरानलदीपनः ॥ ३ ॥

हिंगूळ, बचनाग, गंधक, सुंठ, मिरीं, पिंपळी, हिरडा, बेहडा, आवळकाठी, जायफळ, लवंग, सैंधव, पादेलोण, बिडलोण, सांबरलोण व मीठ ह्या सर्वांचा खल करून लिंबाच्या रसाच्या सात भावना द्याव्या; आणि अर्ध्या गुंज प्रमाणाची गोळी करावी. ह्याला **आदित्यरस** असें म्हणतात. हा अजीर्णाचा नाश करतो. हा खाल्लेल्या सर्व पदार्थांचें पाचन करितो व अग्नीचें दीपन करितो.

हुताशन.

एकं च दिग्द्वादशभागमानं योज्यं विषं टङ्कणभूषणं च ।
हुताशनो नाम हुताशनस्य करोति वृद्धिं कफवातहन्ता ॥ १ ॥

एक भाग बचनाग, आठ भाग टांकणखाराची लाही, आणि

व मिरीं बारा भाग, ह्यांचा एकत्र खल करावा. ह्याला **हुताशन रस** म्हणतात. हा जठराग्नीला वाढवितो व कफवाताचा नाश करितो.

दुसरा प्रकार.

एकांशकाः पारदगन्धटङ्काः कपर्दशङ्खामृतगेहधूमाः ।
त्र्यंशा इमेऽथो मरिचं त्विभांशं संमर्दितं जम्भरसेन गाढम् ॥१
गुल्मारोचकशूलवह्निसदनाजीर्णं विषूचीं कफं
जाड्यं शीर्षसमुद्भवं च कसनं मुद्गप्रमाणा वटी ।
लीढाऽऽर्द्रस्य रसेन हन्ति कथितानेतान्गदान्ब्रह्मणा
पूर्वं निर्मित एष यत्नशतकैर्नाम्ना हुताशो रसः ॥२॥

पारा, गंधक व टांकणखाराची लाही हीं एक एक भाग; कवडी-भस्म, शंखभस्म, बचनाग आणि घेरोसा तीन तीन भाग; मिरीं आठ भाग ह्या सर्वांचा लिंबाच्या रसांत खल करावा. आणि मुगा-एवढी गोळी करून आल्याच्या रसाशीं द्यावी. म्हणजे गुल्म, अरुचि, शूल, अग्निमांद्य, अजीर्ण, विषूचिका, कफ, मस्तकाचा जडपणा व खोकला ह्यांचा ती नाश करिते. हा हुताशन नांवाचा रस शेंकडों प्रयत्नानें पूर्वीं ब्रह्मदेवानें निर्माण केला आहे.

अजीर्णकंटक रस.

शुद्धसूतं विषं गन्धं प्रत्येकं च समं समम् ।
मरीचं सर्वतुल्यांशं कण्टकारिफलद्रवैः ॥ १ ॥
मर्दयेद्भावयेद्यत्नादेकविंशतिवारकम् ।
गुञ्जात्रयमिदं खादेत्सर्वाजीर्णप्रशान्तये ।
सर्वोपद्रवसंयुक्तां विषूचीमपि नाशयेत् ॥ २ ॥

शुद्ध पारा, बचनाग व गंधक हीं औषधें समभाग, व मिरीं सर्वांच्या बरोबर घेऊन सर्वांचा रिंगणीच्या फळाच्या रसांत खल करून त्या रसाच्या एकवीस भावना द्याव्या, आणि सर्व अजी-र्णांचा नाश होण्याकरितां हा अजीर्णकंटक रस तीन गुंजा द्यावा. हा सर्व उपद्रवांनीं युक्त अशा संग्रहणीचाही नाश करतो.

विषूच्यादिचिकित्सा.

सूचीभिरिव गात्राणि तुदन्संतिष्ठतेऽनिलः ।
यस्याजीर्णेन सा वैद्यैर्विषूचीति निगद्यते ॥ १ ॥

अजीर्णामध्यें ज्याच्या शरीरांत वातदोषानें सुया टोंचल्याप्रमाणें पीडा होते, त्या विकारास वैद्यलोक विषूचिका असें म्हणतात.

विषूच्यामतिवृद्धायां पार्ष्ण्योर्दाहः प्रशस्यते ।
गन्धकं कुंकुमं वाऽपि दद्यान्निम्बुजलेन वा ॥ २ ॥

विषूचिका (पटकी) फार वाढली असतां दोन्ही पायांच्या खोटांना डाग द्यावा. तो प्रशस्त आहे. किंवा शुद्ध गंधक अगर केशर लिंबाच्या रसांतून द्यावें.

व्योषं करञ्जस्य फलं हरिद्रानिम्बुकद्रवैः ।
नस्यांजने प्रयोक्तव्ये कुर्याच्च जलसेवनम् ॥ ३ ॥

सुंठ, मिरें, पिंपळी, करंजाची बी व हळद ह्यांचा निंबाचे रसांत खल करून त्याचें नस्य द्यावें, अथवा अंजन करावें; आणि वर पाणी प्यावें.

व्योषं करंजस्य फलं हरिद्रा मूलं समावाप्य च मातुलुङ्ग्याः ।
छायाविशुष्का गुटिकाः कृतास्ता हन्युर्विषूचीं नयनांजनेन ४

सुंठ, मिरीं, पिंपळी, करंजाची बी, हळद व महाळुंगाची मुळी, ह्या सर्वांचा खल करून गोळ्या करून सावलींत वाळवाव्या, आणि त्याचें अंजन करावें; म्हणजे विषूचिकेचा नाश होतो.

करंजनिम्बशिखरीगुडूच्यर्जुनवत्सकैः ।
पीतः कषायो वमनाद्धोरां हन्याद्विषूचिकाम् ॥ ५ ॥

करंजाची बी, लिंबाची साल, आघाडा, गुळवेल, अर्जुनसादडा व कुडयाची साल ह्यांचा काढा करून घेतला असतां वमन होऊन भयंकर विषूचिकेचा नाश होतो.

निम्बूरसश्चिञ्चिणिकासमेतो विषूचिकाशोषहरः प्रदिष्टः ।
दुग्धेन पीतो यदि टङ्कणोऽसौ प्रशामयेद्वै वमनं निरुन्ध्यात् ६

पिपासायां तथोत्क्लेशे लवङ्गस्याम्बु शस्यते ।
जातीफलस्य वा शीतं शृतं भद्रघनस्य वा ॥ ७ ॥

लिंबाचा रस व चिंचेचा बलक मिश्र करून दिला असतां विषूचिकेसंबंधीं शोषाचें निवारण होतें. तसेंच जर टांकणखाराची लाही दुधाशीं दिली तर शोषाचें शमन होऊन वांतीचाही नाश होतो. तहान व ओकारी ह्यांजवर लवंगाचें पाणी (कषाय) द्यावें.

तें प्रशस्त आहे. तसेंच जायफळ अथवा नागरमोथे पाण्यांत टाकून तें उकळून थंड झाल्यावर देणें हितकर आहे.

त्वक्पत्ररास्नागुरुशिग्रुकुष्ठैरम्लप्रदिष्टैः सवचाशताह्वैः ।
उद्वर्तनं खल्लिविषूचिकाघ्नं तैलं विपक्वं च तदर्थकारि ॥ ८ ॥

दालचिनी, तमालपत्र, रास्ना, अगर, शेवगा, कोष्ठ, वेखंड व बडिशेप ह्यांचें चूर्ण लिंबाच्या रसांत अगर ताकांत कालवून त्याची अंगास उटी लावावी. ती खल्ली (वातविकार) व विषूचिका ह्यांचा नाश करिते; अगर वरील जिनसांच्या योगानें तेल सिद्ध करावें, तें देखील वरील गुण करितें.

चुक्याचें तेल.

पलं चुक्रं कुष्ठं पिचुयुगमितं सैन्धवकणे
तदर्धं प्रत्येकं करतलमितं जातिफलकम् ।
कटोस्तैलं किंचित्कुडवमितमग्नावधिशृतं
तदेतच्चुक्राद्यं शमयति विषूचीं च सगदाम् ॥ १ ॥

चार तोळे चुक्याचीं पानें; चार तोळे कोष्ठ; सैंधव व पिंपळी दोन दोन तोळे व जायफळ एक तोळा ह्यांच्या कल्कामध्यें सोळा तोळे शिरसाचें तेल घालून तेल सिद्ध करावें. हें तेल उपद्रवांसहित विषूचिकेचा नाश करितें.

कुष्ठसैन्धवयोः कल्कं चुक्रं तैलसमन्वितम् ।
विषूच्यां मर्दनं कोष्णं खल्लीशूलनिवारणम् ॥ १ ॥

कोष्ठ, सैंधव ह्यांचा कल्क व वरील चुक्रादि तेल एकत्र कालवून थोडें ऊन करून अंगाला मर्दन करावें. तें विषूचिका, खल्ली (वात-विकार) व शूल ह्यांचा नाश करितें.

विलम्बिकालसकयोरूर्ध्वाधःशोधनं हितम् ।
नालेन फलवर्त्या च तथा शोधनभेषजैः ।
दण्डाद्येऽलसकेऽप्युच्चैरयमेव क्रियाक्रमः ॥ २ ॥

विलंबिका व अलसक ह्यांवर वमन व विरेचन ह्या दोन्ही क्रियांनीं शोधन करणें हितकारक आहे. दंडालसकादिकांवर बस्ति फलवर्ती व शोधन औषधें ह्यांच्या योगानें तेंच (वमन व रेचन) उपचार मोठ्या प्रमाणांत करावेत.

उद्गारशुद्धिरुत्साहो वेगोत्सर्गौ यथोचितः ।
लघुता क्षुत्पिपासा च जीर्णाहारस्य लक्षणम् ॥ ३ ॥

शुद्ध ढेंकर येणें, उत्साह, योग्य वेळीं व योग्य असा मल-मूत्रांचा उत्सर्ग होणें, शरीरास हलकेपणा वाटणें, भूक व तहान लागणें, हीं अजीर्ण मोडल्याचीं लक्षणें आहेत.

विरूद्धासात्म्यपानान्नं विष्टम्भीनि गुरूणि च ।
अग्निमान्द्येऽप्यजीर्णे च सर्वाणि परिवर्जयेत् ॥ ४ ॥

विरुद्ध व आपल्या प्रकृतीला न मानवणारें असें अन्नपान आणि मलाचा अवरोध करणारे व जड पदार्थ हे सर्व अग्निमांद्य व अजीर्ण ह्या विकारांत वर्ज करावे.

फलवर्तिं वमिं स्वेदं लङ्घनं चापतर्पणम् ।
विशेषादलसे कुर्याद्विषूच्यामतिसारवत् ॥ ५ ॥

फलवर्ति[१], वमन, स्वेद (घाम काढणें), लंघन व अपतर्पण[२] हे उपचार विशेषतः अलसकावर करावेत, आणि विषूचिकेवर अति-साराप्रमाणें चिकित्सा करावी.

क्रिमिनिदान.

क्रिमींचे भेद.

क्रिमयस्तु द्विधा प्रोक्ता बाह्याभ्यन्तरभेदतः ।
बहिर्मलकफासृग्विड्जन्मभेदाच्चतुर्विधाः ॥ १ ॥
नामतो विंशतिविधा बाह्यास्तत्र मलोद्भवाः ।
तिलप्रमाणसंस्थानवर्णाः केशाम्बराश्रयाः ॥ २ ॥
बहुपादाश्च सूक्ष्माश्च यूका लिक्षाश्च नामतः ।
द्विधा ते कोठपिटिकाकण्डूगण्डान्प्रकुर्वते ॥ ३ ॥

शरीराच्या बाह्य भागांवर असणारे व अभ्यंतरीं असणारे असे क्रमीचे दोन प्रकार आहेत. अंगावरील मळ, कफ, रक्त व विष्ठा हीं त्यांचीं उत्पत्तीचीं चार स्थानें आहेत. म्हणून त्यांचे चार

१. बस्तीच्या अभावीं वस्त्राची वात करून तिला औषधादिकांचा लेप करून मलशोधन होण्याकरितां गुदमार्गांत घालून ठेवतात, तिला फलवर्ति असें म्हणतात.

२. अपतर्पण म्हणजे कर्षणचिकित्सा. हा लंघनापैकींच एक प्रकार आहे.

प्रकार आहेत. ह्यांच्या वीस जाती असून त्यांचीं वीस नांवें वेगवेगळीं आहेत. त्यांत बाहेरचे क्रिमि मलापासून उत्पन्न होतात. ते आकारानें व रंगानें तिळासारखे असून वस्त्रें व केंस ह्यांच्या आश्रयानें असतात. त्यांना पुष्कळ पाय असतात. त्यांत कित्येक फार सूक्ष्म असतात. उवा व लिखा ह्या नांवानें ते दोन प्रकारचे आहेत. हे अंगावर गांधी, पुटकुळ्या, खाज व गांठी उत्पन्न करितात.

क्रिमींचें निदान.

अजीर्णभोजी मधुराम्लसेवी द्रवप्रियः पिष्टगुडोपभोक्ता ।
व्यायामवर्जी च दिवाशयी च विरुद्धभोक्ता लभते क्रमींश्च ॥४॥

अजीर्णावर भोजन करणारा, मधुर व आंबट पदार्थ सेवन करणारा, पातळ पदार्थ फार खाणारा, गूळ व पीठ खाणारा, व्यायाम न करणारा, दिवसा निजणारा, आणि विरुद्ध अन्न खाणारा, अशा मनुष्यास क्रिमि होतात.

माषपिष्टान्नलवणगुडशाकैः पुरीषजाः ।
मांसमाषगुडक्षीरदधिशुक्तैः कफोद्भवाः ।
विरुद्धाजीर्णशाकाद्यैः शोणितोत्था भवन्ति हि ॥ ५ ॥

उडीद, पिठाचें अन्न, मीठ, गूळ व भाज्या (पालेभाज्या) ह्यांच्या अति सेवनानें पुरीषजन्य क्रिमि होतात. मांस, उडीद, गूळ, दूध, दहीं व कांजी वगैरे आम्ल बनविलेले पदार्थ, ह्यांच्या सेवनानें कफजन्य क्रिमि होतात. विरुद्ध अन्न, अजीर्ण, आणि अतिशय पालेभाज्या खाणें ह्यांच्यायोगानें रक्तजन्य क्रिमि होतात.

क्रिमि झाल्याचें लक्षण.

ज्वरो विवर्णता शूलं हृद्रोगश्छर्दनं भ्रमः ।
भक्तद्वेषोऽतिसारश्च संजातक्रिमिलक्षणम् ॥ ६ ॥

ज्वर, अंगाचा वर्ण बदलणें (अंग फिक्कट होणें), शूल, वांति, ग्लानि, घेरी येणें, अन्नाचा द्वेष व अतिसार हीं क्रमि झाल्याचीं लक्षणें आहेत.

कफजन्य क्रिमींचें लक्षण.

कफादामाशये जाता वृद्धाः सर्पन्ति सर्वतः ।
पृथुब्रध्ननिभाः केचित्केचिद्गण्डूपदोपमाः ॥ ७ ॥

रूढधान्यांकुराकारास्तनुदीर्घास्तथाऽणवः।
श्वेतास्ताम्रावभासाश्च नामतः सप्तधा तु ते ॥ ८ ॥
अंत्रादाश्चोदरावेष्टा हृययादा महागुहाः।
चुरवो दर्भकुसुमाः सुगन्धास्ते च कुर्वते ॥ ९ ॥
हृल्लासमास्यस्रवणमविपाकमरोचकम्।
मूर्छाछर्दिज्वरानाहकार्श्यक्षवथुपीनसान् ॥ १० ॥

कफदोषानें आमाशयामध्यें उत्पन्न झालेले क्रिमि वाढले म्हणजे शरीरांत सर्वत्र पसरतात. त्यांपैकीं कांहीं कातड्याच्या रुंद वादीप्रमाणें असतात, कांहीं गांडूळाप्रमाणें असतात, कांहीं धान्याच्या मोडांप्रमाणें असतात, तसेंच कांहीं लांब व बारीक असतात; व कांहीं सूक्ष्म अणूप्रमाणें असतात. त्यांत कांहीं तांबडे (तांब्याप्रमाणें) व कांहीं पांढरे असतात. ते सात प्रकारचे आहेत. त्यांचीं नांवें:—अंत्राद, उदरावेष्ट, हृदयाद, महागुह, चुरु, दर्भकुसुम, व सुगंध अशीं आहेत. हे झाले असतां तोंडाला पाणी सुटणें, अन्नपचन न होणें, अरुचि, मूर्च्छा, ओकारी, ज्वर, पोट फुगणें, कृशपणा, शिंका येणें व पीनस हे विकार उत्पन्न होतात.

रक्तजन्य क्रिमींचें स्वरूप.

रक्तवाहिशिरास्थाना रक्तजा जन्तवोऽणवः।
अपादा वृत्तताम्राश्च सौक्ष्म्यात्केचिददर्शनाः ॥ ११ ॥
केशादा लोमविध्वंसा रोमद्वीपा उदुम्बराः।
षट् ते कुष्ठैककर्माणः सहसौरसमातरः ॥ १२ ॥

रक्तजन्य क्रमि अणूप्रमाणें सूक्ष्म असून ते रक्तवाही शिरांमधून असतात. त्यांना पाय नसतात. ते वाटोळे असतात. आणि त्यांतील कित्येक सूक्ष्मपणामुळें दिसतही नाहींत. केशाद, रोगविध्वंसक, रोमद्वीप, उदुंबर, सौरस व मातृ, अशा सहा नांवांनीं ते सहा प्रकारचे आहेत. हे रक्तजन्य क्रमि कुष्ठ उत्पन्न करितात.

मलजन्य क्रमींचें लक्षण.

पक्वाशये पुरीषोत्था जायन्तेऽधोविसर्पिणः।
वृद्धास्ते स्युर्भवेयुश्च ते यदाऽऽमाशयोन्मुखाः ॥ १३ ॥
तदाऽऽस्योद्गारनिश्वासविड्गन्धानुविधायिनः।

मलजन्य क्रिमि पक्काशयामध्यें उत्पन्न होतात. ते अधोमार्गाकडे

संचार करितात. ते ज्या वेळीं फार वाढतात त्या वेळीं आमाशयाकडे येऊं लागतात. ते आमाशयाकडे येऊं लागले म्हणजे श्वासोच्छ्वास व ढेकर ह्यांना मळाप्रमाणें घाण येते.

त्यांचें स्वरूप.

पृथुवृत्ततनुस्थूलाः श्यावपीतसितासिताः ॥ १४ ॥
ते पञ्च नाम्ना क्रमयः ककेरुकमकेरुकाः ।
सौसुरादाः सलूनाख्या लेलिहा जनयन्ति च ॥ १५ ॥
विड्भेदशूलविष्टम्भकार्श्यपारुष्यपाण्डुताः ।
रोमहर्षाऽग्निसदनगुदकण्डूर्विमार्गगाः ॥ १६ ॥

ते मलजन्य क्रिमि रुंदट (चपटे), वाटोळे, बारीक, मोठे, निळे, किंवा काळे असे असतात. ककेरुक, मकेरुक, सौसुराद, सलून व लेलिह अशा नांवांनीं ते पांच प्रकारचे आहेत. हे आपली जागा सोडून इकडे तिकडे संचार करूं लागले असतां मळ पातळ होणें, शूळ, मळाचा अवरोध, कृशत्व, अंगाला खरखरीतपणा, अंग फिकट होणें, अंगावर कांटा येणें, अग्निमांद्य व मलद्वाराचे ठिकाणीं कंड सुटणें हे विकार उत्पन्न होतात.

क्रिमिचिकित्सा.

मुस्ताखुकर्णीफलदारुशिग्रुक्वाथः सकृष्णाक्रमिशत्रुकल्कः ।
मार्गद्वयेनापि चिरप्रवृत्तान्क्रमीन्निहन्ति क्रिमिजांश्च रोगान् ॥ १

नागरमोथे, उंदीरकानी, इंद्रजव, देवदार व शेवग्याची साल ह्यांचा काढा पिंपळी व वावडिंगें ह्यांची पूड घालून द्यावा. तो गुदावाटे व मुखावाटे पडणाऱ्या अशा फार दिवसांच्या क्रिमींचा नाश करून कृमिजन्य रोगांचाही (उपद्रवांचा) नाश करितो.

दाडिमत्वक्कृतः क्वाथस्तिलतैलेन संयुतः ।
त्रिदिनात्पातयत्येव कोष्ठतः क्रमिजालकम् ॥ २ ॥

डाळिंबाच्या सालीचा काढा करून तो तिळाचें तेल घालून द्यावा. म्हणजे तो कोठ्यांतील कृमींचा समुदाय तीन दिवसांत पाडून टाकतो.

खदिरः कुटजः पिचुमन्दवचात्रिकटुत्रिफलात्रिवृतासहितम् ।
पशुमूत्रयुतं पिब सप्तदिनं क्रमिकोटिशतान्यपि हन्त्यचिरात् ३

खैराची साल, कुड्याची साल, बाळंतलिंबाची सास, वेखंड, सुंठ, मिरीं, पिंपळी, हिरडा, बेहडा, आवळकाठी व तेल ह्यांचा काढा करून तो गोमूत्र घालून सात दिवस प्यावा, म्हणजे कोट्यावधि क्रिमींचा त्वरित नाश होतो.

चूर्ण.

निम्बवत्सकविडङ्गसैन्धवं रामठेन सह जन्तुनाशनम् ।
निम्बषट्कमजमोदकान्वितं चूर्णमेव मधुना प्रशस्यते ॥ ४ ॥

बाळंतलिंबाची साल (अथवा पाला), कुड्याची साल, वावडिंगें, सैंधव, हिंग, व ओंवा ह्या सहा औषधांच्या समुदायाला निंबषट्क म्हणतात. हें निंबषट्क मधाशीं घेतलें असतां जंतूंचा नाश होतो.

आखुकर्णीदलैः पिष्टैः पिष्टकेन च पूपकान् ।
भुक्त्वा सौवीरकं चानु पिबेत्क्रमिहरं परम् ॥ ५ ॥

उंदीरकानीच्या पानाचें चूर्ण आणि कणीक एकत्र करून त्याचे वडे अगर घारगे करून खावे व त्यावर कांजी प्यावी. हा योग क्रमींचा नाश करण्याचे कामीं श्रेष्ठ आहे.

सुवर्चिकारामठपत्रिकाह्वाविडङ्गबाल्हीककणाग्निविश्वाः ।
यवानिकाग्रन्थिकभद्रमुस्तास्तक्रेण चूर्णं क्रमिकोटिहारि ॥ ६

सज्जीखार, हिंग, जायपत्री, वावडिंग, केशर, पिंपळी, चित्रकमूळ, सुंठ, ओंवा, पिंपळमूळ, देवदार व भद्रमोथा (बारीक नागरमोथे, ह्यांचें चूर्ण करून ताकाशीं द्यावें. हें कोट्यावधि क्रिमींचा नाश करितें.

भल्लातको वा दध्ना वा चिञ्चाम्लेन हरेत्क्रमीन् ।
बिब्बा दह्यांत उगाळून किंवा चिंचेच्या बरकाशीं दिला असतां तो क्रिमींचा नाश करतो.

विडङ्गं पारिभद्राग्रं ब्रह्मबीजं पृथक्पिबेत् ॥ ७ ॥
मधुना क्रमिनाशाय निम्बं वा हिंगुना युतम् ।

वावडिंगें, कडू लिंबाचा पाला, किंवा पळसाचें बीं वेगळें वेगळें मधाशीं द्यावें, म्हणजे क्रिमींचा नाश होतो. अथवा क्रिमि दूर होण्याकरितां लिंबाच्या पाल्याचा रस हिंग घालून द्यावा.

निम्बाजमोदाजन्तुघ्नं ब्रह्मबीजं सचोरकम् ॥

सहिंगुकं समगुडं सद्यो जन्तुविनाशनम् ॥ ८ ॥

वाळंतलिंबाची साल, अजमोदा, वावडिंग, पळसाचें बीं, चोरओंवा व हिंग ह्यांचें चूर्ण करून समभाग (सर्व चूर्णाबरोबर) गूळ घालून द्यावें, म्हणजे तत्काळ क्रिमींचा नाश होतो.

हरीतकी चैव तथा हरिद्रा सौवर्चलं चैव समं विचूर्णितम् ।
इन्द्रवारुणिजलेन भावितं कीटसंघविनिवारणं परम् ॥ ९ ॥

हिरडेदळ, हळद व पांदेलोण ह्यांचें समभाग चूर्ण करून कडू इंद्रायणीच्या फळाच्या रसाची त्याला भावना द्यावी. म्हणजे हें चूर्ण क्रिमींच्या समुदायाचा नाश करण्याविषयीं उत्तम होतें.

धुरी.

काकुभकुसुमविडंगं लांगलिभल्लातकं तथोशीरम् ।
श्रीवेष्टकसर्जरसं चन्दनमथ कुष्ठमष्टमं दद्यात् ॥ १० ॥
एषा सुगन्धो धूपः सकृत्क्रमीणां विनाशकः प्रोक्तः ।
शय्यासु मत्कुणानां शिरसि च गात्रेषु यूकानाम् ॥११॥

अर्जुनसादड्याचीं फुलें, वावडिंगें, जळपिंपळी, बिब्बे, वाळा, सुरूचा डिंक (धूपविशेष), राळ, चंदन आणि आठवें कोष्ट घालून ह्यांची धुरी द्यावी. ती तात्काळ क्रिमींचा नाश करिते. ढेंकूण, मस्तकांतील व अंगावरील उवा यांकरितांही ह्यांची धुरी द्यावी.

विशालायाः फलं पक्वं तप्तलोहे परिक्षिपेत् ।
तद्धूमो दन्तलग्नश्चेत्कीटानां पातनः परः ॥ १२ ॥

कडू इंद्रायणीचें पिकलेलें फळ घेऊन तें तापलेल्या लोखंडावर चुरगळून टाकावें व त्याचा धूर दांतांस द्यावा. म्हणजे दांतांतील किडे पडतात.

विडंगादि तैल.

सविडङ्गं च शिलया सिद्धं सुरभिजलेन कटुतैलम् ।
निखिला नयति विनाशं लिक्षासहिता दिनैर्यूकाः ॥ १ ॥

वावडिंगें व मनशीळ ह्यांचा कल्क व गोमूत्र ह्यांच्यायोगानें मोहरीचें तेल सिद्ध करावें, आणि तें एक दिवस डोक्यास लावावें; म्हणजे सर्व उवा व लिखा ह्यांचा नाश होतो.

पारदं मर्दयेन्निष्कं कृष्णधत्तूरकद्रवैः ।
नागवल्लीद्रवैर्वाऽथ वस्त्रखण्डं प्रलेपयेत् ॥ २ ॥

तद्वस्त्रं मस्तके बध्वा धार्यं यामत्रयं ततः ।
यूकाः पतन्ति निश्चेष्टाः सलिक्षा नात्र संशयः ॥ ३ ॥

चार मासे पारा, काळ्या धोतऱ्याच्या अथवा नागवेलीच्या पानाच्या रसांत खलून फडक्यास लेप करून तें फडकें डोक्यास बांधावें व तसेंच तीन प्रहर ठेवावें; म्हणजे उवा व लिखा निश्चेष्ट होऊन पडतात, ह्यांत संशय नाहीं.

चित्रकं दन्तिनीमूलं कोशातकीसमन्वितम् ।
कल्कं पिष्ट्वा पचेत्तैलं केशशत्रुविनाशनम् ॥ ४ ॥

चित्रक, दांतीमूळ, व कडू दोडका ह्यांच्या कल्कांचें तेल सिद्ध करून केसास लावावें, म्हणजे केसांतील क्रिमि नाश पावतात.

रसादि लेप.

रसेन्द्रेण समायुक्तो रसो धत्तूरपत्रजः ।
ताम्बूलपत्रजो वाऽपि लेपनाद्यूकनाशनः ॥ १ ॥

धोतऱ्याच्या अथवा नागवेलीच्या पाल्याचा रस पाऱ्याशीं मिसळून त्याचा मस्तकास लेप केला असतां उवांचा नाश होतो.

कृमिमुद्गर रस.

क्रमेण वृद्धं रसगन्धकाजमोदाविडङ्गं विषमुष्टिका च ।
पलाशबीजं च विचूर्णमस्य निष्कप्रमाणं मधुनाऽवलीढम् ॥ १
पिबेत्कषायं घनजं तदूर्ध्वं रसोऽयमुक्तः कृमिमुद्गराख्यः ।
क्रिमीन्निहंति क्रिमिजांश्च रोगान्संदीपयत्यग्निमयं त्रिरात्रात् ॥२

पारा एक भाग, गंधक दोन भाग, अजमोदा तीन भाग, वावडिंगें चार भाग, कुचला (विषमुष्टि) पांच भाग आणि पळसाचीं बीं सहा भाग, ह्या सर्वांचें चूर्ण करून दोन किंवा तीन मासे चूर्ण मधाशीं द्यावें व त्याजवर नागरमोथ्यांचा काढा द्यावा. ह्याला कृमिमुद्गल रस म्हणतात. हा कृमि व त्यांपासून होणारे उपद्रव ह्यांचा तीन दिवसांत नाश करतो व अग्नि प्रदीप्त करतो.

कृमिकुठार.

विश्वं रामठसैन्धवाग्निमरिचं पथ्या वचागुग्गुलु-
र्बोलं रात्रिविडङ्गकुष्ठलशुनं गन्धः कुबेराक्षकः ।
इन्द्रोद्भूतपलाशबीजखदिराजाजीकणादीप्यकं
सौवर्चं मधुना गुटी कृमिकुठाराह्वा रुजाजन्तुनुत् ॥ १ ॥

सुंठ, हिंग, सैंधव, चित्रक, मिरीं, हिरडेदळ, वेखंड, गुग्गुळ, बोळ, हळद, वावडिंग, कोष्ठ, लसूण, गंधक, सागरगोटा, इंद्रजव, पळसाचें बीं, खैराची साल, जिरें, पिंपळी, ओवा, व पादेलोण, ह्यांचें चूर्ण करून गोळ्या कराव्या. त्या मधाशीं दिल्या असतां क्रिमि व तज्जन्यरोग ह्यांचा नाश करितात.

क्रिमिरोगावर वर्ज्य पदार्थ.

क्षीराणि मांसानि घृतानि चैव दधीनि शाकानि च पत्रवन्ति ।
समासतोऽम्लं मधुरान्रसांश्च क्रमीञ्जिघांसुः परिवर्जयेत्तु ॥ २ ॥

सर्व प्रकारचें दूध, मांस, तूप, दहीं, पालेभाज्या, आंबट व गोड पदार्थ हे क्रिमिरोगाचा नाश इच्छिणाऱ्या मनुष्यानें वर्ज करावेत.

शीताम्बु मधुरं क्षारं दधिक्षीरघृतादिकम् ।
सौवीरं पत्रशाकांश्च वर्जयेत्क्रिमिमान्नरः ॥ ३ ॥

तसेंच थंड पाणी, गोड व खारट पदार्थ, दहीं, दूध, तूप, कांजी व पालेभाज्या हे पदार्थ क्रिमिरोग्यानें वर्ज करावेत.

पांडुरोगनिदान.

पाण्डुरोगाः स्मृताः पञ्च वातपित्तकफैस्त्रयः ।
चतुर्थः संनिपातेन पञ्चमो भक्षणान्मृदः ॥ १ ॥

पांडुरोग हा वात, पित्त व कफ ह्या तीन दोषांपासून तीन प्रकारचा, चवथा त्रिदोषजन्य व पांचवा माती खाण्यापासून होणारा, मिळून पांच प्रकारचा आहे.

व्यवायमम्लं लवणानि मद्यं मृदं दिवा स्वप्नमतीव तीक्ष्णम् ।
निषेवमाणस्य विदूष्य रक्तं दोषास्त्वचं पाण्डुरतां नयन्ति ॥२

मैथुन, आंबट पदार्थ फार खाणें, खारट पदार्थ व मद्य ह्यांचें अतिसेवन करणें, माती खाणें, दिवसा झोंप घेणें, व तीक्ष्ण पदार्थ अतिशय भक्षण करणें, वगैरे कारणांनीं रक्त दूषित होऊन त्वचेला पांढरेपणा येतो.

पूर्वरूप.

त्वक्स्फोटनिष्ठीवनगात्रसादमृद्भक्षणप्रेक्षणकूटशोथाः ।
विण्मूत्रपीतत्वमथाविपाको भविष्यतस्तस्य पुरःसराणि ॥१॥

अंगाची त्वचा फुटणें, थुंकी येणें, अंग गळल्यासारखें होणें, माती खाण्याची इच्छा होणें, डोळ्याच्या पापण्या सुजणें, मळ व मूत्र ह्यांना पिवळटपणा असणें आणि अन्न पचन न होणें हीं पांडुरोगाचीं पूर्वचिन्हें आहेत.

वातजन्य पांडुरोगाचें लक्षण.

त्वङ्मूत्रनयनादीनां रूक्षकृष्णारुणाभता ।
वातपाण्ड्वामये कम्पतोदानाहभ्रमादयः ॥ १ ॥

त्वचा, मूत्र, डोळे वगैरे अवयवांना रूक्षत्व, काळसरपणा, तांबूसपणा, कंप, अंगांत त्वचेला सुया टोंचल्याप्रमाणें वाटणें, पोट फुगणें व भ्रम इत्यादि विकार वातजन्य पांडुरोगामध्यें होतात.

पित्तजपांडुरोगलक्षण.

पीतमूत्रशकृन्नेत्रो दाहतृष्णाज्वरान्वितः ।
भिन्नविट्कोऽतिपीताभः पित्तपाण्ड्वामयी नरः ॥ १ ॥

पित्तदोषामुळें होणाऱ्या पांडुरोगांत रोग्याचा मल, मूत्र व नेत्र ह्यांना पिंवळटपणा येतो; त्याचे अंगाचा दाह होतो; तृषा लागते; ज्वर येतो व मळ पातळ होऊन अतिशय पिंवळा होतो.

कफजन्य पांडुरोगाचें लक्षण.

कफप्रसेकश्वयथुतन्द्रालस्यादिगौरवैः ।
पाण्डुरोगी कफाच्छुक्लैस्त्वङ्मूत्रनयनाननैः ॥ १ ॥

तोंडावाटे कफ पडणें, सूज, तंद्रा, आळस, अतिशय जडत्व, त्वचा, मूत्र, डोळे व तोंड ह्यांना पांढरेपणा हीं लक्षणें कफजन्य-पांडुरोगामध्यें होतात.

त्रिदोषजन्य पांडुरोगाचें लक्षण.

सर्वान्नसेविनः सर्वे दुष्टा दोषास्त्रिदोषजम् ।
त्रिदोषलिङ्गं कुर्वन्ति पाण्डुरोगं सुदुःसहम् ॥ १ ॥
ज्वरारोचकहृल्लासच्छर्दितृष्णाक्लमान्वितः ।
पाण्डुरोगी त्रिभिर्दोषैस्त्याज्यः क्षीणो हतेंद्रियः ॥ २ ॥

सर्व प्रकारचें अन्न सेवन करणाऱ्या मनुष्याचे वातादि सर्व दोष कुपित होऊन तिन्हीही दोषांच्या लक्षणांनीं युक्त व दुःसह असा पांडुरोग उत्पन्न करितात. ह्या त्रिदोषजन्य पांडुरोगामध्यें ज्वर,

अरुचि, मळमळ, ओकारी, तहान व थकवा हीं लक्षणें असतात. क्षीण झालेला व ज्याचीं इंद्रियें आपआपले विषय घेण्यास असमर्थ झालीं आहेत असा त्रिदोषजन्य पांडुरोगी असाध्य समजावा.

मातीपासून होणारा पांडुरोग.

मृत्तिकादनशीलस्य कुप्यत्यन्यतमो मलः ।
कषाया मारुतं पित्तमूषरा मधुरा कफम् ॥ १ ॥
कोपयेन्मृद्रसादींश्च रौक्ष्याद्भुक्तं च रूक्षयेत् ।
पूरयत्यविपक्वैव स्रोतांसि निरुणद्ध्यपि ॥ २ ॥
इन्द्रियाणां बलं हत्वा तेजो वीर्यौजसी तथा ।
पाण्डुरोगं करोत्याशु बलवर्णाग्निनाशनम् ॥ ३ ॥

माती खाणाऱ्या मनुष्याचा वात, पित्त व कफ ह्यांपैकीं कोणता तरी एक दोष प्रकुपित होतो. ती माती तुरट असल्यास वात, खारी असल्यास पित्त, आणि मधुर असल्यास कफ प्रकुपित होतो. ती खाल्लेली माती आपल्या अंगच्या रूक्षपणामुळें रसादि धातूंना कोपविते आणि खाल्लेल्या अन्नालाही रूक्ष करिते. तिचें पचन न झाल्यामुळें स्रोतसांमध्यें शिरून त्यांचा ती रोध करिते; व इंद्रियें, तेज, वीर्य व ओज ह्यांना क्षीणत्व आणून बल, शरीराचा वर्ण व जठराग्नि ह्यांचा नाश करणारा असा पांडुरोग उत्पन्न करिते.

त्याचें विशेष लक्षण.

शूनाक्षिकूटगण्डभ्रूः शूनपन्नाभिमेहनः ।
क्रिमिकोष्ठोऽतिसार्येत मलं चासृक्कफान्वितम् ॥ १ ॥

डोळ्याच्या पापण्या, गाल, भुवया, पाय, बेंबी व शिस्न ह्यांना सूज, कोठ्यामध्यें जंत आणि रक्त व कफ यांनीं मिश्र असा अतिसार हीं विशेष लक्षणें त्यामध्यें होतात.

असाध्य लक्षण.

पाण्डुरोगश्चिरोत्पन्नः खरीभूतो न सिध्यति ।
कालप्रकर्षाच्छूनाङ्गो यो वा पीतानि पश्यति ॥ १ ॥
बद्धाल्पविट्सहरितं सकफं योऽतिसार्यते ।
दीनः श्वेतोऽतिदिग्धाङ्गश्छर्दिमूर्च्छातृषान्वितः ।
स नास्त्यसृक्क्षयाद्यस्तु पाण्डुः श्वेतत्वमाप्नुयात् ॥ २ ॥

फार दिवसाचा पांडुरोग फार दिवस झाल्यामुळें व सर्व धातु रूक्ष झाल्यामुळें साध्य होत नाहीं. तसेंच ज्याच्या सर्व अंगाला सूज आली आहे व ज्याला सर्व पदार्थ पिंवळे दिसतात तो; ज्याला घट्ट, थोडा, हिरवट रंगाचा व कफमिश्र असा मळ होतो तो; दीन; ज्याचें अंगाला पांढरा रंग सारविल्यासारखें दिसतें असा; ओकारी, मूर्च्छा व तहान ह्यांनीं पीडित असा जो पांडुरोगी तो; आणि ज्याचे अंगांतील रक्त क्षीण झाल्यामुळें जो पांढरा फटफटीत दिसतो तो, हे सर्व पांडुरोगी असाध्य समजावेत.

पाण्डुदन्तनखो यस्तु पाण्डुनेत्रश्च यो भवेत् ।
पाण्डुसंघातदर्शी च पाण्डुरोगी विनश्यति ॥ १ ॥

ज्याचे दांत व नखें पांढरीं दिसतात, ज्याचे डोळे पांढरे दिसतात व जो सर्व पदार्थ पांढरे पाहतो तो पांडुरोगी जगत नाहीं.

अन्तेषु शूनं परिहीनमध्यं म्लानं तथाऽन्तेषु च मध्यशूनम् ।
गुदेऽच शोफस्यथ मुष्कयोश्च शूनं प्रताम्यंतमसंज्ञकल्पम् ।
विवर्जयेत्पाण्डुकिनं यशोर्थी तथाऽतिसारज्वरपीडितं च ॥२॥

हात, पाय व डोकें ह्यांना सूज व मध्यभाग कृश झालेला, तसेंच मध्यशरीराला सूज असून हात, पाय व मस्तक हीं कृश झालेलीं, अशा प्रकारचा पांडुरोगी असाध्य जाणावा. गुद, शिस्न व वृषण ह्यांना सूज असलेला पांडुरोगी असाध्य समजावा. तसेंच बेशुद्ध होऊन मृतवत् झालेला पांडुरोगी आणि अतिसार व ज्वर ह्यांनीं पीडित असा पांडुरोगी असाध्य समजून यश इच्छिणाऱ्या वैद्यानें तो सोडून द्यावा.

कावीळ होण्याचें कारण.

पाण्डुरोगी च योऽत्यर्थं पित्तलानि निषेवते ।
तस्य पित्तमसृङ्मांसं दग्ध्वा रोगाय कल्पते ॥ १ ॥

जो पांडुरोगी पित्तकर पदार्थ अतिशय खातो त्याचें तें वाढलेलें पित्त रक्त व मांस ह्यांना दग्ध करून कावीळ उत्पन्न करितें.

काविळीचें लक्षण.

हारिद्रनेत्रः स भृशं हारिद्रत्वङ्नखाननः ।
रक्तपीतशकृन्मूत्रो भेकवर्णो हतेन्द्रियः ॥ १ ॥

दाहाविपाकदौर्बल्यसदनारुचिकर्शितः।
कामला बहुपित्तैषा कोष्ठशाखाश्रया मता ॥ २ ॥
कालान्तरात्खरीभूता कृच्छ्रा स्यात्कुम्भकामला।

ज्याला कावीळ होते त्याचे डोळे अतिशय पिंवळे होतात. त्वचा, नखें व तोंड हीं देखील पिंवळीं होतात. त्याचें मूत्र व मळ हीं तांबडीं किंवा पिंवळीं असतात. तो बेडकाप्रमाणें पिवळा दिसतो. त्याचीं इंद्रियें आपआपले विषय ग्रहण करण्यास असमर्थ होतात. अंगाचा दाह, अपचन, अशक्तपणा, ग्लानि व अरुचि ह्यांनीं तो पीडित होतो. कावीळ ही अत्यंत पित्तदोषयुक्त असते. तिचे कोष्टाश्रित व शाखाश्रित असे दोन प्रकार आहेत. कालांतरानें जीर्ण झालेली कावीळ कष्टसाध्य होऊन कोठ्याचा आश्रय करिते, म्हणून तिला कुंभ-(कोष्ठ) कामला म्हणतात.

कृष्णपीतशकृन्नेत्रो भृशं शूनश्च मानवः ॥ ३ ॥
सरक्ताक्षिमुखच्छर्दिविण्मूत्रो यश्च ताम्यति।
दाहारुचितृडानाहतन्द्रामोहसमन्वितः।
नष्टाग्निसंज्ञः क्षिप्रं हि कामलावान्विपद्यते ॥ ४ ॥

ज्याचा मळ व नेत्र काळसर व पिंवळट झाले आहेत, ज्यास पुष्कळ सूज आली आहे; ज्याचे डोळे, तोंड, वांति, मळ व मूत्र हे रक्ताप्रमाणें लाल झाले आहेत; जो बेशुद्ध होतो; ज्यास दाह, अरुचि, तहान, पोट फुगणें, तंद्रा व मोह ह्यांनीं पीडिलेलें आहे. व ज्याचा जठराग्नि नाहींसा झाला असून जो कोणास ओळखत नाहीं, तो काविळीचा रोगी लवकर नाश पावतो.

छर्द्यरोचकहृल्लासज्वरक्लमनिपीडितः।
नश्यति श्वासकासार्तो विड्भेदी कुम्भकामली ॥ ५ ॥

ओकारी, अरुचि, मळमळ, ताप आणि थकवा ह्यांनीं पीडिलेला आणि ज्याला श्वास, खोकला व अतिसार हे विकार झाले आहेत असा कुंभकामलेचा रोगी नाश पावतो.

पांडुरोगाच्याच अवस्थेंतील हलीमक.

यदा तु पाण्डोर्वर्णः स्याद्धरितश्यावपीतकः।
बलोत्साहक्षयस्तन्द्रा मन्दाग्नित्वं मृदुज्वरः।

स्त्रीष्वहर्षोऽङ्गमर्दश्च सादस्तृष्णारुचिर्भ्रमः ॥ १ ॥
हलीमकं तदा तस्य विद्यादनिलपित्ततः ।

जेव्हां पांडुरोगामध्यें रोग्याच्या शरीराचा रंग हिरवा, निळा किंवा पिंवळा होतो; बल व हुशारी हीं नाहींशीं होतात; डोळ्यांवर झांपड असते; अग्नि मंद असतो; किंचित् ज्वर असतो; कामेच्छा नसते; अंग मोडून येतें; दाह, तहान, अरुचि व भ्रम हे विकार असतात, तेव्हां त्याला हलीमक असें म्हणतात. हा वातपित्तापासून होतो.

पानकीचें लक्षण.

संतापो भिन्नवर्चस्त्वं बहिरन्तश्च पीतता ।
पाण्डुता नेत्रयोर्यस्य पानकीलक्षणं भवेत् ॥ २ ॥

संताप (अंगाचा दाह), मळ पातळ होणें, अंतर्बाह्य पिंवळटपणा आणि डोळ्याला पांढरेपणा हीं पानकीचीं लक्षणें आहेत.

पांडुरोगचिकित्सा.

साध्यं च पाण्डुामयिनं समीक्ष्य स्निग्धं घृतेनोर्ध्वमधश्च शुद्धम् ।
संपादयेत्क्षौद्रघृतप्रगाढैर्हरीतकीलोहरजःप्रयोगैः ॥ १ ॥
पिबेद् घृतं वा रजनीविपक्वं यत्त्रैफलं तैल्वककल्कयुक्तम् ।
विरेचनद्रव्यकृतं पिबेद्वा योगांश्च वैरेचनिकान्घृतेन ॥ २ ॥

पांडुरोगी साध्य आहे असें पाहून त्याला तूप पाजून स्निग्ध करावें. नंतर वमन व रेचक देऊन शुद्ध करावें. आणि ज्यामध्यें मध, तूप, हिरडेदळ व लोहभस्म आहे अशा औषधीप्रयोगाची योजना करावी. किंवा हळद घालून शिजविलेलें तूप प्यावें. अगर लोध्राचा कल्क घालून तयार केलेल्या त्रिफलाघृताची योजना करावी. किंवा विरेचक द्रव्यें घालून तयार केलेलें तूप पाजावें. किंवा विरेचनऔषधीयोग तुपाशीं द्यावे.

विधिः स्निग्धोऽत्र वातोत्थे तिक्तः शीतश्च पैत्तिके ।
श्लैष्मिके कटुरूक्षोष्णः कार्यो मिश्रस्तु मिश्रजे ॥ ३ ॥

वातजन्य पांडुरोगावर स्निग्ध उपचार करावेत; पित्तजन्य पांडुरोगावर कडू व शीत उपचार करावेत; कफजन्य पांडुरोगावर तिखट, उष्ण व रूक्ष असे उपचार करावेत, व मिश्रदोषजन्य पांडु-

रोगावर त्या त्या दोषाला अनुलक्षून मिश्र चिकित्सा करावी.

द्विपञ्चमूलीक्वथितं सविश्वं कफात्मके पाण्डुगदे पिबेत्तम् ।
ज्वरेऽतिसारे श्वयथौ ग्रहण्यां कासेऽरुचौ कण्ठहृदामयेषु ॥ ४

दशमुळें व सुंठ ह्यांनीं तयार केलेला काढा कफात्मक पांडुरोगावर प्यावा. तो ज्वर, अतिसार, सूज, संग्रहणी, खोकला, अरुचि कंठ व हृदयाचे रोग ह्यांजवरही द्यावा.

फलत्रिकामृतावासातिक्ताभूनिम्बनिम्बजः ।
क्वाथः क्षौद्रयुतो हन्यात्पाण्डुरोगं सकामलम् ॥ ५ ॥

हिरडा, बेहडा, आवळकाठी, गुळवेल, आडुळसा, कुटकी, काडेचिराईत व बाळंतलिंबाची साल ह्यांचा काढा मध घालून घ्यावा. तो काविळीसह पांडुरोगाचा नाश करितो.

पुनर्नवानिम्बपटोलशुण्ठीतिक्तामृतादार्व्यभयाकषायः ।
सर्वाङ्गशोफोदरपाण्डुरोगस्थौल्यप्रसेकोर्ध्वकफामयेषु ॥६॥

घेटूळीची मुळी (वसूची मुळी), बाळंतलिंबाची साल, कडू पडवळ, सुंठ, कुटकी, गुळवेल, दारुहळद व बाळहिरडे ह्यांचा काढा सर्व अंगाची सूज, उदर, पांडुरोग, स्थूळपणा, तोंडाला पाणी सुटणें, व उर्ध्वगत कफरोग ह्यांजवर द्यावा.

नवायसचूर्ण.

त्र्यूषणत्रिफलामुस्ताविडङ्गदहनाः समाः ।
नवायोरजसो भागास्तच्चूर्णं मधु सर्पिषा ।
भक्षयेत्पाण्डुहृद्रोगकुष्ठार्शःकामलापहम् ॥ १ ॥

सुंठ, मिरीं, पिंपळी, हिरडा, बेहडा, आवळकाठी, नागरमोथे, वावडिंग व चित्रकमूळ हीं औषधें समभाग आणि लोहभस्म नऊ भाग ह्यांचें चूर्ण तूप व मध ह्यांशीं घ्यावें. हें पांडुरोग, हृदयाचा विकार, कुष्ट, मूळव्याध व कावीळ ह्या रोगांचा नाश करितें.

लोहपात्रस्थितं क्षीरं सप्ताहं पथ्यभोजनः ।
पिबेत्पाण्ड्वामयी शोषी ग्रहणीदोषपीडितः ॥ १ ॥

पांडुरोग, क्षय व संग्रहणी हे विकार ज्याला आहेत त्यानें लोखंडाच्या भांड्यांत ठेविलेलें दूध सात दिवस प्यावें, व पथ्यकारक भोजन करावें.

दग्ध्वाऽक्षकाष्ठैर्मलमायसं तु गोमूत्रनिर्वापितसप्तवारम् ।
विचूर्ण्य लीढं मधुनाचिरेण तक्रेण वा पाण्डुगदं निहन्यात्॥२

लोखंडाचें कीट (मंडूर) बेहड्याच्या लाकडाच्या निखाऱ्यांत भाजून गोमूत्रामध्यें सात वेळ विझवावें, आणि चूर्ण करून मधाशीं अगर ताकाशीं द्यावें; तें पांडुरोगाचा नाश करितें.

अतिशुद्धमयोभस्म घृतक्षौद्रयुतं लिहेत् ।
पाण्डुरोगस्य नाशाय कामलानां च सर्वशः ॥ १ ॥

पांडुरोग व सर्व प्रकारच्या कामला ह्यांचा नाश होण्याकरितां अतिशय उत्तम प्रकारें शुद्ध केलेलें लोहभस्म तूप व मध ह्यांशीं घ्यावें.

नागरं लोहचूर्णं वा कृष्णां पथ्यामथाश्मजम् ।
गुग्गुलं वाऽथ मूत्रेण कफपाण्ड्वामयी पिबेत् ॥ २ ॥

ज्याला कफजन्य पांडुरोग झाला आहे त्यानें सुंठ व लोहभस्म किंवा पिंपळी, हिरडेदळ व शिलाजित अगर गोमूत्राशीं गुग्गूळ घ्यावा.

शिलाजतुक्षौद्रविडङ्गसर्पिर्लोहाभयापारदताप्यभक्षः ।
आपूर्यते दुर्बलदेहधातुस्त्रिपञ्चरात्रेण यथा शशाङ्कः ॥३॥

शिलाजित, मध, वावडिंगें, तूप, लोहभस्म, हिरडेदळ, रससिंदूर व सुवर्णमाक्षिक भस्म हीं औषधें योग्य प्रमाणांत घेऊन सेवन करावींत; म्हणजे जसा चंद्र पंधरा दिवसांमध्यें पूर्णतेस येतो, तसा दुर्बल मनुष्याचा देह व धातु हीं पंधरा दिवसांमध्यें पूर्ण अवस्थेप्रत येतात.

अयस्तिलत्र्यूषणकोलभागैः सर्वैः समं माक्षिकधातुचूर्णम् ।
तैर्मोदकः क्षौद्रयुतोऽनुतक्रः पाण्ड्वामये दूरगतेऽपि शस्तः ॥१॥

लोहभस्म, तीळ, सुंठ, मिरीं व पिंपळी हीं औषधें तोळा तोळा आणि सर्वांच्या बरोबरीनें सुवर्णमाक्षिक भस्म घेऊन सर्वांचा मधांत खल करून गोळ्या कराव्या. त्यांतील एक गोळी घेऊन वर ताक घ्यावें. ह्या फार दिवसांच्या पांडुरोगावर देखील प्रशस्त आहेत.

मंडूरवटक.

सुराब्ददार्वीकटुषट्कताप्यवेल्लं वरा चेति समांशचूर्णम् ।
मण्डूरभागद्वयमष्टमूत्रे पक्त्वा गवां तद्वटकाः सतक्राः ॥ १ ॥
कामलापाण्डुमेहार्शःशोथकुष्ठकफामयान् ।
ऊरुस्तम्भमजीर्णं च प्लीहानं नाशयन्ति च ॥ २ ॥

देवदार, नागरमोथे, दारुहळद, सुंठ, मिरीं, पिंपळी, चवक, चित्रक, पिंपळमूळ, सुवर्णमाक्षिक, वावडिंग, हिरडा, बेहडा व आवळकाठी, ह्या सर्वांचें चूर्ण समभाग आणि मंडूरभस्म दोन भाग ह्या सर्वांचा खल करून आठपट गोमूत्रामध्यें पचन करून गोळ्या कराव्या आणि त्या ताकाशीं घ्याव्या. त्या कावीळ, पांडुरोग, प्रमेह, मूळव्याध, सूज, कुष्ट, कफरोग, ऊरुस्तंभ, अजीर्ण व पांथरी ह्यांचा नाश करितात.

मंडूरवज्रवटक.

पञ्चकोलं समरिचं देवदारु फलत्रिकम् ।
विडङ्गमुस्तायुक्ताश्च भागास्त्रिपलसंमिताः ॥ १ ॥
यावन्त्येतानि चूर्णानि मण्डूरं त्रिगुणं[1] ततः ।
पक्त्वाऽष्टगुणिते मूत्रे तद्घनीभूतमुद्धरेत् ॥ २ ॥
ततोऽक्षमात्रान्वटकान्पिबेत्तक्रेण तक्रभुक् ।
पाण्डुरोगं जयेत्तद्वन्मन्दाग्नित्वमरोचकम् ॥ ३ ॥
मण्डूरवज्रवटको रोगानीकप्रभेदनः ।
अर्शांसि ग्रहणीं शोफमूरुस्तम्भं हलीमकम् ।
कृमीन्प्लीहानमुदरं गलरोगं च नाशयेत् ॥ ४ ॥

सुंठ, मिरीं, पिंपळी, पिंपळमूळ, चवक, चित्रक, देवदार, हिरडा, बेहडा, आवळकाठी, वावडिंग व नागरमोथे ह्या औषधांचें समभाग चूर्ण बारा तोळे आणि सर्व चूर्णाच्या तिप्पट[1] मंडूर घेऊन सर्वांच्या आठपट गोमूत्रामध्यें पचन करावा. घट्ट झाल्यावर एक एक तोळ्याच्या गोळ्या करून ताकाशीं घ्याव्या, व त्यांजवर ताकाशींच जेवण करावें. म्हणजे पांडुरोग, अरुचि व अग्निमांद्य ह्यांचा नाश होतो. हा मंडूरवज्रवटक रोगसमूहाचा नाश करतो. तसेंच मूळव्याध, संग्रहणी, सूज, ऊरुस्तंभ, हलीमक, कृमि, पानथरी, उदर व गलरोग ह्यांचा नाश करतो.

मंडूरलवण.

कृत्वाऽग्निवर्णं मलमायसं तु मूत्रे निषिञ्चेद्बहुशो गवां च ।
तत्रैव सिन्धूत्थसमं विपाच्यं निरुद्धधूमं च बिभीतकाग्नौ ॥१॥

---

१ 'त्रिगुणं' ह्या ऐवजीं 'द्विगुणं' असा पाठ पुष्कळ प्रतींत आहे. हा पाठ घेतल्यास मंडूर दुप्पट घ्यावा, असें होतें.

तक्रेण पीतं मधुनाऽथवापि बिभीतकाख्यं लवणं प्रयुक्तम् ।
पाण्ड्वामयिभ्यो हितमेतदस्मात्पाण्ड्वामयघ्नं नहि किंचिदन्यत् ॥२

लोहाचें कीट अग्नीवर तापवून गोमूत्रामध्यें पुष्कळ वेळ विझवावें. नंतर त्याच्यासमान सैंधव घेऊन दोहोंचा खल करून शरावसंपुटांत घालून मातकापड करून बेहड्याच्या लांकडाचें पूट देऊन पचन करावें. ह्याला बिभीतकाख्य लवण म्हणतात. तें ताकाशीं अथवा मधाशीं द्यावें. हें पांडुरोगावर प्रशस्त आहे. ह्यासारखें दुसरें पांडुरोगनाशक औषध नाहीं.

मधुमंडूर.

गृहीत्वा भिषक्प्रस्थमण्डूरभागं शृते त्रैफले मर्दयित्वा च यामम् ।
पुटे पाचयेद्यामयुग्मं कृशानौ पुटानीह देयानि चन्द्राक्षिवारम् १
तथा धेनुमूत्रे कुमारीरसे च विधेयश्च पञ्चामृते योगराजः ।
भवेत्सिन्धुनागैः पुटैः सिद्धदोऽयमचिन्त्यप्रभावश्च मण्डूर एषः २
मधुमण्डुर एष कणामधुना चिरपाण्डुगदं ननु हेममितः ।
जनको रुधिरस्य निहन्ति परं विविधार्तिहरस्त्वनुपानबलैः ॥३

लोहाचें कीट चौसष्ट तोळे घेऊन त्रिफळयाच्या काढ्यांत प्रहरभर खलावें. नंतर दोन प्रहरपर्यंत अग्नीमध्यें पचन करावें. ह्याप्रमाणें एकवीस पुटें द्यावीं, त्याचप्रमाणें गोमूत्र, कुमारीचा रस व पंचामृत (सुंठ, मुसळी, गुळवेल, शतावरी व गोखरूं किंवा मुंडी) ह्यांच्या रसाच्या व काढ्याच्या एकवीस एकवीस भावना द्याव्या. म्हणजे अशा ह्या चौऱ्याऐशीं पुटांनीं हा अचिंत्य प्रभाव दाखविणारा व सिद्धिदायक असा योगराजमंडूर तयार होतो. हा मधुमंडूर फार दिवसांच्या पांडुरोगावर मध व पिंपळी यांशीं सहा गुंजांपर्यंत द्यावा. हा रक्त उत्पन्न करतो आणि अनुपान योजून दिला असतां अनेक प्रकारचे रोग दूर करतो.

मंडूरारिष्ट.

मण्डूरस्य तु शुद्धस्य तुलार्धं परिकीर्तितम् ।
तद्वल्लोहस्य पत्राणि तिलोत्सेधप्रमाणतः ॥ १ ॥
पुराणगुडपञ्चाशत्कोलप्रस्थत्रयं तथा ।
निकुम्भचित्रकाभ्यां च पले द्वे द्वे सुचूर्णिते ॥ २ ॥
पिप्पलीनां विडंगानां कुडवं कुडवं पृथक् ।

त्रींश्चापि त्रिफलाप्रस्थाञ्जलद्रोणे समावपेत् ॥ ३ ॥
अर्धमासस्थितो धान्ये पेयोऽरिष्टः प्रमाणतः ।
दोषानुभयतः स्राव्य पाण्डुरोगं नियच्छति ॥ ४ ॥
कृमीनर्शांसि कुष्ठं च कासश्वासकफामयान् ।
एषोऽरिष्टस्तु मण्डूरः सर्वपाण्ड्वामयापहः ॥ ५ ॥

मंडूरभस्म दोनशें तोळे, शुद्ध लोहाचे (पोलादाचे) तिळाएवढे पत्रे दोनशें तोळे, जुना गूळ तीनं प्रस्थ आणि पन्नास कोल म्हणजे दोनशें सतरा तोळे, दांतीमूळ व चित्रकमूळ ह्यांचें चूर्ण आठ आठ तोळे, पिंपळी व वावडिंगें ह्यांचें चूर्ण सोळा सोळा तोळे, त्रिफळा एकशें व्याणव तोळे (हिरडे, बेहडे, आवळकाठी चौसष्ट चौसष्ट तोळे), हीं सर्व औंषधें दहाशें चोवीस तोळे पाण्यांत घालावीं. आणि तें सर्व पंधरा दिवसपर्यंत धान्याच्या राशींत पुरून ठेवावें. नंतर काढून वमन-विरेचनानें देहशुद्धि करून प्रमाणांत द्यावें, म्हणजे हें मंडूरारिष्ट पांडुरोगाचा नाश करितें. तसेंच कृमि, मूळव्याध, कुष्ठ, कास, श्वास, कफरोग व सर्व प्रकारचे पांडुरोग ह्यांचा नाश करितें.

रेचनं कामलार्तस्य स्निग्धस्याऽऽदौ प्रयोजयेत् ।
ततः प्रशमनी कार्या क्रिया वैद्येन जानता ॥ १ ॥

कावीळ झालेल्या रोग्याला प्रथम तूप पाजून स्निग्ध करून रेचक द्यावें. नंतर जाणत्या वैद्यानें शमनकारक उपचार करावे.

पाण्डुरोगक्रियां सद्यो योजयेच्च हलीमके ।
मलानुसरणं दृष्ट्वा साऽपि कार्या भिषग्वरैः ॥ २ ॥

हलीमकावर ताबडतोब पांडुरोगावरील उपचार करावेत. त्यांत वातादिकांचा संबंध असेल तर त्याचेही उपचार करावेत. (वातादिपांडुरोगाची चिकित्सा करावी.)

हरिद्रात्रिफलानिम्बबलामधुकसाधितम् ।
सक्षीरं माहिषं सर्पिः कामलापहमुत्तमम् ॥ ३ ॥

हळद, हिरडा, बेहडा, आवळकाठी, बाळंतलिंबाची साल, चिकणामूळ व ज्येष्टमध ह्यांचा कल्क व दूध ह्यांनीं तयार केलेलें म्हशीचें तूप उत्तम कामलानाशक आहे.

त्रिफलाया गुडूच्या वा दार्व्या निम्बस्य वा रसम् ।
प्रातर्मधुयुतं वैद्यः कामलार्ताय योजयेत् ॥ ४ ॥

वैद्यानें काविळीच्या मनुष्याला त्रिफळ्याचा काढा, गुळवेलीचा रस, दारुहळदीचा काढा अथवा कडुलिंबाच्या पाल्याचा रस ह्यां-पैकीं कांहीं तरी एक औषध प्रातःकाळीं मध घालून द्यावें.

दार्वीसत्रिफलाव्योषविडंगानयसो रजः ।
मधुसर्पिर्युतं लिह्यात्कामलापाण्डुरोगवान् ॥ ५ ॥

दारुहळद, हिरडा, बेहडा, आवळकाठी, सुंठ, मिरीं, पिंपळी, वावडिंग व लोहभस्म ह्यांचें चूर्ण कावीळ किंवा पांडुरोग झालेल्या मनुष्यानें तूप व मध घालून घ्यावें.

अयोरजो व्योषविडङ्गचूर्णं लिह्याद्धरिद्रां त्रिफलान्वितां वा ।
सशर्करां कामलिनां त्रिभण्डी हिता गवाक्षी सगुडा च शुण्ठी ६

कावीळ झालेल्या मनुष्यानें सुंठ, मिरीं व पिंपळी आणि वावडिंग ह्यांच्या चूर्णाशीं लोहभस्म घ्यावें, अगर हळदीचें चूर्ण त्रिफळ्याशीं मिश्र करून घ्यावें. किंवा पांढऱ्या तेडाचें चूर्ण साखरेशीं घ्यावें, अथवा गुळाबरोबर कवंडळ आणि सुंठ ह्यांचें चूर्ण घ्यावें. तें हितकारक आहे.

धात्रीलोहरजोव्योषनिशाक्षौद्रं सशर्करम् ।
लीढं निवारयत्याशु कामलामुद्धतामपि ॥ ७ ॥

आवळकाठी, लोहभस्म, सुंठ, मिरीं, पिंपळी व हळद ह्यांचें चूर्ण साखर व मध यांशीं घ्यावें. हें फार वाढलेल्या काविळीचा देखील त्वरित नाश करितें.

लोहचूर्णं निशायुग्मं त्रिफलां कटुरोहिणीम् ।
प्रलिह्य मधुसर्पिर्भ्यां कामलार्तः सुखी भवेत् ॥ ८ ॥

लोहभस्म, हळद, दारुहळद, हिरडा, बेहडा, आवळकाठी व कुटकी ह्यांचें चूर्ण कावीळ झालेल्या रोग्यानें तूप व मध यांशीं घ्यावें, म्हणजे त्याला सुख होतें.

व्योषाग्निवेल्लत्रिफलामुस्तैस्तुल्यमयोरजः ।
चूर्णितं तक्रमध्वाज्यकोष्णतोयोपयोजितम् ॥ ९ ॥

सुंठ, मिरीं, पिंपळी, चित्रकमूळ, वावडिंग, हिरडा, बेहडा,

आवळकाठी व नागरमोथे ह्यांच्या समभाग चूर्णाबरोबर लोहभस्म घेऊन सर्व एकत्र करून तें ताक, तूप व मध किंवा ऊन पाणी ह्यांशीं द्यावें. तें कावीळ, पांडुरोग, हृद्रोग, कुष्ठ, मूळव्याध व प्रमेह ह्यांचा नाश करितें.

कामलापाण्डुहृद्रोगकुष्ठार्शोमेहनाशनम् ।
तुल्यं वाऽयोरजः पथ्यां हरिद्रां क्षौद्रसर्पिषा ॥ १० ॥

अथवा, कावीळ पांडुरोग, हृद्रोग, कुष्ठ, मेह व मूळव्याध झालेल्या मनुष्यानें लोहभस्म, हिरडेदळ व हळद ह्यांचें समभाग चूर्ण तूपमधाशीं घ्यावें.

चूर्णितां कामली लिह्याद्गुडक्षौद्रेण वाऽभयाम् ।
एलाजीरकभूधात्रीसितागव्येन भावयेत् ॥ ११ ॥
प्रातः संसेवनं कुर्यात्कामलानाशनं परम् ।
निशाचूर्णं कर्षमितं दध्नः पलमितं तथा ॥ १२ ॥
प्रातःसंसेवनं कुर्यात्कामलानाशनं परम् ।
अर्कमूलं हरेन्नस्यात्कामलां तण्डुलोदकैः ॥ १३ ॥

अथवा, गूळ व मध ह्यांजबरोबर हिरड्याचें चूर्ण घ्यावें. वेलदोडे, जिरें व भुईआवळी ह्यांचें चूर्ण दूध व खडीसाखरेशीं मिश्र करून प्रातःकाळीं घ्यावें. तें उत्तम प्रकारचें कामलानाशक आहे. हळदीचें चूर्ण एक तोळा व दहीं चार तोळे एकत्र करून घ्यावें. तें कावीळनाश करण्याविषयीं फार उत्तम आहे. रुईचें मूळ तांदुळाच्या धुवणांत उगाळून नस्य केलें असतां कावीळ दूर होते.

अञ्जनं कामलार्तस्य द्रोणपुष्पीरसस्य तु ।
निशागैरिकधात्रीणां चूर्णं चोपरि लेपयेत् ॥ १४ ॥

कावीळ झालेल्या रोग्याच्या डोळ्यांत द्रोणपुष्पीच्या रसाचें अंजन करावें; व हळद, सोनकाव व आवळकाठी ह्यांच्या चूर्णाचा अंगास लेप करावा.

गोदुग्धेन विशालाया मुनिसंख्यादलानि तु ।
जीरकेण युतं पेष्यं रसमेकं पलं पिबेत् ॥ १५ ॥
अथवा तज्जटाद्रावं कर्षार्धं दुग्धमिश्रितम् ।
पाययेत्तु प्रतिदिनमेवमेतद्दिनत्रयम् ॥ १६ ॥
घृतदुग्धौदनं पथ्यं कुर्याद्वै लवणं विना ।
कामलां नाशयत्याशु वायुरभ्रं हरेद्यथा ॥ १७ ॥

कडू इंद्रावणीचीं पानें सात व जिरें हीं दोन्ही औषधें गाईच्या दुधांत वाटून त्यांचा चार तोळे रस काढून प्यावा. किंवा कडू-इंद्रायणीचे मूळाचा रस अर्धा तोळा काढून तो दुधांत मिश्र करून घ्यावा. ह्याप्रमाणें तीन दिवस करावें. तूप, दूध व भात खावा. मीठ खाऊं नये. म्हणजे वारा जसा ढग नाहींसे करितो तसा काविळीचा त्वरित नाश होतो.

गुडूचीघृत.

गुडूचीस्वरसे सिद्धं सक्षीरं माहिषं घृतम् ।
चतुर्गुणेन पयसा पाययेत्तद्धलीमके ॥ १ ॥

गुळवेलीचा रस व दूध ह्यांमध्यें म्हशीचें तूप सिद्ध करावें आणि तें चौपट दुधांतून हलीमक रोगावर द्यावें.

व्योषं बिल्वं द्विरजनी त्रिफला द्विः पुनर्नवम् ।
मुस्ता अयोरजः पाठा विडङ्गं देवदारु च ॥ २ ॥
वृश्चिकाली च भार्ङ्गी च सक्षीरैस्तैर्घृतं शुभम् ।
सर्वान्प्रशमयत्याशु विकारान्मृत्तिकाकृतान् ॥ ३ ॥

सुंठ, मिरीं, पिंपळी, बेलफळ, हळद, दारुहळद, हिरडा, बेहडा, आवळकाठी, पांढरा व तांबडा पुनर्नवा, नागरमोथे, लोहभस्म, पहाडमूळ, वावडिंगें, देवदार, लघु मेढाशिंगी आणि भारंगमूळ, ह्यांचा कल्क व दूध ह्यांच्यायोगानें तूप सिद्ध करावें. तें माती खाण्यापासून होणारे सर्व विकार दूर करितें.

आमलक्यवलेह.

रसमामलकानां तु संशुद्धं यंत्रपीडितम् ।
द्रोणं पचेच्च मृद्वग्नौ तत्र चेमानि दापयेत् ॥ १ ॥
चूर्णितं पिप्पलीप्रस्थं मधुकं द्विपलं तथा ।
प्रस्थं गोस्तनिकायाश्च द्राक्षायाः किल पेषितम् ॥ २ ॥
शृंगबेरपले द्वे तु तुगाक्षीर्याः पलद्वयम् ।
तुलार्धं शर्करायाश्च घनीभूतं समुद्धरेत् ॥ ३ ॥
मधुप्रस्थसमायुक्तं लेहयेत्पलसंमितम् ।
हलीमकं कामलां च पाण्डुत्वं चापकर्षति ॥ ४ ॥

चरकांत दाबून काढलेला आवळ्याचा शुद्ध (स्वच्छ) रस दहाशें चोवीस तोळे घेऊन तो शिजवावा. आणि त्यांत पिंपळीचें

चूर्ण चौसष्ट तोळे, ज्येष्टमध आठ तोळे, गोस्तनी द्राक्षें (मनुका) बिया काढून वाटून तीं चौसष्ट तोळे, सुंठ आठ तोळे, वंशलोचन आठ तोळे, साखर दोनशें तोळे ह्या सर्व जिनसांचें चूर्ण त्या रसांत घालून शिजून दाट झाल्यावर खालीं उतरून निवाल्यावर त्यांत चौसष्ट तोळे मध घालून तो घेत जावा. हा आमलक्यवलेह हलीमक, कावीळ व पांडुरोग ह्यांचा नाश करितो.

त्रिफलायास्त्रयो भागास्त्रयस्त्रिकटुकस्य च ।
भागश्चित्रकमूलस्य विडंगानां तथैव च ॥ १ ॥
पञ्चाश्मजतुनो भागास्तथा रूप्यमलस्य च ।
माक्षिकस्य च शुद्धस्य लोहस्य रजसस्तथा ॥२॥
अष्टौ भागाः सितायास्तु तत्सर्वं मधुसंयुतम् ।
श्लक्ष्णचूर्णं सुसंस्थाप्यमायसे भाजने शुभे ॥ ३ ॥
उदुम्बरसमां मात्रां ततः खादेद्यथाग्निना ।
दिने दिने प्रयोक्तव्यं जीर्णे भोज्यं यथेप्सितम् ॥ ४ ॥
वर्जयित्वा कुलत्थांस्तु काकमाचीकपोतकान् ।
पाण्डुरोगं विषं कासं यक्ष्माणं विषमज्वरम् ॥ ५ ॥
कुष्ठान्यजरकं मेहं श्वासं शोफमरोचकम् ।
विशेषाद्धन्त्यपस्मारं कामलां गुदजानि च ॥ ६ ॥

हिरडा, बेहडा, आवळकाठी, सुंठ, मिरीं, पिंपळी, चित्रकमूळ, वावडिंग, हीं औषधें एक एक भाग; शिलाजित पांच भाग, रुप्याचें कीट पांच भाग, सुवर्णमाक्षिक पांच भाग, लोहभस्म पांच भाग व खडीसाखर आठ भाग, ह्या सर्वांचें वस्त्रगाळ चूर्ण करून मधांत कालवून लोहपात्रांत घालून ठेवावें; आणि रोज एक तोळा प्रमाणानें द्यावें. आणि तें औषध जिरल्यावर यथेच्छ भोजन करावें. त्यांत हुलगे, कांगोणी व कपोत (होला) पक्ष्याचें मांस हे पदार्थ वर्ज करावे. हा त्रिफलादि अवलेह पांडुरोग, विष, खोकला, क्षय, विषमज्वर, कुष्ठ, नूतन प्रमेह, श्वास, सूज, अरुचि, विशेषतः अपस्मार, कावीळ व मूळव्याध ह्यांचा नाश करितो.

हंसमंडूर.

मण्डूरं चूर्णयेच्छ्लक्ष्णं गोमूत्रेऽष्टगुणे पचेत् ।
पञ्चकोलं देवदारु मुस्ता व्योषं फलत्रयम् ॥ १ ॥

विडंगं स्यात्प्रतिपलं पाकान्ते चूर्णितं क्षिपेत् ।
भक्षयेत्कर्षमात्रं च तक्रे तक्रं च भोजने ॥ २ ॥
पाण्डुं शोफं हलीमं च ऊरुस्तम्भं च कामलाम् ।
अर्शांसि हन्ति नो चित्रं हंसमण्डूरको ह्ययम् ॥ ३ ॥

मंडूराचें बारीक चूर्ण करून आठपट गोमूत्रामध्यें पचन करावें. नंतर सुंठ, मिरीं, पिंपळी, चवक, चित्रक, देवदार, नागरमोथे, सुंठ, मिरीं, पिंपळी, हिरडा, बेहडा, आवळकाठी व वावडिंग प्रत्येक चार चार तोळे, ह्या सर्वांचें चूर्ण करून वरील मंडूर व गोमूत्र चांगलें शिजल्यावर त्यांत टाकावें व एक तोळा प्रमाणें ताकाशीं भक्षण करावें. वर ताक प्यावें. म्हणजे पांडुरोग, सूज, हलीमक, ऊरुस्तंभ, कामला व मूळव्याध ह्यांचा तो नाश करतो. ह्यांत आश्चर्य कसलें ? ह्याला हंसमंडूर म्हणतात.

मदेभसिंहसूत रस.

रसगन्धवराटताम्रशङ्खं विषवंगाभ्रमकान्ततीक्ष्णमुण्डम् ।
अहिहिंगुलटङ्कणं समांशं सकलैः स्यात्त्रिगुणं पुराणकिट्टम् ॥१॥
पशुमूत्रविशोधितं सुभृष्टा त्रिफलाभृंगरसाऽऽर्द्रकोत्थनीरैः ।
सुविशोष्य वरामृतालिवासास्वरसैरष्टगुणैः पुनर्नवोत्थैः ॥ २ ॥
पृथगग्निकृतं घनं विपाच्य गुलिका गुञ्जमिता निजानुपानैः ।
ज्वरपाण्डुतृषास्रपैत्यगुल्मक्षयकासस्वरमाग्निसादमूर्छाम् ॥ ३ ॥
पवनादिषु दुस्तराष्टरोगान्सकलं पित्तहरं मदावृतं च ।
बहुना किमसौ यथार्थनामा सकलव्याधिहरो मदेभसिंहः ॥४॥

पारा, गंधक, कवडीभस्म, ताम्रभस्म, शंखभस्म, बचनाग, वंगभस्म, अभ्रकभस्म, कांतभस्म, तिख्याचें भस्म, मुंडलोहाचें भस्म, शिश्याचें भस्म, शुद्ध हिंगूळ व टांखणखार हीं औषधें समभाग व ह्या सर्वांच्या तिप्पट जुना मंडूर घेऊन सर्वांचा खल करून गोमूत्रांत कालवून भाजून काढावें. नंतर त्रिफळ्याचा काढा, माक्याचा रस, आल्याचा रस ह्या प्रत्येकांत खल करून वाळवावा. नंतर त्रिफळ्याचा काढा, गुळवेलीचा रस, माक्याचा रस, अडुळशाचा रस व पांढऱ्या वसूचा रस, हा प्रत्येक रस सर्व औषधांच्या आठपट घेऊन प्रत्येक रसांत वेगवेगळें पचन करावें; व घट्ट झाल्यावर गुंजेगुंजेच्या गोळ्या करून अनुपान योजून द्याव्यात. म्हणजे ज्वर,

पांडुरोग, तहान, रक्तपित्त, गुल्म, क्षय, खोकला, स्वरभेद, अग्नि-मांद्य, मूर्च्छा, वातविकार, आठ प्रकारचे दुस्तररोग, सर्व पित्तविकार, उन्माद किंवा मदात्यय, ह्यांचा नाश करतो. फार काय सांगावें? हा सर्व रोगनाशक मदेभसिंहरस यथार्थ नांवाचा आहे.

त्रैलोक्यनाथ रस.

पलानि चत्वारि रसस्य पञ्च गन्धस्य सत्त्वस्य गुडूचिकायाः।
व्योषस्य चूर्णस्य च तालमूल्याः सशाल्मलस्येह पलत्रयं स्यात् ॥ १
पृथक्पृथक्षड् गगनस्य चाष्टौ लोहस्य सर्वं त्रिफलाजलेन ।
घृष्टं चतुष्षष्टिदिनं तदर्धाः स्युर्भावना मार्कवजद्रवस्य ॥ २ ॥
शिग्रूत्थनीरेण च षोडशाष्टौ तथा नलोत्थाद् गृहकन्यकायाः ।
आर्द्रद्रवस्येति रसोऽयमुक्तः पाण्डुक्षयश्वासगदादिहर्ता ॥
क्षौद्रेण वा शर्करया घृतेन कर्षार्धमेतस्य भजेत्प्रयत्नात् ॥ ३ ॥

पारा सोळा तोळे, गंधक वीस तोळे; गुळवेलीचें सत्व, सुंठ, मिरीं, पिंपळी, मुसळी व शेवरीचा डिंक हीं प्रत्येक बारा बारा तोळे; अभ्रकभस्म चोवीस तोळे आणि लोहभस्म बत्तीस तोळे घेऊन सर्वांचा त्रिफळ्याच्या काढ्यांत चौसष्ट दिवस खल करावा. नंतर माक्याच्या रसांत बत्तीस दिवस खल करावा; शेवग्याच्या रसांत सोळा दिवस व चित्रकाच्या काढ्यांत आठ दिवस खल करून कोरफडीचा रस व आल्याचा रस ह्यांच्याही भावना आठ आठ दिवस द्याव्यात. म्हणजे हा त्रैलोक्यनाथ रस तयार झाला. हा पांडुरोग, क्षय, श्वास, इत्यादि रोगांचा नाश करतो. हा मधाशीं अथवा तूपसाखरेशीं सहा मासेपर्यंत द्यावा.

पथ्यापथ्य.

यवगोधूमशाल्यन्नं रसैर्जांगलजैः शुभैः ।
मुद्गाढकीमसूराद्यैः पाण्डौ भोजनमिष्यते ॥ १ ॥

सातू, गहू व साळी ह्यांचें अन्न जांगल प्राण्याच्या मांसाच्या रसाबरोबर किंवा मूग, तुरी, मसुरा ह्यांच्या कढणाबरोबर खावें. हें पांडुरोगावर प्रशस्त आहे.

वह्निमातपमायासमन्नपानं च पित्तलम् ।
मैथुनं क्रोधमध्वानं पाण्डुरोगी सदा त्यजेत् ॥ २ ॥

विडंगं स्यात्प्रतिपलं पाकान्ते चूर्णितं क्षिपेत् ।
भक्षयेत्कर्षमात्रं च तक्रे तक्रं च भोजने ॥ २ ॥
पाण्डुं शोफं हलीमं च ऊरुस्तम्भं च कामलाम् ।
अर्शांसि हन्ति नो चित्रं हंसमण्डूरको ह्ययम् ॥ ३ ॥

मंडूराचें बारीक चूर्ण करून आठपट गोमूत्रामध्यें पचन करावें. नंतर सुंठ, मिरीं, पिंपळी, चवक, चित्रक, देवदार, नागरमोथे, सुंठ, मिरीं, पिंपळी, हिरडा, बेहडा, आवळकाठी व वावडिंग प्रत्येक चार चार तोळे, ह्या सर्वांचें चूर्ण करून वरील मंडूर व गोमूत्र चांगलें शिजल्यावर त्यांत टाकावें व एक तोळा प्रमाणें ताकाशीं भक्षण करावें. वर ताक प्यावें. म्हणजे पांडुरोग, सूज, हलीमक, ऊरुस्तंभ, कामला व मूळव्याध ह्यांचा तो नाश करतो. ह्यांत आश्चर्य कसलें ? ह्याला हंसमंडूर म्हणतात.

मदेभसिंहसूत रस.

रसगन्धवराटताम्रशङ्खं विषवंगाभ्रमकान्ततीक्ष्णमुण्डम् ।
अहिहिंगुलटङ्कणं समांशं सकलैः स्यात्त्रिगुणं पुराणकिट्टम् ॥१॥
पशुमूत्रविशोधितं सुभृष्टं त्रिफलाभृंगरसाऽऽर्द्रकोत्थनीरैः ।
सुविशोष्य वरामृतालिवासास्वरसैरष्टगुणैः पुनर्नवोत्थैः ॥ २ ॥
पृथगग्निकृतं घनं विपाच्य गुलिका गुञ्जमिता निजानुपानैः ।
ज्वरपाण्डुतृषास्रपैत्यगुल्मक्षयकासस्वरमग्निसादमूर्छाम् ॥ ३ ॥
पवनादिषु दुस्तराष्टरोगान्सकलं पित्तहरं मदावृतं च ।
बहुना किमसौ यथार्थनामा सकलव्याधिहरो मदेभसिंहः ॥४॥

पारा, गंधक, कवडीभस्म, ताम्रभस्म, शंखभस्म, बचनाग, वंगभस्म, अभ्रकभस्म, कांतभस्म, तिख्याचें भस्म, मुंडलोहाचें भस्म, शिश्याचें भस्म, शुद्ध हिंगूळ व टांकणखार हीं औषधें समभाग व ह्या सर्वांच्या तिप्पट जुना मंडूर घेऊन सर्वांचा खल करून गोमूत्रांत कालवून भाजून काढावें. नंतर त्रिफळ्याचा काढा, माक्याचा रस, आल्याचा रस ह्या प्रत्येकांत खल करून वाळवावा. नंतर त्रिफळ्याचा काढा, गुळवेलीचा रस, माक्याचा रस, अडुळशाचा रस व पांढऱ्या वसूचा रस, हा प्रत्येक रस सर्व औषधांच्या आठपट घेऊन प्रत्येक रसांत वेगवेगळें पचन करावें; व घट्ट झाल्यावर गुंजेगुंजेच्या गोळ्या करून अनुपान योजून द्याव्यात. म्हणजे ज्वर,

पांडुरोग, तहान, रक्तपित्त, गुल्म, क्षय, खोकला, स्वरभेद, अग्निमांद्य, मूर्च्छा, वातविकार, आठ प्रकारचे दुस्तररोग, सर्व पित्तविकार, उन्माद किंवा मदात्यय, ह्यांचा नाश करतो. फार काय सांगावें? हा सर्व रोगनाशक मदेभसिंहरस यथार्थ नांवाचा आहे.

त्रैलोक्यनाथ रस.

पलानि चत्वारि रसस्य पञ्च गन्धस्य सत्त्वस्य गुडूचिकायाः।
व्योषस्य चूर्णस्य च तालमूल्याः सशाल्मलस्येह पलत्रयं स्यात्॥ १
पृथक्पृथक्षड् गगनस्य चाष्टौ लोहस्य सर्वं त्रिफलाजलेन।
घृष्टं चतुष्षष्टिदिनं तदर्धाः स्युर्भावना मार्कवजद्रवस्य ॥ २ ॥
शिग्रूत्थनीरेण च षोडशाष्टौ तथा नलोत्थाद् गृहकन्यकायाः।
आर्द्रद्रवस्येति रसोऽयमुक्तः पाण्डुक्षयश्वासगदादिहर्ता ॥
क्षौद्रेण वा शर्करया घृतेन कर्षार्धमेतस्य भजेत्प्रयत्नात् ॥ ३ ॥

पारा सोळा तोळे, गंधक वीस तोळे; गुळवेलीचें सत्व, सुंठ, मिरीं, पिंपळी, मुसळी व शेवरीचा डिंक हीं प्रत्येक बारा बारा तोळे; अभ्रकभस्म चोवीस तोळे आणि लोहभस्म बत्तीस तोळे घेऊन सर्वांचा त्रिफळ्याच्या काढ्यांत चौसष्ट दिवस खल करावा. नंतर माक्याच्या रसांत बत्तीस दिवस खल करावा; शेवग्याच्या रसांत सोळा दिवस व चित्रकाच्या काढ्यांत आठ दिवस खल करून कोरफडीचा रस व आल्याचा रस ह्यांच्याही भावना आठ आठ दिवस द्याव्यात. म्हणजे हा त्रैलोक्यनाथ रस तयार झाला. हा पांडुरोग, क्षय, श्वास, इत्यादि रोगांचा नाश करतो. हा मधाशीं अथवा तूपसाखरेशीं सहा मासेपर्यंत द्यावा.

पथ्यापथ्य.

यवगोधूमशाल्यन्नं रसैर्जांगलजैः शुभैः।
मुद्गाढकीमसूराद्यैः पाण्डौ भोजनमिष्यते ॥ १ ॥

सातू, गहू व साळी ह्यांचें अन्न जांगल प्राण्याच्या मांसाच्या रसाबरोबर किंवा मूग, तुरी, मसुरा ह्यांच्या कढणाबरोबर खावें. हें पांडुरोगावर प्रशस्त आहे.

वह्निमातपमायासमन्नपानं च पित्तलम्।
मैथुनं क्रोधमध्वानं पाण्डुरोगी सदा त्यजेत् ॥ २ ॥

अग्नीचा शेक, ऊन, श्रम, पित्तकारक अन्नपान, मैथुन, राग, व मार्ग चालणें हें पांडुरोग्यानें नेहमीं वर्ज करावें.

रक्तपित्तनिदान.

घर्मव्यायामशोकाध्वव्यवायैरतिसेवितैः ।
तीक्ष्णोष्णक्षारलवणैरम्लैः कटुभिरेव च ॥ १ ॥
कोद्रवोद्दालकैश्चान्नैस्तद्युक्तैरतिसेवितैः ।
पित्तं विदग्धं स्वगुणैर्विदहत्याशु शोणितम् ॥ २ ॥
ततः प्रवर्तते रक्तमूर्ध्वं चाधो द्विधाऽपि वा ।
आमाशयाद् व्रजेदूर्ध्वमधः पक्वाशयाद् व्रजेत् ॥ ३ ॥
विदग्धयोर्द्वयोश्चापि द्विधाभागं प्रवर्तते ।
ऊर्ध्वं नासाक्षिकर्णास्यैर्मेढ्रयोनिगुदैरधः ॥ ४ ॥
कुपितं रोमकूपैस्तु समस्तैस्तत्प्रवर्तते ।
केचिच्च यकृतः प्लीह्नः प्रवदन्त्यसृजो गतिम् ॥ ५ ॥

ऊन घेणें, व्यायाम, शोक, मार्गक्रमण व मैथुन ह्यांचें अतिसेवन करणें; तीक्ष्ण, उष्ण, क्षार, मीठ, आंबट पदार्थ, तिखट पदार्थ, हारीक आणि रानहारीक हीं धान्यें ज्यांत आहेत असें अन्न अतिशय सेवन करणें, ह्या योगानें वाढलेलें पित्त आपस्य तक्ष्णादि गुणांनीं रक्ताला दूषित करितें व त्यामुळें तें रक्त ऊर्ध्वमार्गानें, अधोमार्गानें अथवा दोन्हीही मार्गांनीं बाहेर पडतें. ऊर्ध्व मार्गानें बाहेर पडणारें रक्तपित्त आमाशयांतून वर जातें व अधोमार्गानें पडणारें रक्तपित्त पक्वाशयापासून निघतें; आणि दोन्ही ठिकाणीं प्रकुपित्त झालेलें रक्तपित्त दोन्हीही मार्गांनीं बाहेर पडतें. ऊर्ध्वगामी रक्तपित्त नाक, तोंड, कान, डोळे व मुख ह्यांतून बाहेर येतें. आणि अधोगामी, रक्तपित्त, शिस्न, योनी व गुद ह्या मार्गांनीं बाहेर पडतें. तें फारच प्रकुपित झालें तर सर्व रोमरंध्रांतून निघूं लागतें. कितीएकांच्या मतें हें रक्त यकृत व प्लीहा ह्यांमधून निघतें.

रक्तपित्ताचें पूर्वरूप.

सदनं शीतकामित्वं कण्ठधूमायनं वमिः ।
लोहगन्धिश्च निःश्वासो भवत्यस्मिन्भविष्यति ॥ ६ ॥

गळाठा, थंड पदार्थांची इच्छा, घशांतून धूर निघाल्यासारखें

वाटणें, ओकारी व श्वासोच्छ्वासाला रक्तासारखा वास येणें हीं लक्षणें रक्तपित्त होण्यापूर्वीं होतात.

कफजन्य रक्तपित्त.

सान्द्रं सपाण्डु सस्नेहं पिच्छिलं च कफात्मकम् ।

कफजन्य, रक्तपित्त, दाट, पांढुरकें, स्नेहयुक्त व बुळबुळीत असतें.

वातजन्य रक्तपित्ताचें लक्षण.

श्यावारुणं सफेनं च तनु रूक्षं च वातिकम् ॥ ७ ॥

वातजन्य रक्तपित्त निळसर रंगाचें, तांबूस, फेंसाळ, पातळ व रूक्ष असें असतें.

पित्ताधिक रक्तपित्ताचें लक्षण.

रक्तपित्तं कषायाभं कृष्णं गोमूत्रसंनिभम् ।
मेचकागारधूमाभमञ्जनाभं च पैत्तिकम् ॥ ८ ॥

पित्तजन्य रक्तपित्त फिक्कट, तांबूस रंगाचें, काळसर, गोमूत्रासारखें, मोराच्या कंठाच्या रंगासारखें (निळसर, हिरवट अशी झाक मारणारें), घेरोशाच्या रंगासारखें अगर सुरम्याच्या रंगासारखें असें असतें.

द्वंद्वज व सान्निपातिक रक्तपित्ताचें लक्षण.

संसृष्टलिंगं संसर्गात्रिलिंगं सांनिपातिकम् ।

दोन दोषांचीं लक्षणें ज्यामध्यें आहेत त्याला द्वंदज, व तीन दोषांचीं लक्षणें ज्यामध्यें आहेत त्याला त्रिदोषज रक्तपित्त असें म्हणतात.

ऊर्ध्वगं कफसंसृष्टमधोगं मारुतानुगम् ॥ ९ ॥
द्विमार्गं कफवाताभ्यामुभाभ्यामनुवर्तते ।

उर्ध्वगामी रक्तपित्त कफदोषयुक्त असतें. अधोगामी रक्तपित्त वातदोषयुक्त असतें, आणि उभयमार्गगामी रक्तपित्त कफ व वात ह्या दोन्ही दोषांनीं युक्त असतें.

साध्यासाध्यता.

उर्ध्वं साध्यमधो याप्यमसाध्यं युगपद्गतम् ॥ १० ॥
एकमार्गं बलवतो नातिवेगं नवोत्थितम् ॥ ११ ॥
रक्तपित्तं सुखे काले साधयेन्निरुपद्रवम् ।

एकदोषानुगं साध्यं द्विदोषं याप्यमुच्यते ॥ १२ ॥
त्रिदोषजमसाध्यं स्यान्मन्दाग्नेरतिवेगवत् ।
व्याधिभिः क्षीणदेहस्य वृद्धस्यानश्नतश्च यत् ॥ १३ ॥

ऊर्ध्वगामी रक्तपित्त साध्य, अधोगामी याप्य (औषध व पथ्य ह्या योगानें बरें असणारें) आणि उभयगामी असाध्य समजावें. एकाच मार्गानें पडणारें, बलवानाला झालेलें, अतिशय वेगरहित, नवीन झालेलें, हेमंत शिशिरादि कालांत झालेलें आणि उपद्रवरहित असें रक्तपित्त साध्य समजावें. एकदोषजन्य रक्तपित्त साध्य, दोन दोषांपासून होणारें याप्य व त्रिदोषजन्य असाध्य. तसेंच मंदाग्नि मनुष्याचें अति जोरदार रक्तपित्तही असाध्य समजावें. व्याधीमुळें क्षीण झालेला, म्हातारा व अन्न जात नाहीं अशा मनुष्याचेंही रक्तपित्त असाध्य असतें.

रक्तपित्ताचे उपद्रव.

दौर्बल्यश्वासकासज्वरवमथुमदाः पाण्डुतादाहमूर्छा
भुक्ते घोरो विदाहस्त्वधृतिरपि सदा हृद्यतुल्या च पीडा ।
तृष्णा कोष्ठस्य भेदः शिरसि च तपनं पूतिनिष्ठीवनत्वं
भक्तद्वेषाविपाकौ विकृतिरपि भवेद्रक्तपित्तोपसर्गाः ॥ १४ ॥

अशक्तपणा, श्वास, खोकला, ज्वर, ओकारी, उन्मत्तपणा, अंगाला पांढरेपणा, दाह, मूर्च्छा, जेवलें असतां छातींत अतिशय जळजळ, धैर्य नसणें, नेहमीं छातींत दुखणें, तहान, मळ पातळ होणें, डोकें तापणें, थुंकीला घाण येणें, अन्नद्वेष व अपचन हे रक्तपित्ताचे उपद्रव आहेत.

मांसप्रक्षालनाभं क्वथितमिव च यत्कर्दमाम्भोनिभं वा
मेदः पूयास्रकल्पं यकृदिव यदि वा पक्वजम्बूफलाभम् ।
यत्कृष्णं यच्च नीलं भृशमतिकुणपं यत्र चोक्ता विकारा-
स्तद्वर्ज्यं रक्तपित्तं सुरपतिधनुषा यच्च तुल्यं विभाति ॥१५॥

धुतलेल्या मांसाच्या पाण्याप्रमाणें दिसणारें, कुजल्यासारखें, चिखलाच्या पाण्यासारखें; मेद, पू, किंवा रक्त ह्यांसारखें; यकृताच्या पिंडाप्रमाणें दिसणारें, पिकलेल्या जांभळासारखें, काळ्या किंवा निळ्या रंगाचें, अतिशय दुर्गंधियुक्त, आणि वरील सांगित-

लेल्या अशक्तपणादि विकारांनीं युक्त असें व इंद्रधनुष्याप्रमाणें ज्यांत अनेक रंग दिसतात तें रक्तपित्त असाध्य म्हणून सोडून द्यावें.

येन चोपहतो रक्तं रक्तपित्तेन मानवः।
पश्येद् दृश्यं वियच्चापि तस्यासाध्यमसंशयम् ॥ १६ ॥

ज्या रक्तपित्त झालेल्या रोग्याला सर्व दृश्य वस्तु व आकाश हें रक्तवर्ण दिसतें त्याचें तें रक्तपित्त असाध्य समजावें.

लोहितं छर्दयेद्यस्तु सततं लोहितेक्षणः।
लोहितोद्गारदर्शी च म्रियते रक्तपैत्तिकः ॥ १७ ॥

तसेंच, ज्याला रक्ताच्या पुष्कळ वांत्या होतात, ज्याचे डोळे आरक्तवर्ण झाले आहेत व ज्याला ढेकर येतांना रक्ताच्या गुळण्या येतात, असा रक्तपित्ताचा रोगी जगत नाहीं.

रक्तपित्ताची चिकित्सा.

पित्तास्रं स्तम्भयेन्नादौ प्रवृत्तं बलिनश्च्युतम्।
हृत्पाण्डुग्रहणीरोगप्लीहगुल्मोदरादिकृत् ॥ १ ॥
क्षीणमांसबलं बालं वृद्धं शोषानुबन्धिनम्।
अवाम्यमविरेच्यं च शमनीयैरुपाचरेत् ॥ २ ॥
अतिप्रवृद्धदोषस्य पूर्वं लोहितपित्तिनः।
अक्षीणबलमांसाग्नेः कर्तव्यमपतर्पणम् ॥ ३ ॥

बलवान मनुष्याचें रक्तपित्त प्रारंभींच थांबवूं नये. तसें केलें असतां हृद्रोग, पांडुरोग, संग्रहणी, पानथरी, गुल्म, व उदर हे विकार उत्पन्न होतात. तथापि ज्याचें मांस व बळ क्षीण झालें आहे, जो वृद्ध आहे, ज्याला क्षयाची भावना आहे, अशा रक्तपित्ताच्य रोग्याला वांति अगर रेचक न देतां शामक औषधें द्यावींत. ज्याचें बल, मांस व अग्नि क्षीण झालेला नाहीं, अशा रक्तपित्ताच्या रोग्याला त्याचे दोष फार वाढलेले असल्यास प्रथम लंघन द्यावें.

ऊर्ध्वगे रेचनं पूर्वमधोगे वमनं हितम्।
आरग्वधेन धात्र्या वा त्रिवृता पथ्ययाऽथवा ॥ ४ ॥
विरेचनं प्रयोक्तव्यं शर्करामाक्षिकोत्तरम्।
मुस्तेन्द्रयवयष्ट्याह्वमदनाह्वं पयो मधु ॥ ५ ॥
शिशिरं वमनं योज्यं रक्तपित्तहरं परम्।

उर्ध्वगामी रक्तपित्त असल्यास प्रथम रेचन द्यावें, आणि अधो-

गामी रक्तपित्त असल्यास प्रथम वमन द्यावें, हें हितकारक आहे. ऊर्ध्वगामी रक्तपित्तावर बाहवा, आवळकाठी, तेड अथवा हिरडे ह्यांच्यापैकीं कोणत्याही एकाच्या काढ्यांत अगर चूर्णांत मध व साखर घालून रेचक द्यावें. तसेंच नागरमोथा, इंद्रजव, ज्येष्टमध, गेळफळ ह्यांच्या काढ्यांत (काढा थंड झाल्यावर) मध व दूध घालून अधोगामी रक्तपित्तावर वमन द्यावें. हें रक्तपित्ताचा नाश करण्याविषयीं उत्कृष्ट आहे.

द्राक्षा मधुककाश्मर्यसितायुक्तं विरेचनम् ॥ ६ ॥
यष्टीमधुकसंयुक्तं सक्षौद्रं वमनं हितम् ।

मनुका, ज्येष्टमध, शिवणीचीं फळें, ह्यांचा काढा साखर घालून रेच होण्याकरितां द्यावा, आणि ज्येष्टमधाच्या काढ्यांत मध घालून वमन द्यावें.

शालिपर्ण्यादिना सिद्धा पेया पूर्वमधोगमे ।
रक्तातिसारहन्ता च योज्यो विधिरशेषतः ॥ ७ ॥

साळवण वगैरे औषधांनीं (साळवण, चिकणामूळ, बेलफळ, व पिठवण ह्या औषधांनीं) तयार केलेली पेज अधोगामी रक्तपित्तावर प्रथम योजावी. आणि सर्व उपचार रक्तातिसारनाशक असे करावे.

पयांसि शीतानि रसाश्च जांगलाः सतीनयूषाश्च सशालिपष्टिका
हितानि चैतानि च रक्तपित्ते चान्यान्यपि स्युः किल पित्तहानि ८

थंड दूध, जांगल प्राण्याच्या मांसाचे रस, वाटाण्याचें कढण, व साठ्यासाळीची पेज हे पदार्थ रक्तपित्तावर हितकारक आहेत. आणि जे पित्तनाशक पदार्थ, तेही ह्याजवर हितकारक आहेत.

शालिषष्टिकनीवारकोरदूषप्रसाधिकाः ।
श्यामाकाश्च प्रियंगुश्च भोजनं रक्तपित्तिनाम् ॥ ९ ॥
मसूरमुद्गचणकाः समकुष्टाढकीफलाः ।
प्रशस्ताः सूपयूषार्थे कल्पिता रक्तपित्तिनाम् ॥ १० ॥

साळी, साठ्यासाळी, देवभात, हारीक, सावे, राळे ह्या धान्यांचें अन्न रक्तपित्ताच्या रोग्यानें खावें. मसूरा, मूग, हरभरे, मटक्या व तुरी, ह्या धान्यांचें केलेलें वरण किंवा यूष (सार वगैरे) रक्तपित्ताच्या रोग्याला हितकारक आहेत.

दाडिमामलकं बिल्वानम्लार्थे चापि दापयेत् ।
पटोलनिम्बवेत्राग्रप्लक्षवेतसपल्लवाः ॥ ११ ॥
शाकार्थं शाकसात्म्यानां तण्डुलीयादयो हिताः ।
पारावतकपोतांश्च लावान्रक्ताक्षवर्तकान् ॥ १२ ॥
शशान्कपिञ्जलानेणान्हरिणान्कालपुच्छकान् ।
रक्तपित्तहरान्विद्याद्रसं तेषां प्रयोजयेत् ॥ १३ ॥

आंबट डाळिंब, आवळे व बेलफळ हीं फळें आंबट रसाकरितां योजावींत. पडवळ, लिंब, वेताचे कोंब, पिंपरणी व वेत ह्यांच्या पाल्याची भाजी किंवा तांदुळजाची भाजी, ज्याला भाजी खाण्याची संवय आहे त्याला हितकारक आहे. पारवा, होला, लावा, कबूतर, गांजीणपक्षी (वर्तक), ससा, पांढरा तित्तिरपक्षी, काळवीट, हरीण, भेकर (कालपुच्छ; मृगविशेष) ह्या प्राण्यांचें मांस रक्तपित्तनाशक आहे, म्हणून ह्यांच्या रसांची योजना करावी.

ईषदम्लाननम्लाश्च घृतभृष्टान्ससैन्धवान् ।
कफानुगे यूषशाकं दद्याद्वातानुगे रसम् ॥ १४ ॥
पथ्यं सतीनयूषेण सलितैर्लाजसक्तुभिः ।
जलं खर्जूरमृद्वीकामधुकैः सपरूषकैः ॥ १५ ॥
शृतशीतं प्रयोक्तव्यं तर्पणाय सशर्करम् ।
तर्पणं सघृतं क्षौद्रं लाजचूर्णैः प्रदापयेत् ॥ १६ ॥

किंचित् आंबट, आणि सैंधव घालून तुपाची फोडणी दिलेले यूष (कट) कफात्मक रक्तपित्तावर द्यावेत, आणि अशाच तऱ्हेनें तयार केलेले मांसरस वाताधिक रक्तपित्तावर द्यावेत. भाताच्या लाह्यांचें पीठ व साखर लावलेलें वाटाण्यांचें कढणही पथ्यकारक आहे. खजूर, मनुका, ज्येष्ठमध व फालसा हीं द्रव्यें घालून शिजवून थंड केलेलें पाणी साखर घालून पिण्याकरितां द्यावें. साळीच्या लाह्यांचें पीठ, तूप व मध घालून समाधान वाटण्याकरितां द्यावें.

ऊर्ध्वगं रक्तपित्तं तत्काले पीतं व्यपोहति ।
ह्रीबेरचन्दनोशीरमुस्तपर्पटकैः शृतम् ।
केवलं शृतशीतं वा दद्यात्तोयं पिपासवे ॥ १७ ॥

वाळा, चंदन, काळा वाळा, नागरमोथा व पित्तपापडा, ह्यांचा काढा ऊर्ध्वगामी रक्तपित्तावर द्यावा; अगर ह्याच औषधांनीं कढ-

वून थंड केलेलें पाणी तहान लागली असतां प्यावयास द्यावें.

पयः सिताढ्यं शृतशीतमाजं गव्यं पयो वा प्रसमीक्ष्य वह्निम्।
यष्टीमधूकार्जुनभावनीयं द्राक्षाबलागोक्षुरकैः शृतं वा ॥ १८ ॥

रक्तपित्त झालेल्या रोग्याचें अग्निबळ पाहून त्याला शेळीचें अगर गाईचें दूध तापवून गार करून साखर घालून द्यावें; किंवा ज्येष्टमध व अर्जुनसादडा ह्या औषधांनीं तयार केलेलें, तसेंच मनुका, चिकणामूळ, व गोखरूं ह्या औषधांनीं सिद्ध केलेलें दूध थंड करून द्यावें.

द्राक्षया फलिनीभिर्वा वलया नागरेण वा ।
श्वदंष्ट्रया शतावर्या रक्तजित्साधितं पयः ॥ १९ ॥

मनुका, गव्हला, चिकणामूळ, सुंठ, गोखरूं किंवा शतावरी ह्यांपैकीं कोणत्याही एका द्रव्यानें शिजवून तयार केलेलें दूध रक्तपित्तनाशक आहे.

शृतेनाऽऽज्येन पयसा संपिष्टं कुंकुमं पिबेत् ।
ऊर्ध्वरक्तविनाशाय तेनैवाऽऽजेन भोजनम् ॥ २० ॥

उर्ध्वगामी रक्तपित्ताचा नाश होण्याकरितां तापविलेल्या शेळीच्या दुधांत केशराचें चूर्ण द्यावें व त्याच दुधानें जेवण करावें.

यष्टीमधुसमायुक्तं क्षीरं संक्वाथ्य शीतलम् ।
शर्करामधुसंमिश्रं रक्तपित्तापहं पिबेत् ॥ २१ ॥

ज्येष्टमध घालून शिजवून तयार केलेलें थंड दूध, मध व साखर घालून रक्तपित्ताचा नाश होण्याकारितां प्यावें.

क्षीरेण लाक्षां मधुमिश्रितेन प्रपीय जीर्णे पयसाऽन्नमद्यात् ।
सद्यो निहन्याद्रुधिरं क्षतोत्थं कान्तार्जुनानामथवापि कल्कः २२

दूध व मध ह्यांतून लाखेचें चूर्ण घ्यावें. तें जिरल्यावर दूध व भात खावा. तें उरःक्षतापासून पडणाऱ्या रक्ताला बंद करितें. अथवा गव्हला व अर्जुनसादडा ह्यांचा कल्कही असाच गुणकारक आहे.

कल्कं मधूकत्रिफलार्जुनानां निशि स्थितं लोहमये सुपात्रे ।
साज्यं विलिह्यान्नु पिबेत्सुशीतं सशर्करं छागपयः क्षतार्तः २३

उरःक्षतानें पीडिलेल्या मनुष्यानें ज्येष्टमध, त्रिफळा व अर्जुनसादडा ह्यांचा कल्क रात्रीं लोखंडाच्या भांड्यांत ठेवून सकाळीं

तुपाशीं चाटावा, आणि वर तापवून थंड केलेलें शेळीचें दूध साखर घालून प्यावें.

वृषपत्राणि निष्पीड्य रसं समधुशर्करम् ।
अनेन प्रशमं याति रक्तपित्तं सुदारुणम् ॥ २४ ॥

अडुळशाच्या पानाचा रस मध व साखर घालून घेतला असतां भयंकर रक्तपित्ताचा नाश होतो.

मध्वाटरूषकरसौ यदि तुल्यभागौ
कृत्वा नरः पिबति पुण्यतरः प्रभाते ।
तद्रक्तपित्तमतिदारुणमप्यवश्य-
माशु प्रशास्यति जलैरिव वह्निपुञ्जः ॥ २५ ॥

अडुळशाचा रस व मध समभाग करून प्रातःकाळीं घ्यावा. पाणी जसें अग्नीचा तत्काळ नाश करितें, त्याप्रमाणें तो भयंकर रक्तपित्ताचा नाश करतो.

आटरूषकनिर्यूहः प्रियंगुर्मृत्तिकाञ्जने ।
विनीय लोध्रं सक्षौद्रं रक्तपित्तहरं पिबेत् ॥ २६ ॥

अडुळशाचा रस, गव्हला, तुरटीची लाही व रसांजन ह्यांत लोध्राचें चूर्ण व मध घालून द्यावा. तो रक्तपित्तनाशक आहे.

पिष्टानां वृषपत्राणां पुटपाको रसो हिमः ।
मधुयुक्तो जयेद्रक्तपित्तकासज्वरक्षयान् ॥ २७ ॥

अडुळशाचीं पानें वाटून त्यांचा गोळा करून पुटपाकाच्या रीतीनें त्यांचा रस काढावा आणि तो थंड झाल्यावर मध घालून द्यावा. तो रक्तपित्त, खोकला, ज्वर व क्षय ह्यांचा नाश करतो.

वासायां विद्यमानायामाशायां जीवितस्य च ।
रक्तपित्ती क्षयी कासी किमर्थमवसीदति ॥ २८ ॥

अडुळसा जर मिळतो आहे, तर जीविताची आशा करणाऱ्या रक्तपित्त, क्षय व खोकला ह्या विकारानें पीडिलेल्या रोग्यानें खचून कां जावें? (जीविताविषयीं निराश कां व्हावें?)

वासाकषायोत्पलमृत्प्रियंगुलोध्राञ्जनाम्भोरुहकेसराणि ।
पीत्वा सिताक्षौद्रयुतानि जह्यात्पित्तासृजो वेगमुदीर्णमाशु २९

अडुळशाच्या पानांचा काढा, निळें कमळ, तुरटीची लाही, गव्हला, लोध्र, रसांजन व कमळांतील केशर ह्यांचा कल्क मध

आणि खडीसाखर घालून प्यावा; म्हणजे वेगवान अशा रक्तपित्ताचा त्वरित नाश होतो.

आटरूषकमृद्वीकापथ्याक्वाथः सशर्करः ।
क्षौद्राढ्यः कसनश्वासरक्तपित्तनिबर्हणः ॥ ३० ॥

अडुळसा, मनुका व बाळहिरडे ह्यांचा काढा खडीसाखर व मध घालून प्यावा; तो खोकला, श्वास व रक्तपित्त ह्यांचा नाश करतो.

मुद्राः सलाजाः सयवाः सकृष्णाः सोशीरमुस्ता सह चन्दनेन ।
बलाजये पर्युषितः कषायः स रक्तपित्तं शमयत्युदीर्णम् ॥ ३१ ॥

चिकणामूळ रात्रीं पाण्यांत भिजत घालून दुसरे दिवशीं त्यांत मूग, लाह्या, सातू, पिंपळी, वाळा, नागरमोथे व चंदन हीं औषधें घालून काढा करून प्यावा. तो वाढलल्या रक्तपित्ताचा नाश करितो.

ह्रीबेरं धान्यकं शुण्ठी चन्दनं मधुयष्टिका ।
वृषोशीरयुतः क्वाथः शर्करामधुयोजितः ॥ ३२ ॥

वाळा, धने, सुंठ, चंदन, ज्येष्टमध, अडुळसा व काळा वाळा, ह्यांचा काढा मध व साखर घालून द्यावा. तो उग्र रक्तपित्त, तहान, दाह व ज्वर ह्यांना जिंकतो.

रक्तपित्तं जयत्युग्रं तृष्णां दाहं ज्वरं तथा ।
उशीरं चन्दनं पाठा द्राक्षा मधुकपिप्पली ॥ ३३ ॥

वाळा, चंदन, पहाडमूळ, मनुका, ज्येष्टमध व पिंपळी ह्यांचा काढा मध घालून द्यावा. तो रक्तपित्ताचा निश्चयानें नाश करतो.

सक्षौद्रं पाययेत्क्वाथं रक्तपित्तं हरेद् ध्रुवम् ।
अमृता मधुकं चैव खर्जूरं गजपिप्पली ॥ ३४ ॥

गुळवेल, ज्येष्टमध, खारिक व गजपिंपळी, ह्यांचा काढा मध घालून द्यावा; तो रक्तपित्ताचा नाश करतो.

क्वाथः क्षौद्रयुतो ह्येष रक्तपित्तविकारनुत् ।
चन्दनेन्द्रयवौ पाठा कटुका सुदुरालभा ॥ ३५ ॥
गुडूची वालुकं लोध्रं पिप्पलीक्षौद्रसंयुतम् ।
कफान्वितं जयेद्रक्तं तृष्णाकासज्वरापहम् ॥ ३६ ॥

चंदन, इंद्रजव, पहाडमूळ, कुटकी, धमासा, गुळवेल, वाळा व लोध्र ह्यांचा काढा मध व पिंपळी ह्यांचें चूर्ण घालून द्यावा. तो कफाधिक रक्तपित्त, तहान, खोकला व ज्वर ह्यांना दूर करतो.

शतावरी बला रास्ना काश्मर्यं सपरूषकम् ।
पाययेद्रक्तपित्तघ्नं सद्यः शूलहरं परम् ॥ ३७ ॥

शतावरी, चिकणामूळ, रास्ना, शिवणीचीं फळें व फालसा ह्यांचा काढा करून द्यावा; रक्तपित्त व शूळ ह्यांचा नाश करण्याविषयीं तो उत्कृष्ट आहे.

त्रिफलाकृतमालभवं क्वथनं सितया मधुना मिलितं हरति ।
ननु शोणितपित्तरुजं विविधां घनदाहकपित्तजशूलदरम् ३८

त्रिफळा व बाहव्याची शेंग ह्यांचा काढा करून तो मध व साखर घालून द्यावा. तो रक्तपित्तसंबंधीं अनेक उपद्रव, अत्यंत दाह व पित्तजन्य शूल ह्यांचा नाश करतो.

अतसीकुसुमसमङ्गावटप्ररोहास्तृणाम्भसा पीताः ।
साधयति रक्तपित्तं यदि भुंक्ते मुद्गयूषेण ॥ ३९ ॥

रोहीस गवताचा काढा करून त्यांत जवसाचीं फुलें, लाजाळू व वडाचे अंकुर ह्यांचा कल्क घालून प्यावा, व मुगाच्या कढणाशीं जेवावें; म्हणजे रक्तपित्ताचा नाश होतो.

पक्वोदुम्बरकाश्मर्यपथ्याखर्जूरगोस्तनीः ।
मधुना घ्नन्ति संलीढा रक्तपित्तं पृथक्पृथक् ॥ ४० ॥

पिकलेलें उंबर, शिवणीचें फळ, हिरडा, खजूर व गोस्तनी मनुका, ह्यांपैकीं कोणत्याही एकाचें मधाशीं सेवन केलें असतां रक्तपित्ताचा नाश होतो.

वासकस्वरसैः पथ्या सप्तधा परिभाविता ।
कृष्णा वा मधुना लीढा रक्तपित्तं द्रुढं जयेत् ॥ ४१ ॥

अडुळशाच्या रसाच्या हिरड्याला किंवा पिंपळीला सात भावना द्याव्या आणि त्यांपैकीं कोणत्याही एकाचें चूर्ण मधाशीं चाटावें. तें रक्तपित्ताला जिंकतें.

द्रवेण यावता द्रव्यमेकीभूयाऽऽर्द्रतां व्रजेत् ।
तावत्प्रमाणं निर्दिष्टं भिषग्भिर्भावनाविधौ ॥ ४२ ॥

जितक्या द्रव पदार्थानें औषध भिजून एकत्र होऊन ओलें होतें, तितकें द्रव द्रव्य भावना देण्यास घ्यावें, असें वैद्यांनीं सांगितलें आहे.

अभया मधुसंयुक्ता पाचनी दीपनी मता ।
श्लेष्माणं रक्तपित्तं च हन्ति शूलातिसारजित् ॥ ४३ ॥

बाळहिरड्याचें चूर्ण मधाशीं घ्यावें; तें पाचक व दीपक असून कफ, रक्तपित्त, शूळ व अतिसार ह्यांचा नाश करितें.

लोहगन्धनिभः श्वास उद्गारे रक्तगन्धिनि ।
मृद्वीकोषणमात्रां तु खादेद्द्विगुणशर्कराम् ॥ ४४ ॥

ज्याच्या श्वासोच्छ्वासास लोहगन्ध (लोखंडाच्या किंवा रक्ताच्या वासाप्रमाणें वास) असतो व ज्याच्या ढेंकरास रक्ताचा वास येतो; त्यानें मनुका व मिरपूड ह्यांमध्यें दुप्पट साखर घालून खावी.

उशीरकालीयकरोध्रपद्मकं प्रियंगुका कट्फलशङ्खगैरिकाः ।
पृथक्पृथक्चन्दनतुल्यभागिकाः सशर्करास्तंडुलधावनप्लुताः ॥
रक्तं च पित्तं तमकं पिपासां ।
दाहं च पीताः शमयन्ति सद्यः ॥ ४६ ॥

वाळा, दारुहळद, लोध्र, पद्मकाष्ट, गव्हला, कायफळ, शंखभस्म, सोनकाव व चंदन हीं सर्व समभाग घेऊन चूर्ण करून साखर व तांदुळाचें धुवण ह्यांशीं घ्यावें; म्हणजे रक्तपित्त, तमक श्वास, तहान, व दाह ह्यांचा त्वरित नाश होतो.

पलाशकल्कः क्वाथो वा सुशीतः शर्करान्वितः ।
पिबेद्वा मधुसर्पिभ्यां गवाश्वशकृतो रसम् ॥ ४७ ॥

पळसाच्या पानांचा कल्क अगर सालीचा काढा थंड झाल्यावर साखर घालून प्यावा. किंवा गाईच्या अथवा घोड्याच्या शेणाचा रस तूप व मध ह्यांशीं घ्यावा.

सक्षौद्रं ग्रथिते रक्ते लिह्यात्पारावतं शकृत् ।
अतिनिःसृतरक्तो वा क्षौद्रेण रुधिरं पिबेत् ॥ ४८ ॥

अंगांत रक्ताच्या गांठी बनल्या असल्यास पारव्याची विष्ठा मधाशीं चाटावी; अगर अतिशय रक्त पडत असेल तर मधाशीं केशर घ्यावें.

खदिरस्य प्रियंगूणां कोविदारस्य शाल्मलेः ।
पुष्पचूर्णानि मधुना लिह्याद्वा रक्तपित्तनुत् ॥ ४९ ॥

खैर, गव्हला, कांचन व शेवरी ह्यांचीं फुलें वाटून मधाशीं घ्यावीत; तीं रक्तपित्तनाशक आहेत.

अश्वत्थपत्राग्ररसात्षडंशो बोलोऽथ तस्माद्विगुणं मधु स्यात् ।
रक्तप्रवाहं हृदयस्थितं वा वातो यथाऽभ्रं हरते तथैव ॥ ५० ॥

पिंपळाच्या कोंवळ्या पानांचा रस काढून त्याच्या सहाव्या हिश्शानें त्यांत रक्तबोळ घालावा, आणि बोळाच्या दुप्पट मध घालून घ्यावा. तो, वारा ज्याप्रमाणें ढगांना दूर करतो, त्याप्रमाणें हृदयांतून पडणाऱ्या रक्ताला बंद करितो.

मूलानि पुष्पाणि च मातुलुंग्याः समं पिबेत्तंडुलधावनेन ।

महाळुंगाचें मूळ व फुलें समभाग घेऊन तांदुळाच्या धुवणाशीं प्यावीं. तीं रक्तपित्तनाशक आहेत.

घ्राणप्रवृत्ते जलमाशु देयं सशर्करं नासिकयोः पयो वा ।

नाकांतून रक्त पडत असल्यास, साखर घातलेलें पाणी अगर दूध नाकांत घालावें.

द्राक्षारसं क्षीरघृतं पिबेद्वा सशर्करं त्विक्षुरसं हितं वा ॥ ५१ ॥

द्राक्षांचा रस दूध व तूप ह्यांशीं प्यावा; किंवा साखर घालून उंसाचा रस प्यावा. नाकांतून पडणाऱ्या रक्तावर तो हितकारक आहे.

उदुम्बराणि पक्वानि गुडेन मधुनाऽपि वा ।
उपयुक्तानि निघ्नन्ति नासारक्तं नृणां ध्रुवम् ॥ ५२ ॥

पिकलेलीं उंबरें गुळाशीं अगर मधाशीं खावींत. तीं नाकांतून पडणाऱ्या रक्ताला निश्चयानें बंद करितात.

नस्यं दाडिमपुष्पोत्थो रसो दूर्वाभवोऽथवा ।
आम्रास्थिजः पलाण्डोर्वा नासिकास्रुतरक्तजित् ॥ ५३ ॥

डाळिंबाच्या फुलांच्या रस, अथवा दूर्वांचा रस, आंब्याच्या कोईचा रस, किंवा कांद्याचा रस नाकांत घालावा; तो नाकांतून पडणाऱ्या रक्ताला बंद करतो.

हरितकी दाडिमपुष्पदूर्वा लाक्षारसो नस्यविधानयोगात् ।
निवारयत्येव चिरप्रवृत्तमप्याशु नासान्तरशोणितौघम् ॥५४॥

हिरडा, डाळिंबाच्या फुलाचा रस, दूर्वांचा रस व लाक्षारस ह्यांचें नस्य करावें; म्हणजे फार दिवस पडणारें नाकांतील रक्त त्वरित बंद होतें.

नासाप्रवृत्तरुधिरं घृतभृष्टं श्लक्ष्णपिष्टमामलकम् ।
सेतुरिव रुधिरवेगं रुणद्धि मूर्ध्नि प्रलेपेन ॥ ५५ ॥

तुपांत परतलेले आंवळे बारीक वाटून त्यांचा मस्तकावर लेप करावा. तो, सेतु जसा पाण्याचा वेग आवरतो, त्याप्रमाणें रक्ताचा वेग आवरून धरतो.

प्रियंगुर्मृत्तिका लोध्रमञ्जनं चेति चूर्णयेत् ।
तच्चूर्णं योजयेत्तत्र नस्ये क्षौद्रसमान्वितम् ॥ ५६ ॥
नासिकामुखपायुभ्यो योनिमेढ्राच्च वेगितम् ।
रक्तपित्तस्रवं हन्ति सिद्ध एष प्रयोगराट् ॥ ५७ ॥

गव्हला, तुरटी, लोध्र व रसांजन ह्यांचें समभाग चूर्ण करावें, व तें चूर्ण मधांत कालवून नाकांत घालावें. तें नाकांतून पडणाऱ्या वेगवान् रक्ताला बंद करितें. तसेंच तें तोंड, योनि व गुद ह्या मार्गांनीं पडणाऱ्या रक्तालाही बंद करितें. हा सिद्धयोग आहे.

यत्र शस्त्रक्षते नैव रक्तं तिष्ठति वेगितम् ।
तदप्यनेन चूर्णेन तिष्ठत्येवावचूर्णितम् ।

शस्त्रानें जखम झाल्यामुळें त्यांतून वेगानें रक्त वहात असल्यास त्यावर हें चूर्ण दडपावें, म्हणजे तें देखील बंद होतें.

मेढ्रतोऽतिप्रवृत्तेऽस्रे बस्तिरुत्तर इष्यते ॥ ५८ ॥

शिस्नामधून अतिशय रक्त वहात असल्यास त्याजवर उत्तर-बस्ति द्यावा.

दूर्वाद्यघृत.

दूर्वामुत्पलकिञ्जल्कं मञ्जिष्ठां सैलवालुकाम् ।
शिवां लोध्रमुशीरं च मुस्तां चन्दनपद्मके ॥ १ ॥
विपचेत्कार्षिकैः कल्कैर्घृतप्रस्थं सुखाग्निना ।
तण्डुलाम्बु ह्यजाक्षीरं दत्वा चैव चतुर्गुणम् ॥ २ ॥
तत्पानाद्वमतो रक्तं नावनान्नासिकागतम् ।
कर्णाभ्यां यस्य गच्छेच्च तस्य कर्णौ प्रपूरयेत् ॥ ३ ॥
चक्षुःस्राविणि रक्ते च पूरयेत्तेन चक्षुषी ।
मेढ्रपायुप्रवृत्ते तु बस्तिकर्म प्रकारयेत् ।
रोमकूपप्रवृत्ते च तदभ्यङ्गं प्रयोजयेत् ॥ ४ ॥

दूर्वा, कमळांतील केसर, मंजिष्ट, एलवालुक, आवळकाठी, लोध्र, वाळा, नागरमोथे, पद्मकाष्ठ व चंदन हीं प्रत्येकीं एक एक तोळा घेऊन त्यांचा कल्क करून त्या कल्कानें एक प्रस्थ (चौसष्ट

तोळे) तूप घालावें, व तुपाच्या चौपट तांदुळांचें धुवण व शेळीचें दूध घालून मंदाग्नीनें तूप सिद्ध करावें. तें प्राशन केलें असतां तोंडावाटे पडणारें रक्त थांबतें. तें नाकांत घातलें असतां नाकांतून पडणारें रक्त थांबतें. ज्याच्या कानांतून रक्त येत असेल त्यानें तें कानांत घालावें. ज्याचे डोळ्यांतून रक्त येत असेल त्यानें तें डोळ्यांत घालावें. शिस्न व गुद वगैरे मार्गांतून येत असल्यास ह्या तुपाचा बस्ति द्यावा. आणि रोमरंध्रांतून रक्त येत असल्यास हेंच तूप अंगास लावावें.

वासादि घृत.

वासां सशाखां सदलां समूलां
कृत्वा कषायं कुसुमानि चास्याः ।
प्रदाय कल्कं विपचेद् घृतं च
सक्षौद्रमाश्वेव निहन्ति रक्तम् ॥ १ ॥

डाहाळ्या, पानें व मुळें ह्यांसह अडुळसा आणून त्याचा काढा करावा, आणि त्यांत त्याच्याच फुलांचा कल्क घालून तूप सिद्ध करावें. तें तूप मधाशीं घेतलें असतां रक्तपित्ताचा नाश करितें.

घ्राणस्य कोविदारस्य वृषस्य ककुभस्य च ।
कल्काढ्यत्वात्पुष्पकल्कं प्रस्थे पलचतुष्टयम् ॥ २ ॥
सनास्यकोविदारस्य वृषस्य कुसुमस्य च ।
कल्काढ्यत्वात्प्रशंसन्ति पुष्पकल्कं चतुष्पलम् ॥ ३ ॥

कांचन, अडुळसा व अर्जुनसादडा ह्यांचा कल्कच विशेष द्यावा, असें म्हटलें आहे. म्हणून त्यांच्या फुलांचा कल्क, चौसष्ट तोळे तुपाला सोळा तोळे द्यावा, असें 'वृंद' नांवाच्या ग्रंथांत म्हटलें आहे. त्याच-प्रमाणें कांचन व अडुळसा ह्यांचा कल्कच श्रेष्ठ आहे, म्हणून त्यांच्या फुलांचा कल्क सोळा तोळे द्यावा, असें म्हणतात.

शतावरी घृत.

शतावरी दाडिमतिन्तिडीकं काकोलिकन्दं मधुकं विदारी ।
पिष्ट्वा च मूलं फलपूरकस्य पचेद्घृतं क्षीरचतुर्गुणं तत् ।
कासज्वरोन्मादविबन्धशूलं तद्रक्तपित्तं विविधं निहन्ति ॥ १॥

शतावरी, डाळिंब, चिंच, काकोलीचा कंद, ज्येष्ठमध, भुई-

कोहळा, महाळुंगाची मुळी व फळ ह्यांचा करक घालून तुपाच्या चौपट दूध घालून तूप पचन करावें. तें खोकला, ज्वर, उन्माद, मलावरोध, शूळ व अनेक प्रकारचें रक्तपित्त ह्यांचा नाश करितें.

चंदनादि चूर्ण.

चन्दनं नलदं लोध्रमुशीरं पद्मकेसरम् ।
नागपुष्पं च बिल्वं च भद्रमुस्तं सशर्करम् ॥ १ ॥
ह्रीबेरं चैव पाठा च कुटजोत्पलमेव च ।
शृङ्गबेरं सातिविषा धातकी सरसाञ्जनम् ॥ २ ॥
आम्रास्थिजम्बुसारास्थि तथा मोचरसोऽपि च ।
नीलोत्पलं समङ्गा च सूक्ष्मैला दाडिमत्वचः ॥ ३ ॥
चतुर्विंशतिरेतानि समभागानि कारयेत् ।
तण्डुलोदकसंयुक्तं मधुना सह योजयेत् ॥ ४ ॥
योगं लोहितपित्तानामर्शसां गरिणां तथा ।
मूर्छामदोपसृष्टानां तृष्णार्तानां प्रदापयेत् ॥ ५ ॥
अतिसारं तथा छर्दिं स्त्रीणां चापि रजोग्रहे ।
प्रच्युतानां च गर्भाणां स्थापनं परमिष्यते ।
अश्विनोः संमतो योगो रक्तपित्तनिबर्हणः ॥ ६ ॥

चंदन, जटामांसी, लोध्र, वाळा, कमळांतील केसर, नागकेसर, बेलफळ, भद्रमोथे (बारीक नागरमोथे), साखर, काळा वाळा, पहाडमूळ, कुडयाची साल, कमळ, आलें, अतिविष, धायटीचीं फुलें, रसांजन, आंब्यांतील कोय, जांभळांतील बीं, मोचरस, निळें कमळ, लाजाळू, बारीक वेलदोडे आणि डाळिंबाची साल हीं चोवीस औषधें समभाग घेऊन वस्त्रगाळ चूर्ण करावें, आणि तें तांदुळाचें धुवण व मध ह्यांतून द्यावें. हें रक्तपित्त, मूळव्याध, विषबाधा, मूर्च्छा, उन्माद व तृषा ह्यांनीं पीडिलेल्यास द्यावें. तसेंच हें अतिसार, ओकारी व स्त्रियांचें नष्टार्तव, ह्यांचा नाश करितें; व गर्भपात होऊं देत नाहीं. हा रक्तपित्तनाशक योग अश्विनीकुमारांना मान्य आहे.

एलादि गुटिका.

एला पत्रं त्वचा द्राक्षा पिप्पल्यर्धपलं तथा ।
शिवामधुकखर्जूरमृद्वीकाश्च पलोन्मिताः ॥ १ ॥

संचूर्ण्य मधुना युक्तां गुटिकां संप्रकल्पयेत् ।
अक्षमात्रां ततश्चैकां भक्षयेत्तां दिने दिने ॥ २ ॥
कासं श्वासं ज्वरं हिक्कां छर्दिं मूर्छां मदं भ्रमम् ।
रक्तनिष्ठीवनं तृष्णां पार्श्वशूलमरोचकम् ॥ ३ ॥
शोषं प्लीहोर्ध्ववातं च स्वरभेदं क्षतं क्षयम् ।
गुटिका तर्पणी वृष्या रक्तपित्तं विनाशयेत् ॥ ४ ॥

वेलदोडे, तमालपत्र, दालचिनी, मनुका व पिंपळी हीं दोन दोन तोळे; आवळकाठी, ज्येष्ठमध, खारीक आणि गोस्तनी मनुका चार चार तोळे ह्या सर्वांचें चूर्ण करून मधांत खलून तोळ्या-तोळ्याच्या गोळ्या कराव्या, व रोज एक एक गोळी खावी; म्हणजे खोकला, श्वास, ज्वर, उचकी, ओकारी, मूर्च्छा, उन्माद, भ्रम, थुंकींतून रक्त पडणें, तहान, बरगड्यांतील शूळ, अरुचि, शोष, पांथरी, ऊर्ध्ववात, स्वरभेद, उरःक्षत व क्षय ह्या रोगांचा नाश होतो. ही एलादि गुटिका तृप्तिकारक व वृष्य असून रक्तपित्ताचा नाश करिते.

कूष्मांडावलेह.

कूष्माण्डकात्पलशतं सुस्विन्नं निष्कुलीकृतम् ।
पचेत्तप्ते घृतप्रस्थे पात्रे ताम्रमये दृढे ॥ १ ॥
यदा मधुनिभः पाकस्तदा खण्डशतं न्यसेत् ।
पिप्पली शृङ्गबेरं च द्वे पले जीरकस्य च ॥ २ ॥
त्वगेलापत्रमरिचधान्यकानां पलार्धकम् ।
न्यसेच्चूर्णीकृतं तत्र दर्व्या संघट्टयेत्ततः ॥ ३ ॥
लेहीभूते सुशीते च दद्यात्क्षौद्रं घृतार्धकम् ।
क्षौद्रार्धकां सितां केचिद् द्राक्षां केचित्सितार्धकाम् ॥४॥
द्राक्षार्धानि लवङ्गानि कर्षं कर्पूरकं क्षिपेत् ।
तद्यथाग्निबलं खादेद्रक्तपित्ती क्षतक्षयी ॥ ५ ॥
कासश्वासतमश्छर्दितृष्णाज्वरनिपीडितः ।
वृष्यं पुनर्नवकरं बलवर्णप्रसाधनम् ॥ ६ ॥
उरस्संधानकरणं बृंहणं स्वरबोधनम् ।
अश्विभ्यां निर्मितं श्रेष्ठं कूष्माण्डकरसायनम् ॥ ७ ॥

कोहळ्याच्या फोडी करून त्यांची साल व बिया काढून टाकून त्या चारशें तोळे घेऊन थोड्या उकडून तांब्याच्या भांड्यांत

चौसष्ट तोळे तुपामध्यें पचन कराव्यात. त्यांना मधासारखा रंग आला म्हणजे चारशें तोळे खडीसाखर घेऊन तिजमध्यें त्या कोहळ्याचें पाणी घालून पाक करावा, आणि त्यांत त्या फोडी तुपासह टाकाव्या. आणि पिंपळी, सुंठ व जिरें आठ आठ तोळे; दालचिनी, तमालपत्र, वेलदोडे, मिरीं व धने हीं दोन दोन तोळे घेऊन त्यांचें चूर्ण करून तेंही त्यांत घालून पळीनें ढवळावें. लेहाप्रमाणें दाट झाल्यावर चुलीवरून उतरावें; आणि थंड झाल्यावर त्यांत तुपाच्या निम्यानें मध घालावा. कित्येकांच्या मतानें मधाच्या निम्यानें खडीसाखर व खडीसाखरेच्या निम्यानें द्राक्षें (मनुका) घालावीं; द्राक्षांच्या निम्यानें लवंग व तोळाभर कापूर घालावा. आणि अग्नि व बल पाहून रक्तपित्त, उरःक्षत व क्षय झालेल्या मनुष्यानें घ्यावा. हा अवलेह खोकला, श्वास, मूर्च्छा, ओकारी, तहान, ज्वर ह्या विकारानें जे पीडलेले त्यांनाही द्यावा. हा अवलेह वृष्य, पुन्हा ताजेतवानें करणारा, शक्ति व अंगकांति ह्यांना देणारा, उरःक्षताला भरून आणणारा, पौष्टिक, व स्वर चांगला करणारा आहे. हें कुष्मांडक रसायन अश्विनीकुमारांनीं सांगितलें आहे.

खंडकूष्मांडक.

खण्डकामलकाद्राह्यो रसः प्रस्थद्वयोन्मितः ।
खण्डकूष्माण्डके कंसः स्विन्नकूष्माण्डकद्रवात् ॥ १ ॥
अन्यत्र खण्डकूष्माण्डात्संमतः सकलो रसः ।
पञ्चाशच्च पलं स्विन्नकूष्माण्डात्प्रस्थमाज्यतः ॥ २ ॥
पक्वं पलशतं खण्डं वासाक्वाथाढके पचेत् ।
शिवा धात्री घनं भार्गी त्रिसुगन्धैश्च कार्षिकैः ॥ ३ ॥
तालीसविश्वधान्याकमरीचैश्च पलांशकैः ।
पिप्पलीकुडवं चैव मधुना सह दापयेत् ॥ ४ ॥
कासं श्वासं ज्वरं हिक्कां रक्तपित्तं हलीमकम् ।
हृद्रोगमम्लपित्तं च पीनसं च व्यपोहति ॥ ५ ॥

आवळ्याचा रस एकशें अठ्ठावीस तोळे, कोहळ्याच्या फोडी करून त्या थोड्या वाफळून त्यांचा रस दोनशें छपन्न तोळे काढून एका भांड्यांत ठेवावा. नंतर चौसष्ट तोळे तुपांत दोनशें तोळे

कोहळ्याच्या फोडी पचन कराव्यात. त्यांना मधासारखा रंग आला म्हणजे चुलीवरून उतरून ठेवाव्यात. मग दोनशें छपन्न तोळे अडुळशाच्या काढ्यांत चारशें तोळे खडीसाखर घालून त्यांत कोहळयाच्या फोडी व वरील दोन्ही रस घालून पाक करावा. लेहाप्रमाणें दाट झाल्यावर त्यांत हिरडे, आवळकाठी, नागरमोथे, भारंगमूळ, लवंग, कंकोळ व जायफळ हीं एक एक तोळा, तालीसपत्र, सुंठ, धने व मिरीं हीं चार चार तोळे, व पिंपळी सोळा तोळे यांचें चूर्ण व मध घालून ठेवावा. हा लेह खोकला, श्वास, ज्वर, उचकी, रक्तपित्त, हलीमक, हृद्रोग, आम्लपित्त व पीनस ह्यांचा नाश करतो.

वासाखंड.

तुलामादाय वासायाः पचेदष्टगुणे जले ।
तेन पादावशेषेण पाचयेदाढकं भिषक् ॥ १ ॥
चूर्णानामभयानां च खण्डं शतपलं तथा ।
शीतीभूते निदध्यात्तु क्षौद्रस्याष्टौ पलानि च ॥ २ ॥
वंशोद्भवायाश्चत्वारि पिप्पली द्विपलं तथा ।
चातुर्जातपलं त्वेकं चूर्णितं तत्र दापयेत् ॥ ३ ॥
रक्तपित्तं निहन्त्याशु कासं श्वासं तथा क्षयम् ।
विद्रधिं जठरं गुल्मं तृष्णाहृद्रोगपीनसान् ॥
पलार्धं भक्षणं चास्य यथेष्टं तत्र भोजनम् ॥ ४ ॥

अडुळशाचीं झाडें चारशें तोळे आणून त्यांचा आठपट पाण्यांत चतुर्थांश काढा करावा. नंतर त्या काढ्यांत दोनशें छपन्न तोळे हिरड्याचें चूर्ण व चारशें तोळे खडीसाखर घालून लेह तयार करावा. तो थंड झाल्यावर त्यांत मध बत्तीस तोळे, वंशलोचन सोळा तोळे, पिंपळी आठ तोळे; व दालचिनी, तमालपत्र, वेलदोडे, व नागकेशर हीं एक एक तोळा घालून ढवळून ठेवावा. हा रक्तपित्त, श्वास, खोकला, क्षय, विद्रधि, उदर, गुल्म, तहान, हृद्रोग व पीनस ह्यांचा नाश करितो. हा लेह दोन तोळेपर्यंत सेवन करून वर यथेच्छ भोजन करावें.

खंडकाद्यवलेह.

शतावरी मुण्डिनिकाबलामृताफलत्वचः पुष्करमूलभार्गी ।
वृषो बृहत्यौ खदिरस्य मूलं पृथक्पृथक्पञ्च पलानि चात्र ॥ १॥
पक्कं जलद्रोणमितेऽष्टमांशं यावद्भवेच्छेषमथैव पूतम् ।
विमूर्छितस्यापि निधाय धीमान्पलानि च द्वादश माक्षिकस्य॥
पलं सुवर्णस्य च लोहजस्य विद्याद्धितं खण्डघृतं च तुल्यम् ।
देयं पलं षोडशकं विधिज्ञो विपाचयेल्लोहमये कटाहे ॥ ३ ॥
गुडेन तुल्यं च यदा भवेत्तदा तुगा विडङ्गं मगधा च शुण्ठी ।
द्वे जीरके कर्कटकं फलत्रिकं धान्यं मरीचं सकणा सकेसरम्
पलं प्रमाणं विदधीत तत्पृथक्सुघट्टितं चूर्णमिदं घृतेन ।
स्निग्धे कटाहे प्रणिधाय युंज्यात्कर्षप्रमाणं विहितावलेहम् ॥५॥
प्रभातकाले त्वनुदुग्धपानं गुरूणि चान्नानि च भोजनानि ।
रक्तं सपित्तं सहसा निहन्ति रक्तप्रवाहं च सरक्तशूलम् ॥ ६ ॥
रक्तातिसारं रुधिरप्रमेहं तथैव बस्तौ विहितं नराणाम् ।
भगंदरार्शः श्वयथुं निहन्ति तथाऽम्लपित्तं किल राजरोगम् ७
विशेषतः कुष्ठरुजश्च गुल्मान्बलप्रदं वृष्यतमं प्रदिष्टम् ॥ ८ ॥

शतावरी, मुंडी, चिकणामूळ, गुळवेल, त्रिफळा, तालीसपत्र, पोखरमूळ, भारंगमूळ, अडुळसा, रिंगणमूळ, डोरलीमूळ व खैराचें मूळ हीं प्रत्येक वीस वीस तोळे घेऊन दहाशें चोवीस तोळे पाण्यांत अष्टमांश काढा करावा. तो गाळून घेऊन त्यांत चौसष्ट तोळे साखर घालून लोखंडाच्या भांड्यांत पाक करावा. नंतर त्यांत चौसष्ट तोळे तूप, अठ्ठेचाळीस तोळे सुवर्णमाक्षिक भस्म, चार तोळे सुवर्णभस्म व चार तोळे लोहभस्म घालून पाक गुळाप्रमाणें दाट झाल्यावर त्यांत वंशलोचन, वावडिंग, पिंपळी, सुंठ, जिरें, शहाजिरें, काकडशिंगी, हिरडा, बेहडा, आवळकाठी, धने, मिरीं, गजपिंपळी व नागकेशर ह्यांचें चूर्ण घालून ढवळावें, आणि तुपानें राबलेल्या मडक्यांत हा लेह भरून ठेवावा, आणि रोज सकाळीं एक तोळा प्रमाणानें द्यावा; व वर दूध प्यावयास देऊन त्यावर पौष्टिक अन्न खावयास सांगावें. हा अवलेह रक्तपित्त, कोणत्याही मार्गानें होणारा रक्तप्रवाह, रक्त पडण्यासंबंधीं शूळ, रक्तातिसार, रक्तप्रमेह व बस्ति ह्यांजवर घेण्यास योग्य आहे. भगंदर, मूळव्याध,

सूज, अम्लपित्त, क्षय, विशेषतः कुष्ठ व गुल्म ह्यांचा हा अवलेह नाश करितो. हा बलदायक व वृष्य आहे.

रक्तपित्तकुलकंडन.

शुद्धपारदबलिप्रवालकं हेममाक्षिकभुजंगरङ्गकम् ।
मारितं सकलमेतदुत्तमं भावयेत्पृथक्पृथक्द्रवैस्त्रिशः ॥ १ ॥
चन्दनस्य कमलस्य मालतीकोरकस्य वृषपल्लवस्य च ।
धान्यवारणकणाशतावरीशाल्मलीवटजटामृतस्य च ॥ २ ॥
रक्तपित्तकुलकण्डनाभिधो जायते रसवरोऽस्रपित्तिनाम् ।
प्राणदो मधुवृषद्रवैरयं सेवितस्तु वसुकृष्णलैर्मितः ।
नास्त्यनेन सममत्र भूतले भेषजं किमपि रक्तपित्तिनाम् ॥ ३ ॥

शुद्ध पारा, गंधक, प्रवाळ, सुवर्णमाक्षिक, नागभस्म व वंग-भस्म हीं सर्व समभाग घेऊन त्यांचा खल करावा; आणि चंदन, कमळ, मालतीचीं फुलें, अडुळशाचीं पानें, धने, गजपिंपळी, शतावरी, शेवरीची साल, वडाचे अंकुर व गुळवेल ह्यांच्या यथासंभव काढ्याच्या अगर रसाच्या तीन तीन भावना द्याव्या, म्हणजे हा रक्तपित्तकुलकंडन रस तयार झाला. हा मध व अडुळशाचा रस ह्यांशीं एक मासाभर द्यावा. हा रक्तपित्ताच्या रोग्याला प्राणदायक आहे. रक्तपित्ताच्या रोग्याला ह्याच्यासारखें दुसरें औषध नाहीं.

वासासूत.

आटरूषनवपल्लवद्रवे पालिके सरसभस्मवल्लकम् ।
कर्षसंमितमधुप्रयोजितं प्राश्य नाशयति रक्तपित्तकम् ॥ १ ॥

अडुळशाच्या कोवळ्या पाल्याच्या चार तोळे रसांत एक तोळा मध व एक वाल पारदभस्म (रससिंदूर) घालून द्यावा; तो रक्त-पित्ताचा नाश करतो.

बोलपर्पटीरस.

सूतगन्धकसुकज्जलिकायाः पर्पटी समयुता समभागम् ।
बोलचूर्णविहितं प्रतिवाप्यं स्याद्रसोऽयमसृगामयहारी ॥ १ ॥
वल्लयुग्मयुगुलं प्रतिदेयं शर्करामधुयुतः किल दत्तः ।
रक्तपित्तगुदजास्रुतियोनिस्रावमाशु विनिवारयतीशः ॥ २ ॥

पारा व गंधक ह्यांची समभाग कज्जलि करून त्यांत त्या दो-

होंच्या समान रक्तबोळ घालून पर्पटी करावी. ह्या रसाला बोल-पर्पटी म्हणतात. ही रक्तासंबंधीं विकारांचा नाश करिते. ही दोन वाल प्रमाणांत मध व साखरेशीं द्यावी. हा बोलपर्पटीरस रक्तपित्त, मूळव्याध व योनीसंबंधीं रक्तस्राव ह्यांचा त्वरित नाश करतो.

सुधानिधिरस.

गन्धं सूतं माक्षिकं लोहचूर्णं सर्वं घृष्टं त्रैफलेनोदकेन ।
लौहे पात्रे गोपयःस्थं च कृत्वा रात्रौ दद्याद्रक्तपित्तप्रशान्त्यै १

गंधक, पारा, माक्षिक भस्म व लोहभस्म ह्यांचा त्रिफळ्याच्या काढ्यांत खल करावा. ह्याला सुधानिधिरस म्हणतात. हा रक्त-पित्त दूर होण्याकरितां रात्रीं लोहपात्रांत दूध ठेवून त्यांतून द्यावा.

यच्च पित्तज्वरे प्रोक्तं बहिरन्तश्च भेषजम् ।
रक्तपित्ते हितं तच्च क्षतक्षीणे हितं च यत् ॥ २ ॥

पित्तज्वरावर जीं अंतर्बाह्य औषधें सांगितलीं आहेत तीं, व उरः-क्षतावर जीं औषधें सांगितलीं आहेत तीहीं रक्तपित्तावर द्यावीं.

राजयक्ष्म निदान.

अनेकरोगानुगतो बहुरोगपुरोगमः ।
राजयक्ष्मा क्षयः शोषो रोगराडिति च स्मृतः ॥ १ ॥
नक्षत्राणां द्विजानां च राज्ञोऽभूद्यदयं पुरा ।
यच्च राजा च यक्ष्मा च राजयक्ष्मा ततो मतः ॥ २ ॥
राज्ञश्चन्द्रमसो यस्मादभूदेष किलाऽऽमयः ।
तस्मात्तं राजयक्ष्मेति प्रवदन्ति मनीषिणः ॥ ३ ॥

---

१. सुधानिधिरसापुढें लेखी प्रतींत मागें ज्वरचिकित्सा प्रकरणांत सांगित-लेला चंद्रकलारस सांगून त्यापुढें रक्तपित्तावरील पथ्यापथ्यविधि सांगितला आहे. तो असाः—

व्यायाम, मार्गक्रमण, ऊन, तीक्ष्ण कर्मे, क्षुब्धपणा, मलमूत्रांचा वेग धारण करणें, घाईनें काम करणें (चपळता); हत्ती, घोडा ह्यांजवर बसणें, घाम काढणें, रक्त काढणें, धूम्रपान, मैथुन, राग, हुलगे, गूळ, वांगीं, तीळ, उडीद, शिरस, दहीं, दूध, आडाचें पाणी, विडा, मिरीं, लसूण, शेंगतील धान्यें, विरुद्ध अन्न खाणें, तिखट, आंबट, खारट व विदाही पदार्थ हे रक्तपित्ताला त्याज्य (अपथ्यकारक) आहेत.

देहौषधक्षयकृतेः क्षयस्तत्संभवाच्च सः।
रसादिशोषणाच्छोषो रोगराट् तेषु राजनात् ॥ ४ ॥

अनेक रोगांच्या शेवटीं होणारा व पुष्कळ रोगांचा पुढारी अशा ह्या रोगाला राजयक्ष्मा, क्षय, शोष व रोगराज असें म्हणतात. नक्षत्रें व ब्राह्मण ह्यांचा राजा जो चंद्र, त्याला पूर्वीं हा रोग झाला होता. शिवाय हा रोगांचा राजा असून प्रत्यक्ष रोगही आहे; म्हणून ह्या रोगाला राजयक्ष्मा असें म्हणतात. सर्व वनस्पतींचा व नक्षत्रांचा राजा जो चंद्र त्याला हा रोग झाला म्हणून ह्याला राजयक्ष्मा असें म्हणतात. देह क्षीण झाला असतां औषध न मिळाल्याकारणानें हा रोग होतो; म्हणून ह्याला क्षय असें म्हणतात. रसादि धातूंना शोषून टाकतो, म्हणून ह्याला शोष असें म्हणतात. आणि सर्व रोगांचा हा राजा आहे म्हणून ह्याला रोगराज असें म्हणतात.

क्षयाचीं चार कारणें.

वेगरोधात्क्षयाच्चैव साहसाद्विषमाशनात् ।
त्रिदोषो जायते यक्ष्मा गदो हेतुचतुष्टयात् ॥ १ ॥

वायु, मल, मूत्र इत्यादिकांचा वेग धारण केल्यानें, रसादि धातूंचा क्षय झाल्यानें, विषम अन्न सेवन करण्यानें, आणि साहस केल्यानें, अशा चार कारणांनीं राजयक्ष्मा (क्षय) उत्पन्न होतो. राजयक्ष्मा हा त्रिदोषात्मक असतो.

यावद्दोषा रसस्थानं नाऽप्नुवन्ति विशेषतः ॥ २ ॥
न भजेच्च ज्वरस्तावद्दोषे प्राप्ते प्रवर्तते ।

क्षयामध्यें जोंपर्यंत दोष विशेषतः रसस्थानाचा आश्रय करीत नाहींत, तोंपर्यंत ज्वर येत नाहीं. तेच दोष रसस्थानाप्रत शिरले म्हणजे ज्वर उत्पन्न होतो.

कफप्रधानैर्दोषैस्तु रुद्धेषु रसवर्त्मसु ॥ ३ ॥
अतिव्यवायिनो वाऽपि क्षीणे रेतस्यनन्तराः ।
क्षीयन्ते धातवः सर्वे ततः शुष्यति मानवः ॥ ४ ॥

कफप्रधान दोषांनीं रसवाहक स्रोतसांचा रोध केला असतां किंवा अति मैथुनानें धातुक्षय झाला असतां बाकी रसादि सर्व धातु क्षीण होतात. त्यामुळें मनुष्य कृश होतो.

पूर्वरूप.

श्वासाङ्गसादकफसंस्रवतालुशोष-
वम्यग्निसादमदपीनसकासनिद्राः ।
शोषे भविष्यति भवन्ति स चापि जन्तुः
शुक्लेक्षणो भवति मांसपरो रिरंसुः ॥ १ ॥
स्वप्नेषु काकशुकशल्लकिनीलकण्ठ-
गृध्रास्तथैव कपयः कृकलासकाश्च ।
तं वाहयन्ति स नदीर्विजलाश्च पश्ये-
च्छुष्कांस्तरून्पवनधूमदवार्दितांश्च ॥ २ ॥

श्वास, अंग गळल्यासारखें होणें, कफाचा स्राव, टाळूला कोरड, ओकारी, अग्निमांद्य, उन्मत्तपणा, पीनस, खोकला, निद्रा, डोळ्याला पांढरेपणा, मांस खाण्याची इच्छा व मैथुनेच्छा हीं लक्षणें क्षय होण्यापूर्वीं मनुष्याला होतात. तसेंच स्वप्नामध्यें त्याला कावळे, पोपट, साळई, मोर, गिधाड, वानर व सरड हे प्राणी ओढतात. त्याला स्वप्नांत नद्या कोरड्या दिसतात, आणि झाडें वठलेलीं, अगर वारा, धूर व वणवा ह्यांच्या योगानें सुकलेलीं अशीं दिसतात.

त्रिरूपक्षयाचें लक्षण.

अंसपार्श्वाभितापश्च संतापः करपादयोः ।
ज्वरः सर्वाङ्गगश्चेति लक्षणं राजयक्ष्मणः ॥ १ ॥
अग्निमान्द्यं ज्वरः शैत्यं वान्तिः शोणितपूययोः ।
सत्त्वहानिश्च दौर्बल्यं रोगराजस्य लक्षणम् ॥ २ ॥

खांदे व बरगड्या तापणें, हातापायांची आग होणें, सर्वांगाला ज्वर, हीं लक्षणें (त्रिरूप) क्षयामध्यें होतात. अग्निमांद्य, ज्वर, थंडी वाजणें, रक्त व पू ह्यांची वांति होणें, ओजाचा क्षय होणें व अशक्तपणा येणें हें राजयक्ष्म्याचें लक्षण आहे.

एकादशरूपक्षयलक्षण.

स्वरभेदोऽनिलाच्छूलं संकोचश्चांसपार्श्वयोः ।
ज्वरो दाहोऽतिसारश्च पित्ताद्रक्तस्य चाऽऽगमः ॥ ३ ॥
शिरसः परिपूर्णत्वमभक्तच्छन्द एव च ।
कासः कण्ठस्य चोद्ध्वंसो विज्ञेयः कफकोपतः ॥ ४ ॥

क्षयामध्यें वातदोषामुळें स्वरभेद, शूळ, खांदे व बरगड्या जख-डल्यासारख्या वाटणें हीं लक्षणें होतात. पित्तदोषामुळें ज्वर, दाह, अतिसार आणि थुंकींतून रक्त पडणें हीं लक्षणें होतात; आणि कफदोषामुळें डोकें जड होणें, अन्नद्वेष, खोकला व घशांत कूस गेल्याप्रमाणें वाटणें हीं लक्षणें होतात.

षड्रूपक्षयाचें लक्षण.

भक्तद्वेषो ज्वरः कासः श्वासः शोणितदर्शनम् ।
स्वरभेदश्च जायन्ते षड्रूपे राजयक्ष्मणि ॥ ७ ॥

अन्नद्वेष, ज्वर, खोकला, श्वास, थुंकींत रक्त दिसणें व स्वर बद-लणें हीं लक्षणें षड्रूपक्षयामध्यें होतात.

साध्यासाध्यत्व.

एकादशभिरेतैर्वा षड्भिर्वाऽपि समन्वितम् ।
कासातिसारपार्श्वार्तिस्वरभेदारुचिज्वरैः ॥ ८ ॥
त्रिभिर्वा पीडितं लिङ्गैर्ज्वरकासासृगामयैः ।
जह्याच्छोषार्दितं जन्तुमिच्छन्सुविपुलं यशः ॥ ९ ॥
सर्वैरर्धैस्त्रिभिर्वाऽपि लिङ्गैर्मांसबलक्षये ।
युक्तो वर्ज्यश्चिकित्स्यस्तु सर्वरूपोऽप्यतोऽन्यथा ॥ १० ॥
महाशनं क्षीयमाणमतीसारनिपीडितम् ।
शूनमुष्कोदरं चैव यक्ष्मिणं परिवर्जयेत् ॥ ११ ॥

ह्या वर सांगितलेल्या अकरा लक्षणांनीं किंवा खोकला, अतिसार, बरगड्यांतील वेदना, स्वरभेद, अरुचि व ज्वर ह्या सहा लक्षणांनीं किंवा खोकला, श्वास व रक्त पडणें ह्या तीन विकारांनीं पीडिलेल्या क्षयी मनुष्यास यशेच्छु वैद्यानें उपचार करूं नयेत. मांस व बल ह्यांचा क्षय झाला असतां सर्व लक्षणांनीं, सहा लक्षणांनीं अगर तीन लक्षणांनीं युक्त असा रोगी असला तरी तो असाध्य समजून त्याला औषध देऊं नये. पण ह्याच्या उलट मांस व बल ह्यांचा क्षय झाला नसेल तर सर्व लक्षणें असलीं तरी देखील त्याला उप-चार करावा. पुष्कळ अन्न खात असूनही अतिसारानें पीडिलेला व ज्याचें पोट व अंड सुजलें आहे अशा क्षयी मनुष्याला औषध देऊं नये.

उपक्रमेदात्मवन्तं दीप्ताग्निमकृशं नवम् ।

जो क्षयरोगी पुष्ट आहे, आत्मसंयमन करणारा आहे, ज्याचा अग्नि प्रदीप्त आहे व ज्याला नुकताच क्षय झाला आहे, अशा क्षयरोग्याला औषध द्यावें.

शुक्लाक्षमन्नद्वेष्टारमूर्ध्वश्वासनिपीडितम् ॥ १२ ॥
कृच्छ्रेण बहुमेहन्तं यक्ष्मा हन्तीह मानवम् ।

ज्याचे डोळे पांढरे फटफटित झाले आहेत, ज्यास अन्नद्वेष आहे, ज्याचा उर्ध्वश्वास चालू आहे आणि ज्याला कष्टानें फार लघवी होते (लघवींतून धातू जाते), अशा मनुष्यास क्षयरोग मारतो.

दुसरे क्षय.

व्यवायशोकवार्धक्यव्यायामाध्वप्रशोषितान् ॥ १३ ॥
व्रणोरःक्षतसंज्ञौ च शोषिणौ लक्षणैः शृणु ।

अति व्यवाय (अतिमैथुन), शोक, वृद्धपणा, अतिश्रम, अति मार्गक्रमण, व्रण व उरःक्षत ह्या योगानें ज्यांना क्षय झाला आहे त्यांचीं लक्षणें सांगतों तीं ऐक.

व्यवायशोषी शुक्रस्य क्षयलिङ्गैरुपद्रुतः ॥ १४ ॥
पाण्डुदेहो यथापूर्वं क्षीयन्ते चास्य धातवः ।

व्यवायशोषी मनुष्य शुक्रक्षयाच्या[1] लक्षणांनीं युक्त असून त्याचें शरीर पांढरें फटफटीत दिसतें आणि त्याचे शुक्रादि धातू क्रमानें क्षीण होतात.

प्रध्यानशीलः स्रस्ताङ्गः शोकशोष्यपि तादृशः ॥ १५ ॥
चिन्ताशुक्रक्षयकृतैर्विकारैरुपलक्षितः ॥ १६ ॥

शोकानें क्षीण झालेला मनुष्य चिंतातुर, गलितांग, व शुक्रक्षयाच्या लक्षणानें युक्त[2] असतो.

---

१. शुक्रक्षयलक्षण--मैथुनाला असमर्थ, वृषण व लिंग ह्यांत ठणका, फार वेळानें वीर्यपात होऊन त्यांत रक्त व शुक्र अल्प असणें, हीं लक्षणें होतात.

२. क्षीणशुक्र पुरुषाचें लक्षण--अशक्तपणा, मुखशोष, शरीराला पांढरेपणा, अंग गळणें, भोवळ, नपुंसकत्व व शुक्रस्राव हीं क्षीणशुक्राचीं लक्षणें आहेत.

जराशोषीचें लक्षण.

जराशोषी कृशो मन्दवीर्यबुद्धिबलेन्द्रियः ।
कम्पनोऽरुचिमान्भिन्नकांस्यपात्रहतस्वनः ॥ १७ ॥
ष्ठीवति श्लेष्मणा हीनं गौरवारतिपीडितः ।
संप्रस्रुताक्षिनासास्यः शुष्करूक्षमलच्छविः ॥ १८ ॥

म्हातारपणामुळें क्षय झालेला मनुष्य कृश होतो. त्याचें शुक्र, बुद्धि, बळ, व इंद्रियें हीं क्षीण होतात. त्याचें अंग कांपतें. तोंडाला चव नसते. त्याचा अवाज फुटक्या काशाच्या भांड्याप्रमाणें होतो. थुंकींतून कफ पडत नाहीं, अंग जड होतें, मन उदासीन असतें, तोंडांतून लाळ गळते, नाकांतून व डोळ्यांतून पाणी येतें, मळ शुष्क होतो व अंगकांति निस्तेज दिसते.

मार्ग चालून क्षय झाल्याचें लक्षण.

अध्वप्रशोषी स्रस्ताङ्गः संभृष्टपरुषच्छविः ।
प्रसुप्तगात्रावयवः शुष्कक्लोमगलाननः ॥ १९ ॥

अति मार्गक्रमणामुळें क्षय झालेल्या मनुष्याचें अंग गळल्यासारखें होतें. अंगकांति करपल्यासारखी दिसते. सर्व शरीर किंवा अवयव स्पर्शज्ञानरहित होतात; आणि क्लोम, घसा व तोंड हीं कोरडीं असतात.

अतिश्रमानें झालेल्या क्षयाचें लक्षण.

व्यायामशोषी भूयिष्ठमेभिरेव समन्वितः ।
लिंगैरुरःक्षतकृतैः संयुक्तश्च क्षताद्विना ॥ २० ॥

वरील अध्वशोषाचींच लक्षणें ह्या व्यायामशोषामध्यें जास्त प्रमाणांत असून क्षतावांचून उरःक्षताचींही लक्षणें ह्यांत असतात.

व्रणशोषाचें लक्षण.

रक्तक्षयाद्वेदनाभिस्तथैवाऽऽहारयंत्रणात् ।
व्रणिनश्च भवेच्छोषः स चासाध्यतमो मतः ॥ २१ ॥

व्रणी मनुष्याच्या जखमेंतून अतिशय रक्त जाऊन रक्तक्षय झाल्यामुळें, वेदनांच्या असह्यतेमुळें व आहाराच्या बंधनामुळें जो क्षय होतो त्याला व्रणशोष म्हणतात. हा अत्यंत असाध्य आहे.

परं दिनसहस्रं तु यदि जीवति मानवः ।

सुभिषग्भिरुपक्रान्तस्तरुणः शोषपीडितः ॥ २२ ॥

क्षयी मनुष्य तरुण असून त्याला उत्तम वैद्यांकडून उपचार होत असतील, तरी तो एक हजार दिवस उलटल्यावर दुसऱ्या हजार दिवसांच्या मुदतीपर्यंत वाचण्याची शंकाच वाटते.

मलायत्तं बलं पुंसां शुक्रायत्तं तु जीवितम् ।
तस्माद्यत्नेन संरक्षेद्यक्ष्मिणो मलरेतसी ॥ २३ ॥

मनुष्याचें सामर्थ्य मलावर अवलंबून आहे आणि जीवित हें शुक्रावर अवलंबून आहे. ह्यासाठीं क्षयी मनुष्याचें वीर्य व मल ह्यांचें प्रयत्नानें रक्षण करावें.

क्षयाची चिकित्सा.

किंचिल्लिंगयुतं दीप्तपावकं त्वकृशं नरम् ।
उपाचरेदात्मवन्तं यक्ष्मिणं साध्यलक्षणम् ॥ १ ॥

जो कृश झाला नाहीं, ज्याचा अग्नि प्रदीप्त आहे व क्षयाचीं किंचित् लक्षणें दिसत आहेत, अशा साध्य लक्षणांनीं युक्त व आत्मसंयमी क्षयी मनुष्याला उपचार करावेत.

अर्धलिंगैः कृच्छ्रसाध्यं सर्वलिंगैः परित्यजेत् ।
यक्ष्मिणं शुक्लनयनं तथा भक्तद्विषं कृशम् ॥ २ ॥
ततोर्ध्वश्वासिनं कृच्छ्रं मेहन्तं परिवर्जयेत् ।

ज्याला क्षयाचीं अर्धीं लक्षणें आहेत तो कष्टसाध्य, आणि सर्व लक्षणें आहेत तो असाध्य म्हणून सोडून द्यावा. ज्या क्षयी मनुष्याचे डोळे पांढरे दिसताहेत त्यालाही औषध देऊं नये. तसेंच ज्याला अन्नद्वेष झाला असून जो कृश झाला आहे, त्याचप्रमाणें ज्याला उर्ध्व श्वास असून कष्टानें पुष्कळ लघवी होते, अशा क्षयी मनुष्याला औषध देऊं नये.

अतिव्यवायिनो वापि क्षीणे रेतस्यनंतराः ।
क्षीयन्ते धातवः सर्वे ततः शुष्यति मानवः ॥ ३ ॥

अति मैथुनामुळें शुक्र क्षीण झालें म्हणजे सर्व धातु क्षीण होतात. त्यामुळें मनुष्य कृश होतो.

व्यवायशोषिणं क्षीररसमांसाज्यभोजनैः ।
मुकुलैर्मधुरैर्गन्धैर्जीवनीयैरुपाचरेत् ॥ ४ ॥

अति मैथुनानें क्षीण झालेल्या मनुष्याला दूध, मांसरस, मांस, तूप अशा भोजनानें व मधुर सुवासिक अशा फुलांच्या कळ्या व जीवनीय औषधें (शतावरी वगैरे) ह्यांनीं उपचार करावेत.

व्रणशोषं जयेत्स्निग्धैर्दीपनैः स्वादुशीतलैः ।
दीपनैर्लघुभिश्चान्नैः शोकशोषमुपाचरेत् ॥ ५ ॥

व्रणजन्य क्षयाला स्निग्ध, अग्निदीपक, गोड व थंड अशा औषधांनीं व दीपक आणि हलक्या अशा भोजनानें उपचार करावे.

हर्षणाश्वासनैः क्षीरैः स्निग्धैर्मधुरशीतलैः ।

शोकजन्य क्षयावर मनाला आनंद उत्पन्न करणारे, आश्वासनयुक्त, दूध, स्निग्ध पदार्थ, मधुर व थंड असे उपचार करावे.

आस्यासुखैर्दिवास्वप्नशीतैर्मधुरबृंहणैः ॥ ६ ॥
तत्र मांसरसाहारैरध्वशोषिणमाचरेत् ।

मार्गक्रमणामुळें झालेल्या क्षयावर एकाच ठिकाणीं सुखानें बसणें, दिवसा झोंप घेणें, थंड, मधुर व पौष्टिक अशा औषधांनीं व मांसरसादिकांच्या आहारानें उपचार करावेत.

ईषदम्लैरनम्लैर्वा यूषमांसरसादिभिः ॥ ७ ॥

व्रणजन्य क्षयावर स्निग्ध, दीपक, गोड, थंड, किंचित् आंबट किंवा आंबट नाहींत अशा यूष--मांसरसादिकांनीं उपचार करावेत.

व्यायामशोषिणं स्निग्धैः क्षतक्षयहितैर्हिमैः ।
उपचारैर्जीवनीयैर्विधिना श्लैष्मिकेण तु ॥ ८ ॥

व्यायाम-(श्रम) जन्य क्षयावर स्निग्ध, व्रणजन्य क्षयाला हितकारक व थंड असे पदार्थ आणि जीवनीय व कफवृद्धिकारक औषधें ह्यांनीं उपचार करावेत.

बलिनो बहुदोषस्य वमनं रेचनं तथा ।
वातश्लेष्महरं क्वाथं दद्याद्दोषापहं पुरा ॥ ९ ॥

बलवान व पुष्कळ दोषयुक्त अशा क्षयी मनुष्याला प्रथम

---

१. कस्तुरीमध्यें आस्वाद, कापूर मुखसुवास करणारा, बकुळीचे फुलांमध्यें परिमळ आणि चांफ्याच्या फुलाला सुगंध असतो.

२. "व्रणशोषं जयेत्स्निग्धैः दीपनैः स्वादुभोजनैः ॥" हें श्लोकार्ध मूळामध्यें "इषदम्लैः" ह्या अर्धापूर्वी पाहिजे आहे.

वमन व रेचन द्यावें. तसेंच प्रथम वातकफघ्न व दोषनाशक असा काढा त्याला द्यावा.

यक्ष्मिणः क्षीणदेहस्य यत्कृतं स्याद्विषोपमम् ।
वृन्ताकं कारवेल्लं च तैलं बिल्वं च राजिकाम् ॥ १० ॥
मैथुनं च दिवा निद्रां क्षयी कोपं च वर्जयेत् ।

ज्याचा देह क्षीण झाला आहे, अशा क्षयी मनुष्याला जे ज उपचार करावेत ते ते विषाप्रमाणें वाटतात. वांगें, कारलें, तेल, बेलफळ, मोहऱ्या, मैथुन, दिवसा झोंप, व क्रोध ह्या गोष्टी क्षयी मनुष्यानें वर्ज कराव्यात.

शालिषष्टिकगोधूमयवमुद्गादयः शुभाः ॥ ११ ॥
मद्यानि जांगलाः पक्षिमृगाः शस्ता विशुष्यतः ।
मूलकानां कुलत्थानां यूषैर्वा सूपसंस्कृतैः ॥ १२ ॥
सपिप्पलीकं सयवं सकुलत्थं सनागरम् ।
दाडिमामलकोपेतं स्निग्धमाजरसं पिबेत् ॥ १३ ॥
तेन षड् विनिवर्तन्ते विकाराः पीनसादयः ।
सधान्ययवगोधूममुद्गाश्चापि सदा हिताः ॥ १४ ॥
स्त्रियश्चतुष्पदे श्रेष्ठाः पुमांसो विहगा मताः ।
हरिणच्छागमांसं तु श्लक्ष्णचूर्णीकृतं शुभम् ॥ १५ ॥
अजाक्षीरेण पातव्यं क्षयव्याधिनिवारणम् ।
छागमांसं पयश्छागं सर्पिश्छागं सशर्करम् ।
छागोपसेवा सततं छागमध्ये तु यक्ष्मनुत् ॥ १६ ॥

साठ्या साळी, गहू, सातू व मूग हीं धान्यें पथ्यकारक आहेत. मद्यें, जांगल पक्षी व मृग ह्यांचें मांस, वाळलेले मुळे व हुलगे ह्यांचे यूष किंवा वरण ह्यांनीं मिश्र असें अन्न खावें. तसेंच पिंपळी, सातू, हुलगे, सुंठ, डाळिंब व आवळकाठी, ह्यांनीं तयार केलेला शेळीचें मांसाचा सुरवा द्यावा, म्हणजे क्षयासंबंधीं पीनसादि सहा विकार दूर होतात. धने, सातू, गहू व मूग हीं धान्यें नेहमीं हितकारक आहेत. चतुष्पाद जनावरांतील मादीचें मांस श्रेष्ठ व पक्ष्यांमध्यें नराचें मांस श्रेष्ठ आहे. हरीण व बोकड ह्यांचें मांस बारीक चूर्ण करून द्यावें, तें चांगलें. तें शेळीच्या दुधांतून द्यावें म्हणजे क्षय-रोगाचा नाश करितें. शेळीचें मांस, शेळीचें दूध व शेळीचें तूप,

ह्यांत साखर घालून सेवन करावें. शेळ्यांची सेवा करणें व शेळ्यामध्येंच असणें हें क्षयनाशक आहे.

षडंगयूष.

द्रव्यतो द्विगुणं मांसं सर्वतोऽष्टगुणं जलम् ।
पादस्थं संस्कृतं चाऽऽज्ये षडंगो यूष उच्यते ॥ १

औषधी द्रव्याच्या दुप्पट मांस व सर्वांच्या आठपट पाणी एकत्र करून चतुर्थांश राहीपर्यंत शिजवावें, व त्याला तुपाची फोडणी द्यावी. ह्याला षडंगयूष म्हणतात.

धान्यकं पिप्पलीविश्वदशमूलीजलं पिबेत् ।
पार्श्वशूलज्वरश्वासपीनसादिनिवृत्तये ॥ १ ॥

धने, पिंपळी, सुंठ व दशमुळें ह्यांचा काढा बरगड्यांतील शूळ, ज्वर, श्वास व पीनस वगैरे विकार दूर होण्याकरितां घ्यावा.

दशमूलबलारास्नापुष्करामरदारुनागरैः क्वथितम् ।
पेयं पार्श्वांसशिरोरुक्क्षतकासादिशान्तये सलिलम् ॥२॥

दशमुळें, चिकणामूळ, रास्ना, पोखरमूळ, देवदार व सुंठ ह्यांचा काढा करून प्यावा. तो बरगड्या, खांदे व मस्तक ह्यांची व्यथा, उरःक्षतासंबंधीं खोकला, इत्यादिकांना दूर करतो.

ककुभत्वङ्नागबलावातारिबीजानि चूर्णितं पीतम् ।
पक्कं मधुघृतयुक्तं ससितं यक्ष्मादिकासहरम् ॥ १ ॥

अर्जुनसादड्याची साल, गांगेरुकी (चिकण्याची एक जात) व एरंडाचें बी ह्यांचें चूर्ण करून तें पक्क करून मध, तूप व साखर ह्यांशीं द्यावें. हें क्षय व खोकला इत्यादिकांचा नाश करितें.

अश्वगन्धामृताभीरुदशमूली बलावृषम् ।
पुष्कराऽतिबला घ्नन्ति क्षयं क्षीररसाशिनः ॥ २ ॥

आस्कंध, गुळवेल, शतावरी, दशमुळें, चिकणामूळ, अडुळसा, पोखरमूळ व पेटारीचें मूळ हीं औषधें दूध व मांसरस खाऊन सेवन केलीं असतां क्षयाचा नाश करतात.

तालिसादिचूर्ण.

तालीसपत्रं मरिचं नागरं पिप्पली तुगा ।
यथोत्तरं भागवृद्ध्या त्वगेले चार्धभागिके ॥ १ ॥

पिपल्यष्टगुणा चात्र प्रदेया सितशर्करा ।
कासश्वासारुचिहरं तच्चूर्णं दीपनं परम् ।
पाण्डुहृद्ग्रहणीदोषप्लीहशोषज्वरापहम् ॥ २ ॥

तालीसपत्र एक तोळा, मिरीं दोन तोळे, सुंठ तीन तोळे, पिंपळी चार तोळे, वंशलोचन पांच तोळे, दालचिनी अर्धा तोळा, वेलदोडे अर्धा तोळा व खडीसाखर बत्तीस तोळे ह्यांचें वस्त्रगाळ चूर्ण करावें. ह्याला तालिसादि चूर्ण म्हणतात. हें खोकला, श्वास व अरुचि ह्यांचें नाशक असून अग्निदीपक आहे. हें पांडुरोग, हृद्रोग, संग्रहणी, पानथरी, क्षय व ज्वर ह्यांचा नाश करितें.

सितोपलादि चूर्ण.

सितोपला षोडश स्यादष्टौ स्याद्वंशरोचना ।
पिप्पली स्याच्चतुष्कर्षा एला स्याच्च द्विकार्षिका ॥ १ ॥
एककर्षस्त्वचः कार्यश्चूर्णयेत्सर्वमेकतः ।
सितोपलादिकं चूर्णं मधुसर्पिर्युतं लिहेत् ॥ २ ॥
कासश्वासक्षयहरं हस्तपादांगदाहजित् ।
मन्दाग्निं सुप्तजिह्वत्वं पार्श्वशूलमरोचकम् ।
ज्वरमूर्ध्वगतं रक्तपित्तमाशु व्यपोहति ॥ ३ ॥

खडीसाखर सोळा तोळे, वंशलोचन आठ तोळे, पिंपळी चार तोळे, वेलदोड्याचे दाणे दोन तोळे व दालचिनी एक तोळा ह्यांचें एकत्र चूर्ण करावें. हें सितोपलादि चूर्ण तूप व मध यांशीं द्यावें. हें खोकला, श्वास, क्षय; हात, पाय व अंग ह्यांचा दाह, अग्निमांद्य, जिभेचें जडत्व, बरगड्यांतील शूल, अरुचि, ज्वर व उर्ध्वगामी रक्तपित्त ह्यांचा त्वरित नाश करितें.

लवंगादिचूर्ण.

लवंगकंकोलमुशीरचन्दनं नतं सनीलोत्पलकृष्णजीरकम् ।
एला सकृष्णागरुभृंगकेसरं कणा सविश्वा नलदं सहाम्बुना १
कर्पूरजातीफलवंशरोचनं सितार्धभागं समसूक्ष्मचूर्णितम् ।
संरोचनं तर्पणमग्निदीपनं बलप्रदं वृष्यतमं त्रिदोषनुत् ॥ २ ॥
उरोविबन्धं तमकं गलग्रहं सकासहिध्मारुचि यक्ष्मपीनसम् ।
ग्रहण्यतीसारमथासृजः क्षयं प्रमेहगुल्मांश्च निहन्ति सत्वरम् ३

लवंग, कंकोळ, वाळा, चंदन, तगर, निळीं कमळें, शहाजिरें,

वेलदोडे, कृष्णागरु, माका, नागकेशर, पिंपळी, सुंठ, जटामांसी, काळा वाळा, कापूर, जायफळ व वंशलोचन हीं सर्व औषधें समभाग घेऊन त्यांचें चूर्ण करून त्या चूर्णाच्या निम्यानें त्यांत साखर घालून सेवन करावें. हें रुचिकारक, तृप्तिदायक, अग्निदीपक, बलप्रद, अतिशय वृष्य, त्रिदोषनाशक; व हृद्रोग, तमकश्वास, गलग्रह, खोकला, उचकी, अरुचि, क्षय, पीनस, संग्रहणी, अतिसार, रक्तक्षय, प्रमेह व गुल्म ह्यांचा त्वरित नाश करितें.

कर्पूराद्यचूर्ण.

कर्पूरचोचकंकोलजातीफलदलाः समाः ।
लवंगमांसीमरिचकृष्णाशुण्ठ्यो विवर्धिताः ॥ ४ ॥
चूर्णं सितासमं ग्राह्यं सदाहक्षयकासजित् ।
वैस्वर्यपीनसश्वासच्छर्दिकण्ठामयापहम् ।
प्रयुक्तं चान्नपानैर्वा भेषजद्वेषिणां हितम् ॥ २ ॥

कापूर, दालचिनी, कंकोळ, जायफळ व जायपत्री हीं समभाग; लवंग, जाटामांसी, मिरीं, पिंपळी व सुंठ हीं औषधें भागवृद्धीनें घेऊन चूर्ण करून त्या चूर्णांत त्याच्या बरोबरीनें साखर घालून द्यावें. हें दाह, क्षय, कास, स्वरभेद, पीनस, श्वास, ओकारी व गळ्याचे रोग ह्यांचा नाश करितें. ज्याला औषध घेण्याचा कंटाळा आहे त्याला हें अन्नपानामधून दिलें असतां हितकारक आहे. हें कर्पूरादि चूर्ण हृदयदाहावर सांगितलें आहे.

एलादिचूर्ण.

एला पत्रं नागपुष्पं लवंगं भागस्त्वेषां द्वौ च खर्जूरकस्य ।
द्राक्षायष्टीशर्करापिप्पलीनां चत्वारस्तत्क्षौद्रयुक्तं क्षये स्यात् १

वेलदोडे, तमालपत्र, नागकेशर व लवंग हीं औषधें एक एक भाग, खारीक दोन भाग, मनुका, ज्येष्टमध, खडीसाखर व पिंपळी चार चार भाग ह्यांचें चूर्ण करून मधांतून क्षयावर द्यावें.

अश्वगंधाचूर्ण.

अश्वगन्धादशपलं तदर्धं नागरान्वितम् ।
तदर्धकणया युक्तं मरीचं च तदर्धकम् ॥ १ ॥
चातुर्जातं वरालं च भार्गीतालीसपत्रकम् ।

कचोराजाजिकैडर्यमांसीकङ्कोलमुस्तकम् ॥ २ ॥
रास्ना कटुकरोहिण्या जीवन्ती कुष्ठकं तथा ।
पृथक् कर्षमितं चूर्णं चूर्णेन समशर्करा ॥ ३ ॥
प्रातःकाले त्विदं चूर्णं जलेनोष्णेन सेवयेत् ।
वातक्षये पित्तशोषे त्वजागोघृतसंयुतम् ॥ ४ ॥
श्लेष्मक्षये क्षौद्रयुतं नवनीतेन मेहाजित् ।
शिरोभ्रमे च पित्तार्ते गोक्षीरेण समायुतम् ॥ ५ ॥
क्षतक्षीणे च देहे च विशेषबलवर्धनम् ।
मेहोदरं च मन्दाग्निकुक्षिशूलोदरापहम् ।
अनुपानविशेषेण सर्वरोगहरं परम् ॥ ६ ॥

अश्वगंध चाळीस तोळे, सुंठ वीस तोळे, पिंपळी दहा तोळे, मिरीं पांच तोळे; दालचिनी, तमालपत्र, वेलदोडे, नागकेशर, लवंग, भारंगमूळ, तालीसपत्र, कचोरा, जिरें, कायफळ, जटामांसी, कंकोळ, नागरमोथे, रास्ना, कुटकी, हरणदोडी व कोष्ठ हीं औषधें एक एक तोळा ह्यांचें चूर्ण करून त्या चूर्णाच्या समान साखर घालून प्रातःकाळीं ऊन पाण्याच्या घोटाबरोबर घ्यावें. वातजन्य व पित्तजन्य क्षयावर हें शेळीच्या तुपांतून घ्यावें. कफक्षयावर मधाशीं घ्यावें. हें लोण्याशीं घेतलें असतां प्रमेहाचा नाश करितें. शिरोभ्रम (घेरी) व पित्तविकार ह्यांजवर गाईच्या दुधांतून द्यावें. उरःक्षतानें क्षीण झालेल्यास हें विशेषतः बलवर्धक आहे. हें मेदनाशक असून अग्निमांद्य, कुशींतील शूळ व उदर ह्यांचा नाश करितें. हें अश्वगंधाचूर्ण अनुपानविशेषानें दिलें असतां सर्व रोग नाश करण्याविषयीं उत्तम आहे.

द्राक्षादि चूर्ण.

द्राक्षालाजसितोत्पलं समधुकं खर्जूरगोपीतुगा-
ह्रीबेरामलकाब्दचन्दननतं कंकोलजातीफलम् ।
चातुर्जातकणा सधान्यकमिदं चूर्णं समां शर्करां
प्रातर्भक्षितमात्मकेन विधिना पित्तं सदाहं जयेत् ॥ १ ॥
मूर्छां छर्दिमरोचकं च शमयेत्कायस्य कान्तिप्रदं
पाण्डुं कामलरक्तपित्तमुदरं दाहज्वरारोचकम् ।
यक्ष्माणं रुधिरप्रमेहहरणं तद्योनिदोषापहं

रक्तार्शोमदवृद्धिविद्रधिहरं द्राक्षादिचूर्णोत्तमम् ॥ २ ॥
यवगोधूमचूर्णं वा क्षीरसिद्धं घृतप्लुतम् ।
सक्तूंन्वा सर्पिषा क्षौद्रसिताक्तान्क्षयशान्तये ॥ ३ ॥

मनुका, भाताच्या लाह्या, पांढरें कमळ, ज्येष्ठमध, खारीक, उपळसरी (अनंतमूळ), वंशलोचन, वाळा, आवळकाठी, नागरमोथे, चंदन, तगर, कंकोळ, जायफळ, वेलदोडे, दालचिनी, तमालपत्र, नागकेशर, पिंपळी व धने ह्यांचें समभाग चूर्ण करून त्यांत त्या चूर्णाच्या बरोबरीनें साखर मिळवून हें प्रातःकाळीं द्यावें. म्हणजे दाहयुक्त पित्ताला जिंकतें. मूर्च्छा, ओकारी, अरुचि ह्यांचें शमन करून देहाला कांति देतें. पांडुरोग, कावीळ, रक्तपित्त, उदर, दाह, ज्वर, अरुचि, क्षय व रक्तप्रमेह ह्यांचा नाश करितें. योनिदोष, रक्तमूळव्याध, उन्माद, अंडवृद्धि व करट ह्यांचा नाश करितें. हें द्राक्षादि चूर्ण फार उत्तम आहे. तसेंच क्षयरोग बरा होण्याकरितां सातू किंवा गहू ह्यांचें पीठ दुधांत शिजवून तूप घालून खावें, किंवा त्यांचेंच भाजून केलेलें पीठ तूप, मध व साखर घालून खावें.

चतुर्दशांगलोह.

रास्नाकर्पूरतालीसं भेकपर्णी शिलाजतु ।
त्रिकटु त्रिफला मुस्ता विडङ्गदहनाः समाः ॥ १ ॥
चतुर्दशायसो भागास्तच्चूर्णं मधुसर्पिषा ।
लीढं कासं ज्वरं श्वासं राजयक्ष्माणमेव च ।
बलवर्णाग्निपुष्टीनां वर्धनं दोषनाशनम् ॥ २ ॥

रास्ना, कापूर, तालीसपत्र, ब्राह्मी, शिलाजित, सुंठ, मिरीं, पिंपळी, हिरडा, बेहडा, आवळकाठी, नागरमोथे, वावडिंग व चित्रकमूळ हीं औषधें समभाग आणि लोहभस्म चौदा भाग ह्या सर्वांचें चूर्ण करून तूप व मध ह्यांशीं द्यावें. म्हणजे तें खोकला, ज्वर, श्वास व राजयक्ष्मा ह्यांचा नाश करितें. बळ, वर्ण, अग्नि व पुष्टि ह्यांना वाढवितें व दोषांचा नाश करितें.

बृहन्नवायस.

त्रिकटुत्रिफलैलाभिर्जातीफललवङ्गकैः ।

नवभागोन्मितैरेतैः समं तीक्ष्णं मृतं भवेत् ॥ १ ॥
संचूर्ण्याऽऽलोडयेत्क्षौद्रे नित्यं यः सेवते नरः ।
कासं श्वासं क्षयं मेहं पाण्डुरोगं भगंदरम् ।
ज्वरं मन्दानलं शोथं मोहं संग्रहणीं जयेत् ॥ २ ॥

सुंठ, मिरीं, पिंपळी, हिरडा, बेहडा, आवळकाठी, वेलदोडे, जायफळ आणि लवंग हीं सर्व औषधें समभाग, आणि नऊ भाग तिख्याचें भस्म ह्या सर्वांचें चूर्ण करून तें मधाशीं जो मनुष्य नित्य सेवन करतो, त्याचे कास, श्वास, क्षय, प्रमेह, पांडुरोग, भगंदर, ज्वर, अग्निमांद्य, सूज, मूर्च्छा व संग्रहणी हे रोग दूर होतात.

शिलाजतुयोग.

फलत्रिककाथविशुद्धमादौ शीघ्रं गुडूच्या दशमूलसिद्धम् ।
स्थिरादिकाकोलियुगादिसिद्धं शिलाजतु स्यात्क्षयिषु प्रशस्तम् १

प्रथम शिलाजित त्रिफळ्याच्या काढ्यांत शुद्ध करावा. नंतर लागलेच गुळवेलीच्या व दशमूळाच्या काढ्यांत पचन करावा. त्यानंतर स्थिरादि गण व काकोल्यादि गण ह्यांच्या काढ्यांत क्रमानें शुद्ध करावा; म्हणजे तो क्षयरोग्याला देण्याला प्रशस्त आहे.

द्राक्षाखर्जूरसर्पिर्भिः पिपल्या च सह स्मृतम् ।
सक्षौद्रं ज्वरकासघ्नं स्वर्यं चैतत्प्रयोजयेत् ॥ २ ॥

मनुका, खजूर, तूप, मध व पिंपळी ह्यांमधून शिलाजित घ्यावा. तो ज्वर व खोकला ह्यांचा नाश करतो व स्वर चांगला करतो.

मधुताप्यविडंगाश्मजतुलोहघृताभयम् ।
हन्ति यक्ष्माणमत्युग्रं सेव्यमानं हिताशिना ॥ ३ ॥

मध, सुवर्णमाक्षिक, वावडिंगें, शिलाजित, लोह व हिरड्याची पूड हीं तुपाशीं घेऊन पथ्य करणाऱ्या मनुष्याचा अतिशय उग्र असा क्षय नाश पावतो.

शिलाजतुमधुव्योषताप्यलोहरजांसि च ।
क्षीरभुग्लेहिनश्चाऽऽशु क्षयः क्षयमवाप्नुयात् ॥ ४ ॥

शिलाजित, मध, सुंठ, मिरीं, पिंपळी, सुवर्णमाक्षिक व लोहभस्म ह्या औषधांचें चूर्ण करून दुधाशीं घ्यावें. म्हणजे क्षय नाश पावतो.

कृष्णाद्राक्षासितालेहः क्षये वा क्षौद्रतैलवान् ।
मधुसर्पिर्युतो वाऽश्वगन्धाकृष्णासितोद्भवः ॥ ५ ॥

पिंपळी, मनुका व खडीसाखर ह्यांत मध व तिळाचें तेल घालून कल्क करून क्षयावर द्यावा; किंवा आस्कंध, पिंपळी व खडीसाखर ह्यांचा कल्क, तूप व मध ह्यांजबरोबर द्यावा.

कूष्माण्डकगिरोत्थेन रसेन परिपेषितम् ।
लाक्षाकर्षद्वयं पीत्वा जयेद्रक्तक्षयं तथा ॥ ६ ॥

दोन तोळे लाखेचें चूर्ण कोहळ्याच्या गराच्या रसांतून वाटून प्यावें, म्हणजे रक्तक्षयाचा नाश होतो.

शतपुष्पा समधुकं कुष्ठं तगरचन्दनम् ।
आलेपनं स्यात्सघृतं शिरःपार्श्वांसशूलनुत् ॥ ७ ॥

बडिशेप, ज्येष्टमध, कोष्ट, तगर, चंदन ह्यांचा तुपाशीं लेप केला असतां मस्तक, कुशी व खांदे ह्या ठिकाणचा शूल नाहींसा होतो.

अश्वत्थवल्कलं चैव त्रिकटु लोहकिट्टकम् ।
गुडेन सह दातव्यं क्षयरोगविनाशनम् ॥ ८ ॥

पिंपळाची साल, सुंठ, मिरीं, पिंपळी व मंडूरभस्म ह्यांचें चूर्ण गुळाशीं द्यावें. तें क्षयरोगनाशक आहे.

च्यवनप्राश्यावलेह.

द्विपञ्चमूलीजलसिद्धमाज्यं वासाघृतं वाऽप्यथ षट्पलं च ।
पेयं हि तच्छागलगव्यतोऽथ प्रयुज्यते नागबलाभिधानम् ॥१॥

दशमूळाचा काढा अगर अडुळशाचा रस ह्यांनीं सिद्ध केलेलें गाईचें किंवा शेळीचें तूप अगर षट्पलघृत क्षयनाशार्थ प्राशन करावें; किंवा नागबलाघृताचीही योजना करतात.

शृङ्गीतामलकीफलत्रिकबलाछिन्नाविदारीसटी-
जीवन्तीदशमूलचन्दनघनैर्नीलोत्पलैलावृषैः ।
मृद्वीकाष्टकवर्गपौष्करयुतैः सार्धं पृथक्पालिकै-
रष्टोनानि शतानि पञ्च विपचेद्धात्रीफलानामपः ॥ २ ॥
उद्धृत्याऽऽमलकानि तैलघृतयोः षड्भिश्च षड्भिः पलै-
र्भृष्टान्यर्धतुलां निधाय विधिवन्मत्स्यण्डिकायाः पचेत् ।
शीते षण्मधुनः पलानि कुडवो वांशाश्चतुर्जाततो-
मुष्टिर्मागधिकापलद्वयमयं प्राश्यः स्मृतश्च्यावनः ॥ ३ ॥
न शोषः साफल्यं व्रजति वपुषि क्षीणमनसो
न मूर्च्छा नो छर्दिस्तदपि च न च श्वासकसनम् ।
न चालक्ष्मीर्विघ्नः क्वचिदपि च न व्यापदभयं

प्रयोगादेतस्मान्मनसिजधिया बिभ्रति मनः ॥ ४ ॥

काकडशिंगी, भुईआवळी, हिरडा, बेहडा, आवळकाठी, चिकणामूळ, गुळवेल, भुईकोहळा, कचोरा, हरणदोडी, दशमुळें, चंदन, नागरमोथे, निळें कमळ, वेलदोडे, अडुळसा, मनुका, जीवक, ऋषभक, मेदा, महामेदा, ऋद्धि, वृद्धि, काकोली, क्षीरकाकोली व पोखरमूळ हीं औषधें पृथक् सहा सहा तोळे आणि आवळे चारशें ब्याण्णव घालून (दहाशें चोवीस तोळे) पाण्यांत काढा करावा. तो अष्टमांश उरल्यावर त्यांतून आवळे काढून घेऊन ते, चोवीस तोळे तेल व चोविस तोळे तूप ह्यांत पचन करावे. नंतर त्या काढ्यांत ते आवळे व दोनशें तोळे साखर घालून लेह करावा व तो थंड झाल्यावर त्यांत चोवीस तोळे मध, सोळा तोळे वंशलोचन, दालचिनी, तमालपत्र, वेलदोडे, नागकेशर हीं दोन दोन तोळे व पिंपळीचें चूर्ण आठ तोळे घालून ढवळून सारखें करून ठेवावा, आणि सेवन करावा. ह्याला च्यवनप्राश्यावलेह म्हणतात. हा सेवन करणाराला क्षय होत नाहीं. देह पुष्ट होतो; मूर्च्छा व ओकारी हे विकार होत नाहींत; तसेंच श्वास व खोकला हे विकारही होत नाहींत; त्याला दारिद्र्य व विघ्न हीं कधीं येत नाहींत व त्याला केव्हांही रोग होण्याची भीति नसते. ह्या प्रयोगानें कामवासना उत्पन्न होते.

खंडपिप्पल्यवलेह.

कृष्णाप्रस्थं पचेच्चाऽऽढकपयसि घृतस्याञ्जलिं खण्डपात्रं
दत्वा लेहोऽयमस्मिन्सुरकुसुमचतुर्जातविश्वोषणादीन् ।
ग्रन्थिश्रीखण्डयष्टीमधुमसृणजलं जातिकोशं च कर्षं
प्रत्येकं चूर्णयित्वा मधुकुडवयुतः स्याच्च कृष्णावलेहः ॥१॥
आदौ मन्दाग्निकार्श्यं हरति स च शिशुस्त्रीजरन्मानुषेषु
प्रायो वृष्यः क्षयाद्ये विपुलबलकरो दीपनः पाचनश्च ।
कासश्वासांश्च मेहक्षयरुगतितृषाकामलापाण्डुकण्डू-
प्लीहाजीर्णज्वरांश्चानिलकफविकृतिं रक्तपित्तं च हन्यात् ॥२॥

चौसष्ट तोळे पिंपळी दोनशें छपन्न तोळे दुधांत शिजवावी. नंतर त्यांत सोळा तोळे तूप व दोनशें छपन्न तोळे खडीसाखर

घालून लेह करावा; आणि त्यांत लवंग, दालचिनी, तमालपत्र, वेलदोडे, नागकेशर, सुंठ, मिरीं, गठोना, चंदन, ज्येष्टमध, वाळा व जायपत्री हीं औषधें तोळा तोळा घेऊन चूर्ण करून तें त्या लेहांत घालावें. आणि मध सोळा तोळे घालावा. म्हणजे हा खंडापिप्पल्यवलेह तयार झाला. हा अग्निमांद्य व कृशत्व ह्यांचा नाश करतो. हा बाल, स्त्रिया व वृद्ध मनुष्यें ह्या सर्वांना हितकारक आहे. हा प्रायः वृष्य असून क्षयनाशक, विपुल बळ देणारा, अग्निदीपक, पाचक; व कास, श्वास, मेह, अत्यंत वाढलेला क्षयरोग, तहान, कावीळ, पांडुरोग, कंडू, पांथरी, जीर्णज्वर, वातकफजन्य विकार व रक्तपित्त ह्यांचा नाश करतो.

वासावलेह.

तुलामादाय वासायाः पचेदष्टगुणे जले ।
तेन पादावशेषेण पाचयेदाढकं भिषक् ॥ १ ॥
चूर्णानामभयानां तु खंडात्पलशतं तथा ।
द्वे पले पिप्पलीचूर्णात्सिद्धे शीते च माक्षिकात् ॥ २ ॥
कुडवं पलमानं तु चातुर्जातं सुचूर्णितम् ।
क्षिप्त्वाऽवलोडितं खादेद्रक्तपित्तक्षतक्षयी ।
कासश्वासगृहीतश्च यक्ष्मणा च विशेषतः ॥ ३ ॥

चारशें तोळे अडुळसा आणून आठपट पाण्यांत काढा करावा. तो चतुर्थांश उरल्यावर त्यांत दोनशें छपन्न तोळे हिरड्याचें चूर्ण व चारशें तोळे खडीसाखर घालून लेह करावा. तो थंड झाल्यावर त्यांत आठ तोळे पिंपळीचें चूर्ण, सोळा तोळे मध; दालचिनी, तमालपत्र, वेलची व नागकेशर ह्यांचें चूर्ण एक एक तोळा घालून ढवळून ठेवावा; व तो रक्तपित्त, उरःक्षत व क्षय ह्यांनीं पीडिलेल्यांनीं सेवन करावा. विशेषतः खोकला आणि श्वास ह्यानें पीडिलेल्या व राजयक्ष्मानें पीडिलेलया लोकांनीं हा सेवन करावा.

अगस्त्यवलेह.

हरीतकीशतं भद्रं यवानामाढकं तथा ।
पलानां दशमूलस्य विंशतिं च नियोजयेत् ॥ १ ॥
चित्रकः पिप्पलीमूलमपामार्गः सटी तथा ।

कपिकच्छुः शङ्खपुष्पी भार्गी च गजपिप्पली ॥ २ ॥
बला पुष्करमूलं च पृथग्द्विपलमात्रया ।
पचेत्पञ्चाढके नीरे यवैः स्विन्नैः शृतं नयेत् ॥ ३ ॥
तच्चाभयाशतं दद्यात्क्वाथे तस्मिन्विचक्षणः ।
सर्पिस्तैलाष्टपलिकं क्षिपेद्गुडतुलां तथा ॥ ४ ॥
पक्त्वा लेहत्वमानीय सिद्धशीते पृथक्पृथक् ।
क्षौद्रं च पिप्पलीचूर्णं दद्यात्कुडवमात्रया ॥ ५ ॥
हरीतकीद्वयं खादेत्तेन लेहेन नित्यशः ।
क्षयं कासं ज्वरं श्वासं हिक्काशोंरुचिपीनसान् ॥ ६ ॥
ग्रहणीं नाशयत्येष वलीपलितनाशनः ।
बलवर्णकरः पुंसामवलेहो रसायनम् ॥ ७ ॥
विहितोऽगस्त्यमुनिना सर्वरोगप्रणाशनः ।

हिरडे शंभर, सातू दोनशें छपन्न तोळे, दशमूळें ऐशीं तोळे, चित्रकमूळ, पिंपळमूळ, अघाडा, कचोरा, कवचबीज, शंखपुष्पी, भार्गी, गजपिंपळी, चिकणामूळ, पोखरमूळ हीं औषधें आठआठ तोळे घेऊन बाराशें ऐशीं तोळे पाण्यांत सातू शिजेपर्यंत पचन करावें. नंतर काढा काढून घेऊन त्यांत पूर्वीचे शिजलेले हिरडे पुनः घालून तूप व तेल सोळा सोळा तोळे घालावें, आणि चारशें तोळे गूळ घालून लेहाप्रमाणें पाक करावा. तो थंड झाल्यावर त्यांत मध सोळा तोळे व पिंपळीचें चूर्ण सोळा तोळे घालून ढवळून ठेवावा. ह्याला अगस्त्यवलेह असें म्हणतात. ह्यांतील दोन हिरडे त्या लेहाबरोबर नित्य खावेत. म्हणजे हा अवलेह क्षय, खोकला, ज्वर, श्वास, उचकी, मूळव्याध, अरुचि, पीनस, संग्रहणी व वलीपलितरोग ह्यांचा नाश करतो. हा अवलेह मनुष्याला बल व वर्णदायक असून रसायन आहे. हा सर्व रोगनाशक असा अवलेह अगस्ति मुनीनें सांगितला आहे.

शर्करामधुसंयुक्तं नवनीतं लिहन्क्षयी ।
क्षीराशी लभते पुष्टिमतुल्ये चाऽऽज्यमाक्षिके ॥ ८ ॥

क्षयी मनुष्य साखर व मध ह्यांजबरोबर लोणी सेवन करून दुधावर राहणारास, तसेंच तूप व मध विषम प्रमाणांत खाऊन दुधावर राहणारास पुष्टि येते.

शिवगुटिका.

त्रीन्वारान्प्रथमं शिलाजतु जले भाव्यं भवेन्त्रैफले
निःक्वाथे दशमूलजेऽथ तदनु च्छिन्नोद्भवाया रसे ।
वास्त्यालकथने पटोलसलिले यष्टीकषाये पुन-
र्गोमूत्रेऽथ पयस्यथापि च गवामेषां कषाये ततः ॥ १ ॥
द्राक्षाभीरुविदारिकाद्वयपृथक्पर्णीस्थिरापौष्करैः
पाठाकौटजकर्कटाख्यकटुकारास्नाम्बुदालम्बुषैः ।
दन्तीचित्रकचव्यवारणकणावीराष्टवर्गौषधै-
रद्रोणे चरणस्थिते पलमितैरेभिः पृथग्भावयेत् ॥ २ ॥
धात्रीमेषविषाणिकात्रिकटुकैरेभिः पृथक्पञ्चकै-
र्द्रव्यैश्च द्विपलोन्मितैरपि पलं चूर्णं विदारीभवम् ।
तालीसात्कुडवं चतुष्पलमिह प्रक्षिप्यते सर्पिष-
स्तैलस्य द्विपलं पलाष्टकमथ क्षौद्राद्भिषग्योजयेत् ॥ ३ ॥
तुल्यं पलैः षोडशभिः सितायास्त्वक्क्षीरिकापत्रककेसरैश्च ।
बिल्वांशकैस्त्वक्तृटिसंप्रयुक्तैरित्यक्षमात्रा गुटिकाः प्रकल्प्याः ४
तासामेकतमां प्रयोज्य विधिवत्प्रातः पुमान्भोजनात्
प्राग्वा मुद्गदलाम्बुजाङ्गलरसं शीतं शृतं वा जलम् ।
माक्षीकं मदिरामगुर्वशनभुक्पीत्वा पयो वा गवां
प्राप्नोत्यङ्गमनङ्गवत्सुभगतां संपन्नमानन्दकृत् ॥ ५ ॥
शोफग्रन्थिविमन्थवेपथुवमीपाण्ड्वामयश्लीपद-
प्लीहार्शःप्रदरप्रमेहपिटिकामेहाश्मरीशर्कराः ।
हृद्रोगार्बुदवृद्धिविद्रधियक्ष्मयोन्यामयाः सानिला
ऊरुस्तम्भभगंदरं ज्वररुजस्तूनी प्रतूनी तृषा ॥ ६ ॥
वातासृक्प्रबलं प्रवृद्धमुदरं कुष्ठं किलासं कृमीन्
कासश्वासमुरःक्षतक्षयमसृक्पित्तं सपानात्ययम् ।
उन्मादं मदमप्यपस्मृतिमतिस्थौल्यं कृशत्वं तनोः
सालस्यं च हलीमकं च शमयेन्मूत्रस्य कृच्छ्राणि च ॥ ७
भवति जरया सर्वश्वेतैरकालजराकृतै-
र्वृतमलिकुलाकारैरेभिः शिरश्च शिरोरुहैः ।
प्रसरति बलं त्वस्तातङ्कं वपुश्च समुद्वहन्
प्रभवति शतं स्त्रीणां गन्तुं जनो जनवल्लभः ॥ ८ ॥
स्तिमितमतिरप्यज्ञानान्धः सदस्यपटुः पुमान्
सकृदपि यया ज्ञानोपेतः श्रुतिस्मृतिमान्भवेत् ।
व्रजति च यया युक्तो योगी शिवस्य समीपतां
शिवगुटिकया कस्तामेतां करोति न मानुषः ॥ ९ ॥

त्रिफळ्याचा काढा, दशमुळाचा काढा, गुळवेलीचा रस, चिकण्यामुळाचा काढा, गोमूत्र व गाईचें दूध ह्यांत तीन तीन दिवस खलावा. नंतर द्राक्षें, शतावरी, भुईकोहळा, कोहळा, साळवण, पिटवण, पोखरमूळ, पहाडमूळ, कुडा, काकडशिंगी, कुटकी, रास्ना, नागरमोथे, गोरखमुंडी, दांतीमूळ, चवक, चित्रक, गजपिंपळी, भुईआवळी, ऋद्धि, वृद्धि, मेदा, महामेदा, जीवक, ऋषभक, काकोली व क्षीरकाकोली हीं औषधें वेगळीं वेगळीं चार चार तोळे घेऊन त्यांचा दहाशें चोवीस तोळे पाण्यांत चतुर्थांश काढा करून त्यांच्या वेगवेगळ्या भावना द्याव्या. नंतर आवळकाठी, मेढशिंगी, सुंठ, मिरीं, पिंपळी हीं पांच औषधें आठआठ तोळे घेऊन त्यांचें चूर्ण करावें. भुईकोहळ्याचें चूर्ण चार तोळे, तालीसपत्र सोळा तोळे, तूप सोळा तोळे, तेल आठ तोळे, मध बत्तीस तोळे, खडीसाखर चौसष्ट तोळे; वंशलोचन, तमालपत्र, नागकेशर, दालचिनी व वेलचीदाणे हीं औषधें चार चार तोळे, ह्या सर्वांचें चूर्ण करून सर्वांचा एकत्र खल करून एकएक तोळ्याची गोळी करावी. आणि रोज सकाळीं जेवणापूर्वीं एक गोळी खावी, व त्याजवर मुगाच्या डाळीचें कढण, जांगल मांसाचा रस किंवा तापवून गार केलेलें पाणी प्यावें. मध, मद्य व हलकें अन्न खावें. किंवा दूध पिऊन रहावें; म्हणजे मदनाप्रमाणें सुंदर शरीर होतें, भाग्य प्राप्त होतें, संपत्ति मिळते व आनंद वाटतो. सूज, गांठी, मलावरोध, कंप, ओकारी, पांडुरोग, श्लीपद, पानथरी, मूळव्याध, प्रदर, प्रमेह-पीटिका, प्रमेह, मूतखडा, मूत्रशर्करा, हृद्रोग, अर्बुद, अंडवृद्धि, विद्रधि, यकृत्, योनिरोग, वातजन्य रोग, ऊरुस्तंभ, भगंदर, ज्वरपीडा, तूनी, प्रतूनी, तहान, प्रबळ असें वातरक्त, अतिशय वाढलेलें उदर, किलास, कुष्ट, कृमि, खोकला, श्वास, उरःक्षत, क्षय, रक्तपित्त, मदात्यय, उन्माद, कैफ, अपस्मार, अतिस्थूलत्व, कृशत्व, आळस, हलीमक व मूत्रकृच्छ्र ह्यांचें ही गुटिका शमन करितें. म्हातारपणामुळें किंवा अकालिक वार्धक्यामुळें

पांढरे झालेले डोक्याचे केंस भ्रमराप्रमाणें काळे होतात. शरीरांतील सर्व रोग लयास जाऊन शक्ति वाढते, व तो पुरुष शंभर स्त्रियांशीं रमण्यास समर्थ होतो, आणि लोकांमध्यें श्रेष्ठ होतो. जो अल्पमति व ज्ञानशून्य व वक्तृत्वहीन आहे, तो ह्या गुटिकेच्या प्रभावानें ज्ञानसंपन्न व श्रुति व स्मृतिपाठक होतो. फार काय सांगावें? ज्या गुटिकेच्या प्रभावानें योगी शिवसायुज्यतेप्रत जातो, ती ही शिवगुटिका मनुष्याला काय करणार नाहीं?

लघु शिवगुटिका.

कौटजत्रिफलानिम्बपटोलघननागरैः ।
भावितानि दशाहानि रसैर्द्वित्रिगुणानि च ॥ १ ॥
शिलाजतुपलान्यष्टौ तावती शितशर्करा ।
त्वक्क्षीरिपिप्पलीधात्रीकर्कटाख्यान्पलोन्मितान् ॥ २ ॥
निदिग्धिफलमूलाभ्यां पलं युंज्यात्त्रिजातकात् ।
मधुत्रिफलसंयुक्तान्कुर्यादक्षसमान्गुडान् ॥ ३ ॥
दाडिमाम्रपयःक्षीररसयूषसुरासवान् ।
तं भक्षयित्वाऽनुपिबेन्निरन्नो हितभक्ष्यभुक् ॥ ४ ॥
पाण्डुकुष्ठज्वरप्लीहतमकार्शोभगंदरम् ।
नाशयेन्मूत्रकृच्छ्राणि मूत्रस्थानविबन्धनात् ॥ ५ ॥
यद्यत्र योजितं येन कान्तलोहं तथाऽभ्रकम् ।
पलं पलं च मिलिते तदा स्यात्किमतः परम् ॥ ६ ॥
तीव्रदुःखप्रदं पाण्डुं प्रमेहं सपरिग्रहम् ।
राजरोगं ज व्याधींश्च जयेदिति किमद्भुतम् ॥ ७ ॥

कुडयाची साल, हिरडा, बेहडा, आवळकाठी, कडुनिंब, कडुपडवळ, नागरमोथे व सुंठ, ह्यांचा रस दुप्पट किंवा तिप्पट घालून शिलाजिताला दहा दिवस भावना द्याव्यात. नंतर तो शिलाजित बत्तीस तोळे घेऊन त्याच्या समान खडीसाखर घ्यावी. वंशलोचन, पिंपळी, आवळकाठी व काकडशिंगी, हीं औषधें चार चार तोळे घ्यावींत. रिंगणीचीं मुळें व फळें चार तोळे; दालचिनी, तमालपत्र, वेलची व नागकेशर हीं एक एक तोळा, मध बारा तोळे ह्या सर्वांचा एकत्र खल करून एक एक तोळ्याच्या गोळ्या कराव्या. आणि त्यांतील एक गोळी सकाळीं जेवणापूर्वीं खाऊन त्यावर डाळिंबाचा

रस, आंब्याचा रस, दूध, मुगाचा यूष, मद्य किंवा आसव प्यावें, व त्याजवर पथ्यकारक अन्न खावें. म्हणजे पांडुरोग, कुष्ट, ज्वर, पानथरी, तमक श्वास, मूळव्याध व भगंदर ह्यांचा नाश करिते. तसेंच मूत्रावरोध व मूत्रकृच्छ्र ह्यांचाही नाश करिते. ह्या गुटिकेच्या पाठांत जर चार तोळे कांतलोहभस्म व अभ्रकभस्म घातलें तर मग ह्या गुटिकेपेक्षां अधिक तें काय असणार? ही गुटिका तीव्र दुःखदायक पांडुरोग, प्रमेह, मलावरोध व क्षय ह्यांना जिंकते, ह्यांत काय आश्चर्य आहे?

सूर्यप्रभागुटिका.

दार्वी व्योषविडङ्गचित्रकवचापीताकरञ्जामृता-
देवाह्वातिविषा त्रिवृत्सकटुका कुस्तुम्बरुः कारवी ।
द्वौ क्षारौ लवणत्रयं गजकणा चव्यं तथा पुष्करं
तालीसं कणमूलपुष्करजटाभूनिम्बसंज्ञैर्युतम् ॥ १ ॥
भार्गी पद्मकजीरकोशकुटजो दन्ती वचा भद्रकं
सर्वं कर्षसमांशकं सुभिषजा सूक्ष्मं च संचूर्णितम् ।
तद्वत्पञ्चपलं वरं गिरिजतु स्यात्पञ्चमुष्टिः पुरो
लोहस्य द्विपलं पलद्वयमथो ताप्यस्य संमिश्रितम् ॥२॥
क्षिप्त्वा पञ्च पलानि शुभ्रसिकता वांशीपलं योजित-
मेकैकं त्रिसुगन्धि वस्तु पलितं क्षौद्रैर्घृतैर्लेहवत् ।
एकीकृत्य समांशमेव गुटिका कार्या सुवर्णान्विता
सा च ब्रह्ममुखाम्बुजप्रकटिता सूर्यप्रभा नामतः ॥ ३ ॥
शोषं कासमुरःक्षतं सतमकं पाण्ड्वामयं कामलाम्
गुल्मं विद्रधिपार्श्वशूलमुदरं स्त्रीषु क्षयं च क्रिमीन् ।
कुष्ठार्शोविषमज्वरग्रहणिकामूत्रग्रहं नाशयेत्
भुक्त्वैकां गुटिकां प्रहृष्टमनसा योज्यं यथेष्टाशनम् ॥४॥
नास्त्येतत्सममौषधं त्रिजगतीचक्रे हितं प्राणिना-
मुद्दामप्रमदामदद्विपदराट्सिंही तु सूर्यप्रभा ॥ ५ ॥

दारुहळद, सुंठ, मिरीं, पिंपळी, वावडिंग, चित्रकमूळ, वेखंड, हळद, करंजसाल, गुळवेल, देवदार, अतिविष, तेड, कुटकी, धने, बडीशेप, जवखार, सज्जीखार, सैंधव, पादेलोण, बिडलोण, गजपिंपळी, चवक, कमळ, तालीसपत्र, पोखरमूळ, काडेचिराईत, भारंगमूळ, पद्मकाष्ट, जिरें, जायपत्री, कुडयाची साल, दांतीमूळ,

वेखंड व क्षुद्र नागरमोथे हीं प्रत्येक औषधें तोळातोळा घेऊन बारीक चूर्ण करावें. नंतर वीस तोळे शुद्ध शिलाजित, चाळीस तोळे गुग्गूळ, आठ तोळे लोहभस्म, आठ तोळे सुवर्णमाक्षिक भस्म, वीस तोळे खडीसाखर, चार तोळे वंशलोचन; दालचिनी, तमालपत्र व वेलची हीं एक एक तोळा ह्या सर्वांचा मध व तूप ह्यांमध्यें एकत्र खल करून एक एक तोळ्याची गोळी करावी. ही ब्रह्मदेवानें सांगितलेली सूर्यप्रभा नांवाची गुटिका क्षय, खोकला, उरःक्षत, तमकश्वास, पांडुरोग, कावीळ, गुल्म, विद्रधि, बरगड्यांतील शूल, उदर, स्त्रियांचा क्षय (बाळंतरोग), कृमि, कुष्ट, मूळव्याध, विषमज्वर, संग्रहणी व मूत्रावरोध ह्यांचा नाश करिते. ह्या गोळ्यांपैकीं एक गोळी खाऊन त्याजवर प्रसन्न चित्तानें यथेच्छ भोजन करावें. ह्या गुटिकेप्रमाणें जगत्रयांत दुसरें औषध नाहीं. ही सूर्यप्रभागुटिका मदोन्मत्त तरुण स्त्रियांच्या कामरूप हत्तीला सिंहाप्रमाणें आहे.

बलाद्यघृत.

बला श्वदंष्ट्रा बृहती कलशी धावनी स्थिरा ।
निम्बः पर्पटकं मुस्तं त्रायमाणं दुरालभा ॥ १ ॥
कृत्वा कषायं पेष्यार्थे दद्यात्तामलकीं सटीम् ।
द्राक्षां पुष्करमूलं च मेदामामलकानि च ॥ २ ॥
घृतं पयश्च तत्सिद्धं सर्पिर्ज्वरहरं परम् ।
क्षयकासप्रशमनं शिरःपार्श्वरुजापहम् ॥ ३ ॥

चिकणामूळ, गोखरू, रिंगणमूळ, पिटवण, डोरलीमूळ, सालवण, कडुनिंबाची साल, पित्तपापडा, नागरमोथे, त्रायमाण, धमासा ह्यांचा काढा व भुईआवळी, कचोरा, मनुका, पोखरमूळ, मेदा व आवळकाठी ह्यांचा कल्क व दूध ह्यांमध्यें तूप सिद्ध करावें. हें बलाघृत उत्तम ज्वरनाशक असून क्षय व खोकला ह्यांचें शमन करणारें व मस्तक आणि बरगड्या ह्यांतील पीडा निवारण करणारें आहे.

कोलाद्यघृत.

कोललाक्षारसे तद्वत्क्षीराष्टगुणसाधितम् ।
कल्कैर्विडङ्गदार्वीत्वग्द्राक्षाक्षोटफलान्वितैः ॥ १ ॥
घृतं खर्जूरमृद्वीकामधुकैः सपरूषकैः ।

सपिप्पलीकं वैस्वर्यकासश्वासज्वरापहम् ॥ ३ ॥

बोरीच्या लाखेचा काढा व आठपट दूध ह्यांमध्यें वावडिंग, दारुहळद, दालचिनी, द्राक्षें, अक्रोड, खारीक, मनुका, ज्येष्टमध, फालसा व पिंपळी ह्यांचा कल्क घालून तूप सिद्ध करावें. ह्याला कोलादिघृत म्हणतात. हें स्वरभेद, खोकला, श्वास व ज्वर ह्यांचा नाश करितें.

गोक्षुरादि घृत.

श्वदंष्ट्रां सदुरालभां चतस्रः पर्णिनीर्बलाम् ।
भागान्पलोन्मितान्कृत्वा पलं पर्पटकस्य च ॥ १ ॥
पचेद्दशगुणे तोये दशभागावशेषिते ।
रसे पूते तु द्रव्याणामेषां कल्कान्समावपेत् ॥ २ ॥
सटीपुष्करमूलानां पिप्पलीत्रायमाणयोः ।
आमलक्याः किराताना रिक्तस्य कटुकस्य च ॥ ३ ॥
फलानां सारिवायाश्च सुपिष्टा कर्षसंमितान् ।
तैः साधयेद् घृतप्रस्थं क्षीरं द्विगुणितं भिषक् ॥ ४ ॥
ज्वरं दाहं तमः श्वासं कासं पार्श्वशिरोरुजम् ।
तृष्णां छर्दिमतीसारमेतत्सर्पिर्व्यपोहति ॥ ५ ॥

गोखरू, धमासा, सालवण, पिठवण, ब्राह्मी, सातवीण, चिकणामूळ हीं औषधें चार चार तोळे व पित्तपापडा चार तोळे ह्यांचा दसपट पाण्यांत दशांश काढा करावा. आणि त्या काढ्यांत कचोरा, पोखरमूळ, पिंपळी, त्रायमाण, आवळकाठी, तेजबळ, सुंठ, मिरीं, पिंपळी व उपळसरीचीं फळें ह्यांचा कल्क एक एक तोळा घालून चौसष्ट तोळे तूप, दुप्पट दूध घालून सिद्ध करावें. हें श्वदंष्ट्रादि (गोक्षुरादि) घृत ज्वर, दाह, मूर्च्छा, श्वास, कास, बरगड्या व मस्तक ह्यांमधील पीडा, तहान, ओकारी व अतिसार ह्यांचा नाश करितें.

जीवंत्यादि घृत.

जीवन्तीमधुकं द्राक्षां फलानि कुटजस्य च ।
सटीपुष्करमूलं च व्याघ्रीं गोक्षुरकम्बलाम् ॥ १ ॥
नीलोत्पलं चाऽऽमलकीं त्रायमाणां दुरालभाम् ।
पिप्पलीं च समां पिष्ट्वा घृतं वैद्यो विपाचयेत् ॥ २ ॥

एतद्व्याधिसमूहस्य रोगराजस्य दुर्जयम् ।
रूपमेकादशविधं सर्पिरग्र्यं व्यपोहति ॥ ३ ॥

गुळवेल, ज्येष्ठमध, द्राक्षें, इंद्रजव, कचोरा, पोखरमूळ, रिंगणमूळ, गोखरू, चिकणामूळ, निळें कमळ, आवळकाठी, त्रायमाण, धमासा व पिंपळी ह्यांचा समभाग कल्क करून त्या कल्कानें तूप पचन करावें. हें जीवंत्यादि घृत व्याधिसमुदायांनीं युक्त जो राजयक्ष्मा त्याला अजिंक्य असून एकादशरूप क्षयाचा नाश करितें.

चंदनादि तेल.

चन्दनाम्बुनखं रात्रि यष्टी शैलेयपद्मकम् ।
मञ्जिष्ठा सरलं दारु शट्येला जातिकेसरम् ॥ १ ॥
पत्रं बिल्वमुशीरं च कङ्कोलं चन्दनाम्बुदम् ।
हरिद्रे सारिवे तिक्ता लवङ्गागुरुकुंकुमम् ॥ २ ॥
त्वग्रेणुनलिका चैभिस्तैलं मस्तु चतुर्गुणम् ।
लाक्षारससमं सिद्धं ग्रहघ्नं बलवर्णकृत् ॥ ३ ।
अपस्मारज्वरोन्मादकृत्यालक्ष्मीविनाशनम् ।
आयुःपुष्टिकरं चैव वशीकरणमुत्तमम् ।
विशेषात्क्षयरोगघ्नं रक्तपित्तहरं परम् ॥ ४ ॥

चंदन, वाळा, नखला, हळद, जेष्ठमध, दगडफूल, पद्मकाष्ठ, मंजिष्ठ, सरळ देवदार, देवदार, कचोरा, वेलदोडे, जायफळ, नागकेशर, तमालमत्र, बेलफळ, वाळा, कंकोळ, रक्तचंदन, काळा वाळा, दळद व दारुहळद, पांढरी व काळी उपळसरी, कुटकी, लवंग, अगरु, केशर, दालचिनी, रेणुकबीज, गुलछबू, ह्या औषधांचा कल्क करून त्यांत तेलाच्या चौपट दह्याची निवळ व तेलासमान लाखेचा काढा घालून तेल सिद्ध करावें. तें अंगास मर्दन केलें असतां ग्रहपीडानाशक, बल व वर्णदायक, अपस्मार, ज्वर, उन्माद, राक्षसबाधा व दारिद्र्य ह्यांचा नाश करणारें, आयुष्य व पुष्टि ह्यांना देणारें, मनुष्याला वश करविणारें आणि विशेषतः क्षय व रक्तपित्त ह्यांना दूर करणारें आहे. ह्याला चंदनादि तेल म्हणतात.

लाक्षादि तेल.

तैलं प्रस्थमितं चतुर्गुणजतुक्वाथं चतुर्मस्तुरु-
ग्यष्टीदारुनिशाब्दमूर्वकटुकामिश्यश्च कौन्तीहिमैः ।

रास्नाद्यैः पिचुसंमितैः कृतमिदं शस्तं तु जीर्णज्वरे
सर्वस्मिन्विषमेऽपि यक्ष्मणि शिशौ वृद्धे सगर्भासु च १

तिळाचें तेल चौसष्ट तोळे, लाखेचा काढा चौपट, दह्याची निवळ तेलाच्या चौपट; कोष्ट, जेष्ठमध, देवदार, हळद, नागरमोथे, मोरवेल, कुटकी, बडिशेप, रेणुकबीज, कापूर व रास्ना ह्या औषधांचा कल्क तोळा तोळा घालून तेल सिद्ध करावें. तें जीर्णज्वरावर फार प्रशस्त आहे. सर्व प्रकारचे विषम ज्वर व क्षय ह्या विकारांमध्यें व बाल, वृद्ध व गर्भिणी स्त्रिया ह्यांना हें फार उपयोगी आहे.

चंदनबलाक्षालादि तेल.

चन्दनं च बलामूलं लाक्षा लामज्जकं तथा ।
पृथक्पृथक्प्रस्थमितं जलद्रोणे विपाचयेत् ॥ १ ॥
चतुर्भागावशेषेऽस्मिंस्तैलं प्रस्थद्वयं क्षिपेत् ।
चन्दनोशीरमधुकशताह्वा कटुरोहिणी ॥ २ ॥
देवदारु निशा कुष्ठं मञ्जिष्ठागुरुवालकम् ।
अश्वगन्धाबलादार्वीमूर्वा मुस्ता समूलिका ॥ ३ ॥
एला त्वङ्नागकुसुमं रास्ना लाक्षा सुगन्धिका ।
चम्पकं पीतसारं च सारिवा चोरकद्वयम् ॥ ४ ॥
कल्कैरेतैः समायुक्तं क्षीराढकसमन्वितम् ।
तैलमभ्यञ्जने श्रेष्ठं सप्तधातुविवर्धनम् ॥ ५ ॥
कासश्वासक्षयहरं सर्वच्छर्दिनिवारणम् ।
असृग्दरं रक्तपित्तं हन्ति पित्तकफामयम् ॥ ६ ॥
कान्तिकृद्दाहशमनं कण्डूविस्फोटनाशनम् ।
शिरोरोगं नेत्रदाहमङ्गदाहं च नाशयेत् ॥ ७ ॥
वातामयहतानां च क्षीणानां क्षीणरेतसाम् ।
बालमध्यमवृद्धानां शस्यते शोफकामले ।
पाण्डुरोगे विशेषेण सर्वज्वरविनाशनम् ॥ ८ ॥

चंदन, चिकणामूळ, लाख व वाळा हीं प्रत्येक चौसष्ट तोळे घेऊन दहाशें चोवीस तोळे पाण्यांत चतुर्थांश काढा करावा. नंतर त्या काढ्यांत एकशें अठ्ठावीस तोळे तेल घालून चंदन, वाळा, ज्येष्टमध, बडिशेप, कुटकी, देवदार, हळद, कोष्ट, मंजिष्ठ, अगरु, काळा वाळा, आस्कंध, चिकणामूळ, दारुहळद, मोरवेल, मुळ्यांसह

नागरमोथे, वेलदोडे, दालचिनी, नागकेशर, रास्ना, लाख, पांच, चाफ्याचीं फुलें, पिवळा चंदन, उपळसरी, तगर व गठोना ह्यांचा कल्क व दोनशें छपन्न तोळे दूध ह्यांमध्यें तेल पचन करावें. हें तेल अंगाला लावण्यास श्रेष्ठ असून सप्त धातूंना वाढविणारें आहे. हें खोकला श्वास, क्षय, सर्व प्रकारची वांति, रक्तप्रदर, रक्तपित्त व पित्तकफात्मक रोग ह्यांचा नाश करितें, कांति वाढवितें, दाह शांत करिते; कंडु व विस्फोट (फोड) ह्यांचा नाश करितें; शिरोरोग, नेत्रदाह व अंगाचा दाह ह्यांचा नाश करितें. वातरोगानें जे पिछाडलेले, क्षीण झालेले, धातुक्षयी बाल, तरुण व वृद्ध ह्यांना हें हितावह असून सूज, कावीळ, पांडुरोग व विशेषतः सर्व ज्वर ह्यांचा नाश करणारें आहे.

अश्वगंधादि तेल.

अश्वगन्धा बला लाक्षा प्रस्थं प्रस्थं पृथक्पृथक् ।
जलद्रोणे विपक्तव्यं चतुर्भागावशेषितम् ॥ १ ॥
तैलं त्रिमानिकं दद्याद्दधिमस्तु चतुर्गुणम् ।
अश्वगन्धा निशा दारु कौन्ती कुष्ठाब्दचन्दनैः ॥ २ ॥
निशा तिक्ता शताह्वा च लाक्षा मूर्वा समूलकैः ।
सुरदारु च मञ्जिष्ठा मधुकोशीरसारिवाः ॥ ३ ॥
समभागानि सर्वाणि कल्कीकृत्य विपाचयेत् ।
सर्वज्वरं हरत्याशु शोफघ्नं लघु बृंहणम् ॥ ४ ॥
कासश्वासहरं चैव सर्वधातुविवर्धनम् ।
एतदभ्यञ्जनेनाशु क्षयरोगो विमुञ्चति ॥ ५ ॥

आस्कंध, चिकणामूळ व लाख हीं प्रत्येक चौसष्ट चौसष्ट तोळे घेऊन दहाशें चोवीस तोळे पाण्यांत चतुर्थांश काढा करावा. त्यांत शहाण्णव तोळे तेल व त्याच्या चौपट दह्याची निवळ घालून आस्कंध, हळद, देवदार, रेणुकबीज, कोष्ठ, नागरमोथे, चंदन, दारुहळद, कुटकी, बडीशेप, लाख, मोरवेल, मुळा, सरळ देवदार, मंजिष्ठ, ज्येष्ठमध, वाळा व उपळसरी हीं सर्व औषधें समभाग घेऊन कल्क करून त्यांत घालून तेल सिद्ध करावें. हें सर्वज्वरनाशक, सूज नाहींशी करणारें, हलकें, पौष्टिक, खोकला व श्वास

ह्यांचा नाश करणारें व सर्व धातूंची वृद्धि करणारें आहे. ह्याच्या अभ्यंगानें क्षयरोग त्वरित दूर होतो.

लक्ष्मीविलास तेल.

एलाश्रीखण्डरास्नाजतुनखशशिनः कोलकं चाथ मुस्ता
बालत्वग्दारुकृष्णागुरुतगरजटाकुष्ठमेतत्समांशम् ।
त्रैगुण्यं कालरालं सुदृढडमरुकायन्त्रतः सिद्धमेत-
त्तैलं पुष्पैश्च भाव्यं परिमलमिलितं नामतो गन्धतैलम् ॥ १
एतल्लक्ष्मीविलासं जनयति जगतीनायकैः संप्रयुक्तं
युक्त्या नाना च रोगान्निखिलगदहरं वातसंघातहन्तृ ।
पीतं ताम्बूलवल्लीदलमिलितमलं जाठरं वह्निमिद्धं
कुर्याद्दुर्नामदद्रुक्षयमपि नितरामङ्गसंमर्दनेन ॥ २ ॥

वेलदोडे, चंदन, रास्ना, लाख, नखला, कापूर, कंकोळ, नागरमोथे, चिकणामूळ, दालचिनी, देवदार, कृष्णागुरु, तगर, जटामांसी व कोष्ठ हीं औषधें समभाग घेऊन ह्या सर्वांच्या तिप्पट काळी राळ घेऊन सर्व डमरुयंत्रांत घालून तेल काढावें, आणि त्याला सुवासिक फुलांच्या भावना द्याव्यात. ह्याला गंधतेल किंवा लक्ष्मीविलास तेल असेंही म्हणतात. हें स्त्रीपुरुषांमध्यें प्रेम उत्पन्न करितें. हें युक्तीनें वापरलें असतां नानातऱ्हेचे रोगांचा नाश करितें. हें सर्वरोगनाशक असून वातरोगांचे समुदायाचा नाश करणारें आहे. हें विड्याच्या पानाला लावून सेवन केलें असतां उदरसंबंधीं सर्व रोग व अग्निमांद्य ह्यांचा नाश करितें. व अंगाला मर्दन केलें असतां मूळव्याध, नायटे व क्षय ह्यांचा नाश करितें.

द्राक्षासव.

मृद्वीकायास्तुलार्धं तु द्विद्रोणेऽपां विपाचयेत् ।
पादशेषे कषाये च पूतशीते प्रदापयेत् ॥ १ ॥
गुडस्य द्वितुला मानी धातक्या घृतभाजने ।
विडङ्गं फलिनी कृष्णा त्वगेला पत्रकेसरम् ॥ २ ॥
मरीचं च भिषक्चूर्णं सम्यग्दत्वा विचक्षणः ।
क्षिपेच्च पलिकैर्भागैः स्थापयेच्चैव तद्दिने ॥ ३ ॥
ततो यथाबलं पीत्वा कासश्वासगलामयान् ।
हन्ति यक्ष्माणमत्युग्रमुरःसंधानकारकम् ॥ ४ ॥

चतुर्थभागां द्राक्षाया धातकीमत्र केचन।
प्रयच्छन्ति ततो वीर्यमेतस्योच्चैः प्रजायते ॥ ५ ॥

दोनशें तोळे मनुका, वीसशें अठ्ठेचाळीस तोळे (दोन द्रोण–दोन मण) पाण्यांत शिजवून चतुर्थांश काढा करावा. तो गाळून घेऊन निवाल्यावर त्यांत आठशें तोळे जुना गूळ व चौसष्ट तोळे धायटीचीं फुलें घालून तुपानें रावलेल्या मातीच्या घागरींत घालून त्यांत वावडिंगें, पिंपळी, दालचिनी, वेलदोडे, तमालपत्र, नागकेशर व मिरीं हीं औषधें चार चार तोळे घेऊन चूर्ण करून त्यांत घालून पुरून ठेवावें. (महिना पंधरा दिवसांनीं काढून) यथाशक्ति प्राशन करीत जावें. म्हणजे तें कास, श्वास, गळ्याचे रोग व अतिशय उग्र असा क्षय ह्यांचा नाश करितें, व उरःक्षताला भरून आणतें. ह्यामध्यें कित्येकांच्या मतानें मनुकांच्या चतुर्थांश धायटीचीं फुलें घालावींत असें आहे. ह्याच्या योगानें अत्यंत वीर्यवृद्धि होते.

पिप्पल्यरिष्ट.

पिप्पलीलोध्रमरिचपाठाधात्र्येलवालुकैः।
चव्यचित्रकजन्तुघ्नक्रमुकोशीरचन्दनैः ॥ १ ॥
मुस्ताप्रियंगुलवलीहरिद्रामिसिपल्लवैः।
पत्रत्वक्कुष्ठतगरैर्नागकेसरसंयुतैः ॥ २ ॥
भागैः स्यादर्धपलिकैर्द्राक्षां षष्टिपलां क्षिपेत्।
पलानि दश धातक्या गुडस्य च शतत्रयम् ॥ ३ ॥
तोयार्मणद्वये सिद्धं भवत्येतत्सुखावहम्।
ग्रहणीपाण्डुरोगार्शःकार्श्यगुल्मोदरापहः।
पिपल्यादिररिष्टोऽयं क्षयक्षयकरः परम् ॥ ४ ॥

पिंपळी, लोध्र, मिरीं, पहाडमूळ, आवळकाठी, एलवालुक, चवक, चित्रक, वावडिंग, सुपारी, वाळा, चंदन, नागरमोथे, गव्हला, रायआवळी, हळद, बडिशेप, जटामांसी, तमालपत्र, दालचिनी, कोष्ठ, तगर व नागकेशर हीं औषधें दोनदोन तोळे; द्राक्षें दोनशें चाळीस तोळे, धायटीचीं फुलें चाळीस तोळे, गूळ बाराशें तोळे, ह्यांमध्यें दोन मण (वीसशें अठ्ठेचाळीस तोळे) पाणी घालून काढा करून विधियुक्त अरिष्ट तयार करावें. हें संग्रहणी, पांडुरोग, मूळ-

व्याध, कृशत्व, गुल्म व उदर ह्यांचें नाशक आहे. हें पिप्पल्यादि अरिष्ट क्षयाचा नाश करितें.

खर्जूरासव.

पञ्चप्रस्थं समादाय खर्जूरस्य विचक्षणः ।
द्रोणाम्भसि पचेत्सम्यगुत्तार्य गालयेत्ततः ॥ १ ॥
कुंभीं सुधूपितां कृत्वा प्रक्षिपेत्तं रसं शुभम् ।
हपुषां ताम्रपुष्पीं च कषाये तत्र निक्षिपेत् ॥ २ ॥
द्वारं निरुध्य सुदृढं निक्षिपेद्वसुधातले ।
सप्तकद्वययोगेन सिद्धोऽयं त्वासवो रसः ॥ ३ ॥
रोगराजं तथा शोफं प्रमेहं पाण्डुकामलाम् ।
ग्रहणीं पञ्च गुल्मार्शो नाशयत्यतिवेगतः ॥ ४ ॥

तीनशें वीस तोळे खजूर आणून तो दहाशें चोवीस तोळे पाण्यांत शिजवून गाळून घ्यावा. नंतर धूपानें सुवासित केलेल्या घागरींत भरावा आणि त्यांत योग्य प्रमाणांत शेरणी व धायटीचीं फुलें घालून तोंड बंद करून चौदा दिवस जमिनींत पुरून ठेवावें. म्हणजे हें खर्जूरासव तयार होतें. तें क्षय, सूज, पांडुरोग, कावीळ, संग्रहणी, व पांच प्रकारचे गुल्म ह्यांचा त्वरित नाश करितें.

गुडूच्यादि मोदक.

गुडूचीं खण्डशः कृत्वा कुट्टयित्वा सुमर्दयेत् ।
वस्त्रेण विधृतं तोयं स्रावयेत्तच्छनैः शनैः ॥ १ ॥
शुद्धशंखनिभं चूर्णमेतैः संमिश्रयेद्भिषक् ।
उशीरं वालकं पत्रं कुष्ठं धात्रीं च मौसलीम् ॥ २ ॥
एलां हरेणुकां द्राक्षां कुंकुमं नागकेसरम् ।
पद्मकन्दं च कर्पूरं चन्दनद्वयमिश्रितम् ॥ ३ ॥
व्योषं च मधुलाजांश्च अश्वगन्धां शतावरीम् ।
गोक्षुरं मर्कटाख्यं च जातीकंकोलचोरकम् ॥ ४ ॥
रसाभ्रवङ्गलोहैश्च संमिश्रं कारयेद् बुधः ।
एतानि समभागानि द्विगुणामृतशर्करा ॥ ५ ॥
मत्स्यण्ड्याज्यमधूपेतं भक्षयेत्प्रातरुत्थितः ।
क्षयं च रक्तपित्तं च पाददाहमसृग्दरम् ॥ ६ ॥
मूत्राघातं मूत्रकृच्छ्रं वातकुण्डलिकां तथा ।
निहन्याच्च प्रमेहांश्च सोमरोगं च दारुणम् ॥ ७ ॥
रसायनमिवर्षीणाममृतं वाऽमृतान्धसाम् ॥ ८ ॥

गुळवेलीचे तुकडे करून ठेचून पाणी घालून खूप कुसकरावेत. नंतर तें पाणी गाळून घेऊन कांहीं वेळ तसेंच ठेवावें, म्हणजे भांड्याच्या तळाशीं शुद्ध शंखाप्रमाणें शुभ्रवर्ण सत्व राहतें, तें काढून घ्यावें; आणि त्यांत वाळा, काळा वाळा, तमालपत्र, कोष्ठ, आवळकाठी, मुसळी, वेलदोडे, रेणुकबीज, द्राक्षें, केशर, नागकेशर, कमळाचा कांदा, कापूर, पांढरा व तांबडा चंदन, सुंठ, मिरीं, पिंपळी, मध, भाताच्या लाह्या, आस्कंद, शतावरी, गोखरूं, कवचबीज, जायफळ, कंकोळ, गठोना, रससिंदूर, अभ्रकभस्म, वंगभस्म व लोहभस्म हीं सर्व समभाग आणि गुळवेलीचें सत्व दुप्पट घेऊन सर्वांचें चूर्ण करून तें खडीसाखर, तूप व मध ह्यांशीं प्रातःकाळीं सेवन करावें. म्हणजे क्षय, रक्तपित्त, पायांचा दाह, प्रदर, मूत्राघात, मूत्रकृच्छ्र, वातकुंडलिका, प्रमेह, व दारुण सोमरोग ह्यांचा नाश करितो. ज्याप्रमाणें ऋषींना रसायन किंवा देवांना अमृत त्याप्रमाणें हा गुडूच्यादि मोदक मनुष्याला आरोग्यदायक आहे.

चतुर्मुखरस.

सूतायोभ्रकगन्धकं समलवं सूतांघ्रितुल्यं मृतं
स्वर्णं सर्वमिदं निधाय विमले खल्वे दिनं मर्दयेत्।
कन्याव्योषवरापुनर्नवरसैः कच्छूलवङ्गैः पुन-
र्भाव्यं चित्रकपद्मकैर्घनतरं सेव्येष्टधान्यान्तगम्॥ १॥
कुर्याद्ब्रह्मविनिर्मितं रसवरं यक्ष्मापहं पुष्टिदं
वल्लं क्षौद्रफलत्रयेण सहितं मेहाग्निमान्द्यप्रणुत्॥ २॥

पारा, लोहभस्म, अभ्रकभस्म व गंधक हीं औषधें समभाग, आणि पाऱ्याच्या चतुर्थांश सुवर्णभस्म ह्या सर्वांचा खलामध्यें एक दिवसभर खल करावा; आणि कोरफड, सुंठ, मिरीं, पिंपळी, हिरडा, बेहडा, आवळकाठी, वसु, चित्रकमूळ व पद्मकाष्ठ ह्यांची एक एक भावना देऊन धान्याच्या राशींत कांहीं दिवस पुरून ठेवून काढावा. ह्याला चतुर्मुखरस म्हणतात. हा ब्रह्मदेवानें सांगितला आहे. हा क्षयनाशक व पुष्टिदायक आहे. हा एक वालभर मध व त्रिफळ्याचा रस ह्यांशीं घ्यावा, म्हणजे प्रमेह व अग्निमांद्य यांचा नाश होतो.

रत्नगर्भपोटली रस.

रसं वज्रं हेम तारं नागं लोहं तथाऽभ्रकम् ।
तुल्यांशं मारितं योज्यं मुक्तामाक्षिकविद्रुमम् ॥ १ ॥
राजावर्तं च वैक्रान्तं गोमेदं पुष्परागकम् ।
शङ्खं च तुल्यतुल्यांशं सप्ताहं चित्रकद्रवैः ॥ २ ॥
मर्दयित्वा विचूर्ण्याथ तेनाऽऽपूर्य वराटकान् ।
टङ्कणं रविदुग्धेन पिष्ट्वा तन्मुद्रणं चरेत् ॥ ३ ॥
मृद्भाण्डे तान्सुसंयन्त्र्य सम्यग्गजपुटे पचेत् ।
आदाय चूर्णयेत्सम्यग्निर्गुण्ड्याः सप्त भावनाः ॥ ४ ॥
आर्द्रकस्य रसैः सप्त चित्रकस्यैकविंशतिः ।
द्रवैर्भाव्यं ततः शुष्कं देयं गुञ्जाचतुष्टयम् ॥ ५ ॥
क्षयरोगं निहन्त्याशु सत्यं शिव इवान्धकम् ।
योजयेत्पिपलीक्षौद्रैः सघृतैर्मरिचैश्च वा ।
पोटलीरत्नगर्भेयं सर्वरोगहरा मता ॥ ६ ॥

पारदभस्म, हिऱ्याचें भस्म, सुवर्णभस्म, रौप्य भस्म, नागभस्म, व लोह, अभ्रक, मौक्तिक, माक्षिक, प्रवाळ, राजावर्त, वैक्रांत, गोमेद, पुष्पराग व शंख ह्यांचीं भस्में समभाग घेऊन सात दिवस चित्रकाच्या काढ्यांत खल करावा. नंतर त्याची पूड करून कवड्यांत भरावी. आणि टांकणखार रुईच्या चिकांत खलून त्या कवड्यांच्या तोंडास मुखमुद्रा करावी. नंतर त्या कवड्या मातीच्या भांड्यांत भरून संधिलेप करून गजपुट द्यावें. नंतर काढून निर्गुंडीच्या रसांत सात भावना, आल्याच्या रसाच्या सात भावना, आणि चित्रकाच्या काढ्याच्या एकवीस भावना द्याव्या. शुष्क झाल्यावर चार गुंजांप्रमाणें अनुपान योजून द्यावा; म्हणजे शिवानें ज्याप्रमाणें अंधकासुराचा नाश केला, त्याप्रमाणें हा क्षयाचा त्वरित नाश करतो. हा मध व पिंपळीशीं किंवा तूप व मिरपुडीशीं द्यावा. हा रत्नगर्भपोटली नांवाचा रस सर्वरोगनाशक आहे.

राजमृगांक.

रसभस्म त्रिभागं च भागैकं हेमभस्मकम् ।
मृतताम्रस्य भागैकं शिलागन्धकतालकम् ॥ १ ॥
प्रतिभागद्वयं शुद्धमेकीकृत्वा विचूर्णितम् ।

वराटान्पूरयेत्तेन अजाक्षीरेण टंकणम् ॥ २ ॥
पिष्ट्वा तेन मुखं रुद्ध्वा मृद्भाण्डे संनिधापयेत् ।
शुष्कं गजपुटे पाच्यं चूर्णयेत्स्वाङ्गशीतलम् ॥ ३ ॥
रसो राजमृगांकोऽयं चतुर्गुंजः क्षयापहः ।
एकोनविंशन्मरिचैर्घृतेन सह भक्षयेत् ॥ ४ ॥
दशानां पिप्पलीनां च चूर्णं दत्त्वा पदापयेत् ।
क्षये कासे ज्वरे पाण्डौ ग्रहण्यामतिसारके ॥ ५ ॥

पारद भस्म तीन भाग, सुवर्णभस्म एक भाग, ताम्रभस्म एक भाग, शुद्ध केलेलें मनशीळ, गंधक व हरताळ हीं दोन दोन भाग ह्या सर्वांचा एकत्र खल करून कवडयांत भरून शेळीच्या दुधांत टांकणखार खलून त्यानें त्या कवडयांच्या तोंडास लेप करून त्या कवडया मातीच्या भांडयांत भरून संधिलेप करून सुकल्यावर गजपुट द्यावें. स्वांगशीत झाल्यावर काढून चूर्ण करून ठेवावें. ह्याला राजमृगांक असें म्हणतात. हा चार गुंजा या प्रमाणानें द्यावा, म्हणजे क्षयाचा नाश करतो. हा एकोणीस मिऱ्यांची पूड किंवा दहा पिंपळ्यांची पूड व तूप ह्यांजबरोबर श्वास, खोकला, ज्वर, पांडुरोग, संग्रहणी व अतिसार ह्यांजवर द्यावा.

रसरत्नप्रदीपांतील मृगाङ्क.

रसेन तुल्यं कनकं तयोस्तु साम्येन गुंज्यान्नवमौक्तिकानि ।
रसप्रमाणो बलिरंघ्रिभागः क्षारश्च सर्वं तुषवारिणा तु ॥ १ ॥
संमर्द्य घस्रं तु विधाय गोलं दिनं पचेत्तं लवणेन पूर्णे ।
भाण्डे मृगांकोऽयमतिप्रगल्भः क्षयाग्निमान्द्यग्रहणीगदेषु ॥२॥
साज्योषणाभिर्मधुपिप्पलीभिर्वल्लोऽस्य देयो न ततोऽधिकस्तु ।
पथ्यं हितं शीतलमेव योज्यं त्याज्यं सदा पित्तकरं विदाहि ॥ ३

पारा व सुवर्ण समभाग, दोहोंच्या बरोबर मौक्तिक, पाऱ्याच्या समभाग गंधक आणि पाऱ्याच्या चतुर्थांश जवखार ह्या सर्वांचा कांजीमध्यें खल करून त्याचा गोळा करून तो मीठ भरलेल्या मातीच्या भांडयांत मध्यें ठेवून पचन करावा. स्वांगशीत झाल्यावर काढून घ्यावा. हा मृगांक क्षय, अग्निमांद्य व संग्रहणी ह्यांजवर फार उत्तम आहे. हा मिऱ्याची पूड व तूप ह्यांजबरोबर किंवा मध व पिंपळी ह्यांजबरोबर एक वालभर द्यावा, अधिक देऊं नये. ह्याज-

वर त्या त्या रोगाला हितकारक व थंड असें पथ्य करावें आणि विदाही व पित्तकारक पदार्थ नेहमीं वर्ज करावेत.

राजमृगांक.

रसबलितपनीयं योजयेत्तुल्यभागं
तदनु युगुलभागं मौक्तिकानां शुभानाम्।
यवजचरणयुक्तं मर्दयेत्सर्वमेतत्
दिनमपि तुषवारा गोलकं लघ्वमत्रे ॥ १ ॥
विधाय मुद्रां विदधीत भाण्डे चुल्ह्यां समुद्रे लवणेन पूर्णे।
दिनं पचेच्चारु मृगांकनामा क्षयाग्निमान्द्यग्रहणीविकारे ॥ २ ॥
योज्यः सदा वह्निजसर्पिषा वा कृष्णामधुभ्यां सततं त्रिगुञ्जः।
वर्ज्यं सदा पित्तकरं हि वस्तु लोकेशवत्पथ्यविधिर्निरुक्तः ॥३॥

पारा, गंधक व सोनें समभाग, आणि मौक्तिक दोन भाग, आणि जवखार चतुर्थांश ह्यांचा कांजींत एक दिवस खल करून गोळा करावा; व मिठानें भरलेल्या मातीच्या भांड्यांत ठेवून मुखमुद्रा करून एक दिवस पचन करावा. म्हणजे हा मृगांकरस तयार होतो. हा क्षय, अग्निमांद्य व संग्रहणी ह्यांजवर योजावा. हा नेहमीं तीन गुंजा प्रमाणानें तूप व मिरपूड ह्यांतून अगर मध व पिंपळी ह्यांतून द्यावा. ह्याजवर पित्तकारक पदार्थ खाऊं नयेत आणि लोकनाथाप्रमाणें पथ्य करावें, असें सांगितलें आहे.

नवरत्नराजमृगाङ्क.

सूतं गन्धकहेमताररसकं वैक्रान्तकान्तायसं
वङ्गं नागपविप्रवालविमला माणिक्यगारुत्मतम्।
ताप्यं मौक्तिकपुष्परागजलजं वैडूर्यकं शुल्बकं
शुक्तिस्तालकमभ्रहिंगुलशिला गोमेदनीलं समम् ॥ १ ॥
गोक्षूरैः फणिवल्लिसिंहवदनामुण्डीकणाचित्रकै-
रिक्षुच्छिन्नरुहाहरप्रियजयाद्राक्षावरीजद्रवैः।
शोफघ्नीशतपत्रिकामधुजलैः सच्छाल्मलीधातकी-
जातीसस्यबलाचतुष्टयजलत्वग्देवपुष्पद्रवैः ॥ २ ॥
कक्कोलैर्मदनागकेसरजलैर्भाव्यं पृथक्सप्तधा
भाण्डे सिन्धुभृते मृगांगवदयं पाच्यः क्रमाग्नौ दिनम्।
भूयः प्राक्समुदाहृतैर्द्रवचयैस्तं भावयेत्पूर्ववत्
पश्चात्तुल्यविभागशीतलरजःकस्तूरिका भावना ॥ ३ ॥

गोप्याद्गोप्यतरं रसायनमिदं श्रीशंकरेणोदितं
गुञ्जासिन्धुयुतं कणामधुयुतं शोफे सपांड्वामये ।
वातव्याधिमुपद्रवैश्च सहितं मेहांस्तथा विंशतिं
संयोज्यं च हरीतकीगुडयुतं वातास्रके दुर्जये ॥ ४ ॥
गम्भीरे च गुडूचिसत्त्वचपलाक्षौद्रैस्तु संयोजित-
स्त्वाध्मानारुचिशूलमान्द्यकसनापस्मारवातोदरान् ।
श्वासान्संग्रहणीं हलीमकमथो सर्वज्वरान्नाशयेत्
धातून्पोषयति क्षयं क्षपयति श्यामाशतं यौवनम् ॥ ५ ॥
प्रौढाटोपयुतं करोति सहसा तारुण्यगर्वोज्झितं
सिद्धो राजमृगांक एष जयति स्वस्वानुपानैर्गदान् ॥६॥

पारा, गंधक, सोनें, चांदी, कलखापरी, वैक्रांत, कांतलोह, तिखें, वंग, नाग, हिरा, प्रवाळ, माक्षिक, माणिक, पाच, सुवर्णमाक्षिक, मोतीं, पुष्पराग, शंख, वैदूर्य, ताम्र, मोत्याची शिंप, हरताळ, अभ्रक, गोमेद, नीळमणी, ह्यांचीं भस्में; शुद्ध हिंगूळ, शुद्ध मनशीळ, हीं सर्व औषधें समभाग घेऊन गोखरू, नागवेलीचीं पानें, अडुळसा, गोरखमुंडी, पिंपळी, चित्रक, ऊंस, गुळवेल, काळा धोतरा, भांग, द्राक्षें, शतावरी, वसु, शेवती, ज्येष्ठमध, शेवरीची साल, धायटीचीं फुलें, जायफळ, थोर चिकणा, लहान चिकणा, मुद्रिका, सहदेवी, वाळा, दालचिनी, लवंग, कंकोळ, कस्तूरी, नागकेशर ह्या प्रत्येकाच्या यथासंभव काढ्याच्या किंवा रसाच्या सात सात भावना द्याव्या. नंतर "राजमृगांकाच्या" पद्धतीनें मिठानें भरलेल्या मातीच्या भांड्यांत क्रमवर्धित अग्नीनें एक दिवस पचन करावा. स्वांगशीत झाल्यावर काढून पुनः वर सांगितलेल्या औषधींच्या वरीलप्रमाणेंच पृथक् पृथक् सात भावना देऊन शेवटीं कापूर व कस्तुरी समभाग घेऊन त्याची एक भावना द्यावी. म्हणजे हा रस तयार झाला. हें शंकरानें सांगितलेलें श्रेष्ठ रसायन फारच गुप्त ठेवावें. हें सैंधवाशीं गुंजेवर द्यावें आणि मध व पिंपळी यांशीं पांडुरोग, वातव्याधि व उपद्रवसहित वीस प्रकारचे मेह ह्यांजवर द्यावें; हिरडा व गूळ ह्यांशीं दुर्धर वातरक्तावर द्यावें. हें रसायन गुळवेलीचें सत्व, पिंपळीची पूड, व मध ह्यांशीं दिलें असतां आ-

ध्मान, अरुचि, शूल, अग्निमांद्य, खोकला, अपस्मार, वातोदर, श्वास, संग्रहणी, हलीमक, सर्व ज्वर व क्षय ह्यांचा नाश करितें. व सर्व धातूंचें पोषण करितें. हा राजमृगांकरस आपल्या प्रभावानें नवयौवना अशा शेंकडों स्त्रियांचा गर्व दूर करण्याचें सामर्थ्य देतो. आणि अनुपान योजून दिला असतां सर्व रोग दूर करतो.

महाकनकसिंदूर रस.

रसगन्धकनागाश्च रसको माक्षिकाभ्रके ।
कान्तविद्रुममुक्तानां वंगभस्म च तारकम् ॥ १ ॥
भस्म कृत्वा प्रयत्नेन प्रत्येकं कर्षसंमितम् ।
सर्वतुल्यं शुद्धहेमभस्म कृत्वा प्रयोजयेत् ॥ २ ॥
मर्दयेत्त्रिदिनं सर्वं हंसपादीरसैर्भिषक् ।
ततो वै गोलकान्कृत्वा काचकूप्यां विनिक्षिपेत् ॥ ३ ॥
रुद्ध्वा तत्काचकूपीं च सप्तवस्त्रेण वेष्टिताम् ।
ततो वै सिकतायन्त्रे त्रिदनं चोक्तवह्निना ॥ ४ ॥
पश्चात्तं स्वांगशीतं च पूर्वोक्तरसमर्दितम् ।
विनिक्षिप्य करण्डेऽथ संपूज्य रसराजकम् ॥ ५ ॥
महाकनकसिन्दूरो राजयक्ष्महरः परः ।
पाण्डुरोगं श्वासकासं कामलाग्रहणीगदान् ॥ ६ ॥
क्रिमिशोफोदरावर्तगुल्ममेहगुदांकुरान् ।
मन्दाग्निं छर्दिमरुचिमामशूलहलीमकान् ॥ ७ ॥
ज्वरान्द्वंद्वादिकान्सर्वान्संनिपातांस्त्रयोदश ।
पैत्यरोगमपस्मारं वातरोगान्विशेषतः ॥ ८ ॥
रक्तपित्तप्रमेहांश्च स्त्रीणां रक्तस्रवांस्तथा ।
विंशतिश्लेष्मरोगांश्च मूत्ररोगान्निहन्त्यसौ ॥ ९ ॥
हेमवर्णश्च बल्यश्च आयुःशुक्रविवर्धनः ।
महाकनकसिन्दूरः काश्यपेन विनिर्मितः ॥ १० ॥

पारा, गंधक, नागभस्म, कलखापरी, सुवर्णमाक्षिक, अभ्रकभस्म, कांतभस्म, प्रवाळभस्म, मौक्तिकभस्म, वंगभस्म, रौप्यभस्म हीं प्रत्येक एक एक तोळा व सर्वांच्याबरोबर शुद्ध सुवर्णभस्म घेऊन सर्वांचा हंसपादी लाजाळूच्या रसांत खल करावा. नंतर गोळा करून कांचेच्या कुपींत भरून त्या कुपीचें तोंड बंद करून तिला सात मातकापडें करून सुकल्यावर क्रमानें तीन दिवस अग्नि द्यावा. स्वांग-

शीत झाल्यावर काढून पूर्वी सांगितलेल्या हंसपादी-लाजाळूच्या रसांत खलून करंडयांत भरून ठेवावा आणि त्याचें पूजन करावें. हा महाकनकसिंदूर नांवाचा रस राजयक्ष्म्याचा (क्षयाचा) नाश करण्याचे कामीं श्रेष्ठ आहे. हा रस पांडुरोग, श्वास, खोकला, कावीळ, संग्रहणी, क्रिमि, सूज, उदावर्त, गुल्म, मेह, मूळव्याध, अग्निमांद्य, ओकारी, अरुचि, आमशूल, हलीमक, द्वंद्वादि सर्व ज्वर, तेरा सन्निपात, पित्तरोग, अपस्मार, विशेषतः वातरोग, रक्तपित्त, प्रमेह, स्त्रियांचा रक्तप्रदर, वीस प्रकारचे कफरोग व मूत्ररोग ह्यांचा नाश करतो, व शरीराचा वर्ण सुवर्णाप्रमाणें करतो. हा बलकारक, आयुष्यवर्धक व धातुवर्धक असा महाकनकसिन्दूर रस काश्यपानें निर्माण केला आहे.

कनकसिंदूर रस.

रसः कनकभागिकः कनकमाक्षिकस्तालकः
शिलारसकगन्धका रससमाः सतुत्था इमे ।
विमर्द्य पयसा रवेः सकलमेतदस्योपरि
द्रवैः प्रतिदिनं पृथक्कदिति भावयेद् बुद्धिमान् ॥ १ ॥
जयामुनिकालिप्रियादहनभृङ्गवासोद्भवै-
र्विभाव्य च रसैस्ततः सुदृढगोलकं स्वेदयेत् ।
मृगांकवदथाऽऽर्द्रकद्रवभरेण तं सप्तधा
विमर्द्य च कटुत्रयाम्बुभिरयं क्षयस्यान्तकृत् ॥ २ ॥
रसः कनकसुन्दरो भवति संनिपातेऽप्ययं
सदाऽऽर्द्रकरसैस्तथा पवनगुल्मशूलप्रणुत् ।
स विश्वघृतयोजितः सकलमत्र पथ्यं हितं
मृगांकवदथापरं किमपि नैव योज्यं क्वचित् ॥ ३ ॥

पारा, सोनें, सुवर्णमाक्षिक, हरताळभस्म, शुद्ध मनशीळ, शुद्ध कलखापरी, शुद्ध गंधक व मोरचूत हीं सर्व समभाग घेऊन रुईच्या चिकांत खल करावा. नंतर टाकळी, हतगा, बेहडा, चित्रक, माका व अडुळसा ह्यांच्या रसांमध्यें पृथक् पृथक् एक एक दिवस खलून गोळा करून मृगांकाप्रमाणें मिठानें भरलेल्या मातीच्या भांडयांत एक दिवस पचन करून स्वांगशीत झाल्यावर काढून आल्याच्या रसांत सात दिवस खल करून नंतर सुंठ, मिरीं व पिंप-

ळी ह्यांच्या काढ्यांत खल करावा. म्हणजे हा रस क्षयाचा नाश करणारा होतो. हा कनकसुंदर रस आल्याच्या रसांतून घेतला असतां सन्निपात, वात, गुल्म व शूल ह्यांचा नाश करतो. हा सुंठ व तूप ह्यांशीं द्यावा, आणि ह्याजवर मृगांकाप्रमाणें पथ्य सांगावें. दुसरें कांहींही केव्हांही योजूं नये.

सुवर्णभूपति.

शुद्धसूतसमं गन्धं मृतशुल्बं तयोः समम् ।
अभ्रलोहकयोर्भस्म कान्तभस्म सुवर्णजम् ॥ १ ॥
रजतं च विषं सम्यक्पृथक्सूतसमं भवेत् ।
हंसपादीरसैर्मर्द्यं दिनमेकं वटीकृतम् ॥ २ ॥
काचकूप्यां विनिक्षिप्य मृदा संलेपयेद्बहिः ।
शुष्का सा वालुकायन्त्रे शनैर्मृद्वग्निना पचेत् ॥ ३ ॥
चतुर्गुञ्जमितं देयमार्द्रकद्रवपिप्पली ।
क्षयं त्रिदोषजं हन्ति संनिपातांस्त्रयोदश ॥ ४ ॥
आमवातं धनुर्वातं शृंखलावातमेव च ।
आढ्यवातं पंगुवातं कफवाताग्निमान्द्यनुत् ॥ ५ ॥
कटिवातं सर्वशूलं नाशयेन्नात्र संशयः ।
गुल्मशूलमुदावर्तं ग्रहणीमतिदुस्तराम् ॥ ६ ॥
प्रमेहमुदरं सर्वामश्मरीं मूत्रविड्ग्रहम् ।
भगंदरं सर्वकुष्ठं विद्रधिं महतीं तथा ॥ ७ ॥
श्वासकासमजीर्णं च ज्वरमष्टविधं तथा ।
कामलां पाण्डुरोगं च शिरोरोगं च नाशयेत् ॥ ८ ॥
अनुपानविशेषेण सर्वरोगान्विनाशयेत् ।
यथा सूर्योदये नश्येत्तमः सर्वगतं तथा ।
सर्वरोगविनाशाय सर्वेषां स्वर्णभूपतिः ॥ ९ ॥

शुद्ध पारा व गंधक समभाग, दोहोंच्या समान ताम्रभस्म, आणि अभ्रकभस्म, लोहभस्म, कांतभस्म, सुवर्णभस्म, रौप्यभस्म, व शुद्ध बचनाग हीं सर्व एक एक भाग घेऊन ह्या सर्वांचा हंसपादीच्या रसांत एक दिवस खल करून गोळा करून तो कांचेच्या कुपींत घालून कुपीस बाहेरून चिखलानें लिंपून वाळल्यावर वालुकायंत्रांत ठेवून मृदु अग्नि लावून सावकाश पचन करावा. स्वांगशीत झाल्यावर काढून चार गुंजा याप्रमाणें आल्याचा रस व पिंपळी

यांमधून द्यावा. हा रस त्रिदोषजन्य क्षय, तेरा सन्निपात, आमवात, धनुर्वात, शृंखळावात, आढयवात, पंगुवात, कफवात, अग्निमांद्य, कटिवात, सर्व प्रकारचे शूल, गुल्मशूल, उदावर्त, दुस्तर संग्रहणी, प्रमेह, उदर, सर्व प्रकारचे मूतखडे, मलमूत्रांचे अवरोध, भगंदर, सर्व कुष्ठें, मोठा विद्रधि, श्वास, खोकला, अजीर्ण, आठ प्रकारचे ज्वर, कावळि, पांडुरोग व शिरोरोग ह्यांचा नाश करतो. अनुपान योजून दिला असतां सर्व रोगांचा नाश करतो. जसा सूर्योदयानें सर्व ठिकाणचा अंधार नाहींसा होतो, तसा सर्व रोगांचा नाश करण्याकरितां हा सुवर्णभूपति आहे.

लक्ष्मीविलास.

सुवर्णताराभ्रकताम्रवङ्गत्रिलोहनागामृतमौक्तिकानि ।
एतत्समं योज्य रसस्य भस्म खल्वे कृतं स्यात्कृतकज्जलीकम् १
सुमर्दयेन्माक्षिकसंप्रयुक्तं तच्छोषयेद्वित्रिदिनं च घर्मे ।
तत्कल्कमूषोदरमध्यगामि यत्नात्कृतं तार्क्ष्यपुटेन पक्वम् ॥ २ ॥
यामाष्टकं पावकमर्दितं च लक्ष्मीविलासो रसराज एषः ।
क्षये त्रिदोषप्रभवे च पाण्डौ सकामलासर्वसमीरणेषु ॥ ३ ॥
शोफप्रतिश्यायविनष्टवीर्ये मूलामयं चैव सशूलकुष्ठम् ।
हत्वाऽग्निमान्द्यं क्षयसंनिपातं श्वासं च कासं च हरेत्प्रयुक्तम् ४
तारुण्यलक्ष्मीप्रतिबोधनाय श्रीमद्विलासो रसराज एषः ॥ ५ ॥

सोनें, चांदी, अभ्रक, ताम्र, वंग, कांतलोह, तिखें, मुंडलोह व नाग (शिसें) ह्यांचीं भस्में व शुद्ध बचनाग हीं सर्व समभाग व ह्या सर्वांच्या समान पाऱ्याचें भस्म घेऊन सर्वांचा खलामध्यें चांगला खल करून नंतर मधांत खल करावा; आणि दोन तीन दिवस उन्हांत वाळवावें, आणि मुशींत घालून तार्क्ष्यपुटामध्यें पचन करावें. स्वांगशीत झाल्यावर काढून चित्रकाच्या काढयांत आठ प्रहर खलावें. म्हणजे हा लक्ष्मीविलास रस तयार झाला. हा रस त्रिदोषजन्य क्षय, पांडुरोग, कावीळ, सर्व प्रकारचे वात, सूज, पडसें, धातुक्षीणता, मूळव्याध, कुष्ठ, शूळ, अग्निमांद्य, क्षय, सन्निपात, श्वास व खोकला ह्यांचा नाश करतो. हा लक्ष्मीविलास नांवाचा रस तारुण्यलक्ष्मी देणारा आहे.

त्रैलोक्यचिंतामणि.

रसं वज्रं हेम तारं ताम्रं तीक्ष्णाभ्रकं मृतम् ।
गन्धकं मौक्तिकं शंखं प्रवालं तालकं शिला ॥ १ ॥
शोधितं च समं सर्वं सप्ताहं भावयेद् दृढम् ।
चित्रमूलकषायेण भानुदुग्धैर्दिनत्रयम् ॥ २ ॥
निर्गुण्डीसूरणद्रावैर्वज्रिदुग्धैर्दिनत्रयम् ।
अनेन पूरयेत्सस्यकपीतवर्णान्वराटकान् ॥ ३ ॥
टङ्कणं रविदुग्धेन पिष्ट्वा तेषां मुखं लिपेत् ।
रुद्ध्वा भाण्डे पुटेत्पश्चात्स्वाङ्गशीतं विचूर्णयेत् ॥ ४ ॥
चूर्णतुल्यं मृतं सूतं वैक्रान्तं सूतपादकम् ।
शिग्रूमूलद्रवैः सर्वं सप्तवारं विभावयेत् ॥ ५ ॥
चित्रमूलकषायेण भावनाश्चैकविंशतिः ।
आर्द्रकस्य रसेनैव भावनाः सप्त एव च ।
जम्बीरैर्मातुलुङ्गैर्वा सप्तवारं विभावयेत् ॥ ६ ॥
सूक्ष्मचूर्णं ततः कृत्वा चूर्णपादांशटंकणम् ।
टंकणांशं वत्सनाभं तत्समं मरीचं क्षिपेत् ॥ ७ ॥
लवङ्गं नागरं पथ्या कणा जातीफलं पृथक् ।
प्रत्येकं वत्सनागस्य पादांशं चूर्णितं क्षिपेत् ॥ ८ ॥
मातुलुंग्या आर्द्रकस्य रसेनैतद्विलोडयेत् ।
चतुर्गुञ्जामितं खादेत्कणाक्षौद्रं लिहेदनु ॥ ९ ॥
क्षौद्रैर्वा चाऽर्द्रकद्रावैः शुण्ठ्या वाऽथ गुडैर्युतम् ।
अनुपानैः समायोज्यः सर्वरोगोपशान्तये ॥ १० ॥
वह्निं दीपयते बलं च कुरुते तेजो महद्वर्धते
वीर्यं वर्धयते विषं च हरते दार्ढ्यं विधत्ते तनोः ।
अभ्यासेन निहन्ति मृत्युपलितं पुष्टिं प्रदत्ते नृणां
कासं सूदयते क्षयं क्षपयते श्वासं च निर्नाशयेत् ॥ ११ ॥
वातं विद्रधिपाण्डुशूलग्रहणीरक्तातिसारं जये-
न्मेहप्लीहजलोदराश्मरितृषाशोफं हलीमोदरम् ।
लूताकृच्छ्रभगंदरं ज्वरगणं चार्शांसि कुष्ठं जयेत्
साध्यासाध्यरुजो निहंति च रसस्त्रैलोक्यचिंतामणिः १२

शुद्ध पारा, हिऱ्याचें भस्म, सुवर्णभस्म, रौप्यभस्म, ताम्रभस्म, तिख्याचें भस्म, अभ्रकभस्म, शुद्ध गंधक, मौक्तिक, शंखभस्म, प्रवाळ-भस्म, शुद्ध तालक, शुद्ध मनशीळ हीं सर्व समभाग घेऊन त्यांचा सात दिवस चित्रकमूळाच्या काढ्यांत खल करावा. नंतर रुईच्या

चिकांत तीन दिवस; आणि निर्गुडी, सुरण ह्यांचा रस व त्रिधारी निवडुंगाचा चीक ह्यांत तीन तीन दिवस खल करून तें सर्व चूर्ण पिंवळ्या कवड्यांत भरावें. आणि टांकणखार रुईच्या चिकांत खलून त्यानें त्या कवड्यांचीं तोंडें लिंपावींत. नंतर मातीच्या भांड्यांत त्या कवड्या ठेवून मुखमुद्रा करून संधिलेप करून गजपुटांत पचन करावें. स्वांगशीत झाल्यावर काढून घेऊन खलून चूर्ण करावें. आणि त्या चूर्णाच्या समान पारदभस्म व पाऱ्याच्या भस्माच्या चतुर्थांश वैक्रांत घालून सर्वांचा शेवग्याच्या मूळाच्या रसांत सात दिवस खल करावा. नंतर चित्रकमूळाच्या काढ्याच्या एकवीस भावना द्याव्यात. आल्याच्या रसाच्या भावना सात, ईडलिंबाच्या रसाच्या किंवा महाळुंगाच्या रसाच्या भावना सात देऊन चूर्ण करून चूर्णाच्या चतुर्थांश टांकणखाराची लाही, टांकणखाराइतका शुद्ध बचनाग व त्याच्या बरोबरीनें मिरीं घालावीं. लवंग, सुठं, हिरडेदळ, पिंपळी व जायफळ हीं प्रत्येक बचनागाच्या चतुर्थांश घालून महाळुंगाच्या व आल्याच्या रसांत खलून ठेवावें, आणि चार गुंजा प्रमाणानें मध व पिंपळीशीं द्यावें. मधाशीं अगर आल्याच्या रसाशीं किंवा सुंठ व गुळांतून योजावें. सर्व रोगशांतीकरितां हा अनुपान योजून द्यावा. हा त्रैलोक्यचिंतामणि रस अग्नि प्रदीप्त करितो; बळ वाढवितो; तेज फार वाढवितो; वीर्य वाढवितो; विषाचा नाश करतो; शरीर दृढ करतो; नित्याभ्यासानें म्हातारपण व मृत्यु ह्यांना दूर करतो, शरीर पुष्ट करतो; खोकला दूर करतो; क्षयाचा नाश करतो; श्वासाचा नाश करतो; वात, विद्रधि, पांडु, शूळ, संग्रहणी व रक्तातिसार ह्यांना जिंकतो; प्रमेह, पानथरी, जलोदर, मूतखडा, तहान, सूज, हलीमक, उदर, लूता, मूत्रकृच्छ्र, भगंदर, ज्वरसमुदाय, मूळव्याध व कुष्ठ ह्यांना जिंकतो. हा त्रैलोक्यचिंतामणि रस साध्य आणि असाध्य रोगांचाही नाश करतो.

द्वितीय त्रैलोक्यचिंतामणि.

सूताभ्रस्वर्णताराऽरुणभिदुरशिलाताप्यगन्धप्रवाल-
योमुक्ताशङ्खतालं वरमिदमनलक्काथतः सप्त भाव्यम् ।
निर्गुण्डीसूरणाम्भःपविरविपयसा त्रिः पृथक्चाथ पीता-
नापूर्यैतैर्वराटानथ मिहिरपयष्टङ्कणालिप्तवक्त्रान् ॥ १ ॥
कृत्वा भाण्डे च रुद्ध्वा गजपुटजठरे युक्तितस्तत्तु पक्त्वो-
द्धृत्यैतन्मर्दयित्वा तदखिलतुलितं सूतभस्म प्रदद्यात् ।
वैक्रान्तं सूततुर्यांशकमथ मिलितं सप्तशः शिग्रुमूल-
त्वग्भाव्यं तेन तुल्यं विषमनलवरं टंकणं चोषणं च ॥२॥
पथ्याजातीफलं चामरकुसुमकणानागरं वत्सनाभात्
तुर्यांशं मेलयित्वा पृथगथ दिवसं मर्दयेल्लुङ्गतोयैः ।
एष त्रैलोक्यचिन्तामणिरखिलगदध्वान्तविध्वंसहंस-
स्तत्तद्रोगानुपानादुषसि कवलितः सार्धवल्लप्रमाणः ॥३॥
वातव्याध्यामवातज्वरजठरकृमिश्वासशूलास्त्रवाता-
सृक्पित्तक्षैण्यकासक्षयकफजगदोरःक्षताजीर्णमेहे ।
कुष्ठातीसारपाण्डुग्रहणिषु तमकेऽथ व्रणार्शःप्रकृष्टे
खांज्ये खञ्जाढ्यवातश्रुतिभगजगदे सर्वथैव प्रशस्तः ॥४॥

पारा, अभ्रकभस्म, सुवर्णभस्म, रौप्यभस्म, माणिक, हिरा, शुद्ध मनशीळ, सुवर्णमाक्षिक, शुद्ध गंधक, प्रवाळभस्म, लोहभस्म, मौक्तिक, शंख, शुद्ध हरताळ हीं सर्व औषधें समभाग घेऊन चित्रकाच्या काढ्यांत सात दिवस खलावीत. नंतर निर्गुडी व सुरण ह्यांचा रस, त्रिधारी निवडुंगाचा चीक व रुईचा चीक ह्यांच्या तीन तीन भावना द्याव्या. नंतर चूर्ण करून तें पिंवळ्या कवड्यांत भरावें आणि टांकणखार रुईच्या चिकांत खलून त्यानें त्या कवड्यांचीं तोंडें लिंपावीत. नंतर त्या कवड्या एका गाडग्यांत भरून तोंड बंद करून संधिलेप करून गजपुट द्यावें. स्वांगशीत झाल्यावर काढून त्यांत त्याच्या समान पारदभस्म घालावें. पारदभस्माच्या चतुर्थांश वैक्रांत घालून शेवग्याच्या मुळाच्या सालीच्या काढ्याच्या सात भावना द्याव्या. नंतर त्याच्या बरोबरीनें त्यांत शुद्ध बचनागाचें चूर्ण घालून चित्रक, टांकणखार, मिरीं, हिरडेदळ, जायफळ, लवंग, पिंपळी व सुंठ हीं प्रत्येक औषधें बच-

नागाच्या चवथ्या हिश्शानें घालून महाळुंगाच्या रसांत एक दिवस खल करावा. हा त्रैलोक्यचिंतामणि रस दीड वाल प्रमाणें अनुपान योजून दिला असतां सूर्याप्रमाणें सर्व रोगरूपी अंधकाराचा नाश करतो. वातव्याधि, आमवात, ज्वर, उदर, कृमि, श्वास, शूळ, वातरक्त, रक्तपित्त, क्षीणता, खोकला, क्षय, कफजन्य रोग, उरःक्षत, अजीर्ण, प्रमेह, कुष्ट, अतिसार, पांडुरोग, संग्रहणी, तमक श्वास, व्रण, मूळव्याध, पंगुत्व, आढचवात, कर्णरोग व भगंदर ह्यांजवर हा प्रशस्त आहे.

योगसारामधील चिंतामणि रस.

रसेन्द्रवैक्रान्तकरौप्यताम्रं सलोहमुक्ताफलगन्धहेम ।
त्रिर्भावितं चाऽऽर्द्रकभृङ्गवह्निरसैरजागोपयसा तथैव ॥ १ ॥
अर्शः क्षयं कासमरोचकं च जीर्णज्वरं पाण्डुमपि प्रमेहान् ।
गुञ्जाप्रमाणं मधुमागधीभ्यां लीढं निहन्याद्विषमं च वातम् ।
चिन्तामणिरिति ख्यातः पार्वत्या निर्मितः स्वयम् ॥ २ ॥

पारा, वैक्रांत, रौप्यभस्म, ताम्रभस्म, लोहभस्म, मौक्तिक, शुद्ध गंधक, सुवर्णभस्म हीं औषधें समभाग घेऊन त्यांचा खल करावा. नंतर आल्याचा रस, माक्याचा रस, चित्रकाचा काढा व गाईचें व शेळीचें दूध ह्यांच्या तीन तीन भावना द्याव्यात. म्हणजे हा चिंतामणि रस तयार होतो. हा मूळव्याध, क्षय, खोकला, अरुचि, जीर्णज्वर, पांडुरोग व प्रमेह ह्यांचा नाश करतो. हा गुंज प्रमाणानें मध व पिंपळीशीं द्यावा, म्हणजे विषमवाताचाही नाश करतो. हा चिंतामणि रस स्वतः पार्वतीनें निर्माण केला आहे.

वसंतकुसुमाकर.

प्रवालरसमौक्तिकाभ्रकमिदं चतुर्भागभाक्
पृथक्पृथगतः स्मृते रजतहेमनीद्वयंशके ।
अयोभुजगरङ्गकं त्रिलवकं विमर्द्याखिलं
शुभेऽहनि विभावयेद्भिषगिदं धिया सप्तशः ॥ १ ॥
द्रवैर्वृषनिशेक्षुजैः कमलमालतीपुष्पजैः
पयःकदलिकन्दजैर्मलयचन्दनाद्युद्भवैः ।
वसन्तकुसुमाकरो रसपतिर्द्विवल्लोऽशितः

समस्तगदहृद्भवेत्किल निजानुपानैरयम् ॥ २ ॥
क्षिणोत्यनुमधूषणैः क्षयगदेषु सर्वेष्वपि
प्रमेहरुजि रात्रिभिः समधुशर्कराभिः सह ।
सितामलयजद्रवैर्महति रक्तपित्तेऽथवा
सितामधुसमन्वितैर्वृषभपल्लवानां द्रवैः ॥ ३ ॥
त्रिजातगरुचन्दनैरपि च तुष्टिपुष्टिप्रदो
मनोभवकरः परो वमिषु शङ्खपुष्पीरसैः ।
अभीरुरसशर्करामधुभिरम्लपित्तामये
परेषु च यथोचितं ननु गदेषु संसेवयेत् ॥ ४ ॥

प्रवाळभस्म, पारदभस्म (रससिंदूर), मौक्तिकभस्म व अभ्रकभस्म हीं चार चार भाग, सुवर्णभस्म व रौप्यभस्म दोन दोन भाग, आणि लोहभस्म, नागभस्म व वंगभस्म हीं तीन तीन भाग घेऊन ह्या सर्वांचा खल करून अडुळसा, हळद, ऊंस, कमळाचीं फुलें, मालतीचीं फुलें, दूध, केळीच्या कांद्याचा रस व चंदन ह्यांच्या यथासंभव रसाच्या अगर काढ्याच्या सात सात भावना द्याव्यात. नंतर हा वसंतकुसुमाकर रस अनुपान योजून द्यावा; म्हणजे सर्व रोगांचा नाशक होतो. हा मध व मिऱ्याची पूड ह्यांशीं सर्व क्षयांवर द्यावा. सर्व प्रमेहांवर हळदीची पूड, मध व साखरेशीं द्यावा. चंदनाचा काढा व खडीसाखर ह्यांशीं मोठ्या रक्तपित्तावर द्यावा. किंवा मध व खडीसाखर ह्यांत अडुळशाच्या पानाचा रस घालून त्यांतून द्यावा. दालचिनी, तमालपत्र, वेलदोड्याचे दाणे, अगरु व चंदन ह्यांच्या चूर्णाशीं दिला असतां प्रसन्नता, पुष्टि व कामोत्तेजन करतो. हा ओकारीवर शंखपुष्पीच्या रसांतून द्यावा. शतावरीचा रस साखर व मध ह्यांजबरोबर आम्लपित्तावर द्यावा. आणि इतर रोगांवर अनुपान योजून द्यावा.

लोकेश्वर.

पलं कपर्दचूर्णस्य पलं पारदगन्धयोः ।
माषष्टंकणकस्यैको जम्बीराद्भिर्विमर्दयेत् ॥ १ ॥
पुटेल्लोकेश्वरो नाम्ना लोकनाथोऽयमुत्तमः ।
ऋते कुष्ठं रक्तपित्तमन्यरोगान्क्षयं नयेत् ॥ २ ॥

पुष्टिवीर्यप्रसादौजःकान्तिलावण्यदः परः ।
कोऽस्ति लोकेश्वरादन्यो नृणां शंभुमुखोद्गतात् ॥ ३ ॥

चार तोळे कवड्यांचें चूर्ण, दोन तोळे पारा व दोन तोळे शुद्ध गंधक आणि एक मासा टाकणखार ह्यांची कज्जली करून लिंबाच्या रसांत खल करावा; आणि एक गजपुट द्यावें. ह्याला लोकेश्वर किंवा लोकनाथरस म्हणतात. हा रक्तपित्त व कुष्ट हे रोग खेरीज करून बाकीच्या रोगांचा नाश करतो. हा पुष्टि, वीर्य, प्रसन्नता, ओज, कान्ति व लावण्य देतो. महादेवानें सांगितलेल्या ह्या रसाप्रमाणें आरोग्यदायक असा दुसरा कोणता रस आहे?

लोकेश्वरपोटली रस.

रसस्य भस्मना हेम पादांशेन प्रकल्पयेत् ।
द्विगुणं गन्धकं दत्वा मर्दयेच्चित्रकाम्बुना ॥ १ ॥
वराटकांश्च संपूर्य टंकणेन निरुध्य च ।
भाण्डे चूर्णप्रलिप्तेऽथ शीघ्रं रुन्ध्यात्तु मृन्मये ॥ २ ॥
शोषयित्वा पुटेद्गर्ते रत्निमात्रेऽपराह्णके ।
स्वाङ्गशीतलमुद्धृत्य चूर्णयित्वाऽथ विन्यसेत् ॥ ३ ॥
एष लोकेश्वरो नाम्ना वीर्यपुष्टिविवर्धनः ।
गुञ्जाचतुष्टयं खादेत्पिप्पलीमधुसंयुतम् ॥ ४ ॥
भक्षयेत्परया भक्त्या लोकेशः सर्वदाशनः ।
अङ्गकार्श्येऽग्निमान्द्ये च कासे पित्ते रसस्त्वयम् ॥ ५ ॥
मरीचैर्घृतसंयुक्तैः प्रदातव्यो दिनत्रयम् ।
लवणं वर्जयेत्तत्र साज्यं दधि च योजयेत् ॥ ६ ॥
एकविंशत्यहानीत्थं मरीचं सघृतं पिबेत् ।
पथ्यं मृगांकवज्ज्ञेयं शयीतोत्तानपादतः ॥ ७ ॥
ये शुष्का विषमाशनैः क्षयरुजा व्याप्ताश्च ये कुष्ठिनो
ये पाण्डुत्वहताः कुवैद्यविधिना ये शोषिणो दुर्भगाः ।
ये तप्ता विधिधैर्ज्वरैर्भ्रमदोन्मादैः प्रमादं गता-
स्ते सर्वे विगतामया हि परया स्युः पोटलीसेवया ॥८॥

पारदभस्म एक भाग, सुवर्ण चतुर्थांश भाग व शुद्ध गंधक दोन भाग ह्यांचा चित्रकाच्या काढ्यांत खल करावा. नंतर त्याचें चूर्ण करून कवड्यांत भरावें, आणि त्या एका कवड्यांचीं तोंडें टांकण-खारानें लिंपावीत. नंतर एका गाडग्यास आंतून चुन्यानें सारवून

लगेंच त्यांत त्या कवड्या भरून मुखमुद्रा करून वाळल्यावर एक चौरस हात खळग्यांत तिसरे प्रहरानंतर पुट द्यावें. स्वांगशीत झाल्यावर काढून चूर्ण करून भरून ठेवावें. हा लोकेश्वर नांवाचा रस वीर्य व पुष्टि वाढवितो. हा, चार गुंजा मध व पिंपळीशीं द्यावा. कृशत्व, अग्निमांद्य, खोकला व पित्त ह्यांजवर हा रस भक्तिपूर्वक नेहमीं सेवन करावा. ह्या वरील विकारांवर तूप व मिऱ्यांची पूड ह्यांजबरोबर तीन दिवस द्यावा. ह्याजवर मीठ वर्ज करावें, व दहीं व तूप खाण्यास द्यावें. ह्याप्रमाणें एकवीस दिवसपर्यंत तूप व मिरपुडीशीं हा रस द्यावा. ह्याजवर मृगांकाप्रमाणें पथ्य करावें; व औषध घेतल्याबरोबर वर पाय करून थोडा वेळ निजावें. जे कृश झालेले, विषमज्वरानें पीडिलेले, क्षयानें व्यापलेले, कुष्ठी, पांडुरोगी, अडाणी वैद्याच्या उपचारानें कृश झालेले, नानाप्रकारच्या ज्वरानें पीडिलेले; श्रम, मद व उन्माद ह्यांनीं पीडिलेले हे सर्व ह्या लोकेश्वर पोटलीच्या सेवनानें निरोगी होतील.

प्राणदा पर्पटी.

सूताभ्रायोहिवंगोषणविषमखिलांशेन गन्धेन लोह्यां
कोलाग्नौ विद्रुतेन क्षणमथ मिलितं ढालितं गोमयस्थे।
रम्भापत्रेऽमुनाऽन्येन च दृढपिहितं प्राणदा पर्पटी स्यात्
पाण्डौ रेके ग्रहण्यां ज्वररुजि कसने यक्ष्ममेहाग्निमान्द्ये १
प्राणदा पर्पटी सैषा भाषिता शंभुना स्वयम्।
तत्तद्रोगानुपानेन सर्वरोगविनाशिनी ॥ २ ॥

पारा, अभ्रकभस्म, लोहभस्म, नागभस्म, वंगभस्म, मिरीं व शुद्ध बचनाग, हीं सर्व समभाग घेऊन सर्वांच्या बरोबरीनें शुद्ध गंधक घालून खल करून लोखंडी कढईत बोरीच्या लाकडाच्या अग्नीनें पातळ करून, सर्व एकत्र मिसळल्यावर गाईच्या शेणावर केळीचें पान ठेवून त्यावर ओतावें; व केळीचें दुसरें पान वर ठेवून दडपून ठेवावें. हिला प्राणदा पर्पटी असें म्हणतात. ही पांडुरोग, हगवण, संग्रहणी, ज्वर, खोकला, क्षय, प्रमेह व अग्निमांद्य ह्यांजवर द्यावी. ही प्राणदा पर्पटी स्वतः शंभूनें सांगितली आहे. ही

अनुपान योजून दिली असतां सर्व रोग दूर करिते.

कुमुदेश्वर रस.

पारदं शोधितं गन्धमभ्रकं च समं समम् ।
तदर्धं दरदं दद्यात्तदर्धां च मनःशिलाम् ॥ १ ॥
सर्वार्धं मृतलोहं च खल्वमध्ये विनिक्षिपेत् ।
द्विःसप्तभावना देयाः शतावर्या रसेन च ॥ २ ॥
ततः सिद्धो भवत्येष कुमुदेश्वरसंज्ञकः ।
सितया मरिचेनाथ गुञ्जाद्वित्रिप्रमाणतः ॥ ३ ॥
भक्षयेत्प्रातरुत्थाय पूजयित्वेष्टदेवताम् ।
यक्ष्माणमुग्रं हन्त्येव वातपित्तकफामयान् ॥ ४ ॥
ज्वरादीनखिलान्रोगान्यथा दैत्याञ्जनार्दनः ।
सतताभ्यासयोगेन वलीपलितनाशनः ॥ ५ ॥

शुद्ध पारा, गंधक व अभ्रक समभाग, अर्धा भाग शुद्ध हिंगुळ, पाव भाग शुद्ध मनशीळ, सर्वांच्या निर्मे लोहभस्म, ह्याचा एकत्र खल करून शतावरीच्या रसाच्या चौदा भावना द्याव्या. म्हणजे हा कुमुदेश्वर रस तयार होतो. रोज प्रतःकाळीं इष्टदेवतेची पूजा करून हा रस दोन तीन गुंजांपर्यंत, मिऱ्याची पूड व खडीसाखर ह्यांशीं द्यावा. म्हणजे वात, पित्त व कफजन्यरोग व उग्र क्षय ह्यांचा नाश करतो. ज्याप्रमाणें विष्णु दैत्यांचा नाश करतो, त्याप्रमाणें ज्वरादि सर्व रोगांचा हा नाश करतो. सतत अभ्यासानें हा वलीपलित रोगाचा नाश करतो.

पंचामृताख्य रस.

भस्मीभूतसुवर्णतारदिनकृत्सूताभ्रसत्त्वैः क्रमात्
संवृद्धैस्त्रितयं त्रिभिः कृमिहराम्भोदैर्युतः कट्फलैः ।
निर्गुण्डीदशमूलवह्रिरजनीव्योषार्द्रकैर्भावितो
गोलीकृत्य विशोषितो निगदितः पञ्चामृताख्यो रसः ॥१
नानेन सदृशः कोऽपि रसोऽस्ति भुवनत्रये ।
निहन्ति सकलान्रोगान्भवरोगमिवाच्युतः ॥ २ ॥
सर्वरोगहरः सूतस्तत्तद्रोगानुपानतः ।
अयं पञ्चामृतो नृणां त्रिदशानामिवामृतम् ॥ ३ ॥

सुवर्णभस्म १ भाग, रौप्यभस्म दोन भाग, ताम्रभस्म तीन भाग,

पारदभस्म चार भाग, अभ्रकभस्म पांच भाग; वावडिंगें, नागरमोथे व कायफळ तीन तीन भाग, ह्या सर्वांचा एकत्र खल करून त्याला निर्गुडी, दशमुळें, चित्रकमूळ, हळद, सुंठ, मिरीं, पिंपळी व आलें ह्यांच्या यथासंभव रसाच्या व काढ्याच्या भावना द्याव्यात व व गोळ्या कराव्यात. ह्याला पंचामृताख्य रस म्हणतात. ह्यासारखा गुणकारक दुसरा रस त्रिभुवनांत नाहीं. जसा विष्णु भवरोगापासून मनुष्याला मुक्त करतो, त्याप्रमाणें हा सर्व रोगांपासून मुक्त करतो. त्या त्या रोगाचें अनुपान योजून दिला असतां सर्व रोग दूर करतो. देवांना जसें अमृत त्याप्रमाणें मनुष्यांना हा पंचामृताख्यरस आहे.

हेमाभ्रकरससिंदूर.

अभ्रकं रससिन्दूरमिश्रितं हेमभस्मना ।
समभागं प्रकुर्वीत रसेनाऽऽर्द्रकयोजितम् ॥ १ ॥
क्षयं च क्षयपाण्डुं च क्षयकासं च कुष्ठकम् ।
जयेन्मण्डलपर्यन्तं पूर्वकर्मविपाककृत् ॥ २ ॥

अभ्रकभस्म, सुवर्णभस्म व रससिंदूर हीं औषधें समभाग घेऊन त्यांचा एकत्र खल करावा व आल्याच्या रसांतून त्याची योजना करावी. हा बेचाळीस दिवसपर्यंत घेतला असतां पूर्वकर्मविपाकानें झालेला क्षय, पांडुरोग, क्षयकास व कुष्ठ ह्यांना जिंकतो.

शिलाजत्वादि लोह.

शिलाजतुयुतं लोहं वल्लं तु विधिमारितम् ।
पथ्याशी सेवते यस्तु स यक्ष्माणं व्यपोहति ॥ १ ॥

शिलाजित, आणि विधियुक्त रीतीनें मारलेलें लोहभस्म दोनी मिळून एक वाल सेवन करून जो पथ्यानें राहतो त्याचा क्षय नाश पावतो.

सुवर्णपर्पटी रस.

शुद्धं सुवर्णदलमष्टगुणेन शुद्ध-
सूतेन पिण्डितमथो वसुभागभाजि ।
गन्धे द्रुते बदरवह्निषु लोहपात्रे
दत्त्वाऽवलोड्य लघुलोहशलाकया तत् ॥ १ ॥
मन्दं निरस्य सुरभीमलमण्डलस्थे

रम्भादले तदुपरि प्रणिधाय चान्यत् ।
रम्भादलं लघु नियन्त्र्य तदाददीत
शीतं सुवर्णरसपर्पटिकाभिधानम् ॥ २ ॥
पित्तोल्बणे ससितया तुगयाऽथ वात-
श्लेष्मोल्बणे किल तुगामधुपिप्पलीभिः ।
क्षीणे विरेकिणि च शोषिणि मन्दवह्नौ
पाण्डौ प्रमेहिणि चिरज्वरिणि ग्रहण्याम् ॥
वृद्धे शिशौ सुखिनि राज्ञि तथैव नार्यां
भैषज्यमेतदुदितं हितमामयघ्नम् ॥ ३ ॥

शुद्ध सोन्याचा वर्ख एक भाग आणि शुद्ध पारा आठ भाग ह्यांचा एकत्र खल करून गोळा करावा. नंतर आठ भाग शुद्ध गंधक बोरीच्या काष्टाच्या अग्नीनें लोखंडाच्या कढईत पातळ करून त्यांत तो गोळा घालून लोखंडाच्या सळईनें ढवळावें. आणि गाईच्या शेणाच्या मंडळावर केळीचें पान ठेवून त्याजवर तें मिश्रण हळूच ओतावें; व लागलींच दुसरें केळीचें पान त्याजवर घालून थोडें दडपावें. थंड झाल्यावर ती पर्पटी काढून घ्यावी. हिला सुवर्णपर्पटी रस म्हणतात. पित्ताधिक विकारावर ही वंशलोचन व व खडीसाखरेशीं द्यावी. वातकफाधिक विकारामध्यें वंशलोचन, मध व पिंपळी ह्यांशीं द्यावी. क्षीण झालेला, अतिसारी, क्षयी, अग्निमांद्य झालेला, पांडुरोगी, प्रमेही, ज्याच्या अंगांत ज्वर फार मुरला आहे असा, संग्रहणी झालेला, वृद्ध, बाल, सुखी मनुष्य, राजा व स्त्रिया ह्यांना हितकारक व रोगनाशक असा हा सुवर्ण-पर्पटी रस आहे म्हणून सांगितलें आहे.

मृत्युंजय रस.

त्रिकटु त्रिफला सूतगन्धकौ टङ्कणं विषम् ।
यष्टी निशा कुबेराक्षो दन्तीबीजमथापि च ॥ १ ॥
एतानि समभागानि खल्वमध्ये विनिक्षिपेत् ।
भृङ्गराजरसेनैव मर्दयेत्त्रिदिनं भिषक् ॥ २ ॥
गुटिका माषमात्रास्तु च्छायाशुष्काश्च कारयेत् ।
अनुपानविशेषेण सर्वरोगेषु योजयेत् ॥
मृत्युंजयो रसो नाम सर्वरोगविदारणः ॥ ३ ॥

सुंठ, मिरीं, पिंपळी, हिरडा, बेहडा, आवळकाठी, पारा, गंधक, टांकणखाराची लाही, शुद्ध बचनाग, ज्येष्ठमध, हळद, सागरगोटा व शुद्ध जेपाळबीज, हीं समभाग घेऊन खलामध्यें घालून माक्याच्या रसांत तीन दिवस खल करून एक एक माशाच्या गोळ्या करून सावलींत वाळवाव्यात. ह्या अनुपान योजून सर्व रोगांवर द्याव्या. हा मृत्युंजय नांवाचा रस सर्व रोगांचा नाश करतो.

रक्तवर्ण हेमगर्भ रस.

हिंगुलं कर्षमात्रं तु मर्दयेत्खल्वमध्यगम् ।
सुवर्णं माषमेकं च तत्समं पारदं क्षिपेत् ॥ १ ॥
मर्दयित्वा क्षिपेत्तत्र गंधकं ह्यर्धमाषकम् ।
मर्दयेदर्कजक्षीरैर्बंधयेत्पट्टमध्यगे ॥ २ ॥
भूधरे पाचयेद्यंत्रे कुक्कुटीपुटितेन च ।
पुनर्वस्त्रेण संवेष्ट्य तस्योपरि च गंधकम् ॥ ३ ॥
वस्त्रमेकत्र बध्नीयात् पुनर्यंत्रेण पूर्ववत् ।
हेमगर्भरसो नाम तरुणारुणसंनिभः ॥ ४ ॥
सर्वरोगेषु दातव्य एकैके द्वित्रिदोषजे ।
त्रिदोषे आर्द्रकरसैर्मधुयुक्तैः प्रयोजयेत् ॥ ५ ॥

एक तोळा शुद्ध हिंगूळ खलामध्यें घालून खलावा. नंतर त्यांत एक मासा सोन्याचा चूर, एक मासा शुद्ध पारा व अर्धा मासा शुद्ध गंधक घालून रुईच्या चिकांत खल करून एका फडक्यांत मोटळी बांधून कुक्कुटपुटानें भूधर यंत्रांत पचन करावें. नंतर काढून त्या मोटलीच्या खालीं वर शुद्ध गंधक घालून पुनः वस्त्रानें बांधून पूर्ववत् भूधर यंत्रांत पचन करावें. म्हणजे तरुण अरुणाप्रमाणें आरक्तवर्ण हेमगर्भ तयार होतो. हा एकदोषजन्य, द्विदोषजन्य किंवा त्रिदोषजन्य सर्व रोगांवर द्यावा. त्रिदोषावर आल्याचा रस व मध ह्यांतून द्यावा.

ज्वराणां शमनीयो यः पूर्वमुक्तः क्रियाविधिः ।
यक्ष्मिणां ज्वरदाहेषु स सर्पिष्षु प्रशस्यते ॥ १ ॥
नित्यं स्वदेवपूजाभक्तिर्भैषज्यदेवतागुरुषु ।
छागलमांसपयोऽश्नञ्जीवति यक्ष्मी चिरं धृतिमान् ॥ २ ॥
उपद्रवांश्च स्वरवैकृतादीञ्जयेद्यथास्वं प्रसमीक्ष्य शास्त्रम् ।

त्यजेत्कुवैद्यप्रतिपादितानि बुधो विरुद्धानि च भेषजानि ॥३॥
गीतवादित्रशब्दैश्च प्रियस्तुतिभिरेव च ।
हर्षणाश्वासनैर्नित्यं गुरूणां समुपासनैः ॥ ४ ॥
ब्रह्मचर्येण दानेन तपसा देवतार्चनैः ।
सत्येनाऽऽचारयोगेन रविमण्डलसेवया ॥
वैद्यविप्रार्चनाच्चैव रोगराजो निवर्तते ॥ ५ ॥

पूर्वी ज्वरशामक म्हणून जो विधि सांगितला आहे, तोच क्षयी मनुष्यास ज्वर व दाह असतां तुपासह देणें हें हितकर आहे. नित्य कुलदेवतांची पूजा करणारा, देवता, गुरु व औषध ह्यांजवर भक्ति ठेवणारा आणि धैर्य धरून शेळीचें दूध व बोकडाचें मांस खाणारा क्षयी मनुष्य फार दिवस वांचतो. शास्त्रानुसार त्या त्या रोगाची चिकित्सा करून स्वरभेदादि उपद्रव जिंकावे. सुज्ञानें अडाणी वैद्यांनीं सांगितलेलीं औषधें व परस्परविरुद्ध गुणांचीं औषधें वर्ज्य करावीं. प्रिय अशा गीतवाद्यादि शब्दांनीं, स्तुतीनें, हर्षानें व आश्वासनानें, नित्य गुरूच्या उपासनेनें, ब्रह्मचर्यानें, दानानें, तपश्चर्येनें, देवतार्चनानें, सत्याचरणानें, सूर्याच्या आराधनानें आणि वैद्य व ब्राह्मण ह्यांच्या पूजनानें राजयक्ष्मा दूर होतो.

उरःक्षतनिदान.

धनुराकर्षतोऽत्यर्थं भारमुद्वहतो गुरुम् ।
युध्यमानस्य बलिभिः पततो विषमोच्चतः ॥ १ ॥
वृषं हयं वा धावन्तं दम्यं चान्यं निगृह्णतः ।
शिलाकाष्ठाश्मनिर्घातान्क्षिपतो निघ्नतः परान् ॥ २ ॥
अधीयानस्य वाऽत्युच्चैर्दूरं वा व्रजतो द्रुतम् ।
महानदीं वा तरतो हयैर्वा सह धावतः ॥ ३ ॥
सहसोत्पततो दूरं तूर्णं चाप्यतिनृत्यतः ।
तथाऽन्यैः कर्मभिः क्रूरैर्भृशमभ्याहतस्य च ॥ ४ ॥
स्त्रीषु चातिप्रसक्तस्य रूक्षाल्पप्रमिताशिनः ।
विक्षते वक्षसि व्याधिर्बलवान्समुदीर्यते ॥ ५ ॥
उरो विरुज्यतेऽत्यर्थं भिद्यतेऽथ विदह्यते ।
प्रपीड्यते ततः पार्श्वे शुष्यत्यङ्गं प्रवेपते ॥ ६ ॥

क्रमाद्वीर्यं बलं वर्णो रुचिरग्निश्च हीयते ।
ज्वरो व्यथा मनोदैन्यं विड्भेदोऽग्निवधस्तथा ॥ ७ ॥
दुष्टः श्यावः सुदुर्गन्धिः पीतो विग्रथितो बहुः ।
कासमानस्य चाभीक्ष्णं कफः सासृक् प्रवर्तते ॥ ८ ॥
स क्षती क्षीयतेऽत्यर्थं तथा शुक्रौजसोः क्षयात् ।
अव्यक्तं लक्षणं तस्य पूर्वरूपमिति स्मृतम् ॥ ९ ॥
उरोरुक्शोणितच्छर्दिः कासो वैशेषिकः क्षते ।
क्षीणे सरक्तमूत्रत्वं पार्श्वपृष्ठकटिग्रहः ॥ १० ॥

अतिशय धनुष्य ओढण्यानें, अतिशय जड ओझें वाहण्यानें, बलवानांशीं झोंबी खेळण्यानें, वांकड्यातिकड्या व उंच ठिकाणावरून पडणें; बैल, घोडा वगैरे दुसऱ्याही भरधांव पळणाऱ्या जनावरांना आवरून धरणें, मोठमोठ्या शिळा, दगड, लांकडें व मोठीं शस्त्रें फेंकणें, शत्रूला मारणें, मोठमोठ्यानें घोकून अभ्यास करणें, जलदीनें दूर चालत जाणें, मोठी नदी पोहून जाणें, घोड्याबरोबर धावणें, उंचावरून एकाएकीं पडणें, गडबडीनें अतिशय नाचणें, अशींच दुसरीं अघोर कर्में करणें, शस्त्रादिकांचा आघात होणें, वगैरे कारणांनीं किंवा थोडें, परिमित व रूक्ष अन्न खाणारा असून अत्यंत स्त्रीसंग करणारा अशा मनुष्याच्या छातीमध्यें भयंकर दुखापत होते. त्याला उरःक्षत असें म्हणतात. ह्या उरःक्षतामुळें छाती अत्यंत दुखते; फोडल्याप्रमाणें वाटतें; छातींत दाह होतो; दोन्ही कुशींत पीडा होते; शरीर शुष्क होतें; अंग कापतें; वीर्य, बळ, अंगाचा वर्ण, रुचि व जठराग्नि हीं क्रमानें कमी कमी होत जातात. ज्वर, व्यथा, मनाची उदासीनता, अतिसार, जठराग्नि नष्ट होणें हीं लक्षणें होतात. खोकला आला म्हणजे दूषित, काळसर, दुर्गंधीयुक्त, पिंवळट, गाठाळलेला, व रक्तमिश्र असा कफ पुष्कळ पडतो. व तो उरःक्षती मनुष्य शुक्र व ओज ह्यांचा क्षय झाल्यामुळें अत्यंत क्षीण होतो. उरःक्षताचें जें अस्पष्ट लक्षण तेंच त्याचें पूर्वरूप समजावें. उरांत दुखणें, वांति झाली असतां त्यांतून रक्त पडणें, खोकला, क्षीण झाल्यामुळें लघवींतून रक्त पडणें, कुशी, पाठ व कंबर ताठल्यासारखी होणें हीं उरःक्षताचीं लक्षणें आहेत.

अल्पलिङ्गस्य दीप्ताग्नेः साध्यो बलवतो नवः ।
परिसंवत्सरो याप्यः सर्वलिङ्गं विवर्जयेत् ॥ ११ ॥

ज्याला उरःक्षताचीं किंवा क्षयाचीं लक्षणें अल्प आहेत, ज्याचा अग्नि प्रदीप्त आहे, जो बलवान आहे व ज्याचा व्याधिही नवीन आहे, असा उरःक्षताचा किंवा क्षयाचा रोगी साध्य समजावा. हा रोग होऊन ज्यास एक वर्षभर होऊन गेलें आहे त्याचा हा रोग याप्य समजावा. आणि ज्याला सर्व लक्षणें झालीं आहेत तो असाध्य समजून सोडून द्यावा.

उरःक्षतचिकित्सा.

उरोमन्थी क्षती लाजान्पयसा मधुसंयुतान् ।
सद्य एव पिबेज्जीर्णे पयसाऽद्यात्सशर्करम् ॥ १ ॥
पार्श्वबस्तिरुजि त्वल्पपित्ताग्निस्तान्सुरायुतान् ।

हृद्रोग व उरःक्षत झालेल्या मनुष्यानें भाताच्या लाह्या दूध व मध ह्यांशीं खाव्यात; व त्या जिरल्यावर त्यांजवर दूध व साखरेशीं जेवावें. ज्याच्या कुशीमध्यें व बस्तीमध्यें दुखतें आहे, पित्त कमी झालें आहे, व अग्नि मंद झाला आहे त्यानें ह्या लाह्या मद्याबरोबर घ्याव्यात.

बलाश्वगन्धाश्रीपर्णीबहुपत्रीपुनर्नवाः ॥ २ ॥
पयसा नित्यमभ्यस्ताः शमयन्ति ह्युरःक्षतम् ।

चिकणामूळ, आस्कंध, शिवणीचें मूळ, शतावरी, व पांढरी वसू ह्यांचें चूर्ण करून नित्य दुधाशीं घ्यावें, म्हणजे उरःक्षत दूर होतें.

शर्करामधुसंयुक्तं जीवकर्षभकौ मधु ॥ ३ ॥
लिह्यात्क्षीरानुपानानि रक्तक्षीणतरः कृशः ।

रक्तक्षयानें व अत्यंत क्षीण आणि कृश झालेल्या मनुष्यानें साखर व मध घालून, जीवक, ऋषभक व ज्येष्ठमध ह्यांचें चूर्ण घेऊन वर दूध प्यावें.

नीलिकातिविषाग्रन्थिपद्मकेसरचन्दनैः ।
शृतं पयो मधुयुतं संधानार्थं पिबेत्क्षती ॥ ४ ॥

उरःक्षत झालेल्या रोग्यानें तें क्षत भरून येण्याकरितां नीळ,

अतिविष, पिंपळमूळ, कमळांतील केशर, व चंदन ह्या औषधांनीं सिद्ध केलेलें दूध मध घालून प्यावें.

लाक्षाचूर्णं सुष्ठु कृतं क्षौद्राज्येनान्वितं क्षीरम् ।
शमयति शोषोद्भूतं वमनं रक्तस्य सिद्धमिव ॥ ५ ॥

लाखेचें बारीक चूर्ण करून तें तूप, मध व दूध ह्यांशीं मिळवून द्यावें. तें क्षयापासून होणाऱ्या रक्ताच्या वांतीचें शमन करितें. हा सिद्धयोग आहे.

एलादि गुटिका.

एलापत्रत्वचो द्राक्षा पिप्पल्यर्धपलं तथा ।
सितामधुकखर्जूरमृद्वीकाश्च पलोन्मिताः ॥ १ ॥
संचूर्ण्य मधुना युक्ता गुटिकाः संप्रकल्पयेत् ।
अक्षमात्रां ततश्चैकां भक्षयेच्च दिने दिने ॥ २ ॥
कासं श्वासं ज्वरं हिक्कां छर्दिं मूर्छां मदं भ्रमम् ।
रक्तनिष्ठीवनं तृष्णां पार्श्वशूलमरोचकम् ॥ ३ ॥
शोषप्लीहाढ्यवातांश्च स्वरभेदं क्षतक्षयम् ।
गुटिका तर्पणी वृष्या रक्तपित्तं च नाशयेत् ॥ ४ ॥

वेलदोडे, तमालपत्र, दालचिनी, द्राक्षें (मनुका), व पिंपळी हीं दोन दोन तोळे, खडीसाखर, ज्येष्ठमध, खारीक, व गोस्तनी मनुका हीं चार चार तोळे, ह्या सर्वांचें चूर्ण करून मधांत खलून एक तोळा प्रमाणाच्या गोळ्या कराव्यात; आणि त्यांतून रोज एक एक गोळी खावी. म्हणजे खोकला, श्वास, ज्वर, उचकी, ओकारी, मूर्च्छा, मद, भ्रम, रक्ताची वांति, तहान, बरगड्यांतील शूल, अरुचि, शोष, पांथरी, आढ्यवात, स्वरभेद, उरःक्षत, क्षय व रक्तपित्त ह्यांचा नाश होतो. ही गुटिका तृप्तिकारक व वृष्य आहे.

यष्ट्याद्यघृत.

यष्ट्याह्वनागबलयोः क्काथे क्षीरसमं घृतम् ।
पयसा पिप्पलीवांशीकल्कसिद्धं क्षते हितम् ॥ १ ॥

ज्येष्ठमध व गांगेरुकीची मुळी ह्यांच्या काढ्यांत तूप व तुपाचे बरोबरीनें दूध व पिंपळी आणि वंशलोचन ह्यांचा दुधांत कल्क करून घालून तूप सिद्ध करावें. तें उरःक्षतावर हितकारक आहे.

बलाद्यघृत.

घृतं बलानागबलार्जुनाम्बुसिद्धं सयष्टीमधुकल्कपादम् ।
हृद्रोगशूलक्षतरक्तपित्तकासानिलान्संशमयत्युदीर्णान् ॥ १ ॥

लहान चिकणा, मोठा चिकणा, व अर्जुनसादडा ह्यांच्या काढ्यांत चवथाई तूप व तुपाच्या चवथाई ज्येष्टमधाचा कल्क घालून तूप सिद्ध करावें. तें हृद्रोग, शूळ, उरःक्षत, रक्तपित्त, खोकला व वात ह्या विकारांचें शमन करितें.

श्वदंष्ट्राद्यघृत.

श्वदंष्ट्रोशीरमञ्जिष्ठाबलाकाश्मर्यकत्तृणम् ।
दर्भमूलं पृथक्पर्णी बला सर्षपिका स्थिरा ॥ १ ॥
पालिकान्साधयेत्तेषां रसे क्षीरे चतुर्गुणे ।
कल्कैः स्वगुप्तावर्षाभूमेदाजीवन्तिजीवकैः ॥ २ ॥
शतावर्यादिमृद्वीकाशर्कराश्रावणीवृषैः ।
प्रस्थः सिद्धो घृताद्वातपित्तहृद्रोगगुल्मनुत् ॥ ३ ॥
मूत्रकृच्छ्रप्रमेहार्शःकासशोषक्षयापहः ।
धनुस्तम्भाद्यभाराध्वक्षीणानां बलमांसदः ॥ ४ ॥

गोखरू, वाळा, मंजिष्ठ, चिकणामूळ, शिवणमूळ, रोहिस गवत, दर्भाचें मूळ, पिटवण, थोर चिकणा, शिरस व सालवण हीं औषधें चार चार तोळे घेऊन त्यांचा काढा करून त्या काढ्यांत तुपाच्या चौपट दूध व कवचबीज, पांढरी वसू, मेदा, जीवक, हरणदोडी, शतावरी, मनुका, साखर, मुंडी व अडुळसा ह्या औषधांचा चतुर्थांश कल्क घालून चौसष्ट तोळे तूप सिद्ध करावें. तें वात, पित्त, हृद्रोग, गुल्म, मूत्रकृच्छ्र, प्रमेह, मूळव्याध, खोकला, शोष व क्षय ह्यांचा नाश करितें; आणि धनुष्य ओढणें, ओझें वाहणें व मार्ग चालणें इत्यादि कारणांनीं क्षीण झालेल्यांना बल व मांस देतें.

द्राक्षाद्यघृत.

द्राक्षायाः संमितं प्रस्थं मधुकस्य पलाष्टकम् ।
पचेत्तोयाढके सिद्धे पादशेषेण तेन तु ॥ १ ॥
पलिके मधुकद्राक्षे पिष्टे कृष्णापलद्वयम् ।
प्रदाय सर्पिषः प्रस्थं पचेत्क्षीरे चतुर्गुणे ॥ २ ॥
सिद्धे शीते पलान्यष्टौ शर्करायाः प्रदापयेत् ।

एतद् द्राक्षाघृतं सिद्धं क्षीणक्षतहितं परम् ॥ ३ ॥
वातपित्तज्वरश्वासविस्फोटकहलीमकान् ।
प्रदरं रक्तपित्तं च हन्यान्मांसबलप्रदम् ॥ ४ ॥

द्राक्षें चौसष्ट तोळे, ज्येष्टमध बत्तीस तोळे, ह्यांचा दोनशें छपन्न तोळे पाण्यांत चतुर्थांश काढा करून त्या काढ्यांत ज्येष्टमध चार तोळे, मनुका चार तोळे व पिंपळी आठ तोळे ह्यांचा कल्क घालून चौसष्ट तोळे तूप, तुपाच्या चौपट दूध घालून सिद्ध करावें. तें तूप तयार होऊन थंड झाल्यावर त्यांत बत्तीस तोळे साखर घालून ठेवावें. हें द्राक्षाघृत उरःक्षतानें क्षीण झालेल्यास फार हितावह आहे. हें वात, पित्त, ज्वर, श्वास, विस्फोटक, हलीमक, प्रदर व रक्तपित्त ह्यांचा नाश करितें; आणि बल व मांस वाढवितें.

अमृतप्राश्य अवलेह.

क्षीरधात्रीविदारीक्षुक्षीरिणां च तथा रसे ।
पचेत्समे घृतप्रस्थे मधुकैरिक्षुसंयुतैः ॥ १ ॥
द्राक्षाद्विचन्दनोशीरशर्करोत्पलपद्मकैः ।
मधूककुसुमानन्ता काश्मरीतृणसंज्ञकैः ॥ २ ॥
प्रस्थार्धं मधुनः शीते शर्करायास्तुलां तथा ।
पलार्धकांश्च संचूर्ण्य त्वगेलापत्रकेसरान् ॥ ३ ॥
विनीय तस्य संलिह्यान्मात्रां नित्यं सुयन्त्रितः ।
अमृतप्राश्यमित्येतदश्विभ्यां निर्मितं पुरा ॥ ४ ॥
क्षीरमांसाशिनो हन्ति रक्तपित्तक्षतक्षयम् ।
मूत्रकृच्छ्रज्वरघ्नं च बल्यं स्त्रीरतिवर्धनम् ॥ ५ ॥

दूध, आंवळ्याचा रस, भुईकोहळ्याचा रस, उंसाचा रस व उंबर, वड वगैरे क्षीरवृक्षांचा रस हे समभाग घेऊन ज्येष्टमध, उंसाचे करवे, द्राक्षें, रक्तचंदन, पांढरा चंदन, वाळा, साखर, कमळ, पद्मकाष्ट, मोहाचीं फुलें, अनंतमूळ, शिवणमूळ व रोहिस-गवत ह्यांचा कल्क घालून चौसष्ट तोळे तूप घालावें, व लेह तयार करावा. तो थंड झाल्यावर त्यांत बत्तीस तोळे मध, चारशें तोळे साखर; आणि दालचिनी, तमालपत्र, वेलची व नागकेशर ह्यांचें चूर्ण दोन तोळे घालून ढवळून ठेवावा. आणि नियमितपणानें

राहून हा नित्य सेवन करावा. ह्याला अमृतप्राश्य अवलेह म्हणतात. हा पूर्वीं अश्विनीकुमारांनीं सांगितला. हा दूध व मांस खाणाराचा क्षय उरःक्षत व रक्तपित्त हे रोग दूर करतो. तसेंच तहान, अरुचि, श्वास, कास, ओकारी, उचकी, मूत्रकृच्छ्र व ज्वर ह्यांचा नाश करतो. हा बलकारक व कामोद्दीपक आहे.

रसराज.

मुक्ताप्रवालरसहेमसिताभ्रकान्त-
वङ्गं मृतं सकलमेतदहो विभाव्यम् ।
छिन्नारसेन च वरीसलिलेन सप्त-
वारं ततो मधुहविर्मरिचेन साकम् ।
लिह्यादुरःक्षतहरं रसराजकाख्यं
माषप्रमाणमतनूद्भवहेतुमेनम् ॥ ॥ १ ॥

मौक्तिक, प्रवाळ, पारा, सोनें, चांदी, अभ्रक, कांतलोह व वंग ह्या सर्वांचीं भस्में समभाग घेऊन गुळवेलीच्या रसाच्या व शतावरीच्या रसाच्या सात सात भावना द्याव्या. नंतर हा रसराज नांवाचा रस तूप, मध व मिरपूड ह्यांशीं एक मासा प्रमाणें सेवन करावा. हा उरःक्षताचा नाश करतो व काम उत्पन्न करतो.

अन्यच्च तर्पणं शीतमविदाहि हितं लघु ।
अन्नपानं निषेव्यं तु क्षतक्षीणैः सुखार्थिभिः ॥ २ ॥
शोकं स्त्रियं क्रोधमसूयनं च त्यजेदुदारान्विषयान्भजेच्च ।
तथा द्विजातींस्त्रिदशान्गुरूंश्च कथाश्च पुण्याः शृणुयाद्विजेभ्यः ३

दुसरीं तृप्तिदायक, थंड, अविदाही, पथ्यकारक, हलकीं अशीं अन्नपानें, सुखाची इच्छा करणाऱ्या उरःक्षती रोग्यानें सेवन करावीं. शोक, मैथुन, क्रोध, मत्सर, ह्यांचा त्याग करावा आणि उत्साहजनक (उदार) विषयांचें सेवन करावें. तसेंच ब्राह्मण, देव व गुरु ह्यांचें पूजन करावें. आणि ब्राह्मणाकडून पुण्यकारक कथांचें (पुराणांचें) श्रवण करावें.

खोकल्याचें निदान.

धूमोपघाताद्रजसस्तथैव व्यायामरूक्षान्ननिषेवणाच्च ।
विमार्गगत्वादपि भोजनस्य वेगावरोधात्क्षवथोस्तथैव ॥ १ ॥

घशांत धूर किंवा धुरळा गेल्यामुळें, अति व्यायाम व रूक्ष अन्न सेवन केल्यानें, खाल्लेलें अन्न मार्ग सोडून श्वासमार्गांत गेल्यानें आणि शिंकेचा रोध केल्यानें खोकला उत्पन्न होतो.

त्याची संप्राप्ति.

प्राणो ह्युदानानुगतः प्रदुष्टः संभिन्नकांस्यस्वनतुल्यघोषः ।
निरेति वक्त्रात्सहसा स दोषो मनीषिभिः कास इति प्रदिष्टः१

प्राण वायु उदान वायूशीं मिश्र होऊन दूषित झाल्यानें फुटलेल्या कांशाच्या भांड्यासारखा आवाज काढीत तोंडांतून बाहेर पडतो. त्याला विद्वान् वैद्य कास म्हणजे खोकला असें म्हणतात.

त्यांची संख्या.

पञ्च कासाः स्मृता वातपित्तश्लेष्मक्षतक्षयैः ।
क्षयायोपेक्षिताः सर्वे बलिनश्चोत्तरोत्तरम् ॥ १ ॥

वात, पित्त, कफ, ह्या दोषांपासून तीन; उरःक्षतापासून एक, व क्षयजन्य एक, असा पांच प्रकारचा खोकला आहे. हे जसजसे वाढतात तसतसे ते क्षय उत्पन्न कारितात.

पूर्वरूपं भवेत्तेषां शूकपूर्णगलास्यता ।
कण्ठे कण्डूश्च भोज्यानामवरोधश्च जायते ॥ २ ॥

खोकला येण्यापूर्वीं घशांत व तोंडांत कूस अडकल्यासारखें वाटतें; घशांत खाज उठते व जेवतांना घास अडकतो. हें खोकल्याचें पूर्वरूप समजावें.

वातकासलक्षण.

हृच्छङ्खमूर्धोदरपार्श्वशूली क्षामाननः क्षीणबलस्वरौजाः ।
प्रसक्तवेगस्तु समीरणेन भिन्नस्वरः कासति शुष्कमेव ॥१॥

वातजन्य खोकल्यामध्यें हृदय, दोन्ही आंख, डोकें, पोट व कुशी ह्यांमध्यें शूल होतो; तोंड सुकतें; बल, स्वर व ओज हीं क्षीण होतात; खोकल्याचा वेग जोराचा असतो. खोकला कोरडा असतो व स्वर बदलतो.

पित्तजन्य कासलक्षण.

उरोविदाहज्वरवक्त्रशोषैरभ्यर्दितस्तिक्तमुखस्तृषार्तः ।
पित्तेन पीतानि वमेत्कटूनि कासेत्सपाण्डुः परिदह्यमानः ॥१॥

पित्तजन्य खोकल्यामध्यें उरांत जळजळ, ताप, तोंडाला कोरड, कडवटपणा व तहान ह्या विकारांनीं रोगी बेजार होतो. त्याला पिंवळट रंगाची, तिखट व कडवट अशी वांति होते. तो पांढरा फटफटित होतो; व त्याचे अंगाचा दाह होतो.

कफजन्य कासलक्षण.

प्रलिप्यमानेन मुखेन सीदञ्शिरोरुगार्तः कफपूर्णदेहः ।
अभक्तरुग्गौरवकण्डुयुक्तः कासेद्भृशं सान्द्रकफः कफेन ॥१॥

कफजन्य खोकल्यामध्यें, तोंड आंतून कफानें लेपटल्यामुळें चिकट व बुळबुळीत होतें. ग्लानि येते; डोकें दुखतें; शरीरांत कफ भरलेला असतो; अन्नावर वांच्छा नसते; अंग जड असतें; अंगाला कंडू असतो आणि खोकला अतिशय असून खोकतांना दाट कफ पडतो.

क्षतजन्य कासलक्षण.

अतिव्यवायभाराध्वयुद्धाश्वगजनिग्रहैः ।
रूक्षस्योरःक्षतं वायुर्गृहीत्वा कासमावहेत् ॥ १ ॥
स पूर्वं कासते शुष्कं ततः ष्ठीवेत्सशोणितम् ।
कण्ठेन रुजताऽत्यर्थं विभिन्नेनेव चोरसा ॥ २ ॥
सूचीभिरिव तीक्ष्णाभिस्तुद्यमानेन शूलिना ।
दुःखस्पर्शेन शूलेन भेदपीडाभितापिना ॥ ३ ॥
पर्वभेदज्वरश्वासतृष्णावैस्वर्यपीडितः ।
पारावत इवाऽऽकूजेत्कासवेगात्क्षतोद्भवात् ॥ ४ ॥

अति मैथुन, ओझीं वाहणें, मार्ग चालणें, कुस्ती खेळणें, हत्ती-घोडे धांवत असतां त्यांना आवरण्याचा प्रयत्न करणें, इत्यादि कारणांनीं व कोठ्याच्या रूक्षपणामुळें उरांत क्षत (व्रण) उत्पन्न होतें. त्यामुळें वायूचा कोप होऊन क्षतजन्य खोकला उत्पन्न होतो. त्यामुळें त्या रोग्याला प्रथम कोरडा खोकला असतो व थुंकतांना थुंकींतून रक्त पडतें. उर फुटल्यामुळें घसा फार दुखतो. सुयांनीं टोचल्याप्रमाणें उरांत पीडा होते. हृदयाला स्पर्श सहन होत नाहीं. स्पर्श केला असतां शस्त्रानें फोडल्याप्रमाणें पीडा व ताप

होतो. बरगड्या व सांधे दुखतात. ज्वर, श्वास, तहान व आवाज बसणें हे विकार होतात. आणि तो रोगी खोकल्याच्या वेगामुळें पारव्यासारखा घुमतो. हीं क्षतकासाचीं लक्षणें आहेत.

क्षयकासलक्षण.

विषमासात्म्यभोज्यातिव्यवायाद्वेगनिग्रहात् ।
घृणिनां शोचतां नृणां व्यापन्नेऽग्नौ त्रयो मलाः ।
कुपिताः क्षयजं कासं कुर्युर्देहक्षयप्रदम् ॥ १ ॥
सगात्रशूलज्वरदाहमोहान्प्राणक्षयं चोपलभेत कासी ।
शुष्कं स निष्ठीवति दुर्बलस्तु प्रक्षीणमांसो रुधिरं सपूयम् ।
तं सर्वलिङ्गं भृशदुश्चिकित्स्यं चिकित्सितज्ञाः क्षयजं वदन्ति २
इत्येष क्षयजः कासः क्षीणानां देहनाशनः ।
साध्यो बलवतां वा स्याद्याप्यस्त्वेवं क्षतोत्थितः ॥ ३ ॥

विरुद्ध गुणाचे पदार्थ मिश्र करून खाणें, अपथ्यकारक पदार्थ खाणें, अति मैथुन करणें, मलमूत्रादिकांचे वेग आवरून धरणें, ह्या कारणांनीं दयाळू व शोकाकुल मनुष्याचा जठराग्नि मंद झाल्यामुळें वातादि तिन्हीही दोष कुपित होऊन देहाचा क्षय करणारा असा क्षयजन्य खोकला उत्पन्न करितात. ह्या क्षयजन्य खोकल्यामध्यें सर्व अवयव दुखणें, ज्वर, दाह, मोह, हीं लक्षणें होतात व अखेर प्राणाचाही नाश होतो. तो मनुष्य कृश होतो, थुंकतो, दुर्बल व मांसक्षीण होतो. त्याच्या रक्तामध्यें पू उत्पन्न होतो. अशा ह्या सर्व लक्षणांनीं युक्त व उपचारास कठिण अशा व्याधीला क्षयकास असें वैद्य म्हणतात. हा क्षयजन्य खोकला क्षीण मनुष्याच्या देहाचा नाश करतो. रोगी बलवान् असल्यास तो साध्य होतो; किंवा याप्य होतो. हाच नियम क्षतकासासंबंधानें आहे.

साध्यासाध्यत्व.

नवौ कदाचित्सिध्येतामपि पादगुणान्वितौ ।
स्थविराणां जराकासः सर्वो याप्यः प्रकीर्तितः ॥ १ ॥

हा खोकला नवीन असून पादचतुष्टययुक्त असेल तर कदाचित् साध्य होतो. म्हातारपणामुळें आलेला खोकला याप्य असतो.

चिकित्सा.

त्रीन्पूर्वान्साधयेत्साध्यान्पथ्यैर्याप्यांस्तु यापयेत् ।
पूयाभमरुणं श्यावं हरितं पीतनीलकम् ॥ १ ॥

पहिले तीन खोकले साध्य आहेत. त्यांजवर उपचार करून ते बरे करावेत; आणि जे याप्य आहेत त्यांना पथ्यावर ठेवून वाढूं मात्र देऊं नये.

निष्ठीवन् श्वासकासार्तो न जीवति हतस्वरः ।
कासाच्छ्वासक्षयच्छर्दिस्वरसादादयो गदाः ।
भवन्त्युपेक्षया यस्मात्तस्मात्तं त्वरया जयेत् ॥ २ ॥

पुवासारखा, तांबूस, काळसर, हिरवट, पिंवळट, निळसर अशा प्रकारचा कफ ज्याला थुंकींतून पडतो व ज्याचा आवाज बसला आहे, असा श्वास व खोकला झालेला रोगी जगत नाहीं. खोकल्याची उपेक्षा केली असतां श्वास, क्षय, ओकारी, स्वरभेद इत्यादि रोग होतात; म्हणून खोकला त्वरित बरा करावा.

वातकासचिकित्सा.

रूक्षस्यानिलजं कासमादौ स्नेहैरुपाचरेत् ।
सर्पिर्भिर्बस्तिभिः पेयाक्षीरयूषरसादिभिः ॥ १ ॥
ग्राम्यानूपोदकैः शालियवगोधूमषष्टिकान् ।
रसैर्माषात्मगुप्तानां यूषैर्वा भोजयेद्धि तान् ॥ २ ॥
दशमूलीशृता श्वासकासहिक्कारुजापहा ।
यवागूर्दीपनी वृष्या वातरोगविनाशिनी ॥ ३ ॥
रसः कर्कोटकानां च घृतभृष्टः सनागरः ।
वातकासप्रशमनः शृङ्गीमत्स्यस्य वा पुनः ॥ ४ ॥

ज्याचा कोठा रुक्ष आहे, अशा वातजन्य खोकल्याला प्रथम तूप, बस्ति, पेज, दूध व यूष ह्यांच्याबरोबर स्नेहन औषधें द्यावीं; आणि त्या रोग्याला ग्राम्य व अनूप देशांतील मांस, साळी, सातू, गहूं, साठे तांदूळ हीं धान्यें—मांसरस, उडीद व कवचबीज ह्यांचे यूष ह्यांजबरोबर त्यास खावूं घालावीं. दशमूळानें सिद्ध केलेली कण्हेरी श्वास, खोकला, उचकी व वातरोग ह्यांची नाशक असून वृष्य आहे. तुपाची फोडणी देऊन सुंठीची पूड घालून

तयार केलेला कारल्याचा रस वातजन्य खोकल्याचा नाश करतो. त्याचप्रमाणें शृंगी माशाचा रसही वातजन्य खोकल्याचा नाश करणारा आहे.

अपराजित लेह.

सटीश्रृङ्गीकणाभार्गीगुडवारिदयासकैः ।
सतैलैर्वातकासघ्नो लेहोऽयमपराजितः ॥ १ ॥

कचोरा, काकडशिंगी, पिंपळी, भारंगमूळ, गूळ, नागरमोथे व धमासा ह्यांचा लेह करून तेल मिश्र करून द्यावा. हा वातकास-नाशक आहे. ह्याला अपराजित लेह म्हणतात.

भार्ङ्यादि लेह.

भार्गीद्राक्षासटीश्रृंगीपिप्पलीविश्वभेषजम् ।
गुडतैलयुतो लेहो हितो मारुतकासिनाम् ॥ १ ॥

भारंगमूळ, द्राक्षें (मनुका), कचोरा, काकडशिंगी, पिंपळी, सुंठ, व गूळ ह्यांचा लेह तेल मिश्र करून द्यावा. तो वातकासाचा नाशक व पथ्यकारक आहे.

विश्वादि लेह.

विश्वाभार्गीकणासोमवल्कं द्राक्षा सटी सिता ।
लिह्यात्तैलेन वातोत्थं कासं जयति दुस्तरम् ॥ १ ॥

सुंठ, भारंगमूळ, पिंपळी, कायफळ, मनुका, कचोरा, व खडीसाखर ह्यांचा लेह तेल मिश्र करून घ्यावा. तो दुस्तर अशा वातकासाचा नाश करतो.

दशमूलादि घृत.

दशमूलीकषायेण भार्गीकल्कं घृतं पचेत् ।
दक्षतित्तिरनिर्यूहे तत्परं वातकासजित् ॥ १ ॥

दशमूळाचा काढा, कोंबडा व तित्तिर पक्षी ह्यांचा रस आणि भारंगमूळाचा कल्क ह्यांमध्यें तूप सिद्ध करावें. तें वातकासाचा नाश करतें.

कण्टकार्यवलेह.

चित्रकं पिप्पलीमूलं व्योषं मुस्तं दुरालभाम् ।
शटी पुष्करमूलं च श्रेयसी सुरसा वचा ॥ १ ॥

भार्गी छिन्नरुहा रास्ना कर्कटाख्या च कार्षिकान् ।
कल्काग्निदिग्धिाद्वितुलाकषाये पलविंशतिम् ॥ २ ॥
मत्स्यण्डिकाया दत्त्वा तु सर्पिषः कुडवं पचेत् ।
सिद्धशीते पृथक्क्षौद्रपिप्पलीकुडवान्वितम् ॥ ३ ॥
चतुष्पलं तुगाक्षीर्याश्चूर्णं तत्र प्रदापयेत् ।
लेहयेत्कासहृद्रोगश्वासगुल्मनिवारणम् ॥ ४ ॥

चित्रक, पिंपळमूळ, सुंठ, मिरीं, पिंपळी, नागरमोथे, धमासा, कचोरा, पोखरमूळ, गजपिंपळी, तुळस, वेखंड, भारंगमूळ, गुळवेल, रास्ना व काकडशिंगी, हीं औषधें एक एक तोळा घेऊन त्यांचा कल्क करावा. तो कल्क आणि आठशें तोळे रिंगणीचा काढा ह्यांत ऐशीं तोळे खडीसाखर व सोळा तोळे तूप घालून लेह तयार करावा. तो थंड झाल्यावर त्यांत सोळा तोळे मध, पिंपळीचें चूर्ण सोळा तोळे, वंशलोचन सोळा तोळे ह्यांचें चूर्ण घालून सेवन करावा. हा कास हृद्रोग, श्वास व गुल्म ह्यांचा नाश करतो.

चूर्णिता विश्वदुःस्पर्शाशृंगीद्राक्षाशठीसिताः ।
लिह्यात्तैलेन वाताढ्यं कासं जयति दुस्तरम् ॥ ५ ॥

सुंठ, धमासा, काकडशिंगी, द्राक्षें, कचोरा, व खडीसाखर ह्यांचा लेह तेल घालून चाटावा. तो दुस्तर अशा वातकासाचा नाश करतो.

पञ्चमूलकृतः क्वाथः पिप्पलीचूर्णसंयुतः ।
रसैः समश्नतो नित्यं वातकासमुदस्यति ॥ ६ ॥

लघुपंचमूळाचा काढा पिंपळीचें चूर्ण घालून मांसरसाशीं नित्य सेवन करावा. तो वातकासाचा नाश करतो.

बलादि क्वाथ.

बलाद्विबृहतीद्राक्षावासाभिः क्वथितं जलम् ।
पित्तकासापहं पेयं शर्करामधुयोजितम् ॥ १ ॥

चिकणामूळ, रिंगणमूळ, डोरलीमूळ, मनुका, व अडुळशाचीं पानें, ह्यांचा काढा मध व साखर घालून प्यावा. तो पित्तकासनाशक आहे.

शठ्यादि क्वाथ.

शठीह्रीबेरबृहतीशर्कराविश्वभेषजम् ।

एतं क्वाथं पिबेत्पूतं सघृतं पित्तकासनुत् ॥ १ ॥

कचोरा, वाळा, रिंगणमूळ, साखर, व सुंठ, ह्यांचा काढा तूप घालून प्यावा. तो पित्तकासाचा नाश करतो.

शठीद्विपञ्चमूलस्य पिप्पलीद्राक्षयोस्तथा ।
कषायेण श्रृतं क्षीरं पिबेत्समधुशर्करम् ॥ २ ॥

कचोरा, दशमूळें, पिंपळी, व द्राक्षें ह्यांचा काढा करून त्यांत दूध सिद्ध करावें; वें तें मध व साखर घालून घ्यावें.

खर्जूरादि लेह.

खर्जूरपिप्पलीद्राक्षासितालाजाः समांशकाः ।
मधुसर्पिर्युतो लेहः पित्तकासहरः परः ॥ १ ॥

खर्जूर (खारीक), पिंपळी, द्राक्षें, खडीसाखर व भाताच्या लाह्या हीं औषधें समभाग घेऊन त्यांचें चूर्ण तूप व मध ह्यांजबरोबर सेवन करावें. तें पित्तकासाचा नाश करितें.

क्षीरामलक घृत.

महिष्यजाविगोक्षीरधात्रीफलरसैः समैः ।
सर्पिष्प्रस्थं पचेद्युक्त्या पित्तकासनिवर्हणम् ॥ १ ॥

म्हैस, शेळी, मेंढी व गाय ह्यांचें दूध व आवळ्याचा रस समभाग घेऊन त्यांत चौसष्ट तोळे तूप सिद्ध करावें. तें पित्तकासाचा नाश करितें.

दुसरा प्रकार.

काकोलीबृहतीमेदायुग्मैः सवृषनागरैः ।
पित्तकासे रसक्षीरयूषांश्चाप्युपकल्पयेत् ॥ १ ॥

काकोली, क्षीरकाकोली, रिंगणी, डोरली, मेदा, महामेदा, अडुळसा, व सुंठ हीं औषधें घालून तयार केलेले मांसरस, दूध व यूष ह्यांची योजना करावी.

षट्प्रस्थ घृत.

आपोथ्य क्षीरिणां शृंगान्पचेत्क्षीरचतुर्गुणे ।
द्राक्षाकल्के घृतं सिद्धं लिह्यात्तत्पित्तकासनुत् ॥ १ ॥

वड, उंबर वगैरे क्षीरवृक्षांचे अंकुर आणून कुटून त्यांचा कल्क व द्राक्षांचा कल्क ह्यांत चौपट दूध घालून तूप सिद्ध करावें; व तें सेवन करावें. तें पित्तकासाचा नाश करितें.

क्षीरिघृत.

क्षीरिवृक्षांकुरक्काथे पचेत्क्षीरसमं घृतम् ।
पाययेत्पित्तकासघ्नं मधुना वाऽवलेहयेत् ॥ १ ॥

क्षीरिवृक्षांच्या अंकुराचा काढा करून त्यांत दूध व तूप सम-भाग घालून तूप पचन करावें, व तें प्राशन करावें किंवा मधाशीं चाटावें. तें पित्तकासाचा नाश करितें.

द्राक्षामलकादि लेह.

द्राक्षामलकखर्जूरं पिप्पलीमरिचान्वितम् ।
पित्तकासहरं ह्येतल्लिह्यान्माक्षिकसर्पिषा ॥ १ ॥

मनुका, आवळकाठी, खजूर, पिंपळी व मिरीं ह्यांचें चूर्ण तूप व मधाशीं चाटावें. तें पित्तकासाचा नाश करितें.

कफकास.

कफजे वमनं कार्यं कासे लंघनमेव च ।
शस्ता यवास्तत्प्रकृतियूषाश्च कटुतिक्तकाः ॥ १ ॥

कफकासावर वमन व लंघन करवावें. कफकासावर सातू, सातूचे पदार्थ, सातूंचेंच यूष आणि तिखट व कडू पदार्थ हे प्रशस्त आहेत.

मुद्गामलाभ्यां यवदाडिमाभ्यां कर्कन्धुना शुष्ककमूलकेन ।
शुण्ठीकणाभ्यां सकुलत्थकेन यूषो नवांगः कफकासहन्ता ॥२

मूग, आवळकाठी, सातु, डाळिंब, बोरें, वाळलेले मुळे, सुंठ, पिंपळी व हुलगे ह्यांच्या यूषाला (कढणाला) नवांगयूष म्हणतात. हा कफकासाचा नाशक आहे.

शठी सातिविषा मुस्ताशृंगी कर्कटकस्य च ।
अभया शृंगबेरं च समं शठ्यादि पेषयेत् ॥ १ ॥
हिंगुसैन्धवसंयुक्तं तक्रोदकपरिप्लुतम् ।
श्लेष्मकासी लिहेदेतमवलेहं मुहुर्मुहुः ॥ २ ॥

कचोरा, अतिविष, नागरमोथे, काकडशिंगी, बेलाचें मूळ, हिरडे-दळ व आलें हीं सर्व औषधें समभाग घेऊन वांटून ताकाच्या निवळींत घालून त्याला हिंग व सैंधव लावून कफकास झालेल्या मनुष्यानें वरचेवर चाटावें.

व्योषाजमोदचित्रकषड्ग्रन्थचव्यकल्कितं सर्पिः ।
कफकासश्वासहरं वासकरससाधितं समधु ॥ १ ॥

सुंठ, मिरीं, पिंपळी, ओंवा, चित्रक, पिंपळमूळ व चवक ह्यांचा करक आणि अडुळशाचा रस ह्यामध्यें तूप सिद्ध करून तें मधाशीं द्यावें; तें कफजन्य कास व श्वास ह्यांचा नाश करितें.

द्वंद्वजकासचिकित्सा.

कट्फलं कत्तृणं भार्गी मुस्ता धान्यं वचाऽभया ।
शुण्ठी पर्पटकं शृंगी सुराह्वं च जले शृतम् ॥ १ ॥
मधुहिंगुयुतं पेयं कासे वातकफान्विते ।
कण्ठरोगे मुखे शूले हिक्काश्वासज्वरेषु च ॥ २ ॥

कायफळ, रोहिस गवत, भारंगमूळ, नागरमोथे, धने, वेखंड, हिरडेदळ, सुंठ, पित्तपापडा, काकडशिंगी व देवदार ह्यांचा काढा वातकफजन्य खोकल्यावर प्यावा. हाच काढा गळ्याचे रोग, मुखरोग, शूळ, उचकी, श्वास व ज्वर ह्यांजवरही द्यावा.

सिंहास्यादि कषाय.

सिंहास्यामृतसिंहीनां क्वाथं मधुयुतं पुमान् ।
पिबेत्सपित्तकफजे कासे श्वासे क्षये ज्वरे ॥ १ ॥
वासकस्वरसः पेयो मधुयुक्तो हिताशिना ।
पित्तश्लेष्मकृते कासे तालीसाद्यं च योजयेत् ॥ २ ॥

अडुळसा, गुळवेल, डोरलीमूळ, ह्यांचा काढा पित्तकफजन्य खोकला, श्वास, क्षय व ज्वर ह्यांजवर मध घालून द्यावा. कफपित्तजन्य खोकल्यावर कुड्याच्या सालीचा स्वरस (आंगरस) मध घालून द्यावा. व पथ्य करावें, किंवा तालीसादि चूर्ण द्यावें.

क्षतकास.

कासे तु क्षतजे बल्ये पाचनैर्बृंहणैरपि ।
शमनैः पित्तकासघ्नैरन्यैश्च मधुरौषधैः ॥ १ ॥
यवागूं वा पिबेत्सिद्धां क्षतोरस्कः सुशीतलाम् ।

बलवान् अशा उरःक्षतजन्यकासावर पाचन, बृंहण संशमन, पित्तकासनाशक व मधुर अशा औषधांनीं तयार केलेली पेज थंड करून प्यावी.

इक्ष्विक्षुवालिकापद्मसृणालोत्पलचन्दनैः ॥ २ ॥
मधुकं पिप्पली द्राक्षा शृङ्गी चैव शतावरी ।
द्विगुणा च तुगाक्षीरी सिता सर्वैश्चतुर्गुणा ।
लिह्यात्तं मधुसर्पिर्भ्यां क्षतकासनिवृत्तये ॥ ३ ॥

उंसाच्या मुळ्या, कसई गवताच्या (बरूच्या) मुळ्या, मोठें कमळ, कमळाचे देंठ, निळें कमळ, चंदन, जेष्ठमध, पिंपळी, द्राक्षें, काकडशिंगी व शतावरी हीं औषधें समभाग; वंशलोचन व सर्वांच्या दुप्पट आणि खडीसाखर सर्वांच्या चौपट घालून उरःक्षतासंबंधीं खोकला दूर होण्याकरितां तूप व मध यांशीं चाटावें.

मञ्जिष्ठमूर्वानतवह्निपाठाकृष्णाहरिद्राविहितं तु चूर्णम् ।
क्षौद्रेण कासेऽवलिहेत्क्षतोत्थे पिबेद् घृतं चेक्षुरसे विपक्वम् १

मंजिष्ट, मोरवेल, तगर, चित्रकमूळ, पहाडमूळ, पिंपळी व हळद, ह्यांचें चूर्ण क्षतजन्य खोकल्यावर मधाशीं घ्यावें; आणि उंसाच्या रसांत शिजवून तयार केलेलें तूप प्यावें.

इक्ष्विक्षुवालिकापद्मसृणालोत्पलचन्दनैः ।
शृतं पयो मधुयुतं संधानार्थं पिबेत्क्षती ॥ २ ॥

उंसाचीं मुळें, कसई गवत, मोठें कमळ, कमळाचे देंठ, निळें कमळ (किंवा लहान चंद्रविकासी कमळ) व चंदन ह्या औषधांनीं सिद्ध केलेलें दूध मध घालून उरःक्षती मनुष्यानें क्षत बरें होण्यासाठीं प्यावें.

क्षयकास.

पिप्पलीगुडसंसिद्धं छागीक्षीरयुतं घृतम् ।
एतदग्निविवृद्ध्यर्थं सर्पिश्च क्षयकासिनाम् ॥ १ ॥

पिंपळी व गूळ ह्यांचा कल्क व शेळीचें दूध ह्यांत तूप सिद्ध करून तें क्षयसंबंधीं खोकला असलेल्या रोग्यानें अग्नि वाढण्याकरितां घ्यावें.

काकुभपिष्टं कृत्वा वासारसभावितं बहून्वारान् ।
मधुघृतसितोपलाभिर्लेह्यं क्षयकासरक्तपित्तहरम् ॥ १ ॥

अर्जुनवृक्षाची साल आणून तिचें चूर्ण करून त्याला अडुळशाच्या रसाच्या पुष्कळ भावना द्याव्या; आणि तें मध, तूप, व

खडीसाखर ह्यांजबरोबर द्यावें. तें क्षयजन्य खोकला व रक्तपित्त ह्यांचा नाश करितें.

पिप्पल्याद्यवलेह.

पिप्पली मधुकं पिष्टं कर्षकं ससितोपलम् ।
प्रस्थैकं गव्यमाज्यं च क्षीरमिक्षुरसस्तथा ॥ १ ॥
यवगोधूममृद्वीकाचूर्णमामलकीरसम् ।
तैलं च प्रसृतांशानि तत्सर्वं मृदुवह्निना ॥ २ ॥
पचेल्लेहं घृतक्षौद्रयुक्तं स श्वासकासजित् ।
क्षयहृद्रोगकासघ्नो हितो वृद्धाल्परेतसाम् ॥ ३ ॥

पिंपळी, जेष्ठमध, नांदरुखीची साल बेहडेदळ, खडीसाखर, सातूचें पीठ, गव्हाचें पीठ व मनुका ह्यांचें चूर्ण करून त्यांत गाईचें तूप, दूध व उंसाचा रस हीं द्रव्यें चौसष्ट चौसष्ट तोळे आणि आवळ्याचा रस व तिळाचें तेल आठ आठ तोळे घेऊन सर्व एकत्र करून मंद अग्नीवर पचन करावें. लेहाप्रमाणें झाल्यावर उतरून ठेवावें. हा पिप्पल्यादि अवलेह श्वास, खोकला, क्षय, हृद्रोग, ह्यांचा नाशक असून वृद्ध व अल्पवीर्य अशा लोकांना हितकारक आहे.

दुसरा प्रकार.

पिप्पली मधुकं द्राक्षा सुपक्कं बृहतीफलम् ।
घृतक्षौद्रयुतो लेहः क्षयकासनिबर्हणः ॥ १ ॥

पिंपळी, जेष्ठमध, मनुका व रिंगणीचीं पिकलेलीं फळें, ह्यांचें चूर्ण करून तें तूप व मध ह्यांजबरोबर लेहाप्रमाणें चाटलें असतां क्षयकासाचा नाश होतो.

संनिपातभवो ह्येष क्षयकासः सुदारुणः ।
संनिपातहितं तस्मात्कार्यमत्र चिकित्सितम् ॥ २ ॥

हा भयंकर क्षयकास सान्निपातात्मक असतो, म्हणून ह्याजवर सन्निपातावरील (त्रिदोषावरील) औषधेंही द्यावींत.

कासश्वासाचिकित्सा.

अमृतानागरफञ्जीव्याघ्रीपर्णीसुसाधितः क्वाथः ।
पीतः सकणाचूर्णः कासश्वासौ जयत्याशु ॥ १ ॥

गुळवेल, सुंठ, भारंगमूळ, रिंगणमूळ, सालवण व पिठवण,

ह्यांचा काढा करून त्यांत पिंपळीचें चूर्ण घालून प्यावा. तो श्वासासह खोकल्याला त्वरित जिंकतो.

भार्गी सनागरा सिंही कुलत्थं मूलकं तथा ।
पिबेत्पिप्पलिचूर्णेन कासश्वासौ व्यपोहति ॥ १ ॥

भारंगमूळ, सुंठ, डोरलीमूळ, हुलगे व मुळे, ह्यांचा काढा पिंपळीचें चूर्ण घालून प्यावा. तो खोकला व श्वास ह्यांचा नाश करतो.

स्वरसं शृङ्गबेरस्य माक्षिकेण समन्वितम् ।
पाययेच्छ्वासकासघ्नं प्रतिश्यायकफापहम् ॥ १ ॥

आल्याचा रस मध घालून द्यावा. तो श्वास, खोकला, पडसें व कफ ह्यांचा नाश करतो.

सेवितं मधुखण्डाभ्यां चूर्णं मारिचजं यदि ।
किमर्थं क्रियते चिन्ता कासश्वासपराजितैः ॥ २ ॥

मध व खडीसाखर ह्यांजबरोबर जर मिऱ्याचें चूर्ण सेवन केलें जाईल, तर श्वास, खोकला ह्यांनीं रंजीस आलेल्या गृहस्थांनीं चिंता करण्याचें काय कारण आहे ?

कुलित्थः कण्टकारी च तथा ब्राह्मणयष्टिका ।
शुण्ठीसुरभिसंयुक्तः कासश्वासज्वरापहः ॥ ३ ॥

हुलगे, रिंगणमूळ, भारंगमूळ, सुंठ, व तुळस ह्यांचा काढा श्वास, खोकला व ज्वर ह्यांचा नाश कारितो.

पौष्करं कट्फलं भार्गी विश्वापिप्पलिसाधितम् ।
पिबेत्काथं कफोद्रेके कासे श्वासे च हृद्ग्रहे ॥ ४ ॥

पोखरमूळ, कायफळ, भारंगमूळ, सुंठ व पिंपळी ह्यांचा काढा कफोद्रेक, श्वास, खोकला व हृद्रोग ह्यांजवर प्यावा.

कुनटीसैन्धवव्योषविडंगामरहिंगुभिः ।
लेहः साज्यमधुः कासहिक्काश्वासनिवारणः ॥ ५ ॥

मनशीळ, सैंधव, सुंठ, मिरें, पिंपळी, वावडिंग, देवदार व हिंग ह्यांचा लेह तुप व मध ह्यांशीं द्यावा; तो श्वास, खोकला व उचकी ह्यांचा नाशक आहे.

श्वासकासहरा बर्हिपादा च क्षौद्रसर्पिषा ।
लिह्यान्मारिचचूर्णं वा सघृतक्षौद्रशर्करम् ॥ १ ॥

पिंवळ्या टेंटूचें चूर्ण तूप व मध याशीं द्यावें. तें श्वास व कास

यांचें नाशक आहे. तसेंच मिऱ्याचें चूर्णही तूप-मधाशीं घ्यावें.

भार्गीशुण्ठीकणाचूर्णं गुडेन श्वासकासनुत् ।
पथ्याशुण्ठीगुडयुतां गुटिकां धारयेन्मुखे ॥ २ ॥
सर्वेषु श्वासकासेषु केवलं वा बिभीतकम् ।
नागरेणाभया तद्वत्कासमाशु व्यपोहति ॥ ३ ॥

भारंगमूळ, सुंठ व पिंपळी ह्यांचें चूर्ण गुळाशीं घ्यावें; तें दमा व खोकला यांचा नाश करतें. हिरडेदळ व सुंठ ह्यांच्या चूर्णाची गुळाशीं गोळी करून ती सर्व प्रकारच्या श्वास व खोकल्यावर तोंडांत धरावी किंवा केवळ बेहडा तोंडांत धरावा. त्याचप्रमाणें सुंठीशीं हिरडा तोंडांत धरावा म्हणजे खोकल्याचा त्वरित नाश होतो.

सर्व कास.

सपिप्पलीपुष्करमूलपथ्याशुण्ठीसटीमूलकसूक्ष्मचूर्णम् ।
गुडेन युक्ता गुटिका प्रयोज्या कासेषु नासास्रववैस्वरे च ॥ १

पिंपळी, पोखरमूळ, हिरडेदळ, सुंठ, कचोरा, मुळा, ह्यांचें वस्त्रगाळ चूर्ण करून गूळ मिसळून गोळ्या कराव्यात. त्या सर्व प्रकारच्या खोकल्यावर, पडशावर (नासास्रावावर) व स्वर बदलण्यावर योजाव्यात.

क्षवथौ गन्धनाशे च धूमपानं प्रयोजयेत् ।
अर्कमूलशिले तुल्ये ततोऽर्धेन कटुत्रिकम् ॥ २ ॥
चूर्णितं वह्निनिक्षिप्तं पिबेद्धूमं तु योगवित् ।
भक्षयेदथ ताम्बुलं पिबेद्दुग्धमथाम्बु वा ॥ ३ ॥
कासाः पञ्चविधा यान्ति शान्तिमाशु न संशयः ।

शिंक न येणें व वास न येणें ह्या विकारावर धूम्रपानाची योजना करावी. रुईचें मूळ व मनशीळ समभाग आणि त्याच्या निंमे सुंठ, मिरीं, पिंपळीचें चूर्ण एकत्र करून अग्नीवर टाकून धूर घ्यावा आणि त्याजवर विडा खावा, दूध प्यावें अथवा पाणी प्यावें. ह्या धूम्रपानानें पांच प्रकारचे खोकले त्वरित दूर होतात.

मनःशिलादि धूम.

मनःशिलालमरिचमांसीमुस्तैंगुदैः पिबेत् ॥ ४ ॥
धूमं तस्यानु च पयः सुखोष्णं सगुडं पिबेत् ।
एष कासान्पृथग्द्वंद्वसंनिपातसमुद्भवान् ॥ ५ ॥

शतैरपि प्रयोगाणां साधयेदप्रसाधितान् ।

शुद्ध मनशीळ, शुद्ध हरताळ, मिरीं, जटामांशी, नागरमोथे व हिंगणबेट ह्या द्रव्यांचा धूर घेऊन त्यावर कोमटसें दूध गूळ घालून प्यावें. हा योग एकदोषजन्य, द्विदोषजन्य, व त्रिदोषजन्य अशा शेंकडों उपायांनीं बऱ्या न होणाऱ्या खोकल्यांचा नाश करितो.

मनःशिलालिप्तदलं बदर्यातपशोषितम् ॥ ६ ॥
सक्षीरं धूमपानं च महाकासनिबर्हणम् ।

बोरीच्या पानांना मनशिळाचा लेप करून तीं पानें उन्हांत वाळवावींत आणि त्यांचा धूर घेऊन त्याजवर दूध प्यावें. ह्यापासून मोठ्या खोकल्याचा नाश होतो.

पिष्ट्वा त्रिपुटधत्तुरमूलव्योषमनःशिलाः ॥ ७ ॥
तेन प्रलिप्य वसनं धूमवर्तिं प्रकल्पयेत् ।
धूमं तस्याः पिबेद्यस्तु त्रिदिनात्कसनं हरेत् ॥ ८ ॥

एरंडमूळ, धोतऱ्याचें मूळ, सुंठ, मिरीं, पिंपळी, मनशीळ ह्यांचें चूर्ण करून त्याचा एका फडक्याला लेप करून त्याचा काकडा करून पेटवून त्याचा धूर घ्यावा. तो तीन दिवसांत खोकल्याचा नाश करतो.

जात्यादि धूम.

जातीपत्रशिलाशालैर्योजयेद् गुग्गुलुं समम् ।
अजामूत्रेण संपिष्टो धूमः कासहरः परः ॥ १ ॥

जाईचीं पानें, मनशीळ, राळ व ह्यांच्या समान गुग्गुळ, ह्यांचा शेळीच्या मुतांत खल करून त्याचा धूर घ्यावा. हा खोकला दूर करण्याविषयीं उत्तम आहे.

जातीजटाकिसलयैर्बदरीदलैश्च
जाता मसूरकफलैः समनःशिलैश्च ।
स्याद्धूमवर्तिरिह गुग्गुलुना समेतैः
कासच्छिदे बदरिकाग्निविदह्यमानैः ॥ २ ॥

जाईच्या मुळ्या, कोंवळीं पानें, बोरीचीं पानें, मसुरा, मनशीळ व गुग्गुळ ह्यांचा कल्क करून फडक्यास लेप करून वात करावी. ती बोरीच्या अग्नीनें पेटवून धूर घ्यावा. तो कासनाशक आहे.

रात्रिद्वयं शिलाधूमपानात्कासश्रुतिः कुतः ।
जलपानादपि तथा क्षणेन क्षणदाक्षये ॥ ३ ॥

हळद, दारुहळद व मनशीळ ह्यांचें धूम्रपान करणाराचा खोकला कसा ऐकूं येईल ? त्याचप्रमाणें उषःपान करणाराचाही खोकला क्षणांत नाश पावतो.

हरीतकीकणाशुण्ठीमरीचगुडसंयुतः ।
कासघ्नो मोदकः प्रोक्तः परं चानलदीपनः ॥ १ ॥

हिरडेदळ, पिंपळी, सुंठ, मिरीं व गूळ ह्यांच्या गोळ्या कासनाशक, कफाला पातळ करणाऱ्या व अग्निदीपक आहेत.

समशर्कर चूर्ण.

शुण्ठीकणामरिचनागदलत्वगेलं
चूर्णीकृतं क्रमविवर्धितमूर्ध्वमन्त्यात् ।
खादेदिदं समसितं गुदजाग्निमान्द्य-
गुल्मारुचिश्वसनकण्ठहृदामयेषु ॥ १ ॥

सुंठ, मिरीं, पिंपळी, नागकेशर, दालचिनी व वेलदोडे हीं औषधें शेवटाकडून क्रमानें वाढत्या प्रमाणांत घेऊन चूर्ण करून त्यांत समभाग साखर मिसळून खावें. ह्याला समशर्कर चूर्ण म्हणतात. हें मूळव्याध, अग्निमांद्य, गुल्म, अरुचि, श्वास, कंठरोग व हृद्रोग ह्यांजवर द्यावें.

कर्पूरादि चूर्ण.

कर्पूरवालकङ्कोलजातीफलदलं समम् ।
लवङ्गनागमरिचकृष्णाशुण्ठ्यो विवर्धिताः ॥ १ ॥
चूर्णं सितासमं ग्राह्यं रोचनं क्षयकासजित् ।
वैस्वर्यकासश्वासघ्नं छर्दिं चैव क्षयं जयेत् ।
प्रयुक्तं चान्नपानेषु भेषज्यं द्विगुणं हितम् ॥ २ ॥

कापूर, वाळा, कंकोळ, जायफळ व जायपत्री हीं औषधें एक एक भाग; लवंग, नागकेशर, मिरीं, पिंपळी व सुंठ हीं औषधें क्रमानें वाढतीं घ्यावीं. ह्या सर्वांचें चूर्ण करून त्या चूर्णाच्या समान साखर मिसळून घ्यावें. हें रुचिकारक, क्षयकासनाशक; स्वरभेद, कासयुक्त खोकला, ओकारी व क्षय ह्यांचें नाशक आहे. हें अन्नपानांतून दुप्पट द्यावें म्हणजे हितकारक होतें.

मरिचादि चूर्ण.

कर्षः कर्षांशपलं पलद्वयं स्यात्ततोऽर्धकर्षश्च ।
मरिचस्य पिप्पलीनां दाडिमगुडयावशूकानाम् ॥ १ ॥
सर्वौषधैरसाध्या ये कासाः सर्ववैद्यनिर्मुक्ताः ।
अपि पूयं छर्दयतां तेषामिदमौषधं पथ्यम् ॥ २ ॥

मिरीं एक तोळा, पिंपळी दोन तोळे, डाळिंबाचे दाणे चार तोळे, गूळ आठ तोळे, जवखार अर्धा तोळा ह्यांच्या गोळ्या करून द्याव्या. त्या सर्व औषधांनीं बरे न झालेले, वैद्यांनीं सोडलेले व खोकून वांती होतांना त्यांतून पुवासारखा कफ ज्यांना पडतो असे-ही खोकले ज्यांना आहेत त्यांना पथ्यकारक आहेत.

देवदारुबलारास्नात्रिफलाव्योषपद्मकैः ।
सविडङ्गैः सितातुल्यैस्तच्चूर्णं सर्वकासनुत् ॥ १ ॥

देवदार, चिकणामूळ, रास्ना, हिरडा, बेहडा, आवळकाठी, सुंठ, मिरीं, पिंपळी, पद्मकाष्ट व वावडिंग ह्यांचें चूर्ण समभाग साखर घालून द्यावें. तें सर्व खोकल्यांचा नाश करतें.

बदरीपत्रकल्कं वा घृतभृष्टं ससैन्धवम् ।
स्वरोपघाते कासे च लेहमेतं प्रयोजयेत् ॥ २ ॥

किंवा बोरीचीं पानें वाटून तीं तुपांत तळून सैंधव घालून खावीं. हा कल्क स्वरभेद व खोकला ह्यांजवर द्यावा.

द्वौ क्षारौ पञ्चमूलानि पञ्चैव लवणानि च ।
शठीनागरकोदीच्यकल्कं वा वस्त्रगालितम् ॥
पाययेच्च घृतोन्मिश्रं सर्वकासनिबर्हणम् ॥ ३ ॥

सज्जीखार व जवखार, रिंगणमूळ, डोरलीमूळ, साळवण, पिट-वण आणि गोखरूचें मूळ, पंचलवणें (सैंधेलोण, पादेलोण, बिड-लोण, मीठ व बांगडखार--कांचलवण), कचोरा, सुंठ, वाळा ह्यांचा कल्क किंवा वस्त्रगाळ चूर्ण करून तें तुपाबरोबर खावें. हें सर्व खोकल्यांचा नाश करितें.

त्रिजातगुटिका.

त्रिजातमर्धकर्षं च पिप्पल्यर्धपलं सिता ।
द्राक्षामधुकखर्जूरं पलांशं श्लक्ष्णकल्कितम् ॥ १ ॥

मधुना गुटिका घ्नन्ति ता वृष्याः पित्तशोणितम् ।
कासश्वासारुचिच्छर्दिमूर्छाहिध्मामदभ्रमान् ॥ २ ॥
क्षतक्षयस्वरभ्रंशप्लीहशोषाढ्यमारुतान् ।
रक्तनिष्ठीवहृत्पार्श्वरुक्पिपासाज्वरानपि ॥ ३ ॥

दालचिनी, तमालपत्र व वेलची अर्धा अर्धा तोळा, पिंपळी दोन तोळे; खडीसाखर, मनुका, ज्येष्ठमध व खारीक चारचार तोळे ह्यांचें चूर्ण करून मध घालून गोळ्या कराव्या. ह्या वृष्य व रक्तपित्तनाशक असून खोकला, श्वास, अरुचि, ओकारी, मूर्च्छा, उचकी, मद, भ्रम, उरःक्षत, क्षय, स्वरभेद, पांथरी, शोष, आढ्यवात (ऊरुस्तंभ) रक्ताची वांति, हृदय व बरगड्या ह्यांतील व्यथा, तहान ज्वर ह्यांचाही नाश करितात.

मरिचादि गुटिका.

मरीचं कर्षमात्रं च पिप्पली कर्षसंमिता ।
अर्धकर्षो यवक्षारः कर्षयुग्मं च दाडिमात् ॥ १ ॥
एतच्चूर्णीकृतं युञ्जादष्टकर्षगुडेन हि ।
शाणप्रमाणां गुटिकां कृत्वा वक्त्रे च धारयेत् ।
अस्याः प्रभावात्सर्वेऽपि कासा यान्त्येव संक्षयम् ॥ २ ॥

मिरीं एक तोळा, पिंपळी एक तोळा, जवखार अर्धा तोळा, डाळिंबाची साल दोन तोळे, ह्या सर्वांचें वस्त्रगाळ चूर्ण करून त्यांत आठ तोळे गूळ मिसळून तीन माशाच्या गोळ्या करून एकएक गोळी तोंडांत धरावयास द्यावी. ह्या गोळ्यांच्या प्रभावानें सर्व खोकल्यांचा खात्रीनें नाश होतो.

लवंगादि वटी.

तुल्या लवङ्गमरिचाक्षफलत्वचः स्युः
सर्वैः समो निगदितः खदिरस्य सारः ।
बब्बूलवल्कलकषाययुजां चतुर्णां
कासान्निहन्ति वटिका घटिकाष्टकान्ते ॥ १ ॥

लवंग, मिरीं, बेहडेदळ हीं समभाग व सर्वांच्या बरोबरीनें खैराचा कात ह्यांचें चूर्ण करून बाभळीच्या सालीच्या काढ्यांत चार दिवस खल करावा आणि गोळ्या करून एक गोळी तोंडांत धरावयास द्यावी. ती आठ घटकेंत खोकला दूर करिते.

धनंजयवटी.

धनंजयत्रिजातकं कणाजटाकटुत्रिकम् ।
रसार्द्रकेण भावितं जयेच्च कासमाततम् ॥ २ ॥

अर्जुनसादडा, दालचिनी, तमालपत्र, वेलची, पिंपळमूळ, सुंठ, मिरीं व पिंपळी ह्यांच्या चूर्णाला आल्याच्या रसाची भावना देऊन गोळ्या कराव्यात. ह्या खोकल्याचा नाश करितात.

कासाटवीदाहदवानलाख्य चूर्ण.

कटुत्रिकं छिन्नलताकृशानुफलत्रिकं वेल्लभवं सरास्नम् ।
सशर्करं चूर्णमिदं सुसेव्यं कासाटवीदाहदवानलाख्यम् ॥३

सुंठ, मिरीं, पिंपळी, गुळवेल, चित्रकमूळ, हिरडा, बेहडा, आवळकाठी, मिरीं व रास्ना हीं औषधें समभाग घेऊन चूर्ण करून साखरेशीं घ्यावें. हें कासरूपी अरण्याचा वणव्याप्रमाणें नाश करितें.

खदिरादि गुटिका.

खादिरं पौष्करं शृङ्गी कट्फलं द्विजयष्टिका ।
हरीतकी लवङ्गं च व्योषं चातिविषं तथा ॥ १ ॥
कारवी यासममृता बृहतीद्वयमक्षकम् ।
पृथक्कर्षद्वयं ग्राह्यं सूक्ष्मचूर्णं तु कारयेत् ॥ २ ॥
सर्वैः समं खादिरं च मेलयित्वा विभावयेत् ।
दाडिमत्वक्तथा क्षुद्राखदिराम्भोभिरार्द्रकैः ॥ ३ ॥
बब्बूलत्वग्दलक्काथैराटरूषजलैस्तथा ।
सप्तधा भावयेद्बद्ध्वा गुटिका खादिरी मता ।
कासश्वासौ निहन्त्याशु दुस्तरौ चिरजावपि ॥ ४ ॥

खैराचा कात, पोखरमूळ, काकडशिंगी, कायफळ, भारंगमूळ, हिरडेदळ, लवंग, सुंठ, मिरीं, पिंपळी, अतिविष, बडिशेप, धमासा, गुळवेल, रिंगणमूळ, डोरलीमूळ, बेहडेदळ, हीं सर्व औषधें प्रत्येक दोन दोन तोळे ह्याप्रमाणें घेऊन चूर्ण करावें. आणि त्या सर्व चूर्णाबरोबर त्यांत काताचें चूर्ण घालून डाळिंबाची साल, रिंगणी, खैराची साल, ह्यांचा काढा व आल्याचा रस, बाभळीच्या सालीचा काढा आणि अडुळशाचा रस ह्यांच्या सात सात भावना द्याव्या व गोळ्या कराव्या. ह्या फार दिवसांच्या दुस्तर कासश्वासाचा नाश करितात.

आर्द्रकावलेह.

आर्द्रादर्धतुला गुडादपि तथा ह्याम्रं च कुस्तुम्बरी
दीप्यायोजरणत्रिजातजलदादेतत्पचेद्युक्तितः ।
लेहो रत्नकले तवैव कथितः प्राणप्रियाया मया
कासार्शोज्वरपीनसश्वयथुरुग्गुल्मक्षयध्वंसनः ॥ १ ॥

आलें दोनशें तोळे व गूळ दोनशें तोळे, ह्यांचा लेहाप्रमाणें पाक करून त्यांत धने, ओवा, लोहभस्म जिरें, तमालपत्र, दालचिनी, वेलची व नागरमोथे, ह्यांचें चूर्ण योग्य प्रमाणांत घालून पक्व झाल्यावर उतरून ठेवावा. हे रत्नकले, तूं मला प्राणाप्रमाणें प्रिय आहेस, म्हणून मीं तुला हा लेह सांगितला. हा कास, मूळव्याध, ज्वर, पीनस, सूज, गुल्म व क्षय ह्यांचा नाशक आहे.

व्याघ्रीहारितकीलेह.

समूलपुष्पच्छदकण्टकार्यास्तुला जलद्रोणपरिप्लुता च ।
हरीतकीनां च शतं निदध्याद्ग्राह्यं तु पक्त्वा चरणावशेषम् ॥ १ ॥
गुडस्य दत्वा शतमेतदग्नौ विपक्वमुत्तार्य ततः सुशीते ।
कटुत्रिकं च त्रिपलप्रमाणं पलानि षट् पुष्परसस्य चापि ॥ २ ॥
क्षिपेच्चतुर्जातपलं यथाग्नि प्रयुज्यमानो विधिनाऽवलेहः ।
वातात्मकं पित्तकफोद्भवं च द्विदोषकासानपि संनिपातान् ॥३॥
क्षतोद्भवं कासक्षयं च हन्यात्सपीनसश्वासमुरःक्षतं च ।
यक्ष्माणमेकादशरूपमुग्रं भृगूपदिष्टं हि रसायनं स्यात् ॥ ४ ॥

मुळें, फुलें, पानें ह्यांसुद्धां रिंगणी चारशें तोळे आणि हिरडे शंभर ह्यांचा दहाशें चोवीस तोळे पाण्यांत चतुर्थांश काढा करावा. नंतर त्या काढ्यांत चारशें तोळे गूळ घालून लेह करावा. पक्व झाल्यावर उतरून थंड झाल्यावर त्यांत बारा तोळे त्रिकटूचें चूर्ण (सुंठ, मिरीं, पिंपळीचें चूर्ण), चोवीस तोळे मध आणि चार तोळे चातुर्जातांचें (दालचिनी, तमालपत्र, नागकेशर, वेलची.) चूर्ण घालून अग्निबल पाहून ह्या लेहाची योजना करावी. वातजन्य,

---

१ "ह्याम्रं" हें पद दुर्बोध दिसतें. सर्व प्रती व वैद्यजीवन ह्यांतून पाठ असाच आहे. 'ह्यम्लं' असा कदाचित् पाठ असेल.

पित्तजन्य, कफजन्य, द्विदोषजन्य, त्रिदोषजन्य, उरःक्षतजन्य, व क्षयजन्य कासाचा हा अवलेह नाश करतो. तसेंच पीनस, श्वास, उरःक्षत, आणि अकरा लक्षणें असलेला उग्र क्षय ह्यांचाही नाश करतो. हा भृगुऋषीनें सांगितलेला व्याघ्रीहरीतकी अवलेह रसायनही आहे.

कासकंडनावलेह.

अजामूत्रं शतपलं मन्दाग्नौ गुडपाकवत्।
पक्त्वा बिभीतकं चूर्णं पलद्वयमितं क्षिपेत् ॥ १ ॥
पिप्पली पिप्पलीमूलं पलमात्रं मृतायसम्।
कण्टकारीफलरजो निक्षिपेच्च पलद्वयम् ॥ २ ॥
ततो माषद्वयं खादेट्टङ्कं कर्षमथापि वा।
क्षौद्रेणोष्णाम्बुना वाऽपि सर्वकासात्प्रमुच्यते ॥ ३ ॥
असाध्या भिषजा त्यक्ताश्चिरजाः पथ्यवर्जिताः।
ये कासास्तेऽप्यनेनाऽऽशु प्रणश्यन्ति न संशयः।
कासकण्डननामाऽयं योग आत्रेयभाषितः ॥ ४ ॥

चारशें तोळे शेळीचे मुताचा मंदाग्नीवर गुडपाकाप्रमाणें पाक करावा. पाक झाल्यावर त्यांत आठ तोळे बेहड्याचें चूर्ण घालावें. पिंपळी, पिंपळमूळ व लोहभस्म चार चार तोळे आणि रिंगणीच्या फळाचें चूर्ण आठ तोळे घालावें. नंतर हा अवलेह दोन मासे, चार मासे किंवा एक तोळापर्यंत मधाशीं किंवा ऊन पाण्याशीं सेवन करावा. म्हणजे तो रोगी सर्व खोकल्यांपासून मुक्त होतो. असाध्य, वैद्यानें सोडलेले, फार दिवसाचे व पथ्यवर्जित असे सर्व प्रकारचे खोकले ह्यानें बरे होतात. हा कासकंडन अवलेह आत्रेयऋषीनें सांगितला आहे.

अगस्तिहरीतकीपाक.

दशमूलीं स्वयंगुप्तां शङ्खपुष्पीं शटीं बलाम्।
हस्तिपिप्पल्यपामार्गपिप्पलीमूलचित्रकान् ॥ १ ॥
भार्गींपुष्करमूलं च द्विपलांशं यवाढकम्।
हरीतकीशतं चैव जले पञ्चाढके पचेत् ॥ २ ॥
यवैः स्विन्नैः कषाये च पूतं तच्चाभयाशतम्।
पचेद्गुडतुलां दत्त्वा कुडवं च पृथग्घृतात् ॥ ३ ॥

तैलात्पिप्पलिचूर्णाच्च सिद्धे शीते च माक्षिकात् ।
लिह्याद्वे चाभये नित्यं ततः खादेद्रसायनात् ॥ ४ ॥
वलीं च पलितं हन्याद्वर्णायुर्बलवर्धनम् ।
पञ्च कासान्क्षयश्वासान्हिक्कां च विषमज्वरान् ॥ ५ ॥
हन्यात्तथा ग्रहण्यर्शोहृद्रोगारुचिपीनसान् ।
अगस्तिविहितं धन्यमिदं श्रेष्ठं रसायनम् ॥ ६ ॥

दशमुळें, कुहिलीच्या मुळ्या, शंखपुष्पी, कचोरा, चिकणामूळ, गजपिंपळी, अपामार्ग, पिंपळमूळ, चित्रकमूळ, भारंगमूळ, पोखरमूळ, हीं औषधें आठ आठ तोळे, सातू दोनशें छपन्न तोळे व हिरडे शंभर ह्यांचा बाराशें ऐशीं तोळे पाण्यांत सातू शिजेपर्यंत शिजवून काढा करावा. सातु शिजल्यावर काढा काढून घेऊन त्यांतील हिरडे वेंचून त्या काढ्यांत घालावेत आणि चारशें तोळे गूळ, सोळा तोळे तूप, सोळा तोळे तेल व सोळा तोळे पिंपळीचें चूर्ण घालून लेह तयार करावा. लेह तयार झाल्यावर उतरून थंड झाल्यावर त्यांत सोळा तोळे मध घालावा. नंतर त्यांतील दोन हिरडे व लेह नित्य यथाशक्ति खावा. ह्यापासून वलीपलित रोग दूर होतो. शरीराचा वर्ण, आयुष्य व बल हीं वाढतात. पांच प्रकारचे खोकले, क्षय, श्वास, उचकी, विषमज्वर, संग्रहणी, मूळव्याध, हृद्रोग, अरुचि व पीनस ह्यांचा नाश होतो. हें अगस्तीनें सांगितलेलें रसायन श्रेष्ठ असून धन्यताप्रद आहे.

बिभीतकावलेह.

आजस्य मूत्रस्य शतं पलानां शतं पलानां च कलिद्रुमस्य ।
पक्वं समध्वाशु निहन्ति कासं श्वासं च तद्वत्सबलं बलासम् ॥ १

शेळीचे मूत चारशें तोळे आणि बेहडे चारशें तोळे ह्यांचा लेहाप्रमाणें पाक करून मध घालून द्यावा. तो खोकला, श्वास व वाढलेला कफ ह्यांचा नाश करतो.

कंटकार्यवलेह.

कण्टकारीतुलां नीरद्रोणे पक्त्वा कषायकम् ।
पादशेषं गृहीत्वा च तस्मिंश्चूर्णानि दापयेत् ॥ २ ॥
पृथक्पलांशान्येतानि गुडूचीचव्यचित्रकम् ।

मुस्ताकर्कटशृङ्गी च त्र्यूषणं धन्वयासकम् ॥ ३ ॥
भार्गी रास्ना शठी चैव शर्करा पलविंशतिः ।
प्रत्येकं च पलान्यष्टौ प्रदद्याद् घृततैलयोः ॥ ४ ॥
पक्त्वा लेहत्वमायाते शीते मधुपलाष्टकम् ।
चतुष्पलं तुगाक्षीर्याः पिप्पलीनां चतुष्पलम् ॥ ५ ॥
क्षिप्त्वा निदध्यात्सुदृढे मृन्मये भाजने शुभे ।
लेहोऽयं हन्ति कासार्तिहिक्काश्वासानशेषतः ॥ ६ ॥

चारशें तोळे रिंगणी वीसशें अठ्ठेचाळीस तोळे पाण्यांत शिजवून चतुर्थांश काढा करावा. नंतर त्यांत गुळवेल, चवक, चित्रक, नागरमोथे, काकडशिंगी, सुंठ, मिरीं, पिंपळी, धमासा, भारंगमूळ, रास्ना व कचोरा, ह्या औषधांचें चूर्ण चार चार तोळे, साखर ऐंशी तोळे, तूप व तेल बत्तीस बत्तीस तोळे घालून लेह तयार करावा. तो थंड झाल्यावर त्यांत मध बत्तीस तोळे घालून वंशलोचन व पिंपळी सोळा सोळा तोळे घालावी. आणि ढवळून उत्तम मातीच्या भांड्यांत भरून ठेवावा. हा लेह खोकला, श्वास व उचकी ह्यांचा नाश करतो.

व्याघ्रीघृत.

व्याघ्रीस्वरसविपक्वं रास्नाकट्फलसुगोक्षुरव्योषैः ।
सर्पिः स्वरोपघातं निहन्ति कासं च पञ्चविधम् ॥ ७ ॥

रिंगणीचा स्वरस आणि रास्ना, कायफळ, गोखरू, सुंठ, मिरीं व पिंपळी ह्यांचा कल्क ह्यामध्यें तूप सिद्ध करावें. तें पांच प्रकारचे खोकले व स्वरभेद ह्यांचा नाश करितें.

गुडूच्यादि घृत.

सर्पिर्गुडूचीवृषकण्टकारीक्वाथेन कल्केन च सिद्धमेतत् ।
पेयं पुराणज्वरकासशूलप्लीहाग्निमान्द्यग्रहणीगदेषु ॥ ८ ॥

गुळवेल, अडुळसा व रिंगळमूळ, ह्यांचा काढा व कल्क ह्यांमध्यें तूप सिद्ध करावें. तें जीर्णज्वर, खोकला, शूल, पानथरी, अग्निमांद्य व संग्रहणी ह्यांजवर योजावें.

त्र्यूषणादि घृत.

त्र्यूषणं त्रिफलाद्राक्षाकाश्मर्यश्चाटरूषकम् ।

के पाठे देवदार्वब्दस्वगुप्तं चित्रकं शटी ॥ १ ॥
व्याघ्री तामलकी मेदा काकनासा शतावरी।
त्रिकण्टकं विदारी च पिष्ट्वा कर्षसमान्घृतात् ॥ २ ॥
प्रस्थं चतुर्गुणक्षीरसिद्धं कासहरं पिबेत्।
ज्वरगुल्मारुचिप्लीहशिरोहृत्पार्श्वशूलनुत् ॥ ३ ॥
कामलार्शोनिलाष्ठीलाक्षतशोषक्षयापहम्।
त्र्यूषणं नाम विख्यातं घृतमेतन्महोत्तमम् ॥ ४ ॥

सुंठ, मिरीं, पिंपळी, हिरडा, बेहडा, आवळकाठी, मनुका, शिवणीची फळें, आडुळसा, पहाडमूळ, पहाडवेलीचें मूळ, देवदार, नागरमोथे, कुहिलीचें मूळ, चित्रकमूळ, कचोरा, रिंगणमूळ, भुईआवळी, मेदा, काकनासा, शतावरी, गोखरू व भुईकोहळा, हीं एक एक तोळा घेऊन त्यांचा कल्क करून, त्यांत चौसष्ट तोळे तूप व तुपाच्या चौपट दूध घालून तूप सिद्ध करावें. हें खोकला दूर करितें. तसेंच ज्वर, गुल्म, अरुचि, पानथरी, मस्तक, हृदय व बरगडया ह्यांतील शूल, कावीळ, मूळव्याध, वाताष्ठीला, उरःक्षत व क्षय ह्यांचा नाश करतें. हें त्र्यूषणादि घृत फार उत्तम आहे.

कंटकारीघृत.

समूलफलपत्रायाः कण्टकार्या रसाढकम्।
घृतप्रस्थं बलाव्योषविडङ्गशठिदाडिमैः ॥ १ ॥
सौवर्चलयवक्षारविश्वामलकपौष्करैः।
वृश्चीवबृहतीपथ्यायवानीचित्रकादिभिः ॥ २ ॥
मृद्वीकाचव्यवर्षाभूदुरालम्भाम्लवेतसैः।
शृङ्गीतामलकीभार्गीरास्नागोक्षुरकैः पचेत् ॥ ३ ॥
कल्कैस्तत्सर्वकासेषु श्वासहिध्मासु शस्यते।
कण्टकारीघृतं सिद्धं कफव्याधिनिषूदनम् ॥ ४ ॥

मुळें, फळें, पानें ह्यांसह काढलेला रिंगणीचा रस दोनशें छपन्न तोळे, तूप चौसष्ट तोळे; चिकणामूळ, सुंठ, मिरीं, पिंपळी, वावडिंग, कचोरा, डाळिंब, सज्जीखार, जवखार, सुंठ, आवळकाठी, पोखरमूळ, पुनर्नवा, रिंगणमूळ, हिरडेदळ, ओवा, चित्रकमूळ, मनुका, चवक, वसूची मुळी, धमासा, अम्लवेतस, काकडशिंगी, भुईआवळी, भारंगमूळ, रास्ना व गोखरू ह्यांचा कल्क घालून पचन

करावें. तें सर्व प्रकारचे खोकले, श्वास, उचक्या ह्यांजवर प्रशस्त आहे. हें कंटकारिघृत कफरोगांचा नाश करितें.

दुसरें कंटकारि घृत.

कण्टकार्यास्तुलां क्षुण्णां कृत्वा द्रोणेऽम्भसः पचेत् ।
तेनाऽऽढकेन क्राथस्य घृतप्रस्थं पिचून्मितैः ॥ ५ ॥
रास्नादुःस्पर्शषड्ग्रन्थिपिप्पलीद्वयचित्रकैः ।
सौवर्चलयवक्षारकृष्णामूलैश्च तज्जयेत् ॥
कासश्वासकफघ्नीवहिक्कारोचकपीनसान् ॥ ६ ॥

चारशें तोळे रिंगणी कुटून वीसशें अठ्ठेचाळीस तोळे पाण्यांत करावा. तो काढा दोनशेंछपन्न तोळे उरला म्हणजे त्यांत रास्ना, धमासा, पिंपळमूळ, पिंपळी, गजपिंपळी, चित्रक, सज्जीखार, जवखार व पिंपळमूळ ह्यांचा कल्क एक एक तोळा घालून चौसष्ट तोळे तूप तयार करावें. तें खोकला, श्वास, कफ पडणें, उचकी, अरुचि व पीनस ह्यांना जिंकतें.

भागोत्तरवटी.

रसगन्धकणापथ्याकलिद्रुफलवासकाः ।
भार्गी चेति क्रमाद् वृद्धैरेतद्भर्वरजद्रवैः ॥ १ ॥
पिष्टं विंशतिमेकांतान्कुर्यात्क्षौद्रेण गोलकान् ।
कर्षप्रमाणमेतस्य तमेकं प्रातरुत्थितः ॥ २ ॥
दद्यान्मासत्रयं क्षुद्राक्काथं दशकणायुतम् ।
पिबेत्तदनु कासाच्च श्वासाच्च परिमुच्यते ॥ ३ ॥

पारा, गंधक, पिंपळी, बेहडेदळ, अडुळसा व भारंगमूळ, हीं उत्तरोत्तर क्रमवृद्धीनें घेऊन भारंगमूळाच्या काढ्यांत खल करून एक एक तोळ्याच्या एकवीस गोळ्या कराव्यात आणि त्यांतील एक एक गोळी सकाळीं खाऊन त्याजवर रिंगणीचा काढा दहा पिंपळ्यांचें चूर्ण घालून द्यावा; म्हणजे रोगी खोकला व श्वास ह्यांपासून मुक्त होतो.

पर्पटीरस.

भागो रसस्य गन्धस्य द्वावेको लोहभस्मतः ।
एतद् घृते द्रवीभूतं मृद्वग्नौ कदलीदले ॥ १ ॥

पातयेद्गोमयगते तथैवोपरि योजयेत् ।
ततः पिष्ट्वा द्रवैरेभिर्मर्दयेत्सप्तधा पृथक् ॥ २ ॥
भार्गीमुण्डीमुनिवराजयानिर्गुण्डिकाद्रवैः ।
व्योषवासककन्यार्द्रद्रवैः शुष्कं पुटेल्लघु ॥ ३ ॥
अगन्धं खर्परे नाम्ना पर्पटीति रसो भवेत् ।
सर्वरोगहरः स्वैः स्वैरनुपानैर्द्विमाषतः ॥ ४ ॥
ताम्बूलपत्रसहिता कासश्वासहरा परा ।
सकणः सुरसाक्काथोऽनुपानं वा सगोजलम् ॥ ५ ॥

पारा एक भाग, गंधक दोन भाग, लोहभस्म एक भाग, ह्यांचा खल करून लोखंडाच्या कढईत तुपांत मंदाग्नीवर पचन करून गाईच्या शेणावर केळीचें पान ठेवून त्याजवर ओतून त्याजवर दुसरें पान दडपावें; थंड झाल्यावर खल करून त्याला भारंगमूळ, गोरखमुंडी, पुंडरीक वृक्ष, टाकळी, निर्गुंडी, सुंठ, मिरीं, पिंपळी, अडुळसा, कोरफड व आलें ह्यांच्या रसाची एक एक भावना देऊन एक लघुपूट द्यावें. म्हणजे गंधक निघून जाऊन पर्पटी नांवाचा रस तयार होतो. हा अनुपान योजून दोन मासे प्रमाणें योजला असतां सर्व रोग दूर करतो. ही पर्पटी विड्यांतून दिली असतां खोकला व श्वास ह्यांचा नाश करिते. ह्याजवर तुळशीच्या काढ्यांतून पिंपळीची पूड द्यावी किंवा गोमूत्र द्यावें.

पारदादि चूर्ण.

पारदं गन्धकं शुद्धं मृतं लोहं च टङ्कणम् ।
रास्नाविडङ्गत्रिफलादेवदारुकटुत्रयम् ॥ १ ॥
अमृतापद्मकक्षौद्रं पिचुतुल्यानि चूर्णयेत् ।
त्रिगुञ्जः सर्वकासघ्नो ज्वरारोचकमेहनुत् ॥ २ ॥

शुद्ध पारा, शुद्ध गंधक, लोहभस्म, टाकणखाराची लाही, रास्ना, वावडिंग, त्रिफळा, देवदार, सुंठ, मिरीं, पिंपळी, गुळवेल, व पद्मकाष्ट, एक एक घेऊन चूर्ण करून त्यांत मध एक तोळा मिसळून तीन गुंजा प्रमाणें द्यावें. हें सर्व प्रकारचे खोकले, ज्वर, अरुचि व प्रमेह यांचें नाशक आहे.

कासश्वासविधूनन रस.

रसभागो भवेदेको गन्धकाद्द्वौ तथैव च ।

यवक्षारस्त्रिभागः स्याद्रुचकं च चतुर्गुणम् ॥ १ ॥
मरिचं पञ्चभागं स्यात्सुरसारसमर्दितः ।
कासं पञ्चविधं हन्याच्छ्वासं पञ्चविधं हरेत् ॥ २ ॥

पारा एक भाग, गंधक दोन भाग, जवखार तीन भाग, पादेलोण चार भाग, व मिरीं पांच भाग ह्यांचा तुळशीच्या पाल्याच्या रसांत खल करावा. ह्याला कासविधूनन रस म्हणतात. हा पांच प्रकारचे खोकले व पांच प्रकारचे श्वास ह्यांचा नाश करितो.

ताम्रपर्पटी रस.

मृतं ताम्रं त्रिभागं च रसं गंधं च तत्समम् ।
भागमेकं वत्सनाभं कज्जलीखल्वमध्यगम् ॥ १ ॥
गोघृतेन कृतं कल्कं लोहपात्रे विपाचयेत् ।
ढालयेदर्कपत्रस्थां पर्पटीं रससिद्धये ॥ २ ॥
गुञ्जाद्वयं त्रयं चैव पिप्पलीमधुसंयुतम् ।
त्रिसप्तरात्रयोगेन रोगराजं च नाशयेत् ॥ ३ ॥
आर्द्रकस्य रसेनैव संनिपातं नियच्छति ।
त्रिफलारससंयुक्ता सर्वपाण्डुं विनाशयेत् ॥ ४ ॥
वातारितैलसंयुक्ता सर्वशूलनिवारिणी ।
कुमारीरसयोगेन वातपित्तोपशान्तिकृत् ॥ ५ ॥
बाकुचीरससंयुक्ता सर्वदद्रुविनाशिनी ।
त्रिफलामधुसंयुक्ता सर्वमेहनिवारिणी ॥ ६ ॥
खदिरक्वाथपानेन कुष्ठाष्टादशनाशिनी ।
मन्थानभैरवेणोक्ता लोकानां हितकाम्यया ॥ ७ ॥

ताम्रभस्म तीन भाग, पारा व गंधक तितकाच म्हणजे तीन भाग, बचनाग एक भाग ह्यांची कज्जली करून गाईच्या तुपांत कल्क करून लोखंडी कढईत मंदाग्नीवर पचन करून रुईच्या पानावर ओतून पर्पटी तयार करावी. ही दोन किंवा तीन गुंजा मध व पिंपळीशीं द्यावी, म्हणजे क्षयाचा नाश करिते. आल्याच्या रसाशीं दिली असतां सन्निपाताचा नाश करिते. त्रिफळ्याच्या काढ्यांतून सर्व पांडुरोगाचा नाश करिते. एरंडेल तेलांतून सर्व शूलांचा नाश करिते. कोरफडीच्या रसाशीं दिली असतां वातपित्त शमन करिते. बावचीच्या रसाशीं सर्व दद्रुरोगांचा (गजकर्ण वगैरेंचा) नाश करिते. त्रिफळा व मध ह्यांच्याशीं सर्व प्रमेहांचा

नाश करिते. खैराच्या काढ्याशीं अठराही कुष्टांचा नाश करिते. हा ताम्रपर्पटी रस मंथानभैरवानें सांगितला आहे.

नागवल्लभ रस.

कर्षमाना मृगमदचोचटङ्कणका अथ ।
काश्मीरजन्मदरदपिप्पल्यः स्युर्द्विकर्षिकाः ॥ ८ ॥
आकारकरभो जातीपत्री जातीफलं विषम् ।
प्रत्येकं पलमानानि चत्वार्यथ सुखल्वके ॥ २ ॥
अहिवल्लीदलरसैर्मर्दयेच्च दिनत्रयम् ।
मुद्गप्रमाणा वटका लीढा मध्वार्द्रकद्रवैः ॥ ३ ॥
ताम्बूलचर्विता मेहकासक्षयमरुद्धराः ।
नागवल्लभनामाऽयं रसो विश्वोपकारकः ॥ ४ ॥

कस्तुरी, दालचिनी, टाकणखाराची लाही, हीं औषधें एक एक तोळा; केशर, शुद्ध हिंगूळ, पिंपळी दोन दोन तोळे; अक्कलकाला, जायपत्री, जायफळ व शुद्ध बचनाग चार चार तोळे, ह्या सर्वांचा नागवेलीच्या पानांचे रसांत तीन दिवस खल करावा. आणि मुगाएवढी गोळी करून ती आल्याचा रस व मध ह्यांतून भक्षण करावी. आणि वर विडा खावा. सर्व जगावर उपकार करणारा असा हा नागवल्लभ रस प्रमेह, खोकला, क्षय व वातविकार ह्यांचा नाशक आहे.

हेमगर्भपोटली रस.

रसस्य भागाश्चत्वारस्तावन्तः कनकस्य च ।
तयोश्च पिष्टिकां कृत्वा गन्धो द्वादशभागकः ॥ १ ॥
कुर्यात्कज्जलिकां तत्र मुक्ताभागांश्च षोडश ।
चतुर्विंशति शङ्खस्य भागैकं टङ्कणस्य च ॥ २ ॥
एकत्र मर्दयेत्सर्वं पक्वनिम्बूकजै रसैः ।
कृत्वा तेषां ततो गोलं मूषासंपुटके न्यसेत् ॥ ३ ॥
मुद्रां दत्वा ततो हस्तमात्रे गर्ते च गोमयैः ।
पुटेद्गजपुटेनैव स्वाङ्गशीतं समुद्धरेत् ॥ ४ ॥
पिष्ट्वा गुंजाचतुर्मानं दद्याद्गव्याज्यसंयुतम् ।
एकोनत्रिंशदुन्मानमरिचैः सह दीयते ॥ ५ ॥
राजते मृन्मये पात्रे काचजे वाऽथ लोहजे ।
लोकनाथसमं पथ्यं कुर्यात्प्रयतमानसः ॥ ६ ॥

कासे श्वासे क्षये वाते कफे ग्रहणिकागदे ।
अतीसारे प्रयोक्तव्या पोटली हेमगर्भिका ॥ ७ ॥

पारा चार भाग, व सोनें चार भाग, ह्यांचा एकत्र खल करून त्यांत बारा भाग गंधक घालून कज्जली करावी. नंतर त्यांत मौक्तिकभस्म सोळा भाग, शंखभस्म चोवीस भाग व टाकणखाराची लाही एक भाग घेऊन ह्या सर्वांचा लिंबाच्या रसांत खल करून त्याच्या गोळ्या कराव्या. त्या मुळींत घालून मुखमुद्रा करून एक घनहात खळग्यामध्यें गाईच्या शेणाच्या गोवऱ्यांचें पुट द्यावें. स्वांगशीत झाल्यावर काढून चूर्ण करून चार गुंजाप्रमाणानें गाईचें तूप व एकोणीस मिऱ्यांची पूड ह्यांतून काचेच्या, रुप्याच्या चिनीमातीच्या अथवा लोखंडाच्या भांड्यांतून द्यावें. ह्याजवर लोकनाथाप्रमाणें पथ्य करावें. हा हेमगर्भपोटली रस कास, श्वास, क्षय, वात, कफ, संग्रहणी व अतिसार ह्यांजवर द्यावा.

द्वितीय हेमगर्भपोटली रस.

शुद्धसूतं चतुर्भागं द्विभागं गन्धकस्य च ।
भागमेकं सुवर्णं च त्रिभागं शुल्बभस्म च ॥ १ ॥
कुमारीरससंयुक्तं सप्ताहं मर्दयेद्दृढम् ।
गुटिकां कारयेत्तां तु बध्नीयात्खरकर्पटे ॥ २ ॥
वस्त्रे किंचिद्बलिं स्थाप्य तत्र गोलं निधाय च ।
बध्नीयात्पोटलीं गाढां पश्चाद्वस्त्रेण वेष्टयेत् ॥ ३ ॥
सर्वभागसमं गन्धं दत्त्वा मृन्मयभाजने ।
तन्मध्ये पोटलीं न्यस्य मुखे मुद्रां च कारयेत् ॥ ४ ॥
विधाय च्छिद्रं मुद्रास्थं द्रावं दृष्ट्वा शलाकया ।
पाचयेत्सिकतायन्त्रे रसोऽयं मृदुवह्निना ॥ ५ ॥
यामार्धेन सुसंजातं स्वाङ्गशीतं समुद्धरेत् ।
कासे श्वासे क्षये वाते कफे ग्रहणिकागदे ।
सर्वरोगेषु दातव्या हेमगर्भाख्यपोटली ॥ ६ ॥

शुद्ध पारा चार भाग, गंधक दोन भाग, सोनें एक भाग, ताम्रभस्म तीन भाग ह्यांचा कोरफडीच्या रसांत सात दिवस खल करावा. नंतर त्याच्या गोळ्या करून एका जाड कापडांत बांधाव्या. बांधतांना कापडांत थोडा गंधक घालून त्याजवर गोळी

ठेवून बळकट पोटली बांधून पुनः ती पोटली वस्त्रानें गुंडाळावी. नंतर सर्वांच्या वजनाइतका शुद्ध गंधक मातीच्या पात्रांत घालून त्यांत ती पुरचुंडी घालून पात्राला मुखमुद्रा करून मुद्रेला एक छिद्र ठेवावें; आणि मंदाग्नीवर वालुकायंत्रांत ठेवून गंधक पातळ झाल्यावर सळईनें ढवळावें. ह्याप्रमाणें अर्धा प्रहर करून स्वांगशीत झाल्यावर काढून घ्यावें. हा हेमगर्भपोटली रस कास, श्वास, क्षय, वात, कफ, संग्रहणी व सर्व रोग ह्यांजवर द्यावा.

दुसरा प्रकार.

शुद्धसूतं त्रिभागं च तत्समं शुल्बभस्म च ।
भागैकं गन्धकं दद्यात्तदर्धं स्वर्णमेव च ॥ १ ॥
कज्जलीं कारयेत्तां तु खल्वके सप्तवासरम् ।
अथ निर्गुण्डिकाद्रावैर्मर्दयेद्दिनसप्तकम् ॥ २ ॥
अथवा कनकद्रावैर्गुटिकां कारयेत्ततः ।
किंचिद्गन्धसमायुक्ते वस्त्रे गोलं निधाय च ॥ ३ ॥
बध्नीयात्पोटलीं गाढामेवं च त्रिपुटं चरेत् ।
दृढमृन्मयपात्रे तु गन्धं दत्त्वाऽधरोत्तरम् ॥ ४ ॥
तन्मध्ये पोटलीं न्यस्य निर्वातभवनान्तरे ।
वितस्तिप्रमितं गर्तं तस्मिन्संस्थाप्य मुद्रयेत् ॥ ५ ॥
अंगुलीमृत्तिकाभिश्च ज्वालयेदिन्धनानि च ।
यामेन सिद्धतां याति हेमगर्भाख्यपोटली ।
अनुपानानुसारेण सर्वरोगेषु योजयेत् ॥ ६ ॥

शुद्ध पारा तीन भाग, ताम्रभस्म तीन भाग, गंधक एक भाग, सोनें अर्धा भाग, ह्यांचा सात दिवस खल करून कज्जली करावी. नंतर निर्गुंडीच्या किंवा धोतऱ्याच्या पाल्याच्या रसानें सात दिवस खल करून गोळ्या कराव्यात. नंतर वस्त्रामध्यें थोडा गंधक घालून त्यांत गोळ्या ठेवून पुरचुंडी बांधावी. ह्याप्रमाणें एकावर एक तीन वस्त्रें गुंडाळावींत. नंतर एका बळकट मातीच्या भांड्यांत खालीं वर गंधक घालून ती पुरचुंडी ठेवावी. नंतर निर्वात स्थळीं एक वीतभर खळगा काढून त्यांत तें पात्र ठेवून त्याजवर झांकण घालून एक अंगुल जाडीचा मातीचा लेप करून मुखमुद्रा करावी

व एक प्रहरपर्यंत अग्नि द्यावा. म्हणजे हेमगर्भपोटली रस तयार होतो. हा अनुपानपरत्वें सर्व रोगांवर योजावा.

अन्य प्रकार.

रसं च गन्धकं चैव समं खल्वे विमर्दयेत् ।
कज्जल्यां च तथा स्वर्णं संशुद्धं च विनिक्षिपेत् ॥ १ ॥
सुसूक्ष्मे सुदृढे वस्त्रे बद्ध्वा पोटलिकां दृढाम्
गन्धकेनाऽऽयसे पात्रे पक्त्वा पोटलिकां चिरम् ॥ २ ॥
मन्दाग्निना पचेद्यावद् व्योमवर्णं भवेत्तु तत् ॥ ३ ॥
हेमगर्भ इति ख्यातो रसोऽयं श्वासकासनुत् ।
अनुपानविभेदेन सर्वरोगाञ्जयत्यसौ ॥ ४ ॥

पारा व गंधक समभाग घेऊन कज्जली करावी. नंतर त्या कज्जलींत (पाऱ्यासमान) सोनें शुद्ध करून मिसळावें. नंतर एका पातळ वस्त्रामध्यें बळकट पुरचुंडी बांधून लोखंडाच्या भांड्यांत गंधक घालून त्यांत ती पोटली मंदाग्नीनें पचन करावी. तिला आकाशाप्रमाणें रंग आला म्हणजे काढून घ्यावी. ह्याला हेमगर्भ रस म्हणतात. हा श्वासकासनाशक आहे. हा अनुपान योजून दिला असतां श्वास व खोकला ह्यांचा नाश करतो.

महाहेमगर्भरस.

शुद्धसूतं पलैकं स्यात्पादांशं शुद्धहेमकम् ।
शुद्धगंधस्य माषैकं प्रतिकर्षं प्रयोजयेत् ॥ १ ॥
त्रयमेकत्र कुर्वीत सूक्ष्मं खल्वे विमर्दयेत् ।
सुदृढं बंधयेद्वस्त्रे स्थाप्यं लोहजसंपुटे ॥ २ ॥
मर्दितं गंधकपलं तस्योपरि प्रदापयेत् ।
संपुटं मुद्रितं कृत्वा भूधराख्यपुटे पचेत् ॥ ३ ॥
स्वांगशीतलमुद्धृत्य दग्धं गंधं परित्यजेत् ।
वेष्टयित्वा पुनर्वस्त्रं सूत्रे बध्वा च गोलकम् ॥ ४ ॥
तत्तुल्यं च पुनर्गंधं संपुटे निक्षिपेद् भिषक् ।
मुद्रितं संपुटं कृत्वा पुनर्यंत्रेण पाचयेत् ॥ ५ ॥
हेमगर्भरसो नाम्ना सर्वव्याधिनिवारणः ।
रोगराजादिकं हंति इतरेषां तु का कथा ॥ ६ ॥

चार तोळे शुद्ध पारा, एक तोळा शुद्ध सोनें आणि प्रत्येक तोळ्याला एक मासा शुद्ध गंधक घेऊन खलून कज्जली करावी.

नंतर एका बळकट वस्त्रामध्यें पुरचुंडी बांधून एका लोखंडाच्या संपुटामध्यें घालून त्याजवर गंधक चार तोळे घालून त्या संपुटाला मुद्रा करून भूधर-पुटामध्यें पचन करावें. स्वांगशीत झाल्यावर जळलेला गंधक काढून टाकावा, आणि पुनः त्या गोळ्याला वस्त्रानें वेष्टन करून सुतानें बांधावें. नंतर त्याच्या बरोबरीनें शुद्ध गंधक पुनः संपुटांत घालून मुखमुद्रा करून पुनः वरीलप्रमाणें भूधर-पुटांत पचन करावें. हा हेमगर्भ नांवाचा रस सर्व रोगनाशक आहे. हा क्षयादिकांचा नाश करतो, मग इतरांची काय कथा ?

कफकुंजर रस.

रसगन्धौ समांशौ च स्नुह्यर्कपयसः पलम् ।
पलं च पञ्चलवणमेकीकृत्यावचूर्णयेत् ॥ १ ॥
आलोड्य चार्कदुग्धेन पूरयेच्छङ्खमध्यतः ।
पिप्पलीभकणावारिचूर्णं कृत्वा प्रलेपयेत् ॥ २ ॥
प्रज्वालयेद्याममात्रं सूक्ष्मचूर्णं तु कारयेत् ।
कर्पूरनागपत्रैश्च देयो मात्रार्धगुञ्जया ॥ ३ ॥
श्वासं कासं च हृद्रोगं कफं पञ्चविधं तथा ।
नाशयेत्सर्वरोगांश्च रसोऽयं कफकुञ्जरः ॥ ४ ॥

पारा व गंधक समभाग, तिधारी निवडुंग व रुई ह्यांचा चीक चार तोळे व पंच लवणें चार तोळे ह्या सर्वांचा खल करून चूर्ण करावें. मग रुईच्या चिकानें घोटून तें शंखांत भरावें व पिंपळी, गजपिंपळी व वाळा ह्यांचें चूर्ण करून त्या शंखाला लेप करावा. नंतर एक प्रहरभर आंच देऊन स्वांगशीत झाल्यावर बारीक चूर्ण करून ठेवावें. हा रस कापूर व विड्याच्या पानांतून चार गुंजा-प्रमाणें द्यावा. हा कफकुंजर रस श्वास, खोकला, हृद्रोग, पांच प्रकारचा कफ (खोकला) व सर्व रोग ह्यांचा नाश करतो.

कफरोग-नागरस.

लवङ्गजातीफलजातिपत्रिकास्तथैव नागोषणग्रन्थिकानि ।
कर्षप्रमाणानि तथैकशाणं कस्तूरिकाकुंकुमयोः प्रयुंज्यात् ॥१॥
आर्द्राम्बुनाऽथ विहिता वटिका त्रिगुञ्जा
चाऽऽर्द्राम्भसाऽपि विनिहन्ति कफक्षयादीन् ।
किं श्वासकासं जठरस्य शूलं

नानानुपानैः सकलामयघ्नम् ॥ २ ॥

लवंग, जायफळ, जायपत्री, बचनाग, मिरीं व पिंपळमूळ हीं औषधें एक एक तोळा, कस्तुरी व केशर तीन तीन मासे, ह्या सर्वांचें चूर्ण करून आल्याच्या रसांत खल करून तीन तीन गुंजांच्या गोळ्या कराव्या. आणि त्या आल्याच्याच रसाशीं द्याव्या, ह्या कफक्षयादिकांचा नाश करतात. मग श्वास व खोकला ह्यांचा नाश होईल ह्यांत नवल काय? हा नागरस उदरसंबंधीं शूळाचा नाश करतो आणि अनेक अनुपानांच्या योगानें सर्व रोगांचा नाश करतो.

उन्मत्तभैरव रस.

पारदं दरदं शुद्धं गन्धकं कज्जलाकृति ।
गजकणा वत्सनागं शुण्ठी चोन्मत्तबीजकम् ॥ १ ॥
जातीफलं जातिपत्रं लवङ्गं मरिचं तथा ।
अकल्करं समानं स्यान्मर्दयेच्च दिनत्रयम् ॥ २ ॥
आर्द्रकस्य रसेनैव गुटिकां वल्लसंन्निभाम् ।
चपला मधुना चैव क्षयश्वासनिबर्हणः ॥ ३ ॥
कफरोगविनाशाय रस उन्मत्तभैरवः ।
अनुपानविशेषेण धातुपुष्टिकरः स्मृतः ॥ ४ ॥

पारा, हिंगूळ, गंधक हे शुद्ध करून घेऊन कज्जली करावी. नंतर गजपिंपळी, बचनाग, सुंठ, धोत्र्याचें बीं, जायफळ, जायपत्री, लवंग, मिरीं व अक्कलखारा हीं सर्व औषधें समभाग घालून आल्याच्या रसांत तीन दिवस खल करून वालप्रमाणानें गोळ्या कराव्या. हा उन्मत्तभैरव रस मध व पिंपळी यांशीं द्यावा. म्हणजे क्षयसंबंधीं खोकल्याचें निवारण करतो. हा कफरोगाच्या नाशार्थ सांगितला आहे. हा विशेष प्रकारचें अनुपान योजून दिला असतां धातुपुष्टि करतो.

पथ्यापथ्य.

शालिषष्टिकगोधूममाषमुद्गकुलत्थकाः ।
छाग्याः पयो घृतं बिम्बी वार्ताकं बालमूलकम् ॥ १ ॥
कासमर्दकजीवन्तीवास्तुकं बीजपूरकम् ।
गोस्तनी लशुनं लाजा व्योषमुष्णोदकं मधु ॥ २ ॥
पथ्यमेतद्यथादोषमुक्तं कासगदातुरे ।

साठया साळी, गहू, उडीद, मूग, हुलगे, शेळीचें दूध, तूप, तोंडलीं, वांगीं, कोवळे मुळे, कासविंदा, हरणदोडी, चंदनबटवा, महाळुंग, गोस्तनी मनुका, लसूण, लाह्या, सुंठ, मिरीं, पिंपळी, ऊन पाणी व मध हें पथ्य खोकलेकऱ्याला दोषानुरूप सांगितलें आहे.

मैथुनं स्निग्धमधुरं दिवास्वापं पयो दधि ।
पिष्टान्नं पायसादीनि कासी धूमं च वर्जयेत् ॥ ३ ॥

मैथुन, स्निग्ध व मधुर पदार्थ, दिवसा निजणें, दूध, दहीं, पिष्टमय अन्न, खीर वगैरे पक्वान्नें व धूर घेणें हें खोकलेकऱ्यानें वर्ज करावें.

हिक्कानिदान.

विदाहिगुरुविष्टम्भिरूक्षाभिष्यन्दिभोजनैः ।
शीतपानाशनस्नानरजोधूमातपानिलैः ॥ १ ॥
व्यायामकर्मभाराध्ववेगाघातापतर्पणैः ।
हिक्का श्वासश्च कासश्च नृणां समुपजायते ॥ २ ॥

विदाही, जड, अवष्टंभक, रूक्ष, अभिष्यंदि [स्रावी] अशा भोजनानें; थंड पाणी पिणें, थंड पाण्यानें स्नान करणें, थंड पदार्थ खाणें, धूळ, धूर, उन व वारा घेणें, व्यायाम, ओझीं वाहणें, मार्ग चालणें, शरीरावर जोराचा आघात होणें, आणि लंघन इत्यादि कारणांनीं उचकी, श्वास, व खोकला हे विकार उत्पन्न होतात.

संप्राप्ति.

मुहुर्मुहुर्वायुरुदेति सस्वनो यकृत्प्लीहान्त्राणि मुखादिवाऽक्षिपन् ।
स घोषवानाशु हिनस्त्यसून्यतस्ततस्तु हिक्केत्यभिधीयते बुधैः ॥१

उदान वायूसह प्राणवायु यकृत, प्लीहा व आंतडीं ह्यांना तोंडाकडे ढकलीत [हिक्‌हिक् असा शब्द करीत] वर येतो. हा रोग त्वरित प्राणनाश करतो, म्हणून विद्वान वैद्य ह्या रोगाला हिक्का (उचकी) असें म्हणतात.

पूर्वरूप.

कण्ठोरसोर्गुरुत्वं च वदनस्य कषायता ।
हिक्कानां पूर्वरूपाणि कुक्षेराटोप एव च ॥ २ ॥

गळा व छाती ह्यांमध्यें जडपणा, तोंडाला तुरटपणा, आणि कुशींत गुडगुड वाजणें हीं लक्षणें उचकी येण्यापूर्वीं होतात.

त्यांचीं नांवें.

अन्नजां यमलां क्षुद्रां गम्भीरां महतीं तथा ।
वायुः कफेनानुगतः पंच हिक्काः करोति हि ॥ १ ॥

प्रकुपित झालेला वायु कफासहवर्तमान अन्नजा, यमला, क्षुद्रा, गंभीरा व महती अशा पांच प्रकारच्या उचक्या उत्पन्न करितो.

अन्नजा उचकीचें लक्षण.

पानान्नैरतिसंयुक्तैः सहसा पीडितोऽनिलः ।
हिक्कयत्यूर्ध्वगो भूत्वा तां विद्यादन्नजां भिषक् ॥ १ ॥

अतिशय अन्नपान केल्यामुळें पीडित झालेला वायु प्रकुपित होऊन वर चढतो व उचकी उत्पन्न करतो. त्या उचकीला अन्नजा उचकी म्हणतात.

यमला उचकीचें लक्षण.

चिरेण यमलैर्वेगैर्या हिक्का संप्रवर्तते ।
कम्पयन्ती शिरोग्रीवं यमलां तां विनिर्दिशेत् ॥ १ ॥

जी उचकी फार वेळानें पण एकदम दोन वेळ येते, व मस्तक व मान ह्यांना कंप उत्पन्न करिते, तिला यमला असें म्हणतात.

क्षुद्रा उचकीचें लक्षण.

विकृष्टकालैर्या वेगैर्मन्दैः समभिवर्तते ।
क्षुद्रिका नाम सा ज्ञेया जत्रुमूलात्प्रधावति ॥ १ ॥

जी उचकी फार वेळानें जत्रुमूळापासून मंद वेगानें येते, तिला क्षुद्रिका (क्षुद्रा) उचकी असें म्हणतात.

गंभीरा उचकीचें लक्षण.

नाभिप्रवृत्ता या हिक्का घोरा गम्भीरनादिनी ।
अनेकोपद्रववती गम्भीरा नाम सा स्मृता ॥ १ ॥

नाभीपासून भयंकर व गंभीर स्वरानें येणारी जी उचकी तिला गंभीरा उचकी असें म्हणतात. हिच्यामध्यें अनेक उपद्रव असतात.

महती उचकीचें लक्षण.

मर्माण्यापीडयन्तीव सततं या प्रवर्तते ।
महाहिक्केति सा ज्ञेया सर्वगात्रप्रकम्पिनी ॥ १ ॥

जी उचकी बस्ति, हृदय, व मस्तक ह्या अवयवांत पीडा करते

व सतत एकसारखी येते, तिला महा (महती) हिक्का असें म्हणतात. हिच्या योगानें सर्व गात्रें कांपतात.

उचकीचें असाध्य लक्षण.

आयम्यते हिक्कतो यस्य देहो दृष्टिश्चोर्ध्वं ताम्यते यस्य नित्यम् ।
क्षीणोऽन्नविट् क्षौति यश्चातिमात्रं तौ द्वौ चान्त्यौ वर्जयेद्धिक्कमानौ १
अतिसंचितदोषस्य भक्तच्छेषकृशस्य च ।
व्याधिभिः क्षीणदेहस्य वृद्धस्यातिव्यवायिनः ॥ २ ॥
एषां या सा समुत्पन्ना हिक्का हन्त्याशु जीवितम् ।
यमिका च प्रलापार्तिमोहतृष्णासमान्विता ॥ ३ ॥

उचकी येतांना ज्याचें अंग ताठतें, दृष्टि वर जाते, सर्व अंग वांकतें, तसेंच जो क्षीण झाला आहे, ज्याला अन्नद्वेष झाला आहे व ज्याला अतिशय उचकी येते, ते दोघे आणि गंभीरा व महती ह्या दोन उचक्यांचे रोगी स्वभावतःच असाध्य आहेत. म्हणून सोडून द्यावे. ज्याच्या शरीरांत दोष अतिशय आहेत, अन्नद्वेषामुळें जो क्षीण झाला आहे, जो वृद्ध आहे आणि जो अति मैथुन करतो, अशा मनुष्यास वरील तीन साध्य उचक्यांपैकीं कोणचीही उचकी झाली असतां ती त्वरित प्राणनाश करिते. यमिका बडबड, शूळ, मूर्च्छा व तहान ह्या लक्षणांनीं युक्त असेल तर ती प्राणनाश करिते.

अक्षीणश्चाप्यदीनश्च स्थिरधात्विन्द्रियश्च यः ।
तस्य साधयितुं शक्या यमिका हन्त्यतोऽन्यथा ॥ ४ ॥

जो क्षीण झाला नाहीं, ज्याचें मन सुप्रसन्न असतें, ज्याचीं इंद्रियें व सर्व धातु बळकट आहेत, अशा मनुष्याची यमिका (यमला) नांवाची उचकी साध्य होणें शक्य आहे. ह्याच्या उलट लक्षणें असल्यास ती प्राणनाश करिते.

वातेन हिक्काः प्रभवन्ति पञ्च तासामसाध्यत्वमुदाहरन्ति ।
अक्षीणमांसश्च भवेच्च साध्या प्रान्ते च हिक्के परिवर्जनीये ॥५॥

पांचही उचक्या वातापासून होतात, असें म्हणतात. ज्याचें मांस क्षीण झालें नाहीं त्याची उचकी साध्य होते. तथापि शेवटच्या दोन वर्ज कराव्या.

हिक्काचिकित्सा.

नारीपयःपिष्टसुशुक्लचन्दनं कृतं सुखोष्णं च ससैन्धवं च ।
पिष्टं तथा सैन्धवमम्बुना वा निहन्ति हिक्कां ननु नावनेन ॥१॥

स्त्रीच्या दुधांत चंदन उगाळून थोडें ऊन करून त्यांत थोडें सैंधव घालून किंवा चंदन पाण्यांत उगाळून त्यांत सैंधव घालून त्याचें नस्य केलें असतां निश्चयानें उचकी राहते. [असें नारायणीय ग्रंथांत सांगितलें आहे.]

मधुकं मधुसंयुक्तं पिप्पली शर्करान्विता ।
नागरं गुडसंयुक्तं हिक्काघ्नं नावनत्रयम् ॥ २ ॥

ज्येष्टमध, मध, पिंपळी व साखर ह्यांचें व सुंठ आणि गूळ ह्यांचें नस्य उचकीचें नाशक आहे.

यवागू.

दशमूलीशठीरास्नापिप्पलीविश्वपौष्करैः ।
शृङ्गीतामलकीभार्गीगुडूचीनागरादिभिः ॥ १ ॥
यवागूं मधुना सिद्धां कषायं वा पिबेन्नरः ।
कासहृद्ग्रहपार्श्वार्तिहिक्काश्वासप्रशान्तये ॥ २ ॥

दशमुळें, कचोरा, रास्ना, पिंपळी, सुंठ, व पोखरमूळ, ह्या औषधांनीं तयार केलेली व काकडशिंगी, भुईआवळी, भारंगमूळ, गुळवेल, व सुंठ ह्या औषधांनीं तयार केलेली, यवागू (कण्हेरी) किंवा काढा खोकला, ऊर जखडल्यासारखें होणें, बरगड्या दुखणें, उचकी, व श्वास हे विकार शमन होण्याकारितां मध घालून द्यावा.

हिंगुसौवर्चलाजाजीबिडपौष्करचित्रकैः ।
सटी कर्कटशृङ्गी च यवागूः श्वासहिक्किनाम् ॥ ३ ॥

हिंग, पादेलोण, जिरें, बिडलोण, पोखरमूळ, चित्रकमूळ, कचोरा व काकडशिंगी ह्यांची यवागू श्वास व उचकी हे विकार झालेल्या रोग्यांना हितकारक आहे.

कासमर्दकपत्राणां यूषः शोभाञ्जनस्य च ।
शुष्कमूलकयूषश्च हिक्काश्वासनिवारणः ।
सदाधिव्योषसर्पिष्को यूषो वार्ताकजो हितः ॥ १ ॥

कासविंद्याच्या पानांचा, शेवग्याच्या पानांचा व वाळ्यांचा यूष उचकी व श्वास यांचा नाशक आहे. त्याचप्रमाणें वांग्याचा यूष दहीं, सुंठ मिरीं, पिंपळी व तूप घालून द्यावा. तो उचकी व श्वास ह्यांजवर हितकारक आहे.

दशमूलीजलयुतं शृतं हिक्किषु योजयेत् ।
श्वासकासहरः सर्वो विधिरत्रापि युज्यते ॥ १ ॥

दशमूळाचा काढा उचकीवर द्यावा. श्वास व खोकला यांचीं नाशक औषधेंही ह्याजवर द्यावीं.

पाटल्याः फलतोयेन क्षौद्रेण च समन्वितम् ।
हेमभस्म निहन्त्येव हिक्का पंचातिदुस्तराः ॥ २ ॥

पाडळीच्या फळाचा रस व मध ह्यांतून सुवर्णभस्म द्यावें. तें दुस्तर अशा पांचीही उचक्यांचें निवारण करितें.

दशमूलीकषायेण मधुना च समन्वितम् ।
कान्तायोभस्म हिक्कानां पञ्चतां पंचतां नयेत् ॥ ३ ॥

दशमूळांचा काढा व मध ह्यांतून कांतलोहाचें भस्म द्यावें. तें पांच प्रकारच्याही उचक्यांचें निवारण करितें.

कुलित्थयवकोलाम्बुदशमूलबलाजलम् ।
पानार्थं कल्पयेत्कासहिक्काश्वासप्रशान्तये ॥ ४ ॥

हुलगे, सातु, बोरें, वाळा, दशमूळें व चिकणामूळ ह्या औषधांनीं तयार केलेलें पाणी खोकला, श्वास व उचकी हे विकार शांत होण्याकरितां योजावें.

धात्री च मागधी शुण्ठी क्वाथश्चैषां सितायुतः ।
हिनस्ति हृदयोद्भूतां हिक्कां प्राणापनोदिनीम् ॥ ५ ॥

धायटीचीं फुलें, पिंपळी व सुंठ, ह्यांचा काढा साखर घालून द्यावा. तो हृदयापासून उत्पन्न होणाऱ्या व प्राणनाशक अशा उचकीचा नाश करतो.

शिखिपिच्छभस्म कृष्णाचूर्णं मधुमिश्रितं मुहुर्लीढम् ।
हिक्कां हरति प्रबलां श्वासं चैवातिदुस्तरं छर्दिम् ॥ १ ॥

मोराच्या पंखाची राख व पिंपळीचें चूर्ण मधाशीं चाटावें. तें प्रबळ अशी उचकी व दुस्तर असा श्वास व ओकारी ह्यांचा नाश करितें.

कृष्णामलकशुण्ठीनां चूर्णं मधुसितायुतम् ।
मुहुर्मुहुः प्रयोक्तव्यं हिक्काश्वासनिवारणम् ॥ २ ॥

पिंपळी, आवळकाठी व सुंठ ह्यांचें चूर्ण मध व खडीसाखरेशीं वरचेवर द्यावें. तें श्वास व उचकी यांचें निवारण करितें.

हिक्काश्वासी पिबेद्भार्गीं सविश्वामुष्णवारिणा ।
नागरं वा सिताभार्गीसौवर्चलसमन्वितम् ॥ ३ ॥

उचकी व श्वास झालेल्या रोग्यांनीं सुंठ व भारंगमूळ ह्यांचें चूर्ण ऊन पाण्याशीं घ्यावें; किंवा सुंठ, भारंगमूळ, पादेलोण ह्यांचें चूर्ण व साखर ऊन पाण्याशीं घ्यावी.

शृंगीकटुत्रिकफलत्रयकण्टकारी-
भार्गीसपुष्करजटालवणानि चैषाम् ।
चूर्णं पिबेदशिशिरेण जलेन हिक्का-
श्वासोर्ध्ववातकसनारुचिपीनसेषु ॥ ४ ॥

काकडशिंगी, सुंठ, मिरीं, पिंपळी, हिरडा, बेहडा, आवळकाठी, रिंगणमूळ, भारंगमूळ, पोखरमूळ व पंचलवणें, ह्यांचें चूर्ण उचकी, श्वास, ऊर्ध्ववात, खोकला, अरुचि व पीनस ह्यांजवर ऊन पाण्याशीं योजावें.

विश्वामिसीकणाचूर्णः ससितः समधुः स्मृतः ।

सुंठ, बडिशेप, पिंपळी, ह्यांचें चूर्ण साखर व मध ह्यांशीं योजावें.

गुडूचीनागरं नस्यं हिक्काधिक्कारकारकम् ॥ ५ ॥

गुळवेल व सुंठ ह्यांचें नस्य उचकीचा नाश करणारें आहे.

सामान्य प्रतिकार.

हिक्कार्तस्य पयश्छागं हितं नागरसाधितम् ।

सुंठ घालून तयार केलेलें शेळीचें दूध उचकीच्या मनुष्यास हितकारक आहे.

रसान्पचेत्फलाम्लांश्च लाजाचूर्णं ससैन्धवम् ॥ १ ॥

आम्लवेतसाच्या किंवा आमसुलाच्या फळाचा रस शिजवून द्यावा किंवा लाह्यांचें चूर्ण सैंधव घालून द्यावें.

यष्ट्याह्वं वा माक्षिकेणावलीढं कृष्णाचूर्णं शर्कराढ्यं च किं वा ।
सर्पिः कोष्णं क्षीरमुष्णं रसो वा हन्यादिक्षोः पानतः पञ्च हिक्काः २

ज्येष्टमध मधाशीं चाटावा किंवा पिंपळीचें चूर्ण साखरेशीं द्यावें.

तसेंच तूप, दूध, किंवा उंसाचा रस ऊन करून द्यावा. हे उपचार पांच प्रकारच्याही उचकीचा नाश करितात.

मधुसौवर्चलोपेतं मातुलुंगरसं पिबेत् ।
हिक्कार्तो मधुना लिह्याच्छुण्ठीधात्रीकणान्वितम् ॥ ३ ॥

मध व पादेलोण घालून महाळुंगाचा रस प्यावा. तसेंच उचकीच्या रोग्यानें मधाबरोबर सुंठ, आवळकाठी, व पिंपळी ह्यांचें चूर्ण द्यावें.

कपित्थस्वरसो वाऽपि रस आमलकस्य च ।
पिप्पलीक्षौद्रसंयुक्तो हिक्काश्वासनिवारणः ॥ ४ ॥

कवठाचा रस, अथवा आवळ्याचा रस पिंपळीचें चूर्ण व मध घालून द्यावा. तो उचकी व श्वास ह्यांचें निवारण करितो.

पिप्पलीमूलमधुकगुडगोश्वशकृद्रसान् ।
हिध्माभिष्यन्दकासघ्नाँल्लिह्यान्मधुघृतान्वितान् ॥ ५ ॥

पिंपळमूळ, जेष्टमध, गूळ, आणि गाईच्या शेणाच्या व घोड्याच्या लिदीचा रस हे सर्व जिन्नस एकत्र करून तूप व मध यांशीं द्यावे. हे उचकी, अभिष्यंद व खोकला, ह्यांचा नाश करतात.

खर्जूरः पिप्पली द्राक्षा शर्करा चेति तत्समम् ।
मधुसर्पिर्युतो लेहो हिक्काश्वासनिवारणः ॥ ६ ॥

खजूर, पिंपळी, द्राक्षें, साखर हीं समभाग घेऊन तूप-मधाशीं चाटावीं, म्हणजे उचकी व श्वास ह्यांचें निवारण होतें.

कटुकागैरिकाभ्यां च मुक्ताभस्म तथैव च ।
बीजपूरस्य तोयेन ताम्रं तद्वत्समाक्षिकम् ॥ ७ ॥

कुटकी, सोनकाव, आणि मौक्तिकभस्म ह्यांचें एकत्र मिश्रण करून महाळुंगचा रस व मध ह्यांशीं द्यावें; किंवा ताम्रभस्म मधाशीं द्यावें.

हेममुक्तार्ककान्तानां भस्म वल्लमितं वरम् ।
बीजपूररसक्षौद्रसौवर्चलसमन्वितम् ॥ ८ ॥
हन्ति हिक्काशतं सत्यमेकमात्राप्रयत्नतः ।
का कथा पञ्चहिक्कानां हरणे सूत उच्यते ॥ ९ ॥

सोनें, मौक्तिक, कांतलोह, व ताम्र ह्यांचें वालभर भस्म महाळुंगाचा रस, मध व पादेलोण ह्यांशीं द्यावें, तें एकदां घेतल्यानेंच

शंभर प्रकारच्या उचक्यांचा नाश करिते. मग हे सूत (मुला), पांच प्रकारच्या उचक्यांची कथा काय?

शंखचूल रस.

रसाभ्रहेमभस्मानि वैक्रान्तं सर्वतुल्यकम् ।
सर्वैः पञ्चगुणं शङ्खचूर्णं शुष्कं विमर्दयेत् ॥ १ ॥
लेहयेन्मधुना माषचतुष्कं सानुपानकम् ।
हिक्कां पञ्चविधां हन्ति मुमूर्षोरपि तत्क्षणात् ॥ २ ॥

रससिंदूर, अभ्रकभस्म व सुवर्णभस्म हीं समभाग, सर्वांच्या बरोबर वैक्रांतभस्म आणि सर्वांच्या पांचपट शंखभस्म घालून कोरडाच खल करावा. आणि अनुपान योजून मधाबरोबर चार मासे द्यावा. हा रस अगदीं मरणोन्मुखाची देखील पांची प्रकारची उचकी दूर करतो.

कासप्रकरणोक्तं च भिषगत्र नियोजयेत् ।
क्षयोक्तं वाऽत्र कासे च हिक्काश्वासे नियोजयेत् ॥ ३ ॥

कासप्रकरणांत सांगितलेल्या उपचारांचीही येथें योजना करावी. त्याचप्रमाणें क्षयप्रकरणांत सांगितलेले उपचारही उचकी, कास, व श्वास ह्यांजवर योजावे.

पथ्यापथ्य.

स्वेदनं वमनं नस्यं धूमपानं विरेचनम् ।
निद्रा स्निग्धानि चान्नानि मृदूनि लवणानि च ॥ १ ॥
जीर्णाः कुलित्था गोधूमा शालयः षष्टिका यवाः ।
एणतित्तिरलावाद्या जाङ्गला मृगपक्षिणः ॥ २ ॥
उष्णोदकं मातुलुङ्गं पटोलं बालमूलकम् ।
पक्कं कपित्थं लशुनं क्षौद्रं चेष्टानि हिक्किनाम् ॥ ३ ॥
निष्पावमाषपिण्याकवारिजानूपमामिषम् ।
अविदुग्धं दन्तकाष्ठं बस्तिं मत्स्यांश्च सर्षपान् ॥ ४ ॥
आम्लं तुम्बीफलं कन्दं तैलभृष्टमुपोदिकाम् ।
गुरु शीतं चान्नपानं हिक्कारोगी विवर्जयेत् ॥ ५ ॥

घाम काढणें, ओकारी, नस्य, धूम्रपान, विरेचन, झोंप, स्निग्ध अन्नें, मृदु पदार्थ, मीठ वगैरे लवणें, हुलगे, गहूं, साळी, साठ्या साळी, सातु हीं जुनी (एक वर्षापलीकडील) धान्यें; काळवीट,

तित्तिरपक्षी, लावापक्षी, वगैरे जांगल मृग व पक्षी ह्यांचें मांस; उष्णोदक, महाळुंग, पडवळ, कोंवळे मुळे, पिकलेलें कवठ, लसूण, मध, व बेष्टा हे उचकीच्या रोगाला पथ्यकारक आहेत. पावटे, उडीद, तिळकूट, जलचर व अनूप देशांतील प्राण्यांचें मांस, मेंढीचें दूध, दंतकाष्ठा (काडीनें दांत घासणें), बास्तिकर्म, मासे, मोहऱ्या, आंबट पदार्थ, दुध्या भोपळा, कंद (सुरण), तेलांत तळलेले पदार्थ, मायाळीची भाजी, जड व थंड अन्नपान ह्यांचें उचकीच्या मनुष्यानें सेवन करूं नये.

श्वासनिदान.

कासवृद्ध्या भवेच्छ्वासः पूर्वैर्वा दोषकोपनैः ।
आमातिसारवमथुविषपाण्डुज्वरैरपि ॥ १ ॥

खोकला अतिशय वाढला म्हणजे श्वास उत्पन्न होतो. किंवा पूर्वीं झालेल्या वातादि दोषांच्या प्रकोपामुळें होतो. तसेंच आमातिसार, ओकारी, विषबाधा, पांडुरोग आणि ज्वर ह्या विकारांपासून देखील श्वास उत्पन्न होतो.

रजोधूमानिलैर्मर्मघातादतिहिमाम्बुना ।
यैरेव कारणैर्हिक्का बहुभिः संप्रवर्तते ॥ २ ॥
तैरेव कारणैः श्वासो घोरो भवति देहिनाम् ।

धूर किंवा धूळ घशांत जाणें, सोसाट्याचा वारा घेणें, मर्मावर आघात होणें अतिशय गार पाणी पिणें, आणि ज्या अनेक कारणांनीं उचकी उत्पन्न होते त्या कारणांनींही मनुष्याला भयंकर श्वास उत्पन्न होतो.

विहाय प्रकृतिं वायुः प्राणोऽथ कफसंयुतः ॥
श्वासयत्यूर्ध्वगो भूत्वा तं श्वासं परिचक्षते ॥ ३ ॥
दोषाणामप्यनेकत्वाच्छोषितस्यापि संभवात् ।
श्वासो नैकप्रकारः स्यादिति तावद्व्यवस्थितम् ॥ ४ ॥

प्राणवायु आपला मार्ग सोडून कफाशींसहवर्तमान ऊर्ध्वगामी होऊन श्वासोच्छ्वास उत्पन्न करतो त्याला श्वास असें म्हणतात. दोषांच्या अनेकत्वामुळें व क्षयामध्यें देखील श्वासाचा प्रादुर्भाव असल्यामुळें श्वासाचेही अनेक प्रकार होतात.

महोर्ध्वच्छिन्नतमकक्षुद्रभेदैस्तु पञ्चधा ।
भिद्यते स महाव्याधिः श्वास एको विशेषतः ॥ ५ ॥

श्वास जरी एकच प्रकारचा आहे, तरी विशेषतः महाश्वास, ऊर्ध्वश्वास, छिन्नश्वास, तमकश्वास व क्षुद्रश्वास असे त्याचे पांच प्रकार करितात.

पूर्वरूप.

प्राग्रूपं तस्य हृत्पीडा शूलमाध्मानमेव च ।
आनाहो वक्त्रवैरस्यं शङ्खनिस्तोद एव च ॥ १ ॥

श्वास होण्यापूर्वी छातींत दुखणें, शूळ, पोग फुगणें, पोटाला ताणल्यासारखें होणें, तोंड बेचव होणें, आणि दोन्ही आंखांचें ठिकाणीं टोचणी लागणें, हीं लक्षणें होतात.

महाश्वासाचें लक्षण.

यदा स्रोतांसि संरुध्य मारुतः कफपूर्वकः ।
विष्वग्व्रजति संरुद्धस्तदा श्वासान्करोति सः ॥ १ ॥
उद्धूयमानवातो यः शब्दवद्दुःखितो नरः ।
उच्चैः श्वसिति संक्रुद्धो मत्तर्षभ इवानिशम् ।
प्रनष्टज्ञानविज्ञानस्तथा विभ्रान्तलोचनः ॥ २ ॥
विवृताक्षाननो बद्धमूत्रवर्चा विशीर्णवाक् ।
दीर्घं प्रश्वसितं चास्य दूराद्विज्ञायते भृशम् ।
महाश्वासोपसृष्टस्तु क्षिप्रमेव विपद्यते ॥ ३ ॥

कफाशीं मिश्र झालेला वायु प्राणवह व उदानवह स्रोतसांचा रोध करून कोंडल्यामुळें जेव्हां इकडे तिकडे संचार करूं लागतो, त्या वेळीं तो श्वास उत्पन्न करतो. ज्याचा वात वर चढला आहे, असा मनुष्य दुःखी होऊन बांधून ठेवलेल्या माजलेल्या बैलाप्रमाणें रात्रंदिवस शब्दयुक्त दीर्घ श्वास टाकतो. त्याचें ज्ञान व विचार हीं नष्ट होतात. डोळे भ्रांतिष्टाप्रमाणें होतात. डोळे वटारल्याप्रमाणें करतो; तोंड पसरतो; त्याच्या मलमूत्राचा अवरोध होतो. त्याच्यानें बोलवत नाहीं; तो दीर्घ श्वास टाकतो व तो फार दूरवर ऐकूं जातो. ह्याला महाश्वास म्हणतात. ह्या श्वासानें पिडलेला मनुष्य लवकरच मरतो.

ऊर्ध्वश्वासाचें लक्षण.

ऊर्ध्वं श्वसिति यो दीर्घं न च प्रत्याहरत्यधः ।
श्लेष्मावृतमुखस्रोताः क्रुद्धगन्धवहार्दितः ॥ १ ॥
ऊर्ध्वदृष्टिर्विपश्यंस्तु विभ्रान्ताक्ष इतस्ततः ।
प्रमुह्येद्वेदनार्तश्च शुष्कास्योऽरतिपीडितः ॥ २ ॥
ऊर्ध्वश्वासे प्रकुपिते ह्यधःश्वासो निरुध्यते ।
मुह्यतस्ताम्यतश्चोर्ध्वश्वासस्तस्यैव हन्त्यसून् ॥ ३ ॥

ऊर्ध्वश्वासाचा रोगी वर श्वास घेतो तो लवकर खालीं सोडीत नाहीं. त्याच्या स्रोतसांचीं मुखें कफानें आच्छादलेलीं असल्यामुळें क्रुद्ध झालेल्या वायूनें तो पीडित होतो. त्याची दृष्टि वर होते. तो मांबावल्याप्रमाणें इकडे तिकडे पहातो. तो श्वासाच्या वेदनांमुळें मूर्च्छित होतो. त्याचें तोंड कोरडें होतें. त्याला चैन पडत नाहीं. एकदां श्वासाचा प्रकोप होऊन तो वर चढला असतां लवकर खालीं उतरत नाहीं. त्यामुळें ग्लानि येऊन रोगी मूर्छित होतो. अशा मनुष्याचा ऊर्ध्वश्वास प्राणनाश करतो.

छिन्नश्वासलक्षण.

यस्तु श्वसिति विच्छिन्नं सर्वप्राणेन पीडितः ।
न वा श्वसिति दुःखार्तो मर्मभेदरुगर्दितः ॥ १ ॥
आनाहस्वेदमूर्छार्तो दह्यमानेन बस्तिना ।
विप्लुताक्षः परिक्षीणः श्वसन्रक्तैकलोचनः ॥ २ ॥

छिन्नश्वासांत मनुष्य आपल्या सर्व प्राणाला कष्ट देऊन थांबत थांबत श्वास टाकतो, किंवा मुळींच श्वास टाकीत नाहीं. तो वेदनांनीं पीडित होतो. मर्मभेद झाल्यासारखी त्याला पीडा होते. पोट फुगणें, घाम येणें व मूर्च्छा ह्या विकारांनीं तो बेजार होतो. त्याच्या ओटीपोटांत आग होते. त्याचे डोळे पाण्यानें भरून येतात. तो क्षीण होतो. आणि श्वास टाकतांना त्याचे डोळे लाल होतात.

व्याधिप्रभावामुळें असाध्यत्व.

विचेताः परिशुष्कास्यो विवर्णः प्रलपन्नरः ।
छिन्नश्वासेन विच्छिन्नः स शीघ्रं विजहात्यसून् ॥ १ ॥

ज्या छिन्नश्वासी मनुष्याचें मन उद्विग्न होतें, तोंडाला

कोरड पडते, अंगकांति बदलते व जो बडबडतो, तो रोगी लवकरच प्राणास मुकतो.

तमकश्वासाचें लक्षण.

प्रतिलोमं यदा वायुः स्रोतांसि प्रतिपद्यते ।
ग्रीवां शिरश्च संगृह्य श्लेष्माणं समुदीर्य च ॥ १ ॥
करोति पीनसं तेन रुद्धो घुर्घुरकं तथा ।
अतीव तीव्रवेगं च श्वासं प्राणप्रपीडकम् ॥ २ ॥
प्रताम्यति स वेगेन त्रस्यते संनिरुध्यते ।
प्रमोहं कासमानश्च स गच्छति मुहुर्मुहुः ॥ ३ ॥
श्लेष्मणा मुच्यमानेन भृशं भवति दुःखितः ।
तस्यैव च विमोक्षान्ते मुहूर्तं लभते सुखम् ॥ ४ ॥
तथाऽस्योद्ध्वंसते कण्ठः कृच्छ्राच्छक्नोति भाषितुम् ।
न चापि निद्रां लभते शयानः श्वासपीडितः ॥ ५ ॥
पार्श्वे तस्यावगृह्णाति शयानस्य समीरणः ।
आसीनो लभते सौख्यमुष्णं चैवाभिकांक्षति ॥ ६ ॥
उच्छ्रिताक्षो ललाटेन स्विद्यता भृशमर्तिमान् ।
विशुष्कास्यो मुहुःश्वासी मुहुश्चैवावधम्यते ॥ ७ ॥
मेघाम्बुशीतप्राग्वातैः श्लेष्मलैश्च विवर्धते ।
स याप्यस्तमकः श्वासः साध्यो वा स्यान्नवोत्थितः ॥८॥

दूषित झालेला वायु जेव्हां वर चढून स्रोतसांचा रोध करून मान व डोकें जखडून धरतो, आणि कफाला वर फेकून पडसें उत्पन्न करतो त्या वेळीं तो वायु कफामुळें कोंडला जाऊन घशाशीं घुरघूर उत्पन्न करतो, आणि प्राणाला कष्टदायक असा तीव्र श्वास उत्पन्न करतो. त्यामुळें रोग्याच्या डोळ्यापुढें अांधेरी येते. तो त्रासतो, मूच्छित होतो. त्याला वरचेवर खोकला येऊन तो मूर्छित होतो. कफ सुटला नाहीं तर त्याला फार पीडा होते, आणि कफ सुटून पडला असतां दोन घटका सुख वाटतें. त्याच्या घशांत कूस गेल्यासारखें होतें. तो मोठ्या कष्टानें बोलतो. श्वासानें पिडल्यामुळें निजलें असतां त्याला झोंप येत नाहीं. निजलें असतां वायु कुशींत शिरून त्याला त्रास देतो. बसलें असतां त्याला बरें वाटतें. उष्ण पदार्थांची इच्छा होते. तो डोळे वर नेतो. त्याच्या

कपाळाला घाम येतो. त्याला फार पीडा होते. त्याच्या तोंडाला कोरड पडते. तो वरचेवर श्वास टाकतो, आणि हत्तीवर बसून चालल्याप्रमाणें वरचेवर डुलतो. ढग आले असतां, गारठ्यानें पूर्वेकडील वाऱ्यानें (ढाशा वाऱ्यानें) आणि कफकारक पदार्थसेवनानें हा श्वास वाढतो. ह्याला तमकश्वास म्हणतात. हा नवीन असला तर साध्य होतो. वास्तविक हा याप्य आहे.

तमकश्वास.

ज्वरमूर्छापरीतस्य विद्यात्प्रतमकं तु तम् ।

तमकश्वासांत ज्वर व मूर्च्छा हे विकार झाले असतां त्याला प्रतमक म्हणावें.

संतमकश्वास.

उदावर्तरजोजीर्णक्लिन्नकायनिरोधजः ॥ १ ॥
तमसा वर्धतेऽत्यर्थं शीतैश्चाऽऽशु प्रशाम्यति ।
मज्जतस्तमसीवास्य विद्यात्संतमकं तु तम् ॥ २ ॥

उदावर्त, धूळ घशांत जाणें, अजीर्ण, शिळें अन्न खाणें, मलमूत्रादिकांचा वेग धारण करणें, तमोगुण वाढल्यामुळें जो श्वास वाढतो, थंड उपचारांनीं कमी होतो आणि रोग्याला अंधारांत पडल्याप्रमाणें वाटतें, त्याला संतमकश्वास असें म्हणतात.

क्षुद्रश्वासाचें लक्षण.

रूक्षायासोद्भवः कोष्ठे क्षुद्रवातमुदीरयेत् ।
क्षुद्रश्वासो न सोऽत्यर्थं दुःखेनाङ्गप्रबाधकः ॥ १ ॥
हिनस्ति न स गात्राणि न च दुःखो यथेतरे ।
न च भोजनपानानां निरुणद्ध्युचितां गतिम् ॥ २ ॥
नेन्द्रियाणां व्यथां चाऽपि कांचिदापादयेद्रुजम् ।
स साध्य उक्तो बलिनः सर्वे चाव्यक्तलक्षणाः ॥ ३ ॥

रूक्ष अन्नपानामुळें किंवा आयासामुळें कोठ्यांत संचित झालेला क्षुद्रवायु वर चढून श्वास उत्पन्न करतो. तो श्वास शरीराला फारशी पीडा देत नाहीं. तो अवयवांस त्रास देत नाहीं व इतर श्वासाप्रमाणें फारशी पीडा देत नाहीं. अन्नपानाचे उचित मार्ग आडवून धरीत नाहीं. कोणत्याही इंद्रियाला व्यथा देत नाहीं व कोणत्याही

प्रकारची पीडा करीत नाहीं. हा क्षुद्रश्वास साध्य आहे आणि इतर श्वास पूर्वरूपांत असून रोगी सशक्त असल्यास साध्य होतात.

साध्यासाध्यत्व.

वाताधिको भवेत्क्षुद्रस्तमकश्च कफाधिकः ।
कफवाताधिकः पित्तसंसर्गाच्छिन्नसंज्ञकः ॥ १ ॥
श्वासो मारुतभूयिष्ठो महानूर्ध्वस्तथा मतः ।
क्षुद्रः साध्यतमस्तेषां तमकः कृच्छ्र उच्यते ।
त्रयः श्वासा न सिध्यन्ति तमको दुर्बलस्य च ॥ २ ॥

क्षुद्रश्वास वाताधिक असतो. तमकश्वास कफाधिक असतो. छिन्नश्वास कफवाताधिक असून त्यांत पित्ताचा संसर्ग असतो. महाश्वास व ऊर्ध्वश्वास वाताधिक असतात. त्यांत क्षुद्रश्वास साध्य आहे. तमकश्वास कष्टसाध्य आहे. बाकीचे तीन श्वास साध्य होत नाहींत. तसाच दुर्बल मनुष्याचा तमकश्वासही साध्य होत नाहीं.

कामं प्राणहरा रोगा बहवो न तु ते तथा ।
यथा श्वासश्च हिक्का च हरतः प्राणमाशु वै ॥ ३ ॥

खरोखर प्राण हरण करणारे सन्निपातादि पुष्कळ रोग आहेत, तथापि श्वास व उचकी ह्यांइतके लवकर प्राणहरण करणारे रोग कोणतेच नाहींत.

श्वासचिकित्सा.

स्नेहबस्तिमृते केचिदूर्ध्वं चाधश्च शोधनम् ।
मृदु प्रणयतां श्रेष्ठं श्वासिनामादिशन्ति हि ॥ १ ॥
सर्वेषु श्वासरोगेषु वातश्लेष्मानिबर्हणम् ।
विदधीत विधिं विद्वानादौ स्वेदं मृदुं तथा ॥ २ ॥

ज्यांचा श्वास अल्पस्वरूपांत आहे, अशा श्वासाच्या रोग्याला स्नेहबस्ति खेरीज करून इतर बस्ति व मृदु असे वमनविरेचन देऊन शोधन करणें उत्तम, असें कित्येक म्हणतात. सर्व श्वासविकारांमध्यें वातकफनाशक क्रिया करावी. त्याचप्रमाणें मृदु स्वेदनही करावें.

क्काथ.

कुलत्थनागरव्याघ्रीवासाभिः क्वथितं जलम् ।
पीतं पौष्करसंयुक्तं श्वासकासनिवारणम् ॥ १ ॥

हुलगे, सुंठ, रिंगणमूळ व आडुळसा, ह्यांचा काढा पोखरमूळाचें चूर्ण घालून प्यावा. तो श्वासकासनाशक आहे.

दशमूलीकृतः क्वाथः पौष्करेणावचूर्णितः ।
श्वासकासप्रशमनः पार्श्वशूलनिवारणः ॥ २ ॥

दशमूळाचा काढा पोखरमूळाचें चूर्ण घालून घ्यावा; तो श्वासकास व कुशींतील शूल ह्यांचा नाश करतो.

देवदारुवचाव्याघ्रीविश्वकट्फलपौष्करैः ।
कृतः क्वाथो जयत्याशु श्वासकासानशेषतः ॥ ३ ॥

देवदार, वेखंड, रिंगणमूळ, सुंठ, कायफळ व पोखरमूळ ह्यांचा काढा सर्व प्रकारच्या श्वासकासांचा नाश करतो.

सिंहीनिशासिंहमुखीगुडूचीविश्वोपकुल्याभृगुजाघनानाम् ।
कृष्णामरीचैर्मिलितः कषायः श्वासाटवीदाहपयोद एषः ॥ ४ ॥

डोरलीमूळ, हळद, आडुळसा, गुळवेल, सुंठ, पिंपळी, भारंगमूळ, नागरमोथे, गजपिंपळी व मिरें ह्यांचा काढा श्वासरूप दावानलाला मेघाप्रमाणें विझवून टाकणारा (नाश करणारा) आहे.

वासाहरिद्राधनिकागुडूचीभार्गीकणानागररिङ्गणीनाम् ।
क्वाथेन मारीचरजोन्वितेन श्वासः शमं याति न कस्य पुंसः ॥५॥

अडुळसा, हळद, धने, गुळवेल, भारंगमूळ, पिंपळी, सुंठ, रिंगणमूळ, ह्यांचा काढा मिऱ्याची पूड घालून घेतला असतां कोणाचा श्वास शमन होत नाहीं ?

अयि प्राणप्रिये जातीफललोहितलोचने ।
भार्गीनागरयोः क्वाथं श्वासत्राणाय पाययेत् ॥ ६ ॥

कोणी विलासी पुरुष (लोलिंबराज) आपल्या प्रिय पत्नीला म्हणतो, हे प्राणप्रिये! श्वासापासून मुक्त होण्याकरितां भारंगमूळ व व सुंठ यांचा काढा प्यावयास द्यावा.

द्राक्षामृतानागरमुष्णतोयं कृष्णाविपाकं बहुरोगनिघ्नम् ।
श्वासं च शूलं कसनं च मान्द्यं जीर्णज्वरं चैव जयेच्च तृष्णाम् ॥

मनुका, गुळवेल, सुंठ ह्यांचा काढा पिंपळीचें चूर्ण घालून द्यावा. तो पुष्कळ रोगनाशक आहे. तो श्वास, शूल, खोकला, अग्निमांद्य, जीर्णज्वर व तहान ह्यांचा नाश करतो.

चूर्णें.

कूष्माण्डकशिफाचूर्णं पीतं कोष्णेन वारिणा ।
शीघ्रं शमयति श्वासं कासं चैव सुदारुणम् ॥ १ ॥

कोहळ्याच्या मूळांचें चर्ण ऊन पाण्याशीं द्यावें. तें भयंकर श्वासकासाचा त्वरित नाश करितें.

शृङ्गीकटुत्रयफलत्रयकण्टकारी-
भार्गीसपुष्करजटालवणानि पञ्च ।
चूर्णं पिबेदशिशिरेण जलेन हिक्का
श्वासोर्ध्ववातकसनारुचिपीनसेषु ॥ २ ॥

काकडशिंगी, सुंठ, मिरीं, पिंपळी, हिरडा, बेहडा, आवळकाठी, रिंगणमूळ, भारंगमूळ, पोखरमूळ आणि पंचलवणें (सैंधव, पादेलोण, मीठ, बिडलोण, सांबरलोण) ह्यांचें चूर्ण ऊन पाण्याशीं द्यावें. तें उचकी, श्वास, उर्ध्ववात, अरुचि व पीनस ह्यांवर द्यावें.

शठीभार्गीवचाव्योषपथ्यारुचककट्फलम् ।
तेजोह्वा पौष्करं शृङ्गी सक्षौद्रं श्वासकासनुत् ॥ ३ ॥

कचोरा, भारंगमूळ, वेखंड, सुंठ, मिरीं, पिंपळी, हिरडा, पादेलोण, कायफळ, तेजपत्र, पोखरमूळ व काकडशिंगी ह्यांचें चूर्ण मधाशीं द्यावें. तें श्वास व खोकला ह्यांचा नाश करितें.

गुडोषणनिशारास्नाद्राक्षामागधिकाः समाः ।
तैलेन चूर्णिता लीढास्तन्निश्वासनुदः स्मृताः ॥ ४ ॥

गूळ, मिरीं, हळद, रास्ना, मनुका व पिंपळी ह्यांचें चूर्ण करून शिरसेलाशीं चाटावें. तें तीव्र श्वासाचा नाश करितें.

शुण्ठीकणामरिचनागदलत्वगेलं
चूर्णीकृतं क्रमविवर्धितमूर्ध्वमन्त्यात् ।
खादेदिदं समसितं गुदजाग्निमान्द्य-
गुल्मारुचिश्वसनकण्ठहृदामयेषु ॥ ५ ॥

सुंठ, पिंपळी, मिरें, नागदवण, दालचिनी व वेलदोडे हीं औषधें शेवटाकडून क्रमवृद्धीनें घेऊन चूर्ण करून तें साखरेशीं द्यावें. हें मूळव्याध, अग्निमांद्य, गुल्म, अरुचि, श्वास, गलरोग व हृद्रोग ह्यांजवर द्यावें.

मर्कटीनां तु बीजानां चूर्णं माक्षिकसर्पिषा ।

प्रलिह्यात्प्रातरुत्थाय श्वासार्तः स्वास्थ्यमाप्नुयात् ॥ ६ ॥
कवचबीजाचें चूर्ण मध व तुपाशीं प्रातःकाळीं चाटावें; म्हणजे श्वासाच्या रोग्याला स्वस्थपणा मिळतो.

अवलेह.

गुडं कटुकतैलेन मिश्रयित्वा समं लिहेत् ।
त्रिःसप्ताहप्रयोगेण श्वासो निःशेषतां व्रजेत् ॥ १ ॥
शिरसेलाशीं गूळ चाटावा. हा प्रयोग एकवीस दिवस केला असतां श्वास निःशेष बरा होतो.

हरिद्रा मरिचं द्राक्षा गुडो रास्ना कणा सटी ।
कटुतैले लिहन्हन्याच्छ्वासान्प्राणहरानपि ॥ २ ॥
हळद, मिरें, मनुका, गूळ, रास्ना, पिंपळी, कचोरा, ह्यांचें चूर्ण कटुतेलाशीं (मोहरीच्या किंवा शिरसाच्या तेलाशीं) चाटावें, म्हणजे प्राणहारक अशा श्वासाचेंही निवारण होतें.

भार्गीनागरयोश्चूर्णं लीढमार्द्रकवारिणा ।
श्वासं निहंति दुर्धर्षं पञ्चानन इव द्विपम् ॥ ३ ॥
भारंगमूळ व सुंठ ह्यांचें चूर्ण आल्याच्या रसाशीं चाटावें. तें सिंह जसा हत्तीचा नाश करितो, त्याप्रमाणें दुर्धर श्वासाचा नाश करितें.

क्षुद्रावलेह.

व्याघ्रीशतं स्यादभयाशतं च द्रोणे जलस्य प्रपचेत्कषायम् ।
तुलाप्रमाणेन गुडेन युक्तं पक्त्वाऽभयाभिः सह ताभिरत्र ॥ ४ ॥
शीते क्षिपेत्षण्मधुनः पलानि पलानि च त्रीणि कटुत्रयस्य ।
त्वक्पत्रकैलाकरिकेसराणां चूर्णात्पलं चेति विदेहदृष्टः ॥ ५ ॥
क्षुद्रावलेहः कफजान्विकारान्सश्वासशोफानपि पञ्च कासान् ।
हिक्कामुरोरोगमपस्मृतिं च हत्वा विवृद्धिं कुरुतेऽनलस्य ॥ ६ ॥
चारशें तोळे रिंगणी व चारशें तोळे हिरडे ह्यांचा वीसशें अठ्ठेचाळीस तोळे पाण्यांत काढा करावा. नंतर त्यांत चारशें तोळे गूळ व काढ्यांत शिजविलेले हिरडे घालून लेह करावा. तो थंड झाल्यावर त्यांत चोवीस तोळे मध; सुंठ, मिरीं, पिंपळी ह्यांचें चूर्ण बारा तोळे; दालचिनी, तमालपत्र, नाकेशर व वेलदोडे ह्यांचें चूर्ण

चार तोळे घालून तो ठेवावा. "विदेह" नामक ग्रंथांत पाहिलेला हा क्षुद्रावलेह कफजन्य विकार, श्वास, पांच प्रकारचा खोकला, सूज, उचकी, हृद्रोग व अपस्मार, ह्यांचा नाश करून जठराग्नीला वाढवितो.

भार्ङ्गीहरीतक्यवलेह.

भार्गीजटापलशतं सलिलार्मणेन
युक्तपञ्चमूलतुलया सहितं विपाच्य ।
पादस्थिते तु शतमत्र हरीतकीनां
पक्त्व्यमुज्ज्वलगुडस्य शतेन साकम् ॥ ७ ॥
उत्तार्य तत्र शिशिरे मधुनः पलानि
चत्वारि च द्विगुणितानि फलत्रयं च ।
व्योषं त्रुटीत्वगिभकेसरपत्रकाणा-
मेषां पलं खलु निधेयमथोपयोज्यम् ॥ ८ ॥
श्वासं च कासमपि शोषमथातिहिक्का-
मैकाहिकं ज्वरमथोत्कफपीनसं च ।
हन्याद्रसायनमिदं हि पुरंदरस्य
प्रोक्तं सहस्रकरपुत्रभिषग्वराभ्याम् ॥ ९ ॥

भारंगमूळ, चारशें तोळे, पंचमुळें चारशें तोळे, ह्यांचा दहाशें चोवीस तोळे पाण्यांत चतुर्थांश काढा करावा. नंतर त्या काढ्यांत शंभर तोळे हिरडे, व चारशें तोळे गूळ घालून लेह करावा. उतरून थंड झाल्यावर त्यांत सोळा तोळे मध व बत्तीस तोळे त्रिफळ्याचें चूर्ण घालावें. आणि सुंठ, मिरें, पिंपळी, ह्यांचें चूर्ण चार तोळे; वेलची, दालचिनी, नाकेशर व तमालपत्र, ह्यांचें चूर्ण चार तोळे आणि पिंपळीचें चूर्ण चार तोळे घालून ठेवावें. हें रसायन श्वास, खोकला, क्षय, उचकी, एकाहिक ज्वर, वाढलेला पीनस रोग ह्यांचा नाश करितें. तें अश्विनीकुमारांनीं इंद्राला सांगितलें.

पक्त्वा पंच तुला गुडामलशिखिच्छिन्नादशांघ्र्यम्भसा
पथ्यापात्रवतीकृता शिखिशिवाव्योषाच्चतुर्जातकात् ।
क्षौद्राच्च त्रिफलाञलीद्विकुडवैः क्षाराच्च युक्त्या युतः
शोफार्शः क्षयकुष्ठपीनसकृमिश्वासान्नगुल्मान्तकृत् ॥ १० ॥

गूळ, आवळकाठी, चित्रकमूळ, गुळवेल, दशमुळें, हीं प्रत्येक

औषधें चारशें तोळे; हिरडे दहाशें चोवीस तोळे ह्यांचा (चौपट) पाण्यांत चतुर्थांश काढा करून तो काढा गाळून घेऊन त्यांत पुनः चित्रकमूळ, आवळकाठी, सुंठ, मिरीं, पिंपळी, दालचिनी, तमालपत्र, वेलदोडे, नाकेशर, ह्यांचें चूर्ण बत्तीस बत्तीस तोळे; मध बत्तीस तोळे; जवखार बत्तीस तोळे; व त्रिफळा सोळा तोळे घालून लेह तयार करावा. आणि दोन तोळे याप्रमाणें सेवन करावा. म्हणजे सूज, मूळव्याध, क्षय, कुष्ट, पीनस, कृमि, श्वास, अंत्रवृद्धि, व गुल्म ह्यांचा नाश होतो.

द्राक्षां हरीतकीं मुस्तां कर्कटाख्यां दुरालभाम् ।
सर्पिर्मधुभ्यां विलिहञ् श्वासान्हन्ति सुदारुणान् ॥११॥
प्रलिह्यान्मधुसर्पिर्भ्यां भार्गीमधुकसंयुताम् ।
पथ्यां तिक्ताकणाव्योषयुक्तां वा श्वासनाशिनीम् ॥ १२ ॥
गुडदाडिममृद्वीकापिप्पलीविश्वभेषजैः ।
मातुलुङ्गरसं क्षौद्रं लीढं श्वासनिबर्हणम् ॥ १३ ॥

मनुका, हिरडेदळ, नागरमोथे, काकडशिंगी व धमासा, ह्यांचें चूर्ण तूप-मधाशीं चाटावें. तें दारुण अशा श्वासाचा नाश करितें. जेष्ठमध व भारंगमूळ ह्यांचें चूर्ण तूप व मध यांशीं चाटावें; किंवा हिरड्याचें चूर्ण, कुटकी, गजपिंपळी व त्रिकटु (सुंठ, मिरें, पिंपळी) ह्यांच्या चूर्णाशीं मिसळून तूप-मधाशीं द्यावें. तें श्वासाचा नाश करितें. गूळ, डाळिंब, मनुका, पिंपळी, सुंठ, महाळुंगाचा रस व मध हे पदार्थ एकत्र करून चाटावें म्हणजे श्वासाचा नाश होतो.

श्वासकुठार.

रसो गन्धो विषं चैव टङ्कणं च मनःशिला ।
एतानि टङ्कमात्राणि मरिचं चाष्टटंककम् ॥ १ ॥
एकैकं मरिचं दत्त्वा खल्वे सूक्ष्मं विमर्दयेत् ।
त्रिकटु टङ्कमात्रं च दत्त्वा पश्चाद्विचूर्णयेत् ॥ २ ॥
सर्वमेकत्र संयोज्य काचकूप्यां विनिक्षिपेत् ।
कासे श्वासे च मन्दाग्नौ वातश्लेष्मामयेषु च ॥ ३ ॥
गुञ्जामात्रं प्रदातव्यं पर्णखण्डेन धीमता ।
संनिपाते च मूर्छायामपस्मारे तथा पुनः ॥ ४ ॥
अतिमोहत्वमापन्ने नस्यं दत्त्वा विचक्षणः ।

रसः श्वासकुठारोऽयं सर्वश्वासविकारहा ॥ ५ ॥

पारा, गंधक, बचनाग, टाकणखार व मनशीळ हीं सर्व सम-भाग, आणि मिरीं आठ भाग, मिऱ्यांखेरीज सर्व जिनसांचा बारीक खल करून एक एक मिऱ्याचा दाणा घालून सूक्ष्म खल करावा. नंतर तीन मासे त्रिकटूचें चूर्ण घालून पुनः खल करावा; आणि काचेच्या कुपींत भरून ठेवावा; आणि खोकला, श्वास, अग्निमांद्य, वातकफजन्य विकार ह्यांजवर हा एक गुंजभर विड्याचा पानाशीं द्यावा. आणि सन्निपात, मूर्च्छा, अपस्मार, अतिमोह झाला असतां ह्याचें नस्य द्यावें. हा श्वासकुठाररस सर्व श्वासविकारांचा नाशक आहे.

पथ्यापथ्य.

विरेचनस्वेदनधूमपानप्रच्छर्दनानि स्वपनं दिवा च ।
पुरातनाः षष्टिकरक्तशालिकुलत्थगोधूमयवाः प्रशस्ताः ॥१॥
शशाहिभुक्तित्तिरलावदक्षशुकादयो धन्वमृगा द्विजाश्च ।
पुरातनं सर्पिरजाप्रभूतं पयो घृतं चापि सुरा मधूनि ॥ २ ॥
पटोलवार्ताकरसोनबिम्बीजम्बरितण्डुलियवास्तुकं च ।
द्राक्षा त्रुटिः पौष्करमुष्णवारि निदिग्धिका श्वासिनि पथ्यवर्गः॥३

रेचक, स्वेदन, धूम्रपान, ओकारी, दिवसा झोंप घेणें, जुनी साठी साळ किंवा तामसाळ, हुलगे, गहू, सातू, हीं धान्यें प्रशस्त आहेत. ससा, मोर, तित्तिरपक्षी, लावा, कोंबडा, पोपट, जांगल-देशांतील मृग व पक्षी, जुनें तूप, शेळीचें दूध व तूप, मद्य, मध, पडवळ, वांगीं, लसूण, तोंडलीं, जंबर लिंबू (झांबरें), तांदुळजा, चंदनबटवा, द्राक्षें, वेलची, पोखरमूळ, ऊन पाणी व रिंगणी हा श्वासरोग्याला पथ्यवर्ग सांगितला.

रक्तस्रावः पूर्ववातान्नपानं मेषीसर्पिर्दुग्धमम्भोऽपि दुष्टम् ।
मत्स्याः कन्दाः सर्षपाश्चान्नपानं रूक्षं शीतं गुर्वपि श्वासिवर्ज्यम् ४

रक्तस्राव, पूर्वेकडील वारा व अन्नपान, मेंढीचें दूध व तूप, दूषित पाणी, मासे, कंद, शिरस (मोहऱ्या), रूक्ष, जड व थंड अशा प्रकारचें अन्नपान हें श्वासरोग्यानें वर्ज करावें.

स्वरभेदनिदान.

अत्युच्चभाषणविषाध्ययनाभिघात-
संदूषणैः प्रकुपिताः पवनादयश्च ।
स्रोतस्सु ते स्वरवहेषु गताः प्रतिष्ठां
हन्युः स्वरं भवति चापि हि षड्विधः सः ॥ १ ॥

मोठमोठ्यानें भाषण करणें, विष भक्षण करणें, मोठ्यानें घोकून अभ्यास करणें, गळ्यावर कांहीं आघात होणें, इत्यादि कारणांनीं व दूषित आहारादिकानीं प्रकुपित झालेले वातादि दोष स्वरवाहक स्रोतसांमध्यें शिरल्यामुळें स्वरभेद उत्पन्न करितात. तो सहा प्रकारचा आहे.

वातिक स्वरभेद.

वातेन कृष्णनयनाननमूत्रवर्चा भिन्नं शनैर्वदति गर्दभवत्खरं च १

वातजन्य स्वरभेदामध्यें डोळे, तोंड, मळ व मूत्र हीं कृष्णवर्ण होतात. रोगी सावकाश बोलतो, आणी स्वर गाढवाच्या स्वराप्रमाणें कर्कश असतो.

पैत्तिक स्वरभेद.

पित्तेन पीतनयनाननमूत्रवर्चा ब्रूयाद्गलेन स विदाहसमन्वितेन १

पित्तजन्य स्वरभेदामध्यें डोळे, तोंड, मल व मूत्र हीं पिवळीं होतात आणि बोलतांना घशांत दाह होतो.

कफज स्वरभेद.

ब्रूयात्कफेन सततं कफरुद्धकण्ठः
स्वल्पं शनैर्वदति चापि दिवा विशेषात् ॥ १ ॥

कफज स्वरभेदामध्यें बोलतांना घसा चोंदल्यासारखा होतो. विशेषतः रोगी दिवसा हळुहळू व थोडें बोलतो. अर्थात् त्याला रात्रीं दिवसाइतकेंही बोलतां येत नाहीं.

सन्निपातिक स्वरभेद.

सर्वात्मके भवति सर्वविकारसंप-
त्तं चाप्यसाध्यमृषयः स्वरभेदमाहुः ॥ १ ॥

त्रिदोषजन्य स्वरभेदामध्यें तिन्हीही दोषांचीं लक्षणें होतात. हा सर्व भेद असाध्य आहे असें ऋषि म्हणतात.

क्षयजन्य स्वरभेद.

धूम्येत वाक् क्षयकृते क्षगमाप्नुयाच्च
वागेष चापि हतवाक् परिवर्जनीयः ॥ १ ॥

क्षयजन्य स्वरभेदामध्यें बोलतांना घशांतून धूर निघाल्याप्रमाणें वाटतें. स्वर क्षीण होतो. ह्या सर्व स्वरभेदांमध्यें ज्याची वाचा बंद झाली आहे तो रोगी असाध्य म्हणून सोडावा.

मेदोजन्य स्वरभेद.

अन्तर्गतस्वरमलक्ष्यपदं चिरेण
मेदोऽन्वयाद्वदति दिग्धगलस्तृषार्तः ॥ १ ॥

मेदापासून होणाऱ्या स्वरभेदामध्यें रोगी घशांतल्या घशांत बोलतो. मेदमिश्र कफानें गळा लेपटल्यामुळें त्याचा शब्द बाहेर पडत नाहीं. त्याला तहानही फार लागते.

असाध्य लक्षण.

क्षीणस्य वृद्धस्य कृशस्य चापि चिरोत्थितो यश्च सहोपजातः ।
मेदस्विनः सर्वसमुद्भवश्च स्वरामयो यो न स सिद्धिमेति ॥ १ ॥

क्षीण, वृद्ध व कृश मनुष्याचा फार दिवसांचा स्वरभेद, जन्मापासून असलेला स्वरभेद, मेदामुळें झालेला स्वरभेद व त्रिदोषजन्य स्वरभेद हे असाध्य आहेत.

वातस्वरभेद.

स्वरोपघातेऽनिलजे भुक्तोपरि घृतं पिबेत् ।
मरीचचूर्णसहितं मरुत्स्वरहतिप्रणुत् ॥ १ ॥

वातजन्य स्वरभेदावर जेवल्यावर मिरपूड घालून तूप प्यावें; म्हणजे वातजन्य स्वरभेद दूर होतो.

कासमर्दरसं दत्त्वा भार्गीकल्कं शनैः शनैः ।
सिद्धं सर्पिर्हितं पीतं स्वरभेदे मरुद्भवे ॥ २ ॥

वातजन्य स्वरभेदामध्यें कासविंद्याचा रस व भारंगमूळाचा कल्क घालून सावकाशपणें मंदाग्नीनें तूप पचन करावें. तें वातजन्य स्वरभेदाचा नाश करितें.

आद्य कोष्णजलं पेयं जग्ध्वा घृतगुडौदनम् ।
पीतं घृतं हन्त्यनिलं सिद्धं मार्कवजे रसे ॥ १ ॥

वातजन्य स्वरभेदामध्यें तूप-गुळाशीं भात खाऊन त्याजवर ऊन पाणी प्यावें. माक्याच्या रसांत सिद्ध केलेलें तूप वातजन्य स्वरभेदाचा नाश करितें.

ब्राह्मीमुंडीवचाशुंठीपिप्पली मधुसंयुता ।
सेविता सप्तरात्रेण जायते किंकिणीध्वनिः ॥२॥

ब्राह्मी, गोरखमुंडी, वेखंड, सुंठ व पिंपळी ह्यांचें चूर्ण मधाशीं घ्यावें, म्हणजे सात दिवसांमध्यें पैंजणाच्या मंजुळ आवाजाप्रमाणें मंजुळ स्वर होतो.

पित्तस्वरभेद.

पैत्तिके तु विरेकः स्यात्पयश्च मधुरैः शृतम् ।
लिह्यान्मधुरवस्तूनां चूर्णं मधुसमन्वितम् ॥ १ ॥
अश्नीयाच्च ससर्पिष्कं यष्टीमधुकषायकम् ।
शर्करामधुमिश्राणि शृतानि मधुरैः सह ॥ २ ॥
पिबेत्पयांसि यस्योच्चैर्वदतोऽभिहतः स्वरः ।
शतावरीचूर्णयोगं बलाचूर्णमथापि वा ।
लाजाशतावरीचूर्णं लिह्यान्मधुसमायुतम् ॥ ३ ॥

पित्तजन्य स्वरभेदावर प्रथम रेचक द्यावें, आणि मधुर औषधांनीं सिद्ध केलेलें दूध द्यावें. मधुर औषधांचें चूर्ण मधाशीं चाटावें. जेष्ठमधाचा काढा तूप घालून घ्यावा. फार मोठ्यानें बोलल्यामुळें ज्यांचा घसा बसला आहे, त्यांनीं मधुर औषधांनीं सिद्ध केलेलें दूध साखर व मध घालून घ्यावें. दिवसमावळीच्या मुळाचें चूर्ण किंवा चिकण्याच्या मुळाचें चूर्ण अगर लाह्या व शतावरीच्या मुळ्या ह्यांचें चूर्ण मधाशीं चाटावें.

शुंठीघृत.

शुण्ठी त्वचो दुग्धवतां द्रुमाणां संपिष्य दुग्धे विपचेत्तु तेन ।
कल्केन यष्टीमधुकस्य सर्पिः सशर्करं पित्तरुजामयघ्नम् ॥ १ ॥

सुंठ, क्षीरि वृक्षाच्या (वड, उंबर, पिंपळ वगैरेंच्या) साली व जेष्ठमध दुधांत वाटून त्यानें तूप तयार करावें, व तें साखर घालून घ्यावें. तें पित्तविकाराचा नाश करितें.

कफस्वरभेद.

पिप्पली पिप्पलीमूलं मरीचं विश्वभेषजम् ।
पिबेन्मूत्रेण मतिमान्कफजे स्वरसंक्षये ॥ १ ॥

पिंपळी, पिंपळमूळ, मिरें, सुंठ, ह्यांचें चूर्ण कफजन्य स्वरभेदावर गोमूत्राशीं घ्यावें.

सन्निपातस्वरभेद.

अजमोदा निशा धात्री क्षारं वह्निं विचूर्णयेत् ।
मधुसर्पिर्युतं लीढ्वा त्रिदोषस्वरभङ्गनुत् ॥ १ ॥

अजमोदा, हळद, आवळकाठी, जवखार व चित्रक ह्यांचें चूर्ण करून तूप—मधाशीं घ्यावें, म्हणजे त्रिदोषजन्य स्वरभेदाचा नाश होतो.

फलत्रिकत्र्यूषणयावशूकच्चूर्णानि हन्युः स्वरभङ्गमाशु ।
किंवा कुलत्थं वदनान्तरस्थं स्वरामयं हन्त्यथ पौष्करं वा ॥२॥

त्रिफळा, त्रिकटु, जवखार ह्यांचीं चूर्णे स्वरभंगाचा त्वरित नाश करितात. तांबडे हुलगे किंवा पोखरमूळ तोंडांत धरावें; तें स्वरभंगाचा नाश करितें.

क्षयज स्वरभंग.

क्षयजे स्वरभेदे तु तत्रोक्तविधिमाचरेत् ।

क्षयजन्य स्वरभेदांमध्यें क्षयचिकित्साप्रकरणांत सांगितलेले उपचार करावे.

कटुतिक्तकषायाद्यैर्मेदःस्वरहार्तिं जयेत् ॥ १ ॥

मेदोजन्य स्वरभंग तिखट कडू व तुरट अशा उपचारांनीं जिंकावा.

सामान्य विधि.

चव्याम्लवेतसकटुत्रयतित्तिडीक-
तालीसजीरकतुगादहनैः समांशैः ।
चूर्णं गुडप्रमृदितं त्रिसुगन्धयुक्तं
वैस्वर्यपीनसकफारुचिषु प्रशस्तम् ॥ १ ॥

चवक, आम्लवेतस, त्रिकटु, चिंच, तालीसपत्र, जिरें, वंशलोचन व चित्रकमूळ ह्यांचें समभाग चूर्ण करून गुळांत मळून दालचिनी, तमालपत्र, वेलची ह्यांचें चूर्ण वासापुरतें मिळवून घ्यावें. हें स्वरभंग, पीनस, कफ व अरुचि ह्यांजवर प्रशस्त आहे.

व्याघ्रीघृत.

व्याघ्रीस्वरसविपक्कं रास्नावाट्यालगोक्षुरव्योषैः ।
सर्पिः स्वरोपघातं हन्यात्कासं च पञ्चविधम् ॥ १ ॥

रिंगणीचा स्वरस आणि रास्ना, पोखरमूळ, सराटे, सुंठ, मिरें व पिंपळी ह्यांचा कल्क घालून तयार केलेलें तूप पांच प्रकारचे खोकले व स्वरभेद ह्यांचा नाश करितें.

बदरीपत्रकल्कं वा घृतभृष्टं ससैन्धवम् ।
स्वरोपघाते कासे च लेहमेनं प्रयोजयेत् ॥ १ ॥

अथवा बोरीच्या पानाचा कल्क तुपांत तळून सैंधवाशीं खावा; हा प्रयोग स्वरभंग व खोकला ह्यांजवर योजावा.

विहितमसृणचूर्णान्यारनालेन सार्धं
कलितरुफलकृष्णासैन्धवानि प्रलिह्यात् ।
अभिलषति विजेतुं यः स्वरस्य प्रणाशं
स हि पिबतु सदुग्धं चाऽऽमलक्याः फलं वा ॥१॥

बेहडेदळ, पिंपळी व सैंधव ह्यांचें चूर्ण वस्त्रगाळ करून तें कांजींतून प्यावें; किंवा ज्याला स्वरभंग जिंकण्याची इच्छा आहे त्यानें दुधाशीं आवळकाठीचें चूर्ण घ्यावें.

वाते सलवणं तैलं पित्ते सर्पिः समाक्षिकम् ।
कफे सक्षारकटुकं क्षौद्रं केवलमिष्यते ॥ १ ॥
गले तालुनि जिह्वायां दन्तमूलेषु चाऽऽश्रितः ।
तेन निष्क्रमते श्लेष्मा स्वरश्चाऽऽशु प्रसीदति ॥ २ ॥
तैलाक्तं स्वरभेदे वा खादिरं धारयेन्मुखे ।
पथ्यापिप्पलियुक्तं वा संयुक्तं नागरेण वा ॥ ३ ॥

वातजन्य स्वरभेदामध्यें मीठ मिश्र करून तेल द्यावें. पित्तावर तूप मधासह द्यावें. आणि कफजन्य स्वरभेदामध्यें क्षार व तिखट पदार्थ किंवा केवळ मध द्यावा. त्या योगानें गळा, टाळा, जीभ व दांताच्या मूळाच्या ठिकाणीं असलेला कफ निघून जाऊन स्वर साफ होतो. किंवा स्वरभेदावर कात तेलांत खलून तोंडांत धरावा. अगर हिरडे व पिंपळी ह्यांच्या चूर्णाबरोबर अथवा सुंठीबरोबरही कात तोंडांत धरावा.

गोरक्षवटी.

रसभस्मार्कलोहस्य भावितस्य त्रिसप्तधा ।
क्षुद्राफलरसैर्मुद्गतुल्या कार्या वटी शुभा ॥ १ ॥
मुखस्था हरते सर्वं स्वरभङ्गमसंशयम् ।
गोरक्षनाथैर्गदिता स्वरामयिकृपालुभिः ॥ २ ॥

पारदभस्म, ताम्रभस्म व लोहभस्म हीं समभाग घेऊन रिंगणीच्या फळाच्या रसाच्या त्याला एकवीस भावना द्याव्या आणि मुगाएवढी गोळी करावी. ती तोंडांत धरावी. ही सर्व प्रकारच्या स्वरभंगाचा नाश करिते. स्वरभेदाच्या रोग्यावर कृपा करून श्रीगोरक्षनाथानें ही गुटिका सांगितली आहे.

पथ्य.

द्राक्षा पथ्या मातुलुङ्गं लशुनं लवणार्द्रकम् ।
ताम्बूलं मरिचं सर्पिः पथ्यानि स्वरभेदिनाम् ॥ १ ॥

द्राक्षें, हिरडेदळ, महाळुंग, लसूण, मीठ, आलें, विडा, मिरीं, व तूप हे पदार्थ स्वरभेदावर पथ्यकारक आहेत.

अरोचकनिदान.

पृथग्दोषैः समस्तैर्वा तथाऽप्यागन्तवो हि ये ।
भवन्त्यरोचकाः पञ्च तेषां लक्षणमुच्यते ॥ १ ॥

वातादि दोषांनीं वेगवेगळे तीन, सर्व दोषांपासून एक व आगंतुक एक असा अरोचक रोग पांच प्रकारचा आहे. त्याचें आतां लक्षण सांगतों.

वातिक अरोचकलक्षण.

वातादिभिः शोकभयातिलोभक्रोधैर्मनोघ्नाशनरूपगन्धैः ।
अरोचकाः स्युः परिहृष्टदन्तः कषायवक्त्रश्च मतोऽनिलेन ॥१॥

वातादि दोषांनीं, तसेंच शोक, भय, अतिलोभ, क्रोध, मनाला न आवडणारे पदार्थ, रूप व वास इत्यादि कारणांनीं अरोचक रोग (बेचव) उत्पन्न होतो. त्यांत वातजन्य अरुचीमध्यें दांत शिवशिवणें व तोंडास तुरटपणा हे विकार होतात.

पित्तज अरोचकलक्षण.

कट्वम्लमुष्णं विरसं च पूति पित्तेन विद्याल्लवणं च वक्त्रम् ॥ १

पित्तजन्य अरुचीमुळें तोंड कडू, आंबट, उष्ण, बेचव, दुर्गंधयुक्त व खारट होतें.

कफज अरोचकलक्षण.

माधुर्यपैच्छिल्यगुरुत्वशैत्यस्निग्धत्वदौर्गन्ध्ययुतं कफेन ॥

कफजन्य अरुचीमुळें तोंड मधुर, बुळबुळीत, जड, गार, बांधल्याप्रमाणें व आंतून कफानें लेपटल्याप्रमाणें होतें.

आगंतुक व त्रिदोषज अरोचकलक्षण.

अरोचके शोकभयातिलोभक्रोधाद्यहृद्याशुचिगन्धजे स्यात् ॥
स्वाभाविकं चाऽऽस्यमथारुचिश्च त्रिदोषजेऽनेकरसं भवेत्तु ॥ १

शोक, भय, अतिलोभ, राग, मनाला न आवडणारे घाणेरडे व दुर्गंधी पदार्थ अशा कारणांनीं येणाऱ्या अरुचीमध्यें तोंड स्वाभाविक आहे तसेंच असतें, पण तोंडाला चव मात्र नसते.

विकृति.

हृच्छूलपीडनयुतं पवनेन पित्ता-
तृड्दाहचोषबहुलं सकफप्रसेकम् ।
श्लेष्मात्मकं बहुरुजं बहुभिश्च विद्या-
द्वैगुण्यमोहजडताभिरथापरं च ॥ १ ॥

अरोचक व्याधीमध्यें वातानें हृदयांत शूळ होतो. पित्तानें दाह, तहान व जिभेला ओढल्याप्रमाणें वाटतें. कफानें तोंडांतून कफ पडतो. त्रिदोषामध्यें पीडा फार होते आणि बाकीच्या सर्व अरोचकांमध्यें मनाला व्याकुळता, ग्लानि व जडत्व हे विकार होतात.

प्रतिक्षिप्तं मुखे चान्नं जन्तुर्नाऽऽस्वादते मुहुः ।
अरोचकः स विज्ञेयो भक्तद्वेषमतः शृणु ॥ २ ॥

पोटांत भूक असूनही तोंडांत घातलेलें अन्न खाववत नाहीं, त्याला अरुचि म्हणतात. आतां भक्तद्वेष म्हणजे काय तें सांगतों, ऐक.

चिन्तयित्वा तु मनसा दृष्ट्वा श्रुत्वा तु भोजनम् ।
द्वेषमायाति यो जन्तुर्भक्तद्वेषः स उच्यते ॥ ३ ॥

अन्नाची गोष्ट मनांत आणिली असतां, अन्न दृष्टीपुढें आणिलें असतां किंवा अन्नाची गोष्ट ऐकिली असतां देखील अन्नाचा तिटकाराच येतो, त्याला भक्तद्वेष किंवा अन्नद्वेष म्हणतात.

अरोचकचिकित्सा.

बस्तिः समीरणे पित्ते विरेको वमनं कफे ।
सर्वजे सर्वकामार्थं हर्षणं स्यादरोचके ॥ १ ॥
अरुचौ कवलग्राहो धूमः सुमुखधावनः ।
मनोज्ञमन्नपानं वा हर्षणाश्वासनानि च ॥ २ ॥
सात्म्यान्स्वदेशरचितान्विविधांश्च भक्ष्यान्
पानानि मूलफलखाण्डवरागलेहान् ।
सेवेद्रसांश्च विविधान्विविधैः प्रयोगै-
र्भुञ्जीत चापि लघुरूक्षमनःसुखानि ॥ ३ ॥

वातजन्य अरोचकावर बस्ति द्यावा. पित्तजन्य अरोचकावर ढाळक द्यावें, आणि कफजन्य अरोचकावर त्रिदोषापासून असेल तर त्रिदोषशामक व मनाला हर्ष देणारे उपचार करावे. अरुचीवर कवलग्रह (औषधी वटक तोंडांत धरणें), धूम्रपान, औषधींच्या काढ्यानें तोंड धुणें, मनाला आवडणारें अन्नपान, आनंद व आश्वासन हे उपचार करावे. नित्य संवयीचीं, त्या त्या देशांत होणारीं नाना प्रकारचीं भक्ष्यें, पेयें, मुळें, फळें, रायतीं, कोशिंबिरी, लेह (पंचामृत वगैरे), अनेक प्रकारचे रस ह्यांचे अनेक प्रकारचे हलके, रूक्ष व मनाला सुखावह असे प्रयोग सेवन करावे.

मुखधावन.

अजाजी मरिचं कुष्ठं बिडं सौवर्चलं तथा ।
मधुकं शर्करा तैलं वातिके मुखधावनम् ।
करञ्जदन्तकाष्ठं च विधेयमरुचौ सदा ॥ १ ॥

जिरें, मिरें, कोष्ट, बावडिंग, पादेलोण, जेष्ठमध, साखर व तेल ह्या औषधांच्या काढ्यानें वातजन्य अरुचीवर मुखधावन करावें. अरुचीवर नेहमीं करंजाच्या काड्यांनीं दांत घासावे.

त्रिव्यूषणानि त्रिफला रजनीद्वयं च
चूर्णीकृतानि यवशूकविमिश्रितानि ।
क्षौद्रान्वितानि वितरेन्मुखधावनार्थ-
मन्यानि तिक्तकटुकानि च भेषजानि ॥ २ ॥

दालचिनी, तमालपत्र, वेलदोडे, सुंठ, मिरीं, पिंपळी, हिरडा, बेहडा, आवळकाठी, हळद व दारुहळद ह्यांचें चूर्ण करून त्यांत

जवखार मिळवून मधासह मुखधावनार्थ द्यावें. शिवाय दुसरींही कडू, तिखट अशीं औषधें मुखधावनाकरितां योजावी.

गंडूष.

किंचिल्लवणसंयुक्तमारनालं विपाचयेत् ।
तेन गण्डूषमादध्यादास्यवैरस्यशान्तये ॥ १ ॥

तोंडाचा विरसपणा दूर होण्याकरितां कांजींत थोडें मीठ घालून शिजवून त्यानें गुळण्या कराव्या.

आम्लिकापानक.

अम्लिका मुद्गतोयं च त्वगेलामरिचान्वितम् ।
अभक्तच्छन्दरोगेषु शस्तं कवलधारणे ॥ १ ॥

मुगाचे कटाला चिंच, दालचिनी, वेलदोडे व मिरें ह्यांची पूड लावून, अन्नावर वासना होत नाहीं अशा अरुचीवर कवल धारण करण्याकरितां तें योजावें.

पानक (सरबत.)

भागैकं निम्बुजं तोयं षड्भागं शर्करोदकम् ।
लवङ्गमरिचोन्मिश्रं पानकं पानकोत्तमम् ॥ १ ॥
निम्बूरसंभवं पानमत्यम्लं वातनाशनम् ।
वह्निदीप्तिकरं रुच्यं समस्ताहारपाचकम् ॥ २ ॥

एक भाग निंबाचा रस आणि सहा भाग साखरेचें पाणी मिश्र करून त्याला लवंग व मिरीं ह्यांच्या चूर्णाचा वास लावावा; म्हणजे उत्तम प्रकारचें सरबत होतें. हें अतिशय आंबट, वातनाशक, अग्निदीपक, रुचिकारक आणि सर्व आहाराचें पाचन करणारें आहे.

कवलग्रह.

कुष्ठसौवर्चलाजाजीशर्करामरिचं बिडम् ।
धान्यैलापद्मकोशीरपिप्पलीचन्दनोत्पलम् ॥ १ ॥
लोध्रं तेजोवती पथ्या त्र्यूषणं सयवाग्रजम् ।
आर्द्रदाडिमनिर्यासश्चाजाजीशर्करायुतः ॥ २ ॥
सतैलमाक्षिकाश्चैते चत्वारः कवलग्रहाः ।
चतुरोऽरोचकान्हन्युर्वाताद्येकजसर्वजान् ॥ ३ ॥
विडङ्गचूर्णं कर्षैकं क्षौद्रं कर्षचतुर्मितम् ।
असाध्यमपि संहन्यादरुचिं वक्त्रधारणात् ॥ ४ ॥

१ कोष्ट, पादेलोण, जिरें, साखर, मिरें, बिडलोण, २ धने, वेलदोडे, पद्मकाष्ठ, वाळा, पिंपळी, चंदन, कमळ; ३ लोध्र, मालकांगोणी, हिरडेदळ, सुंठ, मिरे, पिंपळी, जवखार; व ४ ताजा डाळिंबाचा रस, जिरें, साखर, हे चार प्रकारचे कवलग्रह तेल व मधाशीं तोंडांत धरावे. हे वेगवेगळे वातादि तिनीही दोषांपासून होणाऱ्या व सर्वदोषजन्य अरुचीचे नाशक आहेत. वावडिंगाचें चूर्ण एक तोळा आणि मध चार तोळे ह्यांची गोळी करून तोंडांत धरावी. ती असाध्य अशा अरुचीचा नाश करिते.

कारव्यादि गुटिका.

कारव्यजाजीमरिचं द्राक्षा वृक्षाम्लदाडिमम् ।
सौवर्चलं गुडः क्षौद्रमेषां कार्या वटी शुभा ।
बदरास्थिमिता सास्ये धार्यारोचकनाशिनी ॥ १ ॥

बडिशेप, जिरें, मिरें, द्राक्षें, आम्लवेतस (किंवा अमसोल) डाळिंब, पादेलोण, गूळ, व मध ह्यांची बोराच्या आठीएवढी गोळी करून ती तोंडांत धरण्यास द्यावी. ती अरुचीचा नाश करिते.

सिताव्योषकपित्थानां चूर्णक्षौद्रकृतां वटीम् ।
सर्वारोचकशान्त्यर्थं धारयेद्वदनाम्बुजे ॥ १ ॥

खडीसाखर, सुंठ, मिरीं, पिंपळी व कवठाचा गर ह्यांची मधांत गोळी करून सर्व प्रकारच्या अरुचीचा क्षय होण्याकरितां तोंडांत धरण्यास द्यावी.

यवानिखांडवचूर्ण.

यवानी तिंत्तिडीकं च नागरं चाम्लवेतसम् ।
दाडिमं बदरं साम्लं कार्षिकाण्युपकल्पयेत् ॥ १ ॥
धान्यसौवर्चलाजाजीवराङ्गं चार्धकर्षिकम् ।
पिप्पलीनां शतं चैकं द्वे शते मरिचस्य च ॥ २ ॥
शर्करायाश्च चत्वारि पलान्येकत्र चूर्णयेत् ।
यवानीखाण्डकाख्यं तु चूर्णमेतदरोचकम् ॥ ३ ॥
हन्त्येव प्रातरेतत्तु स्थापितं च मुखे मुहुः ।
जिह्वाविशोधनं हृद्यं दीपनं भक्तरोचकम् ॥ ४ ॥
हृत्पीडापार्श्वशूलघ्नं विबन्धानाहनाशनम् ।
कासश्वासहरं ग्राहि ग्रहण्यर्शोविकारनुत् ॥ ५ ॥

ओवा, आमसोल, सुंठ, आम्लवेतस, आंबट डाळिंब, आंबट बोरें, चिंच हीं एकएक तोळा; धने, पादेलोण, जिरें, दालचिनी, हीं अर्धा अर्धा तोळा; पिंपळ्या शंभर, मिऱ्याचे दाणे दोनशें व साखर सोळा तोळे ह्या सर्वांचें एकत्र चूर्ण करावें. ह्याला यवानी-खांडव चूर्ण म्हणतात. हें प्रातःकाळीं वरचेवर तोंडांत टाकावें, म्हणजे अरुचीचा नाश करितें. जिभेचें शोधन करितें. हें हृद्य व अग्निदीपक आहे. अन्नाला रुचि आणितें. हृदयांतील पीडा, कुशीं-तील शूल, मलावरोध व पोट स्तब्ध होणें, ह्यांचा नाश करितें. खोकला, श्वास, संग्रहणी व मूळव्याध ह्यांचा नाश करितें. हें ग्राही म्हणजे मळाला घट्ट करणारें आहे.

खांडवचूर्ण.

तुल्यं तालीसचव्योषणलवणगजंह्विष्कणाग्रन्थ्यजाजी-
वृक्षाम्लाग्नित्वचं त्रिर्घनबदरधनैलाजमोदाम्लविश्वम् ।
सार्धश्वेतांग्रिसारोऽतिसृतिक्रमिवमौ खाण्डवोऽरुच्यजीर्णे
गुल्माध्मालपानलास्योद्रवणगदमरुद्धृद्दश्वासकासे ॥ १ ॥

तालीसपत्र, चवक, मिरीं, सैंधव व नागकेशर हीं एक एक तोळा; पिंपळी, पिंपळमूळ, जिरें, आम्लवेतस, चित्रकमूळ व दाल-चिनी हीं औषधें दोन दोन तोळे; नागरमोथे, बोर, धने, वेलदोडे, अजमोदा, आमसोल व सुंठ हीं औषधें तीन तीन तोळे, सर्वांच्या बरोबरीनें साखर आणि चवथाई (साडेनऊ तोळे) डाळिंबाची साल ह्यांचें चूर्ण करून ठेवावें. ह्याला खांडवचूर्ण असें म्हणतात. हें अतिसार, क्रमि, ओकारी, अरुचि, अजीर्ण, गुल्म, आध्मान, अग्निमांद्य, तोंडाला पाणी सुटणें, पोटांत वात धरणें, श्वास व खोकला ह्यांजवर द्यावें.

आमलक्यादि चूर्ण.

आमलं चित्रकं पथ्या पिप्पली सैन्धवं तथा ।
चूर्णितोऽयं गणो ज्ञेयः सर्वज्वरविनाशनः ॥
भेदी रुचिकरः श्लेष्मजेता दीपनपाचनः ॥ १ ॥

आवळकाठी, चित्रकमूळ, हिरडेदळ, पिंपळी व सैंधव यांचें

चूर्ण करून ठेवावें, तें सर्व ज्वरांचा नाश करितें. हें भेदक, रुचिकारक, कफनाशक, अग्निदीपक व पाचक आहे.

कर्पूरादि चूर्ण.

कर्पूरचोचकंकोलजातीफलदलाः समाः ।
लवंगनागमरिचकृष्णाशुण्ठ्यो विवर्धिताः ॥ १ ॥
चूर्णं सितासमं ग्राह्यं रोचनं क्षयकासजित् ।
वैस्वर्यश्वासगुल्मार्शश्छर्दिकण्ठामयापहम् ॥
प्रयुक्तं चान्नपानेषु भिषजा रोगिणां हितम् ॥ २ ॥

कापूर, दालचिनी, कंकोळ, जायफळ व जायपत्री हीं औषधें एक एक भाग; लवंग, नागकेशर, मिरीं, पिंपळी व सुंठ हीं क्रमानें वाढत्या प्रमाणांत घेऊन चूर्ण करावें; व तें त्या चूर्णाच्या समान साखर घालून द्यावें. हें रुचिकारक व क्षयकासनाशक असून स्वरभेद, श्वास, गुल्म, मूळव्याध, ओकारी व गलरोग ह्यांचा नाश करितें. हें अन्नपानांतून योजिलें असतां रोग्याला हितकर होतें.

तालीसादिचूर्ण.

तालीसं मरिचं शुण्ठी पिप्पली वंशलोचना ।
एकद्वित्रिचतुष्पञ्चकर्षैर्भागान्प्रकल्पयेत् ॥ १ ॥
एलात्वचोस्तु कर्षार्धं प्रत्येकं भागमावहेत् ।
द्वात्रिंशत्कर्षतुलिता प्रदेया शर्करा बुधैः ॥ २ ॥
तालीसाद्यमिदं चूर्णं रोचनं पाचनं स्मृतम् ।
कासश्वासज्वरहरं छर्द्यतीसारनाशनम् ॥ ३ ॥
शोषाध्मानहरं प्लीहग्रहणीपाण्डुरोगजित् ।
पक्त्वा वा शर्कराचूर्णं क्षिपेत्सा गुटिका तथा ॥ ४ ॥

तालीसपत्र, मिरीं, सुंठ, पिंपळी व वंशलोचन हीं औषधें एक, दोन, तीन, चार व पांच तोळे प्रमाणांत द्यावीं. वेलदोडे व दालचिनी अर्धा अर्धा तोळा, आणि साखर बत्तीस तोळे घेऊन चूर्ण करावें. ह्याला तालिसादि चूर्ण असें म्हणतात. हें रुचिकारक, पाचक, खोकला, श्वास, ज्वर, ओकारी, अतिसार, शोष, आध्मान, पांथरी, संग्रहणी व पांडुरोग ह्यांचा नाश करणारें आहे. साखरेचा पाक करून त्यांत हें चूर्ण घालून गोळ्याही कराव्या.

आर्द्रकमातुलुंगावलेह.

आर्द्रकस्वरसं प्रस्थं तदर्धांशं गुडं क्षिपेत् ।
कुडवं बीजपूराम्लं पालयित्वा विचक्षणः ॥ १ ॥
सर्वं मन्दाग्निना पक्त्वा तत्रेमानि विनिक्षिपेत् ।
त्रिजातकं त्रिकटुकं त्रिफलायास्समेव च ॥ २ ॥
चित्रकं ग्रन्थिकं धान्यं जीरकद्वयमेव च ।
कर्षांशं श्लक्ष्णचूर्णं च मेलयित्वा तु भक्षयेत् ॥ ३ ॥
अरोचकक्षयहरमग्निदीप्तिकरं परम् ।
कामलापाण्डुशोफघ्नं श्वासकासहरं परम् ।
आध्मानोदरगुल्मानि प्लीहशूले च नाशयेत् ॥ ४ ॥

आल्याचा रस चौसष्ट तोळे, गूळ बत्तीस तोळे, महाळुंगाचा रस सोळा तोळे घेऊन मंदाग्नीवर पचन करून लेहाप्रमाणें पाक झाल्यावर त्यांत दालचिनी, तमालपत्र, वेलची, सुंठ, मिरीं, पिंपळी, हिरडा, बेहडा, आवळकाठी, धमासा, चित्रक, पिंपळमूळ, धने, जिरें व शहाजिरें हीं औषधें एक एक तोळा घेऊन चूर्ण करून त्यांत घालावें. हा अवलेह अरुचि व क्षय नाशक आहे. अग्नि प्रदीप्त करणारा आहे. व कावीळ, पांडुरोग, सूज, श्वास, खोकला, आध्मान, उदर, गुल्म, पांथरी व शूळ ह्यांचा नाश करतो.

खंडार्द्रकयोग.

आर्द्रकस्य सितायाश्च द्विगुणाष्टपलानि च ।
निष्कद्वादशकं तीक्ष्णमष्टनिष्का च मागधी ॥ १ ॥
अष्टनिष्कं च तन्मूलं पञ्चनिष्कं च नागरम् ।
जातीफलैलादहनवंशाद्याः पञ्चनिष्ककाः ॥ २ ॥
सर्वाण्येतानि शुष्काणि चूर्णं कृत्वा पृथक्पृथक् ।
आर्द्रकं खण्डशः कृत्वा गोघृतेऽष्टपले पचेत् ॥ ३ ॥
शर्करा पूर्णचूर्णं च चाऽऽर्द्रकं सह मेलयेत् ।
मण्डलं सेवयेन्नित्यं महापित्तविनाशनम् ॥ ४ ॥
अम्लपित्तं निहन्त्याशु सर्वपित्तविकारजित् ।
सर्वारुचिं वातरोगं मन्दाग्निं च नियच्छति ॥ ५ ॥

आलें चौसष्ट तोळे, खडीसाखर चौसष्ट तोळे, मिरें तीन तोळे, पिंपळी दोन तोळे, पिंपळमूळ दोन तोळे, सुंठ सव्वा तोळा; जायफळ, वेलदोडे, चित्रकमूळ व वंशलोचन हीं औषधें सव्वा सव्वा

तोळा घेऊन सर्वांचें वेगळें वेगळें चूर्ण करावें. नंतर आल्याचे तुकडे करून बत्तीस तोळे तुपांत तळावे. नंतर त्यांत तीं वरील औषधांचीं चूर्णें व साखर मिसळून ठेवावी. हा खंडार्द्रकयोग एक मंडलपर्यंत सेवन करावा. म्हणजे वाढलेल्या पित्ताचें शमन करितो. आम्लपित्ताला त्वरित जिंकतो. सर्व पित्तविकारांचा नाश करतो. सर्व प्रकारची अरुचि व अग्निमांद्य ह्यांचा नाश करतो.

आर्द्रकयोग.

धौतं खण्डितमार्द्रकं च सलिलैः क्षिप्तं सुतप्ते घृते
सिन्धूत्थं मरिचं सुजीरयुगुलं चूर्णीकृतं प्रक्षिपेत् ।
चूर्णं भृष्टयवोद्भवं च वितुषं हिङ्ग्वाज्यधूमे दहे-
दित्थं दोषविहीनमार्द्रकवरं सुस्वादु संजायते ॥ १ ॥

आलें स्वच्छ पाण्यानें धुऊन त्याचे तुकडे करून ते तापलेल्या तुपांत टाकावे. नंतर सेंधेलोण, मिरें, जिरें व शहाजिरें ह्यांचें चूर्ण करून योग्य प्रमाणांत त्यांत घालावें. आणि कोंडा काढून टाकलेल्या भाजलेल्या सातूचें पीठ तूप व हिंग तव्यांत टाकून त्यांत परतून घेऊन त्यांत मिसळावें. ह्याप्रमाणें निर्दोष झालेलें आलें फार रुचिकारक होतें.

मातुलुंगादि योग.

मातुलुङ्गफलकेसरोद्धृतः सिन्धुजन्ममरिचान्वितो मुखे ।
हन्ति वातकफरोगमास्यगं शोषमास्यजडतामरोचकम् ॥१॥

महाळुंगाचें केसर सैंधव व मिऱ्याची पूड घालून तोंडांत धरावें. तें मुखसंबंधीं वातकफजन्य रोग, शोष, जडत्व व अरुचि ह्यांचा नाश करितें.

महाळुंगाच्या केसराचे गुण.

केसरं मातुलुंगस्य सैन्धवं मधुनाऽपि वा ।
आस्यवैरस्यशमनं भक्षयेत्कर्षसंमितम् ॥ १ ॥

महाळुंगाचें केसर सैंधव व मध ह्यांजबरोबर सेवन केलें असतां देखील तोंडाची अरुचि घालवितें. तें एक तोळापर्यंत खावें.

शमयति केसरमरुचिं सलवणघृतमाशु मातुलुङ्गस्य ।
दाडिमचर्वणमथवा चरको रुचिकारि सूचयामास ॥२॥

महाळुंगाचें केसर सैंधेलोण व तूप ह्यांजबरोबर खावें. तें अरुचीचा त्वरित नाश करितें. किंवा डाळिंब चावावें. तें रुचिकारक आहे, असें चरकानें सुचविलें आहे.

शर्करादियोग.

शर्करा दाडिमं चाथ द्राक्षा खर्जूरमेव च ॥ १ ॥

साखर, डाळिंब, द्राक्षें व खारीक, ह्यांचेंहि मिश्रण अरुचीचें नाशक आहे.

आर्द्रकदाडिमयोग.

जिह्वाकण्ठविशोधनं तदनु च स्याच्छृङ्गबेरान्वितं
सिन्धूत्थं हितमत्र चाथ मधुना शस्तो रसो दाडिमः ।

आल्याबरोबर सैंधेलोण अथवा मधाबरोबर डाळिंबाचा रस द्यावा. तो जीभ व घसा ह्यांचें शोधन करतो.

अग्न्युद्बोधकराण्यजीर्णशमनान्याहुस्तथा भेषजा-
न्यत्रारोचकहृत्प्रयोगसमये तानि प्रदेयानि च ॥ १ ॥

अग्नि प्रदीप्त करणारीं व अजीर्णशामक अशीं जीं जीं औषधें आहेत, तीं तीं सर्व अरुचीचा नाश करितात. म्हणून त्यांचीही योजना अरुचीवर करावी.

जीरकाद्य घृत.

पिष्ट्वाऽजाजीं सधान्याकां घृतप्रस्थं विपाचयेत् ।
कफपित्तारुचिहरं मन्दानलवमिं जयेत् ॥ १ ॥

जिरें व धने ह्यांचा कल्क करून त्यानें एक प्रस्थ (चौसष्ट तोळे) तूप तयार करावें. तें कफ, पित्त, अरुचि, अग्निमांद्य, व ओकारी, ह्यांचा नाश करितें.

सूतादिगुटिका.

सूतगन्धाभ्रमगधाम्लिकामरिचसैन्धवैः ।
गुटिकाऽरोचकहरी जिव्हावदनशुद्धिकृत् ॥ १ ॥

पारा, गंधक, अभ्रक, पिंपळी, मिरें, सैंधेलोण व चिंचेचा कल्क हीं समभाग घेऊन गोळ्या कराव्या. ह्या गोळ्या अरुचिनाशक असून जीभ व मुख ह्यांचें शोधन करितात.

लघुचुक्रसंधान.

गुडक्षौद्रारनालानि समस्तानि यथोत्तरम् ।
शंसन्ति द्विगुणान्भागान्सम्यक्चुक्रस्य सिद्धये ॥ १ ॥

चुक्र तयार करण्यासाठीं गूळ, मध, कांजी, हीं सर्व उत्तरोत्तर दुप्पट प्रमाणांत घ्यावीं.

यन्मस्त्वादि शुचौ भाण्डे सक्षौद्रगुडकाञ्जिकम् ।
धान्यराशौ त्रिरात्रस्थं शुक्तं चुक्रं तदुच्यते ॥ २ ॥

स्वच्छ भांड्यामध्यें दह्यावरील निवळ, मध, गूळ व कांजी एकत्र करून धान्याच्या राशींत तीन दिवस पुरून ठेवितात. त्याला शुक्त किंवा चुक्र असें म्हणतात.

पथ्यापथ्य.

गोधूममुद्गारुणशालिषष्टिका मांसं वराहाजशशैणसंभवम् ।
वेगोझषांडं मधुरालिकं लिशः प्रोष्ठी खलेशः कवरी च रोहितः१
कर्कारुवेत्राग्रनवीनमूलकं वार्ताकसौभाञ्जनमोचदाडिमम् ।
भव्यं पटोलं रुचकं पयो घृतं बालानि मूलानि रसोनसूरणम् २

द्राक्षा रसालं नलदाम्बु काञ्जिकं
कोलं रसाला दधि तक्रमार्द्रकम् ।
स्वाद्वम्लतिक्तानि च देहमार्जनं
वर्गोऽयमुक्तोऽरुचिरोगिणां हितः ॥ ३ ॥

गहू, मूग, तामसाळ, साठेसाळ, रानडुकर, ससा व हरीण ह्यांचें मांस, वेगसा जातीचा मासा, माशांचीं अंडीं, साळुंखी, कुलिश, प्रोष्टी, खलेश व कवरी ह्या जातीचे मासे, रोहीमासा, काकडी, वेताचे कोंब, नवे मुळे (कोंवळे मुळे), वांगें, शेवगा, केळें, डाळिंब, द्राक्षें, वाळा टाकलेलें पाणी, कांजी, बोरें, श्रीखंड, दहीं, ताक, आलें, गोड, आंबट, कडू अशीं औषधें व अंग धुणें हा वर्ग अरुचीच्या रोग्याला हितकारक आहे.

तृष्णोद्गारक्षुधानेत्रवारिवेगविधारणम् ।
अहृद्यान्नमसृङ्मोक्षं क्रोधं लोभं भयं शुचम् ।
दुर्गन्धानूपसेवां च न कुर्यादरुचौ नरः ॥ ४ ॥

तहान, ढेकर, भूक, डोळ्यांतील पाण्याचा वेग आवरणें, अप्रिय अन्न, रक्तमोक्ष, राग, लोभ, भय, शोक, दुर्गंधि, अनूप देशांतील

अन्न वगैरे सेवन करणें, ह्या क्रिया अरुचीच्या रोग्यानें करूं नये.

छर्दिनिदान.

दुष्टैर्दोषैः पृथक्सर्वैर्बीभत्सालोकनादिभिः ।
छर्दयः पंच विज्ञेयास्तासां लक्षणमुच्यते ॥ १ ॥

दूषित झालेल्या वातादि तीन दोषांनीं तीन, सर्व दोषांमुळें एक आणि बीभत्स पदार्थादिकांच्या दर्शनामुळें एक, मिळून वांतीचे पांच प्रकार आहेत; त्यांचें आतां लक्षण सांगतों.

संप्राप्ति.

अतिद्रवैरतिस्निग्धैरहृद्यैर्लवणैरपि ।
अकाले चातिमात्रैश्च तथासात्म्यैश्च भोजनैः ॥ १ ॥
श्रमाद्भयात्तथोद्वेगादजीर्णात्क्रमिदोषतः ।
नार्याश्चाऽऽपन्नसत्त्वायास्तथाऽतिद्रुतमश्नतः ॥ २ ॥
बीभत्सैर्हेतुभिश्चान्यैर्द्रुतमुत्क्लेशितो बलात् ।
छादयन्नाननं वेगैरर्दयन्नङ्गभञ्जनैः ॥
निरुच्यते छर्दिरिति दोषो वक्त्रं प्रधावितः ॥ ३ ॥

अतिशय पातळ, अतिशय स्निग्ध, अप्रिय व अति खारट असें अन्न खाण्यानें, अकालीं व अति भोजन केल्यानें, असात्म्य अन्नसेवनानें; अतिश्रम, अतिभय किंवा अति उद्विग्नता झाल्यानें अजीर्ण किंवा पोटांत कृमि झाल्यामुळें, बायकांना गर्भारपणामुळें, अति जलद जेवण्यानें, बीभत्स पदार्थ वगैरे पहाण्यानें व अशाच अन्य कांहीं कारणांनीं जोरानें झटकन वर उचंबळून आलेला दोष वेगानें तोंड भरून टाकतो व शरीराला पीडा देत देत बाहेर येतो, त्याला छर्दि असें म्हणतात.

पूर्वरूप.

हृल्लासोद्गारसंरोधौ प्रसेको लवणस्तनुः ।
द्वेषोऽन्नपाने च भृशं वमीनां पूर्वलक्षणम् ॥ १ ॥

मळमळणें, ढेकराचा अवरोध होणें, तोंडाला पाणी सुटणें किंवा तोंडांतून खारट व पातळ अशी थुंकी येणें आणि अन्नपानाविषयीं अत्यंत द्वेष हीं ओकारीचीं पूर्व चिन्हें आहेत.

वातज वांतीचें लक्षण.

हृत्पार्श्वपीडामुखशोषशीर्षनाभ्यार्तिकासस्वरभेदतोदैः ।
उद्गारशब्दप्रबलं सफेनं विच्छिन्नकृष्णं तनुकं कषायम् ॥ १ ॥
कृच्छ्रेण चाल्पं महता च वेगेनार्तोऽनिलाच्छर्दयतीह दुःखम् २

हृदय व कुशी ह्यांमध्यें पीडा, तोंडाला कोरड, मस्तक व नाभि ह्यांमध्यें पीडा, स्वर बदलणें, अंगाला टोंचणी असणें, हीं लक्षणें वातजन्य वांतीमध्यें होतात. आणि वांति होतांना वेग व शब्द जोरानें होतो. राहून राहून काळसर, पातळ व तुरट अशी वांति होते. वांति होतांना खूप त्रास होतो. वेग जोराचा आहेसें वाटतो, व वांति थोडी होते. ह्या वातजन्य ओकारीमध्यें फार दुःख होतें.

पित्तज वांतीचें लक्षण.

मूर्छापिपासामुखशोषमूर्धताल्वक्षिसंतापतमोभ्रमार्तः ।
पीतं भृशोष्णं हरितं च तिक्तं धूम्रं च पित्तेन वमेत्सदाहम् ॥१

मूर्च्छा, तहान, तोंडाला कोरड; डोकें, टाळू व डोळे तापणें, डोळ्यापुढें काळोखी व घेरी येणें, हे विकार पित्तजन्य वांतीमध्यें होतात. आणि पिंवळी, हिरवी, कडवट व धुरकट अशी वांति होते. आणि वांति होतांना दाह होतो.

कफजन्य वांतीचें लक्षण.

तन्द्रास्यमाधुर्यकफप्रसेकसंतोषनिद्रारुचिगौरवार्तः ।
स्निग्धं घनं स्वादु कफाद्विशुद्धं सरोमहर्षोऽल्परुजं वमेत्तु ॥१॥

डोळ्यांवर झांपड, तोंड गुळमट होणें, वरचेवर कफाची थुंकी येणें, पोट भरल्यासारखें वाटणें, झोंप, अरुचि व जडत्व हीं लक्षणें कफज वांतीमध्यें असतात. आणि स्निग्ध, दाट, गुळमट व पांढरी अशी वांति होते. वांति होते वेळीं अंगावर कांटा येतो, आणि फार त्रास होत नाहीं.

त्रिदोषज वांतीचें लक्षण.

शूलाविपाकारुचिदाहतृष्णाश्वासप्रमोहप्रबला प्रसक्तम् ।
छर्दिस्त्रिदोषाल्लवणाम्लनीलसान्द्रोष्णरक्तं वमतां नृणां स्यात्॥

शूळ, अपचन, अरुचि, दाह, तहान व अतिशय मूर्च्छा हे विकार त्रिदोषज वांतीमध्यें सारखे जोरांत चालू असतात. आणि

खारट, आंबट, नीलवर्ण, दाट, उष्ण व रक्तमिश्र अशी वांति होते.

असाध्य लक्षण.

विट्स्वेदमूत्राम्बुवहानि वायुः स्रोतांसि संरुध्य यदोर्ध्वमेति ।
उत्सन्नदोषस्य समाचितं तं दोषं समुद्धूय नरस्य कोष्ठात् ॥ १ ॥
विण्मूत्रयोस्तत्समगन्धवर्णं तृट्श्वासकासार्तियुतं प्रसक्तम् ।
प्रच्छर्दयेद्दुष्टमिहातिवेगात्तयाऽर्दितश्चाऽऽशु विनाशमेति ॥ २ ॥

मळवाहक, स्वेदवाहक, मूत्रवाहक व जलवाहक स्रोतांचा रोध करून वायु ज्या वेळीं वर चढतो, त्या वेळीं वर उचंबळलेले कोठ्यांतील दोष बाहेर काढून त्यांच्यासारख्या वर्णाची व वासाची वांति उत्पन्न करतो. त्यांत तहान, श्वास, उचकी व शूळ हे विकार सारखे चालू असतात. ही दुष्ट वांति मोठ्या जोराच्या वेगानें होत असते. असे विकार ज्याच्या वांतीमध्यें दिसतात, तो मनुष्य त्वरित नाश पावतो.

आगन्तुकजा.

बीभत्सजा दौर्हृदजामजा वा ह्यसात्म्यजा वा कृमिजा च या स्यात् ।
सा पञ्चमी तां च विभावयेच्च दोषोच्छ्रयेणैव यथोक्तमादौ ॥ १ ॥

बीभत्स पदार्थांच्या दर्शनादिकांनीं होणारी वांति, बायकांना डोहाळ्यामुळें होणारी वांति, संवय नसलेले पदार्थ खाण्यानें होणारी वांति, अजीर्णापासून होणारी वांति, आणि पांचवी कृमींमुळें होणारी वांति ह्या सर्व आंगतुक वांत्या आहेत. त्यांत पूर्वीं सांगितल्याप्रमाणें जसा दोषांचा संभव असेल त्याप्रमाणें लक्षणें असतात.

कृमिजन्य वांतीचें विशेष लक्षण.

शूलहृल्लासबहुला कृमिजा च विशेषतः ।
कृमिहृद्रोगतुल्येन लक्षणेन च लक्षिता ॥ १ ॥

शूल व मळमळ हीं लक्षणें विशेषतः कृमिजन्य वांतीमध्यें फार असतात. कृमिजन्य हृद्रोगाचीं लक्षणेंही ह्या वांतीमध्यें असतात.

साध्यासाध्यलक्षण.

क्षीणस्य या छर्दिरतिप्रसक्ता सोपद्रवा शोणितपूययुक्ता ।
सचन्द्रकां तां प्रवदेदसाध्यां साध्यां चिकित्सेन्निरुपद्रवां च ॥

क्षीण मनुष्याला जोरानें होणारी वांति, उपद्रवयुक्त असलेली,

रक्त व पू मिश्रित वांति, आणि ज्या वांतीवर उत्पन्न होणारे बुड-बुडे मोराच्या पंखावरील रंगाप्रमाणें चमकतात ती वांति असाध्य समजून तिजवर उपचार करूं नये. जी वांति साध्य व उपद्रव-रहित असेल, तिजवर उपचार करावे.

वांतीचे उपद्रव.

कासः श्वासो ज्वरो हिक्का तृष्णा वैचित्त्यमेव च ।
हृद्रोगस्तमकश्चैव ज्ञेयाश्छर्देरुपद्रवाः ॥ १ ॥

खोकला, श्वास, ज्वर, उचकी, तहान, मन अस्वस्थ असणें, हृद्रोग व तमक श्वास हे वांतीचे उपद्रव आहेत.

छर्दि.

आमाशयोत्क्लेशभवा हि सर्वाः स्युश्छर्दयो लंघनमेव तस्मात् ।
प्राक्कारयेन्मारुतजां विना तु संशोधनं वा कफपित्तहारि ॥ १ ॥

आमाशयामध्यें क्षुब्धता उत्पन्न झाल्यामुळें सर्व प्रकारच्या वांत्या उत्पन्न होतात. म्हणून त्यांजवर वातज वांति खेरीज करून प्रथम लंघन करावें, किंवा कफपित्तनाशक असें संशोधन (रेचक वगैरे) द्यावें.

वातच्छर्दि.

धान्याकविश्वदशमूलकषायसिद्धा-
न्यूषान्रसान्पवनवम्यरुचिप्रशान्त्यै ।
पीत्वा सुखानि लभते मधुमिश्रितं वा
शङ्खाह्वयास्वरसमूषणचूर्णयुक्तम् ॥ १ ॥

वातजन्य छर्दि (ओकारी) व अरुचि ह्यांजवर धने, सुंठ व दशमुळें ह्यांच्या काढ्यांत सिद्ध केलेले यूष व मांसरस द्यावा. किंवा शंखपुष्पीचा स्वरस मिऱ्याचें चूर्ण व मध घालून द्यावा.

लवणादि योग.

लवणत्रयसंयुक्तं संयुक्तं लवणेन वा ।
हन्यात्क्षीरोदकं पीतं छर्दिं पवनसंभवाम् ॥ १ ॥

सेंधेलोण, पादेलोण व बिडलोण ह्यांचें चूर्ण अथवा केवळ मीठ घालून दूध व पाणी मिश्र करून प्यावें. तें वातजन्य छर्दीचा नाश करितें.

सैंधवादि योग.

ससैन्धवं पिबेत्सर्पिर्वातच्छर्दिनिवारणम् ।

सैंधेलोण व तूप मिश्र करून वातजन्य वांति दूर होण्याकरितां सैंधेलोण व तूप मिश्र करून प्यावें.

पित्तच्छर्दि.

चन्दनेनाक्षमात्रेण संयोज्याऽऽमलकीरसम् ।
पिबेन्माक्षिकसंयुक्तं पित्तच्छर्दिनिवृत्तये ॥ १ ॥

पित्तज वांति दूर होण्यासाठीं एक तोळा चंदनाचें चूर्ण व आवळ्याचा रस मध घालून प्यावा.

लाजादि यूष.

लाजामसूरयवमुद्गकृता यवागू-
श्छर्द्यां हिता मधुयुता बहुपित्तजायाम् ।
यूषः सुगन्धिमधुतिक्तरसप्रयुक्तो
मृद्भृष्टलोष्टभवमम्बु हितं तृषायाम् ॥ १ ॥

लाह्या, मसुरा, सत्तु व मूग ह्यांची केलेली यवागू (कण्हेरी) फार पित्तामुळें उत्पन्न झालेल्या ओकारीवर मध घालून दिली असतां हितकारक आहे. तसेंच कडू औषधें, मध व सुवासिक द्रव्यें घालून केलेला यूष व मातीचें ढेकूळ तापवून लाल करून बुडविलेलें पाणी पित्तजन्य वांतीमध्यें तहान लागली असतां हितकारक आहे.

चंदनावलेह.

चन्दनं च मृणालं च वालकं नागरं वृषम् ।
सतण्डुलोदकक्षौद्रः पीतः कल्को वमीर्जयेत् ॥ १ ॥

चंदन, कमळाचे देठ, वाळा, सुंठ व अडुळसा ह्यांचा कल्क तांदुळाचें धुवण व मध घालून प्यावा. तो ओकारीला जिंकतो.

उदीच्यादि योग.

सोदीच्यं गैरिकं देयं सेव्यं वा तण्डुलाम्बुना ।
धात्रीरसेन वा पीता सिता लाजाश्च हन्ति ताम् ॥१॥

वाळ्याच्या चूर्णाबरोबर सोनकाव द्यावी, किंवा तांदुळाच्या धुवणाबरोबर द्यावी; किंवा आवळीच्या पाराच्या अगर आवळ्या-

च्या रसाबरोबर लाह्या व खडीसाखर घ्यावी. ती पित्तजन्य वांतीचा नाश करिते.

मुद्गकषाय.

कषायो भृष्टमुद्गानां सलाजमधुशर्करः ।
छर्द्यतीसारदाहघ्नो ज्वरघ्नः संप्रकाशितः ॥ १ ॥

भाजलेल्या मुगाचा काढा लाह्या, मध व साखर घालून प्यावा; तो वांति, अतिसार, दाह, व ज्वर यांचा नाशक आहे.

पर्पटक्काथ.

क्काथः पर्पटजः पीतः सक्षौद्रः शिशिरीकृतः ।
पित्तच्छर्दिं शिरस्तापं चक्षुर्दाहं व्यपोहति ॥ १ ॥

पित्तपापड्याचा काढा थंड झाल्यावर मध घालून प्यावा. पित्तज वांति, मस्तकाचा संताप व डोळ्याची आग ह्यांचा तो नाश करतो.

माक्षिकाविडवलेह

सिताचन्दनमध्वाढ्यं विलिहेन्माक्षिकाशकृत् ।
सोपद्रवा पित्तभवा छर्दिरेतेन शाम्यति ॥ १ ॥

खडीसाखर, चंदनाचें चूर्ण व मध ह्यांजबरोबर माशीचा मळ चाटावा. तो उपद्रवयुक्त अशा पित्तजन्य वांतीचें शमन करितो.

लाजसक्त्ववलेहिका.

सर्पिःक्षौद्रसितोपेताँल्लाजसक्तूँल्लिहेत्ततः ।
पित्तच्छर्दिरनेनाऽऽशु प्रशाम्यति सुदुस्तरा ॥ १ ॥

तूप, मध व साखर ह्यांच्याबरोबर भाताच्या लाह्यांचें पीठ चाटावें. तें दुस्तर अशा पित्तजन्य छर्दीचें त्वरित शमन करितें.

गुडूच्यादिक्काथ.

गुडूचीत्रिफलारिष्टपटोलैः क्वथितं जलम् ।
क्षौद्रयुक्तं निहन्त्याशु च्छर्दिं पित्तसमुद्भवाम् ॥ १ ॥

गुळवेल, हिरडा, बेहडा, आवळकाठी, लिंबाच्या काडया व कडुपडवळ ह्यांचा काढा मध घालून द्यावा. तो पित्तजन्य वांति त्वरित दूर करितो.

कफच्छर्दि.

छर्द्यां कफोद्भवायां तु वमनं कारयेद्भिषक् ।

तोयैः सर्षपसिन्धूत्थराठनिम्बकणायुतैः ॥ १ ॥
शस्यन्ते शालिगोधूमयवमुद्गमकुष्ठकाः ।
षष्टिकास्तत्र यूषाश्च पटोल्याद्याश्च भोजने ॥ २ ॥

शिरस अथवा मोहऱ्या, सैंधव, गेळफळ, कडुलिंब व पिंपळी ह्यांच्या काढ्यानें कफजन्य ओकारीवर प्रथम वमन द्यावें. साळी, गहू, मूग, मटक्या व साठ्या साळी यांचे यूष व पडवळ वगैरे भाज्या ह्या कफजन्य वांतीवर प्रशस्त आहेत.

विडंगादि चूर्ण.

विडङ्गत्रिफलाव्योषचूर्णं मधुयुतं लिहेत् ।
शाम्यत्यनेन कफजा छर्दिः सोपद्रवा नृणाम् ॥ १ ॥

वावडिंगें, त्रिफळा, सुंठ, मिरें, पिंपळी, ह्यांचें चूर्ण मधाबरोबर चाटावें. ह्या योगानें उपद्रवयुक्त अशी कफजन्य वांति बंद होते.

रक्तशाल्यादि योग.

अथ रक्तशालिभक्तं गोदधिशर्कराविमिश्रं च ।
कुर्याद्भोजनमेतत्कफच्छर्दिं च्छिदं जन्तोः ॥ १ ॥

तामसाळीचा भात गाईचें दहीं व साखर घालून खावा; तो कफजन्य ओकारीचा नाश करितो.

सजाम्बवं बादरचूर्णमम्लं मुस्तायुतः कर्कटकः सशृङ्गी ।
दुरालभां वा मधुना च युक्तां लिह्यात्कफछर्दिविनिग्रहार्थम् १

जांभूळ व बोरें ह्यांचें चूर्ण लिंबाच्या अगर महाळुंगाच्या रसाबरोबर अगर उंसाचा रस, नागरमोथे व काकडशिंगी ह्यांचें चूर्ण घालून द्यावा, किं । धमासा मधाबरोबर द्यावा. तो कफजन्य ओकारी बंद करितो.

त्रिदोषच्छर्दि.

पिष्ट्वा धात्रीफलं द्राक्षां शर्करां च पलोन्मिताम् ।
दत्त्वा मधुपलं चैव कुडवं सलिलस्य च ।
वाससा गालितं पीतं हन्ति च्छर्दिं त्रिदोषजाम् ॥ १ ॥

आवळकाठी व द्राक्षें ह्यांचें चूर्ण चारचार तोळे, साखर चार तोळे व मध चार तोळे एकत्र करून त्यांत सोळा तोळे पाणी घालून मर्दन करून तें वस्त्रगाळ करून द्यावें. तें त्रिदोषज वांतीचें शमन करितें.

मसूरसक्तुयोग.

मसूरसक्तवः क्षौद्रमर्दिता दाडिमाम्भसा ।
पीता निवारयन्त्याशु च्छर्दिं दोषत्रयोद्भवाम् ॥ १ ॥

मसूराचें पीठ व मध डाळिंबाच्या पाण्यांत एकत्र कालवून प्यावें. तें त्रिदोषजन्य वांतीचा त्वरित नाश करितें.

एलादिचूर्ण.

एलालवङ्गगजकेशरकोलमज्जा-
लाजप्रियंगुघनचन्दनपिप्पलीनाम् ।
चूर्णं सितामधुयुतं मनुजो विलिह्य
च्छर्दिं निहन्ति कफमारुतपित्तजाताम् ॥ १ ॥

वेलदोडे, लवंग, नागकेशर, बोराची बी, भाताच्या लाह्या, गव्हला, नागरमोथे, पिंपळी, चंदन, ह्यांचें चूर्ण खडीसाखर व मध घालून चाटावें. तें त्रिदोषजन्य ओकारीचें शमन करितें.

बिल्वादिकषाय.

बिल्वत्वचो गुडूच्या वा क्काथः क्षौद्रेण संयुतः ।
जयेत्त्रिदोषजां छर्दिं पर्पटः पित्तजां तथा ॥ १ ॥

बेलाच्या सालीचा अथवा गुळवेलीचा काढा मध घालून द्यावा. तो त्रिदोषजन्य वांतीचा नाश करतो. त्याचप्रमाणें पित्तपापड्याचा काढा पित्तजन्य ओकारीचें शमन करतो.

सामान्य छर्दि.

कोलामलकमज्जानौ मक्षिकाविट् सिता मधु ।
सकृष्णातण्डुलो लेहश्छर्दिमाशु व्यपोहति ॥ १ ॥

बोराच्या बिया, आवळ्याच्या बिया, माशीची विष्ठा, खडीसाखर, मध व पिंपळी ह्यांचें मिश्रण तांदुळाच्या धुवणांतून द्यावें. तें ओकारीचा त्वरित नाश करितें.

मनःशिलादि योग.

मनःशिलामागधिकोषणानां चूर्णं कपित्थाम्लरसेन युक्तम् ।
लाजैः समांशैर्मधुनाऽवलीढं छर्दिं प्रसक्तामसकृन्निहन्ति ॥१॥

शुद्ध मनशीळ, पिंपळी, व मिरें ह्यांचें चूर्ण कवठाचा गर व लिंबाचा रस घालून त्यांत त्यांच्या समभाग लाह्यांचें पीठ घालून मधाबरोबर द्यावें; म्हणजे प्रबळ वांतीचा त्वरित नाश करितें.

अश्वत्थादियोग.

अश्वत्थवल्कलं शुष्कं दग्धं निर्वापितं जले ।
तज्जलं पानमात्रेण च्छर्दिं जयति दुर्जयाम् ॥ १ ॥

पिंपळाची साल जाळून पाण्यांत बुडवावी; व तें पाणी प्यावें. म्हणजे दुर्जय वांतीचा नाश होतो.

लाजादि योग.

लाजाकपित्थमधुमागधिकोषणानां
क्षौद्राभयात्रिकटुधान्यकजीरकाणाम् ।
पथ्यामृतामरिचमाक्षिकपिप्पलीनां
लेहास्त्रयः सकलवम्यरुचिप्रशान्त्यै ॥ १ ॥

सर्व प्रकारची ओकारी किंवा अरुचि बंद होण्याकरितां साळीच्या लाह्या, कवठ, मध, पिंपळी, मिरें ह्यांचा; मध, हिरडा, सुंठ, मिरें, पिंपळी, धने, जिरें ह्यांचा, किंवा हिरडा, गुळवेल, मध व पिंपळी ह्यांचा लेह असे हे तीन लेह चाटावे.

आम्रादि योग.

आम्रास्थिबिल्वनिर्यूहः पीतः समधुशर्करः ।
निहन्ति च्छर्घतीसारं वैश्वानर इवाऽऽहुतिम् ॥ १ ॥

आंब्याची कोय व बेलफळ ह्यांचा काढा मध व साखर घालून घ्यावा. तो अग्नि जसा आहुतीचा नाश करतो, त्याप्रमाणें ओकारी व अतिसार ह्यांचा नाश करतो.

जंब्वादि योग.

जम्ब्वाम्रपल्लवशृतं क्षौद्रं दत्त्वा सुशीतलं तोयम् ।
लाजैरवचूर्ण्य पिबेच्छर्घतिसारे परं सिद्धम् ॥ १ ॥

जांभळीचीं पानें, आंब्याचीं पानें ह्यांचा काढा थंड झाल्यावर मध व लाह्यांचें चूर्ण घालून प्यावा. तो ओकारीसह अतिसाराचा नाश करतो. हा अनुभविक आहे.

पद्मकादि योग.

पद्मकामृतनिम्बानां धान्यचन्दनयोः पचेत् ।
कल्के क्वाथे च हविषः प्रस्थं छर्दिनिवारणम् ॥ १ ॥

पद्मकाष्ठ, गुळवेल, बाळंतलिंब, धने व रक्तचंदन, ह्यांचा कल्क व काढा ह्यांत चौसष्ट तोळे तूप पचन करावें. तें ओकारीचा नाश करितें.

मयूरादि योग.

मयूरपक्षं निर्दह्य तद्भस्म मधुमिश्रितम् ।
लीढ्वा निवारयत्याशु च्छर्दिं सोपद्रवामपि ॥ १ ॥

मोराच्या पंखाची राख मधाबरोबर चाटावी. ती उपद्रवांसह वांतीचा नाश करिते.

गोण्यादि योग.

पुराणगोणिभस्मासम्भो मधुयुक्तं निपीयताम् ।
छर्दिं छिनत्ति मनुजस्तृणानीव हुताशनः ॥ १ ॥

जुन्या तरटाची (गोणीची) राख करून त्या राखेचें पाणी मध घालून द्यावें, तें अग्नि जसा गवताचा नाश करितो त्याप्रमाणें ओकारीचा नाश करितें.

सामान्य चिकित्सा.

जातीपत्ररसं कृष्णां मरिचं शर्करान्वितम् ।
एतानि मधुयुक्तानि घ्नन्ति च्छर्दिं चिरोद्भवाम् ॥ १ ॥

जाईच्या पाल्याचा रस पिंपळी, मिरें, व साखर ह्यांमध्यें मध घालून घ्यावा, म्हणजे फार दिवसांच्या ओकारीचा नाश होतो.

कोलमज्जा कणा बर्हिपक्षभस्म सशर्करम् ।
मधुना लेहयेच्छर्दिहिक्काकोपस्य शान्तये ॥ १ ॥

ओकारी व उचकी ह्यांच्या प्रकोपाचें शमन होण्याकरितां बोराच्या बियांचें चूर्ण, मोराच्या पंखाची राख, व साखर ह्यांचें चूर्ण मधाशीं चाटावें.

बीजपूरादि योग.

बीजपूराम्रजम्बूनां पल्लवानि जटाः पृथक् ।
विपचेत्पुटपाकेन क्षौद्रयुक्तश्च तद्रसः ।
छर्दिं निवारयेद्धोरां सर्वदोषसमुद्भवाम् ॥ १ ॥

महाळुंग, आंबा व जांभूळ, ह्यांचीं पानें व मुळें वेगवेगळीं पुटपाकानें पचन करून त्यांचा रस मध घालून द्यावा; तो सर्वदोषजन्य भयंकर ओकारीचा नाश करतो.

जम्ब्वाम्रपल्लवोशीरवटश्रृङ्गावरोहजः ।
क्काथः क्षौद्रयुतः पीतः शीतो वा विनियच्छति ।
छर्दिं ज्वरमतीसारं मूर्छां तृष्णां च दुर्जयाम् ॥ १ ॥

जांभळाचीं पानें, आंब्याचीं पानें, वाळा, वडाचे अंकुर व पारंब्या ह्यांचा काढा थंड झाल्यावर मध घालून द्यावा. तो दुर्जय ओकारी, ज्वर, अतिसार, मूर्च्छा व तहान ह्यांचा नाश करितो.

पटोलाद्यघृत.

पटोलशुण्ठ्योः कल्काभ्यां केवलं कुलकेन वा ।
घृतप्रस्थं विपक्तव्यं कफपित्तवमीर्हरेत् ॥ १ ॥

कडू पडवळ व सुंठ ह्यांचा कल्क व काढा ह्यांमध्यें अथवा केवळ कडू पडवळाच्या कल्कानें व काढ्यानें चौसष्ट तोळे तूप सिद्ध करावें. तें कफपित्तजन्य वांतीचा नाश करितें.

हिंगुना सारिवामूलं सर्ववान्तिहरं परम् ।
रम्भाकन्दरसो वाऽपि मधुना छर्दिनाशकृत् ।

उपलसरीचें मूळ हिंगाबरोबर द्यावें; तें सर्व प्रकारच्या वांतीच्या नाशाविषयीं फार उत्कृष्ट आहे. किंवा केळीच्या कांद्याचा रस मधाबरोबर द्यावा; तो ओकारीचा नाश करतो.

दध्युत्थरसादि योग.

दध्युत्थरससंयुक्तं पिप्पलीमाक्षिकान्वितम् ।
मुहुर्मुहुर्नरो लिह्याच्छर्दिभ्यः प्रतिमुच्यते ॥ १ ॥

दह्यावरील पाणी मध व पिंपळीचें चूर्ण घालून वरचेवर द्यावें, म्हणजे वांति दूर होते.

कोमलकरञ्जपत्रं सलवणमम्लेन संयुक्तम् ।
यः खादति दीनवदनश्छर्दिकफौ तस्य कुत्रेह ॥ १ ॥

करंजाचीं कोवळीं पानें सेंधेलोण व लिंबाचा रस ह्यांजबरोबर जो खातो त्याची ओकारी व कफ कुठें राहील ?

ईषद्भृष्टं करञ्जस्य बीजं खण्डीकृतं पुनः ।
मुहुर्मुहुर्नरो भुक्त्वा छर्दिं जयति दुस्तराम् ॥ १ ॥

करंजाची बी थोडी भाजून तुकडे करून थोडी थोडी खावी. ती दुस्तर वांतीचा नाश करिते.

शङ्खपुष्पीरसं टङ्कद्वयं समरिचं मुहुः ।
सक्षौद्रं मनुजः पीत्वा छर्दिभ्यः किल मुच्यते ॥ १ ॥

शंखपुष्पीचा रस सहा मासे, मिऱ्याचें चूर्ण घालून मधाबरोबर वरचेवर द्यावा, म्हणजे मनुष्य वांतीपासून मोकळा होतो.

हरीतक्यादि योग.

हरीतकीनां चूर्णं तु लिह्यान्माक्षिकसंयुतम् ।
अधोभागे कृते दोषे छर्दिस्तेनैव शाम्यति ॥ १ ॥

हिरड्याचें (बाळहिरड्याचें) चूर्ण मधाबरोबर द्यावें, म्हणजे दोषांची गति अधोमार्गी होऊन ओकारी थांबते.

योगसार.

जीरान्वितं पट्टवस्त्रं वर्तिं कृत्वाऽथ धूपयेत् ।
आघ्राणाद्विलयं याति सर्वा छर्दिश्चिरोद्भवा ॥ १ ॥

जिऱ्याची पूड फडक्यांत घालून त्याची वळकटी करून पेटवून तिचा धूर हुंगावा, म्हणजे फार दिवसांची सर्व प्रकारची ओकारी थांबते.

बीभत्सादि पंचवमि.

बीभत्सजामबीभत्सैर्हेतुभिः संहरेद्वमिम् ।

बिभत्स पदार्थादिकांपासून होणारी ओकारी चिळस न आणणाऱ्या पदार्थादिकांनीं जिंकावी.

दौर्हृदस्थां वमिं हृद्यैः काङ्क्षितैर्वस्तुभिर्जयेत् ॥ १ ॥

डोहाळ्यामुळें होणारी ओकारी प्रिय व इच्छित पदार्थ देऊन जिंकावी.

लङ्घनैर्वमनैर्वाऽपि सात्म्यैर्वाऽसात्म्यसंभवाम् ।

ज्या पदार्थांची सवय नाहीं असे पदार्थ खाण्यापासून होणारी ओकारी लंघनानें किंवा नित्य सवईचे पदार्थ देऊन जिंकावी.

कृमिहृद्रोगवच्चापि साधयेत्कृमिजां वमिम् ॥ २ ॥
यथादोषं च वितरेच्छस्तं विधिमनन्तरम् ।

कृमिजन्य हृद्रोगावरील उपचारानें कृमिजन्य वांती जिंकावी. दोषांचा पूर्ण विचार करून नंतर योग्य ते उपचार करावे.

पवनघ्नी चिरोत्थासु प्रयोज्या छर्दिषु क्रिया ॥ ३ ॥

फार दिवसांच्या ओकारीवर वातनाशक क्रिया करावी.

पारदादि चूर्ण.

रसबलिघनसारकोलमज्जामरकुसुमाम्बुधरप्रियंगुलाजाः ।
मलयजमगधात्वगेलपत्रं दलितमिदं परिभाव्य चन्दनाद्भिः ॥
मधुमरिचयुतं रजोऽस्य माषं जयति वमिं प्रबलां विलिह्य मर्त्यः॥१॥

पारा, गंधक, कापूर, बोराची बीं, लवंग, नागरमोथे, गव्हला, भाताच्या लाह्या, तांबडा चंदन, पिंपळी, दालचिनी, वेलदोड्याचे दाणे व तमालपत्र ह्या सर्वांचें चूर्ण करून चंदनाच्या काढ्याची भावना द्यावी. नंतर ह्यांतील एक मासाभर पूड मध व मिऱ्याची पूड ह्यांतून चाटावी; म्हणजे प्रबळ वांतीचा नाश होतो.

जीरकादि रस.

अजाजीधान्यपथ्याभिः सक्षौद्रैः सकटुत्रिकैः ।
एतैः सार्धं सूतभस्म सद्यो वान्तिं विनाशयेत् ॥ १ ॥

जिरें, धने, हिरडा, सुंठ, मिरें व पिंपळी ह्यांच्या चूर्णांबरोबर पाऱ्याचें भस्म (रससिंदूर) मध घालून द्यावें. तें वांतीचा त्वरित नाश करितें.

वमनामृतरस.

गन्धकः कमलाक्षश्च यष्टीमधु शिलाजतु ।
रुद्राक्षष्टङ्कणश्चैव सारङ्गस्य च शृङ्गकम् ॥ १ ॥
चन्दनं च तवक्षीरी गोरोचनमिदं समम् ।
बिल्वमूलकषायेण मर्दयेद्याममात्रकम् ॥ २ ॥
मात्रां चैव प्रकुर्वीत वल्लस्यैव प्रमाणतः ।
नानाविधानुपानेन च्छर्दिं हन्ति त्रिदोषजाम् ।
वमनामृतयोगोऽयं कमलाकरभाषितः ॥ ३ ॥

गंधक, कमलाक्ष, जेष्ठमध, शिलाजित, रुद्राक्ष, टाकणखार, हरणाचें शिंग, चंदन, तवकील व गोरोचन हीं सर्व औषधें समभाग घेऊन बेलाच्या मुळांच्या काढ्यांत प्रहरभर खल करावा. आणि वाल प्रमाणें मात्रा करून ठेवाव्या. ही मात्रा अनेक प्रकारच्या अनुपानाशीं योजिली असतां त्रिदोषजन्य वांतीचा नाश करिते. हा वमनामृत नांवाचा योग कमलाकर नांवाच्या वैद्यानें सांगितला आहे.

वांतिहृद्रस.

अयः शङ्खो बलिः सूतः खल्वे तुल्यं विमर्दयेत् ।
कन्याकनकचाङ्गेरीरसैर्गोलं विधाय च ॥ १ ॥
सप्तमृत्कर्पटैर्लिप्त्वा पुटितो वान्तिहृद्रसः ।

> ह्रिवल्लः कृमिरोगेऽपि साजमोदः सवेल्लकः ॥ २ ॥
> वान्तिहारेण मुनिना प्रोक्तोऽयं मधुना युतः ।
> पिप्पलक्षारपानीयं पाययेद्वान्तिहृद्भिषक् ॥ ३ ॥

लोहभस्म, शंखभस्म, गंधक आणि पारा, हे जिन्नस समभाग घेऊन खलामध्यें मर्दन करावें. नंतर कोरफड, काळा धोतरा व चांगेरी (चुका) ह्यांच्या रसांत खल करून गोळा करावा. आणि त्यावर सात मातकापडें करून पुट द्यावें. म्हणजे हा वांतिहृद्रस तयार होतो. हा दोन वालपर्यंत कृमिरोगावर देखील अजमोदा व वावडिंग ह्यांजबरोबर द्यावा. "वान्तिहार" नांवाच्या मुनीनें हा रस सांगितला आहे. हा मधाशीं द्यावा. ह्याजवर पिंपळाच्या क्षाराचें पाणी द्यावें.

छर्द्यन्तकरस.

> रसभस्म पलांशं स्यात्तत्पादः स्वर्णभस्म च ।
> ताम्रं भुजंगवंगे च मौक्तिकं तत्समांशकम् ॥ १ ॥
> तेषां सममयश्चूर्णमभ्रकं तत्समं भवेत् ।
> तत्समं गन्धकं दत्त्वा बीजपूरार्द्रकाम्बुना ॥ २ ॥
> सर्वं खल्वे विनिक्षिप्य मर्दयेत्रिदिनावधि ।
> तत्कल्कं भावयेत्सप्त दिनान्यामलकद्रवैः ॥ ३ ॥
> पश्चात्तन्मूलमूषायां रुद्ध्वा भाण्डे विनिक्षिपेत् ।
> पांसुभिः परिपूर्याथ क्रमवृद्धेन वह्निना ॥ ४ ॥
> पचेद्यामत्रयं चुल्यां स्वाङ्गशीतलमुद्धरेत् ।
> ततः सर्वं समाकृष्य चूर्णयेत्पट्टगालितम् ॥ ५ ॥
> अजाजी दीप्यकं व्योषं त्रिफला कृष्णजीरकम् ।
> कृमिशत्रु वराङ्गं च प्रत्येकं निष्कमानकम् ॥ ६ ॥
> ततः सर्वं चूर्णयित्वा योजयेत्पूर्वभस्मना ।
> इत्थं पञ्चरसेऽनेन प्रोक्तश्छर्द्यन्तको रसः ॥ ७ ॥
> तत्तद्रोगहरैर्द्रव्यैर्दद्याद्वल्लप्रमाणतः ।
> अम्लपित्तमसृक्पित्तं छर्दिं गुल्ममरोचकम् ॥ ८ ॥
> आमवातं च दुःसाध्यं प्रसेकच्छर्दिहृद्रुजम् ।
> सर्वलक्षणसंपूर्णं विनिहन्ति क्षयामयम् ॥
> स्वस्थोचितो हितकरः सर्वेषाममृतोपमः ॥ ९ ॥

पारदभस्म चार तोळे, सुवर्णभस्म एक तोळा; ताम्रभस्म, वंग-

भस्म, नागभस्म, व मौक्तिकभस्म, एक एक तोळा ह्या ताम्रादि-भस्मांच्या बरोबरीनें लोहभस्म, लोहभस्माइतकें अभ्रकभस्म आणि अभ्रकभस्मासमान शुद्ध गंधक घेऊन आरयाच्या व महाळुंगाच्या रसांत तीन दिवस खल करावा. नंतर त्याला आवळ्याच्या रसाच्या सात भावना द्याव्या. आणि आवळीच्या झाडाची मुळी कोरून तिची मूस करून त्यांत तें औषध भरून मातीच्या भांड्यांत ठेवून वर वाळू भरून चुलीवर क्रमवृद्धीनें तीन प्रहर आंच द्यावी. स्वांगशीत झाल्यावर काढून वस्त्रगाळ करून जिरें, ओवा, सुंठ, मिरें, पिंपळी, हिरडा, बेहडा, आवळकाठी, शहाजिरें, वावडिंग, दालचिनी ह्या प्रत्येकाचें चूर्ण तीन तीन मासे मिसळून खल करून ठेवावा. ह्याला छर्द्यंतक रस म्हणतात. हा त्या त्या रोगनाशक अनुपानाशीं एक वाल प्रमाणें द्यावा. हा आम्लपित्त, रक्तपित्त, ओकारी, गुल्म, अरुचि, दुःसाध्य, आमवात, मळमळ, ओकारी, हृद्रोग, सर्वलक्षणयुक्त क्षय ह्यांचा नाश करतो. निरोगी मनुष्याला देखील हा हितकारक असून अमृताप्रमाणें आरोग्य देणारा आहे.

पथ्यापथ्य.

कलाययवगोधूममुद्गषाष्टिकशालयः ।
शशतित्तिरलावाद्या मृगजाङ्गलसंज्ञिताः ॥ १ ॥
रागखाण्डववेत्राग्रकोलद्राक्षाफलानि च ।
वमिरोगेषु पथ्यानि मुनिभिः कथितानि तु ॥ २ ॥

वाटाणे, गहू, मूग, साठेसाळी, ससा, तित्तिरपक्षी, लावापक्षी, हरीण व इतर जांगल प्राण्यांचें मांस रागखांडव (रायतें वगैरे) वेताचे कोंब, बोरें, द्राक्षें, हीं द्रव्यें वांतीवर पथ्यकारक आहेत, म्हणून मुनींनीं सांगितलें आहे.

लम्बां बिम्बीकोशवत्यौ मधूकं चित्रामेलां सर्षपं देवदालीम् ।
व्यायामं वाऽसात्म्यदुष्टान्नपानं छर्द्यां सद्यो वर्जयेदप्रमत्तः ॥ ३ ॥

दुध्या भोपळा, तोंडली, दोडकी, जेष्ठमध, शेंदणी, वेलची, शिरस, देवडांगरी, व्यायाम व असात्म्य अथवा दुष्ट अन्नपान, हीं वांतीच्या विकारांत वर्ज करावीं.

तृष्णानिदान.

भयश्रमाभ्यां बलसंक्षयाद्वा ऊर्ध्वं चितं पित्तविवर्धनैश्च ।
पित्तं सवातं कुपितं नराणां तालुप्रपन्नं जनयेत्पिपासाम् ॥ १ ॥
सततं यः पिबेत्तोयं नः तृप्तिमधिगच्छति ।
पुनः काङ्क्षति तोयं च तं तृष्णार्दितमादिशेत् ॥ २ ॥

भय, श्रम, बलक्षय, पित्त वाढविणाऱ्या क्रिया, ह्यांच्या योगानें वाढलेलें पित्त वातासहवर्तमान वर चढून टालु व पिपासास्थान ह्यांमध्यें शिरून तहान उत्पन्न करितें. सतत पाणी पीत असतांही ज्याची तहान कमी होत नाहीं, पुनः पाणी प्यावेंसें वाटतें, त्याला तृष्णारोग आहे म्हणून समजावें.

स्रोतःस्वपांवाहिषु दूषितेषु दोषैश्च तृट् संभवतीह जन्तोः ।
तिस्रः स्मृतास्ताः क्षतजा चतुर्थी क्षयात्तथान्यामसमुद्भवा च३
भुक्तोद्भवा सप्तमिकेति तासां निबोध लिङ्गान्यनुपूर्वशश्च ।

वातादि दोषांनीं जलवाहक स्रोतसें दूषित केलीं असतांही तहान लागते. वातादिदोषामुळें तीन, व्रणजन्य एक, क्षयामुळें एक, आमापासून एक, आणि अन्नसेवनापासून एक, असे तहानेचे सात प्रकार आहेत. त्यांचीं लक्षणें क्रमानें सांगतों, ऐक.

पूर्वरूप.

ताल्वोष्ठकण्ठस्य वितोददाहसंतापमोहभ्रमविप्रलापाः ।
पूर्वाणि रूपाणि भवन्ति तासामुत्पत्तिकालेषु विशेषतो हि ॥२

टाळा, ओठ, कंठ, ह्यांच्या ठिकाणीं टोंचल्यासारखें वाटणें, दाह, अंग तापणें, संताप, मोह, भ्रम, प्रलाप (बडबड), हीं लक्षणें तहान लागण्यापूर्वीं विशेषतः होतात.

वातज तृष्णालक्षण.

शुष्कास्यता मारुतसंभवायां तोदस्तथा शंखशिरःसु चापि ।
स्रोतोभिरोधो विरसं च वक्त्रं शीताभिरद्भिश्च विवृद्धिमेति ॥ १ ॥

वातजन्य तहानेमुळें तोंडाला कोरड असते. दोन्ही आंख व मस्तक ह्यांमध्यें टोंचणी असते. रसवाही व जलवाही स्रोतसांचा रोध होतो. तोंड बेचव होतें, आणि थंड पाण्यानें तहान वाढते.

पित्तज तृषालक्षण.

मूर्छान्नविद्वेषविलापदाहा रक्तेक्षणत्वं प्रततश्च शोषः ।
शीताभिनन्दो मुखतिक्तता च पित्तात्मिकायां परिधूपनं च ॥ १ ॥

पित्तजन्य तहानेमध्यें मूर्च्छा, अन्नद्वेष, वडबड, अंगाचा दाह, डोळ्याला लाली, अत्यंत शोष, थंड पदार्थापासून समाधान, तोंडाला कडवटपणा, आणि घशांतून धूर निघाल्यासारखें वाटणें हीं लक्षणें होतात.

कफज तृष्णालक्षण.

बाष्पावरोधात्कफसंवृतेऽग्नौ तृष्णा बलासेन भवेन्नरस्य ।
निद्रा गुरुत्वं मधुरास्यता च तृष्णार्दितः शुष्यति चातिमात्रम् ।
कण्ठोपलेपो मुखपिच्छिलत्वं शीतज्वरश्छर्दिररोचकश्च ॥ १ ॥
कफात्मिकायां गुरुगात्रता च शाखासु शोषस्त्वविपाक एव ।
एतानि रूपाणि भवन्ति तस्यां तयाऽर्दितः कांक्षति नाम्ति चाम्भः ॥

जठराग्नि कफानें आवृत झाल्यामुळें त्याच्या उष्णतेचा रोध होऊन कफजन्य तृष्णा उत्पन्न होते. त्यामुळें झोंप, जडत्व, तोंडाला गुळमटपणा, अतिशय शोष, घशाला लेपटल्यासारखें होणें, तोंडाला बुळबुळीतपणा, शीतज्वर, अरुचि, ओकारी, अंगाला जडत्व, स्रोतसें शुष्क होणें, अपचन, हीं लक्षणें कफजन्य तृषेमध्यें होतात. ह्या तृषेमध्यें रोगी पाणी फार मागत नाहीं.

क्षतज तृष्णालक्षण.

क्षतस्य रुक्शोणितनिर्गमाभ्यां तृष्णां चतुर्थी क्षतजा भवेत्सा ॥१

जखमेच्या वेदनेमुळें किंवा अतिशय रक्तस्राव झाल्यामुळें चवथी क्षतजन्य तहान उत्पन्न होते.

क्षयज तृषालक्षण.

रसक्षयाद्या क्षयसंभवा सा तयाऽभिभूतस्तु निशादिनेषु ।
पेपीयतेऽम्भः स सुखं न याति तां संनिपातादिति केचिदाहुः ॥१
रसक्षयोक्तानि च लक्षणानि तस्यामशेषेण भिषग्व्यवस्येत् ।

शरीरांतील रसधातूचा क्षय झाल्यामुळें जी तहान लागते तिला क्षयजतृषा म्हणतात. ह्या तहानेनें पीडित मनुष्य रात्रंदिवस सारखें पाणी पीत असतो. तथापि त्याला समाधानी नसते. ह्या तहानेला

कित्येक सन्निपातिक (त्रिदोषजन्य) तहान असें म्हणतात. रसक्षयाचीं सर्व लक्षणें हिच्यामध्यें असतात.

आमज तृषालक्षण.

त्रिदोषलिङ्गामसमुद्भवा च हृच्छूलनिष्ठीवनसादकर्त्री ॥ १ ॥

आमज तृषेमध्यें तिन्हीही दोषांचीं लक्षणें असतात. आणि हृदयांत शूळ, लाळ गळणें व ग्लानि हे विकार असतात.

अन्नज तृषालक्षण.

स्निग्धं तथाऽऽम्लं लवणं च भुक्तं गुर्वन्नमेवाऽशु तृषं करोति १

स्निग्ध, आंबट, खारट, व जड असें अन्न खाल्लें असतां त्यामुळें तृषा उत्पन्न होते.

उपसर्गजन्य तृषालक्षण.

दीनस्वरः प्रताम्यन्दीनाननशुष्कहृदयगलतालुः ।
भवति खलु सोपसर्गात्तृष्णा सा शोषणी मता कष्टा ॥ २ ॥

रोगाचा उपद्रव म्हणून झालेल्या तहानेमुळें बोलणें दीनवाणें असतें. त्याला मूर्च्छा येते, ग्लानि येते; तोंड, घसा व टाळू हीं कोरडीं असतात. ही देहाला क्षीण करणारी तहान कष्टसाध्य असते.

ज्वरमोहक्षयकासश्वासाद्युपसृष्टदेहानाम् ।
सर्वास्त्वतिप्रसक्ता रोगकृशानां वमिप्रसक्तानाम् ॥ १ ॥
भवति खलु सोपसर्गा तृष्णा मरणाय विज्ञेया ।

ज्वर, मूर्च्छा, क्षीणता, खोकला, श्वास वगैरे रोगांमध्यें असणारी तहान कष्टसाध्य असते. त्याचप्रमाणें फार वाढलेली तृषा, रोगानें कृश झालेल्या मनुष्याची तृषा, ज्याला ओकारी आहे अशा मनुष्याची तृषा आणि उपद्रवयुक्त तृषा मृत्युकारक (असाध्य) असते.

ताल्वोष्ठकण्ठस्य तु तोददाहाः संतापमोहभ्रमविप्रलापाः ।
सर्वाणि रूपाणि भवन्ति तासां मृत्युर्हि काले तु विशेषतो हि ॥
क्षीणं विभिन्नं बधिरं तृषार्तं विवर्जयेन्निर्गतजिह्वमाशु ॥ २ ॥

टाळा, ओठ व घसा ह्यांमध्यें टोचणी व दाह, संताप, मोह, भ्रम, बडबड हीं सर्व लक्षणें ज्याला होतात, त्याला मृत्यु येतो. क्षीण झालेला, भिन्न, बधिर, व ज्याची जीभ बाहेर आली आहे, अशा तहानेलेल्या मनुष्याला असाध्य समजून औषध देऊं नये.

तृषेचे उपद्रव.

ज्वरो मोहः क्षयः कासः श्वासो बाधिर्यमेव च ।
बहिर्निर्गतजिह्वत्वं सप्तैते तृडुपद्रवाः ॥ ३ ॥

ज्वर, मूर्च्छा, क्षय, खोकला, श्वास, बहिरेपणा, व जीभ बाहेर येणें हे तहानेचे उपद्रव आहेत.

वाततृष्णाचिकित्सा.

वातघ्नमन्नपानं मिष्टं शीतं च वाततृष्णायाः ।
स्याज्जीवनीयसिद्धं क्षीरघृतं वातजे तर्षे ॥ १ ॥

वातजन्य तहानेवर थंड, गोड, व वातनाशक असें अन्नपान करावें; आणि जीवनीय गणांतील औषधांनीं सिद्ध केलेलें दूध किंवा तूप द्यावें.

पित्ततृष्णाचिकित्सा.

पित्तजायां सितायुक्तः पक्वोदुम्बरजो रसः ।
प्रपिबेत्ससितं मन्थं पयःकोलजसक्तुभिः ॥ १ ॥

पित्तजन्य तहानेवर पिकलेल्या उंबराचा रस साखर घालून मंथ प्यावा. साखर घालून दूध प्यावें. वाळलेल्या बोरांचें चूर्ण घालून दूध प्यावें.

काश्मर्यादि कषाय.

काश्मर्यशर्करायुक्तं चन्दनोशीरपद्मकम् ।
द्राक्षामधुकसंयुक्तं पित्ततर्षे जलं पिबेत्॥ १ ॥

शिवणीचीं फळें, साखर, चंदन, पद्मकाष्ट, द्राक्षें व जेष्ठमध हीं औषधें घालून काढा करून द्यावा.

कफतृष्णाचिकित्सा.

यथोक्तं कफतृष्णायां छर्द्यां तथैव कार्यं स्यात् ।
स्तम्भारुच्यविपाकालस्यच्छर्दिषु कफानुगां तृष्णाम् ॥१
ज्ञात्वा मधुदधितर्पणलवणेन जलैर्वमनमभीक्ष्णम् ।
दाडिममम्लफलं वाऽप्यन्यत्सकषायमवलेह्यम् ॥ २ ॥
पयसाऽथ वा प्रदद्याद्रजनीमधुशर्करायुक्तम् ॥ ३ ॥

कफजन्य तहानेवर जे उपचार सांगितले असतात तेच ओकारीवर करावे. स्तंभ, अरुचि, अपचन, आलस्य (अलसक) व

ओकारी ह्या विकारांमध्यें जी तहान असते, ती कफसंबंधी असते असें समजून मध, दहीं व तृप्तिकारक उपचार करावे. आणि मीठ घातलेल्या पाण्यानें वमन करवावें. डाळिंब, कोकम (रातांबा), किंवा दुसरीं आंबट तुरट अशीं फळें खावीं. किंवा मध, साखर व दूध ह्यांतून हळद द्यावी.

सामान्य विधि.

तृष्णातिवृद्धावुदरे च पूर्णे संछर्दयेन्मागधिकोदकेन ।
विलोमसंचारहितं विधेयं स्याद्दाडिमाम्रातकमातुलुङ्गैः ॥

पोट फुगलें असून तहान फार असेल तर पिंपळीच्या काढ्यानें ओकवावें. आणि डाळिंब, अंबाडा व महाळुंग ह्यांचे रस वांति बंद होण्याकरितां किंवा वमनामुळें ऊर्ध्वगामी झालेले दोष अधोगामी होण्याकरितां द्यावे.

सुवर्णरौप्यादिभिरग्नितप्तैर्लोष्टैः कृतं वा सिकतोपलैर्वा ।
जलं सुखोष्णं शमयेच्च तृष्णां सशर्करं क्षौद्रयुतं हिमं वा ॥२॥

सोनें, रुपें, मातीचें ढेकूळ, वाळू किंवा धोंडा अग्नीमध्यें तापवून लाल करून पाण्यांत बुडवावा; आणि तें पाणी कोमट किंवा थंड, साखर व मध घालून द्यावें.

कसेरुशृङ्गाटकपद्मबीजबिसेक्षुसिद्धं ससितं च वारि ।
तृष्णां क्षतोत्थामपि पित्तजातां निहंति पित्तं शिशिरीकृतं च ।

कचरा, सराटे, कमलाक्ष, कमळाचीं बिसें व ऊंस ह्या द्रव्यांनीं शिजवून तयार केलेलें पाणी साखर घालून थंड करून द्यावें. तें क्षतजन्य व पित्तजन्य तहानेचा नाश करितें.

तुलसीमञ्जरीशुण्ठीकणाद्राक्षालवङ्गकैः ।
नागवल्लीपर्णवृन्तत्वक्खर्जूरैश्च कार्षिकैः ॥ १ ॥
कर्षार्धलोध्रसंयुक्तैर्विहितोऽयं कषायकः ।
तृष्णादाहग्लानिहरस्त्रिदोषशमनः परः ॥ २ ॥

तुळशीच्या मंजिऱ्या, सुंठ, पिंपळी, द्राक्षें, लवंग, नागवेलीच्या पानाचे देठ, दालचिनी, खारीक, हीं औषधें एक एक तोळा आणि लोध्र अर्धा तोळा ह्यांचा काढा करून द्यावा; तो तहान, दाह, ग्लानि व त्रिदोष ह्यांचा नाश करण्याविषयीं फार उत्तम आहे.

मधुयुक्तं जलं शीतं पिबेदाकण्ठमातुरः ।
पश्चाद्वमेदशेषं तत्तृष्णा तेन प्रशाम्यति ॥ ३ ॥

तहानेनें पिडलेल्या रोग्यानें मध मिसळलेलें थंड पाणी आकंठ प्यावें आणि मागून तें सर्व ओकावें. ह्या उपचारानें तहान दूर होते.

मधुरैः सुजीवनीयैः शीतैश्च सतिक्तकं शृतं क्षीरम् ।
पानाभ्यञ्जनसेके त्विष्टं मधुशर्करायुक्तम् ॥ १ ॥
तज्जं वा घृतमिष्टं पानाभ्यङ्गेषु नस्यमपि किंचित् ।

जीवनीय गणांतील थंड, कडू व गोड अशा औषधांनीं दूध सिद्ध करावें; आणि तें मध व साखर घालून प्यावें; अंगास चोळावें व अंगावर शिंपावें किंवा त्या औषधांनीं तूप सिद्ध करून तें प्यावें, अंगास लावावें व त्याचें किंचित् नस्यही करावें. तें हितकारक आहे.

जम्ब्वाम्रातकबदर्यम्लवेतसवल्कलपञ्चाम्लैः ॥
हृन्मुखशिरःप्रदेहाः सघृता मूर्च्छार्तिभ्रमतृषाघ्नाः ॥ २ ॥

जांभूळ, अंबाडा, बोर, आम्लवेतस व आमसोल ह्यांचा कल्क करून त्याचा तुपांतून हृदय, मुख व मस्तक ह्यांजवर लेप करावा. तो मूर्च्छा, भ्रम व तृषा यांचा नाशक आहे.

सजीरकाण्यार्द्रकशृंगबेरसौवर्चलान्यर्धपरिप्लुतानि ।
मद्यानि हृद्यानि च गंधवंति पीतानि सद्यः शमयंति तृष्णाम् १

जिरें, आलें, सुंठ, पादेलोण ह्यांचें चूर्ण मद्याच्या निमें घेऊन तें आवडणाऱ्या व सुगंधी मद्यांत घालून प्यावें. तें तहानेचा नाश करितें.

आम्रजम्बूकषायं वा पिबेन्माक्षिकसंयुतम् ।
सर्वां छर्दिं प्रणुदति तृष्णां चैवापकर्षति ॥ २ ॥

आंब्याची साल व जांभळाची साल ह्यांचा काढा मध घालून प्यावा; तो ओकारीचा व तहानेचा नाश करितो.

गोस्तनीक्षुरसक्षीरयष्टीमधुमधूत्पलैः ।
नियतं वाम्यतो पीतैस्तृष्णा शाम्यति तत्क्षणात् ॥ ३ ॥

गोस्तनी द्राक्षें, उंसाचा रस, दूध, जेष्ठमध, मध व कमळ ह्या द्रव्यांनीं वमन करवावें, म्हणजे तात्काळ तहानेचा नाश होतो.

जीरकुस्तुम्बरीद्राक्षाचन्दनोत्पलशीतलम् ।
शीतलेन समं दद्यात् तृष्णां हन्त्यतिशीलितम् ॥ ४ ॥

जिरें, धने, द्राक्षें, रक्तचंदन, कमळ, आणि वाळा ह्यांचें चूर्ण थंड पाण्याशीं द्यावें. हें अतिशीतळ व तृषानाशक आहे.

निर्वापितं तप्तलोष्टकपालसिकतादिभिः ।
तृष्णायां वमनोत्थायां सगुडं दधि शस्यते ॥ ५ ॥

ओकारीपासून होणाऱ्या तहानेवर, मातीचें ढेकूळ (विटकराचा तुकडा), खापरखुंटी, वाळू इत्यादि पदार्थ विस्तवांत तापवून लाल करून ते दह्यांत बुडवून तें दहीं गूळ घालून द्यावें.

लघु मधुकादि फांट.

मधूकपुष्पगम्भारीचन्दनोशीरधान्यकैः ।
द्राक्षया च कृतः फाण्टः शीतः शर्करया युतः ।
तृष्णापित्तहरः प्रोक्तो दाहमूर्छाभ्रमाञ्जयेत् ॥ १ ॥

मोहाचीं फुलें, शिवणीचीं फळें, रक्तचंदन, वाळा, धने व मनुका, ह्यांचा फांट करून थंड झाल्यावर साखर घालून द्यावा; तो तहान व पित्त ह्यांचा नाश करितो. आणि दाह, मूर्च्छा व भ्रम ह्यांना जिंकितो.

सक्षौद्रमाम्रजम्बूत्थं पिबेत्क्वाथं सुपाचितम् ।
सतृष्णो मधुना कुर्याद्गण्डूषांश्शिशिरस्थितः ॥ १ ॥

तहानेच्या रोग्यानें आंब्याची साल व जांभळाची साल ह्यांचा काढा थंड झाल्यावर मध घालून प्यावा. व त्याच काढ्याच्या मध घालून गुळण्या कराव्या.

क्षीरेक्षुरसमृद्वीकाक्षौद्रसिन्धुगुडोदकैः ।
सहवृक्षाम्लगण्डूषस्तालुशोषतृडन्तकृत् ॥ १ ॥

दूध, उंसाचा रस, मनुका, मध, सैंधव, गूळ, पाणी व अमसोलें एकत्र करून त्याच्या गुळण्या कराव्या, म्हणजे तहान व टाळ्याचा शोष ह्यांचा नाश होतो.

लेप.

दाडिमकपित्थलोध्रैः सविदारीबीजपूरकैः शिरसः ।
लेपो गौरामलकैः शृतारनालयुतैः सहितैः ॥ १ ॥

डाळिंब, कवठ, लोध्र, भुईकोहाळा, महाळुंग, ह्यांचा किंवा रायआवळे कांजींत शिजवून त्यांचा मस्तकास लेप करावा.

अरुणचन्दनचन्दनवालकैर्नलदपद्मकतुल्यकृतांशकैः ।
शिरसि लेपनमाचरतां नृणां तृडुपयात्युपशांतिमसंशयम् १

रक्तचंदन, चंदन, वाळा, जटामांसी, पद्मकाष्ठ, ह्यांचा मस्तकावर लेप केला असतां निःसंशय तहान जाते.

दाडिमं वदरं लोध्रं कपित्थं बीजपूरकम् ।
पिष्ट्वा लेपः शिरस्येषां पिपासादाहनाशनः ॥ १ ॥

डाळिंब, बोर, लोध्र, कवठ, महाळुंग ह्यांचा कल्क करून मस्तकास लेप करावा, म्हणजे तहान व दाह ह्याची शांति होते.

गुटिका.

नीलाम्बुजाब्दमधुलाजवटावरोहैः
श्लक्ष्णीकृतैर्विरचिता गुटिका मुखस्था ।
तृष्णां निवारयति तत्क्षणमेव तीव्रां
मृत्योः स्पृहामिव यतेः परमार्थचिन्ता ॥ १ ॥

निळें कमळ, नागरमोथे, मध, लाह्या, वडाच्या कोंवळ्या पारंब्या ह्यांची गोळी करून तोंडांत धरावी, म्हणजे परमार्थचिंतन करणाऱ्या यतीचा प्राण हरण करण्याची मृत्यूची इच्छा जशी नष्ट होते, त्याप्रमाणें तत्क्षणांत तहान नष्ट होते.

वटप्ररोहं मधुकुष्ठमुत्पलं सलाजचूर्णं गुटिका प्रकल्प्या ।
सुसंहिता सा वदने च धारिता तृष्णां सुवृद्धामपि हंति सज्वराम् ॥

वडाच्या पारंब्या, मध, कोष्ट, निळें कमळ, लाह्याचें चूर्ण ह्यांची गोळी करून तोंडांत धरावी, म्हणजे अत्यंत वाढलेल्या ज्वरयुक्त तृषेचा नाश होतो.

कुष्ठलाजाब्दवटप्ररोहमधुकैर्मधुन्वितैः कल्पिता-
प्युग्रामाशु तृषं भृशं प्रशमयेदास्यान्तरस्था गुटी ।

कोष्ट, लाह्या, नागरमोथे, वडाच्या पारंब्या, जेष्टमध व मध ह्यांची गोळी करून तोंडांत धरून ठेवावी, म्हणजे उग्र अशा तहानेचा नाश होतो.

पलाशमूलं गजनागचपलाख्रीकोलमज्जाम्बुद-
श्रीखण्डं मधुयुक् प्रिये प्रशमयेद्धातिं त्रिदोषोद्भवाम् ॥१

वेलदोडयाचे दाणे, लाह्या, लवंग, नाकेशर, पिंपळी गव्हला, बोरांतील बी, नागरमोथे, रक्तचंदन, व मध ह्यांची गोळी त्रिदोषजन्य तहानेचा नाश करिते.

रोगोपसर्गजातायां धान्याम्बु ससितामधु।

एखाद्या रोगामध्यें उपद्रवरूपानें जी तहान असेल, तिजवर धन्याचा काढा मध व खडीसाखर घालून प्यावा.

वटप्ररोहयष्टयाह्वकणामधुकृता वटी॥
मुखस्था चिरकालोत्थां तृष्णां हन्यात्सुदुस्तराम्॥ १॥

वडाच्या पारंब्या, जेष्टमध, व पिंपळी ह्यांची मधांत गोळी करावी. आणि तोंडांत धरावी; म्हणजे फार दिवसांची दुस्तर तहान नाश पावते.

क्षतोद्भवां रुग्विनिवारणेन जयेद्रसानामसृजश्च पानैः।

क्षतजन्य तहान त्या क्षतापासून होणाऱ्या पीडेचें व वाहणाऱ्या रक्ताचें निवारण करून व मांसरस पाजून निवारण करावी.

क्षयोत्थितां क्षीरजलं निहन्यान्मांसोदकं वा मधुकोदकं वा १

क्षयापासून होणारी तहान दुधाच्या काढ्यानें, मांसरसानें किंवा ज्येष्टमधाच्या काढ्यानें जिंकावी.

आमोद्भवां बिल्ववचायुतानां जयेत्कषायैरपि दीपनानाम्।

आमदोषापासून लागणारी तहान बेलफळ व वेखंड ह्यांच्या काढ्यानें किंवा दीपक औषधांच्या काढ्यानें जिंकावी.

उल्लेखनैर्गुर्वशनप्रजातां जयेत्क्षयोत्थां तु विना पिपासाम्॥२॥

क्षयावांचून जडान्न खाण्यानें लागणारी तहान लेखन औषधानें जिंकावी.

स्निग्धेऽन्ने भुक्ते या तृष्णा स्यात्तां गुडाम्बुना शमयेत्।

स्निग्ध (तळलेलें) अन्न खाण्यानें लागणारी तहान गुळाचें पाणी देऊन शमन करावी.

अतिरूक्षदुर्बलानां तृष्णां शमयेन्नृणामिहाऽऽशु पयः॥ ३॥

ज्यांचा कोठा अतिशय रुक्ष आहे अशा अशक्त मनुष्यांची तहान थंड दूध देऊन शमन करावी.

छागमांसरसं साज्यं शीतं समधुशर्करम्।

पीत्वा जयति दुर्दाहमूर्च्छाछर्दिमदात्ययान् ॥ ४ ॥

बोकडाच्या मांसाचा रस थंड करून त्यांत मध, साखर व तूप घालून प्यावा; तो अतिशय दाह, ओकारी, मूर्च्छा व मदात्यय (कैफ) यांचा नाश करितो.

सात्म्यान्नपानभैषज्यैस्तृष्णार्तस्य जयेत्तृषाम् ।
तस्यां जितायामन्योऽपि व्याधिः शक्यश्चिकित्सितुम् ॥ ५ ॥

सामान्य तहांन लागलेल्या मनुष्याची तहान प्रकृतीस मानवणारें व संवईचें अन्नपान देऊन शमन करावी. ती जिंकली म्हणजे दुसऱ्या व्याधीवर देखील उपचार करणें शक्य होतें.

तृषितो मोहमायाति मोहात्प्राणान्विमुञ्चति ।
तस्मात्सर्वास्ववस्थासु न क्वचिद्वारि वार्यते ॥ ६ ॥
अन्नेनापि विना जन्तुः प्राणान्संधारयेच्चिरम् ।
तोयाभावे पिपासार्तः क्षणात्प्राणान्विमुञ्चति ॥ ७ ॥

तहानेल्याला मूर्च्छा येते आणि मूर्च्छा आली असतां तो प्राण सोडतो, म्हणून कोणत्याहि अवस्थेंत केव्हांही पाणी वर्ज करूं नये. प्राणी अन्नावांचून फार दिवस राहूं शकतो, परंतु तृषार्त प्राणी पाणी नसेल तर क्षणांत प्राण सोडतो.

रसादि गुटिका.

रसरजतगुटीं पटीयसीं यो वदनसरोरुहमध्यगां दधाति ।
स जयति तृषितस्तृषां मनुष्यो भृशमघपुञ्जमिव त्रिमार्गगाम्भः॥१

पारा व चांदी ह्यांची बळकट गोळी करून ती जो तोंडामध्यें धरून ठेवतो तो, ज्याप्रमाणें गंगेचें पाणी पापसमूहाला जिंकतें त्याप्रमाणें तहानेला जिंकतो.

रसादि चूर्ण.

रसगन्धककर्पूरैः शैलोशीरमरीचकैः ।
ससितैः क्रमवृद्धैश्च सूक्ष्मं कृत्वा त्वहर्मुखे ॥ १ ॥
त्रिगुञ्जाप्रमितं खादेत्पिबेत्पर्युषिताम्बु च ।
भृशं तृषां निहन्त्येवमश्विभ्यां च प्रकाशितम् ॥ २ ॥

पारा, गंधक, कापूर, शिलाजित, वाळा, मिरें, खडीसाखर हीं औषधें अनुक्रमानें वाढत्या प्रमाणांत घेऊन एकत्र सूक्ष्म खल करून तीन गुंजा प्रमाणानें प्रातःकाळीं द्यावें. आणि वर शिळें

पाणी प्यावें, म्हणजे त्वरित तहान शमते. हें रसादि चूर्ण अश्विनीकुमारांनीं सांगितलें आहे.

पथ्यापथ्य.

षष्टिकाः शालयः पेया विलेपी लाजसक्तवः ।
अन्नमण्डो धान्यरसः शर्करारागखाण्डवौ ॥ १ ॥
भृष्टैर्मुद्गैर्मसूरैर्वा चणकैर्वा कृतो रसः ।
रम्भापुष्पं तक्रकूर्ची कूष्माण्डकमुपोदिका ॥ २ ॥
खर्जूरं दाडिमं धात्री बीजपूरं गवां पयः ।
जम्बीरं करमर्दं च पथ्यमेतत् तृषातुरे ॥ ३ ॥

साठेसाळी, पेज, आटवल, लाह्यांचें पीठ, भाताचा मंड, धान्याचे कट, साखर, रागखांडव (गूळ, हिरवे आंबे, तूप, सुंठ व वेलची हे जिन्नस एकत्र करून कढवून तयार करितात तो), भाजलेले मूग, मसुरा अथवा हरभरे ह्यांचा केलेला यूष, केळफूल, तक्रकूर्ची (दुधांत ताक घालून केलेला खरवस) कोहळा, मयाळ, खजूर, डाळिंब, धायटी, महाळूंग, गाईचें दूध, ईडलिंबु व करवंद हे पदार्थ तहानेच्या रोग्याला पथ्यकारक आहेत.

गुर्वन्नमम्लं लवणं कषायं कटुत्रयं दुष्टजलानि तीक्ष्णम् ।
एतानि सर्वाणि हिताभिलाषी तृषातुरो नैव भजेत्कदाचित् ४

जड अन्न, आंबट पदार्थ, खारट पदार्थ, तुरट पदार्थ, सुंठ, मिरीं, पिंपळी, दूषित व पाणी तीक्ष्ण पदार्थ हे सर्व पदार्थ बरें वाटावें अशी इच्छा करणाऱ्या रोग्यानें केव्हांही खाऊं नयेत.

मूर्च्छानिदान.

क्षीणस्य बहुदोषस्य विरुद्धाहारसेविनः ।
वेगाघातादभीघाताद्धीनसत्त्वस्य वा पुनः ॥ १ ॥
करणायतनेषूग्रा बाह्येष्वाभ्यन्तरेषु च ।
निवसन्ति यदा दोषास्तदा मूर्छन्ति मानवाः ॥ २ ॥
संज्ञावहासु नाडीषु पिहितास्वनिलादिभिः ।
तमोऽभ्युपैति सहसा सुखदुःखव्यपोहकृत् ॥ ३ ॥
सुखदुःखव्यपोहाच्च नरः पतति काष्ठवत् ।
मोहो मूर्छेति तामाहुः षड्विधा सा प्रकीर्तिता ॥ ४ ॥
वातादिभिः शोणितेन मद्येन च विषेण च ।
षट्स्वप्येतासु पित्तं च प्रभुत्वेनावतिष्ठति ॥ ५ ॥

क्षीण, शरीरांत दोषसंचय झालेला, विरुद्ध आहार करणारा, मलमूत्रादिकांचे वेग धारण करणारा, शस्त्रादिकांचा आघात झालेला, व ज्याच्यामधील सत्वगुण कमी झाला आहे असा, अशा मनुष्यांचे क्षुब्ध झालेले दोष मनाच्या बाह्य (कान वगैरे) व अभ्यंतर (मनोवह स्रोतसें वगैरे) स्थानीं जेव्हां प्रवेश करितात, तेव्हां त्यांना मूर्च्छा येते. अशा वेळीं वातादि दोषांनीं संज्ञावह स्रोतसें आच्छादिल्यामुळें सुखदुःखाचें ज्ञान नष्ट करणारा तमोगुण त्वरित वाढतो. आणि सुखदुःखाचें ज्ञान नष्ट झालें असतां मनुष्य काष्ठवत् पडतो. ह्या विकाराला मोह किंवा मूर्च्छा असें म्हणतात. ती सहा प्रकारची आहे. वातादि दोषांनीं तीन प्रकारची, रक्तजन्य एक, मद्यजन्य एक आणि विषजन्य एक. ह्या साही मूर्च्छांमध्यें पित्त हें प्रमुखत्वानें असतें.

पूर्वरूप.

हृत्पीडा जृम्भणं ग्लानिः संज्ञादौर्बल्यमेव च ।
सर्वासां पूर्वरूपाणि यथास्वं च विभावयेत् ॥ १ ॥

छातींत दुखणें, जांभया येणें, ग्लानि व वस्तुज्ञानासंबंधीं दुर्बळपणा हीं लक्षणें मूर्च्छा येण्यापूर्वीं होतात. हिचे प्रकार पुढील लक्षणांवरून ओळखावे.

वातज मूर्च्छालक्षण.

नीलं वा यदि वा कृष्णमाकाशमथवाऽरुणम् ।
पश्यंस्तमः प्रविशति शीघ्रं च प्रतिबुध्यते ॥ १ ॥
वेपथुश्चांगमर्दश्च प्रपीडा हृदयस्य च ।
कार्श्यं श्यावारुणच्छाया मूर्छाये वातसंभवे ॥ २ ॥

वातजन्य मूर्च्छेमध्यें रोग्याला आकाश नीलवर्ण, काळें किंवा तांबूस असें पहातां पहातां मूर्च्छा येते व रोगी लवकर सावध होतो. त्याच्या अंगाला कंप सुटतो. अंग मोडून येतें. छातींत दुखतें. अंग कृश होतें आणि अंगकांति काळसर तांबूस होते.

पित्तज मूर्च्छालक्षण.

रक्तं हरितवर्णं वा वियत्पीतमथापि वा ।
पश्यंस्तमः प्रविशति सस्वेदः प्रतिबुध्यते ॥ १ ॥

सपिपासः ससंतापो रक्तपित्ताकुलेक्षणः ।
जातमात्रे च पतति शीघ्रं च प्रतिबुध्यते ॥
संभिन्नवर्चाः पीताभो मूर्छाये पित्तसंभवे ॥ २ ॥

पित्तजन्य मूर्च्छेमध्यें रोग्याला तांबडें, हिरवें किंवा पिवळें असें आकाश पहातां पहातां मूर्च्छा येते, आणि अंगाला घाम आला आहे अशा स्थितींत तो सावध होतो. त्याला तहान लागते. अंगाचा दाह होतो. त्याचे डोळे तांबूसपिवळे होतात. रोगी लहर येतांच पडतो व त्वरित सावध होतो. आणि त्याला पातळ व पिवळें शौचास होतें.

कफज मूर्च्छालक्षण.

मेघसंकाशमाकाशमावृतं वा तमोघनैः ।
पश्यंस्तमः प्रविशति चिराच्च प्रतिबुध्यते ॥ १ ॥
गुरुभिः प्रावृतैरङ्गैर्यथा वाऽऽर्द्रेण चर्मणा ।
सप्रसेकः सहृल्लासो मूर्च्छाये कफसंभवे ॥ २ ॥

कफजन्य मूर्च्छेमध्यें रोग्याला मेघाप्रमाणें कृष्णवर्ण किंवा अंधार व ढग ह्यांनीं व्यापलेलें असें आकाश पाहतां पाहतां मूर्च्छा येते. आणि तो फार उशिरानें सावध होतो. ओल्या कातड्यानें किंवा जाड पांघरुणानें अंग गुंडाळल्यासारखें त्याला वाटतें. त्याच्या तोंडांतून लाळ गळते व त्याच्या छातींत ढवळल्यासारखें होतें.

सन्निपातज मूर्च्छालक्षण.

सर्वाकृतिः संनिपातादपस्मार इवाऽपरः ।
स जन्तुं पातयत्याशु विना बीभत्सचेष्टितैः ॥ १ ॥

त्रिदोषापासून होणाऱ्या मूर्च्छेमध्यें सर्व दोषांचीं लक्षणें असतात. रोगी त्वरित मूर्च्छा येऊन पडतो. ह्यामध्यें बीभत्स चेष्टा मात्र नसतात, नाहीं तर हा दुसरा अपस्मारच म्हणावयाचा.

रक्तगंधज मूर्च्छालक्षण.

पृथिव्यापस्तमोरूपं रक्तगन्धस्तदन्वयः ।
तस्माद्रक्तस्य गन्धेन मूर्छन्ति भुवि मानवाः ।
द्रव्यस्वभाव इत्येके दृष्ट्वा यदभिमुह्यति ॥ १ ॥

पृथ्वी व उदक ह्यांमध्यें तमोगुण अधिक आहे; आणि रक्ताचा गंध हा दोहोंच्या संबंधाचा आहे. म्हणून रक्ताच्या गंधानें कित्ये-

क्वांस मूर्च्छा येते. नुसतें रक्त पाहिल्यानेंही मूर्च्छा येते. ह्याला कारण द्रव्यस्वभाव आहे असें कित्येक म्हणतात.

विषज व मद्यज मूर्च्छालक्षण.

गुणास्तीव्रतरत्वेन स्थिताश्च विषमद्ययोः ।
त एव तस्मात्ताभ्यां तु मोहौ स्यातां यथेरितौ ॥

विष व मद्य ह्यांमध्यें गुण फार तीव्रपणानें असतात. म्हणून ते गुण त्या दोषांच्या सेवनानें पुढें सांगितलेल्या त्यांच्या लक्षणांप्रमाणें मूर्च्छा उत्पन्न करितात.

स्तब्धाङ्गदृष्टिस्त्वसृजा गूढोच्छ्वासश्च मूर्च्छितः ॥ १ ॥

रक्तज मूर्च्छेंत मूर्च्छित झालेल्या मनुष्याचें अंग व डोळे ताठतात, आणि श्वासोच्छ्वास मोकळेपणानें चालत नाहीं.

मद्येन विलपञ्शेते नष्टविभ्रान्तमानसः ।
गात्राणि विक्षिपन्भूमौ जरां यावन्न याति तत् ॥ १ ॥

मद्याच्या योगानें मूर्छित होणारा मनुष्य स्मरणशक्ति नष्ट होत्साता भ्रमिष्टाप्रमाणें बडबडत जमिनीवर पडतो. आणि मद्य जिरेपर्यंत जमिनीवर हातपाय आपटतो.

वेपथुस्वप्नतृष्णाः स्युस्तमश्च विषमूर्छिते ।
वेदितव्यं तीव्रतरं यथास्वं विषलक्षणैः ॥ १ ॥

विषभक्षणामुळें अंग कापतें, झोंप येते, तहान लागते आणि मूर्छा आली असतां अंधारांत पडल्याप्रमाणें वाटतें. ह्या मूर्च्छेंत ज्या प्रकारचें विष असेल तशीं लक्षणें होतात.

मूर्च्छा, भ्रम, तंद्रा व निद्रा ह्यांतील भेद.

मूर्छा पित्ततमःप्राया रजःपित्तानिलाद् भ्रमः ।
तमोवातकफात्तन्द्रा निद्रा श्लेष्मतमोभवा ॥ १ ॥

मूर्च्छेंमध्यें पित्त व तमोगुण हे जास्त असतात. रजोगुण, पित्त व वात ह्यांपासून भ्रम होतो. तमोगुण, वात व कफ ह्यांमुळें तंद्रा येते. तमोगुण व कफ ह्यांपासून झोंप लागते.

इन्द्रियार्थेष्वसंप्राप्तिर्गौरवं जृम्भणं क्लमः ।
निद्रार्तस्येव यस्यैते तस्य तन्द्रां विनिर्दिशेत् ॥ २ ॥

जेव्हां इंद्रियांना विषयांसंबंधानें अज्ञान होतें, अंगाला जडत्व

व जांभया येतात. हीं लक्षणें असून ज्याला झोप लागल्यासारखी वाटते त्याला तंद्रा आली असें म्हणतात.

मूर्च्छादिक व संन्यास ह्यांतील भेद.

दोषेषु मदमूर्छाया गतवेगेषु देहिनाम् ।
स्वयमेवोपशाम्यन्ति संन्यासो नौषधैर्विना ॥ १ ॥

मद व मूर्च्छा ह्यांमध्यें दोष आपलें कार्य करून आपोआप शांत होतात. पण संन्यास औषध दिल्यावांचून बरा होत नाहीं.

वाग्देहमनसां चेष्टामाक्षिप्यातिबला मलाः ।
संन्यस्यन्त्यबलं जन्तुं प्राणायतनमाश्रिताः ॥ २ ॥
स ना संन्याससंन्यस्तः काष्ठीभूतो मृतोपमः ।
प्राणैर्विमुच्यते शीघ्रं मुक्त्वा सद्यःफलां क्रियाम् ॥ ३ ॥

अतिशय वाढलेले दोष वाणी व मन ह्यांचा व्यापार बंद करून प्राणाचें स्थान जें हृदय त्या ठिकाणीं जाऊन अशक्त मनुष्याला मूर्च्छित करितात. त्या मूर्च्छेनें (संन्यासानें) पीडित मनुष्य निश्चेष्ट लाकडासारखा मृतवत् पडतो. त्याला जर तात्काळ शुद्धीवर आणण्याचे उपाय केले नाहींत तर तो प्राणास मुकतो.

वादित्रगीतानुनयैरपूर्वैर्विस्मापनैर्गुप्तफलावघर्षैः ।
आभिः क्रियाभिश्च न लब्धसंज्ञो सानाहलालश्च नरश्च वर्ज्यः॥४

वाद्यें, गायन, हावभाव व आश्चर्य वाटण्यासारख्या क्रिया ह्यांच्या योगानें किंवा कुहिलीचीं फळें अंगाला लावल्यानें जो सावध होत नाहीं, ज्याचें पोट फुगलें आहे व तोंडांतून लाळ गळत आहे, असा मूर्च्छेचा रोगी असाध्य म्हणून सोडून द्यावा.

मूर्च्छाचिकित्सा.

मूर्छा मोहो द्विधा स प्रभवति सहजागन्तुभेदेन भिन्न-
स्तत्रागन्तुस्त्रिधा स्याद्रुधिरविषसुराजन्यभेदाद्विभिन्नः।
प्रत्येकं दोषभेदाद्भवति च सहजः स त्रिधा षट्सु पित्तं
प्राधान्येनेह तिष्ठेदभिदधति च तां द्वंद्वजां संनिपाते ॥ १ ॥

सहज व आगंतुक अशा भेदानें मूर्च्छा किंवा मोह दोन प्रकारचा आहे. त्यांत रक्तजन्य, मद्यजन्य व विषजन्य असे आगंतुक मूर्च्छेचे तीन प्रकार आहेत; आणि वातादि दोषभेदानें सहज मूर्च्छा

तीन प्रकारची आहे. ह्या साही प्रकारांमध्यें पित्त प्रधान असतें. द्वंद्वज व सन्निपातज मूर्च्छेंतही पित्त प्रधान असतें.

सेकावगाहा मणयः सहाराः शीताः प्रदेहा व्यजनानिलाश्च ।
शीतानि पानानि च गन्धवन्ति सर्वासु मूर्छास्वनिवारितानि ॥१

पाणी वगैरे अंगावर शिंपडणें, पाण्यांत बसणें (बुडी मारणें), रत्नें; रत्नादिकांचे हार, थंडगार लेप, पंख्याचा वारा, थंड व सुगंधी पेयें हे उपचार सर्व मूर्च्छांवर योजावे.

कोलमज्जोषणोशीरकेसरं शीतवारिणा ।
पीतं मूर्छां जयेल्लीढा कृष्णा वा मधुसंयुता ॥ ३ ॥

बोराचीं बीं, मिरें, वाळा, नाकेशर, ह्यांचें चूर्ण थंड पाण्याशीं घ्यावें किंवा पिंपळीचें चूर्ण मधाशीं चाटावें. तें मूर्च्छेला जिंकतें.

महौषधामृताद्राक्षापुष्करग्रन्थिकोद्भवम् ।
पिबेत्कणायुतं क्वाथं मूर्छायां च मदेषु च ॥ १ ॥

सुंठ, गुळवेल, नागरमोथे, पोखरमूळ व पिंपळमूळ ह्यांचा काढा मध घालून तो मूर्च्छा व मद ह्यांजवर घ्यावा.

नारीकेलाम्बुना पीता सक्तवः समशर्कराः ।
पित्तहृत्कफतृण्मूर्छाभ्रमादीन्घ्नन्ति दारुणान् ॥ १ ॥

सातूचें पीठ समभाग साखर मिसळून नारळाच्या पाण्यांतून घ्यावें; म्हणजे तें पित्त व कफ ह्यांचा नाश करितें; आणि तहान मूर्छा व भ्रम वगैरे दारुण रोगांचा नाश करितें.

शतावरीबलामूलद्राक्षासिद्धं पयः पिबेत् ।
ससितं भ्रमनाशाय बीजं वाट्यालकस्य च ॥ १ ॥

शतावरी, चिकणामूळ, व द्राक्षें ह्या औषधांनीं तयार केलेलें दूध साखर घालून भ्रम दूर होण्याकरितां घ्यावें, किंवा चिकण्याचें बीं (बळबीज) सेवन करावें.

दुरालभाकषायस्य घृतयुक्तस्य सेवनात् ।
भ्रमः शाम्यति गोविन्दस्मरणादिव पातकम् ॥ १ ॥

धमाशाचा काढा तूप घालून घेतला असतां, जसें विष्णूच्या स्मरणानें पातक नाहींसें होतें, तसें भ्रमाचें निवारण होतें.

मधुना हन्त्युपयुक्ता त्रिफला रात्रौ गुडार्द्रकं प्रातः ।
सप्ताहात्पथ्यभुजो मदमूर्छाकामलोन्मादान् ॥ १ ॥

त्रिफळ्याचें चूर्ण मधांतून रात्रीं घ्यावें व गुळाशीं आलें सकाळीं घ्यावें. ह्याप्रमाणें सात दिवस औषध घेऊन पथ्य करावें, म्हणजे मद, मूर्छा, कामला व उन्माद ह्यांचा नाश होतो.

स्विन्नमामलकं पिष्ट्वा द्राक्षया सह संसृजेत् ।
विश्वभेषजसंयुक्तं मधुना सह लेहयेत् ।
तेनास्य शाम्यते मूर्छा कासः श्वासस्तथैव च ॥ १ ॥

आवळे उकडून बारीक वाटावे. त्यांत मनुका, सुंठ, व मध ह्यांचा कल्क घालून चाटावा. म्हणजे मूर्छा, खोकला व श्वास ह्यांचा नाश होतो.

पथ्याक्काथेन संसिद्धं घृतं धात्रीरसेन वा ।
सर्पिः कल्याणकं वाऽपि मदमूर्छापहं पिबेत् ॥ १ ॥

हिरड्याच्या काढ्यानें अथवा आवळ्याच्या रसानें सिद्ध केलेलें तूप किंवा (उन्मादचिकित्सेंत सांगितलेलें) कल्याणकघृत प्यावें. तें मद, मूर्छा व भ्रम ह्यांचा नाश करितें.

रक्तजायां तु मूर्छायां हितः शीतक्रियाविधिः ।
मद्यजायां पिबेन्मद्यं निद्रां सेवेद्यथासुखम् ॥ २ ॥
विषजायां विषघ्नानि भेषजानि प्रदापयेत् ।
अञ्जनान्यवपीडांश्च धूमान्प्रधमनानि च ॥ ३ ॥
सूचिभिस्तोदनं शस्तं दाहपीडा नखान्तरे ।
लुञ्चनं नखलोम्नां च दन्तैर्दंशनमेव च ॥ ४ ॥
आत्मगुप्तावघर्षश्च हितस्तस्यावबोधने ।
अण्डयोर्घर्षणं चापि हितमेतैर्विबोधनम् ॥ ५ ॥
नासावदनरोधेन नस्यैर्मरिचनिर्मितैः ।
नरं जागरयेद्भूमौ मूर्छितं मदमारुतैः ॥ ६ ॥

रक्तजन्य मूर्च्छेवर थंड उपचार करणें हितकारक आहे. मद्यजन्य मूर्च्छेवर माफक मद्य पिऊन पुष्कळ झोंप घ्यावी. विषजन्य मूर्च्छेवर विषनाशक उपचार करावे आणि अंजन, नस्य व धूम्रपान हेही उपचार करावे शिवाय सुयांनीं टोचावें. नखाच्या ठिकाणीं डाग द्यावा. नखें दाबावीं. नखें व केस उपटावे. दातांनीं चावावें, कुहिलीचें फळ किंवा आग्याबोंड अंगास चोळावें. हे उपचार त्याला सावध करण्याला हितकारक आहेत. कैफामुळें मूर्च्छा आली

असल्यास नाक व तोंड दाबून श्वासोच्छ्वासाचा रोध करावा. मिरें वाटून चूर्ण करून त्यांचें नस्य करावें; अशा उपायांनीं त्याला सावध करावा.

रस.

कणामधुयुतं सूतं मूर्छायामनुशीलयेत् ।
शीतसेकावगाहादि सर्वं वा पीडनं हितम् ॥ १ ॥

मूर्च्छेवर मध व पिंपळीशीं सूत (रससिंदूर) द्यावा. थंड पाणी अंगावर शिंपावें. स्नान घालावें, किंवा सर्व अंग दडपावें.

पथ्य.

जीर्णा यवा लोहितशालयश्च कौरभं हविर्मुद्गसतीनयूषः ।
धन्वोद्भवा मांसरसाश्च रागाः सखाण्डवा गव्यपयः सिता च॥१॥
पुराणकूष्माडपटोलमोचहरीतकीदाडिमनारिकेलम् ।
मधूकपुष्पाणि च तण्डुलीयमुपोदिकाऽन्नानि लघूनि चापि ॥ २ ॥
अत्युच्चशब्दोऽद्भुतदर्शनं च गीतानि वाद्यान्यपि चोत्कटानि ।
श्रमः श्रुतिश्चिन्तनमात्मबोधो धैर्यं च मूर्छास्विति पथ्यवर्गः ॥३॥
नासामुखद्वारमरुन्निरोधौ विरेचनं छर्दनलङ्घनानि ।
छाया नभोऽम्भः शतधौतसर्पिर्मधूनि तीक्ष्णानि च लाजमण्डः ४

जुने सातू, तामसाळ, मातीच्या घागरींतील तूप, मूग व वाटाणे ह्यांचे यूष, धन्वदेशांत (जांगल देशांत) होणाऱ्या प्राण्यांच्या मांसाचा रस, राग, खांडव, गाईचें दूध, साखर, जुना कोहळा, पडवळ, केळें, हिरडे, डाळिंब, नारळ, मोहाचीं फुलें तांदुळजा, मयाळ, हलकीं अन्नें, मोठ्यानें बोलणें, अद्भुत पदार्थ पहाणें, चमत्कारिक गाणीं व वाद्यें ऐकणें, श्रम न करणें, वेदाध्ययन, आत्मज्ञान व धैर्य हा मूर्छाविकारावर पथ्यवर्ग सांगितला आहे. नाक व तोंड ह्या द्वारांनीं वायूचा रोध करणें, रेचक, वमन व लंघन, सावली, आकाशांतून पडणारें पावसाचें पाणी, शतधौतघृत, मध, तीक्ष्ण औषधें व लाह्याचा मंड, हेही मूर्च्छेवर पथ्यकारक आहेत.

ताम्बूलं पत्रशाकानि दन्तघर्षणमातपम् ।
विरुद्धान्यन्नपानानि व्यवायं स्वेदनं कटुम् ॥
विण्मूत्रवेगरोधं च तक्रं मूर्छामयी त्यजेत् ॥ १ ॥

विडा, पालेभाज्या, दांत घासणें, ऊन, विरुद्ध अन्नपानें, मैथुन, घाम काढणें, तिखट पदार्थ, मलमूत्रांचा वेग धारण करणें व ताक हें मूर्छेच्या रोग्यांनीं सेवन करूं नये.

ये विषस्य गुणाः प्रोक्तास्ते च मद्ये प्रतिष्ठिताः ।
तेन मिथ्योपयुक्तेन भवत्युग्रो मदात्ययः ॥ १ ॥
किं तु मद्यं स्वभावेन यथैवान्नं तथा स्मृतम् ।
अयुक्तियुक्तं रोगाय युक्तियुक्तं यथाऽमृतम् ॥ २ ॥
शुद्धकायः पिबेत्प्रातः सोपदंशं पलद्वयम् ।
मध्याह्ने द्विगुणं तच्च स्निग्धाहारेण पाययेत् ॥ ३ ॥
प्रदोषेऽष्टपलं तद्वन्मात्रा मद्यरसायने ।
आरोग्यं धातुसाम्यं च वह्निकान्तिबलप्रदम् ॥ ४ ॥
अनेन विधिना सेव्यं मद्यं नित्यमतन्द्रितैः ।
बुद्ध्यादयो गुणा यावदुल्लसन्ति निरत्ययाः ।
मात्रा सा विहिता मद्यपाने रोगाय चापरा ॥ ५ ॥
लघुतीक्ष्णोष्णसूक्ष्माम्लव्यवाय्याशुगमेव च ।
रूक्षं विकाशि विशदं मद्यं दशगुणं स्मृतम् ॥ ६ ॥
मद्यस्याम्लस्वभावस्य चत्वारस्तु रसाः स्मृताः ।
मधुरश्च कषायश्च कटुकस्तिक्त एव च ॥ ७ ॥
विषं प्राणहरं तच्च युक्तियुक्तं रसायनम् ।
प्राणाः प्राणभृतामन्नं तदयुक्त्या निहन्त्यसून ॥ ८ ॥
मद्यमुष्णं तथा तीक्ष्णं सूक्ष्मं विशदमेव च ।
रूक्षमाशुकरं चैव व्यवायि च विकाशि च ॥ ९ ॥
औष्ण्याच्छीतोपचारं च तैक्ष्ण्याद्धन्ति मनोगतिम् ।
विशत्यवयवान्सौक्ष्म्याद्वैशद्यात्कफशुक्रनुत् ॥ १० ॥
मारुतं कोपयेद्रौक्ष्यादाशुत्वादाशुकारि च ।
हर्षदं च व्यवायित्वाद्विकाशित्वाद्विसर्पति ॥ ११ ॥
तदम्लं रसतः प्रोक्तं लघुदीपनपाचनम् ।
केचिल्लवणवर्ज्यांस्तु रसांस्तत्राऽऽदिशन्ति हि ॥ १२ ॥

जे विषामध्यें गुण आहेत तेच मद्यामध्येंही आहेत. त्यामुळें तें अनियमित योजिलें असतां उग्र असा मदात्यय रोग होतो. परंतु मद्य हें अन्नाप्रमाणें आहे. तें अयोग्य रीतीनें सेवन केलें असतां रोग उत्पन्न करितें आणि युक्तीनें सेवन केलें असतां अमृताप्रमाणें गुण करितें. वमन-विरेचनानें देहशुद्धि झाल्यानंतर प्रातःकाळीं

कांहीं तरी दातांनीं चावून खाण्याच्या पदार्थांशीं आठ तोळेपर्यंत मद्य सेवन करावें. दोनप्रहरीं स्निग्ध आहाराबरोबर तें सोळा तोळे सेवन करावें. आणि संध्याकाळीं बत्तीस तोळे सेवन करावें. हें प्रमाण मद्य सेवन करण्याचें आहे. म्हणजे हें आरोग्य, धातुसाम्य, जठराग्नि प्रदीप्त होणें, कांति व बल ह्यांना देतें. ह्यासाठीं नेहमीं सावधागिरीनें ह्या वर सांगितलेल्या विधीनें मद्य-पान करावें. बुद्धि वगैरे गुण भ्रष्ट न होतां ते सुप्रसन्न अवस्थेंत येतील, अशा बेतानें मद्यपान करणें ही मद्याची योग्य मात्रा समजावी. ह्यापेक्षां अधिक प्रमाणानें घेतलें असतां रोग उत्पन्न करितें. हलकें, तीक्ष्ण, उष्ण, सूक्ष्म, आंबट, व्यवायी (पचनापूर्वीं सर्व देहांत संचार करणारें) आशुगामी, रूक्ष, विकाशी व विशद (स्वच्छ) असे मद्यामध्यें दहा गुण आहेत. स्वभावतः आंबट असणाऱ्या मद्यामध्यें मधुर, तुरट, तिखट व कडू असे चार रस असतात. मद्य हें विषाप्रमाणें प्राणनाशक आहे व तें युक्तीनें सेवन केलें असतां रसायनाप्रमाणें गुण करितें. प्राण्याला अन्न हें केवळ प्राणासारखें (जीवन) आहे, पण तें अयोग्य रीतीनें सेवन केलें असतां प्राणाचा नाश करितें, त्याप्रमाणें मद्य हें अयोग्य रीतीनें सेवन केलें असतां प्राण हरण करितें. मद्य हें उष्ण, तीक्ष्ण, सूक्ष्म, विशद, रुक्ष, आशुकारी, व्यवायी व विकाशी आहे. तें उष्ण असल्यामुळें त्याजवर शीत उपचार हितकारक असतात. तीक्ष्ण गुणामुळें मनाच्या विचारशक्तीचा तें ऱ्हास करितें. सूक्ष्मपणामुळें तें लहानसान स्रोतसांमध्यें शिरतें. विशदपणामुळें कफ व शुक्र ह्यांचा नाश करितें. रुक्षपणामुळें वाताचा प्रकोप करितें. आशुकारी गुणामुळें त्वरित अम्मल करितें. व्यवायी गुणामुळें आनंद उत्पन्न करितें आणि विकाशी गुणामुळें पसरतें. तें रुचीनें आंबट; अग्नि-दीपक, पाचक असून खारटपणा खेरीज करून बाकीचे सर्व रस ह्या मद्यामध्यें आहेत, असें कित्येक म्हणतात.

विधिना मात्रया काले हितैरन्नैर्यथाबलम् ।
प्रहृष्टो यः पिबेन्मद्यं तस्य स्यादमृतं यथा ॥ १ ॥
स्निग्धैः सदन्नैर्मांसैश्च भक्ष्यैश्च सह सेवितम् ।
भवेदायुःप्रकर्षाय बलायोपचयाय च ॥ २ ॥
काम्यता मनसस्तुष्टिस्तेजो विक्रम एव च ।
विधिवत्सेव्यमाने तु मद्ये संनिहिता गुणाः ॥ ३ ॥

विधियुक्त प्रमाणानें, नियमित वेळीं, हितकारक अशा अन्नाबरोबर, शक्तिमानाप्रमाणें सुप्रसन्न अंतःकरणानें जो मद्यपान करतो त्याला तें अमृताप्रमाणें आहे. स्निग्ध व उत्तम अन्नाबरोबर, व भक्ष्य पदार्थांबरोबर सेवन केलेलें मद्य आयुष्य वाढवितें, शक्ति वाढवितें आणि धातूची वृद्धि करितें. विधियुक्त सेवन केलेल्या मद्यापासून कामोद्दीपन, मनाला समाधान, तेज, व पराक्रम हे गुण होतात.

प्रथममदलक्षण.

बुद्धिस्मृतिप्रीतिकरः सुखश्च पानान्ननिद्रारतिवर्धनश्च ।
संपाठगीतस्वरवर्धनश्च प्रोक्तोऽतिरम्यः प्रथमो मदो हि ॥१॥

पहिल्या मदावस्थेमध्यें बुद्धि, स्मृति व प्रेम हीं वाढतात. मन आनंदित होतें. खाणें, पिणें व कामेच्छा हीं वाढतात. पाठशक्ति वाढते. गायन व स्वर ह्यांची वृद्धि होते. एकंदरींत मदाची पहिली अवस्था अतिशय रमणीय असते.

मध्यममदलक्षण.

अव्यक्तबुद्धिस्मृतिवाग्विचेष्टः सोन्मत्तलीलाकृतिरप्रशान्तः ।
आलस्यनिद्राभिहतो मुहुश्च मध्येन मत्तः पुरुषो मदेन ॥ १ ॥

दुसऱ्या मदावस्थेमध्यें मनुष्याची बुद्धि, स्मृति व वाणी हीं मंद होऊं लागतात. तो वाटेल तसें वागतो. उन्मत्त मनुष्याप्रमाणें लीला व कृति करतो. त्यास स्वस्थता वाटत नाहीं आणि आळस व झोंप वरचेवर येते. ह्या मध्यम मदामध्यें मनुष्य उन्मत्त होतो.

तिसऱ्या मदाचें लक्षण.

गच्छेदगम्यां न गुरुं च मन्येत्खादेदभक्ष्याणि च नष्टसंज्ञः ।
ब्रूयाच्च गुह्यानि हृदि स्थितानि मदे तृतीये पुरुषोऽस्वतन्त्रः ॥१

अगम्य स्त्रियांशीं गमन करण्यास प्रवृत्त होतो. वडील मनुष्यांचा मान राखीत नाहीं. त्याची बुद्धि भ्रष्ट होते. अभक्ष्य पदार्थ भक्षण करतो. मनांतील गुप्त गोष्टी सांगतो. ह्या तृतीय मदावस्थेमध्यें मनुष्य पराधीन होतो.

चतुर्थ मदलक्षण.

चतुर्थे तु मदे मूढो भग्नदार्विव निष्क्रियः ।
कार्याकार्यविभागाज्ञो मृतादप्यपरो मृतः ॥ १ ॥
को मदं तादृशं गच्छेदुन्मादमिव चापरम् ।
बहुदोषमिवामूढः कान्तारं स्ववशः कृती ॥ २ ॥

चवथ्या मदामध्यें मनुष्य मोडक्या लाकडाप्रमाणें निचेष्ट पडतो; त्याच्या हातून कोणचीही क्रिया होत नाहीं; त्याला कार्याकार्य समजत नाहीं; तो मृतापेक्षांही पलीकडचा होतो. अशा ह्या पिशाच्चवत् मदाची कोण अपेक्षा करील ? अशा ह्या अत्यंत दोषयुक्त, हिंसक पशूंनीं भरलेल्या अरण्यांत कोण शहाणा जाईल ? अर्थात कोणीही जाणार नाहीं.

श्लैष्मिकानिलप्रकृतेः स्निग्धमात्रोपसेविनः ।
पानं न बाधतेऽत्यर्थं विपरीतं तु बाधते ॥ ३ ॥

कफवातात्मक प्रकृतीचा मनुष्य व स्निग्ध अन्न खाणारा अशा मनुष्यांना अति मद्यपान बाधत नाहीं. ह्याच्या उलट ज्याची स्थिति आहे त्याला तें बाधतें.

अविधि मद्यपान.

निर्भुक्तमेकान्तत एव मद्यं निषेव्यमाणं मनुजेन नित्यम् ।
आपादयेत्कष्टतमान्विकारानापादयेच्चापि शरीरभेदम् ॥ १ ॥

जो मनुष्य जेवण केल्याशिवाय एकसारखें मद्य प्राशन करतो, त्याला कष्टसाध्य असे विकार होऊन अखेर शरीराचाही नाश होतो.

क्रुद्धेन भीतेन पिपासितेन शोकाभितप्तेन बुभुक्षितेन ।
व्यायामभाराध्वपरीक्षतेन वेगावरोधाभिहतेन वाऽपि ॥ १ ॥
अत्यम्लभक्षावततोदरेण साजीर्णभुक्तेन तथाऽबलेन ।
उष्णाभितप्तेन च सेव्यमानं करोति मद्यं विविधान्विकारान् २

रागावलेला, भ्यालेला, तहानेलेला, शोकानें त्रासलेला, भूक

लागलेला, व्यायाम (श्रम), ओझीं वाहणें व मार्ग चालणें ह्यांनीं थकलेला, मलमूत्रादिकांचे वेग आवरून धरल्यामुळें पीडलेला, अति खाण्यानें पोट फुगलेला, अजीर्णावर जेवण केलेला, अशक्त झालेला व उन्हांतून तापून आलेला, अशा मनुष्यानें मद्य प्राशन केलें असतां तें अनेक विकार उत्पन्न करितें.

पानात्ययं परमदं पानाजीर्णमथापि वा ।
पानविभ्रममुग्रं च तेषां वक्ष्यामि लक्षणम् ॥ १ ॥

पानात्यय, परमद, पानाजीर्ण व उग्र असा पानविभ्रम हे चार विकार होतात, त्यांचीं आतां लक्षणें सांगतों.

वातिक मदात्यय.

हिक्काश्वासशिरःकम्पपार्श्वशूलप्रजागरैः ।
विद्याद्बहुप्रलापस्य वातप्रायं मदात्ययम् ॥ १ ॥

उचकी, श्वास, मस्तक कांपणें, कुशीमध्यें शूल, निद्रानाश व अतिशय बडबड ह्या लक्षणांनीं युक्त मदात्ययाला वातप्राय मदात्यय म्हणतात.

पित्तज मदात्यय.

तृष्णादाहज्वरस्वेदमोहातीसारविभ्रमैः ।
विद्याद्धरितवर्णस्य पित्तप्रायं मदात्ययम् ॥ १ ॥
ज्ञेयानि तत्र भिषजा सुविनिश्चितानि ।
पित्तप्रकोपजनितानि च लक्षणानि ॥ २ ॥

तहान, दाह, ज्वर, घाम, मूर्च्छा, अतिसार, घेरी आणि अंगकांति हिरवट असणें ह्या लक्षणांनीं युक्त अशा मदात्ययाला पित्तप्राय मदात्यय म्हणतात. ह्यामध्यें पित्तप्रकोपापासून होणारीं सर्व लक्षणें असतात.

कफज मदात्यय.

छर्द्यरोचकहृल्लासतन्द्रास्तैमित्यगौरवैः ।
विद्याच्छीतपरीतस्य कफप्रायं मदात्ययम् ॥ १ ॥

ओकारी, अरुचि, छातींत ढवळल्यासारखें होणें, तंद्रा, अंग ओलसर वाटणें, जडत्व व थंडी वाजणें हीं लक्षणें कफप्राय मदात्ययामध्यें होतात.

त्रिदोषज व द्विदोषज मदात्यय.

ज्ञेयस्त्रिदोषजश्चापि सर्वलिङ्गैर्मदात्ययः ।
द्विदोषसंभवैर्लिङ्गैर्विज्ञेयस्तु द्विदोषजः ॥ १ ॥

तिन्हीही दोषांचीं लक्षणें ज्या मदात्ययांत दिसून येतील त्याला त्रिदोषज; आणि दोन दोषांचीं लक्षणें ज्या मदात्ययामध्यें असतील त्याला द्वंद्वज मदात्यय म्हणावें.

परमदलक्षण.

श्लेष्मोच्छ्रयोऽङ्गगुरुता मधुरास्यता च
विण्मूत्रसक्तिरथ तन्द्रिररोचकश्च ।
लिंगं परस्य तु मदस्य वदन्ति तज्ज्ञा-
स्तृष्णा रुजा शिरसि संधिषु चापि भेदः ॥ १ ॥

कफाचा प्रकोप, अंगाला जडत्व, वेचवपणा, मळमूत्रांचा अवरोध, तंद्रा, अरुचि, तहान, मस्तक दुखणें व सांधे दुखणें हीं लक्षणें परमदामध्यें होतात.

पानाजीर्ण व पानविभ्रम.

आध्मानमुग्रमथ चोद्गिरणं विदाहः
पाने त्वजीर्णमुपगच्छति लक्षणानि ।

अत्यंत पोट फुगणें, ओकारी व अंगाचा दाह, हीं लक्षणें मद्याच्या अजीर्णानें होतात.

हृद्गात्रभेदकफसंस्रवकण्ठधूम-
मूर्छावमिज्वरशिरोरुजनप्रदेहाः ।
द्वेषः सुरान्नविकृतेष्वपि तेषु तेषु
तं पानविभ्रममुशन्त्यखिलेन धीराः ॥ १ ॥

हृदय व गात्रें ह्यांमध्यें सुया टोचल्यासारखी पीडा, कफ पडणें, घशांतून धूर निघाल्यासारखें वाटणें, मूर्च्छा, ओकारी, ज्वर, अंगाचा दाह, मद्यें व अन्नें ह्यांचा अगर त्यांचे केलेले अन्य पदार्थ त्यांचा द्वेष हीं लक्षणें पानविभ्रमामध्यें होतात.

असाध्य लक्षण.

हीनोत्तरोष्ठमतिशीतममन्ददाहं
तैलप्रभास्यमतिपानहतं त्यजेत्तु ।
जिह्वौष्ठदन्तमसितं त्वथवापि नीलं
पीते च यस्य नयने रुधिरप्रभे च ॥ १ ॥

ज्याचा वरचा ओठ खालच्या ओठापेक्षां लांबला आहे, ज्याला बाहेरून अतिशय थंडी वाजते आणि अभ्यंतरीं अतिशय दाह होतो, ज्याच्या तोंडावर तेल चोपडल्याप्रमाणें दिसतें, ज्याची जीभ, ओठ व दांत हीं कृष्ण होतात किंवा नीलवर्ण होतात. आणि डोळे पिवळे किंवा लाल होतात.

मदात्ययाचे उपद्रव.

हिक्का ज्वरो वमथुवेपथुपार्श्वशूलः
कासभ्रमावपि च पानहतं त्यजेत्तम् ॥ १ ॥

उचकी, ज्वर, ओकारी, अंग कांपणें, कुशींत दुखणें, खोकला व घेरी हे विकार मदात्ययामध्यें होतात, अशा मदात्ययाच्या रोग्याला असाध्य म्हणून सोडून द्यावा.

पानात्ययादि चिकित्सा.

मद्यं सौवर्चलव्योषयुक्तं किंचिज्जलान्वितम् ।
जीर्णमद्याय दातव्यं वातपानात्ययापहम् ॥ १ ॥

ज्याचें मद्य पचन झालें आहे, अशा मनुष्याला किंचित् पाणी घातलेलें मद्य, सुंठ, मिरें, पिंपळी ह्यांचें चूर्ण व पादेलोण घालून द्यावें. तें वातजन्य पानात्ययाचा नाश करितें.

शुक्तं सौवर्चलं शृङ्गीत्र्यूषणार्द्रकदीपकैः ।
मद्यं पीत्वा जयत्युग्रं पवनोत्थं मदात्ययम् ॥ २ ॥

मद्य प्याल्यावर कांजीमध्यें पादेलोण, काकडशिंगी, सुंठ, मिरें, पिंपळी, आलें व चित्रक ह्यांचें चूर्ण घालून द्यावें. म्हणजे उग्र अशा वातजन्य मदात्ययाचा नाश होतो.

पित्तपानात्ययचिकित्सा.

पित्तपानात्यये पेयं वटशृङ्गं हिमाम्बुना ।
सशर्करं पुनर्मद्यं पिबेत्किंचिज्जलान्वितम् ॥ १ ॥

पित्तज पानात्ययावर वडाचे अंकुर थंड पाण्यांत वाटून साखर घालून प्यावे; आणि वर पुनः साखर घातलेलें मद्य थोडें पाणी घालून प्यावें.

क्षुद्रामलकखर्जूरपरूषकहिमं पिबेत् ।
सिताविमिश्रितं पीतं पानात्ययविकारनुत् ॥ २ ॥

रिंगणमूळ, आवळकाठी, खजूर व फालशाचीं फळें ह्यांचा हिम करून साखर घालून प्यावा, म्हणजे पित्तजन्य मदात्ययाचा नाश होतो.

कफपानात्ययचिकित्सा.

पानात्यये कफोत्थे तु तत्पीत्वोल्लेखनं चरेत् ।
यथाबलं लंघनं च दीपनीयौषधानि च ॥ १ ॥

कफजन्य मदात्ययामध्यें मद्य पिऊन ओकावें. शक्तीप्रमाणें लंघन करावें, आणि अग्निदीपक औषधें द्यावीं.

अष्टांगलवण.

सौवर्चलमजाजी च वृक्षाम्लं साम्लवेतसम् ।
त्वगेलामरिचार्धांशं शर्कराभागयोजितम् ॥ १ ॥
एतल्लवणमष्टांगमग्निसंदीपनं परम् ।
मदात्यये कफोत्थे तु दद्यात्स्रोतोविशोधनम् ॥ २ ॥

पादेलोण, ओवा, आमसुलें व आम्लवेतस हीं एक एक भाग; दालचिनी, वेलदोडे व मिरें अर्धा अर्धा भाग; आणि साखर सर्वांच्या बरोबर घालून चूर्ण करावें. ह्याला अष्टांगलवणचूर्ण म्हणतात. हें उत्तम अग्निदीपक आहे. हें स्रोतसांचें शोधन करितें. हें कफजन्य मदात्ययावर द्यावें.

सर्वजे सर्वमेवेदं प्रयोक्तव्यं चिकित्सितम् ।
आभिः क्रियाभिः सिद्धाभिः शान्तिं याति मदात्ययः ॥१

सर्वदोषजन्य मदात्ययावर वर सांगितलेलीं सर्व दोषांवरील औषधें (मिश्र करून) द्यावीं. ह्या अनुभवसिद्ध प्रयोगांनीं मदात्यय शांत होतो.

सामान्य प्रतिकार.

मधुना हन्त्युपयुक्ता त्रिफला रात्रौ गुडार्द्रकं प्रातः ।
सप्ताहात्पथ्यभुजो मदमूर्छाकामलोन्मादान् ॥ १ ॥

आलें व गूळ सकाळीं द्यावें, आणि मधाशीं त्रिफळा रात्रीं द्यावा. ह्याप्रमाणें सात दिवस करून पथ्यानें असावें; म्हणजे मदात्यय, मूर्च्छा, कावीळ व उन्माद ह्यांचा नाश होतो.

दुःस्पर्शेन समुस्तेन मुस्तपर्पटकेन वा ।
जलं मुस्तैः शृतं वाऽपि दद्याद्दोषविपाचनम् ॥ २ ॥

एतदेव च पानीयं सर्वत्रापि मदात्यये ।
निरत्ययं पीयमानं पिपासाज्वरनाशनम् ॥ ३ ॥

धमासा व नागरमोथे ह्यांचा, नागरमोथे व पित्तपापडा ह्यांचा, किंवा नुसत्या नागरमोथ्यांचा काढा द्यावा; तो दोषांचें पाचन करतो. हाच काढा सर्व मद्यजन्य विकारांवर द्यावा; हा निर्दोष असून ज्वर व तहान ह्यांचा नाशक आहे.

चव्यं सौवर्चलं हिंगु पूरकं विश्वभेषजम् ।
चूर्णं मद्येन पातव्यं पानात्ययरुजापहम् ॥ १ ॥

चवक, पादेलोण, हिंग, महाळुंगाचें केसर व सुंठ ह्यांचें चूर्ण मद्याबरोबर द्यावें. तें मदात्ययसंबंधीं विकार दूर करतें.

मन्थः खर्जूरमृद्वीकावृक्षाम्लाम्लिकदाडिमैः ।
सपरूषैः सामलकैर्युक्तो मद्यविकारनुत् ।

खजूर, मनुका, आमसुलें, चिंच, आंबट डाळिंब, फालसा व आवळकाठी ह्यांचें चूर्ण घालून मंथ द्यावा; तो सर्व विकारांचा नाश करतो.

मथितं गोदधिसहितं तैलं कर्पूरसंमिश्रम् ।
आस्वाद्य पीतमाशु क्षपयति पानात्ययं रोगम् ॥ १ ॥

गाईचें दहीं व तेल घुसळून त्यांत कापूर घालून वास घेऊन प्यावें; तें मदात्ययाचा नाश करितें.

शतावरीरसक्षीरयष्टीकल्कैः शृतं घृतम् ।
पुनर्नवाक्वाथयुतं पानात्ययमपोहति ॥ १ ॥

शतावरीचा रस, दूध व वसूच्या मुळ्यांचा काढा ह्यांमध्यें ज्येष्ठमधाचा कल्क घालून तूप सिद्ध करावें. तें मदात्ययाचा नाश करितें.

कट्फलमुस्तगुडूचीमाषैः क्रमविवर्धितैश्च तत्सर्वम् ।
घृतमुदितं माषघृतं हन्याद्गन्धं सुराभवं सपदि ॥ १ ॥

कायफळ, नागरमोथे, गुळवेल आणि उडीद हे जिन्नस क्रमानें वाढत्या प्रमाणांत घेऊन त्यांच्या बरोबरीनें तूप घालून विधियुक्त रीतीनें तूप सिद्ध करावें. हें तत्काळ दारूचा वास दूर करितें.

मद्यं पीत्वा यदि वा तत्क्षणमवलिह्य शर्करां सघृताम् ।
मदयति न जातु मद्यं मनागपि प्रथितवीर्यमपि ॥ १ ॥

मद्य प्राशन करून लागलेंच त्यावर तूप व साखर खावी; म्हणजे

तें मद्य अगदीं प्रखर असलें तरी किंचित्देखील कैफ येत नाहीं.

अहानि सप्त चाष्टौ वा नृणां पानात्ययः स्मृतः ।
पानं हि मज्जतेऽजीर्णमत ऊर्ध्वं विमार्गगम् ।
पानाजीर्णविनाशाय कुर्यात्कफहरं विधिम् ॥ १ ॥

मद्यासंबंधीं कैफ मनुष्याला सात किंवा आठ दिवस असतो. तोंपर्यंत मद्याचें पचन झालें नाहीं, तर तें अजीर्ण मद्य विमार्गगामी होऊन पानाजीर्ण उत्पन्न करितें. तें नाश होण्याकरितां कफनाशक क्रिया करावी.

पूगमदप्रतिकार.

पूगान्मदं प्रशमयत्यचिरेण जन्तो-
राघ्राय शङ्खरजसः प्रबलस्य गन्धम् ।
पानेन वा शिशिरपुष्करिणीजलस्य
संसेवितैरतिहितैर्व्यजनानिलैश्च ॥ १ ॥

नखस्याच्या चूर्णाचा वास घेतला असतां सुपारीचा कैफ त्वरित दूर होतो. किंवा टाक्यांतील थंडगार पाणी प्यावें, अगर हितकारक असा पंख्याचा वारा घ्यावा; म्हणजे सुपारीचा कैफ दूर होतो.

कोद्रवधत्तूरप्रतिकार.

कूष्माण्डरसः सगुडः शमयति मदमाशु कोद्रवजम् ।
धत्तूरं च दुग्धं सशर्करं पानयोगेन ॥ १ ॥

कोहाळ्याचा रस गूळ घालून घ्यावा. तो कोद्रूच्या (हरकाच्या) मदाचा नाश करितो. आणि साखर घालून दूध घ्यावें; तें धोतऱ्याच्या कैफाचा नाश करितें.

कज्जलीरस.

धात्रीस्वरसनिपीता रसगन्धककज्जली सितासहिता ।
हरति मदात्ययरोगान्गरुत्मानिवोरगान्सहसा ॥ १ ॥

जसा गरूड एकटाच सापांना मारतो, त्याप्रमाणें आवळ्याचा रस व खडीसाखर ह्यांजबरोबर कज्जली घेतली असतां ती मदात्ययाचा नाश करिते.

पथ्य.

गोधूमयवमुद्गाश्च माषषष्टिकशालयः ।
तण्डुलीयं पटोलं च दक्षबर्हिशशामिषम् ।

शीताम्बु चन्दनं स्नानं सेव्यमेतन्मदात्यये ॥ १ ॥

गहू, सातू, मूग, उडीद, साठेसाळी, तांदुळजा, पडवळ, कोंबडा, मोर व ससा ह्यांचें मांस, थंडपाणी, चंदन, स्नान ह्यांचें मदात्यय रोगामध्यें नेहमीं सेवन करावें.

दाहनिदान.

तीक्ष्णमुष्णं पिबन्मद्यं दाहं प्राप्नोति मानवः ।
दाहः सप्तविधः प्रोक्तो वैद्यशास्त्रप्रकल्पितः ॥ १ ॥

तीक्ष्ण व उष्ण अशा प्रकारचें मद्य प्राशन करण्यानें मनुष्याला दाह उत्पन्न होतो. हा दाह वैद्यशास्त्रामध्यें सात प्रकारचा सांगितला आहे.

मद्यजन्य दाहलक्षण.

त्वचं प्राप्तः स पानोष्मा पित्तरक्ताभिमूर्छितः ।
दाहं प्रकुरुते घोरं पित्तवत्तत्र भेषजम् ॥ १ ॥

पित्त व रक्त ह्यांनीं व्यापलेला मद्यपानजन्य उष्मा त्वचेमध्यें शिरून भयंकर दाह उत्पन्न करितो. त्याजवर पित्तविकाराप्रमाणें उपचार करावे.

रक्तजन्य दाहलक्षण.

कृत्स्नदेहानुगं रक्तमुद्रिक्तं दहति ध्रुवम् ।
समुष्यते चोष्यते वा ताम्राभस्ताम्रलोचनः ।
लोहगन्धाङ्गवदनो वह्निनेवावकीर्यते ॥ १ ॥

सर्व शरीरांतील रक्त प्रकुपित झाल्यामुळें दाह उत्पन्न करितें. त्या योगानें अंग तप्त होतें. तहान[1] लागते; अंग लाल होतें; डोळे लाल होतात. अंगाला व तोंडाला लोखंडासारखा वास येतो. आणि त्याला अंगावर विस्तव पसरल्यासारखें वाटतें.

पित्तज दाहलक्षण.

पित्तज्वरसमः पित्तात्स चाप्यस्य विधिः स्मृतः ॥ १ ॥

पित्तप्रकोपामुळें पित्तज्वरांतील दाहाप्रमाणें दाह होतो. त्याजवर पित्तज्वरावरील उपचार करावे.

---

१ मूळश्लोकांत "चोष्यते" ह्या ठिकाणीं "तृष्यते" असा पाठभेद आहे. त्याला अनुसरून अर्थ लिहिला आहे.

तृष्णाजदाहलक्षण.

तृष्णानिरोधादब्धातौ क्षीणे तेजः समुद्धतम् ।
सबाह्याभ्यन्तरं देहं प्रदहेन्मन्दचेतसः ।
संशुष्कगलताल्वोष्ठो जिह्वां निष्कृष्य वेपते ॥ १ ॥

जो मंदबुद्धि मनुष्य तहान लागली असतां पाणी न पितां तहान मारतो, त्याच्या शरीरांतील जलधातु त्यामुळें क्षीण होऊन तेज म्हणजे पित्तोष्मा वाढतो. तो त्या मनुष्याच्या शरीराचा अंतर्बाह्य दाह करतो. त्यामुळें घसा, टाळा व ओठ कोरडे पडतात, आणि रोगी जीभ बाहेर काढून कापूं लागतो.

असृजा पूर्णकोष्ठस्य दाहोऽन्यः स्यात्सुदुःसहः ॥ १ ॥

शस्त्रप्रहार झाल्यामुळें कोठ्यांत रक्त सांठून जो दाह होतो तो फार दुस्तर आहे.

धातुक्षयजन्य दाहलक्षण.

धातुक्षयोत्थो यो दाहस्तेन मूर्छातृषान्वितः ।
क्षामस्वरः क्रियाहीनः स सीदेद् भृशपीडितः ॥ १ ॥

धातुक्षयामुळें जो दाह होतो, त्यामुळें मूर्च्छा व तहान लागते. स्वर खोल जातो; तो निचेष्ट पडतो; आणि त्या दाहामुळें अत्यंत पीडित झाल्यामुळें प्राणास मुकतो.

क्षतजन्य दाहलक्षण.

क्षतजोनश्नतश्चान्नं शोचतो वाऽप्यनेकधा ।
तेनाङ्गं दह्यतेऽत्यर्थं तृष्णामूर्छाप्रलापवान् ॥ १ ॥

व्रण झालेल्या मनुष्यास अन्न न खाण्यानें किंवा शोकामुळें दाह उत्पन्न होतो. त्यामुळें अंगाचा दाह, तहान व बडबड हे विकार होतात.

मर्माभिघातज दाहलक्षण.

मर्माभिघातजोऽप्यस्ति सोऽसाध्यः सप्तमो मतः ।

मर्मावर आघात झाल्यामुळें जो दाह होतो तो असाध्य आहे, त्याला सातवा दाह म्हणतात.

सर्व एव विवर्ज्याः स्युः शीतगात्रेषु देहिषु ॥ १ ॥

ज्या दाहरोग्याचें अंग थंड लागतें आहे असे सर्व प्रकारचे दाह-रोगी असाध्य म्हणून सोडून द्यावे.

दाहचिकित्सा.

दाहेऽतिशिशिरं तोयं क्रिया कार्या सुशीतला ।
सर्वाङ्गे चन्दनालेपश्चन्द्रकस्तूरिकायुतः ॥ १ ॥
शीतनीरजलेपो वा धारागारनिवेशनम् ।
सहजस्नेहसोत्साहमुग्धमंजुललापिनाम् ॥ २ ॥
बालकानां समाश्लेषस्तापं निर्वापयेज्जवात् ।
उशीरागारशयनं तालवृन्तानुवर्तनम् ॥ ३ ॥
साहित्यसरसा वाणी कवीनां तापहृत्त्रयम् ।
उत्तुङ्गकुचसंसर्गिवीणानां हरिणीदृशाम् ॥ ४ ॥
गायनं सुकुमारीणां दाहमुत्सादयेद् द्रुतम् ।
रसौषधसमुद्भूते तापेऽपि सकले हितम् ॥ ५ ॥

दाहरोगामध्यें अत्यंत गार पाणी प्यावयास द्यावें. सर्व उपचार शीतल असे करावे. सर्व अंगाला कापूर व कस्तुरी ह्यांनीं युक्त चंदनाचा लेप करावा. पांढऱ्या कमळाचा लेप करावा. कारंजें असलेल्या घरांत बसावें. स्वभावतः स्नेहाळू, उत्साही, बोबडें व मंजुळ बोलणाऱ्या बालकांच्या आलिंगनानें त्वरित दाहशांति होते. वाळ्यानें बनविलेल्या घरांत निजणें, ताडाच्या पंख्याचा वारा घेणें, आणि कवीचें अलंकारिक भाषण, ह्या तीन क्रिया दाहशांति करणाऱ्या आहेत. वाजविण्याकरितां धरलेल्या वीणेला (सतारीला) ज्यांच्या तुंगस्तनाचा स्पर्श होत आहे अशा सुकुमार हरिणाक्षी स्त्रियांचें गायन त्वरित दाहशांति करितें. तें रसायनें, औषधें वगैरे कारणांनीं होणाऱ्या सर्व दाहांवर हितकारक आहे.

पानीयामलकं द्राक्षानालिकेरेक्षुशर्कराः ।
सेवनाय हितास्तापे कोमलं मूत्रलं फलम् ॥ ६ ॥

आवळे, द्राक्षें ह्यांचा रस व नारळाचें पाणी साखर घालून प्यावें. उंसाचा रस प्यावा. आणि दाह शांत होण्याकरितां मूत्रल व कोवळीं फळें सेवन करावीं.

तण्डुलीयकमूलानि धान्यजीरकजं पयः ।
तुलसीस्वरसं टङ्कं तापेऽपि रसजे हितम् ॥ ७ ॥

पारा किंवा रसायन सेवनामुळें होणाऱ्या दाहावर तांदुळज्याचीं

मुळें, धने, व जिरें ह्या औषधांनीं सिद्ध केलेलें दूध व तुळशीचा रस चार मासे घ्यावा. तो हितकारक आहे.

फलिनीलोध्रसेव्याम्बु हेमपत्रं कुटंनटम् ।
कालीयकरसोपेतं दाहे शस्तं प्रलेपनम् ॥ ८ ॥

गहुला, लोध्र, काळा वाळा, वाळा, घोतऱ्याचीं पानें, क्षुद्र नागरमोथे व पिवळा चंदन ह्यांचा लेप रसजन्य पाऱ्यापासून होणाऱ्या दाहावर प्रशस्त आहे.

ह्रीबेरपद्मकोशीरचन्दनक्षोदवारिणा ।
संपूर्णामवगाहेत द्रोणीं दाहार्दितो नरः ॥ ९ ॥

वाळा, पद्मकाष्ट, चंदन व वाळा ह्यांचें चूर्ण करून तें पाण्यांत टाकून त्या पाण्यानें भरलेल्या द्रोणींत (दगडाचें मोठें भांडें) दाहपीडित मनुष्यानें बुडी मारून बसावें.

प्रातः पर्युषितं धान्यसलिलं सितया युतम् ।
अन्तर्दाहं हरेत्पीतं दुःखं दुर्गार्चनं यथा ॥ १० ॥

दुर्गादेवीच्या पूजनानें जसें दुःख नाश पावतें, त्याप्रमाणें रात्रीं धने पाण्यांत भिजत घालून तें पाणी साखर घालून सकाळीं प्यावें, म्हणजे अंतर्दाहाची शांति होते.

सशर्करं सेन्दुशैलं शीतमम्भः पिबेन्नरः ।
तृष्णानिरोधजं दाहं हन्ति तोयमिवानलम् ॥ ११ ॥

पाण्यानें जसा अग्नि शांत होतो, त्याप्रमाणें साखर, कापूर व शिलाजित घालून तयार केलेलें थंड पाणी प्यालें असतां तहानेचा अवरोध केल्यामुळें उत्पन्न होणारा दाह शांत होतो.

धान्याकधात्रीवासानां द्राक्षापर्पटयोर्हिमः ।
रक्तपित्तं ज्वरं दाहं तृष्णां शोषं च नाशयेत् ॥ १ ॥

धने, आवळकाठी, आडुळसा ह्यांचा; किंवा द्राक्षें व पित्तपापडा यांचा हिम रक्तपित्त, ज्वर, दाह, तहान व शोष ह्यांचा नाश करतो.

पीत्वा वेणुत्वचः क्वाथं सक्षौद्रं शिशिरं नरः ।
रक्तसंपूर्णकोष्ठोत्थं दाहं जयति दुस्तरम् ॥ २ ॥

वेळूच्या सालीचा काढा थंड झाल्यावर मध घालून प्यावा; तो रक्तानें कोठा भरल्यामुळें होणारा दुस्तर दाह जिंकतो.

सक्तुमंथ

पाचितैः शीतनीरेण सघृतैर्यवसक्तुभिः ।
नातिसान्द्रद्रवैर्मन्थस्तृष्णादाहार्तिपित्तहा ॥ १ ॥

सातूचें पीठ व तूप थंड पाण्यांत घालून शिजवावें आणि त्याचा अतिशय दाट नाहीं व अतिशय पातळही नाहीं असा मंथ (माडगें) करावा तो तहान, दाह व पित्त ह्यांचा नाश करतो.

दशसारचूर्ण.

यष्टी धात्रीफलं द्राक्षा एलाचन्दनवालकम् ।
मधूकपुष्पं खर्जूरं दाडिमं पेषयेत्समम् ॥ १ ॥
सर्वतुल्या सिता योज्या पलार्धं भक्षयेत्सदा ।
दशसारमिदं ख्यातं सर्वपित्तविकारनुत् ॥ २ ॥

जेष्टमध, आवळकाठी, मनुका, वेलदोडे, चंदन, वाळा, मोहाचीं फुलें, खजूर व डाळिंब हीं समभाग घेऊन कुटावीं आणि चूर्ण करावें. त्या सर्व चूर्णाबरोबरीनें त्यांत साखर घालून दोन तोळेपर्यंत सेवन करावें. हें दशसार नांवाचें चूर्ण सर्व पित्तविकाराला शमवितें.

मृतसंजीवनी वटिका.

यष्टीमधु लवङ्गं च शिलावल्कं तृटिस्तथा ।
सहस्रभावनाः कार्या नवतण्डुलवारिणा ॥ १ ॥
याममात्रं दृढं मर्द्य वटिका कोलसंमिता ।
कृष्णकार्पासनीरेण तृष्णादाहज्वराञ्जयेत् ॥ २ ॥
मूर्छाभ्रमोग्ररोगं च वान्तिं पित्तं च नाशयेत् ।
मृतसंजीवनी नाम्ना पूज्यपादैरुदीरिता ॥ ३ ॥

जेष्ठमध, लवंग, धोंडफूल, वेलची ह्यांच्या चूर्णाला नव्या तांदुळाच्या धुवणाच्या हजार भावना द्याव्या. आणि एक प्रहरभर खल करून बोराएवढ्या गोळ्या कराव्या. ह्यांतील एक गोळी काळ्या कापशीच्या रसांतून द्यावी. ती तहान, दाह व ज्वर ह्यांना जिंकते. तसेंच मूर्च्छा, उग्र भ्रम, ओकारी व पित्त ह्यांचा नाश करिते. ही मृतसंजीवनी वटिका पूज्यपादानें सांगितली आहे.

चंदनादि चूर्ण.

चन्दनोशीरकुष्ठाब्दधात्रीचोरकमुत्पलम् ।
मधुकं मधुपुष्पं च द्राक्षा खर्जूरकं तथा ॥ १ ॥

चूर्णं कृतं समसितं प्रातः शीताम्बुना पिबेत् ।
रक्तपित्तं तथा श्वासं पैत्यं गुल्मं समुद्धरेत् ॥ २ ॥
अङ्गदाहं शिरोदाहं शिरोविभ्रममेव च ।
कामलां च प्रमेहांश्च पित्तज्वरविनाशनम् ॥
चन्दनाद्यमिदं चूर्णं पूज्यपादेन भाषितम् ॥ ३ ॥

चंदन, वाळा, कोष्ट, नागरमोथे, आवळकाठी, गठोना, कमळ, जेष्टमध, मोहाचीं फुलें, द्राक्षें व खजूर ह्या सर्वांचें समभाग चूर्ण करून, समभाग साखर मिळवून थंड पाण्याशीं घ्यावें. हें रक्तपित्त, श्वास, पित्त व गुल्म ह्यांचा नाश करितें. तसेंच अंगाचा दाह, मस्तकाचा दाह, डोकें फिरल्यासारखें वाटणें, कावीळ, प्रमेह व पित्तज्वर ह्यांचा नाश करितें. हें चंदनादि चूर्ण पूज्यपादानें सांगितलें आहे.

खर्जूरादि चूर्ण.

खर्जूरामलबीजानि पिप्पली च शिलाजतु ।
एलामधुकपाषाणचन्दनोर्वारुबीजकम् ॥ १ ॥
धान्याकं शर्करायुक्तं पातव्यं ज्येष्ठवारिणा ।
अङ्गदाहं लिङ्गदाहं गुदवंक्षणशुक्रजम् ॥ २ ॥
शर्कराश्मरिशूलघ्नं वृष्यं बलकरं परम् ।
नाशयेन्मूत्ररोगांश्च तथा शुक्रभवानपि ॥
शर्करासहितं यष्टीकषायं प्रपिबेत्तदा ॥ ३ ॥

खजूर, आवळकाठींतील बी, पिंपळी, शिलाजित, वेलदोडे, जेष्टमध, पाषाणभेद, चंदन, वाळकाचें बी व धने ह्यांचें चूर्ण साखर मिसळून जेष्टमधाच्या काढ्याबरोबर घ्यावें. म्हणजे तें अंगदाह, गुह्येंद्रियाचा दाह, गुद, जांडसंधी व शुक्राशय ह्यांमधील दाह, मूत्रशर्करा, अश्मरी, शूल, मूत्रजन्य रोग व शुक्रजन्य रोग ह्यांचा नाश करितें. हें वृष्य व उत्तम शक्ति वाढविणारें आहे. जेष्टमधाचा काढा घ्यावयाचा तो साखर घालून घ्यावा.

वैद्यजीवन.

अयि नितम्बिनि खेलनलालसे मधुरवाणि निकाममदालसे ।
वपुषि दाहवतां विहितं हितं हिमहिमांशुजलैरनुलेपनम् ॥ १ ॥

हे काममदालसे, मधुरभाषिणी, क्रीडनलालसे नितंबिनी, दाह

होत असलेल्या रोग्याच्या अंगाला चंदन व कापूर ह्यांचा पाण्यांतून लेप करावा. तो हितकारक आहे.

सहस्रधौतेन घृतेन दिग्धदेहस्य दाहः कृशतां बिभर्ति ।
अन्याङ्गनासंगमसादरस्य स्वीयेषु दारेषु यथाऽभिलाषः ॥२॥

परस्त्रीशीं संग करण्याविषयीं सादर असणाऱ्या पुरुषाला जसा स्वस्त्रीचे ठायीं अभिलाष नसतो त्याप्रमाणें, हजार वेळ पाणी घालून धुऊन टाकलेल्या सहस्रधौतघृताचा अंगास लेप केला असतां दाह कमी होतो.

तृड्दाहमोहाः प्रशमं प्रयान्ति निम्बप्रवालोत्थितफेनलेपात् ।
यथा नराणां धनिनां धनानि समागमाद्वारविलासिनीनाम् ३

वारवनितांच्या समागमानें जसा धनिक पुरुषांच्या धनांचा क्षय होतो, त्याप्रमाणें कडुलिंबाच्या पानाचा रस काढतांना त्यावर येणारा फेंस घेऊन त्याचा अंगास लेप असतां तहान, दाह व मूर्च्छा ह्यांची शांति होते.

कुशाद्य तैल व घृत.

कुशादिशालिपर्णीयजीवकर्षभसाधितम् ।
तैलं घृतं वा दाहघ्नं वातपित्तविनाशनम् ॥ १ ॥

कुशादि गण, साळवण, जीवक आणि ऋषभक ह्या औषधांच्या कल्कानें व काढ्यानें सिद्ध केलेलें तेल किंवा तूप दाह आणि वातपित्त ह्यांचा नाश करितें.

शाखाश्रयां यथान्यायं रोहिणीं व्यधयेच्छिराम् ।
रक्तजातस्ततो दाहः प्रशाम्यति न संशयः ॥ २ ॥

हाताची जी रोहिणी नांवाची शीर आहे, तिचा यथायोग्य रीतीनें वेध करावा, म्हणजे रक्तजन्य दाहाची शांति होते.

धातुक्षयोत्थदाहं तु जयेदिष्टार्थसाधनैः ।
क्षीरमांसरसाहारैर्विधिनोक्तेन तत्र च ॥ ३ ॥

धातुक्षयजन्य दाह शांत होण्याकरितां योग्य ते उपाय करावे

---

१. कुश (पांढरा दर्भ), काश (कसई गवत), नल (देवनळ), दर्भ (लहान दर्भ) व कांडेक्षु (पांढरा ऊंस) ह्याला कुशादि गण म्हणतात.

आणि तो जिंकावा; किंवा दूध व मांसरस ह्यांची त्याजवर विधियुक्त योजना करावी.

पित्तज्वरहरः सर्वः पित्तदाहे विधिर्मतः ।
औदुम्बरस्य निर्यासः सितया दाहनाशनः ।

पित्तजन्य दाहावर सर्व पित्तज्वरनाशक उपचार करावे. उंबराचा चीक साखरेशीं द्यावा. तो दाहशांति करितो.

छिन्नासारः सितायुक्तः पित्तज्वरनिषूदनः ॥ ४ ॥

गुळवेलीचा काढा साखर घालून द्यावा; तो पित्तज्वर व पित्तज दाह ह्यांचा नाश करतो.

रसादि गुटिका.

रसबलिघनसारचन्दनानां सनलदसेव्यपयोदजीवनानाम् ।
अपहरति गुटी मुखस्थितेयं सकलसमुत्थितदाहमश्रमेण ॥१॥

पारा, गंधक, कापूर, चंदन, जटामांशी, काळा वाळा, नागरमोथे, व जीवनीय गणांतील औषधें ह्यांच्या गोळ्या कराव्या; आणि त्यांतील एक गोळी तोंडांत धरावी. म्हणजे सर्व प्रकारचा दाह सहज बरा होतो.

चंद्रकलारस.

गगनदरदयुक्तं शुद्धसूतं च गन्धं
प्रहरमथसुपिष्टं वल्लयुग्मं नरोऽद्यात् ।
ज्वरहरगजसिंहः शृंगबेरोदकेन
प्रथमजनितदाहे तक्रभक्तं च भोज्यम् ॥ १ ॥

अभ्रकभस्म, शुद्ध हिंगुळ, पारा व गंधक ह्यांचा एक प्रहरभर खल करून ठेवावा. ह्याला ज्वरहरगदसिंह असें म्हणतात. हा दोन वालप्रमाणानें आल्याच्या रसाशीं भक्षण करावा; दाह होऊं लागला असतां ताक व भात खावा.

प्रत्येकं तोलमादाय सूतं ताम्रं तथाऽभ्रकम् ।
द्विगुणं गंधकं चैव कृत्वा कज्जलिकां शुभाम् ॥ १ ॥
मुस्तादाडिमदूर्वोत्थैः केतकीस्तनजद्रवैः ।
सहदेव्याः कुमार्याश्च पर्पटस्यापि वारिणा ॥ २ ॥
रामशीतलिकातोयैः शतावर्या रसेन च ।
भावयित्वा प्रयत्नेन दिवसे दिवसे पृथक् ॥ ३ ॥

तिक्तागुडूचिकासत्वं पर्पटोशीरमाधवी ।
श्रीगन्धं सारिवा चैषां समानं सूक्ष्मचूर्णितम् ॥ ४ ॥
द्राक्षाफलकषायेण सप्तधा परिभावयेत् ।
ततो धान्याश्रयं कृत्वा वट्यः कार्याश्चणोपमाः ॥ ५ ॥
अयं चन्द्रकलानाम्ना रसेन्द्रः परिकीर्तितः ।
सर्वपित्तगदध्वंसी वातपित्तगदापहः ॥ ६ ॥
अन्तर्बाह्यमहादाहविध्वंसनमहाघनः ।
ग्रीष्मकाले शरत्काले विशेषेण प्रशस्यते ॥ ७ ॥
कुरुते नाग्निमान्द्यं च महातापज्वरं हरेत् ।
भ्रममूर्च्छाहरश्चाशु स्त्रीणां रक्तं महास्रवम् ॥ ८ ॥
ऊर्ध्वाधो रक्तपित्तं च रक्तवान्ति विशेषतः ।
मूत्रकृच्छ्राणि सर्वाणि नाशयेन्नात्र संशयः ॥ ९ ॥

पारा, ताम्रभस्म व अभ्रकभस्म हीं एकएक तोळा व गंधक दोन तोळे घेऊन सर्वांची कज्जली करावी. नंतर नागरमोथे, डाळिंब, दूर्वा, केवड्याच्या कळ्या, सहदेवी, कुमारी, पित्तपापडा, मरवा व शतावरी ह्यांच्या रसाची एक एक दिवस वेगवेगळी भावना द्यावी. आणि कुटकी, गुळवेलींचें सत्व, पित्तपापडा, वाळा, मधुमालती, चंदन व उपळसरी ह्यांचें समभाग चूर्ण करून त्यांत घालून द्राक्षाच्या काढ्यानें सात दिवस भावना द्याव्या. नंतर तें तीन दिवस धान्यराशींत पुरून ठेवून काढून त्याच्या हरभऱ्याएवढ्या गोळ्या कराव्या. ह्याला चंद्रकलारस म्हणतात. हा सर्व पित्तरोग व वातपित्तरोग ह्यांचा नाश करितो. हा अंतर्बाह्य महान दाहाचा नाश करतो. हा ग्रीष्मऋतूमध्यें आणि विशेषतः शरदृतूमध्यें घेण्यास प्रशस्त आहे. हा अग्निमांद्य न करितां महादाहयुक्त ज्वराचा नाश करतो. भ्रम व मूर्च्छा ह्यांचा नाश करितो. स्त्रियांच्या वाढलेल्या रक्तप्रदराचा नाश करितो. उर्ध्वगामी रक्तपित्त व अधोगामी रक्तपित्त, विशेषतः रक्ताची वांति ह्यांचा नाश करितो, आणि सर्व प्रकारच्या मूत्रकृच्छ्राचा नाश करितो, ह्यांत संशय नाहीं.

पथ्यापथ्य.

शालयः षष्टिका मुद्गा मसूराश्चणका यवाः ।

धन्वमांसरसा लाजा मण्डो वै सक्तवः सिता ॥ १ ॥
श[illegible]धौतघृतं दुग्धं नवनीतं पयोभवम् ।
कूष्माण्डं कर्कटी मोचं पनसं स्वादुदाडिमम् ॥ २ ॥
पटोलं खर्जुरं तुम्बी बिम्बी द्राक्षा कसेरुकम् ।
इति दाहवतां नृणां पथ्यवर्ग उदाहृतः ॥ ३ ॥

साठ्या साळी, मूग, मसुरा, हरभरे, सातू, धन्व (जांगल) देशांतील प्राण्यांच्या मांसाचा रस, लाह्याचा मंड, लाह्याचें पीठ, साखर, शतधौत घृत, दूध, दुधावरील लोणी, कोहळा, काकडी, केळें, फणस, गोड डाळिंब, पडवळ, खजूर, दुध्या भोपळा, तोंडलीं द्राक्षें व कचरा हे पदार्थ दाहरोग्याला पथ्यकारक आहेत.

व्यायाममातपं तक्रं ताम्बूलं मधु रामठम् ।
व्यवायं कटुतिक्तोष्णं दाहवान्परिवर्जयेत् ॥ ४ ॥

व्यायाम, ऊन, ताक, विडा, मध, हिंग, मैथुन, तिखट, कडु व उष्ण पदार्थ दाहरोग्यानें वर्ज करावे.

उन्मादनिदान.

मदयन्त्युद्धता दोषा यस्मादुन्मार्गमाश्रिताः ।
मानसोऽयमतो व्याधिरुन्माद इति कीर्तितः ॥ १ ॥

वाढलेले दोष उन्मार्गगामी होऊन मनोवह स्रोतसांत शिरून मनुष्याला मद उत्पन्न करितात. म्हणून ह्या मानासिक व्याधीला उन्माद असें म्हणतात.

एकैकशः सर्वशश्च दोषैरत्यर्थमूर्छितैः ।
मानसेन च दुःखेन स पञ्चविध उच्यते ॥ २ ॥
विषाद्भवति षष्ठश्च यथास्वं तत्र भेषजम् ।
स चाप्रवृद्धस्तरुणो मदसंज्ञां बिभर्ति च ॥ ३ ॥
भयोद्वेगौ तमः शोषो गात्राणामपकर्षणम् ।
मृत्यूत्साहोऽरुचिश्चान्ने स्वप्नेष्वम्बुषु मज्जनम् ॥ ४ ॥
वायुनोन्मादनं चैव भ्रमक्रमगतस्य च ।
यस्य स्यादचिरेणैवमुन्मादं सोऽपि गच्छति ॥ ५ ॥

परस्परांनीं व्यापलेल्या वातादि प्रत्येक दोषाच्या प्रकोपानें एक एक, सर्व दोषांमुळें एक व मानसिक दुःखामुळें एक, मिळून पांच, आणि विषापासून सहावा, असे उन्मादाचे सहा प्रकार आहेत. त्यां-

ज्वर त्या त्या दोषाला अनुसरून चिकित्सा करावी. उन्माद फार न वाढतां नवीन स्थितींत आहे तोंपर्यंत त्याला मद असें म्हणतात. भय, उद्वेग, अंधारांत बसल्यासारखें वाटणें, शोष, शरीराचे अवयव कृश होणें, मृत्यूविषयीं उत्साह असणें, अन्नाची चव नसणें, स्वप्नामध्यें पाण्यांत बुडणें, वातानें उन्मत्त होणें, श्रम व थकवा असणें ह्या लक्षणांनीं युक्त उन्मादाचा रोगी वांचत नाहीं; आणि ज्याला त्वरित उन्माद होतो, तोही वांचत नाहीं.

कारण व संप्राप्ति.

विरुद्धदुष्टाशुचिभोजनानि प्रधर्षणं देवगुरुद्विजानाम् ।
उन्मादहेतुर्भयहर्षपूर्वो मनोभिघातो विषमाश्च चेष्टाः ॥ ६ ॥

विरुद्ध, दूषित व अपवित्र अन्न खाण्यानें देव, गुरु व ब्राह्मण यांचा तिरस्कार केल्यानें, अत्यंत भीति वाटल्यानें, आनंद झाल्यानें, मनाला धक्का बसल्यामुळें, वाकड्या तिकडया अंगानें कसरती केल्यानें, किंवा बलवानाशीं झोंबी केल्यानें उन्माद उत्पन्न होतो.

तैरल्पसत्त्वस्य मलाः प्रदुष्टा बुद्धेर्निवासं हृदयं प्रदूष्य ।
स्रोतांस्यधिष्ठाय मनोवहानि प्रमोहयन्त्याशु नरस्य चेतः ॥७॥

ह्या वर सांगितलेल्या कारणांमुळें दूषित झालेले दोष कोमल मनाच्या किंवा अल्प सत्वगुणी मनुष्याच्या हृदयाला दूषित करून मनोवह स्रोतसांमध्यें शिरून मनाला मोहित करितात. ह्या रोगाला उन्माद असें म्हणतात.

उन्मादाचें सामान्य लक्षण.

धीविभ्रमः सत्त्वपरिप्लवश्च पर्याकुला दृष्टिरधीरता च ।
अबद्धवाक्यं हृदयं च शून्यं सामान्यमुन्मादगदस्य लिङ्गम् ॥ १ ॥

बुद्धिभ्रंश, मनाला चंचळपणा, कावऱ्या-बावऱ्यासारखी दृष्टि असणें, भित्रेपणा, असंबद्ध भाषण व विचारशक्ति नसणें हीं उन्मादरोग्याचीं सामान्य लक्षणें आहेत.

वातोन्मादलक्षण.

रूक्षाल्पशीतान्नविरेकधातुक्षयोपवासैरनिलः प्रवृद्धः ।

चिन्तादिदुष्टं हृदयं प्रदूष्य बुद्धिं स्मृतिं चाप्युपहन्ति शीघ्रम् ॥१॥
अस्थानहासस्मितनृत्यगीतवाद्याङ्गविक्षेपणरोदनानि ।
पारुष्यकार्श्यारुणवर्णता च जीर्णे बलं चानिलजस्य रूपम् ॥ २ ॥

रूक्ष, थोडें व थंड अन्न खाण्यानें, रेच किंवा वांति पुष्कळ झाल्यानें, धातुक्षीणतेमुळें आणि उपास करण्यानें वाढलेला वायु, काळजीमुळें दूषित झालेलें मन अधिकच दूषित करून बुद्धि व स्मरणशक्ति ह्यांचा नाश करितो. ह्यामुळें तो मनुष्य कारण नसतांही हंसतो, किंवा हंसल्यासारखें करतो; नाचतो, गातो, वेडें-वांकडें बोलतो, हावभाव करतो, रडतो. त्याचें अंग खरखरीत होतें, तो कृश होतो, त्याच्या अंगाला तांबूस रंग येतो; आणि खाल्लेलें अन्न जिरलें म्हणजे रोग बळावतो. ह्याला वातजन्य उन्माद म्हणतात.

पित्तोन्मादलक्षण.

अजीर्णकट्वम्लविदाह्यशीतैर्भोज्यैश्चितं पित्तमुदीर्णवेगम् ।
उन्मादयत्युग्रमनात्मकस्य हृदि स्थितं पूर्ववदाशु कुर्यात् ॥ १ ॥
अमर्षसंरम्भविनग्नभावाः संतर्जनाभिद्रवणौष्ण्यरोषाः ।
प्रच्छायशीतान्नजलाभिलाषाः पीता च भा पित्तकृतस्य लिङ्गम् ।

अपक्क किंवा तिखट, आंबट, विदाही व उष्ण असें अन्न खाण्यानें सांचलेलें पित्त वर चढून हृदयांत जाऊन मनसोक्त वागणाऱ्या मनुष्याला उग्र असा उन्मादरोग उत्पन्न करितें. त्यामुळें त्याची सहनशीलता नष्ट होते. तो चिडखोर बनतो, नग्न राहतो, शिव्या देतो व पळतो. त्याचें अंग उष्ण असतें, तो रागावतो, त्याला सावलींत बसण्याची इच्छा होते. थंड पाणी व थंड पदार्थ खावेसे वाटतात, त्याच्या अंगाचा वर्ण पिंवळा होतो; ह्या उन्मादाला पित्तजन्य उन्माद म्हणतात.

कफोन्मादलक्षण.

संपूरणैर्मन्दविचेष्टितस्य सोष्मा कफो मर्मणि संप्रवृद्धः ।
बुद्धिं स्मृतिं चाप्युपहन्ति चित्तं प्रमोहयन्संजनयेद्विकारम् ॥ १ ॥
वाक्चेष्टितं मन्दमरोचकश्च नारीविविक्तप्रियता च निद्रा ।
छर्दिश्च लाला च बलं च भुक्ते नखादिशौक्ल्यं च कफात्मके स्यात् ॥

यथेच्छ जेवण करून व्यायाम न करणाऱ्या मनुष्याचा कफ प्रकुपित होऊन पित्तासहवर्तमान हृदयामध्यें शिरून बुद्धि व स्मृति ह्यांना नष्ट करतो आणि मनाला मोहित करून उन्मादरोग उत्पन्न करितो. त्यामुळें तो थोडें बोलतो, त्याच्या तोंडाला रुचि नसते. त्याला स्त्रियांमध्यें वागणें व एकांतांत राहणें आवडतें; त्याला झोंप फार येते; ओकारी असते; तोंडातून लाळ गळते; जेवलें म्हणजे रोगाला जोर चढतो; नखें, डोळे व त्वचा हीं शुभ्रवर्ण होतात. ह्याला कफजन्य उन्माद म्हणतात.

सान्निपातिक उन्माद.

यः संनिपातप्रभवोऽतिघोरः सर्वैः समस्तैरपि हेतुभिः स्यात् ।
सर्वाणि रूपाणि बिभर्ति तादृग्विरुद्धभैषज्यविधिर्विवर्ज्यः ॥ १ ॥

जो सर्व दोषांपासून व सर्व कारणांमुळें होतो, तो सन्निपातज उन्माद समजावा. त्यामध्यें सर्व दोषांचीं लक्षणें असतात. ह्याजवरील उपचार परस्परविरुद्ध होतात (त्यामुळें ते गुणावह होत नाहींत), म्हणून ह्याजवर औषध देऊं नये.

मनोदुःखज उन्माद.

चौरैर्नरेन्द्रपुरुषैररिभिस्तथाऽन्यै-
विंत्रासितस्य धनबान्धवसंक्षयाद्वा ।
गाढं क्षते मनसि च प्रियया रिरंसो
र्जायेत चोत्कटतरो मनसो विकारः ॥
चित्रं ब्रवीति च मनोनुगतं विसंज्ञो
गायत्यथो हसति रोदिति चातिमूढः ॥ १ ॥

चोर, राजपुरुष, शत्रु किंवा इतर कोणी मनुष्य ह्यांच्याकडून अत्यंत भीति वाटल्यामुळें, धनवान मनुष्याचें धन नाहींसें झाल्यामुळें, बंधु वगैरे आप्तांच्या नाशामुळें, शोकाकुल झालेल्या मनुष्याच्या मनाला एकदम धक्का बसल्यामुळें किंवा आपल्याला प्रिय अशा स्त्रीची प्राप्ति न झाल्यामुळें उग्र असा मानसिक उन्माद उत्पन्न होतो. त्यामुळें तो कांहीं तरी विचित्र बोलतो, मनांतील गुप्त गोष्ट सांगतो; त्याला स्मरण राहत नाहीं; गातो, हसतो, रडतो व मूर्खासारखें करितो; याला शोकज उन्माद म्हणतात.

विषज उन्माद.

रक्तेक्षणो हतबलेन्द्रियभाः सुदीनः
श्यावाननो विषकृतेन भवेद्विसंज्ञः ॥ १ ॥

विषजन्य उन्मादामध्यें डोळे लाल होतात, रोग्याची शक्ति नाहींशी होते, इंद्रियांचें सामर्थ्य नाहींसें होतें, अंग निस्तेज होतें, तो दीनवाणा होतो, आणि त्याचें तोंड काळसर होतें. ह्या विषजन्य उन्मादामध्यें मनुष्याचें ज्ञान नाहींसें होतें.

असाध्य लक्षण.

अवाङ्मुखश्चोन्मुखो वा क्षीणमांसबलो नरः ।
जागरूको ह्यसंदेहमुन्मादेन विनश्यति ॥ १ ॥

उन्मादाचा जो रोगी खालीं तोंड घालून बसतो, किंवा वर तोंड करून बसतो, ज्याचें मांस व बल क्षीण झालें आहे; व ज्याला झोंप येत नाहीं, तो मनुष्य उन्मादानें निःसंशय नाश पावतो.

उन्मादचिकित्सा.

आश्वासयेत्सुहृद्वाक्यैर्ब्रूयादिष्टविनाशनम् ।
दर्शयेदद्भुतं कर्म ताडयेच्च कशादिभिः ॥ १ ॥
सुबद्धं विजने गेहे त्रासयेदहिभिर्धिया ।
बद्धं सर्षपतैलाक्तं न्यसेदुत्तानमातपे ॥ २ ॥
कपिकच्छ्वाऽथ वा तप्तलोहतैलजलैः स्पृशेत् ।
वस्त्राभिधाने कूपे वा सततं च निवेशयेत् ॥ ३ ॥
सततं धूपयेच्चैनं गोमांसैश्च सपूतिभिः ।
कामशोकभयक्रोधहर्षेर्ष्यालोभसंभवान् ॥ ४ ॥
परस्परप्रतिद्वंद्वैरेभिरेव शमं नयेत् ।

उन्मादाच्या रोग्याला उत्तम भाषणानें आश्वासन द्यावें. इष्ट वस्तूचा नाश झाला म्हणून सांगावें. अद्भुत गोष्टी दाखवाव्या. चाबकानें मार द्यावा. ज्या ठिकाणीं कोणी मनुष्य नाहीं अशा ठिकाणीं त्याला बांधून ठेवावा. त्याच्या अंगावर साप टाकल्यासारखें करून त्याला त्रासवावें. त्याला बांधून अंगाला शिरसाचें तेल चोपडून उन्हांत उताणें निजवावें. कुहिली, तापलेलें लोखंड, तेल, किंवा पाणी ह्यांचा त्याला स्पर्श करावा. किंवा हे जिन्नस तोंडांत घालण्याची भीति दाखवावी. विहिरींत टाकून द्यावा. कुजलेल्या गो-

मांसाची त्याला सतत धुरी द्यावी. काम, शोक, भय, क्रोध, हर्ष, ईर्ष्या, लोभ वगैरे मनोविकार उत्पन्न करून त्यांच्या परस्परविरुद्ध क्रियांनीं त्याला शांत करावें (उन्मादाची शांति करावी).

जलाग्निद्रुमशैलेभ्यो विषमेभ्यश्च तं सदा ॥ ५ ॥
रक्षेदुन्मादिनं चैव सद्यः प्राणहरं हि तत् ।
यच्चोपदेक्ष्यते किंचिदपस्मारे चिकित्सितम् ॥ ६ ॥
उन्मादे तच्च कर्तव्यं सामान्याद्दोषदूष्ययोः ।
स्नेहादिना क्रमेणाऽऽदावुन्मादिनमुपाचरेत् ॥ ७ ॥
वस्तिभिः स्नेहकल्कैश्च निरूहैः स्वेदनाञ्जनैः ।
वातिके स्नेहपानं प्राग्विरेकः पित्तसंभवे ।
कफजे वमनं कार्यं परो बस्त्यादिकः क्रमः ॥ ८ ॥

पाणी, अग्नि, वृक्ष, पर्वत व अपघात होण्यासारखी जागा ह्यांपासून उन्मादी रोग्याचें रक्षण करावें. कारण हीं ठिकाणें तत्काळ प्राण हरण करणारीं असतात. उन्माद व अपस्मार ह्यांमध्यें दोष व दूष्यें हीं सारखींच असतात, म्हणून जे अपस्मारावरील उपचार तेच उन्मादावरही करावे. आधीं उन्मादी रोग्याची स्नेहादि पंचकर्मानें चिकित्सा करावी. स्नेहबस्ती, निरूहबस्ती, स्वेदन व अंजन हे उपचार करावे. वातजन्य उन्मादावर प्रथम स्नेहपान करावें. पित्ताधिक उन्मादावर रेचन द्यावें. कफज उन्मादावर वमन द्यावें. नंतर बस्ती वगैरे उपचार करावे.

ब्राह्मयादि स्वरस.

ब्राह्मीकूष्माण्डषड्ग्रन्थाशङ्खिनिस्वरसाः पृथक् ।
मधुकुष्ठयुताः पीताः सर्वोन्मादापहारिणः ॥ १ ॥

ब्राह्मी, कोहळा, वेखंड व शंखपुष्पी ह्या प्रत्येकाचे स्वरस मध व कोष्ट घालून प्यावे. ते सर्व उन्मादांचा नाश करितात.

ब्राह्मयादि कल्क.

ब्राह्मीरसः स्यात्सवचः सकुष्ठः सशङ्खपुष्पः ससुवर्णचूर्णः ।
उन्मादिनामुन्मदमानसानामपस्मृतेर्भूतहतात्मनां हि ॥
नस्येऽञ्जने पानविधौ च शस्तो ब्राह्मीरसोऽयं सवचादिचूर्णः ॥

वेखंड, कोष्ट, शंखपुष्पी व सोन्याचा वर्ख ह्यांचें चूर्ण घालून ब्राह्मीचा रस, ज्याला उन्माद झाला आहे, ज्याचें मन उन्मत्त झालें

आहे, ज्याला अपस्मार किंवा भूतोन्माद झाला आहे, अशा रोग्याला द्यावा. हा वेखंडादिकांचें चूर्ण घालून तयार केलेला ब्राह्मीचा स्वरस नस्य, अंजन व प्राशन करणें ह्यांविषयीं प्रशस्त आहे.

त्र्यूषणादि वर्ति.

त्र्यूषणं हिंगु लवणं वचा कटुकरोहिणी ।
शिरीषनक्तमालानां वीजं श्वेताश्च सर्षपाः ॥ १ ॥
गोमूत्रपिष्टैरेतैस्तु वर्तिर्नेत्राञ्जने हिता ।
चातुर्थिकमपस्मारमुन्मादं च नियच्छति ॥ २ ॥

सुंठ, मिरें, पिंपळी, हिंग, सैंधलोण, वेखंड, कुटकी, शिरसाचें बीं, करंजाचें बीं व पांढरे शिरस ह्यांचें चूर्ण करून गोमूत्रांत खलून लांबट गोळ्या (वातीसारख्या गोळ्या) कराव्या. ह्या गोळींचें अंजन करावें. तें उन्मादास हितकारक आहे. तें चातुर्थिक ज्वर, अपस्मार व उन्माद ह्यांचा नाश करितें.

शिरीषादि वर्ति.

शिरीषं लशुनं हिंगु नागरं मधुकं वचा ।
कुष्ठं च बस्तमूत्रेण पिष्टं स्यान्नावनाञ्जनम् ॥ १ ॥

शिरसाचें बीं, लसूण, हिंग, सुंठ, जेष्ठमध, वेखंड, कोष्ट, ह्यांचें चूर्ण बोकडाच्या मुतांत खलून ठेवावें. हें नस्य व अंजन करण्यास प्रशस्त आहे.

तद्वद्व्योषं हरिद्रे द्वे मंजिष्ठा गौरसर्षपाः ।
शिरीषबीजमुन्मादग्रहापस्मारनाशनम् ॥ २ ॥

त्याचप्रमाणें सुंठ, मिरें, पिंपळी, हळद, दारुहळद, मंजिष्ठ, पांढऱ्या मोहऱ्या व शिरसाचें बीं ह्यांचें अंजन किंवा नस्य उन्माद, बालग्रह व अपस्मार ह्यांचा नाश करितें.

सिद्धार्थकादि योग.

सिद्धार्थकवचाहिंगु करंजो देवदारु च ।
मंजिष्ठा त्रिफला श्वेता कटभीत्वकटुत्रयम् ॥ १ ॥
समांशानि प्रियंगुश्च शिरीषो रजनीद्वयम् ।
बस्तमूत्रेण पिष्टोऽयमगदः पानमंजनम् ॥ २ ॥
नस्यमालेपनं चैव स्नानमुद्वर्तनं तथा ।
अपस्मारविषोन्मादकृत्यालक्ष्मीज्वरापहः ॥ ३ ॥

भूतेभ्यश्च भयं हन्ति राजद्वारे च शस्यते।
सर्पिरेतेन सिद्धं वा सगोमूत्रं तदर्थकृत् ॥ ४ ॥

मोहऱ्या, वेखंड, हिंग, करंजाची बीं, देवद्वार, मंजिष्टा, त्रिफळा, पांढरी किन्ही, दालचिनी, सुंठ, मिरीं, पिंपळी, गव्हला, शिरसाचें बीं, हळद, दारुहळद या सर्व औषधांचें चूर्ण करून त्याचा बोकडाच्या मुतांत खल करावा. ह्याला अगद म्हणतात. ह्याचा अंजन, नस्य, अंगाला लेपन, स्नान, उटणें वगैरे प्रकारांनीं उपयोग करावा. म्हणजे अपस्मार, विष, उन्माद, कृत्या (राक्षसबाधा), दारिद्य्र व ज्वर ह्यांचा नाश होतो. भूतबाधेची भीति राहत नाहीं. राजद्वारामध्यें देखील आदर होतो. ह्याच औषधांचें चूर्ण व गोमूत्र घालून तूप सिद्ध करावें. तेंही ह्याप्रमाणें गुण करितें.

सितकुसुमबलादि योग.

सितकुसुमबलायाः सार्धकर्षत्रयं यः
शिखरिचरणकेन क्षीरपाकेण पक्वम् ।
पिबति तदनु नित्यं प्रातरुत्थाय शीतं
जयति झटिति घोरं व्याधिमुन्मादसंज्ञम् ॥ १ ॥

पांढऱ्या फुलांच्या चिकण्याचें मूळ साडेतीन तोळे आणि आघाड्याचें मूळ ह्यांचा दुधांत काढा करून थंड झाल्यावर प्रातःकाळीं घ्यावा. तो उन्माद रोगाचा त्वरित नाश करितो.

दशमूलादि योग.

दशमूलाम्बु सघृतं युक्तं मांसरसेन वा ।
ससिद्धार्थकचूर्णं वा केवलं वा नवं घृतम् ॥ १ ॥
उन्मादशान्तये पेयो रसो वा कालशाकजः ।
प्रयोज्यं सार्षपं तैलं नस्याभ्यंजनयोः सदा ॥ २ ॥

दशमुळांचा काढा तूप घालून किंवा मांसरस घालून द्यावा; किंवा मोहऱ्यांचें चूर्ण घालून द्यावा. किंवा केवळ नवें (ताजें) तूप उन्माद शांत होण्याकरितां द्यावें. अगर कालशाकेचा रस आणि नेहमीं मोहरीचें तेल नस्य व अभ्यंग ह्यामध्यें योजावें.

हिंग्वादि घृत.

हिंगुसौवर्चलव्योषैर्द्विपलांशैर्घृताढकम् ।

चतुर्गुणे गवां मूत्रे सिद्धमुन्मादनाशनम् ॥ १ ॥

हिंग, पादेलोण, सुंठ, मिरीं, पिंपळी हीं औषधें दोन दोन पळें (आठ आठ तोळे) घेऊन त्यांचा कल्क करून त्यांत २५६ तोळे तूप व तुपाच्या चौपट गोमूत्र घालून तें तूप सिद्ध करावें. तें उन्मादाचा नाश करितें.

कल्याणघृत.

विशाला त्रिफला कौन्ती देवदार्वेलवालुकम् ।
स्थिराऽनन्ता हरिद्रे द्वे सारिवे द्वे प्रियंगुका ॥ १ ॥
नीलोत्पलैलामंजिष्ठादन्तीदाडिमकेसरम् ।
विडंगं पृश्निपर्णी च कुष्ठं चन्दनपद्मके ॥ २ ॥
तालीसपत्रं बृहती मालत्याः कुसुमं नवम् ।
एतैः कर्षसमैः कल्कैर्विंशत्यष्टाभिरेव च ॥ ३ ॥
चतुर्गुणं जलं दत्त्वा घृतप्रस्थं विपाचयेत् ।
अपस्मारे ज्वरे शोषे कासे मन्दानले क्षये ॥ ४ ॥
वातरक्ते प्रतिश्याये तृतीयकचतुर्थके ।
वातार्शोमूत्रकृच्छ्रेषु विसर्पोपहतेषु च ॥ ५ ॥
कण्डूपाण्ड्वामयोन्मादविषमेहगदेषु च ।
भूतोपहतचित्तानां दंतादानामचेतसाम् ॥ ६ ॥
शस्तं स्त्रीणां च वन्ध्यानां धन्यमायुर्बलप्रदम् ।
अलक्ष्मीपापरक्षोघ्नं सर्वग्रहनिवारणम् ॥
कल्याणकमिदं सर्पिः श्रेष्ठं पुंस्त्वप्रदं नृणाम् ॥ ७ ॥

कवंडळ, हिरडा, बेहडा, आवळकाठी, रेणुकबीज, देवद्वार, शेंदाड, साळवण, धमासा, हळद, दारूहळद, काळी व पांढरी उपलसरी, गव्हला, निळें कमळ, वेलदोडे, मंजिष्ट, दांतीमूळ, डाळिंब, नाकेशर, वावडिंग, पिठवण, कोष्ट, चंदन, पद्मकाष्ट, तालीसपत्र, डोरलीमूळ, मालतीचीं ताजीं फुलें, हीं अठ्ठावीस औषधें तोळातोळा प्रमाणें घेऊन कल्क करून त्यांत चौसष्ट तोळे तूप चौपट पाणी घालून सिद्ध करावें. हें अपस्मार, ज्वर, शोष, खोकला, अग्निमांद्य, क्षय, वातरक्त, पडसें, तृतीयक व चातुर्थिक ज्वर, वातजन्य मूळव्याध, मूत्रकृच्छ्र, विसर्प, कंडु, पांडुरोग, उन्माद, विषबाधा, प्रमेह, भूतोन्माद, दंतरोग व मूर्च्छा ह्या रोगांवर प्रशस्त आहे.

हें वंध्या स्त्रियांना उपयोगी असून आयुष्य, बल व संपत्ति ह्यांना देतें. हें दारिद्र्य, पाप, राक्षसबाधा व सर्व ग्रहबाधा ह्यांचें निवारण करितें. हें कल्याणघृत पुरुषत्वदायक असून श्रेष्ठ आहे.

चैतसघृत.

पञ्चमूली च काश्मर्यो रास्नैरण्डस्त्रिवृद्बला।
मूर्वा शतावरी चेति क्वाथैर्द्विपलिकैः शुभैः॥ ८॥
कल्याणकस्य चाङ्गेन चैतसं नाम तद् घृतम्।
सर्वचेतोविकाराणां शमनं परमं मतम्॥ ९॥
कार्यः कषायो द्विगुणः क्वाथान्मस्तु कलागुणम्।
कल्याणकोक्तकल्केन पादांशेन घृतं पचेत्॥ १०॥

लघुपंचमुळें, शिवणीचीं फळें, रास्ना, एरंडमूळ, तेड, चिकणा, मोरवेल व शतावरी हीं औषधें आठ आठ तोळे घेऊन त्यांचा काढा करून कल्याणकघृताप्रमाणें त्याच घृतांतील औषधांचा कल्क घालून हेंही घृत तयार करावें. ह्याला चैतसघृत असें म्हणतात. हें सर्व मानसिक विकारांचें शमन करितें. हें तूप तयार करितांना पंचमूलादि औषधांचा काढा तुपाच्या दुप्पट घ्यावा; आणि मस्तु (दह्यावरील निवळ) काढ्याच्या सोळापट घ्यावी. कल्याणकघृतामध्यें जीं अठ्ठावीस औषधें आहेत, त्यांचा कल्क तुपाच्या चवथाई घ्यावा आणि तूप सिद्ध करावें.

सूतं गन्धं शिलातुल्यं स्वर्णबीजं विचूर्ण्य च।
भावयेदुग्रगन्धायाः क्वाथे मुनिदिनैः पृथक्॥ १॥
रास्नाक्वाथेन सप्तैव भावयित्वा विचूर्णयेत्।
रसः संजायते नूनमुन्मादगजकेसरी॥ २॥
अस्य माषः ससर्पिष्को लीढो हन्ति हठाद्ध्रुवम्।
उन्मादाख्यमपस्मारं भूतोन्मादमपि ज्वरम्॥ ३॥

उन्मादगजकेसरी रस.

पारा, गंधक व मनशीळ हीं समभाग आणि सर्वांच्या बरोबर धोतऱ्याचें बी ह्यांचा वेखंडाच्या काढ्यांत सात दिवस खल करावा. नंतर रास्न्याच्या काढ्यांत सात दिवस खल करून चूर्ण करून ठेवावें. ह्याला उन्मादगजकेसरीरस असें म्हणतात. हा एक मासा

प्रमाणानें तुपांतून द्यावा, म्हणजे निश्चयानें उन्माद, अपस्मार, भूतोन्माद व ज्वर ह्यांचा नाश करितो.

प्रसादश्चेन्द्रियार्थानां बुद्ध्यात्ममनसामपि ।
धातूनां प्रकृतिस्थत्वं विगतोन्मादलक्षणम् ॥ १ ॥

इंद्रियें आपआपले विषय ग्रहण करण्याविषयीं सुप्रसन्न असणें, बुद्धि, आत्मा व मन ह्यांना देखील प्रसन्नता असणें, सर्व धातु (दोष) स्वस्थानीं सुव्यवस्थित असणें, हें उन्मादरोग बरा झाल्याचें लक्षण आहे.

पथ्यापथ्य.

गोधूममुद्गारुणशालयश्च धारोष्णदुग्धं शतधौतसर्पिः ।
घृतं नवीनं च पुरातनं च कूर्मामिषं धन्वरसा रसाला ॥ १ ॥
पुराणकूष्माण्डफलं पटोलं ब्राह्मीदलं वास्तुकतण्डुलीयम् ।
द्राक्षा कपित्थं पनसं च वैद्यैर्विधेयमुन्मादगदेषु पथ्यम् ॥ २ ॥

गहू, मूग, तामसाळ, धारोष्ण दूध, शतधौत तूप, ताजें किंवा जुनें तूप, कासवाचें मांस, जांगलमांसाचा रस, जुना कोहाळा, पडवळ, ब्राह्मीचा पाला, चंदनबटवा, तांदळी, द्राक्षें, कवठ व फणस हे पदार्थ उन्मादाच्या रोग्याला पथ्याकरितां द्यावे.

मद्यं विरुद्धाशनमुष्णभोजनं निद्राक्षुधातृट्कृतवेगधारणम् ।
तिक्तानि तीक्ष्णानि भिषक्समादिशेदुन्मादरोगापहतेषु गर्हितम् ३

मद्य, विरुद्ध अन्नाचें जेवण, झोंप, भूक, तहान, मलमूत्रांचा वेग धारण करणें, कडू व तीक्ष्ण पदार्थ हे उन्मादरोग्याला अपथ्यकारक आहेत.

भूतोन्मादनिदान.

अमर्त्यवाग्विक्रमवीर्यचेष्टो ज्ञानादिविज्ञानबलादिभिर्यः ।
उन्मादकालो नियतश्च यस्य भूतोत्थमुन्मादमुदाहरन्ति ॥ १ ॥

ज्या रोग्याचें संभाषण, पराक्रम, शक्ति व हालचाल हीं अमानुष असतात, त्याचप्रमाणें ज्याचें तत्वज्ञान, शिल्पज्ञान इत्यादि जाणण्याची शक्ति अमानुष असते, आणि उन्मादाच्या लहरीचा काल ठराविक असतो, त्याला भूतोन्माद असें म्हणतात.

देवजुष्ट उन्माद.

संतुष्टः शुचिरतिदिव्यमाल्यगन्धो
निस्तन्द्रो त्ववितथसंस्कृतप्रभाषी ।
तेजस्वी स्थिरनयनो वरप्रदाता
ब्रह्मण्यो भवति नरः स देवजुष्टः ॥ १ ॥

जो नेहमीं संतुष्ट व पवित्र असतो, ज्याच्या अंगाला दिव्य पुष्पांचा वास अतिशय येतो, ज्याला झोंप येत नाहीं, जो खरें व शुद्ध बोलतो, जो तेजस्वी असतो, ज्याच्या डोळ्यांच्या पापण्या लवत नाहींत, जो दुसऱ्याला आशीर्वाद देतो आणि ब्राह्मणांविषयीं आदर दाखवितो, त्याला देवग्रहाची बाधा आहे म्हणून समजावें.

असुरग्रहलक्षण.

संस्वेदी द्विजगुरुदेवदोषवक्ता
जिह्माक्षो विगतभयो विमार्गदृष्टिः ॥
संतुष्टो न भवति चान्नपानजातै-
र्दुष्टात्मा भवति स देवशत्रुजुष्टः ॥ १ ॥

नेहमीं घामानें युक्त; ब्राह्मण, गुरु व देव ह्यांना दोष देणारा, वांकडी दृष्टि करून पहाणारा, निर्भय वागणारा, कुमार्गाकडे पहाणारा, कितीही अन्नपाणी दिलें तरी संतोष न पावणारा, व दुष्ट बुद्धीचा, अशा मनुष्याला असुरग्रहांनीं बाधा केली म्हणून समजावें.

गंधर्वग्रहजुष्टलक्षण.

हृष्टात्मा पुलिनवनान्तरोपसेवी
स्वाचारः प्रियपरिगीतगन्धमाल्यः ।
नृत्यन्वै प्रहसति चारु चाल्पशब्दं
गन्धर्वग्रहपरिपीडितो मनुष्यः ॥ १ ॥

गंधर्व ग्रहाची बाधा झालेला मनुष्य नेहमीं आनंदी, वाळवंट व अरण्य यांमध्यें फिरणारा, उत्तम आचारशील; गायन, सुगंध व फुलें यांविषयीं लुब्ध असणारा, नाचत नाचत हसणारा आणि थोडेंच पण सुरस भाषण करणारा, अशा प्रकारचा असतो.

यक्षग्रहलक्षण.

ताम्राक्षः प्रियतनुरक्तवस्त्रधारी
गम्भीरो द्रुतगतिरल्पवाक् सहिष्णुः ।

तेजस्वी वदति च किं ददामि कस्मै
यो यक्षग्रहपरिपीडितो मनुष्यः ॥ १ ॥

ज्याचे डोळे लाल असतात, जो आपल्याला आवडेल असें पातळ व लाल वस्त्र पांघरतो, जो गंभीर असून जलद चालणारा, अल्प भाषण करणारा व सहनशील असतो, जो तेजस्वी असून कोणाला काय देऊं, असें म्हणत असतो, तो यक्षग्रहानें पीडला आहे असें समजावें.

पितृग्रहलक्षण.

प्रेतानां स दिशति संस्तरेषु पिण्डा-
ञ्शान्तात्मा जलमपि चापसव्यवस्त्रः ।
मांसेप्सुस्तिलगुडपायसाभिकाङ्क्ष-
स्तद्भक्तो भवति पितृग्रहाभिजुष्टः ॥ १ ॥

जो मनुष्य दर्भ वगैरे पसरून पितरांना पिंड देतो, शांत असून अपसव्य करून तर्पणही करितो, मांस खाण्याची इच्छा करितो, तीळ, गूळ व खीर खाण्याची इच्छा करितो, आणि पितरांची भक्ति करतो, तो पितृग्रहानें पीडलेला आहे म्हणून समजावें.

सर्पग्रहजुष्ट.

यस्तूर्व्यां प्रसरति सर्पवत्कदाचित्
सृक्किण्यौ विलिहति जिह्वया तथैव ।
क्रोधालुर्गुडमधुदुग्धपायसेप्सु-
र्विज्ञेयो भवति भुजंगमेन जुष्टः ॥ १ ॥

जो जमिनीवर सर्पाप्रमाणें सरपटतो, जिभेनें ओठ चावतो, रागीट असतो; व गूळ, मध, दूध व खीर हे पदार्थ खाण्याची इच्छा करितो, तो मनुष्य सर्पग्रहानें पीडित आहे असें समजावें.

राक्षसजुष्ट.

मांसासृग्विविधसुराविकारलिप्सु-
र्निर्लज्जो भृशमतिनिष्ठुरोऽतिशूरः ।
क्रोधान्धो विपुलबलो निशाविहारी
शौचद्विट् स भवति राक्षसाभिजुष्टः ॥ १ ॥

मांस, रक्त व अनेक प्रकारचीं मद्यें ह्यांची इच्छा करणारा, अतिशय निर्लज्ज, क्रूर व शूर, रागीट, पुष्कळ सामर्थ्यवान, रात्रीं

फिरणारा व पवित्र आचरणाचा द्वेष करणारा, असा मनुष्य राक्षसबाधेनें पीडित आहे असें समजावें.

पिशाचबाधेचें लक्षण.

उद्धस्तः कृशपरुषाश्चिरप्रलापी ।
दुर्गन्धो भृशमशुचिस्तथाऽतिलोलः ॥
बह्वाशी विजनवनान्तरोपसेवी ।
व्याचेष्टन्भ्रमति रुदन्पिशाचजुष्टः ॥ १ ॥

हात वर करणारा, अंगानें कृश व रुक्ष, थोडा वेळ बोलणारा, अतिशय घाणेरडा, अपवित्र, अन्नपानाविषयीं अतिशय लोलुप, अति खादाड, निर्जन अरण्यांत राहणारा, विलक्षण चाळे करणारा व रडत फिरणारा, असा मनुष्य पिशाचबाधेनें पीडला आहे असें समजावें.

उन्मादाचें असाध्य लक्षण.

स्थूलाक्षो द्रुतमटनः स फेनलेही
निद्रालुः पतति च कम्पते च योऽति ।
यश्चाद्रिद्विरदनगादिविच्युतः स्या-
त्सोऽसाध्यो भवति तथा त्रयोदशेऽब्दे ॥ १ ॥

डोळे वटारणारा, जलद चालणारा, तोंडाला आलेला फेस चाटणारा, अतिशय झोपाळू, आपोआप पडणारा, व थरथर कांपणारा, अशा मनुष्याचा; व जो पर्वत, हत्ती, वृक्ष ह्यांजवरून पडत असतां ग्रहांकडून पछाडला जातो त्याचा, व ज्याला तेरा वर्षें होऊन गेलीं आहेत त्याचा उन्मादरोग असाध्य समजावा.

ग्रहांचा ग्रहणकाल.

देवग्रहाः पौर्णमास्यामसुराः संध्ययोरपि ।
गन्धर्वाः प्रायशोऽष्टम्यां यक्षाश्च प्रतिपद्यथ ॥ १ ॥
पितरः कृष्णपक्षे स्युः पञ्चम्यामपि चोरगाः ।
रक्षांसि रात्रौ पैशाचाश्चतुर्दश्यां विशन्ति हि ॥ २ ॥

देवग्रह पौर्णिमेला, असुरग्रह संध्याकाळीं, गंधर्वग्रह बहुधा अष्टमीला, यक्षग्रह प्रतिपदेला, पितृग्रह कृष्णपक्षामध्यें, सर्पग्रह पंचमीला, राक्षसग्रह रात्रीं व पिशाचग्रह चतुर्दशीला मनुष्याला बाधा करितात.

दर्पणादौ यथा छाया शीतोष्णं प्राणिनो यथा ।
स्वमणिं भास्करार्चिश्च यथा देहं च देहधृक् ॥ ३ ॥
प्रविशन्ति न दृश्यन्ते ग्रहास्तद्वच्छरीरिणाम् ।
प्रविश्याशु शरीरे हि पीडां कुर्वन्ति दुःसहाम् ॥ ४ ॥

आरशांत दिसणारें प्रतिबिंब, प्राण्याच्या शरीरांत प्रवेश करणारी उष्णता किंवा थंडी, सूर्यकांतांत शिरणारें सूर्याचें तेज किंवा देहांत प्रवेश करणारा आत्मा ज्याप्रमाणें दिसत नाहीं, त्याप्रमाणें ग्रह मनुष्याच्या शरीरांत प्रवेश करितांना दिसत नाहींत. ते मनुष्याच्या शरीरांत झटकन प्रवेश करून दुःसह पीडा देतात.

तपांसि तीव्राणि तथैव दानं ।
व्रतानि धर्मा नियमाश्च सत्यम् ॥

तीव्र तपें, दानें, व्रतें, नियमधर्म व सत्य भाषण ह्यांच्या योगानें भूतोन्मादाची शांति होते.

गुणास्तथाऽष्टावपि तेषु नित्यं ।
व्यस्ताः समस्ताश्च तथाप्रभावः ॥ ५ ॥
अष्टौ ग्रहास्तत्परिचारकाश्च ते तुल्यसत्त्वेषु वसन्ति दुष्टाः ।
त्रयोदशाब्दे च भवन्त्यसाध्या यथास्वभावं परिवर्तयन्ति ॥ ६

आठही ग्रहांचे वेगवेगळे मुख्य आठ गुणांपैकीं सर्व किंवा कांहीं गुण, त्यांचा प्रभाव, तसेंच ते आठीही ग्रह आणि त्यांचे परिचारक हे सर्व आपल्या गुणस्वभावाशीं समान अशा प्राण्याच्या ठिकाणीं दुष्टपणामुळें वास करितात. हे सर्व भूतोन्माद तेरा वर्षें लोटल्यावर असाध्य होतात, आणि त्या त्या भूताच्या स्वभावाप्रमाणें वर्तन करूं लागतात.

त्यांची चिकित्सा.

बुद्ध्वा दोषं वयः सात्म्यं देशं कालं बलाबलम् ।
चिकित्सितमिदं कुर्यादुन्मादे दोषभूतजे ॥ १ ॥

दोष, संवय, वय, देश, काळ, रोगाचें व रोग्याचें बलाबल, ह्या सर्वांचा विचार करून दोषजन्य व भूतजन्य उन्मादावर पुढील चिकित्सा करावी.

देवर्षिपितृगन्धर्वैरुन्मत्तेषु च बुद्धिमान् ।
त्यजेन्नस्याञ्जनादीनि तीक्ष्णानि क्रूरकर्म च ।

सर्पिष्पानादिगायत्रीहोममन्त्रादिरिष्यते ॥ २ ॥

देव, ऋषि, पितर व गंधर्व ह्या ग्रहांच्या बाधेनें उन्मत्त झालेल्या रोग्याला तीक्ष्ण नस्यें, अंजनें व क्रूर कर्मे हे उपचार करूं नयेत. त्याला तूप पिणें, गायत्रीमंत्राचा जप, होम व मंत्र हे उपचार करावे.

पूजाबल्युपहारशान्तिविषयो होमेष्टिमन्त्रक्रिया
दानं स्वस्त्ययनं व्रतादिनियमः सत्यं जपो मङ्गलम् ॥
प्रायश्चित्तविधानमञ्जलिरथो रत्नौषधीधारणं
भूतानामधिपस्य विष्टपपतेर्गौरीपतेरर्चनम् ॥ ३ ॥
ये च स्युर्भुवि गुह्यकाश्च प्रमथास्तेषां समाराधनं
देवब्राह्मणपूजनं च शमयेदुन्मादमागन्तुकम् ॥

पूजा, बलिदान, नैवेद्य, शांतिविषयक होम, मंत्र घालणें, दान, पुण्याहवाचन, व्रतादि नियम, सत्य, जप, स्वस्तिवाचन, प्रायश्चित्त (कर्मविपाकादि ग्रंथांतून सांगितलेलें), नमस्कार, रत्नें व औषधी ह्यांचें धारण, विष्णु व महादेव ह्यांचें पूजन करावें. भूलोकीं संचार करणारे गुह्यक, प्रमथादि रुद्रगणांची आराधना करणें आणि देव व ब्राह्मण ह्यांचें पूजन करणें ह्या योगानें आगंतुक (भूतादिजनित) उन्मादाची शांति होते.

शिरीषनक्तमालानां बीजानि मधुसर्पिषा ।
भक्ष्याश्च सर्वे सर्वेषां सामान्यो विधिरुच्यते ॥ ४ ॥

शिरसाचें बी व करंजाचें बी तूप व मध ह्यांजबरोबर खावें. आणि सर्वांचीं सर्व भक्ष्येंहीं द्यावीं. हा सामान्य विधि सांगितला.

ऋक्षजम्बूकरोमाणि शल्लकी लशुनं तथा ।
हिंगु मूत्रं च बस्तस्य धूपमस्य प्रयोजयेत् ॥ ५ ॥

अस्वल व कोल्हा, ह्यांचे केस, साळईचीं पिसें, लसूण, हिंग व बोकडाचें मूत्र ह्यांची धुरी द्यावी; ह्या धुरीनें बलाढ्य ग्रहाची देखील शांति होते.

धूपेन शाम्यति क्षिप्रं बलवानपि यो ग्रहः ।
शिरीषपुष्पं लशुनं शुण्ठी सिद्धार्थकं वचा ॥ ६ ॥
मंजिष्ठा रजनी कृष्णा बस्तमूत्रेण पेषयेत् ।
वर्ती छायाविशुष्का स्यात्सा हिता नावनाञ्जने ॥ ७ ॥

शिरसाचीं फुलें, लसूण, सुंठ, मोहऱ्या, वेखंड, मंजिष्ट, हळद, व पिंपळी, ह्या सर्वांचें चूर्ण करून बोकडाच्या मुतांत खल करून गोळ्या कराव्या. ह्या गोळ्या उन्माद रोगामध्यें नस्य किंवा अंजन करण्यास हितकारक आहेत.

माहेश्वर धूप.

कार्पासास्थिमयूरपिच्छबृहतीनिर्माल्यपिण्डीतक-
त्वङ्मांसीवृषदंशविण्नखवचाकेशाहिनिर्मोचनैः ।
नागेन्द्रद्विजशृङ्गहिंगुमरिचैस्तुल्यैस्तु धूपः कृतः
स्कन्दोन्मादपिशाचराक्षससुरावेशज्वरघ्नः स्मृतः ॥ १ ॥

सरक्या, मोराचीं पिसें, रिंगणमूळ, शिवनिर्माल्य, तगर, दालचिनी, जटामांसी, मांजराची विष्टा, नखला, वेखंड, मनुष्याचे केस, सापाची कात, हस्तिदंत, सांबराचें शिंग, हिंग व मिरीं, हे जिन्नस समभाग घेऊन त्यांची धुरी द्यावी. ती स्कंदापस्मार (बालग्रह) पिशाचबाधा, राक्षसग्रह, देवग्रह ह्यांची बाधा व ज्वर ह्यांचा नाश करिते.

महापैशाच घृत.

जटिला पूतना केशी मर्कटी चारटी वचा ।
त्रायमाणा जया वीरा चोरकं कटुरोहिणी ॥ १ ॥
कायस्था शूकरी छत्रा सातिच्छत्रा पलंकषा ।
महापुरुषदन्ता च वयस्था नाकुलीद्वयम् ॥ २ ॥
कटंभरा वृश्चिकाली स्थिरा चैतैर्घृतं पचेत् ।
तत्तु चातुर्थिकोन्मादग्रहापस्मारनाशनम् ॥ ३ ॥
महापैशाचकं नाम घृतमेतद्यथाऽमृतम् ।
बुद्धिमेधास्मृतिकरं बालानां चाङ्गवर्धनम् ॥ ४ ॥

जटामांसी, सुगंधजटामांसी (पूतनाकेशी), कुहिली, निळी, वेखंड, त्रायमाण, शमी, भुईआवळी, गठोना, कुटकी, हिरडा, डुक्करकंद, बडिशेप, सागाचें बीं, रास्ना, थोर शतावरी, ब्राह्मी, दोन्ही प्रकारची मुंगसवेल, टेटू, लघुमेढशिंगी व साळवण ह्या औषधांचा कल्क घालून तूप तयार करावें. ह्याला महापैशाचिक घृत म्हणतात. हें चातुर्थिक ज्वर, उन्माद, ग्रहबाधा व अपस्मार ह्यांचा

नाश करितें. हें अमृताप्रमाणें गुणकारक आहे. हें बुद्धि, धारणा व स्मरण वाढविणारें असून मुलांच्या शरीराची वाढ करणारें आहे.

कल्याणकं प्रयुञ्जीत महद्वा चैतसं घृतम् ।
तैलं नारायणं वाऽपि महानारायणं तथा ॥ १ ॥

ह्या भूतोन्मादावर महाकल्याणघृत (मागें उन्मादचिकित्सेंत सांगितलेलें) किंवा चैतसघृत योजावें. त्याचप्रमाणें नारायणतेल अथवा महानारायणतेल योजावें.

भूतभैरवरस.

रसः सतालः सशिलः सलोहः स्रोतोञ्जनं सार्कमिदं हि गन्धम् ।
पिष्टं नृमूत्रेण समं समन्ताद्देयो द्विभागोऽथ बलिः पचेच्च ॥ १ ॥
लौहे क्षणं हन्ति घृतेन माषोऽपस्मारमप्युन्मदमानसत्वम् ।
पिबेदनु त्र्यूषणहिंगुयुक्तं सर्पिर्नृमूत्रं रुचकेन सार्धम् ॥ २ ॥
भूतोन्मादेषु सर्वेषु रसोऽयं भूतभैरवः ।
स्वर्णजैः पञ्चभिर्बीजैर्देयः सर्पिर्विमिश्रितः ॥ ३ ॥

पारा, हरताळ, मनशीळ, लोहभस्म, सुरमा, ताम्रभस्म, गंधक हे सर्व जिन्नस समभाग घेऊन मनुष्याच्या मुतांत ("पिष्टनाजमूत्रेण" असाही पाठभेद आहे.) खल करून, गोळा करून, सर्व औषधाच्या दुप्पट गंधक घेऊन लोखंडाच्या भांड्यांत घालून चुलीवर ठेवून त्यांत तो गोळा क्षणभर पचन करावा. नंतर काढून तुपाशीं मासाभर द्यावा. तो अपस्मार व उन्माद ह्यांचा नाश करितो. ह्याजवर सुंठ, मिरीं, पिंपळी व हिंग ह्यांचें चूर्ण तुपांतून घ्यावें; किंवा मनुष्याच्या मुतांतून पादेलोण घ्यावें. हा भूतभैरवरस सर्व भूतोन्मादांवर द्यावा. हा धोतऱ्याच्या पांच बियाचें चूर्ण व तूप ह्यांशीं मिश्र करून द्यावा.

फेंपरें.

चिन्ताशोकादिभिर्दोषाः क्रुद्धा हृत्स्रोतसि स्थिताः ।
कृत्वा स्मृतेरपध्वंसमपस्मारं प्रकुर्वते ॥ १ ॥

मनोवह स्रोतसांमध्यें स्थित असलेले दोष काळजी व शोक इत्यादिकांनीं प्रकुपित होऊन स्मृतीचा नाश करून अपस्मार (फेंपरें) उत्पन्न करितात.

त्याचें सामान्य लक्षण.

तमःप्रवेशः संरम्भो दोषोद्रेकहतस्मृतिः ।
अपस्मार इति ज्ञेयो गदो घोरश्चतुर्विधः ॥
वातपित्तकफैः सर्वैर्दोषैः स स्याच्चतुर्विधः ॥ १ ॥

दोषप्रकोपामुळें स्मरणशक्ति नाहींशी झाली असतां त्या मनुष्याला अंधारांत शिरल्याप्रमाणें वाटतें. तो डोळे फिरवितो व हातपाय वाकडेतिकडे टाकतो. ह्या रोगाला अपस्मार असें म्हणतात. हा भयंकर व्याधि चार प्रकारचा आहे. वात, पित्त व कफ ह्या दोषांमुळें तीन प्रकार, आणि सर्व दोषांपासून एक प्रकार, मिळून अपस्माराचे चार प्रकार आहेत.

त्याचें पूर्वरूप.

हृत्कम्पः शून्यता स्वेदो ध्यानं मूर्च्छा प्रमूढता ।
निद्रानाशश्च तस्मिंस्तु भविष्यति भवन्त्यथ ॥ १ ॥

छाती धडधडणें, स्मरणशक्ति नाहींशी होणें, घाम येणें, नेहमीं काळजींत असणें. मूर्च्छा येणें, भुलल्याप्रमाणें होणें आणि झोंप न लागणें हीं लक्षणें अपस्मार होण्यापूर्वीं होतात.

वातिक अपस्मारलक्षण.

कम्पते प्रदशेद्दन्तान्फेनोद्वामी श्वसित्यपि ।
परुषारुणकृष्णानि पश्येद्रूपाणि चानिलात् ॥ १ ॥

वातजन्य अपस्मारामध्यें लहरीच्या वेळीं रोगी थरथर कांपतो. दांत खातो, तोंडावाटे फेस टाकतो, श्वास टाकतो, आणि त्याला राठ, तांबूस व काळसर अशीं रूपें दिसतात.

पित्तजन्य अपस्मारलक्षण.

पीतफेनाङ्गवक्त्राक्षः पीतासृग्रूपदर्शनः ।
स तृष्णोष्णानिलव्याप्तलोकदर्शी च पैत्तिकः ॥ १ ॥

पित्तजन्य अपस्माराच्या लहरींत तोंडावाटे पिवळा फेस येतो. रोग्याचें अंग, तोंड व डोळे हीं पिवळीं दिसतात. लहरीमध्यें पिवळे किंवा तांबडे प्राणी त्याला दिसतात. त्याला तहान लागते, उकडतें, आणि सर्वत्र अग्नीनें व्यापलें आहे असें दिसतें.

कफजन्य अपस्मारलक्षण.

शुक्लफेनाङ्गवक्त्राक्षः शीतो हृष्टाङ्गजो गुरुः ।
पश्येद्रूपाणि शुक्लानि श्लेष्मिको मुच्यते चिरात् ॥ १ ॥

कफजन्य अपस्मारी मनुष्याचें अंग, तोंड व डोळे हीं तांबडीं दिसतात. लहरींत तोंडावाटे पांढरा फेस येतो. अंग गार लागतें. अंगावर शहारे येतात. अंग जड होतें. लहरींत त्याला प्राण्यांचीं रूपें पांढरीं दिसतात आणि तो लहर आल्यावर फार वेळानें सावध होतो.

त्रिदोषज अपस्मारलक्षण.

सर्वैरेभिः समस्तैश्च लिङ्गैर्ज्ञेयस्त्रिदोषजः ।
अपस्मारः स चासाध्यो यः क्षीणस्यानवश्च यः ॥ १ ॥

त्रिदोषजन्य अपस्मार तिन्ही दोषांच्या प्रकोपापासून होतो. त्यांत तिन्हीही दोषांचीं लक्षणें असतात. हा अपस्मार असाध्य आहे. तसेंच क्षीण मनुष्याला झालेला व फार दिवसांचा जुना अपस्मारही असाध्य आहे.

असाध्यलक्षण.

प्रस्फुरन्तं च बहुशः क्षीणं प्रचलितभ्रुवम् ।
नेत्राभ्यां च विकुर्वाणमपस्मारो विनाशयेत् ॥ १ ॥

वरचेवर थरथर कांपणारा, फार क्षीण झालेला, भुवया फिरवि- णारा, आणि डोळे वाकडे तिकडे करणारा, अशा मनुष्याचा अप- स्मार नाश करितो.

कालनियम.

पक्षाद्वाऽपि दशाहाद्वा मासाद्वा कुपिता मलाः ।
अपस्माराय कुर्वन्ति वेगं किंचिद्यथांतरम् ॥ १ ॥
देवे वर्षत्यपि यथा भूमौ बीजानि कानिचित् ।
शरदि प्रतिरोहन्ति तथा व्याधिसमुच्छ्रयाः ॥ २ ॥

पंधरा दिवसांनीं, बारा दिवसांनीं, किंवा महिन्यानें कुपित झालेले दोष अपस्मार उत्पन्न करितात. क्वचित् मुदतीच्या आंतही होतो. पाऊस पडला असूनही कांहीं बीजें ज्याप्रमाणें शरदृतूमध्येंच उगवतात, त्याप्रमाणें दोषही अनुकूल काल आला म्हणजेच रोग उत्पन्न करितात.

अपस्मारचिकित्सा.

पूर्वं युञ्जयादपस्मारे छर्दनादीनि बुद्धिमान् ।
वातिकं वस्तिभिः प्रायः पैत्तिकं च विरेचनैः
कफजं वमनप्रायैरपस्मारमुपाचरेत् ॥ १ ॥

अपस्मारामध्यें प्रथम वमनादि कर्मे करावीं. वातिक अपस्मारावर बस्ति, पैत्तिक अपस्मावर रेचन आणि कफजन्य अपस्मारावर वमन अशा उपायांनीं चिकित्सा करावी.

करंजादि योग.

करंजदारुसिद्धार्थकटभीरामठं वचा ।
समङ्गा त्रिफला व्योष प्रियंगुश्च समांशकः ॥ १ ॥
बस्तमूत्रेण संपिष्य नस्यपानाञ्जनादिषु ।
योज्यो योगोऽयमुन्मादेऽपस्मारे भूतरोगिषु ॥ २ ॥

करंजाची बी, देवदार, मोहऱ्या, मालकांगोणी, हिंग, वेखंड, लाजाळू, हिरडा, बेहडा, आवळकाठी, सुंठ, मिरीं, पिंपळी, व गव्हला ह्यांचें समभाग चूर्ण करून त्याचा बोकडाच्या मुतांत खल करावा. हा योग उन्माद, अपस्मार, भूतबाधा ह्यांजवर नस्य, अंजन व प्राशन या कर्मांत योजावा.

निर्गुड्यादि नस्य.

निर्गुण्डीभववन्दाकनायनस्योपयोगतः ।
उपैति सहसा नाशमपस्मारो न संशयः ॥ १ ॥

निगुडीच्या झाडावर उत्पन्न होणारें बांदें आणून त्याचा रस काढून त्याचें नस्य करावें, म्हणजे अपस्माराचा त्वरित नाश होतो.

यष्ट्याव्हादि नस्य व अंजन.

यष्टीहिंगुवचावज्रीशिरीषलशुनामयैः ।
साजमूत्रैरपस्मारे सोन्मादे नावनांजने ॥ १ ॥

जेष्टमध, हिंग, वेखंड, त्रिधारी निवडुंगाचा चीक, शिरसाचीं फुलें, लसूण व कोष्ट ह्यांच्या चूर्णाचें शेळीच्या मुतांतून नस्य व अंजन करावें. तें अपस्मार व उन्माद ह्यांजवर प्रशस्त आहे.

अंजन व धुरी.

पुष्योद्धृतं शुनः पित्तमपस्मारघ्नमांजनम् ।
तदेव सर्पिषा युक्तं धूपनं परमं हितम् ॥ १ ॥

पुष्य नक्षत्रावर कुत्र्याचें पित्त काढून त्याचें अंजन करावें. तें अपस्माराचा नाश करितें. तें पित्त तुपाशीं मिश्र करून त्याची धुरी द्यावी. ती अपस्मारावर फार उत्तम व हितकारक आहे.

मनोऱ्हाद्यंजन.

मनोह्वा ताक्ष्यकं चैव शकृत्पारावतस्य च ।
अंजनं हन्त्यपस्मारमुन्मादं च विशेषतः ॥ १ ॥

मनशीळ, मोरचूत व पारव्याची विष्ठा ह्यांचें अंजन विशेषतः उन्माद व अपस्मार ह्यांचा त्वरित नाश करितें.

श्वशृगालादि अंजन.

श्वशृगालबिडालानां कपिलानां गवामपि ।
पित्तानि नस्यतो हन्युरपस्मारं पृथक्पृथक् ॥ १ ॥

कुत्रें, कोल्हें, मांजर व कपिला गाय ह्या प्रत्येकाच्या पित्ताचें नस्य करावें. तें अपस्माराचा नाश करितें.

त्रपुसीनस्य.

अरण्यत्रपुसीचूर्णं नस्येनापस्मृतिं जयेत् ।

रानतवशाच्या चूर्णाचें नस्य करावें. तें अपस्माराचा नाश करतें.

मधुवचायोग.

यः खादेत्क्षीरभक्ताशी माक्षिकेण वचारजः ।
अपस्मारं महाघोरं सुचिरोत्थं जयेद् ध्रुवम् ॥ १ ॥

मधाशीं वेखंडाचें चूर्ण घेऊन दूधभात खाऊन जो राहतो, त्याचा फार दिवसाचा महाभयंकर अपस्मार निश्चयानें नाश पावतो.

मुस्तकमूलयोग.

उत्तरदिग्गतमुस्तकमूलं बुद्ध्या समुद्धृतं पुष्ये ।
पीतं पयसा हन्यादपस्मृतिं गोः सवर्णवत्सायाः ॥ १ ॥

नागरमोथ्याचें उत्तरेकडील मूळ मुद्दाम पुष्य नक्षत्रावर काढून आणून एकवर्ण व सवत्स गाईच्या दुधांतून घ्यावें. तें अपस्माराचा नाश करितें.

कूष्मांडादि योग.

कूष्माण्डकगिरोत्थेन रसेन परिपेषितम् ।
अपस्मारविनाशाय यष्ट्याह्वं स पिबेत्त्र्यहम् ॥ १ ॥

कोहाळ्याच्या गराच्या रसांत जेष्टमधाचें चूर्ण घालून अपस्माराचा नाश होण्याकरितां तीन दिवस द्यावें.

भैरवरसायन.

वचामृतव्योषमधूकसाररुद्राक्षसिन्धूद्भवबार्हतानि ।
फलं समुद्रस्य रसोनकल्कं ध्मातं हि नासापुटमध्यदेशे ॥ १ ॥
अपस्मृतिश्लेष्ममरुच्छिरोरुक्प्रलापतन्द्राभ्रमजाड्यमोहान् ।
ससंनिपातं श्रुतिकाक्षिभङ्गान्सपीनसं हन्ति हलीमकं च ॥२॥
रसायनं भैरवनामधेयं ज्ञातं विचारात्कविविठ्ठलेन ॥ ३ ॥

वेखंड, गुळवेल, सुंठ, मिरें, पिंपळी, मोहाचा डिंक, रुद्राक्ष, सैंधव, रिंगणीचीं फळें, समुद्रफळ व लसूण ह्या सर्वांचें चूर्ण करून नाकांत ओढावें. म्हणजे अपस्मार, कफवातजन्य मस्तकपीडा, बडबड, तंद्रा, भ्रम, जडत्व, दाह, मोह, सन्निपात, कर्णरोग, नेत्रपीडा, पीनस, हलीमक, ह्यांचा नाश होतो. हें भैरव नांवाचें रसायन विठ्ठल कवीनें स्वतःच्या कल्पनेनें तयार केलें आहे.

ब्राह्मीघृत.

ब्राह्मीरसे वचाकुष्ठशङ्खपुष्पीभिरेव च ।
पक्वं पुरातनं सर्पिरपस्मारहरं ध्रुवम् ॥ १ ॥

ब्राह्मीच्या रसांत वेखंड, कोष्ट, व शंखपुष्पी ह्यांचा कल्क घालून त्यांत जुनें तूप तयार करावें. तें निश्चयानें अपस्माराचा नाश करितें.

सैंधवघृत.

घृतं सैन्धवहिंगुभ्यां कणाभिस्तच्चतुर्गुणैः ।
मूत्रैः सिद्धमपस्मारहृद्ग्रहग्रामनाशनम् ॥ १ ॥

सैंधेलोण, हिंग एक भाग व पिंपळी चार भाग ह्यांच्या कल्कांत तुपाच्या चौपट गोमूत्र घालून तूप सिद्ध करावें. तें अपस्मार व ग्रहसमुदाय ह्यांचा नाश करितें.

स्वल्प पंचगव्यघृत.

गोशकृद्रसदध्यम्लक्षीरमूत्रैः समं घृतम् ।
सिद्धं चातुर्थिकोन्मादग्रहापस्मारनाशनम् ॥ १ ॥

गाईच्या शेणाचा रस, दहीं, लिंबाचा रस, दूध, व गोमूत्र ह्यांच्या बरोबरीनें तूप घालून तें सिद्ध करावें. तें चातुर्थिक ज्वर, उन्माद व अपस्मार ह्यांचा नाश करितें.

कूष्मांडादि घृत.

कूष्माण्डकरसे सर्पिरष्टादशगुणे पचेत् ।
यष्ट्याह्वकल्के तत्सिद्धमपस्मारहरं परम् ॥ १ ॥

तुपाच्या अठरापट कोहळ्याचा रस व जेष्टमधाचा कल्क घालून तूप सिद्ध करावें. तें अपस्माराचा नाश करण्याविषयीं उत्तम आहे.

कटभीतैल.

कटभीनिम्बकट्वंगमधुशिग्रुत्वचारसे ।
सिद्धं मूत्रयुतं तैलं लेपाद्धन्यादपस्मृतिम् ॥ १ ॥

मालकांगोणी, कडुनिंब, टेंटु, व गोड्या शेवग्याची साल ह्यांच्या रसांत गोमूत्र घालून तेल सिद्ध करावें. तें अंगाला लावलें असतां अपस्माराचा नाश होतो.

सार्षप तेल.

अभ्यंगे सार्षपं तैलं बस्तमूत्रे चतुर्गुणे ।
सिद्धं स्याद् गोशकृन्मूत्रे स्नानोद्वर्तनमेव च ॥ १ ॥

बोकडाचें मूत्र किंवा गाईच्या शेणाचा रस व गोमूत्र तेलाच्या चौपट घालून शिरसाचें तेल सिद्ध करावें. तें अंगास लावून स्नान करावें, म्हणजे अपस्माराचा नाश होतो.

धुरी.

नकुलोलूकमार्जारगृध्रकीटाहिकाकजैः ।
तुण्डैः पक्षैः पुरीषैश्च धूपनं कारयेद्भिषक् ॥ १ ॥

मुंगूस, घुबड, मांजर व गिधाड ह्यांची विष्ठा आणि साप व कावळा ह्यांचीं तोंडें, पंखें व विष्ठा ह्यांची धुरी द्यावी.

दुश्चिकित्स्यो ह्यपस्मारश्चिरकारी महागदः ।
तस्माद्रसायनैरेनं प्रायशः समुपाचरेत् ॥ २ ॥

अपस्मार हा चिकित्सा करण्यास फार कठीण आहे. हा फार दिवस राहाणारा मोठा रोग आहे. म्हणून प्रायः ह्याजवर रसायनाचे (ब्राह्मीकल्प, पालाशकल्प वगैरे) कल्प योजून उपचार करावे.

हृत्कम्पोऽक्षिरुजा यस्य स्वेदो हस्तादिशीतता ।
दशमूलीजलं तस्य कल्याणाख्यं च योजयेत् ॥ ३ ॥

हृदय कांपणें, डोळे दुखणें, घाम येणें, हात पाय वगैरे अव-

यव थंड असणें, हे उपद्रव ज्याला आहेत, अशा अपस्माराच्या रोग्याला दशमुळांचा काढा व कल्याणक चूर्ण ह्यांची योजना करावी.

कल्याणक चूर्ण.

पञ्चकोलं समरिचं त्रिफला बिडसैन्धवम् ।
कृष्णाविडंगपूतीकयवानीधान्यजीरकम् ॥ १ ॥
पीतमुष्णाम्बुना चूर्णं वातश्लेष्मामयापहम् ।
अपस्मारे तथोन्मादे दुर्नामग्रहणीगदे ।
एतत्कल्याणकं चूर्णं नष्टस्याग्नेश्च दीपनम् ॥ २ ॥

पिंपळी, पिंपळमूळ, चवक, चित्रक, सुंठ, मिरें, हिरडा, बेहडा, आवळकाठी, बिड, सैंधव, गजपिंपळी, वावडिंग, पादेलोण, ओवा, धने व जिरें ह्यांचें समभाग चूर्ण करून ऊन पाण्याशीं द्यावें. तें वातकफजन्य विकाराचा नाश करितें. हें चूर्ण अपस्मार, उन्माद, मूळव्याध, संग्रहणी ह्या विकारांवर द्यावें. हें कल्याणक चूर्ण नष्ट झालेल्या जठराग्नीचें दीपन करतें.

जलमृतलक्षण.

विष्टब्धपायुमूर्धाक्षं शीतपादकरोदरम् ।
विद्याज्जलमृतं जन्तुं शूनपन्नाभिमेहनम् ॥ १ ॥

ज्याचे डोळे, मस्तक व गुद हे अवयव स्तब्ध (ताठल्यासारखे) झाले आहेत, हातपाय व पोट हे अवयव गार झाले आहेत, आणि पाय, नाभि व गुह्येंद्रिय ह्यांला सूज आली आहे, तो जलमृत असें समजावें.

स्मृतिसागर रस.

रसगन्धकतालानां सशिलाताम्रभस्मनाम् ।
शुद्धानां मूर्छितानां च चूर्णं भाव्यं वचाशृतैः ॥ १ ॥
एकविंशतिधा पश्चाद्ब्राह्मीवारा तथैव च ।
कटभीबीजतैलेन भावयेदेकवारकम् ॥ २ ॥
स्मृतिसागरनामाऽयं रसोऽपस्मारनाशनः ।
सर्पिषा माषमात्रोऽयं भुक्तो हन्यादपस्मृतिम् ॥ ३ ॥
उन्मादोक्तो विधिः सर्वो ह्यपस्मारे प्रयुज्यते ॥ ४ ॥

पारा, गंधक, हरताळ, मनशीळ, ताम्रभस्म हीं द्रव्यें चांगलीं शुद्ध केलेलीं घेऊन एकत्र चूर्ण करून त्याला वेखंडाच्या काढ्या-

च्या एकवीस भावना द्याव्या. नंतर ब्राह्मीच्या रसाच्या एकवीस भावना द्याव्या. आणि त्यानंतर मालकांगोणीच्या तेलाची एक भावना द्यावी. म्हणजे हा स्मृतिसागर रस तयार झाला. हा अपस्माराचा नाश करतो. हा तुपांतून एक मासाभर दिला असतां अपस्माराचा नाश करतो. उन्मादचिकित्सेंत सांगितलेलेही सर्व उपचार अपस्मारावर करावे.

पथ्यापथ्य.

लोहिताः शालयो मुद्गा गोधूमाः प्रततं हविः।
कूर्मामिषं धन्वरसा दुग्धं ब्राह्मीदलं वचा ॥ १ ॥
पटोलं वृद्धकूष्माण्डं वास्तुकं स्वादुदाडिमम्।
सोभाञ्जनं पयःपेटी द्राक्षा धात्री परूषकम्।
अपस्मारगदे नृणां पथ्यमेतदुदीरितम् ॥ २ ॥

तामसाळ, मूग, गहू, जुनें तूप, कासवाचें मांस, जांगल प्राण्यांच्या मांसाचा रस, दूध, ब्राह्मीचा पाला, वेखंड, पडवळ, जुना कोहळा, चंदनबटवा, गोड डाळिंब, शेवगा, पयःपेटी (दुधाचा खवा) द्राक्षें, आवळकाठी, फालसा, हे पदार्थ अपस्मारी रोग्याला पथ्यकारक आहेत.

मद्यं मत्स्यं विरुद्धान्नं तीक्ष्णोष्णं गुरुभोजनम्।
अतिव्यवायमायासं पूज्यपूजाव्यतिक्रमम् ॥ ३ ॥
पत्रशाकानि सर्वाणि बिम्बीमाषाढकीफलम्।
तृषानिद्राक्षुधावेगानपस्मारी नरस्त्यजेत् ॥ ४ ॥

मद्य, मासे, विरुद्धान्न, तीक्ष्ण, ऊष्ण व जड अन्नाचें भोजन, अति मैथुन, आयास, पूज्य मनुष्यांची पूजा न करणें (पूज्य व्यक्तीचें अतिक्रमण करणें) सर्व प्रकारच्या पालेभाज्या, तोंडलीचें फळ, उडीद, तुरी हे पदार्थ आणि तहान, भूक व झोंप ह्यांचे वेग आवरून धरणें या गोष्टी अपस्मारी मनुष्यानें वर्ज कराव्या.

वातव्याधिनिदान.

पित्तं पंगुः कफः पंगुः पंगवो मलधातवः।
वायुना यत्र नीयन्ते तत्र गच्छन्ति मेघवत् ॥ १ ॥

पित्त, कफ, रसरक्तादि धातु व मलमूत्रादि मल हे सर्व पंगु (गति-

हीन) आहेत. हे सर्व मेघाप्रमाणें वायु जिकडे नेईल तिकडे जातात.

वाताचें संप्राप्तिपूर्वक निदान.

शक्त्यानुप्रासशक्त्याऽथ ज्वरादौ प्रतिपाद्यते ।
सर्वव्याधिनिदानं वा वातव्याधिनिरूपणम् ॥ १ ॥

रोगाच्या शक्तीच्या (महत्वाच्या) अनुरोधानें पाहिलें असतां ज्वराच्याही आधीं "सर्वव्याधिनिदान" किंवा वातव्याधिनिदान हेंच सांगितलें जातें.

रूक्षशीताल्पलघ्वन्नव्यवायातिप्रजागरैः ।
विषमादुपचाराच्च दोषासृक्स्रावणादपि ॥ २ ॥
लंघनप्लवनात्यध्वव्यायामातिविचेष्टितैः ।
धातूनां संक्षयाच्चिन्ताशोकरोगातिकर्षणात् ॥ ३ ॥
वेगसंधारणादामादभिघातादभोजनात् ।
मर्माघाताद्गजोष्ट्राश्वशीघ्रयानापसर्पणात् ॥ ४ ॥
देहे स्रोतांसि रिक्तानि पूरयित्वाऽनिलो बली ।
करोति विविधान्व्याधीन्सर्वाङ्गैकांगसंश्रयान् ।

रूक्ष, थंड, थोडें व हलकें अन्न खाण्यानें, अतिशय मैथुन व जागरण करण्यानें; विषम उपचार केल्यानें, कफादि दोष व मल हे वमनविरेचनद्वारा काढून टाकल्यानें, रक्त काढण्यानें, उपास करणें, पोहणें, अतिशय मार्ग चालणें, अनियमित व्यायाम करणें, रक्तादि धातु क्षीण होणें; चिंता, शोक व एखाद्या रोगामुळें कृश होणें, मलमूत्रादिकांचे वेग धारण करणें, इत्यादि कारणांनीं, पोटांत आम संचित झाल्यानें, शरीरावर कांहीं आघात झाल्यामुळें, वेळचे वेळीं जेवण न केल्यानें, मर्मावर आघात झाल्यानें; हत्ती, उंट, घोडे अशा जलद चालणाऱ्या वाहनांवर बसण्यानें, वाढलेला वायु शरीरांतील मोकळ्या स्रोतसांत शिरून सर्वांगवात व एकांगवात ह्यांसारखे रोग उत्पन्न करितो.

---

१. वाग्भटानें ज्वरनिदानाच्याही आधीं "सर्वव्याधिनिदान" ह्या नांवाचा अध्याय सांगितला आहे, व सुश्रुतानें आपल्या निदानस्थानामध्यें प्रथम "वातव्याधिनिदान" नांवाचा अध्याय सांगितला आहे. ह्याला अनुसरून हा श्लोक आहे. ह्याचा सारांश इतकाच कीं, ज्वरापेक्षांही वातव्याधि अधिक आहे.

वाताचें पूर्वरूप व स्वरूप.

अव्यक्तं लक्षणं तेषां पूर्वरूपमिति स्मृतम् ॥ १ ॥

वातविकाराचें जें अस्पष्ट रूप तेंच त्याचें पूर्वरूप समजावें.

आत्मरूपं तु तद्व्यक्तमपाये लघुता पुनः ।
संकोचः पर्वणां स्तम्भो भंगोऽस्थ्नां पर्वणामपि ।
लोमहर्षः प्रलापश्च पाणिपृष्ठशिरोग्रहः ॥ २ ॥
खाञ्जयं पांगुल्यकुब्जत्वे शोषोऽङ्गानामनिद्रता ।
गर्भशुक्ररजोनाशः स्पन्दनं गात्रसुप्तता ॥ ३ ॥
शिरोनासाक्षिजत्रूणां ग्रीवायाश्चापि हुण्डनम् ।
भेदस्तोदार्तिराक्षेपो मोहश्चाऽऽयास एव च ॥ ४ ॥
एवंविधानि रूपाणि करोति कुपितोऽनिलः ।
हेतुस्थानविशेषाच्च भवेद्रोगविशेषकृत् ॥ १ ॥

वातविकारांचें जें स्पष्ट लक्षण तेंच त्याचें रूप समजावें. वाताच्या चांचल्यामुळें व्याधि कधीं कमी व कधीं अधिकही होतो. सांधा आंखडणें किंवा ताठणें, हाडें व सांधे फुटल्याप्रमाणें दुखणें, अंगांवर काटा येणें, बडबड, हात, पाय, पाठ व डोकें

---

१. टीपः—कषायकटुतिक्तकप्रमितरूक्षलघ्वन्नतः
पुरः पवनजागरप्रतरणाभिघातश्रमैः ।
हिमादनशनात्तथा निधुवनाच्च धातुक्षयात्
मलादिपरिधारणान्मदनशोकचिंताभयैः ॥ १ ॥
अतिक्षतजमोक्षणागदकृतातिमांसक्षया-
दतीव वमनान्नृणामतिविरेचनादामतः ।
पयोदसमये दिनक्षणदयोस्तृतीयांशयोः
जरामतिगतेऽशिते शिशिरसंज्ञकालेऽपि च ॥ २ ॥

अर्थः–तुरट, तिखट पदार्थ खाणें, अल्प खाणें, रूक्ष व हलकें अन्न खाणें, पूर्वेकडील वारा घेणें, जागरण, फार पोहणें, शरीरावर आघात होणें, अतिश्रम, थंडी, उपोषण, धातुक्षीणता, मलमूत्रादिकांचा वेग धारण करणें, अति मैथन, काळजी, शोक शरीरांतून अतिशय रक्त जाणें, रोगामुळें अतिशय मांस क्षीण होणें, अतिशय ओकारी व रेच होणें, आमसंचयामुळें वर्षाकाळीं दिवसाच्या व रात्रीच्या तिसऱ्या भागांत अन्न सर्व पचून गेलें असतां किंवा फार वृद्धावस्थेमध्यें आणि शिशिर ऋतूमध्यें वाताचा प्रकोप होतो. ––लेखी प्रतीवरून.

जखडल्यासारखें वाटणें, लंगडेपणा, पांगळेपणा, कुबडेपणा, अंग शुष्क होणें, झोंप न येणें, गर्भ, शुक्र व आर्तव ह्यांचा नाश होणें, अंग कांपणें व बधिर होणें, मस्तक, नाक, डोळे, जत्रु व मान हीं आंत ओढल्यासारखीं किंवा वाकडीं होणें, अंग फुटल्याप्रमाणें दुखणें, टोंचल्याप्रमाणें वेदना होणें, अंग ठणकणें व वांकडें तिकडें होणें, मोह, आयास होणें, अशा प्रकारचे विकार कुपित झालेला वायु करतो. शिवाय कारणभेदानें व स्थानभेदानें दुसरेही कित्येक रोग उत्पन्न करितो.

स्थानविशेषलक्षण.

वायुरामाशये कुद्धश्छर्द्यादीन्कुरुते सदा।

आमाशयांत कुपित झालेला वायु वांत्या वगैरे विकार करितो.

तत्र कोष्ठाश्रिते दुष्टे निग्रहो मूत्रवर्चसोः।
वर्ध्महृद्रोगगुल्मार्शः पार्श्वशूलं च मारुते ॥ १ ॥

कोठ्यामध्यें वायु दूषित झाला असतां मलमूत्रांचा अवरोध होतो. वर्ध्म (आडसंधीमध्यें गांठी येणें), हृद्रोग, गुल्म, मूळव्याध, आणि बरगड्यांमध्यें शूल हे विकार होतात.

सर्वांगवातलक्षण.

सर्वांगकुपिते वाते गात्रस्फुरणभञ्जनम्।
वेदनाभिः परीतस्य स्फुटन्तीवास्य संधयः ॥ १ ॥

सर्व अंगामध्यें वात कुपित झाला असतां अंग स्फुरण पावतें, अंग मोडतें, त्यांत वेदना होतात व सांधे फुटल्यासारखे होतात.

गुदस्थ कुपित वाताचें लक्षण.

ग्रहो विण्मूत्रवातानां शूलाध्मानाश्मशर्कराः।
जंघोरुत्रिकहृत्पृष्ठरुक् शोफश्च गुदस्थिते ॥ १ ॥

पक्वाशयामध्यें (मलाशयांत) वात कुपित झाला असतां मल, मूत्र व अधोवायु ह्यांचा अवरोध होतो. शूल, पोट फुगणें, मूतखडा, मूत्रशर्करा, पायाच्या पोटऱ्या, मांड्या, माकडहाड, हृदय व पाठ ह्यांच्या ठिकाणीं पीडा व सूज हीं लक्षणें होतात.

आमाशयगत वातलक्षण.

रुक् पार्श्वोदरहृन्नाभौ तृष्णोद्गारविषूचिकाः ।
कासः कण्ठास्यशोषश्च छर्दिश्चामाशये स्थिते ॥ १ ॥

आमाशयामध्यें वात कुपित झाला असतां कुशी, पोट, हृदय, नाभि ह्या ठिकाणीं पीडा, तहान, ढेकर, विषूचिका (मोडशी), खोकला, घशाला कोरड आणि ओकारी हीं लक्षणें होतात.

कुपितवातलक्षण.

पक्वाशयस्थोऽन्त्रकूजं शूलाटोपौ करोति च ।
कृच्छ्रमूत्रपुरीषत्वमानाहं त्रिकवेदनाम् ॥ १ ॥

पक्वाशयांत वात कुपित झाला असतां आंतड्यांत कुरकुर असा शब्द होतो. शूल, पोटांत गुडगुड वाजणें, मल व मूत्र कष्टानें होणें, पोट फुगणें व माकडहाडामध्यें वेदना हीं लक्षणें होतात.

कर्णादिकुपितवातलक्षण.

श्रोत्रादिष्विन्द्रियवधं कुर्यात्क्रुद्धः समीरणः ॥ १ ॥

कान वगैरे इंद्रियांचे ठिकाणीं वात कुपित झाला असतां त्या त्या इंद्रियाचा नाश होतो.

त्वचागत व रसगत कुपितवातलक्षण.

त्वग्रूक्षा स्फुटिता सुप्ता कृशा कृष्णा च तुद्यते ।
आतन्यते सरागा च पर्वरुक् त्वग्गतेऽनिले ॥ १ ॥
अश्रद्धा गौरवालस्यं ज्वरो रसगतेऽनिले ।

त्वचा रूक्ष होते, फुटते, बधिर होते, कृश होते, काळी होते, त्वचेमध्यें टोंचणी असते, त्वचा ताणल्यासारखी होते, तांबूस होते आणि पेरें दुखतात. हीं लक्षणें वायूनें त्वचेचा आश्रय केला असतां होतात. आणि वायु रसधातुगत झाला असतां अश्रद्धा, जडत्व, आळस व ज्वर हीं लक्षणें होतात.

रक्तगत वातलक्षण.

रुजस्तीव्राः ससंतापा वैवर्ण्यं कृशताऽरुचिः ।
गात्रे चारूंषि भुक्तस्य स्तम्भश्चासृग्गतेऽनिले ॥ २ ॥

वायु रक्ताश्रित झाला असतां, अंगाचा दाह व तीव्र वेदना होतात. शरीराचा वर्ण बदलतो. शरीर कृश होतें. तोंडाला अरुचि

येते. अंगावर व्रण होतात आणि जेवलें असतां अंग ताठतें.

मांसमेदोगत वातलक्षण.

सर्वांगं तुद्यते स्तब्धं दण्डमुष्टिहतं यथा ।
सरुक्स्तिमितमत्यर्थं मांसमेदोगतेऽनिले ॥ १ ॥

मांस किंवा मेदोगत वात झाला असतां सर्व अंग काठीनें किंवा बुक्यांनीं मारल्याप्रमाणें ठणकतें व ताठतें; स्थिर असतें व दुखतें.

मज्जा व अस्थिगत वातलक्षण.

भेदोऽस्थिपर्वणां संधिशूलं मांसबलक्षयः ।
अस्वप्नः सतता रुक्च मज्जास्थिकुपितेऽनिले ॥ १ ॥

हाडांच्या पेऱ्यांमधून फुटल्याप्रमाणें वेदना होते. सांध्यांस कळा लागतात. मांस व शक्ति कमी होते. झोप येत नाहीं. सतत अंग ठणकतें. हीं लक्षणें हाडें व मज्जा ह्यांमध्यें वात कुपित झाला असतां होतात.

शुक्रगत वातलक्षण.

क्षिप्रं मुञ्चति बध्नाति शुक्रस्थः कुपितोऽनिलः ॥ १ ॥

शुक्रस्थानामध्यें वात कुपित झाला असतां तो शुक्राचा स्राव करतो, किंवा शुक्राचा अवरोध करतो.

शिरागत वातलक्षण.

कुर्याच्छिरागतः शूलं शिराकुञ्चनपूरणम् ।
सबाह्याभ्यन्तरायामं खल्लीं कुब्जत्वमेव च ॥ १ ॥

शिरांमधून वायु प्रकुपित झाला असतां शिरा ठणकतात. त्या आंखडतात आणि वातानें फुगतात. व बाह्यायाम, अंतरायाम, खल्ली, कुब्जत्व वगैरे वातविकार होतात.

स्नायु व संधिगत वातलक्षण.

सर्वांगैकांगरोगांश्च कुर्यात्स्नायुगतोऽनिलः ॥ १ ॥
हन्ति संधिगतः संधीञ्शूलशोफौ करोति च ।

स्नायूंमध्यें वायु प्रकुपित झाला असतां सर्वांगवात किंवा एकांगवात हे वातविकार होतात. संधिगत वात कुपित झाला असतां तो सांधे ढिले करितो, किंवा निखळतो; आणि सांध्यांमध्यें शूल व सूज हे विकार होतात.

आवृत वाताचें लक्षण.

प्राणोदानौ समानश्च व्यानश्चापान एव च ॥ १ ॥
स्थानस्था मारुताः पञ्च व्यापयन्ति शरीरिणम् ।
हृदि प्राणो गुदेऽपानः समानो नाभिमण्डले ॥ २ ॥
उदानः कण्ठदेशे स्याद्व्यानः सर्वशरीरगः ।

प्राण, उदान, समान, व्यान व अपान हे पांच वायु स्वस्थानीं असले म्हणजे प्राण्याच्या शरीराचें पोषण करितात. प्राणवायु हृदयामध्यें असतो. अपानवायु गुदाचे ठिकाणीं असतो. समानवायु नाभिमंडलामध्यें असतो. उदानवायु कंठाचे ठिकाणीं असतो, आणि व्यानवायु सर्व शरीरामध्यें संचार करून असतो.

प्राणे पित्तावृते छर्दिर्दाहश्चैवोपजायते ॥ ३ ॥
दौर्बल्यं सदनं तन्द्रा वैरस्यं च कफावृते ।

प्राणवायु पित्तावृत झाला असतां ओकारी व दाह हीं लक्षणें होतात. कफावृत झाला असतां अशक्तता, ग्लानि, तंद्रा व अरुचि हीं लक्षणें होतात.

उदाने पित्तयुक्ते तु दाहो मूर्छा भ्रमः क्लमः ॥ ४ ॥
अस्वेदहर्षौ मन्दाग्निः शीतता च कफावृते ।

उदान वायु पित्तयुक्त झाला असतां दाह, मूर्च्छा, भ्रम व थकवा हे विकार होतात; आणि कफावृत झाला असतां घाम येत नाहीं, अंगावर काटा येतो, अग्निमांद्य व थंडी हीं लक्षणें होतात.

स्वेददाहौष्ण्यमूर्छाः स्युः समाने पित्तसंयुते ॥ ५ ॥
कफेन सङ्गो विण्मूत्रे गात्रहर्षश्च जायते ।

समानवायु पित्तयुक्त झाला असतां घाम येणें, अंगाचा दाह, उष्णता (अंग तापणें) व मूर्च्छा हीं लक्षणें होतात; आणि कफयुक्त झाला असतां मलमूत्रांचा अवरोध होतो व गात्रें स्फुरण पावतात.

अपाने पित्तसंयुक्ते दाहौष्ण्यं रक्तमूत्रता ॥ ६ ॥
अधःकाये गुरुत्वं च शीतता च कफावृते ।

अपानवायु पित्तयुक्त झाला असतां दाह, उष्णता व लघवी लाल होणें हीं लक्षणें होतात; आणि कफयुक्त झाला असतां शरीराचा खालचा भाग जड होतो आणि थंडी वाजते.

व्याने पित्तावृते दाहो गात्रविक्षेपणं क्रमः ॥ ७ ॥
स्तम्भनो दण्डकश्चापि शोफशूलौ कफावृते ।
गुरूणि सर्वगात्राणि स्तम्भनं चास्थिपर्वणाम् ।
लिंगं कफावृते व्याने चेष्टास्तम्भस्तथैव च ॥ ८ ॥

व्यानवायु पित्तयुक्त झाला असतां अंगाचा दाह, अंग अस्ताव्यस्त टाकणें व थकवा हीं लक्षणें होतात. आणि कफयुक्त झाला असतां काठीप्रमाणें अंग ताठणें, ठणकणें व सूज हीं लक्षणें होतात, आणि सर्व अवयव जड होतात; हाडाचीं पेरें ताठतात व हालचाल करितां येत नाहीं.

आक्षेपकादि रोगांचीं लक्षणें.

यदा तु धमनीः सर्वाः कुपितोऽभ्येति मारुतः ।
तदा क्षिपत्याशु मुहुर्मुहुर्देहं मुहुश्चरः ।
मुहुर्मुहुस्तदाक्षेपादाक्षेपक इति स्मृतः ॥ १ ॥

ज्या वेळीं वायु कुपित होऊन सर्व धमन्यांमधून शिरूं लागतो, त्या वेळीं तो अंग वरचेवर हलवितो. ह्या विकारामध्यें वरचेवर अंगाचें आक्षेपण (आकुंचन) होतें, म्हणून ह्याला आक्षेपक असें म्हणतात.

क्रुद्धः स्वैः कोपनैर्वायुः स्थानादूर्ध्वं प्रपद्यते ।
पीडयन्हृदयं गत्वा शिरःशङ्खौ च पीडयेत् ॥ २ ॥
धनुर्वन्नामयेद्गात्राण्याक्षिपेन्मोहयेत्ततः ।

स्वकारणांनीं कुपित झालेला वायु आपलें स्थान सोडून वर चढतो. हृदयामध्यें जाऊन हृदयाला पीडा करतो आणि मस्तकांत शिरून मस्तक व दोन्ही आंख ह्यांनाही पीडा करितो. अंग धनुष्याप्रमाणें वाकवितो व मूर्च्छा आणतो.

दोन अवस्था.

स कृच्छ्रादुच्छ्वसित्युच्चैः स्तब्धाक्षोऽथ निमीलकः ।
कपोत इव कूजेच्च निःसंज्ञः सोऽपतन्त्रकः ॥ १ ॥

तो कष्टानें श्वास टाकतो, त्याचे डोळे ताठतात किंवा मिटलेले असतात. तो पारव्याप्रमाणें घुमतो व त्याला शुद्ध नसते. ह्या विकाराला अपतंत्रक असें म्हणतात.

दृष्टिं संस्तभ्य संज्ञां च हत्वा कण्ठेन कूजति ।

हृदि मुक्ते नरः स्वास्थ्यं याति मोहं वृते पुनः ॥ २ ॥
मर्माश्रितं व्रणं प्राप्य वायुवत्सर्वदेहगः ।
तेन गौरो भवेद्देहः प्राणघ्नमपि तं त्यजेत् ।
वायुना दारुणं प्राहुरेके तमपतानकम् ॥ ३ ॥

ज्या आक्षेपांत डोळे ताठून मूर्च्छा येते, कंठांतून घुरघुर वाजते, वायु हृदयांतून निघाला म्हणजे बरें वाटतें, आणि वायु पुनः हृदयांत शिरला असतां पुनः पूर्वीप्रमाणें मूर्च्छा येते (ह्याला अपतानक असें म्हणतात). दोष मर्माच्या ठिकाणीं झालेल्या व्रणामध्यें शिरून वायूप्रमाणें सर्व देह व्यापून टाकतो. त्यामुळें सर्व शरीर पांढरें होतें. हा प्राणनाशक आहे, म्हणून सोडावा. ह्याला कित्येक वातजन्य भयंकर अपतानक असें म्हणतात.

त्याचें लक्षण.

कफान्वितो भृशं वायुस्तास्वेव यदि तिष्ठति ।
दण्डवत्स्तम्भयेद्देहं स तु दण्डापतानकः ॥ १ ॥

अत्यंत कफयुक्त झालेला वायु त्याच धमन्यांतून फिरत राहिला असतां तो काठीप्रमाणें रोग्याचें अंग ताठवितो. त्याला दंडापतानक असें म्हणतात.

धनुस्तुल्यं नमेद्यस्तु स धनुस्तम्भसंज्ञकः ।
विवर्णबद्धवदनः स्रस्ताङ्गो नष्टचेतनः ।
प्रस्विद्यंश्च धनुस्तम्भी दशरात्रं न जीवति ॥ २ ॥

ज्या आक्षेपकामध्यें वायु धनुष्याप्रमाणें अंग वाकवितो, त्याला धनुस्तंभ (धनुर्वात) असें म्हणतात. ज्याच्या अंगाचा वर्ण बदलला आहे, दातखिळी बसली आहे, अंग गलित झालें आहे, जो मूर्छित झाला आहे व ज्याला फार घाम येतो आहे, असा धनुर्वाताचा रोगी दहा दिवस वांचत नाहीं.

अभ्यंतरायामाचें साधारण रूप.

अंगुलीगुल्फजठरहृद्वक्षोगलसंश्रितः ।
स्नायुप्रतानमनिलो यदा क्षिपति वेगवान् ॥ १ ॥
विष्टब्धाक्षः स्तब्धहनुर्भग्नपार्श्वः कफं वमन् ।
अभ्यन्तरं धनुरिव यदा नमति मानवः ।
तदा सोऽभ्यन्तरायामं कुरुते मारुतो बली ॥ २ ॥

बोटें, पायाचे घोटे, पोट, हृदय, काळीज व गळा ह्या ठिकाणीं असणारा वायु कुपित होऊन जोरानें स्नायु ताणतो व शरीर ताठवितो. त्या वेळीं त्या रोग्याचे डोळे ताठतात. हनुवटी ताठते. कुशी मोडतात. तोंडाला फेस येतो, आणि ज्या वेळीं उराकडे वाकतो तेव्हां त्याला अभ्यंतरायाम म्हणतात.

बाहिरायामलक्षण.

बाह्यस्नायुप्रतानस्थो बाह्यायामं करोति च ।
तमसाध्यं बुधाः प्राहुर्वक्षःकट्यूरुभञ्जनम् ॥ १ ॥

वायु बाहेरचे म्हणजे पाठीकडचे स्नायु ताणून बाह्यायाम उत्पन्न करितो. ह्यांत ऊर, कंबर व मांड्या मोडतात. हा असाध्य आहे.

कफपित्तान्वितो वायुर्वायुरेव च केवलः ।
कुर्यादाक्षेपकं त्वन्यं चतुर्थमभिघातजम् ॥ १ ॥

कफ व पित्त ह्यांनीं युक्त वायु अथवा केवळ वायु अभिघातापासून आक्षेपक उत्पन्न करतो. त्याला चौथा आक्षेपक असें म्हणतात.

असाध्य लक्षण.

गर्भपातनिमित्तश्च शोणितातिस्रवाच्च यः ।
अभिघातनिमित्तश्च न सिध्यत्यपतानकः ॥ १ ॥

गर्भपातामुळें झालेला, अतिशय रक्तस्राव झाल्यामुळें झालेला व कांहीं तरी आघातामुळें झालेला अपतानक साध्य होत नाहीं.

पक्षवध.

गृहीत्वाऽर्धं तनोर्वायुः शिराः स्नायूर्विशोष्य च ।
पक्षमन्यतरं हन्ति संधिबन्धान्विमोक्षयन् ॥ १ ॥
कृत्स्नोऽर्धकायस्तस्य स्यादकर्मण्यो विचेतनः ।
एकाङ्गरोगं तं केचिदन्ये पक्षवधं विदुः ॥ २ ॥

वायु शरीराच्या अर्ध्या भागामध्यें शिरून त्या भागांतील शिरा व स्नायु शुष्क करून संधिबंधनें ढिलीं करितो. त्यामुळें त्या मनुष्याचें एका बाजूचें सर्व अंग निष्क्रिय व बेशुद्ध होतें. ह्या विकाराला कित्येक एकांगरोग व कित्येक पक्षवध असें म्हणतात.

सर्वाङ्गरोगं तद्वच्च सर्वकायाश्रितेऽनिले ।

वरील एकांगाप्रमाणें वायूनें सर्व अंग व्यापलें असतां त्याला सर्वांगरोग म्हणतात.

दाहसंतापमूर्छाः स्युर्वायौ पित्तसमन्विते ॥ १ ॥
शैत्यशोफगुरुत्वानि तस्मिन्नेव कफावृते ।
शुद्धवातहतं पक्षं कृच्छ्रसाध्यतमं विदुः ॥ २ ॥
साध्यमन्येन संसृष्टमसाध्यं क्षयहेतुकम् ।
गुर्विणीसूतिकाबालवृद्धक्षीणेष्वसृक्क्षयात् ।
पक्षाघातं परिहरेद्वेदनारहितं यदि ॥ ३ ॥

वायु पित्तयुक्त असतां दाह, अंग तापणें व मूर्च्छा हे विकार होतात; आणि कफयुक्त असतां थंडी वाजणें, सूज व जडत्व हे विकार असतात. केवळ वातदोषानें होणारा पक्षवध कष्टसाध्य असतो. त्यांत इतर दोषांचा संबंध असल्यास तो साध्य असतो. क्षयजन्य पक्षवध असाध्य असतो. गर्भिणी स्त्री, बाळंतीण, लहान मूल, म्हातारा व अशक्त मनुष्य ह्यांना झालेला पक्षवध (अर्धांगवायु) त्याचप्रमाणें रक्तक्षयामुळें झालेला पक्षवध आणि ज्या पक्षवधामध्यें वदना होत नाहींत असा पक्षवध हे असाध्य समजावे.

अर्दिताचें लक्षण.

उच्चैर्व्याहरतोऽत्यर्थं खादतः कठिनानि च ।
हसतो जृम्भतो भाराद्विषमाच्छयनासनात् ॥ १ ॥
शिरोनासौष्ठचुबुकललाटेक्षणसंधिषु ।
अर्दयत्यनिलो वक्त्रमर्दितं जनयेत्ततः ॥ २ ॥
अभिघाताद्दिवास्वापाज्जिह्वानिर्लेखनात्पुनः ।
व्रणपाकात्करादेश्च शिराव्यधनतस्तथा ॥ ३ ॥
मर्मसंछेदनान्नेत्रकर्णनासाविघर्षणात् ।
तीक्ष्णमद्यासवापानाद्धारणाद्वेगनिग्रहात् ॥ ४ ॥
वर्तमानोऽनिलस्तेषु वक्त्रमर्दयति ध्रुवम् ।
वक्रीभवति वक्त्रार्धं ग्रीवा चाप्यपवर्तते ॥ ५ ॥
शिरश्चलति वाक्सङ्गो नेत्रादीनां च वैकृतम् ।
ग्रीवाचुबुकदन्तानां तस्मिन्पार्श्वे च वेदना ॥ ६ ॥

उंच स्वरानें अभ्यास करण्यानें, कठीण पदार्थ खाण्यानें, मोठ्यानें हसणें, जांभई देणें, ओझें वाहणें, वाकडेंतिकडें निजणें किंवा बसणें वगैरे कारणांनीं मस्तक, नाक, ओठ, हनुवटी, कपाळ व डोळे ह्यांच्या संधीमध्यें शिरलेला वायु तोंडाला पीडा करतो, आणि अर्दितवात उत्पन्न कारितो. त्याचप्रमाणें कांहीं आघात

झाल्यानें, दिवसा झोप घेण्यानें, जीभ घासण्यानें, व्रण पिकल्यामुळ हाताची वगैरे शीर तोडल्यानें, मर्मच्छेद झाल्यामुळें, नाक, कान, डोळे हे अवयव घासल्यामुळें, तीक्ष्ण अशीं मद्यें किंवा आसवें प्याल्यानें, मलमूत्रादिकांचे वेग धारण केल्यानें, तोंडाच्या शिरांमधून असणारा वायु तोंडाला पीडा करतो, त्यामुळें तोंडाची अर्धी बाजू वाकडी होते आणि मानही वाकडी होते; मस्तक कांपतें, बोलतां येत नाहीं; डोळ्यांना वगैरे विकार होतो. त्या बाजूची मान, हनुवटी व दांत ह्यांमध्यें वेदना होतात.

तस्याग्रजो रोमहर्षो वेपथुर्नेत्रमाविलम् ।
वायुरूर्ध्वं त्वचि स्वप्नं तोदं मन्याहनुग्रहौ ॥ ७ ॥
तमर्दितमिति प्राहुर्व्याधिं व्याधिविशारदाः ।
वातात्पित्तात्कफाच्चैव त्रिधा स स्यात्समासतः ॥ ८ ॥

हा अर्दितव्याधि होण्यापूर्वी अंगावर काटा येतो, अंग कांपतें, डोळे गढूळ होतात, वायूची गति उर्ध्व होते (त्या ठिकाणीं), त्वचा बधिर होते, तेथें टोंचणी असते, मान व हनुवटी ताठते. त्याला वैद्यलोक अर्दित असें म्हणतात. हा वात, पित्त व कफ ह्या दोषभेदानें तीन प्रकारचा आहे.

लालातिप्रसवः कम्पः स्फुरणं हनुसंग्रहः ।
ओष्ठयोः श्वयथुः शूलमर्दिते वातजे भवेत् ॥ ९ ॥

अतिशय लाळ गळणें, कंप, स्फुरण, हनुवटी जखडणें, ओठाला सूज व शूल हे विकार वातजन्य अर्दितामध्यें असतात.

पीतमास्यं ज्वरस्तृष्णा पित्ते मूर्छा च धूपनम् ।

तोंडाला पिवळटपणा, ज्वर, तहान, मूर्च्छा व तोंडांतून धूर निघाल्यासारखें वाटणें हे विकार पित्तजन्य अर्दितामध्यें असतात.

गण्डे शिरसि मन्यायां शोफः स्तम्भः कफोद्भवे ॥ १० ॥

गाल, मस्तक व मान ह्यांचे ठिकाणीं सूज व ताठपणा हे विकार कफजन्य अर्दितामध्यें असतात.

त्याचें असाध्य लक्षण.

क्षीणस्यानिमिषाक्षस्य प्रसक्ताव्यक्तभाषिणः ।
न सिध्यत्यर्दितं गाढं त्रिवर्षं वेपनस्य च ।

जो क्षीण झाला आहे, ज्याचे डोळे मिटत नाहींत, ज्याला स्पष्ट बोलतां येत नाहीं, ज्याचा अर्दितरोग तीन वर्षांचा जुना आहे व ज्याला कंप सुटला आहे, त्याचा अर्दितवायु साध्य होत नाहीं.

गते वेगे भवेत्स्वास्थ्यं सर्वेष्वाक्षेपकादिषु ॥ १ ॥

आक्षेपकादि सर्व रोगांचे वेग निघून गेल्यावर रोग्याला स्वस्थता वाटते.

हनुस्तंभ.

जिह्वानिर्लेखनाच्छुष्कभक्षणादभिघाततः ।
कुपितो हनुमूलस्थः स्रंसयित्वाऽनिलो हनुम् ॥ १ ॥
करोति विवृतास्यत्वमथवा संवृतास्यताम् ।
हनुग्रहः स तेन स्यात्कृच्छ्राच्चर्वणभाषणम् ।
हनुग्रहे पूर्वरूपं हनुस्तम्भश्च वेपथुः ॥ २ ॥

जीभ घासण्यानें, कोरडे पदार्थ खाण्यानें, अभिघातामुळें, हनुवटीच्या मुळाशीं कुपित झालेला वायु हनुवटीला ढिली करून तो पसरतो किंवा मिटवून धरतो. ह्याला हनुग्रह म्हणतात. त्यायोगानें बोलणें व चालणें ह्या क्रिया मोठ्या कष्टानें होतात. हा हनुग्रह होण्यापूर्वीं हनुवटी ताठते व कांपते.

मन्यास्तंभ.

दिवास्वप्नासनस्थानविकृतोर्ध्वनिरीक्षणैः ।
मन्यास्तम्भं प्रकुरुते स एव श्लेष्मणा वृतः ॥ १ ॥

दिवसा निजणें, उंच सखल जाग्यावर बसणें व वाकडी मान करून वर पहाणें ह्या कारणांनीं वायु कफानें युक्त होऊन मन्यास्तंभ उत्पन्न करितो.

जिव्हास्तंभ.

वाग्वाहिनीशिरासंस्थो जिह्वां स्तम्भयतेऽनिलः ।
जिह्वास्तम्भः स तेनान्नपानवाक्येष्वनीशता ॥ १ ॥

वाचावह शिरांमध्यें असलेला वायु जीभ ताठवितो. त्यामुळें रोगी बोलण्याला व खाण्यापिण्याला असमर्थ होतो. त्याला जिव्हास्तंभ असें म्हणतात.

कुब्जवातलक्षण.

हृदयं यदि वा पृष्ठमुन्नतं क्रमशः सरुक् ।

क्रुद्धो वायुर्यदा कुर्यात्तदा तं कुब्जमादिशेत् ॥ २ ॥
कुपित झालेला वायु अनुक्रमें पाठ किंवा हृदय वर उचलल्या-सारखें करून, पीडा उत्पन्न करितो; त्याला कुब्जवात म्हणतात.

शिरोग्रह.

रक्तमाश्रित्य पवनः कुर्यान्मूर्धधराः शिराः ।
रूक्षाः सवेदनाः कृष्णाः सोऽसाध्यः स्याच्छिरोग्रहः ॥१॥

वायु रक्ताचा आश्रय करून मूर्धधरा शिरांमध्यें शिरून त्यांना रूक्षता आणतो व त्यांत वेदना उत्पन्न करितो. त्यामुळें त्या शिरा काळ्या होतात. ह्याला शिरोग्रह असें म्हणतात. हा असाध्य आहे.

गृध्रसी वात.

स्फिक्पूर्वं कटिपृष्ठोरुजानुजंघापदं क्रमात् ।
गृध्रसी स्तम्भरुक्तोदैर्गृह्णाति स्पन्दते मुहुः ॥ १ ॥
वाताद्वातकफाभ्यां वा विज्ञेया सा द्विधा पुनः ।
वातजायां भवेत्तोदो देहस्याऽपि प्रवक्रता ॥ २ ॥
जानुकट्यूरुसंधीनां स्फुरणं सुप्तता भृशम् ।
वातश्लेष्मोद्भवायां तु स्तैमित्यं वह्निमार्दवम् ॥ ३ ॥
तन्द्रा मुखप्रसेकश्च भक्तद्वेषस्तथैव च ।
वाताद्वातकफात्तन्द्रा गौरवारोचकान्विता ॥ ४ ॥

कमरेच्या मागच्या भागापासून सुरवात करून पुढें क्रमानें पाठ, मांड्या, गुडघे, पोटऱ्या व पाय ह्यांमध्यें स्तब्धता, कळा व टोंचणी हे विकार होतात. व वरचेवर कांपरें भरतें. ह्याला गृध्रसी असें म्हणतात. ही केवळ वातापासून किंवा वातकफा-पासून, अशी दोन प्रकारची असते. वातजन्य गृध्रसीमध्यें टोंचणी, शरीराला वक्रता, गुडघे, कंबर व मांड्या ह्यांच्या सांध्याचे ठिकाणीं स्फुरण होतें, व अत्यंत बधिरता असते; आणि वातकफा-पासून होणाऱ्या गृध्रसीमध्यें स्तब्धता, अग्निमांद्य, तंद्रा, तोंडाला पाणी सुटणें व अन्नद्वेष हीं लक्षणें होतात. वातकफजन्य गृध्रसी-मध्यें तंद्रा, जडत्व व अरुचि हीं लक्षणें असतात.

विश्वाची.

तलं प्रत्यंगुलीनां या कण्डरा बाहुपृष्ठतः ।
बाह्वोः कर्मक्षयकरी विश्वाचीति हि सोच्यते ॥ १ ॥

जो वात बाहूच्या पृष्ठापासून तों हाताच्या तळव्यापर्यंत ज्या कंडरा आहेत, त्यांना दूषित करून बाहूची क्रिया बंद करतो, त्या वातविकाराला विश्वाची असें म्हणतात.

गुडघी.

वातशोणितजः शोथो जानुमध्ये महारुजः ।
ज्ञेयः क्रोष्टुकशीर्षस्तु स्थूलः क्रोष्टुकशीर्षवत् ॥ १ ॥

वातरक्तापासून अत्यंत ठणका ज्यामध्यें आहे अशी सूज गुडघ्याला येते. ती कोल्ह्याच्या डोक्यासारखी असते. म्हणून ह्या विकाराला क्रोष्टुशीर्ष असें म्हणतात.

लंगडा व पांगळा.

वायुः सक्थ्याश्रितः सक्थ्नः कण्डरामाक्षिपेद्यदा ।
खञ्जस्तदा भवेज्जन्तुः पंगुः सक्थ्नोर्द्वयोर्वधात् ॥ १ ॥

कमरेमध्यें कुपित झालेला वात मांडीच्या कंडरांना ज्या वेळीं ताणून धरतो, त्या वेळीं मनुष्य लंगडा होतो, आणि दोन्ही मांड्या आखडल्या असतां पांगळा होतो.

कलायखंजलक्षण.

प्रक्रामन्वेपते यस्तु खञ्जन्निव च गच्छति ।
कलायखञ्जं तं विद्यान्मुक्तसंधिप्रबन्धनम् ॥ १ ॥

चालतांना जो लटलट कांपतो व लंगड्याप्रमाणें चालतो, त्याला कलायखंज असें म्हणतात. ह्या विकारांत संधिबंधनें ढिलीं असतात.

वातकंटकलक्षण.

रुक्पादे विषमे न्यस्ते श्रमाद्वा जायते यदा ।
वातेन गुल्फमाश्रित्य तमाहुर्वातकण्टकम् ॥ १ ॥

चालण्याच्या श्रमांमुळें किंवा वांकडातिकडा पाय पडल्यामुळें, वात घोट्यामध्यें शिरून ठणका उत्पन्न करितो. त्याला वातकंटक असें म्हणतात.

पादकण्टकलक्षण.

न्यस्ते तु विषमे पादे रुजः कुर्यात्समीरणः ।
पादकण्टक इत्येष विज्ञेयस्तलकाश्रितः ॥ २ ॥

पाय वांयडा तिकडा टाकल्यामुळें वात पायाच्या तळव्यांत शि-

रून वेदना उत्पन्न करितो; या विकारास पादकंटक म्हणतात.

जळवातलक्षण.

पादयोः कुरुते दाहं पित्तासृक्सहितोऽनिलः ।
विशेषतश्चंक्रमते पाददाहं तमादिशेत् ॥ १ ॥

पित्त व रक्त ह्यांचा आश्रय करून वात पायांचा दाह करितो. त्यांत चालतें असतां विशेष दाह करितो. त्याला पाददाह म्हणतात.

पाय वळणें.

हृष्यतश्चरणौ यस्य भवतस्तु प्रसुतवत् ।
पादहर्षः स विज्ञेयः कफवातप्रकोपजः ॥ १ ॥

ज्याच्या पायाला मुंग्या आल्यासारखें वाटतें, आणि पाय बधिर होतात, त्याला पादहर्ष असें म्हणतात. हा वातकफापासून होतो.

अवबाहुक.

अंसदेशे स्थितो वायुः शोषयित्वांऽसबन्धनम् ।
शिराश्चाऽकुञ्च्य तत्रस्थो जनयत्यवबाहुकम् ॥ १ ॥

खांद्याचा आश्रय करून असलेला वायु खांद्याचीं बंधनें शुष्क करून खांदा सुकवितो, व बाहूच्या शिरा आंखडून धरून अवबाहुक रोग उत्पन्न करितो.

मूकादिकांचें लक्षण.

आवृत्य सकफो वायुर्धमनीः शब्दवाहिनीः ।
नरान्करोत्यक्रियकान्मूकमिन्मिनगद्गदान् ॥ १ ॥

कफयुक्त वायु शब्दवह धमनीचा आश्रय करून बोलण्याची क्रिया बंद करतो, त्यामुळें मनुष्य मुका होतो. मिन्मिण (गेंगणें बोलणारा) होतो, आणि गद्गद बोलणारा (बोलतांना अक्षरें गाळणारा) होतो.

उर्ध्ववातलक्षण.

अधः प्रतिहतो वायुः श्लेष्मणा मायुनाऽथ वा ।
करोति भृशमुद्गारमूर्ध्ववातः स उच्यते ॥ १ ॥

कफानें अथवा पित्तानें खालून झुगारून दिलेला वायु पुष्कळ ढेंकर उत्पन्न करितो, त्याला उर्ध्ववात असें म्हणतात.

तूनीलक्षण.

अधो या वेदना याति वर्चोमूत्राशयोत्थिता ।
भिनत्तीव गुदोपस्थं सा तूनी नाम नामतः ॥ १ ॥

मलाशय व मूत्राशय यांमधून निघालेल्या वेदना खालीं जाऊन गुद व गुह्येंद्रिय ह्यांत फोडल्याप्रमाणें वेदना उत्पन्न करितात, या वातरोगाला तूनी असें म्हणतात.

प्रतूनीलक्षण.

गुदोपस्थिता सैव प्रतिलोमं प्रधावति ।
वेगैः पक्वाशयं याति प्रतूनीति हि सोच्यते ॥ १ ॥

त्याच वेदना गुद व गुह्येंद्रिय ह्यांमधून निघून उलट्या वर चढून वेगानें पक्वाशयांत जातात, तेव्हां या रोगास प्रतूनी असें म्हणतात.

बाधिर्यलक्षण.

यदा शब्दवहं स्रोतो वायुरावृत्य तिष्ठति ।
शुद्धः श्लेष्मान्वितो वाऽपि बाधिर्यं तेन जायते ॥ १ ॥

ज्या वेळीं शुद्ध वायु किंवा कफयुक्त वायु शब्दवह स्रोतसें भरून टाकतो, त्या वेळीं बहिरेपणा उत्पन्न होतो.

आध्मानलक्षण.

साटोपमत्युग्ररुजमाध्मातमुदरं भृशम् ।
आध्मानमिति जानीयाद् घोरं वातनिरोधजम् ॥ १ ॥

पोटांत अतिशय गुडगुडणें, दुखणें व पोट फार फुगणें हे विकार असले म्हणजे त्या भयंकर विकाराला आध्मान असें म्हणतात.

आमाशयजन्य प्रत्याध्मान.

विमुक्तपार्श्वहृदयं तदेवाऽऽमाशयोत्थितम् ।
प्रत्याध्मानं विजानीयात्कफव्याकुलितानिलम् ॥ २ ॥

वरील आध्मान विकार आमाशयांत झाला म्हणजे त्याला प्रत्याध्मान म्हणतात. ह्या विकारांत हृदय व कुशी ह्यांत दुखत नाहीं. ह्यांत वायु कफाशीं मिश्र असतो.

अष्ठीलालक्षण.

नाभेरधस्तात्संजातः संचारी यदि वाऽचलः ।
अष्ठीलावद् घनो ग्रंथिरूर्ध्वमायत उन्नतः ॥ १ ॥

बेंबीच्या खालीं आठळीप्रमाणें वर उचललेली, वाटोळी व लांबट अशी गांठ उत्पन्न होते, ती अचल असते किंवा हलणारी असते; तिला अष्ठीला असें म्हणतात.

वाताष्ठीला.

विण्मूत्रानिलसङ्गश्च तत्राऽऽध्मानं च जायते ।
वाताष्ठीलां विजानीयाद्बहिर्मार्गनिरोधिनीम् ॥ १ ॥

ज्या अष्ठीलेमध्यें मल, मूत्र व अधोवायु ह्यांचा अवरोध असतो, तिला वाताष्ठीला असें म्हणतात. ही बाहेरचा मार्ग रोधून असते.

प्रत्यष्ठीला.

एतामेव रुजोपेतां वातविण्मूत्ररोधिनीम् ।
प्रत्यष्ठीलामिति वदेज्जठरे तिर्यगुत्थिताम् ॥ १ ॥

वरील वाताष्ठीलेप्रमाणेंच पीडा करणारी व अधोवायु व मलमूत्र ह्यांचा अवरोध करणारी जी गांठ पोटामध्यें आडवी उत्पन्न होते, तिला प्रत्यष्ठीला असें म्हणतात.

मूत्ररोध करणारी वातविकृति.

मारुतेऽनुगुणे वस्तौ मूत्रं सम्यक्प्रवर्तते ।
विकारा विविधाश्चापि प्रतिलोमे भवन्ति हि ॥ १ ॥

बस्तीमध्यें वायु मार्गावर असला म्हणजे मूत्र साफ होतें. आणि तोच मार्ग सोडून विगुण झाला असतां मूत्रसंबंधीं नानाप्रकारचे विकार उत्पन्न करितो.

सर्वांगकंपवातलक्षण.

सर्वांगकम्पः शिरसो वायुर्वेपथुसंज्ञकः ॥ १ ॥

ज्या विकारांत सर्व अंग व मस्तक थरथर कांपतें, त्याला वेपथु (सर्वांगकंपवात) म्हणतात.

खल्ली.

खल्ली तु पादजङ्घोरुकरमूलावमोटिनी ॥ १ ॥

पाय, पिंढऱ्या, मांड्या, करमूल (हाताचा सांधा) ह्याला लुके पाडणारी जी वातविकृति तिला खल्ली असें म्हणतात.

अनुक्तवातरोगांचें लक्षण.

स्थानानामनुरूपैश्च लिंगैः शेषान्विनिर्दिशेत् ।

सर्वेषु तेषु संसर्गं पित्ताद्यैरुपलक्षयेत् ॥ १ ॥

स्थानाला अनुरूप अशा लक्षणांनीं बाकीचे वातविकार सांगावे. त्या सर्वांमध्यें पित्तादिकांचा संसर्ग आहे का नाहीं हें पहावें.

हिमन्तीव च गात्राणि रोमाञ्चाद्धुरितानि च ।
शिरोक्षिवेदनालस्यं शीतवातस्य लक्षणम् ॥ २ ॥

अंग थंडगार असतें. अंगावर कांटा येतो, मस्तक व डोळे दुखतात व आळस असतो. ह्या विकाराला शीतवात असें म्हणतात.

अंगेषु तोदनं प्रायो दाहः स्पर्शं न विन्दति ।
मण्डलानि च दृश्यन्ते स्पर्शवातस्य लक्षणम् ॥ ३ ॥

शरीरांत टोंचल्याप्रमाणें वेदना होतात; दाह होतो व स्पर्श कळत नाहीं. अंगावर मंडळें दिसतात. ह्या विकाराला स्पर्शवात म्हणतात.

पादयोश्च भवेद्दाहस्त्वक्स्फोटः श्वयथुः क्रमः ।
रक्तस्रावः स्पन्दनं च रक्तवातस्य लक्षणम् ॥ ४ ॥

पायांचा दाह होतो, त्वचा फुटते, सूज येते व थकवा असतो, त्वचेच्या भेगांतून रक्त येतें व अंग कांपतें, त्याला रक्तवात म्हणतात.

हनुशंखशिरोग्रीवं यो भिनत्ति तु चानिलः ।
कर्णयोः कुरुते शूलं कर्णशूलः स उच्यते ॥ ५ ॥

जो वात हनुवटी, आंख, मस्तक व मान ह्यांच्या ठिकाणीं फोडल्याप्रमाणें पीडा करतो व कानांत शूळ उत्पन्न करतो त्याला कर्णशूल असें म्हणतात.

साध्यासाध्यता.

हनुस्तम्भार्दिताक्षेपपक्षाघातापतानकाः ।
कालेन महता वाता यत्नात्सिध्यन्ति वा न वा ॥ १ ॥
नवान्बलवतश्चैतान्साधयेन्निरुपद्रवान् ।
विसर्पदाहरुक्संगमूर्छारुच्यग्निमार्दवैः ।
क्षीणमांसबलं वाता घ्नन्ति पक्षवधादयः ॥ २ ॥
शूनं सुप्तत्वचं भुग्नं कम्पाध्माननिपीडितम् ।
रुजार्तिमन्तं च नरं वातव्याधिर्विनाशयेत् ॥ ३ ॥

हनुग्रह, अर्दित, आक्षेपक, पक्षाघात, अपतानक हे मोठे वातरोग पुष्कळ दिवस उपचार केल्यानें साध्य होतात; कदाचित् होतही

नाहींत. जर हे वातरोग नवीन, सशक्त मनुष्याला झालेले व उपद्रवरहित असे असतील, तरच त्यांजवर उपचार करून ते बरे करावे. विसर्प, दाह, ठणका, मलमूत्रावरोध, मूर्च्छा, अरुचि व अग्निमांद्य ह्या विकारांनीं युक्त व ज्याचें मांस व बल क्षीण झालें आहे, असे हे पक्षवधादि वातविकार रोग्याला मारतात. ज्याला सूज आली आहे, ज्याची त्वचा बहिर झाली आहे, ज्याला वक्रता आली आहे, ज्याला कंप सुटला आहे, ज्याचें पोट फुगलें आहे व जो पीडेमुळें बेजार झाला आहे अशा रोग्याला वातरोग मारतो.

अव्याहतगतिर्यस्य स्थानस्थः प्रकृतौ स्थितः ।
वायुः स्यात्सोऽधिकं जीवेद्वीतरोगः समाः शतम् ॥४॥

ज्या मनुष्याचा वायु स्वस्थानीं व आपल्या प्रकृतिधर्माला धरून आहे, तसेंच ज्याची गति कुंठित झालेली नाहीं, निरोगी राहून शंभर वर्षें (एकशेंवीस वर्षें व पांच दिवस)पर्यंत वांचतो.

वातव्याधिचिकित्सा.

अभ्यंगं स्वेदनं बस्तिर्नस्यं स्नेहविरेचनम् ।
स्निग्धाम्ललवणं स्वादु वृष्यं वातामयापहम् ॥ १ ॥
स्वाद्वम्ललवणैः स्निग्धैराहारैर्वातरोगिणः ।
अभ्यंगस्नेहबस्त्याद्यैः सर्वानेवोपपादयेत् ॥ २ ॥
पित्तस्याऽऽवरणे वातरोगे शीतोष्णभेषजम् ।
कफस्याऽऽवरणे वायौ रूक्षोष्णं भक्ष्यभेषजम् ॥ ३ ॥

अभ्यंग (अंगास तेल लावणें), स्वेदन (घाम काढणें), बस्ति (एनिमा किंवा पिचकारी देणें), नस्य (नाकांत औषध घालणें), स्नेहविरेचन (स्निग्ध अशीं रेचक औषधें देणें), स्निग्ध, आंबट, खारट, गोड व वृष्य (पौष्टिक) असे खाण्याचे पदार्थ, हे वातनाशक आहेत. सर्व वातरोगावर गोड, आंबट, खारट, स्निग्ध अशा आहारानें; व अभ्यंग, स्नेहन, बस्ति इत्यादि कर्मांनीं उपचार करावे.

केवले पवनव्याधौ स्निग्धोष्णं भक्ष्यभेषजम् ।
स्निग्धोष्णशीतरूक्षाद्यैर्वातजो यो न शाम्यति ।
विकारस्तत्र विज्ञेयो दुष्टशोणितसंभवः ॥ ४ ॥

पित्तयुक्त वात असतां त्याजवर थंड व उष्ण (समशीतोष्ण)

उपचार करावे. वात कफयुक्त असतां त्याजवर उष्ण व रूक्ष असें औषध व खाण्याचे पदार्थ द्यावे. आणि केवळ वातविकार असतां स्निग्ध व उष्ण असें औषध व खाण्याचे पदार्थ द्यावे. ही जी स्निग्ध, उष्ण, शीत, रूक्ष इत्यादि क्रिया सांगितली, त्या योगानें जर विकाराचें शमन झालें नाहीं, तर तो विकार रक्तदोषापासून झाला आहे असें समजावें.

बस्तिगत वातावर.

कार्यो बस्तिगते वाते विधिर्बस्तिविशोधनः ।
विशेषतस्तु कोष्ठस्थे वाते क्षीरं पिबेन्नरः ॥ १ ॥

बस्तिगत (ओटीपोटांतील) वातविकारावर बस्तिशोधक (रेचक वगैरे) उपचार करावे व विशेषतः कोष्ठगत वातावर दूध प्यावें.

व्योषसौवर्चलाजाजीपथ्यालवणपञ्चकम् ।
सारिवाबृहतीपाठाकलिंगाग्नियवाग्रजम् ॥ २ ॥
चूर्णीकृतं दधिसुरातन्मण्डोष्णाम्बुकाञ्जिकैः ।
पिबेदग्निविवृद्ध्यर्थं कोष्ठवातहरं परम् ॥ ३ ॥

सुंठ, मिरें, पिंपळी, पादेलोण, हिरडेदळ, पंचलवणें, उपलसरी, डोरलीमूळ; किंवा रिंगणमूळ, पहाडमूळ, इंद्रजव, चित्रकमूळ, व जवखार ह्या औषधांचें समभाग चूर्ण करून तें जठराग्नि प्रदीप्त होण्याकरितां दहीं, मद्याची निवळ, मद्य, ऊन पाणी किंवा कांजी ह्यांतुन द्यावें. हें कोष्ठगतवात हरण करण्याविषयीं फार उत्तम आहे.

गुदाश्रित वातावर.

दशमूलीकषायेण मातुलुंगरसेन वा ।
पिबेदेरण्डतैलं च बस्तिकुक्षिगुदाश्रिते ॥ १ ॥

बस्ति, कुशी व गुद ह्या स्थानीं वातविकार असतां दशमुळांच्या काढ्यांतून किंवा महाळुंगाच्या रसांतुन एरंडेल प्यावें.

आमाशयगत वातावर.

आमाशयगते वाते छर्दिस्वापौ यथाक्रमम् ।
देयः षट्चरणो योगः सप्तरात्रं सुखांऽबुना ॥ १ ॥

आमाशयगत वातावर अनुक्रमें वमन व झोंप घेण्यास सांगावें; आणि सात दिवसपर्यंत षट्चरणयोगचूर्ण सोसेल अशा ऊन अगर थंड पाण्यांतून द्यावें.

षट्चरणचूर्ण.

चित्रकेन्द्रयवापाठाकटुकातिविषाभयाः ।
महाव्याधिप्रशमनो योगः षट्चरणः स्मृतः ॥ २ ॥

चित्रकमूळ, इंद्रजव, पहाडमूळ, कुटकी, अतिवीष व हिरडेदळ हा महा वातविकार नाश करणारा षट्चरण नांवाचा योग आहे.

काढे.

पूतीकपथ्याशठिपुष्कराणि बिल्वं गुडूची सुरदारु शुण्ठी ।
विडंगपाठातिविषा कणा च क्वाथास्त्रयः सामसमीरणघ्नाः ॥१

करंजाची साल, हिरडेदळ, कचोरा, पोखरमूळ ह्या औषधांचा; बेलाची साल, गुळवेल, देवदार व सुंठ ह्या औषधांचा; आणि वावडिंग, पहाडमूळ, अतिविष व पिंपळी ह्या औषधांचा, असे हे तीन काढे आमवाताचा नाश करितात.

कार्पासास्थिकुलत्थिकातिलयवैरेरण्डमाषातसी-
वर्षाभूशणबीजकाञ्जिकयुतैरेकीकृतैर्वा पृथक् ।
स्वेदः स्यादिति कूर्परोदरहनुस्फिक्पाणिपादांगुली-
गुल्फस्तम्भकटीरुजो विजयते सामाः समीरोद्भवाः ॥२॥

सरक्या, हुलगे, तीळ, सातू, एरंड्या, उडीद, जवस, वसू व तागाचें बीं, ह्या सर्वांचा एकत्र करून अथवा पृथक् पृथक् कांजींतून स्वेद द्यावा. तो कोपर, पोट, हनुवटी, ढुंगण, हात, पाय, बोटें व घोटे ह्यांचा आमवातापासून आलेला ताठपणा व कंबरेचा ठणका ह्यांचा नाश करतो.

पक्वाशयगत वातावर.

पक्वाशयगते वाते हितं स्नेहैर्विरेचनम् ।
बस्तयः शोधनीयाश्च प्राश्याश्च लवणोत्तराः ॥ १ ॥

पक्वाशयगत वातावर स्निग्ध रेचन द्यावें. तें हितकारक आहे. तसेंच शोधन करणारे बस्ति व लवणयुक्त प्राश्य (पेय) पदार्थही हितकारक आहेत.

हृदयवातलक्षणः-हृदिस्थः कुरुते वातोऽन्नपानोच्छ्वासरोधनम् ।
हृदयस्थ कुपित झालेला वात अन्नपान व श्वासोच्छ्वास ह्यांचा रोध करतो.
उपचारः-हृदयानिलनाशाय गुडूचीमरिचान्वितम् ।
पिबेत्प्रातः प्रयत्नेन सुखेनोष्णांभसा सह ॥

कान वगैरे इंद्रियगत वातावर.

श्रोत्रादिषु प्रकुपिते कार्यो वातहरः क्रमः ।
स्नेहाभ्यंगोपनाहांश्च मर्दनालेपनानि च ॥ १ ॥

कान वगैरे इंद्रियांच्या ठिकाणीं वातविकार झाला असल्यास स्नेहन, अभ्यंग, पोटीस, मर्दन व लेप देणें हे सर्व उपचार वातनाशक असे करावे.

त्वचा, मांस, रक्त, शिरा यांतील वातावर.

त्वङ्मांसासृक्शिराप्राप्ते कुर्याद्रक्तविमोक्षणम् ।
स्नेहोपनाहाग्निकर्मबन्धनोन्मर्दनानि च ॥ १ ॥

त्वचा, मांस, रक्त व शिरा ह्यांमध्यें वात प्रकुपित झाला असतां रक्त काढावें, स्नेहन द्यावें, पोटीस बांधावें, डाग द्यावा, पेंड वगैरे बांधावें, व मर्दन करावें.

मांस, मेद मज्जा व हाडें, ह्यांमध्यें कुपित झालेल्या वातावर.

विरेको मांसमेदःस्थे निरूहः शमनानि च ।
बाह्याभ्यन्तरगस्नेहैरस्थिमज्जागतं जयेत् ॥ १ ॥

मांस व मेदोगत वातावर रेचक, निरूहबस्ति व शामक उपचार करावे. आणि अस्थि व मज्जागत वायूवर अंतर्बाह्य (पोटांत घेण्यास व बाहेर अंगाला चोळण्यास) तेलाचे, तुपाचे वगैरे स्निग्ध उपचार करावे.

स्नायु, सांधे व हाडांचे सांधे ह्यांमध्यें कुपित झालेला वायु.

स्नायुसंध्यस्थिसंप्राप्ते कुर्याद्वाते विचक्षणः ।
स्वेदोपनाहसंमर्दस्नेहनादिकमादरात् ॥ १ ॥

पिबेदुष्णांभसा पिष्टं साश्वगंधं बिभीतकम् ।
गुडयुक्तं प्रयत्नेन हृदयानिलनाशनम् ॥
देवदारुसमायुक्तं नागरं परिपेषितम् ।
हृद्वातवेदनायुक्तः पीत्वा सुखमवाप्नुयात् ॥

अर्थः---हृदयांतील वात दूर होण्यासाठीं गुळवेल व मिरें ह्यांचें चूर्ण सकाळीं ऊन पाण्याशीं घ्यावें. अश्वगंध व बेहडेदळ ह्यांचें चूर्ण गुळाशीं ऊन पाण्यातून घ्यावें. तें हृदयसंबंधीं वाताची पीडा दूर करितें. देवदार व सुंठ ह्यांचें चूर्ण घेतलें असतां ज्याला हृदयवाताची पीडा आहे त्याला सुख होतें.

स्नायु, सांधे व हाडांचे सांधे या ठिकाणीं वात कुपित झाला असतां घाम काढणें, पोटीस बांधणें, मर्दन करणें व स्नेहन वगैरे उपचार करावे.

शुक्रगत वातावर.

शुक्रप्राप्तेऽनिले कार्यं शुक्रदोषचिकित्सितम् ॥ १ ॥

शुक्रगत वात कुपित झाला असतां शुक्रदोषावरील चिकित्सा करावी.

काळीज वगैरे ठिकाणचे वाताचे विकार.

वक्षस्त्रिकस्कन्धगते वाते मन्यागते तथा ।
वमनं मर्दनं नस्यं कुशलेन प्रयोजयेत् ॥ १ ॥

वक्ष (हृदय अथवा काळीज), माकडहाड, खांदे, वगैरे ठिकाणीं वात कुपित झाला असतां वमन, अंग रगडणें, नस्य ह्यांची कुशलतेनें योजना करावी.

पक्षाघाताची चिकित्सा.

माषात्मगुप्तकैरण्डवाट्यालकशृतं जलम् ।
हिंगुसैन्धवसंयुक्तं पक्षाघातनिवारणम् ॥ १ ॥

उडीद, कवचबीज, एरंडमूळ व चिकणामूळ ह्यांचा काढा हिंग व सैंधव घालून द्यावा. तो पक्षाघाताचा (अर्धांगवाताचा) नाश करितो.

माषादि सप्तक.

माषबलाशुकशिम्बीकत्तृणरास्नाश्वगन्धारुबुकाणाम् ।
क्वाथो नस्यनिपीतो रामठलवणान्वितः कोष्णः ॥ १ ॥
अपनयति पक्षघातं मन्यास्तम्भं सकर्णनादरुजम् ।
दुर्जयमर्दितवातं सप्ताहाज्जयति चावश्यम् ॥ २ ॥

उडीद, चिकणामूळ, कुहिलीचें मूळ, रोहिस गवत, रास्ना, अश्वगंध व एरंडमूळ ह्यांचा काढा हिंग व सैंधव घालून नाकानें प्राशन केला असतां ("प्रातःपीतो" असा पाठ आहे, याचा अर्थ प्रातःकाळीं प्राशन केला असतां) सात दिवसांमध्यें पक्षाघात, मन्यास्तंभ व दुर्जय असा अर्दितवात ह्यांचा अवश्य नाश करतो.

माषतेल.

ग्रन्थिकाग्निकणारास्नाकुष्ठनागरसैन्धवम् ।
माषक्वाथेन तत्तैलं पक्षघातविनाशनम् ॥ १ ॥

पिंपळमूळ, चित्रकमूळ, पिंपळी, रास्ना, कोष्ट, सुंठ, सैंधव, ह्यांचा करक व उडदाचा काढा ह्यांमध्यें तेल सिद्ध करावें; तें अर्धांगवायूचा नाश करितें.

अर्दितवातचिकित्सा.

नवनीतेन संयुक्तां खादेन्माषेण्डरीं नरः ।
दुर्वारमर्दितं हन्ति सप्तरात्रान्न संशयः ॥ १ ॥

लोण्याबरोबर उडदाचे वडे सात दिवस खावे. ते दुर्निवार अर्दिताचा नाश करितात.

लशुनयोग.

पलमर्धपलं वाऽपि रसोनस्य सुकुट्टितम् ।
हिंगुजीरकसिन्धूत्थसौवर्चलकटुत्रिकैः ॥ १ ॥
चूर्णितैर्माषकोन्मानैरवचूर्ण्यावलोडितम् ।
यथाग्नि भक्षितं प्रातर्रुबुकाथानुपानतः ॥ २ ॥
दिने दिने प्रयोक्तव्यं मासमेकं निरन्तरम् ।
वातामयं निहन्त्येवमर्दितं चापतन्त्रकम् ॥ ३ ॥
एकाङ्गरोगिणां रोगं तथा सर्वाङ्गरोगिणाम् ।
ऊरुस्तम्भं गृध्रसीं च शूलं छंब्रकृमीनपि ॥ ४ ॥

चार तोळे किंवा दोन तोळे लसूण चांगली बारीक करावी, व त्यांत हिंग, जिरें, सैंधव, संचळ, सुंठ, मिरें व पिंपळी ह्यांचें चूर्ण एक मासाभर घालून अग्निबल पाहून एरंडमुळाच्या काढ्याच्या अनुपानाशीं प्रातःकाळीं भक्षण करावी. ह्याप्रमाणें एक महिनापर्यंत हा प्रयोग करावा. ह्यापासून वातरोगांचा नाश होतो. त्याचप्रमाणें अर्दितवात व अपतंत्रक ह्यांचाही नाश होतो. तसेंच अर्धांगवायु, सर्वांग वायु, ऊरुस्तंभ, गृध्रसी, शूल, अंतर्बाह्य कृमि, कंबर व पाठ ह्यांमधील वात, उदरसंबंधीं (नळाश्रित) वात ह्यांचाही नाश होतो.

अवबाहुक रोगावर.

कटिपृष्ठामयं हन्याज्जाठरं च समीरणम् ।
माषतैलरसोनाभ्यां बाह्वोश्च परिवर्तनात् ।

दशांघ्रिमाषक्वाथेन जयेद्वैद्योऽवबाहुकम् ॥ १ ॥

अवबाहुकावर लसणीचा कल्क व माषतेल ह्यानें मर्दन करावें, आणि दशमुळें व उडीद ह्यांचा काढा करून द्यावा. अशा उपचारानें अवबाहुक वात जिंकावा.

माषादि तेल.

माषातसीयवकुरण्टककण्टकारी-
गोकण्टटुण्टुकजटाकपिकच्छुतोयैः ।
कार्पासकास्थिशणबीजकुलत्थकोल-
क्वाथेन बस्तपिशितस्य रसेन चाऽपि ॥ १ ॥
शुण्ठ्या च मागधिकया शतपुष्पया च
सैरण्डमूलसपुनर्नवया सरेण्वा ।
रास्नाबलामृतलताकटुकैर्विपक्कं
माषाख्यमेतदवबाहुकहारि तैलम् ॥ २ ॥
अर्धांगशोषमपतानकमाढ्यवात-
माक्षेपकं सभुजकम्पशिरःप्रकम्पम् ।
नस्येन बस्तिविधिना परिषेचनेन
हन्यात्कटीजघनजानुशिरःसमीरान् ॥ ३ ॥

उडीद, जवस, सातु, कोराटा, रिंगणी, गोखरू, टेंटूमूळ, कुहिलीचें मूळ, सरक्या, तागाचें बीज, हुलगे व बोरें ह्यांचा काढा बोकडाच्या मांसाचा रस आणि सुंठ, पिंपळी, बडिशेप, एरंडमूळ, पुनर्नवा, रेणुकबीज, रास्ना, चिकणामूळ, गुळवेल व कुटकी ह्या औषधांचा कल्क ह्यांच्या योगानें तयार केलेलें तेल अवबाहुक रोगाचा नाश करितें. अर्धांगवायु, अपतानक, आढ्यवात, आक्षेपक, हात कांपणें, मस्तक कांपणें, कंबर, मांड्या, गुडघे व मस्तक ह्या ठिकाणचा वात ह्या विकारांमध्यें बस्ति, नस्य व सेचन करणें, अशा प्रकारें ह्या माषतैलाचा उपयोग केला असतां त्या विकारांचा नाश होतो.

प्रत्यष्ठीला व अष्ठीलिका ह्यांजवर.

प्रत्यष्ठीलाष्ठीलिकयोर्गुल्मेऽभ्यन्तरविद्रधौ ।
क्रिया हिङ्ग्वादिचूर्णं च शस्यतेऽत्र विशेषतः ॥ १ ॥

गुल्म व अंतर्विद्रधि ह्यांजवर जे उपचार सांगितले आहेत, तेच

प्रत्यष्ठीला व अष्ठीलिका ह्यांजवर करावें. आणि ह्या दोनी विकारांवर विशेषतः हिङ्ग्वादि चूर्ण योजावें. तें प्रशस्त आहे.

हिंग्वादि चूर्ण.

हिङ्ग्वाम्लत्रिपटूग्रषट्कटुशठीवृक्षाम्लदीप्याह्लका-
पाठाजाज्यजगन्धमूलहपुषाद्विक्षारसाराभयाः ।
हिध्माध्मानविबन्धवर्ध्मकसनश्वासाग्निसादारुचि-
प्लीहार्शोखिलशूलगुल्मगलहृद्रोगाश्मपाण्डुप्रणुत् ॥ १ ॥

हिंग, आम्लवेतस, सैंधेलोण, पादेलोण, बिडलोण, वेखंड, सुंठ, मिरें, पिंपळी, पिंपळमूळ, चवक, चित्रक, कचोरा, आमसुलें, ओवा, धने, पहाडमूळ, जिरें, रानतुळशीचें मूळ, शेरणी, जवखार, सज्जिखार, नवसागर, हिरडेदळ, ह्यांचें समभाग चूर्ण करावें. हें उचकी, पोट फुगणें, मलावरोध, आडसंधींतील गाठी, खोकला, श्वास, अग्निमांद्य, अरुचि, पांथरी, मूळव्याध, सर्व प्रकारचे शूळ, गुल्म, गळरोग, हृद्रोग, मुतखडा व पांडुरोग ह्यांचा नाश करितें. ह्याला हिंग्वादिचूर्ण असें म्हणतात.

हिंग्वादि चूर्ण.

हिङ्गूग्रगन्धाबिडशुण्ठ्यजाजीहरीतकीचित्रकमूलकुष्ठम् ।
भागोत्तरं चूर्णितमेतदिष्टं गुल्मोदराष्ठीलविषूचिकासु ॥ १ ॥

हिंग, वेखंड, बिडलोण, सुंठ, जिरें, हिरडेदळ, चित्रकमूळ, कोष्ट हीं औषधें उत्तरोत्तर वाढत्या प्रमाणांत घेऊन चूर्ण करावें. ह्याला हिंग्वादि चूर्ण म्हणतात. हें गुल्म, उदर, अष्ठीलिका व विषूचिका ह्यांजवर योजावें.

नादेयादि काढा

नादेयीकुटजार्कशिग्रुबृहतीस्नुग्बिल्वभल्लातक-
व्याघ्रीकिंशुकपारिभद्रकरजापामार्गनीपाग्निकान् ।
वासामुस्तकपाटलान्सलवणान्दग्ध्वा रसं पाचितं
हिङ्ग्वादिप्रतिवापमेतदुचितं गुल्मोदराष्ठीलिषु ॥ १ ॥

टाकळीमूळ, कुडा, रुई, शेवगा, डोरलीमूळ, त्रिधारी निवडुंग, बेलाची साल, बिब्बे, रिंगणीमूळ, पळस, लिंबाची साल, पिचपाडा, आघाडा, कळंबाची साल, चित्रकमूळ, अडुळसा, नागरमोथे,

पाडळमूळ, ह्यांचा काढा करून हिंग व सैंधेलोण घालून तो गुल्म, उदर व अष्ठीलिका ह्यांजवर द्यावा.

विडंगासव.

विडङ्गं पिप्पलीमूलं पाठा धात्र्येलवालुकम् ।
कुटजत्वक्फलं रास्ना भार्गी पञ्चपलोन्मितान् ॥ १ ॥
अष्टद्रोणेऽम्भसः पक्त्वा द्रोणशेषं तु कारयेत् ।
पूते शीते क्षिपेत्तस्मिन्माक्षिकस्य शतत्रयम् ॥ २ ॥
धातक्या विंशतिपलं चूर्णं कृत्वा तु दापयेत् ।
व्योषस्य तु पलान्यष्टौ त्रिजातं द्विपलं तथा ॥ ३ ॥
फलिनीहिमतोयानां सरोध्राणां पलं पलम् ।
घृतभाण्डे समाधाय मासमेकं विधारयेत् ॥ ४ ॥
एष योगो हरत्येव प्रत्यष्ठीलाभगंदरान् ।
ऊरुस्तम्भाश्मरीमेहगण्डमालां सविद्रधिम् ॥
आढ्यवातं हनुस्तम्भं विडङ्गाख्यो महासवः ॥ ५ ॥

वावडिंग, पिंपळमूळ, पहाडमूळ, आवळकाठी, एलवालुक, कुडयाची साल, इंद्रजव, रास्ना, भारंगमूळ, हीं औषधें वीस वीस तोळे घेऊन आठ हजार एकशें व्याण्णव तोळे पाणी घालून अष्टमांश काढा करावा. तो निवाल्यावर गाळून घेऊन त्यांत तीनशें तोळे मध घालावा. आणि धायटीच्या फुलांचें चूर्ण ऐशीं तोळे घालून सुंठ, मिरें, पिंपळी, ह्यांचें चूर्ण बत्तीस तोळे, दालचिनी, तमालपत्र व वेलदोडे ह्यांचें चूर्ण आठ तोळे आणि त्रायमाण, नाकेशर, वाळा व लोध्र ह्यांचें चूर्ण चार चार तोळे घालून तुपानें रावलेल्या मातीच्या भांड्यांत भरून एक महिनाभर पुरून ठेवावें. हा योग प्रत्यष्ठीला व भगंदर ह्यांचा नाश करतो. ह्याला विडंगासव म्हणतात. हें ऊरुस्तंभ, मूतखडा, प्रमेह, गंडमाला, विद्रधि, आढ्यवात, हनुस्तंभ ह्यांचा नाश करितें.

विश्वाची वातावर.

दशमूलीबलामाषक्वाथं तैलाज्यमिश्रितम् ।
सायं भुक्त्वा चरेन्नस्यं विश्वाच्यां चावबाहुके ॥ १ ॥

दशमुळें, चिकणामूळ व उडीद ह्यांचा काढा करून त्यांत तेल

व तूप घालून संध्याकाळीं जेवल्यावर विश्वाची व अवबाहुक ह्या रोगांवर त्याचें नस्य करावें.

मिम्मिण वातावर.

दशमूलस्य निर्यूहो हिंगुपुष्करचूर्णितः ।
शमयेत्परिपीतस्तु वातं मिम्मिणसंज्ञितम् ॥ १ ॥

दशमुळांचा काढा हिंग व पोखरमुळाचें चूर्ण घालून द्यावा. तो मिम्मिणवाताचा (ज्या वातामुळें मनुष्य अडखळत व अक्षरें सोडीत बोलतो तो वात) नाश होतो.

कुब्जवातावर.

हृदयं यदि वा पृष्ठमुन्नतं क्रमशः सरुक् ।
क्रुद्धो वायुर्यदा कुर्यात्तदा तं कुब्जमादिशेत् ॥ १ ॥
वातघ्नैर्दशमूल्या च नवं कुब्जमुपाचरेत् ।
स्नेहैर्मांसरसैश्चापि प्रवृद्धं तं विवर्जयेत् ॥ १ ॥

अनुक्रमें हृदय किंवा पाठ ह्या ठिकाणचा वायु कुपित होऊन त्यांना (त्यांपैकीं एकाला) उंच करून त्यांत ठणका उत्पन्न करतो, त्याला कुब्जवात असें म्हणतात. तो नवीन असेल तर त्याजवर दशमुळाचा काढा, तेल व मांसरस ह्यांचे उपचार करावे; आणि तो जुना असल्यास सोडून द्यावा.

तूनी व प्रतूनी ह्यांजवर.

पिप्पल्यादिरजस्तूनीप्रतितून्योः सुखाम्बुना ।
पिबेद्वा स्नेहलवणं सघृतं क्षारहिंगु वा ॥ १ ॥

तूनी व प्रतूनी ह्यांजवर पिप्पल्यादि चूर्ण जसें मानेल तसें ऊन किंवा थंड पाण्याशीं द्यावें. तेलांत सैंधलोण घालून द्यावें. किंवा हिंग व जवखार द्यावा.

आध्मान वातावर.

आध्माने लेपनं पाणितापश्च फलवर्तयः ।
दारुहैमवतीकुष्ठशताह्वाहिंगुसैन्धवैः ॥ १ ॥
अम्लपिष्टैः सुखोष्णैश्च प्रदिह्य दुदरं भिषक् ।
दीपनं पाचनं चैवाऽऽध्मानघ्नास्तिविशोधनम् ॥ २ ॥

आध्मान वातावर पोटावर लेप करावे, हात ओरपावे, औष-

घांच्या वाती गुदांत ठेवाव्या, आणि दारुहळद, वेखंड, कोष्ठ, बाळंतशेप, हिंग व सैंधव ह्यांचें चूर्ण करून तें कांजींत किंवा लिंबाच्या रसांत वाटून त्याचा पोटावर सोसेल असा ऊन ऊन लेप करावा. तो दीपक, पाचक, आध्मान वाताचा नाशक व बस्तिशोधक आहे.

प्रत्याध्मान व ऊरुस्तंभ ह्यांजवर कल्क वगैरे.

प्रत्याध्मानं तु वमनं लंघनं दीपनौषधम् ।
ऊरुस्तम्भं जयेद्रूक्षस्वेदमर्दनकौशिकैः ॥ १ ॥

प्रत्याध्मानावर वमन, लंघन व दीपक औषधें हे उपचार करावे. व ऊरुस्तंभ वात रुक्ष, स्वेद, मर्दन व गुग्गुळ ह्या उपायांनीं जिंकावा.

पिप्पली पिप्पलीमूलं भल्लातकफलानि च ।
एतत्कल्कश्च सक्षौद्र ऊरुस्तम्भनिवारणः ॥ २ ॥

पिंपळी, पिंपळमूळ व बिब्बे ह्यांचा कल्क मधाशीं द्यावा; तो ऊरुस्तंभाचा नाश करितो.

पञ्चमूलीकषायं तु सुखोष्णं त्रिवृतायुतम् ।
गृध्रसीं गुल्मशूलं च सद्यः पीतं नियच्छति ॥ १ ॥

मोठ्या पंचमुळाचा काढा निशोत्तराचें चूर्ण घालून कोमट करून द्यावा; तो गृध्रसी, गुल्म व शूल ह्यांचा त्वरित नाश करितो.

वाजिगन्धाबलाबिल्वदशमूलयम्बुसाधितम् ।
गृध्रस्यां तैलमैरण्डं बस्तौ पाने च शस्यते ॥ १ ॥

अश्वगंध, चिकणामूळ, बेलाचें मूळ व दशमुळें ह्यांच्या काढ्यांत सिद्ध केलेलें एरंडतेल गृध्रसी वातावर पिण्याला व बस्ती देण्याला प्रशस्त आहे.

द्वे पले सैन्धवात्पञ्च शुण्ठ्या ग्रन्थिकचित्रकात् ।
द्वे पले भल्लकास्थीनि विंशती द्वे तथाऽऽढके ॥ १ ॥
आरनाले पचेत्प्रस्थं तैलस्यैतैरपत्यदम् ।
गृध्रस्यूरुग्रहार्शोर्तिसर्ववातविकारनुत् ॥ २ ॥

सैंधेलोण आठ तोळे, सुंठ वीस तोळे, चित्रकमूळ व पिंपळमूळ वीस वीस तोळे, बिब्यांतील गोडंब्या आठ तोळे ह्यांचा कल्क व दोनशें शहाण्णव तोळे कांजी यामध्यें चौसष्ट तोळे तेल सिद्ध

करावें. हें तेल संततिदायक आहे. हें गृध्रसी, ऊरुस्तंभ, आणि सर्व प्रकारचे वातविकार ह्यांचा नाश करितें.

विध्येच्छिरां मेढ्रबस्तेरधस्ताच्चतुरंगुले ।
यदि नोपशमं गच्छेद्दहेत्पादकनिष्ठिकाम् ॥ ३ ॥
महानिम्बजटाकल्को गृध्रसीनाशनः स्मृतः ॥ ४ ॥

ऊरुस्तंभ व गृध्रसी वायु शांत होण्याकरितां मेढ्र (गुह्येंद्रिय) व बास्त ह्यांच्या खालीं चार बोटांवरील शिरेचा वेध करावा; इतक्यानेंही विकार शांत झाला नाहीं तर पायाच्या करंगळीस डाग द्यावा. बकाण्या लिंबाचा कल्क गृध्रसीचा नाश करितो.

जिव्हास्तंभावर.

जिह्वास्तम्भे क्रिया श्रेष्ठा सामान्योक्ता तु याऽर्दिते ।

अर्दित वातावर जे उपचार सांगितले आहेत, तेच जिव्हास्तंभावर करावे.

कल्याणकावलेह.

सहरिद्रावचाकुष्ठं पिप्पली विश्वभेषजम् ।
अजाजी चाजमोदा च यष्टीमधुयुतं घृतम् ॥ १ ॥
एकविंशतिरात्रेण भवेच्छ्रुतिधरो नरः ।
मेघदुन्दुभिनिर्घोषो मत्तकोकिलनिस्वनः ॥
जडगद्गदमूकत्वं लेहः कल्याणको जयेत् ॥ २ ॥

हळद, वेखंड, कोष्ट, पिंपळी, सुंठ, जिरें, ओवा, जेष्ठमध ह्यांचें चूर्ण करून तुपाशीं घ्यावें. हें एकवीस दिवस घेतलें असतां मनुष्य वेदपाठक होतो. त्याचा स्वर मेघ किंवा नगारा ह्यांच्या गर्जनेप्रमाणें गंभीर व कोकिळाप्रमाणें मंजुळ होतो. जिभेचा जडपणा, मुकेपणा व अडखळत बोलणें ह्या विकारांना हा कल्याणलेह जिंकतो.

गृध्रसी, कलायखंज व पंगुत्व ह्यांजवर.

विशोध्यैरण्डबीजानि पिष्ट्वा क्षीरे विपाचयेत् ।
पायसं तत्कटीशूले गृध्रस्यां चौषधं परम् ॥ १ ॥

एरंडाचें बीं (एरंडयांतील मगज) शुद्ध करून तें वाटून दुधांत टाकून तें दूध पचन करावें, आणि तें दूध प्यावें. हें कटिशूल व गृध्रसी ह्यांजवर उत्तम औषध आहे.

रास्नायास्तु पलं चैकं कर्षान्पञ्च च गुग्गुलोः।
सर्पिषा वटकान्कृत्वा खादेद् गृध्रसिनाशनान् ॥ २ ॥

रास्ना चार तोळे आणि शुद्ध गुग्गुळ पांच तोळे ह्यांच्या तुपांत गोळ्या करून खाव्या. त्या गृध्रसीचा नाश करितात.

तैलमेरण्डजं वाऽपि गोमूत्रेण पिबेन्नरः।
मासमेकं प्रयोगोऽयं गृध्रस्यूरुग्रहापहः॥
जयेत्कलायखञ्जं तु हेतुत्यागरसोनतः॥ १ ॥

एरंडेल तेल गोमूत्रांतून घ्यावें. हा प्रयोग एक महिनाभर करावा, म्हणजे गृध्रसी व ऊरुस्तंभ ह्यांचा नाश होतो. कलायखंजवात होण्याच्या कारणांचा प्रतिकार व लसूणभक्षण ह्या उपचारांनीं कलायखंजवात जिंकावा.

कटिशूळावर.

दशमूलीकषायेण पिबेद्वा नागराम्भसा।
कटिशूलेषु सर्वेषु तैलमेरण्डसंभवम् ॥ १ ॥

दशमुळाचा काढा किंवा सुंठीचा काढा ह्यांतून सर्व कटिशूळांवर एरंडतेल द्यावें.

हलावं खाखसं खाद्यं खर्जूरं मेथिका तिलाः।
मिशिद्वयं च भल्लास्थि वातामं बब्बुलं तथा ॥ २ ॥
सारं चैकपलं ग्राह्यं गुडोऽब्धिकुडवस्तथा।
घृतं द्विकुडवं चैव लड्डूकान्कारयेद्भिषक् ॥ ३ ॥
द्विकर्षं भक्षयेत्प्रातः कटिवातविनाशनः।
धातुस्तम्भं धातुवृद्धिं कुरुते नात्र संशयः ॥ ४ ॥

हळीव, खसखस, खारीक, मेथ्या, तीळ, बडिशेप, बाळंतशेप, बिब्यांतील गोडंब्या, बदामांतील बिया, बाभळीचा डीक, व चारोळी हीं औषधें चार चार तोळे, गूळ चौसष्ट तोळे, तूप बत्तीस तोळे ह्या सर्वांचे विधियुक्त रीतीनें दोन दोन तोळ्याचे लाडू करावे. आणि त्यांतलि एक लाडू सकाळीं नित्य खावा. म्हणजे कटिवाताचा नाश होतो. ह्यांच्या सेवनानें वीर्याची वृद्धि होते, व त्याला दृढत्व येतें.

तैलं घृतं चाऽऽर्द्रकमातुलुङ्ग्योः रसं सचुक्रं सगुडं पिबेद्वा।
कट्यूरुपृष्ठत्रिकगुल्मशूलगृध्रस्युदावर्तहनुग्रहेषु ॥ ५ ॥

तेल, तूप, आरयाच्या व महाळुंगाचा रस कंबर, पाठ, माकड-हाड, आंमधील वात, गुल्म, शूल, गृध्रसी, उदावर्त व हनुग्रह या विकारांवर कांजी किंवा गूळ घालून द्यावा.

गुडघीवर.

गुडूचीत्रिफलाक्वाथैर्गुग्गुलुः पिण्डितो वरः ।
क्रोष्टुशीर्षं निहन्त्युच्चैः सेवितो मासमात्रतः ॥ १ ॥

गुळवेल व त्रिफळा ह्यांच्या काढ्यांत गुग्गुळाच्या गोळ्या करून त्या एक महिनाभर द्याव्या. म्हणजे अतिशय वाढलेल्या क्रोष्टु-शीर्षाचा नाश होतो.

बाकी राहिलेल्या वातांवर.

हनुग्रहे हनुस्तम्भे मन्यास्तम्भेऽर्दिते पिबेत् ।
दशमूलयम्भसा कृष्णा अश्वत्थस्वरसेन वा ॥ १ ॥

हनुग्रह, हनुस्तंभ, मन्यास्तंभ व अर्दित वायु ह्यांजवर दशमुळा-च्या काढ्यांतून अथवा पिंपळाच्या सालीच्या अगर पानाच्या रसांतून पिंपळीचें चूर्ण द्यावें.

बाह्यायामान्तरायामपार्श्वशूलकटिग्रहान् ।
खल्लीदण्डापतानौ च स्नेहस्वेदपुरैर्जयेत् ॥ २ ॥

बाह्यायाम, अंतरायाम, पार्श्वशूल, कटीग्रह, खल्ली व दंडापता-नक, ह्या वातविकारांवर स्नेहन, स्वेदन व गुग्गुळ देणें हे उप-चार करावे.

वामनत्वाङ्गसंकोचभङ्गभेदग्रहव्यथाः ।
मर्दनैर्बस्तिभिः क्वाथैः स्वेदनैश्च भिषग्जयेत् ॥ ३ ॥

कुबडेपणा, अंगसंकोच, अंगाची वक्रता, अंगभेद, अंग जख-डणें व अंगव्यथा ह्यांजवर मर्दन, बस्ति, काढे व स्वेदन हे उपचार करून त्यांना जिंकावें.

अपतानव्रणायामौ स्नेहैर्व्रणचिकित्सितैः ।

अपतानक व व्रणायाम ह्यांजवर स्नेहन आणि व्रणावरील उप-चार करावे.

अङ्गरौक्ष्यस्तम्भकम्पकार्श्यं कपिशतोदने ॥ ४ ॥
दौर्बल्ये स्फुरणे भ्रंशे स्नेहैर्मर्दनमिष्यते ।

अंगाची रूक्षता, ताठपणा, अंगकंप, कृशता, अंगाचा काळसर तांबुसपणा, टोचणी, दुर्बळता, अंग फुरफुरणें, अंग बाहेर येणें किंवा सांधा निखळणें यांजवर औषधी तेलानें मर्दन करावें.

शुक्रकार्श्ये शुक्रनाशे शुक्रस्यातिप्रवर्तने ॥ ५ ॥
विड्ग्रहे बद्धविट्के च स्नेहपानं हितं मतम् ।

धातुक्षीणता, धातु बिघडणें, अतिशय धातु जाणें, मलावरोध, मळाचा खडा होणें यांवर औषधी तेलें किंवा तुपें द्यावीं. तीं हितकारक आहेत असें म्हणतात.

प्रलापे भीरुतापे च प्रसुप्तौ चित्तवैकृते ॥ ६ ॥
स्वेदनाशे बलक्षैण्ये कौशिकः सघृतो हितः ।
शब्दाज्ञतामये चापि लेहः कल्याणको हितः ॥ ७ ॥

बडबड, भित्रेपणा, झोप, मनोविकार, घाम न येणें व बलक्षय, या विकारांवर गुग्गुळ तुपांतून द्यावा. तो हितकारक आहे. शब्द कळत नसेल तर कल्याणक लेह द्यावा.

शीततां रोमहर्षं च शिरापूरणमेव च ।
कटुतिक्तैर्जयेद्द्रव्यैः स्नेहस्वेदनमर्दनैः ॥ ८ ॥

अंग गार होणें, अंगावर कांटा येणें व वातानें शिरा रुंद होणें, या विकारांवर तिखट व कडू औषधें, स्नेहन, स्वेदन व मर्दन हे उपचार करावे.

वाताप्रवृत्तिमुद्गारमन्त्रकूजनमेव च ।
निरूहबस्तिनाऽथाङ्गकाठिन्यं स्नेहगाहनात् ॥ ९ ॥

अधोवायूचा अवरोध, ढेकरा येणें, पोटांतील आंतड्यांत वाजणें, यांजवर निरूह बस्ति द्यावा; आणि अंगाचा कठिणपणा जाण्याकरितां तेलामध्यें बसवावें.

शिरोग्रहे तु कर्तव्या शिरोगतमरुत्क्रिया ।
रक्तावसेचनं कुर्यादभीक्ष्णं वातकण्टके ।
पिबेदैरण्डतैलं वा दहेत्सूचीभिरेव च ॥ १० ॥

शिरोग्रहावर शिरोगत वातावरील उपचार करावे, आणि वातकंटक रोगावर रक्त काढावें; किंवा एरंडेल तेल प्यावें; अगर सुईनें डाग द्यावा.

काढे.

सहचरामरदारु सनागरं कथितमम्भसि तैलविमिश्रितम् ।
पवनपीडितदेहगतिः पिबन्द्रुतविलम्बितगो भवतीच्छया ॥१॥

कोरांटीची मुळी, देवदार व सुंठ यांचा काढा एरंडेल अगर तिळाचें तेल घालून वातविकारानें पीडित मनुष्यानें प्यावा, म्हणजे तो आपल्या इच्छेनुसार जलद किंवा सावकाश चालूं शकतो.

महारास्नादि काढा.

रास्नैरण्डामृतोग्रासहचरचविकारामसेनाब्दभार्गी-
दीप्यानन्तायवानीवृकिसुरकृमिजिच्छृङ्गिशुण्ठीबलाभिः ।
मूर्वातिक्तासमंगाद्विविषशठिवरापिप्पलीयावशूकै
रक्तश्रीखण्डकारग्वधकटुकफलैर्वत्सवृश्चीवयुक्तैः ॥ १ ॥
सर्वैरेतैर्दशांघ्रिप्रयुतसमलवैः साधितोऽष्टावशेषः
क्वाथो रास्नादिरादौ महदुपपदवान्कौशिकाक्तो निहन्ति ।
सर्वांगैकांगवाताऽश्वसनकसनहृत्स्वेदशैत्यादि तन्द्रा-
शूलं तूनीप्रतूनीगलगदनिखिलांगव्यथाकम्पखल्लीः ॥२॥
विश्वाचीश्लीपदामानिलनिखिलमहासूतिकारोगसुप्तिं
जिह्वास्तम्भापतानं स्फुटनविमथनक्लीबताक्षेपकौब्जम् ।
शोफाटोपापतन्त्रार्दितखुडहनुरुग्गृध्रसीपादशूलं
वायुश्लेष्मोत्थरोगानपि गिरितनयावल्लभेनोपदिष्टः ॥ ३ ॥

रास्ना, एरंडमूळ, गुळवेल, कोरांटीची मुळी, चवक, काडेचिराईत, नागरमोथे, भारंगमूळ, ओवा, धमासा, अजमोदा, पहाडमूळ, देवदार, वावडिंग, काकडशिंगी, सुंठ, चिकणामूळ, मोरवेल, कुटकी, लाजाळु, अतिविष, कचोरा, हिरडा, बेहडा, आवळकाठी, पिंपळी, जवखार, रक्तचंदन, बाहाव्याची शेंग, कंकोळ, कुडच्याची साल, वेटुळी (वसु) हीं सर्व औषधें समभाग आणि ह्या सर्वांच्या बरोबरीनें दशमुळें घेऊन सर्वांचा अष्टमांश काढा करावा. हा रास्नादि काढा आधींच महागुणकारक आहे. शिवाय त्यांत गुग्गुळ घालून घेतला असतां सर्वांगवात, एकांगवात, श्वास, खोकला, घाम, शैत्य, तंद्रा, शूल, तूनी, प्रतूनी, गलरोग, सर्व अंगाची व्यथा, कंपवात, खल्ली, विश्वाची, श्लीपद, आमवात, सर्व प्रकारचे बाळंतिणीचे मोठे रोग, सुप्तिवात, जिव्हास्तंभ, अपतानक, अंग फुटल्यासारखें होणें,

मुसळस्यासारखें होणें, क्लीवत्व, आक्षेपक, कुब्जवात, सूज, आंतड्यांत वाजणें, अपतंत्रक, अर्दितवात, खुड्डवात, हनुग्रह, गृध्रसी, पादशूल, आणि कफवातजन्यरोग ह्यांचा नाश करितो. हा महारास्नादि काढा पार्वतीपति श्रीशंकरानें सांगितला आहे.

शार्ङ्गधरांतील महारास्नादि काढा.

रास्ना द्विगुणभागा स्यादेकभागास्तथाऽपरे ।
धन्वयासबलैरण्डदेवदारुशठीवचाः ॥ १ ॥
वासको नागरं पथ्या चव्या मुस्ता पुनर्नवा ।
गुडूची वृद्धदारुश्च शतपुष्पा च गोक्षुरः ॥ २ ॥
अश्वगन्धा प्रतिविषा कृतमालः शतावरी ।
कृष्णा सहचरश्चैव धान्यकं बृहतीद्वयम् ॥ ३ ॥
एभिः कृतं पिबेत्काथं शुण्ठीचूर्णेन संयुतम् ।
कृष्णाचूर्णेन वा योगराजगुग्गुलुनाऽथवा ॥ ४ ॥
आजमोदादिना वाऽपि तैलेनैरण्डजेन वा ।
सर्वांगकम्पे कुब्जत्वे पक्षाघातेऽवबाहुके ॥ ५ ॥
गृध्रस्यामामवाते च श्लीपदे चापतानके ।
अन्त्रवृद्धौ तथाऽऽध्माने जङ्घाजानुगदेऽर्दिते ॥ ६ ॥
शुक्रामये मेढ्वाते वन्ध्यायोन्यामयेषु च ।
महारास्नादिराख्यातो ब्रह्मणा गर्भधारणे ॥ ७ ॥

रास्ना दोन भाग, धमासा, चिकणामूळ, एरंडमूळ, देवद्वार, कचोरा, वेखंड, आडुळसा, सुंठ, हिरडेदळ, चवक, नागरमोथे, वसूची मुळी, गुळवेल, वरधारा, बडिशेप, गोखरू, अश्वगंध, अतिविष, बाहव्याची शेंग, शतावरी, पिंपळी, कोरांटी, धने, रिंगणी व डोरली, ह्यांचा काढा करून तो सुंठीचें चूर्ण, पिंपळीचें चूर्ण, योगिराज गुग्गुळ, अजमोद्याचें चूर्ण किंवा एरंडेल तेल घालून सर्वांगवात, कुब्जत्व, पक्षाघात, अवबाहुक, गृध्रसी, आमवात, श्लीपद, अपतानक, अंत्रवृद्धि, आध्मान, पोटऱ्या, गुडघे व गुद ह्या ठिकाणचा वात, शुक्रसंबंधी विकार, गुह्येंद्रियस्थ वात (नपूंसकत्वादि), वंध्यात्व, योनिरोग, आणि गर्भधारणा होणें, ह्यांजवर योजावा. हा महारास्नादि काढा ब्रह्मदेवानें सांगितला आहे.

महाबलादि काढा.

महाबलामूलमहौषधाभ्यां क्वाथं पिबेन्मिश्रितपिप्पलीकम्।
शीतं सकम्पं परिदाहयुक्तं विनाशयेद्धित्रिदिनप्रयुक्तः॥ १॥

मोठा चिकणा व सुंठ ह्या औषधांचा काढा पिंपळीचें चूर्ण घालून द्यावा; तो शैत्य, कंपवात व दाहयुक्त वात ह्यांचा दोन तीन दिवसांमध्यें नाश करतो.

पंचमूलादि काढा.

पञ्चमूलीकृतः क्वाथो दशमूलीकृतोऽथवा।
रूक्षः स्वेदस्तथा नस्यं मन्यास्तम्भे प्रशस्यते॥ १॥

पंचमूळाचा काढा किंवा दशमुळांचा काढा, रुक्ष, स्वेद व नस्य हे उपचार मन्यास्तंभावर प्रशस्त आहेत.

एरंडमूलादि काढा.

एरण्डबिल्वं बृहतीद्वयं च सौवर्चलं व्योषसुरामठं च।
समातुलुङ्गीलवणोत्तमं च क्वाथो धनुर्वातहरः प्रशस्तः॥१॥

एरंडमूळ, बेलमूळ, रिंगणमूळ, डोरलीमूळ ह्यांचा काढा सुंठ, मिरें, पिंपळी, हिंग, सेंधेलोण व पादेलोण ह्यांचें चूर्ण व महाळुंगाचें केसर घालून द्यावा. तो धनुर्वाताचा नाश करतो.

अश्वगंधादि गण.

वाजिगन्धा बलास्तिस्रो दशमूली महौषधम्।
गृध्रनख्यौ च रास्ना च गणो मारुतनाशनः॥ १॥

अश्वगंध, लघुचिकणा, थोर चिकणा, मुद्राचें मूळ, दशमुळें, सुंठ, लहान बोर, मोठी बोर व रास्ना हा वातनाशक गण आहे.

समीरदावानल काढा.

भल्लातकानां शकलानि कृत्वा त्रिकोलमानं परिगृह्य वैद्यः।
चतुष्पलं तोयसमन्वितोऽयं क्वाथश्चतुर्थांशक एष सम्यक्॥१॥
सिताघृतं गोपयमिश्रितेन कोलं पलार्धं पलमेकयुक्तम्।
क्रमेण पीतः खलु हन्ति वातान्समीरदावानलनामधेयः॥ २॥

दीड तोळे बिब्याचे तुकडे करून, त्यांत सोळा तोळे पाणी घालून, चतुर्थांश काढा करावा; आणि त्यांत अनुक्रमें अर्धा तोळा खडीसाखर, दोन तोळे तूप व चार तोळे दूध घालून द्यावा. म्हणजे हा समीरदावानल नांवाचा काढा सर्व वातविकारांना जिंकतो.

चूर्ण.

रास्नाकुष्ठनतद्रुषट्कटुशठीपाठावचासारिवा-
भूनिम्बत्रिफलाबलादशजटानिर्गुण्डिकैरण्डकम् ।
हिंग्वम्लार्द्रकबस्तगन्धकवरी क्षारौ पटूनां त्रयं
चूर्णं पुष्करतैलयुक्तमखिलान्वातानशीतिं जयेत् ॥ १ ॥

रास्ना, कोष्ट, तगर, सुंठ, मिरें, पिंपळी, चवक, चित्रक, पिंपळमूळ, कचोरा, पहाडमूळ, वेखंड, उपलसरी, काडेचिराईत, हिरडा, बेहडा, आवळकाठी, चिकणामूळ, दशमुळें, निर्गुंडी, एरंड, हिंग, आम्लवेतस, आलें, रानतुळस, वाफळी, जवखार, सज्जिखार, सेंधेलोण, पादेलोण, बिडलोण, ह्यांचें चूर्ण करून, तें पोखरमुळाचा काढा व त्याचाच कल्क ह्यांच्या योगानें तयार केलेल्या तेलांतून द्यावें. हें ऐशीं प्रकारच्या वातरोगांचा नाश करितें.

आभादिचूर्ण.

आभा रास्ना गुडूची च शतावर्यौ महौषधम् ।
शतपुष्पाऽश्वगन्धा च हपुषा वृद्धदारकः ॥ १ ॥
यवानी चाजमोदा च समभागानि कारयेत् ।
सूक्ष्मचूर्णमिदं कृत्वा बिडालपदकं पिबेत् ॥ २ ॥
मद्यैर्मांसरसैर्यूषैस्तक्रैरुष्णोदकेन वा ।
सर्पिषा वाऽपि लेह्यं तु दधिमण्डेन वा पुनः ॥ ३ ॥
अस्थिसंधिगतं वायुं स्नायुमज्जाश्रितं च यम् ।
कटिग्रहं गृध्रसीं च मन्यास्तम्भं हनुग्रहम् ॥ ४ ॥
ये च कोष्ठगता रोगास्तांश्च सर्वान्प्रणाशयेत् ।
आभाद्यो नाम चूर्णोऽयं सर्वव्याधिनिबर्हणः ॥ ५ ॥

बाभळीची साल, रास्ना, गुळवेल, शतावरी, सुंठ, बडिशेप, अश्वगंध, शेरणी, वरधारा, ओंवा, अजमोदा ह्या सर्वांचें समभाग चूर्ण करावें; आणि तें एक तोळाभर चूर्ण मद्य, मांसरस, यूष, ताक किंवा ऊन पाणी ह्यांजबरोबर द्यावें; अगर तूप किंवा दह्यावरील निवळ ह्यांतून द्यावें. म्हणजे अस्थिसंधिगत वात, स्नायुमज्जागत वात; कटिग्रह, गृध्रसी, मन्यास्तंभ, हनुग्रह आणि इतर कोष्ठगत रोग ह्या सर्वांचा नाश करितें. हें आभादि चूर्ण सर्व व्याधींचा नाश करितें.

गुग्गुळ.

आभाऽश्वगन्धा हपुषा गुडूची शतावरी गोक्षुरकं च रास्ना ।
श्यामा घटी घोषवती यवानी सनागरा चेति समं विचूर्ण्य ॥१॥
सर्वैः समं गुग्गुलुमत्र दत्वा कुर्यात्ततोऽर्धं प्रणिधाय सर्पिः ।
अर्धाक्षमात्रा गुटिकास्ततोऽस्य कार्याः पुरस्याथ दिनाननेऽद्यात् २
एकां ससर्पिर्मधुना यथा न स्पर्शो भवेद्दन्ततते: कथंचित् ।
ततः कवोष्णं सलिलं सुरां वा गव्यं पयो वाऽप्यथ मुद्गयूषम् ॥३॥
किं वा रसैर्मांसभवैर्निपीय लवंगमेकं वदने निदध्यात् ।
कटिग्रहे गृध्रसिबाहुपृष्ठे हनुग्रहे जानुपदग्रहे च ॥ ४ ॥
संधिस्थिते चास्थिगते समीरे मज्जाश्रिते स्नायुगतेऽतिदुष्टे ।
शूलद्वये पार्श्वशिरोरुजायां मन्याग्रहे कण्ठहृदिग्रहे च ॥ ५ ॥
त्रयोदशाङ्गोऽयमतिप्रशस्तो जयेद्गदान्वातकफप्रभूतान् ॥ ६ ॥

बाभळीची साल, अश्वगंध, शेरणी, गुळवेल, शतावरी, गोखरू, रास्ना, काळें निशोत्तर, कचोरा, बडिशेप, ओवा व सुंठ ह्यांचें समभाग चूर्ण करून त्या सर्व चूर्णाच्या बरोबरीला गुग्गुळ घालून त्यांत त्याच्या निम्मे हिश्शानें तूप घालून एक एक तोळ्याची गोळी करावी; आणि त्यांतील एक गोळी रोज सकाळीं मध व तुपांतून दातांला स्पर्श न होईल अशा बेतानें खावी; आणि त्याजवर मध, गाईचें दूध, मुगाचा यूष किंवा मांसरस प्यावा; आणि त्याजवर एक लवंग तोंडांत धरावी. कटिग्रह, गृध्रसी, अवबाहुक, पाठींतील वात, हनुवटींतील वात, गुडघे व पाय जखडणें, संधिवात, अस्थिगत वात, मज्जागत व स्नायुगत अति दुष्ट वात, शूल, परिणामशूल, बरगडींत दुखणें, मस्तक दुखणें, मन्यास्तंभ, कंठग्रह (घसा धरणें) व उरोग्रह, ह्या विकारांवर हा त्रयोदशांग गुग्गुळ अति प्रशस्त आहे. हा वातकफजन्य रोगांचा नाश करितो.

द्वात्रिंशक गुग्गुळ.

त्रिकटु त्रिफला मुस्तं विडङ्गं चव्यचित्रकौ ।
वचैला पिप्पलीमूलं हपुषा सुरदारु च ॥ १ ॥
तुम्बरं पौष्करं कुष्ठं विषा च रजनीद्वयम् ।
बाष्पिका जीरकं शुण्ठी सपत्रा च दुरालभा ॥ २ ॥
सौवर्चलं विडङ्गं च क्षारौ द्विरदपिप्पली ।
सैन्धवं च समानानि तुल्यं दत्वा च गुग्गुलुम् ॥ ३ ॥

साधयित्वा विधानेन कोलमात्रां वटीं चरेत् ।
घृतेन मधुना वाऽपि भक्षयेत्तामहर्मुखे ॥ ४ ॥
आमं हन्यादुदावर्तमन्त्रवृद्धिं गुदक्रिमीन् ।
महाज्वरोपसृष्टानां भूतोपहतचेतसाम् ॥ ५ ॥
आनाहोन्मादकुष्ठानि पार्श्वशूलहृदामयान् ।
गृध्रसीं च हनुस्तम्भपक्षघातापतानकान् ॥ ६ ॥
शोफं च प्लीहामत्युग्रां कामलामपचीं तथा ।
नाम्ना द्वात्रिंशको ह्येष गुग्गुलः कथितो महान् ।
धन्वन्तरिकृतो योगः सर्वरोगनिकृन्तनः ॥ ७ ॥

सुंठ, मिरें, पिंपळी, हिरडा, बेहडा, आवळकाठी, नागरमोथे, बावडिंग, चवक, चित्रक, वेखंड, वेलदोडे, पिंपळमूळ, शेरणी, देवदार, चिरफळें, पोखरमूळ, कोष्ट, अतिविष, हळद, दरुहळद, बाफळी, जिरें, सुंठ, तमालपत्र, धमासा, पादेलोण, वावडिंग, जवखार, सज्जिखार, गजपिंपळी व सेंधेलोण हीं सर्व औषधें समभाग आणि सर्वांच्या समान गुग्गुळ घेऊन विधिपूर्वक तयार करून सहा सहा माशाच्या गोळ्या कराव्या, आणि त्यांतील एक रोज सकाळीं तूप-मधाशीं द्यावी. हा द्वात्रिंशक गुग्गुळ आम, उदावर्त, अंत्र-वृद्धि, गुदसंबंधीं कृमि (जंत) ह्यांचा नाश करितो. तसेंच मोठा ज्वर, भूतबाधा, आनाह, उन्माद, कोष्ट, बरगड्यांतील शूल, हृदयाचा विकार, गृध्रसी, हनुस्तंभ, पक्षाघात, अपतानक, सूज, उग्र अशी पांथरी, कावीळ आणि अपची ह्या रोगांचा हा महान द्वात्रिंशक गुग्गुळ नांवाचा गुग्गुळ नाश करितो. हा धन्वंतरीनें सांगितलेला योग सर्व रोगांचा नाश करितो.

योगराजगुग्गुळ.

चित्रकं पिप्पलीमूलं यवानी कारवी तथा ।
विडंगान्यजमोदा च जीरकं सुरदारु च ॥ १ ॥
चव्यैला सैन्धवं कुष्ठं रास्ना गोक्षुरधान्यकम् ।
त्रिफला मुस्तकं व्योषं त्वगुशीरं यवाग्रजम् ॥ २ ॥
तालीसपत्रं गोक्षूरं लवंगं सर्जिका शठी ।
दन्ती गुडूची हपुषा वाजिगन्धा शतावरी ॥ ३ ॥
प्रत्येकं कर्षमात्रं स्याच्चतुष्कर्षमयो मृतम् ।

एतानि सुभिषक्पट्टे सूक्ष्मचूर्णानि कारयेत् ॥ ४ ॥
यावन्त्येतानि चूर्णानि तावन्मात्रो हि गुग्गुलुः
संमर्द्य सर्पिषा गाढं स्निग्धभाण्डे निधाय च ॥ ५ ॥
ततो मात्रां प्रयुञ्जीत यथेष्टाहारवानपि ।
योगराज इति ख्यातो योगोऽयममृतोपमः ॥ ६ ॥
आमवातादिवातादीन्क्रमीन्दुष्टव्रणानपि ।
प्लीहगुल्मोदरानाहदुर्नामानि विनाशयेत् ॥ ७ ॥
अग्निं च कुरुते दीप्तं रेतोवृद्धिं बलं तथा ।
वातरोगाञ्जयत्याशु संधिमज्जगतानपि ॥ ८ ॥
पादग्रहं क्रोष्टुशीर्षं मन्यास्तम्भं हनुग्रहम् ।
कर्णग्रहं कर्णशूलं शिरःशूलं मरुत्कृतम् ॥
रास्नाक्वाथेन हन्त्येष केवलो वा प्रशस्यते ॥ ९ ॥

चित्रक, पिंपळमूळ, ओवा, बडिशेप, वावडिंग, अजमोदा, जिरें, देवदार, चवक, वेलदोडे, सैंधेलोण, कोष्ट, रास्ना, गोखरू, धने, हिरडा, बेहडा, आवळकाठी, नागरमोथे, सुंठ, मिरें, पिंपळी, दालचिनी, वाळा, जवखार, तालिसपत्र, सराटे, लवंग, साज्जिखार, कचोरा, दांतीमूळ, गुळवेल, शेरणी, अश्वगंध, शतावरी हीं औषधें एकएक तोळा व चार तोळे लोहभस्म घेऊन त्यांचें बारीक चूर्ण करावें; आणि त्या चूर्णासमान गुग्गुळ घालून त्याचा तुपांत खल करून तो तुपानें रावळेल्या मातीच्या भांड्यांत ठेवावा; आणि शक्तितारतम्यानें याची मात्रा सेवन करावी. ह्यावर यथेच्छ आहार करावा. ह्याला योगराजगुग्गुळ असें म्हणतात. हा आमवातादि वात, कृमि, दुष्ट व्रण, पांथरी, गुल्म, उदर, आनाह, मूळव्याध ह्यांचा नाश करतो. अग्नि प्रदीप्त करतो. शुक्र व बल वाढवितो. संधि व मज्जागत वात यांचाहि त्वरित नाश करतो. पाय जखडणें, क्रोष्टुशीर्ष, मन्यास्तंभ, हनुग्रह, कर्णशूल, कान गच्च होणें व वातजन्य मस्तकशूळ, ह्या विकारांवर हा रास्नाच्या काढ्यांतून दिला असतां त्यांचा नाश करितो; अगर हा काढ्याच्या अनुपानावांचूनही द्यावा.

षडशीति गुग्गुळ.

सैंधव्यासचित्राद्दारुव्याघ्रीयुक्तं वकानृषन्तु ।
कृष्णाङ्गाग्राधनाभीरुवाट्यालं मिशिवेल्लरी ॥ १ ॥

पथ्या शुण्ठी छिन्नरुहा शठ्यारग्वधगोक्षुरम् ।
विशाखा मोदकी तिक्ता ग्रन्थिभार्गी विदारिका ॥ २ ॥
अलम्बुषा हस्तिकर्णी वस्तगन्धा विषाणिका ।
शिवाक्षं मुशलीकौन्तीकाकोलीदीप्ययुग्मकम् ॥ ३ ॥
त्रिवृद्दन्ती शिखी शृंगी कोकिलाक्षो दुरालभा ।
पञ्चमूलं महद्वीरतरुः कुष्ठं च जोंगकम् ॥ ४ ॥
जातीपत्रीफलैलं च केशरं त्वक्किरातकम् ।
कुंकुमं देवकुसुमं विशाला निशिसैन्धवम् ॥ ५ ॥
मन्दारमूलं कृमिजिद्धेमदुग्धा रविप्रिया ।
गजपिप्पल्यपामार्गो वानरी नक्तमालकः ॥ ६ ॥
एतै रास्ना समा चाभा द्विगुणा तैः पुरः समः ।
सूतं गन्धं हिंगुलं च टंकणं लोहमभ्रकम् ॥ ७ ॥
शुल्बं वंगं सूतभस्म नागं ताप्यमयोरजः ।
मिलितं पुरपादं च सर्वमेकत्र कारयेत् ॥ ८ ॥
पचेच्चतुर्गुणे क्वाथे पुरं षट्कटुजे पुरा ।
तुर्यांशशेषिते क्वाथे पूते चात्र विनिक्षिपेत् ॥ ९ ॥
चूर्णानि पुरमुख्यानि पाचयेन्मृदुवह्निना ।
यावद्घनतरं तावद्गुटिकाः कारयेत्ततः ॥ १० ॥
स्वर्णप्रमाणाः सेव्यास्ता मधुसर्पिःसमन्विताः ।
सप्तधातुगतान्वाताञ्शिरास्नाय्वस्थिसंधिगान् ॥ ११ ॥
सामान्निरामान्संसृष्टाञ्श्लेष्मजान्घ्नन्ति केवलान् ।
यक्ष्माणमग्निमान्द्यं च ज्वरं धातुगतं तथा ॥ १२ ॥
गुल्फजानूरुकट्यूरूदरहृत्कुक्षिकक्षगान् ।
अंसमन्याहनुश्रोत्रभ्रूललाटाक्षिशंखगान् ॥ १३ ॥
प्रमेहं मूत्रकृच्छ्रं च शूलमाध्मानमश्मरीम् ।
किं पुनर्मंदकान्वातान्प्रत्यंगस्थाञ्जयत्यलम् ॥ १४ ॥
गुग्गुलुः षडशीतिर्वै नाम्ना भोजेन कीर्तितः ।
क्षीयमाणेन शिष्येण प्रार्थितेन पुनः पुनः ॥ १५ ॥
स एष राजयोगोऽयं न देयो यस्य कस्यचित् ।
वत्सरेणास्य योगेन षण्ढोऽपि प्रमदाप्रियः ॥ १६ ॥
वाजीकरणमन्यच्च परं नास्माद्विशेषतः ।
गुणोस्य सेवनान्नित्यं यः स्यात्स स्याद्ब्रवीमि किम् ॥१७
एष नो परिहार्यस्तु पानभोजनमैथुनैः ।

कोरांटीची मुळी, धमासा, अतिविष, देवदार, रिंगणी, डोरली, चवक, आडुळसा, पिंपळी, नागरमोथे, वेखंड, धने, शतावरी,

लहान चिकणा, बडिशेप, वरधारा, हिरडेदळ, सुंठ, गुळवेल, कचोरा, बाहव्याची शेंग, गोखरू, वसूची मुळी, मोगऱ्याचें मूळ, कुटकी, पिंपळमूळ, भारंगमूळ, भुईकोहाळा, मुंडी, थोर कासाळू (हस्त्याळू), रानतुळस, मेंढशिंगी, रुद्राक्ष, मुसळी, रेणुकबीज, काकोली, ओवा, अजमोदा, तेड, दांतीमूळ, चित्रकमूळ, काकड-शिंगी, तालिमखान्याच्या मुळ्या (काटे कोळिस्त्याच्या मुळ्या), तांबडा धमासा, टाकळीमूळ, शिवणमूळ, पाडळमूळ, टेंटुमूळ आणि बेलमूळ, अर्जुनसादडा, कोष्ट, अगर (कृष्णागर), जाय-पत्री, जायफळ, वेलदोडे, नाकेशर, दालचिनी, काडेचिराईत, केशर, लवंग, कडु कवंडळ, हळद, सैंधव, मंदाराचें मूळ, वाव-डिंग, काटेधोतऱ्याचें मूळ, सूर्यफूल, गजपिंपळी, आघाडा, कुहि-लीचें मूळ व करंजाची साल ह्या सर्व औषधांबरोबर रास्ना, रा-स्न्याच्या दुप्पट बाभळीची साल व ह्या सर्वांच्या बरोबरीनें गुग्गुळ, आणि पारा, गंधक, हिंगुळ, टांकणखार, लोहभस्म, अभ्रकभस्म, ताम्रभस्म, वंगभस्म, पारदभस्म (रससिंदूर), नागभस्म, सुवर्णमा-क्षिक भस्म व लोहभस्म हीं सर्व औषधें मिळून गुग्गुळाच्या चतु-र्थांश घेऊन सर्वांचें एकत्र मिश्रण करावें. आधीं गुग्गुळ, सुंठ, मिरें, पिंपळी, पिंपळमूळ, चवक व चित्रक ह्या सहा औषधांच्या काढ्यांत पचन करून घ्यावा; नंतर पुनः त्या सुंठ वगैरे सहा औषधांचा चतुर्थांश काढा करून तो गाळून घेऊन त्यांत तो गुग्गुळ व तीं चूर्णें घालून गोळी होण्यासारखा होईपर्यंत पचन करावा. आणि त्याच्या एकएक तोळ्याच्या गोळ्या कराव्या, आणि त्या तूप व मध ह्यांजबरोबर सेवन कराव्या. म्हणजे सप्तधातु, शिरा, स्नायु, अस्थि व संधी ह्यांमधील वात, आमवात, आमरहित वात, मिश्रवात आणि केवळ कफयुक्त वात ह्यांचा नाश करतो. क्षय, अग्निमांद्य, धातुगत ज्वर, घोंटे, गुढगे, मांड्या, कंबर, पोट, हृदय, कुशी, काखा, खांदे, मान, हनुवटी, कान, भुंवया, कपाळ, डोकें, आंख ह्यांमधील वात, प्रमेह, मूत्रकृच्छ्र शूल, आध्मान व मुतखडा

ह्यांचा नाश करतो. मग मेदोवात व प्रत्येक अवयवांतील वात ह्यांचा नाश करील ह्यांत आश्चर्य काय? हा षडशीति नांवाचा गुग्गुळ भोजानें क्षीण झाल्यामुळें वरचेवर प्रार्थना करणाऱ्या आपल्या शिष्याला सांगितला. हा मोठा राजयोग आहे. हा भलत्याला देऊं नये. हा एक वर्षभर सेवन केला असतां षंढ देखील स्त्रियांना प्रिय होतो. ह्याच्यासारखा दुसरा श्रेष्ठ वाजीकरणयोग नाहीं. ह्याच्या सेवनानें जो गुण येईल तो दिसेलच. ह्यापेक्षां अधिक मी काय सांगू? ह्याला खाणें, पिणें, मैथुन ह्यांसंबंधीं पथ्याचा प्रतिबंध नाहीं.

रास्नादि गुग्गुल.

रास्नामृतैरण्डसुराह्वविश्वं तुल्येन गाढं च पुरेण मर्द्यम्।
खादेत्समीरी सशिरोगदी च नाडीव्रणा चापि भगंदरी च ॥१

रास्ना, गुळवेल, एरंडमूळ, देवदार व सुंठ हीं औषधें समभाग आणि सर्वांच्या बरोबरीनें गुग्गुळ घेऊन एकत्र खल करून वातरोग, शिरोरोग, नाडीव्रण व भगंदर ह्या रोगानें पीडित मनुष्यानें शक्तिमानाप्रमाणें सेवन करावा.

लघुविषगर्भ तेल.

तैलाढके समतुषाम्बुहयारिहेम-
निर्गुण्डिभास्करशिफाश्रृतया तु सिद्धम्।
धत्तूरकुष्ठकलिनीविषहेमदुग्धा-
रास्नाहयारिकटभीमरिचोपचित्राः ॥ १ ॥
मांसीवचादहनसर्षपदेवदारु-
दार्वीनिशारुगुजतुत्रिफलासमंगाः।
पिष्ट्वा क्षिपेत्पलमिता विषगर्भमेत-
त्तैलं समस्तपवनामयनाशनं स्यात् ॥ ३ ॥

दोनशें छप्पन्न तोळे तेलामध्यें तेलाच्या समान तुषोदक (अथवा कांजी) घालावें; आणि तितकाच कणेर, धोतरा, निर्गुडी व रुई ह्यांचा काढा घालून धोतरा, कोष्ट, कळलावी, बचनाग, काटेधोतऱ्याच्या मुळ्या, रास्ना, कणेर ह्यांच्या मुळ्या, मालकांगोणीच्या बिया, मिरें, थोर दांतीमूळ, जटामांसी, वेखंड, चित्रकमूळ, मोहऱ्या, देवदार, दारुहळद, एरंडमूळ, लाख, हिरडा, बेहडा,

आवळकाठी व लाजाळु ह्या औषधांचा प्रत्येकीं चार चार तोळे कल्क घालावा आणि तेल सिद्ध करावें. ह्याला विषगर्भ तेल असें म्हणतात. हें सर्व वातविकारांचा नाश करितें.

दुसरें लघुविषगर्भ तेल.

धत्तूरस्य रसस्य पञ्चकुडवं तैलं तथा काञ्जिकं
प्रस्थानां च चतुष्टयं गदवचा त्रिंशत्परं शाणकाः
हिङ्ग्वाश्च मरिचात्पृथङ् नव विषात्षट् स्वर्णबीजात्पटोः
स्युः सप्ताधिकविंशतिः परिमितं तीव्रानिलध्वंसनम् ॥१
पक्षाघातं हनुस्तम्भं मन्यास्तम्भं कटिग्रहम्।
पृष्ठत्रिकशिरःकम्पं सर्वाङ्गग्रहणं तथा ॥ २ ॥

काळ्या धोतऱ्याच्या पानाचा रस ऐशीं तोळे, तेल ऐशीं तोळे, कांजी दोनशें छप्पन्न तोळे, कोष्ट व वेखंड प्रत्येकीं साडेसात तोळे, हिंगवली (हिंतावळी) व मिरें प्रत्येकीं सव्वादोन तोळे, बचनाग दीडतोळा, धोतऱ्याचें बी व सैंधव ६।।-६।। तोळे ह्या सर्वांचा कल्क करून घालून तेल सिद्ध करावें. हें तीव्र वातविकारांचा नाश करितें. विशेषतः पक्षाघात, हनुस्तंभ, मन्यास्तंभ, कटिग्रह, पाठ व माकडहाड ह्यांतील वात, शिरःकंप, सर्व अंग वातानें जखडणें ह्यांचा नाश करितें.

महाविषगर्भ तेल.

कनकस्य च निर्गुण्डी तुम्बिनी च पुनर्नवा।
वाताारिश्चाश्वगन्धा च प्रपुन्नाटं सचित्रकम् ॥ १ ॥
सौभाञ्जनं काकमाची कलिकारी च निम्बकम्।
महानिम्बेश्वरी चैव दशमूलं शतावरी ॥ २ ॥
कारवल्ली सारिवा च श्रावणी च विदारिका।
वज्रार्कौ मेषशृङ्गी च करवीरद्वयं वचा ॥ ३ ॥
काकजङ्घा त्वपामार्गो बला चातिबला द्वयम्।
व्याघ्री महाबला वासा सोमवल्ली प्रसारिणी ॥ ४ ॥
पलोन्मितानि चैतानि द्रोणेऽम्भसि विनिक्षिपेत्।
पक्वेत्पादावशेषेऽस्मिन्कल्कस्य कुडवं क्षिपेत् ॥ ५ ॥
त्रिकटुं विषतिन्दुं च रास्ना कुष्ठं विषं घनम्।
देवदारुर्वत्सनाभो द्वौ क्षारौ लवणानि च ॥ ६ ॥
तुत्थकं कट्फलं पाठा भार्गी च नवसागरम्।

त्रायन्ती धन्वयासं च जीरकं चेन्द्रवारुणी ॥ ७ ॥
तैलप्रस्थं समादाय पाचयेन्मृदुवह्निना ।
विषगर्भमिदं नाम्ना सर्वान्वातान्व्यपोहति ॥ ८ ॥
वक्षोरुकटिजङ्घानां संधानं श्रेष्ठमेव च ।
गृध्रसीं च महावातान्सर्वाङ्गग्रहणं तथा ॥ ९ ॥
दण्डापतानकं चैव कर्णनादं च शून्यताम् ।
वनमध्ये यथा सिंहात्पलायन्ते यथा मृगाः ॥ १० ॥
तथाऽश्वगजभग्नानां नराणां च चतुष्पदाम् ।
नाशयेन्नात्र संदेहो विषगर्भस्य लेपनात् ॥ ११ ॥

काळ्या धोतऱ्याचें मूळ, निर्गुडीचें मूळ, दुध्याभोपळा, घेट्ळीची मुळी (वसूची मुळी), एरंडमूळ, अश्वगंध, टाकळ्याचें मूळ, चित्रकमूळ, शेवग्याची साल, कांगोणीचें मूळ, कळलावी, बाळंतनिंबाची साल, लिंबाऱ्याची साल (किंवा बी), शिवलिंगी, दशमुळें, शतावरी, कारल्याचा वेल, उपलसरी, मुंडी, भुईकोहाळा, त्रिधारी निवडुंग, रुई, मेढशिंगी, बडिशेप, बाळंतशेप, वेखंड, काकजंघा, आघाडा, चिकणा, थोर चिकणा, करंडीची (मुद्रिकेची) मुळी, रिंगणी, सहदेवी, आडुळसा, सोमवल्ली (क्षुद्र सोमवल्ली—रानशेर) व चांदवेल ही औषधें चार चार तोळे घेऊन दहाशें चोवीस तोळे पाण्यांत चतुर्थांश काढा करून त्यांत सुंठ, मिरीं, पिंपळी, कुचला, रास्ना, कोष्ट, अतिविष, नागरमोथे, देवदार, बचनाग, जवखार, सज्जिखार, सैंधेलोण, पादेलोण, बिडलोण, बांगडखार, मीठ, मोरचूत, कायफळ, पहाडमूळ, भारंगमूळ, नवसागर, त्रायमाण, धमासा, जिरें व इंद्रावणमूळ ह्या सर्व औषधांचा मिळून सोळा तोळे कल्क घालून दोनशें छपन्न तोळे तेल सिद्ध करावें. हें विषगर्भ तेल सर्व वातांचा नाश करितें. हृदय, मांड्या, कंबर व पोटऱ्या ह्यांमधील वाताचा नाश करितें. मोडलेल्या हाडाला सांधतें. गृधसी, महावात, सर्वांग जखडण, दंडापतानक, कर्णनाद व बधिरत्व ह्यांचा नाश करितें. अरण्यांत सिंहाला पाहून जशीं इतर श्वापदें पळ काढतात त्याप्रमाणें, हत्ती—घोडे ह्यांवरून पडलेल्या मनुष्यांना व जनावरांना ह्या तेलाचा लेप केला असतां त्यांच्या पीडा दूर होतात.

प्रसारिणी तैल.

समूलपत्रामुत्पाट्य जातसारां प्रसारिणीम् ।
कुट्टयित्वा पलशतं कटाहे समधिश्रयेत् ॥ १ ॥
दध्नस्तत्राऽढकं दद्याद्विगुणं चाम्लकाञ्जिकम् ।
भेषजानि तु पेष्याणि तत्रेमानि समावपेत् ॥ २ ॥
शुण्ठीपलानि पञ्चैव रास्नायाश्च पलद्वयम् ।
प्रसारिणी पले द्वे च द्वे पले मधुकस्य च ॥ ३ ॥
एतत्सर्वं समालोड्य शनैर्मृद्वग्निना पचेत् ।
एतत्प्रभंजने श्रेष्ठं नस्यकर्माणि शस्यते ॥ ४ ॥
एकाङ्गग्रहणं वाऽपि सर्वाङ्गग्रहणं तथा ।
अपस्मारं तथोन्मादं विद्रधिं मन्दवह्निताम् ॥ ५ ॥
त्वग्गताश्चापि ये वाताः शिरासंधिगताश्च ये ।
अस्थिसंधिगता ये च ये च शुक्रान्तरे स्थिताः ॥ ६ ॥
सर्वान्वातामयान्नूनं नाशयत्येव सर्वथा ।
हयं नरं गजं वाऽपि वातजर्जरितं भृशम् ॥ ७ ॥
सद्यः प्रशमयेत्तैलमेतन्नात्र विचारणा ।
इन्द्रियस्य प्रजननं वन्ध्यानां च प्रजाकरम् ॥ ८ ॥
वृद्धानां बालकानां च स्त्रीणां राज्ञां हितं परम् ।
पंगुर्वा पीठसर्पी वा पीत्वैतत्संप्रधावति ॥ ९ ॥

चांगली जून झालेली चांदवेल मुळें व पानें यांसह आणून कुटून तिचा कल्क चारशें तोळे घ्यावा. तो कढईत घालून त्यांत दहीं दोनशें छप्पन्न तोळे व कांजी पांचशें बारा तोळे घालून सुंठ वीस तोळे, रास्ना आठ तोळे, चांदवेल व जेष्ठमध आठ आठ तोळे ह्या औषधांचा कल्क घालून मंदाग्नीनें तेल पचन करावें. हें तेल वातविकारावर श्रेष्ठ आहे. हें नस्य करण्याच्या उपयोगीं आहे. अर्धांगवात, सर्वांगवात, अपस्मार, उन्माद, विद्रधी, अग्निमांद्य, त्वचाश्रित वात, मस्तक व सांधे ह्यांमधील वात, हाडाच्या सांध्यांमधील वात, शुक्रगत वात वगैरे सर्व वातांचा नाश करितें. मनुष्य, हत्ती, घोडे हे जरी वातानें पीडलेले असले तरी त्यांच्या पीडेचें यानें तात्काळ शमन होतें. हें इंद्रियें प्रफुल्लित करितें. वंध्यांना संतति देतें. वृद्ध, लहान मुलें, स्त्रिया व राजे ह्यांना हें हितकारक आहे. पांगळे व कुबड्या घेऊन चालणारे ह्यांनीं हें तेल प्राशन केलें असतां त्यांना धावतां येतें.

नारायणतैल.

बिल्वाग्निमन्थस्योनाकपाटलापारिभद्रकाः ।
प्रसारिण्यश्वगन्धा च बृहती कण्टकारिका ॥ १ ॥
बला चातिबला चैव श्वदंष्ट्रा सपुनर्नवा ।
एषां दशपलान्भागांश्चतुर्द्रोणाम्भसा पचेत् ॥ २ ॥
पादशेषं परिस्राव्य तैलपात्रं प्रदापयेत् ।
शतपुष्पा देवदारु मांसी शैलेयकं वचा ॥ ३ ॥
चन्दनं तगरं कुष्टमेलापर्णीचतुष्टयम् ।
रास्ना तुरगगन्धा च सैन्धवं सपुनर्नवम् ॥ ४ ॥
एषां द्विपलिकान्भागान्पेषयित्वा विनिक्षिपेत् ।
शतावरीरसं चैव तैलतुल्यं प्रदापयेत् ॥ ५ ॥
आजं वा यदि वा गव्यं क्षीरं दत्वा चतुर्गुणम् ।
पाने बस्तौ तथाऽभ्यङ्गे भोज्ये नस्ये प्रयोजयेत् ॥ ६ ॥
अश्वो वा वातभग्नो वा गजो वा यदि वा नरः ।
पंगुर्वा भग्नहस्तो वा भग्नपादोऽथवा नरः ॥ ७ ॥
अधोभागे च ये वाताः शिरामध्यगताश्च ये ।
दन्तशूले हनुस्तम्भे मन्यास्तम्भेऽपतंत्रके ॥ ८ ॥
एकाङ्गग्रहणे वापि सर्वाङ्गग्रहणे तथा ।
क्षीणेन्द्रिया नष्टशुक्रा ज्वरक्षीणाश्च ये नराः ॥ ९ ॥
लालाजिह्वाश्च बधिरा विस्वरा मन्दमेधसः ।
मन्दप्रज्ञा च या नारी या च गर्भं न विन्दति ॥ १० ॥
वातार्तौ वृषणौ येषामंत्रवृद्धिश्च दारुणा ।
एतत्तैलं वरं तेषां नाम्ना नारायणं स्मृतम् ॥ ११ ॥

बेल, टाकळा, टेंटु, पाडळ, लिंब, चांदवेल, अश्वगंध, रिंगणी, डोरली, चिकणामूळ, पेटारीचें मूळ, गोखरू व वसूची मुळी हीं औषधें चाळीस चाळीस तोळे घेऊन तीं चाळीसशें शहाण्णव तोळे पाण्यांत घालून चतुर्थांश काढा करावा, आणि तो गाळून घ्यावा. नंतर त्यांत दोनशें छप्पन्न तोळे तेल आणि बडिशेप, देवदार, जटामांशी, धोंडफूल, वेखंड, चंदन, तगर, कोष्ट, वेलदोडे, साळवण, पिटवण, रानमूग, रानउडीद, रास्ना, अश्वगंध, सैंधव, वसु, ह्या सर्वांचा आठ आठ तोळे कल्क घालून, शतावरीचा रस दोनशें छप्पन्न तोळे घालावा; आणि शेळीचें किंवा गाईचें दूध तेलाच्या

चौपट घालून तेल सिद्ध करावें. हें तेल पिण्यांत, बस्तिकर्मांत, अंगाला लावण्यांत, जेवणांत व नस्यकर्मांत योजावें. घोडा, हत्ती किंवा मनुष्य वातानें पीडलें असल्यास त्याच्यावर ह्या तेलाचा प्रयोग करावा. तसें जे पांगळे व हात किंवा पायमोडके असतील त्यांनाही हें फायदेशीर आहे. शरीराच्या खालच्या भागांतील वात, शिरांमधील वात, दंतशूल, हनुस्तंभ, मन्यास्तंभ, अपतंत्रक, एकांगवात, सर्वांगवात, क्षीणेंद्रिय, हीनवीर्य, ज्वरानें क्षीण झालेले, ज्यांना लाळ फार असते ते, बहिरे, हतस्वर, मंदबुद्धि, तसेंच मंदबुद्धि स्त्रिया, वांझ स्त्रिया, ज्यांचे वृषण वातानें पीडले आहेत ते आणि अंडवृद्धीचा विकार असलेले ह्यांना हें नारायणतेल फार उपयोगी आहे.

लघुनारायणतेल.

एलाबलानतकुचन्दनदारुसौम्या-
शैलेयकुष्ठकुटिलावरुणशृतेन ।
तैलं सदुग्धमिति सिद्धमभीरुकन्द-
तोयेन तेन तुलितेन समीरणघ्नम् ॥ १ ॥

वेलदोडे, चिकणामूळ, तगर, पतंग, देवदार, सोमवल्ली, धोंडफूल, कोष्ट, मोरवेल व वायवर्णा ह्यांचा काढा दूध व मोठ्या शतावरीच्या कांद्याचा रस हीं प्रत्येक तेलाच्या समान घालून तेल सिद्ध करावें. तें वातनाशक आहे.

शतावरीनारायणतेल.

शतावरी चांशुमती पृश्निपर्णी शठी बला ।
एरण्डस्य च मूलानि बृहत्यौ पूतिकस्य च ॥ १ ॥
गवेधुकस्य मूलानि तथा सहचरस्य च ।
एषां दशपलान्भागाञ्जलद्रोणे पचेद् बुधः ॥ २ ॥
पादावशेषे पूते च गर्भे चैतान्समावपेत् ।
पुनर्नवा वचा दारु शताह्वा चन्दनोऽगरुः ॥ ३ ॥
शैलेयं तगरं कुष्ठं तृटी मांसी स्थिरा बला ।
अश्वाह्वा सैन्धवं रास्ना माञ्जिष्ठं घनचोरकम् ॥ ४ ॥
कौन्तीप्रियंगुस्थौणेयं पलार्धं कल्पयेत्पृथक् ।
गव्याजपयसोः प्रस्थौ द्वौ चा तत्र प्रयोजयेत् ॥ ५ ॥

शतावरीरसप्रस्थं तैलप्रस्थं भिषक्पचेत् ।
लवङ्गनखकंकोलवेल्लकं जातिकोशकम् ॥ ६ ॥
त्वक्कटुकं च कर्पूरं तुरुष्कं श्रीनिवासकम् ।
स्पृक्काकुंकुमकस्तूरीर्दद्यादत्रावतारिते ॥ ७ ॥
अस्य तैलस्य सिद्धस्य शृणु वीर्यमतः परम् ।
अश्वानां वातरुग्णानां कुञ्जराणां तथा नृणाम् ॥ ८ ॥
तैलमेतत्प्रयोक्तव्यं सर्ववातविकारनुत् ।
आयुष्मांश्च नरः पीत्वा निश्चयेन दृढो भवेत् ॥ ९ ॥
गर्भमश्वतरी विन्द्यात्किं पुनर्मानुषी तथा ।
हृच्छूलं पार्श्वशूलं च तथैवार्धावभेदकम् ॥ १० ॥
अपचीं गण्डमालां च वातरक्तं हनुग्रहम् ।
कामलामश्मरीं पांडुमुन्मादं विनियच्छति ॥ ११ ॥
नारायणेन गदितं तैलमेतत्कृपालुना ।
नारायणमिति ख्यातं नाम्ना तस्मादिदं भुवि ॥ १२ ॥

शतावरी, साळवण, पिटवण, चिकणामूळ, कचोरा, एरंडमूळ, रिंगणमूळ, डोरलीमूळ, करंजाची साल, कसईचें मूळ आणि कोरांट्याचें मूळ हीं औषधें चाळीस चाळीस तोळे घेऊन त्यांचा दहाशें चोवीस तोळे पाण्यांत चतुर्थांश काढा करावा. नंतर वसूची मुळी, वेखंड, देवदार, वाळंतशेप, चंदन, कृष्णागर, घोंडफूल, तगर, कोष्ट, वेलदोडे, जटामांशी, साळवण, चिकणामूळ, अश्वगंध, सेंधेलोण, रास्ना, मंजिष्ट, नागरमोथे, गठोना, रेणुकबीज, गव्हला व गठोन्याचा भेद ह्या औषधांचा कल्क दोन दोन तोळे; गाईचें व शेळीचें दूध प्रत्येकीं एकशें अठ्ठावीस तोळे व शतावरीचा रस चौसष्ट तोळे घालून त्यांत चौसष्ट तोळे तेल पचन करावें. तेल तयार होऊन खालीं उतरल्यावर पुनः त्यांत लवंग, नखला, कंकोळ, जायपत्री, कुटकी, कापूर, शिलारस, विशेष धूप, पाच, केशर, कस्तुरी हीं औषधें अजमासानें घालावीं. ह्याप्रमाणें तयार केलेल्या ह्या तेलाचे गुण सांगतों ते ऐक. हें तेल वातरोगानें पीडित अशा घोड्यांना, हत्तींना किंवा मनुष्यांना योजावें. हें सर्व वातविकारांचा नाश करितें. ह्या तेलाच्या प्राशनानें मनुष्य निश्चयानें दीर्घायु व बळकट होतो. ह्या तेलाच्या सेवनानें घोडीलाही गर्भ राहतो, मग मानवी स्त्रियांना गर्भधारणा

होईल ह्यांत नवल काय? हें हृदयांतील शूल, कुशींतील शूल, अर्धाव-भेदक, अपची, गंडमाला, वातरक्त, हनुग्रह, कावीळ, मूतखडा, पांडुरोग व उन्माद ह्यांचा नाश करितें. हें तेल नारायणानें कृपाळू होऊन सांगितलें म्हणून हें नारायणतेल ह्या नांवानें ह्या पृथ्वीवर प्रसिद्ध आहे.

शतावरी तेल.

रुग्दारुद्रविडिप्रियंगुतगरं त्वक्पत्रकौन्तीनखै-
मांसीसर्जरसाम्बुचन्दनवचाशैलेयलामज्जकैः ।
मञ्जिष्ठासरलागुरुद्विपबलाराश्वाश्वगन्धावरी-
वर्षाभूमिसिसिन्धुभिश्च सकलैरेभिः पचेत्कल्कितैः ॥१॥
तुल्यं गोपयसा वरीरससमं तैलं विपक्वं मृदु
स्याद्वातघ्नमिदं नृणामिति वरीतैलं भिषक्पूजितम् ॥२॥

कोष्ट, देवदार, वेलची, गव्हला, तगर, दालचिनी, तमालपत्र, रेणुकबीज, नखला, जटामांसी, राळ, वाळा, चंदन, वेखंड, घोंड-फूल, काळा वाळा, मंजिष्ट, अगर, सरळ देवदार, नागबला, रास्ना; अश्वगंध, शतावरी, वसु, बडिशेप व सैंधव ह्यांचा कल्क आणि गाईचें दूध व शतावरीचा रस प्रत्येकीं तेलासमान घेऊन तेल पचन करावें. हें तेल वातनाशक आहे. हें तेल वैद्यांना मान्य आहे.

दशमूलादि तेल.

दशमूलकषायविपक्वमथो पयसा च समेन बलाब्दनलैः ।
त्रुटिचन्दनदारुलतानलदैररुणाजतुकुष्ठवचाकुटिलैः ॥ १ ॥
इति पक्वमिदं तिलजं जयति प्रसभं पवनामयमाशु नृणाम् ।
बलशुक्रविभारुचिवह्निकरं नृपवृद्धशिशुप्रमदासु हितम् ॥ २ ॥

दशमुळांचा काढा व गाईचें दूध हीं प्रत्येकीं तेलाच्या समान घेऊन चिकणामूळ, नागरमोथे, देवनळ, वेलदोडे, चंदन, देवदार, गव्हला, जटामांसी, मंजिष्ट, लाख, कोष्ट, वेखंड व तगर ह्यांचा कल्क घालून तेल सिद्ध करावें. ह्याला दशमूलादि तेल म्हणतात. हें मनुष्याच्या वातविकाराला त्वरित बरें करितें. हें शक्ति, शुक्र, कांती व रुचि ह्यांना वाढवितें आणि अग्नि प्रदीप्त करितें. हें राजे, वृद्ध, लहान मुलें व स्त्रिया ह्यांना हितकारक आहे.

सुगंधीतेल.

तगरागुरुकुंकुमकुन्दुरुभिः सलवंगवरांगकुरंगमदैः ।
सरलामरदारुदलद्रविडीनखकेसररुङ्नलिनीनलदैः ॥ १ ॥
सतुरुष्कहरेणुबलाकथनैरिति तैलमिदं पयसा विपचेत् ।
नृपतिप्रमदाशिशुभिः स्थविरैरुपयोज्यमिदं पवनामयजित् ॥२

तगर, अगर, केशर, धूप, लवंग, दालचिनी, कस्तुरी, सरळ देवदार, तमालपत्र, वेलची, नखला, नाकेशर, कोष्ट, वाळा, कमळ, शिलारस, रेणुकबीज, चिकणामूळ, ह्यांचा कल्क काढा व दूध ह्यां मध्यें तेल पचन करावें. हे राजेलोक, स्त्रिया, वृद्ध पुरुष व लहान मुलें ह्यांना हितावह असून वातनाशक आहे.

एलादि तेल.

एलामुरासरलशैलजदारुकौन्ती-
चण्डाशठीनलदचम्पकहेमपुष्पम् ।
स्थौणेयगन्धरसपूतिदलामृणाल-
श्रीवासकुन्दुरुनखाम्बुलवंगकुष्ठम् ॥ १ ॥
कालीयकं जलदकर्कटचन्दनश्री-
जात्याः फलं सविकसं सह कुंकुमेन ।
स्पृकातुरुष्कलघुलम्भतया विनीय
तैलं बलाक्कथनदुग्धदधिप्रपकम् ॥ २ ॥
मन्दानलेन हितमेतदुदाहरन्ति
वातामयेषु बलवर्णहुताशकारि ॥ ३ ॥

वेलदोडे, एकांगी मुरा, सरळ देवदार, धोंडफूल, देवदार, रेणुकबीज, वाळा, कचोरा, जटामांसी, सोनचाफयाचीं फुलें, सुवर्णपुष्प, थुनेर, रक्तबोळ, करंजाची साल, कमळ, श्रीवेष्टधूप (विशेष धूप), कुंदरु (एक जातीचा धूप), नखला, काळा वाळा, लवंग, कोष्ट, कृष्णागर, नागरमोथे, बेलफळ, चंदन, पिवळा चंदन, जायफळ, मंजिष्ट, केशर व पांच शिलारस, हीं सर्व द्रव्यें एकत्र कुटून कल्क करून तो कल्क दूध, दहीं व चिकण्याचा काढा घालून विधियुक्त तेल सिद्ध करावें. हें सर्व वातविकारांवर हितकारक असून शक्ति व अंगकांति ह्यांना वाढविणारें व अग्निवर्धक आहे.

महालक्ष्मीनारायण तेल.

दशशतांघ्रिशिवेतरमल्लिका दहननागबलारुबुबाष्पिका।
कितवलांगलकीवनमाल्लिका कुटजहेदुवृकीखरशृंगिका ॥ १ ॥
मधुकबीजकचम्पकमालतीस्नुहिबलाकृमिहाप्रपुनाटकाः।
शतदलाश्ववराहकवासनीरुबुकधन्वनपिप्परिरक्तिका ॥ २ ॥
अतिबलाद्विविषाशुकदाडिमी-
शिखरिशालमसिसिन्धुकतुण्डिका।
सुषिरपंगुलकाशसुमर्कटी-
वरककुम्भनिकुम्भजयन्तिका ॥ ३ ॥
कुसुरिपिच्छलिकाकरमर्दिका-
कसनमर्दनकेवणिरूपिका।
अतसिवत्सकगृध्रमहीरुहो
विदुलकुञ्जरिकाद्वितयोच्चटाः ॥ ४ ॥
दधिफलस्रुववृक्षमृगादनी-
मधुरसामगधाजलपत्रिका।
रुदतिका पृथगेभ्यजटाः सुधीः
समनुगृह्य तथैव दशांघ्रिकम् ॥ ५ ॥
बिल्वाग्निमन्थस्योनाककाश्मरीपाटलायुतैः।
शालिपर्णीपृश्निपर्णीबृहतीद्वयगोक्षुरैः ॥ ६ ॥
मुनितरुमलयतपनापामार्गबीजनक्तमालशृङ्गाटी।
प्रपुन्नाटो हेमदुग्धा फलेरुहाणां च बीजानि ॥ ७ ॥
धात्रीशिग्रुकरञ्जबब्बुलमधुष्ठीलेंगुदीनेपती-
नीपारग्वधरक्तसारबदरीविस्फूर्जनः काञ्चनः।
चिंचोदुम्बरतापसीद्रुमयुगांकोलद्वयं सल्लकी
गायत्रीकलिवृक्षभण्डकदराश्वत्थाभयापादपाः ॥ ८ ॥
भल्लीकिंशुकमेषशृङ्गिकिणिहीभूतांकुशः शल्यकः
कोशाम्राजुनपारिभद्रकमहावृक्षाः कुमार्यासनैः।
कुम्भी रक्तधनंजयो नियमनो वातारिमोखाह्वया
एतेषां परिगृह्य वल्कलमथो रम्भा बिदारी वरी ॥
आलूकक्षिरकन्दवाजिसुवहा कर्कोटिका गृष्टिका
खर्जूरी सुरसूरणप्रभृतिकान्कन्दांश्च साधूनपि ॥ ९ ॥
छिन्नाटरूषकशिवप्रियमाषपर्णी-
ज्योतिष्मतीयुगुलपर्पटमेषवल्ली।
भूपर्णिकासजटिकाभृगुराजमुण्डी-
युक्तर्तरीकुलकयुग्मफलार्कभक्ता ॥ १० ॥

भूनिम्बवह्निदमनो गिरिकर्णिकायुक्
चिल्लारकाखदिरकाविजयाकुमार्यौ ।
गंगावती युगकवैष्णविका सुगन्धा
लम्बा सुपर्णलतिका सहदेविका च ॥ ११ ॥
गोपीयुगं मृगखुरी सरणी च कंगु-
मोर्यश्च नागदमनी मधुपुष्पिका च ।
एतानि गृह्य निखिलानि तथाऽब्दयुग्मं
चूतास्थितोतरुरुहो वटसंप्ररोहान् ॥ १२ ॥
भूशर्करामदकराकुसुमं च पीलु-
बर्हिशिखां कनककेतकिसंप्ररोहान् ।
व्याघ्राटिकांघ्रिकरकं तिमिरोत्थसारं
कण्टूकपित्थभवलोहजटां गृहीत्वा ॥ १३ ॥
मुष्टिप्रमाणं विधिनोद्धृतानि द्रौणैर्जलानां तिसृभिर्विपाच्य ।
पादावशेषं परिगृह्य पूतं प्रस्थत्रयं तत्र तिलोत्थतैलम् ॥ १४ ॥
हिंस्रा रक्ता वरिष्ठा सुरजनियुगं सैंहलं गन्धसारं
शृङ्गारं नागपुष्पं पलितकटुफलं रक्तकाष्ठं नतं च ।
षड्ग्रन्थाजोंगकाश्वारुचककरुहं रोचनारक्तसारं
कोरङ्गीपालकाह्वं कृमिरिपुमधुकं सिन्धुजं स्निग्धदारु ॥१५॥
तालीसं जातिसस्यं मलयजममृतं पद्मकं जातिपत्री-
सेव्यं पद्मं यवानी कतकतुरवती केसरं पद्मकस्य ।
पाठीनो राजपुत्रीजलधरचविका सोमवल्को मधूकं
पाक्यः स्वर्जी शताह्वा वनजमगधजा मत्स्यपीता शठी च ॥१६॥
कारुश्रीपुत्रजीवास्तपनकनकजं बीजभृंगाररेची
वृक्षाम्लं देवधूपो जरणरसरसाकल्कराकुट्टिमं च ।
मृद्वीकालाकुरण्डं नियमनधनिका धन्वयासं च ब्राह्मी
विश्वं कैरातकेक्षुक्षुरककरिकणामोदकं बस्तमोदा ॥ १७ ॥
शक्राह्वा तिलकाख्योत्क्षुरपुरसुषवी मथिका शृंगिका च
प्रत्येकं वै गृहीत्वा पिचुदलतुलिता मुञ्च सकृत्प्रविष्टा ।
तान्निक्षिप्याऽऽशु पात्रे शुचिजनविहितं निर्मलं वैद्यवर्यो
गव्यं वा दुग्धमाजं युगपरिगणितं पूर्वमुक्ताच्च तैलात् ॥१८॥
नारायण्याः स्वरसकमथो रंगमाता रसं च
तैलोन्मादं विपच रविजे भोजयेत्प्रत्यहं वा ।
तस्मिन्पाके गतवति यथाविध्यनुप्रक्षिपेच्च
सौगन्ध्याप्त्यै शिशिरकिरणं कुंकुमं वेधमुख्यम् ॥ १९ ॥
गोधूमाख्यं सुसुरभियुतं गन्धकर्चूरकं च

जातीपुष्पं शतदलसमं मल्लिकं चम्पकं च ।
लोवानेन त्वतिसुरभिते काचभाण्डे निधाय
तैलं चैतन्नृपतिसदने धारयेद्वैद्यवर्यः ॥ २० ॥
पाने बस्तौ विहितमशने नावनेऽभ्यञ्जने च
मातंगे वा मनुजहययोर्वातरोगाभिभूते ।
वाताष्ठीलागलहनुशिरोगृध्रसीपादशूलं
पक्षाघातश्रवणनयनभ्रूललाटे तु शूलम् ॥ २१ ॥
ऊरुस्तम्भार्दितबधिरतैकांगरोगापतानं
मन्यास्तम्भं त्रिकहृदयरुङ्मूकताक्षेपखांज्यम् ।
जिह्वास्तम्भं गतिविकलताकुब्जतादन्तशूलं
तून्यौ गुल्मं गुदकटिचरणभ्रंशगुल्फौ च सुप्तिम् ॥ २२ ॥
विश्वाचीं वा वृषणपवनं धातुवातापतानं
मूकं कम्पं जयति सकलान्वातरोगाननुक्तान् ।
रेतोवृद्धिं जनयति नवं यौवनं पुंस्त्ववृद्धिं
बुद्धिं प्राणं वितरति तथा पुष्टिमायुष्यकारि ॥
वन्ध्यायाः पुत्रदं स्याज्ज्वरविहिततनौ शोषदौर्भाग्यहन्तृ
तैलं भूपोपयोग्यं विनिगदितमिदं नाम नारायणं च ॥ २३ ॥

शतावरी, बाबरी, काळा कुडा, चित्रक, गांगेरुकी (चिकण्यांतील एक जात), एरंडमूळ, बाफळी, धोतऱ्याचें मूळ, फळलावी, बटमोगरा, कुडा (श्वेतकुडा), हेदु (हेदींचें झाड), पहाडमूळ, खरसांबळ, जेष्टमध, बिबळा (असाणा), चाफा (सोनचाफा), जाई किंवा मधुमालती, त्रिधारी निवडुंग, चिकणामूळ, वावडिंग, तरोटा (टाकळा), बडिशेप, अश्वगंध, डुकरकंद, वासनवेल, तांबडा एरंड, धामण, नांदरुखी, गुंज, पेटारी, काळें व पांढरें अतिविष, लोध्र, डाळिंबाची साल, आघाडा, काटेसांवरी, निर्गुडी, कडुतोंडली देवनळ, फांगळा, कसाड, गवत, कुहिली, भारंगमूळ, तेड, दांतीमूळ, टाकळी, कुसरी, गोंदणीची साल, करवंदीचें पाळ, कासविंदा, केवणी (नागरमोथ्याचा भेद), रूपिका[1] (पाच), जवस, काळाकुडा, गृध्रमहीरुह (गीधसाव–गंधाण जातीचें गवत), विदुल (वेत), कुंजारिकद्वय (लहान व थोर साळई), पांढरी गुंज, कवठ, वेहेकळ,

---

१ " रूयिका " पाठांतर. अर्थ रुईचें मूळ.

इंद्रवारुणी (कडुइंद्रावण), मोरवेल, पिंपळी, कमळिणी, रुदंती, (रानहरभरा) ह्या प्रत्येक वनस्पतीचीं मुळें घ्यावीं. तशींच दशमुळेंही घ्यावीं. बेल, टाकळी, टेंटु, शिवण, पाडळ, साळवण, पिटवण, रिंगणी, डोरली, व गोखरू ह्यांच्या मुळ्यांना दशमुळें म्हणतात. हादगा, चंदन, बिब्बा, आघाड्याचें बी, करंज, शिंगाडे, प्रपुन्नाट (तरवड किंवा तरोटा), हेमदुग्धा (कांटेधोत्रा किंवा कारहेरी), फलेरुहा (सागरगोटी--गजगा), ह्यांचें बी; आवळी, शेवगा, करंज, बाभळ, मोहाचें झाड, हिंगणबेट, नेपती, कदंब (कळंब), बाहवा, शिसवा, बोर, टेंभुरणी, कांचन, चिंच, उंबर, पांढरा व तांबडा हतगा, पांढरा व काळा अंकोल (अकोला), साळई किंवा रायआवळे), खैर, बेहडा, मंजिष्ट, पांढरा खैर, पिंपळ व हिरडा हे वृक्ष पानांसकट घ्यावे (ह्यांचीं पंचांगें घ्यावीं). बिब्बा, पळस, मेढशिंगी, किणही, नाकशिकणी, गेळ, कोकंब, अर्जुनसादडा, बाळंतनिंबू, त्रिधारी निवडुंग, कोरफड, असाणा, द्रोणपुष्पी, तांबडा अर्जुनसापडा, वायवर्णा, बावळा (वातारि) व खुळखुळा ह्यांच्या साली घ्याव्या. केळ, भुईकोहाळा, शतावरी, आळु, क्षीरकंद (पांढरा भुईकोहाळा), अश्वगंध, मुंगसवेलीचा कांदा, वांझकर्टोलीचा कांदा, डुकरकंद, मुसळीकंद, अमरकंद व सुरण ह्या वनस्पतींचे उत्तम गड्डे घ्यावे. गुळवेल, अडुळसा, बेल, रानउडीद, लहान व मोठी मालकांगोणी, पित्तपापडा, मेढवेल (मेढशिंगी), वासनवेल, गुंजा, माका, मुंडी, काळी व पांढरी निर्गुडी, गोर्डे व कडु पडवळ, उतरंडीचा वेल, सूर्यफूलवेल, (ह्यांचीं पंचांगें घ्यावीं) पालेकिराईत, चित्रक, दवणा, काळी व पांढरी विष्णुक्रांता, लाजाळू, खैर, भांग, कोरफड, गंगावतीद्वय (लहान व मोठी भांबुरडी) वरधारा, रास्ना (किंवा तेरडा), कडुभोपळा, कांड-

---

१ "द्रोणपुष्पी" हा प्रतिशब्द टीकेवरून मूळांतील "कुंभी" ह्या वनस्पतीस लावला आहे. तथापि कुंभी वृक्षाचीं झाडें मोठीं असून तीं कोंकणांत आहेत, त्यांना कुंभ्याचीं झाडें म्हणतात. त्यांची साल घ्यावी.

वेल, सहदेवी, पांढरी व काळी उपळसरी, हरणखुरी, हरणवेल, कांग, मुर्वा (मोरवेल), नागदवण (नाय), मोहाचें झाड (ह्यां- चीं पंचांगें घ्यावीं), मोठे व लहान नागरमोथे, आंब्याची कोय, वांडगुळ, वडाच्या पारंब्या, कडुमाकडकंद, धायटीचीं फुलें, पीलु (अक्रोड), मयूरशिखा, सोनकेवड्याच्या पारंब्या, वाघाटी, कर- वंदी, डाळिंब, कुहिलीचें मूळ, कवठीचें मूळ, लोखंडीचें मूळ, (लोखंडी केळीचें ?) हीं सर्व औषधें विधियुक्त आणून चार चार तोळे प्रमाणें प्रत्येक औषध वजन करून घ्यावें; आणि तीन द्रोण (तीन हजार बाहात्तर तोळे) पाण्यांत त्यांचा चतुर्थांश काढा करून गा- ळून घ्यावा. नंतर त्यांत तीन प्रस्थ (एकशें व्याण्णव तोळे) तिळा- चें तेल घालून जटामांसी, मंजिष्ट, काळा आडुळसा, देवदार, हळद, दारुहळद, दालचिनी, चंदन, लवंग, नाकेशर, गुग्गुळ, कंकोळ, पतंग, तगर, वेखंड, कृष्णागर, अश्वगंध, पादेलोण, नखला, गोरोचन, रक्तचंदन, तुरटी, कोष्ट, वावडिंग, जेष्टमध, सैंधव, लेल्या देवदार, तालीसपत्र, जायफळ, मलयागरू, बचनाग, पद्मक [पद्मकाष्ट-- टीकाकाराच्या मतें कमलाक्ष], वाळा, कमळ, ओवा, निंबळीच्या बिया, तुरटी, कमळांतील केशर, चित्रक, रेणुकबीज, भद्रमोथा, चवक, पांढरा खैर, मोह, जवखार, सज्जिखार, बाळंतशेप, चिर- फळें, पिंपळी, कुटकी, कचोरा, बाफळी, पुत्रवंतीचें बीं, बिब्बा, धोतऱ्याचें बीं, माका, तेड, आमसोल, गुग्गुळ किंवा धूप, जिरें, राळ, रसा (साळईचा डींक—टीकाकाराच्या मतें रास्ना). अक्कलकारा, डाळिंबाची साल, मनुका, साकुरंड (अक्रोड) कडुनिंब, धने, धमासा, ब्राह्मी, सुंठ, काडेचिराईत, ऊंस, तालिमखाना, गज- पिंपळी, ओवा, अजमोदा, इंद्रजव, लोध्र, कुहिलीचें मूळ, गुग्गुळ, कारलें, मेथ्या व काकडशिंगी हीं औषधें प्रत्येकी एक एक तोळा घेऊन त्यांचा कल्क करून त्यांत घालावा. गाईचें किंवा शेळीचें दूध तेलाच्या दुप्पट घालावें. शतावरीचा रस आणि लाखेचा काढा हे दोन्ही जिन्नस तेलाच्या बरोबरीनें घालावे. आणि तांब्याच्या भां-

ड्यांत तेल पचन करावें. व नित्य तांब्याच्या भांड्यांतून वापरावें. ह्याप्रमाणें तेल तयार झाल्यावर तें सुगंधित होण्याकरितां त्यांत कापूर, केशर, कचोरा, गहुला, कापुरकाचरी, जाईचीं फुलें, शेवती, मोगरा, सोनचाफा ह्यांचीं फुलें, व लोबंदी ऊद, ह्या द्रव्यांचें चूर्ण अजमासानें घालून चांगलें सुवासिक झालें म्हणजे काचेच्या भांड्यांत भरून ठेवावें. हे तेल वैद्यानें राजवाड्यामध्यें संग्रह करून ठेवावें. वातरोगानें जर्जर झालेल्या हत्तीला, घोड्याला व मनुष्याला पिण्याला, बस्तिकर्मामध्यें, भक्षणामध्यें, नस्य करण्याच्या कामीं व अंगाला लावण्याच्या कामीं हें हितावह आहे. वाताष्ठीला, गलस्तंभ, हनुस्तंभ, शिरोग्रह, गृध्रसी, पायाचा ठणका, पक्षाघात, कान, डोळे, भुवया व कपाळ ह्यांमधील शूळ, ऊरुस्तंभ, अर्दितवात, बहिरेपणा, एकांगवात, अपतानक, मन्यास्तंभ, माकडहाड व हृदय ह्यांमधील ठणका, मुकेपणा, आक्षेपक, लंगडेपणा, जिह्वास्तंभ, गतिविकलता (चालतांना अडखळणें), कुबडेपणा, दातांचा शूल, तूनी, प्रतूनी, गुल्म, गुद, कंबर व पाय ह्यांचा भ्रंश (निखळणें), घोट्यांतील वात, विश्वाची, वृषणसंबंधी वात, शुक्रगत वात, अपतानक, मुकेपणा व कंप हे व ह्यांखेरीज अन्य सर्व प्रकारचे वातविकार ह्यांना हें तेल जिंकतें. शुक्राची वृद्धि करितें. तारुण्य आणितें. पुरुषत्व आणितें, बुद्धि व प्राणशक्ति वाढवितें; आयुष्य वाढवितें; पुष्टि देतें; हें वांझेला पुत्र देतें. ज्वर, क्षय व दुर्भाग्यता ह्यांचा नाश करितें. असें हें नारायण नांवाचें तेल राजाला योग्य सांगितलें आहे.

माषतैल.

माषक्वाथे बलाक्वाथे रास्नाया दशमूलजे ।
यवकोलकुलत्थानां छागमांसरसे पृथक् ॥ १ ॥
प्रस्थं तैलस्य च प्रस्थं क्षीरं दद्याच्चतुर्गुणम् ।
रास्नात्मगुप्तासिन्धूत्थशताह्वैरण्डमुस्तकैः ॥ २ ॥
जीवनीयबलाव्योषैः पचेदक्षमितैः पृथक् ।
हस्तकम्पे शिरःकम्पे बाहुकम्पेऽवबाहुके ॥ ३ ॥

बस्त्यभ्यंजनपानेषु नावने च प्रयोजयेत्।
माषतैलमिदं श्रेष्ठमूर्ध्वजत्रुगदापहम् ॥ ४ ॥

उडीद, चिकणामूळ, रास्ना व दशमुळें ह्या प्रत्येकांचा काढा चौसष्ट चौसष्ट तोळे; सातू, बोरें व हुलगे ह्यांचा काढा चौसष्ट तोळे आणि बोकडाच्या मांसाचा रस चौसष्ट तोळे एकत्र करून त्यांत तेल चौसष्ट तोळे आणि दूध दोनशें छप्पन्न तोळे घालून रास्ना, कुहिलीच्या मुळ्या, सैंधव, बडिशेप, एरंडमूळ, नागरमोथे, जीवनीय गणांतील औषधें (जीवंती, काकोली, क्षीरकाकोली, मेदा, महामेदा, रानमूग, रानउडीद, ऋषभक, जीवक, व जेष्ठमध) चिकणामूळ, सुंठ, मिरें, पिंपळी ह्या औषधांचा कल्क एक एक तोळा घालून तेल सिद्ध करावें. हें हस्तकंप, शिरःकंप, बाहुकंप व अवबाहुक ह्या विकारांवर बस्ति, अभ्यंग, नस्य व प्राशन करणें ह्या कर्मांत योजावें. हें माषतेल फार उत्तम गुणकारक असून मानेच्या वर होणाऱ्या विकारांचा कारितें.

महाबलातेल.

बलामूलकषायस्य दशमूलीकृतस्य च।
यवकोलकुलत्थानां क्राथस्य पयसस्तथा ॥ १ ॥
अष्टावष्टौ शुभान्भागांस्तैलादन्ये तदेकतः।
पचेदावाप्य मधुरं गणं सैन्धवसंयुतम् ॥ २ ॥
तथाऽगुरुं सर्जरसं सरलं देवदारु च।
मंजिष्ठाचन्दनं कुष्ठमेला कोलांजनं वरा ॥ ३ ॥
मांसी शैलेयकं पत्रं तगरं सारिवा त्वचा।
शतावरी चाश्वगन्धा शतपुष्पा पुनर्नवा ॥ ४ ॥
तत्संसिद्धं च सौवर्णे राजते मृन्मयेऽथ वा।
प्रक्षिप्य सकलं सम्यक् सुगुप्तं स्थापयेद् बुधः ॥ ५ ॥
बलातैलमिदं ख्यातं सर्ववातविकारनुत्।
यथाबलं भिषङ् मात्रां सूतिकायै प्रदापयेत् ॥ ६ ॥
या च गर्भार्थिनी नारी क्षीणशुक्रश्च यः पुमान्।
क्षीणो वातैर्मर्महते मथिते पीडिते तथा ॥ ७ ॥
भग्ने च च्छिन्नभिन्ने च सर्वथैव प्रयोजयेत्।
सर्वानाक्षेपकादींश्च वातव्याधीन्व्यपोहति ॥ ८ ॥
प्रत्यग्रधातुः पुरुषो भवेच्च स्थिरयौवनः।

राज्ञा त्वेतद्धि कर्तव्यं राजमान्यैस्तथा नरैः ॥ ९ ॥

चिकणामुळाचा काढा, दशमुळांचा काढा, सातू, बोरें, हुलगे ह्यांचा काढा हे काढे आठ आठ भाग; दूध आठ भाग, तेल एक भाग, हें सर्व एकत्र करून त्यांत मधुरादि गणांतील औषधें, सैंधव, कृष्णागर, सर्जरस (राळ), सरळ देवदार, देवदार, मंजिष्ठ, चंदन, कोष्ठ, वेलदोडे, कोळिंजन, हिरडा, बेहडा, आवळकाठी, जटामांसी, शिलारस, तमालपत्र, तगर, उपलसरी, दालचिनी, शतावरी, अश्वगंध, बडिशेप, वसूची मुळी, ह्या औषधांचा कल्क घालून तेल सिद्ध करावें आणि तें सोन्याच्या, चांदीच्या अगर मातीच्या भांड्यांत भरून गुप्त ठिकाणीं ठेवावें. ह्या तेलाला बलातेल म्हणतात. हें सर्व वातविकारांचा नाश करितें. शक्तिमानाप्रमाणें योग्य त्या प्रमाणानें हें तेल बाळंतिणीला द्यावें. गर्भधारणेची इच्छा करणाऱ्या स्त्रीनें किंवा क्षीणधातु पुरुषानें ह्याचें सेवन करावें. वातविकारानें क्षीण झालेला व मर्मावर आघात झाल्यामुळें ज्याला घुसळल्यासारखी पीडा होते आहे असा मनुष्य, हाड मोडलेला व शरीराचे अवयव च्छिन्नभिन्न झालेला; अशा मनुष्याला ह्या तेलाची सर्वथा योजना करावी. हें तेल सर्व प्रकारचे वातव्याधि व सर्व प्रकारचे आक्षेपक ह्यांचा नाश करितें. ह्याच्या सेवनानें मनुष्य सर्व धातूनें परिपूर्ण व तरुण होतो. हें तेल राजानें किंवा राजमान्य मनुष्यानें करून संग्रहीं ठेवावें.

विजयभैरव तेल.

रसं गन्धं शिलातालं सर्वं कुर्यात्समांशकम् ।
चूर्णयित्वा ततः श्लक्ष्णमारनालेन पेषयेत् ॥ १ ॥
तेन कल्केन संलेप्य क्षौमं वस्त्रं ततः परम् ।
घृताक्तां कारयेद्वर्तिमूर्ध्वभागे प्रदीपयेत् ॥ २ ॥
तस्याधःस्थापिते पात्रे तैलं पतति शोभनम् ।
लेपयेत्तेन गात्राणि भक्षयेदातुरः सदा ॥ ३ ॥
नाशयेत्स्रुततैलं तद्वातरोगानशेषतः ।
बाहुकम्पं शिरःकम्पं जङ्घाकम्पं ततः परम् ॥ ४ ॥
एकांगं च तथा वातं हन्ति लेपान्न संशयः ।

रोगशान्त्यै सदा भक्ष्यं तैलं विजयभैरवम् ॥ ५ ॥

पारा, गंधक, हरताळ व मनशील ह्यांची बारीक कज्जली करून तिचा कांजींत खल करावा. नंतर त्याचा बारीकशा तागाच्या अगर रेशमी वस्त्रास लेप करून त्याची वळकटी करावी आणि ती तुपांत बुचकळून वरून पेटवावी व खालीं भांडें धरावें; म्हणजे त्यांत तेल पडेल. तें काढून घ्यावें. त्याचा अंगास लेप करावा आणि भक्षणही करावें. हें तेल सर्व वातरोगांचा नाश करितें. हें बाहुकंप, शिरःकंप, जिह्वाकंप, आणि अर्धांगवायु ह्यांचा नाश करितें. वातरोगाच्या शांतीकरितां हें नेहमीं भक्षण करावें.

रास्नापूतिक तेल.

दशमूलबलादारु अश्वगन्धा शतावरी ।
वरुणैरण्डनिर्गुण्डीतर्कारीशिग्रुमोरटम् ॥ १ ॥
सहाचरं चित्रमूलं करंजाकोलमूलकम् ।
पुनर्नवां च भूपीलु अर्कपुष्पी दुरालभा ॥ २ ॥
जीवन्ती विषतिन्दुश्च वातारिर्हिंस्राशिग्रुकम् ।
अलर्कयवलोलं च कुलित्थानां कषायकम् ॥ ३ ॥
एतेषां च समां रास्नां पूतिकं च तयोः समम् ।
अष्टभागावशेषं तु कषायमवतारयेत् ॥ ४ ॥
तत्पादं तिलतैलं च त्वजाक्षीरं च तत्समम् ।
गुग्गुलुं तगरं मांसीं त्रिकटु त्रिफलानि च ॥ ५ ॥
चातुर्जातं कचोरं च विडंगामरदारु च ।
हिंगुरास्नावचातिक्तापाठायष्टिकाचित्रकम् ॥ ६ ॥
प्रियंगुपिप्पलीमूलं चन्दनं चव्यदीप्यकम् ।
वरालं चम्पकं कुष्ठं मंजिष्ठामिशिसर्षपम् ॥ ७ ॥
जातीफलं सुगन्धं च पाठोशीरं समांशकम् ।
एतत्तैलस्य षष्ठांशं कल्कद्रव्याणि दापयेत् ॥ ८ ॥
सुमुहूर्ते सुनक्षत्रे नववस्त्रेण पीडयेत् ।
पानलेपननस्याद्यशिरोबस्तिषु पूजितम् ॥ ९ ॥
धनुर्वातान्तरायामे गृध्रसीमवबाहुकम् ।
आक्षेपके व्रणायामे विश्वाच्यामपतन्त्रके ॥ १० ॥
आढ्यवाते हनुस्तम्भे शिरोवातापतानके ।
भ्रूशंखकर्णनासाक्षिजिह्वास्तम्भेऽवबाहुके ॥ ११ ॥
कलायखञ्जतापंगुसर्वाङ्गैकांगमारुते ।

अर्दिते पादहर्षे च पक्षघाते प्रशस्यते ॥ १२ ॥
ऊरुस्तम्भं सुप्तवातं नाशयेन्नात्र संशयः ।
रास्नापूतीकनामैतत्तैलमात्रेयनिर्मितम् ॥ १३ ॥

दशमुळें, चिकणामूळ, देवदार, अश्वगंध, शतावरी, वायवर्णा, एरंडमूळ, निर्गुडी, थोर टाकळी, शेवगा, उंसाचें मूळ, कोरांटी, चित्रकाचें मूळ, करंजाचें मूळ, अंकोलाचें मूळ, पुनर्नवा (वसु), क्षुद्रपीलु, सूर्यफुलाची वेल, धमासा, हरणदोडी, कुचला, तांबडा एरंड, जटामांसी, शेवगा, मंदार, सातु, बोर व हुलगे हे सर्व जिन्नस समभाग; रास्ना सर्वांच्या बरोबर; आणि ह्या दोहोंच्या बरोबरीनें करंजाची साल ह्यांचा अष्टमांश काढा करून त्यांत त्या काढ्याच्या चवथाई तिळाचें तेल आणि तेलाच्या बरोबरीनें शेळीचें दूध घालून गुग्गुळ, तगर, जटामांसी, सुंठ, मिरें, पिंपळी, हिरडा, बेहडा, आवळकाठी, वेलची, तमालपत्र, दालचिनी, नाकेशर, कचोरा, वावडिंग, देवदार, हिंग, रास्ना, वेखंड, कुटकी, पहाडमूळ, जेष्टमध, चित्रकमूळ, गव्हला, पिंपळमूळ, चंदन, चवक, ओवा, लवंग, चाफा, कोष्ट, मंजिष्ट, बडिशेप, मोहऱ्या, जायफळ, रोहिसगवत, पहाडमूळ व वाळा ह्या औषधांचा कल्क तेलाच्या षष्टांश घालावा. आणि सुमुहूर्तावर व चांगल्या नक्षत्रावर तेल सिद्ध करावें आणि नव्या वस्त्रानें गाळून घ्यावें. प्राशन करणें, लेप देणें, नाकांत घालणें व शिरोबस्ति ह्यांमध्यें योजावें. धनुर्वात, अंतरायाम, गृध्रसी, अवबाहुक, आक्षेपक, व्रणायाम, विश्वाची, अपतंत्रक, आढ्यवात, हनुस्तंभ, शिरोवात, अपतानक, भुवया, कान, नाक, आंख, डोळे व जीभ ह्यांचा स्तंभ (ताठणें), अवबाहुक, कलायखंजवात, पांगळेपणा, सर्वांगवात, एकांगवात, अर्दित, पादहर्ष व पक्षाघात ह्या विकारांवर हें प्रशस्त आहे. ऊरुस्तंभ व सुप्तिवात (सुनभैरी) ह्यांचा नाश करितें. हें रास्नापूतिक नांवाचें तेल आत्रेय महर्षींनीं सांगितलें आहे.

पंचतिक्त घृत.

निम्बामृतावृषपटोलनिदिग्धिकानां

भागान्पृथग्दशपलान् विपचेद्धटेऽपाम् ।
अष्टावशेषितरसेन पुनश्च तेन
प्रस्थं घृतस्य विपचेत्पिचुभागकल्कैः ॥ १ ॥
रास्नाविडङ्गसुरदारुगजोपकुल्या
द्विक्षारनागरनिशामिशिचव्यकुष्ठैः ।
तेजोवतीमरिचवत्सकदीप्यकाग्नि-
रोहिण्यपुष्करवचाकणमूलयुक्तैः ॥ २ ॥
मञ्जिष्ठयाऽतिविषया त्रिवृता यवान्या
संशुद्धगुग्गुलुपलैरपि पञ्चसंख्यैः ।
तत्सेवितं घृतमतिप्रबलं समीरं
संध्यस्थिमज्जगतमप्यपहंति कुष्ठम् ॥ ३ ॥
नाडीव्रणार्बुदभगंदरगण्डमाला
जत्रूर्ध्ववातगदगुल्मगुदोत्थमेहान् ।
यक्ष्मारुजं श्वसनपीनसकासशोफ-
हृत्पाण्डुरोगमथ विद्रधिवातरक्तम् ॥ ४ ॥

कडुनिंबाची साल, गुळवेल, आडुळसा, कडुपडवळ व रिंगणी हीं औषधें प्रत्येकीं चाळीस चाळीस तोळे घेऊन त्यांचा दहाशें चोवीस तोळे पाण्यांत अष्टमांश काढा करावा. त्या काढ्यांत चौसष्ट तोळे तूप व रास्ना, वावडिंग, देवदार, गजपिंपळी, जवखार, सज्जिखार, सुंठ, हळद, बडिशेप, चवक, कोष्ट, माळकांगोणी, मिरें, कुड्याची साल, ओवा, चित्रकमूळ, रोहिसगवत, पोखरमूळ, वेखंड व पिंपळमूळ ह्यांचा एक एक तोळा कल्क आणि मंजिष्ट, अतिविष, तेड, ओवा, शुद्धगुग्गुळ, ह्यांचा कल्क चार चार तोळे घालून तूप सिद्ध करावें. हें सेवन केलें असतां संधिगत, अस्थिगत व मज्जागत देखील प्रबळ वाताचा नाश करतें. कुष्टाचा नाश करितें. नाडीव्रण, अर्बुद (अवाळु), भगंदर, गंडमाळा, मानेच्या वरचे वातविकार, गुल्म, गुदसंबंधीं रोग (मूळव्याध वगैरे), क्षयरोग, श्वास, पीनस, खोकला; सूज, हृदयासंबंधीं विकार, पांडुरोग, विद्रधि व वातरक्त ह्यांचा नाश करितें.

अजमोदादि वटी.

अजमोदा कणा वेल्लं शतपुष्पाऽग्निनागरम् ।

मरीचं सैन्धवं दारु भागैकं च पृथक्पृथक् ॥ १ ॥
पञ्च भागा हरीतक्याः शुण्ठी च दशभागिका ।
वृद्धदारोर्दशांशाः स्युः षट्त्रिंशद्गुडभागकाः ॥ २ ॥
गुडपाकैर्वटीः कृत्वा मात्रा कर्षप्रमाणिका ।
संधिवाते प्रदेयं तत्त्वामवाते सुदारुणे ॥
उष्णोदकानुपानेन सर्ववातं नियच्छति ॥ ३ ॥

ओवा, पिंपळी, वावडिंग, बडीशेप, चित्रकमूळ, सुंठ, मिरें, सैंधेलोण व देवदार हीं औषधें प्रत्येक एक एक भाग; हिरडेहळ पांच भाग, सुंठ दहा भाग, वरधारा[1] दहा भाग आणि गूळ छत्तीस भाग ह्यांच्या गुडपाकविधीनें एक एक तोळ्याच्या गोळ्या कराव्या. ह्या ऊन पाण्याबरोबर दारुण अशा आमवातावर किंवा संधिवातावर द्याव्या. ह्या सर्व प्रकारच्या वाताचा नाश करितात.

वातावर कढी.

निर्गुण्डीदीप्यकं वह्निहरिद्राविश्वभेषजम् ।
तक्रं कांजिकसंपक्वं वातघ्नं वह्निवर्धनम् ॥ १ ॥

निर्गुडीचीं पानें, ओवा, चित्रकमूळ, हळद, सुंठ, ह्या जिनसांचें चूर्ण व कांजी मिसळून ताकाची कढी करावी. ती वातनाशक व अग्निवर्धक आहे.

स्वेद व लेप ह्यांचा प्रकार.

एरण्डार्ककरंजमोरटबलातर्कारिसोमस्नुही-
निर्गुण्डीतलपोटशिग्रुवरणास्फोताश्वगन्धादिजैः ।
पत्रैः कांजिकमूत्रचुक्रसहितैः स्विन्नैर्घटस्थैः कृतः
स्वेदः क्रुद्धसमीरणार्तवपुषां सद्यः सुखोत्पादकः ॥ १ ॥
निर्गुण्ड्या चोपनाहं च सकरंजैः सपित्तलैः ।
भेषजैः सेकलेपादि त्वभिषेकादिकं चरेत् ॥ २ ॥

एरंड, रुई, करंज, मोरवेल, चिकणा, टाकळी, सोमवल्ली, त्रिधारी निवडुंग, निर्गुडी, तरवड, शेवगा, वायवरणा, विष्णुक्रांता व अश्वगंध ह्यांचीं पानें, कांजी, गोमूत्र व चुक्र (अम्लद्रव्य) हीं एकत्र करून एका मातीच्या घागरींत घालून त्यानें शिजवून वातप्रकोपानें ज्याचें शरीर पीडिलें आहे, त्याला शेकावें (वाफारा

1. वरधारेच्या अभावीं तेड द्यावें, असें लेखी प्रतींत आहे.

द्यावा), म्हणजे तेव्हांच बरें वाटतें. निर्गुडीच्या पाल्यानें उपनाह-स्वेद (पोटिसाप्रमाणें पोथंडी करून शेकणें) करावा. तसेंच निर्गु-डी, करंज व इतर पित्तल औषधें ह्यांचा लेप, सेक (शिंपडणें) व त्यांच्याच काढ्याची धार वगैरे धरणें ह्यांत उपयोग करावा.

शतपुष्पसुरद्रुदिनेशपयो गदरामठसिन्धुभवं हरति ।
अपि लेपनतोऽस्थिगतं मरुतं कटिसंधिभवं त्रीदिनात्सततम् ॥

बडिशेप, देवदार, रुईचा चीक, कोष्ट, हिंग व सैंधव ह्यांचा लेप केला असतां कंबर व सांधे ह्यांमध्यें असलेला वात तीन दिवसांत नाश पावतो.

शार्ङ्गधरांतील महासाल्वणयोग.

कुलत्थमाषगोधूमैरतसीतिलसर्षपैः ।
शतपुष्पादेवदारुशेफालीस्थूलजीरकैः ॥ १ ॥
एरण्डबिल्वमूलैश्च रास्नामूलैश्च शिग्रुभिः ।
मिशिकृष्णाकुठेरैश्च लवणैरम्लसंयुतैः ॥ २ ॥
प्रसारण्यश्वगन्धाभ्यां बलाभिर्दशमूलकैः ।
गुडूच्या वानरीबीजैर्यथालाभं समाहृतैः ॥ ३ ॥
क्षुण्णैः स्विन्नैश्च वस्त्रेण धृतैः संस्वेदयेन्नरम् ।
महासाल्वणसंज्ञोयं योगः सर्वानिलार्तिजित् ॥ ४ ॥

हुलगे, उडीद, गहू, जवस, तीळ, शिरस, बडिशेप, देवदार, निर्गुडी, मोठें जिरें, एरंडमूळ, बेलमूळ, रास्ना, शेवग्याची साल, बाळंतशेप, पिंपळी, अजवला, पंचलवणें, आम्लपदार्थ (कांजी वगैरे), चांदवेल, अश्वगंध, चिकणा, दशमुळें, गुळवेल, कुहिलीचें बी (कवचबीज) हीं सर्व औषधें यथालाभ घेऊन कुटून उकडावीं आणि वस्त्रांत बांधून त्यानें वातविकारानें पीडित मनुष्याला शेकावें. ह्याला महासाल्वणस्वेद असें म्हणतात. हा सर्व वातसंबंधीं पीडा दूर करतो.

गुंजाफललेप.

तक्षयित्वा क्षुरेणांगं केवलानिलपीडितम् ।
तत्र प्रदेहं दद्याच्च पिष्ट्वा गुञ्जाफलैः कृतम् ॥ १ ॥
तेनावबाहुजा पीडा विश्वाची गृध्रसी तथा ।
अन्याऽपि वातजा पीडा प्रशमं याति वेगतः ॥ २ ॥

केवळ वातानें ज्या ठिकाणीं पीडा होत असेल, त्या ठिकाणीं वस्त्रानें फासण्या टाकून त्याजवर गुंजा वांटून त्यांचा लेप द्यावा, म्हणजे अवबाहुक, विश्वाची, गृध्रसी व अन्य देखील वातजन्य पीडा शांत होते.

वातनाशक पोटली.

पुन्नागैरण्डनिम्बैर्बकुलधनदद्दङ्गनारिकेलैः करंजैः
कार्पासैः शिग्रुडोलाफलसुनिषणकैः सर्षपांकोलबीजैः ।
रास्नाकुष्ठैः कुलत्थैस्तिललशुनवचाहिंगुसिद्धार्थविश्वैः
सर्वैः स्नेहैः कृतं तत्सकलपटुयुतं पोटलं वातभञ्जि ॥ १ ॥

उंडीण, एरंड, बाळंतनिंब, बकुळ, सागरगोटा, नारळ, करंज, कापूस, शेवगा, निळंबी (नीली), कुरडू, शिरस, अंकोल ह्यांचें बीं, रास्ना, कोष्ट, हुलगे, तीळ, लसूण, वेखंड, हिंग, मोहऱ्या, सुंठ, पंच लवणें व तेल, तूप वगैरे चार प्रकारचीं स्नेहद्रव्यें ह्यांची पोटली अथवा पोथंडी वातनाशक आहे.

लशुनकल्क (शार्ङ्गधरांतून)

पक्वकन्दरसोनस्य गुलिका निस्तुषीकृताः ।
पाटयित्वा च मध्यस्थं दूरीकुर्यात्तदंकुरम् ॥ १ ॥
तदुग्रगन्धनाशाय रात्रौ तक्रे विनिक्षिपेत् ।
अपनीय च तन्मध्याच्छिलायां पेषयेत्ततः ॥ २ ॥
तन्मध्ये पञ्चमांशेन चूर्णमेषां विनिक्षिपेत् ।
सौवर्चलं यवानी च भर्जितं हिंगु सैन्धवम् ॥ ३ ॥
कटुत्रिकं जीरकं च समभागानि चूर्णयेत् ।
एकीकृत्य ततः सर्वं कल्कं कर्षप्रमाणतः ॥ ४ ॥
खादेदग्निबलापेक्षी ऋतुदोषाद्यपेक्षया ।
अनुपानं ततः कुर्यादेरण्डश्रृतमन्वहम् ॥ ५ ॥
सर्वांगैकांगजं वातमर्दितं चापतन्त्रकम् ।
अपस्मारं तथोन्मादमूरुस्तम्भं च गृध्रसीम् ॥ ६ ॥
उरःपृष्ठकटीपार्श्वकुक्षिपीडाकृमीञयेत् ।
अजीर्णमातपं रोषं तप्तनीरं पयो गुडम् ॥ ७ ॥
रसोनमश्नन्पुरुषस्त्यजेदेतन्निरन्तरम् ।
मद्यं मांसं तथाऽम्लं च रसं सेवेत नित्यशः ॥ ८ ॥

१. ' निंबैः ' ह्या ठिकाणीं ' बिंबैः ' (तोंडली) असा पाठभेद आहे.

चांगले पक्क झालेले लसणीचे गड्डे घेऊन सोलून त्यांच्या कुड्या चिरून त्यांतील अंकुर काढून टाकून घाण दूर होण्याकरितां त्या रात्रीं ताकांत भिजत घालाव्या; दुसरे दिवशीं ताकांतून काढून पाट्यावर वाटाव्या. नंतर त्यांत त्या कल्काच्या पांचव्या हिश्शानें पुढील औषधांचें चूर्ण मिसळावें. पादेलोण, ओवा, भाजलेला हिंग, सैंधेलोण, सुंठ, मिरें, पिंपळी व जिरें ह्या औषधांचें समभाग चूर्ण वरील प्रमाणांत घालून पुनः वाटून अग्निबळ व ऋतुमान पाहून एक तोळ्यापर्यंत हा कल्क सेवन करावा, आणि त्याजवर एरंड-मूळाचा काढा घ्यावा. म्हणजे सर्वांगवात, एकांगवात, अर्दित-वात, अपतंत्रक, अपस्मार, उन्माद, ऊरुस्तंभ, गृध्रसी, ऊर, पाठ, कंबर, बरगड्या, कुशी ह्यांमधील पीडा व कृमि ह्यांचा नाश करतो. हा लशुनकल्क घेणाऱ्या मनुष्यानें अजीर्ण होईपर्यंत खाणें, उन्हांत जाणें, राग, ऊन पाणी, दूध व गूळ ह्यांचें सेवन करूं नये. मद्य, मांस, आंबट पदार्थ व मांसरस ह्यांचें नित्य सेवन करावें.

दुसरा प्रकार.

शुद्धः कल्को रसोनस्य तिलतैलेन मिश्रितः ।
वातरोगाञ्जयेत्तीव्रान्विषमज्वरनाशनः ॥ १ ॥

शुद्ध केलेल्या लसणीचा कल्क तिळाच्या तेलाबरोबर सेवन करावा. तो तीव्र वातरोग व विषमज्वर ह्यांचा नाश करतो.

एरंडपाक.

वातारिबीजप्रस्थं तु सुपक्कं निस्तुषीकृतम् ।
क्षीरद्रोणार्धसंयुक्तं भिषङ्मन्दाग्निना पचेत् ॥ १ ॥
घृतप्रस्थार्धयुक्पक्कं खण्डप्रस्थद्वयं क्षिपेत् ।
त्र्यूषणं सचतुर्जातं ग्रन्थिकं वह्निचव्यकम् ॥ २ ॥
छत्रा मिशिः शठी बिल्वदीप्यौ जीरे निशायुगम् ।
अश्वगन्धा बला पाठा हपुषा वेल्लपुष्करम् ॥ ३ ॥
श्वदंष्ट्रारुग्वरादारुवेल्लर्यावालुकावरी ।
एतानि पिचुमात्राणि चूर्णितानि विनिक्षिपेत् ॥ ४ ॥
वातव्याधींश्च शूलं च शोफं वृद्धिं तथोदरम् ।
आनाहं बस्तिरुग्गुल्ममामवातं कटिग्रहम् ।
ऊरुग्रहं हनुस्तम्भं नाशयेदपि योगतः ॥ ५ ॥

एरंडयांतील मगज चौसष्ट तोळे घेऊन तो पांचशें बारा तोळे दुधांत मंदाग्नीवर पचन करावा. (खव्याप्रमाणें झाल्यावर) तो बत्तीस तोळे तुपांत पक्क करून घ्यावा. नंतर एकशें अठ्ठावीस तोळे खडीसाखरेचा पाक करून त्यांत तो खवा व सुंठ मिरें, पिंपळी, दालचिनी, तमालपत्र, वेलची, नागकेशर, गाठी पिंपळमूळ, चित्रक, चवक, बाळंतशेप, बडिशेप. कचोरा, बेलफळ, ओवा, जिरें, हळद, दारुहळद, अश्वगंध, चिकणामूळ, पहाडमूळ, शेरणी, वावडिंग, पोखरमूळ, सराटे, कोष्ट, हिरडा, बेहडा, आवळकाठी, देवदार; भारंगमूळ व एलावालुक हीं औषधें एकएक तोळा घेऊन चूर्ण करून तें चूर्ण त्यांत घालून त्याच्या वड्या करून ठेवाव्या. ह्या शक्तिमानाप्रमाणें सेवन कराव्या; म्हणजे वातसंबंधी सर्व विकार, शूळ, सूज, अंत्रवृद्धि, उदर, आनाह, बस्तीसंबंधी विकार, गुल्म, आमवात, कमरेचा शूळ, ऊरुस्तंभ, हनुवटी जखडणें हे सर्व विकार दूर होतात.

स्वच्छंदभैरवरस.

शुद्धसूतं मृतं लोहं ताप्यं गन्धं च तालकम् ।
पथ्याग्निमन्थनिर्गुण्डीत्र्यूषणं टङ्कणं विषम् ॥ १ ॥
तुल्यांश मर्दयेत्खल्वे दिनं निर्गुण्डिकाद्रवैः ।
मुण्डीद्रावैर्दिनैकं तु द्विगुञ्जं वटकीकृतम् ॥ २ ॥
भक्षयेद्वातरोगार्तो नाम्ना स्वच्छन्दभैरवम् ।
रास्नामृतादेवदारुशुण्ठीवातारिजं शृतम् ।
सगुग्गुलं पिबेत्कोष्णमनुपानं सुखावहम् ॥ ३ ॥

शुद्ध पारा, लोहभस्म, माक्षिकभस्म, शुद्ध गंधक, हरताळ, हिरडेदळ, टाकळीचें मूळ, निर्गुडीचें मूळ, सुंठ, मिरें, पिंपळी, टाकणखार, बचनाग, हीं सर्व औषधें समभाग घेऊन त्यांचा एक दिवस निर्गुडीच्या पाल्याच्या रसांत खल करावा. नंतर एक दिवस गोरखमुंडीच्या रसांत खल करून दोन दोन गुंजा वजनाच्या गोळ्या कराव्या. हा स्वच्छंदभैरवरस वातरोगावर भक्षण करावा. रास्ना, गुळवेल, देवदार, सुंठ व एरंडमूळ ह्यांचा काढा करून

त्यांत गुग्गुळ घालून ह्याजवर अनुपानार्थ योजावा. म्हणजे सुख-कारक होतो.

समीरपन्नगरस.

अभ्रगन्धविषव्योषरसटङ्कान्समांशकान् ।
भावयेत्सप्तधा भृङ्गरसेन स्यात्समीरहा ॥ १ ॥
आर्द्रद्रवेण वल्लो वा खण्डव्योषेण योजितः ।
महावाताञ्जयत्याशु नासाध्मातः सुसंज्ञकृत् ॥ २ ॥

अभ्रकभस्म, गंधकभस्म, बचनाग, सुंठ, मिरें, पिंपळी, पारा व टाकणखाराची लाही हीं औषधें समभाग घेऊन त्यांचा एकत्र खल करून त्याला माक्याच्या रसाच्या सात भावना द्याव्या. म्हणजे समीरपन्नग रस होतो. हा आल्याचा रस व खडीसाखर यांशीं किंवा सुंठ मिरें, पिंपळीची पूड व खडीसाखर ह्यांतून एक वालभर द्यावा. म्हणजे महावाताला त्वारित जिंकतो; आणि नाकांत फुंकला असतां बेशुद्ध मनुष्याला शुद्धीवर आणतो.

वातविध्वंसरस.

रसं गंधकं नागवङ्गं च लोहं तथा ताम्रजं व्योम निश्चन्द्रिकं च ।
कणा टङ्कणं त्र्यूषणं नागरं वै पृथग्भागमेकं विमर्द्यैकयामम् ॥१॥
ततो वत्सनाभं चतुःसार्धभागं दृढं मर्दयेद्भावना व्योषजात्त्रिः ।
वराचित्रकैर्मार्कवैः कुष्ठजाद्भिस्त्रिभिर्भावयेन्निर्गुडीभानुदुग्धैः ॥२
महीधात्रिकाचन्द्रिकानिम्बुनीरैः समं भावयेद्वातविध्वंसनोऽयम् ।
समीरे च शूले महाश्लेष्मरोगे
ग्रहण्यां तथा संनिपाते च सर्वे ।
स्त्रियः सूतिकावातरोगेषु दद्या-
न्निषेवेत गुञ्जाद्वयं सूतमेनम् ॥ ३ ॥

पारा, गंधक, शिशाचें भस्म, वंगभस्म, लोहभस्म, ताम्रभस्म, निश्चंद्र अभ्रकभस्म, पिंपळी, टाकणखाराची लाही, सुंठ, मिरें, व पिंपळी, हीं औषधें प्रत्येकीं एक एक भाग घेऊन त्यांचा एक प्रहरभर खल करावा. नंतर त्यांत बचनाग साडेचार भाग घालून त्याला त्रिकटूच्या काढ्याच्या तीन भावना द्याव्या. नंतर त्रिफळा, चित्रक-मूळ, माका, कोष्ट, निर्गुडी, रुईचा चीक, भुईआवळी, आलें व लिंबाचा रस ह्यांच्या यथासंभव काढ्याच्या किंवा रसाच्या तीन

तीन भावना द्याव्या. ह्याला वातविध्वंसरस असें ह्मणतात. वातविकार, शूल, महान कफविकार, संग्रहणी, सर्व सान्निपात, स्त्रियांचा बाळंतरोग व वातविकार ह्यांजवर हा द्यावा. दोन गुंजांपर्यंत ह्याची योजना करावी.

वातराक्षस.

मृतं सूतं तथा गन्धं कान्तं चाभ्रकमेव च ।
ताम्रभस्मकृतं सम्यङ्मर्दयित्वा समांशकम् ॥ १ ॥
पुनर्नवागुडूच्यग्निसुरसात्र्यूषणं तथा ।
एतेषां स्वरसेनैव भावयेत्रिदिनं पृथक् ॥ २ ॥
दत्त्वा लघुपुटं सम्यक्स्वांगशीतं समुद्धरेत् ।
वातराक्षसनामाऽयं वातरोगे प्रयोजयेत् ॥ ३ ॥
तत्तद्रोगानुपानेन द्विगुंजामात्रसेवनात् ।
ऊरुस्तम्भे वातरक्ते गात्रभङ्गे तथैव च ॥ ४ ॥
आमवातं धनुर्वातं वेदनावातमेव च ।
पक्षाघातं कम्पवातं सर्वसंधिगत तथा ॥ ५ ॥
सुप्तिवातं च शूलं च उन्मादं च विनाशयेत् ।
तत्तद्रोगानुपानेन वाताशीतिविनाशनः ॥ ६ ॥

पारदभस्म (रससिंदूर), शुद्ध गंधक, कांतभस्म, अभ्रकभस्म व ताम्रभस्म हीं द्रव्यें समभाग घेऊन, त्यांस वसु, गुळवेल, चित्रक, तुळस, त्रिकटु ह्यांच्या रसाच्या वेगवेगळ्या तीनतीन भावना द्याव्या. नंतर एक लघुपुट देऊन स्वांगशीत झाल्यावर काढून घ्यावा. ह्यास वातराक्षस रस असें म्हणतात. हा संपूर्ण वातरोगांवर योजावा. त्या त्या रोगोक्त अनुपानांतून दोन गुंजा प्रमाणानें सेवन केला असतां ऊरुस्तंभ, वातरक्त, गात्रभंग, आमवात, धनुर्वात, ज्याच्या योगानें अंगांत कळा येतात तो वात, पक्षाघात, कंपवात, सर्व संधिगत वात, सुप्तिवात, शूल व उन्माद ह्यांचा नाश करतो. त्याचप्रमाणें रोगोक्त अनुपानाशीं घेतला असतां ऐशीं प्रकारचे वातविकारांचा नाश करतो.

धनुर्वातावर सूतिकाभरण रस.

सुवर्णं रजतं ताम्रं प्रवालं पारदं समम् ।
गन्धकं चाभ्रकं तालं शिला त्रिकटु रोहिणी ॥ १ ॥

एतानि समभागानि रविक्षीरेण मर्दयेत् ।
चित्रमूलकषायेण पुनर्नवारसेन च ॥ २ ॥
दिनं गजपुटे पाच्यं मूषायां धारयेत् पृथक् ।
अनुपानविशेषेण देयं गुञ्जार्धकं च तत् ॥ ३ ॥
सूतिकारोगमतुलं धनुर्वातं विशेषतः ।
त्रिदोषोत्थान्हरेद्व्याधीनिच्छापथ्यं प्रदापयेत् ।
सूतिकाभरणं नाम सर्वरोगहरं च तत् ॥ ४ ॥

सुवर्णभस्म, रौप्यभस्म, ताम्रभस्म, प्रवाळभस्म, रससिंदूर, शुद्ध गंधक, अभ्रकभस्म, हरताळभस्म, शुद्ध मनशीळ, त्रिकटु, कुटकी हीं सर्व समभाग घेऊन त्यांचा रुईचे चिकांत खल करावा. नंतर चित्रकमुळाचा काढा व वसूचा रस ह्यांमध्यें एक एक भावना देऊन एक दिवस गजपुट द्यावें. हा अनुपान योजून अर्धी गुंज प्रमाणानें दिला असतां महान सूतिकारोग, विशेषतः धनुर्वात व त्रिदोषजन्य अन्य व्याधि ह्यांचा नाश करितो. हा सूतिकाभरण नांवाचा रस संपूर्णरोगनाशक आहे. ह्याजवर इच्छेनुरूप पथ्य द्यावें.

प्रतापाग्निकुमार रस.

पारदं शुल्वजं भस्म विषं मरिचनागरम् ।
त्रिक्षारं पञ्चलवणमेभिर्मर्द्यार्द्रकद्रवैः ॥ १ ॥
काचकूप्यन्तरे क्षिप्त्वा मृदा संलेपयेद्बहिः ।
शनैर्मृद्वग्निना पाच्यं वालुकायन्त्रके दिनम् ॥ २ ॥
स्वाङ्गशीतलमुद्धृत्य दशांशं च विषं क्षिपेत् ।
सूक्ष्मचूर्णं कृतं खल्वे गुंजामात्रं प्रदापयेत् ॥ ३ ॥
सन्निपातान्निहन्त्याशु आर्द्रकद्रवसंयुतः ।
प्रतापाग्निकुमारोऽयं सर्ववातहरः परम् ॥ ४ ॥

पारा, ताम्रभस्म, बचनाग, मिरें, सुंठ, जवखार, साज्जिखार, टाकणखार, सेंधेलोण, पादेलोण, बिडलोण, मीठ व बांगडखार ह्या सर्वांचा आल्याच्या रसांत खल करावा. नंतर मातकापड केलेल्या काचेच्या कुपींत भरून वालुकायंत्रांत मंदाग्नीनें एक दिवस पचन करावा. स्वांगशीत झाल्यावर काढून त्यांत दशांश बचनागाचें चूर्ण घालून सूक्ष्म खल करून एक गुंज प्रमाणानें आल्याच्या रसांतून

द्यावा. म्हणजे संन्निपाताचा त्वरित नाश करितो. हा प्रतापाग्नि-कुमार सर्व वातरोगांचा नाश करतो.

बाळंतिणीच्या वातावर लक्ष्मीनारायण रस.

शुद्धगन्धकमेतच्च टङ्कणं विषहिंगुलम् ।
रोहिण्यतिविषाकृष्णावत्सकाभ्रकसैन्धवम् ॥ १ ॥
एतानि समभागानि खल्वमध्ये विनिक्षिपेत् ।
दन्तिद्रावैः फलद्रावैर्मर्दयेच्च दिनत्रयम् ॥ २ ॥
वल्लद्वयां वटीं कृत्वा आर्द्रकस्य जलैर्ददेत् ।
दोषज्वरे संनिपाते विषूच्यां विषमज्वरे ॥ ३ ॥
अतिसारे ग्रहण्यां च रक्तामे मेहशूलजित् ।
सूतिकावातदोषघ्नो लंकेशमिव राघवः ॥ ४ ॥
इष्टान्नं भोजयेत्पथ्यमभ्यङ्गं स्नानमाचरेत् ।
कर्पूरमिश्रताम्बूलं प्रसूनं हरिचन्दनम् ॥ ५ ॥
नारिकेलोदकं पीत्वा नारीणां संगमेव च ।
लक्ष्मीनारायणो नाम रसानामुत्तमो रसः ॥ ६ ॥

शुद्ध गंधक, टाकणखाराची लाही, बचनाग, हिंगूळ, कुटकी, अतिविष, पिंपळी, इंद्रजव, अभ्रकभस्म व सैंधेलोण हीं सर्व औषधें समभाग घेऊन खलांत घालून दांतीमुळाच्या काढ्यानें व जायफळाच्या काढ्यानें तीन तीन दिवस खल करावा. व दोन दोन वालप्रमाणें गोळ्या करून त्यांतील एकएक गोळी आल्याच्या रसांतून द्यावी. म्हणजे दोषी ज्वर, सन्निपात, विषूचिका, विषमज्वर, अतिसार, संग्रहणी, आमरक्तातिसार, मेह व शूल ह्यांना जिंकतो. रावणाच्या नाशाविषयीं जसा राम, तसा सूतिकाजन्य वातदोष-नाशाविषयीं हा लक्ष्मीनारायण रस समर्थ आहे. ह्याजवर इच्छेला येईल तें अन्न पथ्यास द्यावें. अभ्यंग करणें, स्नान, कर्पूरमिश्रित तांबूलभक्षण, लवंग, पीत चंदन ह्यांची उटी लावणें, नारळाचें पाणी पिणें व स्त्रीसंग ह्या सर्व गोष्टी हा रस सेवन करणारानें केल्या तरी चालतात. असा हा लक्ष्मीनारायण नांवाचा रस सर्व रसांत श्रेष्ठ आहे.

पथ्य व अपथ्य.

कुलत्थमाषगोधूमा रक्ताभाः शालयो हिताः ।

पटोलं शिग्रुवार्ताकं दाडिमं च परूषकम् ॥ १ ॥
मत्स्यण्डिका घृतं दुग्धं किलाटं दधिकूर्चिका ।
बदरं लशुनं द्राक्षा तांबूलं लवणं तथा ॥ २ ॥
चटकः कुक्कुटो बर्हीं तित्तिरश्चेति जांगलाः ।
शिलीन्द्रः पर्वतो नक्रो गर्गरः खुडिशो झषः ॥ ३ ॥
यथाश्रयं यथावस्थं यथाचरणमेव च ।
वातव्याधौ समुत्पन्ने पथ्यमेतन्नृणां भवेत् ॥ ४ ॥

हुलगे, उडीद, गहू, तामसाळ, पडवळ, शेवगा, वांगीं, डाळिंब, फालसा, साखऱ्या, तूप, दूध, ताकाची निवळी, दह्याची कूर्चिका (ताकतव) बोर, लसूण, द्राक्षें, विडा, मीठ, चिमणी, कोंबडा, मोर, तित्तीरपक्षी व जांगलप्राण्यांचें मांस, शिलींद्र, पर्वत (एकजातीचे मासे), सुसर, गर्गर (एकजातीचा मासा) खुडीश व झष (मत्स्यविशेष) इत्यादि जलचर प्राण्यांचें मांस हे पदार्थ जसा आश्रय (देश वगैरेंचा), जशी रोग्याची अवस्था व जसें आचरण असेल त्या मानानें वातव्याधीचे ठिकाणीं पथ्यास द्यावें.

चिन्ताप्रजागरणवेगविधारणानि
छर्दिः श्रमोऽनशनता चणकाः कलायाः ।
श्यामाकचूर्णकुरुबिन्दुनिवाररकंगु-
मुद्गास्तडागतटिनीसलिलं करीरम् ॥ ५ ॥
क्षौद्रं कषायकटुतिक्तरसा व्यवायो
हस्त्यश्वयानमपि चङ्क्रमणं च खट्वा ।
आध्मानिनोऽर्दितवतोऽपि पुनर्विशेषा-
त्स्नानं प्रदुष्टसलिलैर्द्विजघर्षणं च ॥ ६ ॥
निःशेषतन्त्रपरिकीर्तित एष वर्गो
नृणां समीरणगदेषु मुदं न दत्ते ॥ ७ ॥

चिंता, जागरण, मलमूत्रादिकांचें वेगधारण, वांतिकारक औषध, श्रम, लंघन, हरभरे, वाटाणे, सावे, चुना, मोठ्या साळी, देवभात, राळे, मूग, तळ्याचें पाणी, नदीचें पाणी, नेपती, मध, तुरट, तिखट, कडु असे रस, मैथुन, हत्ती व घोडे ह्यांजवर बसून जाणें, अतिशय चालणें, बाजेवर निजणें, पोट फुगलें असूनही अन्न खाणें, तसेंच अर्दित वात झाला असतां स्नान करणें, वाईट पाण्यानें स्नान

करणें, व दांत घासणें, इत्यादि सर्व वैद्यक ग्रंथांतून सांगितलेला हा वातरोगावरील अपथ्यकारक वर्ग वातविकारामध्यें संतोषदायक होत नाहीं.

वातरोगस्त्वसाध्योऽयं दैवयोगात्सुसिध्यति ।
अनुमानेन कुर्वन्ति वैद्यकं न प्रतिज्ञया ॥ ८ ॥

वातरोग हा असाध्य आहे तो दैवयोगानेंच साध्य होतो. ह्याजवर अनुमानानेंच चिकित्सा करितात. प्रतिज्ञेनें कोणी वैद्य उपचार करूं शकत नाहीं.

प्रथम खंड समाप्त.

कांहीं वातव्याधींची सामान्य चिकित्सा.

१. मधुर, खारट, आंबट, स्निग्ध, असे पदार्थ; नस्य, उष्ण पदार्थ, निद्रा, जड पदार्थ, सूर्यतेज, बस्ती, स्वेद, तर्पण (पौष्टिक योग), अभ्यंग, संमर्दन हे उपचार प्रकुपित वाताला शांत कारितात.

प्रलापाचें लक्षण—स्वकारणानें कुपित झालेल्या वातामुळें जो असंबद्ध व निरर्थक बोलतो त्याला प्रलाप म्हणतात.

त्याजवर उपचार—तगर, पित्तपापडा, बाहव्याची शेंग, नागरमोथे, कुटकी, वाळा, अश्वगंध, ब्राह्मी, काळीं द्राक्षें, चंदन, दशमुळें व शंखपुष्पी ह्यांचा काढा प्रलापवाताचा त्वरित नाश करतो.

रसाज्ञानाचें लक्षण—खाल्लेल्या अन्नाचे मधुरादि रस ज्याला कळत नाहींत त्याला रसाज्ञान म्हणतात.

त्याजवर उपचार—सैंधव, त्रिकटु, आम्लवेतस किंवा चुका ह्यांच्या कल्कानें जीभ घासावी.

किरातादि कल्क—काडेचिराईत, कुटकी, इंद्रजव, कुडयाची साल, ब्राह्मी, पळसाचीं फळें, मोहऱ्या, काळें जिरें, पिंपळी, पिंपळमूळ, चित्रक, सुंठ व मिरें ह्यांचा आल्याच्या रसांत कल्क करून त्यानें जीभ घासावी म्हणजे जीभेची शून्यता जाऊन रसज्ञान होतें.

त्वक्शून्यतालक्षण—त्वचेला स्पर्श झाला असतां मृदु, कर्कश, शीत किंवा उष्ण कसला स्पर्श झाला आहे हें कळत नाहीं. त्याला त्वक्शून्यता म्हणतात. स्पर्श न कळणाऱ्या त्वचेंतील रक्त काढून त्याजवर सैंधव, घेरोसा व तेल ह्यांचा लेप करावा.

ऊर्ध्ववाताचें लक्षण—कफवातानें (कफयुक्त अपान वायूनें) खालून वर ढकललेला समानवायु ऊर्ध्वगति होऊन अतिशय ढेकरा उत्पन्न करतो. त्याला ऊर्ध्ववात असें म्हणतात.

त्याजवर उपचार—सुंठ दहा भाग, वरधारा दहा भाग, हिरडेदळ पांच भाग, भाजलेला हिंग चार भाग, सैंधव एक भाग व चित्रकमूळ एक भाग ह्यांचें चूर्ण ऊर्ध्ववाताचा नाश करितें. ह्यामध्यें वरधारेच्या अभावीं तेड घ्यावें.

(लेखीप्रतीवरून)